# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

• समग्र वाङ्मय •

खंड-१७

## तर्कतीर्थ : स्मृतिगौरव लेखसंग्रह

**संपादक**

डॉ. सुनीलकुमार लवटे

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय

## खंड - १७

# तर्कतीर्थ : स्मृतिगौरव लेखसंग्रह

**संपादक**

**डॉ. सुनीलकुमार लवटे**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
सन २०२४

वाय १८९-१

▶▶ **पुस्तकाचे नाव :** तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय
खंड - १७ तर्कतीर्थ : स्मृतीगौरव लेखसंग्रह

▶▶ **संपादक :** डॉ. सुनीलकुमार लवटे

▶▶ **आयएसबीएन :** ९७८-८१-९६८४५०-३-२

▶▶ **प्रथमावृत्ती -** २०२४

▶▶ **प्रकाशक :**
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवींद्र नाट्य मंदीर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार, सयानी मार्ग,
प्रभादेवी, मुंबई-४०० ०२५

▶▶ **© प्रकाशकाधीन :**

▶▶ **मुद्रक :**
व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६ ००३.

▶▶ **मुखपृष्ठ :** गौरीश सोनार

▶▶ **किंमत :** रुपये ३२९/-

---

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः संपादकाची व लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# अध्यक्षीय मनोगत

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबईचे संस्थापक अध्यक्ष होत. त्यांच्या कार्यकाळात (१९६० ते १९८०) मराठीत विविध ज्ञानविज्ञानांचे ग्रंथ तयार करून प्रकाशित करण्यात आले. तसेच वैश्विक अभिजात साहित्य ग्रंथ भाषांतरित करून घेऊन ते प्रकाशित करण्यात आले. या काळात आंतरभारती योजनेन्तर्गत विविध भारतीय भाषांचे इतिहास व त्या भाषा नि मराठीचे कोश प्रकाशित करण्यात आले. दुर्मीळ ग्रंथ प्रकाशनार्थ अनुदान योजना सुरू करण्यात आली. महत्त्वाच्या नियतकालिकांना प्रकाशन सातत्यार्थ अनुदान देण्यात आले. शिवाय समग्र वाङ्मय प्रकाशनाचा प्रारंभ झाला. आज मंडळ तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय प्रकाशित करत आहे, याचा आनंद होत आहे. हा मंडळाचा महत्त्वपूर्ण व महत्त्वाकांक्षी प्रकल्प होय. तो सिद्ध केल्याबद्दल या प्रकल्पाचे संपादक डॉ. सुनीलकुमार लवटे यांचे मंडळ ऋणी आहे, आणि त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करते.

प्रकल्प संपादक डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय १८ खंडात संपादित करून प्रकाशनार्थ सादर केले आहे. सुमारे अकरा हजार पृष्ठांचे हे वाङ्मय वैविध्यपूर्ण आहे. यात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिखित मराठी विश्वकोश नोंदी, भाषणे, लेख, मुलाखती, प्रबंध व चरित्रे (मराठी आणि संस्कृत), ग्रंथ प्रस्तावना, पुस्तक परीक्षण, पत्रे, संस्कृत हस्तलिखित ग्रंथ विवरण सूची, भारतीय राज्यघटनेचे संस्कृत भाषांतर यांचा समावेश आहे. शिवाय या प्रकल्पात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या जीवनावर आधारित स्मृती व गौरव लेख आणि यांच्या साहित्यावरील समीक्षात्मक लेख अंतर्भूत करण्यात आले आहेत. प्रकल्पाच्या अंतिम खंडात तर्कतीर्थांच्या अप्राप्त साहित्याची सूची देण्यात आली आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या साहित्याची सूची नसताना संपादकांनी हे वाङ्मय संकलित करून त्यांचे साहित्य प्रकार, स्वरूप, विषयाधारित वर्गीकरण करून सादर केले आहे. प्रत्येक खंडास

स्वतंत्र व विस्तृत प्रस्तावना असल्याने तर्कतीर्थ वाङ्मयाची पीठिका प्रारंभीच वाचकास कळते. सर्व साहित्याचे पूर्वसंदर्भ देण्यात येऊन त्यांची क्रमागत प्रकाशन सूची प्रत्येक खंडाच्या शेवटी देण्यात आली आहे. परिशिष्टात ऋणनिर्देशांतर्गत साहित्य संकलनास साहाय्यभूत ठरणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करण्यात आला आहे. शिवाय तर्कतीर्थ जीवन परिचय, तर्कतीर्थ साहित्य व संदर्भग्रंथसूची, संपादक परिचय प्रत्येक खंडाच्या शेवटी देण्यात आला आहे. या अर्थाने व अंगांनी हा प्रकल्प परिपूर्ण व उपयुक्त बनविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे प्रकाशित, संपादित व भाषांतरित ग्रंथ, आणि चरित्रे यापूर्वी वेळोवेळी प्रकाशित झाली होती. पण यात त्यांचे समग्र वाङ्मय संकलित नव्हते. या प्रकल्पात त्याची भरपाई करण्याचा प्रयत्न संपादकांनी केला आहे. यामुळे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे समग्र जीवन, कार्य, विचार जिज्ञासू वाचक, अभ्यासक, संशोधकांना एकत्र उपलब्ध झाले आहे. तो या प्रकल्पाचा उद्देश होता. तो पूर्णत्वास गेल्याचा मंडळास आनंद आहे. प्रकल्पाच्या अठराव्या खंडाच्या शेवटी प्रकल्प परिचय पुस्तिका अंतर्भूत असून त्यामुळे समग्र प्रकल्प एका दृष्टिक्षेपात समजणे सुलभ झाले आहे. हा प्रकल्प जिज्ञासूंना उपयुक्त होईल अशी अपेक्षा आहे.

दि. ८ मार्च, २०२४
जागतिक महिला दिन

**डॉ. सदानंद मोरे**
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# संपादकीय

'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय' प्रकल्पातील हा १७ वा खंड तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे समकालीन सहकारी, सुहृद, स्वकीय, आत्मीय जनांनी वेळोवेळी लिहिलेल्या गौरव लेख, स्मृती लेख, श्रद्धांजली लेख, आठवणी इत्यादी स्वरूपांत घेतलेला व्यक्ती, कार्य आणि विचारांचा आढावा आहे.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा सार्वजनिक जीवनातील वावर नि संचार सन १९२३ च्या नंतरचा. सन १९२३ मध्ये ते काशी येथील उच्च शिक्षण संपवून कलकत्ता येथील शासकीय संस्कृती महाविद्यालयातून (सध्याचे संस्कृत विद्यापीठ, कोलकाता) 'तर्कतीर्थ' पदवी संपादन करून प्राज्ञपाठशाळा, वाई येथे अध्यापक म्हणून रुजू होऊन कार्य करू लागले. साधारणपणे सन १९२३ ते १९३० या काळात ते आपले गुरू नारायणशास्त्री मराठे तथा स्वामी केवलानंद सरस्वती यांच्या मार्गदर्शनाखाली विविध ज्ञातिसभा, धर्मसभा, परिषदांमधून भाग घेत धर्मसुधारणा कार्य करू लागले. वाई, सोनगीर, हैदराबाद, काशी, प्रयाग इत्यादी ठिकाणांच्यावरील सभा नि परिषदांमधून त्यांनी केलेले वादविवाद, खंडनमंडन, उत्तर पक्ष बरेच गाजले तरी सनातनी धर्मपंडित आपले शब्दप्रामाण्य सोडण्यास तयार होत नाहीत, हे त्यांच्या लक्षात आले.

मग त्यांनी आपला मोर्चा सन १९३० च्या कायदेभंग चळवळीकडे वळवला. वरील धर्मसभांमधून त्यांच्यात सभाधीटपणा आला. वक्तृत्व फुलले. त्यांच्या भाषणांनी सातारा जिल्ह्यात स्वातंत्र्य चळवळीविषयी जनसामान्यांत जागृती घडून आली. सन १९३२ च्या मिठाच्या सत्याग्रहात महात्मा गांधींना दांडी (गुजरात) येथे ब्रिटिशांनी अटक केल्यानंतर भारतभर कायदेभंग चळवळ गतिमान झाली. राज्याराज्यांत 'वॉर कौन्सिल्स' स्थापन करण्यात आली. महाराष्ट्राच्या वॉर कौन्सिलमध्ये तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा अंतर्भाव होता. कायदेभंग चळवळीत कार्यकर्ता शिबिरे आयोजित करून चळवळीसाठी कार्यकर्ते तयार करण्याचे कार्य हाती घेण्यात आले. त्यात संगमनेर (जि. अहमदनगर) शिबिर आयोजनात ते सहभागी होते. नामपूर, कळवण, बागलाण, मांगीतुंगी इत्यादी धुळे, नाशिक जिल्ह्यांतील आदिवासीबहुल प्रदेशांत माळी-कोळी आदिवासींचे तर्कतीर्थांनी जंगल सत्याग्रहाच्या व करबंदी सत्याग्रहाच्या

माध्यमातून हजारो आदिवासींचे मोर्चे काढले. त्यात गोळीबार झाला होता. बागलाणचा हा जंगल सत्याग्रह स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात 'मिनी बारडोली' म्हणून ओळखला जातो. याच काळात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी ब्रिटिश सत्तेशी असहयोग आंदोलनाचा भाग म्हणून शेकडो गावकामगार पाटलांचे राजीनामे मिळविले व ब्रिटिशांना सादर केले. तर्कतीर्थांच्या या संघटन, प्रबोधन, कायदेभंग कार्याची नोंद घेऊन तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना येरवडा व धुळे येथे तीन ते सहा महिन्यांचा कारावास व ५१ रुपये दंडाच्या शिक्षा वेळोवेळी ठोठावण्यात आल्या होत्या. यातून ते सार्वजनिक नेते, कार्यकर्ते म्हणून उदयास आले.

या चळवळीनंतर ते महात्मा गांधींचे निकटवर्ती बनले. महात्मा गांधींच्या अस्पृश्यता निर्मूलन कार्यात आवश्यक धर्मग्रंथ, संदर्भांची जुळवणी, चर्चांमध्ये पुरोगामी धर्मपंडित म्हणून नेतृत्व व सहभाग, निवेदन प्रस्तुती अशी अनेक प्रकारची कार्ये करून तर्कतीर्थांनी आपला वेद, उपनिषद, पुराण, अरण्यक, ब्राह्मण ग्रंथ, रामायण, महाभारत, श्रीमद्भागवत इत्यादींवरील अधिकार सिद्ध केला. देवदास गांधी व लक्ष्मी राजगोपालाचारी प्रेमविवाह जो आंतरजातीय विवाह होता, त्याचे पौरोहित्य केले. स्वातंत्र्योत्तर काळात मे १९५१ ला सरदार पटेल यांनी सुरटी सोमनाथ मंदिराचा जीर्णोद्धार करून ते हरिजनांना खुले केले. त्या उपक्रमाचा प्रारंभ स्वातंत्र्यानंतर लगेचच सुरू करण्यात आला होता. तेव्हा महात्मा गांधी यांनी सरदार वल्लभभाई पटेल व न. वि. तथा काकासाहेब गाडगीळ यांनी हे जीर्णोद्धार कार्य लोकवर्गणी व लोकसहभागातून करण्याचा सल्ला दिला होता. त्यानुसार उभारलेले हे मंदिर सर्व जाती-धर्म बांधवांना खुले होणार, म्हणून त्याच्या प्राणप्रतिष्ठा महोत्सवावर शंकराचार्यांच्या नेतृत्वाखालील ब्रह्मवृंदांनी बहिष्कार घातला. या निकराच्या प्रसंगी सन १९५२ ला तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी आपले गुरू स्वामी केवलानंद सरस्वती यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रातून शंभरहून अधिक पुरोहित नेऊन प्राणप्रतिष्ठा कार्य संपन्न करून आपले पुरोगामीपण सिद्ध केले. यामुळे तर्कतीर्थांना स्वतःच्या गावात वाई येथे ब्रह्मवृंदांच्या बहिष्कारास सामोरे जावे लागले होते. त्या काळात ते रॉयवादी होते. मानवेंद्रनाथ रॉय यांची यामुळे त्यांना नाराजी ओढवून घ्यावी लागली होती.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी एकीकडे सार्वजनिक कार्यांत नेतृत्व करत 'सार्वजनिक चरित्र' बनत होते, तर दुसरीकडे या सर्व कार्यांच्या अनुषंगाने भाषणांद्वारे प्रबोधन व लेखनाद्वारे समाजमानसाची प्रागतिक घडण करण्यात कोणतीही कसूर ठेवत नव्हते. या काळात ते वृत्तपत्रे व नियतकालिकांमधून निरंतर लेखन करीत, तद्वत ग्रंथ प्रकाशनात सातत्य ठेवत. या काळात त्यांनी 'आनंदमीमांसा' (१९३३), 'अस्पृश्यत्वमीमांसा' (१९३४), 'जडवाद अर्थात अनीश्वरवाद' (१९४१), 'हिंदुधर्माची समीक्षा' (१९४१), 'ज्योति-निबंध' (१९४७), 'वैदिक संस्कृतीचा विकास' (१९५१) सारखे संस्कृत, मराठी प्रबंध, ग्रंथ, भाषणसंग्रह प्रकाशित करून वाचकांना उपलब्ध करून दिले. या काळात त्यांनी विविध व्याख्यानमाला, साहित्य संमेलने यांतून साहित्य, धर्म, राजनीती, संस्कृतीविषयक व्याख्याने दिली. अनेक साहित्य, संमेलनांची अध्यक्षपदे भूषवून भाषणे दिली. त्यात 'सार्वजनिक वाचनालय, नाशिक शताब्दी व्याख्यानमाला' (१९४१),

'गोमंतक मराठी साहित्य संमेलन, मुंबई' (१९४३), 'मुंबई व उपनगर मराठी साहित्य संमेलन, गिरगाव, मुंबई' (१९४४), 'वाङ्मय चर्चामंडळ, बेळगाव व्याख्यान' (१९४९), 'मराठी वाङ्मय परिषद, बडोदे' (१९५३), विविध विद्यापीठीय व्याख्यानमाला (१९४०, १९५१) यांचा अंतर्भाव आहे. यातूनही तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी 'मराठी साहित्यिक' म्हणून उदयाला आले. सन १९५४ च्या नवी दिल्लीत भरलेल्या '३७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलना'चे ते अध्यक्ष होणे व सन १९५५ ला साहित्य अकादमी पुरस्कार सुरू झाल्यावर त्याचा पहिला मान तर्कतीर्थांच्या 'वैदिक संस्कृतीचा विकास' या भाषणसंग्रहास मिळणे ही त्यांच्या साहित्यिक श्रेष्ठत्वाचीच निशाणी होती.

१ मे १९६० ला मराठी भाषिकांचे स्वतंत्र महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यावर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे संस्थापक अध्यक्ष बनले. त्यांनी मराठी ज्ञानभाषा बनविण्याचे सर्वतोपरी प्रयत्न केले. मंडळामार्फत शेकडो मौलिक नि भाषांतरित ग्रंथांची निर्मिती, मराठी विश्वकोश निर्मिती, प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाईमार्फत 'धर्मकोश'निर्मिती, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय अध्यक्ष, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे संस्थेत महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्यांपैकी एक, सेंटर फॉर दि स्टडी ऑफ सोशल चेंज, वांद्रे (पूर्व), मुंबईच्या संस्थापकांपैकी एक अशा अनेक कार्यांतून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय, साहित्य, प्रबोधन इत्यादी क्षेत्रांचे कर्णधार बनले. त्यांनी केलेल्या या वैविध्यपूर्ण कार्यकर्तृत्वामुळे वेळोवेळी त्यांना अनेक राष्ट्रीय साहित्य, संस्कृती, नागरी सन्मान लाभले. त्यात 'पद्मभूषण', 'पद्मविभूषण', राष्ट्रीय संस्कृत पंडित, साहित्य अकादमी महदत्तर सदस्यत्व (फेलोशिप), 'राष्ट्रभूषण' इत्यादी सन्मान लाभले.

या सर्वांची नोंद घेऊन वेळोवेळी अनेक मान्यवरांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या साहित्य, कार्य, विचार व्यक्तिमत्त्वाचा गौरव, समीक्षा, स्मरण करणारे लेख लिहिले. त्यांत सर्वश्री. न. चिं. केळकर, द्वा. भ. कर्णिक, डॉ. के. ल. दप्तरी, प्रा. गोवर्धन पारीख, यशवंतराव चव्हाण, दुर्गा भागवत, श्री. शं. नवरे, भाई माधवराव बागल, मे. पुं. रेगे, प्रा. रा. ग. जाधव, माधव गडकरी, गोविंद तळवलकर, डॉ. वि. भि. कोलते, डॉ. यु. म. पठाण, प्रा. अरुण कांबळे, शंकर सारडा, प्राचार्य राम शेवाळकर, प्राचार्य शिवाजीराव भोसले, प्रा. य. दि. फडके प्रभृती मान्यवरांचा समावेश आहे. अशा सुमारे शंभर लेखांपैकी निवडक लेख या संग्रहात संग्रहित करण्यात आले आहेत. त्यातून प्रतिबिंबित होणारे तर्कतीर्थ हे प्रकांड पंडित, वेदमूर्ती, बुद्धिवादी, धर्मसुधारक, वक्ता, साहित्यिक, राजकीय भाष्यकार, रॉयवादी, संपादक, भाषांतरकार म्हणून समोर येतात. त्याचा आढावा व संग्रह या खंडाचे मूळ उद्दिष्ट होय.

**डॉ. सुनीलकुमार लवटे**
संपादक

दि. ४ जून, २०२३

# अनुक्रमणिका


○ **अध्यक्षीय मनोगत**.................................................................. तीन

○ **संपादकीय**.........................................................................पाच

○ **प्रस्तावना- 'भयचकित नमावे तुजला'**....................................पंधरा

**(अ) गौरव लेख**

१. **महाराष्ट्राचा सत्पुत्र** - प्रतिनिधी, किर्लोस्कर .................................... ०१

२. **एक वाया गेलेला विद्वान** - दि. वि. देव .......................................... ०८

३. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** - श्री. शं. नवरे.................................. १३

४. **शास्त्रीबुवांची मतांतरे आणि वेषांतरे** - श्री. शं. नवरे.......................... १९

५. **उपेक्षितांचे उपेक्षित पुढारीः तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**- द्वा. भ. कर्णिक २७

६. **आधुनिक महाराष्ट्राचे बुद्धिवादी वेदान्तीः** द्वा. भ. कर्णिक ................ ३२

७. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** - मा. प. मंगुडकर ............................ ३८

८. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** - प्रा. गोवर्धन पारीख......................... ४२

९. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशीः एक थोर 'क्रियावान पंडित'**
- प्रा. गोवर्धन पारीख ................................................................... ५०

१०. **निगर्वी, निर्भीड आणि निःस्पृहः तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** -
लक्ष्मणराव काशीनाथ हसमनीस...................................................... ६१

११. **तर्कतीर्थांचे क्रांतिकार्य** - रमेश रामचंद्रराव चव्हाण............................ ६६

१२. **माझ्या सहवासातील तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** -
श्री. भाई माधवराव बागल ............................................................ ७०

१३. **ज्ञानाचा प्रवाह खुले करणारे शास्त्रीजी** - प्राचार्य अ. के. भागवत ....... ७४

१४. **शास्त्रीबुवाः एक प्रचंड कोडे** - श्री. शं. नवरे..................................... ७८

१५. **शास्त्रीबुवा आणि रॉयवादी चळवळ** - द्वा. भ. कर्णिक...................... ८२
१६. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी: एक कृतार्थ जीवन** - मे. पुं. रेगे......... ८८
१७. **विचार शिल्पकाराची प्रतिमा : तर्कतीर्थ** - रा. ग. जाधव.................. ९९
१८. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** - अनिल डोंगरे............................. १०८
१९. **तर्कतीर्थ** - रवींद्र पिंगे................................................................ ११२
२०. **तर्कतीर्थ जोशी: एक दर्शन** - रा. ना. चव्हाण................................ ११८
२१. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी: शास्त्र आणि शस्त्र-**
यशवंतराव चव्हाण .................................................................. १२७
२२. **प्राज्ञपाठशाळा आणि शास्त्रीजी** - ना. बा. मराठे............................ १३०
२३. **महाराष्ट्रातील प्रबोधनाची चळवळ व शास्त्रीजी** - रा. ना. चव्हाण.... १३८
२४. **शास्त्रीजींचा सामाजिक विचार** - रा. ग. जाधव............................. १६२
२५. **परिवर्तनाचे मार्गदर्शक: तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**- दिनकर साक्रीकर १६९
२६. **तर्कतीर्थांना अभिवादन** - दा. गो. देशपांडे.................................... १७५
२७. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** - द्वा. भ. कर्णिक............................ १७८
२८. **विसाव्या शतकाच्या इतिहासाचे साक्षीदार** - अनिल जोशी .......... १८४
२९. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी: एक कर्मयोगी** - रा. ना. चव्हाण........ १८७
३०. **नित्य नव्या विचारांत रमणारा आनंदयात्री** - अनिल जोशी ........... १९०
३१. **साहित्य-संस्कृतीचे महातीर्थ** - प्राचार्य शिवाजीराव भोसले ............ १९३
३२. **महाराष्ट्रातील एक थोर विचारवंत:**
**तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**-मीनल भावे .................................. २०१
३३. **आनंदवादी, प्रकांड पंडित** - गोविंद तळवलकर............................. २०४
३४. **भारतीय प्रबोधनाचे प्रतीक :** लक्ष्मणशास्त्री जोशी- प्रा. मे. पुं. रेगे...... २०९
३५. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** - शरद बेडेकर............................... २२२
३६. **तर्कतीर्थांची विचारयात्रा** - प्राचार्य राम शेवाळकर .......................... २२६
३७. **साध्या वृत्तीचा प्रकांड पंडित** - प्रा. मे. पुं. रेगे............................... २३२
३८. **कर्मयोगी विद्वान** - रा. ग. जाधव ................................................ २३६
३९. **तर्कतीर्थ: प्राज्ञ धर्मसमीक्षक** - डॉ. मो. गो. धडफळे ....................... २३९
४०. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी: शतकाचा वाटसरू** - मे. पुं. रेगे....... २४७
४१. **'मराठी विश्वकोश'कर्ते : शास्त्रीजी** - प्रा. रा. ग. जाधव.................... २५५
४२. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी: एक 'विभज्यवादी' विचारवंत -**
प्रा. डॉ. मो. गो. धडफळे.........................................................२६५
४३. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी: धर्मसुधारणा**
**आणि समाजसुधारणा** - स. मा. गर्गे ........................................... २७३

४४. **तर्कतीर्थ : एक चालते, बोलते विद्यापीठ** - अ. पां. देशपांडे ........... २८०
४५. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** - वी. र. काळे ................................ २८७
४६. **अभिवादनः तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री** - अथर्व देसाई ........................ ३१०
४७. **इहवादी ऋषी** - नरेंद्र चपळगावकर ............................................. ३१४
४८. **महाराष्ट्रीय विचारविश्वाचे अजातशत्रू नेतृत्वः**
श्री. मा. भावे ............................................................................ ३२३
४९. **प्रज्ञातीर्थः लक्ष्मणशास्त्री जोशी** - डॉ. सुनीलकुमार लवटे ................ ३२७
५०. **माहीत नसलेले तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी -**
डॉ. सुनीलकुमार लवटे ............................................................... ३४१
५१. **रंग, रेषांच्या पलीकडचे व्यक्तिचित्र : वाईचे शास्त्रीजी -**
डॉ. सुनीलकुमार लवटे ............................................................... ३६२
५२. **तर्कतीर्थांचे वाचन** - डॉ. सुनीलकुमार लवटे .................................. ३६७
५३. **प्राज्ञपाठशाळा, 'नवभारत' आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी -**
प्रतिभा मिस्त्री (पोरे) .................................................................. ३७२
५४. **'नवभारत' आणि तर्कतीर्थांमधील अनुबंध** - डॉ. सुनीलकुमार लवटे ३७७

**(ब) श्रद्धांजली लेख**

५५. **ज्ञान भास्कराचा अस्त** - डॉ. यु. म. पठाण .................................... ३८९
५६. **संस्कृतीचा इतिहासकार** - मे. पुं. रेगे ........................................... ३९२
५७. **जिव्हाळ्याचा सुहृद हरपला** - द्वा. भ. कर्णिक .................................. ३९७
५८. **विश्वसंस्कृतीचे स्वप्न पाहणारेः तर्कतीर्थ जोशी**- अनिल जोशी ...... ४००
५९. **निःशेष प्रेम करणारे : आबा** - डॉ. मधुकर जोशी .......................... ४०६
६०. **ज्ञानदानात रमणारे तर्कतीर्थ** - एस. डी. इनामदार ............................ ४१०
६१. **ज्ञानतपस्वी** - सुभाष भेंडे .............................................................. ४१३
६२. **अखंड चाललेल्या ज्ञानयज्ञाचे कुंड विझले** - यशवंत दिनकर फडके ४१८
६३. **चालता-बोलता ज्ञानकोश हरपला** - मधुकाका कुलकर्णी ................ ४२१

**(क) आठवणी**

६४. **कौटुंबिक जीवनातील शास्त्रीजी** - सौ. अरुंधती खंडकर ................. ४२९
६५. **आबा व मी** - डॉ. मधुकर जोशी.................................................. ४३७
६६. **माझे आजोबा** - लक्ष्मी जोशी ...................................................... ४५७
६७. **माझे सासरे** - सौ. इंदू जोशी ....................................................... ४६१
६८. **आबाः एक 'आनंदयात्री'** - सुमन खंडकर.................................... ४६४

६९. **माझे काका: तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी -**
वैद्य सौ. शुभदा अ. पटवर्धन ........................................................ ४८०
७०. **तर्कतीर्थांच्या सहवासात** - माधव गडकरी.................................... ४८५
७१. **तर्कतीर्थ: सहवास आणि संवाद** - मधु मंगेश कर्णिक...................... ५०३
७२. **यशवंतराव, किसन वीर आणि तर्कतीर्थ** - अनिल जोशी................ ५०९
७३. **शास्त्रीजींबद्दलच्या काही व्यक्तिगत आठवणी** - श्री. ना. नानजकर... ५२१
७४. **शास्त्रीजींच्या सहवासात** - अशोक भट ........................................ ५२४
७५. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री यांच्या सहवासात** - रा. कृ. बाबर ............. ५३४
७६. **दोन महापुरुषांचे विचारधन** - विश्वास नाईकनवरे........................... ५३८
७७. **बहुजन समाजातील विवेकवंतांचे लाडके व जवळचे तर्कतीर्थ -**
रा. ना. चव्हाण.......................................................................... ५४२
७८. **मोहनदासांचे चेले: तर्कतीर्थ** - बाबा फाटक ................................ ५४५
७९. **समाजशिक्षक शास्त्रीजी** - अनिल जोशी..................................... ५४७
८०. **माझे सहाध्यायी शिक्षक: तर्कतीर्थ** - पुंडलीकजी कातगडे .............. ५५३
८१. **परमतसहिष्णू व समंजस व्यक्तिमत्त्व** - श्रीकृष्ण नीळकंठ लेले.......... ५५६
८२. **आबांचं घर** - सुभाष अवचट ...................................................... ५५८
८३. **तर्कतीर्थांचा शांतपणा, सहिष्णुता व वादपटुता** - श्री. म. शं. ढोले.... ५६६
८४. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी -**
हाजी महमूद मिया शेख मोहियुद्दीन दारूवाले................................... ५७२
८५. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** - वसंत बोराटे................................ ५७४
८६. **सहवास तर्कतीर्थांचा** - राम देशपांडे............................................ ५७६
८७. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** - संभाजीराव पाटणे......................... ५७९
८८. **प्रकांड पंडित: तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** - अरुण गोडबोले....... ५८१
89. **A Tribute to My Father : Laxmanshastri Joshi-**
Arundhati Khandka**r** ............................................................ 584
**लेखांची संदर्भ सूची** ...................................................................... ५८९
**परिशिष्टे**
१. **ऋणनिर्देश** ................................................................................ ५९७
२. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी:** परिचय ........................................ ६०१
३. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी: साहित्य संपदा व संदर्भ ग्रंथ सूची**... ६०५
४. **संपादक परिचय :** डॉ. सुनीलकुमार लवटे ..................................... ६१५

# प्रस्तावना

# प्रस्तावना

# ‘भयचकित नमावे तुजला’

‘तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय’ प्रकल्पातील हा १७ वा खंड ‘तर्कतीर्थ स्मृतिगौरव लेखसंग्रह’ म्हणून वाचकांपुढे सादर करताना आनंद होत आहे. या खंडाची पार्श्वभूमी आणि भूमिका ‘संपादकीया’मध्ये व्यक्त करण्यात आलेली आहे. ती जिज्ञासूंनी अवश्य वाचावी. तर्कतीर्थांबद्दल त्यांच्या समकालीन सुहृद, सहकारी, हितचिंतक, समीक्षक, आप्तस्वकीयांनी सन १९३७ पासून ते आजअखेर वेळोवेळी वृत्तपत्रे, नियतकालिके, ग्रंथ इत्यादींतून गौरव लेख, प्रासंगिक लेख, श्रद्धांजली लेखांशिवाय आठवणी, पत्रे, इत्यादी लेखन केले आहे. त्यांचा उद्देश सन्मान, प्रशंसा, गौरव, आठवणी, श्रद्धांजली, अभिवादन इत्यादी राहिला आहे. हे लेखन विविध सन्मान, गौरव, पुरस्कार, पदवी प्रदान, षष्ठ्यब्दिपूर्ती, अमृत महोत्सव, सहस्रदर्शन, नवती महोत्सव, वाढदिवस इत्यादी निमित्ताने झाले आहे.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे दुःखद निधन वृद्धापकाळाने वयाच्या ९३ व्या वर्षी २७ मे, १९९४ रोजी महाबळेश्वर मुक्कामी त्यांच्या ‘कृष्णादर्शन’ निवासस्थानी झाले. त्यानंतर त्यांना श्रद्धांजली वाहणारे लेख जवळजवळ सर्व मराठी वृत्तपत्रे व नियतकालिकांनी प्रकाशित करून त्यांच्या स्मृतीस अभिवादन केले. नंतर जयंती, पुण्यतिथी नि जन्मशताब्दी निमित्ताने निघालेल्या विशेष अंकांतून पूर्वस्मृतींना उजाळा देण्यात आला. त्यात आठवणींवर भर होता.

अशा प्रकारे तर्कतीर्थांवर गौरव लेख, श्रद्धांजली लेख व आठवणी अशा तीन प्रकारे झालेल्या लेखनाची उपर्युक्त तीन विभागांत मांडणी करून हे ‘स्मृतिगौरव लेखन’ या खंडाद्वारे प्रस्तुत करण्यात आले आहे. ते लेखन तर्कतीर्थांचे जीवन, शिक्षण, वाचन, संस्कार, घडण, प्रभाव, व्यक्तिमत्त्व, कार्य, विचार इत्यादींवर प्रकाश टाकणारे आहे. ‘तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय’ प्रकल्पातील विविध सोळा खंडांमधून त्यांचे मूळ लेखन विश्वकोश नोंदी, भाषणे, लेख, मुलाखती, प्रस्तावना, पुस्तक परीक्षणे, पत्रव्यवहार, प्रबंध, चरित्र, भाषांतर इत्यादी स्वरूपांत झाले होते. ते या पूर्वीच्या १६ खंडांत संग्रहित, संपादित

करून प्रस्तुत करण्यात आले आहे. या मूळ लेखनाबरोबर त्यांच्या जीवन, कार्य, विचार, साहित्याचे आकलन व समीक्षा करणारे जे लेखन उपर्युक्त समग्र वाङ्मयाचे संकलन करताना हाती आले, ते दोन अधिकच्या खंडांमधून- 'स्मृतिगौरव खंड' आणि 'साहित्य समीक्षा खंडा'मधून वाचकांसमोर अशासाठी प्रस्तुत करण्याचा घाट घातला की, मूळ लेखन जसे विखुरलेल्या स्थितीत होते, तशीच स्थिती या अधिकच्या दोन खंडांतील सामग्रीचीही होती. ती समोर आल्याने समग्रतेस सर्वंकषतेचे परिमाण लाभेल, या अपेक्षा नि हेतुने हा उपक्रम केला आहे. मराठी समग्र साहित्य प्रकाशन परंपरेत या प्रयत्नाने समग्रतेच्या पुढची अवस्था 'सर्वंकष आकलना'ची सुरू होईल तर लेखकीय संशोधन, संपादन, प्रकाशनास एक नवा आयाम मिळेल व तो अशा प्रकारच्या लेखनाच्या विकासाचे नवे पाऊल ठरेल, अशी आशा आहे.

'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय' प्रकल्पास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांनी ऑक्टोबर, २०१९ ला मान्यता दिली. दरम्यान कोविड- १९ चा संसर्ग झाल्याने मार्च, २०२० ते मार्च, २०२२ या काळात जनजीवन ठप्प झाले होते. संदर्भ संकलन मोठे आव्हान होते. तर्कतीर्थ वाङ्मयच काय, साधी ग्रंथसूचीही नव्हती. प्रारंभी करण्यात आलेला प्रकल्प प्रस्ताव हा अक्षरशः अंदाजावर आधारित होता. हिमनगाच्या दिसणाऱ्या टोकापेक्षा मूळ हिमनग कितीतरी प्रचंड असतो. तसे तर्कतीर्थ समग्र वाङ्मयाचे स्वरूप होते. त्यामुळे हे कार्य करील तसे ते मारुतीच्या शेपटीप्रमाणे वाढतच गेले. या प्रकल्पातील प्रस्तावित १८ खंडांशिवाय माझ्या संग्रही चरित्र लेखनाच्या अनुषंगाने ग्रंथ, लेख, पत्रे, छायाचित्रे, कागदपत्रे यांचा असा खजिना हाती आला आहे की, समग्र वस्तुनिष्ठ व क्रमागत चरित्र (Chronological and Objective Biography) असा स्वतंत्र खंड देणे शक्य आहे. पण कुठेतरी थांबायला हवे, म्हणून तो मोह सध्या टाळला आहे.

## अ) गौरव लेख

### १. महाराष्ट्राचा सत्पुत्र

हा लेख 'प्रतिनिधी, किर्लोस्कर मासिक' अशा लेखकीय शीर्षकाने प्रकाशित झाला असला तरी तत्कालीन अशा प्रकारच्या विविध लेखांचा अभ्यास करता, हा लेख तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे प्राज्ञपाठशाळा, वाईचे सहाध्यायी आणि नंतर मराठी वृत्तपत्र सृष्टीत पत्रकार, संपादक व समाजजीवनात समाजसेवक म्हणून मान्यता पावलेल्या श्री. शं. नवरे यांनी लिहिला असावा. 'मौज' साप्ताहिकात 'व्यक्ती तितक्या प्रकृती' सदर चालवणारे श्री. शं. नवरे ज्यांना माहीत आहेत, ते याच्याशी नक्कीच सहमत होतील.

या गौरव लेखाची पार्श्वभूमी आहे. गांधीवाद सोडून तर्कतीर्थ सन १९३६ मध्ये मानवेंद्रनाथ रॉय यांच्या निकटवर्तीयांत सामील झाले होते. मार्क्सवाद, रॉयवाद हे विचार त्यांना प्रमाण वाटू लागण्याचा हा काळ. तर्कतीर्थ वेषांतरे जितकी करत आलेत, तितकीच

त्यांच्या जीवनात मतांतरेही घडून आली आहेत. याचे समकालीनांना आश्चर्य होते, तितकाच आदर त्यांच्या समर्पणाविषयी, विद्वत्तेविषयी ही होता. म्हणून या लेखात लेखक तर्कतीर्थांना सत्पुत्र, नावीन्यपूर्ण चरित्र, उद्बोधक आयुष्य, चित्ताकर्षक व्यक्तिमत्त्व इत्यादी उपाधींनी गौरवतच प्रारंभ करतो. सदर लेखात आत्मीयतेने तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे समग्र परंतु संक्षिप्त शैलीत चरित्र प्रस्तुत करण्यात आले आहे. ते चपखल आहे.

### २. एक वाया गेलेले विद्वान

१५, १६, १७ डिसेंबर, १९४४ रोजी मुंबई व उपनगर मराठी साहित्य संमेलनाचे आठवे अधिवेशन विल्सन हायस्कूल, गिरगाव, मुंबई येथे संपन्न झाले. त्याच्या उपाध्यक्षपदी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची निवड झाली होती. त्याप्रीत्यर्थ लिहिलेला हा लेख. या निवडीपूर्वी तर्कतीर्थांचे 'हिंदुधर्माची समीक्षा' (१९४१) हे पुस्तक प्रकाशित झाले होते. धर्मसुधारणावादी व प्रागतिक दृष्टिकोन ठेवणारे धर्मचिकित्सा झाली पाहिजे, म्हणून आग्रही होते. तर सनातनी मंडळींना ही भूमिका रुचणारी खचितच नव्हती. असा वर्ग त्यांना 'वाया गेलेला विद्वान' म्हणून संभावना करत असला तरी त्या वर्गासही या पंडिताच्या सव्यसाचीपणाची मोहिनी होती, हे या लेखनातून स्पष्ट होते. मतभेदांसह आदर ही समाजाची प्रगल्भ वृत्तीच म्हणावी लागेल.

### ३. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

उपर्युक्त साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर संमेलनाच्या पूर्वसंध्येस लिहिलेला हा लेख. श्री. शं. नवरे हे तर्कतीर्थांचे निकटवर्ती स्नेही व सन्मित्र. या संमेलन अध्यक्षपदी वरील विवेचनातील ग्रंथ प्रकाशन हे जसे कारण होते, तसेच या संमेलनाचे संयोजक असलेले यशवंत सूर्यराव सरदेसाई हे प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाईचे संचालक/विश्वस्त या नात्याने तर्कतीर्थांना लेखकाइतकेच जवळून ओळखणारे होते, याचा खुलासा प्रस्तुत लेखातून होतो. वेदशास्त्रसंपन्न, वेदमूर्ती म्हणून प्रख्यात असलेल्या तर्कतीर्थांचा आदर पुरोगामी बुद्धिजीवी (रॉयवादी, मार्क्सवादी) वर्गात या 'शास्त्रीजीं'चा (इति मानवेंद्रनाथ रॉय!) आदर केला जात असे. गुरुकुल शिक्षण पठडीत शिकूनही इंग्रजी साहित्य वाचनाने तर्कतीर्थांनी पाश्चात्त्य साहित्य व तत्त्वज्ञानावर हुकूमत निर्माण केली होती. तर्कतीर्थ जितक्या उत्साहाने भाषणे देत, तो उत्साह ते लेखनात दाखवीत नसत, असे लेखकाने म्हटले असले तरी कालौघात त्यांनी विपुल लिहून ठेवले आहे, हे या प्रकल्पकार्यात हाती आलेले वास्तव होय, ते कोणासही नाकारता येणार नाही. तर्कतीर्थ तत्त्वनिष्ठ गृहस्थ, समाजहिताप्रती त्यांच्या मनातील तळमळ अकृत्रिम. या माणसाने व्यक्तिगत जीवनात केलेला त्याग अनुकरणीय इत्यादी निरीक्षणे ही या लेखाने तर्कतीर्थ गौरवात घातलेली भर होय. व्यक्तिचित्रणाची श्री. शं. नवरे यांची स्वतःची विवेचक शैली इथेही दृष्टोत्पत्तीस येते.



वाय १८९-२

## ४. शास्त्रीबुवांची मतांतरे आणि वेषांतरे

श्री. शं. नवरे यांनी तर्कतीर्थांना प्रथम पाहिले ते चिंचवड (पुणे)च्या सन १९१४ च्या मोरया गोसावी उत्सवात. तेव्हा ते बटू (विद्यार्थी) होते नि गुरू नारायणशास्त्री मराठे यांच्याबरोबर शिष्योत्तम म्हणून आलेले. पुढे सन १९२१ ला ते प्राज्ञपाठशाळा, वाई येथे विद्यार्थी म्हणून दाखल झाले. एव्हाना ते मोठे झालेले, शिवाय प्राज्ञपाठशाळेतील वरिष्ठ विद्यार्थी म्हणजे जवळजवळ शिक्षक झालेले. तेव्हापासून ते पुढे आयुष्यभर झालेली मतांतरे नि वेषांतरे या लेखात नवरे यांनी नोंदली असून त्यात मिश्कील टीकाभाव आहे. नित्य बदल हा तर्कतीर्थांच्या व्यक्तिमत्त्वाचा स्थायीभाव या लेखात नोंदविण्यात आला असून तो तर्कतीर्थ जीवनाचा व्यवच्छेदक भाग होय. विसंगती दाखवत सुसंगत चरित्र निर्मिती या लेखाचा गाभा आहे.

## ५. उपेक्षितांचे उपेक्षित पुढारीः तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

द्वा. भ. तथा द्वारकानाथ भगवंत कर्णिक आणि वसंतराव भगवंत कर्णिक हे रॉयवादी चळवळीपूर्वी कायदेभंगाच्या चळवळीशी निगडित होते. द्वा. भ. कर्णिक हे बागलाण, कळवण जंगल सत्याग्रहात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे सहकारी व धुळे कारागृहातील सहबंदी बांधव. तर्कतीर्थांना मार्क्सवादाचा परिचय होऊन अभ्यास करण्याची संधी द्वा. भ. कर्णिकांमुळे मिळाली. द्वा. भ. कर्णिक तुरुंगात वेळोवेळी पत्रके, ग्रंथ पुरवत. मानवेंद्रनाथ रॉय हे डॉ. महमूद म्हणून रशियातून भारतात आले. त्या काळात कर्णिक बंधू हे त्यांचे अनुयायी बनले. त्यांच्यामुळेच तर्कतीर्थ मानवेंद्रनाथ रॉय यांच्या संपर्कात आले. सन १९३६ ते १९४८ असा तपभराचा काळ हा रॉयवादी चळवळीचा सुवर्णकाळ. या काळात तर्कतीर्थ रॉयवाद्यांच्या ‘रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टी’चे महाराष्ट्र प्रांतिकचे सेक्रेटरी व पुढे सन १९४८ च्या पार्टी विसर्जन अधिवेशन, कलकत्त्याचे अध्यक्ष. कर्णिक बंधुंशी तर्कतीर्थांचा स्नेह शेवटपर्यंत होता.

द्वा. भ. कर्णिकांनी आपल्या या लेखात तर्कतीर्थांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू उलगडून दाखवले आहेत. त्यांना तर्कतीर्थांचे व्यक्तिमत्त्व लोभस वाटे. महात्मा गांधींच्या व्यक्तिगत जीवनात तर्कतीर्थांचे मानाचे स्थान कसे होते, याचे द्वा. भ. कर्णिक ‘चक्षुर्वैसत्यम’ असे साक्षीदार. प्रागतिक ब्राह्मण म्हणून तर्कतीर्थ अपवाद व्यक्ती होते, हे इथे नोंदविण्यास कर्णिक विसरत नाहीत. ‘हिंदुधर्माची समीक्षा’ ग्रंथ वाचून मानवेंद्रनाथ रॉय यांनी तर्कतीर्थांची गणना कपिल, कणाद इत्यादी पंडितांच्या श्रेणीत केल्याची लेखातील नोंद तर्कतीर्थांच्या व्यक्तिमत्त्वाची महती व उंची सांगणारी सिद्ध होते. तर्कतीर्थ मनस्वी गृहस्थ होते. त्यांच्या अंतर्मनात नित्य खळबळ माजलेली असे. त्यामुळे प्रकट जगात कधीकधी ते हरवल्यासारखे वागत, याच्या अनेक आठवणी या लेखात आहेत. लोकमताची पर्वा न करता ते आपली मते मांडत. त्यामुळे प्रसंगी ते लोकक्षोभाचे बळी ठरत. ते गप्पिष्ट गृहस्थ होते. मित्रमंडळींत

हरखून नि हरवून जात. मित्रांत त्यांना स्वर्गसुख लाभे. रूढ अर्थाने त्यांचे जीवन अयशस्वी मानले तरी ते स्फूर्तिदायक होते हे खरे! निकटवर्तीयाने केलेले वस्तुनिष्ठ वर्णन म्हणून या लेखाकडे पाहावे लागते.

## ६. आधुनिक महाराष्ट्राचे बुद्धिवादी वेदान्ती

गुजरातच्या काठेवाड संस्थानामध्ये सुरटी येथे असलेले सोमनाथाचे मंदिर सन १०२४ मध्ये गझनीच्या महंमदाने लुटले. नंतरच्या काळात १२२७, १३९५, १५११ व १५२० साली पाच वेळा या मंदिरावर हल्ले झाले. या हल्ल्यांतून वाचलेले मंदिर म्हणजे त्याचे केवळ अवशेष होते. स्वातंत्र्यानंतर लगेचच या मंदिराच्या जीर्णोद्धारास गती आली. त्याबद्दल या पूर्वी इथे लिहिले गेले आहे. या जीर्णोद्धारित मंदिराची प्राणप्रतिष्ठा ११ मे, १९५१ ला संपन्न होणार होती. हे मंदिर सर्व जातिधर्मांच्या लोकांना खुले होणार म्हणून देशातील सनातनी शास्त्री-पंडितांनी पौरोहित्य नाकारले. ही कामगिरी पत्करून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी स्वतःस आधुनिक बुद्धिवादी वेदांती सिद्ध केले. या निमित्ताने लिहिलेला हा लेख.

या लेखात द्वा. भ. कर्णिकांनी स्पष्ट केले आहे की, तर्कतीर्थ नुसते विचारवंत, पंडित, तत्त्वचिंतक नव्हते; ते एक कृतिवीर होते. सन १९३० च्या कायदेभंग चळवळीतून केलेल्या कार्याने ते महाराष्ट्रातील अग्रगण्य पुढारी म्हणून पुढे आले. त्यांचे खरे कार्य समाजास दिशा देणे हेच राहिले आहे. त्यांचे मन स्वार्थापासून अलिप्त होते, म्हणून ते धक्के देऊ शकले. स्वभावाने सात्त्विक असलेले तर्कतीर्थ अंतःकरणाने बंडखोर होते. सन १९४२ च्या 'भारत छोडो' आंदोलनात दै. 'संग्राम'मध्ये लिहिलेला अग्रलेख 'या क्रांतीचे प्रेत इथे पडले आहे' आज उपलब्ध नाही, असता तर वाचकांना त्यांच्या वाणीइतकीच लेखणीतील प्रखरता लक्षात आली असती. त्यांनी ब्राह्मणेतर चळवळीवर केलेले असेच प्रक्षोभक लिखाण उपलब्ध नाही. ते हाती आले असते तर उभा मराठा त्यांना डोक्यावर घेऊन नाचला असता नि म्हणाला असता, "आम्ही भिक्षुकशाहीच्या विरोधी आहोत, ब्राह्मणांच्या नव्हे." तर्कतीर्थांनी लिहिलेल्या 'हिंदुधर्माची समीक्षा' ग्रंथाने मानवेंद्रनाथ रॉय यांना जितके प्रभावित केले होते, तितकेच त्यांच्या 'जडवाद अर्थात् अनिश्वरवाद'च्या हिंदी भाषांतराने महापंडित राहुल सांकृत्यायन यांना. ते म्हणाले होते, "मी हे पुस्तक आधी वाचले असते तर जडवादावर लिहिलेच नसते." महात्मा गांधींच्या मृत्युनंतर ओकसाबोकशी रडणारे तर्कतीर्थ राजकीय पक्षनिष्ठेपेक्षा मानवता श्रेष्ठ मानणारे होते. तर्कतीर्थ यांची मनस्विता व मानवता यांचा सुरेख संगम या लेखात झाला आहे.

## ७. साहित्य संमेलनाचे अध्यक्षः तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ३७ वे अधिवेशन १ ऑक्टोबर १९५४ ला संपन्न होणार होते. या संमेलनाच्या अध्यक्षपदी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी विराजमान झाले. त्यांची ही निवड किती सयुक्तिक होती, हे सांगणारा प्रा. मा. पं. मंगुडकर यांचा हा लेख.

प्रा. मंगुडकर प्रारंभीच तर्कतीर्थांच्या साहित्यिक व्यासंग नि विचारश्रेष्ठत्वाची तुलना या संमेलनाचे पूर्वाध्यक्ष सर्वश्री न. चिं. केळकर, अ. ब. कोल्हटकर, प्रा. वा. म. जोशींशी करत त्यांच्या साहित्यिक व्यक्तिमत्त्वाची प्रशंसा करतात. आजवरच्या सर्व राजकीय, धर्मसुधारणा, समाजसुधारणा कार्याचा आढावा घेत ते समजावतात की, तर्कतीर्थांच्या व्यक्तिमत्त्वात अदम्य आत्मविश्वास भरलेला होता. स्वविवेकाच्या कसोटीवर त्यांनी जानेवारी १९३३ मध्ये पुण्याच्या पेरूगेटमधील शिवाजी मंदिरात संपन्न शास्त्रार्थ सभेत काशीचे धर्मपंडित राजेश्वरशास्त्रींशी केलेले प्रतिवाद प्रसिद्ध आहे. तसेच सन १९३५ मध्ये शंकराचार्य वाई येथे आले असताना त्यांनी आपली पाखंडी मते त्यांना ऐकवली होती. तेव्हा शंकराचार्यांनी शाप देत म्हटले होते की, "पुढच्या जन्मी तुम्ही नरकात जाल." त्याचे खिलाडू वृत्तीने स्वागत करत तर्कतीर्थांनी म्हटले होते की, "मी नरकात जाणे पसंत करीन. तेथे जाऊन त्या नरकाचा मी स्वर्ग बनवीन. माझ्या कर्तृत्वाला तिथे मोठे क्षेत्र आहे. स्वर्गात सर्वच सुंदर. तेथे माझे सामर्थ्य गंजून जाईल."

तर्कतीर्थांना मानवेंद्रनाथ रॉय यांच्याप्रमाणेच साम्यवादाची मर्यादा जाणवू लागली. साम्यवाद हा व्यक्तिस्वातंत्र्याशी विसंगत असल्याचे लक्षात आल्यावरून त्यांनी 'मानव हा सर्व मूल्यांचा मानदंड आहे', हे स्वीकारून नवमानवतावादाचा केलेला पुरस्कार हा तर्कतीर्थांचा वैचारिक विकास होता, हे प्रा. मंगुडकर या लेखात अधोरेखित करतात. तर्कतीर्थांनी आपल्या जीवनाच्या उत्तरार्धात बुद्धिवाद, व्यक्तिस्वातंत्र्य आणि शास्त्रीय मानवतावादाचा पुरस्कार करून प्रचार-प्रसार केला. सरतेशेवटी तर्कतीर्थ या निष्कर्षाप्रत येऊन पोहोचले होते की, 'भूतकाळातील पुरोगामी विचारधारा लक्षात घेऊनच आपणांस भविष्य विकासाचा प्रवास करणे जरुरीचे आहे.' तर्कतीर्थांच्या जीवनाचे अनेक बारकावे लेखकाने या लेखात टिपले आहेत.

## ८. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

भाषिक प्रांत रचनेसंबंधाने नवी दृष्टी देणाऱ्या बुद्धिवादी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची निवड ३७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी होणे हा बुद्धिवादाचा जसा विजय आहे, तसा तो अटकेपार झेंडा लावण्याचा उपक्रम नसून अटकेजवळ नवी दृष्टी जाण्याचा आहे, असे सांगत प्रा. गोवर्धन पारीख तर्कतीर्थांची निवड तर्कसंगत असल्याचे या लेखात विशद करतात.

ते सांगतात की, ज्ञानाच्या क्षेत्रात तर्कतीर्थांचे स्थान वादातीत आहे. तर्कतीर्थ संवादी विचारधारेचे उपासक होत. ते विविध क्षेत्रांतील विशेषज्ञ आहेत. एकच एक क्षेत्रातील विशेषज्ञता अंतिमतः एकांगी असते. त्यापेक्षा विविधांगी विशेषज्ञता महत्त्वाची खरी! तसे पाहिले तर तर्कतीर्थ रूढ अर्थाने ललित लेखक नव्हेत. त्यांचं अधिकांश लेखन हे वैचारिक झालं आहे. प्रा. पारीख यांनी आपल्या या लेखात ललित साहित्याचा साचेबंद विचार

करण्याच्या परंपरेबद्दल म्हटले आहे की, जीवनात सौंदर्य, रंजनाइतकेच महत्त्व विचार, विश्लेषणास असते, याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. तर्कतीर्थ नेत्यापेक्षा मित्र, सहकारी म्हणून सर्वश्रुत आहेत. मतभेद झाले की ते दूर होतात, पण त्यात कटुता नसते. अन्यांच्या चुकांबद्दल तर्कतीर्थ क्षमाशील राहात आले आहेत. फळे आणि पुस्तके या त्यांच्या दोन आवडीच्या गोष्टी होत. प्रवासात त्यांच्याशिवाय त्यांना चैन पडत नाही. लेखन व वक्तृत्व त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची अभिन्न अंगे होत. प्रा. गोवर्धन पारीख नि प्रा. अ. भि. शहा त्यांचे आत्मीय! त्यामुळे त्यांची निरीक्षणे व नोंदी म्हणजे अंतःसाक्ष्य देणाऱ्या ठरतात.

### ९. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशीः एक थोर 'क्रियावान पंडित'

समांतर नि समकाली (१९५४) लिहिलेल्या या लेखात प्रा. पारीख यांनी त्यांना 'क्रियावान पंडित' रूपात चित्रित केले आहे. तर्कतीर्थ अनुभवसंपन्न होते. त्यांना विविध संस्था संचालनाचा दीर्घ अनुभव असल्याचे ते स्पष्ट करतात. विचार आणि व्यवहारात अद्वैत असलेले ते दुर्मीळ व्यक्ती होत. त्यांचे सर्व जीवनव्यवहार तंद्रीत चालतात. त्यांच्या वैचारिक निष्ठा अढळ असतात. ते साधनशुचिता समर्थक होत. तर्कतीर्थांचे सर्वग्राही व समग्र व्यक्तिमत्त्व प्रा. पारीख यांनी या लेखात साक्षेपाने नोंदवले आहे.

### १०. निगर्वी, निर्भीड नि निःस्पृहः तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

हा लेखही अखिल भारतीय साहित्य संमेलन अध्यक्ष झाल्याप्रीत्यर्थ हसमनीस यांनी लिहिला आहे. यात ते तर्कतीर्थ गुणगौरव करत त्यांना निगर्वी, निर्भीड व निःस्पृह व्यक्ती म्हणून प्रस्तुत करतात. त्यांच्या लेखी तर्कतीर्थ पढिक पंडित नव्हते. ते आधुनिक ज्ञानाचा जिवंत झरा होते. आधुनिक ज्ञानविज्ञानाचा त्यांचा व्यासंग थक्क करणारा होता. विचारांसाठी प्रसंगी मानहानी सहन करणारे ते कार्यकर्ते होते. सन १९४१ च्या सार्वत्रिक निवडणुकीत रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टीने श्री. जमनालाल मेहता यांना उमेदवारी दिली होती. त्यांच्या प्रचारार्थ तर्कतीर्थांनी मानहानीच काय, मारहाणही सहन केली होती, तीही आपल्या सातारा जिल्ह्यात (आनेवाडी). तीच गोष्ट संयुक्त महाराष्ट्र समिती व काँग्रेस संघर्षात. या सर्वांतून मुक्त होऊन आता ते साहित्य, संपादन, कोश कार्यात व्यग्र आहेत. विसाव्या शतकाच्या मध्यात गौरव शैली समजून घेण्याचे साधन म्हणजे हा लेख.

### ११. तर्कतीर्थांचे क्रांतिकार्य

सदर लेखात रमेश चव्हाण यांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे विविध क्षेत्रांतील क्रियात्मक योगदान रेखांकित केले आहे. त्यांनी स्पष्ट केले आहे की, प्राज्ञपाठशाळा, वाईमुळे त्यांचा चरित्रविकास घडून आला. तिथले संस्कार, गुरुकुल अध्यापन पद्धती, गुरूंचे मार्गदर्शन यांचा त्यांना लाभ झाला. त्यांनी स्वअध्ययनातून धर्मविकास व सुधारणांची नवी दृष्टी विकसित केली. बहुजन समाज, ब्राह्मो समाज, सत्यशोधक समाज यांच्याशी त्यांचे वैचारिक नाते कृतिशील व क्रांतिकारीच म्हणावे लागेल. ते पोथीनिष्ठ राहिले नाही.

यातून त्यांचे पुरोगामीपण लक्षात येते. त्यांची वृत्ती संशोधकाची होती. विविध ज्ञानविज्ञान विस्ताराशी त्यांनी स्वतःस वेळोवेळी जोडून घेतल्याने तर्कतीर्थ मूलभूत योगदान देऊ शकले. वाईसारख्या छोट्या गावात त्यांनी महाविद्यालयाची स्थापना करून उच्च शिक्षणाची सोय केली. लेखक रमेश चव्हाण स्वतः या महाविद्यालयाच्या पहिल्या विद्यार्थ्यांपैकी होत. समाजसेवक व प्रबोधक रा. ना. चव्हाण यांचे हे चिरंजीव असून त्यांनी आपल्या वडिलांचे अनेक ग्रंथ संपादित करून प्रकाशात आणले आहेत, तेही पदरमोड करून.

### १२. माझ्या सहवासातील तर्कतीर्थ

'नवभारत' मासिकाच्या जुलै, १९६६ च्या अंकात भाई माधवराव बागल यांनी 'माझ्या सहवासातील तीन व्यक्ती' या शीर्षकाने लेख लिहिला होता. त्यात त्यांनी सर्वश्री तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, साहित्यिक वि. स. खांडेकर आणि पुण्याचे काँग्रेस कार्यकर्ते, नेते न. वि. तथा काकासाहेब गाडगीळ यांच्याबद्दल लिहिले होते. पैकी इथे त्यातील तर्कतीर्थांसंबंधीच्या मजकुराचाच अंतर्भाव करण्यात आला आहे. तर्कतीर्थांच्या सहवासात भाई माधवराव बागल यांना ते कसे दिसले, भावले याचे विवेचन या उद्धृत अंशात आहे. त्यानुसार भाई माधवराव बागल तर्कतीर्थांना सन १९३० पासून ओळखू लागले. तर्कतीर्थ ब्राह्मण म्हणून भाई माधवराव बागल यांनी पूर्वग्रहाने त्यांना झिडकारले होते, पण निकट सहवासातून भाईंच्या मनात तर्कतीर्थांप्रती आदर वृद्धिंगत होत गेला. तो आयुष्यभर टिकला. भाईंच्या मतानुसार तर्कतीर्थ हे पारंपरिक ब्राह्मण नव्हते. त्यामुळे ते त्यांचे केवळ मित्रच नव्हे तर नातलग सदृश आप्तस्वकीय झाले. महात्मा फुले, देव, धर्म इत्यादींबद्दलचे तर्कतीर्थांचे आचारविचार त्यांना पुरोगामी सिद्ध करतात. तर्कतीर्थ निरिश्वरवादी अर्थात जडवादी होते. त्यांचे मराठी लेखन विद्वत्जड होते. भाई माधवराव बागल यांना तर्कतीर्थांचे शब्द समजून घेण्यासाठी इंग्रजी शब्दकोशाची मदत घ्यावी लागे. भाई माधवराव बागल व तर्कतीर्थ यांच्यात दीर्घ पत्रव्यवहार होता. उभयतांमध्ये मतभेदपूर्ण मैत्र होतं. उभयता एकमेकांच्या विरोधी विचारांप्रती स्वागतशील होते. तत्कालीन समाजजीवन समजावणारा हा लेख आहे.

### १३. ज्ञानाचा प्रवाह खुले करणारे शास्त्रीजी

वाणिज्य व मानव्य महाविद्यालय, वाई (सध्याचे किसनवीर महाविद्यालय, वाई) यांच्या वतीने तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा अमृत महोत्सव ३ फेब्रुवारी १९७५ रोजी तिथे संपन्न झाला. त्या सोहळ्याचा वृत्तांत त्या महाविद्यालयाने प्रा. विजयकुमार फरांदे यांनी साप्ताहिक 'साधना'च्या उपर्युक्त अंकात लिहिला होता. त्यात त्या समारंभामध्ये प्रास्ताविकपर केलेले आचार्य अ. के. भागवत यांचे विस्तृत भाषण आहे. त्यातून उभे राहणारे तर्कतीर्थ उल्लेखनीय होत. तर्कतीर्थ या महाविद्यालयाचे संस्थापक होत. बुद्धी नि कृतीचा सहसा न दिसणारा मेळ तर्कतीर्थांच्या व्यक्तिमत्त्वात दिसून येतो. त्यांनी 'वैदिक संस्कृतीचा विकास' या आपल्या ग्रंथात तो घातला आहे. तसाच मेळ त्यांनी प्राचीन व आधुनिकात

घातला आहे. प्राज्ञपाठशाळा, तेथील गुरू स्वामी केवलानंद, त्यांचे सहकारी आणि शिष्य यांनी महात्मा गांधींच्या आवाहनानुसार कायदेभंग चळवळीत दिलेले योगदान अविस्मरणीय आहे. त्याचे नेतृत्व तर्कतीर्थ करीत. त्यांनी त्यानंतर केलेले अस्पृश्यता निर्मूलनाचे प्रयत्न, आंतरजातीय विवाह, मंदिरांतून सर्व जात-धर्मीयांना प्रवेश इत्यादी गोष्टींतून तर्कतीर्थांचे सामाजिक, धार्मिक सुधारणांसंबंधी योगदान पुढे येते. मानवेंद्रनाथ रॉय यांच्या शब्दांतच सांगायचे तर ते 'बेस्ट प्रॉडक्ट ऑफ इंडियन रेनासान्स' आहेत. साचलेले ज्ञानप्रवाह खुले करण्याचे त्यांचे कार्य समाजविकासकाचे आहे.

### १४. शास्त्रीबुवा: एक प्रचंड कोडे

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने लिहिलेल्या या लेखात श्री. शं. नवरे यांनी सआश्चर्य लेखन करीत तर्कतीर्थ एकाच आयुष्यात परस्परविरुद्ध आचार, विचार, व्यवहार, पोशाख, पक्ष, खानपान कसे करू शकतात, असा प्रश्न उपस्थित करून शास्त्रीबुवांचं सारं जीवन म्हणजे एक प्रचंड कोडे असल्याचे निरीक्षण ते नमूद करतात. जुन्या पठडीत शिक्षण घेऊन ते आधुनिक झाल्याचा अचंबा लेखकास आहे. त्यांच्या निकटवर्तीयांत सर्व प्रकारचे लोक असणं हे तितकंच आश्चर्यकारक! ललित लेखन न करता अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होऊ शकतात. साहित्य अकादमीचा पुरस्कार त्यांना मिळतो. जीवनात सातत्याने त्यांनी परस्परविरोधी भूमिका घेऊनही प्रत्येक वेळी त्या त्या भूमिकेचे सार्थ समर्थन तर्कतीर्थ करू शकतात. वेदांत पंडित, पण कर्मकांडमुक्त जीवन ते जगू शकतात. जाईल तिथे आपला प्रभाव, छाप ते सोडतात. पूर्वोक्त पक्ष सोडून उत्तर पक्षाची वकिली त्यांनी नेहमीच यशस्वीपणे निभावली. आध्यात्म नि विज्ञान यांची सांगड घालावी ती शास्त्रीबुवांनीच!

हा लेख त्यांचे समग्र व्यक्तिमत्त्व एका कोड्याच्या रूपात त्यांना उभा करतो; पण हे एक न सुटलेले कोडे खरे! ते भल्याभल्यांना जमले नाही नि सोडवताही आले नाही. अशी विचक्षण प्रज्ञा, प्रतिभा व प्रवृत्ती घेऊन जन्मलेले तर्कतीर्थ; त्यांच्या आचार-विचारांचा अन्वय, सुसंगती शोधणे महाकठीण. ही सारी लीला ते लीलया पेलतात, यातच तर्कतीर्थांच्या व्यक्तिमत्त्वाचे सारे कौशल्य सामावलेले होते.

### १५. शास्त्रीबुवा आणि रॉयवादी चळवळ

महाराष्ट्रातील रॉयवादी चळवळ आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा घनिष्ट संबंध होता. तर्कतीर्थ मार्क्सवाद असो वा रॉयवाद विचारधारांकडे ओढले गेले ते द्वा. भ. कर्णिक व वसंतराव कर्णिक यांच्यामुळे, हे या पूर्वी नमूद केले आहेच. या रॉयवादी विचारधारेत तत्कालीन बुद्धिजीवी प्रा. गोवर्धन पारीख, प्रा. अ. भि. शहा, श्रीमती मणीबेन कारा, डॉ. इंदुमती पारीख, यशवंतराव चव्हाण, गोविंद तळवलकर, न्यायमूर्ती व्ही. एम. तारकुंडे अशी दिग्गज मंडळी होती. ती मानवेंद्रनाथ रॉय यांच्या विचार नि व्यक्तिमत्त्वाने प्रभावित झालेली होती. असे असले तरी रॅडिकल डेमॉक्रेटिक पार्टीचे महाराष्ट्र प्रांतिकचे सचिव

म्हणून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनाच खस्ता खाव्या लागल्या, हे तितकेच खरे! ही मूलतः राष्ट्रीय काँग्रेसमधील समाजवादी, साम्यवादी विचारांची मंडळी. फैजपूर काँग्रेस (५० वे अधिवेशन, १९३६) नंतर काँग्रेसने विधानसभा निवडणुकांची तयारी सुरू केली, तेव्हा मानवेंद्रनाथ रॉय यांनी महाराष्ट्र दौरा केला होता. त्यात तर्कतीर्थ मानवेंद्रनाथ रॉय यांच्या निकट संपर्कात आले. रॉय यांना राजकारणाइतकाच तत्त्वज्ञानात रस असे. या चर्चेत तर्कतीर्थ भाग घेत. त्यातून त्यांची विद्वत्ता रॉय यांच्या लक्षात आली. रॉयवादी चळवळ पुढे नेण्यासाठी तर्कतीर्थांनी सर्व प्रकारचे कार्य केले. ते केवळ बौद्धिक नव्हते, तर समाजास भिडणारे होते. एकीकडे तडोखबंद लेखन, तर दुसरीकडे व्याख्याने, परिषदा, सभा आयोजन कार्य तर्कतीर्थ करीत असत. बहुजन समाजवर्गाशी त्यांचा निकट संपर्क होता. त्याचा फायदा रॉयवादी चळवळीस झाला. ते रॉयवादाचे सच्चे वारसदार होते.

### १६. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी: एक कृतार्थ जीवन

वरील लेखाप्रमाणेच हा लेखही तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने लिहिला गेला होता. मे. पुं. रेगे हेही तर्कतीर्थांच्या निकटवर्तीयांपैकी एक होते. यात त्यांनी सांगितले आहे की, तर्कतीर्थांची वृत्ती सहज नि साधी होती. ते पांडित्य लीलया पेलत. गृहस्थाश्रमी असलेले तर्कतीर्थ व्यवहारी वृत्तीचे होते. आपण कोणी वेगळे आहोत असा त्यांचा भाव नसे. ज्ञान पारजून लखलखीत झालेले आयुष्य त्यांना लाभले. स्वामी केवलानंद सरस्वती, महात्मा गांधी आणि मानवेंद्रनाथ रॉय या तिघांच्या जीवन, कार्य, विचारांचा खोल प्रभाव तर्कतीर्थांवर होता. शास्त्रीजी परंपरागत ज्ञानाची मांडणी समकालाच्या संदर्भात मांडण्यात तरबेज होते. आधुनिक ज्ञानाचा स्वीकार, अभ्यास, मांडणी करताना त्यांनी स्वतःस नवमतवादी सिद्ध केले आहे. मार्क्सवादाचा अंगीकार व जडवादाची मांडणी ही त्याचीच साक्ष होय. नवज्ञानास ते नवसमाजनिर्मितीचे साधन मानीत असत. ७५ वर्षे आयुष्य लाभलेले त्यांचे जीवन कृतार्थ होते.

### १७. तर्कतीर्थ: विचार शिल्पकाराची प्रतिमा

'विचारशिल्प' हे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या निवडक निबंधांचे संकलन होय. तर्कतीर्थांच्या अमृत महोत्सवाचे औचित्य साधून रा. ग. जाधव यांनी याचे संपादन केले होते. यात त्यांनी 'विचार शिल्पकाराची प्रतिमा' शीर्षकांतर्गत लिहिलेला पहिला लेख म्हणजे तर्कतीर्थांचे सर्वंकष मूल्यमापनच. रा. ग. जाधव यांच्या मतानुसार तर्कतीर्थ थोर विचारवंत व विद्वान होत. त्यांनी ज्ञानसंचिताचे संरक्षण केले नि समीक्षाही. 'हिंदुधर्माची समीक्षा' आणि 'वैदिक संस्कृतीचा विकास' हे दोन ग्रंथ त्याचे प्रमाण होत. तर्कतीर्थांनी जे लेखन केले, ते विविध सामाजिक उपक्रमांची फलश्रुती म्हणून सांगता येईल. ते कर्मयोगी विद्वान होत. त्यांनी ज्ञानाच्या पूर्व आणि पश्चिम धारेमध्ये समन्वय घडवून आणला. या समन्वयाचे स्वरूप 'असंलक्ष्यक्रम' अर्थात व्यंगमुक्त आहे. त्यांच्या लेखनात वाच्यार्थ लक्ष्य

असतो. विचार की शैली, अशा प्राधान्यक्रमात त्यांची निवड विचार पक्षपाती असते. त्यांची विषयाची मांडणी ही तर्कप्रणित असते. आचार्यत्व त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अभिन्न अंग होय. त्यांच्या ध्येयवादाच्या दिशा बदलल्या, पण ध्येयवाद अक्षुण्ण राहिला. याच्या कारणाचा शोध घेता लक्षात येते की, 'साक्षेपी विवेक' ही प्रत्येक निर्णयाची कसोटी राहिली आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास करता लक्षात येते की, तर्कतीर्थांना उच्चता, नैतिकता, बौद्धिकता यांचे निरंतर नि विलक्षण आकर्षण राहात आले आहे. त्यामुळे ते सतत वाहात, बदलत राहिले. त्यांनी नवे तत्त्वज्ञान दिले नसले तरी जुन्या तत्त्वज्ञानाची नवी मांडणी केली खास! कारण स्वातंत्र्योत्तर काळात त्यांनी नवे तत्त्वज्ञान निर्माण केले नाही. रा. ग. जाधवांना तर्कतीर्थांचा मराठी विश्वकोशात दीर्घ सहवास लाभला होता. त्यामुळे त्यांच्या या निष्कर्षांना अनुभवाचे अधिष्ठान आहे.

## १८. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

अमृत महोत्सवाचे औचित्य साधून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे अभीष्ट चिंतन करणारे अनेक समारंभ त्या वेळी महाराष्ट्रात घडून आले. अशा समारंभांपैकी एक सत्कार समारंभ रविवार दि. १६ नोव्हें. १९७५ रोजी औरंगाबाद येथे संपन्न झाला. मराठवाडा साहित्य परिषद आणि मराठवाडा विभाग ग्रंथालय संघाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सदर सोहळ्याचे अध्यक्ष होते ख्यातनाम समीक्षक प्रा. नरहर कुरूंदकर. या निमित्ताने दैनिक 'मराठवाडा'मध्ये अनिल डोंगरे यांनी विशेष लेख लिहून तर्कतीर्थांचे केलेले मूल्यांकन विचारणीय ठरते.

प्रस्तुत लेखात त्यांनी विशद केले आहे की, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी आपल्या प्रखर विचार चिंतनातून भारतीय संस्कृतीचा 'अभिकल्प' (Designe) बांधण्याचा जो प्रयत्न केला आहे, ('वैदिक संस्कृतीचा विकास' ग्रंथाचे लेखन) त्यामुळे ते 'तर्कतीर्थ' आणि 'शास्त्री'सारख्या उपाधीने महाराष्ट्रभर ओळखले जातात. त्यांचे विचार आणि संस्कृती संवर्धनाचे कार्य थोर खरे! हे कार्य त्यांनी पूर्वसंचिताची जपणूक करत केले. त्यांचे लेखन आध्यात्मकेंद्रित असले तरी ते विचारप्रवण असते हे विशेष. परंपरा आणि आधुनिकतेचा संगम करत लिहिले गेलेले त्यांचे लेखन, त्यांचे सौंदर्य, त्यातील प्रखर विचारांत प्रतिबिंबित असते. त्यात स्पंदन (Thrill) अनुभवास येते. सर्वसमावेशक चिकित्सा नि समग्र संदर्भांद्वारे केलेली व्यापक मांडणी यांतून त्यांनी आपल्या लेखनाचे श्रेष्ठत्व सिद्ध केले आहे. धर्म नि बुद्धी यांचा अपवादात्मक मेळ त्यांच्या लेखनात आढळतो. धर्मास परिवर्तनक्षम बनविण्याचे तर्कतीर्थांचे योगदान कोण नाकारेल? सर्वांत महत्त्वाचे म्हणजे त्यांच्या लेखनाने उद्याची आव्हाने स्वीकारण्याची क्षमता समाजमानसात रुजवली. तर्कतीर्थांनी आपल्या समतोल विचारांनी समाज विकसनशील बनविला.

तसा हा गौरव लेख, पण यात समग्र साहित्य लेखनाचे जे मूल्यमापन करण्यात आले आहे, त्यातून तर्कतीर्थांच्या साहित्याची महती कळते. एक पारंपरिक पठडीत घडलेला

वेदांती पंडित आधुनिक विचार मांडतो. याचे आश्चर्य वाटते ते त्यांच्या निरंतर विकसनशील विचारवृत्तीमुळे सहसा असे पंडित स्थितिशील राहात आले आहेत. म्हणून तर्कतीर्थ वेगळे.

**१९. ज्ञानतीर्थः तर्कतीर्थ**

साहित्यिक रवींद्र पिंगे सन १९७५ मध्ये श्री. ग. माजगावकर संपादित साप्ताहिक 'माणूस'मध्ये 'शतपावली' हे सदर चालवीत. त्या साप्ताहिकातला हा लेख पुढे पिंगे यांनी आपल्या 'देवाघरचा पाऊस' (२५ डिसेंबर, १९७५) या लेखसंग्रहात अंतर्भूत केला होता. या सदरात रवींद्र पिंगे समकालीन घटना, प्रसंगांच्या निमित्ताने व्यक्तिशोध घेत लिहीत. त्या व्यक्तीच्या प्रकाशणाऱ्या अंगावर ते बोट ठेवीत. एखाद्या व्यक्तिमत्त्वाचा हा आतून नि बाहेरून घेतलेला शोध, वेध असे. "संभ्रमित माणसांचे खटाटोप आणि नियतीने मांडलेला डाव हा माझ्या अवलोकनाचा आणि कौतुकाचा विषय आहे. त्याचे कवडसे या लेखनात जागोजाग दिसतील." असं खुद्द पिंगे यांनी जे म्हणून ठेवलं आहे, त्याची प्रचिती देणारा हा लेख.

रवींद्र पिंगे यांना दीर्घकाळ तर्कतीर्थांचा सहवास लाभला. त्यातील मिश्कील निरीक्षणे त्यांनी या 'शतपावली'त नोंदवली आहेत. रवींद्र पिंगे यांनी तर्कतीर्थांना नेहमी कार्यमग्नच पाहिले. त्यांचे प्रथम दर्शन पिंगे यांना एका सभेत भाषण करताना झाले. नंतर त्यांनी तर्कतीर्थांना साहित्य संघ, मुंबईत ऐकलं. तद्नंतर तर्कतीर्थांची नि त्यांची गाठ सचिवालयात पडली. सचिवालयाच्या वास्तुशांतीचे पौरोहित्य तर्कतीर्थांनी केले. सोबत कोनकरशास्त्री होते, अशी नोंद ते लेखात करतात. हा लेख मनस्वी लालित्याने भरलेला आहे. महाराष्ट्र राज्य स्थापनेनंतर त्यांचा सचिवालयातला वावर वाढला. ते राजकारण्यांच्या गर्दीतही वेगळे असत, दिसत. यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ स्थापून तर्कतीर्थांची अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली. आय. ए. एस. अधिकारी चिन्मुळगुंद त्यांचे प्रमुख सचिव तर मंडळ प्रभारी रवींद्र पिंगे. या काळातल्या नोंदींवरून मंडळाच्या कार्यावर आणि तर्कतीर्थांच्या कार्यपद्धतीवर प्रकाश पडतो. समकालीन इतिहास, घटना, नोंदी व गतिविधी म्हणून या लेखाचे असाधारण महत्त्व आहे. या काळात राज्यसभा सदस्यत्व मिळत असताना ते नाकारून तर्कतीर्थांनी ज्ञानव्यवहार, भाषा, साहित्य, संस्कृतीशी असलेली आपली पहिली पसंती नि बांधिलकी सिद्ध केली आहे. अशाच काही नोंदी साहित्यिक मधु मंगेश कर्णिक यांनीही करून ठेवल्या आहेत. तर्कतीर्थांचे मित्र, साहित्य व संस्कृती कार्य यांचा इतिहास यात आहे. तर्कतीर्थ अंतर ठेवूनही सद्भावाने वागत, हे नोंदविण्यास पिंगे विसरले नाहीत. या लेखात कुतूहलमिश्रित आदरभाव भरलेला दिसून येतो.

**२०. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशीः एक दर्शन**

दलितमित्र व सत्यशोधक कार्यकर्ते रा. ना. चव्हाण हे तर्कतीर्थांचे स्नेही व सहकारी. त्यांनी या लेखात प्रारंभी वाईचा पूर्वेतिहास कथन करून पार्श्वभूमी विशद केली आहे. या पार्श्वभूमीवर त्यांनी स्वामी केवलानंद सरस्वती आणि तर्कतीर्थांचे कार्य नमूद केले आहे.

ते करत आपल्या जुन्या संबंधांना रा. ना. चव्हाण उजाळा देताना दिसतात. या लेखात त्यांनी तर्कतीर्थांच्या व्यक्तिमत्त्वाची काही गुणवैशिष्ट्ये नोंदली आहेत. त्यानुसार तर्कतीर्थ हे पूर्ण निरिश्वरवादी झाले नाहीत, हे सांगायला ते कचरत नाहीत. तर्कतीर्थांनी बहुजन समाजाला घेऊन राजकारण केले असल्याचे रा. ना. चव्हाण स्पष्ट करतात. सर्वधर्म समभाव, परमतसहिष्णुता, सांप्रदायिकतेचा अभाव, व्यापक समजूतदार बुद्धी, सर्वांगीण अभ्यास, ग्रंथ वा शब्दप्रामाण्य विरोध, विभूती पूजेपेक्षा तत्त्वांना महत्त्व इत्यादींसारखी नोंदविलेली गुणवैशिष्ट्ये म्हणजे संक्षिप्त व्यक्तिचित्रच! रा. ना. चव्हाणांचे लेखन नेहमीच तरतम भावाने होते. हा लेख त्याची वानगी होय.

### २१. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी: शास्त्र आणि शस्त्र

सन १९८१ साली तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी आपल्या जीवनाची ऐंशी वर्षे पूर्ण केली. त्यांना लाभलेल्या या 'सहस्रचंद्रदर्शन योगा'चे औचित्य साधून 'नवभारत' मासिकाने 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी विशेषांक' प्रकाशित केला होता. त्यातील यशवंतराव चव्हाणांचा हा लेख.

सदर लेखात यशवंतराव चव्हाण यांनी स्पष्ट केले आहे की, त्यांचा नि माझा गेल्या पन्नास वर्षांचा ऋणानुबंध आहे. त्यांना मी ऐकले नि पाहिले ते १९३० च्या कायदेभंगाच्या चळवळीत. ते म्हणत की, मी सहा शास्त्रांचा अभ्यास केला आहे (षडांग वेद- शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छन्द आणि ज्योतिष). आज मला त्यांचे रूपांतर शस्त्रात करायचे आहे (तेव्हा ते सशस्त्र क्रांती समर्थक होते). त्यांची त्या वेळी अशी धारणा होती की, सशस्त्र उठावाशिवाय भारताला गुलामगिरीतून मुक्तता मिळणार नाही. त्यांच्या जीवनात दशकानंतर बदल होत राहिले. सन १९२४ मध्ये ते वेदपंडित, सन १९३० मध्ये स्वातंत्र्य चळवळीतील अग्रणी कार्यकर्ते, सन १९४० मध्ये रॉयवादी आणि १९५० मध्ये काँग्रेसी असा त्यांचा प्रवास दिसून येतो. करुणा आणि मानवतेवर आधारित राष्ट्रीयतेचे ते समर्थक होते. वैचारिक क्रांतीची त्यांना तहान होती. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात सामाजिक, आर्थिक समतेची तळमळ दिसून येते. सध्या ते 'मराठी विश्वकोश', 'धर्मकोश' निर्मितीत व्यग्र आहेत. ते उत्तम गृहस्थ होत. महाराष्ट्राला त्यांचा सदैव अभिमान राहील.

### २२. प्राज्ञपाठशाळा आणि शास्त्रीजी

ना. बा. मराठे यांनी प्रस्तुत लेखात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी आणि प्राज्ञपाठशाळा यांच्या अनुबंधावर प्रकाश टाकला आहे. त्यांच्या मतानुसार तर्कतीर्थांची आरंभिक घडण प्राज्ञपाठशोने केली. पुढे त्यांनी आपल्या कार्य-कर्तृत्वाने प्राज्ञपाठशाळेचा विकास केला. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी आपले गुरू स्वामी केवलानंद सरस्वती यांचे अपूर्ण कार्य पूर्ण करून उतराई केली. त्यांनी आपल्या गुरूचे यथोचित स्मारक उभारले. तर्कतीर्थांचे व्यक्तिमत्त्व हे वक्तृत्व, लेखन आणि संपादन इत्यादींतून विकसित झालेले आहे. त्यांच्या

समग्र साहित्याची सूची तयार होऊन त्यांच्या समग्र साहित्यास ग्रंथरूप आले पाहिजे. प्राज्ञपाठशाळा कार्य विस्तारार्थ तर्कतीर्थांनी 'मीमांसा कोश' प्रकाशन, 'धर्मकोश' संपादन, प्राज्ञ प्रेस स्थापना, 'नवभारत' मासिक संचालन, कागद कारखाना उभारणी, विविध ग्रंथ प्रकाशने, संपादने, भाषंतरे इत्यादी कार्य केले. त्यामुळे प्राज्ञपाठशाळा परंपरेस परिणत रूप प्राप्त झाले. तथापि आपल्या गुरूप्रमाणे तर्कतीर्थ शिष्यपरंपरा विकसित करू शकले नाहीत. तसं पाहिलं तर त्यांचं व्यक्तिमत्त्व राष्ट्रीय, पण ते मराठीपुरते मर्यादित राहिल्याने प्रांतिकच राहिले. त्यांनी धनसंग्रह केला नाही हे खरे, परंतु त्यांचा मनुष्यसंग्रह प्रचंड होता. ते आपल्या जीवनात सर्व गौरवांस पात्र राहिले.

## २३. महाराष्ट्रातील प्रबोधनाची चळवळ व शास्त्रीजी

प्रस्तुत लेखात रा. ना. चव्हाण यांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी केलेल्या प्रबोधन कार्याचा आढावा घेतला आहे. त्यात ते स्पष्ट करतात की, महाराष्ट्रात प्रबोधनाची परंपरा जुनी आहे. ती मराठी संतांपासून दिसून येते. ब्रिटिशांचे भारतात आगमन झाल्यामुळे पाश्चात्त्य भाषा, साहित्य, विचार, इतिहासातून पश्चिमी प्रबोधन (रेनासान्स) आपणांस कळाले. त्यातून प्रेरणा घेऊन भारतात धर्म व समाजसुधारणा सुरू झाल्या. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना प्रबोधनाचा वारसा त्यांचे गुरू स्वामी केवलानंद सरस्वती यांच्याकडून मिळाला. तर्कतीर्थांचे प्रबोधन कार्य धर्मनिर्णय मंडळाच्या माध्यमातून सार्वत्रिक झाले. धर्मांतरितांची शुद्धी, ज्ञाती विवाह, अस्पृश्यता निवारण इतयादी कार्य प्रारंभीच्या काळात झाले. स्वातंत्र्योत्तर काळात हेच कार्य तर्कतीर्थांनी लेखन आणि व्याख्याने यांतून केले. त्यातून तर्कतीर्थांनी समाजजागृती घडवून आणली. 'नवभारत' मासिक संचालन त्यांच्या लेखी प्रबोधन माध्यमच होते. असाच जागर त्यांनी अनेक विद्यापीठीय व्याख्यानमालांद्वारे घडवून आणला. या बरोबरीने तर्कतीर्थ वृत्तपत्रे आणि नियतकालिके यांमधून नियमित लेखनाद्वारे प्रबोधन सातत्य ठेवत आले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, मानवेंद्रनाथ रॉय या मान्यवरांसह त्यांनी प्रबोधन कार्य गतिमान केले आहे. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्याबरोबर ब्राह्मो समाज कार्य हा प्रबोधन उपक्रमच होता. महाराष्ट्र राज्याच्या स्वतंत्र निर्मितीनंतर तर्कतीर्थ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबईच्या विद्यमाने ज्या विविध योजना त्यांनी राबविल्या, त्याद्वारे घडून आलेले प्रबोधन, प्रकाशन, भाषांतर कार्य म्हणजे महाराष्ट्राचा ज्ञान, भाषा, साहित्य, संस्कृती विकास होय. ती तर्कतीर्थांची दूरदृष्टी होय. त्यांनी 'हिंदुधर्माची समीक्षा' आणि 'वैदिक संस्कृतीचा विकास'सारखे ग्रंथ लिहून केलेली धर्म व संस्कृती चिकित्सा महत्त्वाची ठरते. त्यांच्या प्रबोधनाचा विकासात्मक आलेख अथवा पट वैदिक धर्म ते नवमानवतावाद असा व्यापक दिसून येतो.

## २४. शास्त्रीजींचा सामाजिक विचार

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे जसे 'तर्कतीर्थ' होते, तसे ते महाराष्ट्राचे 'तीर्थरूप'ही होते. त्यांनी सतत सहा दशके आपल्या व्याख्यानांद्वारे महाराष्ट्राचे प्रबोधन केले. ही

व्याख्यानसत्रे खरे तर त्यांचे ‘जीवन व्रत’ असे. लिहिण्यापेक्षा बोलणे त्यांना आवडायचे. वक्तृत्वावर त्यांचे ‘पहिले प्रेम’ दिसून येते. त्याचे कारण त्यांचे जीवन हे सामाजिक जाणिवांनी ओतप्रोत भरलेले आहे. कोणत्याही सामाजिक प्रश्नावर त्यांचे मत जाणून घेण्यास महाराष्ट्र सदैव उत्सुक असे. भारतीय समाजमन हे धर्मप्रणित असल्याची त्यांना जाणीव होती. म्हणून त्यांनी ‘हिंदुधर्माची चिकित्सा’ केली. ती एका अर्थाने धर्ममीमांसाच आहे. नव्या धर्म संकल्पनेची मुळे आपल्या ‘वैदिक संस्कृती विकास’मध्ये आहेत, याची त्यांना खात्री होती. कालचा वारसा, आजच्या समस्या आणि उद्याचे स्वप्न यांचा मेळ शास्त्रीजी घालत आले आहेत. मानवेंद्रनाथ रॉय यांच्या मतानुसार ते ‘बेस्ट प्रॉडक्ट ऑफ इंडियन रेनासान्स’ होत, ते सार्थही आहे. ‘मराठी विश्वकोश’ निर्मिती आणि ‘साहित्य आणि संस्कृती मंडळ कार्य’ या दोहोंद्वारे तर्कतीर्थांनी केलेली ज्ञानरचना व मराठी भाषा ज्ञानभाषा करण्याचे केलेले कार्य, योगदान असाधारण आहे. आता ८१ व्या वर्षी त्यांच्या स्वरात थोडी विषण्णता दिसून येते. त्यांच्या मनी समाजनिष्ठेपेक्षा व्यक्तिनिष्ठा श्रेष्ठ वाटत आली आहे. त्यांचा सामाजिक विचार हा नागार्जुनसदृश आहे. रा. गं. जाधवांचे विवेचन नेहमीच हृद्य व ललित राहिले आहे.

## २५. परिवर्तनाचे मार्गदर्शकः तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे वशिष्ठांऐवजी वाल्मिकी परंपरेचे परिवर्तनशील मार्गदर्शक होत. त्यांनी पारतंत्र्यातून स्वातंत्र्य आणि स्वातंत्र्यातून मानवनिष्ठ समाजवादी समाजरचनेचा पुरस्कार केला. तर्कतीर्थांनी कार्ल मार्क्स, महात्मा गांधी आणि मानवेंद्रनाथ रॉय विचारधारा स्वीकारत नवमानवतावादाचे समर्थन केले. विवेकवाद, बुद्धिवाद नि राष्ट्रीय वृत्ती तर्कतीर्थांनी अंगीकारली. ते कोण्या एका संप्रदायाचे समर्थक नव्हते. त्यांचे कार्य ‘एन्साइक्लोपीडिक’ राहिले आहे. शास्त्रीजींच्या जीवनात आचारविचारांत अद्वैत आढळते. ते एक निर्भय विचारक होत. वर्तमान समाजमानसाविरुद्ध मतप्रदर्शन करून त्यांनी आपली निर्भयता सिद्ध केली आहे. त्यासाठी प्रसंगी मानहानीही सहन केली आहे. एकाच वेळी महात्मा जोतिबा फुले आणि सावरकर, सत्यधर्म आणि राष्ट्रवाद यांचा पुरस्कार करून त्यांनी आपले वेगळेपण दाखवून दिले आहे. दलित अत्याचारांचा त्यांनी वेळोवेळी धिक्कार केला आहे. वर्तमान प्रक्षुब्ध वातावरणात तर्कशुद्ध, समतोल, विवेकी भूमिका स्वीकारून त्यांनी समाजात परिवर्तन घडवून आणले आहे. दिनकर साक्रीकरांनी केलेले हे वर्णन अनुभवाधिरित आहे.

## २६. तर्कतीर्थांना अभिवादन

दा. गो. देशपांडे यांनी प्रस्तुत लेख तर्कतीर्थांनी आयुष्याची ८५ वर्षे पूर्ण केल्याचे औचित्य साधत लिहिलेला गौरव लेख. दा. गो. देशपांडे यांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना सर्वप्रथम ऐकलं, पाहिलं ते बृहन्महाराष्ट्रातील हैदराबाद येथे गणेशोत्सवानिमित्त तिथल्या साहित्यसभा नि महाराष्ट्र मंडळ कार्यक्रमात. भाषणाचा विषय होता ‘नवे

तत्त्वज्ञान!' (या विषयावर सन १९३७ ला 'किर्लोस्कर'मध्ये तर्कतीर्थांनी दोन दीर्घ लेख लिहिले होते. ते या प्रकल्पाच्या खंड ७ मध्ये अंतर्भूत आहेत). 'सूर्यप्रकाशाखाली काहीच नवे नसते' म्हणत त्यांनी मांडणी केली. हे मूलतः हिब्रू बायबलमधील तत्त्व वा उपदेश होय. 'There is nothing new under the sun' या लेखात तर्कतीर्थांप्रती आदर व्यक्त करत अभिवादन करण्यात आले आहे. त्यात सांगण्यात आलं आहे की, तर्कतीर्थांचं सारं आयुष्य सभा, समारंभ, भाषणे, प्रकाशने, लेखन इत्यादींमध्ये गेलं. शास्त्रीजी विद्वान खरे! सामान्य नि असामान्य सर्वांना ते समत्वतेने स्वीकारार्ह होते. ते जात, धर्म, पंथ इत्यादी भेदांपलीकडे गेलेले गृहस्थ होत. प्रचलित, परिचित विषयाची मांडणी नव्याने करण्याची त्यांची हातोटी अनुकरणीय आहे. ते आचार्य अत्रे नि यशवंतराव चव्हाण यांचे समस्नेही. विरोधकाचे योगदान मान्य करण्याची त्यांची उदारमतवादिता समाजात अपवादाने दिसते. कार्यमग्नता त्यांचा विशेष होय. ते थोरपण महाराष्ट्रापुरते राहिले. इंग्रजी लिहिते तर आंतरराष्ट्रीय झाले असते. श्रद्धेने केलेले लेखन म्हणून या लेखाकडे पाहावे लागते.

### २७. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

द्वा. भ. कर्णिक आणि तर्कतीर्थ यांचा संबंध जुना तसाच तो बहुविध कार्यांतून निर्माण झालेला. द्वा. भ. कर्णिकांमुळेच तर्कतीर्थ मार्क्सवादी व रॉयवादी झाले. ते तर्कतीर्थांनीच अनेकदा जाहीरपणे मान्य केले आहे. त्यांचं लेखन त्यांच्यातील वैचारिक परिवर्तनाचे निदर्शक होय. त्यांनी 'संग्राम' या रॉयवादी दैनिकात विपुल लिहिलं असलं तरी दुर्दैवाने त्यातलं अपवादच उपलब्ध आहे (दै. संग्राम आगीच्या भक्ष्यस्थानी पडलं नि नंतर बंदच पडलं!). त्यांनी साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या माध्यमातून आपल्या अध्यक्षीय कारकिर्दीत सुमारे ६०० ग्रंथांची निर्मिती करून मराठी भाषेस ज्ञानभाषा बनविले. त्यांच्यामुळे माझे जीवन उजळले. प्रस्तुत लेख दीर्घकालीन आत्मीय संबंधांतून तर्कतीर्थांच्या व्यक्तिमत्त्वाला उजाळा देतो.

### २८. विसाव्या शतकातील इतिहासाचे साक्षीदार

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी नव्वदीत प्रवेश केला म्हणून अनिल जोशी यांनी दैनिक 'केसरी'साठी लिहिलेला हा लेख. तो त्या दैनिकाच्या २६ जानेवारी, १९९० च्या अंकात प्रसिद्ध झाला होता. यात त्यांनी स्पष्ट केलं आहे की, शास्त्रीजी पंडितांच्या सहवासात राहूनही आधुनिक बनले ते नवज्ञान विज्ञान जिज्ञासेतून. प्राज्ञपाठशाळेच्या राष्ट्रीय वातावरणामुळे ते स्वातंत्र्य चळवळीकडे ओढले गेले. स्वधर्म चिकित्सेची ऊर्मी त्यांच्यात निर्माण झाली ती पाश्चात्त्य तत्त्वज्ञान ओढीतून. महात्मा फुले यांच्या जीवन नि विचारांच्या आकर्षणाचे मूळ होते ते त्यामागील सामाजिक भावनेत. साम्यवाद अभ्यासला मानवेंद्रनाथ रॉय यांच्या संपर्कातून. साम्राज्यशाहीस विरोधाची भावना त्यातूनच आकारली.

## २९. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी: एक कर्मयोगी

सामाजिक कार्यकर्ते नि तर्कतीर्थांचे सहकारी रा. ना. चव्हाण यांचे विचार दत्ता मर्ढेकर यांनी शब्दांकित करून साकारलेला हा लेख दैनिक 'ऐक्य'च्या २६ जानेवारी, १९९२ च्या अंकात प्रकाशित झालेला होता. यात त्यांनी मुलाखतीद्वारे स्पष्ट केले आहे की, पार्श्वभूमी सनातन असताना ते केवळ नववाचन, चिंतनाने आधुनिक बनले. दलितांना वेदाध्ययनाची संधी दिल्यामुळे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा पूर्वग्रह दूर झाला नि ते तर्कतीर्थांजवळ आले. वाईची परंपरा सनातन राहिली. तिला नवी दिशा देऊन तर्कतीर्थ यांनी आपल्या विचार आणि कार्यातून प्रागतिक बनवलं. 'नवभारत'च्या माध्यमातून तर्कतीर्थांनी महाराष्ट्र समाजाचं वैचारिक प्रबोधन केलं. हे सारं पुरोगामित्व स्वीकारल्याची फलनिष्पत्ती होती. तर्कतीर्थांच्या व्यक्तिमत्त्वाची भव्यता महात्मा फुले, महात्मा गांधी, मानवेंद्रनाथ रॉय, यशवंतराव चव्हाण यांची पाठराखण करण्यात जितकी आहे, तितकीच त्यांच्या स्वतःच्या स्वतंत्र लेखन व व्यक्तिमत्त्वातही सामावलेली आहे. त्यांचं निधर्मीत्व हीच खरी धर्मनिरपेक्षता होती. पंचायत राज्य कारभार महाराष्ट्रात अस्तित्वात आला तोच मुळी लोकशाही निष्ठेमुळे. या सर्वांतील तर्कतीर्थांचं योगदान त्यांना कर्मयोगी बनवतं.

## ३०. नित्य नव्या विचारांत रमणारा आनंदयात्री

अनिल जोशी वाईनिवासी. तर्कतीर्थांचा सहवास नित्याचा, त्यात ते दैनिक 'केसरी' चे प्रतिनिधी. त्यांनी तर्कतीर्थांच्या अनेक मुलाखती घेतल्यात. त्यातून 'संवाद : तर्कतीर्थांशी' ग्रंथ साकारलाय. या प्रकल्पातील खंड-६ हा 'मुलाखतसंग्रह' आहे. यातील ७८ मुलाखतींपैकी २८ मुलाखती एकट्या अनिल जोशींच्याच आहेत. यात भक्ती सातत्य आहे नि नित्य विचारपूजाही! त्यात त्यांनी अनुभवले आहे की तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी नित्य नव्या विचारांत रमणारे आनंदयात्री होत. ज्ञानसाधना तर्कतीर्थांच्या लेखी खरा ब्रह्मानंद होता. नित्य वाचन, लेखन, मनन, चिंतन हेच त्यांचं जीवन होतं. क्लेषकारक प्रसंगातही ते यामुळे स्थितप्रज्ञ राहू शकले. 'सुखदुःखे समे कृत्वा, लाभालाभौ जयाजयौ' अशी वृत्तीच बनून गेलेली. विसंगती सांगत सुसंगती शोधाचं शास्त्र तर्कतीर्थांनी विचार व्यवहारातून प्रत्यक्षात आणलेलं. जीवनमूल्यांवर अपार निष्ठा हेच यांचं खरं आत्मबल होतं. नव्वदी पार करताना नि नेत्र पैलतीरी लागले असतानाही विजीगिषू वृत्ती अचल! यातून लाभलेलं दीर्घायुष्य हे जीवन साधनेचंच पाथेय! सर्व संत साहित्यातून तर्कतीर्थ्यांना आनंदाचा शोध लागलाय असं दिसतं. हा लेख एका आनंदयात्रीच्या आनंदमीमांसेसारखाच वाचनीय, ललित मनोहर!

## ३१. साहित्य- संस्कृतीचे महातीर्थ

'दीपस्तंभ' हे प्राचार्य शिवाजीराव भोसले यांचं लेखमालेतून आकाराला आलेलं पुस्तक. त्यातील तर्कतीर्थांचा हा लेख. यात त्यांनी तर्कतीर्थांच्या व्यक्तिमत्त्वाच्या अनेक पैलूंवर प्रकाश टाकला आहे. ते महाराष्ट्रातील विचारवंत परंपरेतील वर्तमान अध्वर्यू होत. व्याख्यान,

परिषदांमधील नि संमेलनांमधील भाषणे श्रोत्यांना पर्वणी असायची. त्यांना 'तेलगू थल्ली' पुरस्कार अमेरिकेत एन. टी. रामाराव यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला होता. (१९९३). त्यांचे ग्रंथ म्हणजे विचारगुंफेतील कोरीव लेणी होत. या वयातही ते परिव्राजक व्रत घेऊन परिभ्रमण करत असतात. त्यांचे उद्‌गार चिरंतन ठरतात, ते त्यातील नवचिंतनांमुळे! कृष्णा तीरावरील कुटीत विसावलेला हा विद्यावंत मानवकुलातील वैज्ञानिक ऋषी!! त्याला आदरपूर्वक वंदन!!!

### ३२) महाराष्ट्रातील एक थोर विचारवंत: तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

एका मीनल भावे नामक महाविद्यालयीन युवतीनं 'कृष्णाई' या आपल्या महाविद्यालयीन नियतकालिकात लिहिलेला हा लेख. तो सांगतो की तर्कतीर्थ मानवतावादी ध्रुवतारा होते. नित्य नवी ध्येये उराशी कवटाळणाऱ्या विचारवंताला शब्दबद्ध करणं महाकर्मकठीण! तरीही लेख मोठा ललितरम्य शैलीत साकारलाय. शास्त्रीजींचं लेखनसौंदर्य विचारांप्रमाणे शैलीत प्रतिबिंबित झाल्याचं आढळतं. पूर्व व पश्चिमी चिंतनाचा मेळ त्यांच्या विचारधारेत असतो. ते अपूर्णतेस पूर्णत्व प्रदान करतात. म्हणूनही 'दि बेस्ट प्रॉडक्ट ऑफ इंडियन रेनासान्स' ठरतात. धर्मचिकित्सा तीही परखड हा तर्कतीर्थांचा स्थायीभाव. त्याचं विचारधन अक्षय नि अमर!

### ३३. आनंदवादी प्रकांड पंडित

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या प्रथम पुण्यतिथीच्या निमित्ताने प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई यांनी 'महाराष्ट्र टाइम्स' या दैनिकाचे संपादक गोविंद तळवलकर यांचे व्याख्यान पुणे येथे योजले होते. त्या व्याख्यानावर आधारित हा लेख.

या लेखात गोविंद तळवलकर यांनी तर्कतीर्थांची घडण सप्रमाण प्रस्तुत करत ते आनंदवादी प्रकांड पंडित होते हे सिद्ध केले आहे. त्यांच्यासारखा दुसरा पंडित महाराष्ट्रात सापडणे कठीण. त्यांच्या जीवनात भावनात्मकता आणि विवेकवादाचा संगम होता. त्यांना नवविचारांचे निरंतर आकर्षण असे. विविध आणि विरोधी विचारांचे तर्कतीर्थांनी केलेले अनुसरण हे त्या त्या व्यक्तींच्या आत्मसमर्पण आणि त्यागामुळे, असा निष्कर्ष तळवलकर काढतात. रानडे, दादाभाई, लोकमान्य, भांडारकर, गोखले, गांधी, रॉय, राजवाडे यांचे त्यांना असलेले आकर्षण केवळ आदर्शांमुळेच, असे ते स्पष्ट करतात. तर्कतीर्थांनी आपल्या लेखसंग्रहातील प्रस्तावनेत विश्वदुःखवाद सांगितला आहे. तत्पूर्वी त्यांनी सन १९२८ मध्ये 'आनंदमीमांसा' प्रबंध लिहिला होता. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे जीवन, कार्य, व्यवहार पाहता त्यांना आनंदवादी मानणेच योग्य. कारण ती त्यांची वृत्ती खानपान, पोशाख, विचार, व्यवहारांतून प्रतिबिंबित होत होती. आपल्या ग्रंथांच्या प्रस्तावनांमधून तर्कतीर्थ केवळ विचार नाही मांडत, तर त्या विचारांच्या परिप्रेक्ष्यात ते वर्तमान समाजाची चिकित्सा करतात. ते निवृत्तिपर नाही तर प्रवृत्तिपर विचारवृत्तीचे होते. त्यांनी महाराष्ट्रभर केलेले प्रबोधन अभिनिवेषापासून अलिप्त राहात केले. महात्मा फुले त्यांना स्वातंत्र्यपूर्व काळातच समजले

होते. त्यामुळे त्यांना ब्राह्मण-ब्राह्मणेतर चळवळ व्यर्थ वाटत होती. मार्क्सवाद पराभवाची चिकित्सा करत त्यांनी स्वीकारलेला नवमानवतावाद म्हणजे नित्य नव ध्यासाचे उदाहरण होय. विज्ञान स्वीकारूनही ते धर्म नाकारत नाहीत. कारण मानवी विकासास भौतिकाबरोबर भावनिक असण्याची आवश्यकता ते नाकारत नाहीत. अशी वैचारिक मूलभूतता मांडणारे तर्कतीर्थ. त्यांनी कोणतीच पोथी कधी प्रमाण मानली नव्हती, यातच तर्कतीर्थांचे वेगळेपण असल्याचे तळवलकर यांनी स्पष्ट केले आहे.

## ३४. भारतीय प्रबोधनाचे प्रतीक

मूलतः हा लेख प्रा. मे. पुं. रेगे यांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी आपल्या वयाची ८० वर्षे पूर्ण केल्यामुळे लाभलेल्या 'सहस्रचंद्रदर्शन'योगाचे औचित्य साधून 'नवभारत' मासिकाने फेब्रु.-मार्च, १९८१ चा जोड अंक 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी विशेषांक' प्रकाशित केला होता, त्यातील होय. तो नंतर प्राज्ञपाठशाळेस ८० वर्षे पूर्ण झाल्यानंतर प्रकाशित ग्रंथ 'प्राज्ञपाठशाळा व तिची परंपरा' (१९९६) मध्ये समाविष्ट करण्यात आला. त्या ग्रंथाचे संपादन सर्वश्री लक्ष्मणशास्त्री जोशी, डॉ. के. ल. दप्तरी, महादेवशास्त्री दिवेकर, रा. ना. चव्हाण, मे. पुं. रेगे, ना. बा. मराठे यांनी केले. खरे तर ही सर्व मंडळी या ग्रंथातील लेखांचे लेखकच होत.

प्रस्तुत लेखात प्रा. मे. पुं. रेगे यांनी विशद केलं आहे की, शास्त्रीजींची वैचारिक बैठक भारतीय विचार परंपरेवर आधारित होती. या परंपरेची तार्किक आणि आध्यात्मिक अशी दोन अंगे आहेत. पैकी तार्किकतेचा परिपोष न्यायशास्त्रावर आधारित होता, तर आध्यात्मिक परंपरा ही वेदाभ्यासावर. यांची पारंपरिक ज्ञानव्यवस्था व शिस्त तर्कतीर्थांनी आत्मसात केलेली होती, ती 'शास्त्रांचे शास्त्र' मानल्या गेलेल्या न्यायशास्त्रामधून. न्याय व तर्क यांच्या आधारे ज्ञानप्राप्ती असे या शिस्तीचे सूत्र होते. ती विश्वश्रेष्ठ अशी ज्ञानग्रहण पद्धती मानली जायची. रॉयल सोसायटी, नोबेल, ऑक्सफर्ड, केंब्रिजच्या 'डॉन्स'शी ती स्पर्धा करणारी होती, याची माहिती फार कमी भारतीयांना आहे. या वैचारिक शिस्तीत 'पंक्ती लावणे', 'शास्त्रार्थ करणे' इत्यादींचा अंतर्भाव होता. त्या आधारे पूर्वी धर्मशास्त्राचा अभ्यास होत असे. पारंपरिक धर्म हा श्रुतिस्मृतिपुराण इत्यादींवर आधारित होता, म्हणून सनातन मानला जायचा. परंतु नंतरच्या काळात धर्म व्यवहारात कर्मकांड बोकाळल्यामुळे धर्माचे सामाजिक अवतार कार्य संपुष्टात आले. त्यामुळे मानवी मूल्यांना महत्त्व देणाऱ्या धर्माची गरज मानवी समाजास भासू लागली.

यातून मग बौद्ध, जैन धर्मांचा उदय झाला. याच जाणिवेने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'मनुस्मृतिदहन' केले हे खरे; पण त्या वर्ज्य तत्त्वांशिवाय त्यात अनेक गोष्टी होत्या. तर्कतीर्थांनी धर्मतत्त्वांचा अंगीकार हा विवेकाने केला. ही दृष्टी त्यांनी आपले गुरू केवलानंद सरस्वती यांच्याकडून प्राप्त केली होती. बंदिस्त व आत्मलक्ष्यी धर्म सुधारण्याची आणि तो

उदार बनविण्याची तर्कतीर्थांची धडपड ही काळाची गरज होती. पारंपरिक संकल्पनात्मक चौकट अस्मितेचा भाग मानणे कितपत योग्य आहे? असा तर्कतीर्थांनी उपस्थित केलेला प्रश्न विचारणीय होता. त्याच्या परिपूर्तीसाठी आचारात परिवर्तन अनिवार्य होते. ते तर्कतीर्थांनी व्यक्तिगत जीवनात अनुकृत केले होते.

स्वातंत्र्यपूर्व काळातील सशस्त्र क्रांती आणि स्वातंत्र्योत्तर काळातील नवमानवतावादाचा स्वीकार हे त्यांच्या लेखी ऐतिहासिक पराभवाचे परिमार्जन होते. तसेच ते त्यांच्या दृष्टीने सामाजिक परिवर्तनाचे माध्यम आणि प्रबोधन साधनही होते. या संदर्भात त्यांनी केलेली 'हिंदुधर्माची समीक्षा' आपण समजून घेतली पाहिजे, असे प्रा. मे. पुं. रेगे यांना वाटते. धर्म परिवर्तन, समाज परिवर्तन, शिक्षण, प्रबोधन हे तर्कतीर्थांच्या कार्याचे खरे स्वरूप होय. ही प्रक्रिया स्वातंत्र्योत्तर काळात मंदावल्याने नवे तर्कतीर्थ घडले नाहीत.

प्रस्तुत लेखाच्या शेवटी प्रा. मे. पुं. रेगे यांनी व्यक्त केलेली खंत ही वर्तमान समाजाची खरी शोकांतिका आहे. या संदर्भात आपण एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, विवेकवाद, नवमानवतावाद ही तत्त्वे अथवा मूल्ये तुम्ही प्रखर बुद्धिवादी असल्याशिवाय अंगीकारू शकत नाही. त्यासाठी व्यक्तिमत्त्वात एक वैचारिक शिस्त व बांधिलकी असावी लागते. या खंडाचे प्रयोजनच मुळी वर्तमान समाजास अंतर्मुख व्हावयास भाग पाडणे आहे. स्वातंत्र्यानंतर आपण नवे तत्त्वज्ञान जन्माला घालू शकलो नाही, हे शल्य आपणांस जोवर डाचणार नाही, तोवर आपल्या वैचारिकतेचा प्रगल्भतेकडे नेणारा प्रवास अशक्य आहे, हे पण आपण समजून घेतले पाहिजे. तर्कतीर्थांच्या जीवन, कार्य, विचारांचा अभ्यास व अनुकरण या खंडाचा खरा उद्देश आहे. तो फलद्रूप तेव्हाच होईल, जेव्हा आपण धर्म, जात इत्यादी तत्त्वे मानवी मूल्य म्हणून पाहू लागू. तर्कतीर्थ ते अशा अंगांनी पाहात. प्रा. मे. पुं. रेगे यांचा लेख या दृष्टीने असाधारण महत्त्वाचा आहे.

### ३५. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

शरद बेडेकर यांनी 'विचारवंतांचा ईश्वर' (१९९७) या आपल्या ग्रंथात 'ईश्वर' संकल्पनेचे विवेचन करत अनेक विचारवंतांनी ईश्वर संकल्पनेबद्दल जे विचार व्यक्त केले आहेत, त्यांची चर्चा केली आहे. यात स्वातंत्र्यवीर सावरकर, सुधारकाग्रणी आगरकर, महात्मा जोतिबा फुले, जे. कृष्णमूर्ती, स्वामी विवेकानंद, शहीद भगतसिंग, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, मानवेंद्रनाथ रॉय, भगवान महावीर, गौतम बुद्ध यांच्या विचारांचा परामर्श घेण्यात आला आहे. 'ग्रंथाली'ने या ग्रंथाचे प्रकाशन केले आहे.

शरद बेडेकर यांच्या मतानुसार तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी संस्कृत साहित्य आणि हिंदू संस्कृतीचे गाढे अभ्यासक होते. त्यांनी विपुल ग्रंथलेखन करून विविध विषयांसंबंधी आपल्या धारणा स्पष्ट केल्या आहेत. तर्कतीर्थांना आंधळी, परंपरागत ईश्वरभक्ती मान्य नव्हती, तद्वतच वेंधळी पश्चिमी पूजाही! आस्तिक व नास्तिक अशा दोन्ही धारणा समर्थकांना

तर्कतीर्थ आपले वाटत. कारण मूलतः ते शून्यवादी होते. बुद्ध, नागार्जुन, चार्वाक त्यांचे आदर्श होते. तर्कतीर्थ वेद मानत, पण त्यांच्या लेखी वेद मनुष्यनिर्मित होते. मोक्षापेक्षा तर्कतीर्थ कर्मयोग मानीत ('गीतारहस्य' चर्चेत ते स्पष्ट होते!). अलौकिकावर तर्कतीर्थांचा विश्वास नव्हता; परंतु अंतिम सत्याचा शोध ते घेत होते. केवळ भौतिक तत्त्व त्यांना अमान्य होते. त्याला भावनात्मकतेची जोड ते आवश्यक मानत. 'ईश्वरा'संबंधी त्यांची भूमिका समन्वयवादी होती.

## ३६. तर्कतीर्थांची विचारयात्रा

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या निधनानंतर लिहिलेल्या या लेखात त्यांच्या समग्र वैचारिक प्रवासाचा आढावा घेण्यात आला आहे. प्राचार्य शेवाळकरांनी स्पष्ट केलं आहे की, तर्कतीर्थांच्या व्यक्तिमत्त्वाची घडण वैदिक साहित्य अभ्यासातून झाली होती. पुढे स्वातंत्र्य चळवळ, रॉयवादी चळवळ इत्यादींतून त्यांचा वैचारिक पट रुंदावला नि विस्तारला. रॉयवादी दशकभरच्या प्रयत्नांनंतर तर्कतीर्थांच्या लक्षात आले की, भारतीय जनमानस हे क्रांतिपूरक नाही. म्हणून मग त्यांनी नवमानवतावादाचा पुरस्कार केला. स्वातंत्र्योत्तर काळात ते काँग्रेसवासी बनले. निरंतर विचार विकास हे त्यांच्या जीवनाचे सूत्र बनले. ते मनोमंडल सिद्धांत समर्थक होते. त्यांची भाषणे चिंतनशील असत. मानवी बुद्धिमत्ता व ज्ञानमत्ता यांच्या सर्वोच्च शिखरावर ते आरूढ झाले होते.

## ३७. साध्या वृत्तीचा प्रकांड पंडित

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या जन्मशताब्दी प्रारंभाच्या निमित्ताने दैनिक 'सकाळ'च्या २३ जानेवारी, २००० च्या अंकात तर्कतीर्थांचे घनिष्ठ सहकारी प्रा. मे. पुं. रेगे यांनी लिहिलेला हा लेख म्हणजे विसाव्या शतकाचा साक्षीदार राहिलेल्या एका साध्या वृत्तीच्या प्रकांड पंडिताचे जीवन, कार्य, विचारशिल्प होय. प्रा. मे. पुं. रेगे यांनी प्रस्तुत लेखात सन १९५५ च्या 'समाज प्रबोधन पत्रिका' स्थापनेपासून ते जीवनान्तापर्यंतचे तर्कतीर्थ विशद केले आहेत. तर्कतीर्थ मे. पुं. रेगे यांना त्यांच्या लिखाणातून ओळखत. पण प्रत्यक्ष परिचय 'समाज प्रबोधन पत्रिका'च्या गारगोटीच्या श्री मौनी विद्यापीठातील बैठकीत कसा झाला याचा मासलेवाईक किस्सा मे. पुं. रेगे यांनी लेखारंभी सांगितला आहे. तो काळ बुद्धिवादी मंडळींच्या चळवळी व संघटनेचा होता. काँग्रेस कार्यकर्ते शंकरराव देव, गांधीवादी आचार्य स. ज. भागवत, प्राचार्य देवदत्त दाभोळकर, प्रा.अ. भि. शाह, प्रा. भा. शं. भणगे, प्रा. गोवर्धन पारीख प्रभृती मान्यवर हे तर्कतीर्थांचे मित्रमंडळ. यात प्रवेशाचा आनंद मोठा. या सर्वांना ऐकणं पर्वणी होती. मुंबईत तर्कतीर्थ आले की प्रा. अ. भि. शहा, प्रा. गोवर्धन पारीख यांच्याकडे उतरत. या स्नेह्यांमुळे तर्कतीर्थांचा निकट सहवास, साहचर्य, संस्कार लाभले. साहित्य आणि संस्कृती मंडळ, धर्मकोश, मराठी विश्वकोश इ. कार्यांमुळे हा स्नेह दृढ होत गेला. तर्कतीर्थ मराठी ज्ञानभाषा व्हावी म्हणून धडपडत होते. आधुनिक

ज्ञानाच्या मराठीकरणाचा जणू त्यांनी ध्यास घेतला होता. शास्त्रीजी मानवेंद्रनाथ रॉय यांचे सहकारी होते. मानवेंद्रनाथ रॉय तर्कतीर्थांना मानत. शास्त्रीजींच्या विचार व आचरणाला अखिल भारतीय संदर्भ असायचा. भारतीय लोकशाही हा त्यांच्या निष्ठेचा विषय होता, समग्र भारतीय संत साहित्य तर्कतीर्थांच्या जिभेवर होते. हा तसा भारतीय दर्जाचा विद्वान, पण मराठी मानसास यांची नीट ओळख होऊ शकली नाही. तर्कतीर्थ भारतीय संस्कृती व आधुनिकतेचे अभ्यासक, उपासक; पण या दोन्हींचा मेळ त्यांना घालता आला नाही. प्रकांड पांडित्य त्यांनी लीलयेने पेलले. त्यांची राहणी साधी होती. त्यांच्या जीवनात उतारचढाव पुष्कळ आले, पण त्यांनी आपल्या वैयक्तिक जीवनातील तोल कधी ढळू दिला नाही. एक निकट सहकारी म्हणून निरीक्षणातून साकारलेल्या या व्यक्तिचित्रात आदर्श अधोरेखित होतो पण तो वस्तुनिष्ठतेच्या पायावर, हे अधिक महत्त्वाचे.

### ३८. कर्मयोगी विद्वान

जन्मशताब्दी निमित्ताने प्रकाशित दैनिक सकाळच्या 'प्रतिमा' या रविवारीय पुरवणीत (२३ जानेवारी, २०००) तर्कतीर्थांचे आणखी एक निकटवर्ती व सहकारी प्रा. रा. ग. जाधवांचा हा लेख वरील लेखाप्रमाणेच व्यवच्छेदक आहे. त्यात प्रा. जाधव यांनी स्पष्ट केले आहे की शास्त्रीजींना आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा लाभली ती विद्या व्यासंगामुळे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेकविध पैलू होते. तर्कतीर्थ आणि विसावे शतक हे जुळ्या भावंडाप्रमाणे विकसित होत राहिले. प्राज्ञपाठशाळा, स्वातंत्र्य आंदोलन, रॅडिकल डेमॉक्रेटिक पार्टी, सोमनाथ मंदिर प्राणप्रतिष्ठा, संविधान संस्कृत भाषांतर यांतून तर्कतीर्थांचे व्यक्तिमत्त्व विकसित होत गेले. त्यांनी केलेल्या वैविध्यपूर्ण लेखनातून त्यांच्यातील विचारवंत आणि साहित्यिकाची घडण झाली. शास्त्रीजींना अर्धशतकाचे वैवाहिक जीवन लाभले. त्यांनी आपल्या पत्नीस तिच्या निधनानंतर वाहिलेली 'भावपुष्पांजली' हृद्य आहे. टिळक युगाचे संस्कार, प्राज्ञपाठशाळेचा धर्मसुधारणावाद घेऊन तर्कतीर्थांनी गांधीयुगात प्रवेश केला. तरी शास्त्रीजींचा उपजत पिंड मूलतः आध्यात्मप्रवण जीवनोपासनेचाच राहिला. ते कर्मसंन्यासी नव्हते. होते ते कर्मयोगी! कर्मलक्ष्यी घटकांमध्येच त्यांनी स्वतःस गोवून, गुंतवून ठेवले होते. ते सर्व तत्त्वज्ञानाचे भाष्यकार राहिले पण मनोमन शून्यवादीच राहिले. त्यांचं व्यक्तिमत्त्व ज्ञानविज्ञानवादी दृष्टीचं स्वयंभू होतं. ते शतकाचे साक्षीदार नव्हते तर त्याला प्रवृत्त करणारे कर्मवीर होते. प्रा. रा. ग. जाधव यांनी 'विचारशिल्प', 'शास्त्रीजी'सारख्या ग्रंथांतून व विविध लेखांतूनही तर्कतीर्थ चित्रित केले आहेत. ते या लेखासारखेच विलोभनीय आहे.

### ३९) तर्कतीर्थ: प्राज्ञ धर्मसमीक्षक

डॉ. मो. गो. धडफळे यांनी प्रस्तुत लेख तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने या वर्षातील स्मृतिदिनाचे औचित्य साधून दैनिक 'सकाळ'च्या 'प्रतिमा' पुरवणीसाठी लिहिला होता. तो या दैनिकाच्या रविवार दि. २१ मे, २००० च्या

अंकात प्रसिद्ध झाला होता. यात त्यांनी म्हटलं आहे की तर्कतीर्थ पदवीला माहात्म्य लाभले ते लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या जीवनामुळे. त्यांनी तर्क अर्थात न्याय विषयावर विपुल लेखन केले. न्याय हेच त्यांच्या विचारांचं आधारभूत तत्त्व वा मूल्य होतं. त्यांच्या 'विश्वकोशकार' व्यक्तिमत्त्वाची घडण 'धर्मकोशकार' भूमिकेतून झाली. ते धर्मसुधारणाकार म्हणजेच समाजसुधारणाकार होते. तर्कतीर्थ रॉयवादी झाले खरे परंतु यांनी मार्क्सवादाचा स्वीकार पोथीनिष्ठ अशा चौकटीतून न करता चिकित्सेतून केला. त्यामुळे ते मार्क्सवाद सोडून नवमानानावाद स्थापन करू शकले. अनुचित रूढी आणि अयोग्य सांस्कृतिक परंपरांची लक्ष्मणरेषा ओलांडणारे ते प्रागतिक धर्मशास्त्री होते. धर्माविषयी रामशास्त्री बाण्याने त्यांनी भाषणे केली, त्याचबरोबर लिखाणही केलं. गुळमुळीतपणा त्यांना अजिबात मान्य नव्हता. सडेतोड विधाने करण्याची त्यांना सवय होती. अशी विधाने बऱ्याचदा वादग्रस्त ठरली. काही तर अनेकदा परस्परविरुद्ध असणारी असत. परंतु ती त्यांच्या विचार चिंतनातून निर्माण झालेली स्वतंत्र बुद्धीची असत. तर्कतीर्थ काव्य, संगीत, साहित्यात रमत. त्यांनी आयुष्यभर जनजागरण व समाजप्रबोधन केलं. डॉ. मोहनराव धडफळे यांनी आपल्या या लेखात शास्त्रीजींच्या घरगुती आठवणींना उजाळा देत हा प्राज्ञ धर्मसमीक्षक लौकिक जीवनात तितकाच स्नेहशील, मनमिळावू, घरगुती व्यवहार जपणारा गृहस्थाश्रमी होता, हे स्पष्ट केले आहे.

**४०) शतकाचा वाटसरू**

दैनिक 'महाराष्ट्र टाइम्स', मुंबईच्या २८ मे, २००० च्या अंकात प्रकाशित झालेला हा लेख जन्मशताब्दी वर्षातील स्मृतिदिनानिमित्त तो लिहिल्यानं त्याला शतकाच्या मूल्यमापनाचं परिमाण लाभलं आहे. तसं, प्रा. मे. पुं. रेगे यांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या अनेक मुलाखती घेतल्या आहेत. अनेक लेख लिहिलेत नि भाषणंही दिलीत. पण निकट साहचर्यामुळे सर्वत्र नव्या बाबींवर प्रकाश पडत राहतो नि वाचकांना शास्त्रीजींच्या व्यक्तिमत्त्वाचे नवनवे पैलू उमजत जातात. विसाव्या शतकात ज्या उलथापालथी झाल्या त्याचे तर्कतीर्थ केवळ मूक साक्षीदार नव्हते तर सक्रिय भागीदार होते. ते उत्कट जीवन जगले. पण कधी विचलित झाले नाहीत. ते काल नि प्रदेश प्रतिबिंबित तत्त्ववेत्ते होते. गर्दीत ते हरखत नि हरवत असत. त्यांच्याशी कधीही भेटावं, बोलावं असे ते गृहस्थ होते. मानवतावाद त्यांच्या जिभेवर नाही तर आचारात होता. सोविएत रशियाचे विघटन झाल्यावर ते म्हणाले होते की अस्तित्वात येणाऱ्या प्रत्येक वस्तुंचे विघटन होते हे खरे पण सोविएत साम्राज्याचे विघटन झाले ते आंतरिक दुबळेपणामुळे. धर्मसुधारणा हे शास्त्रीजींचे मोठे समाजकार्य व योगदान असल्याची या लेखातील प्रा. रेगे यांनी केलेली नोंद महत्त्वाची होय. शास्त्रीजी धर्मशास्त्राचे अधिकारी होते आणि परिवर्तनवादी पंडितही. समन्वय आणि इतिहासवाद या विवादाचे फलित म्हणून तर्कतीर्थांच्या 'धर्मकोशा'कडे पाहावे लागते. वैज्ञानिक ज्ञान व

तंत्रे, मानव्यवादी मूल्ये आणि त्यांच्यावर आधारलेली विवेकनीती यांनी व्यवहाराचे नियमन व्हावे अशी शास्त्रीजींची शिकवण होती. हा लेख या सर्व शिकवणीची उजळणी करतो.

### ४१) मराठी विश्वकोशकर्ते : शास्त्रीजी

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांनी एक गौरव अंक (विशेषांक) प्रकाशित केला होता. त्यातील प्रा. रा. ग. जाधव यांचा हा लेख. याचे महत्त्व अशासाठी की प्रा. जाधव अनेक वर्षे मराठी विश्वकोश कार्यालय, वाई होथे मानव्य कक्षेचे संपादक म्हणून कार्यरत होते. तर्कतीर्थांचे मराठी विश्वकोश निर्मितीतील सहयोगी म्हणून या लेखाला महत्त्व आहे. लेखाचा पूर्वार्ध मराठी विश्वकोशाच्या ध्येय, उद्दिष्ट, स्वरूपावर प्रकाश टाकतो. त्यातून तर्कतीर्थांची कोश निर्मितीविषयक संकल्पना रेखांकित झाली आहे तर उत्तरार्ध हा 'विश्वकोशकर्ते तर्कतीर्थ' या अंगाने व्यक्तिनिष्ठ वर्णन करताना दिसतो. त्यानुसार मराठी विश्वकोश परिपूर्तीसाठी म्हणून तर्कतीर्थांनी केवळ बुद्धिजीवी लेखकांची फौज नाही उभारली तर मराठी विश्वकोश निर्मिती विना अडचणीची व्हावी म्हणून कागद कारखाना, मुद्रणालय उभारले, त्यातील तज्ज्ञ गोळा केले. कार्यालयाची रचना तर्कतीर्थांनी अशी केली होती की एका दृष्टिक्षेपात सर्वांचे कार्य लक्षात येई. त्यांचे कार्यालय मुक्तद्वार होते. कोणीही जाऊन आपले शंका समाधान, तक्रार निवारण करून घेत असे. संपादकीय मंडळाच्या बैठकी म्हणजे ज्ञानसत्र असे. विश्वकोश निर्मितीस आवश्यक मनुष्यबळाची घडण हे शास्त्रीजींचे खरे योगदान होय. शास्त्रीजींनी मराठी विश्वकोशाची स्वायत्तता जपली. मराठी विश्वकोशासाठी कोणताही विषय शास्त्रीजींनी 'अविषय' मानला नाही, हे त्यांच्यातील ज्ञानतपस्वीचे खरे उदारपण होय. ते स्वत: चांगले नोंदलेखक होते. (मराठी विश्वकोशाच्या वीस खंडात त्यांच्या १५९ नोंदी आहेत.) शिवाय त्यांनी नोंदलेखनाची शैली स्थिरपद केली. ('मराठी विश्वकोश परिचय ग्रंथ' वाचला की ते लक्षात येते.) 'सन १९६० ते १९८० हा मराठी विश्वकोश निर्मिती कालखंडातील मंतरलेले उद्योगपर्व होते.' अशा सार्थ शब्दात प्रा. रा. ग. जाधव यांनी तर्कतीर्थांच्या लेखी मराठी विश्वकोश हा नर्मबिंदू (Weak Point) होता, हे स्पष्ट केले आहे. हा लेख एका अर्थाने मराठी विश्वकोश निर्मितीचा संक्षिप्त इतिहासच होय. 'चक्षुर्वैसत्यम्' हे या लेखाचे खरे मूल्य होय.

### ४२. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशीः एक 'विभज्यवादी' विचारवंत

संस्कृतमध्ये ज्या अर्थाने 'विभज्यवादी' शब्द वापरला जातो, पाली-बौद्धधर्मीय त्यास 'विभज्जवादी' म्हणतात. याचा अर्थ 'The Religion of Logic and Reason' असा होतो. म्हणजे एखादा विचार तर्कनिष्ठ, शास्त्रपूत, समंजस आणि व्यवहार्य विवेकशीलतेने करणे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची विचारसरणी या पद्धतीची होती, म्हणजे ते विभज्यवादी सिद्ध होतात, अशी उपपत्ती मांडणारा हा लेख. प्रा. डॉ. मो. गो. धडफळे अर्थात मोहन गोविंद धडफळे हे मूलतः प्राच्यविद्या पंडित, बौद्ध, पालीचे अभ्यासक. त्यांनी या

लेखात सर्वथा वेगळ्या कसोटीवर तर्कतीर्थांच्या व्यक्तिमत्त्वाचे विश्लेषण व मूल्यांकन केले आहे.

त्यानुसार समोर आलेल्या विषयाची तर्कशुद्ध मांडणी हे तर्कतीर्थांच्या व्यक्तिमत्त्वाचं खरं बलस्थान होतं. ज्योतिषशास्त्रासारख्या विषयांवरही ते वाद करीत. ते सांगत की, गणित आणि शक्यता यांमधील अंतर कमी होण्यावर ज्योतिषाचं यश अवलंबून आहे. तर्क आणि युक्तता यांच्या समन्वयाचा जो विभज्यवादी विचार होता, त्याचे तर्कतीर्थ पुरस्कर्ते होते. सर्व धर्मग्रंथांचा ते साकल्याने विचार करत. 'वेद' आणि 'त्रिपिटक' त्यांच्या दृष्टीने समान जिज्ञासेचे विषय होते. मार्क्सवादातील विरोधविकासवाद मांडून त्यांनी आपला विभज्यवाद सिद्ध केला होता. सर्वधर्मी समानत्व व मैत्रीभाव तर्कतीर्थांना विश्वबंधुत्वाकडे घेऊन जातो. 'गाळीव मार्क्सवाद', 'निवडक नवमानवतावाद' आणि 'आंशिक फ्राइडवाद' ही त्यांच्या विभज्यवादी असण्याची निजखूण होय. त्यांनी मराठीत लिहिलेले सर्व ग्रंथ भारतविद्या (Indology) शाखेत येतात. कोणत्याही विषयाला गोलाई देण्याचं तर्कतीर्थांचं कौशल्य अपवाद होतं. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनातील ते सर्वमान्य व्यक्ती होते. हा लेख तर्कतीर्थांच्या व्यक्तिमत्त्वाची चिकित्सा वेगळ्या पद्धतीने करणारा असल्याने अभिनव असा आहे. डॉ. मो. गो. धडफळे हे प्राच्यविद्या पंडित असल्याने व तर्कतीर्थांचा त्याचा अभ्यास असल्यानेच त्यांना वेगळी मांडणी करणे शक्य झाले आहे.

### ४३. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी: धर्मसुधारणा आणि समाजसुधारणा

ही गोष्ट स्वातंत्र्यपूर्व काळातील. मराठवाड्यातील मोठा प्रदेश हा निजामशाहीच्या अमलाखाली होता. स. मा. गर्गे तेव्हा औरंगाबादमध्ये राहात होते. तिथल्या व्याख्यानमाला, ग्रंथालय, सांस्कृतिक कार्यक्रमांत ते सक्रिय असत. या कामांतूनच त्यांचा तर्कतीर्थांशी परिचय घडून आला. त्या काळात व्याख्यानमालेचा वक्ता बाहेरचा असला तरी अध्यक्ष स्थानिकच असे. काही वाद झाल्यास अध्यक्षास जबाबदार धरण्याचा रिवाज निजामशाहीत होता. पुढे स. मा. गर्गे पुण्यात स्थायिक झाले, तसे तर्कतीर्थ परिचयाचे रूपांतर घनिष्ठ मैत्रीत झाले. रॉयवादी चळवळ त्याचे कारण ठरली.

पुण्यातील आकाशवाणी केंद्रावरून स. मा. गर्गे यांचे लेख शीर्षकाधारित भाषण ५ नोव्हेंबर, २००० मध्ये प्रक्षेपित करण्यात आले होते. ते त्यांनी नंतर आपल्या 'भेटीगाठी' (२००२) या ग्रंथात समाविष्ट केले.

या भाषणानुसार तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी धर्मशास्त्राचे चिकित्सक अभ्यासक होते. मराठी विश्वकोशात त्यांनी धर्मविषयक अनेक नोंदी लिहिल्या आहेत. तर्कतीर्थांनी धर्मसुधारणा आणि समाज सुधारणांसंबंधी अगोदर कार्य केले आणि नंतर तद्संबंधी लेखनही. पूर्व शतकातील (१९ वे शतक) समाज व धर्मसुधारक सर्वश्री महात्मा फुले, 'सुधारक'कार गोपाळ गणेश आगरकर, लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, लो. टिळक

आणि वर्तमान शतकातील (विसावे शतक) डॉ. रा. गो. भांडारकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रभृती मान्यवरांचे कार्य पुढे नेण्याची तर्कतीर्थांची भूमिका राहिली. आपण इतिहासात पराभूत होत राहिलो यात प्राचीन रूढी, चालीरीतींचा वाटा मोठा आहे. यास शह देण्याचा प्रयत्न ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज, आर्य समाज इत्यादींनी केला. विसाव्या शतकातील अशा प्रकारच्या कार्यात तर्कतीर्थ हे आघाडीवर होते. बुद्धिवादाचा स्वीकार, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अंगीकार यांतून तर्कतीर्थांनी समाज प्रबोधन घडवून आणले. भौतिक सुधारणांना मूल्यांची जोड देऊन समन्वयातून तर्कतीर्थांनी धर्म नि समाज परिवर्तन घडवून आणले.

## ४४. एक चालते बोलते विद्यापीठ

अ. पां. देशपांडे हे मूलतः मराठी विज्ञान परिषदेचे तर्कतीर्थ वेदाभ्यासी. आध्यात्म आणि विज्ञानाचा समन्वय म्हणजे तर्कतीर्थ जीवन. 'विद्वज्जन' या आपल्या ग्रंथात अ. पां. देशपांडे यांनी सश्रद्धपणे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचं कार्य आणि कर्तृत्व रेखाटले आहे. 'भयचकित नमावे तुजला' म्हणत ही श्रद्धा इथे व्यक्त झाली आहे. 'भयचकित नमावे तुजला रमणी' ही मूळ काव्यपंक्ती भा. रा. तांबे यांची ती कविता स्त्री गौरवाची! पण त्यातील विशेषणं जशी भयचकित करणारी तद्वतच आदरभावही व्यक्त करणारी! या खंडातील सारे लेखही असेच. अ. पां. देशपांडे यांनी या लेखात तर्कतीर्थांचा सर्व जीवनपट साक्षात केला आहे. काँग्रेस कार्यकर्ते शंकरराव देव आणि तर्कतीर्थ 'नवभारत'मुळे जोडले गेले. शंकरराव देव आध्यात्मिक वृत्तीचे गृहस्थ होते. त्यांना तर्कतीर्थ तसेच वाटत. पण प्रत्यक्षात वेगळा अनुभव आल्यानंतर (तर्कतीर्थ मार्क्सवादी झाल्याचे लक्षात आल्यावर) ते आपणापासून वैचारिकरीत्या दूर गेल्याचं शल्य शंकरराव देव यांनी महात्मा गांधींपुढे व्यक्त केल्याची या लेखातील आठवण मोठी हृद्य आहे. पुढे कालांतराने 'आपण गांधीवाद सोडायला नको होता' ही तर्कतीर्थांची कबुली म्हणजे सुबह का भूला, शाम को लौट आये' असंच होतं. (संदर्भ-'कृष्णाकाठचा माणूसः सुसंस्कृत नेतृत्व' शीर्षक मुलाखत, खंड-६) 'तर्कतीर्थ, तुम्ही संपादिलेला मीमांसाकोश, धर्मकोशाचे खंड आणि विश्वकोशाचे हजारो पृष्ठांचे चौदा खंड या क्षय न पावणाऱ्या इमारती आहेत. ते तुमचं अपहृत न होणारे धन आहे.' हे काढलेले शंकरराव देवांचे उद्‌गार म्हणजे एका समाजसेवकाने दुसऱ्या ज्ञानसेवकाचा केलेला अक्षय गौरव होय.

## ४५) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

वी. र. काळे यांचा 'विस्मृतीतील विचारवंत' हा लेख मूलतः त्यांनी घेतलेल्या एका प्रत्यक्ष मुलाखतीवर आधारित दीर्घ लेख होय. 'तर्कतीर्थांची खरी ओळख महाराष्ट्राला झाली नाही' अशी खंत एकदा प्रा. मे. पुं. रेगे यांनी व्यक्त केली होती. प्रस्तुत लेखाकडे या शल्याची पूर्ती म्हणून पाहता येते. इथे तर्कतीर्थांच्या समग्र जीवनाचे सर्वंकष आकलन करून ते सादर करण्याचा लेखकाचा भाव कृतज्ञतेपोटी घडलेला दिसतो. लेखाच्या पूर्वार्धात जीवनपट

उलगडून दाखवला आहे, तर उत्तरार्ध विश्लेषणकेंद्री आहे. ते विश्लेषण साहित्यलेखनाचा आढावा घेत केले आहे. ते प्रामुख्याने 'वैदिक संस्कृतीचा विकास'वर आधारित आहे.

### ४६) अभिवादन : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री

अथर्व देसाई लिखित हा लेख म्हणजे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या रौप्य महोत्सवी स्मृतिदिनानिमित्त केलेले त्यांच्या जीवन, कार्य नि विचारांचं कृतज्ञ स्मरण! ते 'साधना' साप्ताहिकाच्या ४ फेब्रुवारी, २०१७ च्या अंकात प्रसिद्ध झालं होतं. आपल्या मनात काही व्यक्तींबद्दल त्यांच्या विस्मयकारी कार्यकर्तृत्वामुळे जिज्ञासा असते नि कृतज्ञताही! माणसाच्या घडणीत प्रवासात भेटणाऱ्या व्यक्तींचं योगदान असतं खरं! तसे तर्कतीर्थांना अनेक जण कार्य वाटचालीत भेटत राहिले-शिकताना स्वामी केवलानंद सरस्वती, आचार्य विनोबा भावे, महात्मा गांधी, कार्ल मार्क्स, मानवेंद्रनाथ रॉय प्रभृती मान्यवर. त्यामुळे त्यांचा प्रवास वेद ते नवमानवतावाद असा आध्यात्माकडून विज्ञान नि वस्तुनिष्ठतेकडे होत राहिला. ते देववादी होते, ते कर्तव्यपरायण झाले. धर्मचिकित्सक, जिज्ञासू तत्त्वज्ञ बनले. मग त्यांना भारतीय तत्त्वज्ञानातील दारिद्र्याची जाणीव झाली तसे ते पाश्चात्त्य साहित्य नि तत्त्वज्ञानाचे अवगाहन करू लागले. यामुळे ते व्यापक अर्थाने विश्वमानव झाले. त्यांना कोण्या एका विचारधारेचा ठरवणं अवघड. 'गंगा गये गंगादास, जमना गये जमनादास!' 'पानी तेरा रंग कैसा? जिसमें मिलाये वैसा...' अन्यथा नितळ, निरभ्र, निःस्पृह, निर्मोही, निरपेक्ष! पाण्यात राहून कोरडं राहाणं सोपं का असतं?

### ४७. इहवादी ऋषी: तर्कतीर्थ

प्रसंगोपात न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर यांचा तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्याशी परिचय झाला, पण तर्कतीर्थांची उदारता, व्यासंग, आतिथ्यशीलता यांमुळे परिचयाचे रूपांतर स्नेहबंधात झाले. तर्कतीर्थांच्या साध्या गप्पा ऐकणेही ज्ञानात भर घालणारे असते, असा अनुभव आहे. ते केवळ अनुभव, माहिती पुरवत नाहीत, तर निष्कर्षास आपली चर्चा पोहोचवून संगती पूर्ण करतात.

त्यांनी न्यायमूर्ती चपळगावकर यांना 'न्याय' विषयावर व्याख्यान द्यायला लावून न्याय परंपरा प्राचीन असल्याचे लक्षात आणून दिले. न्याय ही न्यायदान, कायदा इत्यादींपलीकडची प्रक्रिया असून ती एक तर्कप्रक्रिया आहे. तर्कतीर्थांनी जे ज्ञानग्रहण केले होते, ते अशा स्वाध्यायी परंपरेतून. धर्माबद्दल आदर असला तरी धर्माची मते कालबाह्य झाली असतील तर ती मानणे बंधनकारक नसल्याचा तर्कतीर्थांचा निष्कर्ष स्वाध्याय नि चिंतनातून आलेला आहे. प्राचीन विद्या अभ्यासकाची पारंपरिक प्रतिमा तर्कतीर्थांनी आपल्या व्यवहाराने बदलली आहे. समाज रचनेबद्दलच्या कोणत्याही प्रश्नाबाबत नव्या पद्धतीने उत्तर द्यायची पद्धत स्वानुभूती आधारित आहे. अशा अनेक कारणांनी ते ऋषी वाटत असले तरी लौकिक, भौतिकाचा परीघ सोडत नसल्याने इहवादी वाटतात.

### ४८. महाराष्ट्रीय विचारविश्वाचे अजातशत्रू नेतृत्वः तर्कतीर्थ

प्रारंभी तर्कतीर्थांच्या समग्र जीवन व कार्याचा आढावा घेऊन श्री. मा. भावे यांनी तर्कतीर्थांच्या अजातशत्रू नेतृत्वावर प्रकाश टाकला आहे. तर्कतीर्थ प्रथमदर्शनी परस्परविरुद्ध गुणांचे वाटले तरी प्रसंगोपात त्यातील संगती लक्षात येत जाते. राजकारणात सक्रिय राहून त्याच्यापासून अलिप्त राहण्याची त्यांची स्थितप्रज्ञता अनुकरणीय आहे. तर्कतीर्थ हे साक्षेपी अभ्यासक होते. विसाव्या शतकाच्या वैचारिक विश्वाचे महाराष्ट्रातील ते कर्णधार होते. त्यांच्यात सर्वगामी विद्वत्ता होती. मराठी विश्वकोशाच्या माध्यमातून त्यांनी महाराष्ट्रातील विचारवंतांना एकत्र येण्याचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले.

### ४९) प्रज्ञातीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

### ५०) माहीत नसलेले तर्कतीर्थ

### ५१) रंग, रेषांच्या पलीकडचे व्यक्तिचित्र: वाईचे शास्त्रीजी

### ५२) तर्कतीर्थांचे वाचन

हे चारही लेख मूलतः डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी प्रसंगोपात दिलेली भाषणे होत. 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय' आकारास येत असतानाच्या काळात समाज मानसात जागलेले कुतूहल पूर्ण करत असताना दिलेली ही व्याख्यानं, ती वेळोवेळी 'जडणघडण' (दिवाळी, २०००), 'नवभारत' (मार्च, २०२१), साप्ताहिक साधना' (२९ मे, २०२१) इ. मध्ये प्रकाशित झालेली आहेत. ती प्राज्ञपाठशाळा, वाई; मराठी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर इ. ठिकाणी झालेली. त्यात तर्कतीर्थः व्यक्ती, विचार, कार्य, घडण, वाचन समजावण्याचा प्रयत्न आहे. वर्तमान पिढीस तर्कतीर्थ ऐकून माहीत आहेत. त्यांचं साहित्यही अल्पस्वरूपात ग्रंथरूप झालंय! हिमनगावत! अशा लेखनातून तर पुढे 'सर्वंकष आकलन'सारखा ग्रंथ साकारलाय. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचं व्यक्तिमत्त्व स्वयंसिद्ध असल्यानं मला त्यांचं मोठं अचंभित आकर्षण राहत आलंय. वर्तमानात जात, धर्म, घराणं, परंपरा यांना महत्त्व येऊ लागलंय. दुय्यमास प्रथमत्व हे बुद्धिप्रामाण्याच्या पराभवाचं, लक्ष्मणरेषा न ओलांडण्याच्या भयाचं आक्रमणच ना? तर्कतीर्थांवर महाराष्ट्रातील सर्व थरांतील महानुभावांनी लिहिलं असलं तरी त्यांच्या समग्र जीवनाचं पाथेय ओंजळीत भरत नाही. बहुआयामी व्यक्तिमत्त्व आणि बहुप्रज्ञता, बहुश्रुतता इत्यादींमुळे तर्कतीर्थ पुरून उरतातच. याचं कारण एका जन्मात सात जन्मांचे कर्तृत्व करून दाखवणं. 'रंगुनि रंगात साऱ्या' बंधमुक्त राहाता येतं, याचं आश्चर्य वाटल्यावाचून राहात नाही. अशा साऱ्या पाठलागातून झालेलं हे चिंतन, मनन, लेखन, भाषण म्हणजे एक ऋषीच्या कुळाचा नि मुळाचा शोध उपक्रम! ही परिक्रमा न संपणारी. मूलत: गूढगामी माणसं अशा महानिर्वाणाच्या यात्रेत रममाण असतात, ती यात्राच मुळात अन्तहीन प्रवास असतो. अज्ञात प्रदेश, विश्वाचा. त्यामुळे शोध घेत राहणं इतकंच आपल्या हतबल हातात असतं.

### ५३) प्राज्ञपाठशाळा, ‘नवभारत’ आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या स्मृतिगौरव खंडातील हा शेवटचा लेख लिहिला आहे प्रतिमा मिस्त्री (पोरे) यांनी. या त्रिपदी लेखाचं केंद्र पर्व तर्कतीर्थ होत. प्रतिभा मिस्त्री (पोरे) या तर्कतीर्थांच्या मराठी विश्वकोश प्रकल्पातील सहकारी. सन १९७० ते ८० दशकाचा काळ हा त्यांच्या जीवनातील तर्कतीर्थ संपर्काचा. या काळातील ‘प्राज्ञपाठशाळा’, ‘नवभारत' मासिक आणि 'मराठी विश्वकोश’ असं त्रिस्थळी तर्कतीर्थ कर्तृत्व त्यांनी न्याहाळलं. त्याचं हे लेखरूप.

तर्कतीर्थ, तत्त्वज्ञ, तज्ज्ञ अशा त्रिपदी अभ्यासक बैठकीतून 'नवभारत' चे अनेक विशेषांक आकारले. 'काँग्रेस शताब्दी विशेषांक व्यवच्छेदक होता. 'मराठी विश्वकोश' निर्मिती कार्य हे मोठं ज्ञानसर्जक होतं. त्यामागे एक सुनियोजित योजना न सुदृढ कार्यवाहीचं अधिष्ठान होतं. सारं कसं नीट, नेटकं, नीटस असायचं. याला समांतर अनेक व्याख्यानं, भेटींचं, थोरामोठ्यांचं मार्गदर्शन नित्याचंच असायचं. ही एक प्रकारची अनायास लाभणारी सांस्कृतिक समृद्धी होती. हे एक- प्रगल्भ बौद्धिक वातावरण होतं. यशवंतराव चव्हाण, किसन वीर प्रभृतींचं नित्य येणं जाणं सहज संचार असायचा. त्यात अनौपचारिकता असे. एकदा यशवंतराव चव्हाण आले होते. शास्त्रीजींना बोलताना म्हणाले, "बरे झाले तुम्ही या खिंडीत (प्राज्ञपाठशाळेची अरूंद गल्ली!) राहता, राजकारणात पडून आम्हाला खिंडीत पकडले नाही!' यशवंतराव चव्हाण आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचं मैत्र अबाधित होतं. मान, सन्मान स्वीकारले पण कधी सत्त्व नि स्वत्व गमावून न देता. ‘पद्म’ पुरस्कारही याला अपवाद नव्हते! प्राज्ञपाठशाळा, नवभारत, धर्मकोश, मीमांसा कोश, मराठी विश्वकोश अशा परिघात तर्कतीर्थ विश्वयात्रा करीत राहिले. ज्ञान, ज्ञानी नि ज्ञानेश्वराच्या अनेक समाधींच्या साक्षीदार लेखिका. त्यांचं लेखन आठवणींच्या साठवणीतून घडलं असलं तरी त्यास तर्कतीर्थांच्या समृद्ध संस्काराचं कोंदण आहे. मतभेदपूर्ण स्वातंत्र्य जपत केलेलं हे लेखन त्या संस्कारांचीच जपणूक, जोपासना होय.

### (ब) श्रद्धांजली लेख

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचं २७ मे, १९९४ रोजी वृद्धापकाळाने वयाच्या ९३व्या वर्षी दुःखद निधन झालं. त्यानंतर वृत्तपत्रांमधून आणि विविध नियतकालिकांमधून त्यांच्या जीवन, कार्य, विचारांचे योगदान अधोरेखित करत अनेक मान्यवरांनी श्रद्धांजली लेख लिहिले. त्यात सर्वश्री डॉ. यु. म. पठाण, प्रा. मे. पुं. रेगे, द्वा. भ. कर्णिक, अनिल जोशी, डॉ. मधुकर जोशी, प्रा. सुभाष भेंडे, प्रा. य. दि. फडके, मधुकाका कुलकर्णी प्रभृतींचा समावेश आहे. या खंडात त्यांचा समावेश करण्यात आला आहे. पैकी काहींचे विवेचन येथे करण्यात येत आहे.

डॉ. यु. म. पठाण यांनी त्यांचा सन १९५३ पासूनचा संगमनेर महाविद्यालयापासूनचा संबंध निर्देश करून विविध स्मृतींना उजाळा दिला आहे. तर्कतीर्थांनी त्यांच्या 'उखाहरण' या कवी चोंभांच्या संपादित ग्रंथास प्रस्तावना दिल्याचे नमूद केले आहे. ती प्रस्तावना आपण या प्रकल्पाच्या 'प्रस्तावना व पुस्तक परीक्षणसंग्रह' (खंड १०) मध्ये अंतर्भूत केली आहे. डॉ. पठाण यांच्या आकलनानुसार ते अभ्यासिकेतले पंडित नव्हते. तर्कतीर्थांच्या लेखनाचा आपल्यावर प्रभाव असल्याचेही त्यांनी नम्रपणे मान्य केले आहे.

'संस्कृतीचा इतिहासकार' शीर्षक श्रद्धांजली लेखात प्रा. मे. पुं. रेगे यांनी आपला परिचय, नंतर अंतरंग गोटात समावेश इत्यादी गोष्टी सांगत स्पष्ट केले आहे की, तर्कतीर्थांमुळे आपली घडण वेगळी होऊ शकली. तर्कतीर्थ रॉय यांच्याकडे का आकर्षित झाले होते, याची ते या लेखात कारणमीमांसा करतात. शिवाय सांगतात की, प्राचीन साहित्यावरील त्यांच्या अधिकारामुळे सर्व त्यांना मानीत असत. ते आयुष्याच्या अंतकाळी शून्यवादी होऊन अद्वैतवादाजवळ जाऊन विसावले होते.

द्वा. भ. कर्णिक यांनीदेखील प्रथम भेटीपासून ते शेवटच्या क्षणापर्यंतच्या आठवणी जागवत तर्कतीर्थ उभे केले आहेत. मानवेंद्रनाथ रॉय, स्वातंत्र्य चळवळ, वृत्तपत्रलेखन इत्यादींमुळे उभयता जवळ आले आणि अतरंग मित्र बनले. तर्कतीर्थ जी भूमिका घेत, ती तडीस लावत. शेवटी ते मानवतावादी बनले होते. त्यांनी केलेले ज्ञानदान आणि लोकशिक्षण हेच त्यांचे खरे स्मारक असल्याचे कर्णिकांनी नमूद केले आहे.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे अमेरिकानिवासी ज्येष्ठ चिरंजीव डॉ. मधुकर जोशी यांनी आत्मीय स्मृती जागवत आपल्या पित्याचे मोठेपण गौरविले आहे. त्यानुसार आपले वडील मित्र होते हे स्पष्ट केले आहे. त्यांच्यावर आईन्स्टाइनचा प्रभाव होता. लोकशाहीवर अढळ निष्ठा होती. आनंदप्राप्ती हाच त्यांचा मोक्ष होता.

एस. डी. तथा श्रीधर देवीदास इनामदार हे तर्कतीर्थांचे 'मराठी विश्वकोश'मधील १९६८ पर्यंतचे सहकारी. त्यामुळे त्यांच्या लेखनास वस्तुनिष्ठतेचे अधिष्ठान आहे. तर्कतीर्थ साध्या शंकांचे निरसनही साधार करीत. त्यांचा व्यासंग सर्व ज्ञानविज्ञानाचा होता. विदेशी प्रवासाने त्यांची दृष्टी व्यापक झाली होती. सर्व धर्मांचा त्यांचा अभ्यास मूलगामी स्वरूपाचा होता. ते संदेहवादी (Sceptic) होते. भौतिकापलीकडे असलेल्या शोधात ते होते. काम, शृंगार, नग्नता, अश्लीलता इत्यादींबाबत त्यांच्या धारणा आधुनिक होत्या. ते विशुद्ध कलावादाचे समर्थक होते. त्यांच्या चर्चेतून जे मिळे, ते ग्रंथांच्या पलीकडचे असे. वि. स. खांडेकर, जी. ए. कुलकर्णी यांच्या साहित्याचे मर्म त्यांनी ओळखले होते. त्यांचं समग्र लेखन हाच तर्कतीर्थांच्या विद्वत्तेचा पुरावा म्हणून सांगता येईल.

प्रा. य. दि. फडके यांनी आपल्या लेखनात तर्कतीर्थांची मदत व मार्गदर्शन मिळाल्याचे नमूद करत म्हटले आहे की, त्यांच्या निधनाने अखंड चाललेल्या ज्ञानयज्ञाचे कुंड विझले. ते

परिणतप्रज्ञ होते. मानवहितलक्ष्यी ते स्वीकार्य असा त्यांचा विवेक होता. ज्ञानसाधना व प्रबोधन ही त्यांची खरी कार्यक्षेत्रे होती. ती त्यांनी अनेकविध प्रकारच्या कार्यांनी विस्तारली होती.

या आणि अन्य अनेकांच्या श्रद्धांजली लेखांमधून आपणांस तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक अज्ञात पैलू समजतात. त्यांचं व्यक्तिमत्त्व, जीवन, कार्य इतकं बहुआयामी होतं की, ते कितीही उजळलं, उगळलं तरी पुरून उरतंच. ही त्यांची जीवनसाधना म्हणायची. त्यांनी जे केलं, त्यामागे एक प्रकारचे ध्येय, ध्यास, धुंदी होती. काही माणसं आयुष्यभर सक्रिय राहतात, कारण कार्यरत राहणं हाच त्यांचा स्थायीभाव असतो. हे आपणच करायला हवं, असा जो घोर एखाद्यास लागलेला असतो, ती ऊर्जा नि ऊर्मी हेच त्यांचं जीवन असतं!

**(क) आठवणी**

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे आप्तस्वकीय, नातलग, स्नेही, सहकारी इत्यादींनी त्यांच्या तर्कतीर्थांसंबंधी वैयक्तिक आठवणी वेळोवेळी लिहिल्या आहेत. त्यांतून तर्कतीर्थ पिता, गृहस्थ, सासरे, काका, आजोबा, स्नेही, सहकारी, मित्र, हितचिंतक म्हणून कसे होते, या बाबींवर प्रकाश पडतो. या आठवणी या सुहृदांनी षष्ट्यब्दीपूर्ती, अमृत महोत्सव, सहस्रचंद्रदर्शन योग, स्मरण, जन्मशताब्दी, स्मृतिदिन, जयंती अशा अनेकविध प्रसंगांनी लिहिल्या गेल्या आहेत. त्यातून घरगुती वा खासगी जीवनात तर्कतीर्थांचे वागणे, सवयी, स्वभाव, संवाद, दिनक्रम, खानपान इत्यादींवर प्रकाश पडतो. सार्वजनिक व्यक्तींचं वैयक्तिक जीवन जनसामान्यांचा नेहमीच जिज्ञासेचा विषय राहात आलेला आहे. या खंडात सुमारे २५ लोकांच्या आठवणी संग्रहित आहेत.

डॉ. सुमन तथा अरुंधती खंडकर यांनी मराठी, इंग्रजीत लिहिलेल्या आठवणी या खंडात आहेत. डॉ. अरुंधती खंडकर यांनी मराठीत तर्कतीर्थांवर तीन चरित्रे लिहिली असून त्यांच्या काही लेखांची इंग्रजी भाषांतरे, इंग्रजी चरित्रही लिहिले आहे. त्या प्राध्यापिका होत्या. आईच्या अकाली निधनानंतर वडील 'अबा' घरी पालक म्हणून कसे होते, आयुष्याच्या वळणावरच्या त्यांच्या बदलत्या भूमिकांतून अबांची कर्तव्यपरायणता रेखांकित केली आहे. हेही स्पष्ट केले आहे की, अबांच्या सार्वजनिक नि घरच्या वागण्यात फरक नव्हता. मुलीचे वडील म्हणून येणाऱ्या सर्व जबाबदाऱ्या त्यांनी वेळोवेळी निभावल्या. जीवनाबद्दलचा नैतिक दृष्टिकोन तर्कतीर्थांनी संस्कार म्हणून आपल्या मुलांमध्ये रुजवला, हे सांगायला डॉ. खंडकर विसरत नाहीत. वाचन, लेखनात ते नित्य रमत असत. घरातील आतिथ्यशीलतेबद्दल अबा दक्ष असत.

डॉ. मधुकर जोशी हे तर्कतीर्थांचे अमेरिकास्थित ज्येष्ठ चिरंजीव. वडील तर्कतीर्थांशी त्यांचं मैत्रीचं नातं होतं. डॉ. मधुकर यांचं वाचन चांगलं असल्यानं पितापुत्रांत बौद्धिक चर्चा, संवाद, देवाणघेवाण होत राहायची. इतक्या दूर राहूनही आपल्यात अंतर नव्हतं, हे डॉ.

मधुकर आवर्जून नोंदवतात. पिता-पुत्रांत ३० वर्षांचे अंतर; तरी प्रगल्भ मैत्रभाव, सख्य! पण नातं, संवाद बरोबरीचे, सलगीचे असत. यंत्रयुगाच्या प्रभातकाळी आबा भारावलेले असायचे. मी आबांसारखाच अल्पसंख्य, उपरा राहिलो. यातील पिता-पुत्रांची जुगलबंदी मुळातूनच वाचायला हवी.

तत्कालीन 'लोकसत्ता' दैनिकाचे संपादक माधव गडकरी यांनी आपल्या 'साहित्यातील हिरे आणि मोती' (१९८४) या ग्रंथात तर्कतीर्थांच्या दीर्घकालीन सहवासातील अनेक आठवणी विशद केल्या आहेत. तर्कतीर्थ फिरस्ते गृहस्थ होत. ते व्याख्यानार्थ महाराष्ट्रभर फिरत. त्यांच्या जीवनात गौरवाचे प्रसंग आले, म्हणून ते हुरळून गेले नाहीत. तद्वतच मानहानी, बहिष्कार प्रसंगी खचले नाहीत. अशा प्रसंगांनंतर कालपरत्वे त्यांनी मनाची उदारता नि क्षमाशीलतेचे दर्शन दिले. पत्नीच्या निधनानंतर पुनर्विवाह नाकारणारे तर्कतीर्थ प्रगल्भ गृहस्थ होते. ज्ञानाचं काहीच वर्ज्य नसते, म्हणणारे तर्कतीर्थ सर्व ज्ञानविज्ञानात पारंगत असणे स्वाभाविकच म्हणायला हवेत. मांसाहार, मद्यप्राशन, धुम्रपान यांबाबतचा त्यांचा दृष्टिकोन प्रागतिक राहिला आहे. आदरासह मतभेदात त्यांनी सभ्यतेचेच दर्शन दिले. त्यांचा पुनर्जन्मावर विश्वास नव्हता. ते देवळात जात, पण शिल्पसौंदर्य न्याहाळण्यासाठी. अशा अनेक आठवणींनी माधव गडकरी यांनी तर्कतीर्थांचे अनेक नवे पैलू उलगडून दाखविले आहेत.

साहित्यिक मधु मंगेश कर्णिक मुख्यमंत्र्यांचे प्रसिद्धी सचिव असल्यापासूनचा त्यांचा स्नेह उत्तरोत्तर वृद्धिंगतच होत गेला. तर्कतीर्थ कर्णिकांच्या 'तोरण' कथासंग्रह प्रकाशन समारंभाचे प्रमुख पाहुणे होते. कर्णिकांच्या गावी छोट्या हायस्कूलच्या स्नेहसंमेलनास जाऊन तर्कतीर्थांनी नमूद केलेली त्यांची उदारता हृद्य खरी! 'समग्र क्रांती'वर कणकवलीत दिलेले त्यांचे व्याख्यान विद्वत्तानिदर्शक होते. रत्नागिरीस संपन्न सन १९९० च्या ६४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनास तर्कतीर्थांनी पु. लं.सह लावलेली हजेरी कर्णिकांना विशेष भावली होती. मधु मंगेश कर्णिक आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यातील संबंध जिव्हाळ्याचे होते. त्यात कृत्रिमता नव्हती, होता स्नेहभाव. तो या आठवणींत जागोजागी प्रत्ययास येतो.

काँग्रेसचे कार्यकर्ते पुंडलिकजी कातगडे हे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे आचार्य विनोबा, श्री. शं. नवरे यांच्याप्रमाणे प्राज्ञपाठशाळा, वाईचे सहाध्यायी. तर्कतीर्थांनी त्यांना 'वेदान्त कारिका' शिकविली होती. शिवाय तत्त्वज्ञानही! तर्कतीर्थ स्वाध्यायाच्या आधारे फार पुढे गेले, हे कातगडे यांनी नम्रपणे कबूल केले आहे. त्यांच्या विद्वत्तेचा लौकिक इतका होता की, 'कर्नाटक गांधी' गंगाधरराव देशपांडे यांनी एकदा त्यांना हुदली येथे बोलावून घेऊन त्यांचा व्यासंग समजून घेतला होता. ज्योतिष परिषदेतील तर्कतीर्थांचे भाषण त्यांना संस्मरणीय वाटले.

श्रीकृष्ण लेले वाईचे. त्यांचे वडील म्हणजे वेदभूषण नीळकंठ शास्त्री लेले. त्यांनी एकदा वाईत सयशु अग्निष्टोम याग केला. यागात पशुबळी द्यायचा होता. त्याचा विरोध तेथील गोशाळा चालवणाऱ्या चौंडे महाराज यांनी केला. यागात विघ्न आले. तर्कतीर्थांनी विरोध करणाऱ्यांना याग अनुष्ठानविषयक शास्त्रोक्त माहिती देऊन गैरसमज दूर केला. विघ्न टळले. परमतसहिष्णुता गावात रुजली व सामंजस्य निर्माण झाले. तर्कतीर्थ हे खरे समाजशिक्षकच!

वैद्य सौ. शुभदा पटवर्धन यांनी आपले काका म्हणून तर्कतीर्थ कसे होते, ते आपल्या आठवणींत शब्दबद्ध केले आहे. माझे वडील वेणीमाधव शास्त्री तर्कतीर्थांचे मोठे भाऊ. दोघांत प्रेमाचे संबंध होते. लेखिकेने सांगितले आहे की, आपले 'सुलोचना' नाव तर्कतीर्थांची पसंती होती. मोठ्या भावाचा 'आयुर्वेद महाशब्दकोश' साहित्य आणि संस्कृती मंडळामार्फत प्रकाशित करून त्यांनी आयुर्वेद प्रचारास मोठी गती दिली. पुतणीने तर्कतीर्थांना 'भारताचे सॉक्रेटिस' म्हटले आहे, यात अजिबात अतिशयोक्ती नाही. तर्कतीर्थ लोकसंपर्काची एकही संधी सोडीत नसत. सर्वांना प्रस्तावना लिहून देऊन प्रोत्साहन देण्याचा त्यांचा यज्ञ अखंड चालू होता. तर्कतीर्थ नियमित व्यायाम, योग करीत. भोजनोत्तर 'शतपावली' ठरलेली. त्याला तर्कतीर्थ 'चरणसेवा' म्हणत. शतपावलीतही त्यांचं शिक्षण देणं सुरू असे, हे अनेकांनी अनेक प्रसंगी सांगितलेले आहे.

## स्मृतिगौरव लेखांची मीमांसा

विसाव्या शतकाचे साक्षीदार नि भागीदार असलेल्या तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या जीवन, कार्य, विचार, व्यक्तित्व, कर्तृत्व, योगदानाची नोंद घेत सन १९३७ ते २०२३ अशा ८६ वर्षांच्या कालखंडातील हे ८८ लेख. ते लिहिलेत मित्र, सहकारी, प्रेमी, नातलग शिवाय पत्रकार, समीक्षक, साहित्यिक यांनी. निमित्ते अनेक होती. साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद, पदवी, गौरव समारंभ, अमृत महोत्सव, सहस्र-चंद्रदर्शन योग, नव्वदी आणि मृत्यूनंतर मृत्युलेख, अग्रलेख, स्मृती लेख, आठवणी इ. आपल्या समाज नि सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग म्हणून या सर्वांकडे पाहिलं जातं, पहायलाही हवं. कृतज्ञता हे जर आपण संस्कारी जीवनाचे मूल्य मानत असू तर असे लेखन उपक्रम अटळ मानले पाहिजेत. ज्यांच्यासह आपलं जगणं सुसह्य होतं अशा व्यक्तींत विचार नि व्यवहारांची देवघेव अनिवार्यपणे होत असते. यालाच सहजीवन म्हणतात.

ऋण अभिव्यक्ती हा आपल्या सांस्कृतिक जीवनाचा अनुकरणीय आदर्श मानला गेला आहे. यात ही अभिव्यक्ती कधी उच्चाराने तर कधी लेखनाने घडत राहाते. यातूनच गौरव लेख, स्मृती लेख, आठवणी जन्मल्या. या हृद्य, प्रेरक असतातच. शिवाय त्यांत वाचकास अंतर्मुख करण्याची मोठी शक्ती व क्षमता असते. असे लेख वाचून माणूस सत्शील, सदाचारी, समशील, स्नेही, सद्भावी होतो. असं लेखन साहित्यिक सौंदर्यापेक्षा प्रेरक, अनुकरण म्हणून महत्त्वाचं ठरतं. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी मूळचे पिंपळनेर या धुळे

जिल्ह्यातील एका खेड्यातील. वडिलांचा जोशीपणाचा व्यवसाय होता. मुहूर्त काढून देत, पत्रिका वाचत, पंचांग सांगत, पौरोहित्य करीत. मुलाने आपला हा पारंपारिक दीक्षा उपक्रम अधिक नेटकेपणाने करावा म्हणून ते आपल्या मुलास वेदांती, पंडित बनवू पाहात होते. यात त्यांना वाईस्थित देवकुळे नामक पिंपळनेरकरांकडून समजले की तेथे प्राज्ञपाठशाळा नामक गुरुकुल आहे. तिथे संस्कारक्षम राष्ट्रीय शिक्षण भारतीय दर्शनाच्या आधारे देऊन विद्यार्थ्यांना वेदांती बनवलं जातं. वयाच्या १४ व्या वर्षी बाळाजी जोशी यांनी आपल्या लक्ष्मणास गुरुचरणी वाहिलं नि ते निश्चिंत झाले.

या बटूचा संस्कृत पंडित होणं काही आश्चर्याची गोष्ट नव्हती. आश्चर्य या गोष्टीचं होतं की तो अपवाद विद्यार्थी ठरला याचं. अवघ्या चार वर्षांत या विद्यार्थ्याने नारायणशास्त्री मराठे या आपल्या गुरूंकडची विद्या ग्रहण केली तसे उच्च शिक्षणाचे त्यास वेध लागले नि तो 'तर्कतीर्थ' होण्यासाठी सन १९१८ ला काशीस गेला. तर्कतीर्थ होऊन सन १९२३ ला परतला नि प्राज्ञपाठशाळेचा आचार्य झाला. गुरू नारायणशास्त्री मराठे पुढे संन्यास घेऊन स्वामी केवलानंद सरस्वती झाले तसे त्यांनी 'धर्मकोश', 'मीमांसा कोश' निर्मितीत लक्ष घातले. प्राज्ञपाठशाळा, धर्मसुधारणा मंडळ या आपणच स्थापन केलेल्या संस्थांची जबाबदारी वयपरत्वे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींकडे आली, ती त्यांच्या कार्यकर्तृत्वामुळे. दरम्यानच्या काळात तर्कतीर्थ आपल्या गुरूंच्या मार्गदर्शनाखाली धर्मसभा, पंडित संमेलने, ब्राह्मण महासभा इ.तून धर्मसुधारणा चळवळीत हिरिरीने भाग घेऊ लागले होते. सनातन पंडित, शंकराचार्य, धर्माधिकारी काही केले तर प्राचीन व पारंपारिक शब्दप्रामाण्याचं सीमोल्लंघन करण्यास तयार होत नाहीत, हे पाहून मग यांनी आपला मोर्चा धर्मसुधारणा चळवळीकडून स्वातंत्र्य चळवळीकडे वळवला. स्वामी केवलानंद सरस्वती, महात्मा गांधी, मानवेंद्रनाथ रॉय अशा सतत उन्नत ऊर्जास्रोतांमुळे तर्कतीर्थांचे व्यक्तिमत्त्व उदार नि व्यापक होत वैश्विक बनलं. लौकिक मान, सन्मान, पुरस्कार लाभले ते सातत्यपूर्ण समाजशील कार्यामुळे. यातून तर्कतीर्थ सार्वजनिक सन्मान्य व्यक्ती बनले.

या खंडातील गौरव लेख, स्मृती लेख, आठवणी यांची ही पार्श्वभूमी होय. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी अजातशत्रू व्यक्ती! त्यांच्यावर न लिहिणारा आळशी. माणसाला असं सर्वग्राही होता आलं पाहिजे. ती तुमच्या समाजशीलतेची निजखूण म्हणायची. सर्व मान्यवर व्यक्ती गौरव लेख, स्मृती लेख, आठवणी लिहितात. ते सर्व मान्यवर वृत्तपत्रे नि नियतकालिके प्रकाशित करतात. हा व्यवहार एक प्रकारचा समाजसन्मानच असतो. असे लेखन व्यक्ती, कार्य, विचारांची प्रशंसा असते नि गौरवही! यातून नायकास अधिक ऊर्जस्वल जीवन जगण्याची उमेद येते नि प्रेरणा, प्रोत्साहन लाभते.

सलामीच्या गौरव लेखातच 'किर्लोस्कर' मासिकाने सन १९३७ मध्ये तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींचा गौरव 'महाराष्ट्राचा सत्पुत्र' म्हणून करावी यास भविष्यवाणी, भाकीत

म्हणावे की वर्तमानाचं वस्तुनिष्ठ वर्णन, आकलन. उगवतीलाच एखादं चरित्र लेखकास उद्‌बोधक वाटावं हा चमत्कार नसून साक्षात्कार होता हे मान्य करायलाच हवं. धर्मसुधारणा चळवळीला यश मिळत नाही म्हणून ते राष्ट्रीय चळवळीत आले. अन्यथा धर्म नि समाज सुधारक म्हणून ते लोकादरास पात्र होते. गांधीवादी विचार नि व्यवहाराचं भूत तर्कतीर्थांच्या मानेवर पराकोटीच्या कर्मठपणाने ठाण मांडून होते. विद्यार्थी दशेत त्यांनी अनेक व्रत, वैकल्ये दृढ निश्चयाने पाळली. तशीच सवय राजकीय चळवळीतही त्यांनी अंगी बाणवून घेतली होती. साखर, तिखट, दूध वर्ज्य केलं होतं. हे अहिंसा व्रत इतक्या टोकाला गेले की तर्कतीर्थ भाकरी पाण्यात कालवून, कुस्करून खाऊ लागले. शेवटी पोराची तगमग वडिलांना असह्य झाली. म्हणाले, ''गांधीवादात जीवन पापमय आहे, तर आत्महत्या का करू नये याचं उत्तर दे." तेव्हा ही राजकीय व्रते संपुष्टात आली. निग्रहामुळेच तर्कतीर्थ 'अशक्य ते शक्य करिता सायास'ची उंची गाठू शकले.

असं नव्हतं की उमेदीच्या काळात त्यांची सर्व जण भलामणच करीत होते. 'वाया गेलेला विद्वान', 'एक प्रचंड कोडे' असे प्रहारही मिळत होते नि हारही! तर्कतीर्थांनी विचार नि कार्यावरील निष्ठा अढळ ठेवली तेव्हा कुठे ते सर्वमान्य होत गेले. संघर्ष यांच्या पाचवीला पुजलेला होता. ते निकराने दोन हात करत राहिले. अंतिम विजय सत्याचा असतो यावर यांची श्रद्‌धा नि विश्वास असल्याने ते लिहीत, बोलत, करत राहिले. 'कायदा पाळा गतीचा, थांबला तो संपला' गुणगुणत ते मार्गक्रमण करत राहिले. रॉयवादाने त्यांना खूप शिकवले तसे गांधीवादानेही! अंतिमतः ते नवमानवतावादी बनले, झाले. सनातन विचार, व्यवहाराकडून प्रागतिक, वैज्ञानिक विचार प्रवाहाकडे आलेली तर्कतीर्थांची वाटचाल हा अपघात नव्हता, तर ती विचारपूर्ण कृती होती.

माणसाच्या जीवनात असे काटकोनी परिवर्तन होत असताना चांगले मित्र, सहकारी लाभणं, ही माणसाला मिळालेली आयुष्यभराची देणगी असते. श्री. शं. नवरे, आचार्य विनोबा भावे, द्वा. भ. कर्णिक, प्रा. गोवर्धन पारीख, प्रा. अ. भि. शाह यांच्यासारखे मित्र तर्कतीर्थांना लाभले, याचे श्रेय स्वामी केवलानंद सरस्वती, महात्मा गांधी, कॉम्रेड मानवेंद्रनाथ रॉय या प्रेरकांना द्यावं लागेल. 'Man is known by the company he keeps' न्यायानं तर्कतीर्थांची उठबस बुद्धिजीवी मंडळीत होत राहण्याने ते बुद्‌धिप्रामाण्यवादी बनले. यात पाश्चात्त्य साहित्यवाचन, विचाराचा वाटाही तितकाच महत्त्वाचा. राजकारण, समाजकारण, पत्रकारिता, प्राच्यविद्या अशी क्षेत्रे पादाक्रांत करत तर्कतीर्थांनी डॉ. राजेंद्र प्रसाद, काकासाहेब गाडगीळ, यशवंतराव चव्हाण, किसन वीर, गोविंद तळवलकर, पु. ल. देशपांडे, प्रा. मे. पुं. रेगे, भाई माधवराव बागल, स. मा. गर्गे, प्रा. रा. ग. जाधव, माधव गडकरी, कुमार गंधर्व, प्रा. य. दि फडके प्रभृतींचा स्नेह व विश्वास संपादला. या सर्वांनी तर्कतीर्थांवर प्रसंगोपात जे लिहिलं, तो उपचार नव्हता. ती आत्मीयता होती नि सख्यही!

श्रद्धांजली लेख असतात, आपणास पारख्या झालेल्या व्यक्तीविषयीचं कृतज्ञ स्मरण! मृत्युपश्चातचा गौरव निरपेक्ष मानला जातो नि वस्तुनिष्ठही! डॉ. यु. म. पठाण, प्रा. सुभाष भेंडे, प्रा. य. दि. फडके, प्रा. मे. पुं. रेगे, द्वा. भ. कर्णिक प्रभृती मान्यवरांनी वाहिलेली श्रद्धांजली तर्कतीर्थांच्या समग्र जीवनाचा आलेख आपल्यासमोर ठेवते. त्यातून प्रतिबिंबित होणारे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी ज्ञानभास्कर, संस्कृतीचे इतिहासकार, ज्ञानतपस्वी, ज्ञानकोश म्हणून आपणापुढे येतात. हे मूल्यमापन नसते, असतं मूल्यांकन! 'जन पळभर म्हणतील हाय हाय' अशी औपचारिकता या श्रद्धांजली लेखांमध्ये नाही. असेलच तर आपुलकी, आपलेपणा, आत्मभाव. हानीचा विलाप इथे आहे आणि भरून न येणारी जखमही! श्रद्धा असल्याशिवाय असे भावनिक लेख लिहिता येत नाहीत.

आठवणींचे अंगण आप्तस्वकीयांचे असतं. जिवाभावाचा माणूस चितारणं अवघडलेपण असतं. पण कृतज्ञ ऋणाभिव्यक्तीशिवाय माणूस हलका होत नसतो. तर्कतीर्थांनी किती लोकांबद्दल गौरव, स्मृती, आठवणी लिहिल्यात. या समग्र वाङ्मयात अशा व्यक्तीविषयक भाषणे, मुलाखती, लेख, चरित्रे आहेत नि भाषांतरेही! तर्कतीर्थ सहसा भावुक होत नाहीत. परंतु महात्मा गांधी, स्वामी केवलानंद सरस्वती, मानवेंद्रनाथ रॉय, एलन रॉय, पंडित नेहरू निवर्तल्यानंतरचं त्यांचं लेखन हृद्य खरंच! तसंच पत्नी सत्यवतीच्या निधनानंतरचा आठव आकांतकारी! तर्कतीर्थांबद्दल त्यांची मुलं, सुना, नातवंडं यांनी लिहिलंय नि मित्र, सरकाऱ्यांनीही. सर्व आठवणींत मायेचा पाझर नि मैत्रीचं सख्य भरून ओसंडतं. असे एक दोन नव्हेत, चांगले दोन डझन लेख ही तर्कतीर्थांच्या मायेच्या पाखराची घसघशीत मिळकत नि कमाई म्हणून पाहाता येते.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींची अनेक रूपं, पैलू या सर्व लेखांतून उलगडत जातात नि हाती येणारं संचित शल्य निर्माण करत रहातं. माणूस गमावला तो लाख मोलाचा होता. त्याचं असणं गलबललेले जहाज होतं नि नसणं पृथ्वी वैराण वाळवंट करून जाणं! उद्ध्वस्त धर्मशाळा बनवणं!!

**समारोप**

गौरव लेख, स्मृतिलेख, आठवणी यांतून खरे तर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे जन्म ते मृत्यू असे ९३ वर्षांचे जीवन साकार होताना दिसते. तर्कतीर्थांची कन्या डॉ. अरुंधती खंडकर यांनी त्यांची तीन चरित्रे लिहिली आहेत. तर्कतीर्थांनी अनेक आत्मपर लेखन लिहिले असून त्यांनी दिलेल्या काही मुलाखती (विशेषतः प्रा. मे. पुं. रेगे यांनी घेतलेल्या) दीर्घ असून त्यातूनही त्यांच्या चरित्रावर प्रकाश पडतो. इथे ती सामग्री संकलित आहे, त्यातून चरित्रापेक्षा व्यक्तिमत्त्व प्रकर्षाने पुढे येते. या खंडातील लेख शीर्षकांतील विशेषणे- 'विद्वान', 'बुद्धिवादी', 'क्रियावान पंडित', 'निगर्वी', 'निःस्पृह', 'इतिहासाचे साक्षीदार', 'कर्मयोगी', 'आनंदयात्री', 'महातीर्थ', 'प्रबोधनाचे प्रतीक', 'धर्मसमीक्षक', 'विश्वकोश-कर्ते', 'इहवादी

ऋषी', 'अजातशत्रू नेतृत्व', 'प्रज्ञातीर्थ', 'ज्ञानतपस्वी', 'ज्ञानकोश' ही दुसरी तिसरी काही नसून ती त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचेच पैलू होत. असे असंख्य पैलू लाभलेलं हे व्यक्तित्व इतक्या साऱ्या लेख, आठवणींनंतरही 'दशअंगुले' उरतंच, ही या व्यक्तिमत्त्वाची खरी महिमा!

त्यांचे स्नेही नि सन्मित्र श्री. शं. नवरे यांनी आपल्या येथील एका लेखात (मौज, १३ डिसेंबर, १९४४) जे म्हणून ठेवले आहे, ते त्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक समर्पकपणे व्यक्त करणारे आहे- "अनेक पदव्या जुन्या पंडितांनी त्यांना बहाल केल्या आहेत. पण आश्चर्य हे की त्यांना पदवी देणारे (नावे ठेवणारे) हे लोकच काळाच्या अथांग सागरात बुडत चालले असून लक्ष्मणशास्त्री झपाट्याने हात मारीत पोहत चाललेले आढळतात. अशा लोकनिंदेची किंवा त्यांच्या सक्रिय बहिष्काराची शास्त्रीबोवांनी केव्हाच पर्वा केली नाही. तरुण पिढी आपल्याला चांगली ओळखते, आपल्या मागून येण्यास ती तयार आहे, यातच त्यांना पराकाष्ठेचा आनंद होतो, भरपूर समाधान मिळते."

दि. १७ जून, २०२३

**डॉ. सुनीलकुमार लवटे**
संपादक

# (अ) गौरव लेख

१.

# महाराष्ट्राचा सत्पुत्र
## प्रतिनिधी, किर्लोस्कर

तसे पाहिले तर तर्कतीर्थांच्या चरित्रात नावीन्य आहेच, पण विभूतिपूजनच्या मनोवृत्तीला ते जितके भडक दिसावे तितके दिसणार नाही, हेही तितकेच खरे. चमत्कार करून नमस्कार पदरी पाडण्याची वृत्ती शास्त्रीबुवांच्या मनाच्या ठेवणीला पूर्ण पारखी आहे, पण पाहणाऱ्याला व विचार करणाऱ्याला चित्ताकर्षक वाटेल इतकी नवलाई त्यात खास आहे. आणि जुन्या वळणाचा एक शास्त्री नव्या वळणाकडे कसा वळला, हे दृश्य म्हणजे एक चमत्कारच नाही का? अंगठीतून गंगा काढण्याचा चमत्कार पाहण्याची- पाहण्यापेक्षा ऐकण्याचीच म्हटले तर जास्त शोभेल- ज्या मनाला सवय आहे, त्याला हे स्थित्यंतर चमत्कार वाटणार नाही. तथापि बुद्धिवादाच्या या विसाव्या शतकात चमत्कारलोलुपता जरा कमीच करावयास पाहिजे आणि त्या दृष्टीने पाहता तर्कतीर्थांचे आयुष्य उद्बोधक ठरेल यात शंका नाही.

**बालपण**

लक्ष्मणशास्त्री यांचा जन्म पश्चिम खानदेशात साक्री तालुक्यातील पिंपळनेर गावी झाला. घराणे वैदिक; पण अतिशय दरिद्री. घरी दुधातुपाची वाण कधीच नसे, परंतु खाऊचा पैसा लहान मुलाला कधीच दिसला नाही. आणि एखादे वेळी तांबडा पैसा चुकून हातावर पडला तर बाळ लक्ष्मणचा आनंद गगनात मावेनासा होई. याज्ञिकीमुळे, जुन्या राहणीमुळे, काटकसरीमुळे व त्या काळच्या स्वस्ताईमुळे खाण्यापिण्याचे हाल झाले असे काही म्हणता यावयाचे नाही.

पस्तीस वर्षांपूर्वीच्या खेडेगावांतील ते जीवन! गावापासून रेल्वे स्टेशन शेचाळीस मैल दूर. त्यामुळे इंग्रजी शिक्षणाचा खडखडाटच होता. जेमतेम मराठी शाळा चालली होती. धुळ्याहून मॅट्रिक झालेला मुलगा रस्त्याने हिंडू लागला की, गावचे लोक त्याच्याकडे टकमका पाहात. म्हाताऱ्याची त्याच्या पायघोळ काचावर टीकासुद्धा चाले. अर्थात आमच्या सनातनींना पाहिजे इतका मागासलेला तो गाव होता. आणि जिथे अज्ञान तिथे

धर्म. मॅट्रिक मुलगा म्हणजे प्रदर्शनीय वस्तू, अशी परिस्थिती असताना संतवारकऱ्यांची मात्र गर्दी होत असे. गुजरातेतील स्वामीनारायणाचे मठ, वारकऱ्यांचे फड आणि गोसाव्याचे मेळे यांची ये-जा सारखी चालू असे. लहानपणी लक्ष्मणला या वारकऱ्यांचे फड पाहणे, दोन-तीनशे देव पाहणे हाच एक करमणुकीचा खेळ होऊन बसल्यास नवल नाही. असले हंगामी संत दर हंगामाला येत असत. शिवाय एकदा नारायण महाराजांची मोठी मिरवणूक निघाली होती. एकदा शिवगंगा मठाचे शंकराचार्य आले होते. त्या वेळी तर सारे गावच्या गाव त्यांना लोटांगण घालावयास गेले होते. आणि गावचा देशमुख बैरागी बनून नित्याचा वारकरी बनला होता, ही गोष्ट निराळीच.

भिक्षुक घराण्याला गावात फार मान. त्याची भेट झाली की, 'पाय लागो महाराज' असे खालच्या जातीने म्हणण्याची प्रथा. त्यामुळे दारिद्र्य असले तरी शास्त्रीजींचे घराणे मानमरातबाचे होते. वडिलांची प्रवृत्ती धार्मिक; त्यामुळे लक्ष्मणाला इसापनीती, सिंहासन बत्तिशी या ग्रंथांऐवजी रामायण व महाभारत आणि त्यातल्या त्यात महिपती व श्रीधरांनी वर्णिलेली संतांची चरित्रे यांचीच गोडी लावण्यात आली. पण या धार्मिक गोष्टींबरोबरच भुताटकीच्या गोष्टीही घरात चालत, आणि त्या गोष्टींचे आगर म्हणजे घरातील बायका. शास्त्रीबुवांची आई लहानपणीच वारल्यामुळे त्यांचे संगोपन वडील बहिणीने केले. तिन्हीसांजेच्या वेळेला त्या घरात शेजारच्या साळकाया माळकाया जमायच्याच. विशेषतः पावसाळ्याच्या दिवसांत जोराचा पाऊस पडत असताना निरनिराळे आवाज ऐकू येत असायचे; आणि त्या वेळी वाकड्या पायांनी डाकीण, मेलेली बाळंतीण यांच्या कथा ऐकताना लक्ष्मणसारख्या लहान मुलांची नेहमीच तारांबळ उडायची. पावसाने आलेला गडद काळोख व गोड्या तेलाच्या समईचा मिणमिण प्रकाश यांची साथ मिळाल्यावर कोठे खुट्ट झाल्याबरोबर भीतीने थरकाप उडून गेल्यास नवल कसचे?

## अध्ययनाची मोहीम

आश्चर्य करण्यासारखी गोष्ट आहे की, एवढ्या त्या अज्ञानाच्या साम्राज्यात लक्ष्मणशास्त्रींच्या वडिलांचा भुताखेतांवर विश्वास कधीच बसला नाही. त्यांनी ही गोष्ट उघडपणे कधीच बोलून दाखविली नाही; पण भुताखेतांसाठी मंत्रतंत्र करणाऱ्या लोकांना ते सांगत की, 'अरे, मला ही भुतं काहीच करू शकत नाहीत.' आणि मोठेपणी शास्त्रीबुवांनीदेखील 'माझा प्रेतभुतांवर कधीच विश्वास बसला नाही' असे त्यांनी उघड बोलून दाखविले आहे. परलोकावरही त्यांची श्रद्धा बेताबाताचीच. ते गमतीने लक्ष्मणशास्त्रींना बोलत की, 'अरे! तू काही आमचे श्राद्ध घालणार नाहीस ही खात्री आहे. मला ठिकठिकाणच्या शास्त्रीपंडितांचा अनुभव आहे. ते नेहमी आचारभ्रष्ट असतात. तेव्हा काय करायचं ते आत्ताच कर.'

शास्त्रीजींचे शाळेतील शिक्षण मराठी दोन इयत्तांपर्यंतचे. परंतु मराठी ग्रंथांचे वाचन लहानपणापासूनच सुरू होते. आठव्या वर्षी मुंज झाल्यानंतर त्यांनी जटा, दंड व कमंडलु

स्वेच्छेने परिग्रहण केली व याचे कारण म्हणजे भाऊशास्त्री लेले यांच्या मनुस्मृतीच्या भाषांतराचे वाचन. अर्थात जुन्या विचारांचा भावनेच्या भरात शास्त्रीजींनी त्या वयात स्वीकार केला होता. तीन वर्षे वेदाध्ययन केले, आणि त्यानंतर वडिलांना आपला मुलगा पंडित व्हावा अशी महत्त्वाकांक्षा असल्यामुळे त्यांनी शास्त्रीबुवांना नारायणशास्त्री मराठ्यांच्या हवाली केले.

## गुरुजी आणि सहाध्यायी

नारायणशास्त्री पूर्ण आचारनिष्ठ. तत्त्वज्ञान व धर्मशास्त्र या विषयांत शुद्ध बुद्धिवादी, निरोगी, गौरवर्ण, भव्य शरीरयष्टी, अफाट विद्याव्यासंग आणि प्रेमळ पण अत्यंत संतापी स्वभाव. कनकाची अपेक्षा त्यांना स्वप्नातदेखील झाली नाही. त्यांची आचारधर्मांत कडक शिस्त. उभ्या आयुष्यात नारायणशास्त्री कधी साडेचारनंतर झोपले असे कधीच घडले नाही. पण त्यांचा हा पट्टशिष्य मात्र कधी साडेचार वाजता जागा झाला, असेही कधी घडले नाही. त्यांच्या सहाध्यायांत 'आळशी' अशीच शास्त्रीजींची प्रसिद्धी आहे. त्यांच्याकडून अमुक एक काम वेळेवर होईल, अशी अपेक्षा सहसा कोणी करीत नाही. आता कार्याच्या व्यापामुळे त्यांचा आळस आळसावू लागला आहे ही गोष्ट निराळी. अशा या आळशी विद्यार्थ्यावरही नारायणशास्त्रींचे प्रेम असण्याचे कारण लक्ष्मणशास्त्रींची कर्मनिष्ठा. त्या वेळी अग्निहोत्रादी ब्रह्मकर्मांवर लक्ष्मणशास्त्रींची दृढ श्रद्धा होती.

लक्ष्मणशास्त्रींचे त्या वेळचे सहवासी व सहाध्यायी म्हणजे बुद्धिवादी दिनकरशास्त्री कानडे आणि बुवाशाहीचे विध्वंसक महादेवशास्त्री दिवेकर. अशांच्या सहवासात शास्त्रीजींनी शिक्षणास प्रारंभ केला. दीड वर्षात संस्कृत ग्रंथांची व्युत्पत्ती नारायणशास्त्रींनी चांगल्या प्रकाराने करून दिली. वयाच्या चौदाव्या वर्षी तर्क, वेदान्त व मीमांसा यावरील प्राथमिक ग्रंथांची ओळख नारायणशास्त्रींनी तोंडी करून दिली. तसेच नारायणशास्त्रींचे भौतिकशास्त्रांचे अध्ययन चांगले होते, तेव्हा भौतिकशास्त्रांची मूलतत्त्वे, प्रकाश, विद्युत व यंत्रशक्ती या विषयांचा थोडासा परिचयही त्यांनी करून दिला.

पण भौतिक ज्ञानाचा परिणाम नारायणशास्त्रींच्या वेदान्तमतांवरही झाला होता. उपनिषदांतील ब्रह्मवाद सांगताना 'Conservative Energy'च्या सिद्धान्ताचा उपयोग करून भौतिकवादी (Materialists) ज्याला 'मॅटर' म्हणतात, तेच ब्रह्म होय, असे ते आग्रहाने सांगत. १९१७ साली वर्धाश्रमातील गांधीजींचे पट्टशिष्य विनोबा भावे वाईला वेदान्ताच्या अध्ययनासाठी आले. त्या वेळेस 'नारायणशास्त्री भौतिक ब्रह्मवादी आहेत, खरे ब्रह्मवादी नाहीत' असे लक्ष्मणशास्त्रींना वारंवार बोलून दाखवीत. लक्ष्मणशास्त्रींच्या आजच्या भौतिकवादी मतांचे कदाचित या ठिकाणीच बीज रोवले गेले असावे.

## १९२० सालचा असहकार

१९२० सालापासून त्यांनी अध्यापनास सुरुवात केली. बंगाली न्यायाने (नवन्याय)

अध्यापन करायचे आणि स्वतः दार्शनिक ग्रंथांचे अध्ययन करायचे असा त्यांचा दुहेरी क्रम चालू होता. या काळात त्यांच्या शिष्यांपैकी प्रामुख्याने तर्कतीर्थ रघुनाथशास्त्री कोकजांचा उल्लेख करता येईल.

शास्त्रीजींच्या मनावर गांधीवादाचा पगडा होताच. त्यातच असहकाराची चळवळ आली. या काळात त्यांनी प्रवचनरूपाने सातारा व बेळगाव जिल्ह्यात गांधीवादाचा व असहकाराचा प्रचार केला. प्राणिशास्त्रातील 'Will to live' या सिद्धांताचा आधार घेऊन व रिचर्ड ग्रेगच्या विचारसरणीचा अवलंब करून असहकाराचे समर्थन शास्त्रीबुवा त्या वेळी करीत असत. मृत्यू हाच जगाचा शास्ता आहे, यासाठी प्रत्येकाने ध्येयासाठी मृत्यूला धैर्याने तोंड दिले पाहिजे. उदाहरणार्थ उपनिषदातील नचिकेत पाहा, असे मी त्या वेळी सांगत होतो, असे शास्त्रीजी हसतमुखाने सांगत असतात.

**मग आत्महत्या का करीत नाही?**

असहकाराची चळवळ एवढ्यावरच थांबली नाही. विद्यार्थिदशेत त्यांनी जशी धार्मिक व्रते स्वीकारली होती, तशी या चळवळीत राजकीय धार्मिक व्रते पत्करली. साखर, तिखट, दूध यांना अजिबात फाटा मिळाला. अहिंसेचे तत्त्व इतके ताणले गेले की, शास्त्रीजी काही दिवस पाण्यात कुसकरून खात असत. शेवटी एक दिवस वडील संतापाने म्हणाले की, 'गांधीवादात जीवन पापमय आहे, तर आत्महत्या का करू नये याचे काय उत्तर आहे ते दे?' तेव्हा ती राजकीय व्रते सुटली.

**सोनगीरची पंडित परिषद**

या काळात शास्त्री मंडळींत 'परिवर्तनवाद' हा विषय जोराने चर्चिला जात असे. 'अस्पृश्योद्धार, शुद्धी, धर्मविचाराचे साधन कोणते?' या विषयांवर कडाक्याचे वाद होत असत आणि या प्रश्नांचा निकाल लावण्यासाठी कुकुरमुंड्याचे संतोजी महाराज व सोनगीरचे केशवदत्त महाराज या दोघांनी सोनगीरला एक पंडित परिषद १९२३ साली भरवली होती. या वेळी द्वारकापीठाचे शंकराचार्य, डॉ. कुर्तकोटी, वल्लभाचार्य महामहोपाध्याय अनंतकृष्णशास्त्री, लक्ष्मणशास्त्री, द्रवीडशास्त्री, शेटेशास्त्री इत्यादी सनातन पक्षाची मंडळी हजर होती. तर नवीन पक्षाची नारायणशास्त्री मराठे, दिवेकरशास्त्री, भिडेशास्त्री, लक्ष्मणशास्त्री जोशी, चिंतामणराव वैद्य अशी मंडळी उपस्थित होती. पण महामहोपाध्यायांच्या (अनंतकृष्णशास्त्री) दबदब्यामुळे कोणी पुढे येऊन वादाला तोंड फोडीना. शेवटी नारायणशास्त्री मराठे हळूच लक्ष्मणशास्त्री जोशींना म्हणाले, 'तू बोलतोस का?' तेव्हा लक्ष्मणशास्त्री जोशींनी "मनुष्याच्या स्वबुद्धीने धर्म पालटत गेला आणि तसा अधिकार इंद्रिय संयमी माणसास राहू शकतो" अशा आशयाचा पूर्वपक्ष केला. या विषयावर अठरा तास चर्चा झाली. पंधरा वक्त्यांची भाषणे झाली. शेवटी अनंतकृष्णशास्त्री म्हणाले की, "अहो! आद्य शंकराचार्यांनी आपल्या 'शारीरभाष्य'मध्ये धर्माचे साधन श्रुतिशिवाय

दुसरे काही नाही असे म्हटले आहे, त्याची काय वाट?'' यावर लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी "शंकराचार्य असे म्हणतात, हे काही प्रामाण्यवादाच्या दृष्टीने प्रमाण होऊ शकत नाही", असे ठणठणीत बजावले. झाले! 'भगवद्पूज्यपादानां वचनप्रमाणीक्रियते' (परमपूज्य शंकराचार्यांचे वचन अप्रमाण!) अशी डोक्यात राख घालून जो तो उठू लागला. शेवटी दोन महाराजांनी तडजोड करून ती सभा पार पाडली. त्या सभेला चिंतामणराव वैद्य हजर होते. जेवताना लक्ष्मणशास्त्रींना ते म्हणतात, "अरे बाबा, ही दगडी भिंत आहे. यावर उगाच का डोके आपटतोस? वाद करू नकोस. तुम्हाला आम्ही 'लक्ष्मणशास्त्री द्रवीडा'प्रमाणे ' लक्ष्मणशास्त्री महाराष्ट्र' अशी पदवी देतो, मग तर झाले!"

**चित्रशाळेच्या पत्त्यावर तार**

१९२३-२९ काळ थंडाईचा होता. १९२९ साली मालवीयांनी प्रयागला एक 'सनातन धर्म परिषद' भरविण्याचे ठरविले होते. मालवीयजींना लहान लहान गोष्टींत सुधारणा करावयाची होती. उदाहरणार्थ, अस्पृश्यांना पंचाक्षरी मंत्राचा अधिकार असावा अशा मताचे ते होते. तेव्हा आपल्या मताला पुष्टी देण्यासाठी त्यांनी लक्ष्मणशास्त्रींना चित्रशाळेच्या पत्त्यावर तार केली.

वादाचा मुद्दा मोठा गमतीचा होता. शूद्रांनी आणि अस्पृश्यांनी 'नमः शिवाय' असा मंत्र जपावा, की 'शिवाय नमः' असा जपावा? सनातनी पक्षाचे त्या वेळचे म्होरक्ये पंडित गिरिधर शर्मा हे होते. त्यांचे म्हणणे अर्थातच 'नमः शिवाय' असे म्हणता यावयाचे नाही. कारण तो मंत्र श्रुतीचा असून त्यामुळे श्रुती बाटते असे होते. लक्ष्मणशास्त्री जोशी म्हटले तरी चालेल अशा मताचे होते. आश्चर्य वाटेल, की या प्रश्नावर बारा तास चर्चा चालली होती; आणि इतकी चर्चा चालूनही वाद अर्धवटच राहिला! याला म्हणतात सनातन पक्ष!

**१९३० सालचा सत्याग्रह**

तीस साली शास्त्रीजींनी सत्याग्रहाच्या चळवळीत जोराचा भाग घेतला. संगमनेर, बागलाण, कळवण या भागांत जंगल सत्याग्रहासाठी मोठीच संघटना त्यांनी केली. लाख शेतकऱ्यांच्या परिषदा त्यांनी भरविल्या होत्या. साडेतीनशे पोलीस पाटलांचे राजीनामे त्यांनी घेतले. सत्याग्रहाला संघटित स्वरूप देण्याचा त्यांनी चांगला प्रयत्न केला. या सुमारास मार्क्सवादी भाई सरदेसाई व त्यांची इतर सहकारी मंडळी यांचा त्यांच्याशी परिचय झाला.

जेलमध्ये असताना विनोबा भावे यांची गीतेवरची प्रवचने शास्त्रीजी ऐकत होते. पण त्या भावनामय प्रवचनांनी बुद्धी आकर्षली जाईना. 'त्या प्रवचनांत समाजविषयक तत्त्वज्ञानाचा अभाव असल्यामुळे मला ती सरस भाषेतील प्रवचने नीरस वाटली', असे शास्त्रीजी केव्हा केव्हा उद्गारतात. १९२४ साली राखलेल्या विस्तीर्ण जटा निघाल्या, तसा 'राजकीय मतांना व व्रतांना' फाटा मिळाला याचीच ही साक्ष नाही का?

## गांधीजींच्या सहवासात

दुसऱ्या सत्याग्रहाच्या चळवळीत गांधींनी एकवीस दिवसांचा उपवास केला होता, ही गोष्ट माहीत आहेच. त्याच वेळी लक्ष्मणशास्त्रींची सुटका झाली होती. बाबू भगवानदास, प्रि. ध्रुव यांसमवेत त्या वेळेस 'अस्पृश्यता निवारणा'वर शास्त्रीजींनी चर्चा केली आणि अस्पृश्यता-निवारणाबाबत धर्मशास्त्रीय निर्णयाचे स्वरूप त्या वेळी शास्त्रीजींनीच ठरविले होते. शास्त्रीजी याच वेळेस महात्मा गांधींच्या निकटच्या सहवासात आले. बेचाळीस दिवस निरनिराळ्या विषयांवर चर्चा चालू असे. या विचारविनिमयावरून 'गांधीजी जरी विद्वान नसले तरी खोलबुद्धीचे, वादपटू, दूरवरची विचारसरणी पोटी बाळगून जवळच्या मित्रासही बोलून न दाखविणारे' असे त्यांना आढळून आले.

उलट गांधीजींना चातुर्वर्ण्यविषयक चर्चेवरून असे दिसले की, शास्त्रीजी जाती नष्ट कराव्या या मताचे आहेत. अर्थात यांच्यातर्फे 'लक्ष्मी-देवीदास' विवाह लावला तर जातीच्या एकीकरणाच्या कार्यास अप्रत्यक्षरीत्या मदत होईल, हा विचार त्यांच्या मनात उद्भवला; आणि या विचारातूनच त्या विवाहाचे पौरोहित्य शास्त्रीजींकडे आले. सनातन्यांनी वाई व कऱ्हाड या ठिकाणी ग्रामण्याचे ठराव पास केले; पण ब्राह्मणांचे ग्रामणीपण नष्ट झाल्याबरोबर ग्रामण्याचे शस्त्र बोथट पडते हे सनातन्यांच्या लक्षात कसे यावयाचे? वाईला तर ब्रह्मवृंदांनी शंकराचार्यांची सातशे रुपयांनी पाद्यपूजा केली; आणि त्यांच्या तोंडून 'लक्ष्मणशास्त्री रौरव नरकांत जातील' असे वदवून घेतले. नरकाचा साक्षात पत्ता लावणाऱ्या या शंकराचार्यांची ज्ञानप्रकाशात अनावृत पत्राने हजेरी घेतली होती.

## परिवर्तनवादातून मार्क्सवादाकडे

लक्ष्मणशास्त्री प्रथम परिवर्तनवादी होते; पण इतर परिवर्तनवाद्यांहून त्यांची भूमिका वेगळ्या प्रकारची होती. ते पक्के बुद्धिवादी होते. दिवेकरशास्त्री, भिडेशास्त्री किंवा कोकजेशास्त्री हे परिवर्तनवादी असले तरी भूतकाल हा आदर्श, अशी त्यांची मनोवृत्ती आहे. लहान लहान सुधारणा कराव्या, मूलग्राही बदल करावे, असा तात्पुरता सुधारणावाद त्यांना हवा असतो. पण धर्मशास्त्राचे अध्ययन करीत असता धर्मात वेळोवेळी झालेले मूलग्राही बदल पाहून हा तात्पुरता सुधारणावाद किंवा भूतकालविषयक पूज्यबुद्धी शास्त्रीजींना पसंत नव्हती. यामुळे ते काही काळ मिल्ल-स्पेन्सरच्या बुद्धिवादाचे अनुयायी बनले.

शिरस्त्याप्रमाणे त्यांनी तुरुंगातच 'मार्क्सवाद' वाचला. मार्क्सच्या ग्रंथाच्या परिशीलनाने त्यांची 'शास्त्रीय विचिकित्सेची पद्धती' त्यांना पटली; पण हिंदुस्थानविषयक परिस्थितीसंबंधी कित्येक भाईंचे विचार त्यांना पटेनात. विशेषतः ज्या काँग्रेसला आपण सर्वस्व दिले, जिच्या छत्राखाली लाख लाख शेतकरी गोळा होतात त्या काँग्रेसला एक वरिष्ठ वर्गाची संस्था, सुधारणावादी (Reformist) संस्था, असा शेलका आहेर त्यांच्या बुद्धीला काँग्रेसमन या नात्याने पटेना. पण त्याच वेळेस एस. के. विद्यार्थी या नावाखाली चीनविषयक येणाऱ्या

लेखामध्ये 'काँग्रेस ही एक स्वातंत्र्यवादी वर्गाची चळवळ आहे', ही विचारसरणी पटली व त्यानंतर 'Our Task in India', 'India in Transition' इत्यादी एम. एन. रॉय यांचे ग्रंथ व लेनिन आणि मार्क्स यांचे इतर ग्रंथ वाचून 'मार्क्सवाद' हे जीवनातील मूलभूत प्रश्न सोडविण्याचे एक शास्त्र आहे अशी त्यांची बौद्धिक खात्री पटली आहे.

**धर्मकोशाचे कार्य**

काही कारणाने त्यांचा व त्यांच्या गुरुजींचा मतभेद झाला. नारायणशास्त्रींचे म्हणणे असे की, 'इंग्रजी शाखा यापुढे ठेवू नये'. या वादाचे पर्यवसान नारायणशास्त्रींच्या राजीनाम्यात झाले. आज प्राज्ञपाठशाळेचे लक्ष्मणशास्त्री अध्यक्ष आहेत. अर्थात नारायणशास्त्रींनी सुरू केलेल्या धर्मकोशाची जबाबदारी त्यांच्या शिरावर येऊन पडली आहे.

धर्मशास्त्रांतील 'कायद्याचा भाग' संशोधन करण्याची जबाबदारी आज त्यांच्यावर आहे. वेदकालापासून तहत धर्मप्रबंधकारांपर्यंत सर्व प्राचीन धर्मशास्त्रांचे आलोकन करून आपल्या संस्कृतीत मूलग्राही बदल घडेल का नाही याचा पडताळा आज ते घेऊ शकतात. 'या प्राचीन ग्रंथांचे अध्ययन करून संशोधन करण्यात का वेळ दवडता?' असा आक्षेप करणारे काही मार्क्सवादी आहेत. पण मार्क्सवाद ज्यांच्या अंगी मुरला असेल, त्यांना ऐतिहासिक मीमांसेचे महत्त्व किती आहे, हे सांगावयास नको. आणि खऱ्या मार्क्सवादाच्या दृष्टीने धर्मकोशाचे कार्य मार्क्सवादाला व त्यातल्या त्यात हिंदुस्थानविषयक प्रश्नाला उपकारकच ठरेल यात शंका नाही.

**(किर्लोस्कर, जुलै, १९३७, पृ. ९३९ ते ९४३)**

OOO

# २.

# एक वाया गेलेला विद्वान: तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

## दि. वि. देव

मुंबई, उपनगर मराठी साहित्य संमेलनाचे अधिवेशन डिसेंबर ता. १६ व १७ तारखेस मुंबई येथे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे अध्यक्षतेखाली भरणार आहे. स्वागत मंडळाने या भारतीय पंडिताची अध्यक्षस्थानी निवड करून लक्ष्मणशास्त्री यांच्या विद्वत्तेचा गौरव केला आहे. लक्ष्मणशास्त्रींना हा दुसऱ्यांदा मान मिळत आहे. ते गोमंतक साहित्य संमेलनाचे एक वेळ अध्यक्ष होते. त्यांच्या प्रस्तुत निवडणुकीने संमेलनास महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यांचे पांडित्य, त्यांचे वक्तृत्व, त्यांची वादकुशलता, त्यांचा परिवर्तनवादी दृष्टिकोन आणि त्यांची समाजोन्नतीची कळकळ पाहिली असता त्यांची महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे अध्यक्षस्थानीदेखील लवकरच निवड व्हावयास पाहिजे असे प्रत्येक साहित्यभक्तास वाटल्यावाचून राहणार नाही. त्यांच्या अध्यक्षीय वक्तव्याने मराठी वाङ्मयास मूलगामी विचारसरणीचे आणि खरेखुरे पुरोगामी वळण लागेल अशी खात्री वाटते.

### यज्ञ व जटाधारण

त्यांची संमेलनाचे अध्यक्षपदी निवड झाली असताना त्यांच्या विद्वत्तेची आणि जीवित कार्याची महती करून देणे अवश्य आहे. ते मूळचे वाई येथे राहणारे. आठवे वर्षी मौजीबंधन झाल्यापासून ते वयाचे तेविसावे वर्षापर्यंत त्यांनी जुन्या पद्धतीप्रमाणे वेदाध्ययन व संस्कृतविद्येचे अध्ययन केले, या कालात त्यांनी यज्ञ व जटाधारणाचे व्रत अविरतपणे चालू ठेवले होते. त्यांचे सर्व अध्ययन गुरुगृहीच झाले. वाईचे नारायणशास्त्री मराठे (केवलानंद सरस्वती) महामहोपाध्याय लक्ष्मणशास्त्री द्रवीड, कलकत्ता, वामाचरण भट्टाचार्य, बनारस नित्यानंद पंडित, बनारस आणि कामाक्षीनाथ तर्कवागीश यांच्यासारख्या शास्त्री पंडितांपाशी त्यांनी तर्क, वेदान्त व इतर भारतीय दर्शने यांचा अभ्यास केला. आणि हे अध्ययन संपल्यावर वयाचे चोविसावे वर्षी लग्न करून ते गृहस्थाश्रमी झाले.

## ब्राह्मणेतराचा स्पर्शही स्नानार्ह

वयाच्या पंधराव्या वर्षापर्यंत त्यांचे विचार व आचाराचे वळण पूर्ण सनातनी होते. इतके की, ब्राह्मणेतराचा स्पर्शही ते स्नानार्ह मानीत. याच सुमारास त्यांनी आगरकर वाचला आणि त्याचा परिणाम म्हणजे स्पृश्यास्पृश्याच्या भावनांचे जुने पीळ सुटू लागले. विवेकानंद आणि रामकृष्ण परमहंस यांच्या वाचनाने त्यांच्या विचारांचाही दिवसेंदिवस त्यांच्यावर बराच पगडा बसला. त्याबरोबरच त्यांचे आद्य गुरुजी नारायणशास्त्री मराठे यांच्या जीवनाचा त्यांच्या संस्कारक्षम व धारणाशील मनावर फार खोल परिणाम झाला. काही दिवस विनोबाजी भावे यांचाही सहवास त्यांना लाभला. त्यांच्यापासून त्यांनी इंग्रजी भाषेचे थोडेसे शिक्षण घेतले. त्यांच्या सहवासाने शास्त्रीबोवांची मते परिवर्तनावदी बनली.

## सोनगिरी येथील पंडित परिषद

त्यांची विवादपटुता आणि स्वतःची विचारपूर्वक बनलेली मते निर्भीडपणे मांडण्याचे त्यांचे धैर्य अगदी लहान वयातच प्रत्ययास आले. वयाचे तेविसावे वर्षी त्यांचे अध्ययन नुकतेच संपले होते. त्या वेळी सोनगिरी येथे एक पंडित परिषद भरली होती. तेथे काशीचे अनेक पंडित आले होते. त्या परिषदेत या युवक पंडिताने परिवर्तनवादाचे मूळ सिद्धांत मांडले. तीन दिवसपर्यंत संस्कृतमध्ये वादविवाद झाला. काशीच्या पंडितांनीही त्यांना कसून विरोध केला. तथापि, शेवटी ही उच्च भूमिकेवरून केलेली चर्चा निर्णायक न होता सुहृद भावाने समाप्त झाली. या परिषदेत काशीच्या पंडितांना शास्त्रीबुवांच्या बुद्धिमत्तेची चमक चांगलीच प्रत्ययास आली.

यानंतर म्हणजे १९२१ पासून शास्त्रीबुवांनी वाई येथील प्राज्ञपाठशाळेत तर्कशास्त्र, वेदान्त व धर्मशास्त्र या विषयांचे अध्यापनास सुरुवात केली. ते कार्य सतत दहा वर्षे म्हणजे १९३० सालापर्यंत केले.

त्यांनी या काळात अनेक सामाजिक व राजकीय चळवळींत प्रत्यक्ष भाग घेतला. शुद्धी, अस्पृश्यता निवारण आणि जातिभेदविरोध या सामाजिक चळवळीत त्यांनी जसे निर्भयतेने काम केले, तसेच असहकारितेच्या चळवळीत त्यांनी राष्ट्रीय शिक्षण आणि स्वदेशी यांचा धडाक्याने प्रचार केला.

१९२१ साली बारडोली आश्रमात त्यांची नि महात्मा गांधींची भेट झाली. महात्माजींनी शास्त्रीबुवांना मोठ्या गौरवाने तेथे ठेवून घेतले. तेथे त्यांनी केलेले उपनिषदांचे व गीतेने पठन गांधीजींना फारच आवडले. मृत्यू व नचिकेतस यांच्या संवादाच तर गाधीजींच्या मनावर गंभीर परिणाम झाला. त्यांचा हा सहवास गांधीजींना इतका प्रिय झाला की, त्यांनी शास्त्रीबुवांना नेहमीच आपल्याबरोबर राहण्याची विनंती केली. परंतु तेवढ्यातच गांधीजींना अटक झाली. आणि शास्त्रीबुवांना वाईस परत जावे लागले.

## सातशे पंडितांविरुद्ध एक

दिवसेंदिवस शास्त्रीबुवांच्या विद्वत्तेचा लौकिक दूरवर पोहोचला. १९२९ साली बनारस येथे अखिल भारतीय पंडित परिषद भरली. एकंदर सातशे पंडितांनी या परिषदेत भाग घेतला होता. शास्त्रीबुवा एकच एक महाराष्ट्रीय पंडित परिवर्तनवादी शास्त्रार्थ सांगणारे म्हणून उपस्थित होते. पोटजातींचे एकीकरण, मुलींच्या विवाह वयोमर्यादेत वाढ, अस्पृश्यता निवारण, आंतरजातीय सहभोजन इत्यादी विषयांवर शास्त्रीबुवांनी एक विरुद्ध ७०० अशा संपूर्ण विरोधी परिस्थितीत सात दिवस वाद केला. जुन्या शास्त्रांतील विचार अगदी नवे करून संस्कृत भाषेत मांडून आपल्या वक्तृत्वाची आणि वाद कौशल्याची त्यांनी कमाल केली. सर्व विद्वान त्यांच्या विरोधी मताचे होते, तरी त्यांनी त्यांना अत्यंत गौरवाने वागवून त्यांच्या निवेदनास कौतुकाने पूर्ण अवसर देत होते. या चर्चेचा 'शुद्धिसर्वस्वम्' नावाचा ऐंशी पानांचा प्रबंध त्यांनी प्रसिद्ध केला आहे. या विचारसरणीला त्यांचे गुरुवर्य पंडित नारायणशास्त्री यांनी फारच मदत झाली. इतकेच काय, पण त्यांचे गुरुजी म्हणजे त्यांचे स्फूर्तिस्थानच होय.

## कायदेभंग आणि जंगल सत्याग्रह

१९३० साली सर्व देशभर कायदेभंगाची चळवळ सुरू झाली होती. शास्त्रीबुवांनी शेतकऱ्यांत जाऊन एकंदर पंचेचाळीस व्याख्याने दिली. कऱ्हाडच्या घाटावर सतत सात दिवस कायदेभंगावर व्याख्याने दिली. दहा दहा हजार लोक व्याख्यानासाठी जमत. 'काय नाटकावानी बोलतुया' असे काही शेतकऱ्यांनी उद्गार काढले, तेव्हा तेथील प्रसिद्ध वकील आळतेकर, पांडुअण्णा शिराळकर, राघुअण्णा धोपाटे वगैरे मंडळींनी शास्त्रीबुवांना सांगितले, "हे उद्गार म्हणजे तुम्हाला कॉम्प्लिमेंट्स आहेत असा गैरसमज करून घेऊ नका." याच वर्षी मे महिन्यात संगमनेरला त्यांनी जंगल सत्याग्रहाचे शिबिर मोठ्या प्रतिकूल परिस्थितीत स्थापन केले. नंतर त्याची सर्व जबाबदारी हल्लीचे प्रभातचे संपादक श्री. शं. नवरे यांचेवर सोपवून ते पश्चिम खानदेशात गेले व बागलाण, साक्री वगैरे विभागांत अनेक व्याख्याने देऊन सुमारे २७५ पोलीस आणि मुलकी पाटलांचे राजीनामे त्यांनी घेतले. परंतु त्याच वेळी ते टायफॉइडने आजारी पडले आणि त्यांना अटक होऊन एक वर्षाची शिक्षा झाली. पुढे १९३२ सालीही पुन्हा एकदा त्यांना अटक होऊन दहा महिन्यांची शिक्षा झाली होती.

## प्रतिलोम विवाह लावला

याच वर्षी शास्त्रीबुवांनी गांधीजींचे चिरंजीव देवीदास व राजगोपाळाचारी यांची कन्या लक्ष्मी यांचा हिंदू विवाह पद्धतीस निषिद्ध असलेला प्रतिलोम विवाह लावला. वैश्यपुत्र आणि ब्राह्मणकन्या यांच्या या विवाहाने सनातनी मंडळींत शास्त्रीबुवांचे वजन थोडे कमी झाले तरी त्यांचा शास्त्रप्रतिपादनाचा हातखंडा आणि त्याप्रमाणे वागण्याचा बेडरपणा जनतेच्या चांगलाच प्रत्ययास आला.

आद्य शंकराचार्यांप्रमाणे प्रतिपक्षाशी नित्य वाद करीत राहणे हाच जणू शास्त्रीबुवांचा जीवनक्रम दिसतो. सतत झगडत राहून देशकाल आणि परिस्थितीप्रमाणे समाजधारणेस शास्त्राचा अर्थ कसा परिपोषक असेल हे ओळखून तो जाणत्यांच्याही गळी उतरविण्याचे कार्य ते करीत आले आहेत. १९३३ साली मंदिर प्रवेश चळवळीच्या प्रसंगाने अस्पृश्यता निवारणाला शास्त्रात अवकाश आहे का, यासंबंधी येरवडा जेलमध्ये वाद झाला. प्रसिद्ध न्यायाचार्य पंडित राजेश्वरशास्त्री प्रतिपक्षी होते. महात्माजींचे प्रमुख पंडित म्हणून शास्त्रीबुवांनी काम केले.

## खाली बसा नाहीतर मारू

मंदिर प्रवेश कायद्यासंबंधी विरोधी लोकांची पुण्याच्या शिवाजी मंदिरात एक मोठी सभा झाली. त्या वेळी शास्त्रीबुवा बोलावयास उभे राहिले. तेव्हा चाळीस लाठीबंद तरुण ओरडून त्यांना म्हणाले, "तुम्ही खाली बसा, नाहीतर तुम्हांस आम्ही मारू!" त्यास शास्त्रीबुवा भ्याले तर नाहीच, पण मारणारांना एक प्रकारचे आव्हान देऊन तेथेच अखेरपर्यंत उभे राहिले. हरीभाऊ फाटक यांनी ही हकीकत जेव्हा गांधीजींच्या कानांवर घातली, तेव्हा ते म्हणाले, "ही इज दि ग्रेटेस्ट सत्याग्रही."

## ते रॉयिस्ट कसे बनले

वरील माहितीवरून शास्त्रीबुवा जुन्या पाठशाळेच्या कर्मठ नि सनातनी विद्यार्थी दशेतून परिवर्तनवादी पंडित कसे झाले आणि त्यांची सामाजिक नि राजकीय मते गांधीवादाशी कशी एकजीव होत गेली, याची कल्पना येईल. परंतु हा अस्सल सनातनी शास्त्री आज रॉयिस्ट कसा बनला, हे पाहण्यासारखे आहे. तर्कवादी किंवा बुद्धिवादी माणूस अंतःकरणाचा भावनेचा आदेश मानीत नाही व बुद्धीच्या क्रमात कसा अडकतो, याचे हे एक चांगले उदाहरण आहे. १९३० नंतर त्यांच्या सहवासात अनेक समाजवादी कार्यकर्ते आले. त्यांच्याबरोबर अनेक प्रसंगी तात्त्विक चर्चा होत; परंतु त्यामुळे त्यांचे समाधान झाले नाही. म्हणूनच त्या तत्त्वज्ञानाचे प्रणेते कार्ल मार्क्स व लेनिन यांच्या ग्रंथांचे त्यांनी सतत सात वर्षे अध्ययन केले. त्याचबरोबर त्यांनी यूरपचे एन्शंट, मीडीव्हल आणि मॉडर्न इतिहास वाचले. गिबन, बकल, मॉम, फिशर यांचे आकर-ग्रंथ (क्लासिकल) व मानवजातीशास्त्र (एन्थ्रॉपॉलॉजी) यांचा अभ्यास केला. त्यामुळे कार्ल मार्क्सच्या विचारप्रणालीवर जास्त प्रकाश पडला. शिवाय हिंदू धर्मशास्त्र व हिंदू तत्त्वज्ञानाचा त्यांचा मूळचाच अभ्यास असल्यामुळे कार्ल मार्क्सच्या सिद्धांतांचा त्यांच्यावर फारच परिणाम झाला. तो नसता तर तितका परिणाम झाला नसता, असे त्यांचे मत आहे.

या सात-आठ वर्षांच्या काळात त्यांच्या राजकीय मतांत परिवर्तन घडून आले. गांधींच्या विचारसरणीपासून ते दूर गेले. व्यक्ती कितीही मोठ्या असल्या आणि त्यांच्या प्रेमाचे नि जिव्हाळयाचे कितीही संबंध असले तरी वैचारिक मतभेद झाल्यावर भावना व बुद्धी यांचा



वाय १८९-५

झगडा होऊन बुद्धीची बाजू घ्यावी लागते, असे त्यांचे मत आहे. तसे करताना मनाला यातनाही फार होतात. शास्त्रीबुवांचीही मनःस्थिती त्या वेळी तशीच झाली. एम. एन. रॉय हे त्यांच्यासारखेच प्राचीन तत्त्वज्ञानाचे पंडित असून त्यांच्यात आधुनिक विज्ञानाचाही सुंदर संगम झाल्याचे शास्त्रीबुवांना दिसून आले. लोकप्रियता किंवा लोकप्रिय मते झुगारून देण्यास लागणारे धैर्य व त्या स्थितीत आपल्या विचारसरणीचा शुद्ध नि सात्त्विक आनंद भोगण्याची वृत्ती ही रॉय यांच्यात त्यांना दिसली. प्राचीन, सूक्ष्म, बहुमार्गी व भेदक वादपद्धती दोघांनाही सारखीच परिचयाची व आवडीची असल्यामुळे शास्त्रीबुवांचे रॉय यांच्याशी चांगलेच जमून गेले आणि अशा रीतीने हे पंडित एका बैठकीवर आले.

शास्त्रीबुवांच्या या आयुष्यक्रमाकडे ओझरता दृष्टिक्षेप केला तरी तो एक प्रचंड बुद्धिवादाचा झगडा आहे असे दिसून येईल. त्यांच्या वेषांतदेखील क्रमशः मताप्रमाणेच परिवर्तन होत गेले आहे. प्रथम एक वस्त्र आणि उपवस्त्र व मस्तकावर जटाभार, पुढे संपूर्ण खादी व नंतर आंग्ल पद्धतीचा अद्यावत पोशाख. असा त्यांच्या पोशाखांत फरक पडत गेला. आज त्यांच्या पूर्वीच्या खादीपैकी फक्त एक सदराच त्यांच्याजवळ उरला आहे.

## त्यांनी लिहिलेले ग्रंथ

आता त्यांनी लिहिलेल्या ग्रंथांचे थोडक्यात दिग्दर्शन करून हा परिचयलेख संपवितो. त्यांनी 'आनंदमीमांसा' नावाचा उपनिषदांतील तत्त्वज्ञानासंबंधी प्रबंध मराठीत लिहिला आहे. विशेष उल्लेखनीय म्हणजे त्यांचा 'धर्मकोश' होय. हा ग्रंथ संस्कृतमध्ये तयार होत आहे. या ग्रंथाची अडीच हजार पाने छापून झाली असून, त्यात प्राचीन हिंदू कायद्याची वैदिक कालापासून ते अठराव्या शतकापर्यंतची सर्व ऐतिहासिक माहिती देण्यात आली आहे. हिंदस्थानातील कायदेपंडितांनी त्यावर आपली समालोचना लिहिली आहे. या धर्मकोशाची एकंदर चौदा हजार पानांची, चौदा विभागांची योजना आहे. आणि यात संस्कृत भाषेतील सर्व धर्मविचारांचे संकलन होणार आहे. तसेच नागपूर युनिव्हर्सिटीतर्फे झालेली त्यांची व्याख्याने 'हिंदुधर्माची समीक्षा' म्हणून प्रसिद्ध आहेत. 'सिस्टिम्स ऑफ इंडियन लॉजिक' नावाचे तर्कशास्त्रावरील नवीन पुस्तक प्रसिद्धीच्या वाटेवर आहे.

पंडित लक्ष्मणशास्त्री उत्तम संपादकही आहेत. ते पूर्वी 'प्रमोद' चालवीत असत. हल्ली ते 'युगांतर'चे संपादक आहेत. अशा सव्यसाची पंडितास मुंबईच्या साहित्यसंघाने आपल्या संमेलनाचे अध्यक्ष केले आहे, ह्याबद्दल त्या संस्थेचे कोणीही अभिनंदनच करील.

**(साप्ताहिक नवयुगः दि. २६ नोव्हेंबर, १९४४, पृ. २)**

○○○

# ३.

# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

## श्री. शं. नवरे

पंडित न्याय, वेदांत, व्याकरण, धर्मशास्त्रादी जुनी शास्त्रे जुन्या पद्धतीने शिकलेला पंडित, मुंबईसारख्या इंग्रजी सुधारणेने फुललेल्या शहरातील मराठी साहित्य संमेलनाचा १९४४ साली अध्यक्ष होणे हा एक अद्भुत चमत्कारच समजला पाहिजे. माझ्या माहितीप्रमाणे मराठी साहित्य संमेलनाच्या इतिहासात हा प्रसंग अपूर्वच होय. पूर्वीचा एखादा दाखला असला तर तो याच तर्कतीर्थांविषयी होय. ता. ६ फेब्रुवारी १९४३ रोजी मुंबईत भरलेल्या गोमंतक मराठी साहित्य संमेलनाच्या द्वितीय अधिवेशनाचे अध्यक्षपद लक्ष्मणशास्त्रीबोवांनाच मिळाले होते. वाईसारख्या एकीकडच्या गावी राहणारा हा जुनापंडित, साहित्य संमेलनाचे अध्यक्षस्थान भूषविणारा मोठा साहित्यिक आहे. हा शोध मुंबईत राहणाऱ्या गोमंतकीयांनी प्रथम लावला हे मोठे आश्चर्य आहे. त्याच वेळी या निवडीबद्दल पुष्कळांनी नाकेही मुरडली असतील, पण अधिवेशन पार पडल्यानंतर योग्य स्थानी योग्य मनुष्य लाभल्याबद्दल सर्वांच्या तोंडून धन्योद्गारच ऐकावयास मिळाले.

गोमंतक हा काही शास्त्रीबोवांच्या नित्याचा संचाराचा प्रांत नव्हे. फार तर एकदोनदा आपल्या संस्थेच्या कामासाठी ते तिकडे फिरकले असतील. पण तरीही गोमंतकीयांसारख्या दूरस्थ लोकांना शास्त्रीबोवांचा खरा परिचय होण्याचे कारण वरील अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष माझे मित्र श्री. यशवंत सूर्यराव देसाई हे होत. ज्या प्राज्ञपाठशाळा मंडळाचे लक्ष्मणशास्त्री अध्यक्ष आहेत, त्याच मंडळाच्या चालकांमध्ये यशवंतराव हे एक आहेत. निकट परिचयाने शास्त्रीबोवांची खरी योग्यता त्यांना कळून चुकली, आणि हा जसा पहिल्या प्रतीचा पंडित आहे, त्याप्रमाणे पहिल्या प्रतीचा साहित्यिकही आहे, अशी त्यांची खात्री झाली.

*

जुन्या शास्त्रीपंडितांची एकेक पिढी आता मागे पडत चालली आहे. एक शास्त्री गेला की, त्याची जागा भरून काढणारा दुसरा शास्त्री मिळत नाही, आणि तो मिळत नाही म्हणून

वाईट वाटणाऱ्यांची संख्याही दिवसेंदिवस कमी होत चालली आहे! जीर्ण मतांची ती जुनी खोडे जिवंत राहिली काय किंवा मेली काय सारखीच. नवीन जगाला त्यांचा काहीही उपयोग नाही. शास्त्री म्हणजे भट, भिक्षुक, याज्ञिक किंवा पुराणिक यापलीकडे आता अर्थ राहिलेला नाही, अशी स्थिती येण्याला आमचा जुना शास्त्रीवर्ग स्वतःच किती कारणीभूत झाला आहे, त्याचा विचार करण्याचे हे स्थळ नव्हे. पण एवढे मात्र खरे की, जुन्या शास्त्रीपंडितांत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी ही एकच व्यक्ती अशी मिळू शकेल की, नवीन पुरोगामी विचारांच्या लोकांतसुद्धा ज्यांना आदराचे आणि मानाचे स्थान मिळेल. मी प्रारंभी म्हटल्याप्रमाणे तर्कतीर्थांची येत्या शुक्रवारी येथे सुरू होणाऱ्या मुंबई आणि उपनगर साहित्य संमेलनाच्या अध्यक्षस्थानी निवडहोणे, हेच याचे द्योतक होय.

*

शास्त्रीबुवा वयाने फारसे नाहीत; चाळीशीच्या आतबाहेरचे आहेत. आधुनिक पद्धतीच्या कोणत्याही शाळेत किंवा महाविद्यालयात त्यांनी शिक्षण घेतलेले नाही. फार तर पश्चिम खानदेशातील आपल्या पिंपळनेर गावी मराठी शाळेमध्ये काय दोन-तीन वर्षे त्यांनी घालविली तेवढीच. पण बाकीचे सर्व शिक्षण काही जुन्या पद्धतीने गुरूजवळ राहून तर बरेचसे केवळ स्वतःच्या बुद्धिमत्तेने जिज्ञासू वृत्तीने आणि असामान्य ग्रहणशक्तीने त्यांनी मिळविले आहे. वडिलांच्या इच्छेवरून वाईचे प्रख्यात पंडित वेदशास्त्रसंपन्न नारायणशासत्री मराठे (आता स्वामी केवलानंद) यांचेजवळ अध्ययन करण्यासाठी शास्त्रीबुवा बालपणी गेले. संस्कृत शस्त्रांचे मुख्य अध्ययन त्यांनी तेथेच केले. मध्यंतरी काही काळ काशीला राहून तेथील विख्यात शास्त्रीपंडितांचे जवळ अध्ययन करण्याचा लाभ त्यांनी घेतला. तथापि 'तर्कतीर्थ' ही पदवी कलकत्ता संस्कृत असोसिएशनची आहे. ज्याप्रमाणे सरकारी युनिव्हर्सिट्यांतून बहुमानाच्या पदव्या घेऊन दरसाल कित्येक लोक बाहेर पडतात, पण त्यातून पुढे सार्वजनिक क्षेत्रांत नावारूपाला आलेला एखादाच भेटतो, त्याप्रमाणे कलकत्ता, काशी, बडोदे, पुणे किंवा अन्य ठिकाणांहून प्राचीन शास्त्रांच्या परीक्षा दिलेले विद्वान दरसाल पुष्कळ बाहेर पडतात, पण देशाच्या सार्वजनिक जीवनाशी एकरूपता पावून प्रत्येक प्रश्नाचा स्वतंत्र बुद्धीने विचार करणारा आणि प्रत्येक राजकीय किंवा सामाजिक चळवळीच्या आघाडीवर राहणारा लक्ष्मणशास्त्र्यांसारखा पंडित एखाद दुसराच.

*

केवळ विद्वत्तेच्या कसोटीवर घासून पाहिले तर जुन्या पंडितांत शास्त्रीबुवांचा क्रम पहिल्या श्रेणीमध्ये लागेल. अगदी 'रामो हरिः करी भूभृत्' येथपासून जुन्या संस्कृत शिक्षणाला जुन्या पद्धतीने, म्हणजे गुरूंच्या हाती स्वतःची शेंडी देऊन, त्यांनी सुरुवात केली आणि अत्यंत अल्पकालामध्ये जुनी बहुतेक प्रमुख शास्त्रे त्यांनी आत्मसात केली. आज जुने किंवा नवे पढिक विद्वान थोडे नाहीत. परंतु आयत्या वेळी त्यांनी शिकलेल्या विद्येचा

त्यांना फारच थोडा उपयोग होतो. जुन्याआणि नव्या शिक्षणपद्धतींत एक फार मोठा फरक आहे. मुद्रणकलेच्या अभावी जुनी विद्या ब्राह्मणांना पिढ्यान्‌पिढ्या आपल्या जिभेवर झेलीत आणावी लागली. सर्व शास्त्रे मुखोद्गत करण्यावाचून गत्यंतरच नसे. जुन्या पद्धतीतील हा लाभ शास्त्रीबोवांना भरपूर मिळाला. त्यामुळे वादाचा कोणताही विषय निघो, शास्त्रीबोवांना फारशी पुस्तके धुंडाळावी लागत नाहीत किंवा डोके खाजवीत बसावे लागत नाही. त्यांची कौतुकास्पद स्मरणशक्ती जिभेच्या रूपाने ताबडतोब बोलू लागते. यामुळे पठणक्रियेला पारख्या झालेल्या आधुनिक विश्वविद्यालयांतून बाहेर पडलेल्या पंडितांना ते हांहां म्हणता फिक्के पाडू शकतातच, पण शिवाय आपली बुद्धिमत्ता, स्मरणशक्ती, ग्रहणशक्ती आणि हजरजबाबीपणा या गुणांच्या जोरावर प्राचीन पंडितांचीही त्याचेपुढे डाळ शिजू शकत नाही, असा अनुभव अनेक धर्मपरिषदांतून आणि शंकराचार्यांपुढे झालेल्या वादांतून आलेला आहे. जुन्या पंडितांचे वादविवादाचे विशिष्ट आडाखे ठरलेले असतात. त्या परंपरेतच शास्त्रीबुवा वाढलेले असल्यामुळे केवळ या आडाख्यांच्या चापांत पकडून त्यांना कोणीही अडवू शकत नाही.

*

संस्कृत शाळेमध्ये इंग्रजी शिक्षण अर्थातच होऊ शकत नाही. निदान शास्त्रीबुवा ज्या वेळी वाईला गेले, तेव्हा प्राज्ञपाठशाळेमध्ये इंग्रजी शिक्षणाची काहीच व्यवस्था नव्हती. शास्त्रीबुवा स्वतःच खाजगी रीतीने ही भाषा शिकले आणि थोड्या वेळामध्ये त्यांनी तीत एवढी प्रगती केली की, आंग्लविभूषित पदवीधरांना चटकन आकलन न होणारे इंग्रजी भाषेतील शास्त्रीय ग्रंथदेखील ते वाचू लागले.

इंग्रजी भाषेचा परिचय झाल्यामुळे पाश्चात्त्य विद्येच्या नवीन दालनाचे द्वार शास्त्रीबुवांनी स्वतःला उघडे करून घेतले व त्यामुळे त्यांच्या शिक्षणातील एकांगीपणा आपोआपच नष्ट झाला. जुने शास्त्रीपंडित आधुनिक शास्त्रे आणि विद्या यांकडे उपहासाच्या दृष्टीने पाहतात आणि आंग्ल विद्येने विभूषित झालेले नवे पंडित जुन्या शास्त्रांकडे तुच्छतेने आणि अनादराने पाहतात. यामुळे त्यापैकी प्रत्येकजण एकांगीच राहतो. दोन्ही विद्यांतील चांगले गुण आपल्यामध्ये तो साठवू शकत नाही. ज्यांना हायस्कुलांतून किंवा कॉलेजांतून शिकवावेच लागते, अशा काही शास्त्रीलोकांचा इंग्रजी भाषेशी परिचय असलेला दिसतो; पण तो अगदी कामापुरताच. लक्ष्मणशास्त्री इंग्रजी भाषेकडे वळले ते पोटाला दोन अधिक पैसे मिळावे या इच्छेने त्या भाषेचा नुसता परिचय करून घेण्याकरिता नव्हे, तर त्या भाषेच्या द्वरा आधुनिक पाश्चात्त्य विचारसरणी समजून घेण्याच्या इच्छेने. त्यामुळे जुनी आणि नवी, पौर्वात्य आणि पाश्चात्त्य अशी दोन्ही शास्त्रे आत्मसात करण्याचा मान त्यांनी मिळविला.

*

एवढी विद्या इतक्या अल्पकालात संपादन करावयाची म्हणजे कोणाला सहज वाटेल की पहाटे ब्राह्ममुहूर्तावर उठून किंवा रात्री दिवे जाळून शास्त्रीबुवांनी रोजचे पंधरा-सोळा तास तरी अध्ययनांत आणि वाचनात घालविले असतील. पण शास्त्रीबुवांसारखा पट्टीचा झोपाळू आणि आळशी क्वचितच सापडेल. परमेश्वराने झोपेचा आणि आळसाचा शाप या महापंडिताला दिला नसता तर त्याच्या हातून आजच्यापेक्षा कितीतरी पटींनी अधिक शास्त्राची आणि साहित्याची सेवा झालेली दिसली असती. एखाद्या ठिकाणी सहज तास अर्धा तास स्वस्थपणे एखाद्या पुस्तकाचे वाचन झाले की, शास्त्रीबोवांचा संपला अभ्यास. कधीकधी तर खोलीमध्ये झपाट्याने येरझारा घालीत पुस्तकाची पाने भराभर उलटून आपले वाचन ते संपवीत असतात. मग त्या पुस्तकातील मुख्य प्रतिपाद्य विषय आणि त्यावरील शास्त्रीबुवांची टीका यावर वादविवाद करण्यास कोणीही त्यांचेसमोर यावे. चूक व्हावयाची नाही.

जेवणे म्हणजे ताटात वाढलेले पदार्थ कसेतरी तोंडात भराभर भरणे असा शास्त्रीबुवांचा समज आहे. शेजारच्या माणसांचा पहिलाभात संपण्यापूर्वीच शास्त्रीबुवा सर्व जेवण आटोपून ढेकर देत बसलेले आढळतात. बरे हे बकाबका भरताना तोंडाचा पट्टा सारखा चाललेलाच असतो! त्यांना चर्चेला विषय नाही, असे कधी होत नाही. ऐकणारा कोणी असला म्हणजे झाले. त्यांची भोजनाची आणि वाचनाची पद्धती जवळजवळ एकच. पण बकाबका खाण्याने जसे त्यांना कधी अपचन झाले नाही, तसे भराभर पुस्तके फस्त केल्याने त्यांच्या बुद्धीलाही कधी ताण पडला नाही. जठराप्रमाणे बुद्धीचा नेहमी धगधगणारा अग्नीही येईल तो विषय पचवून टाकून पुन्हा नवीन खाद्य मिळविण्याच्या शोधाला लागतो.

*

वाचनाप्रमाणेच भरभर लेखनाची सवय शास्त्रीबोवांना लागली असती तर त्यांच्या साहित्यसेवेने कित्येकांचे डोळे आज दिपवून टाकले असते. पण आळसाचा त्यांना मिळालेला शाप त्यांना ही गोष्ट करू देत नाही. त्यांचेकडून एखादा लेख मिळवावयाचा म्हणजे त्यांना कित्येक वेळा खोलीत कोंडून ठेवावे लागते. 'लेख लिहिलात तर दार उघडतो' अशी धमकी देऊन सर्व साहित्यानिशी त्यांना लेख लिहिण्यास बसवावे, पण आळशी आणि झोपाळू शास्त्रीबोवांना ही इष्टापत्तीच वाटावी! कारण बंद खोलीमध्ये स्वस्थपणे झोपावयास मिळाल्यावर आणि आपणांस कोणी व्यत्यय आणू नये म्हणून बाहेर फुकटचा पहारेकरी बसावयास मिळाल्यावर त्यांना आणखी काय पाहिजे?

पण अशा स्थितीतही शास्त्रीबोवांच्या हातून मौल्यवान साहित्यसेवा घडलेली आहे. एकही ग्रंथ न लिहिलेल्या पण साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद विभूषित केलेल्या वशिल्याचे साहित्यिक ते नव्हेत. त्यांची साहित्यसेवा थोडीच का होईना, पण मोलाची आहे. 'आनंदमीमांसा', 'हिंदुधर्माची समीक्षा' आणि 'जडवाद' ही त्यांची तीन पुस्तके त्यांच्या

विद्वत्तेची, बुद्धिमत्तेची, स्वतंत्र वृत्तीची आणि पुरोगामी विचारसरणीची उत्तम साक्ष देतील. 'हिंदुधर्माची समीक्षा' हे पुस्तक म्हणजे नागपूर विद्यापीठामध्ये त्यांनी दिलेल्या व्याख्यानांचा संग्रह होय. नागपूर विद्यापीठाला या विद्वानाची ओळख सर्वांत आधी झाली.

पुरोगामी आचार आणि पुरोगामी विचार यांमुळे जुन्या शास्त्रीपंडितांच्या तिरस्कारास लक्ष्मणशास्त्री पात्र व्हावे, यात आश्चर्य नाही. सुधारक, धर्मलंड, बहकलेला, चार्वाक, पाखंडी, भ्रष्ट अशा अनेक पदव्या जुन्या शास्त्रीपंडितांनी त्यांना बहाल केलेल्या आहेत. पण आश्चर्य हे की, त्यांनापदवी देणारे हे लोकच कालाच्या अथांग सागरात बुडत चालले असून लक्ष्मणशास्त्री झपाट्याने हात मारीत पोहत चाललेले आढळतात. अशा लोकनिंदेची किंवा त्यांच्या सक्रिय बहिष्काराची शास्त्रीबोवांनी केव्हाच पर्वा केली नाही. तरुण पिढी आपल्याला चांगली ओळखते, आपल्या मागून येण्यास ती तयार आहे, यातच त्यांना पराकाष्ठेचा आनंद होतो, भरपूर समाधान मिळते.

*

'जडवाद' या पुस्तकाला लिहिलेल्या दोनच पानांच्या प्रस्तावनेत शेवटी शास्त्रीबोवा म्हणतात, "आपली प्रगती जडवादावाचून अडून राहिली आहे. जडवादाने आपल्या विचारक्षेत्रांत आणि वाङ्मयक्षेत्रात प्रवेश केल्याशिवाय आपल्या बुद्धीचे जाड्य नष्ट होणार नाही. ज्या बुद्धीस जडवादाचे आकलन होणार नाही, ती जड असते. आपल्या सामाजिक बुद्धीतील आणि कर्मातील मांद्य व आंद्य नष्ट करण्यास तात्त्विक जडवादच समर्थ आहे. तात्त्विक जडवाद हा कलात्मक कर्म व ज्ञानरूप विचार यांचा बलवान असा आधार आहे. त्याच्याशिवाय ईश्वरवादाच्या सोनेरी व सुंदर आवरणाखाली दडलेल्या सामाजिक अन्यायाचा व मानवी दास्याचा शुद्ध बुद्धीच्या न्यायासनासमोर निकाल लागणार नाही.''

परंपरागत विचारसरणीच्या हृदयाला चटके देणारे असे धगधगीत निखारे शास्त्रीबोवांच्या लेखनांत आणि भाषणांत कितीतरी आढळतात. त्यामुळे निश्चेष्ट पडलेले शास्त्रीबोवांचे कित्येक जुने स्नेही आणि चाहते मला माहीत आहेत. माणसांतून उठलेला विद्वान असे कित्येक वेळा ते शास्त्रीबोवांचे वर्णन करीत असतात. शास्त्रीबोवांचे नाव घ्यावयाचे नाही, त्यांच्या लेखाला प्रसिद्धी द्यावयाची नाही किंवा त्यांना उत्सवात व्याख्यानाला बोलवावयाचे नाही अशा प्रतिज्ञा पुष्कळांनी केलेल्या आहेत. पण यामुळे शास्त्रीबोवांच्या कर्तृत्वाचा कोंडमारा केव्हाच होऊ शकला नाही. "जानन्तु ते किमपि तान्प्रति नैष यत्नः" हीच भावना शास्त्रीबोवांनी त्यांचेविषयी धरलेली आहे.

*

अध्ययन, शास्त्रचिंतन, लेखन आणि भाषण एवढ्यातच शास्त्रीबोवांच्या कर्तृत्वाची मर्यादा संपलेली नाही. त्यांना सर्वसामान्य समजू लागल्यापासून अशी एकही राजकीय चळवळ नाही, की ज्यात त्यांनी धडाडीने उडी घेतलेली नाही. राजकीय चळवळीची जेवढी म्हणून

साधने आज ज्ञात आहेत, तेवढी सर्व त्यांनी हाताळली आहेत आणि त्याकरता अनेक कष्टही सहन केलेले आहेत. महाराष्ट्रातील तरुणपिढीशी त्यांचे संघटन होण्यास शास्त्रीबोवांच्या या राजकीय चळवळीच कारणीभूत आहेत. राजकीय कार्यासाठी झंझावाताप्रमाणे त्यांनी दौरे काढलेले आहेत, हृदये थरारून सोडतील अशी वक्तृत्वपूर्ण भाषणे केलेली आहेत. आपल्या जिवंत विचारसरणीने नवीननवीन कार्यकर्ते उभे केले आहेत, आणि या सर्वांचे प्रायश्चित्त म्हणून अनेकदा कारावासही भोगलेला आहे.

पहिल्या प्रतीची तत्त्वनिष्ठा, समाजहिताची दुर्दम्य कळकळ आणि महान त्याग नसता तर शास्त्रीबोवांच्या एवढ्या देशसेवेलाही कोणी किंमत दिली नसती. शास्त्रीबोवांची विद्वत्ता आणि बुद्धिमत्ता भाड्याने घ्यावी म्हणून पुढाऱ्यांनी आणि पैसेवाल्यांनी आजपर्यंत थोडेथोडके प्रयत्न केले नाहीत. त्यांना वेळोवेळी कोणती आमिषे दाखविण्यात आली, त्यांची लांबलचक यादी आज माझ्या डोळ्यांसमोर आहे. या आमिष दाखविणाऱ्यांमध्ये गांधींसारखे महान पुढारी आणि बिर्लासारखे नवकोट नारायण अशी बडी बडी प्रस्थे होती एवढे सांगितले म्हणजे पुरे! पण आपले क्रियास्वातंत्र्य कायम ठेवण्यासाठी यापैकी कोणत्याही आमिषाला शास्त्रीबोवा बळी पडले नाहीत. पुष्कळांच्या टीकेला पात्र झालेल्या 'रॉयिस्ट' पंथात आज ते मोडतात. मला त्या पंथाविषयी विशेष आपुलकी वाटण्याचे काहीच कारण नाही. पण जोपर्यंत लक्ष्मणशास्त्री त्यामध्ये आहेत, तोपर्यंत त्या पक्षाविषयी देशद्रोहीपणाचा संशय घेण्यास मात्र मी केव्हाही तयार होणार नाही व दुसऱ्या कोणी होऊ नये असे मी सांगत राहीन. आपल्या आजपर्यंतच्या आयुष्याला बट्टा लागेल असे एखादे पाप हा पक्ष करीत आहे, अशी खात्री पटताच त्याला लाथ मारून दूर होण्यास लक्ष्मणशास्त्री क्षणाचाही विलंब लावणार नाहीत.

**(साप्ताहिक मौज, मुंबई, बुधवार, दि. १३ डिसेंबर, १९४४, पृ. ५ व ११)**

○○○

# ४.
# शास्त्रीबुवांची मतांतरे आणि वेषांतरे
## श्री. शं. नवरे

“शास्त्रीबुवा, आयुष्याचे शेवटी पुनः सनातनी होऊन पृथ्वी गोल आहे, हे तुम्ही सिद्ध करून देणार.”

शास्त्रीबुवा आपल्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे जोरजोराने हसले.

प्रचलित अनेक विषयांवर माझ्या घरी शास्त्रीबुवांबरोबर गप्पा मारीत असता वरील उद्गार चार-पाच वर्षांपूर्वी मी काढले होते. त्यातील खोच त्यांच्या लक्षात आली म्हणून ते हसले. ती खोच बोचक नव्हती. आम्हा दोघांमध्ये होणाऱ्या विनोदी संभाषणातील निरागस होती.

**वेषांतरे तितकी मतांतरे**

गेल्या चोवीस वर्षांतील शास्त्रीबुवांच्या मतांना अनुलक्षून माझे उद्गार होते. शास्त्रीबुवांमध्ये आजपर्यंत जितकी वेषांतरे झाली, तितकीच मतांतरे झालेली आहेत.

सुमारे तीस वर्षांपूर्वी चिंचवड क्षेत्रात मी त्यांना प्रथम पाहिले. मोरया गोसाव्याच्या उत्सवानिमित्त वाईच्या प्राज्ञपाठशाळेचे प्राचार्य वे. शा. सं. नारायणशास्त्री मराठे आपल्या शिष्यवृंदाला घेऊन उत्सवाला आले होते. मार्गशीर्ष महिन्यातील कडाक्याची थंडी होती. प्रातःकाळी गुरुवर्यांसह सर्व शिष्यगण पवना नदीत स्नान करून वाळवंटात संध्यावंदन जपजाप्यादी कार्यक्रम अत्यंत स्तब्ध आणि गंभीर वातावरणात करीत बसलेला होता. पैकी दोन व्यक्तींकडे येणारा जाणारांचे लक्ष विशेष खेचले जात असे. एक सहा फूट उंचीचे, धिप्पाड शरीराचे व तेजःपुंज मुखाचे ऋषितुल्य नारायणशास्त्री मराठे व त्यांचेजवळ मृगाजिनावर जपजाप्य करीत बसलेला कौपीन-जटाधारी पाणीदार डोळ्यांचा बटू.

इतर लोकांप्रमाणेच ते चित्र पाहून मी पुढे गेलो.

पुढे १९२१ साली सप्टेंबर महिन्यात याच प्राज्ञशाळेमध्ये जाण्याचा माझ्यावर प्रसंग आला. असहकारितेच्या लाटेत, कॉलेज सोडून व काँग्रेसचे कार्य करून, वडिलांच्या इच्छेवरून याज्ञिकी शिकण्यासाठी मी गेलो होतो. कॉलेज होस्टेलच्या अगदी विरुद्ध

वातावरण. जिकडेतिकडे बाह्यतः तरी सनातनीपणाची छाप बसलेली, त्यातही प्रसन्नता होती; पावित्र्य होते, आपुलकी होती, राष्ट्रीय बाणा होता. प्राज्ञ पाठशाळेच्या भरभराटीचा तो अत्युच्च बिंदू होता, असे म्हणावयास हरकत नाही. या शाळेच्या बाळगोपाळांत एक प्रौढ समजला जाणारा विद्यार्थी नेहमी वावरताना दिसत असे. कटीला खादीचा पंचा, अंगावर खादीचे लहानसे उपरणे, पाठीवर रुळणारा जटाभार आणि गुळगुळीत शरीर. या मूर्तीला पाहिले की, मुले भोवताली जमायची आणि 'शास्त्रीबुवा' 'शास्त्रीबुवा' म्हणून नाना प्रकारचे प्रश्न विचारावयाची. हसत हसत प्रत्येकाची उत्तरे शास्त्रीबुवा देत. प्रश्नाला हळूहळू चर्चेचे स्वरूप येई आणि चर्चेचे पर्यवसान वादामध्ये. असे कितीतरी वेळा चालत असे. हा जटाधारी कोण? मी सहज चौकशी केली. तेव्हा "हे आमचे लक्ष्मणशास्त्री" असे शाळेचे चिटणीस गंगाधर शास्त्री सोहनी यांनी मला उत्तर दिले.

पण जाता येता एकमेकांकडे पाहण्याखेरीज आमचा दोघांचा कितीतरी दिवस परिचय झाला नाही. राष्ट्रीय चळवळीत कॉलेज सोडून याज्ञिकी शिकण्यासाठी आलेला विद्यार्थी म्हणून ते माझ्याकडे कौतुकाने पाहात, मुलांमधील एक लोकप्रिय व्यक्ती या पलीकडे मात्र माझे मनात त्यांचेविषयी काहीच आदर उत्पन्न झाला नाही. चेहऱ्यावर बुद्धिमत्तेची झाक दिसे; पण त्या सनातनी वेषाचा तितकाच तिटकाराही वाटे. दुसरे असे की, हा प्रौढ विद्यार्थी अभ्यास करताना क्वचितच दिसे. झोप, इकडे तिकडे भटकणे आणि गप्पागोष्टी हाच नित्याचा कार्यक्रम!

### परिचयाची वाढ

पण एकाच संस्थेच्या छत्राखाली राहून अमर्यादित कालपर्यंत अनोळखीमध्ये राहणे आम्हाला अशक्य होते. राष्ट्रीय शिक्षणाची प्रचंड लाट उसळलेली; नवीन नवीन विद्यार्थ्यांचा ओघ पाळशाळेकडे वळलेला; संस्थेचा व्याप एकदम कितीतरी वाढला. दिवेकर शास्त्र्यांच्या मनात स्वाभाविकच प्रथम आले की, संस्थेतील प्रौढ विद्यार्थ्यांना हाताशी धरून त्यांचेकडून जबाबदारीची कामे करवून घ्यावी. ज्या पाच-सात जणांची यासाठी निवड झाली, त्यांत लक्ष्मणशास्त्री आणि मी अर्थातच होतो. संस्थेची कामे, शिक्षकांच्या बैठकी, कार्यकारी मंडळाच्या सभा या निमित्ताने परिचय वाढत गेला आणि कालांतराने त्याचे दृढ स्नेहात रूपांतर झाले. परस्परांना परस्परांत काही विशेष दिसल्यामुळे गप्पागोष्टींत आणि वादविवादांत तासचे तास जाऊ लागले. काही वर्षांपूर्वी चिंचवडला आपण पाहिलेला जटाधारी मुलगा तो हाच असे मला या वेळी समजले.

### शिक्षणाची सुरुवात

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे पश्चिम खानदेशातील पिंपळनेरचे राहणारे; वडिलांना संस्कृत विद्येची फार मोठी आवड; या दुसऱ्या मुलाला संस्कृत शिकविण्यास त्यांनी सुरुवात केली. नित्य नैमित्तिक ब्रह्मकर्मे, रूपावली, समासचक्र, अमरकोश इतकेच नव्हे तर सगळा

यजुर्वेद त्यांनी आपल्या या दुसऱ्या चिरंजीवाकडून पाठ करवून घेतला आणि अधिक याज्ञिकीकरिता त्याला वेदमूर्ती नारायणशास्त्री मराठे यांच्या चरणांवर घातला.

नारायणशास्त्रींनी या नवीन शिष्याला क्रमाक्रमाने न्याय, वेदांत, काव्य, व्याकरण इत्यादी विषय शिकविले. शिष्याची बुद्धिमत्ता आणि ग्रहणशक्ती पाहून त्यांना फार आनंद होई. त्यांच्या दूरदृष्टीला शिष्यांच्या कर्तृत्वाचा भविष्यकाळही दिसे. या शिष्यावर त्यांचे विशेष प्रेम बसले हे सांगावयास नकोच; उलट शिष्यालाही आपल्या गुरूबद्दल आदर, पूज्यभाव आणि नितांत प्रेम वाटे.

## दिव्यदृष्टी देणाऱ्या गुरूची भेट

याच शाळेमध्ये लक्ष्मणशास्त्र्यांना एक निराळी दृष्टी देणारा आणखी एक गुरू भेटला, तो म्हणजे प्रख्यात पंडित आणि वक्ते पंडित दिनकरशास्त्री कानडे हे होत. कानडे शास्त्री आणि दिवेकरशास्त्री हे जुन्या समर्थ विलायतातील प्रौढ विद्यार्थी. सरकारी हुकमाने समर्थ विद्यालय बंद झाल्यावर हे दोघेही वाईस वेदमूर्ती नारायणशास्त्री मराठे यांजकडे गेले आणि तेथे त्या सर्वांनी प्राज्ञपाठशाळेची स्थापना केली. धार्मिक आणि राष्ट्रीय वृत्तीचा प्रचार करणारे कार्यकर्ते तयार करणे, हा उद्देश संस्था स्थापनेच्या मुळाशी होता. दिवेकरशास्त्री आता सर्वांच्या परिचयाचेच झाले आहेत. दिनकरशास्त्री कानडे प्राज्ञपाठशाळा सोडल्यावर काही महिने महाराष्ट्रभर गीतारहस्यावर प्रवचने देत हिंडल्यावर अमेरिकेत जाऊन कोलंबिया युनिव्हर्सिटीचे एम. ए. झाले व परत आल्यावर वऱ्हाडात बुलढाणा येथे काँग्रेसचे काम करू लागले. सध्या ते शिवणी येथील तुरुंगात स्थानबद्ध आहेत.

दिवेकरशास्त्री आणि कानडेशास्त्री समर्थ विद्यालयातील राष्ट्रीय चळवळीचे वातावरण घेऊन वाईला आले. पैकी दिवेकरशास्त्री संस्थेसाठी पैसा जमविण्याकरिता म्हणून बाहेर फिरत आणि कानडेशास्त्री संस्थेतील सर्व अंतस्थ व्यवस्था पाहात. चांगली बुद्धिमान मुले पाठवावयाची आणि गप्पागोष्टी करीत त्यांचे ठिकाणी कडकडीत राष्ट्रीय बाणा उत्पन्न करावायाचा हे कानडेशास्त्री यांचे काम. त्यांच्या नजरेतून लक्ष्मणशास्त्री सुटणे शक्यच नव्हते. लक्ष्मणला त्यांनी नवीन दृष्टी दिली, असे म्हणण्यापेक्षा नारायणशास्त्री यांच्या सहवासात लक्ष्मणला जी दृष्टी येण्यास नुकतीच सुरुवात झाली होती, तिचा त्याने झपाट्याने विकास केला, असे म्हणणे योग्य होईल.

## विनोबा भावे यांचे आगमन

याच वेळी प्राज्ञपाठशाळेमध्ये आणखी एक कर्तबगार व्यक्ती येऊन दाखल झाली. ती म्हणजे विख्यात विनोबा भावे ही होय. विनोबा हे मूळचे वाईचे पण पुढे बडोद्याला जाऊन राहिले होते. महात्मा गांधींनी साबरमतीचा सत्याग्रहाश्रम स्थापन करताच विनोबा तेथे जाऊन दाखल झाले व काही महिन्यांनी वेदांताचा अभ्यास वाढविण्यासाठी वे नारायणशास्त्री मराठे यांच्याजवळ वाईस येऊन राहिले.

## वाईहून बडोद्यास पलायन

प्राज्ञपाठशाळेमध्ये प्राचीन पद्धतीने शास्त्रीय पूर्वोत्तर पक्ष करण्याचे किंवा आधुनिक पद्धतीने व्याख्याने देण्याचे प्रसंग प्रत्येक सोमवारी घडवून आणण्यात येत असत. त्यात एके दिवशी लक्ष्मणचे पहिले व्याख्यान झाले. 'धर्म रक्षणाकरिता स्वराज्याची आवश्यकता आहे', असा पक्ष त्यांनी मांडला. युक्तिवाद पाहून नारायणशास्त्री, दिनकरशास्त्री व विनोबा भावे यांच्या मनावर विशेष परिणाम झाला. पण नारायणशास्त्र्यांची अनुज्ञा घेण्यास त्यांचे मन कचरले. विचारले असते तर अशी अनुज्ञा मिळाली नसती ही खात्री. म्हणून एके दिवशी लक्ष्मणने आणखी दोन विद्यार्थ्यांसह बडोद्याला विनोबांकडे पलायन केले. काही आठवडे ते बडोद्यात होते. आज ज्याला गांधीवाद म्हणतात, त्याची मूलतत्त्वे पटवून देण्यास विनोबांनी सुरुवात केली, पण लक्ष्मणच्या बुद्धीत ते काही उतरेना. मग एके दिवशी विनोबांची संगत सोडून, बिनतिकिटाने, हालअपेष्टा भोगीत लक्ष्मण वाईला परत आला. नारायणशास्त्री रागाचा एकही शब्द बोलले नाहीत. तेव्हा पूर्ववत कार्यक्रम सुरू झाला.

## काशी येथील अध्ययन

पुढे काही दिवसांनी गुरुजींच्याच अनुज्ञेने शास्त्रीबुवा काशीला अध्ययनासाठी गेले. निरनिराळ्या शास्त्री पंडितांचा सहवास घडावा, त्याचेकडून काही शिकता आल्यास पाहावे, नवीन जग पाहावयास मिळावे आणि विविध प्रकारचा अनुभवही यावा हा त्यातील मूळ हेतू होता. काशीतील दोन तीन वर्षे शास्त्रीबुवांनी अत्यंत कष्टांत काढली. कारण रोजच्या गरजा भागण्याइतकासुद्धा पाठिंबा त्यांना नव्हता. काशीच्या अन्नछत्रात फक्त दुपारचे एकदाच जेवण मिळत असे. त्यामुळे रोज रात्री फाक्या मारण्याशिवाय गत्यंतर नसे. एकादशीच्या दिवशी तरी एक वेळचेही जेवण मिळण्याची सोय नसल्यामुळे दीड दिवस पूर्ण उपवास घडत असे. काशी अध्ययन झाल्यानंतर शास्त्रीबुवा पुन्हा वाईत आले. कलकत्ता संस्कृत असोसिएशनची तर्कतीर्थ ही पदवी त्यांनी १९२४ साली घेतली.

## गांधीवादाचे समर्थन

विनोबा भावे यांनी प्रथम लिहिलेले गांधीवादाचे घुटके घशाखाली सोडण्यास शास्त्रीबुवा जरी का-कू करू लागले तरी काँग्रेसची सूत्रे गांधींच्या हाती येऊन असहकारितेची प्रचंड लाट देशभर उसळल्यावर भावनाप्रधान शास्त्रीबुवा त्यामध्ये पूर्णपणे बुडून गेले. अंगावर खादीचा पेहराव त्यांनी चढवला, आणि गांधीवादाचे येता जाता ते समर्थन करू लागले. याबाबीत प्रस्तुत लेखकाची मते प्रथमपासूनच विरुद्ध असल्यामुळे दोघांचे वादविवादाचे खटके नेहमी उडत. गांधीवादावरील शास्त्रीबुवांचे हे प्रेम सुमारे दहा वर्षे कायम टिकले. असहकारितेच्या युगात बारडोलीस राहून गांधीजी सत्याग्रहाची तयारी करीत असता शास्त्रीबुवांचा मुक्काम बारडोलीच्या आश्रमात होता. तेथे ते उपनिषदांवरती मधूनमधून प्रवचने सांगत व महात्माजी ती लक्षपूर्वक ऐकत. दोघांचा पहिला परिचय आणि सहवास याच वेळी घडला.

## सत्याग्रहातील कार्य

१९३० मध्ये दांडी मार्चच्या सुरुवातीला कायदेभंगाची दुसरी लाट उसळली. त्यात प्राज्ञपाठशाळेच्या जुन्या नव्या कित्येक विद्यार्थ्यांनी मोठ्या तडफेने भाग घेतला. प्रस्तुत लेखक संगमनेरच्या आघाडीवर गेला आणि शास्त्रीबुवा नाशिक जिल्ह्यातील कळवणपासून पश्चिम खानदेशातील साक्रीपर्यंत याच कामासाठी फिरत राहिले. याच वेळी कर्णिक बंधूंचा आणि त्यांचा प्रथम सहवास घडला व वसंतराव कर्णिक यांचे तोंडून कॉ. मानवेंद्रनाथ रॉय यांच्या कित्येक गोष्टी शास्त्रीबुवांना ऐकावयास मिळाल्या. तथापि केवळ कुतूहल उत्पन्न होण्यापलीकडे त्या वेळी मजल गेली नाही. पुढे शास्त्रीबुवा क्रमप्राप्त तुरुंगात गेले.

## मार्क्सवादाचा पगडा

१९३० पासून १९३२ पर्यंत गांधींनी कायदेभंगाच्या ज्या दोन प्रचंड चळवळी केल्या, त्याचे दुसरे काय परिणाम झाले असतील हे असोत; पण एक मोठा परिणाम हा झाला की, देशातील सहस्रावधी कार्यकर्ते तुरुंगामध्ये एकत्र आले. त्यांचेमध्ये कम्युनिस्ट वाङ्मय फेकले गेले आणि हा हा म्हणता या नवीन विचारसरणीचा फैलाव तरुणांमध्ये झाला. या दोन चळवळी झाल्याच नसत्या तर तरुणांमध्ये हे नवीन विचार इतक्या झपाट्याने पसरले असते की नाही, याची शंका आहे. शास्त्रीबुवांना मार्क्सवादाची पहिली ओळख अशाच परिस्थितीत तुरुंगात झाली व त्याने ते इतके भाळून गेले की, बाहेर आल्यानंतर या विषयाचा पुरा परिचय करून घेण्याच्या मागे ते लागले. मार्क्सवाद्यांची ओळख करून घ्यावी आणि त्यांचे वाङ्मय भराभर वाचून काढावे असा सपाटा त्यांनी सुरू केला; आणि थोड्याच अवधीत ते खंबीर मार्क्सवादी बनले. कॉ. रॉय यांचे 'इंडिया इन ट्रॅन्झिशन' हे पुस्तक व इतर लेख वाचून त्यांचेविषयी त्यांना आदर वाटू लागला. ज्या षड्‌दर्शनांचा अभ्यास शास्त्रीबुवांनी केलेला होता, त्यांचा रॉयनाही चांगला परिचय असल्याचे त्यांना आढळून आल्यामुळे एकमेकांची भाषा एकमेकांना अधिक चांगल्या रीतीने कळू लागली. रॉय हा मोठा बुद्धिमान पुरुष आहे आणि परिस्थितीचे अचूक आकलन करण्याचे सामर्थ्य त्याचेजवळ आहे अशी शास्त्रीबुवांची खात्री होऊन चुकल्यामुळे तिकडे ते वळले. रॉय यांचे प्रथम ते अनुयायी झाले व नंतर काही दिवसांनी रॉय यांची व त्यांची भेट झाली. पुढील इतिहास ताजा असल्यामुळे फार वाढवीत नाही. एवढेच सांगतो की, शास्त्रीबुवांच्या बुद्धिमत्तेची छाप उलट रॉय यांचेवरही पडल्यामुळे पुढारी आणि अनुयायी हे त्या दोघांमधील नाते नष्ट होऊन ते परस्परांचे स्नेही आणि सहकारी बनले. आज रॅडिकल डेमोक्रॅटिक पक्षाचे शास्त्रीबुवा मोठे आधारस्तंभ समजले जातात. या पक्षाचे तत्त्वज्ञान देशहितास पोषक आहे की नाही हा विचार करण्याचे हे स्थळ नव्हे.

## जीवनात झालेली भयंकर उलथापालथ

मार्क्सवादाने शास्त्रीबुवांच्या जीवनात एवढी भयंकर उलथापालथ केली की, पूर्वी शास्त्रीबुवा ते हेच काय असा प्रश्न जो तो विचारतो. त्यांची मूळची वृत्ती अत्यंत धार्मिक आणि

अध्यात्मपर. पुढे तिला राष्ट्रीय वळणांची जोड मिळाली. ज्याला सामान्यतः टिळकांची विचारसरणी असे म्हणता येईल, तिचा अभिमान त्यांच्या अंगी संचारला. गीतारहस्यातील कर्मयोगाचे ते तावातावाने समर्थन करू लागले. त्यातील वर्णाश्रम धर्माचाही पुरस्कार ते करीत असत. तथापि गांधींच्या चळवळीत असताना १९२० ते १९३० या दहा वर्षांच्या अवधीत त्यांच्या धार्मिक मतांमध्ये फार झपाट्याने वाढ होत होती. सर्व प्रचलित धार्मिक आणि सामाजिक प्रश्नांवर प्राज्ञपाठशाळेत वारंवार मोकळ्या मनाने चर्चा होत असे. त्यामध्ये शास्त्रीबुवा, नवीन काळास योग्य अशा नवीन सुधारणा मांडू लागले. प्राचीन ग्रंथांतून या सुधारणांना आधार दाखवल्यावाचून लोक त्या ग्रहण करीत नाहीत, अशी त्या वेळची परिस्थिती असल्यामुळे निरनिराळ्या ग्रंथांतून आपल्या नवीन विचारांना ते आधार दाखवू लागले. या नवीन धर्मसुधारणेमध्ये प्राज्ञपाठशाळेच्या सर्वच कार्यकर्त्यांनी प्रामुख्याने भाग उचलल्यामुळे ती संस्था सनातनी लोकांच्या रोषास पात्र झाली. हा सुधारकांचा अड्डा आहे, अशी ते कुचेष्टा करू लागले. शंकराचार्यांच्या पीठासमोर काशी येथे पंडित मदन मोहन मालवीय यांनी भरविलेल्या ब्राह्मण सभांमधून आणि खानदेशातील कुकुरमुंडे येथे श्री. संतोजी महाराजांनी वेळोवेळी भरविलेल्या धर्मसभांतून प्राज्ञपाठशाळेचे लोक हजर राहून आपली नवीन मते पूर्वीच्या शास्त्रांच्या आधारानेच मांडू लागले. वादविवादाचे सर्व काम लक्ष्मणशास्त्र्यास करावे लागे. ते संस्कृत भाषेत उत्तम बोलू शकतात, वादविवादाची मीमांसा पद्धतीही त्यांच्या अंगवळणी पूर्ण पडली आहे. प्राचीन सर्व शास्त्रे हात जोडून त्यांचे जिभेवर नेहमी उभी असतात. त्यामुळे सनातनी लोकांनी आपल्या वतीने उभे केलेले कलकत्त्याचे विख्यात पंडित कै. अनंत कृष्ण, काशीचे कै. लक्ष्मणशास्त्री द्रवीड व त्यांचे चिरंजीव राजेश्वर शास्त्री, धारवाडचे कै. नागेशशास्त्री उप्पिन बेट्टिगिरी यांच्या मानाने लक्ष्मणशास्त्री यांचे वय अगदी लहान. ते केवळ पोरसवदा दिसत पण पूर्वोत्तर पक्षात या सर्व अतिरथी महारथींना ते केवळ लीलेने लोळवीत असत. हे सर्व वाद मी स्वतः ऐकलेले आहेत. शास्त्रीबुवांचे विषयी पंडित मदन मोहन मालवीय यांचे मनामध्ये आदर आणि प्रेम उत्पन्न होण्याचे कारण शास्त्रीबुवांचे वादविवादपटुत्व आणि प्राचीन शास्त्रावरील त्यांचे प्रभुत्व वेळोवेळी झालेल्या याच वादविवादांतून शास्त्रीबुवांचे 'शुद्धिसर्वस्वम्' हे संस्कृतभाषेत लिहिलेले पुस्तक बाहेर पडले.

प्राचीन शास्त्राधार दाखवूनदेखील सनातनी पक्ष सुधारणेस नाकबूल आहे हे लक्षात येताच महाराष्ट्रातील परिवर्तनवादी शास्त्रीमंडळींनी स्वतःची नवी संघटना केली. त्यात प्राज्ञपाठशाळेच्या लोकांनीच पुढाकार घेतलेला होता. हल्ली ज्याला धर्मनिर्णय मंडळ म्हणतात, त्यांच्या संस्थापकांपैकी एक लक्ष्मणशास्त्री आहेत. या मंडळाने वेळोवेळी केलेल्या पुरोगामी विचारात्मक ठरावांचे श्रेय लक्ष्मणशास्त्री व त्यांचे गुरू नारायणशास्त्री यांनाच दिले पाहिजे.

## धर्मकोशाचे संपादन

या दहा वर्षांच्या अवधीत वाईच्या प्राज्ञपाठशाळेने धर्मकोश संपादनाचे काम सुरू केले होते. वेदमूर्ती नारायणशास्त्री हे त्याचे मुख्य संपादक आणि लक्ष्मणशास्त्री त्यांचे साहाय्यक. हल्ली समाजापुढे हे जे सामाजिक आणि धार्मिक प्रश्न येतात, ते सोडविण्याच्या उद्देशाने या प्रश्नासंबंधी प्राचीन शास्त्रांतील वचनांचे संकलन करणे हा धर्मकोशांचा मुख्य हेतू होता. या कोशाचे काही भाग प्रसिद्ध झालेले आहेत. तो अद्यापि पुरा व्हावयाचा आहे. वे. नारायणशास्त्री यांनी चतुर्थाश्रम स्वीकारल्यावर कोशाच्या संपादनाची मुख्य जबाबदारी लक्ष्मणशास्त्री यांचेवर येऊन पडली. या कोशासाठी द्रव्यसाहाय्य मिळविण्याच्या उद्देशाने ते हिंदुस्थानभर फिरत असतात. धर्मकोशाचे काम इतके लांबले की दरम्यानच्या काळात त्याचे संपादक पूर्ण मार्क्सवादी बनून प्राचीन हिंदुशास्त्राकडे पाहण्याची त्यांची दृष्टी साफ बदलली. तेव्हा एकदा सुरू केलेले काम पूर्ण करावयाचे या पलीकडे शास्त्रीबुवा त्याकडे आता विशेष ममत्वाने पाहात असतील असे मला वाटत नाही.

## शास्त्रीबुवांचे मतांतर

पूर्वी ज्या ज्या गोष्टींचे शास्त्रीबुवा तावातावाने समर्थन करीत असत, त्यातील काही गोष्टी आज निरर्थक म्हणून त्यांनी आपल्या विचारांतून कायमच्या सोडून दिलेल्या आहेत; आणि काहींवर विरोधी स्वरूपाचे भयंकर हल्ले ते चढवीत असतात. उदाहरणार्थ ज्या गीतारहस्याची तोंडभर स्तुती करीत ते फिरत असत, त्या ग्रंथाला त्यांनी हल्ली कुचकामी ठरविले आहे. जुन्या नव्या प्रत्येक वाङ्मयाकडे आणि नवीननवीन उद्भवणाऱ्या प्रत्येक प्रश्नाकडे केवळ मार्क्सवादाच्या चश्म्यातूनच पाहू लागल्यामुळे त्यांचेमध्ये एवढी क्रांती झालेली दिसते व म्हणून पूर्वीच्या सनातन्यांवर रूष्ट होऊन वेगळे झालेले शास्त्रीबुवांचे परिवर्तनवादी नवीन शास्त्रीपंडितही त्यांचेवर आज नाराज झालेले आढळतात. शास्त्रीबुवा स्वतः रात्रंदिवस मार्क्सवाद्यांच्या वर्तुळांतून फिरत असतात किंवा तरुण तरुण मार्क्सवाद्यांची वर्तुळे त्यांचे भोवती भरलेली नेहमी दिसत असतात.

सर्वांच्या स्मरणात असलेला शास्त्रीबुवांचा नित्याचा पोशाख म्हणजे एक कमरेला खादीचा पंचा व अंगावर एखादी साधी शाल किंवा खादीचाच दुसरा पंचा, डोक्यावर मोठा जटाभार. शास्त्रीबुवा कितीतरी वर्षे पादत्राण घालीत नसत. किंवा छत्रीची आवश्यकता त्यांना कधी भासत नसे. वयाच्या चोविसाव्या वर्षी ब्रह्मचर्याश्रमातून गृहस्थाश्रमात गेल्यावर त्यांनी जटाभार उतरविला. तथापि बाकीचा वेष तसाच कायम राहिला. १९३० सालच्या चळवळीत प्रचार करीत हिंडत असता राजकीय कामासाठी त्यांना निरनिराळे वेष बदलणे भाग पडले. अर्धी विजार, त्यावर सदरा व डोक्यावर टोपी आली. चळवळ संपल्यावर पुन्हा ते पूर्ववेषात म्हणजे पंचा उपरण्यासह फिरू लागले. मार्क्सवादाची दीक्षा घेतल्यानंतर गांधीवादाविषयी त्यांच्या मनात तिटकारा उत्पन्न झाला आणि गांधीवादाची निदर्शक

अंगातील खादीही नाहीशी झाली. शास्त्रीबुवा स्वदेशी पण गिरणीचा कपडा वापरू लागले. आज त्यांचा दिसतो तो पोशाख म्हणजे पायघोळ धोतर, सदरा, त्यावर उत्तम प्रकारचा कोट आणि टोपी. वेषांतर आणि मतांतर ही कशी बदलत गेली हे यावरून लक्षात येईल.

## आचारावरील परिणाम

मतांतर या शब्दाने पगडी फिरविणे असा अर्थ पुष्कळ वेळा ध्वनित होतो. तो मात्र यात नाही. नवे वाङ्मय जसजसे त्यांच्या वाचण्यात आले, तसतसा त्यांच्या मतांचा विकास होत गेला, असे म्हणणेच अधिक शोभेल. या मतांचा शास्त्रीबुवांच्या आचारांवरही परिणाम झाल्यावाचून राहिला नाही. त्याच्या आहारविहारावरून ते ब्राह्मण आहेत असे कोणीच म्हणू शकणार नाही. प्राज्ञपाठशाळेत लहानपणी संध्या जपजाप्यादी कर्मकांड त्यांनी श्रद्धेने आचरले असेल, पण पुढे यावरील त्यांचा विश्वास साफ उडाल्यासारखा दिसला. संस्थेमध्ये राहून संस्थेचे नित्याचे धार्मिक आचार शास्त्रीबुवा पाळत नाहीत व अशा रीतीने इतर मुलांना वाईट उदाहरण घालून देतात, याबद्दल त्यांच्या गुरूंचा त्यांचेवर फार राग असे. परंतु ती गोष्ट गुरुजी प्रत्यक्ष त्यांचे तोंडावर बोलून दाखवीत नसत; कारण लक्ष्मण हा मोठा बुद्धिवान, विद्वान आणि कर्तृत्ववान मुलगा आहे अशी गुरूंची खात्री होती आणि ती आजही कायम आहे. मध्यंतरी प्राज्ञपाठशाळेच्या कारभारात काही उलथापालथी होऊन हे गुरू आणि शिष्य शरीराने दुरावले तरी एकमेकांस एकमेकांविषयी वाटणारे प्रेम अद्यापि कायम आहे, हे प्रस्तुत लेखकाला चांगले माहीत आहे.

शास्त्रीबुवांच्या विचारांचा विकास आज कोठपर्यंतही झालेला असो, त्यांच्या आजपर्यंतच्या सर्व सार्वजनिक आयुष्याचे मुख्य श्रेय त्यांचे गुरुवर्य वेदमूर्ती नारायणशास्त्री मराठे व स्वतंत्र विचाराला अत्यंत पोषक असे वातावरण देणाऱ्या प्राज्ञपाठशाळेला दिले पाहिजे. या दोन्ही गोष्टी मिळाल्या नसत्या तर आपण जुन्या शास्त्रीपंडितांप्रमाणे कोठेतरी सांदीकोपऱ्यात पडून राहिलो असतो, असे शास्त्रीबुवाच मुखाने सांगत असतात. वेदमूर्ती नारायणशास्त्री मराठे प्राचीनकालीन मुनींप्रमाणे एकांतवास प्रिय असल्यामुळे त्यांचा खरा परिचय महाराष्ट्राला अद्यापही झालेला नाही. त्यांच्या आचारांवरूनही तो होण्यासारखा नाही. तथापि एका शब्दात मी एवढेच सांगतो की, ते पहिल्या प्रतीचे धार्मिक, सामाजिक आणि राजकीय क्रांतिकारक आहेत. प्राज्ञपाठशाळेतून नवीन विचारांचे लोक बाहेर पडण्याचे मुख्य श्रेय या थोर आणि कीर्तिविन्मुख पुरुषालाच दिले पाहिजे.

**(लोकमान्य, शुक्रवार, दि. १५ डिसेंबर १९४४, पृ. ४, ६)**

○○○

५.

# उपेक्षितांचे उपेक्षित पुढारीः तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

### द्वा. भ. कर्णिक

## टेक केअर शास्त्रीजी

ठाकरसी पर्णकुटीच्या मुख्य द्वाराशी एक लिमोसीन मोटारगाडी उभी राहिली. द्वारपालाने धावत जाऊन अदबीने दरवाजा उघडला. "Oh, Lachhman Shastri is here." असा आतून एक उद्गार आला आणि शास्त्रीजी मोटारीबाहेर पडले. मोटारीतून उतरण्याच्या धांदलीत उघड्या अंगावर परिधान केलेली त्यांची शाल हातावर पडलेली होती. ती नीट अंगावर लपेटून घेत आणि पायातल्या वहाणाही नीट करीत ते तुरूतुरू पायऱ्या चढू लागले. पण पहिल्याच पायरीजवळ त्यांचा पाय अडखळला आणि त्यांना सामोरे येणाऱ्या राजाजींनी त्यांना सावरले नसते तर ते पडलेही असते.

"Take care Shastriji", चक्रवर्ती राजगोपालाचारी त्यांच्याशी हस्तांदोलन करीत म्हणाले.

"Oh, Oh!" असे काहीतरी पुटपुटत त्यांनी आपला हात सोडवून घेतला आणि मग आतल्या प्रशस्त दालनात प्रवेश करता करता त्यांनी हात जोडून इतरांना प्रणाम केला.

" You are late Shastriji", सरोजिनीदेवी त्यांच्याकडे हसत हसत पाहात म्हणाल्या, "Bapuji is dying to see you."

" Yes yes! I am late", शास्त्रीबुवा आपले टपोरे डोळे सभोवार फिरवीत म्हणाले. त्यांची पावलेही नाचरेपणाने इतस्ततः पडत होती.

## सर्वांना कौतुक वाटे

दालनात जमलेले वार्ताहर आणि इतर काही थोर लोक त्यांच्या धांदलीकडे कौतुकाने पाहात होते. १९३४ सालच्या गांधीजींच्या उपवासात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना गांधी परिवारात पुढे उच्च स्थान होते की, त्यांच्या आगतस्वागताचा शुभकार सर्वांच्या अगदी अंगवळणी पडला होता. पण दर वेळेला शास्त्रीबुवांची जी तारांबळ उडत असे,

विचारमग्न अवस्थेत गांधीजींच्या खोलीकडे जाताना कोणाकडे तरी पाहात आणि दुसऱ्याच कोणाला उत्तर देत ते ज्या त्वरेने आत पाऊल टाकीत असत, किंवा आत गेल्यानंतर बावरल्याप्रमाणे बाहेर येऊन तेथे जमणाऱ्या रूपसुंदर तरुणीकडे रोखून पाहात असत, त्याचे सर्वांना कौतुक वाटत असे. गांधीजींचा उपवास संपून नंतर स्वतः शास्त्रीबुवांनी पौरोहित्य केलेला देवदास विवाह होईपर्यंत ठाकरसी पर्णकुटीतील त्यांच्या फेऱ्या दिवसातून एक-दोन वेळ चालू असत. त्या वेळी अस्पृश्यतोद्धाराच्या चळवळीला हिंदुधर्मशास्त्राचे आधार ते काढून देत असत आणि मग तासन्तास गांधीजी आणि त्यांची या बाबतीत चर्चा चालू असे.

## मैं हूँ लछमनशास्त्री जोशी

त्या वेळी मंदिर प्रवेशाच्या चळवळीविरुद्ध सनातनी लोकांनी जो प्रचार चालविला होता, त्याला जाहीर सभांतून विरोध करण्याचेही कंकण शास्त्रीबुवांनी बांधले होते. पुण्यातील शिवाजी मंदिरात अशीच एक सभा त्या सुमारास सनातन्यांनी भरवली होती. त्या सभेसाठी बनारसहून पंडित देवनायकाचार्य, पंडित राजेश्वरशास्त्री असे रथी-महारथी सनातन्यांनी बोलविले होते. त्या दोघांनीही आपला पूर्वपक्ष खरोखरच धीमेपणाने, मधूनमधून धर्मशास्त्रातील वचने देऊन आणि भावनावश न होता मांडला. त्यांची हिंदी भाषा संस्कृतप्रचुर, पण विलक्षण रसाळ, आवाज पहाडी, उच्चासनावर बैठक मांडून विशेष हातवारे न करता संथ पण खणखणीतपणे ते बोलत. आणि तो आवाज साऱ्या शिवाजी मंदिरभर पोचत असे. पंडित राजेश्वरशास्त्री जेव्हा बोलू लागले, ‘‘मैं बराबर कहना चाहता हूँ कि अछूतों का मंदिरप्रवेश हिंदु धर्मशास्त्र को कभी संमत नहीं था और कभी संमत होगा नहीं।’’ तेव्हा क्षणभर त्या आवाजाने मोहित होऊन सारी सभा निश्चल राहिली. पण त्यानंतर मात्र तितक्याच खणखणीतपणे व्यासपीठावरूनच एक आवाज उठलाः ‘‘यह बात सच नहीं है।’’

‘‘कौन कहता है कि मेरी बात सच नहीं है?’’ राजेश्वरशास्त्री खवळून उद्गारले.

‘‘मैं हूँ लछमनशास्त्री जोशी।’’ शास्त्रीबुवा व्यासपीठावर उभे राहून म्हणाले, ‘‘मेरा कहना है कि, देवता के मंदिर सभी भक्तों के लिए खुले हैं। धर्मशास्त्र किसी को भी मंदिर में जाने से रोकता नहीं।’’

## घरचा अहेर

शास्त्रीबुवांचे ते शब्द ऐकताच काही लोकांनी टाळयांचा कडकडाट केला. पण त्यामुळे सभेला जमलेले सनातनी एकदम खवळले. त्यांनी "बसा, बसा खाली बसा" अशा आरोळया ठोकल्या. आणि एक-दोन लठ्ठ धटिंगणांनी शास्त्रीबुवांची गर्दन पकडून त्यांना व्यासपीठावरून खाली खेचण्यास सुरुवात केली. व्यासपीठावर आणि सभेमध्ये एकच गोंधळ उडाला. शास्त्रीबुवा एकटेच व्यासपीठावर असल्यामुळे त्यांच्याकडे चौफेर हात आणि मुठी वळल्या. त्यांचा प्रसादही त्यांना मिळाला. शेवटी त्यांच्याभोवती कसेबसे कडे केल्यानंतर एका सनातन्याने यांना अस्सल शिवी हासडली, "अरे x x x x पोटचा आहे हा शास्त्री."

## असा ब्राह्मण उभ्या महाराष्ट्रात नाही

शास्त्रीबुवांचे जीवन अशा अनेक लढायांनी भरलेले आहे. राजकारणात त्यांनी जितक्या शर्थीने झुंज घेतली आहे, यापेक्षा अधिक निधडेपणाने त्यांनी धार्मिक आणि सामाजिक अन्यायांचा प्रतिकार केला आहे. कर्मठ वातावरणात ते वाढले, जुनाट शास्त्रांच्या अध्ययनात यांनी आपल्या हयातीची ऐन उमेदीची वर्षे घालविली आणि पोटासाठी अजूनही सनातन्यांचे आगर असलेल्या एका पुराण्या गावात त्यांना वसती करावी लागत आहे. पण विचाराने इतका क्रांतिकारक आणि वाणीने इतका निर्भीड असा सच्चा दिलाचा ब्राह्मण उभ्या महाराष्ट्रात दुसरा सापडणे विरळा.

## कपिलकणादांच्या परंपरेतले

दोन वर्षांपूर्वी मुंबईच्या मारवाडी विद्यालयाच्या दिवाणखान्यात एम. एन. रॉय यांनी एक व्याख्यानमाला गुंफली. शेवटचे त्यांचे व्याख्यान तत्त्वज्ञानविषयक होते. त्या वेळी व्याख्यानाच्या अखेरीस रॉय यांनी शास्त्रीबुवांच्या हिंदुधर्मावरील टीकेचा फार मोठ्या गौरवाने उल्लेख केला. ते म्हणाले, "आज या ठिकाणी असा महापंडित बसला आहे की ज्याच्या चरणावर आपले मस्तक विनम्र करण्याची मला इच्छा झाली होती. तो महापंडित म्हणजे आपले तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी होत. शास्त्रीजींनी हिंदी तत्त्वज्ञानाबद्दल जे विचार प्रदर्शित केले आहेत, ते खरोखरच इतक्या मौलिक स्वरूपाचे आहेत की, ते वाचल्यानंतर कपिल, कणादांची परंपरा चालविणारा पुरुष आपल्यामध्ये निर्माण झाल्याबद्दल मला अभिमान वाटला."

## मन व विचारांची निर्बंध धाव

शास्त्रीबुवांची परंपरा मात्र विचार प्रवर्तकाचीच. त्यांनी राजकारणात हिरिरीने भाग घेतला आणि १९३० सालापासून ते या ना त्या गटाचे नेते म्हणून राजकीय क्षितिजावर उभे आहेत. परंतु स्वतंत्रपणे कोठलीही राजकीय भूमिका घेणे, त्या भूमिकेच्या पायावर स्थिर पक्षसंघटना उभी करणे आणि प्रतिपक्षाच्या भूमिकेचे, डावपेचांचे आणि विशेषतः त्यांच्या बलाबलांचे नीट आकलन करून मग आपला पवित्रा घेणे हे त्यांच्या आवाक्याबाहेरचे आहे. शास्त्रीबुवा हे विचारवंत, पण त्यांचे विचारचक्र केव्हा , कोणत्या दिशेने फिरेल आणि किती वेगाने धावेल याचा अंदाज करता येणार नाही. फक्त सभेमध्ये स्वतः एखाद्या विषयाचे विश्लेषण करीत असेपर्यंत त्यांच्या विचारांची साखळी सुसूत्रपणे जोडलेली असते. पण ज्या क्षणी ते खाली बसतील, त्या क्षणी त्यांचे मन जाणि विचार सैरावैरा धावू लागतात. कित्येक वेळी शरीरही त्या विचारांच्या अनुरोधाने तितकंच अनिर्बंधपणे पळू लागते.

शास्त्रीबुवांच्या जीवनातील एक सत्यकथा मला नेहमीच प्रतीकात्मक वाटत आली आहे. त्यांच्या पत्नी सत्यवतीबाई या एकदा हॉस्पिटलमध्ये पडून होत्या. शास्त्रीबुवा त्यांच्या कॉटजवळ बसले, बोलले आणि थोड्या वेळाने बाहेर गेले. ते पुन्हा जे परत आले ते त्याच

वॉर्डमध्ये शिरले. पण इतके विचारमग्न होते की दुसऱ्याच एका बाईच्या कॉटजवळ बसले. आहो, त्यांना हे कळायला काही मिनिटे लागली!

### देह एकीकडे, मन दुसरीकडे

शास्त्रीबुवांचे मन केव्हा, कोठे घोटाळत असेल याचा नियम नाही. १९३० साली ते सत्याग्रहाच्या चळवळीत पडले. सारा महाराष्ट्र त्यांनी आपल्या प्रभावी वक्तृत्वाने गाजविला. असले प्रभावी वक्तृत्व पुन्हा ऐकावयाला मिळणे खरोखरच कठीण आहे. सातारा जिल्ह्यातील त्यांच्या दौऱ्यात एकामागून एक महाभारतातील आख्याने सांगून जुन्या पुराणातील दाखले आणि दृष्टान्त देऊन त्यांनी ब्रिटिश सत्तेविरुद्ध इतकी आग भडकविली की पुढे-पुढे तेथील चळवळ सत्याग्रहाच्या कक्षेत बसविता येईल की नाही याचीच भीती वाटू लागली. शास्त्रीबुवांचे वैशिष्ट्य आहे ते हेच की, सत्याग्रहाच्या चळवळीत ते देहाने पडले; पण त्यांचे मन या त्या वेळी शस्त्राचाऱ्यांच्या आसपास घोटाळत होते. पुढे पुढे गुप्त संघटनांचे जाळे त्यांनी काही प्रमाणात विणले. पण त्या वेळी मार्क्सवादाचा पगडा त्यांच्या अंतःकरणावर सतत होता. आणि त्या वेळी सामुदायिक क्रांतीचा पुरस्कार ते करू लागले. याच वेळी नैतिक मूल्यांचे संशोधन करण्याचा साक्षात्कार त्यांना झाला, म्हणून प्रत्यक्ष राजकीय संघटनेचे कार्य यांच्या हातून होणे दुरापास्त झाले. राजकारणात आपली बाजू टिकवून धरण्यासाठी जो चिवटपणा लागतो, तो तर त्यांच्यामध्ये नाहीच, पण आपली बाजू बिनतोड आहे, असा आग्रह धरण्याला जो आत्मविश्वास लागतो याचाही त्यांच्यामध्ये पुष्कळ वेळा अभाव असतो. कित्येक वेळा राजकीय चर्चा अथवा वादविवाद सुरू असताना त्यांचे मन विमनस्क असते.

### 'मला तरी कुठं ठाऊक आहे ?'

एकदा शास्त्रीबुवा आणि मी आठ नंबरच्या ट्रॅमने फ्लोरा फाऊंटनला जात होतो. ठाकुरद्वारच्या सुमारास शास्त्रीबुवा एकदम माझ्या जवळून उठले आणि चार बाके पुढे जाऊन बसले. फाउंटनवर उतरल्यावर मी त्यांना म्हटले, "का हो शास्त्रीबुवा, मध्येच का उठला तुम्ही?" ते विमनस्कपणे हसत म्हणाले, "काय की! मला तरी कुठं ठाऊक आहे?"

राजकीय चर्चेच्या वेळी ते केव्हास, कोठला प्रश्न सभेत उपस्थित करतील याचा असाच नियम नाही. पण त्या वेळी मूलभूत तत्त्वांचा निर्देश करावयाचा असेल, राजकीय पक्षाच्या तत्त्वज्ञानाची दिशा ठरवायची असेल, त्या वेळी मात्र शास्त्रीबुवांचा वाक्प्रवाह संथपणे वाहत राहील. त्या वेळी त्यांच्या तर्कशुद्ध विचारपद्धतीत एकही दोष राहणार नाही.

### खरे सुख गप्पांत

शास्त्रीबुवांचे स्थान खरोखर कोणत्याही पक्षाच्या पोलादी चौकटीत नव्हे. संघटनेच्या कार्याचा भार ह्यांच्यावर टाकणे म्हणजे संपादकाला मशीनवरील जॉबरचे कार्य करावयाला सांगण्यासाररखे आहे. शास्त्रीबुवांना स्वच्छंदपणाने स्वैर संचार करू द्या. तत्त्वशोधन करीत

असताना नि:शंकपणे जीवनातील आनंदही लुटू द्या. मग त्यांच्या प्रतिभेचे जे एक एक पैलू बाहेर पडतील, त्याने तुमचे डोळे दिपून जातात किंवा नाहीत ते पाहा. शास्त्रीबुवांना स्वतःलाही तेच जीवन जगावयाचे आहे. सुखोपभोगाकडे ते कधीही  पाठ करीत नाहीत. उत्कृष्ट अन्न आणि उत्कृष्ट पेय यांचा आस्वाद आधाशीपणाने घेताना त्यांना पाहिले म्हणजे सोमरस घेणाऱ्या प्राचीन ऋषिमुनींची आठवण झाल्यावाचून राहात नाही. या ऋषिमुनींनी जे उज्ज्वल वाङ्मय प्रसवले, जो तत्त्वज्ञानाचा दीप पाजळला, जी राज्य काव्यसृष्टी निर्माण केली, ते वाङ्मय, ते तत्त्वज्ञान, ते गद्यकाव्य शास्त्रीबुवांच्या लेखणीतून अधिक समर्पक रीतीने बाहेर पडणे शक्य आहे. शास्त्रीबुवा हे अभिजात रसिक आहेत. तात्त्विक चर्चेत त्यांच्या मनाला समाधान लाभते. पण नाचऱ्या पावलांचे सौंदर्य वर्णन करताना त्यांच्या वाणीला जो बहार येतो, तो अवर्णनीय आहे. शास्त्रीबुवांचा खरा सहवास चार मित्रमंडळींत ते जेव्हा बसतात आणि एकदा सुरू झालेली मैफल मधूनमधून खाद्यपदार्थांचा आस्वाद घेण्यासाठी फक्त जेव्हा मोडते, तेव्हाच घडून येतो. गप्पा मारण्याइतके सुख शास्त्रीबुवांना दुसऱ्या कशातही लाभत नसेल. आणि अशा गप्पांचे वेळी शास्त्रीबुवांना एकटेच बोलू देणे, त्यांच्या तोंडून संस्कृत कथांतील काहीशा अशिष्ट पण अत्यंत हृदयस्पर्शी कथा ऐकणे आणि त्या वेळी त्यांच्या भाषेतील लालित्य, प्रसाद, नर्म विनोद, यांची अवीट गोडी चाखणे यासारखे सुख आपल्यालाही दुसऱ्या कशात मिळणार नाही.

**लौकिकदृष्ट्या अयशस्वी- तरीही स्फूर्तिदायक!**

शास्त्रीबुवांच्या जीवनाचा विचार करू लागलो म्हणजे त्यातील परस्परविरोधी घटनांकडे पाहून क्षणभर मन स्तिमित झाल्यावाचून राहात नाही. त्यांच्या सभोवती वैराग्यातील वातावरण आहे. पण त्यांची जीवनाकडे पाहण्याची दृष्टी जितकी आशावादी, तितकीच सुखलोलुप आहे. प्राज्ञपाठशाळेमध्ये आणि गांधींच्या आश्रमामध्ये अत्यंत कडक शिस्तीत राहूनही त्यांचे मन बंडखोर राहिले आहे. देवदेवतार्चनात सारा जन्म घालवूनही ते पाखंडीच नव्हेत तर मूर्तिभंजक झाले आहेत. राजकारणातील देवमूर्तींचे पाय शाडूचे प्रगट झाल्यानंतर स्वतःच्या उज्ज्वल भवितव्याकडे पाठ फिरवून त्यांनी राजकीयदृष्ट्या अस्पृश्य ठरलेल्या पुढाऱ्यांबरोबर काट्याकुट्यांनी भरलेला मार्ग सुधारावयालाही मागेपुढे पाहिले नाही. आज राजकारणात शास्त्रीबुवा हे निर्वासितांसारखे आहेत. लौकिकदृष्ट्या त्यांचे जीवन अयशस्वीच आहे. पण त्या जीवनातील ध्येयवाद इतका तेजस्वी आहे, सुखदुःखाने, आशा-निराशेने ते इतके परिपूर्ण भरलेले आहे, मानलेले देव, मागे टाकलेली तत्त्वे, उराशी जतन करून अखेर गंगार्पण केलेली आणि नवी स्वीकारलेली ध्येयस्वप्ने यांच्या कडू आणि गोड आठवणींनी त्या जीवनाला इतकी विविधता आलेली आहे की, त्या जीवनापासून स्फूर्ती घेण्याचा मोह कोणालाही आवरता येणार नाही.

**(साप्ताहिक मौज, १९ मे, १९४८, पृ. ७)**

○○○

६.

# आधुनिक महाराष्ट्राचे बुद्धिवादी वेदान्ती: तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

## द्वा. भ. कर्णिक

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे उभ्या राष्ट्रात शास्त्री म्हणूनच प्रसिद्ध आहेत. वाई हे त्यांचे प्रथमपासूनचे कार्यक्षेत्र. वाईच्या प्राज्ञ पाठशाळेला ज्या काही थोर व्यक्तींनी पुढे आणले त्यांत शास्त्रीबुवांची प्रामुख्याने गणना होते. आज त्याच ठिकाणी स्वतःला अक्षरशः कोंडून घेऊन शास्त्रीबुवा हाती घेतलेले धर्मकोशाचे प्रचंड कार्य करीत आहेत; ते कार्य पुरे झाले तर शास्त्रीबुवांचे नाव त्रिखंडांत गाजण्याइतके उजळ होईल; पण पुरे झाले नाही तरी शास्त्रीबुवांनी विद्वत्तेचे समाजात जे तेज पाडले आहे त्याचे वलय त्यांच्याभोवती कायम टिकून राहील.

पण शास्त्रीबुवा हे नुसते पंडित नव्हेत, नुसते तत्त्वचिंतक नव्हेत, नुसते विचारवंत नव्हेत; ते महाराष्ट्रातील एक कृतिवीर आहेत. त्यांच्या जीवनाचा विचार करू लागले म्हणजे त्यातील स्थित्यंतरे वैचारिक संघर्ष आणि विविध चळवळींची त्या जीवनावर झालेली प्रतिक्रिया यांचे चित्र डोळ्यांसमोर उभे राहून असे वाटू लागते की, अखेरीस हे जीवन वाहत तरी कोठे जाणार आहे? शास्त्रीबुवांना स्वतःलासुद्धा त्याचा थांग लागला नसेल, लागणारही नाही. त्याचे असे झाले की, शास्त्रीबुवांचे मन आणि विचारशक्ती नेहमी स्वतंत्र राहिली आणि ज्या चळवळी किंवा विचारप्रणालींची त्या मनाला ओढ लागली, त्या चळवळीत भाग घ्यावयाला व त्या विचारप्रणालीचा प्रचार करावयाला त्यांनी कधीही मागेपुढे पाहिले नाही.

गेली वीस वर्षे मी त्यांचे जीवन पाहात आहे. १९३० सालच्या सत्याग्रहाचे एक पुढारी म्हणून ते महाराष्ट्रात अग्रगण्य झाले. त्या सत्याग्रहात ते सामील झाले त्याच वेळी त्यांच्या जीवनाला कलाटणी मिळाली. कारण, त्या सत्याग्रहामुळे ते प्राज्ञ पाठशाळेच्या वैराग्यशील वातावरणातून बाहेर पडले आणि बऱ्यावाईट, त्यागी आणि सुखलोलुप, श्रद्धावान आणि निःश्रद्ध, भावनोत्कट आणि विचारशील अशा सर्व प्रकारच्या मंडळींच्या जीवनाशी ते समरस झाले. शास्त्रीबुवांना कोणी विचारले, की "तुम्ही राजकारणात इतक्या हिरिरीने

पडलात, निरनिराळया पक्षोपपक्षांत काम केलेत; पण अखेरीस तुम्ही मिळविलेत काय?" त्याला शास्त्रीबुवा एकच उत्तर देतील, "मी जीवन जगलो आणि जीवन हे जगण्यासाठी आहे हा धडा मी शिकलो. हीच माझी कमाई!"

वीस वर्षांपूर्वी कळवण येथील पोलीस कोठडीत शास्त्रीबुवांची आणि माझी अचानक गाठ पडली. आदल्याच दिवशी आम्हा काही सत्याग्रहींना जंगल सत्याग्रहाबद्दल पकडण्यात आले होते. रात्री बाराच्या सुमारास कोणीतरी माझ्याजवळ येऊन बसले आणि हसत हसत मला म्हणाले, "उठा, उठा कर्णिक. आम्ही आलो तुमच्या सोबतीला!"

मी डोळे चोळीत उठलो तेव्हा खळखळून हसत ते पुन्हा मला म्हणाले, "ओळखलं नाहीत का? मी आहे शास्त्रीबुवा!"

"तुम्ही कसे पकडला गेलात शास्त्रीबुवा?" मी थक्क होऊन विचारले.

"तो एक मोठा इतिहास आहे." शास्त्रीबुवा हलक्या आवाजात म्हणाले, "फितुरीचा इतिहास आहे तो. आम्हाला पकडून देण्यात आलं आहे."

"मग? आता पुढे?" मी त्यांना विचारले.

"पुढे काय?" शास्त्रीबुवा खिन्नपणे म्हणाले, "अहो, आपण फुकट चळवळ करतो आहोत. येथील शेठ-सावकारांनी केव्हाच वनचराई भरली आहे. बिचारे शेतकरी मात्र देशोधडीस लागत आहेत; मरताहेत बिचारे!"

सत्याग्रहाने शास्त्रीबुवांच्या जीवनाला कलाटणी दिली ती अशी, की त्या सत्याग्रहानेच त्यांच्या विचारांत क्रांती घडवून आणली. ३० सालचा सत्याग्रह हा हिंदुस्थानातील प्रत्येक कार्यकर्त्याच्या जीवनातील एक महत्त्वाचा टप्पा मानावा लागेल. गांधीजींच्यावरील निष्ठेने त्या सत्याग्रहात शास्त्रीबुवांनी हिरिरीने भाग घेतला. तो भाग घेत असताना त्यांचा जनतेशी विशेष संबंध आला आणि त्या अनुभवांतून त्यांना कळून आले की स्वातंत्र्य हे बहुजन समाजाच्या जीवनात आमूलाग्र सुधारणा करण्याचे साधन असेल, तर गांधीवाद हा ते कार्य पार पाडण्याला अपुरा ठरेल, असमर्थ ठरेल. त्याची पुढची पायरी म्हणजे गांधीवादाच्या जागी समाजवादाची प्रतिष्ठापना करणे ही होय.

शास्त्रीबुवा हे बराच काळ गांधीजींच्या आश्रमात होते. गांधीजींशी त्यांचे संबंधही अत्यंत जिव्हाळ्याचे होते. गांधीजींवरील प्रेमानेच त्यांना सत्याग्रहात ओढले, पुढेही त्यांच्या मनात बदल झाल्यानंतरही काही काळ गांधीजींच्या परिवारातील एक म्हणून ते समाजात वावरले; पण गांधीवादावर त्यांची निष्ठा राहिली नाही हे खास.

खुद्द सत्याग्रहाच्या चळवळीत तरी त्यांनी गांधीवादी साधनांचा कोठे उपयोग केला? काँग्रेस बेकायदा झाल्यानंतर गुप्ततेच्या मार्गाचाच शास्त्रीबुवांनी अवलंब केला. पण त्यामुळेच संगमनेर व बागलाण येथील जंगल- सत्याग्रहाची चळवळ ते पेटवू शकले. खरे पाहिले तर शास्त्रीबुवा हे अहिंसावादी नव्हतेच. अहिंसा हे राजकीय चळवळीतील एक

धोरण म्हणूनच त्यांना मान्य होते. परिस्थिती अनुकूल आहे असे जर त्यांना वाटले असते व शस्त्रास्त्राने स्वातंत्र्य संपादन करता येईल अशी त्यांची खात्री झाली असती, तर उघडपणे त्याचा पुरस्कार करावयालाही त्यांनी माघार घेतली नसती. कालांतराने महाराष्ट्रातील काही दहशतवादी गटांशीही त्यांचे संबंध जुळून आले. पण त्या दृष्टीने प्रत्यक्षपणे कार्य करण्याच्या आतच सुप्रसिद्ध मार्क्सवादी व क्रांतिकारक एम. एन. रॉय यांच्या गटाशी त्यांची ओळख झाली आणि व्यक्तिगत अत्याचारांचा निष्फळ मार्ग न स्वीकारता सामुदायिक क्रांतीच्या कार्याला वाहून घेणे अधिक श्रेयस्कर आहे, याची त्यांना मनोमन साक्ष पटली.

अर्थात महात्मा गांधी व गांधीवादाशी फारकत करून घेणे शास्त्रीबुवांना सोपे नव्हते. विशेषतः १९३४ सालच्या सुमारास गांधीजींनी अस्पृश्योद्धाराची चळवळ चालविणे हेच आपले एकमेव कार्य ठरविले. गांधीजींचा हृदयपरिवर्तनावरच खरा भर. म्हणून अस्पृश्योद्धाराला विशेषतः मंदिरप्रवेशाला हिंदू धर्मशास्त्रांचा आधार मिळवून जुन्या शास्त्रीपंडितांचीही मते मिळवावी असा गांधीजींनी विचार केला. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्याकडे हे आधार मिळवून देण्याचे, जुन्या शास्त्री-पंडितांशी पूर्वपक्ष व उत्तरपक्ष करण्याचे कार्य गांधीजींनी सोपवून दिले. जीवनातील अत्यंत वैभवाचा काळ जर कोणता असेल तर तो हाच होय. त्यांच्या शिरावर गांधीजींचे छत्र होते; सर्वसाधारण जनतेचा त्यांच्या चळवळीला पाठिंबा होता. पंडितांचे ज्यामुळे रक्त सळसळून यावे आणि जिभेवर रसवंती नाचावी असे शास्त्राधार काढून दुसऱ्या पंडिताला नामोहरम करण्याचे मनपसंत कार्य त्यांना करावयाचे होते. मग शास्त्रीबुवांचा चेहरा आनंदाने खुलला तर त्यात नवल काय! त्या वेळी येरवडा तुरुंगांतील आम्रवृक्षाखाली गांधीजी एका खाटेवर स्वस्थ पडून एकाग्रतेने ऐकत असता हे वादविवाद होत. शास्त्रीबुवांना येरवडा मंदिर हे मुक्तद्वार असे. केव्हाही आपल्या उघड्या अंगावर शाल लपेटून तरातरा पावले टाकीत आणि आपल्याच विचारांत मग्न असे शास्त्रीबुवा त्या तुरुंगात शिरत. मोठे मोठे काँग्रेसचे पुढारी आणि पुढे गांधीजींचे व्याही झालेले चक्रवर्ती राजगोपालाचारी हेही गांधीजींबरोबर भक्तिभावाने शास्त्रीबुवांचे विवेचन ऐकत बसत. शास्त्रीबुवांनीही आपल्या ज्ञानाची सारी कवाडे खोलून, आपल्या अध्ययनाचा सारा गाभा त्यांच्यापुढे प्रकट करून सर्वांची मने अंकित करून घेतली.

त्याच सुमारास श्री. देवदास गांधी यांचा राजगोपालाचारी यांच्या कन्येशी विवाह झाला. त्या विवाहाचं पौरोहित्यही शास्त्रीबुवांनीच केले. पण त्या महत्त्वाच्या प्रसंगानंतर थोड्याच दिवसांत गांधीजी व शास्त्रीबुवा यांचे मार्ग भिन्न झाले. व्यक्तिशः गांधीजींची व शास्त्रीबुवांची ताटातूट कधीच झाली नाही. पण राजकारणात मात्र गांधीवाद व रॉयवाद यांच्यामध्ये असलेल्या दरीइतके अनुल्लंघनीय असे मतभेद यांच्यामध्ये निर्माण झाले.

रॉयवादाचा स्वीकार करताना शास्त्रीबुवांनी सर्वस्वावर पाणी सोडले एवढे खास. लोकप्रियतेचे व रॉयवादाचे विळयाभोपळयाएवढे सख्य. शास्त्रीबुवांना तोवर सामाजिक

जीवनात जी प्रतिष्ठा होती तीही त्यानंतर राहिली नाही; इतकेच नव्हे, तर त्यांच्या ज्ञानाचेही पुढे चीज होईनासे झाले. पण शास्त्रीबुवा हे रगेल खरे. त्यांनी साऱ्या दुःखांचे, संकटांचे, मानहानीचे आघात हसतमुखाने अंगावर झेलले; पण आपली निष्ठा सोडली नाही. त्या निष्ठेचा त्यांना एक फायदा झाला; आणि तो हा की, त्यांच्या मनातील परंपरागत विचारांची व आचारांची सारी जळमटे निघून गेली, त्यांच्या विचारांना प्रगल्भता आली, त्यांच्या प्रज्ञेला धार चढली आणि आज एक सर्वश्रेष्ठ विचारवंत म्हणून शास्त्रीबुवा समाजापुढे आले आहेत.

शास्त्रीबुवांची खरी कामगिरी कोणती असेल तर समाजाच्या विचारांना दिशा देणे एवढेच नव्हे, तर धक्का देणे ही होय. त्यांचे मन स्वार्थापासून जितके अलिप्त आहे, तितकीच त्यांची वृत्ती जातिनिरपेक्ष आणि धर्मनिरपेक्ष आहे. त्यांच्या स्वभावात जितकी सात्त्विकता आहे तितकाच त्यांच्या अंतःकरणात बंडखोरपणा भरलेला आहे. आणि आचाराने ते जितके पवित्र आहेत, पापभिरू आहेत, तितकाच उदारपणा दुसऱ्याचे पाप पोटात घालून त्याच्या गुणांचे चीज करण्याइतका त्यांच्या अंगी आहे. म्हणूनच ४२ च्या क्रांतीचा डोंब पेटला असताना आणि "या क्रांतीचे प्रेत येथे पडले आहे" असे जळजळीत लेख लिहून त्या क्रांतीला प्रत्यक्ष विरोध करीत असतानाही खुद्द सातारा जिल्ह्यातही शास्त्रीबुवांना कधी कोणी मज्जाव केला नाही. शास्त्रीबुवा हे धार्मिक ब्राह्मण. पण ब्राह्मणेतरांना त्यांच्याइतका दुसरा आधार कोणाचाच वाटत नाही. आज ना उद्या सत्यशोधक चळवळीवर, ब्राह्मणेतरांच्या चळवळीवर व जोतिबा फुले यांच्यावर शास्त्रीबुवांचे समग्र लिखाण बाहेर पडले, तर उभा मराठा त्यांना डोक्यावर घेऊन नाचेल आणि म्हणेल, "आम्ही भिक्षुकशाहीच्या विरुद्ध आहो; ब्राह्मणांच्या नव्हे."

सुदैवाने शास्त्रीबुवा आज राजकीय चळवळीतून बाहेर पडलेले आहेत. त्यांच्या विविधरंगी जीवनातील एक नवा टप्पा आता सुरू झाला आहे. गांधीवादाचा त्याग केल्यानंतर रॉयवादाच्या निशाणाखाली श्रमजीवी जनतेची संघटना उभारून, त्या जनतेला सत्ता काबीज करावयाला प्रवृत्त करणे हे त्यांनी आपले कार्य ठरविले होते. त्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या रॅडिकल पक्षाचे ते एक अध्वर्यु झाले होते. युद्धकाळात आणि त्यानंतर काही वर्षे त्यांनी या पक्षाचे कार्य हिरिरीने केले. पण अखेरीस रॉय यांच्याप्रमाणेच त्यांनाही कळून आले, की हा सत्तासंपादनांचा लढा जनतेला हितप्रद होत नाही आणि स्वतःच्याही उन्नतीचे कार्य करू शकत नाही. उलट मूठभर पुढाऱ्यांच्या किंवा एखाद्या अल्पसंख्य पक्षाच्या हाती सर्व सत्ता केंद्रित करून, गुलामगिरीच्या बेड्या अधिक घट्ट करण्यासाठीच या सत्तेच्या राजकारणाचा उपयोग होतो. म्हणून रॅडिकल पक्षाच्या विसर्जनाला इतरांप्रमाणेच शास्त्रीबुवांनी मान्यता दिली आणि तेव्हापासून कोणत्याही पक्षाचे वा गटाचे बंधन न ठेवता, स्वतंत्र प्रज्ञेने लोकशिक्षणाचे, लोकांमध्ये स्वत्त्वाची जाणीव निर्माण करण्याचे, त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करून स्वतःच्या भवितव्याचे मार्ग शोधून काढण्याची पात्रता उत्पन्न करण्याचे कार्य शास्त्रीबुवा करीत आहेत.

शास्त्रीबुवांनी जे कार्य आधीच हाती घ्यावयाला पाहिजे होते ते हे कार्य. पण राजकारणाच्या धुमश्चक्रीत पडल्यामुळे शास्त्रीबुवांचे या कार्याकडे दुर्लक्ष झाले होते. अर्थात राजकारणात कार्य करतानाही त्यांनी आपला व्यासंग कधी सोडला नव्हता. खरोखर कौतुकाची गोष्ट ही आहे, की दैनंदिन कार्याचा व्याप मागे लागला असतानाही शास्त्रीबुवांनी मौलिक विचारांचे लेणे समाजाला दिले. शास्त्रीबुवांनी जे काही लिहिले आहे, त्यात वाक्यावाक्यागणिक विचारसंपत्ती उधळलेली आपल्याला दिसून येईल. शास्त्रीबुवांच्या थोरवीची मला खरी कल्पना एके दिवशी मारवाडी विद्यालयाच्या दिवाणखान्यात झालेल्या एका सभेच्या वेळी आली. या सभेत श्रीयुत एम. एन. रॉय यांनी शास्त्रीबुवांच्या 'हिंदुधर्माची समीक्षा' या पुस्तकाचा गौरवपर उल्लेख करून म्हटले, "हे पुस्तक मी वाचले तेव्हा मला असे वाटले, की ज्या व्यक्तीने लिहिले तिला वंदन करून त्याची पदधुली आपल्या शिरावर ठेवावी. पंडित लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी कपिलकणादांची परंपरा सार्थ केली आहे."

शास्त्रीबुवांनी 'जडवादा'वरही तितकेच मौल्यवान पुस्तक लिहिलेले आहे. हे पुस्तक महापंडित राहुल सांकृत्यायन यांच्या हाती जेव्हा गेले तेव्हा ते उद्गारले, की "हे पुस्तक आधी माझ्या हाती पडते, तर मी या विषयावर लिहिण्याचे धाडस केले नसते." महापंडित राहुलजी यांचा त्यानंतर शास्त्रीबुवांच्यावर इतका लोभ जडला, की भारताच्या राज्यघटनेचे संस्कृत भाषेत भाषांतर करावयाची वेळ आली तेव्हा त्यांनी तत्काळ शास्त्रीबुवांचे नाव त्या कामासाठी सुचविले.

शास्त्रीबुवा प्रत्यक्ष राजकारणातून निवृत्त झाल्यामुळे त्यांच्यापुढे आता अशी नवीन नवीन दालने खुली होतील आणि मग त्यांच्या विद्वत्तेचे तेज नव्या दीप्तीने चमकलेले दिसून येईल. पण शास्त्रीबुवा व्यक्तिगत जीवनावर किंवा त्यांच्या वागणुकीवर या मान्य मान्यतेच्या किंवा विद्वज्जनांच्या स्तुतीचा अणुमात्रादी परिणाम होणार नाही. (शास्त्रीबुवांच्यापाशी त्यांच्या विद्वत्तेपेक्षा आणि विचारसंपदेपेक्षाही अधिक लोभस अशी कोणती गोष्ट असेल तर ते त्यांचे व्यक्तित्व. इतका थोर आणि इतका निरहंकारी, इतका विद्वान आणि इतका खिलाडू वृत्तीचा, इतका पाखंडी आणि इतका पापभिरू आणि एखाद्या लहान मुलासारखा निरागस असा माणूस सापडणे विरळाच.) शास्त्रीबुवांच्या जवळ ज्ञानाचे भांडार भरलेले आहे; पण त्यांची वृत्ती विद्यार्थ्याची. नवीन विचार ऐकून घ्यावयाला ते नेहमी उत्सुक असतात. कोणीही काही दटावून सांगितले, की त्यांना मनातून त्याचे म्हणणे पटो किंवा न पटो, त्याच्याकडे मान डुलवतील; आणि एखाद्याने नावीन्यपूर्ण विचार प्रकट केले, अभिजात रसिकता प्रकट केली की शास्त्रीबुवांचा आनंद गगनात मावेनासा होतो! मग ते आपला सारा मोठेपणा विसरून जातील आणि भक्तिभावाने आपलं हृदय त्याला अर्पण करतील.

शास्त्रीबुवा हे जसे गुरू आहेत तसे गुरुपूजकही आहेत. त्यांच्या संस्कारक्षम मनावर निरनिराळ्या श्रेष्ठ विभूतींनी निरनिराळ्या वेळी मोहिनी घातली. त्या मोहिनीने मुग्ध होऊन

शास्त्रीबुवांनी त्या त्या वेळी त्या विभूतींच्या पावलावर पाऊलही टाकले. पुढे त्याचे मन परिणत झाले तेव्हा या विभूती व त्यांचे मार्ग भिन्न झाले. पण मार्ग भिन्न होऊनही शास्त्रीबुवांच्या हृदयातील जिव्हाळा मात्र आटला नाही. गांधीजींशी त्यांची फारकत झाली आणि दोन टोकांना ते दोघे उभे राहिले. पण १९४८ साली ३० जानेवारीच्या त्या भीषण दिवशी जेव्हा गांधीजींच्या खुनाची वार्ता त्यांनी ऐकली, त्या वेळी मनावरील ताबाच जणू नाहीसा होऊन शास्त्रीबुवा एखाद्या अर्भकाप्रमाणे रडले. ते अश्रू एका कर्तव्यकठोर कार्यकर्त्याच्या डोळ्यांतून बाहेर पडले होते, हे लक्षात ठेवण्यासारखे आहे. राजकारणापेक्षा, राजकीय पक्षाच्या निष्ठेपेक्षा मानवता ही श्रेष्ठ आहे. हृदयातील जिव्हाळा राजकीय मतभेदांनीही नाहीसा होऊ शकत नाही, हे त्या अश्रुंनी हृदयद्रावकपणे जाहीर केले. आणि आश्चर्य असे, की तेव्हापासूनच शास्त्रीबुवांच्या राजकीय व सामाजिक जीवनातील एक नवे प्रकरण सुरू झाले.

शास्त्रीबुवांना कोणी विचारले, की पुढे काय? तर ते स्वतः प्रांजलपणे म्हणतील, "मला तरी कोठे माहीत आहे?" मागील अनुभवांची शिदोरी घेऊन ते पुढे पाऊल टाकीत आहेत. पण या नव्या जीवनात आता सत्ताभिलाषा राहणार नाही, कोणत्याही पक्षाच्या लादलेल्या शिस्तीच्या बंधनांतून त्यांना वाट काढावी लागणार नाही. आता शास्त्रीबुवा खरेखुरे मुक्त झाले आहेत. पण त्यामुळेच त्यांच्या कर्तृत्वाला अधिक वाव मिळेल.

त्यांचे विचार मोकळेपणाने जगासमोर येतील. शास्त्रीबुवांना खुशाल बोलू द्या. त्यांच्या रसिकतेचा विलास अनिर्बंधपणे प्रकट होऊ द्या. चारदोन सवंगड्यांसमवेत ते जितक्या खुल्या दिलाने बोलतात, चर्चा करतात, जीवनातील आनंदाचा आस्वाद घेतात, तशाच प्रकारे त्यांना समाजात वागू द्या. म्हणजे पाहा कशी विचारमौक्तिके ते उधळतील, गद्यकाव्याचे अलंकार मराठी वाङ्मयावर चढवतील, तत्त्वचर्चेला उच्च अधिष्ठान प्राप्त करून देतील; आणि रसिकवृंदांना डोलविणाऱ्या ललित कथांचा पारिजातकाच्या फुलांप्रमाणे नुसता सडा शिंपडतील! शास्त्रीबुवा पंडित आहेत, तत्त्वज्ञ आहेत तसेच रसिक आहेत. आणि त्यांचे वैशिष्ट्य हेच आहे, की जीवन हे शिकविण्यासाठी आहे, कर्तव्य करण्यासाठी आहे, तसेच आनंद उपभोगण्यासाठीही आहे. आणि हाच संदेश- त्याप्रमाणे प्रत्यक्ष जीवन कंठून- ते जगाला देऊ पाहात आहेत.

**(मनोहर मासिक, मे, १९५१, पृ. १४९ ते १५६)**

ooo

## ७.

# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

## मा. पं. मंगुडकर

दिल्लीस भरत असलेल्या यंदाच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या अध्यक्षपदी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची निवड करून महाराष्ट्राने आपली गुणग्राहकता व्यक्त केली आहे. तर्कतीर्थ जोशी हे व्यासंगी पंडित म्हणून महशूर आहेत. साहित्यशास्त्रासंबंधी त्यांचे विचार त्यांच्या अध्यक्षीय भाषणात खात्रीने व्यक्त होतील. या पूर्वी साहित्य परिषदेची छत्तीस संमेलने होऊन तितकीच अध्यक्षीय भाषणे झाली असतील, परंतु साहित्य परिषदेच्या व्यासपीठावरून झालेल्या भाषणांमधून साहित्यशास्त्राची मूलभूत चर्चा करणारी व्याख्याने किती झाली, याचा वर आपण विचार केला तर ती संख्या एका हाताच्या बोटावर मोजण्याइतपतच भरेल असे वाटते. श्री. न. चिं. केळकर, श्री. अ. ब. कोल्हटकर, श्री. वा. म. जोशी, ज्ञानकोशकार केतकर यांनी आपल्या भाषणांतून साहित्याविषयी मूल्यांची वा सिद्धांतांची चर्चा करून मराठी सारस्वत संपन्न करण्यास मदत केली आहे. याच थोर अध्यक्षांची परंपरा सांभाळून यंदा शास्त्रीबुवा साहित्यावरील आपले मौलिक विचार व्यक्त करतील अशी अपेक्षा आहे. शास्त्रीबुवांचा वैचारिक पिंड केवळ कथा कादंबऱ्यांवर पोसलेला नाही; त्यांनी अनेक समाजशास्त्रांचा सखोल अभ्यास केलेला आहे. जीवनाकडे पाहण्याची त्यांची दृष्टी व्यापक आहे. जीवनाचे सम्यक ज्ञान आणि सम्यक दर्शन घडविण्याचे सामर्थ्य त्यांच्या प्रज्ञेमध्ये आलेले आहे. यामुळेच दिल्ली येथील साहित्य परिषदेपुढे होणाऱ्या त्यांच्या अध्यक्षीय भाषणात साहित्य शास्त्रासंबंधी उद्बोधक चर्चा होईल अशी आशा आहे.

### तेजस्वी बाणा

शास्त्रीबुवांनी कै. आगरकरांची बुद्धिप्रामाण्यवादी परंपरा मोठ्या धैर्याने महाराष्ट्रात पुढे चालविली आहे. इ. स. १९२० साली त्यांच्या सार्वजनिक जीवनास प्रारंभ झाला असे म्हणता येईल. प्रथम एक कडवे धर्मसुधारक म्हणून ते प्रसिद्धीस आले. या काळात त्यांनी हिंदू धर्मातील रूढ कल्पना व समजुतींची समीक्षा करून त्यातील दोष व विकृती लोकांसमोर

मांडली. मिश्रविवाह, अस्पृश्यता निवारण, हरिजन मंदिरप्रवेश, पुरोगामी विचारांना शास्त्रांचा पाठिंबा असल्याची ग्वाही दिली. देवदास गांधी व लक्ष्मीदेवी यांचा त्यांनी लावलेला मिश्र विवाह प्रसिद्ध आहे. महात्मा गांधींचे कनिष्ठ चिरंजीव देवदास व चक्रवर्ती राजगोपालाचारी यांची कन्या लक्ष्मीदेवी यांचा लग्नविधी पुण्यास १६-६-१९३३ ला होणार होता. म. गांधींवर या प्रतिलोम विवाहाबद्दल सर्व सनातनी मंडळी त्या वेळी खवळून उठली होती. जुने ब्राह्मण लग्न लावण्यास तयार नव्हते; त्या वेळी या लग्नाचे पौरोहित्य करण्यास वाईचे हे पुरोगामी पुरोहित पुढे आले. त्या वेळी पुण्यास तुळशीदास बागेतील सभामंडपात आहिताग्नि राजवाडे यांच्या अध्यक्षतेखाली सभा भरून त्यांनी या लग्नाचा, पर्यायाने लग्न लावणाऱ्या पुरोहिताचा निषेध केला होता. त्यात त्यांनी म्हटले होते, 'वैश्यपुत्र व ब्राह्मण कन्या यांचे होणारे हे लग्न सर्वतोपरी धर्मशास्त्र व शिष्ट परंपरा यांविरुद्ध असून वर्णसंकरकारक व जातिधर्मविध्वंसक असल्याने त्याज्य व निषिद्ध आहे.' परंतु धर्मशास्त्रांचा अभ्यास केलेल्या तर्कतीर्थांनी हा मिश्रविवाह धर्मसंमत असल्याचे निक्षून सांगितले.

## अदम्य आत्मविश्वास

मिश्रविवाहाप्रमाणे अस्पृश्यता-निवारणाला धर्मशास्त्रांतील पुरावे देऊन म. गांधींच्या अस्पृश्यता निवारणाच्या मोहिमेस त्यांनी खंबीर पाठिंबा दिला. १९३३ च्या जानेवारीमध्ये पुण्यास महात्मा गांधी व वर्णाश्रम स्वराज्यसंघाचे प्रतिनिधी पंडित राजेश्वरशास्त्री यांच्यामध्ये या मुद्द्यावर चर्चा चालू होती. त्या वेळी पंडित मालवीय व महात्मा गांधी यांच्या वतीने तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे सनातनी पंडितांशी शास्त्रार्थ करण्यासाठी पुढे आले होते. त्या नंतर १९३५ साली श्री शंकराचार्य हे वाईस गेले असता तेथेदेखील शास्त्रीबुवांची पाखंडी मते त्यांना ऐकावी लागली. विविध मतांबद्दल संतापून वाईच्या सभेत श्री शंकराचार्यांनी त्यांना शाप दिलाः 'पुढच्या जन्मी तुम्ही नरकात जाल.' शास्त्रीबुवांना ही शापवाणी कळल्यानंतर तितक्याच अभिनिवेशात ते म्हणाले, "मी नरकात जाणे पसंत करीन. तेथे जाऊन त्या नरकाचा मी स्वर्ग बनवीन. माझ्या कर्तृत्वाला तेथे मोठे क्षेत्र आहे. स्वर्गात सर्वच सुंदर. तेथे माझे सामर्थ्य गंजून जाईल."

## रॅडिकल पक्षाची स्थापना

अस्पृश्यांना शेकडो वर्षे सामाजिक गुलामगिरीमध्ये ठेवणाऱ्या मनुस्मृतीची डॉ. आंबेडकरांनी मुंबईला चौपाटीवर जाहीर होळी केली. सनातनी मंडळींनी शास्त्रीबुवांकडे येऊन त्यांचे मत विचारले. तर्कतीर्थ जोशी त्या वेळी म्हणाले, "डॉ. आंबेडकरांनी मनुस्मृती जाळली यांत काही वावगे केले नाही. खुद्द मनूला जरी त्यांनी आज जाळले असते तरी मला आश्चर्य वाटले नसते!"

इ. स. १९३५ पर्यंत शास्त्रीबुवांनी आपल्या सुधारकी विचारांनी महाराष्ट्रातील समाजसुधारणेच्या कार्यास जी मदत केली, ती बहुमोल होती.

इ. स. १९३६ साली पुण्यास कै. मानवेंद्रनाथ रॉय यांच्याशी त्यांची गाठ पडली आणि तेथून त्यांच्या विचारांना नवी दिशा प्राप्त झाली. इ. स. १९३६ ते १९४८ पर्यंतच्या काळात त्यांनी पूर्वीची धर्मसुधारकाची भूमिका टाकून देऊन साम्यवादी विचारांची दीक्षा घेतली. इ. स. १९४० साली नागपूर विद्यापीठापुढे झालेल्या त्यांच्या 'हिंदुधर्माची समीक्षा'वरील व्याख्यानांत त्यांनी हिंदुधर्मावर याच दृष्टिकोनातून तीव्र हल्ला चढविला होता. 'जडवाद' या पुस्तकात त्यांनी भौतिकवादाचे शास्त्रशुद्ध मंडन केले आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या लक्षणेसंबंधी काँग्रेसबरोबर त्यांचे मतभेद झाले. कॉ. रॉय यांच्याबरोबर ते काँग्रेसमधून बाहेर पडले व त्यांच्याबरोबर रॅडिकल डेमोक्रॅटिक पक्ष स्थापन करण्यात पुढाकार घेतला. १९४२ ऑगस्ट चळवळीला त्यांनी बेडरपणे कसून विरोध केला!!!

## वैचारिक प्रवासाचे टप्पे

इ. स. १९४८ नंतर त्यांचे स्नेही कॉ. रॉय यांच्याबरोबरच साम्यवादी विचारांतील अपुरेपणा त्यांना जाणवू लागला. साम्यवाद व्यक्तिस्वातंत्र्याशी विसंवादी आहे. त्यामुळे चिरंतन मानवी मूल्यांची जोपासना होणार नाही, असे त्यांचे मत बनले. शिवाय वर्ग-विग्रहाप्रमाणे लावलेला मानवी इतिहासाचा अन्वयार्थही त्यांना एकांगी वाटू लागला. साम्यवादी इतिहासाच्या तत्त्वज्ञानात भौतिक परिस्थितीला- उत्पादनाच्या साधनांना- अवास्तव महत्त्व देऊन मानवी विचार आणि कर्तृत्व यांना गौण स्थान दिले आहे, असे त्यांना वाटू लागले. मानव हा आपल्या भवितव्याचा शिल्पकार असतो यावर त्यांची अढळ निष्ठा आहे. 'मानव हा सर्व मूल्यांचा मानदंड आहे' यावर त्यांचा अचल विश्वास आहे. सूर्यमालेमधील सूर्याप्रमाणे मनुष्य हाच सर्व समाजसंस्थांच्या मध्यवर्ती असावा, हे त्यांचे आवडते मत आहे. त्यामुळेच त्यांनी १९४८ च्या कलकत्त्याच्या रॅडिकल डेमोक्रॅटिक पक्षाच्या अधिवेशनात साम्यवाद टाकून नवमानवतावादाचा स्वीकार केला. तर्कतीर्थ जोशी हेच त्या अखिल भारतीय परिषदेचे अध्यक्ष होते. तेव्हापासून या नव्या तत्त्वज्ञानाचा प्रचार ते काँग्रेसच्या व्यासपीठावरून करीत आहेत. एक कडवे धर्मसुधारक, पाखंडी नास्तिक, साम्यवादी व नंतर नवमानवतावादी असे शास्त्रीबुवांच्या वैचारिक प्रवासाचे टप्पे आहेत.

## मानवतावादी मानदंडांचा वापर

बुद्धिप्रामाण्यवाद, व्यक्तिस्वातंत्र्य व शास्त्रीय मानवतावाद या तीन थोर मूल्यांचा त्यांनी महाराष्ट्रात गेली काही वर्षे प्रचार केला आहे. आज आपल्या देशात शास्त्रे आलेली आहेत; परंतु शास्त्रीय दृष्टी आलेली नाही. येथे मध्ययुग आणि आधुनिक युग यांचे चमत्कारिक मिश्रण झाले आहे. यातूनच उद्याच्या भारताचे नवजीवन निर्माण करावयाचे आहे. या चळवळीस शास्त्रीबुवांसारखे पौरस्त्य आणि पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचे अभ्यासू साहाय्यभूत होणार आहेत. 'वैदिक संस्कृतीचा विकास' हा त्यांचा ग्रंथही १९५१ मध्ये प्रसिद्ध झाला. या दृष्टीने तो मोलाचा आहे. यात त्यांनी १९४० मधील धर्मसमीक्षेची साम्यवादी दृष्टी टाकून मानवतावादी

मानदंड वापरला आहे. जुना भूतकाळ सर्वस्वी टाकून आपणांस भविष्यकाळ निर्माण करता येणार नाही, तर भूतकाळातील पुरोगामी विचारधारा लक्षात घेऊनच आपणांस पुढचा प्रवास केला पाहिजे, असे त्यांचे मत बनले आहे. या दृष्टीने हा ग्रंथ उपयुक्त ठरेल. शास्त्रीबुवांचा आतापर्यंत येथील पुरोगामी चळवळींना उपयोग झाला त्याहीपेक्षा त्यांचा अधिक उपयोग भविष्यकालीन प्रबोधनाच्या चळवळीस होणार आहे. निदान मी त्यांच्याकडे या दृष्टीने पाहात आहे.

## अभिनंदन व सदिच्छा

दिल्लीच्या या साहित्य संमेलनात 'संयुक्त महाराष्ट्रा'सारखा राजकीय प्रश्न चर्चिला जाऊन तेथील वातावरण तप्त होणार की काय म्हणून अनेकांची मने शंकाकूल झाली होती. परंतु साहित्याच्या व्यासपीठावरून हा प्रश्न हाताळला जाणार नाही, असे जाहीर आश्वासन त्यांनी दिल्यामुळे अनेकांना समाधान वाटत आहे. सवंग लोकप्रियतेला बळी न पडता साहित्य क्षेत्राचे पावित्र्य ते राखीत आहेत, याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो.

त्यांच्या अध्यक्षीय भाषणाकडे अनेकांचे लक्ष लागले आहे. त्यांच्या अध्यक्षतेखाली साजरे होणारे हे संमेलन पूर्ण यशस्वी होवो, हीच सदिच्छा!

**(साप्ताहिक साधना, शनिवार, दि. २ ऑक्टोबर, १९५४, पृ. ६)**

ooo

# ८.
# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी
## प्रा. गोवर्धन पारीख

दिल्ली येथे भरणाऱ्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी झालेली तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची निवड योग्य व अर्थपूर्ण वाटते. काहींच्या मताने ही निवड अपेक्षितच होती. तर्कतीर्थांशी तुलना संभवेल असा दुसरा कोणीही निवडणुकीच्या क्षेत्रात नसल्यामुळे तर्कतीर्थांची निवड होणे क्रमप्राप्तच होते, असेही काहींनी सूचित केले आहे. ही विधाने बरोबर असोत वा नसोत, या निवडणुकीच्या अर्थपूर्णतेला त्यांच्या योगाने मुळीच बाधा येत नाही.

### ज्ञानाच्या क्षेत्रातील वादातीत अधिकार

तर्कतीर्थांचा महाराष्ट्राला वा मराठी भाषकांना परिचय करून देण्याची गरज आहे, असे नाही. ज्ञानाच्या क्षेत्रातील त्यांची योग्यता सर्वांच्या परिचयाची आहे. तीस-चाळीस वर्षांच्या सतत तपश्चर्येचे ते फळ आहे. प्राचीन संस्कृत विद्या आणि आधुनिक पाश्चात्त्य ज्ञानविज्ञान यांचा उत्कृष्ट समन्वय त्यांच्या ठिकाणी झाला आहे. यामुळे त्यांच्या अधिकाराला एक प्रकारचे वैशिष्ट्य प्राप्त झाले आहे. जुन्याची तपासणी करून त्याचे पुनःमूल्यमापन करणे आणि नव्याची परीक्षा करून त्यातील गुणग्राह्य ठरविणे, या दोन्ही कार्यांना आवश्यक असलेला असा तो अधिकार आहे. आणि पंचवीस-तीस वर्षांच्या विविध सामाजिक व राजकीय आंदोलनांतील प्रत्यक्ष अनुभवांनी तो अधिकच संपन्न झाला आहे. त्यामुळे नव्या-जुन्या विचारांच्या मंथनांतून काढलेले निष्कर्ष प्रत्यक्ष अनुभवाच्या कसोटीवर तपासून पाहण्याचे सामर्थ्यही त्यात आहे. 'जुने' व 'नवे' ज्ञान आणि ज्ञान व अनुभव असा हा दुहेरी संगम क्वचितच पाहावयास आढळतो. आणि तो तर्कतीर्थांच्या ठिकाणी झाला असल्याकारणाने त्यांचा ज्ञानाच्या क्षेत्रातील अधिकार वैशिष्ट्यपूर्ण बनला आहे. हे वैशिष्ट्य सर्वांना संमत असलेले आणि वादातीत स्वरूपाचेच आहे, असे म्हणावयास हरकत नाही.

## संवादी-जीवनाच्या गरजेची जाणीव

या वैशिष्ट्याचीच आणखीही एक बाजू स्पष्ट करण्यास हरकत नाही. तर्कतीर्थांचे अध्ययन ज्याप्रमाणे प्राचीन संस्कृत विद्येपुरतेच मर्यादित राहिले नाही, त्याचप्रमाणे विशिष्ट ज्ञानशाखेपुरतेही ते मर्यादित नाही. संस्कृत विद्येच्या अध्ययनाचे फलित म्हणून 'धर्मकोशा'कडे बोट दाखवता येते, परंतु 'धर्मकोश'देखील केवळ संस्कृत अध्ययनाचा परिपाक नाही असे जाणत्या लोकांचे मत आहे. विशिष्ट क्षेत्रात त्यांनी मिळविलेल्या तज्ज्ञतेत विविध क्षेत्रांतील अवलोकनाचे व अध्ययनाचे अंशही आहेतच. मराठी-भाषकांस त्यांच्या या प्रदीर्घ तपश्चर्येची जी थोडीबहुत फळे आज उपलब्ध झाली आहेत, ती पाहिली तरी याच विधानाला पुष्टी मिळाल्यावाचून राहात नाही. धर्म, संस्कृती, तर्कशास्त्र, मार्क्सवाद, तत्त्वज्ञान, सामाजिक आंदोलने व त्यांचा इतिहास, राज्यशास्त्र, साहित्यशास्त्र इत्यादी विविध क्षेत्रांतील दीर्घ व्यासंगांचा व मूलगामी विचारपद्धतीचा प्रत्यय त्यांच्या अवलोकनाने आल्यावाचून राहात नाही. आधुनिक काळातील व विशेषतः गेल्या शंभर-सव्वाशे वर्षांतील ज्ञानाच्या वाढीमुळे श्रमविभागाचे तत्त्व ज्ञानक्षेत्रातही शिरले आहे आणि विशिष्ट मर्यादित क्षेत्रातील व्यासंगामुळे अधिकार प्राप्त झालेली व्यक्ती अशी 'पंडित' वा 'विद्वान' शब्दाची आमची व्याख्या बनली आहे. ज्ञानवाढीमुळे ज्ञानोपासकाला आपले उपासनेचे क्षेत्र अधिकाधिक मर्यादित करावे लागत आहे आणि ते मर्यादित केल्यामुळे ज्ञानाची आणखी झपाट्याने वाढही होत आहे. ही परिस्थिती एका अर्थी इष्ट व आवश्यक आहे यात मुळीच संशय नाही. पण ती सर्वथैव इष्ट मानावयाची की नाही याबद्दल शंका आहे. किंबहुना जीवनाचे विविध प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने ती बहुतांशी निरुपयोगीच आहे, असा निष्कर्ष आता निघू लागला आहे. एकमेकांपासून अलग व स्वतंत्र राहणाऱ्या क्षेत्रांत विकास पावणाऱ्या ज्ञानाचे मार्गदर्शकत्व स्वीकारणारे समाजजीवन हे प्रवाहपतितासारखेच बनणे अपरिहार्य आहे आणि त्याच्या दुष्परिणामांचा आज पुरेपूर प्रत्यय येऊ लागला आहे. विज्ञानयुग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या काळातदेखील भावनांचा उद्वेग हेच जीवनाचे प्रश्न सोडविण्याचे प्रमुख साधन समजले जात आहे. तात्पर्य, विशिष्ट ज्ञानक्षेत्रांतील प्रावीण्याबरोबरच विविध क्षेत्रांच्या समन्वयाकडे, विश्लेषणाकडून संकलनाकडे वळणे ही आजची एक प्राथमिक गरज आहे. आणि अशा प्रकारचे संकलन (Synthesis) दुराग्रही स्वरूपाचं होऊ नये, यासाठी ते सदैव 'खुले' ठेवणे ही मूलभूत जबाबदारी आहे. त्यावाचून आजच्या कलहांनी भरलेल्या परिस्थितीतून नव्या संवादी जीवनाची उभारणी होणे अशक्य आहे. तर्कतीर्थांच्या अध्ययनात ही जाणीव प्रकट झाल्याचे दिसते.

## आक्षेपाचा फोलपणा

तर्कतीर्थांचे हे वैशिष्ट्य अनेकांना मान्य आहे. तथापि तसे असूनही, 'तर्कतीर्थांची सगळी कामगिरी साहित्येतर क्षेत्रातील आहे, साहित्यातील नव्हे, ललित साहित्य त्यांनी

लिहिलेले नाही', हा त्यांच्यासंबंधी काहींचा 'आक्षेप' आहे. यामुळेच साहित्य संमेलनाच्या अध्यक्षस्थानी तर्कतीर्थ शोभत नाहीत, एखाद्या पंडितसभेत वा राजकीय परिषदेत ते शोभून दिसतील, असा एक सूर या पूर्वीच निघाला होता. आणि अजूनही त्याचे पडसाद अधूनमधून कानी येतात. ललित व ललितेतर साहित्य यांजमधील भेदांतून हा दृष्टिकोन निघाला आहे. प्रस्तुत भेद व तत्संबंधीचे वाद यांत पडण्याचे कारण नाही. माझा तो अधिकारही नाही. शिवाय तर्कतीर्थांनी ललित साहित्य लिहिलेले नाही हे अगदी स्पष्ट आहे. तथापि केवळ तेवढ्यावरून वरील दृष्टिकोनाचे समर्थन होऊ शकेल असे वाटत नाही. मूर्त कलाकृतीपेक्षा अमूर्त अशा 'साहित्यिकपणा'विषयी निर्माण होऊ लागलेला हा अभिमान सर्जनशीलतेचा माफकपणा (Mediocrity) सूचित करीत नाही काय, अशी शंका क्षणभर आल्यावाचून राहात नाही. तर्कतीर्थ हे उत्तम रसिक आहेत. व्यापक व परिणत स्वरूपाची सौंदर्यदृष्टी त्यांच्याजवळ आहे. साहित्यसमीक्षेच्या क्षेत्रातील त्यांचा अधिकार अत्यंत मोठा आहे. मुंबई, गोमंतक, इंदूर व बडोदे या चारही संमेलनांच्या अध्यक्षपदावरून त्यांनी केल्या भाषणांमध्ये याविषयीचा प्रत्यय येतो. यामुळे वरील आक्षेपाचा फोलपणा अगदी स्पष्ट आहे.

## बौद्धिक निष्ठेबद्दल द्यावी लागलेली किंमत

श्रीस्वामी केवलानंद सरस्वती यांनी निर्माण केलेल्या आत्मनिष्ठेला व सारासार विचाराला प्राधान्य देणाऱ्या उच्च परंपरेत तर्कतीर्थांचे संस्कृत विद्येचे जुन्या पद्धतीने अध्ययन झाले. या परंपरेत लोकशिक्षणाला- अध्यापनालाही महत्त्वाचे स्थान होतेच. पुढे हळूहळू राष्ट्रीय शिक्षणही तिच्यात आले आणि त्यातूनच तर्कतीर्थांचे लक्ष आधुनिक पाश्चात्त्य ज्ञानविज्ञानाकडे वळले. इंग्रजी शिकून त्यांनी पाश्चात्त्य विद्येच्या अध्ययनाला आरंभ केला. शुद्ध ज्ञानोपासना, सामाजिक जबाबदारीची जाणीव आणि आत्मनिष्ठा या तिहींचा मधुर मिलाफ या परंपरेत झालेला होता आणि तर्कतीर्थांचे व्यक्तिमत्त्व हे त्या परंपरेचेच एक उन्नत स्वरूपातील प्रतीक होय. सामाजिक आणि राजकीय आंदोलनांच्या निमित्ताने महात्मा गांधी आणि भाई मानवेंद्रनाथ रॉय या दोन विभूतींशी त्यांचा निकटचा व जिव्हाळ्याचा संबंध आला; आणि त्या योगाने त्यांचे व्यक्तिमत्त्व कितीतरी अधिक संपन्न बनले. सार्वजनिक जीवनातील तर्कतीर्थांचा अनुभवही त्यांच्या अध्ययनाप्रमाणेच वैशिष्ट्यपूर्ण आहे. महात्मा गांधींजवळ त्यांचे अत्यंत मोठेपणाचे व मानाचे स्थान होते हे प्रसिद्ध आहे आणि तेही काँग्रेस अधिकारारूढ होण्याच्या काळात! परंतु आत्मनिष्ठेच्या परंपरेत वाढलेल्या तर्कतीर्थांनी वैचारिक निष्ठेसाठी त्याचा त्याग केला. आणि नुकत्याच तुरुंगातून सुटून आलेल्या मानवेंद्रांजवळ जाऊन ते उभे राहिले. लौकिकदृष्ट्या या दोन युगपुरुषांच्या सामाजिक जीवनातील स्थानांचा विचार केला म्हणजे तर्कतीर्थांच्या या कृतीचे महत्त्व ध्यानात आल्यावाचून राहात नाही. यशाऐवजी निष्ठेला, मोठेपणाऐवजी प्रामाणिकपणाला महत्त्व देणारे ते वर्तन आहे. "अहंते (Ego)चा त्याग हाच खरा त्याग होय. एरव्ही त्यागाचे स्वरूप हे भावी फायद्याकरिता गुंतविण्यात

येणाऱ्या भांडवलासारखेच आहे", असे भाई रॉय यांनी एके ठिकाणी म्हटले आहे. आणि त्यांच्या या विधानाचे यथार्थ उदाहरण म्हणून तर्कतीर्थांकडे बोट दाखविण्यास हरकत नाही. या बौद्धिक निष्ठेबद्दल तर्कतीर्थांना भरपूर किंमत द्यावी लागली आहे. 'रॉयवादी' राजकारणात त्यांनी घालविलेल्या दहा-बारावर्षांच्या काळात त्यांची सुवर्णपरीक्षाच झाली असे म्हणावे लागेल. उपेक्षा, टीका, कुचाळी, निर्भर्त्सना, शेणमार व प्रत्यक्ष लाथाबुक्क्यांचा प्रसाद या सर्व प्रकारच्या दिव्यांतून ते व्यवस्थितपणे पार पडले. आणि द्वेष, कडवटपणा वा अन्य विकृती निर्माण होण्याऐवजी त्यांचे व्यक्तिमत्त्व संपन्न करणारे, गुणांच्या व शीलाच्या संवर्धनास पोषक असे ते एक तपच ठरले आहे.

### पुढारी- नव्हे, मित्र!

अशा प्रकारे ज्ञानाची सतत उपासना केलेले व जीवनाचा व्यापक अनुभव घेतलेले हे गृहस्थ स्वभावाने अत्यंत साधे, प्रेमळ व मऊ गृहस्थ आहेत. त्यांची थोरवी त्यांच्या सान्निध्यात प्रत्यही प्रगट होत असली तरी सहसा भासत नाही. राजकीय व सामाजिक कार्यकर्त्यांना ते 'पुढारी' वाटत नाहीत; 'मित्र' वाटतात. प्रत्येकाची प्रेमाने विचारपूस करणे, सर्वांच्या त्यांनी सांगितलेल्या वा न सांगता ध्यानात आलेल्या अडीअडचणींकडे लक्ष देणे व शक्य ती सर्व मदत त्यांना करणे हा तर्कतीर्थांचा एक स्वभावधर्म आहे. आणि त्याचे पालन कुणाच्या लक्षातही न येता अगदी सहजगत्या घडत असते. प्रेमळपणा वर्तनात दिसतोः त्याचे स्वतंत्र प्रदर्शन होत नाही. सामान्य कार्यकर्त्यांविषयीची तळमळ कृतीने स्पष्ट होते; शब्दांनी सहसा व्यक्त केली जात नाही. आणि या प्रेमाला वा आस्थेला पक्षाची, विचारांची वा अन्य कोणतीही बंधने नाहीत. विकसित स्वरूपाच्या शुद्ध माणुसकीचेच ते आविष्कार आहेत असे वाटते. यामुळेच भिन्न भिन्न पक्षीय वा विचारसरणींच्या कार्यकर्त्यांशी तर्कतीर्थांचे संबंध हे नेहमी मैत्रीचे, खेळीमेळीचे व मोकळेपणाचेच आढळतात. राष्ट्रीय स्वयंसेवक संघापासून साम्यवाद्यांपर्यंत कोणत्याही व्यासपीठावरून आपले विचार ते स्पष्टपणे मांडू शकतात. तथापि वैचारिक क्षेत्रांतील प्रखरता वर्तनातील माणुसकीला बाध आणीत नाही. १९४२ सालच्या आंदोलनात बिनशर्त युद्धसहकार आवश्यक व इष्ट होय असे प्रतिपादन करीत असताना, जुना स्नेह असलेल्या मध्यप्रदेशातील एका भूमिगत काँग्रेस कार्यकर्त्याला बराच काळपर्यंत त्यांनी आश्रय दिला होता, हे मला प्रत्यक्ष माहीत आहे. पक्षनिष्ठ राजकारणात हे वर्तन भोंगळपणाचे वा प्रसंगी पक्षविद्रोहाचेही समजले जाण्याचा संभव आहे. "तुम्ही या बाजूचे की त्या?" याचे स्पष्ट उत्तर मागणारांना अशा प्रकारच्या वर्तनात संधिसाधुपणाचाही वास येईल. पण माणुसकीला मर्यादा घालणारी पक्षनिष्ठा तर्कतीर्थांच्या ठिकाणी मला तरी कधीही आढळली नाही. आणि रॉयवाद्यांतही वरील प्रकारच्या त्यांच्या वर्तनाविषयी कोणी त्यांना कधी काही विचारल्याचेही ऐकिवात नाही. तर्कतीर्थांच्या या स्वभावामुळे ते कोणत्या पक्षात आहे हा प्रश्न गौण ठरतो; आणि त्यांच्या वैचारिक भूमिकेकडेच अधिक लक्ष देणे

युक्त ठरते. त्यांचा स्वभाव बराच भिडस्तही आहे. यामुळे क्वचित प्रसंगी ते अनपेक्षितपणे भिडेस्तव एखादे काम हाती घेताना दिसतातही. तथापि त्यात आवश्यक ती सावधगिरी येतेच. त्यांना योग्य रीतीने ओळखणारांच्या मनात त्यामुळे मुळीच गैरसमज होत नाही, असा अनुभव आहे.

**'हवा कशाला झगडा?'**

या स्वभावामुळे वैयक्तिक कलहापासून ते नेहमी दूर राहतात, असा माझा अनुभव आहे. वैयक्तिक स्वरूपाचे मतभेद आले, दोन माणसे एकमेकांशी स्पर्धा करू लागली किंवा एकमेकांचे दोष काढू लागली की तर्कतीर्थ तेथून निसटलेच. कोणाचीही बाजू घ्यायचे नाहीत इतकेच नव्हे, तर कुठे गेले आहेत याचादेखील लवकर पत्ता लागावयाचा नाही! अशा एका प्रसंगी मी त्यांना "अहो, निघून का गेलात?" म्हणून विचारले असता त्यांनी मला उत्तर दिले, "खरं म्हणजे मला हे फारसं रुचत नाही. मला एखाद्या पक्ष्यासारखं जगणं आवडतं. एकाच ठिकाणी बसण्यासाठी एकमेकांशी भांडणारे दोन पक्षी तुम्ही कधी पाहिलेत का? ते स्वातंत्र्याचे जीवन आहे. तुम्हाला या झाडावर बसायचं असल्यास मी त्या पलीकडच्या झाडावर जाऊन बसेन. हवा कशाला झगडा?'' खासगी वा व्यक्तिगत हेवेदावे, रागद्वेष त्यांच्या ठिकाणी फारसे आढळत नाहीत. याचा अर्थ ते रागावत नाहीत असा मात्र मुळीच नव्हे; किंबहुना त्यांच्यासारखा रागावणारा मनुष्य माझ्या तरी पाहण्यात नाही, असेच मी म्हणेन. संतापले म्हणजे समोर बसलेल्या माणसाला तोंड उघडावयाची सोय तर नसतेच; पण समोर बसण्याचीसुद्धा भीती वाटायची! पण हा राग तर्कदुष्ट विचार, डुक्करडोकी वृत्ती वा हेतुपुरस्सर दुष्ट कृती यांवरच बहुधा असतो. अशा वेळी त्यांना एकटेच सोडून देणे उचित ठरते. एक दोन दिवसांनी पारा पुनः मूळ पातळीवर येतो आणि संबंधित व्यक्तीविषयी सहानुभूती दिसू लागते. अशा वेळी जर का "फारच रागावलात बुवा तुम्ही!" असं कुणी म्हटले तर शांतपणे "अहो, ती एक 'फिट' आहे. मनावर घेऊ नका तुम्ही" असे उत्तर मिळेल.

## चुकांकडे बघण्याची सहानुभूतीची दृष्टी

दुसऱ्यांकडून झालेल्या चुकांबद्दल मात्र ते सहसा रागवत नाहीत. ती सुधारण्याकडे लक्ष असते; आणि त्याबरोबरच तसल्या प्रकारची चूक पुनः होणार नाही याविषयी काळजी घेतली जाते. एकदा मी वाईत असताना धर्मकोश कार्यालयात कुणाची तरी चूक झाली होती; त्यामुळे सुमारे महिनाभर केलेले काम फुकट जाणार होते. तर्कतीर्थ 'त्या गृहस्थांना हे सांगा' अशा तऱ्हेची सूचना एका सहकाऱ्याला करीत होते. 'तुम्हीच त्यांना सांगावे' असे त्या सहकाऱ्याने सुचविताच ते म्हणाले, "अहो, मी सांगेन. पण त्याचा परिणाम कदाचित योग्य होणार नाही. त्यांना वाईट वाटेल. आणि मी विशिष्ट अधिकारामुळे बोलतो आहे, अशी त्यांची अकारण समजूत होईल. त्या चुकीबद्दल व्हायचे ते श्रम आता होणारच. प्रश्न त्या चुकीचा नसून त्यांच्या ठिकाणी अधिक दक्षता व जबाबदारी निर्माण होण्याचा

आहे. त्यासाठी कुणीतरी त्यांच्याबरोबर काम करणाऱ्या माणसाने सांगायला पाहिजे. काम करताना एखादी शंका आली, प्रश्न पडला तर आपल्या कल्पनेप्रमाणे पुढे न जाता मला विचारावं, दुसऱ्यांचा सल्ला घ्यावा, म्हणजे अशी परिस्थिती निर्माण होणार नाही, एवढं त्यांच्या लक्षात आलं म्हणजे झालं." हा संवाद माझ्यासमोर झाल्यामुळे माझ्या तो चांगलाच ध्यानात राहिला आहे. नंतर त्या चुकीबद्दल मी त्यांना विचारले असता, "ती उत्साहाच्या भरात घडली आहे. माणूस कामाच्या दृष्टीने अतिशय उपयुक्त आहे. त्याच्या उत्साहावर विरजण पडता कामा नये," असे त्यांनी सांगितले. अशा प्रकारच्या चुकीचे इतरत्र काय परिणाम झाले असते, याची कल्पनाच केलेली बरी! ज्याची चूक आपण दाखवणार, त्याच्या मनावर त्याचे काय परिणाम होतील याविषयी दखल घेण्याची ही दृष्टी साध्या चर्चेतसुद्धा आढळते. "तुमचे म्हणणे चुकीचे आहे", असे ते सहसा म्हणावयाचे नाहीत. तो त्यांच्या स्पष्टीकरणावरून निघणारा निष्कर्ष असेल, कदाचित तो ते स्वतःही काढतील, पण अशा पद्धतीने की त्यात बोचक असे काहीही असावयाचे नाही.

## साधे राहणे, साधे खाणे

तर्कतीर्थांची राहणी अगदी साधी व अनौपचारिक स्वरूपाची आहे. जेवणाकडे बहुधा त्यांचे लक्ष नसतेच. पानात विशेष काही असलेच तर गोष्ट निराळी! एरव्ही बहुधा विचारांच्या तंद्रीतच जेवण संपते. वेशही साधाच. मध्यंतरी पाटलोण वापरण्यापर्यंत एकदा मजल गेली होती; नाही असे नाही. पण केवळ एकदोन महिनेच. पुनः पूर्ववत धोतर, लांब 'नेहरू' सदरा व टोपी या मूळपदावर वेशभूषा स्थिरावली आहे. आणि दहापाच घरांच्या एखाद्या खेड्यापासून मुंबईपर्यंत सामान्य शेतकऱ्याच्या झोपडीपासून धनपतींच्या प्रासादापर्यंत, सर्वत्र संचार असल्याने सगळीकडे सोयीचा असाच हा वेश आहे. विशेष महत्त्वाचाच प्रसंग असल्यास सदरा लहान होतो व त्यावर लांब कोट येतो. नियमितपणाच्या सवयी, अत्यंत कमी व साध्या गरजा यांमुळे तर्कतीर्थ पाहुणे म्हणून आले, तर काही विशेष सरबराई केली पाहिजे, असे परिचितांना सहसा वाटत नाही. नाही म्हणायला फळांची मात्र त्यांना विशेष आवड आहे. चांगले कोणतेही फळ चालते आणि प्रवासात असताना एखाद दुसरे बहुधा सदऱ्याच्या खिशातही आढळते.

## विशेष आवडीची वस्तू- पुस्तके

आणखी एक विशेष आवडीची वस्तू म्हणजे पुस्तके! कोणताही नवीन ग्रंथ कुणाजवळ दिसला की परिचय असल्यास त्यासंबंधी प्रश्नांचा भडिमार सुरू होतो. आणि अपरिचिताच्या टेबलावर पाहण्यात आल्यास परिचितांजवळ चौकशी होते. त्यातील विचारांसंबंधी चौकशी केल्यानंतर त्यात नवीन काही तरी सांगितलेले आहे, असे आढळल्यास तो मिळविण्याची धडपड सुरू व्हायची. "तुम्ही विद्यापीठात काम करणारी माणसं किती भाग्यवान आहात. कितीतरी नव्या नव्या गोष्टी तुमच्या नजरेपुढे सतत येत असतात", अशा तऱ्हेचे उद्गार मी

अनेक वेळा ऐकले आहेत. काही वेळा टेबलावरच्या एखाद्या पुस्तकाच्या मागणीची ती प्रस्तावनाही असते. आणि तुम्ही काही कारणाने किंवा सहज "मला ते हवं आहे" असं म्हटलेत की "You are very kind. How are you leave me in such ignorance?" ("आपण फारच दयाळू आहात, मी असं अज्ञानात राहणं आपल्याला कसं आवडेल?") अशा प्रकारचा प्रश्न अशा काही पद्धतीने विचारला जाईल की, तुम्ही मुकाट्याने पुस्तक उचलून त्यांच्या हवाली करावे. ते परत वेळच्या वेळी येतेच. दुसऱ्याकडून नेलेली पुस्तके अत्यंत जपून वापरली जातात, स्वतःची मात्र नव्हे. कारण त्यांच्या बाबतीतही ते दयाळूच आहेत. आणि या दयाळूपणामुळे आपल्या संग्रहातील अनेक महत्त्वाची पुस्तके त्यांनी हरवल्याचे मला माहीत आहे.

## प्रभावी लेखन नि वक्तृत्व

तर्कतीर्थांचे लेखन आणि वक्तृत्व दोन्हीही अत्यंत प्रभावी आहेत, यात संशय नाही. दीर्घकालीन व्यासंगाचे व मननाचे अधिष्ठान दोहोंनाही असल्यामुळे त्यात विचारांना भरपूर खाद्य मिळते. पण दोहोंत एक महत्त्वाचा फरक आहे असे वाटते. लेखनशैली बहुधा पंडिती पद्धतीची, संस्कृत अध्ययनाची छाप पुरेपूर दर्शविणारी, काहीशी क्लिष्ट वाटणारी आहे. कदाचित बहुतेक लेखन शास्त्रीय विषयांवर असल्यामुळेही असे असण्याचा संभव आहे. निरनिराळ्या ज्ञानशाखांत मराठी लेखन अधिकाधिक सुरू झाले म्हणजे आज क्लिष्ट समजल्या जाणाऱ्या गद्याला कदाचित मान्यताही द्यावी लागेल. पण आज तरी भाषेच्या दृष्टीने तर्कतीर्थांच्या लेखनाला 'सामान्य' मराठी वाचक बुजतो असे वाटते. त्यांच्या 'हिंदुधर्माची समीक्षा' या ग्रंथासंबंधी एका गृहस्थाने "ग्रंथ उत्तम आहे; पण तो मराठीत लिहिल्यास फारच चांगले होईल", अशा अर्थाची टीका केल्याचे स्मरते. हे गृहस्थ स्वतः एक उत्तम टीकाकार असून क्लिष्ट लेखनाबद्दल प्रसिद्ध आहेत. म्हणून त्यांच्या टीकेची मला विशेष गंमत वाटली. मात्र तर्कतीर्थांच्या वक्तृत्वाला हे विधान फारसे लागू नाही. कदाचित पंडितसभा गाजवीत राहण्याऐवजी सामाजिक व राजकीय चळवळींच्या निमित्ताने सामान्य जनतेपुढेच बोलण्याचे प्रसंग तर्कतीर्थांना कितीतरी अधिक येतात, त्याचाही हा परिणाम असण्याचा संभव आहे. संस्कृत वचने व्याख्यानात येत नाहीत असे नाही, पण ती कठीण विषय सोपा करून मांडण्याच्या हेतुनेच! व्याख्यानाच्या विषयाचा मथळा कठीण वाटतो; व्याख्यान ऐकल्यानंतर त्याचे आकलन झालेसे वाटून सोपेपणामुळे तो विषय हस्तगत करण्याबद्दलचा आत्मविश्वास निर्माण होतो. विषयदेखील परिचित परिभाषा व नेहमीच्या अनुभवातील उदाहरणे यांच्या साहाय्याने सुलभ केला जातो आणि त्याच्या नावीन्यामुळे वाटणारी भीती नाहीशी होते.

## अर्थपूर्ण निवड

मनुपासून महर्षी अरविंदांपर्यंत आणि प्लेटोपासून मार्क्सपर्यंत मानवी विचारसंपदेच्या

वारशाचा उपभोग घेऊन मानवेंद्रनाथ रॉय यांच्या 'नवमतवादा'च्या भूमिकेवर तर्कतीर्थ आज स्थिर झाले आहेत. त्यांची तपश्चर्या व तिच्या योगाने त्यांना प्राप्त झालेला अधिकार हा मराठी-भाषिकांचा एक महत्त्वाचा ठेवा आहे. साहित्य-संमेलनाच्या निमित्ताने तो अखिल भारतापुढे मांडण्याचा घेण्यात आलेला निर्णय हा औचित्यपूर्णच म्हटला पाहिजे. मराठीचे गाऱ्हाणे वा संयुक्त महाराष्ट्राचे मागणे हे संकुचित राजकीय दृष्टिकोनातून जन्मलेले नसून त्याचे अधिष्ठान व्यापक सांस्कृतिक मूल्यांवर उभारलेले आहे, हे सूचित करणारी ही निवड आहे. आणि याच दृष्टीने ती अर्थपूर्ण आहे. प्रांतिकता वा राष्ट्रीयता मानवी संस्कृतीची व मूल्यांची जोपासना करू शकत नाही; त्या भावनांचा 'बंदिस्तपणा' (Exclusivism) नाहीसा झाला पाहिजे. व्यापक मानवी प्रेम हेच प्रति वा राष्ट्रप्रेमामागील शक्ती म्हणून स्वीकारावयास हवे. आजच्या जगात एकच 'संस्कृती' असू शकते; आणि म्हणून तिच्या विविध आविष्कारांत संवादित्व निर्माण होणे, ही आजची प्राथमिक गरज आहे. ती पुरी करण्याच्या मार्गातील एक अडचण दूर करण्यासाठी 'संयुक्त महाराष्ट्रा'स मान्यता हवी. अशा प्रकारची भाषिक प्रांत-रचनेसंबंधी नवी दृष्टी पुढे मांडणाराची दिल्लीच्या संमेलनासाठी अध्यक्ष म्हणून निवड व्हावी हा महाराष्ट्रातील बुद्धिवादाचाच विजय होय. आज अटकेपार झेंडा नेण्याचे दिवस नाहीत. अटकेजवळ नवी दृष्टी जाण्याची गरज आहे. आणि तर्कतीर्थांच्या मार्गदर्शकत्वातून ती तेथवर पोहोचेल, अशी आशा वाटते.

**(सह्याद्री मासिक, ऑक्टोबर, १९५४, पृ. ४६७ ते ४७०)**

ooo

९.

# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी: एक थोर 'क्रियावान पंडित'

**प्रा. गोवर्धन पारीख**

दिल्लीला यंदा मराठी साहित्यसंमेलन भरविण्यात येणार आहे. दिल्ली केवळ भारताची राजधानीच नव्हे तर आधुनिक भारतीय सांस्कृतिक जीवनाचे छोटेसे पण प्रातिनिधिक केंद्र म्हणूनही दिल्लीचा उल्लेख करता येईल. आमची विविध सांस्कृतिक अंगोपांगे तेथे एकत्र आली आहेत; आणि ती एकजीव होऊन नव्या भारतीय सांस्कृतिक जीवनाची निर्मिती होणे आवश्यक आहे. मराठी भाषिकांची संस्कृतीही त्या जीवनाचाच एक महत्त्वाचा भाग आहे. तो भारताच्या नजरेसमोर यावा, अन्य भाषिकांचा त्याच्याशी परिचय व्हावा, त्याच्या विकासाचा प्रश्न व त्यातून उद्भवणाऱ्या गरजा सर्वांना समजाव्यात, या हेतूनेच ३७ वे मराठी साहित्य संमेलन दिल्लीत भरविण्यात येत आहे असे वाटते. मराठीचे मागणे पुढे मांडताना तिच्या प्रगल्भतेचाही सर्वांना परिचय होणे इष्ट आहे. संयुक्त महाराष्ट्राची आवश्यकता स्पष्ट करताना त्याच्या मुळाशी असलेली भूमिका संकुचित प्रांतिकतेची नसून, ती व्यापक मानवी मूल्यांशी जुळणारी आणि त्यांच्या जोपासनेला अनुकूल अशीच आहे हे स्पष्ट झाले पाहिजे. आमच्या साहित्यविषयक आणि संस्कृतीविषयक दृष्टिकोनाची उंची, व्यापकता, विशुद्धता आणि सहृदयता यांचे दर्शन सर्वांना घडले पाहिजे. या दृष्टीने संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी झालेली तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची निवड योग्य व अर्थपूर्ण वाटते.

शास्त्रीजी माहीत नाहीत, अशी व्यक्ती महाराष्ट्रात सापडणे कठीण! आणि परिचय झाल्यानंतर त्यांच्याविषयी जिव्हाळा न वाटणे हे त्याहूनही कठीण! गेली पंचवीस-तीस वर्षे एक थोर क्रियावान पंडित या नात्याने ते महाराष्ट्रापुढे आहेत. वयाच्या त्रेपन्न वर्षांपैकी चाळीस वर्षे त्यांनी ज्ञानोपासनेत घालवली आहेत. या ज्ञानसाधनेचे विविध पैलू निरनिराळ्या क्षेत्रांतील अधिकारी व्यक्तींच्या परिचयाचे आहेत. त्यांच्या क्रियाशीलतेचा सामाजिक व राजकीय क्षेत्रातील असंख्य कार्यकर्त्यांना अनुभव आहे. महिन्यातील आठ-दहा दिवस कुठेतरी सभा, संमेलन, चर्चा, व्याख्याने, संघटन इत्यादी कार्य करावयाचे; ठरलेल्या काळात

वाईत धर्मकोशाच्या संपादनाची जबाबदारी पार पाडावयाची; आणि त्याबरोबरच विविध ज्ञान-विज्ञान शाखांत नवे काय निर्माण होत आहे, त्याचा अर्थ, परिणाम व महत्त्व किती हे जाणण्याची सतत धडपड सुरू असावयाची. अनेक वर्षांमागे "हे सगळं तुम्हाला कसं काय जमतं हो?" असा मी त्यांना एकदा सहज प्रश्न विचारला होता. "अहो, अडचणी असणारच, पण स्वस्थ बसून कसं चालेल?" असा आत्मस्तुतिपर उपदेश किंवा "हे आरंभापासूनचंच वळण आहे" अशी इतरांवर अप्रत्यक्ष टीका ऐकावी लागेल अशी कल्पना होती. पण शास्त्रीजी केवळ मोकळेपणाने हसले आणि म्हणाले, "अहो, कसलं आलंय? 'कुछ रोटी, कुछ लंगोटी' असा हा सगळा कारभार आहे झालं." उत्तर ऐकून मी सर्दच झालो. स्वतःच्या कर्तृत्वाविषयीची त्यांची ही विनम्र व निगर्वी वृत्ती त्यांच्या पांडित्याला शोभा देते, कामात तारतम्य कायम राखते आणि दोहोंच्या विकासाचे व वाढीचे मार्ग खुले ठेवते अशी माझी समजूत आहे. आपल्या विद्वत्तेची व कर्तृत्वाची जाणीव नसलेला असा हा विद्वान आहे. त्यांच्याशी अल्पसा परिचय आला तरी विद्वत्ता डोक्यात असावी पण ती तेथे 'जाऊ नये', कर्तृत्व निष्ठेने करावे पण त्याबद्दल अहंपणा बाळगू नये, ही शिकवण मिळाल्यावाचून राहात नाही.

विद्येच्या क्षेत्रातील तर्कतीर्थांच्या तपश्चर्येचे व अधिकाराचे मूल्यमापन करणे कठीण आहे; निदान माझ्या तरी सामर्थ्यापलीकडचे ते कार्य आहे. गेल्या दहावीस वर्षांतील त्यांच्या सामाजिक व राजकीय कार्यामुळे जी माणसे त्यांच्या सान्निध्यात आली, त्यांच्यापैकी मी एक आहे. आधुनिक भौतिक व सामाजिक शास्त्रे, संस्कृती व तत्त्वज्ञान, समाजवादी विचारसरणी व मार्क्सवाद इत्यादी क्षेत्रांतील त्यांच्या गाढ व्यासंगाशी मी परिचित आहे. तथापि त्यासंबंधी यापेक्षा अधिक काही सांगण्याचा माझा अधिकार नाही. आणि त्यांच्या पूर्वायुष्यातील प्राचीन संस्कृत विद्येच्या अध्ययनाविषयी तर मी काहीच बोलू शकत नाही. त्या काळातील त्यांच्या अध्ययनाची माहिती असलेले त्यांचे काही मित्र माझ्याही परिचयाचे आहेत. सामान्यतः पंडित समजल्या जाणारांचे जितके वाचन झालेले असते, तितके त्या काळी तर्कतीर्थांचे पाठांतर होते असे म्हणतात. "आयुष्य विद्या रसनाग्रनर्तकी" हे विधान त्यांना अगदी यथार्थतेने लागू पडते. या तपश्चर्येची ओझरती कल्पना अजूनही अधूनमधून अप्रत्यक्षपणे येते. पुणे विद्यापीठातर्फे इचलकरंजीकर व्याख्यानमालेतील व्याख्यानांच्या निमित्ताने, "येत्या महिन्यात सगळे वेद पुनः पहावयास हवेत", "आता बाहेरचे कार्यक्रम स्वीकारायला मुळीच वेळ नाही. सगळी पुराणे नजरेखालून घालावयाची आहेत; निदान दोन अडीच महिने तरी लागतील", "गेल्या महिन्यात असे काही एकदोन प्रश्न निघाले की त्यासाठी सगळे महाभारत पुनः पाहावे लागले" अशा तऱ्हेचे उद्गार मी वेळोवेळी त्यांच्या तोंडून ऐकले आहेत. त्यांच्या पूर्वायुष्यातील अध्ययनाचेच एक महत्त्वाचे फलित म्हणजे धर्मकोशाचे संपादन हे होय.

## अध्ययन पद्धतीची विशिष्ट परंपरा

तर्कतीर्थांच्या व्यक्तिमत्त्वाच्या आजवरच्या विकासाची बीजे ज्या पद्धतीने व ज्या परंपरेत त्यांचे पूर्वायुष्यातील अध्ययन झाले त्यातच बहुतांशाने आढळतात असे म्हणावे लागेल. आणि याविषयीचे सर्व श्रेय त्यांचे गुरुवर्य श्री केवलानंद सरस्वती स्वामी महाराज यांच्याकडेच आहे. अध्ययनपद्धतीचे वर्णन तर्कतीर्थांच्याच शब्दांत करावयास हरकत नाहीः "प्राचीन संस्कृत विद्येच्या परंपरेत बौद्धिकदृष्ट्या विद्यार्थी अधिक सकस तयार होत असे. तर्क व व्याकरण यांचे नियम सारखे उपस्थित ठेवून ते वापरण्याची पद्धत त्यात आहे... पूर्वोत्तरपक्ष पद्धती ग्रंथ लावताना वापरावी लागते. त्यामुळे अस्पष्टता, विसंगती व गोंधळ हे दोष नाहीसे होतात. विषय अधिक तोलून, मोजून मापून तपासण्याची सवय लागते. पूर्वापरसंगती सिद्ध करण्याकरिता विषय संपूर्णपणे उपस्थित किंवा कंठस्थ ठेवण्याची जबबादारी बाळगावी लागते." या पद्धतीने होणाऱ्या संस्कृत विद्येच्या अध्ययनाला प्राज्ञपाठशाळेत त्यांच्या गुरुवर्यांनी घालून दिलेल्या व जोपासना केलेल्या परंपरेत अध्यापन किंवा लोकशिक्षण या कर्मयोगाची जोड मिळाली. जुन्या अध्ययन पद्धतीतील रूक्षता, वावदूकता, गर्व आणि दुसऱ्या सद्गृहस्थाबद्दलच्या खऱ्या आदराचा अभाव हे दोष त्यामुळे आपोआपच टाळले गेले. पांडित्यापेक्षा आध्यात्मिक निष्ठेला, शब्दप्रामाण्यापेक्षा सारासारविचाराला अधिक महत्त्व देणाऱ्या या परंपरेच्या लाभामुळे विद्वत्तेबरोबरच शील व सदाचारसंपन्नताही वाढीस लागली. आणि पुढील आयुष्यात महात्मा गांधी आणि भाई मानवेंद्रनाथ रॉय या दोन्ही युगपुरुषांशी आलेल्या संबंधांमुळे त्या परंपरेचेच अधिक व्यापक, संवर्धित, संपन्न व उन्नत स्वरूपांतील प्रतीक म्हणून तर्कतीर्थ आज दिसत आहेत. प्राचीन संस्कृत विद्येबरोबरच राष्ट्रीय शिक्षणाचाही भाग प्राज्ञपाठशाळेतील शिक्षणक्रमात हळूहळू आला. आणि राष्ट्रीय आंदोलनाला प्रेरणा देणाऱ्या आधुनिक विचारसरणीकडे तर्कतीर्थांचे लक्ष वेधले आणि इंग्रजी शिकण्यासाठी बडोदे येथे काही काळ त्यांनी घालविला. संस्कृत अध्ययनासाठी वाईस आलेले श्री. विनायकराव भावे (आचार्य विनोबा) यांजकडून ते इंग्रजी शिकले आणि भाषा अवगत होताच आधुनिक पाश्चात्त्य विद्येच्या अध्ययनाला आरंभ झाला. गेल्या पंचवीस-तीस वर्षांत सतत अध्ययनाने याही क्षेत्रात त्यांनी सर्वांगीण स्वरूपाचा अत्यंत मोठा अधिकार प्राप्त करून घेतला आहे. आणि तो अनेक जाणत्या मंडळींनी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे मान्यही केला आहे.

प्राचीन संस्कृत विद्या, पाश्चात्त्य ज्ञानविज्ञान आणि अत्यंत विकसित स्वरूपात आढळणारी आधुनिक तर्कपद्धती, विश्लेषणपद्धती व विचारपद्धती यांवरील पकड यांमुळे तर्कतीर्थांचा ज्ञानाच्या क्षेत्रातील अधिकार काहीसा 'यासम हा' अशाच स्वरूपाचा आहे असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही. या श्रेष्ठ समन्वयाची 'हिंदुधर्माची समीक्षा', 'वैदिक संस्कृतीचा विकास', 'जडवाद', 'ज्योति-निबंध' यांसारखी फारच थोडी फळे अजून मराठी भाषिकांस मिळाली

आहेत. पण ती अत्यंत महत्त्वाची आहेत. राज्यघटनेसारख्या अत्यंत बारीकसारीक श्लेषांनी भरलेल्या कायद्याच्या किचकट ग्रंथाचे ते सहज संस्कृतमध्ये भाषांतर करू शकले, याचेही कारण या समन्वयातच आहे. प्राचार्य धनंजयराव गाडगीळ यांच्या निमंत्रणावरून पुणे येथील 'गोखले इन्स्टिट्यूट'मध्ये कै. रा. ब. काळे यांच्या वर्षश्राद्ध दिनानिमित्त गत वर्षी त्यांनी वाचलेला 'राष्ट्रवाद' या विषयावरील प्रबंध त्यांचा राज्यशास्त्रातील थोर अधिकार सूचित करणारा आहे. अशा प्रकारची आणखीही अनेक उदाहरणे सहज देता येण्यासारखी आहेत.

## सामाजिक व राजकीय चळवळींचा अनुभव

तर्कतीर्थांचे कार्यक्षेत्र विद्यार्जनापुरतेच मर्यादित नाही. अनेक महत्त्वाच्या व राजकीय चळवळींतही त्यांनी भाग घेतला आहे. त्यांचे धर्मनिर्णय मंडळातील कार्य, अस्पृश्योद्धाराच्या आंदोलनात त्यांनी घेतलेला महत्त्वाचा भाग, धर्माचे परिवर्तनवादी स्वरूप सिद्ध करताना त्यांनी गाजवलेल्या पंडितसभा इत्यादी प्रसिद्धच आहेत. राजकीय क्षेत्रात त्यांचा गांधीयुगात जन्म झाला. स्वतः म. गांधींचे आणि त्यांचे जवळचे व जिव्हाळ्याचे संबंध होते. "एक थोर विद्वान व निष्कलंक चारित्र्याचे गृहस्थ" (A man of great learning and spotless character) या शब्दांत गांधींनी त्यांचा गौरव केला होता. आणि महात्माजींशी अत्यंत मूलभूत स्वरूपाचे राजकीय मतभेद झाले असतानादेखील त्यांच्याविषयी अत्यंत खोलवर रुजलेली आदराची भावना तर्कतीर्थांच्या मनात दिसत असते. तथापि ते कधीकाळी 'गांधीवादी' होते की नाही हा एक प्रश्नच आहे. १९३०-३१ च्या सत्याग्रहाच्या आंदोलनातील बागलाणमधील जंगल सत्याग्रहातील त्यांची कामगिरी अनेकांना माहीत आहे. तथापि वाढत्या अध्ययनाबरोबर आणि प्रत्यक्ष अनुभवानेही त्यांची राष्ट्रवादी चळवळीवरील श्रद्धा हळूहळू कमी होऊ लागली. आणि ते 'डाव्या' विचारसरणीकडे झुकू लागले. याच काळात दहशतवादी कार्यकर्त्यांना प्रसंगी धोका पत्करूनही साहाय्य केले. पिस्तुले, काडतुसे घरात किंवा प्रसंगी प्रवासाच्या सामानातही बरोबर असत. पण मार्क्सवादाच्या वाढत्या अध्ययनामुळे हे वारे फार काळ टिकले नाही. १९३६-३७ मध्ये भाई मानवेंद्रनाथ रॉय यांची तुरुंगातून सुटका झाल्यानंतर मार्क्सवादाकडे झुकू लागलेले तर्कतीर्थ रॉयवादी झाले. आणि त्याच चळवळीच्या 'नवमानवतावादा'च्या वैचारिक भूमिकेत ते आजही आहेत. १९३६-३७ च्या सुमारासच माझा त्यांच्याशी परिचय झाला आणि तेव्हापासूनचे त्यांचे जीवन मी जवळून पाहिले आहे.

प्राज्ञपाठशाळा व धर्मकोश कार्यालय यांचे कार्य प्रत्यक्ष पाहिले की ज्या वातावरणात तर्कतीर्थ बराच काळ घालवतात, जेथे त्यांचे बहुतेक अध्ययन-लेखन-कार्य चाललेले असते, त्याचे स्वरूप ध्यानात येते. तर्कतीर्थ व त्यांचे सहकारी यांच्या प्रेमळ, मोकळेपणाच्या व सहजस्फूर्त शिस्तीच्या वागण्यामुळे आपण एखाद्या मोठ्या कुटुंबातच वावरत आहोत, असा क्षणभर भास होतो. तेथील खेळीमेळीच्या वातावरणामुळे 'अंतर' नाहीसे होत नाही; अंतर

असल्यामुळे जिव्हाळा कमी होत नाही; जिव्हाळयामुळे एकमेकांच्या स्वभावांतील कानेकोपरे किंवा प्रसंगविशेषी घडणारे प्रमाद यांजकडे दुर्लक्ष होत नाही; पण त्यांवरच लक्ष केंद्रित न झाल्यामुळे परस्परांविषयीचे प्रेम आणि अगत्य कायम राहते. एकमेकांची स्वभाववैशिष्ट्ये, आवडीनिवडी, गरजा व अडीअडचणी यांजकडे सतत लक्ष पुरविणारे, विभागणीमुळे प्राप्त झालेले आपापले काम दक्षतेने पार पाडणारे व ते पार पाडीत असता एकमेकांच्या विकासास सहायभूत होणारे अशा सहकार्यांच्या समुदायांत तर्कतीर्थांचे अध्ययन-लेखनकार्य चालते. मुद्द्याचा विषय असल्यावाचून सहसा न बोलणारे वासुनाना, राजकीय चर्चेत हिरिरीने पडणारे शंकरराव, कोठल्याही चर्चेत सहसा न पडता आपल्या कामात सदैव मग्न असणारे विठ्ठलशास्त्री, दुरूनच 'काय चालले आहे?' म्हणून सहज कानोसा घेणारे रंगनाथशास्त्री आणि न पटलेला मुद्दा झुरक्यासारखा उडवून देणारे मधुकरराव साठे या सर्वांची एकोप्याने व एकदिलाने काम करणारी 'टीम' निर्माण करण्याचे बरेच श्रेय तर्कतीर्थांकडेच आहे. या सहकार्यावरील निष्ठेमुळेच श्री. बिर्लाशेठजींनी देऊ केलेल्या धर्मकोशाप्रीत्यर्थ सर्व साधनसामग्रीच्या आणि स्वतःसाठी दोन हजार रुपये महिन्याच्या तरतुदीच्या आश्वासनाचा तर्कतीर्थांनी अव्हेर केल्याचे मला माहीत आहे. विविध राजकीय व सामाजिक कामांमुळे बराच काळ बाहेर घालवताना वाईतील सहकाऱ्यांचे व कामाचे सतत स्मरण तर्कतीर्थांना असते. उलट, वाईतच राहिल्यास त्यांच्या इतर कामांची हेळसांड होण्याचा संभव आहे याची जाणीव व चिंता सहकाऱ्यांच्या ठिकाणी नेहमी आढळते. कामाची शिस्त व कार्यक्षमता आणि कार्यकर्त्यांचे प्रेमाचे व खेळीमेळीचे संबंध यांचा इतका सुंदर मिलाफ झालेले दुसऱ्या एखाद्या संस्थेचे उदाहरण क्वचितच आढळेल. याच वातावरणाशी एकरूप झालेले तर्कतीर्थांचे कौटुंबिक जीवन आहे. सामान्य मध्यमवर्गीय परंतु अत्यंत टापटिपीची राहणी, आल्यागेल्यांचे योग्य आदरातिथ्य, घरातील प्रेमाचे व मोकळे वातावरण यांमुळे येणाराचा संकोच ताबडतोब नाहीसा होतो आणि तो त्या प्रसन्न वातावरणात एकरूप होऊन जातो. प्रत्येकाच्या आवडीनिवडीप्रमाणे त्याचे आदरातिथ्य होते. सौ. सत्यवतीबाईंच्या दक्षतेमुळे, आपल्यासाठी विशेष काही होत आहे याची जाणीव मुळीच न होता वेळच्या वेळी चहा, जेवण, मधल्या वेळचे खाणे- सर्व कार्यक्रम व्यवस्थितपणे पार पडत असतात. वागण्यातील सहिष्णुता व लवचिकपणा यांमुळे एखाद्या कर्मठ ब्राह्मणापासून तो आधुनिक पद्धतीची राहणी असलेल्या गृहस्थापर्यंत, किंबहुना अधूनमधून येणाऱ्या युरोपियन पंडितापर्यंत प्रत्येक जण संतुष्ट व समाधानी असतो. राहण्याचे व कामाचे स्थान एकच असल्यामुळे बहुतांशी सारखेच वातावरण सर्वत्र आढळते. कार्यालयाची दोन दालने ओलांडली की घर येते; त्यामुळे कार्यालयातील शिस्त व जबाबदारपणा घरातही आढळतो. घरातून चार पावले बाहेर टाकली की कार्यालय येते; त्यामुळे घरातील मोकळेपणा व जिव्हाळा तेथेही वावरतो. पाहुण्याभोवती घर फिरत नाही; त्याचे स्वातंत्र्य कायम राहते. पण त्याच्याकडे दुर्लक्षही होत

नाही आणि त्यामुळे अपरिचित ठिकाणी निर्माण होणारी एकटेपणाची भावनाही त्याच्या मनात येत नाही. मोकळेपणाचे चुकूनही थिल्लरपणात रूपांतर होत नाही. ऋग्वेदातील ऋचांपासून अर्नाळकरांच्या साहित्यापर्यंत, आंतरराष्ट्रीय राजकारणापासून वाईतील रेशनिंगपर्यंत सर्व विषयांवर चर्चा चालतात. पण गप्पांना फारसा अवकाश मिळू शकत नाही. आणि अल्प काळ जरी तिथे घालवला तरी त्यातून काहींना काही लाभ घेऊनच आपण बाहेर पडत आहोत ही जाणीव जाणाराच्या मनात निर्माण झाल्यावाचून राहात नाही.

## प्रतिपादनाप्रमाणेच वर्तन

दुसऱ्याच्या सोयी-गैरसोयींविषयी इतकी दक्षता बाळगणारे हे गृहस्थ स्वतः पाहुणे म्हणून आले म्हणजे मात्र आपल्या आवडीनिवडीचा पत्ता लागू न देता जातील तेथील वातावरणाशी एकरूप होऊन जातात. श्री. बिर्ला वा श्री. अंबालाल साराभाईंसारख्या धनपतींच्या प्रासादापासून एखाद्या सामान्य शेतकऱ्याच्या झोपडीपर्यंत वा विद्यार्थ्याच्या खोलीपर्यंत हाच अनुभव असावा असे म्हणता येईल. आवडच असेल तर झोपडीची आणि त्याहूनही विशेष म्हणजे एखाद्या डोंगरातील शांत गुहेची! शास्त्रीजी आले म्हणजे काही विशेष अवस्था ठेवली पाहिजे असे परिचितांना सहसा वाटावयाचे नाही. केव्हाही येऊन उभे राहतील; जे काही घरात केलेले असेल ते आनंदाने खातील. 'होल्डॉल' पसरण्यापुरती मोकळी जागा दाखविली की तो पसरून शांतपणे, कसल्याही परिस्थितीत वा प्रसंगात असोत, एखाद्या लहान मुलासारखे स्वस्थ झोपतील ही त्यांची सामान्य पद्धत! पाहुणे म्हणून या त्यांच्या किमान अपेक्षा असतात. साधं कोरड्यास, भाकरी व लसणाची चटणी यांवर आनंदाने ताव मारताना मी त्यांना पाहिले आहे. आणि त्यात आपण काही विशेष केले अशी चुकूनही त्यांच्या ठिकाणी जाणीव मला तरी कधीही आढळली नाही. 'खाण्यापिण्यातील विविध विधिनिषेध पाळणे योग्य आहे काय?' या विषयी गांधीवाद्यांच्या एका मेळाव्यात झालेल्या चर्चेत "जोवर ते पाळले जातील आणि ते पाळण्यात विशिष्ट मोठेपणा आहे, ही समजूत राहील तोवर सामान्य माणसाशी कधीही एकरूप होता यावयाचे नाही", असा स्पष्ट इशारा त्यांनी काही दिवसांमागे दिला होता. आणि ही एकरूपता शास्त्रीजींनी साध्य केली आहे. यामुळेच सातारा, सांगली, कोल्हापूर, नाशिक किंवा खानदेश या त्यांचे राजकीय कार्यक्षेत्र असलेल्या जिल्ह्यांत आणि सामान्यतः महाराष्ट्रात सगळीकडेच "हा बामण आमचाच आहे" असं समजणारी अनेक शेतकरी कुटुंबे आढळतात आणि त्यांना हे मनापासून आवडते. असे झाल्यावाचून आमच्या सामाजिक जीवनात एकजिनसीपणा निर्माण अशक्य आहे असे त्यांचे प्रतिपादन आहे आणि प्रतिपादनाप्रमाणेच वर्तनही आहे. एकदा आमच्याकडील एका म्हाताऱ्या मोलकरणीने, ते बाहेर गेले असून संध्याकाळी परत येतील, असा निरोप मला सांगताना त्यांचा 'तात्या' या नावाने उल्लेख केला. शास्त्रीजी किंवा तर्कतीर्थ ही नावे तिला पेलण्यासारखी नव्हती. शास्त्रीजी परत आल्यानंतर सहज

तिच्या लक्षात येऊ नये म्हणून मी त्यांना इंग्रजीत हे सांगितले. आणि आज तुम्हाला एक नवे नाव मिळाले आहे म्हणून म्हणालो. शास्त्रीजी किंचित हसत लगेच उद्गारले; "Oh! It is very sweet. I like it very much." ('किती गोड नाव आहे हे! मला ते फारच आवडले.')

जेवणाकडे त्यांचे बहुधा लक्ष नसतेच. एखाद्या चर्चेला रंग भरलेला असायचा किंवा विचारांची तंद्री लागलेली असायची. आणि त्यातच ताटात असेल ते संपायचे! काही वेळा तंद्रीतून जागे करून एखादा पदार्थ हवा की नको याचे निश्चित उत्तर काढावे लागते. निरनिराळे पदार्थ एकामागून एक खाण्यात वेळ जातो असे त्यांना वाटते की काय कोण जाणे? पण काही वेळा सर्वच पदार्थ एकत्र कालवून तो 'काला' खाण्यासही सुरुवात होते. एकदा भाई रॉय यांच्याकडे डेहराडून येथे अशा प्रकारचे जेवण सुरू झाले. रॉय थट्टेने म्हणाले, "Shastriji is eating according to Dr. Akroyd's formula" ('शास्त्रीजी डॉ. ॲक्रॉइड यांच्या फॉर्म्युल्याप्रमाणे जेवत आहेत'). पण याचा अर्थ पदार्थांच्या चवी व त्यांतील तारतम्य त्यांना समजत नाही असा मात्र मुळीच नव्हे. तंद्रीतूनच एकदम केव्हा तरी म्हणतील, "हं. तूप फारच उत्तम आहे.", "भाजी छान झाली आहे" आणि ही विधाने अगदी यथार्थ असणार, औपचारिक नव्हेत असे खुशाल समजावे. शास्त्रीजींनी एखादा पदार्थ उत्तम आहे असे म्हटले म्हणजे तो उत्तम असणारच. मात्र खरोखरच तसं काही पानात नसेल तर काहीही न बोलता बहुधा ॲक्रॉइड फॉर्म्युल्याप्रमाणे तंद्रीतच जेवण संपेल. हे चिंतन इतरही अनेक वेळा चालू असते. फिरावयास जाण्यासाठी चारचौघांबरोबर निघतील आणि एकटेच तंद्रीत भराभर पावले टाकीत पुढे चाललेले दिसून येतील. चारचौघांशी बोलत बसलेले असताना क्षणार्धात आपल्याच विचारांत मग्न होतील. एखाद्याची ओळख करून देत असताना मध्येच अंतरिक्षात पाहू लागतील. सभोवतालच्या परिस्थितीचे अवधान राहात नाही असे नाही. पण तिच्यात विशेष काही आढळल्यावाचून आपल्या जगातून ते बाहेर यायला सहसा तयार असत नाहीत.

फळांची मात्र त्यांना विशेष आवड आहे. ते आले म्हणजे सदऱ्याच्या खिशात कुठेतरी एखाद-दुसरे लिंबू, चार-दोन आवळे, एखादे सफरचंद, दहावीस बोरे काही ना काही मोसम असेल त्याप्रमाणे सापडायचेच! आणि एकदोन दिवसांच्या का होईना मुक्कामानंतर गेले म्हणजे अशीच काहीतरी फळे टेबलाच्या ड्रॉवरमध्ये असायची! विशिष्ट फळेच आवडतात असे नाही. हापूसचा आंबा जसा उत्साहाने खातील, तशाच उत्साहाने उत्तम दिसणारे लिंबू चोखत बसतील. आंबट-तुरट आवळा, गोड किंवा आंबड-गोड बोरं, कच्चा पेरू सर्व चालतात. दर्शनी वाईट दिसणारी किंवा काही कच्ची व बेचव फळे वर्ज्य! इतरांच्या बाबतीत उत्साह सारखाच! चाकू, बशी इत्यादी साहित्याची वाट पाहायचे नाहीत. एकदा मी त्यांना फलाहार हे एक मनुष्याच्या पूर्वजांचे (Atavism)चे लक्षण आहे असे म्हटले.

आणि योगायोगाने त्या दिवशी जेवणानंतर उत्तम काबुली द्राक्षे आली. आणि मला या थट्टेचे चांगलेच प्रायश्चित्त मिळाले. एकदा त्यांच्या आवडीचे म्हणून ग्रेपफ्रुट त्यांना जेवणानंतर दिले. आणि बशी आणीपर्यंत त्यांनी ते खावयासही सुरुवात केली. "अहो, साली कुठे आहेत?" विचारताच धोतराच्या सोग्यात गोळा केलेल्या साली त्यांनी दाखविल्या. "अहो, सोग्यात काय भरल्यात साली? असे म्हणताच, "आणा बशी इकडे. तिच्यात ठेवतो. बोलून चालून खेडूत संघाचे अध्यक्ष आम्ही!" असे म्हणत पुनः खाणे सुरू झाले. अर्थात धोतराच्या प्रसिद्ध असलेल्या निरनिराळ्या उपयोगांत हाही एक उपयोग आहेच! अशा या उपयुक्त धोतराऐवजी पाटलोण येते की काय अशी शंका काही वर्षांमागे निर्माण झाली होती. पण ती एक-दोन महिन्यांपेक्षा अधिक काळ टिकू शकली नाही. शास्त्रीजी पुनः मूळपदावर म्हणजे 'संत'वेषात गेले नाहीत. पंतवेषच कायम राहिला आहे.

## वैचारिक निष्ठा

तर्कतीर्थांची वैचारिक निष्ठा त्यांच्या सार्वजनिक जीवनात ओतप्रोत भरलेली आहे. आणि त्याबद्दल त्यांना भरपूर किंमतही द्यावी लागली आहे. राष्ट्रीय चळवळीत ते असताना स्वतः महात्मा गांधींशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. तथापि अत्यंत मानाचे व मोठेपणाचे हे स्थान त्यांनी वैचारिक मतभेदामुळे सोडले. आणि तेदेखील काँग्रेस भूमिगत होण्याच्या वा ओस पडण्याच्या काळात नव्हे तर अधिकारारूढ झाली असताना! समाजवादी विचारसरणीतील तत्कालीन उथळपणा त्यांना रुचणारा नव्हता. मार्क्सवादाकडे ते झुकले असले तरी साम्यवादाची ठोकळेबाजीही त्यांना पसंत पडण्यासारखी नव्हती. अशा अवस्थेत स्वतंत्र विचारांना महत्त्व देणारी रॉय यांची मार्क्सवादी भूमिका त्यांना जवळची वाटली असल्यास नवल नाही. 'राष्ट्रीय चळवळीतील एवढे मानाचे व मोठेपणाचे स्थान सोडून तुम्ही रॉय यांच्याकडे कसे झुकलात' असा प्रश्न मी काही दिवसांमागे त्यांना विचारला होता. त्याचे उत्तर म्हणून त्यांनी लिहिले, "श्री. नारायणशास्त्री मराठे यांनी षड्दर्शने शिकविली. वर्तमान भारतीयांच्या अध्यात्मवादी वातावरणापेक्षा विलक्षण असेच वातावरण षड्दर्शनांच्या वैचारिक संघर्षात मी अनुभवले. अत्यंत मूलगामी तात्त्विक मतभेदाने भरलेले ते विचार आहेत. त्यांच्याशी तुलना करता वर्तमानकालीन भारतीय संस्कृतीचे वैचारिक जीवन अत्यंत श्रद्धाजड दिसते. १९ व्या व २० व्या शतकांतील थोर भारतीयसुद्धा या रूढ अध्यात्माला मानवंदना करणारे दिसतात. दोन सहस्र वर्षांपूर्वीचा निर्भयपणे संचार करणारा वैचारिक साहसी सोडल्यानंतर सगळीकडे वैचारिक शरणागती सापडते. पुरातन युगातल्या स्वतंत्र विचारशार्दूलाचा तो आदर्श मला पुन्हा एकदा नव्या थोर भारतीयांत दिसला. तो एकांतिक भारतीय म्हणजे मानवेंद्रनाथ रॉय होत." बाहेर स्वतंत्र कर्तृत्व व स्थान असलेली जी थोडीबहुत माणसे रॉय यांच्याजवळ आली, त्यांच्यात तर्कतीर्थांचे स्थान अत्यंत मोठे व घरचे आहे. राजकीय यशापयशाचे गणित मांडून ते रॉय यांच्याजवळ आले नाहीत. वैचारिक

श्रद्धेमुळेच त्यांनी तो मार्ग स्वीकारला. आणि तेथेही संघटनेच्या दृष्टीने नव्हे तर व्यक्ती या नात्याने त्यांचे स्थान अत्यंत मोठे होते. राजकीय धकाधकीच्या मामल्याबाहेरचे आपल्या दीर्घकालीन चिंतनाचे विषय मुद्दाम चर्चेसाठी रॉय ज्या चार-दोन व्यक्तींपुढे काढीत, त्यात शास्त्रीजी प्रमुख होते. कित्येक वेळा या चर्चांना वेळेचे बंधनही राहात नसे. रात्री तीन-तीन चार-चार वाजेपर्यंत त्या चर्चा चालत. आणि त्यात निघालेले प्रश्न दोघांच्याही मनांत घोळत राहात.

पक्षसंघटनेमध्ये शास्त्रीजी महाराष्ट्रपक्षाचे सरचिटणीस होते. पण त्या स्थानावरून त्यांचे पक्षातील महत्त्व समजू शकणार नाही. पक्षाचे मित्र, तत्त्वज्ञ व मार्गदर्शक म्हणून त्यांना स्वतंत्र स्थान होतेच. त्यांच्या साध्या, मोकळया व प्रेमळ आचरणामुळे सर्वांना ते आपलेच आहेत असे वाटे आणि आपलेच असावेत अशी इच्छाही असे. आमच्या पक्षातील अनुभवावरून, स्वतः रॉय पतिपत्नींचा अपवाद वगळल्यास सर्व क्षेत्रांतील व श्रेणींतील कार्यकर्त्यांच्या हृदयांत स्थान असलेला तर्कतीर्थांसारखा दुसरा कोणीही नव्हता, असे निर्विवादपणे म्हणता येईल. आपल्या विद्येमुळे व स्वभावामुळे तर्कतीर्थांनी ज्याप्रमाणे हे स्थान मिळवले, त्याचप्रमाणे आपल्या वैचारिक निष्ठेमुळे अत्यंत त्रास व अडचणीही सहन केल्या. प्रवाहाविरुद्ध पोहण्याचे ते राजकारण निष्ठेवाचून करता येणे अशक्य होते. दहावीस हजारांची सभा गाजवणे सोपे आहे, पण दहापाच लोकांचे अभ्यासमंडळ पाच पन्नास श्रोत्यांपुढे त्यांना मुळीच न रुचणाऱ्या विषयांचे तास-दोन तास प्रतिपादन करणे कठीण आहे. तर्कतीर्थांना बोलवायचे म्हणजे कार्यक्रम यशस्वी झाला पाहिजे, ही निमंत्रकाची इच्छा असेच. आणि त्याचप्रमाणे प्रयत्नही होई. पण तो परिणामकारक न झाल्यास त्याविषयी निमंत्रण देणाराला कसलीही प्रतिक्रिया न येता त्याचा कामासंबंधी उत्साह कायम राहावा, असेच तर्कतीर्थांचे वागणे! ते आले म्हणजे कुणीतरी 'पुढारी' आला आहे असे वाटण्याऐवजी आपला एक मित्रच आला असून सहज दूर करू शकू असे कुणाही सामान्य कार्यकर्त्याला वाटे. तर्कतीर्थांच्या विद्वत्तेमुळे त्याला मूठभर मांस चढे; त्यांच्या वक्तृत्वामुळे त्याला जोर येई! राष्ट्रीय चळवळीत त्यांनी भोगलेला तुरुंगवास या खडतर तपश्चर्येपुढे काहीच नव्हे असे म्हणावयास मुळीच हरकत नाही. 'रॉयवादी' झाल्याने रॉय यांचा स्नेह मिळाला. पण स्थान, सत्ता, मोठेपण सर्व काही गमवावे लागले. तथापि हा विचार राजकीय वैचारिक निष्ठेमुळे तर्कतीर्थांना कधीही शिवला नाही. "रॉयसाहेबांनी फार मोठी देणगी मला दिली आहे. त्यांनी मला महत्त्वाकांक्षा जिंकावयास समर्थ केले. आणि मी मुक्त झालो." असे ते एकदा सहज बोलता बोलता मला म्हणाले.

## साधनशुचितेचा आग्रह

मात्र या खडतर प्रसंगांतून जात असताना त्यांनी आपली वैचारिक व वर्तनक्रमाची पातळी कधीच सोडली नाही. १९४६ च्या निवडणुकीच्या दिवसांत महाराष्ट्रात सात्त्विक वृत्तीचे व

हळुवार मनाचे म्हणून प्रसिद्धी पावलेले एक काँग्रेस पुढारी वाईस गेले व तेथील सभेत त्यांनी तर्कतीर्थांना "हे तर्कतीर्थ कसले? तर्कटतीर्थ नव्हे, मर्कटतीर्थ आहेत", असा अहेर केला. तर्कतीर्थांनी त्यांच्या सर्व राजकीय मुद्द्यांना सडेतोड उत्तरे दुसऱ्या दिवशीच्या सभेत दिली. लोक केव्हा स्फोट होतो, याची वाट पाहात होते, पण उत्तर देऊन झाल्यावर ते क्षणभर स्तब्ध झाले; आणि हसून म्हणाले, "या व्यतिरिक्त त्यांचे जे भाषण होते ते सर्व त्यांचे 'सत्यं, शिवं, सुंदरम' आहे. त्याबद्दल मी काय बोलावे?" एखाद्या वाक्यातच सभा खुलविण्याचे वा जिंकण्याचे सामर्थ्य त्यांच्या वक्तृत्वात आहे. मुंबईतील एका सभेत "बंधुत्वाचा संदेश आम्हाला नवा नाही किंवा आमच्या सांस्कृतिक जीवनाशी विसंवादीही नाही. आमच्या खानदेशातील 'भाऊ' हा तुमच्या या आधुनिक 'भाई'चा फार मोठा व जुना पूर्वज आहे", असे ताडकन बोलताच सगळी सभा जवळजवळ कोसळलीच. पण हे प्रभावी वक्तृत्व पूर्वग्रहांशी, विकारांशी, भ्रामक व चुकीच्या कल्पनांशी झगडा करण्यातच त्यांनी खर्ची घातले; फड जिंकण्यात वा मोठेपणा मिळविण्यात नव्हे. आणि यामुळे आलेले सगळे प्रसंग त्यांनी अत्यंत आनंदाने सहन केले. आपल्या राजकीय निष्ठेसाठी साधनशुचितेचा आग्रह धरणारांकडून शेणमार व लाथाबुक्क्यांचा प्रत्यक्ष प्रसाद मिळालेला, केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर अखिल भारतात माझ्या माहितीप्रमाणे हा एकच पंडित आहे. पण त्यांच्या मनात द्वेष वा कडवटपणा निर्माण झाला नाही. आणि म्हणून आपले कार्य करण्याच्या हेतूने पुनः काही विशिष्ट परिस्थितीतच ते त्याच समुदायात आजही दिसत आहेत. संधिसाधुत्व त्यांच्या जीवनात अजून कधीही शिरले नाही. ते तेथे पाहणाराला 'संधी' व 'साधणे' या दोहोंचाही स्वतंत्र अर्थ न समजल्याकारणाने सगळीकडेच 'संधिसाधुपणा' दिसतो असे म्हणावे लागेल. कार्यावरील निष्ठेमुळे ते साधण्यासाठी येणारी संधी घ्यावयास ते तयार असतात हे खरे! पण ती घेताना मूळ हेतूशी विसंगत असे त्यांनी काहीही केलेले नाही, अशी माझी समजूत आहे. त्यांच्यावर संधिसाधुत्वाचा आरोप करणे म्हणजे त्यांच्या सर्व जीवनाकडे पूर्ण दुर्लक्ष करण्यासारखे आहे.

### सोमनाथाचे पौरोहित्य

सोमनाथ प्रतिष्ठापनेच्या वेळी त्यांनी स्वीकारलेल्या पौरोहित्यामुळे देखील तर्कतीर्थांविषयी थोडासा गैरसमज निर्माण झाला होता. परंतु तोही बऱ्याच अंशी अकारण व त्यांच्यावर अन्याय करणारा होता असे वाटते. ज्या विशिष्ट मंदिराबाबत आणि विशिष्ट परिस्थितीत त्यांनी ते कार्य स्वीकारले ती ध्यानात घेतली पाहिजे. कुणाही मानवाला प्रवेशाचा आणि कुणाही हिंदुला पूजेचा अधिकार असलेले असे ते मंदिर आहे. आणि त्यामुळेच सगळया सनातनी मंडळींनी नाकारलेले असे ते पौरोहित्य होते. पुनरुज्जीवनाच्या (Revivalism) आंदोलनाचे ते केंद्र बनणे अशक्य होते व आहेही. अशा अवस्थेत त्या कार्याचा स्वीकार केल्याबद्दल तर्कतीर्थांवर नाराज होण्याचे कारण नाही. तर्कतीर्थांच्या मनावर अजूनही

धार्मिक भावनेचा पगडा आहे, तिला मनात खोलवर स्थान आहे, ही गोष्ट या प्रसंगाने स्पष्ट झाली.पण त्यातही रागावण्यासारखे काही नाही. ठेच लागेपर्यंत नास्तिक अनेक असतात. यात पहिला दगड कुणी मारायचा हाच खरा प्रश्न आहे. शिवाय, पौरोहित्याचा व्यवसाय त्यांनी अजून टाकलेला नाही. तेव्हा त्या प्रसंगावरून झालेला गैरसमज हा बव्हंशी अस्थानीच होता असे म्हणावे लागते. त्या प्रसंगी त्यांची 'पृथ्वी प्रदक्षिणा' सुरू झाली असून ते पुनः मूळपदावर येऊन थांबणार अशी टीका त्यांच्या एका स्नेह्याने केली होती असे मला स्मरते. त्यांच्या वैचारिक भूमिका वेळोवेळी बदलतात असा या टीकेचा अर्थ असल्यास ती टीका अगदीच उथळ आहे. पृथ्वी प्रदक्षिणा हे एक महापुण्य आहे. प्रदक्षिणा केल्या माणूस मूळपदावर आल्यासारखा दिसतो तो केवळ आभास होय. त्याचे व्यक्तित्व मध्यंतरीच्या काळात कितीतरी विकसित व संपन्न झालेले असते. तिकडे दुर्लक्ष करून, आपण घट्टपणे राहिलो तिथेच तो पुनः येत आहे अशा भ्रामक समजुतीने समाधान मानून घेण्यात वा ते स्थान सोडल्याबद्दल त्याच्यावर टीका करण्यात काय अर्थ आहे?

**भारतीय नवजीवनाचे प्रतिनिधी**

तर्कतीर्थांना 'साहित्यिक' म्हणावयाचे की नाही या शुष्क वादात येथे पडण्याचे कारण नाही. ते रसिक आहेत. साहित्य समीक्षेच्या क्षेत्रात त्यांचा अधिकार मोठा आहे. गोमंतक, मुंबई, इंदूर व बडोदे या चार साहित्य संमेलनांतील त्यांच्या अध्यक्षीय व इतर भाषणांवरून ही गोष्ट स्पष्ट होते. उच्च अभिरुचीचे, व्यापक सौंदर्यदृष्टी असलेले ते एक विचारवंत आहेत. सर्जनशील साहित्य त्यांनी निर्माण केले हे खरे! पण सर्जनशीलतेचे मार्गच आज बंद झाल्यासारखे दिसत आहेत. प्रतिभेचे झरे आटत आहेत. जीवनाविषयीची शिसारी हीच आज जीवनदृष्टी होऊ पाहात आहे. घृणा किंवा वैफल्य हेच आजच्या सर्जनाचे परिपाक आहेत. नवजीवनाची केवळ 'स्वप्नच' आणि तीदेखील 'अंधुक' स्वरूपातच दिसत आहेत. मनोरथांचे 'शेण' होत आहे. अशा परिस्थितीत, निर्मितीचे मार्ग पुनः खुले व्हावेत, प्रतिभेला बहर यावा आणि जीवनाच्या विविध क्षेत्रांत तिचा मुक्त विहार सुरू व्हावा यासाठी मानवी जीवनाचा आणि संस्कृतीचा अर्थ शोधण्यात ज्यांनी आयुष्य घालविले व अजूनही त्याच कार्यात जे गढलेले आहेत, अशा विचारवंतांचीच गरज आहे. आणि तर्कतीर्थ हे अशा विचारवंतांपैकी एक होत. भाई रॉय यांनी एकदा म्हटल्याप्रमाणे "भारतीय नवजीवनाचे ते एक प्रतिनिधी आहेत." (A man of Indian Renaissance).

**(नवभारत मासिक, ऑक्टोबर, १९५४, पृ. ३९ ते ४६)**

ooo

# १०.
# निगर्वी, निर्भीड आणि निःस्पृहः तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी
## लक्ष्मणराव काशीनाथ हसमनीस

भरतखंडातील नद्यांत गंगेला जे नितांत पावित्र्य प्राप्त झालेले आहे, तेच पावित्र्य महाराष्ट्रात कृष्णेला लाभलेले आहे. कृष्णेने महाराष्ट्राचे भाग्य अनेक तऱ्हेने उज्ज्वल केलेले आहे. पावित्र्य, सौंदर्य व संपत्ती तिने विपुल प्रमाणात आम्हाला दिली आहे. तिच्या अनेक पवित्र क्षेत्रांतून अनेक विद्वत्रत्नेही तिने जगाला अर्पण केलेली आहेत. अशाच एका थोर अभिमानास्पद व विशाल देणग्यांपैकी कृष्णातीरीच्या वाईच्या प्राज्ञपाठशाळेने महाराष्ट्राला तर्कतीर्थांच्या रूपाने एक महान देणगी अर्पण केलेली आहे.

ऋषिप्रणित मार्गाने वागण्याचा प्रयत्न करून जगातील सद्भाव टिकवावा, वाढवावा आणि स्वतःबरोबरच जगाचे कल्याण करावे, म्हणून त्यागपूर्ण, नैष्टिक व विरक्त जीवन जगणारे मुनितुल्य- गुरुवर्य श्री. नारायणशास्त्री मराठे यांच्या साक्षात सान्निध्यात चार वेद, सहा शास्त्रे, अठरा पुराणे 'पठिताभव' होऊन न्याय मीमांसा, व्याकरण व वेदांत या सर्व विद्येत पारंगतता संपादून संस्कृत शास्त्रातील 'तर्कतीर्थ' ही सर्वोच्च पदवी मिळवून श्री. लक्ष्मणरावांनी आपल्या जीवनाला भरीव पायावर सुरुवात केली. आणि त्यांच्या सखोल स्वाध्यायाची नि व्युत्पन्न व्यासंगाची प्रचिती थोराथोरांना अगदी अल्प वयातही चकित करू लागली. सहजच ते पुष्कळांच्या आकर्षणाचा व कौतुकाचा विषय बनले. अगदी लहान वयात म्हणजे वयाच्या सुमारे अकराव्या वर्षी त्यांनी औंध येथे आपल्या दंडपलाशादी संजाप शेंडी मंडित बालब्रह्मचारी बटु वेशात, तैत्तिरीय उपनिषदातील आनंदवल्लीमधील मंत्रांच्यावर प्रवचने करून त्या काळी मोठमोठ्या विद्वानांनाही विस्मयचकित केलेले होते, अशी आठवण माझे विद्वान स्नेही श्री. भा. वि. गुळवणी यांनी सांगितल्याचे स्मरते आणि मला त्यांचा सादर अभिनिवेश पाहून पूर्वी श्री. गोविंदराव टेंबे यांनी कुमार गंधर्वांचे त्यांच्या वयाच्या दहाव्या वर्षी त्यांनी दाखविलेल्या संगीत नैपुण्याबाबत काढलेल्या आश्चर्योद्गारांचे स्मरण झाले. त्या वेळी मोठमोठे गानसम्राटही कुमार गंधर्वांचे गाननैपुण्य, गायनाची अभिजात चातुरी आणि

आवाजाची सुरेलता पाहून थक्क होत होते. तीच गोष्ट श्री. लक्ष्मणशास्त्र्यांचे बाबतीतही अक्षरशः सत्य घडली आहे. प्राचीन न्यायदर्शनादी षड्दर्शनांत त्यांनी अल्पावधीतच अतुल प्रभुत्व मिळविले. त्यांची ज्ञानसाधना खरोखर एक तपस्याच होती!

त्यांच्या नावाच्या मागील व पुढील 'तर्कतीर्थ' व 'शास्त्री' या शब्दांमुळे ते एक जुन्या पद्धतीचे पढिक शास्त्री पुराणिक असून पगडी, उपरणे, बाराबंदी, जोडा आणि कपाळावर भस्माचे पट्टे अगर गंध अशा पारंपरिक शास्त्रीभूषेत ते वावरत असावेत, असे नवख्यांना वाटण्याचा संभव आहे. पण त्यांनी अशा आचाराचा कर्मठपणा कधीच पाळला नाही. आश्रमीय वसने प्रथम काही काळ त्यांनी वापरली. अक्षरशः आर्ष बालब्रह्मचारीची वेश व केशभूषा धारण करून आणि हातांत एक दंड घेऊनच शास्त्रीबुवा एका काळी वावरत होते. पण हा कठोर आचारविचार त्यांनी नंतर भौतिक शास्त्रांच्या परिशीलनाने व परिचयाने सोडला. पुढे तर शास्त्रीबुवा बहुजन समाजात इतके समरस व एकजीव झाले की, त्यानंतरच्या राष्ट्रीय आंदोलनात त्यांनी उडी घेतली. ते समाजाच्या खालच्या थरात इतके मिसळले की, त्यांनी त्या वेळी 'अभक्ष्य भक्ष्य' सोडून कुणाच्याही घरात, कोणत्याही वेळी, कसलाही आहार घेतलेला आहे. खऱ्या अर्थाने अन्न हे 'पूर्णब्रह्म' मानणारे ते आहेत. माझ्या कल्पनेप्रमाणे त्यांचे स्नेही ब्राह्मणेतरांतच फार आहेत. घरच्याप्रमाणे शास्त्रीबुवा तेथे राहतात व वावरतात. कठोर व अंध रूढीपरंपरेची पट्टी त्यांनी आपल्या नेत्रांवर झापडीसारखी कधीच बांधली नाही. चमत्काराचे नमस्कार त्यांना करायचे असते तर त्यांनी आजवर काहीही करून आपली बुवाबाजी थाटली असती आणि अक्षरशः लाखो रुपये मिळवले असते. पण सोरटी सोमनाथाच्या पुनरुज्जीवनाच्या समारंभाचे पुरोहित म्हणून त्यांना मिळालेली जवळजवळ १५ हजार रुपयांची 'दक्षिणा' शास्त्रीबुवांनी सोमनाथ ट्रस्टला दिली. शास्त्रीबुवांच्या निःस्पृहपणाबद्दल बरेच लिहिता येईल. आपल्या मतस्वातंत्र्यासाठी त्यांनी खरोखर महान त्याग केलेला आहे. अमळनेरचे श्रीमंत प्रतापशेट यांनी त्यांना गावी येऊन धर्मकार्य करावे, अशी इच्छा प्रदर्शित केली होती. बडोद्याचे राजे कै. सयाजीराव यांचे सन्माननीय निमंत्रणही शास्त्रीबुवांनी झिडकारले ते केवळ स्वतःची अस्मिता राहावी म्हणून! आपल्या मतस्वातंत्र्याला शास्त्रीबुवा फार जपतात. नाहीतर आज ते फार मोठ्या पदावर काँग्रेसी पुढारी म्हणून राहिले असते. रॉयिस्ट, कम्युनिस्ट आदी खांदेपालट त्यांनी कधीच केले नसते पण कारण एकच. शास्त्रीबुवा आपल्या मनाची प्रतारणा करू शकत नाहीत.

त्यांच्या ज्ञानाची व वादविवाद कौशल्याची पहिली मोठी जाहीररीत्या झालेली परीक्षा म्हणजे सन १९३४ चे सुमारास महात्मा गांधींनी अस्पृश्यांच्या बाबतच्या निवाड्याबाबत केलेल्या उपासानंतर जी अस्पृश्यता निवारण्याची चळवळ झाली व त्या वेळी सनातनी हिंदूंनी अस्पृश्यतेला शास्त्राधार आहे, ती सनातन आहे म्हणून केलेली ओरड व त्यांची महात्माजींशी झालेली चर्चा व त्या वेळी महात्माजींचे वैदिक वाङ्मयाचे सल्लागार म्हणून शास्त्रीबुवांनी

केलेली बेडर पण समर्पक आणि सार्थ कामगिरी हीच होय. खुद्द काशीक्षेत्रातही त्यांनी अस्पृश्यता निवारणवाद अनेक महापंडितांना पटवून दिला. 'शास्त्री' मंडळातील मोठमोठे पंडित या आधुनिक 'बाळशास्त्र्या'पुढे पराभूत होऊन जाऊ लागले. त्या वेळचा वादविवाद हा अलीकडच्या काळातील एक संस्मरणीय प्रसंग होय! त्या वेळपासून लक्ष्मणशास्त्री एकसारखे वैचारिक आघाडीवरच आहेत. जिवंत प्रतिभा, तल्लख बुद्धिमत्ता व दीर्घोद्योग व सतत प्रगट होणारी ज्ञानलालसा यांच्या जोरावरच शास्त्रीबुवांनी फार मोठी 'विद्या' संपादन केली आहे. आपल्या विनयशील वर्तणुकीने ती सर्वांना आदरणीय व सुसह्य केली आहे. बालपणापासून त्यांना सुसंस्कारी शिक्षण आणि मोठा गुरुलाभ मिळाला आहे. त्यांचे थोर गुरुजी स्वामी श्री. प्रज्ञानंद सरस्वती यांनी अवघ्या १३-१४ वयाच्या 'लक्ष्मणा'ला वैशेषिक दर्शन शिकविले. केवळ पंधरा दिवसांत त्यांच्याकडून तर्कसंग्रह तयार करून घेतला. जुन्या पठडीतून गेलेले शास्त्रीबुवा कै. राजवाडे यांच्या मार्गदर्शनामुळे आधुनिक तत्त्वज्ञानाकडे प्रथम वळले. राजकीय वातावरण त्या वेळी (१९१०) फारच तप्त होते. चिपळूणकरांचे निबंध त्या वेळी शास्त्रीबुवांना मुखोद्गत होते. त्या साऱ्यांचा परिणाम त्यांच्यावर व संस्थेवर झाला. शास्त्रीबुवा राजकारणाकडे हिरिरीने वळले.

जिवंत ज्ञानाचा स्थायीभाव म्हणजे सतत जागृती. ती त्यांच्या ठायी प्रखरपणे अभिजात स्वरूपात आहे. पहिल्यापासूनच राष्ट्रीय चळवळीत ते होते व त्यातून त्यांचा वरच्या दर्जाच्या काँग्रेस पुढाऱ्यांशी दृढ परिचय झाला व तेथेही त्यांनी आपली योग्यता पटविली. त्यांच्या प्रगमनशील धोरणामुळेच त्यांना श्री. राजगोपाळाचार्य यांच्या कन्येचा महात्माजींच्या चिरंजिवाशी झालेल्या क्रांतिकारक व सुधारक विवाहप्रसंगी पौरोहित्यासाठी पाचारण केले गेले. त्यानंतर अशाच स्वरूपाचा फार मोठा मान या वाईकर भटजीला सोरटी सोमनाथाच्या प्राणप्रतिष्ठापनेच्या वेळी मिळाला. इंग्रजी घटनेचे भाषांतर संस्कृतात करण्यासाठी भारत सरकारने जी समिती नेमली होती, त्यात शास्त्रीबुवाच प्रमुख होते. त्यांच्या या कार्याचे कौतुक सर्व भारतात एकमुखी झालेले आहे. घटनेची आंग्ल परिभाषा संस्कृतच्या प्राचीन चौकटीत बसवून दाखवण्याची किमया शास्त्रीबुवाच करून दाखवोत!

वैदिक पांडित्याबरोबरच त्यांच्या ठिकाणच्या आधुनिक पांडित्याचे दर्शन जनतेला वेळोवेळी घडलेले आहे. त्यांना इंग्रजी शिवयला गुरूही मोठे थोर मिळाले होते. गांधींच्या आश्रमात त्यांना प्रथम आचार्य विनोबा भाव्यांनी इंग्रजी शिकविले. मात्र त्यांची इंग्रजी भाषेवर इतकी प्रभुता आहे की, त्या परकीय भाषेत ते तासन्तास व्याख्यान देऊ शकतात! भौतिकवाद व मार्क्सवादाचे आधुनिक सर्व तत्त्वज्ञान त्यांनी स्वतंत्रपणे स्वतः अभ्यासले आहे. त्यानंतर त्यांचा भाई मानवेंद्रनाथ रॉय यांच्याशी संबंध आला. हिंदुस्थानच्या राजकीय क्षेत्रात विख्यात क्रांतिकारक व तर्कशुद्ध विचारसरणीबाबत व नव्या मानवतावादी धोरणाबाबत प्रसिद्ध असलेले नेते श्री. मानवेंद्रनाथ रॉय यांच्या प्रत्यक्ष पदार्पणानंतर त्यांच्याकडे अनेक बुद्धिवंत

व प्रामाणिक राजकारणी पुरुष आकर्षित झाले. त्यात महाराष्ट्रात नाव घेण्याजोगा पंडित म्हणून श्री. लक्ष्मणशास्त्री यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल व त्या त्यांच्या कम्युनिस्ट अवस्थेमध्ये त्यांना महाराष्ट्र समाजापासून जरा दूर व्हावे लागले. थोड्या गैरसमजास व काहींच्या अनादरासही प्राप्त व्हावे लागले. परंतु त्यांनी त्याची कधीच पर्वा केली नाही. इतकेच नव्हे तर काँग्रेस पुढारी तुरुंगात असताना सन १९४१ मध्ये मध्यवर्ती असेंब्लीच्या निवडणुकीच्या वेळी त्यांनी महाराष्ट्रात श्री. जमनादास मेहता यांना पाठिंबा मिळविण्यासाठी काढलेला प्रचारकी दौराही असाच बेडर, पण जिवंत राजकीय प्रज्ञावंताचाच म्हणावा लागेल! त्यानंतरच्या काळात श्री. रॉय यांच्या मानवतावादाचे त्यांना एक मोठे भाष्यकार म्हणून महत्त्व प्राप्त झाले. त्या वेळी शास्त्रीबुवा प्रसिद्धीच्या अगदी शिखरावर होते. त्यांच्या तर्कतीर्थी तर्कशुद्ध विचार-प्रमेयांच्या कारंज्यांनी महाराष्ट्र पुलकित होत होता. त्यानंतर शास्त्रीबुवा पुन्हा आता परत काँग्रेसमध्ये शिरले. आता काँग्रेस अधिकारावर असल्यामुळे अनेक 'भलेबुरे' व 'बाजारबुणगे' लोक काँग्रेसमध्ये भाऊगर्दी करून राहिले आहेत व त्यांची आवक सतत वाढतच आहे. परंतु शास्त्रीबुवांच्यावर कोणी चुकूनही 'संधिसाधुपणाचा' आरोप केला नाही. त्यांच्या गेल्या दोन तपाच्या राजकीय जीवनात जरी अनेक स्थित्यंतरे झाली, तरी ते फरक नैसर्गिक होते; प्रगमनशील होते. त्यात 'अन्य हेतू' काहीच नव्हता. हे त्यांच्या मनाची ठेवण ज्यांना ठाऊक आहे, त्यांना सहज पटण्यासारखे आहे. वैयक्तिक मोठेपणा, अधिकारलालसा यांसारख्या कोठल्याही कारणांनी त्यांनी पक्षपालट कधीच केला नाही; तर फक्त त्यांच्या दृष्टीला ज्या ज्या वेळी जे प्रगतिपर वाटले, त्या त्या पक्षात ते जननिंदेची कदर न बाळगता शिरले व तेथे धैर्याने व प्रामाणिकपणे वागले व चमकले. त्यांना मतलबी, स्वार्थी, संधिसाधुपणाच करायचा असता तर तो त्यांनी निरनिराळ्या मार्गांनी या पूर्वीच अनेक वेळा केला असता. त्यांच्या सभांवर त्यांनी दगडफेक कधीच ओढवून घेतली असती, पण आपणाला जे प्रांजलपणे पटले ते ठासून मांडण्याचा त्यांचा बाणा आहे.

आध्यात्मिक व आधिभौतिक शास्त्रावर त्यांनी अनेक ग्रंथ लिहिलेले आहेत व ते विद्वत्मान्यही झालेले आहेत. 'हिंदुधर्माची समीक्षा', 'जडवाद' आदी त्यांचे ग्रंथ आणि आजवरचे शेकडो प्रासंगिक लेख सर्वविश्रुत आहेत. महामहोपाध्याय काणे, प्रिंसिपॉल घारपुरे वगैरेंच्या मदतीने श्री लक्ष्मणशास्त्री हल्ली जे धर्मकोशाचे प्रचंड काम करीत आहेत, ते डॉ. केतकरांच्या ज्ञानकोशाच्या कार्याइतकेच महत्त्वाचे आहे. ज्ञानकोशाचे प्रकाशनानंतर डॉ. केतकरांना महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे अध्यक्ष करून महाराष्ट्र साहित्यिकांनी त्यांचा सन्मान केला, तसाच किंबहुना थोडा अधिकच मान आज श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी यांना मिळत आहे.

मुंबईसह संयुक्त व अखंड महाराष्ट्र या मागणीच्या मागील जनतेचे अंतःकरण व उत्साह यांचे दर्शन दिल्लीच्या वरिष्ठ राजकारणी मंडळींच्या निदर्शनाला आणून व महाराष्ट्राच्या

थोर परंपरेचा अनुभव दिल्लीकरांतर्फे अखिल भारताला घडवून महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल करण्याचे हेतूने महाराष्ट्राचे संमेलन या वेळी दिल्लीला भरविले जात आहे. सदर संमेलनाचे उद्घाटन भारताचे महामंत्री श्री. पंडित जवाहरलालजी करणार आहेत व स्वागताध्यक्ष म्हणून श्री. काकासाहेब गाडगीळांसारखे मुरब्बी राजकारणी पुरुष आहेत. अशा ऐतिहासिक व क्रांतिकारक प्रसंगी श्री. शास्त्रीबुवांची संमेलनाच्या अध्यक्षपदी नियुक्ती होत आहे ही मोठ्या मानाची व अभिमानाची गोष्ट आहे. त्यांच्या निरपेक्ष वाङ्मयसेवेच्या सत्काराइतकीच महाराष्ट्राच्या या मोक्याच्या समयी असा कणखर, विद्वान व लोकधुरंधर तर्कतीर्थ नेता संमेलनाला लाभल्यामुळे महाराष्ट्रीयांची दिल्लीतील पत वाढणार आहे. श्री. शास्त्रीबुवा आपल्या अंगच्या अनेक अलौकिक गुणांनी महाराष्ट्राचा लौकिक हिंदुस्थानभर गाजवतील असा सर्वांनाच भरवसा वाटत आहे. त्यांची अध्यक्षीय कारकिर्द अत्यंत यशस्वी व्हावी, अशीच सर्वांची इच्छा आहे. शास्त्रीबुवांच्याकडून अनेक प्रकारे लोकांच्या अपेक्षा आहेत व त्या सर्व ते पुऱ्या करतील, अशी खात्री बाळगण्यास हरकत नाही.

तथापि या प्रासंगिक कामगिरीनंतर शास्त्रीबुवा आपले पूर्वीचे कोश पूर्ण करणेचे कामच आणखी काही काळ करीत राहतील. पण त्याचबरोबर त्यांच्या मोठ्या ज्ञानाचा फायदा जनतेला मिळणे हल्ली स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तर फारच जरूर झाले आहे. डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनी जसे 'अर्थशास्त्र व राजकारणशास्त्र' यांचे स्वतंत्र विद्यालय काढले आहे, तसे राजकीय घडामोडींचे व शास्त्राचे ज्ञान जनतेला देण्यासाठी त्यांनी पुण्यासारख्या मध्यवर्ती ठिकाणी एक 'विद्यालय' काढावे अशा विद्यालयाचे प्राचार्य म्हणूनच ते यापुढे शोभतील व जनतेला ते तसे हवे आहेत.

शास्त्रीबुवांनी वयाच्या विसाच्या वर्षातच अखिल भारतीय कीर्ती मिळविली व आजच चाळिशीची हद्द ओलांडल्यानंतर ते त्या दर्जात स्थिर झाले आहेत. या पुढे त्यांना अधिक तर उज्ज्वल भाग्य व दीर्घारोग्य लाभावे हीच इच्छा.

**(महाराष्ट्र, १९५४)**

❍❍❍

# ११.
# तर्कतीर्थांचे क्रांतिकार्य
## रमेश रामचंद्रराव चव्हाण

महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे भूतपूर्व अध्यक्ष, सोरटी सोमनाथाच्या जीर्णोद्धाराचे अध्वर्यु, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष, महाराष्ट्राला बौद्धिक नेतृत्व देणारे विचारवंत नेते आणि आमच्या महाविद्यालयाचे प्रमुख संस्थापक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हा आम्हा विद्यार्थ्यांचा, तरुण पिढीचा बहुमोल आदर्श आहे. या सर्व कार्यक्षेत्रांत त्यांनी मिळविलेल्या यशाचे श्रेय त्यांच्या सर्वसंग्राहक वृत्तीत आहे.

प्राज्ञपाठशाळेतून व तिच्याचद्वारे त्यांच्या चरित्राचा व कार्याचा विकास झाला. कृतज्ञपणे त्यांनी प्राज्ञपाठशाळा मंडळाचा विकास होण्यासाठी आपले स्वतःचे आयुष्य वेचिले. तर्कतीर्थांची पूर्वपरंपरा पुढे तत्त्वनिष्ठ परिवर्तनवादी स्वरूपात विकास पावली. तथापि तर्कतीर्थ यांच्या जीवनाचे स्वरूप काहीसे मार्टिन ल्युथरप्रमाणे राहिले. 'हिंदुधर्माची समीक्षा' या पुस्तकाच्या वाचनामुळे वरील विधानासंबंधीची खात्री होण्यासारखी आहे. परिवर्तनवाद हा काही जीर्ण सनातन बीजे तशीच कायम ठेवितो; नव्हे त्याची जोपासनाही करतो. परंतु 'रॉय' यांच्या प्रभावामुळे तर्कतीर्थ मानवतावादी झाले. नवमानवतावादाच्या परिणामामुळे तर्कतीर्थ क्रांतिकारक ठरले. तर्कतीर्थ म्हणजे विचार-विवेक आणि सारासार ज्ञान होय. राममोहन सनातनी कुटुंबात वाढले. पण त्यांनी अनेक धर्म व विविध भाषा यांचे स्वतःच्या परिश्रमाने अध्ययन केले. हाच अनुभव तर्कतीर्थांच्या जीवनओघात आला. राममोहन यांच्याप्रमाणे त्यांचे विचार सर्वव्यापक झाले. राममोहन यांनी आधुनिक विद्या, भौतिक शास्त्रे व इंग्रजी शिक्षण यांचा पुरस्कार केला. तद्वतच तर्कतीर्थांनी संस्कृत प्राज्ञपाठशाळेला कॉलेजची जोड देऊन त्या विचारांचे आधुनिकीकरण केले, अद्ययावतता साधली. तत्त्वज्ञान व व्यवहार यांची सांगड येथे आढळते. येथे सायन्स शिक्षणाची सोय झाल्यास हा समन्वय बऱ्याच प्रमाणात यशस्वी होईल व क्रांतिकारक कार्य पुष्कळच पुरे होईल. ज्ञानविज्ञानाचा समन्वय होईल व विज्ञानाच्याही क्षेत्रात शास्त्री व प्राज्ञ तयार होतील.

सामान्यतः संस्कृतशिक्षित पंडित व शास्त्री यांच्या विचारांची मजल हिंदुत्वनिष्ठेची कक्षा साहजिकपणे ओलांडू शकत नाही. तर्कतीर्थांनी अहंकारी राष्ट्रवादाच्याही मर्यादा ओलांडल्या. म्हणून मी त्यांना 'क्रांतिकारक शास्त्री' म्हटले.

तर्कतीर्थांनी स्वतःची दृष्टी बहुजन समाजवादी राखली. म्हणूनच त्यांना राजकारणात ग्रामीण जनतेशी, नेतृत्वाशी एकरूप होता आले. ग्रामीण प्राकृत जनता म्हणजेच बहुजन समाज होय. आपल्या कॉलेजची संस्थापना तर्कतीर्थांनी वाई व तिच्या परिसरातील ग्रामीण जनतेच्या उद्धारार्थच केली आहे. पांढरपेशांच्याच विचारसंग्रामात त्यांनी स्वतःला गुरफटून ठेवले नाही. पांढरपेशा समाज म्हणजे सारे राष्ट्र व सगळी आम जनता नव्हे. परंपरागत विचारसरणी व सार्वजनिक आयुष्यात पुष्कळ वेळा कोत्या ठरणाऱ्या मर्यादित दृष्टीच्या पलीकडे त्यांनी अमर्यादपणे पाहून क्रांतिकारक वैचारिक कार्य केले, लोकनिंदेची पर्वा केली नाही. ते वादाच्या भरीस पडले नाहीत. ज्ञाननिष्ठ असे कर्मयोगी राहून त्यांनी परंपरेचा विकास व संवर्धन केले. त्यांची ज्ञानसाधना, दीर्घवाचन, मनन आणि चिंतन सर्वच विद्यार्थ्यांना आदर्श असे आहे. त्यांची भाषा व लेखनातील भारदस्तपणा विचारवंतांचे लक्ष वेधून घेतो. जीवनाच्या हरएक क्षेत्रात उच्च पातळी राखण्याचा त्यांचा प्रयत्न सतत असतो व तो अनुकरणीय असा आहे.

शास्त्री म्हणजे सनातनी असा अनुभव असतो पण ही वहिवाट तर्कतीर्थांनी मोडली. चिपळूणकरी विचारांची री ओढत बसण्याची सांप्रदायिक परंपरा त्यांनी दूर सारली. 'ज्योतिनिबंध' ह्या त्यांच्या पुस्तकावरून याची साक्ष पूर्णपणे पटते. या 'ज्योतिनिबंधा'मुळे परंपरावादातून बाहेर पडून त्यांनी क्रांतिकारक विचार धाडसाने मांडले. सामान्य शास्त्री हे वैचारिक साहस सहसा करणार नाहीत, म्हणूनच मला ते असामान्य शास्त्री वाटतात. एवढेच नव्हे तर ते आदर्श विद्यार्थी आहेत.

'हिंदुधर्माची समीक्षा'त तर्कतीर्थांनी परंपरावादी अनेक विचारांचे रास्त खंडन केले आणि पवित्र समजल्या जाणाऱ्या अनेक पूर्वग्रंथांवर समतोल टीका केली आहे. त्यांच्या वैचारिक क्रांतिकार्याची ही साक्ष अमर आहे. तौलनिकदृष्ट्या प्रत्यक्ष पाहिल्यावर जोतिबा फुल्यांच्या 'गुलामगिरी'पेक्षाही तर्कतीर्थांची ही 'हिंदुधर्माची समीक्षा' प्रखर आहे. त्यांनी स्वतःचे विचार गतिमान व विकासक्षम ठेवले. ग्रंथप्रामाण्य किंवा शब्दप्रामाण्याला सर्वसामान्य शास्त्रीपंडितांप्रमाणे ते मुळीच बद्ध राहिले नाहीत. ज्या विचारांत दोष विचारांती दिसून आले व येऊ शकतात, त्या त्या प्रमाणे त्यांनी वैचारिक बदल केले. त्या दृष्टीने नंतर मार्क्सवादापासूनही सुटका करून घेतली. याचे कारण ते कधीच पक्षपूजक किंवा पोथीनिष्ठ (Dogmatic) नव्हते. नेहमीच बुद्धिवादी राहिले.

ज्ञानाच्या क्षेत्रात सतत साधना करणारे संशोधक विद्यार्थी तसेच राजकारणी व मुत्सद्दी असा त्यांनी लौकिक मिळविला आहे. यामुळे सर्वच विद्यार्थ्यांना ते आदर्श आहेत. ज्ञानाचा

नंदादीप सतत तेवत राहील, अशी योजना त्यांनी केली. वाई कॉलेजचे मूळ त्यांच्याच विचारांत सुप्तावस्थेत होते व ते आता साकार व दृश्य झाले आहे. परिश्रमाने ते बद्धमूल व वर्धमान झाले आहे.

दर्जा (Standard) वाढविणे व तो राखणे हा एक उपेक्षिला गेलेला शैक्षणिक क्षेत्रातील मुद्दा व अनुभव त्यांनी मांडला व त्या दृष्टीने कार्याची रचना केली. दर्जा राखणे व वाढविणे हे कार्य विद्यार्थी, अध्यापक आणि शिक्षणसंस्था यांच्याच सहकार्याने करता येते. या सत्कार्याचे दर्शन वाई कॉलेजच्या मार्गक्रमणाच्या इतिहासात होते.

वाई येथे स्थानिक संस्थेच्याच द्वारे कॉलेज चालवून दाखविणे ही क्रांती आहे. कारण तेथील सर्व शैक्षणिक संस्था बाहेरच्या संस्थांकडून चालविल्या जातात. या परावलंबनाच्या परंपरेत तर्कतीर्थांनी क्रांती केली. ही कार्यात्मक क्रांतीदेखील बहुमोलाची आहे. व पर्यायाने ही तपश्चर्या वाई परिसरातील बहुजन समाजाच्याच कायापालटणीच्या महत्त्वाच्या कार्यास उपयोगी पडेल. त्यांचाच यामुळे मुख्यतः विकास होईल, असा विश्वास आहे. प्राज्ञपाठशाळेची संस्थापना ब्रह्मीभूत श्री केवलानंद सरस्वती यांनी केली व श्री. दिवेकरादी शास्त्री-पंडितांनी या शाळेचे संवर्धन केले, परंतु या सर्वांच्याच परिश्रमाला व तपश्चर्येला श्री. तर्कतीर्थांनी फार मोठ्या प्रमाणात विधायक दृष्टी देऊन वरील कार्याचा नेत्रदीपक विकास केला हेच खरे. प्राज्ञपाठशाळेच्या विकसनशील इतिहासातील तर्कतीर्थांची व्यावहारिक दृष्टी व त्यांची उपस्थिती वगळली तर संस्थापकांच्या पश्चात म्हणजे (श्री केवलानंद यांच्या वियोगानंतर) प्राज्ञपाठशाळा मंडळाचा जो सर्वांगीण विकास झाला, तो झालाच नसता असे धाडसाने म्हणावेसे वाटते. वाई कॉलेजच्या दृष्टीने देखील हेच विधान करता येते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री यांनी कॉलेजला अंग व आत्मा जर दिला नसता तर कॉलेजही उभे राहिले नसते. त्यांची मानवी दृष्टी, सर्वसंग्राहकता, सामाजिक व्यापकता व दर्जा यासंबंधीची दृष्टी पुढे टिकवून धरणारे नेतृत्वही दृष्टिक्षेपात आज तरी दिसत नाही. म्हणून तर्कतीर्थांना प्राज्ञपाठशाळा मंडळाचे इतिहासात अद्वितीय, असामान्य, अभूतपूर्व असे म्हणावे लागेल. त्यांची सामाजिक सुधारणापर दृष्टी व 'दर्जावाद' टिकवून धरणे तसे सोपे नाही. त्यासाठी फार कष्ट व त्याग करावा लागेल, हे नम्रपणे सांगणे इष्ट वाटते. प्राज्ञपाठशाळा जरी वाईत कार्य करते, तरी प्राज्ञपाठशाळा मंडळात वाईच्या बाहेरच्या प्राज्ञ सभासदांचा समावेश करण्याची प्रथा तर्कतीर्थांच्याकडून मुद्दाम संवर्धिली गेली व त्यामुळेच विकास शक्य झाला. प्राज्ञपाठशाळा मंडळाची एक कचेरी मुंबईमध्ये स्वतःच्या मालकीच्या जागेत उघडली गेली आहे. म्हणून प्राज्ञपाठशाळा मंडळाच्या संशोधनात्मक कार्यालाही तसा स्थानिक बांध व मर्यादा घालणे इष्ट नव्हे, कारण ज्ञानाला, संशोधनालाही अशा अपुऱ्या प्रादेशिक

मर्यादा नसतात. तर्कतीर्थांची दृष्टी केवळ स्थानिक नाही, म्हणूनच तर्कतीर्थांनी हितचिंतक व साहाय्यक मिळविताना कोता भाव बाळगला नाही व कोते राजकारणही पत्करले नाही. यामुळेच त्यांना श्री. यशवंतराव चव्हाणांचे साहाय्य व मार्गदर्शन मिळविता आले.

केवलानंद स्मारक मंदिराच्या व कॉलेजच्या उभारणीच्या वेळी श्री. यशवंतराव चव्हाण यांचे झालेले साहाय्य सुवर्णाक्षरांनी नोंदवावे लागेल. नामदार श्री. चव्हाण व तर्कतीर्थ यांच्याच समन्वयाने हा विकास घडला. नामदार चव्हाणांचा सहवास, साहाय्य व मैत्री यांच्या योगाने त्यांचे क्रांतिकारक कार्य पूर्णावस्थेस पोहोचले. श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या जीवनप्रवाहात व गतिमान बौद्धिक आयुष्यओघात चव्हाण-साहाय्याला फारच महत्त्वाचे स्थान आहे. तर्कतीर्थांची अंतिम भूमिका लोकशाही व निधर्मी ठरली.

समानशील व समान मते यांमुळे मैत्री वाढत जाते व गुणाधिक्याने सामान्य माणूस असामान्यतेच्या पदास चढतो, याची प्रचिती तर्कतीर्थांच्या चरित्रचिंतनातून येते. गुणाधिक्यामुळेच नेतृत्व, आदर्शत्व येते व जनमनात जिव्हाळा विकसित होत जातो.

कॉलेज व तत्समान महान कार्ये यांच्या संबंधीचा जिव्हाळादेखील दर्जा (Standard) वर्धमान राखल्यामुळे वाढेल. गुणाधिक्याचे माहात्म्य सर्वसामान्य जनता ओळखते. व ही अपेक्षित क्रांती तर्कतीर्थांच्या वरील सर्वसंग्राहक, जनता संपर्कवादी धोरणाच्या विकासाने आत्मसात करता येईल.

**(‘कृष्णाई’, ६५-६६, मानव्य व वाणिज्य महाविद्यालय, वाई, नियतकालिकामधून)**

❍❍❍

# १२.
# माझ्या सहवासातील तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी
## श्री. भाई माधवराव बागल

आठवत नाही बरोबर; पण बहुधा असेल १९३० साल. मी कराड तालुक्यात व्याख्यानाच्या दौऱ्यावर होतो. कराड तालुक्याच्या बटाणे या पुढाऱ्यांनी तो आखला होता. कराड जवळचेच कोणते तरी एक खेडे असावे. (आमदार) आत्माराम पाटीलही त्या वेळी बरोबर असावेत.

त्या माझ्या सभेत एक भटजीही बोलायला उठले. त्यांना कदाचित मुद्दाम बोलावून आणलेही असेल. पण ही स्वारी, भटजी म्हणजे अगदी भटजी! शंभर नंबरी भटजीचा अवतार! गुळगुळीत चकाकणाऱ्या गोटूयावर, सहारा वाळवंटावर एखादे झुडूप डोकावल्याप्रमाणे, शेंडी लोंबत होती. मी होतो बुटासुटात, तर भटजी होते भर सभेत अगडबंब! अंगावर उपरणे टाकले होते तरी जानवे आणि तुळतुळीत भोजनयष्टी काही झाकली नव्हती.

कोल्हापूरचा सत्यशोधक मी! ब्राह्मणाकडे काही आदराने पाहणारा नव्हतो! अन् त्यात हा अगडबंब अवतार! पाहताच माझ्या कपाळाला आठ्या पडल्या. पण बोलताना बरा बोलला गृहस्थ! त्या सोवळ्या अवतारात बसण्याजोगे नव्हते ते व्याख्यान. जवळजवळ सत्यशोधकीच विचार होते त्याचे. पोशाख सनातनी होता पण विचार भरपूर पुरोगामी-सत्यशोधकीच होते.

यामुळे प्रथमदर्शनी जो तिटकारा निर्माण झाला होता, तो जाऊन ती जागा आदराने, कौतुकाने व आपलेपणाने घेतली व तीच भावना आज एप्रिल १९६६ पर्यंत टिकली आहे.

पण तेच हे भटजी असे त्यांनी शपथ देऊन, पुरावा पुढे केला तरी आता खरे वाटणार नाही, असा त्यांच्या पेहरावात, परिस्थितीत व व्यासंगात बदल झाला आहे. हेच सोवळे गृहस्थ एकदा गांधीवादी भक्तांच्या संगतीत सहभोजनाला बसले होते. त्यात काही सर्वोदयींच्या खास अन्नाची ताटे पडली होती. सडीचा भात, गायीचे दूध, फळे वगैरे. एकाच पंक्तीत हे अन्नसेवकांचे वर्ग पडले होते. याच पंक्तीत कराडचे ते ब्राह्मण बसले होते. ते म्हणाले,

"आणखी येथे हा कसला जातिभेद. एकाच पंगतीत हे निरनिराळे प्रदर्शन का? आपल्याला हे काही आवडत नाही. सर्वांबरोबर जे असेल, जे मिळेल ते खावे. आवडत नसेल तर पंगतीत बसू नये. आपल्या समाजात काय कमी मतभेद आहेत, म्हणून त्यात ही आणखी भर?"

त्या पंगतीत शंकरराव देव वगैरे गांधीवादी बसले होते. कराडच्या त्या ब्राह्मणाचा तो स्पष्टपणा ऐकून मी तरी अगदी बहेद्द खूश होऊन गेलो. त्या वाक्याने तो मला ब्राह्मण जातीचा उरला नाही. तो माझाच जातभाई झाला. सत्यशोधक!

त्या पंगतीतल्या एका गांधीवादी म्हणवून घेणाऱ्याला ती स्पष्टोक्ती आवडली नाही. तो म्हणाला,

"मग निषिद्ध अन्न असले तरी ते खावे म्हणता का आपण?"

"निषिद्ध म्हणजे कोणते ते बोला ना?"

"अहो मांस."

"अहो मांस खाणाऱ्या पंगतीत बसला असाल तर मांस खाल्ले पाहिजे. नाहीतर त्या पंगतीत बसू नये."

"मग तुम्ही मांससुद्धा खाल काय?"

"हो पंगतीत बसलो तर जरूर खाईन. अशी जात निर्माण करण्यापेक्षा मांस खाल्लेले मला परवडलं. मांसच काय, इंग्रजी समाजात बसलो तर पिईनसुद्धा."

"अहो, असे बोलू तरी नका!"

"का? अशी मताची छपवाछपवी करणे मला आवडत नाही."

या त्यांच्या भाषणामुळे त्यांच्या-माझ्यामधील परकेपणा समूळ नष्ट झाला व ते माझे मित्र आणि नातलग झाले. माझे त्यांचे संबंध जवळचे झाले. ते माझ्या घरी आले. राहिले, जेवले व आमचे अन्न तितक्याच गोडीने त्यांनी खाल्ले.

ही व्यक्ती म्हणजे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी होय.

याच त्यांच्या स्वभाव व वागणुकीमुळे कोल्हापूर येथे रा. रा. मुकुंदराव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या सत्यशोधक परिषदेचे उद्घाटक म्हणून तर्कतीर्थांना बोलावण्यात आले. व हे मी व भास्करराव जाधव यांनी विचाराने ठरवले.

तर्कतीर्थांनी महात्मा फुले यांच्यावरही अभ्यासू व विचारप्रवर्तक लेख लिहिला आहे. आणि फुले तर सत्यशोधक, ब्राह्मण्याचे वैरी व ब्राह्मणेतर समाजाचे दैवत, ब्राह्मणेतर पुढाऱ्यांचे पुढारी व मार्गदर्शक.

मी स्वतः निरीश्वरवादी. देव, धर्म, बुवाबाजीवर मी लेखातून, ग्रंथातून व व्याख्यानांतून बरेच हल्ले चढवलेले, मार्क्सवादी. त्या माझ्या हातात त्यांचे जडवाद पुस्तक पडले. मग काय! पूर्वीहून तर्कतीर्थ आणखी जवळ आले.

त्यांचे माझे मैत्रीचे संबंध लोकांना माहीत झाल्यामुळे कोणत्या तरी एका समारंभात

राजाराम कॉलेजमध्ये मी होतो उद्घाटक व तर्कतीर्थ होते अध्यक्ष. प्रो. पंगू त्या वेळी हयात असावेत. तर्कतीर्थांची व माझी अधिक सलगी असल्यामुळे मी उद्घाटन भाषणात म्हणालो-

"आता तर्कतीर्थ बोलतील. ते अत्यंत विद्वान आहेत, अभ्यासू आहेत, पुरोगामी विचारांचे आहेत. ते मुलांना शिकवतील; पण मुलांपासूनही त्यांना पुष्कळ शिकण्याजोगे आहे. ती म्हणजे सोपी भाषा. विद्वानांनी सोपी भाषा बोलायला व लिहायला शिकले पाहिजे. ते सोप्या भाषेत बोलले तरच विद्यार्थ्यांना काहीतरी समजेल, नाही तर त्यांचे ते जडवाद! ते पुस्तक त्यांनी लिहिले आहे म्हणून मी ते विकत घेऊन वाचले. पण त्यापेक्षा मला जडवादावरची इंग्रजी पुस्तके सोपी वाटली. व मराठी शब्द समजण्याकरिता इंग्रजी डिक्शनरी उघडावी लागली!!!"'

यावर आपल्या भाषणात तर्कतीर्थ म्हणाले, "माझ्या एका मित्राला मी माझे 'हिंदुधर्माची समीक्षा' हे पुस्तक वाचायला दिले. वाचून परत केल्यावर त्याला विचारले, 'कसे काय आवडले का पुस्तक?"'

त्यावर तो म्हणतो, "पुस्तक वाचनीय, मननीय व अभ्यसनीय आहे, पण आपण मराठीत लिहिले असते तर अधिक बरे झाले असते! आता सांगा, माधवरावांची टीका या मानाने किती सौम्य! प्रयत्न करूनही सोपे लिहायला येतच नाही मला!"

हा तर्कतीर्थांचा प्रांजलपणा मला फार आवडला.

कोल्हापूरला गंगावेशीत सत्यसमाज मंदिरासमोर व्याख्यान होते. मी अध्यक्ष असेन. मी म्हणालो,

"गीता हा कितीही उद्बोधक व महत्त्वाचा ग्रंथ असला तरी मार्क्सवादी दृष्टिकोनातून पाहिल्यास त्यात वार्गिक वर्चस्वाचा गौरव केलेला आढळतो. गरीब प्राण्यांची पिळवणूक करणाऱ्या व त्यांच्या रक्तावर जगणाऱ्या पाण्यातील 'मगरात', पक्ष्यांतील 'गरुडात', जनावरांतील 'वनराज सिंहात' व माणसांतील- नरांतील- नृपाधिपांत- राजात ईश्वराचा अंश आहे. व राजदंडात ईश्वरी आज्ञा आहे असे प्रतिपादन केल्याचे आढळते."

माझी ही विचारसरणी तर्कतीर्थांनी न खोडता ती मान्य केली.

हा तर्कतीर्थांचा प्रामाणिकपणा मला फार आवडला. ते आग्रही दिसले नाहीत.

या अशा प्रसंगांमुळे आणि अनुभवांमुळे आम्ही अधिकाधिक जवळ येत गेलो.

त्यांनी मला अनेक वेळा वाईला व्याख्यानासाठी बोलावले. माझ्यासाठी मला आवडणारे पदार्थ हॉटेलातून आणून जेवण दिले व तेही संकोच न मानता मजबरोबर खाल्ले.

त्यांचा माझा पत्रव्यवहार असे. आज त्यांच्या इतर व्यवसायांमुळे कमी झाला असला तरी तो नाहीसा झालेला नाही. त्यांची पत्रे फार मन मोकळेपणाने लिहिलेली असतात, हात आखडून लिहिलेली नसतात. मीही त्यांच्यावर तितक्याच मोकळ्या मनाने टीका करीत असे.

तर्कतीर्थांनी जडवादावर पुस्तक लिहिलेले ते निरीश्वरवादी- सत्यशोधक. आणि सोमनाथ मंदिराचा पुरोहितपणा केलेला ऐकून मी त्यांना बोललो,

''तर्कतीर्थ, याचा अर्थ काय लावायचा?''

ते हसले व खिजलेही. म्हणाले, ''त्याला म्हणायचा व्यवहार.''

माझे आत्मचरित्र 'जीवनप्रवाह' पुस्तक तयार झाले. त्याची प्रस्तावना त्यांनीच लिहिली. त्याचे प्रकाशन तर्कतीर्थांच्याच हस्ते केशवराव भोसले थिएटरात करण्यात आले. माझ्या साठावीला त्यांनी 'मौज'मध्ये माझ्यावर खास लेख लिहून माझी त्या वाचकांना ओळख करून दिली व मला उपकृत केले.

अलीकडे त्यांच्या माझ्या फारशा गाठी पडत नाहीत. सं. म. समितीतर्फे आखलेल्या प्रतापगड मोर्चासाठी मी गेलो होतो. त्या मोर्चाचा ठराव माझ्याच अध्यक्षतेखाली झाला होता. तर्कतीर्थ यशवंतरावजी चव्हाणांचे परमस्नेही आणि हितचिंतक. मी त्या वेळी समितीत. तर्कतीर्थ काँग्रेसचे, त्यातही यशवंतरावांचे लाडके. यशवंतराव तर त्या वेळी समितीचे शत्रू!

पण मोर्चा पार पडल्यानंतर आणि काँग्रेसवर व यशवंतरावजींच्यावर भरपूर तोंडसुख घेतल्यानंतर मी रात्रीचा मुक्काम ठोकला तर्कतीर्थांच्यात आणि एकमेक मिठास बोललो. दोन्ही बाजूंच्या मंडळींना आश्चर्य वाटले.

आता तर्कतीर्थांची माझी फारशी भेट पडत नाही. रागावून पत्र पाठवले म्हणजे दिलगिरी प्रदर्शित करतात.

सुरुवातीचे उघडेबंब सोवळे भटजी आता संस्कृतीच्या महान पीठावर आरूढ झाले आहेत. मोठ्या जबाबदाऱ्या अंगावर घेतल्या आहेत. त्यांच्या प्रोत्साहनाने अनेक ग्रंथ बाहेर पडत आहेत.

गाठीभेटी कमी झाल्या तरी मैत्री कमी झाली आहे असे मात्र नव्हे.

**(नवभारत, जुलै, १९६६, मूळ लेखातील निवडक भाग, पृ. ४७-४९,**
**मूळ लेख शीर्षक-'माझ्या सहवासातील तीन व्यक्ती')**

 OOO

## १३.

# ज्ञानाचा प्रवाह खुले करणारे शास्त्रीजी

## प्राचार्य अ. के. भागवत

"आजचा सत्कार म्हणजे आपल्या वाई महाविद्यालयाच्या कुटुंबातील एका ज्येष्ठ नातेवाइकाचा ७५ व्या वर्षात पदार्पण केल्याबद्दल सत्कार आहे. महाविद्यालयाच्या स्थापनेत त्यांचा पुढाकार आहे. ते प्राज्ञपाठशाळेने सुरू केले. काही वर्षांनंतर सध्याच्या जनता शिक्षण संस्थेकडे ते आले. ते सत्तांतर अत्यंत सरळ सुगम झाले. त्यात कटुता आली नाही. शास्त्रीबुवांचे मार्गदर्शन पूर्वीसारखेच चालू राहिले."

काही म्हणतात, "बौद्धिक, वैचारिक क्षेत्र आणि प्रत्यक्ष कार्य या क्षेत्रांत तफावत आढळते." ही दरी भरून काढणाऱ्या क्रियावान पंडितांतले शास्त्रीबुवा हे एक! १९ व्या शतकात भारतामध्ये नवजीवनाची चळवळ आली. पाश्चात्त्य विद्यांचा, विज्ञानाचा स्वीकार करायचा की पौरस्त्य पारंपरिक शास्त्रग्रंथ अभ्यासायचे, याबद्दल मोठा वैचारिक संघर्ष झाला. त्या वेळी राजा राममोहन रॉयनी विचारपूर्वक पाश्चात्त्य विद्यांचा स्वीकार केला. इंग्रजी शिक्षणाचे एक नवे पर्व सुरू झाले. पाश्चिमात्य तत्त्वज्ञानातील, फ्रेंच क्रांतीने प्रस्थापित केलेली स्वातंत्र्य, समता व बंधुता ही मूल्ये भारताने स्वीकारावी; परंतु त्यामागे वैदिक संस्कृतीच्या सर्वाभूती एक आत्मा पाहणाऱ्या व्यापक वैश्विक तत्त्वज्ञानाचा पाया उभारावा, अशी राममोहन यांची समन्वयवादी भूमिका होती. सबंध मानवी संस्कृतीच्या विकासात भारतीय संस्कृती हा एक अविभाज्य भाग आहे असे शास्त्रीबुवांनी 'वैदिक संस्कृतीचा विकास' ह्या आपल्या ग्रंथात मांडले. पाश्चात्त्य व पौर्वात्य संस्कृतींचा समन्वय अथवा संघर्ष यापेक्षा ही संस्कृतीच्या एकात्मतेची भूमिका वेगळी होती; अधिक विकसित होती.

शास्त्रीजींनी केवळ विचारांना चालना दिली नाही तर मूल्यांचा प्रत्यक्ष स्वीकार केला व ती कार्यवाहीत आणण्यासाठी अविरत प्रयत्न केले. भारतीय पारंपरिक पद्धतीने त्यांनी प्राचीन विद्यांचा, धर्म-तत्त्वज्ञान-ग्रंथांचा सखोल अभ्यास केला. भारतीय तत्त्वज्ञानामधील सूक्ष्मता,

विचारांची खोली व परमतसहिष्णुता ह्यांचा त्यांच्या मनावर ठसा उमटला. परंतु भोवताली पाहिले तर समाजाची गतिमानता व चैतन्य नष्ट होत चालली होती. शास्त्रीजींनी परंपरा स्वीकारली; विचार व प्रत्यक्ष व्यवहार ह्यांतील तफावत त्यांना जाणवली. आणि अशा एका निर्णायक अवस्थेत त्यांची आणि केवलानंदांची गाठ पडली व त्यांनी आधुनिकतेचा स्वीकार केला.

केवलानंदांच्या नेतृत्वाखाली प्राज्ञ पाठशाळेतील शास्त्री-पंडितांनी गांधी विचारांचे स्वागत केले, ही गोष्ट महाराष्ट्राच्या सामाजिक व राजकीय इतिहासात महत्त्वाची आहे, असे सांगून प्राचार्य भागत म्हणतात, ''ह्यामुळे शिकलेला, पुढारलेला वर्ग व बहुजनसमाज यांच्यात सामंजस्य निर्माण झाले. गांधीविचार हा बौद्धिकता व क्रियाशीलता यांच्यात सेतू होता. दैनंदिन व्यवहारामागील सत्याचे प्रयोग करून पाहण्याच्या गांधीजींच्या पद्धतीचा शास्त्रीजींच्या मनावर प्रभाव पडला असेल. भारतीय परंपरेतील अहिंसा, सत्य, अस्तेय, असंग्रह, ब्रह्मचर्य या मूल्यांचा गांधीजींनी केलेला पुनरुच्चार त्यांना रुचला असावा. आश्रमातील व्रतस्थ, सात्त्विक जीवनाचे त्यांना आकर्षण वाटणे साहजिक होते. अस्पृश्यता, विधवाविवाहाला मनाई ह्यांसारख्या रूढींना शास्त्राधार शोधण्याची मोठी जबाबदारी गांधीजींनी त्यांच्याकडे सोपवली आणि शास्त्रीजींनी ती चोखपणे बजावून ह्या रूढींना शास्त्राधार नाहीत, असे ठामपणे सांगितले. गांधीजींनी त्यांच्याबद्दल उद्गार काढले, 'ए मॅन ऑफ लर्निंग अँड स्पॉटलेस कॅरॅक्टर!' पंडित आणि निष्कलंक चारित्र्याचा मनुष्य! गांधीविचारातील ही गतिमानता स्वीकारार्ह वाटली तरी काही प्रमाणात ज्ञानविज्ञान विरोध, व्यक्तिवादावर, अंतःप्रेरणेवर दिलेला भर यांमुळे शास्त्रीजींचे बुद्धिवादी मन गांधीविचारांत फार काळ रमणे शक्य नव्हते. त्यांनी मार्क्सवादाचा अभ्यास सुरू केला. गांधीजींच्या १९३०-३२ च्या चळवळीनंतरच्या कारावासात तो करण्याला निवांतपणा मिळाला. त्यांनी इंग्रजीचा अभ्यास त्या आधी विनोबा भावे वाईला प्राज्ञपाठशाळेचे विद्यार्थी असताना त्यांच्याकडे केला होता. लवकरच तत्त्वज्ञान, समाजशास्त्र यांवरील ग्रंथ मूळ इंग्रजीतून वाचण्याइतकी त्यांची प्रगती झाली. आज ते विद्वत्सभेत तत्त्वज्ञान विषयावर इंग्रजीत बोलू शकतात.

विचार मांडणारा बुद्धिवादी व काम करणारा कष्टकरी यांमध्ये मार्क्सने वैचारिक एकसंधता निर्माण केली. विचार हा जड भौतिक परिस्थितीतून निर्माण झाला. जडातूनच चैतन्य निर्माण होते, हा विचार मांडला. उत्पादनाची, नवनिर्माणाची शक्ती कामगाराकडे, श्रमिकांकडे, पण त्याच्या हातात सत्ता नाही. उलट त्याच्या श्रमावर सत्ताधारी जगतात, फोफावतात. सत्ता कामकरी, कष्टकरी या वर्गाकडे गेली पाहिजे, असा क्रांतीचा संदेश मार्क्सने दिला; पण ह्यात एक तऱ्हेचा नियतिवाद होता. उत्पादनाच्या साधनांची मालकी व अर्थव्यवहार ह्यांना अधिक महत्त्व दिले गेले होते. विचार हा पूर्णपणे परिस्थितिसापेक्ष मानला होता. व्यक्तीची

सामाजिक बंधनांतून मुक्ती करण्यासाठी अवतरणारा साम्यवाद तिला अधिकच बांधून ठेवीत होता. शास्त्रीजींनी मार्क्स स्वीकारल्याचा पुरावा त्यांच्या 'हिंदुधर्माची समीक्षा' ह्या ग्रंथात मिळतो. हिंदुधर्मातील कर्मकांडांवर, वर्णभेद-जातिभेद इत्यादींवर त्यांनी मार्क्सवादी दृष्टिकोनातून टीका केली. त्यांनी लिहिलेल्या 'ज्योति-निबंधा'ने जोतिबा फुल्यांचे महत्त्व नव्याने तरुण पिढीला पटले. त्यातील मीमांसासुद्धा बव्हंशी मार्क्सवादी पद्धतीची आहे.''

प्राचार्य भागवत पुढे म्हणतात, ''मार्क्सवादातील उणिवा व न्यूनता यांवर बोट ठेवून त्याच्यात बदल घडवून आणण्याचा प्रयत्न मानवेंद्रनाथ रॉय यांनी केला. रॉय यांचे आंतरराष्ट्रीय साम्यवादी चळवळीतले स्थान फार थोर होते. भारतात आल्यावर प्रथम मार्क्सवादी पद्धतीने त्यांनी गांधीजींच्या व्यक्तिवादी राष्ट्रवादावर, अध्यात्मावर जोराची टीका केली. स्वतःला प्रथम नवमार्क्सवादी म्हटले, परंतु मार्क्सवाद टाकून एका नव्या नवमानवतावादाचा त्यांनी स्वीकार केला. नवमतवादात मानवाचे व्यक्तित्व हा केंद्रबिंदू मानला; मानवाचे स्वातंत्र्य व संपूर्ण विकास यांवर भर दिला गेला. बुद्धिवादाला, विज्ञानाला, आधुनिक ज्ञानाला महत्त्व दिले गेले. भारतीय संस्कृतीतील चिरंतन भाग हा व्यापक मानवी संस्कृतीचा एक भाग मानला गेला. रॉयच्या विचारसरणीने शास्त्रीजी आकर्षित झाले. रॉय यांच्या तत्त्वमंथनाला, पाश्चिमात्य विद्यांच्या ज्ञानाला शास्त्रीजींनी आपल्या भारतीय तत्त्वज्ञानाच्या सखोल अभ्यासाची जोड दिली. रॉयनी शास्त्रीजींना 'बेस्ट प्रॉडक्ट ऑफ इंडियन रेनेसान्स'- भारतीय प्रबोधनाचा उत्कृष्ट नमुना! असे गौरवाने म्हटलेले आहे.

विचार एका भौतिक परिस्थितीतून निर्माण झाले तरी ते केवळ परिस्थितिसापेक्ष नाहीत. मूल्यांना स्वतंत्र, स्वायत्त स्वरूप प्राप्त होते. त्यांचे संवाहन करण्याचे कार्य मध्यमवर्गीयांस, बुद्धिमंतांस करता येईल, अशी रॉय यांची धारणा होती. म्हणून त्यातील संस्कृतीच्या बेटांची- आयलंड्स ऑफ कल्चरची- कल्पना मांडली. सांस्कृतिक मूल्ये प्रथम जरी काही अल्पसंख्याकांनी प्रस्थापित केली तरी त्यांचा प्रसार व प्रचार, चर्चा, संमेलने, परिसंवाद, ग्रंथ इत्यादींच्या द्वारा करण्याचे काम बुद्धिवंतांचे आहे असे रॉयनी मांडले. महाराष्ट्रामध्ये हे कार्य करण्याला शास्त्रीजींचे प्रयत्न फार मोलाचे आहेत. आज त्यांचे विश्वकोशाचे जे कार्य चालले आहे, त्या मागे ज्ञानप्रसाराचा प्रमुख हेतू आहे व तो पूर्वीच्या त्यांच्या ज्ञानोपासनेशी सुसंगत आहे. ज्ञानाची मिरासदारी एका विशिष्ट वर्गाची, साचेबंद न राहता त्याचा प्रवाह खुला झाला पाहिजे. ही गंगा अल्पशिक्षितांकडे, बहुजन समाजाकडे गेली पाहिजे, हा त्यामागील एक क्रांतिकारक विचार आहे. त्यासाठी जो प्रचंड व्यासंग लागतो तो शास्त्रीजींचा आहे. विद्वानांना एकत्र आणून त्यांना कार्यरत करण्याची कुशलता त्यांच्यात आहे.

"परंपरागत भारतीय शास्त्रे व त्यांतील ज्ञान आणि पाश्चिमात्य ज्ञान, त्यांतील सांस्कृतिक मूल्ये यांचा स्वीकार करून नव्या मानवाची कल्पना साकार करण्यासाठी शास्त्रीजींनी आपली आजवरची हयात खर्च केली आहे." हे कार्य त्यांच्या हातून पुरे होवो, यासाठी त्यांना दीर्घायुष्य व आरोग्य लाभो.

**(दि. ३ फेब्रुवारी, १९७५ रोजी वाणिज्य व मानव्य महाविद्यालय, वाईमार्फत संपन्न तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी अमृत महोत्सव समारंभातील प्रास्ताविकपर भाषण)**

**(सध्याचे किसनवीर महाविद्यालय, वाई).**

**(साप्ताहिक साधना, पुणे, दि. १७ फेब्रुवारी, १७७५, पृ. ४ ते ६)**

○○○

# १४.

# शास्त्रीबुवाः एक प्रचंड कोडे

## श्री. शं. नवरे

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणजे एक प्रचंड कोडे आहे! जुन्या पद्धतीने जुनी शास्त्रे अमूलाग्र शिकलेला, जुनी मराठी शिकविलेला, माधुकरी मागून विद्या शिकलेला, काशी क्षेत्रात अन्नछत्रात जेवलेला, जटाधारी व शालजोडी पांघरलेला, एक जुना शास्त्री, नव्या काळातील रॉयिस्टांचा अग्रणी होतो. बरोबर शास्त्रीपंडित नेऊन अस्पृश्यांनासुद्धा उघडे राहील, अशा सौराष्ट्रातील सोमनाथाचा उद्धार करतो. गांधींचा मुलगा आणि राजगोलालाचारी यांची मुलगी यांचा प्रतिलोम विवाह लावतो. संध्या करताना खचितच दिसतो. खाण्यापिण्याचे निषेध पाळीत नाही. काँग्रेसच्या निवडणूक दौऱ्यांवर जातो. युरोप फिरतो. धर्मकोशाचा आणि विश्वकोशाचा संपादक होतो. मोटारीतून फिरतो. हे चालले असताना मित्रमंडळी पाहिली तर न्यायमूर्ती तारकुंडे, प्रो. गोवर्धन पारीख, वसंतराव कर्णिक, कीर्ती कॉलेजचे (माजी) प्राचार्य मे. पुं. रेगे, साउथ इंडियन कॉलेजचे (माजी) प्राचार्य अ. भि. शहा, गिरीलाल जैन नि यशवंतराव चव्हाण, विनोबा भावे यांच्यासारखे एकजात मातब्बर! व्यवसाय पाहावा तर साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष! गुरू वाईचे नारायणशास्त्री मराठे किंवा स्वामी केवलानंद सरस्वती. कशाचा कशाला पत्ता नाही. नवीन कोणत्याही इंग्रजी शाळेत गेले नाहीत आणि शिकले नाहीत. पण पाश्चात्य अनेक देशांत जाऊन भारताचे प्रतिनिधित्व केलेले! इंग्रजी निबंध वाचलेले! चर्चा आणि वादविवाद केलेले!

### साहित्य अकादमीचे पारितोषिक

१९५४ साली मराठी साहित्य संमेलनाच्या दिल्ली अधिवेशनाचे अध्यक्ष निवडले गेले. तेव्हा बडोद्याच्या एका दिवाणबहादुराने पत्र लिहिले की, ज्याला इंग्रजी येण्याची तोहमत, तो दिल्ली राजधानीस अध्यक्ष होऊन काय करणार? त्यापेक्षा मी एका कमिशनचा सभासद म्हणून सर्व देश फिरलेला, व्यवसायाने वकील, केतकरांच्या ज्ञानकोशात खूप लिहिलेला, महाराष्ट्र साहित्यपरिषदेचा उपाध्यक्ष- मग मलाच का निवडीत नाहीत? त्यांना उत्तर मिळाले

की, अहो, अध्यक्षांची निवड कधीच होऊन चुकलेली आहे! दुसऱ्या कोणी आधुनिक साहित्यिकाने आक्षेप घेतला की यांनी ललित साहित्य काय लिहिले आहे? म्हणून यांची निवड झाली. एकतरी कविता लिहिली आहे का? एक तरी निबंध लिहिला आहे का? हे अध्यक्ष होऊन काय करणार?

भाराभर ललित लेखन करणारे हेच राजमान्य, राजश्री आता शास्त्रीबुवांच्या साहित्य आणि संस्कृती मंडळात प्रवेश व्हावा म्हणून खटपट करीत असतात! शास्त्रीबुवा मात्र 'वैदिक संस्कृतीचा विकास' या सहाशे पृष्ठांच्या ग्रंथाबद्दल १९४३-५४ पर्यंत झालेल्या मराठी पुस्तकांत प्रथम क्रमांकाचे साहित्य अकादमीचे पाच हजार रुपयांचे पारितोषिक मिळाले आहे.

## परस्परविरोधी भूमिका

या पंडिताला पाहून आंतरराष्ट्रीय कीर्तीचे क्रांतिकारक मानवेंद्रनाथ रॉय चकित झाले आणि शास्त्रीबुवाही त्या क्रांतिकारकाचे भजनी लागले! रॉय यांनी निर्मितलेल्या संस्थांतून अग्रस्थानी शास्त्रीबुवा आणि रॉय यांच्या निधनानंतर त्याच्या स्मारकार्थ निघालेल्या संस्थांचे अध्यक्ष शास्त्रीबुवा! दुसऱ्या महायुद्धात हिटलरचा पराभव व्हावा म्हणून जंग जंग पछाडणारे क्रांतिकारक रॉय आणि शास्त्रीबुवा आणि त्याबद्दल लोकांचे जोडे खाणारे तेच! केंद्रीय सरकारने मंजूर केलेले १३ हजार रुपये खर्च करणारेही तेच!

वस्तुतः प्राज्ञपाठशाळेचा, हिटलरचा, रॉयबाबूंचा काय संबंध? आणि शास्त्रीबुवांनी या सर्वांची एकच गाठ कशी घातली? संयुक्त महाराष्ट्राला विरोध करून महाराष्ट्र झाल्याबरोबर यशवंतराव चव्हाण त्याचे मुख्यमंत्री आणि शास्त्रीबुवा साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष होतात. याचा अर्थ काय? याचा अर्थ जुन्या-नव्या शास्त्रांत शास्त्रीबुवांच्यासारखा पारंगत मनुष्य सापडणे अगदी कठीण! जवळजवळ नाहीच! शोध करूनही मिळायचा नाही. प्राज्ञपाठशाळेला हिटलर आणि रॉयबाबूंबरोबर संबंध ठेवावा लागला, तोही शास्त्रीबुवांमुळे! प्राज्ञपाठशाळेशी शास्त्रीबुवांचा संबंध आला तो लहानपणामुळे! पश्चिम खानदेशात पिंपळनेर येथे मुंज झाल्यावर लक्ष्मणाला कोणत्या तरी अध्यात्मवादी संस्थेत जावयाचे होते. वडिलांना आसपासच्या संस्कृत पाठशाळा दिसत होत्या. कोणी श्रद्धानंदांच्या गुरुकुलाचे नाव सांगितले. वडिलांनी लक्ष्मणला तिकडे घेऊन जाण्याची तयारी केली. पण इतक्यात जंगल खात्यातील देवकुळे नामक कोणी इसमाने वाईच्या नारायणशास्त्र्यांचे नाव सांगितले. तिकडे वडील निघाले. प्राज्ञमठ अस्तित्वात होता. प्राज्ञपाठशाळेचा जन्म व्हावयाचा होता. नारायणशास्त्रीसुद्धा (सह) सगळे लोक माधुकरी मागून आपला चरितार्थ चालवीत होते. शास्त्रीबुवांचा वेष लांबलचक जटा, नेसायला आणि पांघरायला पंचा, अध्ययनाला जुनी शास्त्रे! अनध्यायाच्या दिवशी सर्वत्र सारवण! नारायणशास्त्री कोठे दौऱ्यावर गेले की, त्यांच्याबरोबर लक्ष्मण!

पुढे मात्र नारायणशास्त्र्यांचा संबंध बराचसा सुटला! अधिक विद्येसाठी काशी गाठावी लागली. नदीवर स्नान, अन्नछत्रात मिळेल ते एकदा जेवण व कोणातरी गुरूजवळ अध्ययन! शेवटच्या परीक्षेसाठी कलकत्ता येथे जावे लागे. न्यायमार्तंड आणि तर्कतीर्थ या परीक्षा झाल्या. शास्त्रीबुवा वाईला परत आले. शिकायचे शिल्लक राहिलेले नव्हते. एखाद्या मठीत राहून मिळतील त्या दोन-तीन मुलांना न्यायशास्त्र शिकवावयाचे! बाकी अध्ययनाला, वाचनाला, लागेल तितका वेळ! गुरुजींवर निष्ठा होतीच. वेष तोच, म्हणजे जटा-शालजोडीचा!

पण काशीला आणि कलकत्त्याला जायचे म्हणजे बाहेरचे वारे लागणारच! गांधीयुग सुरू झालेले होते. खादीचे माहात्म्य वाढलेले होते. तुरूंग भरले जात होते. गांधी, विनोबा, स्वामी आनंद, काका कालेलकर, साने गुरुजी, सरदार वल्लभभाई पटेल यांची नावे घेतली जात होती. जुने आणि नवे यांच्या चोचीत शास्त्रीबुवा सापडले होते. जवळजवळ परिचयाचेच होते त्या वेळी! बाहेरचे वारे लागल्याबरोबर शास्त्रीबुवा अंतर्व्यवस्थेपासून दूर दूर जात होते. जुनी तत्त्वे मान्य पण जुने कर्मकांड त्यांना नकोसे झाले! आगरकरांविषयी प्रेम उत्पन्न झाले. स्वामी दयानंद हवेसे वाटू लागले. महात्मा गांधींविषयी आस्था उत्पन्न झाली. याचा परिणाम जुन्या कर्मकांडांत शिथिलता येत चालली.

याच वेळी जुने संपून नवे सुरू झालेले होते. प्राज्ञपाठशाळेत त्यांचे प्रतिबिंब पडू लागलेले होते. नवा गृहस्थाश्रमी माध्यमिक वर्ग सुरू झालेला होता. असहकार म्हणून मोठमोठ्यांची मुले इंग्रजी शिकण्याकरिता सरकारी शाळा सोडून येऊ लागलेली होती. त्यांचे भवितव्य पाहण्यासाठी टिळक महाविद्यालयाला प्राज्ञपाठशाळा जोडून घेण्यात आली. तिकडे परीक्षक त्यांचे पेपर्स तपासू लागलेले होते.

वार्षिक सरस्वतिउत्सवाला तिकडचे 'पाहुणे' बोलावण्यात येऊ लागले. सर्वच नूर पालटत चाललेला होता. अध्यक्षस्थानी नारायणशास्त्री व प्रचारक म्हणून दिवेकरशास्त्री होते. ते आपली शिस्त मुलांना लावण्याचा प्रयत्न करीत होते. ब्रह्मकर्म चालू होते. विसपर्ण म्हटले जात होते. गंगेवर पहाटेचे स्नान उरकून आणि सूर्यनमस्कार घालून गुरुजींसहित 'शांति' म्हणण्यासाठी मुले सरस्वती मंदिरात जमत होती. जेवताना मुले श्लोक म्हणत होती. सोमवारी सायंकाळी मंत्रपुष्प म्हटले जात होते. एकादशीला एकान्न भक्षण केले जात होते. शास्त्रीबुवा यांपैकी फारच थोड्या कार्यक्रमांना हजर असत. ते दत्तमंदिरात निजलेले सापडावयाचे! फार तर एखादे पुस्तक वाचताना! नारायणशास्त्र्यांच्या लक्षात ही गैरहजेरी आल्यावाचून राहत नसे! पण लक्ष्मणाच्या डोळ्यांतील ते पाणी आणि त्याची एकंदर हुशारी पाहून त्यांना कानाडोळा करावा लागे! चर्चा आणि वादविवादाला इतर कोणाहीपेक्षा लक्ष्मणचा उपयोग सर्वांत अधिक होई, याची त्यांना जाणीव होती.

### अनेक सभा जिंकल्या

काशीचे राजेश्वरशास्त्री द्रविड किंवा लक्ष्मणशास्त्री द्रविड, पुण्याचे वासुदेवशास्त्री

अभ्यंकर, डेक्कन कॉलेजचे श्रीधरशास्त्री पाठक, वाईचे रंगाचार्य रड्डी, कलकत्त्याचे अनंत कृष्णशास्त्री किंवा कुकुरमुंडेकर बुवा यांना तोंड देणारा शास्त्रीबुवांखेरीज नव्हता, हे नारायणशास्त्री पूर्ण जाणून होते. लक्ष्मणशास्त्र्यांनी काशीपासून अनेक सभा जिंकलेल्या होत्या. त्यांचा पराभव झाला असे त्यांचे पोरसवदा वय पाहून वाटे, पण त्या विचारात पडत. आणि पुढे रॉय हे स्वतः भेटल्यावर सर्वच संपले. म्हणजे या चर्चा, वेदोक्त वादविवाद संपले. पूर्वोक्त प्रश्न समाप्त झाले!! शास्त्रीबुवा नवीन मंडळींशी खलबते करू लागले! जुने स्नेही मागे पडले. नवे स्नेही पुढे आले!!

संयुक्त महाराष्ट्रानंतरचा काळ बदलला. तोपर्यंत नारायणशास्त्री संन्यास घेऊन स्वामी केवलानंद झालेले होते. प्राज्ञपाठशाळेचे स्वरूप हळूहळू बदलत चाललेले होते. शास्त्रीबुवा तिथे नवीन अध्यक्ष झालेले होते. पण बाहेर साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष व विश्वकोशाचे संपादक म्हणून ते ओळखले जात होते. शाळेशी त्यांचा काही संबंध नव्हता. आठवड्यातून दोन-तीन दिवस शाळेत फक्त दिसावयाचे. बाकीचे दिवस मुंबईतील सचिवालयात किंवा अन्यत्र काँग्रेसचे काम करीत दिसावयाचे.

## युक्तीच्या गोष्टी सांगणारा

सध्या शास्त्रीबुवा संस्कृती मंडळाचे, विश्वकोशाचे आणि धर्मकोशाचे काम पाहात आहेत. वर्षानुवर्षे ते चाललेले आहे. करावे तेवढे थोडेच! वाई आणि मुंबई यामध्ये त्यांच्या येरझारा चालूच आहेत. निवडणुकीला उभे राहात नाहीत. यावरून समजायचे की, ते राजकारणात प्रत्यक्ष नाहीत, पण बाकी सर्व राजकारण चालले आहे- 'गोष्टी सांगेन युक्तीच्या चार' चालूच असते!

सध्या शास्त्रीबुवांचा अमृतमहोत्सव चालू आहे. त्यांचा वडीलबंधूंच्या म्हणण्याप्रमाणे त्यांचा जन्मदिन रथसप्तमी असला तरी प्रत्येकाच्या सोयीप्रमाणे निरनिराळ्या दिवशी तो साजरा केला जात आहे. खुद्द प्राज्ञपाठशाळेचा उत्सव जन्मतिथीप्रमाणे गेल्या १८ तारखेला झाला. गौरवग्रंथ मात्र वर्षअखेर प्रसिद्ध व्हावयाचा आहे.

**(दै. मराठा, मुंबई, २२ फेब्रुवारी, १९७५)**

ooo

## १५.

# शास्त्रीबुवा आणि रॉयवादी चळवळ

## द्वा. भ. कर्णिक

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे रॉयवादी चळवळीकडे ओढले जावे हा एक अपूर्व योगायोग आहे. त्यांच्या पूर्वीच्या जीवनाशी सर्वस्वी विसंगत वाटावे असे पाऊलच शास्त्रीबुवांनी हा निर्णय घेऊन टाकले असे म्हणावे लागेल. रॉयवादाचा पुरस्कार करण्यापूर्वीच्या त्यांच्या जीवनाचे पैलू विविध प्रकारचे होते. म्हणजे ब्रह्मवृंदांचे माहेरघर म्हणून मानल्या जाणाऱ्या वाईसारख्या तीर्थक्षेत्रात संस्कृत भाषेचे अध्ययन व अध्यापन करण्यात शास्त्रीबुवांच्या जीवनाची पहिली बरीच वर्षे गेली. ते कार्य करीत असताना त्यांचे संस्कारक्षम मन देशात प्रगट होणाऱ्या राजकीय उद्रेकांपासून मात्र अलिप्त राहिले नाही. गांधीजींनी १९३० साली कायदेभंगाची मोहीम सुरू केली. तेव्हा शास्त्रीबुवांनी आपल्या परंपरेचा तसाच संस्थेच्या भवितव्याचाही विचार न करता या संग्रामात उडी घेतली. शास्त्रीबुवांचे वैशिष्ट्य असे की कोणतेही कार्य वा चळवळ हाती घेतल्यानंतर हातचे राखून काम करावयाचे नाही, असा त्यांचा मनःपिंड आहे. कायदेभंगाच्या या चळवळीत त्यांनी आपल्या प्रभावी वक्तृत्वाने उभा ग्रामीण महाराष्ट्र चेतविला, पेटविला. ब्रिटिश साम्राज्यशाहीविरुद्ध ते नुसते आग ओकीत गेले आणि सत्याग्रहासाठी त्यांनी प्रक्षुब्ध वातावरण तयार केले.

ते वातावरण तयार करीत असताना त्यांच्या जीवनाचा आणखी एक पैलू प्रगट झाला. हा पैलू म्हणजे धगधगणाऱ्या क्रांतिकारकांशी समरस होणारे त्यांचे मन. गांधीवादी अहिंसा ही साधन म्हणून शास्त्रीबुवांनी स्वीकारली होती. पण 'किचनेर पोलीस' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आडदांड, तशाच क्रूर पोलीस दलाशी सामना देताना व्यक्तिगत म्हणा किंवा सामुदायिक म्हणा शस्त्राचाराचा आश्रय घ्यावा लागेल अशीच शास्त्रीबुवांच्या मनाची धारणा होती. त्यामुळे एकीकडे गांधीवादी सत्याग्रहात भाग घेत असतानाही दुसरीकडे हिंसाचारी क्रांतिकारक दलांच्या कारवायांत समरस होणे आणि त्या दलातील लोकांचे संगोपन करणे, त्यांना संरक्षण देणे हेही साहस शास्त्रीबुवांनी चालूच ठेवले. तीस-बत्तीस सालच्या सामुदायिक

कायदेभंगाच्या चळवळी थंडावल्यानंतर गांधीजींनी जेव्हा अस्पृश्योद्धाराच्या चळवळीकडे आपले लक्ष वळविले, तेव्हा शास्त्रीबुवांच्या जीवनाचा तिसरा पैलू प्रगट होण्याची संधी प्राप्त झाली. ही संधी गांधीजींनीच त्यांना मिळवून दिली. अस्पृश्योद्धाराला धर्माधार मिळाला तर सवर्ण हिंदूंमधील एका मोठ्या समुदायाच्या गळी आपण ही अस्पृश्योद्धाराची चळवळ उतरवू असा गांधीजींना विश्वास वाटला. त्यांनी हा शास्त्राधार धुंडाळण्याचे आणि त्या बाबतीत सनातनी धर्मपंडितांशी वाद घालण्याचे कार्य शास्त्रीबुवांकडे सोपविले. साहजिकच गांधीजींच्या प्रभावळीत शास्त्रीबुवांना स्थान प्राप्त झाले आणि अखेरीस गांधीजींचा त्यांच्यावर इतका लोभ जडला की, आपला पुत्र देवदास याचा राजाजींच्या मुलीशी विवाह व्हावयाचे पक्के झाल्यानंतर त्या विवाहाचे पौरोहित्य करण्याचे काम त्यांनी शास्त्रीबुवांकडेच सोपविले.

१९३४-३५ सालाच्या सुमारास शास्त्रीबुवांचे जीवन गांधीजींच्या परिवारात समृद्ध होत असताना १९३७ साली एम. एन. रॉय हे दीर्घ काळच्या कारावासातून बाहेर पडले. त्या पूर्वीच्या काळात शास्त्रीजींचा महाराष्ट्रातील व्यक्तिगत रॉयवाद्यांशी ठिकठिकाणी संबंध आलाच होता. माझी व शास्त्रीबुवांची १९३० सालीच धुळ्याच्या तुरुंगात भेट झाली होती आणि रॉयवाद्यांच्या गुप्तपणे उभारल्या जाणाऱ्या गटात मी सामील झालेला असलो तरी उघड कार्य काँग्रेसमधूनच आम्ही करीत असल्यामुळे शास्त्रीबुवांशी आमच्या भेटीगाठी होत असत आणि विचारविनिमयही होत असे. एम. एन. रॉय हे तुरुंगातून बाहेर पडल्यानंतर त्यांनी जे पहिलेच निवेदन प्रसिद्ध केले, त्यात त्यांनी काँग्रेसमध्ये समरस होऊनच आपले राजकीय कार्य करण्याचे उद्दिष्ट जाहीर केले. फैझपूर काँग्रेसमध्ये 'रहस्यमय' म्हणून मानल्या गेलेल्या एम. एन. रॉय यांच्या व्यक्तिमत्त्वाचे व विचारांचे जे दर्शन झाले, ते सामान्य काँग्रेसजनांच्या हृदयाला भिडले नसेल, पण काँग्रेसमधील विचारवंतांवर मात्र त्यांची छाप पडल्यावाचून राहिली नाही. अशा विचारवंतांत शास्त्रीबुवांची प्रामुख्याने गणना करावी लागेल.

शास्त्रीबुवांचे मन संस्कारक्षम आणि वृत्ती गुणग्राहक. रॉय यांनी फैझपूर काँग्रेसमध्ये जे भाषण केले, ते सामान्यपणे वक्तृत्वाचा जो आपल्या देशात आदर्श मानला गेला जातो त्या आदर्शाला साजेसे मुळीच नव्हते. पण त्यात विचारांचा पक्केपणा होता. ते विचार त्यांनी एका सूत्रात ओवल्यासारखे दुवा आणि दुवा जोडत मांडले होते. एकेक मौक्तिकबिंदुच जणू ते ओवत होते. आणि त्या विचारांतून क्रांतीचे तत्त्वज्ञानच नव्हे तर ती क्रांती घडवून आणण्याची पद्धती त्यांनी विशद केली होती. तर्कशुद्ध विचारपद्धतीचा एक नमुना म्हणूनच त्या भाषणाकडे पाहावे लागेल. काँग्रेसची संघटना ही तळापासून कशी बांधण्यात यावी आणि गावोगावी प्रस्थापित करण्यात आलेल्या काँग्रेस समित्या, ही संघर्षाची केंद्रे कशी बनवावी, याचे विवेचन केल्यानंतर संघर्षाची ही केंद्रे कालांतराने सत्तेची साधने कशी बनतील, याचेही रॉय यांनी दिग्दर्शन केले होते. त्यांनी सिद्धांत मांडला होता तो प्रतिस्पर्धी

सत्ताकेंद्रे स्थापन करण्याचा. ब्रिटिश राजवटीशी समांतर अशी ही सत्ताकेंद्रे (State within a State) प्रत्यक्षतः उभ्या देशात काँग्रेस समित्यांमार्फत प्रस्थापित करण्याचा क्रांतिकारक संदेश त्यांनी दिला होता.

तो संदेश शास्त्रीबुवांच्या बुद्धीला पटला आणि हृदयाला भिडला. त्यातूनच त्यांच्या जीवनातील आणखी एक स्थित्यंतर सुरू झाले. फैझपूर काँग्रेसनंतर लगेच काँग्रेसने विधानसभेच्या निवडणुकीसाठी जी मोहीम आखली होती, त्या मोहिमेत भाग घेण्यासाठी रॉय यांनी महाराष्ट्राचा दौरा केला. रॉय आणि शास्त्रीबुवा यांचा या दौऱ्यात बराच संपर्क जुळून आला. दोघा विचारवंतांच्या या भेटीगाठी होत्या. विद्वत्ता आणि व्यासंग आणि परस्परांबद्दलची गुणग्राहकता यांच्यामुळे या गाठीभेटींतून असा एक सुहृद्भाव निर्माण झाला की, राजकारणात तर त्यांचे साहचर्य निर्माण झालेच, पण अविस्मरणीय अशा काव्य शास्त्र विनोदात रंगून जाणाऱ्या मैफलींचा लाभ घेण्याची इतर सहकाऱ्यांना वेळोवेळी संधी मिळू लागली.

रॉयवादी आंदोलन हे राजकीय स्वरूपाचे खरेच. पण रॉय यांना राजकारणाव्यतिरिक्त अनेकविध विषयांत रस असे. जे क्रांतिकारक तत्त्वज्ञान त्यांनी आपल्या आंदोलनासाठी स्वीकारले होते, ते ठोकळेबाज नव्हते. स्थितिप्रियही नव्हते. ते सारखे विकसित होत होते. देशविदेशातील राजकीय स्थित्यंतरांचा अनुभव गाठी घालून, त्याचप्रमाणे समाज परिस्थितीचे बदलते रंग विचारांत घेऊन आणि तात्त्विक आघाडीवर मोठमोठ्या तत्त्वज्ञांकडून वा विचारवंतांकडून जी नवी नवी प्रमेये मांडली जात असत, त्यांची चिकित्सा करून रॉय हे आपल्या तात्त्विक भूमिकेला आणि राजकीय सिद्धांताला नवनवे अधिष्ठान मिळवून देण्याचा प्रयत्न करीत असत. ती भूमिका अधिकाधिक तर्कशुद्ध कशी होईल, यासाठी शोध घेत असत. त्याच्या अनुषंगाने जे विचारमंथन सुरू होई, त्यात शास्त्रीबुवांच्या ज्ञानाचा व व्यासंगाचा रॉय यांना अतिशय उपयोग होत असे. रॉय यांना शास्त्रीबुवांच्या विद्वत्तेबद्दल आदर असे. शास्त्रीबुवांनी लिहिलेल्या 'हिंदुधर्माची समीक्षा' या पुस्तकाचा एका जाहीर सभेत उल्लेख करताना रॉय यांनी असे उद्गार काढले होते की, ही समीक्षा करणाऱ्या महापंडिताच्या चरणी नतमस्तक होण्याचा मोह मला आवरता येण्यासारखा नाही.

शास्त्रीबुवांनी बौद्धिक आघाडीवरच रॉयवादी चळवळीशी सहकार्य केले असे मात्र मुळीच नव्हे. समर्पित भावनेने त्यांनी त्या चळवळीतील सर्व प्रकारच्या भूमिका पार पाडल्या. त्यासाठी त्यांनी प्रचारकाचे, संघटकाचे काम केले, लोकप्रियतेला तिलांजली दिली. अप्रिय सिद्धांत आणि कार्यक्रम लोकांच्या गळी उतरविण्यासाठी अनेक वेळा शिव्याशापच नव्हे तर प्रत्यक्ष दगड-धोंड्यांचा वर्षावही सहन केला. एम. एन. रॉय यांचे वैशिष्ट्यच असे होते की, तर्कशुद्ध आचारविचारांची राजकारणात छाप पाडण्यासाठी त्यांना बहुशः लोकमताविरुद्धच उभे राहावे लागले. ते तुरुंगातून सुटले, त्या वेळी डावे म्हणून मानल्या जाणाऱ्या गटांनी

काँग्रेसशी वैर धारण केले होते. रॉय यांनी काँग्रेसशी समरस होण्याचे धोरण जाहीर केल्यानंतर डाव्या गटांनी भांडवलदारी काँग्रेसचे हस्तक म्हणून त्यांच्यावर टीकेची झोड उठविली. रॉय यांनी काँग्रेसच्या नेतृत्वाविरुद्ध प्रतिस्पर्धी नेतृत्व उभे करण्याचा चंग बांधला. तेव्हा काँग्रेसमधील उजव्या गटाने त्यांना अक्षरशः वाळीत टाकले. कामकरी संघटनांत एकजूट करण्यासाठी त्यांनी जो पर्याय सुचविला, तो सवते सुभे करणाऱ्यां कामकरी पुढाऱ्यांना आवडला नाही. काँग्रेस ही एक चळवळ आहे आणि त्या चळवळीत कामगार शेतकरी यांनी सामील होऊन काँग्रेस हे राष्ट्रीय क्रांतीचे साधन बनवावे, अशी रॉय यांनी भूमिका घेताच कम्युनिस्टांनी, कामगारांची चळवळ या राष्ट्रीय आघाडीपासून अलिप्त राहावी, असा प्रयत्न तर केलाच; पण शेतकऱ्यांचीही किसान परिषद उभी केली. अशा रीतीने एकंदरीने रॉय आणि रॉयवाद्यांना सर्व प्रकारच्या संघर्षालाच तोंड द्यावयाची वेळ आली.

पण ते सारे संघर्ष ही तुलनात्मक दृष्टीने चुणूक वाटावी अशा प्रकारच्या अग्निदिव्याला तोंड देण्याची पाळी रॉयवाद्यांवर यावयाची होती. दुसऱ्या महायुद्धाबद्दलच्या भूमिकेच्या संदर्भात ही पाळी आली. त्या युद्धात फॅसिझमचा पाडाव करणे हेच लोकशाहीवाद्यांचे एकमेव कर्तव्य आहे आणि त्यासाठी फॅसिझमविरुद्ध ज्या ज्या शक्ती उभ्या राहतील, त्यांच्याशी आपण बिनशर्त हार्दिक सहकार्य केले पाहिजे, अशी रॉय यांनी भूमिका घेतली. या शक्तीत ब्रिटिश साम्राज्यशाही समाविष्ट झाली म्हणून सहकार्याचा आपला सिद्धांत बदलावयाला रॉय तयार झाले नाहीत. त्यांनी भारतात अधिष्ठित असलेल्या ब्रिटिश सत्तेशीही फॅसिझमचा पाडाव करण्यासाठी सहकार्य करावयाला मान्यता दिली. मधमाशांच्या पोळयावर दगड फेकावा, तसा हा प्रकार होता. त्यानंतरच्या काळात रॉय व रॉयवाद्यांविरुद्ध इतका विषारी प्रचार झाला, व्यक्तिगत चारित्र्यहनन आणि सामुदायिक हिंसाचार यांचा इतक्या हिरिरीने आश्रय घेण्यात आला की, रॅडिकल डेमोक्रॅटिक पक्षाला आपले अस्तित्व टिकवून धरणेही अशक्यप्राय झाले.

शास्त्रीबुवांनी या प्रकाराला जुमानले नाही. आपल्यावर होणाऱ्या हल्ल्याला निधडेपणाने तोंड दिले. युद्धाबद्दलचा आपला सिद्धांत त्यांनी बेचाळीसच्या क्रांतीचे अग्निकुंड पेटले असतानाही गावोगाव हिंडून लोकांसमोर मांडला. काही काळ महाराष्ट्र रॅडिकल पक्षाचे ते सरचिटणीसही झाले. पक्षाशी त्यांची एकात्मता इतकी पक्की झालेली होती की, रॅडिकल डेमोक्रॅटिक पक्षाची संघटना बांधण्यासाठी त्यांनी वाटेल तो त्याग करण्याची तयारी दाखविली. त्या वेळी रॉयवाद्यांचे 'संग्राम' नावाचे दैनिक चालू झाले होते. त्या दैनिकात 'हे क्रांतीचे प्रेत येथे पडले आहे' या मथळयाखाली शास्त्रीबुवांनी एक अग्रलेख लिहिल्याचे मला आठवते. ४२ च्या क्रांतीचे फॅसिझमविरोधी लढ्याच्या संदर्भात विश्लेषण करून शास्त्रीबुवांनी अत्यंत प्रभावी भाषेत आणि तर्कशुद्ध विचारांच्या साहाय्याने असे प्रतिपादन केले होते की, फॅसिझम यशस्वी झाला तर सारे जग रानटीपणाच्या गडद अंधारात फेकले जाईल आणि मानवी संस्कृतीच विलयाला गेलेली पाहण्याची आपल्यावर वेळ येईल.

एकीकडे शास्त्रीबुवा तडाखेबंद लेखन करीत होते, दुसरीकडे व्याख्याने, परिसंवाद, राजकीय परिषदा, सामुदायिक संचलने यांच्या साहाय्याने लोकजागृती घडवून आणीत होते; आणि त्याच वेळी रॉय यांनी बुद्धिवादी विचारवंतांचा एक निर्भय पण निर्धाराचा गट तयार करण्याचा जो उपक्रम सुरू केला होता, त्या उपक्रमाला साहाय्यभूत होण्यासाठी तत्त्वदर्शनात्मक अशा विचारमंथनातही सहभागी होत होते. शास्त्रीबुवा हे विचारवंत खरे. पण ते कृतिशील विचारवंत होते. रॉय यांच्या सहवासात आल्यानंतर त्यांच्या कृतींना विधायकतेची जोड मिळाली.

उदाहरणार्थ, फैजपूर काँग्रेसमध्ये संघर्षाची केंद्रे ही सत्तेची माध्यमे बनविण्याच्या दृष्टीने काँग्रेस समित्या संघटित करण्याचा रॉय यांनी आदेश दिला होता. आता रॅडिकल पक्षाच्या कार्यकर्त्यांना त्यांनी जनता समित्या बनविण्याचा आदेश दिला. शास्त्रीबुवांनी रॅडिकल पक्षाच्या नेतृत्वाखाली या समित्या गावोगावी उभ्या करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. लोकजागृतीचे आणि लोकप्रतिनिधींची निवड, त्याचप्रमाणे त्यांच्या उक्ती-कृतींवर अंकुश ठेवण्याचे एक साधन म्हणून जनता समित्यांचे महत्त्व रॉय यांच्याप्रमाणेच शास्त्रीबुवांनी ओळखले होते. आज जयप्रकाश नारायण हे ज्या पद्धतीचे राज्यसत्तेवर दडपण आणू पाहात आहेत, त्याची दिशा एम. एन. रॉय यांनी युद्धोत्तर काळातच दाखविली होती. पण स्वातंत्र्योत्तर काळात रॉय यांना जे दडपण अभिप्रेत होते, ते विधायक स्वरूपाचे होय. चढत्या किमतींना आळा घालण्यासाठी ग्राहकांचा प्रतिकार संघटित केला गेला पाहिजे, ही कल्पनाही प्रथम रॉय यांनीच मांडली होती. त्या प्रतिकाराचे विधायक स्वरूप म्हणजे उत्पादकांच्या व ग्राहकांच्या सहकारी सोसायट्या होत हे रॉय यांनी त्याच वेळी ठासून मांडले होते. निष्फळ आंदोलनांवर रॉय यांचा विश्वास नव्हता. त्यापेक्षा जनतेची संघटित शक्ती विधायक कार्यासाठी उपयोगात आणली गेली तर लोकशाहीवादी सरकारला त्या कार्याला प्रतिसाद द्यावाच लागेल, ही रॉय यांची श्रद्धा होती. रॉय यांनी क्रांतिकारी आंदोलनाचा जो कार्यक्रम आखला होता, तो अशा रीतीने व्यवहार्यतेवर आधारलेला होता. त्यात डोळे दिपविणारे असे काही आढळून येणार नाही. पण जनतेच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असे प्रश्न हाताळून, जनतेच्या जीवनात आवश्यक तो फेरबदल घडवून आणण्याच्या कामी हीच व्यवहार्यता उपयोगी पडली असती. त्यातून मिळालेला दिलासा आणि आत्मविश्वास हीच खरी जनतेच्या कृतीची प्रेरकशक्ती ठरली असती आणि त्या कृतींना पायबंद घालणे कोणत्याही प्रबळ शक्तीलासुद्धा साध्य करता आले नसते.

राजकीय क्षेत्रातील रॉय यांची ही तर्कशुद्ध विधायकता शास्त्रीबुवांच्या हृदयाला भिडली. त्याचप्रमाणे रॉय यांचा सामाजिक दृष्टिकोन शास्त्रीबुवांना जसा विचारप्रवर्तक तसा मूलगामी वाटला. रॉय हे नुसते पाखंडी नव्हते, ते खरेखुरे मूर्तिभंजक होते. देवादिकांचे आणि देवस्वरूप व्यक्तींचे शाडूंचे काम त्यांनी निधडेपणाने वेळोवेळी उघड केले. तर्क आणि

विवेक यांची कास धरूनच जीवन जगले पाहिजे, हा रॉय यांचा आग्रह असे. राजकीय ध्येयधोरणे ठरविताना त्यांनी विवेकालाच प्राधान्य दिले; भावनात्मक दृष्टिकोनातून त्यांनी राजकारणातील डावपेच टाकले नाहीत. सामाजिक दृष्टिकोन ठेवतानाही त्यांनी चिकित्सक भूमिकेचा अंगीकार केला. माणूस हाच जीवनाच्या मध्यभागी असतो आणि या विश्वाचा व्यापार-व्यवहार नियंत्रित करण्याचे सामर्थ्य माणसाने संपादन केले पाहिजे, त्यासाठी सतत निसर्गाला आव्हान देण्याचे आणि जीवनाला कलाटणी देण्याचे कार्य माणसालाच केले पाहिजे, ही रॉय यांची श्रद्धा होती.

शास्त्रीबुवांनी त्या श्रद्धेनुसार सतत आचरण केले असे जरी म्हणता आले नाही, तरी सामाजिक प्रश्नांची चिकित्सा करताना, नेत्यांचे आणि समाजसुधारकांचे मूल्यमापन करताना, सामाजिक चळवळींची समीक्षा करताना शास्त्रीबुवांनी रॉय यांनी घालून दिलेले निकषच उपयोगात आणले हे कोणालाही मान्य करावेच लागेल. महाराष्ट्रातील समाज प्रबोधनाला चालना देण्याचे कार्य शास्त्रीबुवा लेखन व्याख्यानाद्वारे इतक्या हिरिरीने करीत असतात, त्याचे तरी कारण हेच होय. जोतिबा फुले, शाहू महाराज आणि डॉ. आंबेडकर यांचे मूल्यमापन करण्याच्या बाबतीत, बहुजन समाजातील लोक शास्त्रीबुवांच्याकडे अगत्याने पाहतात, याचे कारण असे आहे की आपल्या जीवनाशी व जीवनपद्धतींशी समरस झालेल्या लोकांत ते शास्त्रीबुवांची प्रामुख्याने गणना करतात; शास्त्रीबुवांच्या जिव्हाळयाच्या भावनेबद्दल त्यांच्या मनात अणुमात्रही संदेह राहिलेला नाही. शास्त्रीबुवांच्या या आचारविचारांमागे खरी प्रेरणा रॉय यांची आहे. रॉय यांची परंपरा इतकेच नव्हे, तर वारसा ते चालवीत आहेत.

**(नवभारत मासिक, फेब्रुवारी, १९७५, पृ. ११ ते १७)**

○○○

१६.

# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी: एक कृतार्थ जीवन

## मे. पुं. रेगे

शास्त्रीजींच्या कीर्तीची आणि कर्तृत्वाची थोडीशीदेखील यथार्थ कल्पना ज्याला आहे, अशा एखाद्या अपरिचित माणसाची आणि शास्त्रीजींची पहिल्यांदाच गाठ पडली आणि बोलणे सुरू झाले तर मला वाटते त्या माणसाच्या मनावर सर्वांत गडद ठसा उमटेल तर शास्त्रीजींच्या सहज, साध्यावृत्तीचा.

त्यांच्याशी संभाषणाची तार जुळली तरी त्यांच्या अनेकांगी, समृद्ध विद्वत्तेची त्याच्यावर अशी छाप पडेल, तसा त्यांच्या प्रसन्न, मनमोकळया, साध्या वृत्तीचाही लोभसवाणा प्रत्यय येईल. शास्त्रीजींचे दिलखुलास, अंतर्यामातून आलेले, ढगांच्या गडगडाटासारखे हसणे ऐकणे हा त्यांच्याशी परिचय नसलेल्या माणसाला चकित करील आणि आश्वासक ठरेल असा अनुभव असणार. आपले अथांग पांडित्य इतक्या लीलेने पेलणारे विद्वान क्वचितच आढळतील.

### गृहस्थाश्रमी वृत्ती

हे साधेपण, चारचौघांत मिसळण्याची, चारचौघांशी समरस होण्याची प्रवृत्ती शास्त्रीजींच्या जीवनाचा स्थायीभाव आहे. प्राचीन आश्रमांचे कुलपती कसे राहात हे मला माहीत नाही; पण शास्त्रीजी वाईला प्राज्ञपाठशाळेत गृहस्थाश्रमी वृत्तीने राहतात. गृहस्थाश्रमाच्या मर्यादा आणि संकेत ते आस्थेने पाळतात. परिचयातील व्यक्तींची कौटुंबिक सुखदुःखे, समारंभ, शोकप्रसंग, यशापयश- त्या सगळयांशी जिव्हाळयाने समरस होतात. आणि ह्या परिचयाचा विस्तार किती व्यापक आहे, याची कल्पनाच करावी लागेल. गृहस्थाश्रमी व्यवहाराची सारी अवधाने शास्त्रीजी सांभाळू शकतात, याचे श्रेय त्यांच्या पत्नीच्या जागरूक, सौम्यपणे प्रकट होणाऱ्या करड्या देखरेखीला द्यावे लागेल. पण ज्या जिव्हाळयाने शास्त्रीजी हा व्यवहार करतात तो पूर्णपणे आंतरिक आहे.

## सामान्य मनुष्याचा व्यवहार

सामान्य माणसांचा दैनंदिन, सामान्य व्यवहार हा सगळ्या मानवी जीवनाचा आधार आहे हे त्यांना चांगले माहीत आहे. विज्ञान, साहित्य, कला, तत्त्वज्ञान, राजकारण इत्यादी क्षेत्रांत असामान्य व्यक्ती जी असाधारण, वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी बजावतात, तिचा आधार हाच सामान्य व्यवहार असतो. हा सर्वसामान्य व्यवहार जितका उन्नत, प्रगल्भ, संवेदनशील, चोखंदळ असेल, तितका समाज निरोगी आणि सुसंस्कृत असणार. तेव्हा साऱ्याच सांस्कृतिक व्यवहाराचा सर्वसामान्य जीवन हा जसा आधार आहे, त्याप्रमाणे ह्या जीवनाचे पोषण करणे हे सांस्कृतिक व्यवहाराचे अंतिम उद्दिष्ट असले पाहिजे ही शास्त्रीजींची मूलभूत धारणा आहे. केवळ काव्याचेच नव्हे तर सारेच साहित्य, कला, विज्ञान, तत्त्वज्ञान ह्यांचे कार्य जीवनावर भाष्य करणे, वास्तव जीवनाचे समीक्षण करणे आणि विकासासाठी नवी क्षितिजे मोकळी करणे हे असले पाहिजे असे ते मानतात. ह्यामुळे शास्त्रीजींची विद्वत्ता कधी अलिप्त, पुस्तकी, शुष्क नव्हती. त्यांच्या ज्ञानसंग्रहाला, मननाला प्राप्त परिस्थितीचा, सद्यःप्रश्नांचा नेहमी संदर्भ होता. त्यांच्या विचारांची झेप कितीही मोठी असली तरी, समाजापुढील जिव्हाळ्याच्या प्रश्नांपासून त्यांच्या उड्डाणाला सुरुवात होते आणि संग्रहित ज्ञानाच्या साऱ्या क्षेत्रांत भ्रमण करून, भविष्यातील अनेक शक्यतांचा वेध घेऊन ते ह्या प्रश्नांकडे परततात. त्यामुळे त्यांचे ज्ञान नेहमी चैतन्याने रसरसलेले, ताजे असते. सदैव परजून लखलखीत केलेले असे त्यांचे आयुष्य आहे.

## गांधीजींचा प्रभाव

गांधीजींच्या शिकवणीच्या प्रभावाने त्यांना जीवनाच्या व्यवहारामागील सत्याचा शोध घेण्यास उद्युक्त केले असेल. लौकिक व्यवहाराच्या कसोटीला सत्य उतरले पाहिजे असा गांधीजींचा आग्रह होता. गांधीजींच्या विचाराची एक बाजू म्हणजे रूढ व्यवहारात मुरलेले शहाणपण आदराने समजून घेण्याचा प्रयत्न. हा व्यवहारात सहभागी होऊनच ते समजून घेता येते. ह्या व्यवहारापासून अलिप्त असलेल्या, त्याला पारखे झालेल्या प्रतिभावंतांनी स्वतः शोधून काढलेल्या आणि सामान्यांना अप्राप्य किंवा दुःसाध्य असलेल्या सत्याच्या आधारे लोकजीवनाचे नियमन करण्याला गांधीजींचा कसून विरोध होता. ही गांधीजींची कॉंझर्व्हेटिव्ह बाजू. पण स्वतःच्या अनुभवांच्या प्रकाशात रूढ व्यवहाराचे सतत परीक्षण केले पाहिजे, त्याचे सतत उन्नयन केले पाहिजे. आपल्याला जी सत्ये म्हणून गवसली आहेत, ती स्वतःच्या आचरणात पारखून घेतली पाहिजेत आणि हे सुरुवातीला लोकविलक्षण दिसणारे आचरण सामाजिक व्यवहाराच्या कसोटीवर पारखले पाहिजे आणि ह्या कसोट्यांना ही सत्ये उतरली तर रूढ व्यवहारात त्यांना अनुसरून बदल केला पाहिजे असाही गांधीजींचा आग्रह होता. ही गांधीजींची निर्मितिशील, क्रांतिकारक बाजू. शास्त्रीजींनी ह्या दोन्ही बाजू पचविल्या आहेत. परंपरा आणि नवता ह्यांतील तोल त्यांनी विलक्षण कौशल्याने साधला

आहे.

पण तो त्यांनी आपल्या पद्धतीने साधला आहे. त्यांचा पिंड बौद्धिक आहे. गांधीजी, विनोबाजी ही महान प्रतिभावान माणसे. तपशिलाच्या आडवळणातून अचूक मार्ग काढून किंवा ह्या आडवळणांवरून झेप घेऊन मुख्य मुद्द्याचा वेध घेणे, हे जे प्रतिभावान विचारवंताचे लक्षण आहे, ते ह्या दोघांच्याही ठिकाणी निःसंशय आढळते. पण त्यांचे विचार जीवनानुभवाने ओथंबलेले असे असतात; अशा अनुभवांपासून मुक्त केलेले, अमूर्त (ॲब्स्ट्रॅक्ट) असे ते विचार नसतात. हे अनुभव मूलगामी आणि मध्यवर्ती असल्यामुळे ते व्यक्त करणाऱ्या विचारांच्या अंगी सार्वत्रिक आणि दृढ प्रामाण्य असते. किंबहुना असे मध्यवर्ती आणि मूलगामी अनुभव हेरणे आणि त्यांना विचारांचे रूप देणे ह्याच्यातच अशा विचारवंतांची प्रतिभा व्यक्त होते. पण शास्त्रीजींचा पिंड वेगळा आहे. अमूर्त, तार्किक विचाराची त्यांना विलक्षण ओढ आहे. अशा विचारांत, घटपटाच्या खटपटीत ते रममाण होतात. भारतीय दार्शनिकांची पंडिती परंपरा त्यांनी आत्मसात केली आहे. अद्वैत वेदांतासारख्या गूढ, सबंध जीवनाला अंतर्बाह्य पाटू शकणाऱ्या अनुभवावर आधारलेल्या दर्शनाला नव्यन्यायाच्या काटेकोर परिभाषेत मांडणाऱ्या, काटेकोर प्रमाणांनी सिद्ध करू पाहणाऱ्या पंडितांच्या परंपरेतील ते आहेत. विचार शक्य तितक्या तर्कशुद्ध स्वरूपात मांडण्याच्या, तार्किक प्रमाणांनी त्याचे खंडनमंडन करण्याच्या झटापटीत त्यांच्या जीवनातील मोठा आनंद सामावलेला आहे. पण एवढेच नव्हे, तर शुद्ध तर्काच्या सामर्थ्याची त्यांना यथार्थ कल्पना आहे. सत्य शोधून काढण्याचे आणि प्रस्थापित करण्याचे तार्किक विचार हे अमोघ साधन आहे; त्याची अवहेलना करणे बेजबाबदार, अप्रामाणिकही ठरेल, अशी त्यांची मनोमन धारणा आहे. परंपरा आणि नवता ह्यांचा तोल शास्त्रीजींनी सांभाळला तो व्यवहार आणि अनुभव यांच्याशी तार्किक विचार ह्यांचा तोल राखून.

**प्राज्ञपाठशाळेत आगमन**

कोणत्या मूळ प्रेरणेने किंवा व्यावहारिक गरजेपोटी ते प्राज्ञपाठशाळेत आले, हे मला माहीत नाही. पण हा जो योग जुळून आला, तो स्वतः शास्त्रीजींना, प्राज्ञपाठशाळेला आणि महाराष्ट्राला अतिशय लाभदायी ठरला, ह्यात शंका नाही. भारतीय विद्या जतन करणे आणि त्यांना सतेज, वर्धिष्णू करणे हे प्राज्ञपाठशाळेचे अंगीकृत कार्य होते. पण हे कार्य भारतीय राष्ट्राच्या पुनरुत्थापनाच्या संदर्भात करायचे होते. ह्या देशात नव्याने घडू पाहणारे राष्ट्र जर खऱ्या अर्थाने भारतीय असायचे असेल, केवळ भौगोलिकदृष्ट्याच नव्हे तर सांस्कृतिक दृष्ट्याही ते भारतीय असायचे असेल, तर स्वतःच्या पृथगात्म परंपरेवर ते आधारलेले असणे आवश्यक होते. ह्यासाठी भारतीयांची बौद्धिक आणि सांस्कृतिक अस्मिता प्रखर आणि दृढ असायला हवी. पोकळ अभिमानावर अशी अस्मिता आधारता येत नाही. चोख अध्ययनाने आपली प्राचीन बौद्धिक परंपरा आत्मसात करूनच ती अंगी बाणवता येणे शक्य होते.

## दोन प्रभावी व्यक्तिमत्त्वे

प्राज्ञपाठशाळेत आल्यामुळे पारंपरिक भारतीय पद्धतीचे अध्ययन करण्याची संधी शास्त्रीजींना लाभली. ही अमोल संधी होती आणि तिचा त्यांनी उत्कृष्ट उपयोग करून घेतला. केवलानंदांसारखा गुरू त्यांना भेटला आणि आपल्या बौद्धिक परंपरेची अनेकांगी समृद्धता, तिच्यात बाणलेली बौद्धिक नेकी, आध्यात्मिकता, भूतमात्राविषयीची आस्था आणि विरक्ती ह्या गुरूच्या रूपाने मूर्त झाली आहे असे त्यांना वाटले. त्यांच्या गुरूच्या अध्ययनशील सात्त्विक वृत्तीचा कायमचा ठसा शास्त्रीजींच्या व्यक्तिमत्त्वावर उमटला आहे, असे मला वाटते. सहसा भावविवश न होणारे आणि कुणाच्याही कामगिरीचे, गुणांचे, सहानुभूतीने पण तटस्थपणे मूल्यमापन करणारे शास्त्रीजी जेव्हा प्रसंगोपात आपल्या गुरुजींविषयी बोलतात, तेव्हा त्यांचे मन आतून हललेले असते, हे आपल्याला जाणवते. आपुलकी आणि अभिमान त्यांच्या बोलण्यात ओतप्रोत भरलेला असतो. त्यांच्या गुरुजींची स्वाभाविक प्रवृत्ती सात्त्विक होती; उलट शास्त्रीजींची स्वाभाविक प्रवृत्ती राजस आहे, असे मला वाटते. एक प्रकारचा आडदांड अवखळपणा त्यांच्या वृत्तीत पुरेपूर भरलेला आहे. त्यामुळे ते स्वतःला कशातही झोकून देऊ शकतील. क्षणिक भावनेचा उद्रेक त्यांच्या ठिकाणी होऊ शकेल, ते पराकोटीला जाऊ शकतील. ह्या त्यांच्या स्वाभाविक वृत्तीला आवर घालणारी दोन बंधने आहेत. एक त्यांच्या गुरूच्या व्यक्तिमत्त्वाची स्मृती आणि दुसरे त्यांच्या पत्नीची अतिशय प्रेमळ पण अतिशय परिणामकारक जरब. आणि ही दोन्ही बंधने आता बाह्य बंधने राहिलेलीच नाहीत. ती शास्त्रीजींनी आत्मसात केली आहेत आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या द्रव्यात मिसळून गेली आहेत. आणि तरीही त्यांचा मूळचा निकोप अवखळपणा ह्या वयातही अधूनमधून उसळून येतो, हे आपल्या सर्वांचे भाग्य.

कुशाग्र बुद्धिमत्ता आणि चिकाटीने केलेले परिश्रम यांच्या बळावर शास्त्रीजींनी भारतीय बौद्धिक परंपरा आत्मसात केली. ज्या परंपरेतील विद्यार्थी आपण बारा वर्षे 'व्याप्ती' पढत होतो, असे अभिमानाने आणि सार्थकतेने सांगतात, ती सारी परंपरा एखाद्या व्यक्तीने आत्मसात केली असे म्हणणे धार्ष्ट्याचे वाटेल. पण शास्त्रीजींचा बौद्धिक झपाटा किती विलक्षण आहे हे त्यांच्या सहवासात आल्याशिवाय कळू शकणार नाही. हॅरॉल्ड लास्की ह्यांच्याजवळ जस्टिस होम्स ह्यांनी वाचनाच्या बाबतीतील स्वतःच्या असमर्थतेचा एकदा कबुली जबाब दिला होता. पुस्तक वाचताना आपल्याला प्रत्येक ओळ डावीकडून उजवीकडे वाचत जावी लागते व त्यामुळे फार वेळ मोडतो. आपण लास्कीप्रमाणे पुस्तके वरून खाली वाचू शकत नाही याबद्दल त्यांनी खेद व्यक्त केला होता. शास्त्रीजींच्या वाचनाचा आवाका पाहिला तर पुस्तके आडवी वाचायची गरज त्यांना नसावी, पुस्तके उभी वाचण्याची किमया त्यांना साधली असावी असा संशय येतो. पण वाचलेल्या प्रत्येक पुस्तकाचे मर्म त्यांनी ग्रहण केलेले असते आणि पचवलेले असते. आपल्याला आलेला कोणताही अनुभव आपण

कधीही विसरत नाही, आपल्या गुप्त मनात तो कायमचा साठवलेला असतो असे काही मानसशास्त्रज्ञांचे म्हणणे आहे. शास्त्रीजींनी वाचलेल्या ग्रंथांच्या बाबतीत ही गोष्ट शब्दशः खरी असावी असे वाटते. फरक एवढाच की, त्यांनी वाचलेले सारे त्यांच्या सुप्त मनात साठवलेले नसते. ते त्यांच्या जागृत मनात उपस्थित असते. आणि त्याचा ते विनासायास पुनरुच्चार करतात. त्यांच्या वाचनाचा पसारा आणि त्यांचे कार्यबाहुल्य ध्यानी घेतले तर ह्या गोष्टीचा अचंबा वाटल्याशिवाय राहात नाही. शास्त्री-पंडितांनी ग्रंथ मुखोद्गत केलेले असणे ही आपल्या परिचयाची गोष्ट आहे. पण शास्त्रीजींचे नवल वाटते ह्याचे एक कारण असे की, ह्या ग्रंथांची संख्या अलोट आहे. आणि ते वेगवेगळ्या शास्त्रांतील ग्रंथ आहेत. शिवाय ह्या ग्रंथांचे पद्धतशीर अध्ययन-अध्यापन करणे त्यांनी सोडून दिल्यावर अनेक दशके लोटली आहेत. पण हे सारे ज्ञान त्यांच्या मनात अजून ताजे, टवटवीत आहे.

त्यांच्या कुतुहलाचा आवाकाही विलक्षण आहे. वेदविद्या, धर्मशास्त्र, दर्शने, व्याकरण, साहित्य आणि साहित्यशास्त्र हे सारे विषय ह्या आवाक्यात मोडतात. वृत्तीने ते विशेषज्ञ (स्पेशालिस्ट) नाहीत. विशेषज्ञांच्या एकाग्रतेचा, एका संकुचित क्षेत्रात प्रदीर्घ व्यासंग करून त्यांनी जो ज्ञानसंग्रह जमविलेला असतो, त्याचा ते मनापासून कृतज्ञतेने आदर करतात. पण स्वतःच्या व्यासंगावर असे एका विषयाचे बंधन घालून घेणे त्यांच्या प्रकृतीला मानवणारे नाही. ज्ञानाच्या बाबतीत ते पिपासू तर आहेतच, पण रसिकही आहेत. बौद्धिक आहारात त्यांना विविधता हवी असते. त्यांच्यात अनेक द्रव्यांचा समतोल राखला गेलेला पाहिजे असतो. त्यांच्या बुद्धीचे वळण संग्राहक, समावेशक, समन्वयात्मक (सिनॉप्टिक) आहे. वेगवेगळ्या ज्ञानशाखांतील परस्परसंबंधांचे धागे ते अचूकपणे हेरतात; भिन्न तपशिलाच्या पसाऱ्याखाली अर्धवट दडलेली त्यांच्यामधील साम्ये त्यांच्या दृष्टीला पटकन येतात. ज्या एकात्म मानवी अनुभवातून आणि व्यवहारातून ह्या विद्या विकसित झाल्या आहेत, त्यांच्याशी त्यांचे असलेले संधान ते कधी विसरत नाहीत. ह्यामुळे त्यांचा व्यासंग अनेकविध असला तरी तो विसकळीत नाही. त्याच्यात व्यवस्था आहे. भारतीय विद्यांच्या बाबतीत तरी शास्त्रीजींना उद्देशून 'सर्वज्ञः स हि लक्ष्मणः' असे म्हणता येईल.

ह्या विद्यांच्या अध्ययन-अध्यापनात शास्त्रीजींची तरुणपणाची उमेदीची काही तल्लख वर्षे गेली. त्यांचा संस्कार त्यांच्या बुद्धीच्या घडणीवर आणि व्यक्तिमत्त्वावर कायमचा झालेला आहे. भारतीय बौद्धिक परंपरेतील प्रांजलपणा आणि चोखपणा, विचारांची स्पष्टता, सूक्ष्मता आणि झेप, तिने निर्माण केलेली आणि स्वीकारलेली करडी बौद्धिक शिस्त ह्यांचा शास्त्रीजींना रास्त अभिमान आहे. ते स्वतःला ह्या परंपरेतील मानतात. ते मूलतः एक शास्त्री आहेत. ह्याशिवाय ते आणखी कितीतरी गोष्टी आहेत आणि असतील. पण त्यांचे शास्त्रीपण हा ह्या इतर साऱ्या गोष्टींचा आधार आहे. ह्या परंपरेतील व्यक्तींच्या आठवणीत, सहवासात ते स्वाभाविकपणे रमतात. ह्या क्षेत्रात ते स्वतःच्या घरी असल्यासारखे मोकळेपणे वावरतात.

ह्या परंपरेतील थोर विद्वानांची ते अतिशय कदर करतात. विशेषतः त्यांची डोळसपणे कदर करू शकणारी आपल्यासारखी माणसे फारच कमी आहेत ह्याची जाणीव असल्यामुळे ते अधिकच आपुलकीने त्यांची कदर करतात. वृद्ध माणसांच्या मनात आपल्या विरून गेलेल्या बालपणीच्या स्थळांच्या, प्रसंगांच्या, व्यक्तींच्या आठवणी जशा भरभरून येतात, त्यांच्याच उदास आनंदाने ते जसे रमतात, तशी स्थिती शास्त्री-पंडितांच्या परंपरेविषयी बोलताना शास्त्रीजींची होते. आपल्या अभिमानाचा विषय असलेल्या ह्या आठवणी ऐकण्यात आता कुणाला रस असणार नाही, सभ्यपणाचा प्रकार म्हणून फार तर लोक त्या ऐकून घेतील अशी भीतीही त्यांना असणार. ह्या क्षेत्रात त्यांनी जमविलेले विचारधन, त्यांनी गाजवलेल्या पराक्रमाच्या, त्यांना भेटलेल्या दिग्विजयी पंडितांच्या आठवणी हा आता त्यांच्या एकांतातील आनंदाचा विषय झाला आहे. पण ह्या विषयावर बोलता बोलता खुलून आलेल्या शास्त्रीजींचे बोलणे ऐकणे हा अविस्मरणीय अनुभव आहे.

## परंपरागत ज्ञानाचे पुनरुत्थापन

पण शास्त्रीजी मूलतः शास्त्री असेले तरी केवळ शास्त्री उरलेले नाहीत. भारतीय राष्ट्राच्या पुनरुत्थापनाचे साधन म्हणून परंपरागत भारतीय ज्ञानाची साधना करायची आहे हे प्राज्ञपाठशाळेचे उद्दिष्ट ते कधी विसरले नाहीत. हे पुनरुत्थापन म्हणजे केवळ परंपरेचे पुनरुज्जीवन असू शकणार नाही, ही गोष्ट त्यांनी हेरली. वर्तमान परिस्थितीशी मुकाबला करू शकणारा, भविष्याला अभिमुख असा जोमदार समाज येथे निर्माण करायचा तर आतापर्यंतच्या परंपरानिष्ठ, स्थितिशील भारतीय समाजाहून तो वेगळा असला पाहिजे जे त्यांना मनोमन पटले. व्यक्तिस्वातंत्र्य, समता आणि सामाजिक न्याय, भौतिक समृद्धी ह्या मूल्यांवर आधारलेला, भौतिक विज्ञान आणि तंत्रज्ञान आत्मसात केलेला आणि विशेषतः वैज्ञानिक, चिकित्सक दृष्टिकोन दृढपणे स्वीकारलेला असा तो समाज असला पाहिजे हे त्यांना स्पष्टपणे दिसून आले. आणि अशा समाजाची धारणा करणाऱ्या आधुनिक विद्यांकडे आणि तत्त्वज्ञानाकडे ते वळले.

## आधुनिक ज्ञानाचा स्वीकार

आधुनिक ज्ञानाकडे जेव्हा शास्त्रीजी वळले, तेव्हा त्यांची बुद्धी प्रगल्भ होती. कोणताही विचार शक्य तितक्या स्पष्ट स्वरूपात मांडावा, त्याचा आधार असलेली गृहीत कृत्ये उघड करावी, त्याच्यापासून निष्पन्न होणारे सर्व निष्कर्ष शोधावे ही बौद्धिक शिस्त त्यांनी पचवली होती. बौद्धिक आत्मप्रत्यय त्यांच्या ठिकाणी भरपूर प्रमाणात होता. तेव्हा त्यांना गुरूची आवश्यकता नव्हती. विचार समजून घेण्यात, त्याचे परीक्षण करण्यात काही अडचण पडायचे कारण नव्हते. फक्त इंग्रजी भाषेचा अडसर होता आणि तो दूर व्हायला वेळ लागला नाही. मग पाश्चात्त्य ज्ञानभांडाराचे जे भव्य दर्शन झाले त्याने ते अक्षरशः दिपून, भारावून गेले. ह्या ज्ञानभांडारामागचे बौद्धिक चैतन्य, प्रांजल चिकित्सक दृष्टी, नवनिर्मितिक्षम प्रतिभा ह्यांची

मोहिनी त्यांच्यावर सहजपणे पडली. भारतीय विद्या विरुद्ध पाश्चात्त्य विद्या हा द्वैत भाव त्यांना कधी जाणवलाच नाही. जी बौद्धिक आणि नैतिक मूल्ये भारतीय विद्यांच्या अध्ययनातून त्यांनी आत्मसात केली होती, त्यांचाच उज्ज्वल आविष्कार त्यांना पाश्चात्त्य ज्ञानपरंपरेत झालेला आढळला. आणि शिवाय ही ज्ञानपरंपरा अधिक जोमदार, विकसनशील होती; कारण समाजापुढील भौतिक, नैतिक, सांस्कृतिक प्रश्नांची उत्तरे शोधण्यात ती गुंतलेली होती. पूर्वसंचित सांभाळणे हे भारतीय विद्यांच्या अध्ययनाचे उद्दिष्ट होते. ज्ञानाचा विस्तार करणे, भौतिक आणि सामाजिक वास्तवाचे स्वरूप स्पष्ट करीत राहणे अणि कमावलेल्या ज्ञानाने सामाजिक जीवनाचे नियमन करणे हे पाश्चात्त्य ज्ञानपरंपरेचे उद्दिष्ट होते. ह्या ज्ञानपरंपरेत शास्त्रीजी सहजपणे प्रविष्ट झाले.

आधुनिक ज्ञानाची बैठक ज्यांनी सिद्ध केली, त्या सोळाव्या-सतराव्या शतकातील युरोपिअन विचारवंतांशी त्यांची तुलना करता येईल. ॲरिस्टॉटिलि अन स्कॉलॅटिक परंपरा तेव्हा विद्यापीठात दृढमूल होती. ह्या परंपरेत ते वाढले होते. पण ती निःसत्त्व, जीर्ण झाली आहे हे ह्या विचारवंतांनी ओळखले होते आणि एका नवीन प्रकारचे तत्त्वज्ञान आणि विज्ञान, वेगळी नैतिक आणि सामाजिक मूल्ये, वेगळी सामाजिक व्यवस्था आणि राज्यपद्धती निर्माण करण्याचे आव्हान त्यांनी स्वीकारले होते. ह्या विचारवंतांचे विद्यापीठांशी संबंध असले तरी त्यांनी निर्माण केलेले नवीन ज्ञान विद्यापीठांबाहेरच फोफावले आणि हळूहळू विद्यापीठांच्या अभ्यासक्रमांत आणि संशोधनात प्रविष्ट झाले. परंपरेच्या कोशातून बाहेर पडून आपण नव्याने सुरुवात करीत आहो, वेगळ्याच प्रकारे विचार करीत आहो, ह्या जाणिवेतून निर्माण झालेली ईर्षा व उत्साह ह्या ज्ञानात भरलेला आहे. पण पारंपरिक समाजाच्या गर्भात रूप धारण करीत असलेल्या एका वेगळ्या प्रकारच्या समाजाला आकार देण्याचे कार्य आपण करीत आहो, ह्या जाणिवेतून येणारी जबाबदारीची भावनाही त्याच्यात अहे. तो चैतन्याने रसरसलेला असा आहे. शास्त्रीजीही एका परंपरेच्या कोशातून बाहेर पडले होते. त्यांनी नवीन प्रकारचे ज्ञान निर्माण केले नाही, पण त्याचा शोध होता आणि म्हणून त्यांना जे दर्शन घडले त्याच्यात उत्कटता आणि ताजेपणा होता. ह्या अवस्थेमध्ये शास्त्रीजींना मार्क्सवादाचे आकर्षण वाटणे स्वाभाविक होते. उलट, मार्क्सने सामाजिक परिवर्तन हे तत्त्वज्ञानाचे आद्य कार्य मानले. सामाजिक वास्तवाचा अर्थ लावायचा तो ह्या वास्तवात बदल घडवून आणण्यासाठी ही सामाजिक बांधिलकी शास्त्रीजींच्या प्रेरणेशी जुळली. त्यांच्या दृष्टीनेही ज्ञान हे सामाजिक परिवर्तनाचे आयुध होते. मार्क्सवादाची एक श्रद्धाशील बाजू आहे. मानवजातीने आपल्या ऐतिहासिक वाटचालीत निर्माण केलेल्या साऱ्या भौतिक आणि सांस्कृतिक संचिताचा मार्क्स अभिमानाने आणि आदराने स्वीकार करतो. ह्या साऱ्या संचिताला एक काळी पिळवणुकीची निगेटिव्ह बाजू आहे आणि म्हणून ह्या संचितात हीन मिसळलेले आहे, ही गोष्ट मार्क्स ओळखतो, किंबहुना तिच्यावर तो सतत भर देतो. पण ही

निगेटिव्ह बाजू नष्ट करणे, हे संचित शुद्ध करून सबंध मानवजातीचा समाईक वारसा म्हणून म्हणून सर्वांना त्याच्यात सहभागी होता येईल अशी समाजरचना निर्माण करणे हे तर त्याच्या दृष्टीने सामाजिक परिवर्तनाचे उद्दिष्ट होते. ह्या श्रद्धाळू आणि क्रांतिकारक बाजू शास्त्रीजींच्या मनोवृत्तीशी सुसंगत होत्या. सामाजिक जीवनाच्या आणि संस्कृतीच्या कोणत्याही अंगाकडे समग्र सामाजिक वास्तवाच्या आणि त्याच्या घडत आलेल्या ऐतिहासिक विकासाच्या संदर्भात पाहिले पाहिजे हा मार्क्सवादी दृष्टिकोनही त्यांच्या बौद्धिक व्यक्तिमत्त्वाला पटण्यासारखा होता. आणि म्हणूनच मार्क्सवाद त्यांच्या दृष्टीने आयात केलेली विचारसरणी नव्हती. आधुनिक समाज घडविण्याचे साधन म्हणून ते आधुनिक ज्ञानाकडे वळले होते. आणि ह्याच प्रेरणेने त्यांनी मार्क्सवादाचा स्वीकार केला. ह्या स्वीकारात सखोलपणा होता, त्याच्यामागे स्वतःशीच केलेला एक जीवघेणा संघर्ष होता आणि ज्या मूल्यांवरील निष्ठेमुळे भारतीय सांस्कृतिक परंपरा आत्मसात करायला ते प्रवृत्त झाले होते, त्याच मूल्यांवरील निष्ठेमुळे हा स्वीकार अटळ ठरतो, ह्या जाणिवेतून निर्माण झालेली उत्कटता होती. ह्या काळच्या त्यांच्या लिखाणात आणि विशेषतः ‘हिंदुधर्माची समीक्षा’ ह्या त्यांच्या पुस्तकात मार्क्सवादी दृष्टिकोन स्पष्टपणे प्रतिबिंबित झाला आहे. ह्या काळात भारतीय संस्कृतीची त्यांनी केलेली चिकित्सा अतिशय विघातक होती. ह्या चिकित्सेतून त्यांनी स्वतःलाच, स्वतःच्या पूर्वायुष्यात साधलेल्या स्वतःच्या कर्तृत्वालाच नाकारले होते.

## एम. एन. रॉय यांचा प्रभाव

ह्या काळात एम. एन. रॉय ह्यांचा प्रभाव त्यांच्यावर पडणे आणि रॉय ह्यांनी त्यांना जवळ करणे स्वाभाविक होते. भारतातील मार्क्सवादी पुढारी आणि विचारवंत यांच्यात रॉय ह्यांचे व्यक्तिमत्त्व टोलेजंग होते. मार्क्सवादी क्रांतीच्या आद्य प्रवर्तकांतील व्यापकपणा आणि बहुविधपणा अपेक्षित असतो. कोणत्याही वैचारिक भूमिकेचे, सिद्धांतांचे मूलगामी विश्लेषण करण्याची जी कुवत अपेक्षित असते, ती रॉय ह्यांच्या ठिकाणी होती. तेव्हा जो नवीन, आधुनिक दृष्टिकोन आपण स्वीकारला आहे, त्याचे भारतात रॉय समर्थपणे प्रतिनिधित्व करतात, असे शास्त्रीजींना वाटणे स्वाभाविक होते. रॉय यांच्या तोडीच्या भारतीय विचारवंतांशी त्यांची तुलना केली तर रॉय ह्यांचे वैशिष्ट्य असे आढळून येईल की, त्यांनी भारतीय परंपरेचा पाश्चात्त्य परंपरेशी समन्वय साधण्याचा कधी प्रयत्न केला नाही. मानवजातीचा एकात्म सांस्कृतिक वारसा आहे असे त्यांनी मानले आणि ह्या दृष्टिकोनातून त्यांनी भारतीय संस्कृतीची चिकित्सा, मूल्यमापन केले. ते भारतीय होते, पण हा त्यांच्या दृष्टीने अपघात होता. ते भारतीय म्हणून भारत हे त्यांचे कार्यक्षेत्र होते. पण मानवजातीचा इतिहास घडविण्याचा एक भाग म्हणून ह्या कार्यक्षेत्राकडे त्यांनी पाहिले. भारतीयत्वाचा अभिनिवेश त्यांच्या ठिकाणी यत्किंचितही नव्हता. असता तर ती त्यांनी अडगळ मानली असती. उलट, शास्त्रीजींचे भारतीयत्व दृढ होते. भारतीय संस्कृतीने त्यांचे व्यक्तिमत्त्व

घडविलेले होते. आधुनिकत्वाकडून पारंपरिक भारतीय संस्कृतीकडे आलेले रॉय आणि पारंपरिक भारतीय संस्कृतीकडून आधुनिकत्वाकडे गेलेले शास्त्रीजी ह्यांना परस्पर आकर्षण वाटणे स्वाभाविक होते. शिवाय शास्त्रीजींसारखा चिकित्सक, परिणतप्रज्ञ सहकारी रॉय ह्यांना लाभला, ही गोष्टही रॉय ह्यांनी केलेल्या बौद्धिक वाटचालीला अनुकूल ठरली असणार. एखादा विचार अमुक एकाकडून येतो, रॉय ह्यांच्याकडूनही येतो, म्हणून केवळ शास्त्रीजींनी कधी स्वीकारला नसता; तपासून घेतल्याशिवाय कोणताही विचार त्यांनी स्वीकारला नसता. आपला नवमानवतावाद प्रसृत करण्यापूर्वी रॉय ह्यांनी जे विचारमंथन केले, त्याच्यात शास्त्रीजींचा मोठाच भाग असणार.

इतिहासाचा एकमेव राजमार्ग असतो असे नाही. भारतीय संस्कृतीत काही वैशिष्ट्यपूर्ण मूल्ये रुजून फुलली असतील, फुलविण्यात येऊन जोपासली असतील. समाजाचे स्वास्थ्य आणि व्यक्तीचे हित ह्यांचा तोल साधणारी समाजधारणेची काही वैशिष्ट्यपूर्ण तत्त्वे येथे आकारलेली असतील, पण त्याबरोबरच व्यक्तीच्या विकासाला आणि समाजाच्या प्रगतीला कुंठित करणाऱ्या अनेक प्रथा, अनेक विचार ह्यांनी ह्या समाजाला वेढून टाकलेली असेल. चांगल्या-वाईटाचे मिश्रण असलेल्या आपल्या सांस्कृतिक वारशाचे आत्मीयतेने पण चिकित्सकपणे परीक्षण केले पाहिजे. हे काम शास्त्रीजींइतक्या अधिकाराने आणि कौशल्याने दुसरा कोणीच करू शकणार नाही. ‘वैदिक संस्कृतीचा विकास’ ह्या आपल्या ग्रंथात हे काम त्यांनी काही प्रमाणात केले.

वैदिक संस्कृतीची समावेशक, उदार, विधायक बाजू त्यांनी उलगडून दाखविली. अहिंसा (म्हणजे भूतमात्राविषयीची आस्था), सृष्टीशी असलेल्या तादात्म्याच्या जाणिवेतून निर्माण झालेली निसर्गाविषयीची आदराची भावना ही मूल्ये शास्त्रीजींना भारतीय संस्कृतीची थोर वैशिष्ट्ये वाटतात आणि हे योग्यच आहे. मानवी समाजाच्या धारणेला, माणसाची नैतिक संवेदनशीला जागी राखण्यासाठी ही मूल्ये अतिशय आश्वासक आहेत. सेमेटिक परंपरेत माणसाचा आत्मकेंद्रीपणा, निर्घृणपणा जोपासला गेला आहे. माणूस आणि इतर सर्व सृष्टी ह्यांना विभागणारी एक रेषा ह्या परंपरेने आखली आहे. ह्या रेषेपलीकडचे पदार्थ मात्र केवळ माणसाच्या उपभोगासाठी आहेत अशी ह्या परंपरेची शिकवण आहे. ह्यामुळे त्यांच्याकडे बेदरकारपणे पाहण्याची वृत्ती माणसांत मुरते आणि ही बेदरकार वृत्ती अ-मानवी वस्तुंपुरती मर्यादित राहात नाही. आज लोकसंख्येची अमाप वाढ झाली असताना आणि नैसर्गिक साधनसंपत्ती लुटून फस्त होत असताना अहिंसा, सृष्टीविषयीचा पूज्यभाव ह्या भारतीय मूल्यांची साऱ्या मानवजातीला आवश्यकता आहे. उलट, शुचिता हे मूल्य (आणि त्याची सावली असलेली विटाळ ही कल्पना) भारतीय समाजाला घातक ठरली आहे असे त्यांचे ठाम मत आहे. त्याच्यामुळे सामाजिक सरमिसळ अशक्य झाली, बुद्धिजीवी वर्ग आणि कष्टकरी वर्ग एकत्र येऊ न शकल्यामुळे भौतिक विज्ञाने वाढली नाहीत, घरकोंबडी वृत्ती बळावल्यामुळे सर्वच क्षेत्रांतील कर्तबगारी कुंठित झाली.

## कृतार्थ

शास्त्रीजी आज कृतार्थ आहेत. प्रेमळ आणि दक्ष पत्नीची संगत त्यांना जन्मभर लाभली आहे. त्यांचा वैयक्तिक संसार बहरलेला आहे. हे अर्थात प्रामुख्याने त्यांच्या पत्नीच्या दक्षतेमुळेच शक्य झाले. पण ह्यात भगवंताचेही अधिष्ठान होते, ह्यात शंका नाही. सारी सामाजिक कर्तव्ये त्यांनी मनःपूर्वक पार पाडली आहेत. सारे जीवन स्वच्छ आहे, लपविण्यासारखे त्यांच्यात काहीच नाही. प्रातःकाली सुस्नात शुचिर्भूत अशी शास्त्रीजींची मूर्ती शाल पांघरून प्रसन्नपणे चिंतनमग्न स्थितीत प्राज्ञपाठशाळेच्या आवारात फिरताना ज्यांनी पाहिली असेल, त्यांना प्राचीन आश्रमातील कुलपतीची आठवण व्हावी. आश्रमाला साजेसा कुलपती आहे पण अंतेवासी नाहीत, ही खंत आहे. ब्राह्मण्याचे तेज त्यांच्या ठिकाणी आहे, पण ब्राह्मण्याचा अहंकार यत्किंचितही नाही. समानतेवरील श्रद्धा हा त्यांच्या जीवनाचा पाया आहे. प्राज्ञपाठशाळेत विचारविनिमयासाठी येणारे मंत्री आणि आठवड्याच्या बाजाराच्या दिवशी हक्काने वसतीला येणारे धनगर ह्या साऱ्यांचे स्वागत सारख्याच जिव्हाळ्याने ते आणि त्यांची पत्नी करतात. ते मांसाहारी आहेत, पण ब्राह्मणी पद्धतीचे, सात्त्विक, मिष्ट, शाकाहारी भोजनच त्यांना मनापासून रुचते, अशी मला दाट आणि सकारण शंका आहे. आधुनिक होण्यासाठी केवळ तत्त्वनिष्ठतेने मांसाहारी होण्याचा निर्णय त्यांनी घेतला असावा असे मला वाटत होते. हा माझा तर्क मी त्यांना बोलून दाखविला तेव्हा ते म्हणाले, 'असे नाही; स्वातंत्र्याच्या चळवळीत प्रचारासाठी फिरताना ज्या घरी, ज्या झोपडीत माझा मुक्काम असेल, तेथे जे शिजायचे, माझ्या यजमानाच्या ताटात जे पडायचे, तेच माझ्या ताटात पडले पाहिजे असा माझा आग्रह होता.' ह्यामुळे शास्त्रीजी कुणाला कधी कुठे परके वाटलेच नाहीत. हरिजनांच्या कल्याणासाठी आपले सारे जीवन वेचलेल्या एकनिष्ठ गांधीवादी कार्यकर्त्यांना जे साधले नाही ते शास्त्रीजींना सहज साधले. जेथे जेथे शास्त्रीजी पोचले तेथे ते लोकांचे, लोकांतले एक बनले. गांधीहत्येनंतर ग्रामीण महाराष्ट्रात ब्राह्मणविरोधाचा डोंब उसळला. प्राज्ञपाठशाळा अच्छेद्य, अदाह्य म्हणून शांतपणे उभी होती. माझ्या आयुष्यातील एका बिकट प्रसंगी मला धीर देताना ते स्वतःबद्दल म्हणाले, 'सर्व जगाला वाटते की मी नास्तिक आहे, पण माझ्या पत्नीला मात्र हे माहीत आहे की मी वेदांती आहे.' कदाचित ह्या श्रद्धेमुळेच त्यांना या समत्वाचा योग साधला असेल. कधीकधी कुणावर संतापाने भडकताना मी त्यांना पाहिले आहे, पण कुणाचा राग त्यांनी मनात धरलेला मला माहीत नाही. त्यांना लाभलेल्या अधिकारस्थानामुळे त्यांना अनेकांना दुखवावे लागले आहे. त्यांचे अनेक शत्रू असणार. पण ते कोणाचेही शत्रू नाहीत. व्यक्तिनिरपेक्ष असलेल्या आधुनिक शासनयंत्रणेची सूत्रे चालविताना होणारी त्यांची तारांबळ अनेकांनी पाहिली असणार. कारण माणसांविषयीचा जिव्हाळा, त्यांच्यातील कर्तृत्वाच्या बीजाविषयीची आस्था हाच त्यांचा घनिष्ठ परिचय होता आणि परिचयापासून आपला लाभ झाला आहे

असे ह्या व्यक्तींनीही मानले होते. पण शास्त्रीजी समोरच्या कुणाही माणसाशी सारख्याच समरसतेने बोलू शकतात. आणि त्यांच्या जवळ आलेल्यांना ह्या साऱ्या व्यापात मग्न असतानाही ते अलिप्त असतात, हे जाणवते. ज्या प्रेरणेने ते प्राज्ञपाठशाळेत आले, तिच्याशी ते पूर्णपणे एकनिष्ठ राहिले. जे व्रत त्यांनी स्वीकारले, त्याला एक समृद्ध आशय त्यांनी दिला, पण शिवाय त्याचा प्रखरपणाही त्यांनी सहन केला- नव्हे, त्याच्यात आनंद मानला. ह्या आत्मिक बळामुळे ते अजित, अ-दीन असे जीवन जगू शकले. ह्या आत्मिक बळावर ते शंभर शरद जगतील.

**(दै. महाराष्ट्र टाइम्स, मुंबई, दि. १६ मार्च, १९७५)**

❍❍❍

## १७.

# विचार शिल्पकाराची प्रतिमा: तर्कतीर्थ

## रा. ग. जाधव

महाराष्ट्रातील एक थोर विद्वान आणि विचारवंत तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या काही निवडक लेखनाचा हा संग्रह मराठी वाचकांपुढे ठेवताना मला आनंद होत आहे. शास्त्रीजींच्या नित्य व्यासंगाचे अनेक विषय त्यात अंतर्भूत असले, तरी तो एक प्रातिनिधिक विचारसंग्रह आहे, असे नाही. त्यांच्या साहित्याचा 'विशाल भूधर' समोर उभा आहे नि त्याच्या उत्तुंगतेने मन भारावून जात आहे; अशा अवस्थेत त्या भूधराच्या एका कातळावर त्याचेच एक लघुशिल्प खोदण्याचा हा प्रयत्न आहे. राजमार्ग वा लघुवाट नसलेल्या विद्यापीठाकडे जाण्यासाठी एखादी पायवाट काढता येते. शास्त्रीजींच्या मूळ लेखनाचा स्थूल परिचय करून घेण्यास ही पायवाट कदाचित उपयोगी पडेल, असा विश्वास वाटतो.

शास्त्रीजींची प्रतिमा नजरेसमोर असली, की विद्वान आणि विचारवंत या दोहोंची व्याख्या नव्याने करावीशी वाटते; आणि या पुढच्या भारतीय समाजात ज्या प्रकारच्या विद्वानांची व विचारवंतांची खरी गरज आहे, त्या विद्वान-विचारवंतांची कल्पना स्पष्ट होत जाते. लोकहितवादींनी आपल्या 'शतपत्रां'तील पन्नासाव्या पत्रात 'स्वराज्यातील विद्वानां'विषयी अत्यंत परखडपणे आपली नापसंती व्यक्त केली आहे. राजेरजवाड्यांच्या आश्रयाने जगणाऱ्या त्या विद्वानांनी जुनी विद्या वाढविलीही नाही व तिचा समाजाला उपयोगही होऊ दिला नाही. विद्वानाने ज्ञानधनाचे पूर्वसंचित केवळ सांभाळून भागत नाही; तर ते त्याला वर्धिष्णू करावे लागते; म्हणजे पूर्वसंचिताचे जिवंतपण मीमांसापूर्वक टिकवून ठेवावे लागते. खरा विद्वान ज्ञानसंचिताचा संरक्षक व समीक्षक असतो. शास्त्रीजींनी जीवनभर हे कार्य केले. धर्मकोशाची संपादणी, 'हिंदुधर्माची समीक्षा' व ' वैदिक संस्कृतीचा विकास' ह्या ग्रंथराजांची निर्मिती हे त्याचे फलित होय. लोकहितवादींना जो कर्मयोगी विद्वान अभिप्रेत होता, तोही शास्त्रीजींत आहे. राजदरबारी व पाठशाळांत बंदिस्त झालेले, 'अटकावलेले' ज्ञान त्यांनी महाराष्ट्राच्या

कानाकोपऱ्यांत व्याख्यानरूपाने विखरून दिले. महाराष्ट्राला शास्त्रीजींचा खरा परिचय एक व्याख्याते म्हणूनच अधिक आहे. जीवनातील फार मोठा काळ त्यांनी व्याख्यानांपायी खर्ची घातला आहे. शास्त्रीजींना खरे तर, लेखनापेक्षा बोलण्याचीच अधिक महती वाटते. 'हिंदुधर्माची समीक्षा' (१९४०) व 'वैदिक संस्कृतीचा विकास' (१९४९) हे त्यांचे दोन ग्रंथ मुळातील व्याख्यानेच आहेत. आपल्या शेकडो भाषणांमधून शास्त्रीजींनी महाराष्ट्रातील लहानमोठ्या गावांतील विचारभुकेल्यांना ज्ञानाचे सकस अन्न पुरविले आहे. ज्ञानाला त्यांनी हस्तिदंती मनोऱ्याबाहेर आणले व समाजाच्या भर प्रांगणात खडे केले. खासगी चर्चा हे तर शास्त्रीजींचे विद्वानप्रिय असे विद्यापीठच. या विद्यापीठात ज्यांना ज्यांना प्रवेश लाभला, ते ते नव्या विचारांनी उजळून निघाले. हे विद्यापीठ मुक्तद्वार विद्यापीठ होते व तेथे सामान्यातल्या सामान्य माणसाला केव्हाही प्रवेश असे.

शास्त्रीजींच्या सर्व लेखनाला एक प्रकारचे सामाजिक निमित्त आहे. एखादी शाळा, संस्था, महाविद्यालय, व्यक्तींचे वाढदिवस वा वर्धापनदिन प्रसंग, व्याख्यानमाला, ग्रंथप्रकाशन, ग्रंथपुरस्कार यांसारख्या नाना कारणांस्तव ते आजवर भाषणे देत आले व लेखन करीत आले. यामागे सामाजिक जबाबदारीची एक निष्ठा आहे. केवळ स्वतःचे विद्वत्त्व मिरविण्यासाठी त्यांनी लेखनही केले नाही व भाषणही दिले नाही. जिथे जिथे व ज्यांना ज्यांना ज्ञानविचारांची गरज जाणवली, तिथे तिथे ते गेले व त्यांना त्यांना त्यांनी ज्ञानविचार ऐकवले. घराबाहेर पडलेला हा विद्वान म्हणूनच कर्मयोगी विद्वान ठरतो. स्वतंत्रपणे फार मोठे ग्रंथकर्तृत्व करून दाखविण्याची क्षमता असूनही शास्त्रीजींनी ते केले नाही, सामाजिक उद्बोधन हीच त्यांच्या ज्ञानयोगाची व लेखनाची प्रेरणा राहिली.

पण शास्त्रीजी केवळ कर्मयोगी विद्वान नाहीत; तर ते आधुनिक विचारवंतही आहेत. विद्यासंपन्न वैदिक पंडित एवढ्याच भूमिकेत ते मर्यादित राहिले नाहीत. आधुनिक पश्चिमी ज्ञानविज्ञानाच्या ज्ञानसागरात परिश्रमपूर्वक विहार करून त्यांनी भारतीय ज्ञानपरंपरेला आधुनिक अन्वयर्थकता आणण्याचा प्रयत्न केला. परंपरा व आधुनिकता या दोहोंनाही आपल्या अगाध व्यासंगाने खराखुरा डोळसपणा दिला. मराठी विश्वकोशाची निर्मितिप्रेरणा यातूनच त्यांना लाभली. सामाजिक प्रगतीचे लक्ष्य ठेवणाऱ्या विचारवंताला पारंपरिक विद्वत्ता व आधुनिक ज्ञान यांचा मेळ घालावाच लागतो. हा मेळ कसा घालावयाचा, याचा आदर्श शास्त्रीजींनी घालून दिला. मानवेंद्रनाथ रॉयांसारख्या प्रतिभावंत तत्त्वज्ञाला शास्त्रीजींविषयी 'द बेस्ट प्रोडक्ट ऑफ दि इंडियन रेनेसान्स' असे उद्गार काढावे लागले, त्याचे मर्म या वस्तुस्थितीतच आहे.

म्हणूनच आज-उद्याच्या विद्वान-विचारवंताना शास्त्रीजींच्या आदर्शापासून पुष्कळ काही शिकण्यासारखे वाटेल. जो जाणतो तो विद्वान व जो विचार करतो तो विचारवंत, या सूत्रानुसार आधुनिक समाजाला जे प्रेरक ठरेल, ते जाणून घेणे व तेच विचारान्ती प्रकट करणे,

या नव्या विचारकार्याचा वस्तुपाठ शास्त्रीजींनी घालून दिला. आपले प्राचीन विचारधन आणि पश्चिमी आधुनिकता यांची स्वच्छपणे चिकित्सा करून उद्याच्या समाजरचनेची घडण कशी करता येईल, हा भारतीय प्रज्ञेपुढे अतिशय महत्त्वाचा प्रश्न आहे. आंधळी परंपराभक्ती व वेंधळी पश्चिमपूजा यांचे धोके टाळून हा प्रश्न सोडवावा लागेल. यासाठी समाजात सातत्याने विचारमंथन चालू राहणे आवश्यक आहे. आणि अशा विचारमंथनासाठी महाराष्ट्रात तरी एक 'लक्ष्मणशास्त्रीय' परंपरा टिकून राहणे इष्ट आहे.

पण कोणत्याही समाजात विचारकार्याला अडथळयांच्या शर्यतीतून धावावे लागते. विचाराने मने घडविण्याचे कार्य फार संथपणे चालते. संथपणाबरोबरच ते प्रतिभेप्रमाणेच 'असंलक्ष्यक्रम' असते. विचाराने मनोदीप कसे लागतात, हे सांगता येत नाही. ज्ञानविचाराचा परिणाम एकदम दृश्य स्वरूपात पहावयास मिळत नाही. ज्ञानाने मनाच्या खोल गाभाऱ्यात निरांजन तेवते, झगमगीत विद्युदीप लागत नाहीत. यामुळेच समाजातील विचारकार्याची बूज अधिक दक्षपणे राखावी लागते. आपल्या शिक्षणसंस्था या बाबतीत असमाधानकारक वाटतात. मराठी निबंधांच्या पाठ्यपुस्तकात त्याच त्या जुन्या लेखकांचे तेच ते निबंध वर्षानुवर्षे पाहावयास मिळतात. नव्या ज्ञानाची व विचारकार्याची योग्य ती दखल घेतली जात नाही. त्यामुळे नव्या पिढीला नव्या विचारांची ओळख करून देण्याची संधी हुकते. इतिहास, धर्म, तत्त्वज्ञान यांसारख्या विषयांच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमात आधुनिक विचारवंतांचे ग्रंथ समाविष्ट होत नाहीत. शास्त्रीजींसारख्या कितीतरी विद्वानांचे विचारप्रवर्तक लेखन आधुनिक मराठी विद्यापीठांत प्रवेशू नये, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. श्रेष्ठ विचारवंतांचे लेखन नाना प्रकारे व नाना घाटांतून समाजापुढे येत राहिले पाहिजे. पण या बाबतीत आपली सामाजिक जाणीव बोथट आहे. 'विचारशिल्प' सादर करण्यामागे एका श्रेष्ठ विचारवंताचे महत्त्वाचे लेखन नमुना म्हणून तरी घरोघर पोहोचावे, अशी तळमळ आहे. एका मोठ्या ज्ञानगंगेचे हे पाटाचे पाणी आहे, ते सुलभपणे दारी यावे असे मनापासून वाटते.

या पाण्याचा रंग महत्त्वाचा नाही; तर त्याची चव जीवनदायी आहे हे महत्त्वाचे नाहे. शास्त्रीजींच्या लेखनाचे सौंदर्य विचारांत आहे, शैलीत नाही. याचे कारण शास्त्रीजींची विचार करण्याची पद्धतीच शुद्ध तर्कसंगतीवर भर देऊन शुद्ध  विचार घडविणारी आहे. तिला लालित्याची गरज जाणवत नाही. मुद्दाम विचार खुलवावा, असे त्यांना वाटत नाही. पंडिती विचाररीतीमध्ये लालित्याला वाव नसतो असे नाही; पण त्याची आवश्यकता असतेच असेही नाही. 'पात्र सोन्याचे असो मृत्तिकेचे! वेड मजला आतल्या अमृताचे,' अशी काहीशी बाह्य शैलीविषयी शास्त्रीजींची कल्पना असावी. महत्त्व अमृताला आहे; ते सुवर्णपात्रात आहे की मृत्पात्रात आहे याला नाही. पण याचा अर्थ शास्त्रीजींच्या लेखनात रसिक विवेचनाची स्थळे नाहीत, असे नाही. शास्त्रीजी माणूस म्हणून विलक्षण रसिकसंपन्न आहेत. ऐंद्रिय संवेदनांची श्रीमंती ते अनुभवू शकतात व व्यक्तही करू शकतात. पण यासाठी विचारप्रतिपादनाला लालित्याचा संकर ते ऊठसूट करीत नाहीत.

'शैली म्हणजे व्यक्ती' ('स्टाइल इज द मॅन') असे म्हटले जाते, ते शास्त्रीजींच्या लेखनशैलीला पूर्णपणे लागू पडते. शास्त्रीजी कोणत्याही गोष्टीकडे विचारदृष्टीने पाहायचे म्हटले, की एक प्रकारच्या तर्कशुद्ध गांभीर्याने पाहतात. विचारांकडे क्रीडादृष्टीने पाहण्याची त्यांची वृत्ती नाही. त्यामुळे वरवरच्या विचारांचा वरवर विचार करणे वा एखाद्याच चमकदार विचाराचा पाठपुरावा करणे, त्यांना जमत नाही. सर्वांगीण व सम्यक विचारबोध हेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे लक्षण असल्याने 'मिया मूठभर व दाढी हातभर' अशी मांडणी त्यांच्या लेखनात अवतरत नाही. पण याचा अर्थ एवढाच की, एखाद्या विचाराचे लालित्यपूर्ण प्रकटीकरण ते विचाराच्या अंगोपांगांनीच करतात. म्हणूनच त्यांचे लेखन विचारसौंदर्याचा नमुना ठरते. त्यात माहितीची नुसती परिपूर्णताच नसते; तर ती माहिती विचारनाट्याने थरथरत असते. तिच्यात सखोल दृष्टीची व मार्मिक निरीक्षणाची रूपेरी चमक असते. बुद्धीला खडबडून जागे करणारी दीप्ती असते. युक्तिवादांचे चातुर्य तिच्यात असते. दृष्टान्ताचे नेमकेपण असते. यामुळेच सुजाण वाचकाला शास्त्रीजींच्या लेखनात एक प्रकारचे जिवंत स्पंदन ('थ्रिल') जाणवत राहते.

शास्त्रीजींच्या विचारकार्याचा मागोवा अनेक प्रकारे घेता येणे शक्य आहे. वयाच्या चौदाव्या वर्षी ते वाईच्या प्राज्ञ पाठशाळेत आले व त्यांना 'आचार्यदर्शन' घडले. आपला जन्म त्याच आचार्यकुळात झाला आहे, असा साक्षात्कार त्यांना घडला. पण पारंपरिक आचार्यपरंपरेत शोभण्यासारखे अध्ययन-अध्यापन करूनही ते त्या परंपरेतून लवकरच बाहेर पडले. महात्माजींच्या चळवळीत ते सामील झाले व जुन्या शास्त्राधारे नव्या सुधारणा साधू लागले. पण भारतीय सुधारणावादातूनही ते बाहेर पडले व मार्क्सवादी व रॉयवादी विचारप्रणालीने भारावून गेले. भारतापुरताच मर्यादित असलेला त्यांचा ध्येयवाद त्यामुळे अखिल मानवजातीच्या ध्येयवादात परिणत झाला. विचारशिल्पकाराची प्रतिमा अध्यात्मकेंद्रित विशाल मानवतावादाचा ध्रुवतारा आता शास्त्रीजींच्या वैचारिक वाटचालीचा मार्गदर्शक आहे.

नव्या ध्येयवादाने सतत बदलणारा हा प्रवाही विचारवंत म्हणूनच नेमक्या शब्दांत पकडणे सोपे नाही. मोठमोठ्या नेत्यांच्या व विचारवंतांच्या प्रभावळीत व प्रभावाखाली येऊनही शास्त्रीजींनी आपले विचारस्वातंत्र्य अबाधित राखले. एक प्रकारच्या गंभीर सारग्राही ('इक्लेक्टिक') वृत्तीने त्यांनी सर्व विचारधारांचे सार तेवढे आत्मसात केले व त्याज्य वाटले ते निर्भयपणे अव्हेरले. योग्यायोग्याचा हा साक्षेपी विवेक हे शास्त्रीजींच्या विचारकार्याचे खरे रहस्य असावे, असे म्हणूनच वाटते. कोणती एकच एक वैचारिक भूमिका अंधपणाने त्यांनी स्वीकारली नाही. कोणत्याच तत्त्वप्रणालीची बांधिलकी पत्करली नाही. म्हणूनच सनातन्यांना कधी ते जवळचे भासले; तर कधी आधुनिकांना ते आपलेसे वाटले. या दोहोंचेही समाधान करण्याची कुवत जशी त्यांच्यात आहे, तशीच कुवत या दोहोंनाही अस्वस्थ करण्याचीही आहे. म. गांधी, मार्क्स, मानवेंद्रनाथ रॉय यांच्याविषयी त्यांनी प्रबंधलेखन केले नाही; याचा अर्थ, त्यांच्या विचारांविषयीही व्यापक विधायक तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने

काहीतरी अपुरेपणा त्यांना जाणवत असावा. अपूर्णाला लेखनरूप गवसणी घालण्याचा प्रयत्न शास्त्रीजींनी कधी केला नाही. वैदिक संस्कृतीविषयी त्यांची भूमिका सर्वथा निश्चित झाली; म्हणून तिच्या विकासाचा आलेख रेखाटण्यास ते प्रवृत्त झाले. महात्मा गांधी, मार्क्स व मानवेंद्रनाथ रॉय यांसंबंधी जेव्हा ते तोंडी चर्चा करतात, तेव्हा या श्रेष्ठांच्या काही दुबळ्या जागा सहजपणे लक्षात येतात. स्वतंत्र विचार व विचारस्वातंत्र्य यासंबंधीच्या अत्यंत प्रगल्भ व आदर्शवत अशा कल्पना शास्त्रीजींनी जोपासलेल्या आहेत. या कल्पना त्यांनी कोठून मिळविल्या? असे वाटते, की ज्या पारंपरिक अध्ययनपद्धतीत शास्त्रीजींची वैचारिक घडण झाली, त्या पद्धतीतच स्वतंत्र विचाराचे व विचारस्वातंत्र्याचे आदर्श लपलेले होते. भारतीय विचारपरंपरा सर्वसमावेशक असली, तरी ती अतिशय काटेकोरपणे चिकित्सा करणारी परंपरा आहे. तिला शाब्दिक, भावनात्मक व वक्तृत्वपूर्ण लटपटपंची सहन होत नाही. विचारशुद्ध मोत्येच ती निवडते. या परंपरेला शास्त्रीजींनी आपल्या स्वतंत्र विचारकार्याने पुनरपि उजाळा दिला. बुद्धीचे पूर्णपणे समाधान न करणारी कोणतीही गोष्ट भारतीय दर्शनांनी स्वीकारलेली नाही. अशा दर्शनांच्या सखोल व सम्यक परिशीलनाने ज्यांची विवेकशक्ती घडली, त्या शास्त्रीजींना म्हणूनच आपले स्वातंत्र्य अबाधित राखता आले. वाईच्या अमृत महोत्सवी सोहळ्यात बोलताना ते म्हणाले होते की, 'उच्च, नैतिक व बौद्धिक सत्याच्या ध्रुवताऱ्याकडे लक्ष देऊनच मी वाहत राहिलो आहे,' हे खरे आहे. पण भारतीय विचारपरंपरेत अशी उच्च बुद्धिनिष्ठा निर्माण करण्याची ताकद आहे, हेही शास्त्रीजींनी सिद्ध करून दाखविले. म्हणूनच सतत परिवर्तनशीलता हा त्यांच्या विचारकार्याचा स्थायीभाव ठरला.

या स्थायीभावाला परिपोषक ठरणारी परिस्थितीही शास्त्रीजींच्या विचारयात्रेला लाभली, असे वाटते. 'वैदिक संस्कृतीचा विकास'ची समीक्षा आपण का केली, याची मीमांसा या ग्रंथाच्या उपसंहारात त्यांनी केली आहे: 'हे राष्ट्र तत्त्वज्ञानशून्य बनण्याची शक्यता वाढत आहे. केवळ बौद्धिक विचारसंपत्ती म्हणून तत्त्वदर्शनाची आवश्यकता नाही; तर अस्तित्वाच्या सर्व भागांवर प्रकाश टाकून मार्गक्रमणास उत्साहित करणारे तत्त्वदर्शन आवश्यक आहे. संस्कृती ही अनुभवांचे आणि विचारांचे संचयस्थान असते. तत्त्वज्ञान अनुभवांच्या आणि विचारांच्या समग्र संकलनाने निर्माण होत असते. म्हणून ही वैदिक संस्कृतीच्या विकासाची समीक्षा आम्ही केली आहे. परंपरेने प्राप्त झालेली परलोकपरायण विचारसरणी जशीच्या तशी स्वीकारून या जगात जगण्याचे सामर्थ्य मिळणार नाही. या जगाचा अर्थ समजला, तरच जगात यशस्वीपणे जगता येते. हे जग अधिक चांगले कसे बनविता येईल, हा खरा प्रश्न आहे... ' या अत्यंत मननीय व अर्थगर्भ प्रतिपादनात भारतीय विचारवंतांपुढील खऱ्या कार्याची रेखीव मांडणी आहे.

हे कार्य दुहेरी होते व आहे. प्रदीर्घ भूतकाळ हे भारतीय समाजाच्या परिवर्तनातील फार मोठे आव्हान आहे. चीनचा अपवाद वगळता कोणत्याही आधुनिक समाजाला एवढ्या

प्रदीर्घ भूतकाळाचा गुंता सोडवावा लागलेला नाही. म्हणूनच भारताच्या पूर्वपरंपरेची वस्तुनिष्ठ चिकित्सा केल्याशिवाय नव्या संकल्पित परिवर्तनाची दिशा गवसणार नाही. सांस्कृतिक घडण जडवादी साधनसामग्रीने होत नाही; म्हणून जुन्यानव्याचा मेळ घालणारे कार्यक्षम तत्त्वज्ञान समाजाला आवश्यक असते. पण नेमके याचेच दुर्भिक्ष्य भारतात आहे, याची विदारक जाणीव शास्त्रीजींनी वरील उपसंहारात व इतरत्रही अनेकदा व्यक्त केली आहे. कोणत्याही सुजाण भारतीयाला विलक्षण अस्वस्थ करणारी ही वस्तुस्थिती आहे. ही वस्तुस्थिती केवळ १९४० च्या आसपासची नाही. आजही या वस्तुस्थितीमध्ये काही फरक झालेला नाही. स्वातंत्र्योत्तर काळातील सार्वजनिक जीवनाचा जो अधःपात आपण पाहत आलो, तो याच वस्तुस्थितीचा निर्विवाद पुरावा आहे.

-असे का झाले? कालोचित असे नवे जीवनदर्शन हजारो वर्षांचे दार्शनिक जीवन जगणाऱ्या आम्हा भारतीयांना का निर्माण करता आले नाही? या भूमीत जीवनदर्शने केवळ निर्माणच झाली नाहीत, तर ती जन्मली व जगलीही. शास्त्रीजी म्हणतात त्याप्रमाणे, केवळ 'बौद्धिक विचारसंपत्ती' म्हणून येथे तत्त्वदर्शन अवतरले नाही; तर 'अस्तित्वाच्या सर्व भागांवर प्रकाश टाकून मार्गक्रमणास उत्साहित करणारे तत्त्वदर्शन' येथे निर्माण झाले होते. अगदी मध्ययुगीन भक्तिमार्गाच्या तत्त्वज्ञानापर्यंत हे एक निखळ सत्य होते. या सत्याची शास्त्रीजींसारख्यांना आठवण होती. मग ही आठवण वांझोटी का ठरली? प्राचीनाची सर्वंकष समीक्षा व आधुनिकाची उभारणी हे कार्य तत्त्वज्ञानाच्या पातळीवर नवे भारतीय दार्शनिक का करू शकले नाहीत?

या 'का' व 'कसे' यांना सहजासहजी उत्तर सापडणार नाही. शास्त्रीजींच्याच विचारविकासाचा नमुना अभ्यासून त्यांचे काहीएक उत्तर शोधण्याचा आपणास प्रयत्न करता येईल.

शास्त्रीजी हे विसाव्या शतकाच्या प्रथमार्धाचे एक नमुनेदार (टिपिकल) भारतीय विचारवंत होत. हा भारतीय विचारवंत एका प्रचंड भोवऱ्यात गरगरत होता. शास्त्रीजींनी स्वतःबद्दल म्हटले आहे की, 'मी सतत वाहत आलो; पाय टेकायला कुठे जागाच सापडली नाही,' हे खरे होते. या विचारवंतापुढे विचारांची नवी नवी क्षितिजे येत होती व त्याची सतत धावपळ चालू होती. एका डोंगराच्या शिखरावर चढून क्षितिज हाती लागेलसे वाटते न वाटते, तोच पुढचा डोंगर व त्याच्या माथ्यावरचे क्षितिज अवचित समोर अवतरत होते. कोणत्याही जागृत विचारवंताला आत्मवंचना टाळायची असेल, तर या नव्या क्षितिजाची दखल घेणे भागच होते. कुठे थांबावे याची कुणालाच खात्री वाटत नव्हती. मंझिले बदलत होती, मुक्काम बदलत होते. भारतीय प्रज्ञा जणू वातचक्रात सापडून भिरभिरत होती. फ्रेंच राज्यक्रांती, रशियन राज्यक्रांती, मार्क्सवाद, गांधीवाद आणि या जोडीला प्रचंड परंपरेचे बहुजिनसी ओझे आणि पारतंत्र्याच्या शृंखला यांतून समाज कोणत्या वाटेने पुढे न्यावयाचा,

याचा संभ्रम भारतीय विचारवंतांच्या मनात दाटलेला होता. कुठल्यातरी टेकूच्या आधारे एखादी भव्य झेप (बिग लीप) घ्यावी, तर असा टेकूही लाभत नव्हता. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात राजा राममोहन रॉय यांनी सुरू केलेल्या तथाकथित भारतीय प्रबोधनाला टेकू देण्याइतपत सर्वंकष तत्त्वदर्शनाचा कणाच नव्हता. पश्चिमी अर्थाने आपल्या देशात १८व्या-१९व्या शतकांत खरेखुरे प्रबोधन खरोखरच सुरू झाले किंवा नाही, याची पुन्हा एकदा तपासणी केली पाहिजे. मुख्य म्हणजे राजकीयदृष्ट्या परतंत्र असलेल्या समाजातील प्रबोधन-चळवळ आणि राजकीयदृष्ट्या स्वतंत्र असलेल्या समाजातील तशी चळवळ यांत फरक असतो व तो केलाही पाहिजे. याशिवाय बहुभाषी, बहुसांप्रदायिक व अनेकात्म स्वरूपाच्या नि दीर्घ भूतकाळ असलेल्या समाजात प्रबोधनाची चळवळ तिच्या पहिल्या पर्वात कच्चे स्वरूप धारण करते. ती तपशिलांवर भर देऊन समग्र तत्त्वज्ञानाकडे दुर्लक्ष करण्याचा संभव असतो. भारतीय प्रबोधनाची चळवळ या सर्व दृष्टींनी पुन्हा न्याहाळली पाहिजे.

भारताच्या दुर्दैवाने येथे राजकीय पारतंत्र्य आणि सांस्कृतिक परिवर्तनाची ऐतिहासिक गरज यांची एकाच कालखंडात गाठ पडली. याचा स्वाभाविक परिणाम सांस्कृतिक परिवर्तन प्रक्रियेची पीछेहाट होण्यात झाला. आधी राजकीय स्वातंत्र्य की सामाजिक सुधारणा, यांसारखे विलक्षण गुंतागुंतीचे प्रश्न ऐतिहासिक नियतीने भारतीयांसमोर उपस्थित केले.

शास्त्रीजींची वैचारिक घडण या शतकाच्या आरंभापासून होत गेली व वरील सर्व प्रश्न या घडणीत प्रभावी ठरले. भारतीय पारंपरिक तत्त्वज्ञान अभ्यासूनही नव्या काळात ते कुचकामी आहे, याचा साक्षात्कार त्यांना झाला. 'हिंदुधर्माची समीक्षा' या प्रेरक प्रबंधात पारंपरिक धर्ममूल्यांची परखड चिकित्सा करून आधुनिक काळातील विज्ञानमूल्यांचा व सामाजिक मूल्यांचा पुरस्कार केला पाहिजे, असे त्यांनी प्रतिपादन केले. पण पर्याय सुचवून समग्र जीवनाची तत्त्वप्रणाली सिद्ध होत नाही. बौद्धिक विचारसंपत्तीचाच तो एक भाग होतो. टिळकवादात नवे प्रणालिसामर्थ्य नव्हते. गांधीवाद हा गांधीच्या हयातीत प्रक्रियागत होता. पुन्हा राजकीय स्वातंत्र्याच्या चळवळीशी तो घट्ट बांधलेला होता; त्यामुळे गांधीवादाची तत्त्वदर्शन म्हणून मांडणी करण्यास स्वातंत्र्यपूर्व काळात कुणालाच फुरसत नव्हती. मार्क्सवाद, रॉयप्रणित रॅडिकल ह्युमनिझम, समाजवाद यांच्या उलटसुलट आघातांनी व राजकीय स्वातंत्र्यप्राप्तीच्या लगतच्या उद्दिष्टामुळे विचारवंत ही भूमिकाच टिकवून ठेवणे कठीण झाले होते. मध्ययुगीन संत चळवळीत ज्याप्रमाणे संतत्व व कवित्व यांची सांगड निपजली होती, तद्वतच या शतकाच्या प्रथमार्धात राजकीय कार्यकर्ता व विचारवंत यांची सांगड जुळल्याचे दिसून येते. काँग्रेस पक्ष हे सर्व प्रकारच्या कार्यांचे व विचारांचे मध्यवर्ती व्यासपीठ होते. ते या दोन्ही बाबतींत संकीर्ण स्वरूपाचे होते. या व्यासपीठावर सनातनी व सुधारक, साम्यवादी व समाजवादी, अहिंसावादी व क्रांतिवादी, पुरोगामी व पुनरुज्जीवनवादी अशा सर्वांचीच वर्दळ होती. मुख्य लक्ष्य नव्या भारतीय राज्यतंत्राची (पॉलिटीची) निर्मिती करून राजकीय

स्वातंत्र्य प्राप्त करून घेणे, हे होते. या लक्ष्यापायी सर्व प्रकारचे मनुष्यबळ व विचारबळ राबविणे इष्ट होते. स्वातंत्र्य मिळेपर्यंत सगळी भारतीय प्रज्ञा व बळ एका प्रचंड चळवळीच्या प्रवाहात वाहत राहिली. त्यांना पाय टेकायला उसंतच लाभली नाही.

म्हणूनच स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सांस्कृतिक प्रबोधनाचे मधल्या काळात सुटले-तुटलेले धागे एकत्र करून त्यांची नवी वीण गुंफणे अत्यावश्यक होते. वैदिक संस्कृतीची व हिंदुधर्माची समग्र चिकित्सा पुनरपि करून तिच्याधारे नवी तत्त्वप्रणाली समाजापुढे ठेवणे आवश्यक होते. खरे भारतीय प्रबोधन, खरे तर, १५ ऑगस्ट १९४७ च्याच सुमुहूर्तावर सुरू करणे इष्ट होते. स्वतंत्र समाजालाच जुन्याची समीक्षा व नव्याची रचना करण्यास अनुकूल मनःस्थिती असते. अधिक जबाबदारीने या गोष्टी करण्याची गरज त्याला जाणवते. या कार्यात त्याच्या भवितव्याचे प्रश्न गुंतलेले आहेत, त्यात आपले 'हित' आहे, याची कल्पना त्यास असते. गांधीवादाची खरी मांडणी, चिकित्सा व तत्त्वप्रणालीय संश्लेषण करण्याची खरी वेळ स्वातंत्र्योत्तर काळातच होती. मार्क्सवादाची आभाळे येत जात होती. येथील परंपरेशी त्याचे नाते शोधण्याची खरी संधी स्वतंत्रता हीच होती. स्वत:कडे एक प्रकारच्या स्वच्छ वस्तुनिष्ठतेने पाहण्यास अनुकूलता राजकीय स्वातंत्र्याने निर्माण केली होती. स्वातंत्र्यपूर्व काळात आपला भारतीय विवेक सतत पश्चिमसापेक्ष राहिला; त्यामुळे त्याची श्रेष्ठता सिद्ध केल्याचे वांझोटे समाधान आपणास लाभले, तरी नव्या सांस्कृतिक घडणीच्या दृष्टीने तो उपयुक्त ठरला नाही. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी फार पूर्वी आत्मज्ञानाची, स्वतःचे स्वतःबद्दलचे ज्ञान जाणून घेण्याची, महत्त्वाची गरज बोलून दाखविली होती. ती गरज पूर्ण भागविण्याची जबाबदारी भारतीय विचारवंतांवर होती व आहे.

असे असले, तरी शास्त्रीजींसारख्या विचारवंताची घडण ज्या काळात झाली, त्या काळात गांधीवादी तत्त्वज्ञानाचे कार्यक्रम समाजाच्या सर्व क्षेत्रांत कमीअधिक प्रमाणात राबविण्यात आले. हे तत्त्वज्ञान अंगविणारे काही नमुने येथे निर्माण होत राहिले. त्यांतील एक आचार्यनमुना समाजाच्या, विशेषतः स्वातंत्र्योत्तर समाजाच्या, आशाआकांक्षेचे नेतृत्व करण्यात यशस्वी झाला नाही. तथापि शास्त्रीजींसारखा दुसरा एक नमुनाही गांधीयुगाने आपणास दिला. हा आचारशुद्ध विचारवंतांचा एक जागृत नमुना होता. प्रत्यक्ष सत्ताक्षेत्रापासून तो अलिप्त होता, पण सत्ताक्षेत्राचा चिकित्सक निरीक्षक होता. छत्रपती शिवाजी व रामदास यांच्यातील नात्याप्रमाणे सत्ताधारी व हा विचारवंत यांचे दूरजवळचे नाते होते. हा विचारवंत नवी पश्चिमी तत्त्वज्ञाने पचवून भारतीय परंपरेची आध्यात्मिकता कशी जोपासता येईल, याची चिकित्सा करणारा होता; नवी विज्ञानमूल्ये व समाजमूल्ये यांना येथील मातीत रुजविता येण्यासाठी जी एक सांस्कृतिक अधःसंरचना (इन्फ्रास्ट्रक्चर) हवी, तिचा अभिकल्प मांडू पाहणारा हा विद्वान होता. केवळ वैज्ञानिक-तांत्रिक प्रगतीने व औद्योगिकीकरणाने नव्या समाजाचे नवेपण आपोआप तयार होणे शक्य नाही; तर या भौतिक आर्थिक प्रक्रियेला एक अनुकूल अशी मानसिक घडण समाजात

तयार केली पाहिजे, असे या दुसऱ्या गांधीयुगीन विवेकनमुन्याचे धोरण होते. प्रयोगशाळेत असताना सात तासांचा शास्त्रज्ञ प्रयोगशाळेबाहेर पडला, की ग्रहग्रहणांच्या पारंपरिक कल्पनांचे सोवळे नेसून सनातनी बनतो, ही आमच्या वैज्ञानिक आधुनिकीकरणातील विसंगती आहे. या विसंगतीमुळे नव्या भारतीय समाजात खरेखुरे सांस्कृतिक परिवर्तन शक्य होणार नाही. यासाठी जुनी परंपरा अभ्यासून तिच्यातूनच नव्या समाजाची प्रयोगशाळा कोठे, कशी व कोणत्या अग्रक्रमाने बांधावयाची, याचा विचार करणे आवश्यक होते व आहे. शास्त्रीजींसारख्यांनी असाच विचार करण्याचा प्रयत्न केला. पण हे काम प्रचंड होते. त्यासाठी नव्या प्रबोधनाचा घणाघाती विचार समाजात अहोरात्र होणे आवश्यक होते. आपण हे केले काय?

स्वातंत्र्योत्तर काळात आपण राज्य हाती घेतले; पण आपल्या शासनाचा रथ आंधळया अश्वांनी आजवर ओढत आणला आहे. शास्त्रीजी हे मी वर म्हटल्याप्रमाणे गांधीयुगातील एक नमुनेदार विचारवंत. या विचारवंताला ज्या ऐतिहासिक परिस्थितीतून वाट काढावी लागली, तिचे मला उमगलेले स्वरूप मांडण्याचा वर प्रयत्न केला आहे. हा विचारवंत खऱ्या अर्थाने आपली विचारवंताची भूमिका वठवू शकला नाही व याची कारणे परिस्थितीत आहेत. या विचारवंताजवळ बौद्धिक साधने व साधना होती; पण त्यास बौद्धिक उसंत नव्हती. म्हणूनच या विचारवंताने 'अस्तित्वाच्या सर्व भागांवर प्रकाश टाकून मार्गक्रमणास उत्साहित करणारे तत्त्वदर्शन' निर्माण केले नाही. आणि स्वतंत्र भारतात राजसत्तेच्या कैफात सगळाच समाज गुंगून पडल्याने हे कार्य करण्यास कुणीच प्रवृत्त झाला नाही. म्हणजे भारतीय विचारवंत एकाकी पडला असे नाही; तर भारतीय विचारच अपुरा पडला.

म्हणून भारतीय स्वातंत्र्य हा भारतीय विचारवंतांचा पराभव ठरला. त्यामुळेच स्वातंत्र्योत्तर भारतीय समाजात सार्वजनिक नीतिमत्तेचे अधःपतन झाले. समाज एक वेळ गरिबीवर जगतो; पण तत्त्वशून्यतेवर जगू शकत नाही. म्हणूनच शास्त्रीजीसारख्यांनी जे विचारधन निर्माण केले व जे विचारधन निर्मिण्याची आकांक्षा बाळगली, त्याची आठवण ठेवून आज उद्याच्या भारतीय विचारवंताने विचारकार्य करणे इष्टच नव्हे, तर आवश्यकही आहे. परंपरेची सम्यक समीक्षा व नव्या सामाजिक वैज्ञानिक मूल्यांचा साक्षेप यांच्या अधिष्ठानावर नव्या तत्त्वदर्शनाची उभारणी करणे, हे त्या कार्याचे सूत्र राहील. अखिल मानव्याचा विचार करणारा मानवतावाद हे त्याचे लक्ष्य राहील व प्रत्यक्ष आचारक्षमता, कार्यक्षमता व नीतिप्रवर्तन या गुणांनी ते संपन्न असेल. याचा ध्यास घेणारे विचारवंत निर्माण होणे, यातच शास्त्रीजींच्या विचारकार्याचे सार्थक आहे.

**('विचारशिल्प' (१९७५)मधून)**

ООО

# १८.

# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

## अनिल डोंगरे

लक्ष्मणशास्त्रींना 'तर्कतीर्थ' आणि 'शास्त्री' या दोन नावांनी उभा महाराष्ट्र ओळखतो. अर्थात ही ओळखण्याची कारणे केवळ 'तर्कतीर्थ' आणि नावापुढील 'शास्त्री' ही उपाधी ह्यास कारणीभूत नसून आपल्या प्रखर विचारांनी भारतीय संस्कृतीचे अभिकल्प बांधण्याचा त्यांनी एक प्रयत्न केला. त्या अवघड कार्याच्या निमित्ताने महाराष्ट्र त्यांना ओळखतो.

शास्त्रीजींचे व्यक्तिमत्त्व तपासताना माझ्यासमोर सर्वप्रथम त्यांचे वैचारिक आणि संस्कृती जोपासण्याच्या कार्याचे मोठेपण उभे ठाकले. त्यांच्या प्रगाढ, ज्ञानी व्यक्तिमत्त्वाला अनेक कंगोरे असतीलही; मात्र प्रामुख्याने ज्ञानधनाचे पूर्वसंचित जपण्याचे महान व्रत हाती घेऊन त्यांनी जे कार्य केले तो कंगोरा महत्त्वाचा आहे, श्रेष्ठ आहे आणि पुढील विचारवंतांचा प्रकाशदायी तारा आहे.

भारतीय संस्कृतीची परंपरा जुनी आहे आणि तिच्या प्रारंभापासून तिचा विकास जसजसा होत गेला, त्या त्या विकासक्रमात भाग घेऊन आपल्या परीने विचार मांडण्याचे प्रयत्न केले. मात्र हे विचार मांडताना केला गेलेला विचार इतक्या मर्यादित वर्तुळात गरगरा फिरत राहिला की ज्ञानाच्या संचिताची वाढ होईल या कार्याकडे साफ दुर्लक्षच झाले. संस्कृतीच्या प्रवाही प्रवाहात चालत आलेले ज्ञान वर्धिष्णू करायचे कार्य आपले असते, याची दखल विचारवंतांनी कधी घेतलेली दिसत नाही. साऱ्या विद्वानांनंतर तर्कतीर्थांकडे वळताना जाणवतो तो विशेष हाच, की यांनी आपल्या आयुष्यात ज्ञान प्राप्त करणे आणि वाढविण्याचे प्रयत्न मात्र अविरत केले. पूर्वसंचिताचा ठेवा जपायचा तर असतोच शिवाय त्याची वाढ करण्याचा प्रयत्न करता करता सांभाळण्याचेही कार्य विचारवंतांना करायचे असते. या बाबतीत तर्कतीर्थांचे कार्य उल्लेखनीय ठरते.

### वैचारिक वाटचाल

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या वैचारिक वाटचालीचा आलेख पाहताना तो

प्राज्ञ पाठशाळेतील प्रवेश, अध्ययन, गांधी चळवळीतील उडी, मार्क्सवाद आणि रॉयवाद यांच्या अभ्यासातून ध्येयवादाने प्रेरित झालेले मन आणि मानवतावादाच्या दृष्टिकोनातून आध्यात्मकेंद्रित लेखन असा क्रमन्वित पद्धतीने पाहावा लागेल.

एखादी गोष्ट पटण्यासाठी कारण परंपरा ही लागतच असते. शास्त्रीजींचे आध्यात्मकेंद्रित, वैचारिक लेखन घडण्यालाही अनेक निमित्तांचे आधार सर्वश्रुतच आहेत. अनेक निमित्तांनी त्यांनी भाषणे केली. आवर्जून लेखन केले आणि जिथे ज्ञानविचार मांडणे आवश्यक वाटले तेथे तेथे ज्ञानविचार ऐकवले.

### महाराष्ट्रीय मन

मानवेंद्र रॉयसारख्या प्रतिभावंत तत्त्वज्ञाचे मार्गदर्शन आणि सहवास लाभल्याने तर्कतीर्थांचे वैचारिक क्षितिज रुंदावलेले जाणवते. शास्त्री चर्चक विद्वान कधी राहिलेच नाहीत, तर त्यांनी पाश्चिमी संस्कृतीचे ज्ञानग्रहण करीत, मानवतावादाचा पुरस्कार करीत आधुनिक विचारसरणीही आत्मसात केली. भारतीय संस्कृतीची अगाध परंपरा आणि आधुनिकता या दोन्हींचे डोळसपणे आकलन करून भारतीय वैचारिक परंपरेचा अन्वयार्थ लावण्याचे श्रेष्ठ कार्य या ज्ञानपंडिताने उपासक या नात्याने केले आहे. सतत चालू असलेला व्यासंग आणि संस्कृतीच्या परंपरेने पोसलेले मन रॉयवाद व मार्क्सवाद यांचा बरोबर मेळ घालून आधुनिक समाजाला काय प्रेरक ठरेल, आधुनिक समाजरचनेची घडी कशी घालता येईल, आंधळी भक्ती आणि यातले धोके कसे टाळता येतील याचे जाणीवपूर्वक लेखन करून त्यांनी महाराष्ट्रीय मन तयार करायचा प्रयत्न केला.

चांगले विचार उत्पन्न झाल्यावर समाजातील विशिष्ट वर्गाने त्याची दखल वेळेवर भान ठेवून घ्यावयास हवीच. तर्कतीर्थांनी 'धर्माचे इतिरासातील स्थान', 'धर्ममूल्यांची चर्चा' आणि 'महाराष्ट्रातील धर्म सुधारणांचे आंदोलन' वगैरेंवर केलेले लेखन या दखल घेतल्याच्या गोष्टींचे निदर्शकच आहे.

### हेच त्यांचे यश

विचारांचा प्रवाह सतत बदलत असतो, एकच एक विचार स्थिर कधीही राहात नसतो. त्याचे स्थिर राहणे धोक्याचे असते. तर्कतीर्थांचे विचार आणि लेखन एकाच विचाराच्या बिंदूभोवती कधीही फिरत राहिलेले नाही, हे त्यांचे यशच समजावे लागेल. कथा, कादंबऱ्या अथवा ललित लेखनातून अपरिहार्यपणे आढळणारी लेखनातील सौंदर्यता शास्त्रीजींच्या लेखनात औषधालाही आढळणार नाही. याचा अर्थ असा नव्हे की, यांच्या लेखनास शैली नाही, मात्र 'style is art' या परंपरेच्या चौकटीत त्यांचे लेखन बसत नाही. त्यांना सत्य वाटतात ते आपण मांडलेले विचार, बाह्यात्कारी शैलीवर विश्वास ठेवणाऱ्यांत त्यांचा समावेश करता येणार नाही. त्यांच्या लेखनात असलेले अंगभूत सौंदर्य त्यांच्या विचारांतच दडलेले आहे. नाही तरी पंडिती लेखनात शैलीदार लेखन करणे तसे अवघडच असते.

## थोरामोठ्यांचा सहवास

तर्कतीर्थांना अनेक वेळेस थोरामोठ्यांचा सहवास लाभला. मात्र या प्रभावळीत ते कधी सापडले नाहीत. या प्रभावळीने निश्चित केलेल्या वाटाही त्यांनी नाकारल्या आणि वैचारिक सौंदर्याचे महत्त्व जाणून वैदिक, धार्मिक विचारांचे वरदाते नाट्य विवेक दृष्टीने मांडले. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे 'विचाराशिल्प' या निवडक निबंधांच्या संपादकीयात रा. ग. जाधवांनी एक मार्मिक विधान केले ते असे- ''सुजाण वाचकाला शास्त्रीजींच्या लेखनात एक प्रकारचे जिवंत स्पंदन (थ्रील- Thrill) जाणवत राहते.'' यावरून शास्त्रीजींच्या लेखनातील कस जाणवावा आणि सकसता प्रत्ययास यावी.

## स्वतंत्र विचारांचे आदर्श

शाब्दिक, भावनात्मक आणि वक्तृत्वपूर्ण लटपट त्यांना मान्य नसल्यामुळेच ज्या पारंपारिक अध्ययन पद्धतीत शास्त्रीजींची घडण झाली, त्या पद्धतीतच त्यांच्या स्वतंत्र विचारांचे आदर्श लपलेले आहेत. या कारणाने अतिशय काटेकोर व विचारकार्याला उजाळा देणारी, सर्वसमावेशक चिकित्सा करून उच्च बुद्धिनिष्ठा निर्माण करण्याची ताकद या प्रगाढ पंडितात निश्चितच आहे.

आपली स्वतःची स्वतंत्र प्रणाली असल्यामुळे दुसऱ्या एखाद्या तत्त्वप्रणालीला त्यांनी कधीही जखडून घेतले नाही. वैदिक संस्कृतीविषयी आपली भूमिका निश्चित झाली म्हणून ते या विशिष्ट विचारांचा आलेख रेखाटण्यास प्रेरित झाले. आपल्याच मूळ लेखात त्यांनी असे म्हटले की, "संस्कृती, अनुभव व विचारांचे संचयस्थान असते. तत्त्वज्ञान, विचार व अनुभवाच्या 'समग्र संकलनाने' निर्माण होत असते." वरील वाक्यातील 'समग्र संकलन' हे शब्द विशेष महत्त्वाचे वाटतात. या समग्र संकलनाच्या दिशेने बोध घेत जाण्याच्या प्रवृत्तीतूनच मला वाटते शास्त्रीजींच्या एकंदर लेखनाची जन्मकथा घडली असावी.

आपले भारतीय पारंपारिक विचार एका भोळसट आवर्तात जीवघेण्या अवस्थेत फिरत होते. पाश्चिमात्य संस्कृतीत सतत बदल होत होते आणि त्यांचे भले-बुरे पडसाद आपल्याकडे उमटत होते. मार्क्सवाद, नवीनच उदय पावलेला गांधीवाद आणि रॉयवाद यांच्यातून समाजाला पुढे न्यायचे अवघड कार्य करावयाचे होते. हे करताना पारंपरिक बेड्या तोडणे आवश्यक होते. मात्र आपली होत असलेली प्रगती जुन्या परंपरेच्या विचारांचे धागे पकडून आधुनिकतेचा स्वीकार करू पाहात होती. हा संभ्रम विचारवंतांना सोडवता येत नव्हता. या संभ्रमित अवस्थेच्या प्रारंभापासून तर्कतीर्थांच्या जडणघडणीचा काळ आढळतो. त्यांनी 'धर्ममूल्यांची परखड चिकित्सा करून आधुनिक काळातील विज्ञानमूल्य व सामाजिक मूल्य यांचा स्वीकार केलाच पाहिजे', असे प्रतिपादन केले. या प्रतिपादनापासूनच महाराष्ट्राला जुन्या आणि नव्यांचा योग्य अशा ठिकाणी दुवा जोडणारा विचारवंत सापडला असे मला म्हणावयाचे आहे.

''धर्म आणि बुद्धिवाद यांच्यात नेहमीच, सतत संघर्ष चालत आलेला आहे. आपल्या आधुनिक विज्ञानाचे पाय समाजजीवनात दूरवर पसरल्याने आज धर्माची श्रद्धा कमी कमी होत आहे. बुद्धिवाद्यांचा पाया भक्कम असून पुरोगामीपणाला महत्त्व देणारा असतो. मात्र आज एकाकी पडत चाललेला धर्म Faith व Belief यांच्या डगमगत्या पायावर उभा राहण्याचा प्रयत्न करतो आहे. आजची सामाजिक मूल्ये 'काल'पेक्षा वेगळी आहेत. 'उद्या'ची पुन्हा वेगळी असतील. म्हणून धर्माचे शब्दप्रामाण्य आजमावणारे असणार नाही, असा अंतिम मूल्याचा आकार (Reason) दिलेला नाही म्हणून आपल्या काळाचे बोट धरा आणि परंपरेचे पाईक होऊ नका'', हे जणू तर्कतीर्थांनी सांगितले. त्यांचे विचार याच विचारांची ग्वाही देतात.

**शुभास्ते पंथानः**

वाई प्राज्ञ शाळेत शिक्षण झाल्यामुळे वैदिक वाङ्मयाचा एक दाट प्रभाव तर्कतीर्थांवर आहेच; शिवाय त्यांनी रूढीग्रस्त धर्माची कडक, जाचक निर्बंधेही नाकारली आहेत. दोन्ही विचारांच्या समतोलाच्या भूमिकेवरून तर्कतीर्थांनी केलेली वैचारिक सौंदर्याची वाटचाल स्वागतार्ह आहे. या प्रवाहाने अजून वाटचाल करावी, अशीच महाराष्ट्राची इच्छा आहे. या प्रवासाला उद्देशून एवढेच म्हणू या की, शुभास्ते पंथानः!

**(दैनिक मराठवाडा, औरंगाबाद, दि.१६ नोव्हेंबर, १९७५)**

ooo

# १९.
# तर्कतीर्थ
## रवींद्र पिंगे

फांदीवरल्या पाखरासारखे चुळबूळ न करता स्वस्थ बसलेले आहेत असे शास्त्रीबुवांना मी कधीच पाहिलेलं नाही. शास्त्रीबुवांची बहुत रूपं न्याहाळली. वीसएक वर्षांपूर्वी त्यांना प्रथम गिरगाव बॅकरोडवरल्या फडके गणेश मंदिराच्या पटांगणात पाहिलं. कुठल्या तरी सभेचे ते प्रमुख वक्ते होते. धोतर, कोट, टोपी असा गृहस्थी वेष होता. सभा कशाबद्दल कि कुणाची होती तेही आता धड आठवत नाही. विद्वानांची सभासंमेलनं हा माझा प्रांत तेव्हाही नव्हताच; पण गर्दी दिसली म्हणून सहज डोकावलो. पाहतो तर गर्दीच्या ऐन मध्यभागी ध्वनिक्षेपकासमोर घाईगर्दीत उभे असलेले विजिगीषू शास्त्रीबुवा काही तरी चिरक्या आवाजात सभेला पटवून देत होते. शब्द थरथर गळ्यातून येत नव्हते. थेट पोटातून कारंज्यासारखे उसळत होते. सभेच्या विषयात ते गळाभर रुतले होते. त्या विषयात त्यांची involvement होती. संस्कृत वाङ्मयातले उतारेही त्यांनी श्रोत्यांच्या तोंडावर भिरकावून दिले. त्यांच्या विद्वत्तेचा जो दबदबा होता, त्याला प्राचीन सुभाषितांचा तो फवारा शोभून दिसला; पण विषय मला धड कळला नाही. मी काढता पाय घेतला. त्यानंतर साहित्यसंघाच्या बोळात एकदा झपाझप चाललेले पाहिले. सचिवालयाच्या वास्तुशांतिसमारंभात यज्ञकुंडांच्या आसपास ते खांद्यावर शाल टाकून तरातरा येरझारा घालताना दिसले. तेव्हाही ते विलक्षण घाईगर्दीत दिसले. त्यांच्या सारथ्याखाली कोनकरशास्त्री कुठल्या तरी ऋच्या घोकीत होते. इतर ब्रह्मवृंद त्यांची री ओढीत होता. त्याच सुमारास केव्हा तरी ते विधान परिषदेतल्या काळोखी बाकावर नेहरू शर्ट घालून एकाकीपणे बसलेले दिसले. दिसले न दिसले तोच टोपी घालून स्वतःच्याच तंद्रीत कुठे तरी ताड ताड पायतणं वाजवीत निघूनही गेले! मी मनाशी दोन खूणगाठी मारल्या, ज्या सभेत गायबगळ्यांच्या माळेत हा पक्षी वावरतोय, तिथे त्याचा मूळ कुळधर्म जाणू शकेल असा एकही सुज्ञ सांगाती न भेटल्यामुळे अंतर्यामी खंतावलेला हा शास्त्रीमाणूस निःसंशय अस्वस्थ असेल. आंतरिक अस्वस्थतेचं बाह्य रूप

म्हणजे सदाची तारांबळ आणि पळापळ. ही झाली एक अटकळ. दुसरा होरा असा होता की, आज ना उद्या याच्या शोधात असलेला हा ग्रंथप्रेमी माणूस गावठी राजकारणपटूंच्या कळपातून अलगद आपली सुटका करून घेईल नि पुन्हा पोथी उघडून एकटाच बसेल. अरे, ज्याला उमाळ्याच्या ज्ञानपान्ह्याची चव कळलेली आहे त्याचं पुस्तकांपासून मोजून शंभर कोस दूर असलेल्या संधिसाधू स्वार्थांधाबरोबर कधी गूळपीठ जमेल काय? आणि त्याचाही रोकडा प्रत्यय थोड्याच दिवसांत आला. गर्भावस्थेतल्या साहित्य आणि संस्कृतिमंडळाचे डोहाळे लागले होते तेव्हा मी सचिवालयात किंचित साहेबराव होतो. मंडळाचे सुरुवातीचे अ पासून ज्ञ पर्यंतचे झाडून सगळे कागदपत्र मी स्वतः माझ्या हातांनी तयार केलेले आहेत. त्या निमित्ताने शास्त्रीबुवांची शिक्षणखात्यात सतत ये-जा असायची. ते त्यांच्या खास चलतीचेही दिवस होते. वरच्या वर्तुळात त्यांची सतत पैरवी असे. बडे सनदी अधिकारी श्री. चिन्मुळगुंद यांच्याकडे ते थेट यायचे. मुदलात चिन्मुळगुंद हे प्रकांडपंडित. त्यांच्या जिभेवर साक्षात सरस्वतीचीच वसती होती आणि वृत्ती चंदनाच्या लेपाप्रमाणे एकदम थंड. शिवाय माणूस अंतःकरणाचा काहीच्या काहीच भला. त्यांनी शास्त्रीबुवांच्या थोरवीचा संदर्भ पाहून, त्यांच्या लाग्याबांध्यांच्या पल्ल्याचा अंदाज घेऊन आणि संकल्पित कार्याचं अव्वल महत्त्व जाणून साहित्य संस्कृती मंडळाच्या कामात तडाखेबंद रस घेतला. मंडळाची पालखी निघाली. मला त्या पालखीचा भोया नेमला. मीही राब राब राबलो. पाळणा नागपुरात हालला, तेव्हा मी शास्त्रीबुवांच्या अगदी निकट गेलो. नामकरणविधी झाल्यानंतर तारांबळीतले शास्त्रीबुवा एकदम चिन्मुळगुंदसाहेबांसमोर आले नि स्पष्टपणे म्हणाले,

''साहित्य-संस्कृती मंडळ आता रीतसर सुरू झालंच आहे; पण विश्वकोशाची योजना मंजूर होणार नं? कारण मला पार्लमेंटात पाठवायचं म्हणताहेत; पण मला त्यात इंटरेस्ट नाही. विश्वकोशाची जुळणी होत असेल तर मला पार्लमेंटातली / सीट नको. राज्यसभेवर जाऊन काय करू? विश्वकोश हे भाषेचं काम आहे. आता मी साठ वर्षांचा झालो. प्रकृती उत्तम आहे. तेव्हा जी काही पुढची दहा-पंधरा वर्षे मिळायची असतील ती मला हे थोर काम तडीला नेण्यासाठी घालवायची आहेत. विश्वकोश हे माझ्या आयुष्याचं काम होणार आहे. त्या दृष्टीने काय ते ठरवा.''

राजकारणाबद्दल चिन्मुळगुंदसाहेब जन्मजात उदास होते. ते पाइप फुंकीत शांतपणे म्हणाले,

''छे हो, दिल्लीला कसले जाता? इथेच राहा! आपण ज्ञानकोशाचं काम करू. मी एफ. डी. चं ॲप्रुव्हल आणतो. सी. एम. जवळ तुम्ही बोलून ठेवा. नि पिंगे, तुम्ही नोट पुटप करा लवकर!''

मी कागदी घोडे नाचवले. अर्थखात्याची मंजुरी तत्काळ लाभली. कारण वरून किल्ल्या फिरलेल्या होत्या. विश्वकोशाचं प्रस्थान ठेवलं गेलं. शास्त्रीबुवांना जन्मीचं सार्थक होईल

असं वर्धिष्णू काम मिळालं. त्यांची घाईगर्दी दामदुपटीने वाढली. सचिवालयात ते धावत येत आणि पळत जात. 'कुठे चाललात?' म्हणून त्यांना कधीही विचारावं, त्यांचं उत्तर ठरलेलं असे, 'पारिखांकडे जातोय.' त्यांना कधीही विचारावं, 'कुठून आलात हो?' उत्तर ठरलेलं असे, 'पारिखांकडे होतो. तिथून आलो.' पळापळीच्या काळात शास्त्रीबुवांचा मुंबईतला ओटका मुक्काम आलटूनपालटून पारिखांकडे आणि ए. बी. शहांकडे असे. कधीकधी कन्नमवारांकडे उतरत. पुण्यात ते इंजिनिअरिंग कॉलेजच्या प्रा. ओगल्यांकडे उतरत. मुंबई पुणे-वाई, नि वाई-पुणे-मुंबई असे त्यांचे शंभर हेलपाटे त्या काळी झाले.

साहित्य आणि संस्कृती मंडळाने स्वतःची प्रकाशनं काढायची नाहीत, इतरांच्या मौलिक प्रकाशनांना पन्नास टक्के अनुदानं द्यायची अशी सुरुवातीची कल्पना होती. शास्त्रीबुवा मला म्हणाले होते, 'माय हॅण्डस् आर फुल. त्यात आता आणखी प्रकाशनाचा व्याप कोण सांभाळणार ? विश्वकोशच मला पुरून उरणार आहे.'

'काय सांगता शास्त्रीबुवा ? एकाच वेळी अनेक कामं उरकाल तुम्ही. आता विश्वकोशाचं काम आलं म्हणून काय तुम्ही प्राज्ञमठाचं धर्मकोशाचं काम बंद करणार आहात?' मी म्हणालो.

तेव्हा प्राज्ञशाळेचं नाव निघाल्याबरोबर विरघळलेले शास्त्रीबुवा उत्तरले,

'नो-नो धर्मकोशाचं काम हे उमाळ्याचं काम आहे. माझ्या गुरूंचं काम आहे. त्याला नेहमीच फर्स्ट प्रेफरन्स राहील!'

पुढे यथाकाल मंडळाच्या अवतारकृत्याच्या कल्पनेत बदल होत गेला. पहिलं प्रकाशन म्हणून आवळसकरांच्या 'रायगडची जन्मकथा' ह्या कमालीच्या मेहनतीने सिद्ध झालेल्या ग्रंथाची निवड झाली. मंजुरीची ती सभा महाबळेश्वरला झाली. सर्व सभासदांना शास्त्रीबुवांनी महाबळेश्वराच्या परिसरातून हिंडवून आणलं. सर्वांना सांगितलं, 'पायात चांगलं घाला कारण महाबळेश्वराच्या मातीत फुरशी असतात!' त्यांच्याबरोबरच मी ऑर्थरसीटवरून सह्याद्रीचे अक्राळविक्राळ कडे पाहिले. शाळेच्या पिछाडीला कृष्णेचा पान्हा उन्हात वाहत होता. मला राहवेना. मी कपडे उतरवून डोहात यथेच्छे पोहलो. तरंगत तरंगत कृष्णेचे सगळे घाट पाहिले. काठावरल्या झाडीच्या सावलीत डुंबलो. पाण्यातूनच प्राज्ञशाळेच्या वास्तुची निरनिराळ्या कोनांतून दर्शनं घेतली. तृप्त झाल्यावर बाहेर आलो! शास्त्रीबुवांना भेटलो. जलतरणाचा अहवाल सादर केला. तेव्हा ते खरेखुरेच आनंदले. परत परत विचारू लागले, 'खरंच तुम्हाला वाई आवडली? खरंच तुम्हाला कृष्णा आवडली?' मग त्यांनी मला गंगापुरीतून भटकवून आणलं. स्वतःच्याच तंद्रीत असल्यासारखे ते वैकुंठवासी केवलानंदांबद्दल बोलत होते. 'गुरुजी ह्या इथे सांजसकाळ फेऱ्या मारायचे. हा मठ. इथे त्यांच्या पोथ्या होत्या नि ही माडी दिसतीय नं, इथे विनोबांची वसती होती. ते गुरूकडे विद्येसाठी आले होते. गुरुजींनी माझ्यावर फार फार माया केली. मी उशिरा उठायचो. शाळेच्या शिस्तीत ते बसत नव्हते; पण

मला ना नव्हती. मला त्यांनी विद्याही दिली नि आटोकाट प्रेमही दिलं; नि बरं का, लोकांचा गैरसमज आहे की मी वाईचाच म्हणून, तसं नाही. मी खानदेशचा आहे. धुळ्याचा. इथे मठात विद्येसाठी आलो. आलो तो इथलाच झालो. आता दुसरी दिशाच नाही!'

मी म्हटलं, ''शास्त्रीबुवा, तुम्ही फार लकी आहात. तुम्हाला राहायला जागा उत्तम मिळालीय इथे नदीच्या काठावर; पुण्यात शिवाजीनगरला बंगल्यात; मुंबईला शिवाजीपार्कवर कोऱ्या करकरीत ब्लॉकमध्ये!''

त्यावर ते चटकन उत्तरले,

''माझा तो योगच आहे. मी कुठेही गेलो तरी मला राहायला जागा उत्तम मिळते. कलकत्त्याला होतो तेव्हाही मला उत्तम जागा मिळाली होती.''

''आणि तुरुंगात काय परिस्थिती होती ?''

''तुरुंगातही तोच अनुभव बघा ! सर्वांत चांगली कोठडी माझ्या वाट्याला यायची. एकदा तर विनोबाजी जेलमध्ये म्हणालेच होते, 'शास्त्रीबुवा, तुमचं आपलं बरं आहे; सर्वांत चांगली जागा तुम्ही बळकावलीत!' आता ह्यावर काय म्हणणार ?''

प्राज्ञशाळेतलं ग्रंथालय पाहून डोळे निवले. शास्त्रीबुवा म्हणाले, ''काम झालं पाहिजे. विश्वकोशासाठी संदर्भग्रंथ कमी पडले असं कधी होणार नाही. अहो, धर्म-कोशासाठी मला संदर्भ पाहायचे होते तर लंडनच्या लायब्ररीतून मी ग्रंथ उसनवारीने आणले. ग्रंथ आजूबाजूला असतातच. आपल्यालाच ज्ञानलालसा हवी आणि कार्य तडीस नेण्याची प्रबळ जिद्द हवी.''

साहित्य आणि संस्कृती मंडळाचा मी पहिला मुन्शी आणि मुकादम असा दोन्ही एकाच वेळी होतो! पहिल्या वर्षी ज्या काही दहा-बारा सभा झाल्या, त्यांची इतिवृत्तं माझ्या हातची आहेत. त्या अनेक बैठकींत शास्त्रीबुवांच्यापाशी असलेली ज्ञानाची प्रभा लपून राहिली आहे असं कधी झालं नाही. एखाद्या ज्ञानशाखेत एखादं नवं प्रमेय सिद्ध होत आहे नि त्याचा संदर्भ एखाद्या नव्या पुस्तकात आहे, असं कुणी म्हणालं, तर ते बेचैन व्हायचे. तो ग्रंथ वाचण्याची त्यांना सपाटून भूक लागे. धमाल धावपळ करून ते पुस्तकांची रास जमवीत; पण अखंड धावपळीत ती वाचायला त्यांना फुरसतच होत नसे. मग ते प्रवासात ग्रंथांनी ओतप्रोत भरलेली ट्रंक घेत नि पडल्या पडल्या ग्रंथांचा फडशा पाडीत. डॉ. लोहियांच्यातलं नि लक्ष्मणशास्त्र्यांच्यातलं मला उमगलेलं हे साम्यस्थळ. डॉ. लोहियांबरोरसुद्धा अशीच एक पुस्तकांनी भरलेली ट्रंक सदाचीच असायची. शास्त्रीबुवा एकदा कुठल्या तरी कॉन्फरन्सला बनारसला निघाले. मी स्टेशनवर पोहोचवायला म्हणून गेलो. तेव्हा त्यांच्याबरोबर पन्नास-साठ तरी बडे ग्रंथराज होते! ह्या ज्ञानप्रेमामुळे त्यांची नि प्रा. न. र. फाटकांची कुंडली जुळली. फाटकांबद्दल ते नेहमीच जिव्हाळाने बोलायचे. शास्त्रीबुवांचं दुसरं वैशिष्ट्य म्हणजे ते कधी चुकूनही दुसऱ्याच्या आयुष्यात डोकावत नसत. ते कुणाबद्दलच्या काही प्रवादाबद्दल बोलले असं घडलं नाही. आपण बरं की आपलं काम बरं असाच त्यांचा पंडिती खाक्या होता.

संसारात ते चांगलेच समाधानी वाटत. मंडळातर्फे मला वाटतं, त्यांना महिन्याकाठी काही तरी एक सहस्र रुपयांचं मानधन मिळे. शिवाय प्रवासभत्ता. त्यांची मुलंबाळ अमेरिकेत होती. तेव्हा संसाराचं लोढणं असं त्यांच्या गळ्यात नव्हतंच. त्या काळातलं मला स्पष्ट आठवतंय, ते चौघांबद्दल मोठ्या प्रेमाने बोलले होते. ते चौघे म्हणजे ह. रा, महाजनी, मे. पुं. रेगे, गोविंद तळवलकर आणि अशोक शहाणे. पैकी महाजनी त्यांचे मित्र होते. ते काळाच्या पडद्याआड गेले. रेगे आणि तळवलकरांनी आज जी निःस्पृह चिकित्सक अशी डोळ्यात भरण्यासारखी इयत्ता कुठलीही शिडी न वापरता गाठली आहे, तिची तेव्हा वाच्यताही झालेली नव्हती; पण शास्त्रीबुवांनी त्यांच्यातले गुण हेरले होते. अशोकची टगेगिरी तेव्हाही आजच्यासारखीच जोरात होती! मंडळाच्या बैठकीत शास्त्रीबुवांची अनेक दर्शनं घडत. ती नेहमीच प्रबोधनेच्छु, ज्ञानपिपासू आणि कार्यव्यापृत महत्त्वाकांक्षी पंडिताची असत. एकदाच फक्त वेगळं घरगुती दर्शन घडलं. सचिवालयात सभा चाललेली होती. माजी मंत्री भाऊसाहेब हिरे अचानक कालवश झाल्याची बातमी कुणीतरी सभेत आणली. त्याबरोबर शास्त्रीबुवा चक्क स्फुंदू लागले. गहिवरून म्हणाले, ''छे ! आता कामकाज चालवणं मला शक्य नाही. आपण आवरू या. मला गेलंच पाहिजे. फार फार वाईट गोष्ट झाली.'' आणि मागे न बघता सभास्थान सोडून ते घाईघाईत निघून गेले. मी दफ्तर आवरलं.

पैशांच्या बाबतीत त्यांचे व्यवहार अगदी लखलखीत असत. त्यांना मानधन द्यायला खात्याची मंजुरी होती. त्यानंतर सरकारी फतवा निघायचा होता. ते कागदपत्र माझ्या टेबलावर रेंगाळत होते. तर एकदा शास्त्रीबुवा म्हणाले,

''पिंगे, तुम्ही तो जी. आर. लवकर काढा बुवा!''

''त्यात घाई कसली आहे? काढू सावकाश. अर्थखात्याची मान्यता पदरात पडलेलीच आहे.'' मी सांगितलं! तेव्हा लगबगीने म्हणाले,

''तसं नाही. एकदा मंडळाचं मानधन सुरू झालं की पाठशाळेकडून मिळणारं वेतन मला बंद करायचं आहे. तेव्हा जी. आर. जितका लवकर येईल तितका शाळेवरचा बोजा हलका होईल. म्हणून मला घाई आहे!''

दुसरा प्रसंग पुण्याचा आहे. मंडळाच्या सभेला आम्ही दोघं रिक्षातून गेलो. उतरल्याबरोबर मी रिक्शावाल्याचे पैसे देऊ केले तर शास्त्रीबुवांनी मला पैसे देऊ दिले नाहीत. मी म्हणालो,

''असं काय शास्त्रीबुवा? पैसे मी दिले काय किंवा तुम्ही दिलेत काय, त्यात काय फरक आहे ? इट मेक्स नो डिफरन्स.''

त्यावर शास्त्रीबुवा ठामपणे म्हणाले, ''ही साधी बाब नाही. इट डझ मेक डिफरन्स; इन्फॅक्ट इट मेक्स लॉट ऑफ डिफरन्स. स्टाफला पैसे भरायला लावणं अयोग्य आहे!''

दिवस असे उमेदीत चालले होते. पुढे ग्रहमान बदललं.

साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या मुकादमपदावरून मला डच्चू मिळाला. आणि ते

बरंच झालं. माझा शांत, धीमा कारभार आणि मंडळाची विद्येच्या क्षेत्रातली जोरकस झेप ह्यांचा ताळमेळच बसेना. मी शून्य महत्त्वाकांक्षेने काम करायचा. उसनं अवसान आणणं मला जमेना. साहजिकच माझ्या कामात विलंब होई. इतरांना तो असह्य होई. त्यावरून दीर्घसूत्री शब्दाशब्दी झाली नि एका कोमेजलेल्या सायंकाळी मी जानवं तोडून मोकळा झालो. तेव्हा मी तापलो होतो. आता एका तपाच्या थंड कालावधीनंतर वाटतं, झालं ते मंडळाच्या कामाच्या सर्वांगीण वाढीच्या दृष्टीने निश्चितपणे कल्याणकारकच झालं. आज मराठी भाषेच्या समृद्धीच्या दृष्टीने मंडळातर्फे शास्त्रीबुवा जे उत्तम कार्य करीत आहेत, ते विशेष तडफेनेच व्हायला हवं होतं आणि त्यासाठी माझ्याहून चपळ, विद्वान आणि महत्त्वाकांक्षी कारभारीच मंडळाच्या सेवेत राबायला हवा होता. दत्तात्रय यशवंत राजाध्यक्षांच्या रूपाने मंडळाला तसा तो लागलीच मिळालाही. आता मंडळाच्या कामाचा डेरेदार वृक्ष पानाफुलांनी बहरून निघाला आहे. पलीकडच्या काठावरून मी त्यांचं सौंदर्य आता नीट निरखू शकतो.

आता आदरणीय अंतरावरून काय दिसतं?

एका लक्ष्मणशास्त्र्यांमध्ये अनेक लक्ष्मणशास्त्री गुरफटलेले दिसतात. शास्त्रीबुवा म्हणजे काही कुणी साधुसंत नव्हेत. तेही संसारीच आहेत. त्यांनाही तुमच्या-आमच्या सारखेच रागलोभ आहेत, स्वार्थ-परमार्थ आहेत. त्यांच्यातही दोष आहेत. संतापणं, उसळणं हा प्रमुख दोष. दुसऱ्या क्षणाला विसरून जाणं हा प्रमुख गुण. मला ते विविध रूपांत दिसले. किंबहुना वर्षभर दिसतच राहिले. हाताखालच्या माणसाला बरोबरीच्या नात्याने, पण त्याला सलगी करू न देता वागवणारे, मित्रप्रेमात न्हाऊन निघणारे; ग्रंथावलोकनात ब्रह्मानंदी टाळी लागणारे; संतापाने लालबुंद होणारे; दोन घटका जिवाची मौजमजा करणारे; सांसारिक सुखाभिवृद्धीमुळे तृप्त झालेले; स्वतःच्या साहित्य सेवेबद्दल ओझरता उल्लेखही न करणारे; स्वतःच्या मिजाजीत वावरणारे; विद्येच्या अभिजात अभिलाषेने प्रचंड काम अंगावर घेणारे आणि गुरुजींच्या आठवणीने पुनःपुन्हा व्याकुळणारे, प्रकृतीला जपणारे असे वेगवेगळं शास्त्रीबुवा दिसतात. मजा अशी की, पुन्हा ही सर्व रूपं औटघटकेचीच असतात.

कुठल्याही रूपात ते स्थिर असे दिसतच नाहीत. त्यांच्या चित्ताला चाकं लागलेली आहेत. ह्या माणसाची अष्टौप्रहर धावपळच चालू असते. फांदीवरल्या पाखरासारखे चुळबूळ न करता स्वस्थ बसलेले आहेत, असं शास्त्रीबुवांना मी कधीच पाहिलेलं नाही.

**('देवाघरचा पाऊस'मधून उद्धृत, २५ डिसेंबर, १९७५)**

ooo

## २०.

# तर्कतीर्थ जोशी: एक दर्शन

### रा. ना. चव्हाण

तर्कतीर्थ जोशी मूळचे खानदेशी, पण त्यांचे वास्तव्य वाई क्षेत्री अध्ययन व अध्यापनार्थ झाल्यामुळे ते वाई देशी ठरतात. वाई देश हा सातारा जिल्ह्यातीलच असल्यामुळे तर्कतीर्थ सातारी ठरतात. राजकारण हा त्यांचा एक प्रमुख विषय झाल्यामुळे ते सातारी राजकारणाशी व पर्यायाने महाराष्ट्राच्या जानपद राजकारणाशी निगडित झाले आहेत. राजकारण हा त्यांचा अभ्यासाचा जसा प्रांत आहे, तसेच निवडणुकीचे राजकारण हादेखील त्यांच्या जीवनाचा विभाग होत असतो. पण ते स्वतः कोणत्याच राजकीय निवडणुकीस उभे राहात नसल्यामुळे ते तसे व्यक्तिशः सत्तास्पर्धेपासून अलग असतात. राजकारणात व व्यवहारात आणि विविध संस्थांमध्ये कार्य करीत असताना निर्माण होणारी कटुता तर्कतीर्थ टाळतात. झाल्या-गेल्या गोष्टी व बाबी विसरून पुढे जातात, तर्कतीर्थांचा मूळ विषय तत्त्वज्ञान हाच ठरतो व ह्यातूनच त्यांचे खरे दर्शन होऊ शकते. पांडित्याबद्दल तर प्रश्न नव्हताच व नाही. विद्यार्थी दशेपासून केवलानंद सरस्वती यांच्या प्राज्ञपाठशाळेत ते येऊन राहिले. त्यांची व्याख्यानार्थ सर्वच भ्रमंती चालू असते, तरी त्यांच्या वास्तव्याचे घर म्हणजे वाईच होय. सन १९१४ सालापासून ते वाईकर आहेत. त्यांना समजावून घेण्यासाठी सन १९१४ च्या पूर्वी वाई कशी होती ते पाहिले पाहिजे.

सुखवस्तू इनामदार, सावकार व भिक्षुक यांचे हे गाव प्राय: क्षेत्र होते. वाई ही विराट नगरी म्हणून म्हटले जाते. तरी ऐतिहासिक दृष्टीने या संदर्भाविषयी एकमत नाही. निबंधमालाकारांनी ‘वाई म्हणजे विराट नगरी’ हे साफ नाकारले आहे. म्हणूनही वादात जाण्याचे कारण नाही.

वाई हा शब्द ‘वायु’ ह्या शब्दापासून झाला. वैदिक काळात वायु ही एक देवता होती. पुढील ऐतिहासिक कागदपत्रांतून वाईचा उल्लेख ‘वैराज क्षेत्र’ असा जास्ती आढळतो. खूप वर्षे वाई हे अफजूलखानाचे व तत्पूर्वी व नंतरही विजापूरकरांचे एक महत्त्वाचे ठाणे होते व मराठ्यांना ते जिंकून घेण्यासाठी फारच प्रयास पडले. ह्या कामी हंबीरराव मोहिते कामास

आले, वाई घेण्यासाठी मराठ्यांना जी लढाई करावी लागली, तो संग्राम अपूर्व व विलक्षण होता. उत्तर पेशवाईत वाई हे रास्ते सरदारांचे मुख्य ठिकाण झाले व त्यांनी पश्चिम वाई वसविली. ह्या पश्चिम वाईतच प्राज्ञपाठशाळा निघाली व आहे. म्हणजे हल्ली प्राज्ञपाठशाळा मंडळाच्याद्वारे विविध संशोधनीय व प्रकाशकीय कार्ये चालतात. परंतु तर्कतीर्थ येण्यापूर्वी व सन १९२९/३० पर्यंत तरी वाई हे सनातनी व जुन्या पंडितांचे ठाणे होते. सन १९१३ सालाच्या अगोदर प्रसिद्ध पंडित कै. भाऊशास्त्री लेले सनातन्यांचे अध्वर्यू होते. लोकमान्य टिळकांनी गीतेचा अर्थ कर्मयोगपर लाविला ही बाब म्हणजे एक महत्त्वाची धर्मसुधारणा भाऊशास्त्री लेले वाईकर यांनी नापसंत केली व टिळकांचे प्रमुख प्रतिस्पर्धी म्हणून उभे ठाकले. वेदोक्त प्रकरणातही राजर्षी शाहू महाराजांना विरोध करण्याच्या कामी भाऊशास्त्री अग्रेसर होते. परंतु भाऊशास्त्री राजकारणात जहाल होते. त्यांच्या काळात वैदिक विद्वान भिक्षुक ह्यांचा भरणा वाईस फार होता; हे सावसावकारकीदेखील करीत व त्यातूनच त्यांचा पेशा जमीनदारांचा झाला होता. वाईस तर जोशीआळी म्हणून स्वतंत्र वस्ती होती. भाऊशास्त्री यांच्यापूर्वी वाई तर फार सनातनी होती. सन १८२८ साली प्रसिद्ध जगन्नाथ शंकरशेट सोनार मुंबईहून वैदिक हव्य-काव्यादी विधीप्रीत्यर्थ वाईस आले होते. पण क्षेत्रस्थानी त्यांना वैदिक संस्कारांचा लाभ होऊ दिला नाही. सातारच्या शेवटच्या प्रतापसिंह छत्रपतींनी स्वतः मध्यस्थी केली, तरी वाईच्या आगमनाबद्दलचे ग्रामण्य वाईकर शास्त्रीपंडितानी तसेच उठविले नाही. खुद्द प्रतापसिंह महाराज यांच्या वेळच्या प्रसिद्ध वेदोक्त प्रकरणात वाईकर पंडितांनी त्यांच्या विरुद्ध पवित्रा घेतला व छत्रपतींना गादीसही बाळाजी नातूकरवी मुकावे लागले. हा इतिहास देताना सरदेसाई यांचाही नाइलाज झाला. परंतु वाई प्रांत पुढे राजकीय स्वातंत्र्यासंबंधी जागरूक व क्रियाशील होता. वासुदेव बळवंत फडके वाईस त्यांच्या जवळच्या नातलगाकडे गुप्त येऊन राहिले होते. उमाजी नाईकाच्या समाजाने प्रतापसिंह यांच्याच कारकिर्दीत पांडवगडचा आश्रय घेऊन इंग्रज सेनानींना हैराण केले होते. इंग्रजी राज्य हे फक्त राजकीय व आर्थिक आक्रमण नव्हते ते संस्कृतीवरीलदेखील आक्रमण होते. म्हणूनच वाईस जुनी विद्या व संस्कृती टिकवून धरण्यासाठी प्राज्ञपाठशाळा साहजिकच निर्माण केली गेली. वाई हे योग्य असे विचारांती निवडलेले गाव म्हणून गणिले गेले. हे क्षेत्र होते, तरी येथे पंढरपूर, नाशिक, माहूर वगैरे ठिकाणांसारखी बडवेशाही नव्हती व नाही. ह्या आगळेपणाशिवाय येथे दशग्रंथी अभ्यासू वैदिक ब्राह्मण होते. विद्येची परंपरा होती. अव्वल इंग्रजीतील सुखवस्तू काळात येथे मराठी वाङ्मयसेवक अनेक झाले. 'धर्म', 'मोदवृत्त' व 'वृत्तसार' वगैरे पत्रे निघत. सार्वजनिक कामाची हौस असलेले अनेक सद्गृहस्थ येथे होते. सर्व दृष्टींनी वाई हे जागृत केंद्र होते. पुणे येथील सार्वजनिक जीवनाचा वाईवर परिणाम प्रथमपासून होत आला.

केवलानंद सरस्वती (कै. नारायण शास्त्री मराठे) यांच्या अगोदर प्रज्ञानंद सरस्वती विद्वान म्हणून प्रसिद्ध होते. नारायण शास्त्रींचे हे गुरू व लक्ष्मणशास्त्री हे नारायणशास्त्रींचे शिष्य

दिवेकरशास्त्री, कानडेशास्त्री, वाटवेशास्त्री वगैरे वगैरे वाई येथे प्राज्ञपाठशाळेत अध्यापक होते व ते प्रसिद्ध आहेत. केवलानंदांनी अनेक शिष्योत्तम तयार केले.

लोकमान्य टिळक यांच्यानंतर महात्मा गांधी यांच्याद्वारे वाई येथेही स्वातंत्र्यासंबंधी नवी जागृती झाली व प्राज्ञपाठ शाळेतील अनेकांनी स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला. बेचाळीसच्या भूमिगतांना तेथे आश्रय मिळे. सत्याग्रहाच्या लढ्यात पंडित लक्ष्मणशास्त्री यांनीही कारागृहवास सोसला; तर्कतीर्थ हे एक स्वातंत्र्य सैनिक आहेत. एवढेच नव्हे तर विचारस्वातंत्र्याचे भोक्ते आहेत. म्हणजे शास्त्रीजी कोणताही ग्रंथ सर्वप्रमाण मानीत नाहीत.

देशात अशी दुसऱ्या बाजूने धर्मजागृती होत होती. हिंदुसमाजावर आक्रमण होत होते म्हणजे हिंदुमुसलमानांचाही प्रश्न असे. प्राज्ञपाठशाळेतील कै. श्री. दिवेकरशास्त्री (हिंदुत्वदीपक) ह्यांनी हिंदुत्वाला पूरक असे अनेक ग्रंथ लिहिले. हिंदुमहासभेच्या अधिवेशनात ही प्रमुख मंडळी भाग घेत असत. हिंदू समाजात त्या काळी ब्राह्मण ब्राह्मणेतर वाद व पुढे अस्पृश्यांचा प्रश्न जशा अंतर्गत समस्या पुढे आल्या. ह्यांचाही विचार करणे प्राज्ञ मंडळींना भाग झाले. प्राज्ञपाठशाळा स्थापन होण्याच्या वेळेस जो काळ होता; तो पहिल्या महायुद्धापूर्वीचा होता. महायुद्धानंतर काळ पालटला. लोकमान्यांचा नंतर मृत्यू घडून आला व महात्मा गांधी राजकीय क्षितिजावर आले व गांधीकाळाचा प्रभाव वाढत चालला. प्राज्ञपाठशाळेने गांधीनिष्ठ माणसे देखील पुरविली. तर्कतीर्थांच्यावर म. गांधी यांचा परिणाम फार घडला. तारुण्यावस्थेतील महत्त्वाचा काळ त्यांनी गांधी यांच्या स्वातंत्र्य लढ्यात घालविला. महात्मा गांधी-नेताजी सुभाषचंद्र बोस ह्यांच्या लढ्यामुळे पूर्ण स्वातंत्र्यच आले. भारतामध्ये युगांतर घडले. नवयुग आले.

परंतु भांडवलदारांनी स्वातंत्र्यलढ्यास पाठिंबा दिला. अर्थात स्वातंत्र्यात सत्ता वाढली. पुढे मार्क्सवादी शास्त्रीय व वैज्ञानिक विचार ह्या देशातील विचारवंतावर प्रभाव गाजवू लागले. तर्कतीर्थांचे पहिले अध्ययन संस्कृत भाषेतील व जुने होते. कै. श्री. नारायणशास्त्री मराठे ह्यांनी प्राज्ञपाठशाळेत फार मोठा संग्रह संग्रहित केला होता. वाचनालयदेखील होते. ह्या ग्रंथसंपत्तीचा तर्कतीर्थांनी लाभ घेतला. वाईमध्ये राहूनच त्यांनी पुढे इंग्रजी भाषा चांगली आत्मसात केली. यामुळे पाश्चात्त्य ज्ञान व विज्ञान यांचे नवे दालन त्यांना खुले झाले व उत्तरोत्तर ते परंपरावादी राहिले नाहीत. मार्क्सचाही त्यांनी चांगला अभ्यास केला. कारागृहवासात असतानाही त्यांना अनेक नवे व व्यासंगी मित्र भेटले. मार्क्सवादातून त्यांनी हिंदुधर्माची मीमांसा प्रगट केली; व गुलामगिरीचे व पिळवणुकशाहीचे स्वरूप त्यांनी सांगितले. जुने शास्त्री पंडित व नवमतवादी तर्कतीर्थ ह्यांच्यात तफावत पडत गेली. उदा. मागील लोकहितवादी हे आर्यांग्ल पंडित होते. तत्पूर्वीचे राममोहन रायदेखील आर्यांग्ल विद्वान होते. पाश्चात्य विद्या व धर्म आणि संस्कृती ह्यामुळे ह्या दोघांमध्येही अव्वल इंग्रजीत विलक्षण फरक पडला होता. राममोहन प्रथम संस्कृतचे व देशी भाषेतील पंडित होते व नंतर ते प्रौढपणी इंग्रजी शिकले. असाच प्रकार तर्कतीर्थांच्या जीवन ओघात आढळतो. तर्कतीर्थ राममोहन यांच्या परंपरेत एकपरी मोडतात. महात्मा गांधी देखील एका अर्थाने राममोहन यांच्या परंपरेतील झाले.

महात्मा गांधी ह्यांनी सामाजिक सुधारणा व राजकीय सुधारणा ह्यांचा समन्वय केला. मागे ह्यासंबंधी वितंडवाद होता. स्वातंत्र्यलढ्याबरोबर अस्पृश्यता निर्मूलनाचा लढादेखील गांधी ह्यांना करावा लागला. ह्या सामाजिक लक्ष्यात स्वामी केवलानंद (पूर्वाश्रमीचे नारायण शास्त्री मराठे) व तर्कतीर्थ जोशी ह्यांनी महात्मा गांधींना चांगली साथ दिली. महात्मा गांधी ह्या काळात येरवड्याच्या कारागृहवासात होते. महात्मा गांधींना अस्पृश्यता निवारणाला धर्मशास्त्राचा आधार दाखविण्याची तीव्र गरज होती. सर्वसामान्य जनता व परंपरावादी शास्त्री पंडित यांच्या खातरजमेसाठी हा उपक्रम जरूर होता. तर्कतीर्थांनी हे आधार व शाखातील मूळ ज्ञानाचा अस्पृश्यता निवारणासाठी आधार दाखवून देण्यात चांगलेच यश मिळविले. यामुळे गांधी व तर्कतीर्थ अधिकच जवळ आले. पुढे राजगोपालाचार्य यांची कन्या व महात्मा गांधी यांचा पुत्र देवीदास यांचा मिश्र विवाह जमला. ह्याही विवाहात तर्कतीर्थांनी पौराहित्य केले. यामुळे पंचक्रोशीत व वाईच्या बाहेरील सनातनी गोटातदेखील खळबळ उडाली.

परिवर्तनाला म्हणजे समाज सुधारणेलाही मागील संस्कृतातील पूर्वग्रंथातील म्हणजे श्रुतीस्मृतीतील आधार दाखविण्याची गरज ह्या काळात मोठी होती. कारण 'वचनात् प्रवृत्तिः। वचनात् निवृत्तिः' असे वागणारे अनेक पंडित व सनातनी विद्वान पुष्कळ होते. आज ते दिसत नाहीत. लोकहितवादी, पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर मागे राममोहन राय ह्यांनी व रानडे, भांडारकर ह्यांनीही मागे धार्मिक, सामाजिक सुधारणांना ऋषी वचन, संतांचे साहित्य, श्रुतीस्मृती ह्यांतीलही आधार दाखविले होते. पण राममोहन, रानडे, भांडारकर व दयानंद यांची धर्म व समाज सुधारणा तत्त्वनिष्ठ परिवर्तनवादी भूमिकेवरून झाली तर अधिक हितावह होईल असा विचार विद्वान व काही पंडितांनी पुढे आणिला व त्यासाठी धर्मनिर्णय मंडळाची योजना केली. स्वामी केवलानंद (तर्कतीर्थांचे वाई येथील गुरू) ह्या कार्यात प्रमुख होते. धर्मनिर्णय मंडळ व विद्वत्परिषदांमधून तर्कतीर्थांनी भाग घेतला. शंकराचार्यांना धर्मनिर्णय मंडळाने लोकशाही पद्धतीने व अधिकार संपन्नतेतून अनेक धर्म व समाज सुधारणांना वचनाधारे आधार दिले व नव्या काळाला अनुसरून असलेली परिवर्तने धर्ममान्य ठरविली. यात अस्पृश्यता निवारणालाही आधार दाखविले. सनातनी पक्षाने तर्कतीर्थांचा बराच छळ केला, तर्कतीर्थांनी तो सोसिला. मार्टीन लूथर यांच्या कार्याशी तर्कतीर्थांची व केवलानंदांची भूमिका मिळतीजुळती वाटते. ह्यामुळे सनातनी पक्षाचे पूर्ण व साधार निर्दालन झाले व आधुनिकता ही सर्वांनाच अटळ झाली. पश्चिमी विचार हे पश्चिमेकडील म्हणूनच त्याज्य मानणे ही एक घोडचूक होय.

नंतर मानवेंद्र रॉय यांचे मूलगामी व मानवतावादी विचार ह्या देशातील प्रांतोप्रांतातील विवेकवंतांवर प्रभाव गाजवू लागले. ह्याही पुरोगामी मानवतावादी विचारसरणीशी सक्रिय होऊन, तर्कतीर्थांनी असामान्य कार्य केले. ह्याच काळात 'ज्योति-निबंध' जोतिराव फुले (१९४७) हा एक महत्त्वाचा प्रबंध तर्कतीर्थांनी लिहून सिद्ध केला. ह्या वेळी ह्या कार्याच्या

दृष्टीने मी व तर्कतीर्थ फारच समीप आलो होतो. तर्कतीर्थांचा ह्याच काळापूर्वी महर्षी शिंदे यांचेशी परिचय झाला. महर्षि शिंदे यांनी तर्कतीर्थांच्या पुरोगामी भूमिकेला पाठिंबा दिला.

सन १९४७ मध्ये पूर्ण स्वातंत्र्य आले. त्यामुळे नव्या परिवर्तनाची पुनः गरज निर्माण झाली. काळाप्रमाणे बदलत राहाणे हे तर्कतीर्थांच्या जीवितसरणीचे मुख्य वैशिष्ट्य ठरते. रॉयवादी असताना काँग्रेसला विरोधक असा पवित्रा तर्कतीर्थांचा होता; कारण भांडवलशाही धोरण बदलण्याची मोठी गरज होती. रॉयवादी काळात तर्कतीर्थांना काँग्रेसकडून सडकून विरोध झाला. तोही त्यांनी सोसिला. परंतु स्वातंत्र्यात विधायक व रचनात्मक कार्य करून स्वराज्याचे सुराज्य करण्याचे नवे कर्तव्य उभे राहिले. या दृष्टीने तर्कतीर्थांनी स्वपक्ष बरखास्त करून काँग्रेस पक्ष स्वीकारला. यामुळे महाराष्ट्र-काँग्रेसला एका मोठ्या विद्वानाची जोड मिळाली. वरिष्ठ बुद्धिजीवी वर्गातील बुद्धिसंपन्न माणसे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनसंघ किंवा फार तर माजी हिंदुमहासभेत असत. पण ह्या दृष्टीने व एकूण त्यांच्या जवळची-आसपासची मंडळी केसरी-तरुण भारत वगैरे पुणेरी जुन्या धोरणाशी बद्ध असत. (आज केसरीने परिवर्तन केले आहे).

तर्कतीर्थांच्या जीवन ओघातून त्यांचे एक दर्शन घडवून देण्याचा हा प्रयत्न आहे. हा एक अभ्यास आहे. सान्निध्याचा व अनुभवाचा त्याला आधार मिळाला आहे.

आज सामाजिक सुधारणांना सनातनी पक्षांचा व जीर्णमतवाद्यांचा विरोध राहिलाच नाही. म्हणून हा प्रश्न पुष्कळसा फाईल झाला आहे तरी सर्वांतच रूढिग्रस्तता आढळते. म्हणून विज्ञानात्मक दृष्टिकोनाचा परामर्श तर्कतीर्थांकडून वारंवार घेतला जातो. नव्या यंत्रयुगाचा व आधुनिकतेचा सर्वांनीच स्वीकार केला आहे. पाश्चिमात्य विज्ञान सर्वज्ञ अटळ आहे. सनातन्यांच्या घरीच नवी सुधारक व आधुनिक विचारांशी सहमत पिढी निर्माण झाल्यामुळे आधी सामाजिक का आधी राजकीय वगैरेंसारखे शुष्क वाद दिसतच नाहीत. एकूण काळ फारच पालटला. तथापि, तर्कतीर्थ निरीश्वरवादी (म्हणजे नास्तिकवादी) मला कधीच भासले नाहीत. जिवाने जीव ते जाणतातच.

तर्कतीर्थांच्या जीवनात अस्पृश्यतेच्या विनाशनाला फार मोठे स्थान आहे व हा समतावादी मानवी दृष्टिकोन घरीदारी कृतीत येत असतो.

अस्पृश्यांसंबंधीचा म्हणजे दलितांच्या संबंधीचा ज्यांचा दृष्टिकोन उदार असू शकतो, त्यांचा दृष्टिकोन बहुजन समाजाच्या बाबतीतदेखील सनातनी असू शकत नाही. मानवी अस्पृश्यांना दलित ही नवी संज्ञा वापरली जाते. तशीच ब्राह्मणेतर ह्या जुन्या परिभाषेऐवजी बहुजन समाज असे हल्ली म्हटले जाते. बहुजनसमाजाच्या दृष्टीने तर्कतीर्थांचा दृष्टिकोन व प्रतिपादन सहानुभूतीचे व जवळीकेचे फार वर्षांपासून होते व आहे. एकपरी तर्कतीर्थ बहुजनवादी आहेत.

काँग्रेसमध्ये आल्यावर त्यांचा व श्रीमान यशवंतराव चव्हाण यांचा पुनः जवळकीचा

संबंध जडला व तो कायम आहे आणि कायम राहिला. नामदार यशवंतराव यांचे चुलते वगैरेंचा सत्यशोधक ब्राह्मणेतर चळवळीशी संबंध होता. नामदार यशवंतरावांनी कार्य करण्याची पद्धत राष्ट्रीय व अखिल भारतीय अशी वर्धमान केली हे चांगले झाले. तरी त्यांना महात्मा फुले व राजर्षी शाहू महाराज यांच्यासंबंधीची कृतज्ञता सोडत देत नाही. ह्याचप्रमाणे महात्मा फुले व शाहू महाराज यांच्या कार्याचा चांगला अभ्यास तर्कतीर्थांनी केला. नामदार यशवंतरावांच्या राजकारणाला पाठिंबा देण्याचा बहुजनसमाजाभिमुखी पवित्रा तर्कतीर्थांनी घेतला. ह्यातच त्यांच्या उत्तरार्धाच्या जीवनाचे मुख्य सूत्र व सार्थकता आढळते. महाराष्ट्रातील बहुजनांना घेऊन व त्यांच्याशी विशेष संबंध राखून, राजकारण करणे हे एकपरी लोकमान्य टिळकांना देखील फारसे जमले नाही. न्यायमूर्ती रानड्यांत हा गुण होता. पुष्कळसे विद्वान तुसडपणे वागतात. पुष्कळ पंडितांचे संशोधन, साहित्य व राजकारणदेखील जातीय उपाधीने मर्यादित झालेले आढळते. म. गांधी ह्यांनीदेखील काँग्रेस शेतकऱ्यांची व जास्तीत जास्त ग्रामीण जनतेची झाली पाहिजे असा आग्रह सक्रियपणे धरिला. मागे महात्मा फुले ह्यांची अशी तक्रार होती की, काँग्रेस ही सर्वसामान्य जनतेची नाही! त्यांच्या काळातील राष्ट्रीय सभेचे स्वरूप पाहिल्यास हा फुल्यांचा आरोप चुकीचा नव्हता असे दृष्टीस येईल. खेड्यापाड्यातून व शेतकऱ्यांपासून काँग्रेस दूरच असे.

बहुजनसमाजाला धरून घेऊन राजकारण करणे हा तर्कतीर्थांचा महत्त्वाचा पैलू आहे. मुत्सद्दीपण आहे. तर्कतीर्थांचा अमृत महोत्सव झाला. नंतर लगेच ते पद्मभूषण झाले. ह्यामुळे पुष्कळांकडून त्यांच्यावर भाष्ये झाली व विविधांकडून मोठमोठे सत्कार झाले हे साहजिक होते व जरुरीचे होते. या देशातील पुष्कळ थोर पुरुषांची योग्यता त्यांच्या पश्चात जाणली गेली. निदान स्वातंत्र्य आल्यावर कोणत्याही खऱ्या कार्यकर्त्याची उपेक्षा होऊ नये. तर्कतीर्थांनी कै. श्री. न. चिं. केळकर-भटकर यांचा गांधीविरोधी पवित्रा बॅ. सावरकर यांचा हिंदु महासभावादी म्हणजे काँग्रेसविरोधी पवित्रा घेतला नाही. गोळवलकर यांचा वर्णवाद त्यांनी खंडन केला व लोकशाही आणि समाजवादी निधर्मी धोरण पत्करिले. हे पुष्कळांना मागे जमले नाही व खूप वरच्या थरातील लोकांना अवघड जाते. म्हणून ते संघीय व जनसंघीय होऊन राष्ट्रीय जीवनापासून व नव्या धोरणापासून दूरचे ठरतात. ही दूरता व ही अलगता तर्कतीर्थांनी टाळली. सार्वजनिक जीवनात, संस्थासंभारात व राजकारणात निर्माण होणारी "एकतिकता" टाळणे व जनताभिमुख होणे हे जे तर्कतीर्थांच्या जीवनाचे मर्म व वर्म आहे तेच अजून संबंधितांच्या व जवळच्या कार्यकर्त्यांच्या लक्षात आले नाही. इतःपर तरी ध्यानात यावे! उच्चभ्रूंनी, विद्वानांनी व वरिष्ठ थरातील स्वतःला समजणाऱ्यांनी जनताभिमुख झाले पाहिजे हा माझा मुद्दा सोदाहरण स्पष्ट करण्यासारखा खास आहे. उदा. कॉमरेड डांगे हे भारतीय राजकारणाच्या क्षितिजावर पहिल्या महायुद्धानंतर पासून आहेत. तर्कतीर्थांप्रमाणे डांगे ह्याच्यात अनेक जन्म (परिवर्तन-पालट) आढळत नाहीत हे खरे. मार्क्सवादी घेतलेली

भूमिका डांगे यांनी सोडिली नाही. रशियावादी होते व आहेत. मार्क्सवाद हा जनतेचा वाद म्हणून असतो. महाराष्ट्रातील सत्यशोधक चळवळ मूलतः शेतकरी-कामकऱ्यांची चळवळ होती. महात्मा फुले व लोखंडे वगैरेंनी शेतकरी व मजूर हा प्रश्न हाताळला होता. ह्या वेळी रशियन साम्यवादी विचार येथे आले नव्हते. तरी ह्या चळवळीने शेतकऱ्यांच्या अडचणी, दुःखे, मागण्या व नव्या जाणिवा जनतेपुढे प्रथम मांडिल्या. असे असतानाही कॉम्रेड डांगे ह्यांनी कधीच ह्या चळवळीचा विशेषाने उल्लेख केलेला आढळत नाही. ही चळवळ म्हणजे विद्याप्रसारक चळवळ होय, एवढेच अपवादात्मक त्यांनी एका भाषणात ओझरते सांगितलेले आढळते. तर्कतीर्थांनी ही चूक होऊ दिली नाही. बहुजन समाजाच्या चळवळीवर व त्यातील थोर थोर कर्मवीरांच्यावर तर्कतीर्थ हे एक अभ्यासक विद्वान गणिले जातात. तर्कतीर्थ व माझा विशेष सहवास घडून आला, तो ह्याच कारणामुळे. हा तत्कालीन मिलाफ सार्वजनिक ठरला.

ह्या लेखात तर्कतीर्थांच्या प्रत्यक्ष संबंधाने काही आगळे मुद्दे मांडिले आहेत. सदर नियतकालिक हे शिक्षणविषयक आहे. तर्कतीर्थ ही फक्त तत्त्वज्ञानी व्यक्तीच नव्हे तर त्यांनी राजकारणात भागही घेतला आहे व हल्ली काँग्रेसपक्षाच्या माध्यमातून घेत असतात. पंडित व जाडे विद्वान पुष्कळ वेळा समाजविन्मुख, एकलकोंडे, एककल्ली व कित्येक वेळा खाजगी व सार्वजनिक जीवनात तऱ्हेवाईक वृत्तीचे आढळतात. पण हे दोष तर्कतीर्थात समक्ष आढळले नाहीत. सर्वधर्म समभाव, परमतसहिष्णुता, सांप्रदायिकतेचा अभाव, व्यापक अशी समजूतदार बुद्धी, सर्वांगीण अभ्यास पोथी (ग्रंथ) प्रामाण्याचा अभाव, विभूतिपूजेपलीकडील तात्त्विक दृष्टी वगैरे दृष्टीने आधुनिक गुणसंपदा तर्कतीर्थात आढळते. गुणोपासनेची वृत्ती समाजात वाढली पाहिजे. केवळ स्तुती सोपी असते.

विद्यार्थी, प्राध्यापक, अध्यापक व प्राचार्य ह्यांच्या दृष्टीने तर्कतीर्थांची जीवितसरणी म्हणजे एक आदर्शच होय. दीर्घ वाचन, चिंतन, तैलबुद्धी, बैठक, मुद्दे काढण्याची स्वतंत्र व स्वावलंबी बुद्धी ह्या सर्व महत्त्वाच्या बाबी तर्कतीर्थ ह्या असामान्य व्यक्तीत सापडतात. नव्हे मी अनुभविल्या. कारण मी वाईचाच रहिवाशी आहे. पांडित्य व्यवहार व राजकारण ह्या तिन्ही बाबींतील दक्षता तर्कतीर्थांत आढळते.

पुष्कळ (इतिहास) संशोधक मागील काळात साहजिकपणे रुतून बसतात. पण तर्कतीर्थ वर्तमानाचा व भविष्याचा जास्ती वेध घेतात. पुढे दीर्घपणे पाहतात. मतभेद झाले व त्यांना कटुता आली तरी तर्कतीर्थ स्थितप्रज्ञावस्थेतच होते व असतात. कार्याचे व मुद्यांचे सार्वजनिक महत्त्व चटकन ओळखतात. ह्या गतिमानतेमुळे त्यांना काळ सुलभ यश आले. स्वामी केवलानंद व स्वामी प्रज्ञानंद यांच्या विचारप्रवाहाला समृद्धता आणिली व त्यांच्याही संस्थेला नवी मजबुती निर्माण केली. जीवनात भेद झाले व सर्वत्र मनुष्य स्वभावाने होतात. तरी 'धर्मकोश' व 'विश्वकोश' ही उत्तुंग शिखरे ठरतील. तर्कतीर्थांत प्रज्ञा आढळते. एक आदर्श प्राज्ञ म्हणून त्यांचे ठळक दर्शन सहवासातून शब्दांकित केले आहे. तर्कतीर्थांच्या

सहवासातून हे दर्शन साकार झाले आहे. त्यांच्या समीपतेतून जे लेखन साहित्य प्रकट झाले, त्यापैकी 'ज्योति-निबंध' जोतीराव फुले (सन १९४७) ही एक कृती होय. याचे लेखक ते स्वतः आहेत. ह्या निबंधात जोतीराव कृत "इषारा", "गुलामगिरी" व "सार्वजनिक सत्यधर्म" ह्या तीन पुस्तकांचे सार आहे. "इषारा" हा छोटासा निबंध फार उपयोगी व प्रभावी झाला. जोतीरावांच्या विचारांचा गाभा ह्या पुस्तकात आढळतो. ह्या निबंधात शेवटी राजकीय भविष्य सांगितले आहे; ते आजही खरे झालेले आहेत असे ठरते. काळजीपूर्वक लिहिलेल्या ह्या निबंधाचे इंग्रजी भाषांतरही प्रसिद्ध झाले होते. ह्यानंतर जोतीराव फुले यांचे चरित्र लिहिण्याचा त्यांनी संकल्प केला. मी पुष्कळ साधने प्रस्तुत पुस्तकासाठी जमा केली होती. जोतीरावांच्यावर विचार होत असताना जोतीरावांचे चरित्र म्हणजे त्यांच्या काळातले भालेकर, लोखंडे, घोले वगैरे, नंतर सयाजीराव, शाहू महाराज, जेधे, कर्मवीर भाऊराव पाटील, भास्करराव जाधव वगैरे. कर्मवीरांचे कार्य म्हणजे जोतीरावांच्या चरित्राचा वाढणारा परीघ होय. जोतीराव, भालेकर, लोखंडे यांची व मुकुंदराव पाटील, शाहू महाराज, भास्करराव जाधव यांची चरित्रे लिहून झाली होती. ज्योती निबंधामुळे तर दिल्लीच्या साहित्य अध्यक्षपदाचा मान शास्त्रीजींना मिळाला असे त्यांनीच वारंवार सांगितले. पुढे संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न उपस्थित झाला. रॅडिकल पार्टी बरखास्त करून शास्त्रीजी काँग्रेसमध्ये गेले. माननीय यशवंतराव चव्हाणांच्या राजकारणाशी ते फारच समीपता पावले. मध्यंतरी कै. श्री. अत्रे यांनी 'महात्मा फुले' बोलपट काढण्याची तयारी केली. वरील लेखन तर्कतीर्थांनी कै. श्री. अत्रे यांना दिले व त्यांना ही सामुग्री उपयोगी झाली. साहाय्यक म्हणून कृतज्ञतेने बोलपटाच्या अगदी सुरुवातीस तर्कतीर्थांचे नाव पडद्यावर झळकले.

ह्या दोन पुस्तकांच्यामुळे तर्कतीर्थांशी माझा फार संबंध आला. ते मजकूर सांगत व मी लिहीत असे. एकूण दोनशे तास तरी ह्यात खर्ची पडले असावेत. दुसरे पुस्तक अप्रसिद्ध राहिले, तरी ह्या सामाजिक विषयावरील माझेही अध्ययन वाढले व शिरकाव (प्रवेश) झाला. जोतीरावांची वाक्ये पल्लेदार व भाषा सोपी असली तरी त्यामागील विचार शोधल्याशिवाय सहजी समजत नाहीत. बहुजन समाज सुधारक चळवळीचा अन्वय अर्थ उत्तरोत्तर कळण्यास वरील लिखाणाच्या सुरुवातीस व नंतर जी चर्चा होत होती ती कारण झाली. मी नंतर माझे अध्ययन-चिंतन सोडले नाही. म. फुले व शाहू महाराज वगैरे तत्सम विषयावर नंतर तर्कतीर्थांना लिहावे बोलावे लागतेच. ह्याही प्रक्रियेस वरील पहिले प्रयत्न उपयोगी होतात. तर्कतीर्थांचे वाचन व चिंतन वर्धमान असते. वरील लेखनाचा काळ १९४७ ते १९५२ च्या दरम्यानचा होता. मागे १९३३ ते सन १९३६/३७ पर्यंत कर्मवीर शिंदे ब्राह्मोसमाजाच्या कार्यानिमित्त वाईस येत जात होते. ब्राह्मोसमाजामध्ये मानवतावादी दृष्टी असल्यामुळे तर्कतीर्थ व (वाई) ब्राह्मसमाज यांचे ह्या कालखंडात व पुढेही बरेच सहकार्य झाले. तर्कतीर्थात संप्रदायिकता व अंध पक्षीयता नसते. मानवेंद्र रॉय यांचा त्यांच्यावर फार परिणाम घडला.

तर्कतीर्थांच्या जीवनात अनेक परिवर्तने झालेली मी पाहिली. बाह्य (पोशाखात) व अंतर्गत बदल पाहिले. तर्कतीर्थांनी ह्या संबंधात एकदा सांगितले की, माझी मते बदलतात तरी सर्वच मते बदलत नाहीत. याची साक्ष म. फुले समग्र वाङ्मयाच्या ग्रंथाला त्यांनी दिलेली प्रस्तावना देते. गुलामगिरी नव्हतीच असे त्यांना म्हणावयाचे नाही; उत्तर पेशवाईला तर्कतीर्थांनी जास्तीत जास्त जबाबदार धरिले आहे.

पूर्वी झालेल्या चर्चेतून काही आठवणीत बाळगिलेली त्यांची सूत्रे व भविष्य पुढे देत आहे. खालील ज्ञानकण सर्वांनाच सार्वजनिक उपयोगाचे वाटतील.

जोतीरावांना मित्र चांगले भेटले. जोतीरावांचे जीवन त्यांच्या घराण्याचा पूर्वेतिहास व त्याचा स्वानुभव ह्यातून घडले.

शाहू महाराज झाले नसते तर निबंधमालेच्या टीकेतच जोतीरावांचे दर्शन पुढीलियाना फक्त उपलब्ध झाले असते.

शाहू महाराजांचे आर्थिक साह्य सर्वांनाच झाले. वेदोक्त प्रकरणात लो. टिळक चुकले हे त्यांनी वारंवार मागे लिहिले बोलले आहे. ताजे उदाहरण राजर्षी गौरव ग्रंथ १९७६ (महाराष्ट्र राज्य शिक्षण विभागाने संपादित केलेला). ह्यातील लेखात "वेदोक्त प्रकरणाचा शास्त्रार्थ" राजर्षी शाहू यांच्या पक्षाचे दृढीकरण करतो.

इंग्रज जाण्यापूर्वी 'इंग्रज आता राहणार नाही तो जाणे अटळ आहे' असे ते सन १९४७ पूर्वीही सांगत. बहुजनसमाजाच्या इतिहासात माननीय ना. चव्हाण यांचेही चरित्र घ्यावे असे मी त्यांना म्हणालो. "अजून ते मोठे व्हावयाचे आहेत" असे ते १९५३ पूर्वी म्हणाले. नामदार यशवंतराव उत्तरोत्तर मोठे झालेले आहेत असे आपण आज सर्वच प्रत्यक्ष पाहात आहोत. अशी अनेक त्यांची भविष्ये खरी ठरली.

त्यांच्या मुद्द्यातील काही मतांविषयी मतभेद करावासा मला वाटला. त्यांचा त्याला व्यत्यय नसतो; तथापि अधिक चिंतनानंतर मला त्यांचे मुद्दे अभ्यसनीय आहेत असे वाटले, वाटतात. उपक्रम हाती घेतला व तो सोडला याबद्दल खंत वाटत नाही. एकूण समाज प्रबोधनाच्या गेल्या शतकातील इतिहासावर पुष्कळ विचार मंथन घडले.

कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांचा सहवास मला लाभला. नंतर तर्कतीर्थांचा लाभला. यामुळे शेवटी धन्यता व्यक्त करावीशी वाटते.

रयत शिक्षण संस्थेने त्यांचा सत्कार केला. रयत शिक्षण पत्रिकेच्या माध्यमातून तर्कतीर्थांच्या सत्कारार्थ पुनः हा खास लेख होय.

**(रयत शिक्षण संस्थेची 'रयत शिक्षण पत्रिका' फेब्रुवारी १९७७, सातारा.**

**संपादक- प्रा. आर. डी. गायकवाड, सहसंपादक प्रा. द. ता. भोसले, पंढरपूर)**

ООО

# २१.

# तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी : शास्त्र आणि शस्त्र

## यशवंतराव चव्हाण

महाराष्ट्रातील प्रसिद्ध विद्वान तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा या महिन्यात ८० वा वाढदिवस साजरा होत आहे याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन! या निमित्ताने त्यांच्यासंबंधी गेली ५० वर्षे माझ्या मनात वसत असलेला आदरभाव व्यक्त करण्याची महत्त्वपूर्ण संधी मला मिळालेली आहे.

मी तर्कतीर्थांना प्रथम पाहिले ते १९३० च्या कायदेभंगाच्या आंदोलनात. कराड येथील कृष्णेच्या घाटावर भरगच्च गर्दीच्या एका सभेत वाईच्या पाठशाळेचा एक तरुण शास्त्री महात्मा गांधींच्या असहकाराच्या चळवळीस आपले प्रेरणादायक विचार मांडीत होता. उघड्या अंगावर बंगाली पद्धतीने घेतलेली खादीची शाल, चेहऱ्यावर प्रखर तेज, अशी त्यांची मी पाहिलेली मूर्ती मला आजही आठवते. आणि त्यांच्या त्या दिवशीच्या व्याख्यानातील एक वाक्य माझ्या मनात कायमचे घर करून राहिले आहे. ते सांगत होते, "मी माझ्या गुरूंच्या पायाशी बसून सहा शास्त्रांत पारंगत झालो आहे. आणि आता मला या शास्त्रांचे रूपांतर शस्त्रात करावयाचे आहे. ही मोठी शास्त्रे आता शस्त्रे बनली नाहीत, तर हिंदुस्थानात कायमची गुलामगिरी राहील." भारताच्या पारतंत्र्याची कारणमीमांसा इतक्या थोड्या व नेमक्या शब्दांत केलेली मी पूर्वी ऐकली नव्हती. त्या चळवळीत त्यांचा माझा परिचय झाला. पुढे क्रमाक्रमाने परिचयाचे रूपांतर राजकीय सहकार्य व हळूहळू गाठीभेटीत व पुढे मैत्रीत झाले.

गेल्या पन्नास वर्षांच्या या काळात त्याच्याशी माझा निवळ राजकीय संबंध आला असे नव्हे तर, त्यांच्या साहित्यिक, सांस्कृतिक कार्याशीही माझा संबंध येत गेला. शास्त्रीबुवांचे व्यक्तिमत्त्व हे एक स्वतंत्र शैलीचे आकर्षक व्यक्तिमत्त्व आहे. त्यांचा जसा भारतीय संस्कृती, इतिहास, साहित्य व तत्त्वज्ञान यांचा गाढा व्यासंग आहे तसाच मार्क्सवादी व इतर पाश्चिमात्य तत्त्वज्ञान व इतिहासाचा खोल अभ्यास आहे. या व्यासंगातून जे व्यक्तिमत्त्व उभे राहते, ते

एक प्रकारचे अपूर्व असे व्यक्तिमत्त्व आहे. त्या व्यक्तिमत्त्वाला तीक्ष्ण बुद्धिमत्तेची व समतोल विचार शक्तीची झालर लागली आहे.

त्यांच्या जीवनामध्ये राजकीय विचारांची वाढ एका विशिष्ट पद्धतीने झाली आहे. १९३० साली ते गांधीजींच्या सत्याग्रहाचे सैनिक होते. १९४० च्या आधीच मानवेंद्रनाथ रॉय यांच्या मानवतावादी आंतरराष्ट्रीय दृष्टिकोनाचा त्यांनी स्वीकार केला. १९५० नंतर राजकारणाचा समतोल त्यांनी साधला असे मला वाटते. पण ह्या सर्व कालखंडात त्यांची जीवनदृष्टी सुसूत्र अशीच राहिली. करुणा आणि मानवतावाद यांवर आधारलेली राष्ट्रीयता व वैचारिक क्रांतीची तितिक्षा, त्याचप्रमाणे सामाजिक व आर्थिक समतेसाठी मनात उठलेला कल्लोळ ही त्यांची वैशिष्ट्ये आहेत. विद्वत्तेमुळे कधी कधी येणारा एकांगीपणा शास्त्रीजींच्यामध्ये कधीच दिसला नाही. याचे कारण त्यांची बौद्धिक निष्ठा वैचारिक प्रामाणिकपणावर अवलंबून आहे. जे विचाराने स्वीकारले ते पडेल ती किंमत देऊन त्यांनी आचरिले आहे. आपल्या विचारासाठी त्यांनी अनंत कष्ट सोसले आहेत. १९३०-३२ च्या आंदोलनात भोगलेला कारागृहवास, रॉयवादाचा, अत्यंत कठीण काळात पुरस्कार करताना सहन करावी लागलेली अप्रियता त्यांनी आनंदाने सहन केली आहे. महात्मा जोतीराव फुले यांच्या वैचारिक क्रांतिकार्याची महनीयता महाराष्ट्राच्या बुद्धिमंतांना मानावयास लावण्यात त्यांचा महत्त्वाचा पुढाकार होता. ते आपल्या विचारांतील भिन्नता व्यक्त करतात; परंतु त्यात कटुता कधीच नसते.

गेली वीस वर्षे त्यांनी साहित्य-संस्कृती मंडळाचे अध्यक्ष व विश्वकोश कार्याचे प्रमुख संपादक म्हणून जे कार्य केले आहे ते मराठी भाषेच्या विकासाच्या इतिहासातील एक प्रमुख कार्य म्हणून गणले जाईल. विश्वकोश व साहित्य-संस्कृती मंडळाचे कार्य सुरू करावे असा निर्णय मी मुख्यमंत्री असताना महाराष्ट्र सरकारने घेतला, त्या वेळी हे काम कोणावर सोपवावे असा प्रश्नच माझ्यापुढे उभा राहिला नाही. कारण तेव्हा तर्कतीर्थांसारखी सुयोग्य व्यक्ती माझ्या नजरेपुढे उभी होती. आणि २० वर्षांनंतर मी मागे वळून पाहतो, तेव्हा ती एक अतिशय उचित अशीच गोष्ट झाली असे मला नेहमी वाटते. त्यांचे धर्मकोशाचे कार्य तर सर्व भारतीय विद्वानांना विदित आहे.

तर्कतीर्थ एक उत्तम गृहस्थी आहेत तसेच प्रेमळ मित्रही आहेत. त्यांच्या घरी अनेक वेळा जाण्याचा मला प्रसंग आला आहे. त्यांच्या कै. पत्नी हयात असताना त्यांच्या संसारातील आतिथ्यशील पाहुणचार मी अनेकदा घेतला आहे. ते गृहस्थी असले तरी त्यांचे मन खालच्या पातळीवर कधीच नसते. ते नेहमीच तत्त्वचिंतनात गर्क असलेले दिसतात.

शास्त्रीजींशी झालेले संभाषण म्हणजे एक बौद्धिक मेजवानीच असते. म्हणून अशी संधी मी वारंवार उपलब्ध करण्याचा प्रयत्न करतो. माझ्या या सवयीमुळे काही मंडळी ते माझे गुरू व मी त्यांचा शिष्य असे सुचविण्याचा प्रयत्न करीत असतात; परंतु त्यांचे माझे गुरुशिष्याचे नाते नाही; तर ते आहे एका थोर विद्वानाच्या चाहत्याचे व जिव्हाळयाच्या स्नेहाचे.

महाराष्ट्राला आज अभिमान व आनंद आहे की तर्कतीर्थांच्या कर्तृत्वाचा विद्वान आमच्यात अजून क्रियाशील आहे. आज आपल्या प्रिय पत्नीच्या निधनानंतर ते थोडेसे एकाकी वाटतात; परंतु त्यांनी आपले मन कामात व्यग्र ठेवले आहे आणि एका अर्थाने आपल्या गुरुदेवांसारखेच जीवन ते व्यतीत करीत आहेत असे वाटते. मी स्वतःला एका अर्थाने भाग्यशाली समजतो, की अशी तोलामोलाची विचारवंत व्यक्ती सहकारी व मित्र म्हणून मला लाभली. या मैत्रीबद्दल मी कृतज्ञ आहे.

**(नवभारत मासिक, फेब्रुवारी- मार्च, १९८१, पृ.४५ व ४६)**

○○○

# २२.
# प्राज्ञपाठशाळा आणि शास्त्रीजी
## ना. बा. मराठे

माणूस इतिहास घडवितो की इतिहास माणसाला घडवितो असा एक प्रश्न इतिहासतज्ज्ञांच्या समोर चर्चेला येत असतो. इतिहासतज्ज्ञांच्या वैचारिक प्रणालीला अनुसरून त्याची उलट सुलट उत्तरे दिलेली दिसतात. समर्थ मनुष्य आपल्या कर्तृत्वाने इतिहास घडवितो आणि ऐतिहासिक कार्यकारणभाव लक्षात घेऊन माणसाला त्याच्या कर्तृत्वाचे माप त्याच्या पदरात टाकता येते. मार्क्स, लेनिन, गांधी, नेहरू यांच्या कर्तृत्वाचे मूल्यमापन ऐतिहासिकदृष्ट्या करता येते. व्यक्तीचे अनुभवविश्व, विचारसामर्थ्य, कल्पनाशक्ती जितकी कार्यक्षम तेवढे यश त्या त्या व्यक्तीच्या पदरात टाकायला इतिहास कचरत नाही. संत ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, रामदास-तुकाराम यांसारखे प्रवृत्तिनिवृत्तीच्या मागे जाणारे संत-महंत किंवा आधुनिक काळातील लोकमान्य टिळकांपासून विनोबाजींपर्यंतचे कर्मयोगी यांनी आपापल्या परी स्वकर्तृत्वाने आपापल्या क्षेत्रांत एक निश्चित ठसा उमटवून इतिहासाला चालना देण्यात यश मिळविले आहे. अशा व्यक्तींनी इतिहास घडविला की ऐतिहासिक कार्यकारणभावानुरूप ही कर्तृत्ववान माणसे निपजली, याचा वाद तत्त्वज्ञांनी जरूर लढवावा. वस्तुस्थितीत फारसा फरक पडण्याची शक्यता नाही.

### प्राज्ञपाठशाळेच्या पार्श्वभूमीत

पंडित लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे व्यक्तिमत्त्व प्राज्ञपाठशाळेच्या पार्श्वभूमीवर तपासता, त्यांच्या विद्वत्तेचा व कर्तृवाचा एक वेगळाच प्रत्यय येऊन जातो. पंडित नारायणशास्त्री मराठे यांनी आपल्या गुरुवर्यांच्या- प्रज्ञानंदांच्या नावे प्राज्ञपाठशाळा सुरू केली, वाढवली, जोपासली. या प्राज्ञपाठशाळेचे लक्ष्मणशास्त्री हे विद्यार्थी. पंडित नारायणशास्त्री मराठे यांचे एकमेव नामवंत पट्टशिष्य! तर्कतीर्थांची पदवी परीक्षा देण्यासाठी काही काळ त्यांना बनारसला पं. वामाचरण भट्टाचार्य, लक्ष्मणशास्त्री द्रवीड यांसारख्या प्रख्यात नैयायिकांकडे पाठविण्यात आले होते. तेथून परत आल्यावर प्राज्ञ पाठशाळेत त्यांची अध्यापक म्हणून

नेमणूकही करण्यात आली होती. पंडित दिनकरशास्त्री कानडे, पंडित महादेवशास्त्री दिवेकर, पंडित भय्याशास्त्री वाटवे सारख्यांच्या सहवासात प्राज्ञ पाठशाळेचा व्याप वाढतच राहिला. प्राज्ञपाठशाळेतून बाहेर पडणारा विद्यार्थी समाजकार्यात रस घेणारा, राजकीयदृष्ट्या पुरोगामी विचारसरणीचा व धार्मिकदृष्ट्या सुधारक असा बाहेर पडावा, या दृष्टीने प्राज्ञपाठशाळेतील अभ्यासक्रम आखण्यात आला होता. पं. नारायणशास्त्री हे कडक शिस्तीचे, प्रखर विद्वत्तेचे अन् जाज्वल्य निष्ठेचे सुधारक विद्वान म्हणून महाराष्ट्राला त्या वेळी ज्ञात होते. याचसाठी अकोल्याला भरलेल्या ब्राह्मणसभेचे अध्यक्षस्थान त्यांचेकडे चालून आले होते. त्यांच्या परिवर्तनवादी विचारसरणीचा परिणाम त्यांच्या सर्वच शिष्यांवर पडला गेल्यास नवल कोणते? आधुनिक विद्यांचे शिक्षण घेतल्याशिवाय तरणोपाय नाही हे जाणून तत्कालीन कार्यकर्त्यांनी प्राज्ञपाठशाळेला माध्यमिक शिक्षणाची जोड देण्याचा उपक्रम सुरू केला. संस्कृत शिक्षणाबरोबर इंग्रजी शिक्षणाची व्यवस्था करण्यात आली. राष्ट्रीय शिक्षणाची शाळा म्हणून प्राज्ञपाठशाळेला महाराष्ट्रात मोठे नाव मिळाले. लक्ष्मणशास्त्री, भय्याशास्त्री, दिनकरशास्त्री यांसारख्या हिरिरीच्या तरुण अध्यापकांनी १९३२ च्या असहकार चळवळीत व सत्याग्रहात भाग घेतला. अशा तऱ्हेने शास्त्रीजींचा वैचारिक पिंड शास्त्रीय शिक्षणाबरोबर राजकीय व सामाजिक क्षेत्रातही हळूहळू वाढतच राहिला.

### पं. नारायणशास्त्री - केवलानंद- झाले

मात्र प्राज्ञपाठशाळेच्या कार्यात त्यामुळे थोडासा व्यत्यय आला. माध्यमिक शाळा बंद करावी लागली. पं. नारायणशास्त्री मराठे यांनी संन्यास घेतला; आणि सर्व जबाबदारी लक्ष्मणशास्त्री जोशी यांचेवर येऊन पडली. पण शास्त्रीजी कचरले नाहीत. त्यांनी प्राज्ञपाठशाळेचा संस्कृत शिक्षणाचा कार्यक्रम चालू ठेवला. विश्वस्त मंडळ स्थापन केले. धर्मकोशाचे सम्पादकपद स्वतःकडे घेतले. काही काळ धर्मकोश कार्यालय पुण्याला नेले आणि पुनः ते वाईला हलविण्यात आले, ते आजतागायत. १९६० पर्यंतचा काळ हा शास्त्रीबुवांच्या वैचारिक चिंतनाचा कालखंड समजला पाहिजे. कारण याच कालखंडात त्यांनी मूलगामी लेखन केले. विचारमंथनाला अधिक उजाळा मिळाला तो त्यांचा मानवेन्द्रनाथ रॉय यांचेशी जवळचा संबंध आल्यापासून. पूर्वी ‘आनंदमीमांसे’त रमणारे शास्त्रीजी आता 'जडवादा'चे स्वरूप उकलून दाखवू लागले. नागपूरच्या परांजपे व्याख्यानमालेतून ‘हिंदुधर्माची समीक्षा’ करून त्याचा विकास कसकसा होत गेला याचे विवेचन करू लागले. ‘वैदिक संस्कृतीचा विकास’ लिहून साहित्य अकादमी दिल्लीकडून ५०००/- रु. चे पारितोषिक मिळवले. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद देऊन महाराष्ट्राने त्यांना गौरविले. भारत सरकारने भारतीय घटनेचे संस्कृत रूपान्तर करण्यासाठी शास्त्रीजींची नेमणूक केली. आणि ‘पद्मविभूषण’ ही सन्माननीय पदवीही बहाल केली. महाराष्ट्र सरकारनेही त्यांची कदर करून महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे अध्यक्षपद

व विश्वकोशाचे मुख्य संपादकपद देऊन त्यांचा गौरव केला. स्वतः शास्त्रीजी अशा तऱ्हेने व्यक्तिगत उच्चांक गाठीत जातच होते. मात्र परिस्थितीवश प्राज्ञ पाठशाळेचे काय झाले? विद्यार्थी कमी कमी होत जात एक क्षण असा आला, की प्राज्ञपाठशाळेतील शिक्षणकार्य बंद झाले आणि स्वामीजींनी सुरू केलेला धर्मकोशही अतिमंद गतीने सुरू राहिला. पण त्याचबरोबर 'केवलानंद सरस्वती मंदिर' ही गुरूचं नाव कायम ठेवणारी वास्तू करून त्यांनी गुरूवरील निष्ठा अक्षर करून ठेवली. एवढेच काय, स्वामी केवलानंदांनी एक हाती लिहून ठेवलेला सात खंडात्मक 'मीमांसाकोश'ही शास्त्रीजींनी प्राज्ञपाठशाळेमार्फत प्रकाशित करून गुरुऋण फेडले. स्वामीजींनी अद्वैत सिद्धीचा केलेला मराठी अनुवादही प्रा. पा. शाळेमार्फत प्रकाशित करण्याचे श्रेय मिळविले.

## ग्रंथालये व शास्त्रीजी

प्राज्ञपाठशाळेच्या स्थापनेपासूनच विद्यार्थी व शिक्षक यांच्या उपयोगासाठी ग्रंथ जमा करण्याची योजना कार्यान्वित झाली होती. प्राज्ञ पाठशाळा प्रचारक जेथे जेथे जात, तेथून यासाठी पुस्तके, पोथ्या गोळा करीत असत. गेल्या साठ सत्तर वर्षांत संस्कृत-इंग्रजी-हिन्दी-मराठी ग्रंथांचा फार मोठा संग्रह जमा झाला आहे. संस्कृत पोथ्यांचा एक कॅटलॉगही प्रसिद्ध करण्यात आला आहे. विश्वकोशाचे कार्यालय वाईला आल्यापासून त्याचेही एक भव्य व सुसज्ज ग्रंथालय गंगापुरीत तयार झाले आहे. वाईसारख्या ठिकाणी टिळक सार्वजनिक वाचनालय हे एकच ग्रंथ-वाचनालय उपलब्ध होते, पण आता प्रा.पा. शाळा ग्रंथालय विश्वकोश ग्रंथालय व वाई कॉलेज ग्रंथालय अशा तीन ग्रंथालयांनी वाईचे वैचारिक वातावरण समृद्ध केले आहे. पण याचे सारे श्रेय पंडित लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या मध्यवर्ती नेतृत्वालाच द्यावयाला हवे. कारण प्राज्ञ पाठशाळेचे नेतृत्व करता करतानाच विश्वकोशाची मुहूर्तमेढ त्यांनी लावली आणि वाईचे जीवन सांस्कृतिकदृष्ट्या संपन्न करण्यास वाईला कॉलेज स्थापन करून ते भरभराटीस आणण्यासही त्यांचेच नेतृत्व कारणी लागले आहे.

## 'नवभारत'

शास्त्रीजींच्या बहुविध कर्तृत्वाची विविध अंगे त्याच प्राज्ञ पाठशाळा भूमीवर स्थिर पाय रोवून विविध स्वरूपांत अवतीर्ण झाली आहेत. एके काळी 'आशा-चित्रा' साप्ताहिकाचे सम्पादन शास्त्रीजींनी केले होते. रॅडिकल ह्युमॅनिस्टच्या सम्पादक मण्डळात त्यांचे नांव होते. 'क्वेस्ट'मध्येही त्यांचे नाव गोवले गेले होते. परंतु 'नवभारत' त्यांनी प्राज्ञ पाठशाळेमार्फत चालवायला घेतल्यापासून ‘नवभारत’ मासिकाने साहित्यिक व सांस्कृतिक विषयांचे सर्वांगीण आलोडन करणारे दर्जेदार मासिक म्हणून नाव कमावले. याची सारी प्रेरणा स्वतः शास्त्रीजींचीच आहे.

## प्राज्ञप्रेस

धर्माच्या कार्यासाठी म्हणून सुरू केलेला प्राज्ञप्रेस हे शास्त्रीजींच्या प्रेरणेचे आणखी एक प्रमुख अंग. वस्तुतः प्राज्ञ पाठशाळेचा आणि प्रेसचा कोणताही तसा संबंध नव्हता.

परंतु द्वितीय महायुद्ध सुरू झाल्यापासून जीवनाच्या कक्षा रुंदावत चालल्या, हे लक्षात आल्याबरोबर केव्हा ना केव्हा या संस्कृत शिक्षणाला बंद करावे लागेल याचा अंदाज त्यांना लागला होता; आणि धर्मकोशाचे मुद्रण इतर प्रेसकडून करून घेणे दिवसेंदिवस दुष्कर होत चालले आहे याची जाणीव झाल्याबरोबर स्वतःचे मुद्रणालय हेच त्याचे प्रत्यक्ष उत्तर होते अन् ते त्यांनी प्रत्यक्षात आणले. प्राज्ञप्रेसचे सुरुवातीपासून काम पाहणारी अत्यंत विश्वासू मंडळी त्यांना मिळत गेली, म्हणूनच प्राज्ञप्रेस आपल्या भक्कम पायावर उभा राहण्यास समर्थ ठरला. या कार्यी कै. मधुकर साठे यांचे नाव नमूद केल्याशिवाय पुढे जाता येणार नाही. स्वतःचा प्रेस झाल्यामुळेच शास्त्रीजींना प्राज्ञ पाठशाळेची प्राज्ञप्रकाशने सुरू करता आली. 'नवभारत'मधून एखादी लेखमाला प्रसिद्ध करून मान्यवान लेखकाला समाजात मानमान्यता मिळवून देण्याचा उपक्रम यामुळेच त्यांना सुरू करता आला. नवभारत वा प्राज्ञप्रेस याचे कार्य हाती घेण्यात समाजाची प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सेवा करणे हा स्तुत्य हेतूच होता, हे काळाच्या ओघात सिद्ध झाले आहे.

**हातकागद कारखाना**

प्रेसचा व्याप उघडल्यानंतर साहजिकच त्यांचे कागदाकडे लक्ष गेले. गंगापुरीच्या घाटावरील मुरलीधर मंदिराची प्रशस्त जागा प्रा.पा.शाळेला आंदण मिळाली होती. तिचा कागद कारखाना काढण्यास उपयोग करण्यात आला. मात्र हा कागद कारखाना जितका किफायतशीर व्हायला हवा होता तितका होऊ शकला नाही. त्याची कारणे वेगळी असू शकतील. कागद कारखाना हा स्मॉल स्केल इंडस्ट्रीजच्या धर्तीवर चालवून वेगळ्या धर्तीवर चालवला असता तर तोही अत्यंत किफायतशीरपणे चालू शकला असता. शास्त्रीजी असहकार चळवळीत गेल्यापासून देशी वस्तूंचा वापर करणे, खादीचा वापर करणे हे त्यांचे अंगी जणू बाणूनच गेले. गेली ४०/५० वर्षे शास्त्रीजी स्वतः पूर्ण खादीधारी आहेत. स्वतः स्वामी केवलानंदही पूर्ण खादीधारी होते. त्यांचे भोवती प्राज्ञ पाठशाळेची धुरा वाहाणारे कै. शं. वि. लेले, श्री. विठ्ठलशास्त्री जोशी, कै. शंकरराव जोशी, कै. वासुनाना कोनकर, कै. नाना खरे, पं. रंगनाथशास्त्री जोशी हे सारे खादीधारी होते वा आहेत. प्राज्ञ पाठशाळेतून उत्तीर्ण होऊन गेलेले प्रायः सारे विद्यार्थी खादीभक्त आहेत असे विधान केले तर ते अतिशयोक्तीचे होणार नाही. या स्वदेशी चळवळीतूनच राष्ट्रीय वृत्तीची व समाजकार्य करण्याची इच्छा असलेली तळमळीची माणसे प्राज्ञ पाठशाळेने निर्माण केली. शास्त्रीजी हे त्या वृत्तीचे अध्वर्यू होते. मात्र त्यांचे कार्यक्षेत्र केवळ प्राज्ञ पाठशाळा एवढ्यापुरतेच मर्यादित न ठेवता त्या सामाजिक-राजकीय कार्याचा व्याप त्यांनी महाराष्ट्रभर वाढविला. समर्थ रामदास स्वामी हे छत्रपती शिवाजीचे गुरू झाले तर महाराष्ट्राचे एके काळचे मुख्यमंत्री व नंतरचे जबाबदार केन्द्रीय मंत्री झालेले श्री. यशवंतराव चव्हाण यांनी पंडित लक्ष्मणशास्त्री जोशी यांना गुरुपदी मानले. महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून तर्कतीर्थांनी लोकशाही, मानवतावाद,

भारतीय संस्कृती यांसारख्या विषयांवर गेली सतत पन्नास वर्षे समाजहित लोकांसमोर मांडले. एखादा भाऊशास्त्र्यांनी गणपतीआळीच्या घाटावरील व्याख्यानांतून शास्त्री यांच्या प्रगतिवादी विचारसरणीवर जोराची टीका केली असली किंवा आचार्य अत्रे यांनी तर्कतीर्थांना 'नरकतीर्थ' म्हणून हिणवले असले तरी त्याचा समाजातील कोणत्याही थराने विशेष रूपात स्वीकार केलेला नाही.

**समग्र ग्रंथ**

खऱ्या अर्थाने तर्कतीर्थ हे महाराष्ट्राचे गुरू आहेत. वयाच्या सोळाव्या वर्षापासून ८०व्या वर्षापर्यंत त्यांनी समाजाचे बौद्धिक नेतृत्व केले आहे. बंगालसारखा प्रदेश अशा पुरुषांना डोक्यावर घेऊन नाचला असता, पण तुलनात्मकदृष्ट्या महाराष्ट्र पुरुषगुण विज्ञानविमुखच म्हटला पाहिजे. बंगालमधील अशा गुणी लोकांच्या समग्र ग्रंथांचे संकलन करून ते सर्व लोकांना उपलब्ध करून ठेवण्याची प्रकाशकांना व लोकांनाही सवय आहे. रवीन्द्रनाथ टागोर, अरविंद घोष, शरच्चन्द्र चॅटर्जी, बंकिमचन्द्र यांसारख्या कित्येक समाजहितैषींच्या समग्ररचनावली बंगालमध्ये मिळू शकतात. महाराष्ट्राकडे तोंड वळवून बघायला लागलो तर? वीर सावरकर समग्रग्रंथ निघाले ते केवळ श्री. शं. रा. दाते यांचे वैयक्तिक प्रयत्नामुळे! परोपरी हिंडून बिचाऱ्यांना त्यांची विक्री करावी लागली. न. चिं. केळकर एवढे साहित्य- सम्राट! त्यांचे समग्रग्रंथ १० खंडांत निघाले; पण त्यांना म्हणावे तितके प्रोत्साहन महाराष्ट्रात मिळाले नाही. गेल्या पंचवीस वर्षांत अशी समग्ररचनावली मराठीतून निघाल्याचे ऐकिवात नाही. मराठी भाषा, साहित्य वा वाङ्मय समृद्ध करावयाचे तर अशा नेतृत्व करणाऱ्या धुरीणांचे विविध जागी विखुरलेले लिखाण एकत्र उपलब्ध करून पुढील पिढीसाठी जतन करून ठेवणे हे समाजाचे उद्दिष्ट असायला हवे. मागच्या पिढीने काय सांगितले अन् आज काय हवे आहे याची तुलना करायची तर तसे वाङ्मय उपलब्ध करून देणे हे सामाजिक कर्तव्य आहे. तशी जाणीव व जरुरी महाराष्ट्राला अजून शिवलेली दिसत नाही. तर्कतीर्थांनी तसे फुटकळ लिखाण इतके भरपूर केले आहे की त्याची एक 'लेखसूची' करणेही सुलभ नाही. दाते ग्रंथसूची मंडळाने 'कालिक लेख सूची'चा प्रकल्प हाती घेऊन मराठी वाङ्मयावर फार मोठा उपकार करून ठेवला आहे. त्याच्या आधारे मूळ लेख शोधून त्याची मुद्रण तयार करणे हेही एक जटिल काम आहे. ते सारे लेख एकत्रित करून विषयवार विभागणी करून त्यांचे समग्र ग्रंथासाठी सम्पादन करणे हेही एक महत्त्वाचे काम जसे आहे तसे त्याने प्रकाशन-मुद्रण-वितरण आदी साऱ्या समस्या विचारात घेण्यासारख्या असल्या तरी त्यांचे निवारण करणे अत्यंत आवश्यक आहे.*

---

*य. गो. जोशी : व्यक्ति व कार्य, ज्ञानकोशकार केतकर, र. वा. दिघे यांसारख्या विषयांवर पीएच. डी. चे प्रबंध तयार झाले; मग समग्र ग्रंथ प्रकाशित करण्यास महाराष्ट्रीय प्रकाशक का पुढे येत नाहीत?

## शिष्यपरंपरा तयार केली नाही

प्रज्ञानंदांनी केवलानंदासारखे निस्सीम शिष्य तयार केले तर स्वामी केवलानंदानी तर्कतीर्थ हे शिष्योत्तम तयार करून ऋषिऋण फेडले. पण तर्कतीर्थांचे पट्टशिष्य कोण म्हणून पाहू गेल्यास कुणी नजरेस पडत नाही. प्राचीन काळी शिष्यपरंपरा कायम राहावी म्हणून बुद्धिपुरःसर प्रयत्न केले जात असत. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात तिचा लोप झालेला दिसत आहे. तर्कतीर्थांनी प्रत्यक्ष फारच थोड्या विद्यार्थ्यांना पाठ दिले असतील. त्या थोड्या विद्यार्थ्यांत प्रस्तुत लेखकाचा समावेश करायला हवा. शास्त्रीबुवांनी आमचे शांकरभाष्याचे पाठ पुरे करायचे म्हणून सोलापूरला आम्हाला बरोबर नेले आणि सकाळच्या वेळी शांकरभाष्याचे पाठ दिले आणि संध्याकाळी 'लोकशाही' या विषयावरची जाहीर प्रवचने दिली. त्यांचेही जणू पाठच आम्हाला मिळाले... ते आमचं भाग्य समजायला हवं...

खरे म्हणजे शिष्यांचा लोंढा आपल्यामागे ठेवण्यासारखा गेल्या पन्नास वर्षांचा कालखंडच नव्हता. ज्या सनातनी पद्धतीत व सनातनी शिस्तीत त्यांचा पहिल्या पंचवीस वर्षांचा काळ गेला, ती सामाजिक परिस्थिती इतक्या झपाट्याने बदलत राहिली तसे तेही बदलत राहिले. हा बदल ‘सुखाय की दुःखाय’ हे ठरविण्याचे काम पुढील पिढीतील सामाजिक परिस्थितीचा इतिहास लिहिणाऱ्या तज्ज्ञांसाठी शिल्लक ठेवलेले बरे!

## पुंजी केली नाही

शैक्षणिक कार्य करणाऱ्या महाराष्ट्रातील व्यक्तींकडे पाहिले तर त्यांनी कुठे ना कुठे स्वतःचा बंगला, घर, फ्लॅट किंवा अपार्टमेंट थाटल्याचे दृश्य दिसते. मात्र लक्ष्मणशास्त्रीजींच्या जीवनाकडे त्रयस्थ दृष्टीने पाहिल्यास त्यांना अशा स्वतंत्र वास्तूची जरूर भासली असे दिसत नाही. केवलानंदांनी प्राज्ञमठाची प्राज्ञपाठशाळा घडवली तर त्या पाठशाळेतील माधुकरी मठाचे शास्त्रीबुवांनी अभ्यागतगृहात रूपांतर केले. विश्वकोशाच्या कार्यासाठी येणाऱ्या अभ्यागत- संपादकांचे राहाणे, जेवणे आदींची सोय करणे परिस्थितीवश आवश्यकच होते. स्वतःसाठी अगदी एक लहानशी जागा राखून ठेवून इतर भागात अभ्यासिका व खाजगी ग्रंथसंग्रह ठेवून दिला. मनात असते तर शास्त्रीबुवांना एखादा लहानसा बंगला बांधणे अशक्य नव्हते. त्यांच्या सुशील व सुविद्य पत्नीनेही तसा आग्रह कधी धरला नाही. येणाऱ्या जाणाऱ्या अभ्यागतांचे आदरातिथ्य करण्यात तिने स्वतःचे 'सती' हे नाव सार्थ केले, अन् अकस्मात एक दिवस शास्त्रीजींना मागे एकटे ठेवून स्वतःचा कारभार संपवून टाकला. शास्त्रीजींच्या जीवनात स्वामीजी गेले तो पहिला शोक, दुसरा मधुकर साठे याने दिला आणि तिसरा धक्का ‘सत्यवती’बाईंनी दिला. मग आता कुणासाठी करावयाचा आहे तो बंगला अन् घर?

जीवनात मिळालेले हे धक्के सहन करण्याची ताकद त्यांचेजवळ आहे. वयाची ८० वर्षे कशी नकळत निघून गेली हे त्यांचे त्यांनाच कळत नाही. वयाला ७५ वर्षे झाल्यावर वाईकरांनी त्यांचा एक भव्य सत्कार समारंभ घडवून आणला. आपल्या समारंभातील

भाषणात वाईकरांना त्यांनी दिलासा दिला होता की 'मी जरूर आत्मचरित्र लिहिण्याचा प्रयत्न करीन'- मात्र त्याला अजून हात लागला नसावा अशी माझी समजूत आहे.

### विविध समारंभ

पाठशाळेत दर वर्षी सरस्वत्युत्सव व गुरू प्रज्ञानंदांची पुण्यतिथी करण्याचा परिपाठ गेली साठ- सत्तर वर्षे अव्याहत चालू आहे. वाईकरांना ती एक अपूर्व मेजवानी असते. दोन-तीन दिवस महाराष्ट्रातील नामवंत विद्वानांना बोलावून प्रचलित विषयावर व्याख्याने केली जातात. या व्याख्यानांना आमंत्रण न मिळालेला विद्वान महाराष्ट्रात क्वचितच असेल. शास्त्रीबुवा स्वतः व्याख्याने द्यावयाला उभ्या महाराष्ट्रात जात; त्या वेळी त्या भागातील विद्वानांना हेरून खास आमंत्रण देऊन त्यांचा सत्कार करणे हाही त्यामागील हेतू असावा. स्वतः विद्वान असणे आणि विद्वान माणसांचा चाहता असणे या दोन्ही दुर्लभ गोष्टी शास्त्रीजींमध्ये पाहावयास मिळतात. गुरुवर्य केवलानंदांना ७५ वर्षे पूर्ण झाल्यावरही शास्त्रीजींनी न्यायमूर्ती गजेंद्रगडकरांना खास बोलावून गुरूंचा भव्य सत्कार समारंभ आयोजित करून आणला होता. एवढेच काय, त्या वेळी स्वामी केवलानंद गौरव ग्रंथही प्रकाशित करण्यात पुढाकार घेतला होता. १९७७ साली ब्रह्मीभूत केवलानंदांची शताब्दी साजरी करण्यासही शास्त्रीजींनी पुढाकार घेतला. असल्या क्षणी त्यांची गुरुभक्ती उचंबळून आलेली लक्षात भरते.

### मराठी माध्यमामुळे मर्यादा

तर्कतीर्थांना रॉयिस्टांच्या मेळाव्यात नेहमीच अग्रस्थान मिळालेले आहे. स्वतः एम. एन. रॉय, एलेन रॉय, बॅ. तारकुंडे, व. भ. कर्णिक, अ. भि. शहा आदी त्यांना फार मानतात. रॉयिस्ट पक्षाचे विसर्जन करण्याचा ठराव कलकत्ता अधिवेशनात करण्यात आला, त्या अधिवेशनाचे अध्यक्षस्थान तर्कतीर्थांनीच भूषविले होते. रॉयिस्ट पक्ष जन्माला आल्यापासून त्याच्या विसर्जनापर्यंत शास्त्रीजी त्या पक्षाशी एकनिष्ठ राहिले. इंग्रजीतून सम्भाषण करण्याचे कौशल्य शास्त्रीजींनी कित्येक वर्षे आत्मसात केले आहे. इंग्रजी ग्रंथांचे वाचन-मनन तर सारखे चालूच असते. मार्क्सचा विरोधविकासवाद मोठमोठ्या राजकीय पुढाऱ्यांना विशद करून सांगण्याचे चातुर्य त्यांनी अनेक वेळा प्रकट केले आहे. हिंदीच्या आधारे आपले म्हणणे हिंदी व्यक्तीसमोर मांडण्याची तत्परता शास्त्रीजी नेहमीच दाखवतात. संस्कृतमधून चर्चा झाली तर त्यात त्यांना कधीच अडचण पडली नाही. कारण प्राथमिक शिक्षणानंतर सारी घटपटादी चर्चा संस्कृतच्याच आधारे झाल्याने त्या माध्यमाचा त्यांना पुरेपूर फायदा घेता येतो. एवढे सारे असले तरी त्यांचे प्रायः सारे लेखन मराठी माध्यमातूनच झाले असल्याने महाराष्ट्राबाहेर एका ठरावीक राजकीय पक्षाखेरीज शास्त्रीजींचे नाव पोहोचलेले दिसत नाही. डॉ. नगेन्द्रांच्या रसचर्चेवर त्यांनी मूलभूत समीक्षण केले ते मराठीतून. हिंदीपेक्षा साहित्यशास्त्रावर मराठीमध्ये खूपच लिखाण झाले आहे, पण ते हिंदी अभ्यासकांच्या आवाक्याबाहेरचे असते. इंग्रजी माध्यमवाले इतर भाषांतून आलेल्या

अभिजात वाङ्मयाकडेही दुर्लक्षच करतात. तीच गत त्या त्या भारतीय भाषांमधूनच रेंगाळणाऱ्या पंडितांची !

**गौरव ग्रंथ**

म्हणून मला या निमित्ताने शास्त्रीबुवांच्या चाहत्यांना असे सुचवावेसे वाटते की 'Tarkateerth: The Man And His Work' असा इंग्रजीतूनच एक मोनोग्राफ तयार करून त्यांच्या कार्याचा गौरवग्रंथरूपात तो प्रसिद्ध करावा. एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्राचा कायापालट करण्यास ज्यांनी जीवापाड प्रयत्न केले, अशा न्या. तेलंग, रानडे आदी समाजसुधारकांची इत्थंभूत माहिती देणारे ग्रंथ इंग्रजीतून उपलब्ध करून देण्याची खबरदारी त्यांच्या चाहत्यांनी घेतली. कॉ. रॉय, डी. डी. कोसंबी, जी. डी. पारीखसारख्या तत्त्वज्ञांची माहितीही आता इंग्रजी माध्यमाद्वारे अभ्यासकांपुढे आली आहे. महाराष्ट्राचे आधुनिक काळातील एक श्रेष्ठ तत्त्वज्ञ म्हणून शास्त्रीजींचा लौकिक आहे. त्याची माहिती इंग्रजी माध्यमाद्वारे सर्व भारतवासीयांना वा भारताबाहेरही असणे इष्ट आहे; ते काम करणे हे त्यांच्या चाहत्यांनी स्वतः होऊन अंगावर घेऊन पुरे करावे.

**(नवभारत मासिक, फेब्रुवारी- मार्च १९८१, पृ. १ ते ५)**

❍❍❍

२३.

# महाराष्ट्रातील प्रबोधनाची चळवळ व शास्त्रीजी

## रा. ना. चव्हाण

गेल्या शतकाच्या प्रारंभापासून चालू झालेले प्रबोधन प्रथमतः सामाजिक व त्यानंतर राजकीय होते. ज्ञानेश्वर-तुकारामादी संतांनी समाज प्रबोधनाची पारमार्थिक चळवळ केली व ती खेड्या-पाड्यांपर्यंतही पोहोचली होती ह्याची साक्ष आजही पटते. इंग्रजी पाश्चात्त्य राज्य आले व गेले, तरी संतांचा प्रभाव आहेच. ख्रिस्ती मिशनऱ्यांना जनमानसावरील संतांची पकड ढिली करिता आली नाही. उलट रेव्हरंट ॲबट, रेव्हरंट जे. एफ. एडवर्ड्स, रेव्हरंट टिळक वगैरे अनेक ख्रिस्ती विचारवंत भक्त मराठी संतांच्या वाङ्मयाचे अभ्यासक झाले. तुकाराम व त्याचे अभंग यांच्याकडे रेव्ह. मरे मिचेल यांचे सन १८६० च्या आधीच प्रथम लक्ष गेले होते. वरील विद्वानांच्याप्रमाणे मिचेल ख्रिस्ती धर्मप्रसाराच्या आवडीमुळे झपाटला होता. तरी त्याच्या चिकित्सक मनाला तुकारामाने मोहिनी घातली व कितीतरी अभंगांची त्याने सुलभ इंग्रजीत भाषांतरे केलेली आढळतात. महाराष्ट्रातील प्रबोधकांनी ख्रिस्ती मिशनरी मंडळीपासून स्फूर्ती घेतली, असे म्हटले गेले, ते अव्वल इंग्रजीतील परिस्थितीला धरूनही होते. पण तुकारामादी भागवतधर्मी संतांपासूनही त्यांनी प्रेरणा घेतल्या होत्या, ही बाब नजरेआड झाली. प्रो. विल्सन, सर विल्यम जोन्स, नेब्जिट, स्टीव्हन्सन, अलेक्झाण्डर डफ वगैरे अभ्यासू, विद्वान गौरकाय विवेकवंतांनी हिंदुस्थानात येऊन भारतीय दर्शनांचाही अभ्यास केला, व त्यावर टीका लिहिल्या. मॅक्समुल्लर तर महत्त्वाचे झाले. ह्यासारख्या परकीय पंडितांचे ग्रंथ राममोहन राय, दादोबा पांडुरंग आदीकरून पहिल्या सुधारकांच्या वाचनात आले. फार काय वरील युरोपीय पंडितांचे ग्रंथ प्राकृत लोकांचे पुढारी जोतीराव यांच्यापर्यंत पोहोचले होते; फुल्यांचे लेखन ह्याची साक्ष देते. अव्वल इंग्रजीत पाश्चात्त्य संस्कृती, इंग्रजी विद्या, साहित्य, इतिहास, विज्ञान यांची व भारतीय संस्कृतीची गाठ पडली; व आदान-प्रदान चालू झाले. पूर्वी चार वेद, सहा शास्त्रे व अठरा पुराणे ह्यांवरच अटळपणे विचार झाला. राममोहन व दादोबा पांडुरंग हे संस्कृतपंडित होते व त्यांनी इंग्रजीच्या नव्या

अभ्यासाबरोबर वेदान्ताचा अभ्यास केला होता; इतरही शास्त्रे त्यांनी अभ्यासली होती जे प्रबोधन आविष्कारित झाले त्याला पाश्चात्त्य व स्थानिक पौर्वात्य दोन्हीही प्रेरणा होत्या. फ्रेंच राज्यक्रांती, अमेरिकेतील निग्रोविमोचन वगैरे राजकीय घटनांतून समतेचे व समान हक्काचे विचार इकडे आले. येथेही समतेच्या विचारांची बीजे होती. 'मानवधर्मशास्त्र' नामक जातिवर्ण समतेचा पुरस्कार करणारे छोटे संस्कृत काव्य राममोहन व दादोबा पांडुरंग यांच्यासारख्या सुशिक्षितांना उपलब्ध होते. महाराष्ट्रात तुकाराम उपलब्ध होता तसा उत्तरेत कबीर प्रसिद्ध होता. एकोणिसाव्या शतकापूर्वीपासून इंग्रजांनी भारत जिंकित आणला होता; व इ. स. १८४८ साली, मराठेशाही सर्वथा बुडाली. देश परकीयांच्या अंकित का झाला? याची धार्मिक व सामाजिक आणि राजकीय कारणेदेखील पुनरुत्थानासाठी आत्मपरीक्षणाने जबाबदार विचारवंत शोधू लागले. इंग्रजी राज्य व बुडालेली देशी राज्ये यांची तुलना होऊ लागली. मिशनऱ्यांची विद्याप्रसारादी लोकसेवेची कार्ये व येथील धर्मातील पुरोहितांची वागणूक यांच्यातील फरक दिसू लागले; ख्रिस्ती मिशनरी धर्मप्रसाराच्या मिषाने हिंदुधर्माला नावे ठेवून त्यावर आक्रमण करू लागले. ह्यातूनही सर्वांगीण पुनरुत्थानाच्या प्रथम सामाजिक व धार्मिक (Socio Religous) आणि नंतर राजकीय चळवळी चालू झाल्या; ह्याला क्रियाशील विवेकावंतांची प्रज्ञादेखील कारणीभूत होती. प्रज्ञेला जनजागरणाच्या प्रक्रियेत मूलभूत स्थान असू शकते. उदा. वेद व वेदांत यापासून राममोहन रॉय आदीकरून प्रबोधकांनी प्रेरणा घेतल्या होत्या; त्या भारतीय होत्या.

## प्रबोधन व तर्कतीर्थ

पुढे तर्कतीर्थांच्या जन्माच्या वेळी विसावे शतक चालू झाले होते. त्यांच्यावर झालेल्या संस्कारांत त्यांच्या वडिलांचे व घरातील संस्कार महत्त्वाचे होते. त्यांच्या काळात आजच्याएवढा घरीदारी संस्कारांचा लोप नव्हता. दादोबा पांडुरंग, लोकहितवादी व पुढील रानडे-भाण्डारकर यांच्या लहानपणी स्वधर्माचे शिक्षण त्यांना एकत्र कुटुंबीय पद्धतीतच मिळे. इंग्रजी विद्येमुळे देशी संस्कार पुढे उत्तरोत्तर लोप पावू लागले. ही स्थिती प्राज्ञपाठशाळा चालू करणारे श्री. नारायणशास्त्री मराठे व त्यांच्या साहाय्यकांच्या लक्षात आली. संस्कारांचा लोप होत आहे व जुन्याची जागा धड नवेही घेत नाही व धर्मनीती पराङ्मुख नवी पिढी होत आहे, ही बाब रानडे-मोडक यांच्यासारख्या देशकल्याणेच्छूंच्याही मागे लक्षात आली होती; भारतीय देशाभिमानात स्वधर्माभिमानाचा समावेश होत आला आहे. वैदिक संस्कृती लोप पावू नये, संस्कृत विद्या टिकावी व वाढावी म्हणून तर वाई क्षेत्री प्राज्ञपाठशाळा चालू करण्यात आली होती. विशेषतः गुरू नारायणशास्त्री यांच्याजवळ व त्यांनी चालविलेल्या वसतिगृहयुक्त संस्कृत प्रशाळेत शास्त्रीजी विद्या शिकले. काशीला जाऊन तर्कतीर्थ झाले. तर्कतीर्थ म्हणजे लक्ष्मणशात्री व लक्ष्मणशास्त्री म्हणजे तर्कतीर्थ असा आता अर्थ आहे. वेदादी भारतीय विद्यांत त्यांनी चांगली प्रगाढता कमाविली हा त्यांच्या जीवनातील पाया

आहे. नारायणशास्त्री त्यांचे गुरू होते एवढेच नव्हे, तर ते व प्राज्ञपाठशाळा हा तर्कतीर्थांच्या जीवनाचा पाया झाला; ह्यावर तर्कतीर्थांनी व्यापक ज्ञानमंदिर उभारले.

तर्कतीर्थांच्या काळात व आगेमागे देशात अनेक पंडित व तर्कतीर्थ पदवी घेतलेले शास्त्री पंडित होते. पण फारच थोड्या शास्त्री पंडितांनी पाश्चिमात्य इंग्रजी भाषा व हिंदुधर्माशिवाय इतर सर्व धर्मांचे अध्ययन केले होते. राजा राममोहन रॉय यांच्या वेळेसही त्यांच्याबरोबर बौद्धिक सामना देणारे शास्त्री पंडित देशी शास्त्र शिकलेलेच प्रायः असत. विशेषतः इंग्रजी व इतर पाश्चात्त्य भाषा व धर्म यांचे अध्ययन राममोहन यांनी नंतर मोठे झाल्यावर केले. नाहीतर ते प्रथम मुख्यतः संस्कृत पंडितच होते. ह्याच क्रमाने तर्कतीर्थांनी प्रौढ वयात इंग्रजीचे ज्ञान करून घेतले; ह्यामुळे त्यांचे एकदेशीयत्व हरपले. धर्म व तत्त्वज्ञान हा तर्कतीर्थांचा आवडीचा विषय. इंग्रजीचे ज्ञान झाल्यावर त्यांनी मार्क्सवादावरील ग्रंथ आत्मसात केले. ज्ञानाबरोबर विज्ञानाची महती त्यांना कळून आली. लोकहितवादी, रानडे-भाण्डारकर, आगरकर-टिळक-चिपळूणकर व फुले यांनाही वाघिणीचे दूध प्राशन करण्यास मिळाले नसते व त्यांचा जन्म व हयात मागेच पेशवाईतील असती, तर ते प्रबोधक झालेच नसते! ह्या काळात समाजप्रबोधनाचा अर्थात मागमूसही नव्हता. पहिल्या परिच्छेदात समाजप्रबोधन आविष्कारित होण्याची जी देशी व विदेशी कारणे द्यावी लागली त्यांचे संदर्भ तर्कतीर्थांच्या जीवनाशी पुढे निगडित होतात. जे प्रबोधन झाले व त्यात थोर थोर व्यक्ती होऊन गेल्या, त्यांच्या चरित्रांचा व विचारांचा अर्थ लेखी व तोंडी सांगणाऱ्यांत लोकशिक्षक तर्कतीर्थ अग्रेसर आहेत. नाहीतर समाजप्रबोधनाचा व मोठमोठ्या प्रबोधक सुधारकांचा विपर्यास करणारे शास्त्रीपंडित देशात व महाराष्ट्रातही मुबलक होते. फार काय ज्या वाईत तर्कतीर्थांची उभी हयात गेली त्या वाई क्षेत्रीदेखील कमी नव्हते. "धर्म" मासिकाचे मागील अंक वाचणाऱ्यांच्या लक्षात ही बाब चटकन चांगली येऊ शकते. तत्त्वनिष्ठ परिवर्तनवादाचाही त्या वेळी मागमूस नव्हता. शास्त्र-वचन प्रमाण व ईश्वरीय मानून शास्त्रीपंडित धर्मनिर्णय घेत. ज्या वाईत 'धर्म' मासिकाचे संपादक कै. विद्वत्रत्न भाऊशास्त्री लेले होऊन गेले; त्याच वाईतून परिवर्तनवादाचा पाठपुरावा करणारे तर्कतीर्थही गाजले. संस्कृत प्रकांड पंडित असूनही सोपे, सुलभ व ओघवते मराठी लिहिणारे भाऊशास्त्री यांनी सत्यनारायणाची पोथी अगदी अलीकडची आहे, असे जाहीर केले होते. धर्माचा विचार करताना त्यांनी अशी काही धक्कादायक सत्येही सांगितली होती. भाऊशास्त्र्यांच्या वेळची वाई आता इतिहासजमा आहे. गेल्या पन्नाससाठ वर्षांत खुद्द तर्कतीर्थांच्या हयातीत वाईत, महाराष्ट्रात व देशात विलक्षण पालट झाला. काळाचा स्वभावच परिवर्तनीय असतो. जाणते पंडित हे जाणतात. वाईच्या 'धर्म' मासिकाचे संपादक निबंधमालेच्या परंपरेतील होते. सगळ्या नवमतांना व नवीन सुधारणांना त्यांनी शास्त्रवचनाद्वारे विरोध केला. पण ह्या नाही त्या क्षेत्रातील नवीनता कोणालाही पत्करावी लागते. नियतकालिके काढण्याची, छापण्याची वगैरे कला पश्चिमेकडून

इकडे आली होती; व भारतातील पहिल्या ख्रिस्ती मिशनऱ्यांनी पहिली वृत्तपत्रे काढली होती. चिपळूणकरांनी व त्यांच्या परंपरेने स्वधर्म, स्वदेश, स्वभाषा यांच्या अभिमानातून का होईना वरील प्रकाराचे अनुकरण केले होतेच; स्थापित राजवटीला कोणासही थोडेफार परिस्थितीनुसार धरूनही चालणे अटळ होते. वरील 'धर्म' व 'निबंधमाले'ची उदाहरणे मी येथे फक्त नमुन्यासाठी घेतली आहेत. त्यांच्या संपादकांचा देशाभिमान व लेखणीच्याद्वारे अव्वल इंग्रजीत त्यांनी परकीय सत्तेशी दिलेली 'झुंज' दृष्टिआड करावयाची नाही. फक्त परंपरेप्रमाणे धर्माच्या बाबतीतच अपरिवर्तनीय पद्धतीचा जो त्यांनी पुरस्कार केला व समाजप्रबोधनाला अडविण्याचा यत्न केला, तो खुद्द धर्माच्या परिवर्तनशील स्वभावानुसारही यशस्वी होण्यासारखा नव्हता. कै. श्री. वामन आबाजी मोडक यांची कीर्तने, कविता वगैरेंच्या संग्रहाला १९४८ च्या पूर्वी तर्कतीर्थांनी विस्तृत प्रस्तावना दिलेली उपलब्ध आहे, व ह्या विवेचक प्रस्तावनेत शास्त्रीजींनी लिहिले आहे, की ते स्वत: राममोहन, रानडे, लोकहितवादी- फुले यांच्या परंपरेतील आहेत. ही परंपरा धर्म व समाजसुधारकांची व नवप्रबोधकांची ठरते. शास्त्रीजींचे गुरू केवलानंद सरस्वती हेदेखील धर्म व समाज या दृष्टीने अपरिवर्तनवादी परंपरेत मोडत नाहीत. ज्यांच्याशी शास्त्रीजींचा जवळचा संबंध आला ते म. गांधी, एम. एन. रॉय हेदेखील अर्थात सनातनी परंपरावादी नव्हते. सांगण्याचा मुद्दा हा, की 'समाज- प्रबोधन व तर्कतीर्थ' असा विवेक करताना तर्कतीर्थांचा पक्ष समाजप्रबोधनाच्या बाजूचा ठरतो. जुन्या परंपरेत वाढून व जुनी विद्या घेऊनही तर्कतीर्थ सतत वर्तमान व ताज्या आणि नव्या विचारांच्या बाजूने राहिले व वागले, हे विशेष आहे. धर्म व तत्त्वज्ञान जुनेच म्हणजे शाश्वत असते. पण गेल्या शतकातील समाजप्रबोधनाचा विशेष असा होता, की नव्या काळानुसार नव्या समाजसुधारणांचा पुरस्कार करणे भाग होते. यासाठी येथील धर्मही समाजसुधारणांना मूलभूतपणे अनुकूल आहे व पाठिंबा देणाराही आहे, अशा प्रकारे नव्याने त्याची परिवर्तनशील मांडणी होणे अगत्याचे होते. भारतीय धर्मेतिहासात ह्या कार्याची अत्यंत जरूरी होती. आता कोणताही ग्रंथ साक्षात ईश्वरप्रणित किंवा सर्वांशी प्रमाण म्हणून जबाबदार विद्वान मानीत नाहीत.

### धर्मनिर्णयमंडळ व तर्कतीर्थ

सत्तेचे राजकारण करणे हा तर्कतीर्थांचा मुळात पिंड नव्हता व नाही. सत्याग्रही, स्वातंत्र्यसैनिक वगैरे दृष्टीने त्यांनी प्रथम राजकारणात भाग घेतला. रॅडिकल पक्षाचे प्रवक्ते, काँग्रेसचे कार्यकर्ते मार्गदर्शक वगैरे दृष्टीने राजकीय प्रबोधनात्मक त्यांनी जे कार्य केले, त्याचा परामर्श येथे घ्यावयाचा नाही. धर्म- सुधारक, समाजसुधारक, अस्पृश्योद्धारक वगैरे दृष्टीने त्यांचे जे समाजप्रबोधनातील असामान्य कार्य झाले त्याचे दर्शन घडवून देण्याचा येथे मुख्य संकल्प आहे. समाजप्रबोधनाच्या कार्यात धर्मनिर्णय मण्डळाच्या कार्याला विशेष महत्त्व होते व आहे. धर्मकोश वगैरे जी कार्ये सध्या चालू आहेत ती वरील प्रयत्नांच्या दृष्टीने पूरक आहेत.

मागे प्रबोधनाच्या निर्मितीतून प्रत्येक समाजात व हरएक धर्मात सनातनी व सुधारक असे दोन तट पडले. राममोहन यांनी म्हटले आहे, की जगात जो झगडा असतो तो सनातनी (प्रतिगामी) व सुधारक (पुरोगामी) ह्यामध्ये होत असतो. भारतात धर्मशुद्धीच्या चळवळी निघाल्या त्या फक्त हिंदुधर्मातच निघाल्या. कोणत्याही सुधारणांना धर्मवचनांचा ग्रंथाधार असला तर त्या सुधारणा व परिवर्तने ही धर्म्य आहेत, असा सनातन्यांचा आग्रही पक्ष होता; व आग्रही पक्षाचे मनुष्यबळही प्रथम मोठे होते. राममोहन, पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर व रानडे-भांडारकर वगैरे पंडितांनी सती, पुनर्विवाह वगैरे नव्या व कालप्राप्त सुधारणांना धर्मवचनांचे आधार दाखविले, पण ब्राह्मोसमाजाचा जो विचारप्रवाह होता तो सर्वथैव व पुढे वेदानुकूल व वेद-प्रामाण्यवादी नव्हता. मानवतावादातून व नव्या समतेच्या विचारातून ह्या धर्मसुधारणेचे विचार होते. दयानंद व त्यांच्या आर्यसमाजाला वरील समन्वयवादी समाज व धर्मसुधारकांच्या सामाजिक सुधारणा मान्य होत्या, पण स्वामी दयानंद सनातनी नव्हते. वेदांचा अर्थ त्यांनी सुधारला. परंपरावादी सनातन्यांना दयानंदांचाही पक्ष रुचला नाही. कारण त्यांना कसलाच फरक नको होता. भारत व हिंदूधर्म समर्थ व्हावा, म्हणूनच वरील चळवळी चालल्या होत्या. पण ह्यांना जाणत्या सनातन्यांचाही कडवा विरोध होता; उदा. कै. श्री. स. कृ. फडके (पनवेल) यांचा ‘नवयुगधर्म’ हा मोठा ग्रंथ विरोधाचे स्वरूप सांगतो.

आर्य समाजातून एकपरी हिंदुमहासभा हा राजकीय पक्ष निघाला व पुढे बॅरिस्टर सावरकरांनी हिंदुमहासभेच्याद्वारे अस्पृश्यता निवारणासह सर्व ठरावांना पाठिंबा दिला. महर्षी शिंदे यांनाही बॅरिस्टर सावरकरांचा सुधारक पवित्रा स्वागतार्ह वाटला. रत्नागिरी येथे समक्ष जाऊन स्थानबद्ध असणाऱ्या बॅरिस्टर सावरकरांच्या अस्पृश्यता निवारक कार्याचे कर्मवीर शिंद्यांनी त्यात भाग घेऊन कौतुकही केले. परंतु सप्त बेड्या तोडणाऱ्या क्रांतिकारक सावरकरांच्या धर्मसुधारणा सनातन्यांना मंजूर नव्हत्या. वर्णाश्रमवादी ‘स्वराज्य संघ' वगैरेसारख्या सनातन्यांच्या कित्येक संघटना होत्या. बहुतेक सर्व पीठांचे शंकराचार्य यांचाही सुधारणांना विरोध होता.. परंपरागत चालत आलेली वेदोक्त बंदी उठविण्यास सनातनी तयार नव्हते. वेदोक्त प्रकरणातूनच टिळक व शाहूमहाराज यांच्या काळात नवा ब्राह्मण-ब्राह्मणेतर वितंडवाद महाराष्ट्रात विकोपाला गेला होता. जे सुज्ञ व प्राज्ञ होते त्यांना ह्याही प्रश्नावर विवेक करणे भाग झाले होते. या संदर्भात कैलासवासी हिंदुत्वदीपक पंडित दिवेकरशास्त्री यांचे लेखन व व्याख्याने उल्लेखनीय होती. एकूण अनेकअंगी समाजप्रबोधनाच्या दृष्टीने प्राज्ञपाठशाळा मंडळाच्या कार्याचे स्थान महत्त्वाचे ठरते. वाईतही एक ब्राह्मण परिषद झाली. केवलानंद सरस्वती व त्यांचे शिष्य तर्कतीर्थ आदिकरून प्रज्ञावंतांनी ब्राह्मण परिषदेच्याद्वारे सर्व शाखीय ऐक्य, पोटजातीय विवाह वगैरे कालप्राप्त परिवर्तने घडवून आणण्याचे पहिले प्रयत्न केले व नव्या परिवर्तनीय जागृतीला चालना दिली. पेशवाई नंतरचाही काळ मागे पडला.

नवा नवा काळ येऊ लागला. धर्मनिर्णयाचे कार्य शंकराचार्य पीठांच्याकडे असे. पण एकटे डॉ. कुर्तकोटी हे शंकराचार्य सोडले, तर बाकीचे कट्टर सनातनी होते. म्हणूनही तत्त्वनिष्ठ परिवर्तनवादी परिषद चालू करणे भाग झाले व ह्या परिषदांमधून बहुतेक समाजसुधारणांना तत्त्वनिष्ठ ऐतिहासिक परिवर्तनवादातून मान्यता देण्यात आली. वेगवेगळ्या ठिकाणी ह्या परिषदा झाल्या व त्यात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री यांनी भाग घेतला. स्वामीजींच्या समवेत तर्कतीर्थ असतच; अनेक परिषदांतून शास्त्रचिकित्सा झाली व गृह्यविधीत म्हणजे लग्नादी संस्कारांत शास्त्रानुसार जो मंत्रभाग असणे क्रमप्राप्त आहे, तेवढाच ठेवून सर्व हिंदूंसाठी नवे संस्कारविधी 'धर्मनिर्णय' मंडळाने तयार केले. हिंदुसाठी सार्वजनिक प्रार्थनादेखील तयार केली. इतर कित्येक धर्मसुधारकांप्रमाणे वेदबाह्य न होता वेदानुकूल राहून पूर्वशास्त्रग्रंथ संमत व इतिहासक्रम दृष्टीने तत्त्वनिष्ठ परिवर्तनवादी परिषदेने सुचविलेली परिवर्तने वैदिक धर्मेतिहासाच्या वाटचालीतही महत्त्वाची ठरतात. तर्कतीर्थ तत्त्वनिष्ठ परिवर्तनवादी परिषदेचे संस्थापक सभासद होते व पुढील धर्मनिर्णय मण्डळावरही त्यांचा तसाच सहभाग होता.

'नवभारता'ने जन्मशताब्दी निमित्त अलीकडे प्रसिद्ध केलेल्या स्वामी केवलानंद खास अंकात धर्मनिर्णय मंडळाच्या कार्यासंबंधी मी विस्तृत विवेचन केलेले आहे. पण हा विषय महाराष्ट्रातील प्रबोधनाच्या दृष्टीने व तर्कतीर्थांच्या संबंधानेही कमी महत्त्वाचा आहे, असे नव्हे. उदा. ह्यापुढे तर्कतीर्थांनी देवीदास गांधी व राजगोपालाचार्य यांची कन्या यांच्या विवाहात केलेले पौरोहित्य, अस्पृश्यता निवारणाला महात्मा गांधी यांच्या अपेक्षेप्रमाणे दाखविलेला शास्त्राधार, सोरटी सोमनाथ मंदिराच्या उद्घाटनाच्या वेळची उपस्थिती व भाग वगैरे घटना व प्रसंग फार वादळी ठरले. पण ही कार्ये तत्त्वनिष्ठ परिवर्तनवादाला साजेशीच होती. स्वामीजींचा ह्याला प्रत्यक्ष पाठिंबाच होता. पण खुद्द वाईत व महाराष्ट्रातही विलक्षण खळबळाट उडाली! गाजलेला देवीदास गांधी यांचा विवाह तर मिश्र-विवाहाच्या सदरात मोडत होता. समाजसुधारणांची बाजू घेतल्यामुळे वाईच्या पंचक्रोशीतील लोकांचे (म्हणजे विशेषतः स्थानिक सनातनी ब्रह्मवृंदांचेही) वाग्बाण शास्त्रीजींवर फेकले गेले! डॉ. भाण्डारकर यांचा संमती बिलाच्या वेळी बराच छळ झाला, तशा प्रकारचा नसला तरी अलीकडील काळाला साजेसा विरोध व निंदा शास्त्रीजींना सहन करावी लागली; वाई हे उत्तर पेशवाईपासूनचे अपरिवर्तनवादी पंडितांचे केंद्र होते.

सोरटी सोमनाथ मंदिर उद्घाटनातील प्रामुख्याबद्दलही स्वतः कै. एम्. एन्. रॉय यांनी त्यांच्या मुखपत्रात त्या वेळच्या सरकाराला दोष देऊन टीका केली होती. ती जहरी होती. एम. एन. रॉय यांच्या पुरोगामित्वाच्या दृष्टीने ती अयोग्य नव्हती. पण हे मंदिर अस्पृश्यांसह सर्वांना खुले व्हावयाचे होते. इतरही काही योजना होत्या. सारासार विवेक करून प्रागतिक दृष्टीने शास्त्रीजींनी वरील धार्मिक कार्यात भाग घेतला. त्यांच्या मित्रांनाही हे पटले नाही; असे होणे अटळ झाले. शास्त्रीजींनी तत्त्वतः मूर्तिपूजा प्रथेला पाठिंबा देण्यासाठी व परंपरागत सनातनी दृष्टीतून भाग घेतला होता, असे नव्हे; वरील उपक्रमातील परिवर्तनीय भाग त्यांनी

मुख्य मानिला. पूर्वी अस्पृश्यांसह शूद्रातिशूद्रांना मंदिरे खुली व्हावीत असे अनेक सत्याग्रह झाले. त्रावणकोर येथे व्ह्याकोम गावी मंदिरप्रवेश सत्याग्रह लढा महर्षी शिंदे व स्वामी श्रद्धानंद यांनी दिला होता. पुढे पर्वती सत्याग्रह, नाशिकचा काळाराम मंदिर सत्याग्रह वगैरे लढे गाजले होते. डॉ. आंबेडकर यांनी नाशिकच्या काळाराम मंदिर सत्याग्रहाचे नेतृत्व केले होते. परंपरावाद्यांचा तीव्र विरोध होता. सोरटी सोमनाथ हे ऐतिहासिक मंदिर अस्पृश्यांना नव्याने बांधल्यावरच खुले म्हणून जाहीर झाले होते. उत्तरोत्तर स्पृश्यांच्या मनांचे असे परिवर्तन होत गेल्याचे चिन्ह झाले. देवीदास गांधींचा मिश्र विवाह, येरवडा तुरुंगात अस्पृश्यतेला शास्त्राधार आहे किंवा नाही? ह्या घटना सोरटी सोमनाथ उद्घाटनाच्या पूर्वीच्या होत्या.

**महात्मा गांधी व शास्त्रीजी**

महात्मा गांधीच्या सत्याग्रही लढ्यात म्हणजे राजकीय प्रबोधनात तर्कतीर्थ यांनी वारंवार भाग घेतला होता. प्राज्ञपाठशाळा हे एक निरनिराळ्या लढ्यांचे केंद्र बनले होते. पण डॉ. आंबेडकर यांच्या विभक्त मतदार संघाच्या मागणीमुळे अस्पृश्यांचा प्रश्न सर्वांसमोर मोठ्या ज्वलंत स्वरूपात आला. महात्मा गांधींनी अस्पृश्यता निवारणाची चळवळ आसेतु हिमाचल चालू केली. अस्पृश्यतेला हिंदुधर्मात शास्त्राधार आहे किंवा नाही? या संबंधात सनातनी व परिवर्तनवादी अशा दोन्हीही बाजूंचे पंडित जमा केले; व दोघांचीही मते अजमाविली. या काळातही महात्मा गांधी यांच्या अस्पृश्यता निवारक चळवळीस सनातन्यांचा स्मृती वगैरे शास्त्राधारे जोराचा विरोध चालू होता. गांधींच्या जीवावरही प्रसंग आले होते. ह्याच काळात अस्पृश्यांसाठी मागितलेला स्वतंत्र मतदारसंघ रद्द व्हावा म्हणून मोठा कष्टप्रद व बिकट उपवास करावा लागला. महात्मा फुले, महर्षी शिंदे, डॉ. आंबेडकर यांच्या मताप्रमाणे अस्पृश्यता प्रत्यक्ष सामाजिक अन्याय होता व आहे. वरील हे कडवे सुधारक शास्त्राधाराची पर्वा करीत नव्हते. बुद्धिवादी आगरकरदेखील सामाजिक सुधारणा ह्या न्याय्य आहेत म्हणून प्रचारित होते.

महात्मा गांधी यांच्या दृष्टीने शास्त्रीपंडितांचा अस्पृश्यता निवारणाला पाठिंबा मिळाल्यास विरोधाचा बराच भाग थिटा पडेल, असे मत होते. मनुस्मृती वगैरे जे कायद्याचे ग्रंथ आहेत, त्यांमध्ये अस्पृश्यतेला आधार आहेत. परंपरावादी शास्त्रीपंडित ह्या कायद्याच्या आधारे सामाजिक अस्पृश्यतेला हिंदुधर्माच्या शास्त्रांचा आधार आहे, असे अर्थात प्रतिपादित होते. धर्माचे तत्त्वज्ञान व मूल सिद्धांत पाहिल्यास त्यात अस्पृश्यतेला मुळीच आधार नाही. मुळात समताच आहे, असा मूलगामी दृष्टिकोन तत्त्वनिष्ठ परिवर्तनवादी पंडित लक्ष्मणशास्त्री यांनी मांडिला; व पुढील आचारधर्मविषयक कायदेवजा ग्रंथ गौण ठरविले. तत्त्वनिष्ठता म्हणजे मूळ तत्त्वाकडे जाणे. तत्त्वे व सिद्धांत यांच्या दृष्टीने हिंदुधर्म अस्पृश्यता धर्म्य मानीत नाही, ही बाब प्रतिपादून तर्कतीर्थांनी अस्पृश्यता तत्त्वबाह्य ठरवून दिली. याची आवश्यकता होती. पूर्वी या सामाजिक विषयावर स्वतंत्र असा शास्त्राधारे महत्त्वाचा वाद उभयपक्षांत झाला नाही.

धर्मनिर्णय देणे व करणे म्हणजे मुळात शुद्ध धर्म तत्त्वतः कोणता व कालमानानुसार मूळ धर्मावर चढलेले अधर्माचे आवरण कोणते, हे धाडसाने सांगणे होय. स्वातंत्र्याचा लढा हा परकीय सरकाराबरोबर होता. पण स्वकीय सनातनी शास्त्रीपंडितांबरोबर बौद्धिक संघर्ष करणे हा लढा म्हणजे आप्तस्वकीयांची इतराजी ओढविणे होय. ह्या प्रकारचे अनेक सामाजिक लढे तर्कतीर्थांनी दिले होते. अनेक वादही त्यांनी जिंकले. हे जे धैर्य त्यांनी वारंवार दाखविले ते वरील राजकीय लढ्यापेक्षा अवघड व परंपरेच्या रूढ इतिहासात लोकोत्तर होते; त्या वेळचा काळ आजच्या पिढीने लक्षात घ्यावा. तो काळ स्वातंत्र्य आल्यानंतरचा अर्थात नव्हता, पण म. गांधी यांच्या सत्याग्रही लढ्याचा होता. काँग्रेसच्या जहाल लढाऊ राजकारणाला महत्त्व चढत होते तरी म. गांधी हे समाजप्रबोधनाच्या दृष्टीने खूप मोठे कृतिवंत होते. देवदास गांधी विवाह व अस्पृश्यतेला हिंदुधर्म-तत्त्वांचा व मूळ लक्षणांचा आधार नाही असे सांगण्यात नेतृत्व केल्यामुळे महात्मा गांधी व लक्ष्मणशास्त्री फारच जवळ आले. गांधींशी त्यांचा प्रत्यक्ष जवळून संबंध आला. महात्मा गांधी रॅडिकल सुधारक होते, असे जरी म्हणता आले नाही, तरी त्यांच्या ठायी स्त्री-शूद्रातिशूद्रासंबंधी व ग्रामीण जनतेविषयी जो कळवळा होता, तो महत्त्वाचा होता. ह्या काळात काँग्रेसच्या प्रमुख पुढाऱ्यांचे व कार्यकर्त्यांचे लक्ष अस्पृश्यता निवारणाकडे अधिकच लागले. महात्मा गांधी समाजसुधारकांतच मोडतात. सनातन्यांनी त्यांना आतापर्यंत कधीच स्वतःचे- स्वकीय मतांचे- मानिले नाही; अपरिवर्तनवादी हे सर्व तर्कतीर्थांना सुधारकच मानतात. मुळात सामाजिक सुधारणांच्या गरजेतून येथील समाजप्रबोधनाचे उत्थान झाले होते.

## तर्कतीर्थ व महर्षी शिंदे आणि दलितोद्धार

तर्कतीर्थांची योग्यता महात्मा गांधी यांनी जाणली होती. तर्कतीर्थांचा भारतातील व महाराष्ट्रातील मोठमोठ्या पुढाऱ्यांशी व थोर थोर सामाजिक नेत्यांशी जवळून संबंध आला. काहींच्या बरोबर कार्य करण्याचीही त्यांना संधी मिळाली. तर्कतीर्थांच्या घरी त्यांच्याशी चर्चा करताना महात्मा गांधी यांच्या- संबंधाने ते म्हणाले, की ''गांधींनी मागील सर्वच सुधारकांच्या इच्छेचे पांग फेडले.''

'मौज' मुंबई दि. १०-१-४९ च्या म. गांधी स्मृती खास अंकात तर्कतीर्थांचा गांधीजींच्यावर चिंतनीय असा लेख वाचावयास मिळाला. शास्त्री-पंडितांना बोलावून त्यांच्या उभय पक्षांशी गांधींनी चर्चा केली, या संबंधातील साद्यंत हकीगत व पुढील स्मृती वरील अंकातील लेखात मिळते... ''कैलासवासी विठ्ठल रामजी शिंदे हे एकदा येरवड्यामध्ये गांधींना वरील सल्ला देण्याकरिता मुद्दाम आले होते. विठ्ठल रामजींचा अधिकार समाजसुधारणेच्या बाबतीत किती मोठा होता, हे सांगण्याची गरज नाही. विठ्ठल रामजी आले तेव्हा मी गांधींच्या शेजारी बसलो होतो. दुपारी तीन वाजताचे ऊन गांधींचे अंग तापवीत होते....''

विठ्ठल रामजींना तर्कतीर्थ सन १९३२ च्याही अगोदरपासून ओळखत होते. पुढील

काही वर्षांत म. गांधींच्याप्रमाणेच तर्कतीर्थांचा व कर्मवीर शिंद्यांचा निकटचा संबंध आला. तर्कतीर्थांचे पुरोगामित्व जाणण्याची आणखी एक घटना शिंद्यांना समजली. ती म्हणजे वाईच्या प्राज्ञपाठशाळेत एक हरिजन विद्यार्थी संस्कृत, वेद वगैरे शिकण्यासाठी ठेविला होता. केवलानंद सरस्वतीही विठ्ठल रामजींना अर्थात ओळखीत होते. पण ह्या घटनेमुळे विठ्ठल रामजी प्राज्ञपाठशाळेकडे आकृष्ट झाले. तर्कतीर्थ या वेळी प्राज्ञप्राठशाळेचे मुख्य कार्यवाह होते. विठ्ठल रामजीची बारनिशी त्यांच्या पश्चात् पाहावयास मिळाली. त्यांनी लक्ष्मणशास्त्रींना पत्र लिहून वाई येथील ब्राह्मोसमाजाच्या पहिल्या वार्षिक उत्सवासाठी प्राज्ञपाठशाळेची जागा मागितली. शास्त्रीजींनी तात्काळ मान्यता दिली. सन १९३४ साली नोव्हेंबरमध्ये प्राज्ञपाठशाळेत वरील उत्सवातील प्रीतिभोजन झाले. शिंदे अस्पृश्यता निवारणाचे कार्य ब्राह्मो- समाजाच्या माध्यमातून करीत असत. अर्थात वरील प्रीतिभोजनात प्राज्ञपाठशाळेत हरिजनासह सहभोजन झाले, वाई येथील टिळक स्मारक मंदिरात लक्ष्मणशास्त्री यांचे 'धर्म' ह्या विषयावर व्याख्यान झाले. ह्या काळाच्या सुमारास थोडे आधीच एक शंकराचार्य वाईस आले होते; व त्यांच्या सनातनी पक्षाची गणपतीआळी घाटाच्या पटांगणावर शास्त्रीजींना विरोध करण्यासाठी मोठी सभाही झाली होती. देवीदास गांधी-विवाह वगैरे वरील सुधारक कार्यात भाग घेतल्याबद्दल सनातन्यांनी काहूर उठविले होते. विठ्ठल रामजी मोठ्या कडव्या स्वभावाचे होते. त्यांनी सांगितले की, लक्ष्मणशास्त्री यांना त्रास दिला तर खपवून घेतले जाणार नाही. शिंद्यांच्या ह्या भाषणाचा सारांश ''सुबोधपत्रिका'' (मुंबई) मध्ये आला होता. शास्त्रीजींच्या आयुष्याच्या दीर्घ वाटचालीत १९३३/३४ च्या सुमारास आगेमागे कसा काळ होता, व विरोधकांची विरोधी वर्तने व वाणी प्रभावी असतानाही त्यांनी समाजप्रबोधनाचे कार्य केले व समाजसुधारणाक्षेत्रात कर्मवीर शिंदे यांच्यासारखी जी कर्ती माणसे कार्य करीत होती त्यांच्या विचारप्रवाहाला व कार्यप्रवाहाला खतपाणी घातले. महर्षी शिंदे यानी वाई येथे संस्थापित त्या ब्राह्मोसमाजाच्या वतीने वाईत अनेक वर्षे अनेक व्याख्याने दिली. विचारप्रसारकार्यात प्रत्यक्ष भाग घेऊन साह्य केले. शास्त्रीजींचा शिंद्यांशी सहवास तर वाढलाच, पण सुबोध पत्रिकेचे संपादक कैलासवासी श्री. द्वा. गो. वैद्य, कैलासवासी प्रो. व्ही. एन्. नाईक वगैरे अनेक विद्वान मण्डळीशी जवळचा संबंध आला. पुढे पुणे व मुंबई प्रार्थना समाजात तर्कतीर्थांची आजवर अनेक वेळा विद्वत्ताप्रचुर व्याख्याने झाली. शिंदे म्हणत असत, की प्रार्थनासमाजाचे केवळ वाङ्मय वाचून तो समजणार नाही. सन १९७३ साली महर्षी शिंदे यांची जन्मशताब्दी झाली. ह्या वेळी 'महाराष्ट्र टाइम्स' (मुंबई) मध्ये 'महर्षी शिंदे व्यक्ती व कार्य' याचा तर्कतीर्थांनी घेतलेला वेध वाचला तर वरील विधानाची प्रचिती कोणासही येईल. व्यक्तीचा वेध घेण्याच्या प्रक्रियेत प्रत्यक्ष सहवासाला जास्ती महत्त्व असू शकते.

सन १८६४ पासून प्रार्थनासमाज महाराष्ट्रात समाजसेवेचे अस्पृश्योद्धाराचे कार्य यथाशक्ती करीत आला. परंतु मोठमोठ्या धर्मज्ञ विवेकवंतांनी त्याच्यावर छिद्रान्वेषण बुद्धीनेच आजवर

लिहिलेले आढळते पण व्याख्यानांच्याद्वारे व लेखांच्याद्वारे ह्या विचारप्रवाहाचे यथायोग्य मूल्यमापन तर्कतीर्थांनी केले ही त्यांची कामगिरी होय. यासंबंधाने रानडे-चरित्राचे लेखक व पुढे प्राज्ञपाठशाळेचे अध्यक्ष कैलासवासी श्री. न. र. फाटक यांचेही कार्य जाताजाता स्मरणीय आहे, असे सांगावेसे वाटते. 'डॉ. भाण्डारकर यांचे लेख व व्याख्याने' ह्या ग्रंथाविषयी बोलत असताना तर्कतीर्थ एकदा मजजवळ म्हणाले की, ज्ञानेश्वरीनंतर मराठीत धर्मावर झालेला हाच ग्रंथ (पुस्तक) उल्लेखनीय वाटतो.

उपेक्षितांची व त्यांच्या वाईतील सामाजिक संस्थेची तर्कतीर्थांनी बाजू घेतली, हेदेखील स्पृहणीय आहे. तर्कतीर्थ सांगत असत की, प्रार्थना व ब्राह्मो समाजात मानवतावाद आहे. शिंदे-गांधी यांना अस्पृश्यांसाठी मुसलमानांप्रमाणे वेगळा मतदार संघ नको होता. तसेच तर्कतीर्थांना अस्पृश्यांचे राजकीय व धार्मिक वेगळेपण वाढविणे पसंत नव्हते. वरील काळात शिंदे व पंडित लक्ष्मणशास्त्री हे म. गांधी यांच्या कार्याशी समीप आले होते. बुद्ध धर्माच्या बाजूने तर्कतीर्थ व शिंदे यांनी महत्त्वाचे लेखन केले आहे. तरी प्रत्यक्ष कसलेही धर्मांतर हे समाजांतर करणारे असू शकते, म्हणून दोघांनाही मान्य नव्हते. सर्वधर्मांतर्गतरहस्य, सर्वधर्मसमभाव, सहिष्णुता, धर्मोदार्य उदारता व कोणत्याही संप्रदायाच्या दुरभिमानाच्या आहारी न जाता सत्य व्यक्त करणे, हे गुण दोघांच्याही दृढ सहवासातून मला अनुभविता आले. तर्कतीर्थांच्या जवळ जाण्यास महर्षी शिंदे हेदेखील कारणीभूत झाले. माणसे एकत्र का होतात? चालू निधर्मीवाद म्हणजे सांप्रदायविहीनता असा एक अर्थ केला जातो. भारतीय निधर्मीपणा म्हणजे धर्मस्वातंत्र्य, समता व बंधुभाव होय. महर्षी शिंदे पुरस्कृत ब्राह्मोसमाज वरील अर्थांना समीप आहेत. कारण ठरावीक विभूतिबद्धता व पोथीबद्धता ह्यामध्ये नाही. मार्क्सवादी दृष्टिकोनातून केलेल्या हिंदुधर्म- समीक्षेत शेवटच्या विभागात ब्राह्मसमाज हा सरळ मार्ग आहे, असे तर्कतीर्थांनी ध्वनित केले आहे. शास्त्रीजींचा प्रार्थना समाज, ब्राह्मोसमाज यांना कधीच विरोध नव्हता. तर्कतीर्थ व शिंदे दोघेही तत्त्वचिंतक; येथे व्यक्तिगत तुलना करण्याचा मुळीच उद्देश नाही. मोठमोठ्या समाजसुधारकांशी तर्कतीर्थांचा घडलेला सहवास व कार्य निवेदल्यामुळेही त्यांची धोरणे समजू शकतात. महाराष्ट्रातील प्रबोधनाचा प्रवाह कसा कसा वाहात आला, हेही समजते. समाजशास्त्रज्ञ व धर्मशास्त्रज्ञ महर्षी शिंदे यांच्या 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' ह्या पुस्तकाचे महत्त्व तर्कतीर्थांनी लेखी व तोंडी अनेकवार सांगितले. स्वत: तर्कतीर्थांनी अस्पृश्यतेची उत्पत्ती, जातिसंस्थेचा उगम इ. जटिल सामाजिक प्रश्नांवर वारंवार लिहिले आहेच. सुधारक समाजशास्त्रज्ञ व धर्मशास्त्र असल्यास दुधात साखरच पडते. म्हणजे मूलगामी शोध होतो. समाजसुधारणा म्हणजे लिहिण्या-बोलण्याचा विषय नव्हे; तर हा प्रत्यक्ष कृतीचा विषय असतो असे शिंदे म्हणत. सन १९१८ साली काँग्रेसने शिंद्यांच्या दीर्घ प्रयत्नांनी अस्पृश्यता निवारणासंबंधीचा एक सामाजिक ठराव पास केला होता. तरी सर्वच काँग्रेस पुढाऱ्यांचे व सभासदांचे ह्या प्रश्नाकडे प्रत्यक्ष लक्ष होते. अशा

काही दुर्मीळ काँग्रेस कार्यकर्त्यांत तर्कतीर्थ पुढे होते. शिंदे ब्राह्मणासह महारमांग, चांभार-धेड व मराठे यांना एकत्र बैठकीवर आणीत. सुशिक्षित, निरक्षर बायाबापडे देखील अशा सामाजिक संमेलनांत समाविष्ट केले जात. तर्कतीर्थांनी ह्यातून त्या काळात सपत्नीक भाग घेतला होता. पुढेही त्यांच्या पत्नी कै. सौ. सतीकाकू यांनी आमरण सामाजिक सुधारणांच्या प्रक्रियेत भाग घेतला.

## कृतिशील तर्कतीर्थ

बहुतेक विद्वानांना प्रत्यक्ष कृतीचे अंग असत नाही. पुष्कळ विद्याव्यासंगी पंडित व विद्वान एकलकोंडे, तुसडे व स्वभावाचे चमत्कारिक असलेले आढळतात. तर्कतीर्थांची सामाजिकता जनतेतील सर्व थरांना जवळून स्पर्श करणारी आहे. त्यांचे एक वाक्य स्मरते; ते असे ''लिहावयाचे कोणासाठी, लोकांसाठीच ना?'' कित्येक पंडितांना त्यांच्या स्वजातीच्या बाहेरचे मित्र नसतात. हिंदू म्हणजे ब्राह्मणच फक्त! अशीही कित्येकांची समजूत नव्या काळातही आढळते. बहुतेक विवेकवंतांना शहरातील पांढरपेशा जीवनाबाहेरचे खरे भारतीय जीवन ठाऊक नसते. तर्कतीर्थांचे जीवन म्हणजेच एक ज्ञानयज्ञ आहे. काँग्रेसचे कार्य करीत असताना व रॅडिकल पार्टीचे कार्य करीत असताना त्यांचा खेड्यापाड्यांत संचार भरपूर झाला. पंचायत राज्याच्या उपयुक्ततेसंबंधी त्यांनी व्याख्यानांतूनही विवरण केले होते. पंचायत राज्य (लोकशाही विकेंद्रीकरण) हा विकासाचा मार्ग ठरतो. वास्तविक हे एक नवे प्रबोधन होय. पण पंचायत ही 'पंचाईत' होऊ शकते होते- होते, हाही अनुभव ते कथन करू शकतात. त्यांचे प्रबोधनातील कार्य केवळ तत्त्वज्ञान, धर्म व समाजसुधारणा ह्या क्षेत्रापुरते मर्यादित नाही. शास्त्रीबुवा हे प्रवृत्तीचे गृहस्थाश्रमी गृहस्थ आहेत. निवृत्तीमार्गी मठपती नाहीत. राजकारण हा राज्यशास्त्रीय विषय असतो व हे महत्त्वाचे जीवन असते. ह्या दृष्टीने त्यांचे विचार राजकारण-अर्थशास्त्र ह्या आधुनिक समाजांगांशी निगडित असतात. म्हणून त्यांच्या कार्याचे चौफेर दर्शन घेणे अटळ आहे. विचारांचा व कृतीचाही परीघ मोठा आहे. शिक्षणविषयक विचार व कृती हीदेखील सामावते. तर्कतीर्थ मूळचे हाडाचे शिक्षक आहेत. अनेक पुढारी व सुधारक प्रथम शिक्षकच होते. प्राज्ञपाठशाळेचे तर्कतीर्थ ह्याला अपवाद नाहीत. देवदेवतार्चन वगैरे पार्थिव कर्मकाण्डाचा त्यांच्या आयुष्याच्या आरंभी त्यांनी अनुभवही घेतला होता; असा भक्तीने अंतःकरण मृदु करण्याचाही काळ होता. धर्म हा नैतिक प्रेरणा देण्यासाठी असतो. ह्या अर्थी शास्त्रीजी कधीच नास्तिक व पाखंडी नव्हते व नाहीत. नवधर्म संस्थापनेचा हा काळ नव्हे. साकार किंवा निराकार (सगुण-निर्गुण) ह्या दोन्ही संकल्पना कल्पितच आहेत. अर्थात वैयक्तिक मोक्षापेक्षा सामाजिक मोक्ष, स्वातंत्र्य ह्यांकडे ते अधिकच वळले. इहवादी झाले.

धर्मनिर्णय सम्मत विवाहविधीनुसार त्यांनी काही पौरोहित्यही केली. १९३४/३५ साली शिवाजी मराठा हायस्कूल (पुणे) येथे त्यांच्या सोलापूरकडील एका रॅडिकल मित्राचा आंतरजातीय विवाह त्यांनीच लावला. मी तेथे होतो. धर्म व रूढी ह्यांत सुधारणा करण्याचा

त्यांच्यापरी त्यांनी घरी-दारी यत्न केलाच. त्यांचे घर म्हणजे प्राज्ञपाठशाळा. ह्या गृही अस्पृश्यतादी भेदाभेद पाळला जात नाही.

## डॉ. आंबेडकर व तर्कतीर्थ

बहुजनसमाज व दलितवर्ग वगैरेंमधील अनेक सुशिक्षित पुढारी, साहित्य सेवक, कार्यकर्ते व सर्वसामान्य नागरिक यांमधून तर्कतीर्थांनी अनेक मित्र मिळविले असे नव्हे, तर त्यांची व्यापक मते व दृष्टी पाहून अनेक त्यांचे जवळचे मित्र झाले. मी एक ह्यांपैकी सर्वसामान्य. तर्कतीर्थ यांनी पंचक्रोशीतील, आळीतील, गावातील गावकीच्या राजकारणापासून स्वतःला सतत दूर ठेविले. बाहेरच्या विद्वानांशी सतत संपर्क ठेविला, त्यांच्या विद्वत्तेमुळे तो येऊ शकला. एकजातीयता ओलांडून ब्राह्मणेतर व दलित ह्या बहुजनसमाजातील कार्यकर्ते जवळ करून किंबहुना त्यांच्या जवळ जाऊन कार्य करण्याचे व्यापकत्व तर्कतीर्थांनी अवलंबिले. अस्पृश्योद्धारक महर्षी शिंदे यांची चळवळ हातात घेऊन स्वावलंबनाने स्वोद्धारार्थ डॉ. आंबेडकर यांचे लढे व संघर्ष चालू होते. धर्मांतराचीही घोषणा केली जात होती. ह्यामुळेही प्रबोधन खालपर्यंत पोहोचू लागले होते. खुद्द डॉ. आंबेडकर व तर्कतीर्थ यांच्यामध्ये चर्चात्मक सहवास झाला होता. डॉ. आंबेडकरांना जवळून जाणणारे तर्कतीर्थ महत्त्वाचे ठरतात. आंबेडकर यांच्या पश्चात् तर्कतीर्थांना त्यांच्या चरित्रावर लिहिण्याची इच्छा होती. पण सर्वच संकल्प पुरे होत नाहीत, योगायोग लागतो; आणि योग पुरेदेखील होत नाहीत. 'Who Were the Shudras?' ह्या आंबेडकरांच्या गाजलेल्या पुस्तकाची प्रत त्यांनी तर्कतीर्थांना सादर भेट दिली होती. एम. एन. रॉय यांच्यासमवेत कार्य करताना मजूर व कामगार प्रश्नावर तर्कतीर्थ व आंबेडकर यांचे साहचर्य झाले होते.

डॉ. आंबेडकर यांनी वरील इंग्रजी प्रबंधाच्या प्रस्तावनेत ब्राह्मण पंडितांना सत्य प्रगट करिताना परंपरेचे पायगोवे (Ties) आडवे येतात असे विधान केले आहे. आंबेडकरांच्यासारखे विधान फुल्यांत व शिंद्यांतही सापडते. 'हिंदुधर्माची समीक्षा', 'ज्योतिनिबंध', 'वैदिक संस्कृतीचा विकास' वगैरे आजच्या कृतींत त्यांनी पारंपरिक प्रामाण्याचा यशस्वी त्याग केल्याची प्रचिती कोणासही येईल. पायगोव्यांना न जुमानता ह्या शृंखला तोडणाऱ्यांपैकी तर्कतीर्थ हे एक महत्त्वाचे आहेत, व पुढेही राहातील. डॉ. आंबेडकर यांनी शेवटी बुद्धधर्माचा सामुदायिकपणे स्वीकार केला. बुद्धधर्म निवृत्तिवादी आहे अशी तर्कतीर्थांनी केलेली प्रतिक्रिया अर्थात आंबेडकरांना आवडली नाही. तत्पूर्वी आपटे व्याख्यानमालेत, 'वैदिक संस्कृतीचा विकास', 'हिंदुधर्माची समीक्षा' वगैरे विचार प्रपंचात शास्त्रीजींनी बुद्धधर्म व संस्कृती ह्यांवर सूक्ष्म अभ्यास मांडिला आहे. बौद्धसाहित्यसेवकांना व एकूण नवबौद्धांना मराठीतील ही माहिती व मीमांसा अभ्यसनीय व मार्गदर्शक होणारी आहे. एकपरी बुद्धधर्म हा वेदान्ताचा विकासच ठरतो. फार काय, निरीश्वरवादी भारतीय दर्शने तर्कतीर्थांनी कधीच उपेक्षणीय मानिली नाहीत, हे चार्वाकासंबंधीचे तर्कतीर्थांचे विचार वाचल्यावर समजू शकते.

बुद्ध व शंकराचार्यांचाही ऐतिकासिक काळ निवृत्तिप्रधानच होता. तर्कतीर्थ जोशी यांचे कार्य तटस्थ समीक्षक ह्या नात्याने प्रामुख्याने पाहावे लागते. समीक्षकाला त्रुटी सांगाव्या लागतात; आणि हिंदुधर्माच्या बाबतीत त्यांनी अधिक कठोरपणानेही सांगितल्या आहेत, हे कोणासही विसरता येणार नाही. क्रांतदर्शी विचार अधिक महत्त्वाचे वाटतात.

येथे तर्कतीर्थांच्या पुस्तकांचा मुळीच परामर्श घ्यावयाचा नाही; तर त्यांच्या पुस्तकांनी (व लेखांनी आणि अगणित व्याख्यानांनी) परिणाम कोणता घडविला व कार्य कोणते केले, हे सांगावयाचे आहे. अर्थात आवृत्तींचा मान प्राप्त होणारी ही त्यांची कृती त्यांचे पुरोगामित्व दर्शविते.

## 'हिंदुधर्माची समीक्षा' व चिंतनाचे वर्धमान स्वरूप

तर्कतीर्थांच्या कार्याचे दोन भाग पडतात. एक मूलभूत, विकासक्षम व गंभीर सौष्ठव आणि ठसठीशीत असे वैचारिक वाङ्मय, हा पहिला महत्त्वाचा विभाग ठरतो. दुसरा भाग म्हणजे कृतीचा. पुष्कळ विचारवंतांचे कृतीचे अंग पुष्कळ लुळे असते. ग्रंथनिर्मिती, साहित्यनिर्मिती हीदेखील एकपरी कृतीच असते. यालाही बैठक-आसन लागते. तर्कतीर्थांची बैठकशक्ती मोठी आहे; विचार ही शस्त्रे आहेत. हा विचार मी तर्कतीर्थांपासून शिकलो.

"हिंदुधर्माची समीक्षा" हे मीमांसात्मक पुस्तक तर्कतीर्थांची कृती आहे. सत्याग्रहाच्या चळवळीत पुष्कळ विवेकवंत एकत्र आले. विचारविमर्श होऊ लागला व समाजवाद व साम्यवादी विचारांकडे महाराष्ट्रातील काही विचारवंत आकृष्ट झाले. पण लक्ष्मणशास्त्री हे एकटेच वेदादी जुन्या शास्त्रांत विशेष पारंगत होते. त्यांनी मार्क्सवादावरील अनेक ग्रंथांचा अभ्यास केला. कोणत्याही विषयाचे प्रथम अध्ययन व चिंतन करणे हा त्यांचा स्वभावच. त्यांचे इंग्रजी उत्तरोत्तर वाढत गेले. देशी जुन्या व नव्या 'हिंदुधर्माच्या समीक्षा' त्यांना अवगत होत्याच. त्यानंतर मार्क्सवादाचा चांगला परिचय झाला. मार्क्सवाद हे एक वैश्विक तत्त्वज्ञान आहे. ह्यातून कोणत्याही जीवनविषयक प्रश्नाची समीक्षा करता येते. या दृष्टीने हिंदुधर्माची समीक्षा मार्क्सवादातून मांडण्याचे महत्कार्य शास्त्रीजींनी केले. परकीय आर्यांच्या स्थानिक आर्येतरांवर स्वाऱ्या, पुरोहितांनी निर्माण केलेली गुलामगिरी, यासाठी केलेला शब्द व ग्रंथप्रामाण्याचा उपयोग ही प्रकरणे व नवे नवे तत्सम परिच्छेद वाचल्यावर असे समजून आले, की जोतिबा फुले यांना त्यांच्यासारखा पांडित्याचा लाभ झाला असता, तर त्यांनी शास्त्राधारेच पुरोहितांच्या गुलामगिरीचे व पिळवणुकीचे स्वरूप मांडले असते. मग कै. विष्णूशास्त्री चिपळूणकरांची मोठी पंचाईत झाली असती. जोतिबांत हे जे राहून गेले ते शास्त्रीजींनी पुरे केले. ह्याहीमुळे मी तर्कतीर्थांच्याकडे आकृष्ट झालो. वैदिक धर्माचा विकास व वरील समीक्षा ह्यातील भूमिकेत साहजिक अंतर दिसते. हे अंतर स्वतः शास्त्रीजींनी 'वैदिक संस्कृतीचा विकास'च्या प्रस्तावनेत सांगितले आहे. विवेकवंताच्या ठायी अंतर्विरोध सापडू शकतो. वेगवेगळया दृष्टिकोनांतून एकच विषय मांडता येतो. तरी

दोन्हीही पुस्तके हिंदुधर्माचे विवेचन करून जास्ती जास्ती माहिती वाचकांना देऊ शकतात. आज मार्क्सवादातील थिटेपणा व उणिवा त्यांना जाणवतात. उदा. रविवार सकाळ १९७८ च्या दिपवाळी अंकात त्यांचे ताजे विचारचालन सापडते. सकारण बदललेले विचार लोकांपुढे मांडण्यातही धाडस लागते. जेव्हा विचार पालटलेले आढळले, त्या वेळी त्यांना काही काही प्रसंगी मी विचारले, त्या वेळी "माझे सर्वच विचार पालटतात असं नव्हे", अशा प्रकारे उत्तर देऊन त्यांनी शंकासमाधान केल्याचे पूर्ण स्मरते. मार्क्सवाद त्यांनी आपलासा केल्यापासून त्यांना एकपरी जोतिबा फुले आपलेसे वाटू लागले. सर्वच पुरोगामी विषयांकडे त्यांचे लक्ष लागू लागले. जुन्या पठडीतून पुढे आलेल्या पंडिताने मार्क्सवादाचा विशेष परिचय करून घेऊन, हिंदुधर्मासारख्या गुंतागुंतीची अनेक तत्त्वज्ञाने असलेल्या धर्माची मार्क्सवादी मीमांसा उपलब्ध करावी, हे कार्य क्रांतिकारक होते. आजही त्यांची कोणत्याच बाबीतील व विषयावरील सर्वच्या सर्व मते पालटली आहेत, असे मुळीच नव्हे. तत्त्वनिष्ठपणे मागे हाताळलेल्या विषयासंबंधी आस्था असतेच. अलीकडे जोतिबा फुले व मार्क्स यांच्या संबंधाने त्यांना मी विचारले, त्या वेळी जोतिबात मार्क्सवादाची बीजे आहेत; असे त्यांनी मला त्यांच्याशी विश्वकोश कार्यालयात हा विषय निघाला तेव्हा सांगितले. ज्या ज्या वेळी प्रश्न व शंका मी घेऊन जाई, त्या त्या वेळी त्यांनी समाधान केले. चर्चेतून ज्ञानार्जन झाले.

अलीकडचा समाजप्रबोधनाचा इतिहास पाहिल्यास दादोबा पांडुरंग यांचे 'धर्मविवेचन', लोकहितवादींची 'शतपत्रे', जोतिबांची 'गुलामगिरी', दयानंदांचा 'सत्यार्थ प्रकाश' ह्या एकपरी हिंदुधर्माच्या समीक्षाच आहेत. ख्रिस्तीधर्म व हिंदुधर्म हे इंग्रजी राज्यामुळे एकत्र एकाच भारतात येण्याचा म्हणजे असण्याचा संभव निर्माण झाल्यानंतरच्या काळातील वरील समीक्षा होत्या. शास्त्रीबुवांची हिंदुधर्मसमीक्षा, मार्क्सवाद येथील विचारवंतांवर प्रभाव गाजवू लागल्याच्या वेळची आहे; पण स्वातंत्र्य येण्यापूर्वीची आहे. तरीही त्यातील चिकित्सा ताजी वाटणारी आहे. मधून अधून त्यांच्याकडे जाणे झाल्यानंतर, अलीकडे असे आढळते, की ते इंग्रजी पुस्तक घेऊन वाचताना सहसा दिसतात. पुष्कळ देशी जुनी विद्या घेतलेल्या पंडितांत पाश्चात्त्य धर्म, संस्कृती व भाषा यांच्यासंबंधी घृणा आढळते; व पौर्वात्त्य विद्येसंबंधी अभिनिवेष आढळतो. असले एकदेशी पंडित स्वजाती-धर्माचा अहंकार ओलांडीत नाहीत. 'मी' 'मी' म्हणणाऱ्या पंडितांच्या विवेचनाला हा अहंकार मर्यादा घालितो. हिंदुधर्माबद्दल शास्त्रीजींना अभिमान आहेच, पण त्याज्य गोष्टींविषयी व बाबींविषयी ते मुळीच आस्था बाळगीत नाहीत. वैचारिक पाठिंबा देतच नाहीत. अशी दृष्टी असल्यामुळे ब्राह्मो समाज, आर्यसमाज व सत्यशोधक समाज यांच्यासंबंधी पूर्वविद्वानांत जो पूर्वग्रहदूषितपणा होता, तो त्यांनी दूर केला. पण याचाही अर्थ असा नव्हे, की ह्या सर्व चळवळी निर्दोष होत्या. पण ह्यांनी आधुनिक समाजप्रबोधनाचे देशाला मोठमोठे पुढारी देऊन व उद्घाटन करून पूर्व संवर्धन केले, म्हणूनही इतिहासातील यांचे पायाभूत कार्य जाणावे लागते. ह्याशिवाय

प्रबोधनाचे स्वरूप व पुढील कार्य समजू शकत नाही. वरील सर्व अर्थात मागचे टप्पे आहेत. काळ आता पुढे गेला आहे.

'साहित्य संस्कृति मंडळा'चे अध्यक्ष असताना तर्कतीर्थांनी काही मार्क्सवादी विवेकवंतांच्या पुस्तकांना प्रस्तावना दिलेल्या वाचनात आल्या. त्यावरून हाती घेतलेल्या कोणत्याच विषयाकडे त्यांची संपूर्ण पाठ झालेली नाही, असे दिसून येईल. काही सूक्ष्म बारकावेदेखील वर्धमान झालेले आढळतील. पक्षीय व सांप्रदायिक मनोवृत्तीच्या वाचकांना शास्त्रीजींच्या वर्धमान चिंतनाचे स्वरूप सापडणे अशक्य होईल! दीर्घायुष्यात विशाल, स्फुट, अनेकविध विविध विषयांवर एवढे संपन्न लेखन झाले आहे, की त्या कालखंड, विविधता, अंतर्विरोध, परिवर्तन वगैरे प्रकारे बहुरंग व बहुपालट होणे, वर्धमान चिंतकाच्या बाबतीत अटळ आहे. विपरीत वाटण्याचे कारण नाही. विरोधात राहिल्यावर माणूस अल्पसंख्याक होतो. किंबहुना तो जनप्रवाहापासून दूर पडतो. अशी स्थिती पत्करूनही त्यांनी जनतेमधून मूलगामी जागृती करण्याचा प्रयत्न केला. अजूनही हा कालविभाग महत्त्वाचा वाटतो. विरोधासाठी विरोध हा त्यांचा स्वभावच नसतो.

**बहुजनांचे प्रबोधन व तर्कतीर्थ**

एम. एन. रॉय यांच्या रॅडिकल पक्षात नवमानवतावादी दृष्टिकोनातून कार्य करीत असताना शास्त्रीजींचा जनसंपर्क वाढू लागला. महाराष्ट्रातील बहुजन समाजाच्या चळवळीच्या प्रवाहाकडे शहरी पांढरपेशा विद्वानांची मनोवृत्ती उदार नव्हती. ह्या कृपण मनोवृत्तीचे प्रतिनिधित्व प्रथम निबंधमालाकारांनी केले. नागपूर-अमरावती भागात जोतीराव फुले यांच्यावर तर्कतीर्थांनी व्याख्यान दिल्याचे मी 'राष्ट्रवीर' (बेळगाव) ह्या पत्रात वाचले. मग ब्राह्मो समाजामार्फत वाईस शास्त्रीजींची तीन व्याख्याने झाली. रॉयिस्ट पक्ष विशेष लोकप्रिय नसतानाही ह्या व्याख्यानांना गर्दी झाली. विशेष विरोधात राहून धैर्याने शास्त्रीजी ह्या वेळी लोकशिक्षणाचे कार्य करीत होते. त्यांच्या व्याख्यानांचे वाईत लाविलेले बोर्ड उलटे करून ठेविल्याचा मला अनुभव आला. एकदा शास्त्रीजींच्या रॉय पक्षातील कै. श्री. ह. रा. महाजनी यांचे महात्मा फुले मंडईत नगरपालिकेसमोर व्याख्यान होते. त्या वेळीही व इतर अनेक सभांत काँग्रेस पक्षीयांमधील काही जणांनी धिंगाणेवजा विरोध केला. याचे कारण रॉय पक्षाने निवडणुकीत विरोधी उमेदवार उभे केले होते! शास्त्रीबुवा एकाकी होऊनही लोकशिक्षणाचे व प्रबोधनाचेही कार्य करीत होते. निबंधमालाकार यांनी प्रामुख्याने जोतिबा फुले वगैरे समाजप्रबोधनातील अनेक पहिल्या नेत्यांवर सडकून टीका केलेली मी अभ्यासली होती. तर्कतीर्थ ह्या सर्वांचे निरसन करू शकतील असा उत्तरोत्तर घरीदारी होणाऱ्या संपर्कातून माझा विश्वास वाढता राहिला. मी वैयक्तिक कारणासाठी शास्त्रीजींच्याकडे गेलो नव्हतो. पण वरील योगायोगाचे सार्वजनिक परिणाम दूरगामी व शुभ ठरले.

## ‘ज्योति-निबंध’

जोतीराव यांच्या गुलामगिरी, इशारा व सार्वजनिक सत्यधर्म या तीन पुस्तकांचा परामर्श घेऊन सार सांगणारा हा निबंध चिकाटीच्या प्रयत्नांनी कै. श्री. शंकरराव मोरे यांच्या हस्ते वाईस प्रसिद्ध झाला. कै. श्री. केशवराव जेधे यांचीही उपस्थिती लाभली. ह्या वेळी महाराष्ट्रात कॉंग्रेसमधून फुटून निघून शेतकरी कामगार पक्ष साकार होऊ लागला होता. ‘ज्योति-निबंधा’ने जोतीराव फुले यांच्या तेजावर जे ढग आले होते, ते साफ दूर झाले. ‘हिंदुधर्माची समीक्षा’ व जोतीराव फुले ही शास्त्रीजींची कृती प्रखर पुरोगामी म्हणून त्यांच्यामागे सतत राहील. जोतीरावांवर लिहिणे-बोलणे म्हणजे पुष्कळ विद्वानांना 'अब्रह्मण्यम्' वाटे. पण हा काळ आता दृष्टिआड झाला; व जोतीरावांवर लिहीत बोलत नाहीत असे पुरोगामी विवेकवंतही आढळत नाहीत. ज्योति-निबंधातील उतारे कैकजणांनी आधारास घेतले व घेतात. दक्षिण हिंदुस्थानातील सुधारकांची माहिती उत्तरेच्या लोकांना फारशी नसते. ज्योति-निबंधाचे इंग्रजीत झालेले भाषांतर त्या वेळी रॉय यांच्या मुखपत्रात प्रसिद्ध झाले होते. ज्योति-निबंधात (इ. स. १९४७ साली) शेवटच्या परिच्छेदात जे शेतकऱ्यांच्या भवितव्याबद्दल भाकीत केले होते, त्यानुसार भारतात शेतकरी जनतेचे राज्य अद्याप व्हावयाचे राहिले आहे, एवढे तरी हल्ली म्हणता येते. हा शिखरभूत असलेला अंतिम परिच्छेद शास्त्रीजींच्या त्या वेळच्या मनोव्यापाराचे प्रतीक होय. शास्त्रीजी सतत विद्यार्थी असतात. नवे नवे मुद्दे काढून तत्त्वाशी गाठ घालतात.

## सत्य असत्याशी मन केले ग्वाही

ह्या लेखात महाराष्ट्रातील प्रबोधनाचा अर्थ सांगण्याबरोबरच तर्कतीर्थांचे समाजप्रबोधनातील कार्यही सांगावयाचे आहे. परंपरा, प्रबोधन व परिवर्तन असा क्रम असू शकतो. समाजसुधारकाला प्रवाहाच्या उलट जावे लागते. ‘सत्य असत्याशी मन केले ग्वाही। मानियेले नाही बहुमता॥’ हेच सूत्र धरावे लागते. प्रस्तावनावजा पहिल्या परिच्छेदात मी प्रबोधनाला आधार म्हणून तुकोबा अनेकांना उपयोगी पडला, असे विधान केले होते, व ‘ज्योति-निबंध’ तयार झाल्यावर त्यावर तुकोबाची वरील उक्ती निवडण्यात आली. ही उक्ती जोतिबांच्याही जीवनाच्या बाबतीत तर लागू आहेच, पण शास्त्रीबुवांच्या मनाची व कार्याची त्या वेळची ठेवणही दर्शविते. बहुमताला व लोकमान्य दृष्टिकोनाला न जुमानता त्यांनी जे विचार मांडिले व कृती केली, तिलाच प्राधान्य द्यावे लागते. कारण त्यात कसोटी असते.

‘ज्योति-निबंध’ प्रसिद्ध झाल्यावर शास्त्रीजींच्या अध्यक्षतेखाली दिल्ली येथे मराठी साहित्य संमेलन भरले. ह्या अध्यक्षीय भाषणात समाजसुधारकांच्या कार्याचा व त्यांच्या भाषाविषयक सेवेचा विशेष उल्लेख केलेला आहे. प्रबोधनावर फारच थोड्या मागील अध्यक्षांनी विचार केलेला आढळतो; हा विचार पुढे वाढता राहिला. भाषणाच्या शेवटी संयुक्त महाराष्ट्राचाही पुरस्कार केला.

‘ज्योति-निबंध’ प्रसिद्ध झाल्यावर जोतीरावांच्या चरित्रावर लिहावे असा शास्त्रींचा

मनोदय व्यक्त होऊ लागला. सन १९४६ ते १९५३/५४ पर्यंत शास्त्रीजींच्या मी फारच वैचारिक सहवासात वावरलो. एकूण बहुजनसमाजाचा इतिहास लिहावा अशी व्यापक कल्पना शास्त्रीजींनी मांडली. ह्या उपक्रमाला प्रकाशनाचे स्वरूप आले नाही. तरी ह्या योजनेच्या मागील विचाररेखा व एकूण आखणी मला वाचकांच्यासाठी सांगता येते. कारण वरील उपक्रमाला व 'ज्योति-निबंधा'ला साधने जमवून देण्यात माझा सहभाग होता. शास्त्रीजी व मी मिळून चार पाच वर्षांच्या ह्या काळात एकूण दोनशे तास तरी एकत्र बसलो. मजकूर मी लिहून घेत होतो. बैठकीच्या अगोदर व नंतर साधकबाधक खूप चर्चा होई. शास्त्रीजींच्या मताप्रमाणे जोतीरावांना चांगले मित्र भेटले होते. ह्या साह्यक व सहभागी मित्रांचे कार्यदेखील फुल्यांच्या कृतीतून व विचारांतून उत्स्फूर्त होते. या दृष्टीने भालेकर-लोखंडे-विश्राम रामजी व प्रथम फुले यांच्या विचाराआचारावर लिहून झाले. नंतर सयाजीराव व शाहूमहाराज यांच्यावरही लिहून संपले. महर्षी शिंदे यांच्यावर प्रास्तविक पान लिहून संपले. पाचपन्नासच्यावर साधने उपयोगात आणली गेली. जोतिबांच्या 'सत्सार' अंक १ ला प्रथम शास्त्रीजींच्यामुळे प्रथमच मिळाला होता. दीनमित्राचे संपादक कैलासवासी श्री. पाटील यांनीही दुर्मीळ साधने पाठविली होती. पुढे जेधे, भाऊराव पाटील वगैरेंचा परामर्श घ्यावयाचा होता. शेवटी ह्या सर्व व्यापक विषयाच्या दृष्टीने शास्त्रीबुवा स्वतःची विस्तृत प्रस्तावना लिहिणार होतो. हा अभ्यास पुढे खुद्द शास्त्रीजींनाही उपयोगी झाला.

हा काळ द्विभाषिक का महाराष्ट्र ह्या चळवळींचा होता. कैलासवासी प्रल्हाद के. अत्रे (संपादक दैनिक मराठा) हे महाराष्ट्राची बाजू हिरिरीने मांडीत होते; व त्यांनी ह्या काळाच्या सुमारास 'म. फुले बोलपट' तयार करण्याची कामगिरी हाती घेतली होती. ह्या कार्यासाठी त्यांना देण्यात आलेले वरील लेखन महात्मा फुले बोलपट तयार करण्यास उपयोगी पडले. कृतज्ञतेने ज्यांचे साह्य झाले त्यांत मुख्यतः तर्कतीर्थांचे प्रथमच पडद्यावर नाव नमूद केलेले, वरील बोलपट पाहणारांना आठवत असेल. ह्याप्रमाणे वरील बौद्धिक श्रम सत्कार्यी लागले. व माझाही बराच तर्कतीर्थांच्या समवेत एकूण समाजप्रबोधनावरील अभ्यास सतत वाढता राहिला. हा लेख म्हणजे तर्कतीर्थांच्या प्रत्यक्ष सहवासाचे एक प्रतीक आहे. प्रतिबिंब आहे. स्मृती व त्यांचे कार्य यांचा समन्वय येथे केला आहे. बहुजन समाजाच्या चळवळीवर लिहिताना एकूण सर्व प्रबोधनातील प्रवाहांचे सिंहावलोकन झाले. रॉयवादी पक्षाचे प्रवक्ते असण्याच्या काळात तर्कतीर्थांनी जी वरील कामगिरी बजाविली त्यामुळे ते पूर्वीपेक्षा बहुजन समाजाच्या फारच जवळचे झाले. तर्कतीर्थांनी जोतीरावांच्या चरित्रातील एक एक प्रसंग चांगले उभे केले होते. जोतीरावांच्या चरित्राचे व त्यांच्या कार्याचे बीज व मूळ त्यांच्या पूर्ववृत्तात व पूर्वजांच्या हकिगतीत आहे, असे तर्कतीर्थ म्हणत असत. याची प्रचिती जोतिबांचे एक मित्र कै. श्री. नारो आबाजी महाघटशास्त्री पाटील यांनी लिहिलेले जोतीरावांचे 'अमर जीवन' ही पुस्तिका ह्यानंतर मला मिळाली. वाचताना शास्त्रीजींच्या

अनेक मुद्द्यांची आठवण झाली. येथे शास्त्रीजींच्या साहित्याने समाजप्रबोधनाच्या क्षेत्रात जे कार्य केले म्हणजे परिणाम केला, तो मुख्यतः दर्शवायचा आहे.

## 'वैदिक संस्कृतीचा विकास' म्हणजे भारतीय धर्मविकास

तत्त्वनिष्ठ ऐतिहासिक परिवर्तनवादाचीही कक्षा तर्कतीर्थांनी ओलांडली. शास्त्रीजींचे प्रबोधन विचारविकासाचे कार्य आहे. त्याचे स्वरूप क्रांतिकारक आहे. उदा. आतापर्यंत वैदिक धर्माचा इतिहास अनेकांनी लिहिला असेल, पण भारतीय सहा दर्शनांमध्ये जी वेदप्रतिकूल दर्शने आहेत, त्यांचाही उगम व विकास वैदिक धर्माचा विकास या ग्रंथात विवेचिला आहे. सांख्य, चार्वाक, जैन, बुद्ध ह्या सम्यक दर्शनांचीही माहिती व तत्त्वज्ञान 'वैदिक संस्कृतीचा विकास' हे पुस्तक मराठी वाचकांना पुरविते. मागील सर्व वैदिक विद्वानांनी वेदप्रतिकूल शास्त्रे केवळ खण्डणार्थ दृष्टीने हाताळली होती. शास्त्रीजींचा काळ हा अर्वाचीन काळ ठरतो; त्यांचे साधारणतः निम्मे आयुष्य पारतंत्र्यात देश असताना गेले; व स्वातंत्र्य आल्यावर पुढील जीवनौघ चालला आहे. दोन्ही काळ ते अनुभवीत आले. ज्ञान व विज्ञान ह्या दोन्हीही दृष्टीला ते महत्त्व देतात. शास्त्रीजींचे जे कार्य झाले ते त्यांच्या वर्धमान विद्वत्तेच्याद्वारे जास्ती झाले.

अलीकडील काळात राममोहन रॉयपासून ते पुढे दयानंद, रानडे-भाण्डारकर, आगरकर-फुले यांच्या अखेरपर्यंत जे प्रबोधन झाले त्याचाही उद्गम व विकास 'वैदिक संस्कृतीचा विकास' या पुस्तकात आला आहे. ब्राह्मोसमाज, प्रार्थनासमाज व सत्य-शोधक समाज हे वेदानुकूल नसताही त्यांच्या प्रबोधनाला व कार्याला महत्त्व दिले आहे. म. गांधी, एम. एन. रॉय वगैरे आधुनिक तत्त्वचिंतकही परामर्षित केले आहेत. शेवटी विज्ञानाचे विस्तृत महत्त्व सांगितले आहे. याप्रमाणे 'वैदिक संस्कृतीचा विकास' हा भारतीय धर्माचा विकास अशी अभूतपूर्व भूमिका घेतली आहे. भारतीय संस्कृती व धर्म यांचे एकत्व, 'परस्परसंबंध व परिणाम' सांगण्यामुळे भारताच्या नैसर्गिक व ऐतिहासिक अखंडत्वाबद्दलची समजूत वाढू शकते.

शास्त्रीजींनी हिंदुधर्माची एकदा एक व्याख्या केल्याचे पूर्ण स्मरते. हिंदुधर्म म्हणजे वैदिक, बुद्ध व जैनधर्म यांचा समन्वय होय. वाई कॉलेजला किसनवीर हे नाव देण्याचा जो समारंभ गेल्या वर्षी झाला, त्यातील भाषणात त्यांनी सांगितले, की पूर्वी भारतात एकाच कुटुंबात वैदिक, बुद्ध व जैनमताची माणसे गुण्यागोविंदाने राहत होती. वाई शहराच्या अवतीभोवती महायान पंथाच्या पालकेश्वर आदिकरून गुहा आहेत. यांचा काळ तर्कतीर्थांच्या मते इ. सन पूर्व पाचशे सहाशे वर्षे आधीचा होय. शास्त्रीजींच्यामध्ये नैसर्गिक गुणवत्ता व बुद्धिमत्ता असली तरी वाचन, चिंतन, अभ्यास व निरीक्षण ह्यांमुळे दुधात साखर पडली आहे.

काही थोड्या वर्षांपूर्वी जैन धर्मीयांचा वाईत एक फार मोठा महोत्सव झाला. ह्या महोत्सवात शास्त्रीजींनीदेखील भाषण दिले व जैन धर्माची आणि तीर्थंकरांची महती

सांगितली. भारतीय संस्कृतीत जी निरीश्वरवादी दर्शने आहेत, ती उपेक्षणीय नाहीत. भारतीय संस्कृती मागे संमिश्रपणे समन्वयीत झालेली होती व पुढेही होणारी आहे. आता शुद्ध आर्य म्हणून कोणी राहिलेले नाहीत. अशी अनेक नि:पक्षपाती मते त्यांच्या लेखनातून व भाषणे संवादांतून मिळू शकली. तर्कतीर्थांच्या हयातीत हे सर्व वाचकांपुढे मांडता आले हा सुयोगच होय. हा एक त्यांच्या चरित्राचा साधन भागही ठरेल.

ज्योतिनिबंध साकारत असतानाच कै. भास्करराव जाधव (कोल्हापूर) यांनी प्रोत्साहन दिले होते. जाधवांचा व शास्त्रीबुवांचा परिचय आधीपासून होता. एकमेकांत सामाजिक-धार्मिक विषयांवर विचारविमर्श झाला होता. जाधवरावांनी रामायणावरील लिहिलेले लेख टीका प्रतिटिकेमुळे गाजले होते. 'मराठे लोक व त्यांची भाषा' हे एक जाधवरावांचे आगळे-वेगळे व्याख्यान पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाले होते. ह्या दोन्हीही कृतींचा तर्कतीर्थांनी त्यांच्यावर लिहिताना परामर्श घेतला होता. 'गुणिनां गुणिः वेत्ति।' या सुभाषिताचा परिचय शास्त्रीबुवांच्या ह्या लेखनावरूनही आला. पुढे कोल्हापूरला जाधवराव आजारी असताना त्यांना भेटण्याचा तर्कतीर्थांना योग प्राप्त झाला. याच वेळी कोल्हापूर येथे सत्यशोधक समाज परिषद कै. दीनमित्र पत्रकर्ते मुकुंदराव पाटील यांच्या अध्यक्षत्वाखाली झाली. या परिषदेचे उद्घाटन शास्त्रीजींनी केले व सत्यशोधक समाजाचे समाजप्रबोधनाच्या इतिहासातील कार्यही तर्कतीर्थांनी निवेदिले. ह्याप्रमाणे बहुजनांचा संबंध वाढत गेला. फलटण (जि. सातारा) येथील महात्मा फुले पुतळ्याचे उद्घाटनही पुढे त्यांच्या हस्ते झाले.

सन १९१९ ते २९ पर्यंत वाईमध्ये झालेली व सातारा वगैरे मुंबई इलाख्यामध्ये झालेली सत्यशोधक चळवळ शास्त्रीजींना पूर्ण अवगत होती. जेधे, जवळकर, बाबूराव यादव वगैरे पुढाऱ्यांची वाईत झालेली व्याख्यानेही त्यांना ऐकून ठाऊक होती. पण ही चळवळ क्रियाप्रतिक्रियात्मक धुमश्चक्रीतून त्या वेळी चालली होती; विरोधही पुष्कळ होता. या चळवळीचा सांगोपांग अभ्यास करून नंतर शास्त्रीबुवांनी त्यांना अभिप्रेत अशी समीक्षा मांडली आहे. मालसे-कीर संपादित 'समग्र फुले वाङ्मय' पुस्तकाला त्यांनी लिहिलेल्या विस्तृत प्रस्तावनेत ही समीक्षा सापडते. ‘ज्योतिनिबंधा’च्या वेळी (१९४७ सालात) 'समग्र फुले’ उपलब्ध नव्हते.

शास्त्रीजींची पहिली ३० वर्षे व १९८१ च्या अगोदरची ३० वर्षे सोडून मधला जो सुमारे पंचवीस वर्षांचा कालखंड होता, तो त्यांच्या विचारप्रखरतेचा ठरतो, या वेळी ते काँग्रेसच्या विरोधात होते. 'नवमानवतावाद' हे त्यांचे पुस्तक ह्याच कालखण्डातील आहे. 'निरीश्वरवाद' हेही पुस्तक ‘हिंदुधर्माची समीक्षे’प्रमाणेच अपूर्व आहे. ह्या काळात पाखण्डी म्हणूनच विशेष प्रसिद्धीस चढले होते. जातिवर्णसत्ता-मत्ता तर राहिली पाहिजे, व देशाला (स्वराज्य) राजकीय स्वातंत्र्यही मिळाले पाहिजे, असे गर्भित धरून राजकारण करणारा पूर्वी एक जाणता वर्ग असे. बहुजन समाजाला सत्तेत योग्य वाटा दिला पाहिजे, त्यांच्यातून जे नेतृत्व पुढे येत आहे

ते स्वागतार्ह आहे अशा विचारसरणीचे शास्त्रीजी होते. ह्यामुळेच त्यांच्या हातून बहुजन समाजवादी वाङ्मयाची भर घालून आस्थापूर्वक सेवा झाली.

महात्मा फुले यांच्यावरील चिंतन व प्रेम पुढेही उत्तर कालखण्डातही कायम राहिले. उदा. साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष असतानाच मण्डळाचे अनुदानातून 'म. फुले : समग्र वाङ्मय' प्रसिद्ध झाले. म. फुले यांची पुस्तके चांगली छापून काढावीत असे त्यांचे मत ज्योतिनिबंधाच्या (इ. स. १९४७) काळातही होते. 'समग्र फुले वाङ्मया'च्या प्रस्तावनेत त्यांनीच फुल्यांना प्रथमच 'नरव्याघ्र' म्हटले आहे. एकूण महात्मा फुले यांचे विचार वस्तुस्थितीस धरून होते असे शेवटी निष्कर्ष म्हणून सांगितले आहे.

तर्कतीर्थ सत्यशोधक समाज, ब्राह्मो व प्रार्थना समाजाचे प्रत्यक्ष सभासद कधीच नव्हते. तरी आस्थापूर्वक समाजप्रबोधनातील ह्या प्रवाहांचा त्यांनी जो समक्ष पाठपुरावा केला, तो नजरेआड करता येत नाही. कृतज्ञतेने पावती देणे हे एक सार्वजनिक कार्य होय. बहुजन समाजाच्या प्रवाहाची सक्रिय सेवा करणारे पूर्वी राजारामशास्त्री भागवत होऊन गेले. लक्ष्मणशास्त्र्यांचा दुसरा क्रमांक त्याहीपेक्षा व्यापक व समतोल ठरतो. तर्कतीर्थ प्रबोधनाचे समीक्षकही ठरतात. उदा. "सत्यशोधक चळवळ म्हणजे ब्राह्मणेतर चळवळ असे संकुचित रूप गृहीत धरले तर यापुढे या चळवळीला यत्किंचितही भवितव्य नाही, हे निश्चित समजावे. अशा संकुचित रूपामुळेच त्या चळवळीची गेल्या ५० वर्षांत पीछेहाट झाली; तिला विकृत जातिवादाचे रूप आले." [महात्मा फुलेकृत 'सार्वजनिक सत्यधर्म- पुस्तकसार' ह्या पुस्तकातील तर्कतीर्थांची प्रस्तावना पहा.]

## कार्याचा परीघ व वैचारिक व्यास

पूर्व व पश्चिम जग आणि सारा भारत शास्त्रीजींनी पाहिला. साहाजिकच शास्त्रीजींच्या कार्याचा परीघ व विचारप्रधान वाङ्मयाचे क्षेत्र एवढे मोठे आहे की त्या सर्वांचा मागोवा घेणे हे अतिव्याप्त कार्य आहे. अनेक वेळा धक्के देणारे विचार व कार्य त्यांच्यात आढळते. त्यांनी कधी स्वतःला अप्रमादशील मानिले नाही. लोकशाहीला विभूतिपूजा धोकादायक आहे, असे जयप्रकाश यांच्यावर बोलताना त्यांनी सांगितले. लो. टिळक वेदोक्त प्रकरणी चुकले, असे शाहू- महाराजांवर लिहिताना त्यांनी स्वच्छ सांगितले आहे. शास्त्रीजी कोणाच्याही मतस्वातंत्र्याच्या व हितसंबंधाच्या आड येत नाहीत. प्रतिपक्षाचे स्वातंत्र्य मानतात. मोठमोठ्या सभा व परिसंवादात्मक उपक्रम यांचे अध्यक्ष या नात्याने त्यांनी उत्कृष्ट संचालन केले व करीत असतात. शम-दम अंगी असल्यामुळे विरोध व शत्रुत्व वाढवू देत नाहीत. वाद वाढवू देत नाहीत. साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्षस्थान त्यांच्याकडे असताना सत्तेचे व त्यांचे नाते जमले. 'समाज प्रबोधन पत्रिका', 'अस्मितादर्श', 'संशोधन पत्रिका', डॉ. बाबा आढाव व अनिल अवचट यांचे 'पुरोगामी सत्यशोधक' वगैरे समाजप्रबोधक नियतकालिकांना त्यांनी अनुदाने चालू केली. ग्रामीण साहित्य व दलित साहित्य यांनाही

प्रोत्साहन दिले. यांच्या सर्वस्पर्शी सामाजिकतेचा व प्रबोधनासंबंधीचा जिव्हाळाच व्यक्त झाला. हा सर्व कालखंड रचनात्मक व विधायक झाला. सत्तेचा वापर चांगला करून त्यांनी समाजप्रबोधनाच्या कार्यात भरच घातली. सा. संस्कृती मंडळातर्फे व अनुदानातून उत्कृष्ट वाङ्मय निर्माण झाले आहे. हे वाङ्मय मागील प्रबोधनातील प्रेरक विचारसंपदा रक्षण करू शकेल. विश्वकोशातील शास्त्रीजींच्या टिपणी (Notes) देखील प्रबोधक आहेत. उदा. दयानंद सरस्वती यांच्यावरील टिपणी आर्यसमाज व दयानंदांचे कार्य चांगले सांगते. पुणेरी मेंटॅलिटीचा कोणी वरील मण्डळावर अध्यक्ष असता तर वरील सर्व झालेले कार्य एवढ्या पुरोगामित्वाच्या कसोटीस उतरले नसते. पश्चिम महाराष्ट्राखेरीज मराठवाडा-नागपूर-विदर्भ वगैरेंमधील साहित्य सेवकांनाही अनुदाने देण्यात आली. गुणाधिक्य, कार्याधिक्य व ह्यांचे परिणामाधिक्य तपासूनच त्यांच्या कार्याचे मूल्यमापन होऊ शकते; छिद्रान्वेषक दृष्टीला चांगले दिसत नाही. माझ्या व त्यांच्या दरम्यान पक्षभेद झाले नाहीत असे नव्हे. थोडेफार झालेच. मतभेद होऊ शकतात; पण ते कितपत ताणावयाचे हे शास्त्रीजींपासून शिकता येते. त्यांच्या जीवनातील महत्त्वाच्या स्मृती मी लक्षात ठेविल्या आहेत. उदा. पूर्वी पुण्यास एक पशुबळी देणारा यज्ञ झाला. हल्लीच्या काळात यज्ञात पशू बळी देणे, शास्त्रीजींना अर्थात अमान्य होते. यज्ञाला त्यांचा पाठिंबा नव्हता. वाईचे कै. गो. भ. चौण्डेमहाराज यांच्या मते वेदात पशुबळीला आधार नाही; पण असे आधार वेदात आहेत, असे त्यांनी चौण्डे महाराजांना सांगितले, हे स्मरते. पशुबळी यज्ञामुळे महाराष्ट्रात वादळ माजले होते!

तर्कतीर्थांनी चाळीस पन्नास वर्षांत केलेल्या प्राज्ञपाठशाळेच्या आजच्या क्रांतिकारक प्रगतीविषयी त्या वेळच्या सहकाऱ्यांना व पंचक्रोशीतील मण्डळींना त्यांच्या महत्त्वाकांक्षेची कल्पना नव्हती. पण एकूण समाजास बहिःशाल पद्धतीने त्यांनी केलेले शिक्षणदान व उपलब्ध केलेली ज्ञानसाधने ही पाहाता हा एक मोठा ज्ञानसागरच विकासला आहे. हे एक बहि:शाल विद्यापीठच उभे राहिले आहे.

महाराष्ट्रातील प्रबोधनाची चळवळ व त्यातील तर्कतीर्थांचे कार्य निवेदिताना तर्कतीर्थ ही असामान्य व्यक्ती समजावून घ्यावी लागते. यामुळे त्यांच्या यशाचे इंगित समजू शकते. तर्कतीर्थ स्थितप्रज्ञ आहेत. द्रष्टे आहेत. वर्तमानाचा व पुढचाही मागोवा ते घेतात. लक्ष्मणशास्त्री ह्यांना व्यापक कार्य करिता आले याचे कारण त्यांचा नेमस्त स्वभाव होय. पूर्वग्रहदूषितपणाने ते कोणत्याही विषयाकडे पाहात नाहीत. अतिप्राचीन वैदिक काळातच ते रममाण होत नाहीत. पंढरपूरच्या यज्ञाच्या विरोधाला त्यांनी पाठिंबा दिला होता. त्यांची कित्येक राजकीय भाकिते खरी ठरली. उदा. चीनची स्वारी येण्याच्या पाचसहा वर्षे आधी त्यांनी चीनचा धोका बोलून दाखविला होता. ह्या वेळी केवलानंद सरस्वती मंदिराच्या पायाचे काम चालू होते.

## प्रबोधनानुसार कार्य

बहुजन समाजाच्या बाजूचे राजकारण म्हणजे बहुसंख्य जनतेच्या बाजूचे राजकारण असा एक अर्थ महाराष्ट्रात होता व आहे. तथापि राजकारण म्हणजे समाजाचा, देशाचा प्रपंच होय. राजकारण केल्याने होत असते. स्वातंत्र्य आल्यावर निवडणुकीतील एक पक्ष ह्या नात्याने रॅडिकल पक्ष बरखास्त झाला; व शास्त्रीजी विरोधापेक्षा विधायक व रचनात्मक कार्याकडे वळले. इंग्रज जाणार, तो राहणार नाही असे सन १९४७ पूर्वीही शास्त्रीजी सांगीत असत. प्रत्यक्ष तो गेल्यावर शास्त्रीजींनी माननीय यशवंतराव चव्हाण-किसनवीर यांच्या बाजूचे राजकारण केले. ह्या वेळी महाराष्ट्राला स्थिर सरकार प्राप्त झाले होते. प्राज्ञपाठशाळा-'धर्मकोश' व 'विश्वकोश' ही पूर्वीची व शेवटची नवी दोन कार्ये शास्त्रीजींनी वर्धमान ठेविली. प्रबोधनाच्या दृष्टीने ही सर्व कार्ये महत्त्वाची आहेत. शास्त्रीजी प्रा. पा. मंडळाचे प्रमुख होण्यापूर्वी कार्यकारी मंडळावर अब्राह्मण समाजापैकी कोणी नव्हते. श्री. कै. किसन वीर ह्यांचा तर्कतीर्थांनी समावेश केला. श्रीमान यशवंतराव चव्हाण हे म. गांधी व काँग्रेसच्या राजकीय-सामाजिक प्रबोधनातून पुढे आलेले अ. भा. नेते झाले. तरी 'महात्मा फुले व शाहू' प्रबोधनाचे व विद्याप्रसाराचे महत्त्व यशवंतराव कृतज्ञतेने सांगितात. "शाहूमहाराज झाले नसते तर म. फुले यांचे नाव निबंधमालेतच वाचावयास मिळाले असते," असे तर्कतीर्थांच्या बरोबर बोलत असताना त्यांनी म्हटले. शाहूमहाराजांना पुण्यास एम. एस. एम. आर. (मद्रास अँड साउथर्न मऱ्हाटा रेल्वे) च्या प्लॅटफॉर्मवर समक्ष पाहिल्याचेही सांगितले. बहुजन समाजाच्या बाजूने तर्कतीर्थांनी केवळ लिहिले-बोलले असेच नव्हे, तर एकपरी मूळचा फुले-शाहू पक्ष काँग्रेसमध्ये यशवंतरावजींच्या नेतृत्वाखाली कार्य करीत असताना शास्त्रीजींनी वेळोवेळी मार्गदर्शन करून बहुजन समाजाच्या राजकारणाला बौद्धिक व सक्रिय पाठिंबा दिला. हल्ली राजकारणाचे स्वरूप पालटले आहे.

वाई व वाई तालुका, महाराष्ट्र व एकूण भारतात साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष व विश्वकोशाचे प्रमुख संपादक ह्या नात्याने तर्कतीर्थांचे तीस-बत्तीस वर्षे जे कार्य झाले ते, व 'विश्वकोश' आणि 'धर्मको'श यांच्याद्वारे चालू असलेले कार्य हे सर्व प्रबोधनात्मक आहे. म्हणजे पुरोगामी आहे. शास्त्रीबुवांनी प्राज्ञ पाठशाळेला आधुनिक काळानुसार परिवर्तित केले. शाळेचा प्राज्ञप्रेस काढून स्वावलंबनाने अनेक ग्रंथ व पुस्तके प्रकाशित केली. 'नवभारत' चालवावयास घेऊन ते समाजप्रबोधनार्थ चालविले. त्याचे ध्येयधोरण एकपक्षीय, एककल्ली, विशिष्ट सांप्रदायी किंवा केवळ प्रचारकीय ठेविले नाही. चर्चेला, चिकित्सकतेला व संशोधनाला वाव दिला जातो. शास्त्रीजी स्वपक्षाचा बिनहिशेबी अहंकार किंवा अभिनिवेश धरीत नाहीत, हे नवभारताच्या वाचकांना, लेखकांना व अन्य सर्व संबंधितांना अनुभविण्यास मिळाले असेलच. राजकारणात वर्तमान काळानुसार पत्कराव्या लागलेल्या स्वपक्षाची ते समीक्षा-मीमांसा करतात. त्रुटी व वैगुण्य सांगतात. त्यांच्यात सांप्रदायिकता जशी नाही, तसेच पक्षीयतादेखील सापडली नाही. आणीबाणीला विरोध दर्शवून त्यांनी लोकशाहीची बाजू

घेतली. निधर्मीवादाचे समर्थन करण्यात त्यांनी त्यांची बुद्धिमत्ता खर्ची घातली. लोकशाही व निधर्मीवाद हा गेल्या शतकात होऊन गेलेल्या प्रबोधनाचा स्वातंत्र्यातील परिपाक आहे. ह्या झालेल्या प्रबोधनात्मक एकूण कार्यावरूनही त्यांच्या कार्याचे व्यापक स्वरूप कळेल. वरील ह्याही काळात अस्पृश्यतानिवारण वगैरे प्रबोधनातील मुद्द्यांच्याकडे त्यांनी दुर्लक्ष केले नाही. उत्तर हिंदुस्थानातील पुरीच्या शंकराचार्यांनी काही वर्षांमागे जातिवर्णधर्माला प्राधान्य देऊन दलितादी समाजांना न रुचणारे, न परवडणारे भाषण केले. वाईच्या वसंत व्याख्यानमालेतील त्या वेळच्या भाषणात तर्कतीर्थांनी शंकराचार्यांचे मुद्दे खोडले व पुरुष सूक्तदेखील प्रक्षिप्त असल्याचे सांगितले. वर्तमान प्रश्नावर प्रतिवर्षी व्याख्यान देऊन ह्या साठ वर्षांपेक्षा जास्ती वर्षे सतत चाललेल्या वाई व. व्या. मालेतूनही शास्त्रीजींनी समाजप्रबोधन केले. वरील व्याख्यान गाजले होते. पुढे संबंधित शंकराचार्यांवर केंद्र सरकारने खटलाही भरला होता. वाईत मुलांचे एकमेव हायस्कूल होते. सन १९५६ साली महर्षि शिंदे हायस्कूल सर्वसामान्य ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी काढण्यात आले. त्याच्या उद्घाटनप्रसंगी माननीय यशवंतरावांसमवेत शास्त्रीजी उपस्थित होते व नव्या इमारतीचे पायापूजन तर्कतीर्थांनी केले. प्राज्ञपाठशाळेतर्फे एकलव्य विद्यार्थी वसतिगृह अनेक वर्षे हरिजन विद्यार्थ्यांसाठी प्राज्ञ पाठ शाळेच्या मालकीच्या द्रवीड वाड्यात चालविले. संस्था चालविणे हे सर्वांत अवघडांतील अवघड काम होय, असे एक वाक्य त्यांचे म्हणून पूर्ण आठवते. या दृष्टीने प्राज्ञपाठशाळेचे धुरिणत्व त्यांनी दीर्घ वर्षे सतत केले आहे. त्यांच्या कारकिर्दीत प्रतिवर्षी होणाऱ्या सरस्वती उत्सवात आधुनिक काळाच्या दृष्टीने वर्तमान विषयांवर विद्वानांची व्याख्याने ठेवून त्यांनी श्रोत्यांना ज्ञानदान केले आहे. इंदिरा गांधी, राधाकृष्णन्, राजेंद्रप्रसाद वगैरे थोर थोर पुरुषांना वाईस बोलावून त्यांच्या दर्शनाचाही लाभ शास्त्रीजींनी लोकांना घडविला. महाराष्ट्रातील प्रबोधनात शिक्षणप्रसार व त्यातल्या त्यात ग्रामीण बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार विशेषतः वाढविणे हा मोठा मुद्दा होता. वाईस कॉलेज काढण्यात व ते त्याच्या बालपणी चालविण्यात शास्त्रीजींचे श्रम व नेतृत्व महत्त्वाचे मानले पाहिजे.

### शेवटी

महाराष्ट्रातील प्रबोधनाचा विद्यमान विचार केल्यानंतर असे जाणवते की, रानडे-भाण्डारकर यांना अभिप्रेत असणारे प्रबोधन प्रगत होऊन ते जनतेपर्यंत पोहोचले नाही. ''फुले-आंबेडकर" यांच्यावर जास्ती विचारप्रपंच चालू असतो. महाराष्ट्रातील मार्क्सवादी व समाजवादी शहरांतूनच राहिले आहेत. स्वातंत्र्य आल्यामुळे लो. टिळकांची ध्येयपूर्ती झाली आहे. आगरकरांच्या बुद्धिवादाला खतपाणी घालणारे तर्कतीर्थांसारखे थोडेच दिसतात. स्वातंत्र्य आल्यावर प्रबोधन वर्धमान न होता एकपरी पुच्छप्रगती चालल्याचीही दिसते! तर्कतीर्थांच्या 'सार्वजनिक सत्यधर्मसार' (१९७३) ह्या माझ्या पुस्तकाच्या प्रस्तावनेतील पुढील काही भाग सादर करून वाचकांची रजा घेत आहे.

"बहुजनसमाज हा उच्चनीच जातिभेदाच्या अहंकाराने फुटीर, विस्कळीत व दुर्बळ झाला आहे; अंधश्रद्धेच्या अंधारात चाचपडत आहे; लोकभ्रमाची पिशाच्चे व भुते अजून बहुजनसमाजाच्या मानगुटी पकडून बसली आहेत; त्याच्यात विचारक्रांती झाल्याशिवाय नवजीवनाच्या प्रेरणा प्राप्त होणार नाहीत. त्याचे एकजीव सामर्थ्यशाली समाजात रूपांतर होण्याची गरज आहे."

"सर्व मानवजातीचा धर्म एकच आहे; प्रस्थापित हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन इत्यादी धर्मसंस्था मानवामानवांत फूट पाडतात; त्यामुळे मानवी प्रगती खुंटते."

**(नवभारत मासिक, फेब्रुवारी - मार्च, १९८१, पृ.१८ ते ३३)**

OOO

# २४.
# शास्त्रीजींचा सामाजिक विचार
## रा. ग. जाधव

आपल्या आवडत्या व आदरणीय व्यक्तींबद्दल जिव्हाळ्याच्या भावना व्यक्त करण्याची किंवा सूचित करण्याची प्रत्येक समाजाची विशिष्ट रीत असते. महाराष्ट्रीय समाज याला अपवाद नाही. महाराष्ट्राने तर्कतीर्थ म्हणूनच माननीय लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा स्वीकार केला. तर्कसंगती महाराष्ट्राला आवडते, एवढाच याचा अर्थ नाही. तर्कसंगतीला तीर्थरूपताही असावी म्हणजे एक प्रकारचे वैचारिक पावित्र्य किंवा शुद्धता तीत असावी, असाही त्याचा अर्थ आहे. पावित्र्य आणि शुद्धता यांचा या ठिकाणी अर्थ एवढाच की, परंपरेने पवित्र आणि शुद्ध मानलेल्या गोष्टींना म्हणजे आचारविचारांना, अज्ञानाने वा अर्धज्ञानाने क्रांतिकारक धक्के देण्याचे टाळणे. शास्त्रीजींकडून गेली साठ वर्षे शेकडो अशिक्षित-सुशिक्षित मराठी माणसांनी व्याख्यान रूपाने जे विचार ऐकले, त्यांत तर्कसंगती आणि तीर्थरूपता या दोन्ही गोष्टी होत्या. शास्त्रीजींनी बोलत राहावे व आपण ऐकत राहावे, अशीच मराठी माणसाला आता सवय झाली आहे. गेली ६० वर्षे शास्त्रीजी बोलतच आले आहेत. व्याख्याने हे त्यांचे जीवनव्रत आहे. लिहिण्यापेक्षा बोलणे त्यांना अधिक आवडते; कारण भाषणातून एकाच वेळी शेकडो लोकांच्या अंतःकरणात ज्ञानज्योती पेटवता येतात. लेखन हे मराठीत तरी पुष्कळदा विद्वानांनी विद्वानांसाठी केलेले ठरते. शास्त्रीजींना म्हणूनच ते भाषणाइतके प्रिय नाही. वक्तृत्व हेच त्यांचे पहिले प्रेम आहे.

-याचे कारण आहे: शास्त्रीजींचे अवघे जीवन सामाजिक जाणिवांनीच प्रवृत्त झाले आहे. समाजाची स्थितिगती, समाजाची परंपरा आणि प्रगती, समाजाचा इतिहास आणि भवितव्य याच गोष्टी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची केंद्रीभूत प्रेरणा आहे. केव्हाही आणि कधीही हा माणूस एका किंवा अनेक सामाजिक प्रश्नांशी मनोमन झगडा करीत आहे, असेच आढळते. तुकारामाप्रमाणेच अहोरात्र त्यांचा मनाशी संवाद चाललेला असतो आणि रामदासाप्रमाणे एखाद्या शिवथरच्या घळीत जाऊन त्यांचे मन त्या सामाजिक समस्येचे चिंतनमनन

करीत असते. सामाजिक विचारांचे अखंड अग्निहोत्र त्यांच्या मनोवेदीत धगधगत असते. सामाजिक जाणिवांची अशी नैसर्गिक बांधिलकी पत्करून शास्त्रीजींनी आधुनिक संस्कृतीच्या मध्यधारेत अखंडपणे जीवन व्यतीत केले. त्यामुळे कोणत्याही सामाजिक चळवळीबद्दल किंवा विचारप्रणालीबद्दल शास्त्रीजींचे म्हणणे काय आहे, हे ऐकण्यास मराठी माणूस नेहमीच समुत्सुक असतो. त्यांचे विचार ऐकण्याचे एक चिरंतन कुतूहल मराठी मनाला सतत वाटत असते. शास्त्रीजींशी विचारोत्सुक असे एक अपूर्व नाते मराठी माणसांनी बांधलेले आहे. घरातील वडीलधाऱ्या माणसाकडून अडेल त्या प्रश्नावर मार्गदर्शन घेण्याची प्रवृत्ती लहानांत असते; शास्त्रीजींबद्दल महाराष्ट्राने बाळगलेली प्रवृत्ती याच प्रकारची आहे. आधुनिक काळातील अशी एकही सामाजिक चळवळ वा विचारप्रणाली नाही, की जिच्याशी शास्त्रीजींचा संबंध आला नाही. पण हे म्हणणेही तितकेसे अचूक नाही. खरी गोष्ट अशी आहे, की प्रत्येक सामाजिक चळवळ आणि विचारप्रणाली यांचा शास्त्रीजींशी संबंध लावण्याची सवय मराठी समाजाला जडलेली आहे. या सवयीच्या मुळाशी समाजाची एक श्रद्धा आहे. ती अशी की त्या चळवळीचा आणि विचारप्रणालीचा तर्कसंगत आणि सखोल असा अर्थ आणि अन्वय करण्याची शास्त्रीजींमध्ये एक अनन्यसाधारण क्षमता आहे. अनन्यसाधारण म्हणण्याचे कारण असे की, कोणत्याही भावनेच्या आहारी न जाता एकान्तिकता आणि आलंकारिकता या मोहांना बळी न पडता आणि फसव्या बंडखोरीचा व सनसनाटी विध्वंसकतेचा आव न आणता एखाद्या सामाजिक प्रश्नाची वास्तव आणि व्यासंगपूर्ण मीमांसा शास्त्रीजी करू शकतात. मुख्य म्हणजे या त्यांच्या समतोल विवेकनिष्ठेवर लोकांची श्रद्धा आहे. ती अजूनही टिकूनच आहे.

देशातील टिळकयुगाच्या शेवटच्या टप्प्यात शास्त्रीजींच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण झाली. वयाच्या १४ व्या वर्षी ( १९१४) ते वाईच्या प्राज्ञपाठशाळेत दाखल झाले. राष्ट्रीय विचारांनी भारलेल्या व पुरोगामी विचारांनी प्रदीप्त झालेल्या पाठशाळेच्या वातावरणात त्यांनी भारतीय संस्कृतीच्या ज्ञानसंपन्न वैदिक वारशाचा सखोल अभ्यास केला. लोकमान्य टिळक, मानवेंद्रनाथ रॉय, महात्मा गांधी यांच्या विचारकार्याचा त्यांनी साक्षेपाने अंगीकार केला. त्यांच्या वैचारिक जडणघडणीचा काळ म्हणजे गांधीयुग हाच होय. स्वातंत्र्याच्या आंदोलनात यांनी सक्रिय भाग घेतला व प्रसंगी कारावासही पत्करला. गांधीयुगातील ह्या सर्वंकष स्वरूपाच्या राजकीय-सांस्कृतिक चळवळीच्या प्रेरणा त्यांनी आत्मसात केल्या. पण या सर्व वातावरणात व्यासंगाची, अभ्यासाची, चिंतन-मननाची वाट त्यांनी कधी बदलली नाही. आधुनिक विचारवंत म्हणून जर एखादा नमुना आपण उभा करू शकलो, तर त्यासाठी शास्त्रीजींच्याच व्यक्तिमत्त्वाचा आधार घ्यावा लागेल.

गांधीयुगातील सामाजिक विचार हा राजा राममोहन रॉयपासून झालेल्या सर्वंकष प्रबोधनाच्या चळवळीतूनच प्रगत झालेला होता. धर्मसुधारणा हे त्या चळवळीचे पहिले पर्व

होते. भारतीय समाज-व्यवस्था ही धर्मप्रणितच होती. शास्त्रीजींनी महाराष्ट्रातील धर्मसुधारणा आंदोलनाचे मार्मिक विश्लेषण केलेले आहे. त्यांनी म्हटले आहे,

"हिंदुसमाजसंस्था धर्मग्रंथांवर उभारली आहे. या धर्मग्रंथांचे प्रणेते दिव्यदृष्टीचे लोक होते किंवा वेद हे अपौरुषेय अथवा ईश्वरोक्त आहेत, या श्रद्धेवर प्रहार करण्याकरिता समाजनेता व धर्मनेता जो ब्राह्मणवर्ग, त्याच्या विद्या कशा अपूर्ण आहेत ; सद्यःकालीन समाजप्रगतीला का विरोधी आहेत, हे चिकित्सक दृष्टीने दाखवून दिले."

हे चिकित्सक दृष्टीने दाखवून देण्याचे कार्य लोकहितवादी आणि म. जोतिबा फुले यांनी कसे केले, हे शास्त्रीजींनी मार्मिकपणे दाखवून दिले आहे. महाराष्ट्राच्या धर्मसुधारणेच्या आंदोलनाला प्रार्थना समाज व सत्यशोधक समाज यांनी जी तात्त्विक अधिष्ठाने मिळवून दिली, त्याचेही मर्म शास्त्रीजींनी विशद केले आहे. ते म्हणतात:

''शुद्ध नैतिक जाणीव व विश्वरचनेच्या चमत्काराची अनुभूती हीच ईश्वराच्या जाणिवेला प्रकट करते, असा ह्या तात्त्विक भूमिकेचा आशय आहे. दुष्ट चालीरीती, गुलामगिरी आणि स्त्रीपुरुषांतील विषमता नष्ट करण्याचे सामर्थ्य, अशी तात्त्विक भूमिका दृढ झाल्यामुळेच प्राप्त होते. सामाजिक सुधारणा हे त्याचे प्रत्यक्ष प्रत्यंतर होय, अशी प्रार्थनासमाज व सत्यशोधक समाज यांची भूमिका होती.''

-वरील प्रकारच्याच मार्मिक मीमांसा इतरही भारतीय प्रबोधनकारांच्या विचारांसंबंधी शास्त्रीजींनी मांडलेल्या आहेत.

सामाजिक परिवर्तनातील पारंपरिक धर्मसंस्थेचा अडथळा कशा प्रकारचा आहे, त्याची मार्मिक मीमांसा करून आधुनिक काळात एकूणच धर्ममूल्यांचे स्थान कितपत आहे, यासंबंधीचा मूलगामी विचार शास्त्रीजींनी 'हिंदुधर्माची समीक्षा' ह्या प्रबंधात केला आहे: "धर्मसंस्थेपेक्षा उच्चतर अशा सामाजिक संस्था आता निर्माण होऊ लागल्या आहेत. धर्मसंस्थेने मानवसमाजार्थ पूर्वी जी कामगिरी बजावली, तीच कामगिरी अधिक कुशलतेने व उच्च भूमिकेत राहून पार पाडणारी साधने व संस्था समाजाने निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे." ही साधने व संस्था समाजवादी तत्त्वावर अधिष्ठित व लोकसत्तेच्या राज्यघटनेने युक्त असली पाहिजेत, अशी शास्त्रीजींची भूमिका आहे.

नव्या समाजाचे स्वप्न आणि संस्थापना यांची मुळे मात्र वैदिक संस्कृतीच्या परंपरेतच आहेत, हा शास्त्रीजींचा अत्यंत महत्त्वाचा व मूलभूत विचार होय. या विचारांचा ऐतिहासिक दृष्टिकोनाने व अत्यंत विस्तृत स्तरावर घेतलेला मागोवा त्यांच्या 'वैदिक संस्कृतीचा विकास' ह्या श्रेष्ठ ग्रंथात आढळून येतो. आधुनिक समाजाची किंवा सामाजिक प्रबोधनाची ''नूतन ध्येये ही आपल्या परंपरेचीच नवपरिणती आहे. व्यासांनी मानवव्यवहाराला, लोकव्यवस्थेला व समाजसुधारणेला मुख्यत्व देऊन शाश्वत नैतिक मूल्यांनाही सापेक्ष ठरविले, मानव्याला मध्यवर्ती स्थान दिले. वेदांपासून तो शंकराचार्यांपर्यंत तत्त्ववेत्त्यांनी सत्याच्या नित्य समीक्षेचा

व संशोधनाचा अग्नी जागृत ठेवला. हिंदुधर्माचा हा थोर वारसा भारतीयांना मिळालेला आहे.''

कालचा वारसा, आजच्या समस्या आणि उद्याचे स्वप्न यांचा मेळ घालणे ही अत्यंत अवघड गोष्ट शास्त्रीजींनी पार पाडण्याचा प्रयत्न केला. 'तर्कतीर्थ', 'लक्ष्मणशास्त्री' अशी पारंपरिक विद्वत्तेची बिरुदे त्यांनी स्वतःही निर्भयपणे वागविली आणि महाराष्ट्रानेही ती बिरुदे मान्य केली. जणू वैदिक परंपरेतील व्यासादिक मुनींचा आणि आर्य शंकराचार्यांचा वैदिक वारसाच त्यांनी या बिरुदांच्या रूपाने टिकवून ठेवला. हा प्राचीन वारसा न सोडताही नवा समाजवादी समाज आणि लोकशाही शासन यांचा त्यांनी आयुष्यभर पुरस्कार केला. ब्राह्मणेतर समाज, दलित समाज, ग्रामीण समाज यांच्या नव्या न्याय्य आकांक्षांशी समरस होऊन, पारंपरिक समाजात या वर्गांवर कसा अन्याय झाला, हेही त्यांनी दाखवून दिले. या उपेक्षित समाजातील कार्यकर्त्यांचे आणि कार्याचे मर्म आणि महत्त्व त्यांनी आपल्या लेखन-भाषणांतून परोपरीने स्पष्ट केले. शास्त्रीपणा आणि आधुनिकता यांच्यातील तथाकथित विसंगती त्यांनी स्वतःच्या आचारविचारांनी अर्थशून्य करून दाखविली. लो. टिळकांना तेल्या तांबोळ्यांचे पुढारी म्हणून एकेकाळी हिणवण्यात आले होते. महाराष्ट्रातील सामाजिक प्रबोधनाच्या चळवळीतील तेल्यातांबोळ्यांचे पुढारी असेच शास्त्रीजींचे वर्णन करणेही योग्य ठरेल. एकीकडे भारतीय परंपरेतील अक्षर विचारधन जतन करणारे 'धर्मकोशा'सारखे महान कार्य त्यांनी केले, तर दुसरीकडे आधुनिक ज्ञानविज्ञानांचा अगदी सामान्य माणसाला परिचय करून देणारा मराठी 'विश्वकोशा'सारखा प्रकल्पही त्यांनी उभा केला. श्रेष्ठ परंपरेचा चंद्र आणि उचित आधुनिकतेचा सूर्य अशा चंद्रसूर्याच्या पूर्ण संगतीचा ज्ञानाकाशातील एक चमत्कार शास्त्रीजींनी करून दाखविला. म्हणूनच मानवेंद्रनाथ रॉय यांनी 'द बेस्ट प्रॉडक्ट ऑफ द इंडियन रेनेसान्स' अर्थपूर्ण शब्दांत त्यांचा गौरव केला.

'विश्वकोशा'सारखे शासनाधारे चालणारे सांस्कृतिक प्रकल्प उभे करणे ही परंपरा आणि आधुनिकता यांच्यातील कालोचित संगती दाखवणारी सामाजिक बांधिलकी मानणाऱ्या ज्ञानवंतांची जबाबदारीच आहे. बहुजनसमाज नव्या ज्ञानप्रेरणांनी आता जागा होत आहे. आधुनिक ज्ञानविज्ञानांची एक अभिरुचीच समाजात निर्माण होत आहे. स्वातंत्र्योत्तर काळात, विशेषतः भाषिक राज्यांच्या स्थापनेनंतर अनेक भारतीय भाषांत 'विश्वकोशा'सारखे प्रकल्प शासकीय मदतीने सुरू झाले आहेत. नव्याने साक्षर आणि सुशिक्षित होत जाणाऱ्या भारतीय बहुजनसमाजाची ज्ञानतृष्णा वाढत आहे. ही सामाजिक गरज एका शुद्ध ज्ञानैक दृष्टीने भागविणे हे प्रबोधनकार्याचेच एक स्वरूप आहे. या बाबतीत महाराष्ट्र राज्याने पहिले पाऊल टाकले आणि त्याची पुढील वाटचाल शास्त्रीजींच्या नेतृत्वाखाली होत राहिली, या गोष्टीला मराठी समाजाच्या दृष्टीने एक निश्चितच महत्त्व आहे. कल्याणकारी शासनालाही विविध क्षेत्रांत सामाजिक कल्याणाच्या योजना राबविण्यास कल्पक आणि कर्तृत्ववान

व्यक्तींची गरज असतेच. मराठीतील ज्ञानविज्ञानाच्या क्षेत्रात 'मराठी विश्वकोश' प्रकल्पाच्या रूपाने शास्त्रीजींनी एक सांस्कृतिक कार्यच उभे केले, असे म्हणता येईल. विश्वकोशरचना ही स्वतंत्र भारतातील एक देशव्यापी चळवळच आहे. तिचे प्रवर्तन करण्याचे श्रेयही शासन आणि विद्वत्ता यांचा बहुजनसमाजाच्या गरजेच्या दृष्टीने मेळ घालणाऱ्या प्रबोधनप्रवृत्तीलाच आहे. मराठी विश्वकोश प्रकल्प या दृष्टीनेही समजून घेता येतो.

शास्त्रीजी आज वयाची ऐंशी वर्षे पूर्ण करून शंभरीकडे वळत आहेत. त्यांचे सामाजिक विचारकार्य आणि त्याचे महाराष्ट्राच्या संस्कृतीतील महत्त्व हे निश्चितपणे सांगणे अवघड आहे. त्यांच्या कार्याचे मूल्यमापन होण्यास आणखी काही काळ जावाच लागणार. कारण अजूनही शास्त्री कार्यरतच आहेत. तथापि त्यांच्या सामाजिक विचारकार्याचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य सहजपणे लक्षात येते. ते म्हणजे परंपरा आणि आधुनिकता यांचे एक समतोल भाष्यकार हीच त्यांची मुख्य भूमिका आहे. कोणत्याही सामाजिक विचारप्रणालीचे किंवा चळवळीचे मूळ आणि कूळ हेरून तिच्या महत्त्वाबरोबरच तिच्या मर्यादाही समाजापुढे स्वच्छपणे मांडण्याची शास्त्रीजींची भूमिका असते. त्यामुळेच एखाद्या विशिष्ट चळवळीशी किया विचारप्रणालीशी संपूर्ण अशी बांधिलकी त्यांनी कधीच स्वीकारली नाही. हत्तीचे वर्णन त्याचे एकेकच अंग चाचपून करण्याचा आपला मोह शास्त्रीजींनी टाळला. त्यामुळे समाजाच्या एखाद्या चळवळीतील किंवा विचारप्रणालीतील धोके दाखवून देण्याचे अप्रिय कामही त्यांनी सतत केले आहे. म्हणूनच यांच्या सामाजिक विचारकार्यात कृतीपेक्षा चिंतनावर आणि महत्त्वापेक्षा मर्यादेवर अधिक भर असलेला दिसून येतो. सगळ्याच समाजांच्या व सगळ्याच विचारवंतांच्या व सगळ्याच संस्थांच्या व चळवळींच्या मेळाव्यांत शास्त्रीजी रमू शकतात. याचे कारण, त्यांच्या समतोल विवेकवादावर या सर्वांचाच विश्वास असतो हे होय.

वयाच्या ८१ व्या वर्षी शास्त्रीजींशी सामाजिक विषयांवर बोलताना आज एक प्रकारचा विषण्णतेचा सूर ऐकू येतो. गेल्या दीड-दोनशे वर्षांतील भारतीय प्रबोधनाची फलश्रुती शून्यवत आहे, हे त्यांना अर्थातच मान्य नाही. भारतातील सामाजिक परिवर्तनाची चळवळ पुष्कळशी यशस्वी झाली, असेच त्यांचे मत आहे; तथापि नवी सामाजिक व राजकीय आव्हाने पेलण्याची आपल्या समाजाची कुवत मात्र कमी झाली आहे, असे त्यांना वाटते. ही कुवत आपण का निर्माण करू शकलो नाही, या प्रश्नाशी शास्त्रीजी आज काहीसे अडखळत आहेत, असे वाटते. आपल्या समाजात विचारांचे स्वातंत्र्य आणि सामर्थ्य यांवरील विश्वासच कमी झाला आहे, याबद्दल ते मनस्वी व्यथित झालेले दिसतात. कदाचित ही त्यांची व्यथा खरीही असेल; वस्तुस्थिती इतकी हाताबाहेर गेलेली आहे असे सर्वांनाच वाटेल असे नाही. श्रेष्ठ विचारवंत आणि भाष्यकार हे नेहमीच एका आदर्श समाजव्यवस्थेच्या मागे धावत असतात. व्यासांनासुद्धा शेवटी विलक्षण वैफल्य आले होते. शास्त्रीजींना तशीच विषण्णता जाणवत असावी! पण समाज वैफल्याचे हे सगळे चक्रनेमिक्रम पचवून पुढेच जात असतो.

समाजाच्या या पुढे जाण्याच्या सामर्थ्यावरील श्रद्धा निर्माण करण्याचे कार्य शास्त्रीजींसारखे प्रज्ञावंत भाष्यकारच निर्माण करीत असतात. ते आळवितात तो विषण्णतेचा सूर हाच समाजाला नवे चैतन्य देणारा ठरतो. आपल्या निराशेतूनच असे थोर लोक समाजाची आशा जिवंत ठेवत असतात.

समाज आणि थोर विचारवंत यांच्यातील आशा-निराशांचे गणित, मी वर म्हटले आहे तितके, सुलभ आणि सोपे आहे, असे मलाच वाटत नाही. व्यक्तिसमष्टीसंबंध हे अनेकदा विरोधाभासात्मक (पॅरॉडॉक्सिकल) असतात, हे खरे; म्हणजे थोर विचारवंताला आयुष्याच्या संध्याकाळी जाणवणारी निराशा समाजाच्या नव्या आशेची पहाट सूचित करते हे खरेच; पण अशी अटकळ बांधणे हे सामाजिक विचारातील एक अतिसुलभ असे समीकरण ठरते, हेही खरे आहे. आणि हे सर्व मनात येते त्याचे खरे कारण तर अगदी वेगळेच आहे. ते कारण आहे, शास्त्रीजींच्या अंतर्मनातील पुष्कळदा जाणवणारा एक प्रकारच्या शून्यवादाचा स्वर!

समाजातील आणि संस्कृतीतील उपेक्षित किंवा दुर्लक्षित विचारधारांचे नेमके यथार्थदर्शन घडविण्याचे कार्य शास्त्रीजींनी अखंडपणे केले, अजूनही करीत आहेत. हे जीवनव्रत अबाधितपणे चालविण्यासाठी समाजावर आणि त्याच्या प्रगतिपरतेवर श्रद्धा ठेवणे भागच आहे. शास्त्रीजींनी अशी श्रद्धा निश्चितच जपली; तथापि समाजापेक्षाही त्यांची खरी श्रद्धा ही माणूस म्हणून असणाऱ्या माणसाच्या अस्तित्वावर विशेष आहे, असे जाणवते. शास्त्रीजींचा विश्वास माणसावर आहे आणि एका दृष्टीने हा माणूस समाजनिरपेक्षच आहे. किंबहुना माणसाचे माणूस म्हणून असणारे महत्त्व हे केवळ समाजसापेक्ष नाही, अशीच त्यांची धारणा असावी! म्हणूनच भारतातील मुस्लिमांचा प्रश्न, तसेच दलितांचा प्रश्न हे अखेरपक्षी बहुसंख्याक हिंदू समाजाचे प्रश्न आहेत, असे त्यांना वाटते. त्यांच्या दृष्टीने मुस्लीम, दलित, नवबौद्ध ही धार्मिक-सामाजिक विशेषणं माणूस या मुख्य विशेष्याच्या दृष्टीने तितकी महत्त्वाची नाहीत. माणसाचे माणूस म्हणून असलेलेच हे प्रश्न आहेत, अशीच त्यांची मनोमन भूमिका आहे; आणि म्हणून भारतीय सामाजिक प्रश्न आज अवाढव्य रूप घेताना दिसत आहेत, ते सोडविण्यासाठी माणूस या मूलभूत पातळीवरच त्यांची सोडवणूक करावी लागेल, असे शास्त्रीजींना वाटते. म्हणूनच सामाजिक माणसापेक्षा आर्थिक व आध्यात्मिक माणूच हाच त्यांच्या सामाजिक विचारांतील केंद्रीभूत विषय ठरतो.

सामाजिक निष्ठेपेक्षा मानवनिष्ठा अधिक महत्त्वाची मानणे हे भारतीय संस्कृतीचेच निदर्शक आहे. वैदिक संस्कृतीने स्वीकारलेली ही मानवश्रद्धाच शास्त्रीजींच्या अंतर्मनात रुजलेली आहे. तिचा संबंध आधुनिक पश्चिमी संस्कृतीमधील मानवी हक्कांच्या संकल्पनेशी नसून तो भारतीय संस्कृतीतील सारभूत तत्त्वांशीच आहे, असे दिसून येते. ही भारतीय श्रद्धा स्वीकारली, की तिचेच आणखी एक उपप्रमेयही स्वीकारावे लागते. ते म्हणजे, व्यक्तिजीवनाचे अंतिम मूल्य हे काय आहे, हे ठरविण्याचे! शास्त्रीजींचा मोक्षकल्पनेवर विश्वास नाही. खरे

तर त्यांचा आवडता दार्शनिक म्हणजे श्रेष्ठ बौद्ध आचार्य व तत्त्ववेत्ता नागार्जुन हा आहे, असे मला वाटते. नागार्जुन हा शून्यवादी होता; पण त्याच्या शून्यवादाचा अर्थ वैशिष्ट्यपूर्ण आहे. शून्यवाद म्हणजे जगाला अस्तित्वच नाही असे नाही; तर जगाचे अस्तित्व हे सापेक्ष आहे, निरपेक्ष नाही, असा त्याचा अर्थ बाहेर लोकसंमत किंवा व्यावहारिक सत्याच्या दृष्टीने जगाला अस्तित्व आहे, पण पारमार्थिक दृष्टीने मात्र जग शून्य आहे. नागार्जुनाने एक गोष्ट स्पष्ट केली आहे. ती अशी की, पारमार्थिक शून्यतेवर श्रद्धा ठेवूनही लौकिक जीवनात लोकसंमत संकेतांचा स्वीकार करूनच जगावे लागते. निर्वाणाची कल्पनाही त्याच्या दृष्टीने शून्यात्मकच आहे. शास्त्रीजींनी आपल्या सामाजिक विचारकार्यात जवळजवळ पाच तपे प्रखर अशा पुरोगामी दृष्टीने सामाजिक प्रबोधनाचा पुरस्कार केला. पण हे सर्व करत असताना त्यांच्या मनात एक नागार्जुन पहिल्यापासून ध्यानस्थ बसलेला आहे. या नागार्जुनाबद्दल कधीतरी त्यांनीच आपल्याला सविस्तरपणे सांगितले पाहिजे, असे मला वाटते...

**(नवभारत मासिक, फेब्रुवारी-मार्च, १९८१ पृ. ७२ ते ७६)**

OOO

## २५.

# परिवर्तनाचे मार्गदर्शक: तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

### दिनकर साक्रीकर

प्राचीन भारतीय ऋषींच्या दोन परंपरा, भिन्न आणि परस्परविरोधी पण.

एक परंपरा वसिष्ठाची कठोर असहिष्णु, शब्दप्रामाण्यवादी. सीतेने अग्निदिव्य करावे, नाही तर तिचा त्याग करावा. शंबुकाने वेदाध्ययन केले, त्याचा शिरच्छेद केलाच पाहिजे. स्त्री आणि शूद्र या दोघांच्याही बाबतीत वसिष्ठ रामाला आग्रही आदेश देतात आणि आपल्या इच्छेप्रमाणे कृती करवून घेतात.

दुसरी परंपरा वाल्मिकीची- सहृदयतेची, सहिष्णुतेची, मानण्याची. त्यांचा राम मर्यादापुरुषोत्तम आहे- एकवचनी, एकपत्नी, एकबाणी, समाजाला निष्ठेचा, संयमाचा, आत्मत्यागाचा चिरंतन आदर्श देणारा.

समाजमनावर प्रभुत्व मिळविण्यासाठी या दोन परंपरांमध्ये अखंड स्पर्धा व संघर्ष होतो. वसिष्ठपरंपरा वरचढ झाली, की समाज अवरुद्ध होतो, ज्ञानशून्य शब्दांचे महत्त्व वाढते, सहिष्णुतेवर कठोरतेची आणि आत्मत्यागाऐवजी आत्मकेंद्रिततेची प्रतिष्ठा अधिक प्रभावी होते. वाल्मिकी-परंपरेतून समाज गतिशील होतो, ज्ञानसाधनेसाठी धडपडू लागतो आणि माणुसकीची मूल्ये अधिक महत्त्वाची होतात.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे या वाल्मिकी-परंपरेचे आधुनिक प्रतिनिधी वाटतात. त्यांची ज्ञानसाधना ही एक कठोर तपश्चर्याच होती. व्रतस्थाचे अनुशासन आणि जिज्ञासूचा धर्म अत्यंत काटेकोरपणे पालन करूनच ते 'तर्कतीर्थ' झाले, 'शास्त्री' झाले; पण ज्ञानाची गर्वोद्धतता आणि तपस्व्याची असहिष्णुता त्यांना स्पर्श करू शकली नाही. दया, क्षमा, शांती हे संतांच्या विभूतीचे गुण त्यांच्या व्यक्तिमत्त्वात विकसन पावले. ज्ञानाने त्यांना दिली निर्भयता आणि परमतसहिष्णुता.

ज्ञानामुळे कृतीचा मार्ग स्वच्छ दिसतो आणि त्या स्वच्छ, निर्भय कृतीतून विचार समृद्ध होतो, या मार्क्सच्या सूत्राचा त्यांचे जीवन हा एक संपूर्ण प्रयोग आहे.

तत्त्वज्ञांनी आतापर्यंत जीवनाचा अर्थ सांगण्याचा प्रयत्न केला; आता हे जग बदलण्याचे कार्य त्यांनी करावयाचे आहे, अशा भूमिकेतून या तत्त्ववेत्त्याने केवळ तत्त्वचिंतन व तत्त्वनिरूपणावर समाधान न मानता पारतंत्र्यातून स्वातंत्र्य आणि स्वातंत्र्यातून मानवनिष्ठ समाजवाद निर्माण करण्याच्या प्रक्रियेतही सहभाग घेतला.

वेदशास्त्रसंपन्न तर्कतीर्थांनी महात्मा गांधी, मानवेंद्रनाथ रॉय आणि कार्ल मार्क्स यांच्या विचारांचा एक सुरेख संगम आपल्या वैचारिकेत साधला. परंपरा आणि आधुनिकता यांचा बीज आणि फळासारखा असलेला संबंध त्यांच्या विचार-आचार-संपन्न जीवनातून प्रतीत होतो.

आपली वैचारिक जडणघडण कशी झाली, याचे वर्णन शास्त्रीजींनी 'नवभारत'च्या विशेषांकातील मुलाखतीत दिले आहे. ते म्हणतात : 'विवेकवाद किंवा बुद्धिवाद हा आमच्या पाठशाळेच्या शिक्षणाचा भाग होता. राष्ट्रीय वृत्ती हा दुसरा भाग.'

प्राज्ञ पाठशाळेत शिक्षण घेत असताना आत्मसात केलेला बुद्धिवाद त्यांच्या वैचारिकेत सतत प्रगल्भ होत गेला आहे. गतवर्षीच पुण्याला 'बुद्धिप्रामाण्यवादी' मेळाव्याचे ते अध्यक्ष होते (१९८०). त्या चर्चेत गणेशशास्त्र्यांनी ''बुद्धिप्रामाण्य' सांगणारे शब्दप्रामाण्यवादीच आहेत,' अशी टीका करून शास्त्रीजींना आवाहन केले, की 'हे नैयायिक आहेत. त्यांनी यावर विवेचन करावे.'

शास्त्रीजींनी मग 'प्रमाण' म्हणजे काय, येथूनच मूलभूत चर्चा केली. प्रत्यक्ष प्रमाण, अप्रत्यक्ष प्रमाण यांचे तौलनिक महत्त्व सांगितले आणि तर्कशुद्ध मांडणीतून बुद्धिप्रामाण्याची श्रेष्ठता प्रस्थापित केली.

याच मुलाखतीत शास्त्रीजी सांगतात, की त्यांच्या गुरुजींशिवाय त्यांच्यावर गांधीजी व रॉय यांचा बौद्धिक प्रभाव पडला. मात्र ते कोणत्याही पंथाचे आग्रही समर्थक नाहीत. ते म्हणतात :'मी तटस्थ वृत्तीने कोणत्याही सिद्धांताचा आग्रह न करता सर्व विचारांचे परीक्षण करता माझा आग्रह नैतिक मूल्यांविषयीच आहे. ते माझे बंधन आहे. नैतिक दृष्टीपलीकडे मी गेलेलो नाही.' ते म्हणतात : 'हिंदू किंवा इस्लामी किंवा मार्क्सवादी फंडमेंटालिस्ट हे जगाला दुःखात, 'शून्यात' लोटणार आहेत पण 'हे जग बदललेच पाहिजे,' हा मार्क्सचा सिद्धांत मी पूर्णपणे मानतो... शोषणरहित समाज असावा, त्यात पूर्ण स्वातंत्र्य असावे. विश्व हे एक कुटुंब असावे, हा जो दृष्टिकोन आहे, तो अद्भुतरम्यवादी आहे. पण तो माझ्या मनाची पकड सोडीत नाही.' पण 'अद्भुतरम्यवाद' आहे, त्यालाच मार्क्सने शास्त्रीय स्वरूप देण्याचा प्रयत्न केला आहे. पण आपण मार्क्सच्या पुढे गेलो आहोत, मार्क्स 'विचार' ही केवळ उपघटना मानतो. 'भौतिक पाया व आधारित रचना' असे जे द्वंद्व कल्पिले, ते शास्त्रीजींना अर्थपूर्ण वाटत नाही. त्यांच्या मते ध्येयवाद, विचार ही कायम प्रवर्तक शक्ती आहे.

आधारित रचना म्हणजे विचार, तत्त्वज्ञान मूल्ये हे सुद्धा भौतिक शक्तीचे उच्चत्तम, अधिक सशक्त असे रूप आहे. तेव्हा, मार्क्सच्या विचाराच्या पुढे जायला पाहिजे, त्यासाठी दोन आव्हानांना तोंड द्यावे लागणार. दोन प्रकारच्या आव्हानांना उत्तर द्यावे लागणार. हे उत्तर एकत्रित द्यावे लागेल. पाश्चात्त्य संस्कृतीच्या बौद्धिक सामर्थ्याचे आव्हान मान्य करणारे तत्त्वज्ञान उत्पन्न होण्यास आवश्यक अशी वैज्ञानिक दृष्टी हा एक मोठा सद्गुण आहे, असा अभिनिवेश बाळगणारी शिक्षणपद्धती भारतीय विद्यापीठांत अस्तित्वात आली पाहिजे.

दुसरे आव्हान म्हणजे मनुष्य व मानवी समाज बदलण्याची प्रक्रिया प्रदर्शित करणारे तत्त्वज्ञान पाहिजे. हा विचार थोड्या तपशिलाने ते मांडतात: 'जे तत्त्वज्ञान आजच्या सामाजिक अनुभवांचा अर्थ सांगेल, विज्ञानाच्या वाढीस उपकारक सिद्धान्ताचे दिग्दर्शन करील आणि जीवनातील अडचणीतून बाहेर काढणारा सामाजिक कर्मयोग दाखवील, तेच आजच्या भारताचे तत्त्वज्ञान बनेल.' असे तत्त्वज्ञान भारतात उदय पावण्याची पूर्वतयारी कोठेही दिसत नाही, असे ते म्हणतात, पण ते तितकेसे खरे नाही. हे पूर्वतयारी-कार्य खरे तर त्यांच्याकडूनच होत आहे. त्यांच्या ऐंशीव्या वाढदिवसानिमित्त वाईला जो समारंभ झाला, त्याचे अध्यक्ष म्हणून बोलताना डॉ. रा. ना. दांडेकरांनी शास्त्रीजींच्या या कार्याचे उचित महत्त्व यथार्थतेने सांगितले. ते म्हणाले, की-'फ्रेंच राज्यक्रांतीअगोदर फ्रेंच कोशकारांनी-एन्सायक्लोपिडिस्ट- जे कार्य केले, तेच कार्य शास्त्रीजींनी निरनिराळ्या कोशांचे संपादन करून कोशपरंपरा विकसित केली आहे.'

महादेवशास्त्री जोशी म्हणतात, की महाराष्ट्रात कोशाची दीर्घ आणि भव्य परंपरा आहे. चालुक्य राजवटीत बाराव्या शतकात सोमेश्वर पंडिताने पहिला ज्ञानकोश रचला व त्यानंतर हेमाडपंत, बाबा पाध्ये, डॉ. केतकर अशी ज्ञानकोशकारांची अखंड परंपरा असल्याचे ते सांगतात. या परंपरेवर कळस चढविला तर्कतीर्थांनी, 'विश्वकोशा'ची अभूतपूर्व रचना करून.

विश्वकोशाची कल्पना ज्ञानकोशापेक्षा अधिक समृद्ध आहे. स्वातंत्र्यानंतर आणि संयुक्त महाराष्ट्र निर्मितीनंतर नवजागृत बहुजनसमाजाची ज्ञानाची व विज्ञानाची गरज भागविणे हा एक महान सांस्कृतिक प्रकल्प आहे. त्यासाठी शास्त्रीजींसारख्या चतुरस्र व्यासंगाचा व अनेक विषयांचा मर्मग्राहक संपादकच आवश्यक होता.

विश्वकोशाची रचना केवढी अफाट व अवाढव्य आहे. मानव्य आणि विज्ञान कक्षातील सर्व विषयांचे ज्ञान-सार संग्रहित व संपादित करण्याचे कार्य किती बिकट व कालव्यापी आहे, याची कल्पना नसणारे लोकच त्यावर टीका करू शकतात. शास्त्रीजींना तासन्तास खुर्चीवर बसून नोंदी तपसताना व नव्या नोंदी स्वतःच लिहिताना ज्यांनी प्रत्यक्ष पाहिले आहे, निरनिराळ्या विषयांवरील अभ्यासकांचे सहकार्य संपादन करून त्यांच्याकडून नियोजित मर्यादेत विषयाचे सार देणाऱ्या नोंदी तयार करून घेण्याचे व नोंद चांगली होत नाही, हे कळून येताच शांतपणे स्वतःच ती लिहिणारे शास्त्रीजी ज्यांनी प्रत्यक्ष पाहिले आहेत, त्यांच्या

अवघड विषयांवरच्या सुस्पष्ट, मुद्देसूद व विषयाचे सारसर्वस्व संक्षेपाने देणाऱ्या नोंदी ज्यांनी पाहिल्या, त्यांनाच शास्त्रीजी केवढे महान कार्य करीत आहेत, याची कल्पना येऊ शकेल. त्यांच्या अथक परिश्रमातून हा एक महान प्रकल्प सिद्ध होत आहे. हा कोश पूर्ण झाला, की शास्त्रीजी कोशकारांच्या परंपरेचे मुकुटमणी समजले जातील. परिवर्तनासाठी आवश्यक ती मनोभूमिका तयार करण्याचं जे कार्य महाराष्ट्रात होत आहे, त्यात शास्त्रीजींचे कोशकार्य हे सर्वाधिक महत्त्वाचे मानले जाईल.

विचार आणि कृतीत सातत्य व सुसंगतता- जी शास्त्रीजींच्या जीवनात आढळते, तशी क्वचितच जाणवते. पाठशाळेत राष्ट्रवादाचे शिक्षण घेतले आणि राष्ट्रीय लढ्यात स्वतःला झोकून घेतले. राष्ट्रीय चळवळीतील कारावास, अज्ञातवास सर्व सहन करण्यात आनंद, उत्साह, निष्ठावंतालाच मिळणारे समाधान. समतेचे, स्वातंत्र्याचे, विज्ञाननिष्ठेचे मूल्य जीवन-मूल्य म्हणून स्वीकारल्यानंतर प्रबोधनासाठी ज्ञानभांडारच समर्पण. मग अस्पृश्यता निवारणाच्या कार्यात गांधीजींशी सहकार्य करण्याचा प्रश्न असो, गांधीजींच्या मुलाच्या आंतरजातीय विवाहाचा प्रश्न असो, सनातनी शास्त्री पंडितांना काय वाटेल, लोकक्रोधाच्या आगीत भाजावे लागेल, याची क्षिती नाही.

शास्त्रीजी हे निर्भय विचारक आहेत. लोकप्रियतेवर नजर ठेवून ते भूमिका घेत नाहीत. 'हिंदुधर्माची समीक्षा', जोतिबा फुले यांच्यावरील 'ज्योति-निबंध', 'वैदिक संस्कृतीचा विकास' यांसारख्या ग्रंथांत वैचारिक पातळीवर त्यांनी पारंपरिक प्रामाण्याला साफ अव्हेरलेले आहे. त्यांच्या पाठशाळेत हरिजन विद्यार्थ्याला संस्कृत व वेदशिक्षणासाठी ठेवून घेतले. ब्राह्मो समाजाचे वार्षिक संमेलन विठ्ठल रामजींना प्राज्ञपाठशाळेत भरविता आले. त्यांनी 'जाती'च्या मर्यादा कधीच मानल्या नाहीत. ब्राह्मणेतर व दलित कार्यकर्त्यांच्यामध्ये ते आत्मीयतेने वावरतात. म्हणूनच आजही तरुण, दलित कादंबरीकार प्रकाशन समारंभासाठी त्यांना आग्रहाने घेऊन जातो आणि आता तर दलित साहित्य संमेलनाचे ते अध्यक्षही झाले आहेत. समतेचे आणि स्वातंत्र्याचे मूल्य व्यासपीठावरून उद्घोषित करण्यासाठी या ग्रंथातून प्रतिपादन करण्यासाठी केवळ नसून ते जीवनाचे आधार मूल्य आहे, ते जगण्यासाठी आहे; याचा कृतिशील आदर्श त्यांच्या सार्वजनिक आणि वैयक्तिक आचरणातून प्रगट होतो.

कराडच्या संमेलनात दुर्गाबाईंप्रमाणे शास्त्रीजींनीही आपल्या लिखित भाषणात स्वातंत्र्याच्या मूल्याचा निःसंदिग्ध पुरस्कार केला होता आणि संयुक्त महाराष्ट्राच्या काळात त्यांनी उग्र लोकमताविरुद्ध भूमिका घेतली आणि लोकक्रोधाच्या दर्शनाला दाद न देता निर्भयपणे मांडण्याचे काम केले.

साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष म्हणून त्यांच्या कारकिर्दीची ज्या प्रकारे समाप्ती करण्यात आली, ती एक खेदजनक घटना होती. अर्थात, शासनाकडून प्रशस्त अप्रशस्त

याचा विवेक बाळगला जाण्याची अपेक्षा कोणी करणे अवास्तवच होते. परंतु ही कारवाई करण्यासाठी शासनाला समर्थन प्राप्त करून देण्याचे कार्य त्यांच्या स्नेह्यांनीच करावे, हा भाग अधिक खेदजनक समजावा. शास्त्रीजींना काय वाटत होते वा वाटले, हे कळणे कठीण. ते तटस्थपणे हालचाली पाहत होते. त्यांच्या नेहमीच्या प्रसन्न दर्शनात काही फरक जाणवला नाही. फरक सूक्ष्म जाणवला, तो त्यांच्या प्रिय पत्नीच्या मृत्यूनंतर. एकाकीपणाची विषण्ण जाणीव कुठंतरी तरळताना भासते. पण कोणत्याही घटनेमुळे वैयक्तिक दुःखाची असो वा सार्वजनिक अधिक्षेपाची असो, त्यांच्या कार्यात कधी खंड पडला नाही, कार्याच्या गतीला मंदपणा आला नाही. विवेचनातील तर्क आणि शैली कधी बिघडली नाही. आणि पुढे केव्हा साहित्य संस्कृती मंडळासाठी त्यांनी केलेल्या कार्याचे तटस्थ मूल्यांकन होईल, तेव्हा त्यांनी केलेले प्रबोधनाचे प्रत्यक्ष कार्य किंवा हे कार्य करणारांना दिलेले उत्तेजन व साहाय्य यांचे दूरगामी महत्त्व मान्य करावे लागेल. यशवंतराव चव्हाणांसारखे मित्र मुख्यमंत्री असतानासुद्धा शासन कोणत्याही प्रकारची वाढ करणार नाही, ही अट मान्य करून घेतल्यानंतरच त्यांनी अध्यक्षस्थान स्वीकारले. साहित्य संस्कृती मंडळाची कल्पना यशवंतरावांची असली, तरी तिला समूर्त स्वरूप दिले, जिवंतपणा दिला, प्रतिष्ठा दिली, ती शास्त्रीजींनी. त्यांच्यासारखा स्वतंत्र प्रज्ञेचा अध्यक्ष मंडळाला प्रारंभीच्या काळात लाभला, हे मंडळाचे भाग्य आणि म्हणून त्यांच्या अध्यक्षपदासंबंधी वाद उपस्थित करणे ही एक दुर्दैवाची गोष्ट घडली, असेच म्हणावे लागेल.

आज वयाच्या ८० व्या वर्षी ते ज्या महाराष्ट्राकडे पाहत आहेत. तो कसा आहे? शास्त्रीजींना प्रारंभीच्या काळात त्यांच्या परिवर्तनवादी भूमिकेमुळे सनातन्यांच्या विरोधाला व निंदेलाही तोंड द्यावे लागले. १९४० मध्ये त्यांनी मानवेंद्रनाथ रॉय यांचा पक्ष स्वीकारला, तेव्हाही कुचेष्टा व निंदा त्यांच्या वाट्याला आली. संयुक्त महाराष्ट्राच्या काळातही त्यांना हे 'दिव्य' करावे लागले. आता. आयुष्याच्या अखेरच्या काळात पुन्हा एकदा त्यांना सामाजिक प्रश्नावर या दिव्यातून जावे लागणार आहे का? प्रत्यक्ष अस्पृश्यतेच्या प्रश्नावर आता कोणी शास्त्राधार दाखवून विरोध करीत नाही, हे खरे; पण दलितांना उच्चवर्णीयांच्या बरोबर आणण्यासाठी, समाजात त्यांना समानतेचा दर्जा प्रत्यक्षात प्राप्त व्हावा, म्हणून आरक्षणसारखे जे तुटपुंजे प्रयत्न होत आहेत, त्यांना पन्नास वर्षांपूर्वीच्याच कडवेपणाने आजही विरोध आहे. म. फुले यांच्या नावाचा कितीही जयजयकार आज होत असला, तरी जोतिबांचा 'सत्यधर्म' हा बहुजनसमाजाला पचलेला नाही आणि सवर्णांना सावरकर-आगरकर पचलेले नाहीत. आज एकीकडे सवर्ण आरक्षण योजना उद्ध्वस्त करण्यासाठी रक्ताचे टिळे लावून प्रतिज्ञा घेत आहेत, तर मिळालेली तुटकी फुटकी आरक्षणाची व्यवस्था मोडली जाऊ नये, म्हणून सर्व जाती-जमाती एकजुटीने लढण्यास सिद्ध होत आहेत. गुजरातचा वर्णीय संघर्ष महाराष्ट्रातही पेटू शकेल, अशी चिन्हे दिसतात. पुन्हा एकदा शास्त्रीजींना या सवर्णांना

युक्तीच्या चार गोष्टी सांगाव्या लागणार आहेत. सवर्णांचे मत बदलविण्याचे अवघड कार्य शास्त्रीजीच करू शकतात आणि हे कार्य त्यांनी सुरू केले आहे. पुण्याला महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कार्यक्रमात बोलताना त्यांनी स्पष्टपणे सांगितले : "दलितांवर जो अन्याय झाला, त्याला आपणच कारणीभूत आहोत, म्हणून ही अस्पृश्यता आपणच दूर केली पाहिजे. आज माणसा-माणसांत जवळीकच दिसून येत नाही, त्यामुळे माणसावरील अन्यायाची माणसालाच खंत व जाणीव नाही. या अन्यायाचे परिमार्जन आपणच केले पाहिजे. अन्यथा हे पातक आपणांला इतके भोवेल, की देशाच्या भवितव्याबद्दल शंका निर्माण होईल.''

हाच इशारा त्यांनी त्यानंतर औरंगाबाद येथे केलेल्या भाषणात दिला आहे. आजच्या प्रक्षुब्ध वातावरणात शास्त्रीजींच्या तर्कशुद्ध, समतोल, विवेक-विवेचनामुळे मतपरिवर्तन अधिक प्रभावी होऊ शकेल. त्यांचे व्यक्तिमत्त्व, त्यांची प्रगाढ विद्वत्ता, परिवर्तनवादी वैचारिक आणि विचाराशी सुसंगत आचरण असलेले निर्मळ चरित्र यामुळे या प्रकारच्या आवाहनामागे जो नैतिक प्रभाव असावा लागतो, तो त्यांच्याशिवाय दुसऱ्या कोणा विचारवंताला असेलसे वाटत नाही. आयुष्याच्या पूर्वार्धात सुरू केलेल्या कार्याची एक प्रकारची सांगता करण्याचीच ही वेळ आहे. महाराष्ट्राला पूर्वी कधी नव्हती, इतकी आज त्यांच्या वैचारिक मार्गदर्शनाची जरुरी आहे.

शास्त्रीजींना दीर्घायुष्य आणि आरोग्य लाभून परिस्थितीच्या भयावह घसरगुंडीला रोखण्याचे विवेक व बुद्धिप्रामाण्याचे प्रमुख होऊन समाजाला परिवर्तनाच्या दिशेकडे घेऊन जाण्याचे श्रेय त्यांना लाभो, ही शुभेच्छा!

**(महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे/ अमृत महोत्सव (१९०६-१९८१)**
**'अमृतधारा' स्मरणिका - २७ मे, १९८१,**
**संपा. ग. वा. बेहरे, वि. रा. करंदीकर, द. दि. पुंडे, म. श्री. दीक्षित,**
**पृ.१२ ते १५).**

OOO

# २६.
# तर्कतीर्थांना अभिवादन
## दा. गो. देशपांडे

२७/१/८६ तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे पंचाऐंशी नॉट आऊट झाले ते असेच नॉट आऊट राहावेत, असे समस्त सुविद्य मराठी माणसे म्हणतील. कारण जोशीबुवा यांचे सामाजिक, वैचारिक आणि सांस्कृतिक देणे अथकपणे चालूच आहे. सभा समारंभांना हजर राहणे, आपले प्रश्न, विचार स्पष्टपणे मांडणे आणि कुणी विनंती केली तर लेख लिहिणे, यांत खंड पडलेला नाही. शास्त्री या नावाबरोबर सर्वसाधारणपणे जी जडता आणि अंतरे निर्माण करणारी गंभीरता येते, ती तर्कतीर्थांनी केव्हाच खोडून काढलेली आहे. याचा अर्थ असा नव्हे की, त्यांचे वागणे, बोलणे आणि लिहिणे सवंग आणि स्वस्त आहे. परंतु एक गोम आहे आणि त्यातच त्यांच्या अस्मितेचे मर्म आहे. ते असे की, ते विचारवंतांचे, पंडितांचे आणि रसिकाग्रणींचे शास्त्रीबुवा आहेत. उदाहरणच द्यायचे झाले तर असे म्हणता येईल की, सर्वश्री ना. ग. गोरे, गोविंद तळवलकर, अनंत भालेराव, माधव गडकरी, ग. वा. बेहेरे इत्यादी तुमच्या-आमच्याकरता लिहितात तर शास्त्रीबुवा विद्वानांकरिता लिहितात. मात्र एक विशेष यातही आहे. म्हणजे वरच्या पातळीवरचे बुद्धिमंत आणि सामान्य जिज्ञासू या सर्वांत लक्ष्मणशास्त्री जोशी या नावाची बूज आहे, दबदबा आहे आणि त्याला अतुलनीय प्रतिष्ठा आहे. प्रतिष्ठादेखील अशी की, तिने जातपात, सत्ता, पदे, संपत्ती आणि पक्षीय भेदाभेदांच्या सीमा ओलांडून आपले स्वयंप्रकाशित्व सिद्ध केलेले, संयुक्त महाराष्ट्राच्या संबंधात आणि आणीबाणीच्या अनुरोधाने त्यांनी रामशास्त्री प्रभुणे एकटे काही न्याय देणारे, बोलणारे नव्हते हे दाखवून दिले.

मी शास्त्रीबुवांना पहिल्यांदा पाहिले, ऐकले तो इ. स. १९३७ ते इ. स. १९३९ चा काळ असावा. बाल्य झटकून पौगंडावस्थेत शिरण्याचे माझे ते वय होते. तरी महात्मा गांधींच्या असहकाराच्या चळवळीत तुरुंगवास भोगून झपाटलेले बंधू कै. रामभाऊ यांचा हैद्राबादच्या गणेशोत्सवात पुढाकार होता. निजामी सत्तेविरुद्ध जनजागरणाकरता गणेशोत्सव हे एक निमित्त

होते. मराठी माणसे लो. टिळकांनी ज्या हेतूने गणेशोत्सवाचे प्रवर्तन केले त्याचे अवधान मनात पक्के बाळगून होती. संस्थानाबाहेरच्या विद्वानांना, राजकारणांना व समाज धुरीणांना पाचारण करण्यात येत असे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींना याच अनुरोधाने आमंत्रित करण्यात आले होते. त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता, 'नवे तत्त्वज्ञान.' रामभाऊंनी प्रास्ताविकात 'सूर्याच्या प्रकाशाखाली काहीच नवे नसते', असे सांगितले होते. काळसर रंगाचे, किडकिडीत असलेले आणि डोक्यावर पांढरी टोपी असलेले शास्त्रीबुवा बोलावयास उभे राहिले. त्यांच्या भाषणाची सुरुवात, मध्य आणि शेवट ही काही माझ्या आकलनात आली नाहीत अन् आठवणीत साहजिकच नाहीत. परंतु बंधूंनी त्या भाषणाचे एक टिपण करून ठेवले होते. ते माझ्या वाचनात मी कॉलेजात असताना इ. स. १९४६ साली आले. ते असेः 'सूर्याच्या प्रकाशाखाली काही नवीन नसते- असे मी प्रास्ताविकात बोललो खरे पण शास्त्रीबुवांच्या भाषणात ज्ञानसूर्याच्या प्रकाशात सदा नवोन्मेष असतो याची प्रचिती आली. भारतीयांचे प्राचीन तत्त्वज्ञान, पाश्चात्त्यांकडून आलेले विज्ञान आणि त्या अनुषंगाने आलेली वैज्ञानिक व औद्योगिक क्रांती, पारतंत्र्यातून सोडवणूक करून घेण्याकरिता आलेला राष्ट्रवाद आणि नव्याने झालेली आर्थिक व सामाजिक जाण या सर्वांचे जे पडसाद त्यांच्या भाषणात उमटले, ते नव्या तेजाचा स्पर्श करणारे होते. विजेचा झटका बसावा तसे विचारकण त्यांच्या भाषणात होते. हे भाषण अविस्मरणीय खरे, पण स्मरणात ठेवावयास कठीण.'

माझ्या बंधूंनी जे टिपण लिहिले ते किती अचूक होते! शास्त्रीबुवांचे वाचन, चिंतन आणि आविष्कार ही प्रचंड अभ्यास व विश्लेषण, सूक्ष्म निरीक्षण व तौलनिक आलोडन, गतिबदल व परिवर्तन या विशेषांनी अवगुंठित असतात. डोळसपणा, जागरूकता आणि तार्किकता यांची कास सुटत नाही. बांधिलकी फक्त ज्ञानवेधाची आणि सत्यशोधनाची आहे. प्रसिद्धी, लोकप्रियता आणि मोठेपणा यांच्या मागे न लागता, किंबहुना बऱ्याच वेळा अप्रियता व गैरसमज यांना झेलत जोशीबुवांचे मार्गक्रमण चालू आहे. त्यांचे संयुक्त महाराष्ट्र चळवळीवर आकाशवाणीवर भाषण झाले. त्या भाषणात आ. अत्रे यांचा उल्लेख नव्हता. मला वाटले की, अत्र्यांनी शास्त्रीबुवांवर जी कटू टीका केली, त्याचा हा परिणाम असावा. परंतु हे मी मनात न ठेवता त्यांना स्पष्ट विचारले, त्यावर ते म्हणाले, 'अत्र्यांचा वाटा हा वादाचा विषयच नाही. वेळेच्या मर्यादा भाषणाच्या काटछाटीस कारण ठरतात आणि आकाशवाणी ते करते.' कै. यशवंतराव चव्हाण तर शास्त्रीबुवांना गुरुस्थानी मानत हे सर्वज्ञात आहे. शास्त्रीबुवासुद्धा यशवंतराव चव्हाणांबद्दल विरुद्ध फारसे बोलत नाहीत असा प्रवाद आहे. पण संयुक्त महाराष्ट्र आंदोलन आणि आणीबाणीच्या वेळेस शास्त्रीबुवांचे मतभेद लपून राहिले नाहीत. या सर्व क्रिया-प्रतिक्रियांत शास्त्रीबुवांनी आपले सौजन्य आणि संयम यांचा त्याग केला नाही. याचा अर्थ ते मूग गिळून गप्प बसतात असाही करण्यात आला. शास्त्रीबुवांचे व्यक्तिमत्त्व वडासारखे स्थिर असते. ते अशा गोष्टींनी किंवा घटनांनी आंदोलित किंवा दोलायमान होत नाहीत.

काही दिवसांपूर्वी त्यांच्याबरोबरच्या चर्चेत जी मुंबई महाराष्ट्रात आहे, ती आपण घालवणार का? असा विषय निघाला. मुंबईतील मराठी माणसांची पीछेहाट आणि लोकसंख्येत त्यांचे घटत चाललेले प्रमाण हे काही अपघात नाहीत. त्या मागे मुंबई महाराष्ट्रापासून अलग करण्याची योजनाबद्ध सूत्रं आहेत. शास्त्रीबुवा आमच्यासारखे अनुमानाकडे अधीरतेने धावणारे नाहीत. त्यांच्या मते देशाच्या राजकीय, राष्ट्रीय, आर्थिक आणि आंतरराष्ट्रीय संदर्भात मुंबईचे माहात्म्य महाराष्ट्रातल्या राजकारण्यांना जसे व जितके कळावयास हवे तितके अजून कळले नसल्याने एक दिवस मुंबई गमावण्याची पाळी आल्यास नवल नाही!

शास्त्रीबुवा आपल्या ठिकाणी ठाम आहेत. सत्तापदे त्यांना मोहवू शकली नाहीत. प्रतिकूल टीकेने ते कधीही विचलित झालेले नाहीत. मग ते सोमनाथाचे पौरोहित्य असो वा 'मंत्रालय' हे नामकरण असो, त्यांचा व्यासंग, संपर्क व संवाद ही सदैव सजग राहिलेली आहेत. वाई आणि कोश ही त्यांनी सोडली नाहीत. मंत्री असो वा संत्री असो, शास्त्रीबुवांचा मनस्वीपणा शाबूत आहे. प्रसिद्धीकरता त्यांनी लेखन केले नाही. आचार्य विनोबांच्या भाषेत, त्यांचे बोलणे व लिहिणे 'कामाचे' राहिले आहे. ते लिहिण्या-बोलण्याचे काम करीत नाहीत. कामाचेच लिहितात व बोलतात. याकरिताच इतकी वर्षे ते लिहीत असून त्यांच्या नावावर ग्रंथांची लक्षणीय यादी नाही. त्यांचा लेखसंग्रह अलीकडे संपन्न झाला; त्याचा पहिला खंड प्रकाशित झाला. हा संग्रह दहा ग्रंथांना भारी आहे. मोठ्या आकाराच्या पानांचा जवळजवळ सहाशे पृष्ठांचा तो आहे. तो वाचत असताना माझ्यासारख्याला वाटते की, जन्मात त्यांच्यासारखे एक वाक्य जरी लिहिता आले तरी मी स्वतःला धन्य समजेन! मला आणखीन असेही वाटले की, शास्त्रीबुवांनी इंग्रजीत लिहिले असते तर ते नक्कीच जागतिक सन्मानाचे धनी झाले असते. आत्मप्रसिद्धीचे तंत्र अवलंबिले असते तर ज्ञानपीठ अवार्ड त्यांना कधीच मिळाले असते!...

असा हा विद्वान आपल्याला याचि डोळा, याचि देही पाहावयास मिळतो हे काय कमी आहे? हे कधीच कमी होऊ नये असेच कुणासही वाटणार!

**(साप्ताहिक साधना, दि. २१ जानेवारी १९८६, पृ. २ व २१)**

○○○

# २७.

# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

## द्वा. भ. कर्णिक

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्याशी असलेला माझा ऋणानुबंध वाङ्मयीन, राजकीय, सांस्कृतिक तसाच कौटुंबिक आहे. कौटुंबिकदृष्ट्या इतका जिव्हाळ्याचा की १९३० साली त्यांची आणि माझी ओळख झाल्यानंतर कर्णिकांच्या घरातील शुभकार्याला शास्त्रीजींचा आशीर्वाद गृहीतच धरला जात असे. हा आशीर्वाद प्रत्यक्ष हजर राहून शास्त्रीजी देत आले. आमच्या वडिलांचे पुण्यातील निवासस्थान 'आनंदीगेह' हे नंतर शास्त्रीजींच्या पदधुलीने सदैव पावन होत राहिले. आमचे वडील भगवंतराव कर्णिक हे धार्मिक वृत्तीचे जाज्वल्य गांधीवादी होते. शास्त्रीजींना गांधीजींच्या परिवारात जो मान असे, त्याच्या जाणिवेने आमच्या वडिलांनी शास्त्रीजींचा सहवास हा पुण्यभेटीसमानच मानला होता. पुढे आमचे दुसरे बंधू डॉ. अनंतरात कर्णिक यांनी हा ऋणानुबंध नुसताच जतन केला नाही, तर त्यात अधिकच जिव्हाळा आणला.

शास्त्रीजींचे नाव मी स्वतः प्रथम ऐकले ते १९३० साली, जेव्हा गांधीजींनी मिठाचा सत्याग्रह सुरू केला तेव्हा. सत्याग्रहाचे आंदोलन सुरू होताच शास्त्रीजींनी वाईच्या प्राज्ञपाठशाळेकडे पाठ फिरविली आणि ते सत्याग्रही आंदोलन प्रज्वलित करण्यासाठी गावोगाव भाषणे देत फिरू लागले. त्यांच्या या भाषणांनी सबंध सारा जिल्हा खडबडून जागा झाला. आणि सामान्य लोकांमध्ये वीरश्रीचे वारे लागले. शास्त्रीजींची त्या वेळची भाषणे इतकी तेजस्वी तशीच जनमनावर इतकी छाप टाकणारी होत असत की एकदा वृत्तपत्रातून असे गौरवपर उद्गार निघाले की, "शास्त्रीजींच्या प्रभावी वक्तृत्वामुळे एक इसम इतका बेभान झाला की त्याला टाळ्या देण्यासाठी दोन हातही जुळविणे अशक्य झाले."

ही शास्त्रीजींच्या भाषणातील धार होती. तिला साजेसे पांडित्य आणि लालित्य हा तर त्या भाषणांचा गुणविशेषच होता. सारे महाभारत आणि रामायण शास्त्रीजी एकेका भाषणात विशद करीत असत आणि त्यातूनच गांधीजींच्या सत्याग्रहासाठी नैतिक अधिष्ठान शास्त्रीजी उभे करीत असत.

हे कीर्तिमान व्यक्तित्व आकस्मिकपणे आणि प्रथमच मला भेटले ते नाशिक जिल्ह्यातील कळवण येथील लॉकअपमध्ये. माझ्याबरोबरच शास्त्रीजांनाही सभाबंदीचा हुकूम मोडल्याबद्दल अटक करण्यात आली होती. मला नाशिकच्या आदिवासी विभागातून पकडून आणण्यात आले होते. रात्री निवांतपणे मी झोपलो असताना मध्यरात्रीच्या सुमारास पोलिसांनी शास्त्रीजींनाही त्याच लॉकअपमध्ये आणले. खडबडून मी जागा झालो. आणि आपला सहप्रवासी कोण आहे हे कळल्यानंतर एक प्रकारच्या आश्चर्याच्या तशाच उदात्ततेच्या भावनेने माझे अंतःकरण भरून आले. उण्यापुऱ्या अठ्ठावन्न वर्षांपूर्वी घडून आलेली ही भेट ही माझ्या जीवनातील एका सुवर्णक्षणासारखी मी जपून ठेवली आहे, जतन केली आहे. त्यानंतर धुळ्याच्या तुरुंगात शास्त्रीजी आणि मी भेटत होतो. आणि त्या भेटीतील उत्सुकता अधिकच वाढत असे ती यामुळे की, आम्ही एम. एन. रॉय यांचे तत्त्वज्ञान व त्यांचा क्रांतीचा कार्यक्रम यांविषयी परस्परांत विचारविनिमय करीत असू. शास्त्रीजी आमच्या बराकीतील सत्याग्रही लोकांमध्ये अधिकच लोकप्रिय होण्याचे आणखी एक कारण असे होते की, 'ब' वर्गाचे कैदी म्हणून शास्त्रीजींना कांदे, बटाटे, भाजी व इतर फळे यांचा जो खास आहार मिळत असे, त्याचा काहीसा वाटा माझ्यासाठी आवर्जून मधूनमधून पाठवून देत असत आणि आमच्या लहानशा कोठीत तो प्रसादासारखा वाटला जात असे.

त्यानंतरच्या काळात रॉय यांच्या विचारसरणीचे माझ्याप्रमाणेच शास्त्रीजींना कुतूहल तसेच कौतुक वाटू लागले. रॉयवादाशी पहिली ओळख करून देण्याचे श्रेय शास्त्रीजी त्यामुळेच मला देत असतात. रॉयवादी म्हणून आम्हा कर्णिक बंधूंना अभिमान वाटत आला आहे तो हा की भारतातील एक खंदा पंडित आमच्यामुळे रॉयवादाकडे वळला. शास्त्रीजींचे वैशिष्ट्य असे आहे की बुद्धिवादाच्या निकषावर एखादा दृष्टिकोन वा विचारसरणी त्यांना पटली की ते आपल्या विचारपद्धतीत बदल घडवून आणण्याला कचरत नाहीत ते. स्वतः गांधीजींच्या सहवासात राहिले होते. गांधीजींचे सान्निध्य त्यांना अशा प्रकारे लाभले होते की, धर्मशास्त्राच्या बाबतीत गांधीजी हे त्यांना सल्लागार म्हणून मानू लागले होते. अस्पृश्यतानिवारणाचा गांधीजींनी जो ध्यास घेतला होता त्यात धर्माचा आधार घेऊन अस्पृश्यतानिवारण हे धर्मविरोधी नाही असे पटवून देण्याच्या कामी शास्त्रीजींचीच त्यांनी मदत घेतली होती. याच प्रकारचा शास्त्राधार काढून देण्यात शास्त्रीजी मग्न असतानाच देवदास गांधी व राजगोपालाचारी यांची कन्या यांच्यामधील प्रेमसंबंध दृढ झाला आणि त्यांच्या विवाहाचे पौरोहित्य करण्याचे कार्य गांधीजींनी शास्त्रीजींकडे सोपविले. हा एक अपूर्व सन्मान होता. त्याचप्रमाणे गांधीजींनी शास्त्रीजींवर टाकलेल्या विश्वासाचे ते एक प्रसादचिन्हही होते. शास्त्रीजींच्या प्रतिष्ठेने त्या वेळी कळस गाठला असेच म्हणता येईल.

पण विद्वज्जनांमध्ये आणि चिकित्सक आणि अभ्यासू राजकीय कार्यकर्त्यांमध्ये शास्त्रीजींना खरीखुरी प्रतिष्ठा मिळवून दिली ती एम. एन. रॉय यांनी. तसे पाहिले तर वाईच्या

तर्कतीर्थ शास्त्रीबुवांना शास्त्रीजी केले ते रॉय यांनी. तेव्हापासून शास्त्रीजी हे त्यांचे अभिधान रूढ झाले. शास्त्रीजींनी 'हिंदुधर्माची समीक्षा' हे आपले विद्वत्तापूर्ण पुस्तक प्रसिद्ध केले. त्यानंतर थोड्याच दिवसांत मुंबईच्या मारवाडी विद्यालयाच्या दिवाणखान्यात रॉय यांचा पन्नासावा वाढदिवस साजरा करण्यात आला. त्या प्रसंगी बोलताना रॉय यांनी शास्त्रीजींचा आकस्मिकपणे उल्लेख करून म्हटले, "आमच्यामध्ये शास्त्रीजी यांच्यासारखा एक महापंडित आहे याचा मला अभिमान वाटतो. त्यांच्या हिंदुधर्मसमीक्षेचा विचार करता त्यांच्या चरणी लीन होऊन त्यांना प्रणाम करावासा मला वाटतो."

त्या सुमारास माझ्या संपादकत्वाखाली आमचे रॉयवाद्यांचे 'संग्राम' हे दैनिक निघत होते. शास्त्रीजींचा आणि माझा वाङ्मयीन ऋणानुबंध त्यातूनच अंकुरित झाला असे मला म्हणता येईल. 'संग्राम' दैनिकाचा व्याप हा माझ्या जीवनातील कसोटीचाच काळ होता. पण त्या काळात शास्त्रीजींचा जो सहवास मला लाभला, त्यांच्याबरोबर काव्यशास्त्रविनोदात रममाण होण्याची मला जी संधी मिळाली आणि विद्वत्तेबरोबरच त्यांच्या रसिकतेचे जे दर्शन मला घडले त्याचा विचार करता हा काळ माझ्या जीवनातील आनंदाने उत्फुल्ल होण्याचाच कालखंड होता असे मला म्हणता येईल.

शास्त्रीजी आमच्या कचेरीत गप्पा मारण्यासाठी येत. पण आल्या आल्या गप्पांच्या ओघात आम्ही एखाद्या विषयावर त्यांचे मत अजमविण्याचा प्रयत्न करीत असू. लगेच शास्त्रीजी लेख लिहिण्यासाठीच सज्ज होत असत. आमचे सहसंपादक श्री. मा. पं. शिखरे हे शास्त्रीजींचे Dictation आपल्या सुरेख अक्षरांत लिहून काढीत असत. मग शास्त्रीजींच्या कल्पकतेचे वारू तुफान वेगाने दौडू लागे. कधी अग्रलेख, कधी स्फुटे, कधी ललित लेख तर कधी नामांकित पाश्चिमात्य चित्रकारांची कलात्मक समीक्षा असे विविध विषय शास्त्रीजी हाताळीत असत. मायकेल अँजेलो, गोया, राफेल, पॉल सेझाने, रेनॉयर वगैरे विख्यात कलावंतांचे कलेतील प्रावीण्य, त्यांची शैली, त्यांच्या विषयांमधील आशय आणि त्यांच्या अविस्मरणीय कलाकृती यांविषयी शास्त्रीजींनी जे लेख संग्राममध्ये लिहिले, ते रविवारच्या अंकाचे भूषणच मानले जात असे. ललित साहित्याचा कसच त्यामध्ये प्रगट होत असे. कारण शास्त्रीजींच्या विदग्ध लेखनाचे सारे कसब त्यात सामावलेले असे. दुर्दैवाने संग्रामच्या अस्तित्वावरच घाला पडल्यामुळे हे चिरस्मरणीय ठरणारे साहित्यही आज पडद्याआड झाले आहे.

माझ्या दृष्टीने शास्त्रीजी हे एक जगावेगळेच व्यक्तित्व आहे. त्यांचे ज्ञानभांडार डेहराडूनच्या रॉय यांच्या निवासस्थानी वा व्ही. बी. कर्णिक यांच्या साहित्य सहवासमधील फ्लॅटमध्ये वा जेथे जेथे शास्त्रीजी त्या त्या क्षणी असतील, तेथे असामान्य तशाच सामान्य लोकांसमोर निर्व्याजपणे खुले केले जाते. कृष्णेच्या काठावरील वाईच्या त्यांच्या निवासस्थानी जे दिवस मी काढले आहेत त्यांच्या आठवणी पुसू म्हटले तरी पुसता येणार नाहीत. कारण

अंतःकरणात त्या घर करून राहिलेल्या आहेत. त्या घरात आणि आजूबाजूच्या परिसरात शास्त्रीजींचा स्वैरसंचार चालू असतो. ते स्वतः इतके आतिथ्यशील आहेत की, घरी पाहुणे आले किंवा मित्रमंडळ भोजनासाठी बोलाविलेले असले, तर शास्त्रीजी भल्या पहाटे स्वतः सारे भोजन साहित्य जमा करण्यासाठी मंडईत जातात. त्याबाबतीत त्यांचा अहंकार असा की भाजी वा फळे यांची अचूक निवड करून योग्य भावाने त्यांचा सौदा करण्यात त्यांचा हात धरणारा दुसरा कोणीही नाही. विश्वकोशाच्या निमित्ताने त्यांच्याकडे विद्वान अतिथी नेहमीच मुक्कामाला असतात आणि त्यांची विचारपूस व देखभाल स्वतः शास्त्रीजी पित्याच्या जिव्हाळ्याने करीत आलेले आहेत. या कामी आपल्या पत्नी सत्यवतीबाई या नुसतेच सहकार्य करीत नव्हत्या तर हयात असताना त्यांनीच प्रामुख्याने हा भार सांभाळला, असेही शास्त्रीजी विनयाने जाहीर करतात. सत्यवतीबाईंचे आकस्मिकपणे निधन झाल्यानंतर शास्त्रीजींना याचा इतका धक्का बसला की, पुढील चार दिवस विश्वकोशातील आपल्या अभ्यासिकेत स्वतःच कोंडून घेऊन अश्रुपूरित नेत्रांनी ते सत्यवतीबाईंच्या आठवणी लिहीत बसले, असे त्यांनीच एकदा माझ्याशी बोलताना सांगितले. जिव्हाळ्याच्या सहकाऱ्याबद्दल शास्त्रीजींच्या मनात इतकी उत्कट भावना असते की, व्ही. बी. कर्णिक यांच्या निधनानंतर त्यांना क्षणभर चैतन्यहीन झाल्यासारखे वाटले. त्याच्या मुळाशी कर्णिकांबद्दलचा जिव्हाळा आणि त्यांच्या निधनामुळे निर्माण झालेल्या पोकळीबद्दलचे अतीव दुःखच होते.

पण या साऱ्या संसाराच्या व्यापातापांत मग्न असतानाही शास्त्रीजींचे लेखन तसेच मनन, चिंतन आणि व्यासंग या साऱ्या गोष्टी अनिर्बंधपणे चाललेल्या असतात. त्यांचे घर हे मुक्तद्वार राहिलेले आहे. पण लोकांच्या भेटीगाठी घेत असताना त्यांच्या मुखातून जी माहिती प्रगट होत असते आणि संस्कृत वचनाची जी जोड ते तिला देत असतात त्यातून त्यांचे ज्ञानभांडार तर खुले होतेच, पण त्यांच्या लेखनाचे विषय ठरत असतात; त्याचप्रमाणे इतरांच्या लेखनालाही स्फूर्ती मिळत असते. शास्त्रीजी विश्वकोशाचे संपादन करताना धर्मकोशाचे संपादन त्याच वेळी चालू असते. साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी वीस वर्षे कार्य केले. त्या कार्याचा रगाडा मी पाहिलेला आहे. स्वतः शास्त्रीजी निश्चितपणे प्रकाशनासाठी हव्या असलेल्या पुस्तकांची निवड करतात आणि ती निवड अचूक ठरते ती यासाठी की, त्यांनी ते पुस्तक वाचलेले असते आणि त्याचे मूल्यमापनही त्यांनी आपल्या चाणाक्षपणाने केलेले असते. त्यांच्या कारकिर्दीत सहाशेच्या वर ग्रंथ लिहिले गेले किंवा अनुवादित केले गेले याचे श्रेय त्यांच्या दूरदर्शी प्रतिभेलाच द्यावे सागेल. शास्त्रीजींची मती साहित्य, कला, विज्ञान, तत्त्वज्ञान तसेच तंत्रज्ञान या सर्व शाखांत सारख्याच अधिकाराने चालते, ही विद्वज्जनांमध्येही वैशिष्ट्यपूर्ण ठरणाऱ्या विद्वत्तेची खूण मानावी लागेल.

पण त्याच वेळी शास्त्रीजी जी गुणग्राहकता प्रगट करतात त्यातून मराठी साहित्यात मोलाची भर पडलेली दिसून आल्याशिवाय राहणार नाही. रॉय यांचे 'लेटर्स फ्रॉम जेल'

हे उत्कृष्ट पुस्तक शास्त्रीजींनीच अनुवादासाठी निवडले आणि ते अनुवादाचे काम त्यांनी माझ्याकडे सोपविले. पुढे एलन रॉय यांचे चरित्र मी लिहिले आहे असे त्यांच्या कानी आले. लगेच वाईहून गाडी पाठवून त्यांनी मला बोलावून घेतले. अशा वेळी शास्त्रीजी आपली सारी कामे विसरून जातात आणि तल्लीन होऊन जे साहित्य पुढे येईल ते ऐकत असतात. एलन रॉय यांचे चरित्र पुढे त्यांच्याच शिफारशीवरून मधुकाका कुलकर्णी यांच्या श्रीविद्या प्रकाशनातर्फे प्रसिद्ध करण्यात आले.

शास्त्रीजींनी साहित्य संस्कृती मंडळातर्फे मराठी भाषेची जी सेवा केली आहे ती खरोखरच अनमोल आहे. व्ही. बी. कर्णिक यांनी जॉन स्टुअर्ट मिल यांच्या 'ऑन लिबर्टी' या पुस्तकाचा त्यांच्याच विनंतीवरून जो अनुवाद केला आहे त्याचा पुरस्कार करताना शास्त्रीजींनी आपले विचार खुलेपणाने व्यक्त केले आहेत. या पुरस्कारात ते म्हणतात, "मराठी भाषेला व साहित्याला ज्ञानविज्ञानाच्या क्षेत्रात पश्चिमी भाषांचा दर्जा प्राप्त व्हावा, इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, रशियन इत्यादी पश्चिमी भाषांना जसे विद्यापीठीय स्तरावर स्वयंपूर्ण महत्त्व प्राप्त झाले आहे, तसे मराठी भाषेला व साहित्याला प्राप्त व्हावे, इंग्रजी भाषेला व साहित्याला आज भारतीय विद्यापीठांमध्ये जसे मुख्य स्थान आहे तसे स्थान महाराष्ट्रातील विद्यापीठात मराठी भाषेला व साहित्याला प्राप्त व्हावे या उद्देशाने साहित्य संस्कृती मंडळाने वाङ्मयनिर्मितीचा विविध कार्यक्रम हाती घेतला आहे."

या वाङ्मयनिर्मितीत भाषांतराला शास्त्रीजींनी प्रमुख स्थान दिले. या भाषांतर योजनेत शास्त्रीजींनी पाश्चात्त्य व भारतीय भाषांतील सुमारे २०० पुस्तके निवडली. त्यात होमर, व्हर्जिल, एस्किलस, ॲरिस्टोफिनीस, युरिपिडिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल तसेच न्यूटन, डार्विन, रूसो, कांट, हेगेल, बर्ट्रांड रसेल या थोर थोर लेखकांचा समावेश आहे. शास्त्रीजींच्या गाढ्या विद्वत्तेची व व्यासंगाची यातूनही कल्पना येऊ शकते. व्ही. बी. कर्णिक यांच्याकडे रूसोलिखित सामाजिक कराराच्या अनुवादाचे जे काम शास्त्रीजींनी सोपविले ते तर त्यांच्या गुणग्राहकतेचे उत्कृष्ट उदाहरण मानता येईल. त्या अनुवादावरील निवेदनात शास्त्रीजी म्हणतात, ''श्री. वसंत भगवंत कर्णिक यांनी पश्चिमी तात्त्विक विचारांचे योग्य आकलन व अवगाहन करून मराठी भाषेच्या प्रकृतीशी मेळ बसेल अशा पद्धतीने हा अनुवाद केला आहे.''

शास्त्रीजींच्या जीवनाकडे पाहिले तर त्यांचे सारे अनुभवविश्व एखाद्या पॅनोरमाप्रमाणे सप्तरंगी छटांत आपल्या डोळ्यांसमोर तरळत राहते. एक शास्त्रीजी उघड्या अंगाने शाल सावरीत झपाझपा पावले टाकीत असलेले दिसतात. देवदासच्या लग्नात त्यांचा तोल जात असताना राजगोपालाचारी यांनी त्यांना मोठ्या अगत्याने "Take care Shastriji" असे म्हटलेले मी ऐकले आहे. अस्पृश्यतेच्या बाबतीत अनुकूल धर्मनिर्णय देताना पंडित राजराजेश्वरशास्त्री आणि देवनाथाचार्य यांच्याशी शाब्दिक झटापट घेताना मी त्यांना पाहिले

आहे. महात्मा गांधींच्या भेटीसाठी येरवडा तुरुंगात जाताना सभोवार जमलेल्या लोकांच्या मुद्रेवर कौतुकाचा भाव जो प्रगट होत असे तेच शास्त्रीजींचे खरे वैभव होते. त्या वैभवाकडे पाठ फिरवून ते रॉय यांच्या १३, मोहिनी रोडवरील निवासस्थानी आले तेव्हा मानवेंद्रनाथ रॉय यांनी नितांत आदराने त्यांना 'शास्त्रीजी' ही जी हाक मारली, त्यातूनच शास्त्रीजींच्या वैचारिक परिवर्तनाचे एक नवे पर्व सुरू झाले. तेव्हापासून आमच्या दृष्टीने गुरुशिष्याचे एक अद्वैत अस्तित्वात आले. रॉय यांचे तत्त्वज्ञान त्यांची वैचारिक बैठक, त्यांचा राजकीय कार्यक्रम आणि विशेषतः मानवतावादी सामाजिक प्रबोधनासाठी त्यांनी केलेले आवाहन याबद्दल शास्त्रीजींनी पुढील काळात अव्यभिचारी निष्ठा दाखविली. रॉय आणि रॉयवाद यांच्यापासून ते कधीही विलग झाले नाहीत. शास्त्रीजींचा आणि माझा दुवा तसाच कर्णिक कुटुंबीयांचा दुवा अभंग राहिला तो जितका वैयक्तिक आत्मीयतेमुळे होय, तितकाच तात्त्विक समरसतेमुळे आणि जीवनविषयक समान दृष्टिकोनामुळे होय. शास्त्रीजींशी जडलेल्या स्नेहसंबंधांमुळे माझे सारे जीवन उजळून निघाले आणि त्यांच्या सहवासातील प्रत्येक क्षण हा मला सुवर्णक्षणासारखाच वाटत आला आहे.

**(महाराष्ट्र साहित्य पत्रिका, दिवाळी अंक -१९८८, पृष्ठ ३५ ते ४०)**

○○○

# २८.
# विसाव्या शतकाच्या इतिहासाचे साक्षीदार
## अनिल जोशी

खानदेशामधून वयाच्या १४ व्या वर्षी केवळ ज्ञानसंपादनाच्या हेतूने वाईमध्ये आलेले तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी वाईच्या प्राज्ञपाठशाळा मंडळाशी एकरूप झाले. गुरू स्वामी केवलानंद सरस्वती यांच्या विचारांचा प्रभाव तर्कतीर्थांच्या मनावर अत्यंत प्रखर अशा स्वरूपाचा होता. त्यांच्या वडिलांनी संस्कृत भाषेचे ज्ञान आपल्या मुलास व्हावे आणि परंपरागत धर्मशास्त्रामध्ये आपला मुलगा पारंगत व्हावा या हेतूने त्यांना वाईच्या प्राज्ञपाठशाळेमध्ये दाखल केले.

वेद, उपनिषदे, पुराण, न्यायशास्त्र आदींचे अध्ययन ह्या प्राज्ञपाठशाळेमध्ये तर्कतीर्थांनी केले, हे जरी खरे असले तरी त्यांना आधुनिक ज्ञानाची ओळख याच ठिकाणी त्यांच्या गुरूकडून झाली. संस्कृत भाषेतील विविध ग्रंथांचे अध्ययन करीत असतानाच त्यांना विज्ञान व इतर आधुनिक समाजशास्त्राचे विविध विचार ऐकण्याची संधी येथे लाभली. संस्कृत भाषेमध्ये तज्ज्ञ असलेले केवलानंद सरस्वती त्या काळात भौतिकशास्त्राचे अनेक पाठ आपल्या विद्यार्थ्यांना देत होते. रसायनशास्त्राची ओळख याच ठिकाणी झाली आणि या सर्वांचा परिणाम म्हणून तर्कतीर्थांची परंपरागत ज्ञानसाधनाच्या बरोबरच आधुनिक ज्ञान-विज्ञानाकडे झेप घेण्याची तयारी होत गेली.

हिंदु धर्मशास्त्राच्या अध्ययनाबरोबरच तर्कतीर्थांनी इस्लाम, बौद्ध व जैन धर्मशास्त्रांचा चिकित्सक अभ्यास याच ठिकाणी केला. समाजाच्या विकासामध्ये अडथळे बनू पाहणाऱ्या विविध रूढि-परंपरांतील दोषांवर टीका करण्याची तयारी येथेच होत राहिली. कोणत्याही विचाराच्या मुळाशी जाऊन तो उपलब्ध साधनांच्या साहाय्याने तपासण्याची तयारी आणि त्यातून आलेली एक स्वतंत्र वैचारिक बैठक या सर्व गोष्टी त्याच प्राज्ञपाठशाळा मंडळात घडत होत्या. धर्मशास्त्रांचे अध्ययन आणि अध्यापन मानवी जीवनाच्या विकासाचा इतिहास तटस्थपणे तपासण्यामध्ये तर्कतीर्थांना आगळाच आनंद होता.

पंडित-शास्त्रींच्या सान्निध्यात राहूनदेखील त्यांच्या विचारांची झेप ही आधुनिकतेकडेच होत राहिली. केवलानंद सरस्वतींच्या आधुनिक सामाजिक विचारांचा वेगळाच प्रभाव त्यांच्यावर सातत्याने होत राहिला. धर्मशास्त्रांच्या अध्ययनाबरोबरच आधुनिक विज्ञानशास्त्राची ओळख आणि त्याचा मानवी जीवन विकासाशी असणारा संबंध याचा परिचय याच ठिकाणी झाला. वेदमंत्रांचे पठण करणारे तर्कतीर्थ वैज्ञानिकांच्या, शास्त्रज्ञांच्या विविध शोधांनी आणि दृष्टिकोनांनी प्रभावित झाले.

## क्रांतिकारक विचार

वाईच्या प्राज्ञपाठशाळेमध्ये देश-स्वातंत्र्याच्या विचारांनी भारावून गेलेली आणि त्यासाठी क्रांतिकारक विचारांना जोपासणारी काही मंडळी होती. या सर्वांचा परिणाम स्वातंत्र्यविचारांचा पगडा निर्माण करण्यात झाला. एतद्देशीय राजकारणाबरोबरच अन्य देशांतील राजकीय घडामोडी व तेथील राजकीय मतप्रणाली तपासण्याची संधी येथेच प्राप्त झाली. परंपरेला फाटा देऊन आधुनिकतेचा स्वीकार करण्याचे विचार येथे दृढ झाले.

स्वधर्मातील (हिंदु धर्मातील) विविध घटनांचा-विचारांचा अभ्यास तर्कतीर्थांनी अत्यंत चिकित्सकपणे केला व त्यातील उणिवांवर प्रसंगी स्पष्टरीत्या टीकादेखील केली. परंपराप्रेमी लोकांनी या भूमिकेच्या स्वीकारापोटी तर्कतीर्थांची संधी मिळेल तेथे निंदानालस्ती करण्याचे प्रयत्न केले.

समाजशास्त्रातील अनेक नवीन विचारांनी ते प्रभावित होत राहिले. पाश्चिमात्य विचारांची ओळख त्यांनी करून घेतली. मिल्ल-स्पेन्सर यांचे समाजशास्त्रीय विचार त्यांनी अभ्यासले. अनेक देशांचे, संस्कृतींचे, धर्मांचे विचार समजावून घेऊन या मानवी इतिहासाचा वेगळ्याच पद्धतीने अभ्यास करण्याचा त्यांनी ध्यास घेतला.

महात्मा जोतीराव फुले यांचे सामाजिक विचार तर्कतीर्थांनी मान्य केले. त्यांचा प्रसंगी प्रसारदेखील केला. प्रदेश पातळीवर आधुनिक विचारांचे दर्शन घडविणारे न्यायमूर्ती रानडे तर्कतीर्थांना अधिक प्रभावित करून गेले.

## साम्यवादाचा अभ्यास

देशस्वातंत्र्याच्या चळवळीमध्ये तर्कतीर्थ सक्रिय सहभागी झाले होते. त्यासाठी त्यांना कारावास भोगावा लागला होता. राजकीय विचारांचा त्यांनी अत्यंत चिकित्सकपणे अभ्यास केला. लोकशाही-समाजवाद याबरोबरच साम्यवादाचा अभ्यास करण्यास त्यांनी सुरुवात केली. साम्यवादाचा बराच प्रभाव त्यांच्यावर त्या काळी होता. पण त्यांच्या वैचारिक बैठकीमध्ये प्रत्येक राजकीय-सामाजिक विचारप्रणालीमधील मर्यादा तपासण्याची तयारी होती. त्यातूनच त्यांनी साम्यवादामध्ये असणाऱ्या मर्यादांबाबत आपले विचार मांडले. मानवतावादाचा स्वीकार केला.

१९३७ सुमारास मानवेंद्र रॉय यांच्याबरोबर तर्कतीर्थांचा जो परिचय झाला, त्यातून

अत्याधुनिक विचारांकडे अधिक प्रमाणात झुकले. मार्क्सचे विचार तपासले पाहिजेत व त्याच्यावर देखील टीका होऊ शकते, हे त्यांचे मत एम. एन. रॉय यांनी मान्य केले. तर्कतीर्थ मानवतावादाकडून नवमानवतावादाकडे झेप घेत राहिले. संस्कृतीच्या वैचारिक चौकटी मोडून विदेशी संस्कृतीचा अभ्यास करत राहिले. स्वातंत्र्यसंग्राम तर्कतीर्थांनी प्रत्यक्ष पाहिला आहे. त्यामध्ये ते सहभागी झाले आहेत. लो. टिळक, म. गांधी यांच्या विचारांचा त्यांच्यावर प्रभाव होता. लोकमान्यांच्या गीतारहस्यावर त्यांनी मांडलेले विचार अधिक तटस्थपणाचे आणि अनेकांना मार्गदर्शक असे होते. क्रियाशील तत्त्वज्ञ म्हणून लोकमान्यांच्या कार्य विचारांचा स्वीकार त्यांनी केला होता. 'साम्राज्यशाहीविरोधास वैचारिक लढा देणारा त्या काळचा महान भारतीय नेता' अशा शब्दांत लोकमान्यांचा त्यांनी गौरव केला होता.

**(दैनिक केसरी, पुणे; २६ जानेवारी, १९९०, पृ. ४)**

 OOO

# २९.
# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशीः एक कर्मयोगी
## रा. ना. चव्हाण
## शब्दांकनः दत्ता मर्ढेकर

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे धर्मेतिहासातील स्थान कोणते असे विचारता रा. ना. चव्हाण म्हणाले, दीर्घायुषी तर्कतीर्थ हे एक आदर्श पुरुषोत्तम आहेत. जितकी वर्षे इसवी सनाला तितकी त्यांच्या वयाला वर्षे असतात. परिवर्तनवादी पंडित म्हणून तर्कतीर्थ आजही महत्त्वाचे आहेत. आयुष्यात काळानुसार बदलणे, पालटणे म्हणजे नवा जन्म, नवा अवतार त्यांच्या या जन्मात ते घेत आले. भूतकाळात रुतून न राहता त्यांनी त्यांच्या विचार आचाराचा सांधा विशेषतः वर्तमान काळाशी सतत राखला. म्हणून ते पुढे येऊ शकले. इतर पंडित शास्त्री सहसा फक्त मागील काळात जगत असल्यासारखे अजूनही दिसतात. तर्कतीर्थांना जुनी, प्राचीन हिंदू शास्त्रे अवगत असतानाही ते पुढे इंग्रजी शिकले. इंग्रजी भाषेत ते बोलू लिहू शकतात. त्यांचे या भाषेतील वाचन सुरू असते. हिंदी, संस्कृत यातही ते वक्तव्ये करू शकतात. या कारणामुळे ते कधीही एकदेशी वाटत नाहीत. बायबल व कुराण यांतही त्यांची गती आहे. केवळ या त्यांच्या व्यापकपणामुळे ते सर्वांगीण विद्वान म्हणून गणले जातात.

महात्मा गांधींना त्यांनी हरिजन चळवळीच्या सुरुवातीला अस्पृश्यता विचार व कार्यास शास्त्राधार दाखवला. यामुळे अस्पृश्यता निवारण हे हिंदू धर्माला शास्त्रतः अमान्य आहे अशी समजूत बळावली.

सनातनी अनेक नामवंत शास्त्र्यांशी त्यांचे मागे वाद झाले. ऐतिहासिक तत्त्वनिष्ठ परिवर्तनवाद त्यांनी सिध्द केला. या बाबतीत त्यांना त्यांचे परात्पर गुरू श्री केवलानंद सरस्वती यांचा पाठिंबा मिळाला. याच संदर्भात वाई येथे धर्मकोशाचे कार्य सुरू आहे. त्यांच्या संपादकत्वाखाली ते सुरू आहे.

महात्मा गांधी यांचा मुलगा देवीदास व राजगोपालाचार्य यांच्या मुलीच्या मिश्र विवाहात त्यांनी पौरोहित्य केले. त्यामुळे गांधींच्या समीप ते गेले. संस्कृत व वेद सर्वांना खुले असावेत व वेद हे मनुष्यकृत आहेत असा पवित्रा त्यांनी घेतला. 'हिंदुधर्माची समीक्षा' नामक पुरोगामी

ग्रंथ त्यांनी लिहिला. तो डॉ. आंबेडकर यांना फार आवडला. या काळात ते व डॉ. आंबेडकर यांच्या एकत्र बैठका व चर्चा झाल्या.

एकूण वरील सर्व पुरोगामी धर्म सुधारणेचे कार्य पाहून महर्षी शिंदे यांना तर्कतीर्थांबद्दल फार आत्मीयता वाटू लागली. अनेक सभेत ते दोघे आले. तर्कतीर्थांनी प्राज्ञपाठ शाळेत भिंगारदेवे नामक हरिजन विद्यार्थी शिकण्यास ठेवला. यामुळे कर्मवीर भाऊराव पाटील यांना तर्कतीर्थांबद्दल परम आदर वाटू लागला. परंपरावादी अनेक शंकराचार्य व एकूण सनातन्यांचा विरोध लक्ष्मणशास्त्री यांनी सहन केला.

वाईच्या गतेतिहासाच्या दृष्टीने तर्कतीर्थ महत्त्वाचे कसे? असे विचारताच चव्हाण म्हणाले, उत्तर पेशवाईत वाई येथील परंपरावाद व एकूण सनातनशाही याचे वर्चस्व फार मोठ्या प्रमाणात वाढले होते. 'धर्म' या मासिकाचे संपादक कै. धर्ममार्तंड भाऊशास्त्री लेले यांनी जुन्या पक्षाचे धुरीणत्व केले. यामुळे वेदोक्त प्रकरणाला महाराष्ट्रात मोठी धार चढली. लोकमान्य टिळकांनी गीतारहस्यात कर्मयोग हा प्रामुख्याने प्रतिपादिला. या क्रांतिकारक अर्थाला भाऊशास्त्री यांनी मोठा विरोध केला. राजारामशास्त्री यांनी मोठा विरोध केला. राजारामशास्त्री भागवत यांनी वेदोक्त प्रकरणात शाहू महाराजांची बाजू घेतली. यामुळे भाऊशास्त्री यांनी 'धर्म' मासिकात राजारामशास्त्रींवर विरोधी टीका केली. वाई येथून पूर्वी आद्य छत्रपती शिवाजी महाराज व शेवटचे छत्रपती प्रतापसिंह महाराज वेदोक्त संबंधाने यांना मोठा विरोध झाला होता. इसवी सन १८२६ साली मुंबईचे प्रसिध्द सुधारक जगन्नाथ शंकर शेठ वाईस कृष्णाकाठी हव्यकव्य करून वेदोक्त श्राध्द विधी करण्यासाठी आले होते. पण त्यांना पूर्ण अटकाव करण्यात आला. या वेळी बाळाजी नातू सनातन्यांचे नेते होते. कोकणस्थ वाई येथे मागाहून आले. म्हणून मूळचे देशस्थ त्यांना पंगतीस घेत नसत. याप्रमाणे वाई क्षेत्र हा एक पुराणमतवाद्यांचा बालेकिल्ला होता. साहजिकच परंपरावादी व परिवर्तनवादी यांच्या दरम्यान येथे मोठा संघर्ष झाला. वाई हे एक सत्यशोधक चळवळीचे केंद्र होते. अशा दुर्धर ठिकाणी तर्कतीर्थ यांची पुरोगामी कामगिरी झाली. वरील संदर्भाच्या दृष्टीने ते फारच महत्त्वाचे गणले पाहिजे. नाहीतर वाई क्षेत्राचे मोठे चमत्कारिक स्वरूप होते. ग्राम्हण्ये निर्माण करायचे व प्रायश्चित्त देऊन शुध्द करायचे व यानिमित्त भोजनी घेण्याची येथे मोठी वहिवाट होती. आता काळ फारच पालटला आहे.

तर्कतीर्थ येण्यापूर्वी कोणती स्थिती होती हे जाणण्यासाठी मुद्दाम शोध व बोध घेतला पाहिजे. १९०४ साली वाई येथे प्लेग झाला. प्रज्ञानंद स्वामी याच वर्षी प्लेगामुळे निधन पावले. शिवाय जवळजवळ ३००-३५० वैदिक शास्त्री प्लेगमुळे मरण पावले. पुढे मोठ्या जिद्दीने नारायणशास्त्री केवलानंद मराठे यांनी प्रज्ञानंद स्वामी यांचे कार्य पुढे चालवण्यासाठी प्राज्ञ पाठशाला काढली व संस्कृत विद्या वाढवली. त्यांच्या गुरुकुलामध्ये भोजन व निवासाची सोय होती. अनेक विद्यार्थी शिकून प्रसिध्दीस आले. केवलानंद यांना तर्कतीर्थ यांच्यासारखा शिष्योत्तम प्राप्त झाला. म्हणून त्याच्या पश्चात प्राज्ञ पाठशाळा मंडळ टिकून आधुनिक प्रकारे विकास पावले.

निःपक्षपातीपणे 'नवभारत' मासिक आज ४४ वर्षे सुरू आहे. प्रबोधन व परिवर्तनाचे कार्य ते करते. तर्कतीर्थांचा या वयातही संचार असतो. त्यांनी त्यांचे आरोग्य अतिशय चांगले राखले आहे. त्यांचे दर्शन झाल्यावर मोठा आनंद होतो. पांडित्यापुढे नतमस्तक होणे हा एकच मार्ग राहतो. ते कोणासही काहीही झाले तरी दुखवत नाहीत. स्वभावाने समाधानी व स्थितप्रज्ञ असतात. कोणाच्याही हितसंबंधांच्या ते आड येत नाहीत. मागे झाले गेलेले काढत नाहीत. त्यांची कित्येक राजकीय भविष्ये खरी ठरली आहेत. धर्मकोश, विश्वकोश यांचे राहिलेले खंड त्यांचे देखत पूर्ण व्हावेत असे भाग्य त्यांना लाभावे.

तर्कतीर्थांना 'नवभारत'चे संपादक मे. पुं. रेगे, प्राज्ञ पाठशाळेचे चिटणीस प्रा. श्रीपाद नानजकर, ॲड. अशोकराव भट साह्यकारी होतात. अ. ल. कुलकर्णी यांनी मासिक 'नवभारत'च्या कार्यकारी संपादकत्वाची धुरा आज कित्येक वर्षे सांभाळली आहे.

एक असामान्य वैचारिक मासिक म्हणून नवभारतची ख्याती आहे. हे मासिक कायम चालवणे शक्य व्हावे म्हणून मोठा निधी उभारण्याचे ठरले आहे. धनिकांनी यासाठी उदार हस्ते साहाय्य करावे अशी चव्हाण यांनी विनंती केली आहे.

पुरोगामी दृष्टिकोन व साहित्यसेवा यासंबंधी काही सांगाल का? असे म्हणताच चव्हाण म्हणाले, तर्कतीर्थांचा पुरोगामी दृष्टिकोन प्राधान्याने वैज्ञानिक आहे. हल्ली जात व धर्म राजकारणात आणण्याचा देशभर प्रयत्न होतो. धर्मांधता व अंधश्रध्दा यांची मोठी लाट आली आहे. तर्कतीर्थांचे विचार ही अनिष्ट लाट थोपविण्याचे कामी उपयोगी पडतील. ते स्वतः एम. एन. रॉय यांना गुरू मानतात. निधर्मी लोकशाहीचा पुरस्कार करणे हा त्यांचा पैलू आहे. दीर्घायुष्य व दीर्घ अनुभव, सर्व सुविधा त्यांना उपलब्ध आहेत. वास्तविक त्यांनी त्यांचे आत्मचरित्र उपलब्ध केल्यास ते पुढील पिढीस फार उपयोगी पडेल.

तर्कतीर्थांची भव्यता कशात आहे असे विचारले असता चव्हाण म्हणाले, तर्कतीर्थांनी राजकारणात यशवंतराव चव्हाण यांची बाजू घेतली व बहुलोक समाजाच्या राजकारणाला पाठिंबा दिला. महात्मा जोतिबा फुले यांचे महत्त्व सांगणारा ज्योतीनिबंध उपलब्ध केला. भारतीय घटना ही लोकशाही निधर्मीवाद पुरस्कारते. या निधर्मीवादाचे स्वरूप व त्याचे महत्त्व लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी जेवढे पुरस्कारले आहेत तेवढे दुसऱ्या कोणी विद्वानाने सांगितले नसावे असे वाटते. पंचायत राज्य हा यशवंतरावांचा मुद्दा होता. यशवंतराव चव्हाण, किसनवीर, तर्कतीर्थ यांच्यामुळे ग्रामीण नेतृत्व पुढे आले. सातारा जिल्ह्यात काँग्रेस मजबूत झाली आहे.

तर्कतीर्थ आज ९२ व्या वर्ण वर्षात पदार्पण करत आहेत. यानिमित्त त्यांना आयुरारोग्य चिंतणे सामाजिक कर्तव्य वाटते.

**(दैनिक ऐक्य, सातारा, दिनांक २६ जानेवारी, १९९२)**

ooo

## ३०.

# नित्य नव्या विचारांत रमणारा आनंदयात्री

## अनिल जोशी

विविध संस्कृतींचा अभ्यास, चिंतन, मनन आणि अखेरीस विश्वसंस्कृतीचे स्वप्न पाहणारे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे जीवनातील अनेक आदर्शांचे मूर्तिमंत उदाहरण आहे. विद्वत्ता, व्यासंग, याबरोबरच शरीराचे आणि मनाचे आरोग्य निकोप ठेवून एक वेगळा दृष्टिकोन देणारे शास्त्रीजी हे एक चालू शतकातील आनंदयात्री आहेत.

मानवी जीवनातील ज्या ज्या पैलूंना त्यांनी स्पर्श केला, त्यातील निखळ आनंद शोधणे आणि त्याद्वारे आपल्या मनास सातत्याने टवटवीत ठेवणे हे त्यांच्या दीर्घायुष्याचे मुख्य सूत्र ठरले आहे. व्यावहारिक जीवनात कितीही क्लेशकारक प्रसंग आले, तरीदेखील स्थितप्रज्ञ वृत्तीने त्या सर्वांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून नित्य नवीन, विचारांच्या शोधात स्वत:ला रमवून घेणे हा त्यांचा एक आगळा छंद ठरला.

शास्त्रीजींच्या समवेत काही काळ घालविण्याची संधी ज्यांना प्राप्त झाली, ते भाग्यवान ठरले आहेत. जीवनातील विसंगती शास्त्रीजी सातत्याने सांगत राहतात आणि सुसंगतीचे धागे आपणास दाखवीत असतात. तात्त्विक चर्चा हा जरी त्यांच्या आवडीचा भाग असला तरीदेखील आनंददायी जीवन जगण्यासाठी कोणते विचार वाचले पाहिजेत, स्वीकारले पाहिजेत यासंबंधात शास्त्रीजी अनेक उदाहरणांच्या माध्यमांतून भर देत असतात.

जीवनमूल्यांवर त्यांची अमर्याद निष्ठा आहे. मैत्री, स्नेह, श्रद्धा, वात्सल्य यांसारख्या भावना त्यांच्या मनाला सुखावून सोडतात. मोठ्यांच्यामध्ये ते लहान ठरलेले नाहीत आणि लहानांमध्ये त्यांनी कधीही मोठेपणाचे प्रदर्शन केले नाही. माणसाबद्दल प्रेम हा त्यांचा स्थायीभाव आहे. सामान्यांना दीपवून टाकणाऱ्या गंभीर अशा विचारांचे डोंगर त्यांनी कधीही उभे केलेले नाहीत. हे असे खरे तसेच असामान्य काय आहे, हे दर्शविण्यासाठी ते नेहमीच सिद्ध असतात.

समाजजीवनातील अनेक विषमतेच्या भिंती त्याच्या गजाला पीडा देतात. धर्म आणि जाती यांतून दुभंगलेला समाज त्यांच्या विचाराने त्यांना बेचैन करतो.

शास्त्रीजी आचार-विचारांनी पुरोगामी आहेत. परंपरा, रूढी समाजाला पुढे नेणारे काय आहे, हे सांगण्यात त्यांना आनंद वाटतो आणि ते सांगत असतानाच समाजजीवनास गतिरोधक बनून राहिलेले विचार-आचार कोणते आहेत, याचाही ते सातत्याने उल्लेख करतात. संस्कृतीवर त्यांचे अगाध प्रेम आहे, पण या संस्कृतीमध्ये विकृती कोठे आहे, याचाही शोध घेऊन त्यासंबंधीचे योग्य ते मार्गदर्शन त्यांनी अखंडपणे आजअखेर केले आहे.

जीवनाच्या एका विशिष्ट टप्प्यावर आता शास्त्रीजी येऊन पोहोचलेले आहेत. अनेकजण त्यांना सातत्याने असंख्य प्रश्न विचारीत असतात. समाजजीवन आणि कौटुंबिक जीवन यांतील सुख आणि आनंद वाढविणाऱ्या गोष्टी कोणत्या यावरच शास्त्रीजींचा अलीकडे अधिक भर असतो. कौटुंबिक जीवनात एकमेकांबद्दलच्या वागणुकीत मार्दव असावे असे सांगताना शास्त्रीजी कोणी जर कठोर अभिप्राय दिला, तर नाराजी व्यक्त करतात. कुटुंबातील माणसांमध्ये गोडी कायम राहील या दृष्टीने आपली भाषा व आविष्कार असावा असा यांचा आग्रह असतो. शिक्षणाच्या वयात असणाऱ्यांचा उत्साह कायम राहील आणि शिक्षणाबद्दलची त्यांची आस्था पक्की होत राहील, असेच आपण बोलत व वागत राहावे याकडे त्यांचे अधिक लक्ष असते.

दीर्घायुरारोग्य हा त्यांनी आपल्या समोर ठेवलेला मोठा आदर्श आहे. यासाठी आहार-विहारांच्या मर्यादा यांनी आखलेल्या आहेत. उत्साह वाढविणारे जीवनातील विविध प्रसंग ते आपल्यासमोर मांडत असतात. आर्थिक चणचणीतून निर्माण होणारी बेचैनी आपण टाळावी याही गोष्टी ते सांगत राहतात. मनःशांती हे कुटुंबाचे स्वास्थ्य ठेवणारे रहस्य आहे, याचा उल्लेख ते सातत्याने करीत असतात. जीवनामध्ये आचार-विचारांतून गैरसमज निर्माण होणार नाहीत, याकडे प्रत्येकाने लक्ष पुरविणे गरजेचे आहे, हे सांगता सांगताच नम्रता स्वीकारून निर्माण झालेला ताठरपणा घालविता येतो, याचेही सोदाहरण उल्लेख ते सातत्याने करीत असतात.

जीवनातील मैत्री, करुणा आणि उपेक्षा यांचा उल्लेख त्यांनी अलीकडेच केला; याचे स्पष्टीकरण करताना शास्त्रीजींनी सांगितले की हे तीनही भाव आपण जपले पाहिजेत. ज्यांची सुस्थिती आहे, त्यांच्याबद्दल मैत्री भाव हवा, ज्यांना अडचणी आहेत, त्यांच्याबद्दल करुणा हवी व ज्यांच्यात दोष आहेत, त्यांच्यातील दोषांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्याची मानसिक तयारी हवी. अशा रीतीने मन:स्थिती ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. कारण कौटुंबिक जीवनातील निरोगीपण त्यात आहे. विनोबा भावे यांच्यापासून कवी अनिलांपर्यंत आणि महात्मा गांधींपासून यशवंतराव चव्हाणांपर्यंत अगणित मित्र शास्त्रीजींना मिळाले. विनोबांनी त्यांच्यावर निस्सीम प्रेम केले, पण या प्रेमाचे कारण शास्त्रीजी आजही सांगू शकत

नाहीत. शास्त्री, वाटवे, एम. एन. रॉय, आत्माराम पाटील, पु. ल. देशपांडे, ना. धों. महानोर अशा कितीकांची नावे शास्त्री सांगत राहतात.

शास्त्रीजींना जीवनातील अनेक आनंददायी स्थळांचा उल्लेख त्यांच्या साहित्यात सापडतो. ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास हे त्यांना वंदनीय व वाचनीय वाटतात. त्यांच्या साहित्यात दडलेले खोल अर्थ शोधण्यात त्यांना आनंद मिळतो. रामदासांच्या साहित्यात साहित्यिक गुण कमी असले तरी त्यांनी विवेकास केलेला उपदेश शास्त्रीजींना आनंद देतो. ज्ञानेश्वर, तुकाराम यांच्या साहित्यात यांना उच्च दर्जाच्या गुणांचे दर्शन घडते, असे सांगत असतानाच सर्वच संत आपल्यावर प्रभाव पाडून गेलेले आहेत, असाही उल्लेख ते करतात. आपण कोणत्याही संतास वगळू शकत नाही, असे सांगताना शास्त्रीजी एकनाथांचे नाव घेतात आणि एकनाथांचे जीवन म्हणजे आदर्श संत म्हणून निर्दिष्ट करता येते, असे सांगत सांगत आपली बातचीत संपवतात. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री विसाव्या शतकाच्या इतिहासाचे जसे साक्षीदार आहेत, तसेच ते खऱ्या अर्थाने आनंदयात्री आहेत.

**(दैनिक केसरी, पुणे, दि. २८ जानेवारी, १९९३)**

ooo

# ३१.
# साहित्य-संस्कृतीचे महातीर्थ
## प्राचार्य शिवाजीराव भोसले

कृष्णा नदीच्या उगमस्थानापासून सुमारे पंधरा मैलांच्या अंतरावर, नदीतीरावर वसलेले वाई नावाचे नगर तसे सर्वज्ञात आहे. पाचगणी-महाबळेश्वरच्या वाटेवर असणारे हे गाव अनेकांनी पाहिले असेल. प्रतापगडाकडे जाणारे इतिहासप्रेमी वाईच्या घाटावर विश्रांती घेतात. पोलादपूर-महाडमार्गे रायगडाकडे जाणारे शिवप्रेमी कृष्णेचे पाणी पिऊन पुढे पाऊल टाकतात. याच गावात मराठी विश्वकोशाचे रचनाकार तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी राहतात. ज्ञानविज्ञानाच्या विविध क्षेत्रांत अविरत संचार करणारे शास्त्रीबुवा हे आजन्म वाईत राहिले. वाई शहराच्या भोवती डोंगराचा फेर उभा करण्याचे काम निसर्गाने केले. नदीकाठी घाट आणि मंदिरे बांधण्याचे काम माणसांनी केले. देशातील प्रज्ञावंतांसाठी प्राज्ञपाठशाळा नावाचे संस्कारपीठ स्थापन करण्याचे काम केवलानंद सरस्वती यांनी केले. या केवलानंदांना एक विवेकानंद भेटले ते तर्कतीर्थांच्या स्वरूपात. एका पुरातन तीर्थाला खऱ्या अर्थाने तीर्थरूपत्व प्रदान करणारे तर्कतीर्थ हे साहित्य-संस्कृतीचे महातीर्थ मानावे लागेल.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी! वय वर्षे ९४! वार्धक्याला अंतरावर ठेवून ज्ञानसाधना करणारा योगी! पहाटेच्या प्रहरी उठणारा, आसन-प्राणायामाचा अभ्यास करणारा, नवनवीन प्रमेयांचा परामर्श घेणारा, मराठी विश्वकोशाच्या रचनेत रममाण झालेला आधुनिक व्यास! कोणीही जावे, या ज्ञानयोग्याचे दर्शन घ्यावे, त्याच्या संगतीत तत्त्वचिंतन करावे, विचारमंथन करावे, कृतार्थ व्हावे आणि परत यावे. चारी धामांच्या, अष्टविनायकांच्या, बारा ज्योतिर्लिंगांच्या यात्रेने जे लाभणार नाही ते तर्कतीर्थांच्या सहवासातील काही क्षणांनी लाभेल.

दि. २७ जानेवारी १९०१ या दिवशी धुळे जिल्ह्यात असणाऱ्या पिंपळनेर गावी शास्त्रीबुवांचा जन्म झाला. त्यांचे वडील हेही एक शास्त्री होते, याज्ञिक होते. भिक्षुकी हा त्यांचा व्यवसाय होता. धर्मकृत्यांत प्रवीण असणारे याज्ञिक म्हणून त्यांना मोठी मान्यता होती. त्यांचे

पौरोहित्य लाभावे म्हणून अनेक यजमान त्यांच्या दारी धरणे धरीत. प्रसन्नचित्त, अल्पसंतुष्ट, अध्ययनशील आणि शुचिर्भूत ब्राह्मण म्हणून सर्वजण बाळंभटजींकडे पूज्यतेच्या भावनेने पाहत. या भटजीबुवांची पत्नी चंद्रभागा ही सुविद्य अशी संस्कारगंगाच होती. या गंगेने कृष्णेची ओटी भरली ती ज्ञानविज्ञानाच्या ओंजळीने.

पिंपळनेर या गावी शास्त्रीबुवांना पारंपरिक संस्कार लाभले. वडिलांबरोबर यजमानांच्या घरी जाणे, धर्मकृत्यांचे अवलोकन करणे, जमल्यास त्यात सहभागी होणे, या गोष्टी त्यांना सहजसाध्य होत्या. बालपणी निजामपूरकर बुवांची कीर्तने ऐकणे हा लक्ष्मणाचा छंद होता. कीर्तनात प्रकट होणारे अनेक गुण लक्ष्मणाच्या अबोध मनाने नकळत टिपले आणि अनुकरणाने आत्मसात केले. पहिल्या काही इयत्तांचे प्राथमिक शिक्षण पिंपळनेरात झाले. त्या काळी शिक्षणात अनुक्रमबद्ध अशी सलगता नव्हती. ते कोठेही सुरू होत असे आणि संपत असे. गुरुकुल पद्धतीचा अनुसार करणारे काही आश्रम व पाठशाळा विद्यादानाचे कार्य करीत असत. तेव्हा शिक्षण हे थोड्या लोकांसाठी होते आणि थोडेच शिक्षण अनेकांना पुरत असे. अध्ययनात विशेष रस आणि गती असणारे विद्यार्थी विद्यार्जनासाठी दूर कोठे तरी जात. पिंपळनेरच्या बाळंभटजींना लक्ष्मणाच्या शिक्षणाची चिंता होती. त्याला कुठेतरी धाडण्याच्या विचारात ते असताना त्यांना कोणीतरी वाईची दिशा दाखवली.

तेव्हा आजकालच्या शाळा, विद्यालये, विद्यापीठे आणि परीक्षापद्धती अशी शिक्षणव्यवस्था नव्हती. काही नगरांतून पंडितांनी चालवलेल्या पाठशाळा होत्या. राहण्यासाठी धर्मशाळा, शिकण्यासाठी पाठशाळा, भोजनासाठी अन्नछत्र किंवा माधुकरी अशी जीवितचर्या महत्त्वाकांक्षी विद्यार्थ्यांच्या वाट्याला येत असे. लक्ष्मणाने पिंपळनेरमध्ये रुतून राहू नये; दूर कुठे तरी जावे, गुरुगृहवास पत्करावा, संस्कृत आणि पारंपरिक शास्त्रे काळजीपूर्वक अभ्यासावीत आणि नावारूपाला यावे असे बाळंभटजींना वाटे. पण जावे कोठे? प्राचीन गुरुकुल पद्धतीचा अनुसार करणारे हरिद्वार येथील श्रद्धानंदांचे विद्यालय आणि वाई येथील पंडित नारायणशास्त्री मराठे यांची पाठशाळा या दोहोंपैकी एके ठिकाणी जाणे शक्य आणि हिताचे होते. वाईचे दादासाहेब देवकुळे हे पिंपळनेर येथे जंगलखात्याचे अधिकारी म्हणून काम पाहत होते. त्यांच्या मार्गदर्शनामुळे लक्ष्मणाची पावले वाईकडे वळली. लक्ष्मण वाईला जाणार, बहुश्रुत आणि सुसंस्कृत होणार, स्वधर्मनिष्ठ होणार हे स्वप्न वडील पाहत होते. एका शुचिर्भूत वैदिकाला पडलेले ते स्वप्न होते.

वाईची पाठशाला ही विद्यार्थ्यांना केवळ पढिकतेच्या वाटेने चालविणारी निर्जीव संस्था नव्हती. राष्ट्रीय शिक्षणाचा आग्रह धरणारी ती तत्त्वनिष्ठांची तपोभूमी होती. या तपोभूमीत प्रवेश करणारा हा लक्ष्मण एक नवे रामायण घडवील, असा विश्वास अनेकांना वाटत होता. व्याकरण, न्याय, पूर्वमीमांसा आणि वेदान्त या शास्त्रांचा अभ्यास लक्ष्मणाने केला. १९१८ मध्ये न्यायशास्त्राचा विशेष अभ्यास करण्यासाठी लक्ष्मण वाराणसीला गेला.

रामेश्वरशास्त्री द्रवीड आणि वामाचरण भट्टाचार्य या विख्यात विद्वानांच्या मार्गदर्शनाखाली त्याने न्यायदर्शनाचा सांगोपांग अभ्यास केला. १९१७ मध्ये विनोबा भावे शांकरभाष्याचा अभ्यास करण्यासाठी गांधीजींच्या अनुज्ञेने वाईला येऊन राहिले होते. विनोबाजी हे लक्ष्मणशास्त्रींचे त्या काळचे इंग्लिशचे शिक्षक झाले. विनोबांचे बोट धरून तर्खडकरांना वाट पुसत आपल्या व्यासंगबळावर शास्त्रीबुवा शेक्सपिअरपर्यंत पोहोचले. १९२० मध्ये शास्त्रीबुवा प्राज्ञपाठशाळेत अध्यापक झाले. १९२२-२३ मध्ये कलकत्त्याच्या शासकीय महाविद्यालयाची 'तर्कतीर्थ' ही पदवी शास्त्रीबुवांनी संपादन केली. पंचविशी उलटली. शास्त्रीबुवा परिणतप्रज्ञ झाले. आता त्यांनी गृहस्थाश्रमात प्रवेश करावा, असे त्यांच्या वडिलांना आणि गुरुदेवांना वाटले. शास्त्रीबुवा विवाहबद्ध झाले. मुल्हेर येथील वासुदेव पंडित यांची कन्या कावेरी, सत्यवती हे नाव धारण करून शास्त्रीबुवांच्या जीवनात आली. पंचाहत्तरीत असणाऱ्या बाळंभटजींनी सत्यवतीचे मुख पाहिले आणि तिला आशीर्वाद दिला. या आशीर्वादाने त्या ज्ञानवृद्धाचा अमृतमहोत्सव साजरा झाला.

प्राज्ञपाठशाळा ही राष्ट्रीय बाणा बाळगणारी शाळा होती. धर्म आणि राष्ट्र यांचा अभिमान बाळगणारी विद्यासंपन्न मुले या शाळेच्या प्रांगणात उभी होती. एखादे राष्ट्रीय आंदोलन उभे राहिले की, त्यात उत्स्फूर्तपणे सहभागी व्हायचे हा या व्रतस्थ जिवांच्या अभ्यासाचा आणि जीवितकार्याचा भाग होता. १९३० आणि ३२ च्या कायदेभंगाच्या चळवळीत शास्त्रीबुवांनी सक्रिय भाग घेतला. कारागृह नावाचे एक नवीन दालन, एक नवे परिमाण घेऊन त्यांच्यापुढे प्रकट झाले. या दालनात त्यांना विनोबाजी, साने गुरुजी, शेठ जमनालाल, भय्यासाहेब मुधोळकर, अण्णासाहेब दास्ताने अशी मंडळी भेटली. केवलानंद सरस्वती हे व्यक्तिमत्त्व अनेकांच्या दृष्टीने प्रातःस्मरणीय होते. महात्मा गांधी त्यांना मानत. धर्मशास्त्राच्या संदर्भात त्यांच्याशी विचारविनिमय करीत. वेदकालापासून विज्ञानयुगापर्यंत 'धर्म' नावाच्या विचारधारेत वारंवार आढळणारी वळणे व घडलेला बदल विचारांत घेऊन अवघ्या धर्मजीवनाचा आलेख तयार करण्याच्या तयारीत असणारे केवलानंद सरस्वती धर्मकोशलेखनाचा संकल्प सोडून कार्यास लागले होते. गांधीजींना या कार्याचे कौतुक होते. १९२० मध्ये गांधीजींनी प्राज्ञपाठशाळेस भेट दिली. 'पूज्य नारायणशास्त्रींचे हे ऋषिकुल पाहून मी प्रसन्न झालो,' असा अभिप्राय गांधीजींनी दिला. १९२१ मध्ये शास्त्रीबुवा बार्डोलीच्या आश्रमात जाऊन राहिले. गांधीजींच्या जवळ जाऊन पोहोचले. १९३३ मध्ये 'हिंदू धर्मशास्त्र आणि अस्पृश्यता' या संदर्भात लक्ष्मणशास्त्रींशी महात्माजींनी चर्चा केली. गांधीजींना हरिजनसेवा हवी होती. त्यासाठी धर्माचा आधारही हवा होता. जेव्हा जेव्हा धर्मशास्त्राचा विचार करण्याची वेळ येई, तेव्हा गांधीजी केवलानंद आणि लक्ष्मणशास्त्री यांच्याशी संवाद साधत. केवलानंद हे आश्रमात राहणारे! शास्त्रीजी हे पायाला चाक बांधून धावत राहणारे.

तर्कतीर्थांच्या रूपाने गांधीजींना एक धर्मशास्त्रविवेचक भेटला. संस्कृतीचा एक प्रबोधनकार भेटला. चालता-बोलता, फिरता-वावरता गतिमान तत्त्ववेत्ता भेटला.

असाच एक प्रसंग. अगदी सत्त्वपरीक्षेचा क्षण! गांधीजींचे चिरंजीव देवदास आणि राजगोपालाचार्यांची कन्या लक्ष्मी यांच्या विवाहाची बोलणी चालू होती. बोलणे सोपे होते. लग्न मात्र अवघड होते. वैश्य आणि ब्राह्मण यांच्यात विवाहसंबंध संभवू शकत नव्हता. तो धर्मबाह्य ठरणार होता. गांधीजींना धर्माधार हवा होता. रजिस्टर लग्न गांधींना नको होते. कोण देणार हा आधार? कोण करणार या प्रसंगी पौरोहित्य? महात्माजींना कृष्णेच्या काठी असणारा हा तेजस्वी वैदिक आठवला. त्यांनी तर्कतीर्थांना पाचारण केले. तर्कतीर्थांनी महात्माजींचे समाधान केले. ते म्हणाले, "वर्णव्यवस्था फार जुनी झाली आहे. ती कालबाह्य आणि गतार्थ झाली आहे. मी हा विवाहसोहळा यथासांग पार पाडू शकेन. आपण निश्चिंत राहा." या विवाहप्रसंगी शास्त्रीजींबरोबर सत्यवतीबाई पण गेल्या होत्या. त्यांना गांधी-कस्तुरबा जवळून पाहावयास मिळाले. कस्तुरबांनी सत्यवतीस आशीर्वाद दिला. त्याच क्षणी महाराष्ट्राच्या त्या 'सती'काकू झाल्या.

शास्त्रीबुवांनी महात्मा गांधींच्या मुलांच्या विवाहाचे पौरोहित्य केले, ही गोष्ट कर्मनिष्ठांना रुचली नाही. परंपरेच्या पुजाऱ्यांनी वाईच्या गणपती घाटावर एक निषेधसभा घेतली. अध्यक्षस्थानी शंकराचार्य जेरेशास्त्री होते. ब्रह्मवृंदांनी गहजब केला. 'धर्म बुडाला' असा डंका पिटला. शंकराचार्य आपल्या भाषणात म्हणाले, "हे निषिद्ध कर्म केल्याबद्दल धर्मशास्त्रानुसार शास्त्रीबुवांना नरकवास प्राप्त होईल." या शापवाणीला उत्तर म्हणून शास्त्रीबुवांनी आचार्यांना एक अनावृत पत्र लिहिले. पुण्याच्या एका दैनिकात ते छापून आले. त्या पत्राचा आशय असा, ''तुम्ही शंकराचार्य धर्मशास्त्राविरुद्ध वागता. संन्याशाने जरीकाठी, रेशमी वस्त्रे वापरावयाची नसतात. तुम्ही ती वापरता. ही निषिद्ध कृती केल्याबद्दल मृत्यूनंतर आपणांस जी गती प्राप्त होईल, तीच मलाही होणार आहे. तुमची-आमची भेट तेथे होईलच." या पत्राने शंकराचार्यांचे आसन डळमळले. अवसान गळाले.

कन्हैयालाल मुन्शी केंद्रीय मंत्री होते. त्यांच्या मनात एक संकल्प स्फुरला. सोमनाथ मंदिराचा जीर्णोद्धार करावा आणि हे मंदिर सर्व जातिधर्माच्या लोकांना खुले करावे. त्यांनी शास्त्रीजींना त्याचे साकडे घातले. शास्त्रीबुवांनी धर्मशास्त्राचा आधार घेऊन हे कार्य सिद्धीस नेले. सोमनाथाची प्राणप्रतिष्ठा केली. या सोहळ्याचे यजमान होते राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद. मार्गदर्शक होते केवलानंद सरस्वती. संयोजक होते तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी. हा दिवस होता वैशाख शुद्ध द्वितीया शके १८७३, वेळ होती सकाळची (९वा. ४६ मिनिटे).

त्या दिवशी वैदिक धर्माच्या सर्वसंग्राहकतेचे निशाण सोमनाथाच्या शिखरावर फडकले आणि कर्मठपणाच्या कर्दमात बुडालेले काही आग्रही जीव कळवळले.

शास्त्रीबुवा आता केवळ वाईचे राहिले नाहीत, प्राज्ञपाठशाळेचे राहिले नाहीत, ते अवघ्या

भारताचे झाले; समाजप्रबोधनकार म्हणून पक्षश्रेष्ठींनी त्यांचा गौरव केला. १९३६ पासून १९४८ पर्यंत ते मानवेंद्रनाथ रॉय यांच्या रॅडिकल डेमोक्रॅटिक पार्टीचे क्रियाशील सभासद होते.

शास्त्रीजींचे व्यक्तिमत्त्व सहस्र पैलूंनी संपन्न होते. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे ते अध्यक्ष होते. प्राज्ञपाठशाळेने प्रसिद्ध केलेल्या अनेक खंडात्मक धर्मकोशाचे ते संपादक आहेत. वीस संकल्पित खंडांत प्रकाशित होणाऱ्या विश्वकोशाचे ते प्रधान संपादक आहेत. यांपैकी १४ खंड अभ्यासकांच्या हाती आले आहेत.

महाराष्ट्राला बुद्धिवादी विचारवंतांची एक सुदीर्घ परंपरा आणि संपन्न परंपरा लाभली आहे. शास्त्रीबुवा या प्रणालिकेत आपल्या तेजाने शोभून दिसतात. आपल्या देशात बोलणारे लिहीत नाहीत, लिहिणारे बोलत नाहीत आणि दोघे मिळून काहीच करत नाहीत, असा एक प्रवाद आहे. शास्त्रीबुवा हा एक अपवाद आहे. ते वक्ते आहेत, लेखक आहेत, कार्यकर्ते आहेत. त्यांच्या ऐन उमेदीतील प्रभावी भाषणांनी भारावून जाणारे अनेक विद्यार्थी आज वक्ते झाले आहेत. माटे आणि फडके यांनी मराठी वक्तृत्वाला डौल दिला. सावरकरांनी त्याला झेप दिली, शास्त्रीबुवांनी त्याला धार दिली.

व्याख्याने आणि परिषदा यांच्या निमित्ताने शास्त्रीबुवा किती फिरले याला पारावार नाही. एवढा विद्वान, पण अहंता नाही. ग्रामीण भागातील प्राथमिक शाळेच्या गटसंमेलनापासून दिल्लीच्या साहित्यसंमेलनापर्यंत, महाबळेश्वरात भरणाऱ्या काँग्रेस कार्यकर्त्यांच्या शिबिरापासून पॅरिस येथे भरणाऱ्या आंतरराष्ट्रीय प्राच्यविद्या परिषदेपर्यंत शास्त्रीजींचा अविरत विहार चालू असतो. बुद्धविहाराची यावरून कल्पना येते. वय विसरून गेलेला हा विद्वान ज्ञानविज्ञानाच्या क्षेत्रात चिरंजीव ठरला आहे.

मे १९९३ मध्ये शास्त्रीजी अमेरिकेचा दौरा करणार आहेत. या दौऱ्यात त्यांना एक विशेष पुरस्कार भारतीय बांधव देणार आहेत. न्यूयॉर्क परगण्यात आंध्रचे माजी मुख्यमंत्री एन. टी. रामाराव यांच्या हस्ते हा पुरस्कार दिला जाणार आहे. हा 'तेलुगु थल्ली' या नावाने ओळखला जाणारा पुरस्कार भारतीय भाषांची श्रीमंती वृद्धिंगत करणाऱ्या थोर सारस्वताला दिला जातो. या वर्षीचे या पुरस्काराचे मानकरी शास्त्रीबुवा आहेत. अमेरिकेत होणारा मराठी भाषेचा आणि पांडित्याचा हा बहुमान आहे. या सुखद वार्तेने नेवासे येथील पैसाचा खांब आनंदाने पाझरला असेल.

शास्त्रीजींचा प्रत्येक ग्रंथ हे एक देशीकार लेणे आहे. 'जडवाद', 'ज्योतिनिबंध', 'वैदिक संस्कृतीचा विकास', 'आधुनिक मराठी साहित्याची समीक्षा आणि रससिद्धांत', 'हिंदुधर्माची समीक्षा' हे त्यांचे ग्रंथ म्हणजे विचारगुंफेतील कोरीव लेणी आहेत.

पिंपळनेरच्या बाळंभटजीच्या मुलाला यजमान म्हणून राष्ट्रपती भेटावेत; मित्र म्हणून गोवर्धन पारीख, यशवंतराव चव्हाण, द्वा. भ. कर्णिक लाभावेत, गोगटे, किर्लोस्कर,

कल्याणी या उद्योगपतींनी त्यांचा गौरव करावा हे कौतुकास्पद नव्हे काय? बाळंभटजींना सतत थोडीफार दक्षिणा मिळाली असेल, पण त्यांच्या मुलाला काय काय लाभावे?

दि. ७ मार्च १९९० या दिवशी इचलकरंजीच्या 'फाय फाउंडेशन'ने त्यांना 'राष्ट्रभूषण' हा किताब आणि एक लाख रुपयांचा पुरस्कार दिला. भारतीय दार्शनिक अनुसंधान परिषदेने त्यांना सन्मानपत्र आणि एक लाख रुपयांचा गौरवनिधी समर्पित केला. दि. ३१ डिसेंबर १९९० रोजी महाराष्ट्र सरकारने एक लाख रुपयांचा 'महाराष्ट्र गौरव पुरस्कार' दिला. कोल्हापूरच्या शाहू छत्रपती मेमोरियल ट्रस्टने गौरवपत्र, मानचिन्ह आणि ११ हजारांचा निधी त्यांच्या हवाली केला. सातारच्या गोडबोले ट्रस्टने पाच हजारांचा गौरवनिधी या विद्वानाच्या पायी ठेवला.

शास्त्रीबुवांना टिळक-गांधीजींचे आकर्षण वाटे, सावरकर त्यांना प्रिय होते. आगरकर, मिल आणि स्पेन्सर हे त्यांचे आवडते लेखक, मानवेन्द्रनाथ रॉय नावाचे क्रांतिकारक आणि तत्त्वज्ञ त्यांचे आप्तस्वकीय. शास्त्रीबुवा हे माणसांत रमणारे पण स्थितप्रज्ञाच्या साक्षीत्वाने सर्वांकडे पाहणारे जगन्मित्र आहेत. मुला-नातवंडांना बरोबरीने वागवणारे ते सर्वांचे आबा आहेत. वाईकरांचे ते पितामह आहेत.

१९७५ मध्ये शास्त्रीबुवांनी ७५ व्या वर्षात पदार्पण केले. या अमृतमहोत्सवी वर्षात मुंबई विद्यापीठाने त्यांना एल. एल. डी. ही पदवी दिली. त्या पाठोपाठ राष्ट्रपतींनी त्यांना पद्मभूषण म्हणून गौरवले. शास्त्रीबुवांचे जीवनाकाश गौरवचिन्हांच्या तारकांनी झळाळत होते. या रत्नखचित आकाशाला एकाएकी तडा गेला आणि सर्वांत देदीप्यमान तारा निखळून पडला. दि. १२ ऑगस्ट १९७८ या दिवशी सतीकाकू त्यांना सोडून गेल्या. एक थोर तत्त्वज्ञ हादरून गेला. त्याचा कंठ दाटून आला, पण शब्द फुटेना. शेवटी पोरकेपणाची शाल पांघरून, हाती लेखणी घेऊन 'सत्यवतीची जीवनयात्रा' हे अक्षरशिल्प शास्त्रीजींनी साकार केले. उदंड ग्रंथकर्तृत्व करणाऱ्या शास्त्रीबुवांनी आपल्या सहचारिणीचे चरित्रलेखन केले. आणि एक दीर्घ निःश्वास सोडला. शास्त्रीबुवांची लेखणी कुजबुजली, 'आज मी सौभाग्यवती झाले.'

अल्पकाळ खचलेले शास्त्रीबुवा उठले आणि उद्योगाला लागले. सभा-संमेलनांना जाऊ लागले. आपल्या विवेकनिष्ठ, विज्ञाननिष्ठ, बुद्धिनिष्ठ प्रतिपादन पद्धतीने समाजप्रबोधन करू लागले.

शास्त्रीबुवा या वयातही परिव्राजकाच्या निष्ठेने परिभ्रमण करतात. महिन्यातून पंधरा दिवस घराबाहेर असतात. मुले, माणसे, मित्र, हितचिंतक आणि त्यांचा प्राज्ञपरिवार त्यांना परावृत्त करण्याचा प्रयत्न करतात. सर्वांना वाटते, आबांनी आता थांबावे. प्रवासाची दगदग टाळावी. यावर तर्कतीर्थ म्हणतात, 'हा माझा प्राणवायू आहे. माझे आरोग्य यामुळे टिकून आहे.' प्राचार्य शिवाजीराव भोसले व्याख्यानासाठी फार फार भ्रमंती करतात, अशी तक्रार

कोणीतरी शास्त्रीबुवांजवळ केली, तेव्हा ते म्हणाले होते, "प्रवाहाने वाहावे, प्राचार्यांनी फिरावे, तेच त्यांचे जीवन."

देशोदेशीचे अभ्यासक अध्ययनासाठी वाईला येतात. शास्त्रीबुवांजवळ राहतात. अभ्यास करतात. धन्यतेच्या भावनेने या महापुरुषाला नमस्कार करून वाईकरांचा निरोप घेतात.

तर्कतीर्थांची अभ्यासिका हे एक मंदिर आहे. वेद, शास्त्र, पुराणे, तत्त्वज्ञान, विज्ञान इतिहास राजकारण, शिक्षण, कला, साहित्य, धर्म अशा अनेक विषयांवरचे ग्रंथ नेमकेपणाने आणि चिरेबंद पद्धतीने लावून ठेवलेले आहेत. शास्त्रीबुवांचे बोलणे-लिहिणे साधार आणि सप्रमाण असते. काही क्षणांत हवा तो संदर्भ ते शोधू शकतात, सांगू शकतात. डॉ. आंबेडकरांप्रमाणे शास्त्रीबुवा ग्रंथवेडे आहेत. 'पुस्तक हे संस्कृतीचे मस्तक आहे' असे ते मानतात. शिरोधार्य अशा ग्रंथांच्या संगतीत काळ कंठणारा हा 'ज्ञानियांचा राजा' कृष्णेच्या तीरावर आज उभा आहे. तर्कतीर्थ हे विचारवंतांच्या जीवनातील एक 'तीर्थ' आहे. साहित्य आणि संस्कृती यांचे ते 'महातीर्थ' आहे.

अभ्यास हे एक मूल्य आहे. विद्यार्जन हे एक व्रत आहे. ज्ञानाइतके पवित्र काहीच नाही. ज्ञानविज्ञानामुळे निसर्गावर प्रभुत्व संपादन करता आले. धर्म आणि तत्त्वज्ञान यांमुळे विकारांवर विजय मिळवता आला. साहित्यामुळे संवेदनांना रूप प्राप्त झाले. अध्यात्मामुळे आत्मबोध घडला. नीतिविचारामुळे जीवनाचे प्राप्तव्य कळले. हा सगळा इतिहास प्रकाशात आणण्याचे काम शास्त्रीजींनी केले.

मराठी भाषा आणि साहित्य यांचा सर्वांगीण विकास व्हावा, विचारी वाचकांच्या जिज्ञासेची परिपूर्ती घडावी, विज्ञान, तंत्रज्ञान आणि समाजविज्ञान यांचे किमान आकलन सर्वांना घडावे आणि महाराष्ट्राच्या नागरिकत्वाची उंची वाढावी यासाठी तर्कतीर्थांनी केलेल्या प्रयत्नांना तुलना नाही. जगातील प्रगल्भ भाषांतून ज्ञानकोशाचे खंड निघाले. अमृताला पैजेने जिंकू पाहणाऱ्या मराठी भाषेत त्यांचा अभाव जाणवत होता. शास्त्रीजींनी हे रितेपण दूर केले. या विश्वकोशामुळे मराठी भाषेचे विश्व विस्तारले.

आज तर्कतीर्थ शतकपूर्तीच्या सीमेवर उभे आहेत. २१ व्या शतकाला सन्मुख असणाऱ्या नवभारताच्या जडणघडणीत शास्त्रीजींचा वाटा मोठा आहे. शास्त्रीजींच्या विचारांची उत्तुंगता त्यांच्या एखादा सहज उद्गारावरूनही लक्षात येते. अमेरिकेत दिलेल्या एका मुलाखतीत शास्त्रीबुवा म्हणाले, "शांती हे धर्माचे उद्दिष्ट आहे. हे मुलांना लहानपणापासून शिकवा. युद्धाची सुरुवात प्रथम मनात होते... शस्त्रास्त्रे नंतर येतात. नव्या युगात विश्वमैत्रीची भावना निर्माण झाली नाही तर मानवसमाजाचे अस्तित्व धोक्यात येईल." त्यांच्या वयाच्या ८२ व्या वर्षी प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या एका लेखसंग्रहाच्या प्रस्तावनेत शास्त्रीजी सांगतात, "जुन्या जगातील अत्यंत बुद्धिवंत लोक ज्या निश्चित व स्थिर अशा विश्वविषयक संकल्पनांच्या मर्यादेत विचार करीत राहिले व जगले, ते विश्वाचे चित्र आज अवास्तव ठरत

असून नित्य बदलत आहे. नव्या नव्या विश्वतत्त्वांच्या आणि विश्ववस्तूंच्या संकल्पनांनी सतत समृद्ध होणारी विश्वसंकल्पना स्वीकारल्याशिवाय ज्ञानाची प्रगती होऊ शकत नाही. आता पाठीमागे जाता येणार नाही."

कृष्णेच्या तीरावर असणाऱ्या आपल्या कुटिरातून अवघ्या विश्वाच्या आणि मानवकुलाच्या भवितव्याचा विज्ञानवेध घेणाऱ्या या विद्यावंताला, विचारवंताला, प्रज्ञावंताला अभ्यासकांच्या अनेक पिढ्या आदरपूर्वक अभिवादन करीत राहतील!

**('दीपस्तंभ' (१९९४) मधून उद्धृत)**

OOO

## ३२.

# महाराष्ट्रातील एक थोर विचारवंत : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

**मीनल भावे**

शास्त्रीजींची प्रतिमा नजरेसमोर आली की विद्वान आणि विचारवंत या दोहोंची व्याख्या नव्याने करावीशी वाटते.

शास्त्रीजींच्या विचारकार्याचा मागोवा अनेक प्रकारे घेता येणे शक्य आहे. वयाच्या चौदाव्या वर्षी ते वाईच्या प्राज्ञ पाठशाळेत आले व त्यांना आचार्यदर्शन घडले. आपला जन्म त्याच आचार्यकुळात झाला आहे, असा साक्षात्कार त्यांना घडला. पण पारंपरिक आचार्य परंपरेत शोभण्यासारखे अध्ययन-अध्यापन करूनही ते त्या परंपरेतून लवकर बाहेर पडले. महात्माजींच्या चळवळीत ते सामील झाले व जुन्या शास्त्राधारे नव्या सुधारणा साधू लागले. पण भारतीय सुधारणावादातूनही ते बाहेर पडले व मार्क्सवादी व रॉयवादी विचारप्रणालीने भारावून गेले.

भारतापुरताच मर्यादित असलेला त्यांचा ध्येयवाद त्यामुळे अखिल मानवजातीच्या ध्येयवादात परिणत झाला. अध्यात्मकेंद्रित विशाल मानवतावादाचा ध्रुवतारा शास्त्रीजींच्या वैचारिक वाटचालीचा मार्गदर्शक ठरला असे म्हणावे लागेल.

नव्या ध्येयवादाने सतत बदलणारे प्रवाही विचारवंत म्हणून नेमक्या शब्दांत त्यांना पकडणे सोपे नाही. मोठमोठ्या नेत्यांच्या व विचारवंतांच्या प्रभावळीत व प्रभावाखाली येऊनही शास्त्रीजींनी आपले विचारस्वातंत्र्य अबाधित राखले, एक प्रकारच्या गंभीर सारग्राही (इलेक्टिक) वृत्तीने त्यांनी सर्व विचारधारांचे सार तेवढे आत्मसात केले व त्याज्य वाटले ते निर्भयपणे अव्हेरले. योग्यायोग्याचा हा साक्षेपी विवेक हे शास्त्रीजींच्या विचारकार्याचे खरे रहस्य असावे, म्हणूनच असे वाटते कोणती एकच एक वैचारिक भूमिका अंधपणाने त्यांनी कधीच स्वीकारली नाही. कोणत्याच तत्त्वप्रणालीची बांधिलकी पत्करली नाही. म्हणूनच सनातन्यांना कधी ते जवळचे भासले, तर कधी आधुनिकांना ते आपलेसे वाटले.

ज्या पारंपरिक अध्ययन पध्दतीत शास्त्रीजींची वैचारिक घडण झाली, त्या पद्धतीतच

स्वतंत्र विचाराचे व विचारस्वातंत्र्याचे आदर्श लपलेले होते. या विचारवंतापुढे विचारांची नवी नवी क्षितिजे येत होती व त्यांची सतत धावपळ चालू होती. एका डोंगराच्या शिखरावर चढून क्षितिज हाती लागेलसे वाटते न वाटते तोच पुढचा डोंगर व त्याच्या माथ्यावरचे क्षितिज अवचित समोर अवतरत होते. कोणत्याही जागृत विचारवंताला आत्मवंचना टाळायची असेल तर या नव्या क्षितिजाची दखल घेणे भागच होते.

ज्ञानाला पर्याय नसतो हे खरे, पण तिकडे जाण्यासाठी एखादी पायवाट काढता येते शास्त्रीजींच्या मूळ लेखनाचा खरा परिचय करून घेण्यास ही पायवाट कदाचित उपयोगी पडेल. हिंदुधर्माची समीक्षा (१९४०) व वैदिक संस्कृतीचा विकास (१९४९) हे त्यांचे दोन ग्रंथ. शास्त्रीजींच्या सर्व लेखनाला एक प्रकारचे सामाजिक निमित्त असायचे. स्वतंत्रपणे फार मोठे ग्रंथकर्तृत्व करून दाखविण्याची क्षमता असूनही केवळ स्वतःचे विद्वत्व मिरविण्यासाठी शास्त्रीजींनी ते केले नाही. म्हणूनच हा विद्वान कर्मयोगी विद्वान ठरतो.

शास्त्रीजींच्या लेखनाचे सौंदर्य विचारांत आहे, शैलीत नाही. याचे कारण शास्त्रीजींची विचार करण्याची पद्धतीच शुध्द तर्कसंगतीवर भर देऊन शुध्दविचार घडविणारी होती.

शास्त्रीजींना, खरे तर, लेखनापेक्षा बोलण्याचीच अधिक महती वाटत होती. आणि म्हणूनच जीवनातील फार मोठा काळ त्यांनी व्याख्यानांपायी खर्ची घातला. शास्त्रीजींचा खरा परिचय एक प्रभावी वक्ते म्हणूनच करावासा वाटतो. आपल्या शेकडो भाषणांमधून शास्त्रीजींनी महाराष्ट्रातील लहानमोठ्या गावांतील विचारभुकेल्यांना ज्ञानाचे सकस अन्न पुरविले, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. एखादी शाळा, संस्था, महाविद्यालय, व्यक्तींचे वाढदिवस व वर्धापन दिन प्रसंग, व्याख्यानमाला, ग्रंथप्रकाशन यांसारख्या नाना कारणांस्तव त्यांनी अनेक भाषणे दिली. मात्र त्यामागे सामाजिक जबाबदारीची एक निष्ठा असायची.

शास्त्रीजी केवळ कर्मयोगी विद्वान नव्हते, तर ते आधुनिक विचारवंतही होते. विचारसंपन्न वैदिक पंडित एवढ्याच भूमिकेत ते मर्यादित राहिले नाहीत. आधुनिक पश्चिमी ज्ञान विज्ञानांच्या ज्ञानसागरात परिश्रमपूर्वक विहार करून त्यांनी भारतीय ज्ञानपरंपरेला आधुनिक अन्वर्थकता आणण्याचा निश्चित असा प्रयत्न केलेला आहे.

आपले प्राचीन विचारधन आणि पश्चिमी आधुनिकता यांची स्वच्छपणे चिकित्सा करून उद्याच्या समाजरचनेची घडण कशी करता येईल याचा ते सतत विचार करीत असत. आंधळी परंपराभक्ती व वेंधळी पश्चिमपूजा यांचे धोके टाळून हा प्रश्न सोडवावा लागेल, असेही ते सांगत.

ज्ञानाला त्यांनी हस्तिदंती मनोऱ्याबाहेर आणले व समाजाच्या भर प्रांगणात खडे केले. खाजगी चर्चा हे तर शास्त्रीजींचे विद्वानप्रिय असे विद्यापीठच. या विद्यापीठात ज्यांना ज्यांना प्रवेश लाभला ते ते नव्या विचारांनी उजळून निघाले. हे विद्यापीठ जणू मुक्तद्वार विद्यापीठ होते व तेथे सामान्यातल्या सामान्य माणसाला केव्हाही प्रवेश असायचा.

परंपरा व आधुनिकता या दोहोंनाही आपल्या अगाध व्यासंगाने खराखुरा डोळसपणा शास्त्रीजींनी दिला. मराठी विश्वकोशाची निर्मितिप्रेरणा कदाचित यातूनच त्यांना लाभली असावी. ज्याचे प्रत्यक्ष रूप आतापर्यंत तयार झालेल्या विश्वकोशाच्या १४ खंडांतून दिसून येते.

अपूर्णाला लेखनरूप गवसणी घालण्याचा प्रयत्न शास्त्रीजींनी कधी केला नाही. वैदिक संस्कृतीविषयी त्यांची भूमिका सर्वथा निश्चित झाली. म्हणून तिच्या विकासाचा आलेख रेखाटण्यास ते प्रवृत्त झाले. महात्मा गांधी, मार्क्स व मानवेंद्रनाथ रॉय यांसंबंधी जेव्हा ते तोंडी चर्चा करत, तेव्हा या श्रेष्ठांच्या काही दुबळ्या जागा सहजपणे लक्षात येत. स्वतंत्र विचार व विचारस्वातंत्र्य यासंबंधीच्या अत्यंत प्रगल्भ व आदर्शवत अशा कल्पना शास्त्रीजींनी जोपासल्या होत्या, मानवेंद्रनाथ रॉय सारख्या प्रतिभावंत तत्त्वज्ञाला शास्त्रीजींविषयी 'दि बेस्ट प्रॉडक्ट ऑफ द इंडियन रेनेसान्स' असे उद्गार काढावे लागले.

शास्त्रीजींची वैचारिक घडण या शतकाच्या आरंभापासून होत गेली. भारतीय पारंपरिक तत्त्वज्ञान अभ्यासूनही नव्या काळात ते कुचकामी आहे याचा साक्षात्कार त्यांना झाला. त्यामुळे पारंपरिक धर्ममूल्यांची परखड चिकित्सा करून आधुनिक काळातील विज्ञानमूल्यांचा व सामाजिक मूल्यांचा पुरस्कार केला पाहिजे असे प्रतिपादन ते नेहमी करीत असत.

या विचारवंताजवळ बौद्धिक साधने व साधना होती पण त्यास बौद्धिक उसंत नव्हती. म्हणूनच या विचारवंताने अस्तित्वाच्या सर्व भागांवर प्रकाश टाकून मार्गक्रमणास उत्साहित करणारे तत्त्वदर्शन निर्माण केले नाही. हा विचारवंत अन्या अर्थाने आपली विचारवंताची भूमिका वठवू शकला किंवा नाही याबद्दल मतभेद असू शकतील. परंतु याची कारणे त्या त्या वेळच्या ऐतिहासिक परिस्थितीवर अवलंबून असावीत असे वाटते.

शास्त्रीजींसारख्यांनी जे विचारधन निर्माण केले व जे विचारधन निर्मिण्याची आकांक्षा बाळगली, त्याची आठवण ठेवून उद्याच्या भारतीय विचारवंतांनी विचारकार्य करणे आवश्यक आहे. परंपरेची सम्यक समीक्षा व नव्या सामाजिक वैज्ञानिक मूल्यांचा साक्षेप यांच्या अधिष्ठानावर नव्या तत्त्वदर्शनाची उभारणी करणे हे त्या कार्याचे सूत्र असावे. प्रत्यक्ष आधारक्षमता, कार्यक्षमता व नीतिप्रवर्तन या गुणांनी ते संपन्न असावे, याचा ध्यास घेणारे विचारवंत निर्माण होणे यातच शास्त्रीजींच्या विचारकार्याचे सार्थक आहे.

**(मीनल भावे, बी. ए. भाग १**
**'कृष्णाई' १९९५.**
**मानव्य व वाणिज्य महाविद्यालय,**
**वाई, नियतकालिकामधून)**

०००

# ३३.

# आनंदवादी प्रकांड पंडित

## गोविंद तळवलकर

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या जीवनाचा पट केवळ दीर्घच नाही, तर भव्य होता. गेल्या निदान सात दशकांतील महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक आणि वैचारिक क्षेत्रातील परिवर्तनाशी इतका निगडित असलेला प्रकांड पंडित दुसरा सापडणे कठीण आहे. पौर्वात्य आणि पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यास केला असून शास्त्रीजी तत्त्वज्ञानातच न रमता स्वातंत्र्याचे आंदोलन, अस्पृश्यतोद्धार, समाजसुधारणा अशा विविध आंदोलनांत सहभागी होत होते. अर्थात याची दुसरीही बाजू आहे. अनेकविध संस्था आणि चळवळी यांत सहभागी झाल्यामुळे शास्त्रीजींच्या हातून थोडे लिखाण झाले. ते शंकराचार्यांचे चरित्र लिहिणार होते. पण ते लिहिले गेले नाही. रेगे यांनी त्यांना बैठक मारून लिहावयास लावले असते तर मराठी वैचारिक वाङ्मयात मोलाची भर पडली असती.

शास्त्रीजींच्या जीवनाचा विचार केल्यावर भावनात्मकता आणि विवेकवाद यांचा संगम त्यांच्या ठिकाणी झालेला दिसेल. शास्त्रीजींचा जन्म खानदेशातील त्या काळात देशाच्या अनेक भागांत क्रांतिकारकांचा पंथ वावरत असे आणि शास्त्रीजी या क्रांतिकारकांकडे आकर्षित झाले होते. महात्मा गांधींच्या अस्पृश्यताविरोधी भूमिकेला शास्त्राधार पुरविण्यापुरताच शास्त्रीजींचा त्यांच्याशी संबंध आला, असे नव्हे. महात्मा गांधींच्या व्यक्तित्वाने ते प्रभावित झाले होते आणि सर्व जग विरोधी गेले तरी हरकत नाही, आपण ठरविलेल्या मार्गाने जाणार ही जी गांधीजींची वृत्ती होती, तिचा प्रभाव शास्त्रीजींवर पडलेला होता.

### भावनात्मकता

गांधीजींच्या राजकारणाचे मानवेंद्रनाथ रॉय हे टीकाकार होते आणि शास्त्रीजी रॉय यांच्या निकट सहवासात होते. सशस्त्र क्रांतिकारक, अहिंसेचे उपासक महात्मा गांधी आणि प्रथम मार्क्सवादी आणि नंतर नवमानवतावादाचा पुरस्कार करणारे एम. एन. रॉय अशा विविध

आणि काहीशा विरोधी प्रवृत्तीचा शास्त्रीजींवर का प्रभाव पडला आणि ते त्यांच्याकडे कसे आकर्षित झाले, असा प्रश्न पडणे स्वाभाविक आहे. याचे उत्तर शास्त्रीजींच्या ज्या प्रदीर्घ मुलाखती प्रा. रेगे यांनी घेतल्या, यात मिळू शकते. शास्त्रीजींनी असे उत्तर दिले आहे की, सशस्त्र क्रांतीचा मार्ग अवलंबिणाऱ्यांपासून महात्मा आणि रॉय यांच्याकडे आपण आकर्षित झालो ते या सर्वांत जी आत्मसमर्पणाची, असीम त्यागाची वृत्ती होती, ती आपल्याला यांच्याकडे ओढून घेण्यास कारणीभूत झाली. शास्त्रीजींच्या भावनात्मकतेची यावरून काहीशी कल्पना येऊ शकेल.

शास्त्रीजींचा जन्म १९०१ सालचा. न्यायमूर्ती रानडे यांच्या निधनानंतर एक वर्षाने ते चौदाव्या वर्षी स्वामी केवलानंदांकडे वाईस प्राज्ञपाठशाळेत आले. शास्त्रीजींच्या पंधराव्या वर्षी नामदार गोखले यांचे निधन झाले आणि विसाव्या वर्षी लोकमान्यांचे. याच वर्षी महात्मा गांधींचे आंदोलन सुरू झाले आणि भारतीय राजकारणाने सर्वस्वी वेगळे वळण घेतले. एकोणिसावे शतक आणि त्याही पलीकडे त्या शतकाचा उत्तरार्ध हा या देशाच्या आणि महाराष्ट्राच्या दृष्टीने एक चैतन्यमय असा कालखंड होता आणि या चैतन्याचे रूप बदललेले असले तरी महात्मा गांधींच्या आगमनापासून मूळ चैतन्य नष्ट झाले नव्हते. शास्त्रीजींच्या अगदी तरुण वयात त्यांच्यावर संस्कार झाले ते कष्टपूर्वक विद्या मिळविण्याचे होतेच, पण प्राज्ञपाठशाळेने स्वातंत्र्याचे आंदोलन हा सामाजिक सुधारणांचे विचार यांच्यापासून अलिप्त राहावयाचे नाही असेच ठरविल्यामुळे या आंदोलनाचा प्रभाव शास्त्रीजींवर पडला.

## असामान्य कर्तृत्वाचे आदर्श

स्वामी केवनानंद सरस्वतींशी महात्माजींनी अस्पृश्यतेच्या संदर्भात चर्चा केली होती आणि स्वामीजी गांधीजींना साहाय्य करण्याच्याच बाजूचे होते. पण शास्त्रीजी केवळ धर्मशास्त्र, वेदान्त, पौर्वात्य विद्या यांतच तेव्हा गुरफटून राहिले असते तर नंतरच्या काळात जे स्वरूप आपल्याला पाहावयास मिळते, ते मिळाले नसते. त्यांनी भारतीय तत्त्वज्ञानाबरोबरच इंग्रजी विद्या, भौतिकविद्या यांचा अभ्यास केला आणि तो मोलाचा होता. आचार्य विनोबा भावे यांच्यापुढे त्यांनी हा अभ्यास केला आणि इतिहासाच्या अभ्यासाचे महत्त्व त्यांना इतिहासाचार्य राजवाडे यांच्यामुळे समजले. ते आणि त्या पूर्वीचा काळ असा होता की, येथील तरुणांपुढे विद्या, कला आणि इतर अनेक क्षेत्रांत सामान्य कर्तृत्व गाजविणाऱ्यांचे आदर्श होते. रानडे, दादाभाई, लोकमान्य, भांडारकर, गोखले आणि नंतर महात्मा गांधी असे पहाडासारखे पुरुष होते आणि आपल्या जीवनाला काही तात्त्विक अधिष्ठान असले पाहिजे याची ओढ यामुळे निर्माण होत होती. शास्त्रीजींचा विचार करताना त्यांच्या वैचारिक प्रवासाची आणि परिवर्तनाची दखल घेतल्याशिवाय चालणार नाही. शास्त्रीजी हे अखेरपर्यंत कमालीचे उत्साही आणि समाधानी होते.

एखाद्याची अशी वृत्ती असते असे कारण देऊन शास्त्रीजींच्या वृत्तीचे रहस्य समजणार

नाही. ते त्यांच्याच लिखाणाने उलगडते. शास्त्रीजींच्या लेखांच्या संग्रहास त्यांनीच प्रस्तावना लिहिली असून त्यांनी म्हटले आहे की, विश्वदुःखवाद ही भारतीय अध्यात्मवादाची नांदी आहे. विश्वाचे वास्तव स्वरूप हे आनंदमय ब्रह्म आहे. या विचाराशी ही नांदी अगदी विसंगत आहे. शास्त्रीजींनी विश्वदुःखवादाचा स्वीकार केला नव्हता. १९२८ साली त्यांनी 'आनंदमीमांसा' या नावाचा एक दीर्घ लेख लिहिला होता. त्यात त्यांनी म्हटले होते की, ''आनंदातून विश्वाची उत्पत्ती होते, आनंदात विश्वाची स्थिती असते व आनंदातच विश्वाचा लय असतो; हे समजून घेण्याची खरी आतुरता उत्पन्न व्हावयास पाहिजे. कारण हा आनंद म्हणजे ब्रह्म होय.'' पण ही भावना कशी निर्माण झाली याचा शोध घेऊन शास्त्रीजींनी वैदिक वाङ्मयाचा आढावा घेतला आहे. त्याचे सार सांगताना शास्त्रीजींनी जे काही म्हटले आहे ते त्यांच्या वृत्तीवर प्रकाश टाकते. ते सांगतात की, "वैदिक ऋषीत जयष्णू समाजाच्या सर्व तऱ्हेच्या महत्त्वाकांक्षा प्रतिबिंबित झाल्या आहेत. दुर्जनांच्या दौर्जन्याचा प्रतिकार करण्याचा ऋषीचा बाणा आहे. तप आणि पराक्रम ही ऐश्वर्याची साधने आहेत. यश, कीर्ती आणि प्रताप हे कल्पनेच्या सीमा ओलांडीत आहेत. सध्या हृदयात उत्साह आणि आशावाद भरलेला दिसतो. उत्साह आणि प्रयत्न यांची वाण कोठेही वैदिक वाङ्मयात भासत नाही. वैदिक वाङ्मय आशावादाने फुलून गेले आहे. वैदिक वाङ्मयातील आशावादाच्या पाठीमागे सत्कर्म, सामर्थ्य, सत्य, ज्ञान आणि तप यांचे अधिष्ठान आहे. शुद्ध सौंदर्याचा ऋषींना वीट नाही. आध्यात्मिक आनंद आणि अधिभौतिक आनंद यांचे वैदिक वाङ्मयात संगनमत झाले आहे. प्रपंच आणि परमार्थ गुण्यागोविंदाने एकत्र नांदत आहेत. शास्त्रीजी गहन तत्त्वमीमांसा करीत असताना खानपानातही का आणि कसे रमत याचे आणि त्यांच्या अखंड उत्साहाचे कारण या त्यांच्या एका परिच्छेदातही सापडू शकेल. आनंदवादी वैदिक प्रकांड पंडित असे त्यांचे वर्णन करणे चूक होणार नाही, असे मला वाटते.

'वैदिक संस्कृतीचा विकास' या ग्रंथाच्या प्रास्ताविकात त्यांनी भारतीय समाजाच्या ऱ्हासाची कारणमीमांसा केली आहे. या ऱ्हासाचे मूलगामी कारण कोणते हे स्पष्ट करताना शास्त्रीजींनी असे म्हटले आहे की, "पिंडपोषणास आवश्यक असलेल्या अर्थपर प्रवृत्तीचा अभाव, अर्थोत्पादनास असलेला अदम्य आवश्यक उत्साह प्राणिमात्राच्या जीवधारणेच्या शक्यतेचे शुभलक्षण होय." निवृत्तीपर विचार सांगणारांची वाहवा होत असताना शास्त्रीजींनी हे मत दिले हे महत्त्वाचे आहे. ज्या देशात पन्नास टक्के लोक गरीब आहेत, त्यांना निवृत्तीचा वेगळा उपदेश करण्याचे कारण नाही. याचा अर्थ या समाजाने भौतिकतेकडे पाठ फिरवली असे नव्हे. तो निकोप नव्हे तर विकृत भौतिकवादी आहे. अशा वेळी अर्थार्जनासाठीचा उत्साह हवा हे रोखठोकपणे सांगणे आवश्यकच होते.

शास्त्रीजींनी महाराष्ट्रातील प्रबोधन चळवळीचा, समाजसुधारणेचा आढावा घेतला आहे. हे प्रबोधन ज्यांनी केले, त्यांनी कोणती कामगिरी बजावली याबद्दलचे शास्त्रीजींचे

विवेचन अभिनिवेशापासून अलिप्त आहे. ते स्वतः सामाजिक परिवर्तनाच्या आंदोलनात होते. पण असे असून लोकमान्य टिळकांनी राजकीय स्वातंत्र्याला प्राधान्य देण्याचे धोरण स्वीकारले असल्यामुळे ते सामाजिक सुधारणांना काही वेळा विरोध करताना आढळतात, असा खुलासा शास्त्रीजी करण्यास चुकत नाहीत. त्याचप्रमाणे स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्रात ब्राह्मण-ब्राह्मणेतर चळवळ करण्याची गरज नाही, असेही ते ठामपणे सांगतात. काही जणांना हे खटकेल, पण त्यांनी हे लक्षात घ्यावे की, महात्मा जोतिबा फुले यांची महाराष्ट्राला ओळख करून देणारे लिखाण शास्त्रीजींनी चाळीस-पंचेचाळीस वर्षांपूर्वी केले होते.

## मूलभूत स्वरूपाचे विवेचन

एम. एन. रॉय यांच्या सहवासात आल्यावर शास्त्रीजींवर मार्क्सचा प्रभाव पडणे साहजिक होते. त्यांनी हिंदुधर्माच्या समीक्षापर नागपूरला जी व्याख्याने दिली, त्यात हा मार्क्सचा प्रभाव स्पष्ट दिसतो. पण शास्त्रीजी आणि रॉय हे पोथीनिष्ठ नव्हते. शास्त्रीजींनी 'नवभारत' मासिकात अनेक वर्षांपूर्वी मार्क्सवर एक लेखमालाच लिहिली होती. ऐतिहासिक भौतिकवाद, विरोधविकासवाद, आर्थिक मीमांसा या सर्वांविषयी शास्त्रीजींनी मूलभूत स्वरूपाचे विवेचन या लेखमालेत केले आहे. सोव्हिएत युनियन कोसळले हा तेथील नेत्यांचा पराभव असून मार्क्सवादाचा नाही, अशी भूमिका काही मांडीत असतात. शास्त्रीजींची ही लेखमाला अशांना उत्तर देण्यास समर्थ आहे. ही लेखमाला त्यांच्या लेखसंग्रहाच्या पहिल्या खंडात समाविष्ट आहे.

इतिहासाची गती ठरलेली आहे असा नियतीवाद स्वीकारण्यात आला असला तरी अशा अगोदरच ठरल्याप्रमाणे मानवी इतिहास घडत नाही हे अनेकदा स्पष्ट झाले आहे. परिस्थितीप्रमाणे मानव घडत असला तरी माणूसही परिस्थितीला वेगळे वळण देत असतो. मानवी बुद्धीची झेप कोणाच्याच लक्षात येणे शक्य नाही, तेव्हा झपाट्याने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाची जाणीव मार्क्सने ठेविली नव्हती इत्यादी भाग शास्त्रीजींनी स्पष्ट केला आहे. तसेच मार्क्सने भांडवलशाहीची मीमांसा केली असली तरी समाजवादी समाज कसा उभारावा, याचे काही दिग्दर्शन केले नव्हते. यामुळे रशियातील तेव्हाच्या परिस्थितीत लेनिन आणि स्टालिन यांना जे निकडीचे वाटले, ते त्यांनी केले असले तरी मार्क्सवादावर आधारित असा समाज असे मानणे चूक होते, इत्यादींचा ऊहापोह शास्त्रीजींनी समर्थपणे केला आहे.

## व्यवहार, समर्थन नव्हे

शास्त्रीजींनी जडवाद, मटेरिआलिझमवर चाळीस वर्षांपूर्वी पुस्तक लिहिले होते. वादविवेचनमालेतील ते एक पुष्प आहे. पण धर्म या संकल्पनेचा मानवी जीवनातून लोप होईल, विशेषतः विज्ञानाच्या प्रगतीमुळे शक्य होईल असे जे अनेकजण मानतात, ते शास्त्रीजी मान्य करताना दिसत नाहीत. कर्मकांड सोडा, पण धर्माचा विचार, एक अंतिम शक्ती असू शकेल हा विचार अमेरिकेसारख्या भौतिकदृष्ट्या प्रगत देशातूनही गेला नाही

आणि सोव्हिएत युनियनमध्ये सत्तर वर्षे धर्मविरोधी असे धोरण सरकारने राबवूनही धर्माचे उच्चाटन झाले नाही. याची दखल घेण्याची सूचना शास्त्रीजी करतात, तेव्हा ते व्यवहार काय हे सांगतात, त्याचे ते समर्थन नसते.

एक प्रकारे शास्त्रीजींनी रानडे, भांडारकरांचा पंथ स्वीकारला होता असे म्हणता येईल. या दोघांनी निरीश्वरवाद स्वीकारला नाही आणि धर्माचा विचार करताना आधुनिक ज्ञानविज्ञानाची जाण ठेविली तसेच सामाजिक सुधारणांचा आग्रह धरला. शास्त्रीजी याच मार्गाने जात होते.

पौर्वात्य आणि पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचा गाढ अभ्यास केलेले शास्त्रीजी सांगतात की, कोणतेही एक तत्त्वज्ञान एका मर्यादेपर्यंतच बरोबर असते. यानंतर शास्त्रीजींनी नागार्जुनाचार्यांचा दाखला दिला आहे. नागार्जुनाचार्यांनी म्हटले होते की, कोणतेही तत्त्वज्ञान जे आहे ते लक्षात घ्या, पण नंतर त्याच्याबाहेर पडा. हीच आपली वृत्ती असल्याचे शास्त्रीजींनी स्पष्ट केले आहे. अशीच वृत्ती आधुनिक जगातील तत्त्वज्ञ इसाया बर्लिन यांचीही आहे. आपण साशंक उदारमतवादी आहोत असे त्यांनी म्हटले आहे. तसेच प्रत्येक दर्शनाच्या मर्यादा असतात आणि सत्याचा शोध घेणे, मानवी संबंधातील वा समाजातील संघर्षाची क्षेत्रे कमी करणे हे काम तत्त्वज्ञानाने करावे, पण याचा एकच मार्ग असतो असे मानू नये, असा इशारा इसाया बर्लिन यांनी दिला आहे. शास्त्रीजींच्या मनाची ठेवण अशीच होती आणि त्यांच्या जीवनाचा वैचारिक आधार असाच होता. कोणतीच पोथी त्यांनी अखेरचे सत्य सांगणारी मानली नाही आणि याच वृत्तीचा प्रसार होण्याची आवश्यकता आहे.

**(प्राज्ञ पाठशाळेतर्फे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या पहिल्या पुण्यतिथीनिमित्त २७ मे रोजी पुणे येथे केलेले भाषण.)**
**(दैनिक महाराष्ट्र टाइम्स, मुंबई रविवार २७, मे १९९५)**

OOO

# ३४.
# भारतीय प्रबोधनाचे प्रतीक : लक्ष्मणशास्त्री जोशी
## प्रा. मे. पुं. रेगे

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी केलेली ज्ञानसाधना आणि त्यांचा जन्मभर उत्कटतेने आणि तन्मयतेने चालू असलेला वैचारिक प्रवास यांच्याविषयीची सर्वसाधारण कल्पना 'अध्ययन आणि वैचारिक वाटचाल' या त्यांच्या मुलाखतीवरून येऊ शकेल. ह्या मुलाखतीवरून जी एक गोष्ट स्पष्ट होते- आणि हिच्यात शास्त्रीजींचे अनन्यसाधारण वैशिष्ट्य सामावलेले आहे- ती ही की, शास्त्रीजींची वैचारिक बैठक ही दृढपणे भारतीय वैचारिक परंपरेवर अधिष्ठित आहे. ह्या वैचारिक परंपरेची तार्किक आणि आध्यात्मिक अशी दोन अंगे आहेत आणि ही परस्परांत गुंतलेली, परस्परांपासून अविभाज्य असलेली अशी अंगे आहेत.

ह्या तार्किक अंगाचा विकास आणि परिपोष पारंपरिक न्यायशास्त्रामध्ये झाला होता आणि नव्यन्याय हे ह्या शास्त्राचे प्रगल्भ असे स्वरूप आहे. न्यायशास्त्र हे अनेक शास्त्रांमधील एक पृथक् शास्त्र एवढेच त्याचे स्वरूप नव्हते. ते पायाभूत शास्त्र, 'शास्त्रांचे शास्त्र' होते. इतर शास्त्रांचे शास्त्र हे स्वरूप, विधानांना भाषिक रूप देण्याची, त्यांची तपासणी करून त्यांची सिद्धी करण्याची पद्धती ही न्यायशास्त्रामध्ये विकसित आणि आकारित करण्यात आलेल्या पद्धतीविषयक संकल्पनांवर आणि नियमांवर आधारलेली होती. कोणताही वैचारिक व्यवहार भाषेद्वारा आणि तार्किक नियमांना अनुसरून चालतो आणि म्हणून भाषेचे शास्त्र - व्याकरण - आणि व्यापक अर्थाने तर्कशास्त्र - न्याय- ही मूलभूत आणि प्रास्ताविक शास्त्रे मानण्यात येत होती. भारतीय वैचारिक परंपरेत ही दोन्ही शास्त्रे अत्यंत प्रगल्भ अवस्थेला पोचली होती आणि त्यांनी घालून दिलेली कठोर भाषिक आणि तार्किक शिस्त तंतोतंत पाळण्यात इतर शास्त्रांचा शास्त्रत्वाचा दावा आणि स्वाभिमान सामावलेला असे. विधान नेमकेपणे मांडण्यात आले पाहिजे, त्याच्या अर्थाविषयी यत्किंचित संदेह किंवा अस्पष्टपणा असता कामा नये, ते मान्य करण्यापूर्वी त्याच्याविरुद्ध जे आले पाहिजे अशी अपेक्षा होती आणि ह्या कुवतीचे शास्त्री शिकवून तयार करणे हे अध्यापनाचे अंतिम उद्दिष्ट होते. हे उद्दिष्ट

प्रत्यक्षात साध्य होईल अशी अध्ययन- अध्यापनपद्धती अनुभवातून घडविण्यात आली होती. ह्या सर्व व्यवहारांत अतीव गंभीरपणा आणि निष्ठा होती. सर्व वैचारिक शक्ती सर्वसामान्य सहनशक्तीच्या मर्यादेपलीकडे ताणल्या जातील असे बौद्धिक आव्हान होते. आत्यंतिक परिश्रम करण्याचे आवाहन विद्यार्थ्याला मिळेल अशी व्यवस्था होती. आदर्श म्हणून ज्यांचे विद्यार्थ्यांनी अनुकरण करावे आणि ज्यांच्या पलीकडे जाण्याची ईर्ष्या बाळगावी असे प्रतिभासंपन्न दिग्गज पंडित सभोवती होते. विद्यार्थ्याच्या आणि अध्यापकाच्या ज्ञानाचा कस सतत घेण्याची पद्धती रूढ होती. कसदार ज्ञान, ज्ञानाची खोली आणि विस्तार यांच्यामुळे समानधर्मीयांची लाभणारी मान्यता आणि ह्या मान्यतेवर आधारलेली सामाजिक प्रतिष्ठा, लोकमान्यता आणि अभिजनमान्यता, अभिजनांचा आश्रय आणि त्यातून लाभणारी सुरक्षित, सुखवस्तू राहणी ही यशस्वी विद्यार्थ्याला लाभणारी पारितोषिके असत. पण बुद्धीची निर्दयपणे परीक्षा घेणाऱ्या, तिला विकसित करून वळण देणाऱ्या, ज्ञानाच्या ज्ञात काठापर्यंत पोचलेल्या, आणि तेथून पुढील प्रवेश न्याहाळणाऱ्या माणसांच्या ठिकाणी जो शांत आणि सघन आत्मप्रत्यय असतो तेच त्याला लाभणारे सर्वश्रेष्ठ पारितोषिक असते. हे पारितोषिक ह्या परंपरेतील सर्वश्रेष्ठ पंडितांना लाभत असे. ह्या बाबतीत ह्या पंडितांची तुलना रॉयल सोसायटीचे सभासद होणाऱ्या किंवा नोबेल पारितोषिक मिळविणाऱ्या वैज्ञानिकांशी किंवा ऑक्सफर्ड-केंब्रिजच्या 'डॉन्स'शी करता येईल.

हे विस्ताराने लिहायचे कारण असे की, ह्या परंपरेची पुसटती ओळखही बहुसंख्य भारतीय सुशिक्षितांना नाही. उलट, तिच्याविषयी अज्ञानावर आधारलेले हास्यास्पद गैरसमज आहेत. तकलुपीपणा, उथळपणा, अर्धकच्चेपणा, ग्रंथनिविष्ट ज्ञानावरील परावलंबीपणा, आणि या सर्वांमुळे येणारा आत्मप्रत्ययाचा आणि निर्मितिक्षमतेचा अभाव आणि वांझपणा ह्या दोषांसाठी आधुनिक भारतीय विद्यापीठीय शिक्षणाकडे वळावे लागेल. पारंपरिक भारतीय शिक्षणव्यवस्थेत जे दोष होते ते वेगळ्या प्रकारचे होते.

भारतीय वैचारिक परंपरेची दुसरी बाजू आध्यात्मिक होती. येथे व्यक्तीची आध्यात्मिक साधना आणि वैचारिक अध्यात्मशास्त्र यांत भेद करावा लागेल. जे आक्षेप घेता येण्यासारखे आहेत ते स्पष्टपणे पुढे करण्यात आले पाहिजेत, ह्या आक्षेपांची तपासणी तर्ककठोरतेने पण ऋजुपणे झाली पाहिजे, त्यांच्या बाजूचा जो पुरावा आणि युक्तिवाद असतील त्यांची गंभीरपणे दखल घेतली पाहिजे, येथे लपवाछपवी, तार्किक चलाखी यांना अवसर असता कामा नये, प्रतिपक्षावर सोपा विजय मिळविण्याचा मोह वैचारिक दुबळेपणा म्हणून टाळला पाहिजे, ह्या परीक्षणात आपला पक्ष जर टिकत नसेल तर त्याच्यात आवश्यक ते बदल केले पाहिजेत, आपली विधाने ज्या सुप्त गृहीतकृत्यांवर आधारलेली असतील ती प्रकट केली पाहिजेत, तपासून स्वीकारलेली अंतिम आधारभूत तत्त्वे आणि पुरावा यांच्या अधिष्ठानावर

आपले सिद्धान्त भक्कमपणे आधारले पाहिजेत हे पद्धतीविषयक दंडक सर्व शास्त्रांकडून मान्य झाले होते आणि अनुसरले जात होते.

ही जी वैचारिक शिस्त भारतीय परंपरेत अवतीर्ण झाली आणि विकास व दृढता पावली तिचा, आणि आपण ही शिस्त आत्मसात केली आहे ह्या गोष्टीचा शास्त्रीजींना सार्थ अभिमान आहे. महत्त्वाची गोष्ट ही की, ही शिस्त त्यांच्या विचार करण्याच्या पद्धतीचा भाग होऊन बसली आहे. आणि म्हणून 'कम्युनिस्ट पक्षाचा जाहीरनामा' आणि इतर मार्क्सवादी साहित्य, न्याय किंवा अद्वैत वेदान्त याच्यावरील एखादा पारंपरिक ग्रंथ वाचावा त्या पद्धतीने, 'पंक्ती लावून' त्यांनी वाचले. पारंपरिक अध्यापनपद्धतीचे उद्दिष्ट शास्त्री तयार करणे हे होते. शास्त्री होणे म्हणजे कितीही कठीण असलेला शास्त्रग्रंथ स्वतः वाचून समजण्याची, त्यातील विधानांचे खंडनमंडन करण्यासाठी जे युक्तिवाद करण्यात आले आहेत किंवा करता येणे शक्य आहे त्यांचे परीक्षण करण्याची शक्ती येणे. जो शास्त्री असेल त्याला 'शास्त्रार्था'त भाग घेता येणे आवश्यक असे. म्हणजे स्वतःच्या भूमिकेवर प्रतिपक्षाकडून जे अपेक्षित किंवा अनपेक्षित आक्षेप घेण्यात येतील त्यांना सयुक्तिक उत्तरे देणे, ह्या आक्षेपांच्या संदर्भात स्वतःच्या भूमिकेच्या समर्थनासाठी आवश्यक तर नवीन युक्तिवाद रचून पुढे मांडणे ह्या गोष्टी करता येणे त्याला आवश्यक असे. ही शक्ती येईपर्यंत तो शास्त्री म्हणून मान्य होत नसे. तेव्हा ज्याने ग्रंथांतरी निविष्ट असलेले ज्ञान संपादिले आहे किंवा मुखोद्गत केले आहे तो शास्त्री, ही व्याख्या अपुरी आणि म्हणून दिशाभूल करणारी ठरेल. ह्या ज्ञानाचा वापर त्याला करता आला पाहिजे आणि ह्या वापरातून त्याचा विकास साधता आला पाहिजे, त्याला अधिक तर्कशुद्ध, सुसंगत रूप देता अध्यात्मशास्त्रात वेदान्तादी मोक्षशास्त्रे अंतर्भूत होती; त्याप्रमाणे मोक्षसाधनेचे अधिष्ठान असलेले, सामाजिक व्यवहाराचे नियमन करणारे धर्मशास्त्रही अंतर्भूत होते. किंबहुना, धर्माचे प्रयोजनच स्वाभाविक प्रवृत्तीला उन्नत आणि प्रगल्भ करून तिचे निवृत्तीत परिवर्तन करण्याचे असल्यामुळे, मोक्षशास्त्र हा धर्मशास्त्राचाच भाग होता. ह्या 'एकशास्त्र'वादी भूमिकेमागची एक दृष्टी अशी होती की, जे अत्युच्च नैतिक गुण मोक्ष किंवा निःश्रेयस यांच्या प्राप्तीसाठी आवश्यक असतात त्यांचा विकास धर्मप्रेरित आणि धर्मनियमित सांसारिक आणि सामाजिक जीवनातच होऊ शकतो, आणि तेजस्वी आणि संपन्न अशा वैयक्तिक आणि सामाजिक जीवनाच्या उभारणीत ह्या गुणांचा स्वाभाविक आविष्कार होतो. अभ्युदय आणि निःश्रेयस, प्रवृत्ती आणि निवृत्ती यांच्यामध्ये कालिक क्रम असो नसो, तार्किक अनुबंध जरूर होता. स्वाभाविक प्रवृत्ती आणि त्यांच्यावर धर्माने केलेले नैतिक संस्कार हे ऐहिक आणि आध्यात्मिक ह्या दोन्ही जीवनपद्धतींचे समान अधिष्ठान होते. (सत्य, अहिंसा, ब्रह्मचर्य, अपरिग्रह, क्षमा, शांती, भूतदया, मैत्री, करुणा इ. मूल्ये हा धर्मप्रणित ऐहिक जीवनाचा आशय होता आणि हेच आध्यात्मिक जीवनाचे अनिवार्य अधिष्ठान होते. फक्त आध्यात्मिक जीवनात ह्या मूल्यांच्या 'पारमितां'ची साधना

होती. आणि म्हणून धर्मपूत ऐहिक जीवन आणि मोक्षसाधना यांच्यामध्ये एक रेषा काढून त्यांची स्पष्ट विभागणी करता आली नसती.)

श्रुतिस्मृतिपुराणांचे शब्दप्रामाण्य हे धर्माचे अधिष्ठान होते. चातुर्वर्ण्याच्या संकल्पनेच्या चौकटीतील जातिव्यवस्था हे सामाजिक संघटनेचे स्वरूप होते. श्रौत आणि स्मार्त 'शास्त्रवचनां'च्या आधारे जीवनाच्या विविध क्षेत्रांतील गुंतागुंतीच्या सामाजिक व्यवहारांचे नियमन करणे; स्वार्थाने, मदाने, वैराने डागळलेल्या ऐहिक व्यवहाराचे नियमन करणे हे धर्मशास्त्राचे एक काम होते. यज्ञयागादी श्रौतस्मार्त विधी, त्यांचा अधिकार ज्यांना असेल त्यांनी यथासांग करणे हा धर्मशास्त्रप्रणीत जीवनाचा अनिवार्य भाग होता. ह्या विधींचा अधिकार आणि त्यांच्यापासून प्राप्त होतील म्हणून कल्पिण्यात आलेली फळे यांना केवळ शब्दप्रामाण्याचा आधार होता. ही सर्वच रचना आधुनिक हिंदू मनाला अमान्य होईल अशी आहे. श्रुति-स्मृतीतील सर्व वचनांचे प्रामाण्य मान्य करून त्यांना सुसंगत समन्वयात ओवून घेणे, सर्व विधिनिषेधपर वाक्यांची सुसंवादी व्यवस्था लावणे आणि ह्या व्यवस्थेचा सांधा वेळोवेळी प्रचलित असलेल्या प्रत्यक्ष सामाजिक व्यवहाराशी जोडून घेणे हे धर्मशास्त्राचे काम होते आणि हे काम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी बुद्धीचा फार मोठा आवाका आणि सूक्ष्म तार्किकता हे गुण आवश्यक होते. पण केवळ एक तार्किक व्यवस्था म्हणून धर्मशास्त्र आपल्याला कितीही मनोवेधक वाटले, त्याच्यात मूर्त झालेल्या बौद्धिक गुणांविषयी आपल्याला कितीही आकर्षण आणि आदर वाटला तरी त्याचे सामाजिक प्रयोजन कधीच संपुष्टात आले आहे. ऐतिहासिक कुतूहलाचा विषय याच्यापलीकडे त्याला काही स्थान नाही अशा दृष्टीनेच आपण त्याच्याकडे पाहू. किंबहुना, त्याचे सामाजिक प्रयोजन इतकी शतके टिकून राहिले हीच आपल्या समाजाच्या रुद्धावस्थेची खूण होती असे आपण म्हणू. आज वस्तुस्थिती अशी आहे की, धर्मशास्त्र असे काही होते आणि दोन पिढ्यांपूर्वी आपल्या सामाजिक जीवनाचे ते प्रत्यक्षात नियमन करीत होते ह्याचा सर्वसामान्य सुशिक्षित, मध्यमवर्गीय हिंदूंना पत्ता नाही. (ख्रिस्ती धर्मशास्त्रानुसार परमेश्वर ही तीन पुरुषांची युती आहे की तो त्रिविध असा एक पुरुष आहे.) या गुह्य समस्येभोवती सूक्ष्म, अदृश्यप्राय ठरतील इतके सूक्ष्मभेद व्यक्त करणाऱ्या ग्रीक शब्दांच्या माध्यमातले जे वादंग माजले होते त्याची आजच्या सर्वसामान्य ख्रिस्ती माणसाला जितकी माहिती असेल तितकीही आजच्या सर्वसामान्य सुशिक्षित हिंदुला हिंदू धर्मशास्त्राविषयी असत नाही. पण एकोणिसाव्या शतकापर्यंत 'ट्रिनिटी'च्या संकल्पनेचा सम्यक अर्थ कसा लावावा ही ख्रिस्ती सुशिक्षित समाजापुढे असलेली जिवंत समस्या होती.

कर्मकांड आणि सामाजिक व्यवहाराचे शास्त्रवचनाद्वारे नियमन हा धर्मशास्त्राचा एक भाग होता. दुसरा भाग उच्च मानवी मूल्यांवर आधारलेल्या जीवनक्रमाचा आदर्श लोकांपुढे ठेवणे हा होता. ही मूल्ये प्राचीन, निवृत्तीमार्गी श्रमणांच्या साधनेतून स्फुरली असतील आणि

बौद्धपंथी आणि जैनपंथी श्रमणांनी त्यांचा आपल्या जीवनक्रमात परिपोष केला असेल; पण वैदिकांनी ती आत्मसात केली होती आणि आपल्या कर्मकांडाशी आणि चातुर्वर्ण्याशी जुळवून घेतली होती. खऱ्या ब्राह्मणाचा जीवनमार्ग कसा असतो ह्याचे बौद्ध आणि जैन धर्मग्रंथांत वर्णन आहे आणि हा जीवनक्रम सर्वांपुढे आदर्श म्हणून ठेवला आहे. म्हणजे ह्या मूल्यांचा ऐतिहासिक उगम काही असो, भारतीय धर्मपंथांचे समान आदर्श हा अधिकार त्यांना प्राप्त झाला. खरा ब्राह्मण आणि खरा श्रमण यांच्यात भेद राहिला नाही. ह्याचा अर्थ असा की, आध्यात्मिकदृष्ट्या कर्मकांड आणि चातुर्वर्ण्य आगन्तुक ठरले. भारताच्या सांस्कृतिक इतिहासात सातत्याने वाहणारा असा हा प्रवाह आहे. त्याचे संवर्धन भक्तिमार्गी, मूळच्या अवैदिक असलेल्या पंथीयांनी तर केलेच; पण शब्दप्रामाण्य मानणाऱ्या शंकराचार्यांनीही केले. मनुस्मृती जाळली तरी तिच्यात न जळणारा असा काही भाग आहेच असे शास्त्रीजींनी डॉ. आंबेडकरांना एकदा म्हटले होते; आणि ह्याचे एक उदाहरण म्हणून 'सर्व परवशं दुःखं सर्वमात्मवशं सुखम्' हा चरण उद्धृत केला होता. मनुस्मृती जाळणे आवश्यक होते; परंतु तिच्यात न जळणारा जो भाग होता तो तगवून धरणेही आवश्यक होते.

भारतीय शास्त्रांच्या परंपरेपासून बौद्धिक चोखपणाचा आणि सार्वत्रिक मानवी मूल्यांचा वारसा शास्त्रीजींनी घेतला आणि ह्या अधिष्ठानावरून भारतीय समाजाच्या पुनरुत्थापनाच्या प्रश्नाकडे त्यांनी पाहिले. हा वारसा त्यांना प्राज्ञपाठशाळेकडून लाभला यात शंका नाही. त्यांच्या वैचारिक घडणीमध्ये प्राज्ञपाठशाळेचा भाग सर्वांत मोठा आहे. प्राज्ञपाठशाळेमागची प्रेरणा त्रिविध होती. एकत्र भारताच्या स्वतःच्या शास्त्रीय आणि दार्शनिक परंपरेचे रक्षण आणि संवर्धन तिला करायचे होते. ही आपले स्वत्व राखण्याची, आपल्या आपलेपणाचे जतन करण्याची प्रेरणा होती. तिच्याशी एकवटलेली दुसरी प्रेरणा, जी भौतिक आणि सामाजिक शास्त्रे आणि मूल्ये पश्चिमी परंपरेने निर्माण केली होती ती आत्मसात करण्याची होती. आणि तिसरी प्रेरणा, स्वतःच्या जाणीवपूर्वक प्रस्थापित केलेल्या अस्मितेच्या अधिष्ठानावर, नवीन ज्ञानाच्या आणि मूल्यांच्या साहाय्याने भारतीय समाजात सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याची होती. तेव्हा सुरुवातीपासूनच प्राज्ञपाठशाळा ही पारंपरिक पाठशाळांतील केवळ एक पाठशाळा नव्हती. ती वेगळ्या प्रकारची पाठशाळा होती. कारण ती आधुनिक जगाला, आणि ज्या मूल्यांनी, अनुभवांनी आणि ज्ञानाने हे आधुनिक जग घडविले होते त्यांना, सन्मुख होती. भारतीय शास्त्रीय आणि दार्शनिक परंपरेमध्ये कितीही बौद्धिक चैतन्य असले तरी ती बंदिस्त आणि आत्मलक्षी परंपरा होती. तिच्यामध्ये एक संकल्पनात्मक चौकट विकसित होऊन स्थिर झाली होती आणि ह्या संकल्पनाव्यूहाने मानवी अनुभवांची आणि व्यवहारांची जी व्यवस्था लावली होती तिच्या कोशातून बाहेर पडण्याची शक्ती तिच्यात राहिली नव्हती. ह्यामुळे ह्या संकल्पनात्मक व्यवस्थेत जे अनुभव सामावून घेता येत नसत त्यांच्याविषयी ती उदासीन असे. उदा. पश्चिमेत झालेला वैज्ञानिक

विकास, तेथे निर्माण झालेले सामाजिक आणि राजकीय तत्त्वज्ञान, देशात झालेल्या राजकीय आणि औद्योगिक घडामोडी इ. ह्यामुळे, ऐहिक व्यवहाराच्या व्यापक आणि महत्त्वाच्या अशा अनेक क्षेत्रांपासून ती अधिकाधिक अलिप्त आणि म्हणून अधिकाधिक संकुचित होत गेली होती. तिच्यामध्ये नवनिर्मितीची ताकद होती हे नव्यन्यायाच्या निर्मितीवरून सिद्ध होते. पण एका अतिशय घट्ट अशा संकल्पनात्मक चौकटीमधील ती नवनिर्मिती होती.

प्राज्ञपाठशाळा आधुनिक जगाला आणि ज्ञानमूल्यांना सन्मुख होती ह्याचा अर्थच असा की, ह्या चौकटीच्या बाहेर उदयाला आलेली आणि विकसित झालेली शास्त्रे, अनुभव आणि व्यवहार यांना तिच्या दृष्टीने फार महत्त्व होते. आपल्या समाजाच्या अभ्युत्थानासाठी ही सामग्री आत्मसात करणे आवश्यक आहे हा तिचा निर्णय होता. आणि प्राज्ञपाठशाळेने हा आपल्या कामाचा भाग म्हणून स्वीकारण्यात ही सामग्री पारंपरिक संकल्पनात्मक चौकटीत सामावून घेता येणे शक्य आहे हे गृहीत होते. हे गृहीतकृत्य कितपत योग्य होते हा एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे. दुसरा संबंधित प्रश्न असा की, ही पारंपरिक संकल्पनात्मक चौकट हा भारतीय किंवा हिंदू अस्मितेचा (आयडेंटिटी) सारभूत (एसेन्शिअल) भाग आहे असे मानणे कितपत रास्त आणि कितपत उपयुक्त होते?

सामाजिक परिवर्तन घडवून आणणे आवश्यक होते ह्याचा प्राज्ञपाठशाळेच्या दृष्टीने अर्थ असा होता की, धर्मशास्त्रावर आधारलेल्या परंपरागत आचारधर्मात बदल करणे आवश्यक होते. ह्याच्या मागचा एक विचार असा होता की, हिंदू समाजाला अधिक बलसंपन्न करणे आवश्यक होते. ब्रिटिशांनी आपला पूर्ण पराभव केला होता. आपल्यावर पारतंत्र्य लादले होते आणि आपल्या समाजाची ताकद वाढविल्याशिवाय ब्रिटिशांशी मुकाबला करून आपले स्वातंत्र्य परत हिसकावून घेणे अशक्य होते. सशस्त्र क्रांतीचा मार्ग पत्करलेला एक गट प्राज्ञपाठशाळेत होता आणि इतिहासात हिंदू समाजाचा परत परत पराभव का होत आला आहे हा त्याच्या चर्चेचा सततचा विषय होता. इथे एक प्रश्न उपस्थित करता येईल. पराभवाचे शल्य, आपल्या समाजाच्या दुबळेपणाविषयीची खंत, तिच्यातून उद्भवलेली आत्मनिरीक्षणाची प्रेरणा, समाजाचे बळ वाढविण्याचा निर्धार ह्या गोष्टी इस्लामचे आक्रमण आणि भारतात त्याने मिळविलेला विजय ह्यांना लाभलेल्या हिंदू प्रतिसादात का आढळत नाहीत? ब्रिटिश राजवटीला, ब्रिटिशांच्या सामर्थ्याला ह्या स्वरूपाचा प्रतिसाद का मिळाला? असे होते का, की ब्रिटिशांचा लष्करी पराक्रम, त्यांची राज्यव्यवस्था ह्यांच्यातून एका वेगळ्या प्रकारच्या - 'आधुनिक' - समाजाचे दर्शन लोकांना होत होते आणि ह्या दर्शनातून आपल्या समाजाच्या वास्तव स्थितीचे सम्यक दर्शन घेण्याची शक्ती, त्याचे मूल्यमापन करण्याचा मानदंड लाभला होता. स्वतःकडे पाहायचे तर स्वतः बाहेर पडावे लागते, स्वतः बाहेरच्या कोणत्यातरी बिंदूवर अधिष्ठान ठेवून स्वतःकडे वळावे लागते. हा बिंदू ब्रिटिश समाजाच्या वेगळेपणाने पुरविला. ज्यांनी इंग्रजी शिक्षण घेतले होते त्यांनी अर्थात आधुनिक वैज्ञानिक

आणि सामाजिक संकल्पना आत्मसात केल्या होत्या आणि स्वतःच्या समाजाचे निरीक्षण आणि परीक्षण करण्याची साधने आणि प्रवृत्तीही त्यांना ह्या संकल्पनांपासून लाभली होती. पण ही मंडळी अर्थात सांस्कृतिकदृष्ट्या 'परकी' झाली होती. एका वेगळ्या संस्कृतीमध्ये त्यांचा अनुप्रवेश झाला होता, त्यांचे व्यक्तिमत्त्व द्विधा झाले होते. पण ज्यांनी आपले अधिष्ठान भारतीय परंपरेवर ठेवले होते, आपली पारंपरिक अस्मिता (आयडेंटिटी) जोपासली होती त्यांनी आत्मनिरीक्षणाला आणि आत्मपरिवर्तनाला प्रवृत्त व्हावे ही लक्षणीय गोष्ट होती.

दुसरा प्रश्न असा की, सशस्त्र क्रांतिकारकांना जे परिवर्तन पाहिजे होते त्यातून त्यांना काय साधायचे होते? त्यांना अर्थात राजकीय स्वातंत्र्य पाहिजे होते. ह्यासाठी त्यांना समाजातील क्षात्रतेज वाढवायचे होते, व्यक्तींची समाजावरील निष्ठा, सांघिक वृत्ती आणि शिस्त ह्यांचे संवर्धन करायचे होते, आधुनिक शस्त्रास्त्रांचा वापर आणि निर्मिती करण्याचे ज्ञान वाढवायचे होते इ. थोडक्यात, ते भौतिक बळाची आराधना करीत होते आणि ह्या बळाचा आविष्कार प्रामुख्याने रणांगणावर व्हायचा होता. पराभूत राष्ट्रातील तरुणांनी पराभवाला ह्या स्वरूपाचा, बलसाधनेच्या ईर्ष्येद्वारा प्रतिसाद द्यावा ही स्वाभाविक गोष्ट आहे. कारण समाजाची सांस्कृतिक दुरवस्था अनेकदा रणांगणावरील पराभवात मूर्त होते. रणांगणात विजय मिळवूनच मागील पराभवाचे निराकरण करता येईल अशी दृष्टी स्वाभाविकपणे बनते.

ब्रिटिश राजवटीला, पारतंत्र्याला प्राज्ञपाठशाळेने दिलेला प्रतिसाद ह्या तारुण्यसुलभ प्रतिसादापेक्षा अधिक खोल, प्रगल्भ आणि भारतीय शास्त्रीय व दार्शनिक परंपरेला साजेसा होता. एकतर आधुनिक भौतिक आणि सामाजिक शास्त्रांचे प्रामाण्य तिने मान्य केले; प्रमाण ज्ञानाचा एक प्रकार म्हणून त्यांचा स्वीकार केला. भौतिक शास्त्रांच्या आधारे साधनसंपत्ती निर्माण करता येते आणि तिचा वापर करून ऐहिक जीवन सुखी करता येते; म्हणून आधुनिक भौतिक शास्त्रांना औपपत्तिक आणि व्यावहारिक असे दुहेरी प्रामाण्य आहे अशी ही दृष्टी होती: आधुनिक सामाजिक शास्त्रांकडून प्राज्ञपाठशाळेने स्वीकारलेली एक महत्त्वाची देणगी म्हणजे ऐतिहासिक दृष्टिकोन. भारतीय शास्त्रीय परंपरेत ऐतिहासिक दृष्टिकोनाचा उद्भव आणि विकास झालाच नव्हता. ऐतिहासिक दृष्टिकोन प्राज्ञपाठशाळेने मुख्यतः धर्मसुधारणेच्या कार्यासाठी राबविला. आधुनिक भौतिक ज्ञानाला ज्याप्रमाणे ज्ञान म्हणून प्रामाण्य आहे आणि शिवाय व्यावहारिक उपयुक्तताही आहे, त्याप्रमाणे मानवी समाजाकडे आणि संस्थांकडे पाहण्याची सम्यक दृष्टी म्हणून ऐतिहासिक दृष्टिकोनाला प्रामाण्य आहे आणि प्राप्त परिस्थितीत हिंदू समाजाची सुधारणा करण्यासाठी, त्याच्या आचारात जे परिवर्तन घडवून आणणे आवश्यक आहे ते घडवून आणायला अनुकूल असा हा दृष्टिकोन असल्यामुळे त्याला व्यावहारिक प्रामाण्यही आहे अशी प्राज्ञपाठशाळेची भूमिका दिसते.

हिंदू धर्मशास्त्र मीमांसेवर आधारलेले आहे; म्हणजे, शास्त्रवचनांचा अर्थ लावण्याची जी पद्धती मीमांसेने निश्चित केली आहे तिच्यावर आधारलेले आहे. शास्त्रवचनाच्या, म्हणजे श्रुती

आणि स्मृती यांतील प्रत्येक वचनाच्या प्रामाण्याचा स्वीकार हे मीमांसापद्धतीचे आधारभूत तत्त्व आहे. आता प्रत्येक शास्त्रवचन जर सत्य असेल तर सर्व शास्त्रवचने परस्परांशी सुसंगत असली पाहिजेत हे उघड आहे. कारण कोणतीही दोन शास्त्रवचने जर परस्परविसंगत असतील तर त्यांतील निदान एक विधान असत्य असावे लागेल आणि प्रत्येक शास्त्रवचन सत्य असते हे तत्त्व बाधित होईल. तेव्हा सर्व शास्त्रवचनांचा सुसंगत समन्वय साधणे हे मीमांसेच्या पद्धतीचे उद्दिष्ट आहे आणि ते साधण्यासाठी संकल्पनांची आणि तत्त्वांची जी रचना मीमांसेने केली आहे तिच्याकडे केवळ एक बौद्धिक रचना म्हणून जर आपण पाहिले तर आपल्याला तिचे विलक्षण कौतुक वाटल्याशिवाय राहणार नाही. ती अतिशय दृढ, सुसंगत आणि समर्थ अशी रचना आहे. आता धर्मशास्त्राकडे ऐतिहासिक दृष्टीने पाहण्याचा अर्थच असा होतो की, शास्त्रवचनांचे शब्दप्रामाण्य आपण नाकारीत आहोत. धर्मशास्त्र म्हणजे माणसांनी काय करावे आणि काय करू नये, कोणत्या सामाजिक संस्था आणि प्रघात असावे, माणसांचे एकमेकांशी संबंध आणि व्यवहार कसे असावे ह्या विषयीची तत्त्वे आणि नियम घालून देणारे शास्त्र. हे माणसांनी वेळोवेळी रचलेले शास्त्र आहे. बदलती परिस्थिती आणि बदलती मूल्ये यांना अनुसरून माणसांनी धर्मशास्त्रात वेळोवेळी बदल केले आहेत आणि म्हणून आजची परिस्थिती, आज उपलब्ध असलेले अनुभवांचे संचित आणि ज्ञान यांना अनुसरून परंपरागत आलेल्या धर्मशास्त्रात बदल करण्याचा अधिकार आपल्याला आहे आणि ते आपले कर्तव्य आहे असे ऐतिहासिक पद्धतीचा पुरस्कार करणाऱ्यांचे म्हणणे होते. ऐतिहासिक पद्धतीविरुद्ध मीमांसेची समन्वयपद्धती अशी मांडणी प्रथम प्राज्ञपाठशाळेनेच केली आणि जाणीवपूर्वक ऐतिहासिक पद्धतीचा पुरस्कार केला.

प्राज्ञपाठशाळेची ही भूमिका क्रांतिकारक होती. कारण तिच्यात शब्दप्रामाण्याचा अव्हेर अभिप्रेत होता. उलट, धर्मशास्त्राची परंपरा शब्दप्रामाण्यावर आधारलेली होती. शास्त्रांचे शब्दप्रामाण्य नाकारणारा पण परंपरेचा अधिकार स्वीकारणारा ह्या अधिकाराचा अर्थ कसा लावील? परंपरेचा अधिकार, त्याच्या दृष्टीने, ती शास्त्रांच्या योग्य अर्थावर आधारलेली आहे आणि ह्या अर्थाला अनुसरणारी आहे ह्याच्यापासून निष्पन्न होत नाही. उलट, शास्त्रे हीच परंपरेची निर्मिती आहे, तिला सुव्यवस्थित आणि दृढ स्वरूप देण्याची ती साधने आहेत असे त्याचे म्हणणे राहील. अखेरीस, परंपरेत मानवी मूल्यांचा परिपोष झालेला असतो, अनेक पिढ्यांचा अनुभव आणि प्रतिभावंत व्यक्तींचे चिंतन ह्यांच्यातून ह्या मूल्यांना स्वतःमध्ये मूर्त करणारी एक जीवनपद्धती आणि सामाजिक व्यवहाराची रचना निर्माण झालेली असते आणि ह्या जीवनपद्धतीला आणि रचनेला समाजात स्थायी रूप आणि सातत्य देण्याची यंत्रणा परंपरेत विकसित झालेली असते, ह्यासारख्या कारणांवर परंपरेचा अधिकार तो आधारील. परंपरेचा वारसा हे समाजातील प्रत्येक व्यक्तीचे सामायिक धन असते. ते निष्कारण बाजूला सारून व्यक्तीने मुळापासून स्वतःचे जीवन घडविण्याचा प्रयत्न करणे अविवेकी ठरेल. पण

परंपरा मानवनिर्मित असल्यामुळे तिच्यात अपुरेपणा आणि दोष असणार, आणि म्हणून तिची चिकित्सा करणे आवश्यक असते. तसे न करणे अंधश्रद्धा ठरेल. दुसऱ्या समाजात जर काही मानवी मूल्यांचा विशेष विकास झाला असेल तर ती स्वीकारणे आणि स्वतःच्या परंपरेत मूर्त झालेल्या मूल्यांशी त्याचा समन्वय साधणे हेही योग्य आहे. तसे न करणे संकुचितपणा ठरेल. सारांश, ऐतिहासिक पद्धतीमध्ये परंपरेचा बंदिस्तपणा नष्ट करण्याचे, व्यापक आणि सार्वत्रिक मानवी संस्कृतीमध्ये परंपरेच्या विशिष्टत्वाचे विसर्जन करण्याचे सामर्थ्य होते, आणि हे करण्यात खरी आधुनिकता होती.

उदा., पारंपरिक हिंदू धर्मशास्त्रातील यज्ञयागादी विधींचे स्थान घ्या. हे विधी बंधनकारक आहेत. त्यांच्यापासून अदृश्य फळे मिळतात. ही फळे त्यांच्यापासून कशी निष्पन्न होतात हे अनुभव आणि तर्क यांच्या आधारे जाणता येत नाही. ते जाणता येत असते तर श्रुतिस्मृतींना प्रयोजन नसते. ती निष्पन्न होतात हे ज्ञान शास्त्रवचनांच्या प्रामाण्यावर आधारलेले असते अशी धर्मशास्त्राची स्पष्ट भूमिका आहे. विधीविषयीची ही संकल्पना ऐतिहासिक पद्धतीचा पुरस्कार करणाऱ्यांनी जर मान्य केली तर शास्त्राचे शब्दप्रामाण्य ते मान्य करतात असा त्याचा अर्थ होईल. आणि काही शास्त्रवचनांचे शब्दप्रामाण्य मान्य केल्यानंतर इतरांचे अमान्य करता येणे त्यांना शक्य झाले नसते. म्हणजे समन्वयपद्धतीचा अंगीकार केल्यावाचून त्यांना गत्यंतर उरले नसते. तेव्हा विधीपासून अलौकिक कार्यकारणभावाला अनुसरून म्हणजे अनुभव आणि तर्क यांच्या आधारे ज्ञान होऊ शकत नाही, अशा कार्यकारणभावाला अनुसरून विधीपासून फळे प्राप्त होतात ही संकल्पनाच सोडून द्यावी लागते. मग यज्ञयाग, श्राद्ध इ. विधी आणि उपनयन इ. संस्कार यांचा वेगळा अर्थ लावणे ऐतिहासिक पद्धतीचा पुरस्कार करणाऱ्यांना भाग पडते. उदा. इंद्रियातीत अस्तित्वाशी संबंध जोडण्याचे, त्याच्याविषयीच्या आपल्या भावनांचे पोषण करण्याचे आणि त्यांचा आविष्कार करण्याचे प्रतीकात्मक मार्ग म्हणून त्यांच्याकडे पाहाणे ही असा त्यांचा नवीन अर्थ लावण्याची एक रीत मानता येईल. (इंद्रियातीत अस्तित्वाची संकल्पना इतिहासवाद्यांना सोडून द्यावी लागते असे मानायचे कारण नाही. फक्त ह्या संकल्पनेचा उदय आणि ह्या अस्तित्वाचे ज्ञान केवळ शास्त्रवचनांपासून होते ही भूमिका सोडून द्यावी लागेल आणि मानवी अनुभवात त्यांना आधार द्यावा लागेल. (उदा. गूढ अनुभवात किंवा विशुद्ध नैतिक अनुभवात इ.) तेव्हा ऐतिहासिक पद्धतीचा स्वीकार हे आधुनिकतेच्या दिशेने टाकण्यात आलेले एक क्रांतिकारक तिला कोणतेही राजकीय अंग नव्हते, कोणतीही राजकीय ध्येये किंवा उद्दिष्टे ह्या परंपरेने स्वीकारलेली नव्हती. तेव्हा प्राज्ञपाठशाळेच्या सामाजिक परिवर्तनाच्या कार्यक्रमाला फारसा अवसर मिळाला नाही.

पण प्राज्ञपाठशाळेचे मुख्य कार्य विद्येच्या आणि विचारांच्या क्षेत्रात होते. ह्या क्षेत्रात तिने स्वीकारलेल्या आधुनिकतेचे स्वरूप आणि मर्यादा, पण त्याबरोबरच ह्या स्वरूपात दडलेल्या आणि प्रत्यक्षात न अवतरलेल्या शक्यता यांचाही विचार करावा लागेल. प्राज्ञपाठशाळेत

शिकविण्यात येणारा अभ्यासक्रम आणि होणारे इतर अध्ययन हे दृढपणे पारंपरिक होते. पारंपरिक शास्त्रे आणि दर्शने हा ह्या अध्ययनाचा प्रमुख भाग होता. पण मराठी ही प्राकृत लोकभाषाही शिकविण्यात येत होती. मराठीतून वक्तृत्व करण्याचा सराव करून घेण्यात येत असे. नवीन विचारांचा समाजात फैलाव करण्याचे साधन म्हणून ही भाषिक कौशल्ये विद्यार्थ्यात बाणविण्याचा हा प्रयत्न होता हे उघड आहे. शास्त्रीय वादांचे माध्यम अर्थात परंपरेप्रमाणे संस्कृत होते. पाश्चात्त्य भौतिक शास्त्रांच्या अभ्यासाचा समावेश अभ्यासक्रमात होता, पण त्याचे प्रमाण मामुली होते. ज्या गंभीरपणे आणि नेटाने उदा., न्यायशास्त्राचा अभ्यास होत होता, त्या गंभीरपणे आणि नेटाने भौतिकी किंवा रसायनशास्त्र यांचा अभ्यास होत नव्हता. तेव्हा आधुनिक भौतिक शास्त्रे आहेत; एकंदर ज्ञानशाखांमध्ये त्यांना महत्त्वाचे स्थान आहे, ह्या वस्तुस्थितीची जाणीव करून देणे आणि ह्या शास्त्रांची तोंडओळख करून देणे यापलीकडे ह्या अभ्यासातून काही साधत नव्हते.

ह्याचे एक कारण असे असणार की, ब्रिटिशांनी सुरू केलेली आधुनिक शिक्षणव्यवस्था रूढ झाली होती आणि ह्या वस्तुस्थितीच्या पार्श्वभूमीवर प्राज्ञपाठशाळेने विद्येच्या क्षेत्रातील आपल्या भूमिकेची आणि कार्याची संकल्पना घडविली असणार. आधुनिक ज्ञानाचे महत्त्व होतेच, आणि त्याच्यात प्रवेश करून देणारी शिक्षण व्यवस्थाही निर्माण झाली होती. आणि विद्यार्थी अनेक कारणांमुळे तिच्याकडेच वळत होते. उलट, आपली स्वतःची अध्ययन-अध्यापन व्यवस्था क्षीण होत होती, तिचे विषय असलेली शास्त्रे लुप्त होतील अशी भीती निर्माण झाली होती, (आज ती लुप्तप्राय झाली आहेत.) आणि म्हणून पारंपरिक अध्ययनव्यवस्थेला दृढ करणे आवश्यक होते. पण ह्याबरोबरच आधुनिक ज्ञान आणि विचार ह्यांच्या अस्तित्वाची दखल, पारंपरिक शास्त्रे आत्मसात करणारांनी घेणे आवश्यक होते. जो नवीन पाऊल होते ह्यात शंका नाही. एकोणिसाव्या शतकात बायबलची 'उच्चतर समीक्षा' सुरू झाल्यावर पारंपरिक ख्रिस्ती श्रद्धेचा नव्याने अर्थ लावावा लागला. ऐतिहासिक पद्धतीचा स्वीकार ही हिंदू धर्मशास्त्राचा आणि पारंपरिक धार्मिक श्रद्धेचा नवीन अर्थ लावण्याची आणि त्याला अनुसरून सामाजिक जीवनात एक परिवर्तन घडवून आणण्याच्या प्रक्रियेची सुरुवात होती.

प्रत्यक्षात प्राज्ञपाठशाळेने ज्या सामाजिक सुधारणांचा पुरस्कार केला त्या मामुली होत्या; आजच्या संदर्भात नव्हे तर त्या काळीही मामुली वाटतील अशा होत्या. ह्याची अनेक कारणे होती. परंपरेत ठाण मांडून तिच्यामध्ये परिवर्तन घडवून आणावे ही प्राज्ञपाठशाळेची भूमिका होती आणि ज्या तत्त्वाच्या आधारे हे परिवर्तन ती घडवून आणू पाहत होती तिच्यात परंपरेचे विसर्जन करण्याचे सामर्थ्य होते हे आपण पाहिले. पण ह्या तत्त्वात जी क्रांतिकारकता सुप्त होती ती प्रकट व्हायला अवसर मिळाला नाही. जी पारंपरिक ब्राह्मणी वहिवाट तिच्या बाहेर प्राज्ञपाठशाळेने एक पाऊल टाकले. पण ते फार लांब टाकलेले पाऊल नव्हते. एकतर

प्राज्ञपाठशाळा ब्राह्मण समाजापलीकडे पोचू शकत नव्हती. शिवाय लोकांच्या रोमरोमात भिनलेल्या कल्पना आणि सवयी ते पटकरून सोडून देतील हे शक्य नव्हते. तेव्हा लोकांचे वैचारिक परिवर्तन घडवून आणण्यावर प्राज्ञपाठशाळेने भर दिला आणि ह्या परिवर्तनाचे एक प्रतीक म्हणून परंपरेने आखलेल्या लक्ष्मणरेषेचा भंग करणारे एक पाऊल टाकले. पण तोपर्यंत आधुनिकता अनेक मार्गांनी समाजमनामध्ये शिरत होती. जोतिबांनी हिंदू धार्मिक परंपरा झिडकारली आणि आधुनिकतेचा वाहक असलेल्या धर्माची स्थापना केली. आगरकरांनीही धार्मिक परंपरेचा अव्हेर केला आणि ऐहिक कल्याणावर आधारलेल्या समाजरचनेचा पुरस्कार केला. ह्या दोन्ही आंदोलनांमागची प्रेरणा सरळ पाश्चात्त्य अनुभव आणि संकल्पना यांच्यात उगम पावलेली होती. राजकीय चळवळ जसजशी प्रखर होत गेली तसतशी पारंपरिक समाजाच्या पुनर्रचनेची आवश्यकता लोकांना पटू लागली होती. येथे एक राष्ट्र आहे आणि त्याला स्वतंत्र करायचे आहे अशी परिस्थिती नसून, येथे एक स्वतंत्र राष्ट्र निर्माण करायचे आहे अशी परिस्थिती आहे हे आकलन लोकांना होऊ लागले होते. आणि ह्या भावी स्वतंत्र राष्ट्राची घडण धार्मिक परंपरेवर आधारता येणार नाही हे स्पष्ट होते. कारण ज्या स्वरूपात धर्माधिष्ठित सामाजिक परंपरा जिवंत होती त्या स्वरूपात उदा. कायस्थ, खानदानी मराठे इ. राज्यकारभारात भाग घेणाऱ्या उच्च पातळीवरील जातींनी - ते शिकून घेतले असते. मग पुरोहितवर्गाची पारंपरिक, धर्मकेंद्री शास्त्रे आणि ऐहिक, व्यवहारोपयोगी शास्त्रे हा भेद स्पष्ट झाला असता. आणि हा भेद जर स्पष्ट झाला असता तर पारंपरिक कारागीर जातीतील विद्यार्थ्यांनाही हे ज्ञान मोकळे झाले असते. शिवाय पुरोहित नसलेले आणि राज्यकारभार, व्यापार यांत सामील असलेले जे बरेच ब्राह्मण होते त्यांनी, सामाजिक महत्त्व आणि अधिकार प्राप्त करून देणाऱ्या ह्या ज्ञानाकडे पाठ फिरविली नसती. ही जातिसंस्थेच्या विघटनाची. एका बाजूने होणारी सुरुवात ठरली असती. औद्योगीकरण आणि व्यापार- दळणवळण यांच्यात झालेल्या वाढीमुळेही ह्या प्रक्रियेला दुसऱ्या बाजूने सुरुवात झाली असती.

वैज्ञानिक विचारपद्धतीवर आधारलेले व्यवहारोपयोगी निसर्गविज्ञान आणि पारंपरिक शास्त्रदर्शनांची व्यवस्था ही दोन्ही प्रकारची ज्ञाने जर समाजात एकत्र नांदली असती तर ह्या परिस्थितीचा पारंपरिक ज्ञानव्यवस्थेवर काय परिणाम झाला असता हा आपल्यापुढचा प्रश्न आहे. ह्याचे थोडक्यात उत्तर असे देता येईल: एकतर पारंपरिक ज्ञानात जो वैज्ञानिक आशय आहे तो बाधित झाला असता. उदा. वैशेषिक आणि सांख्य ह्या दर्शनांतील पदार्थस्वरूपविषयक जो भाग आहे तो कालबाह्य ठरला असता. आयुर्वेदातील औषधांचे रासायनिक पृथक्करण झाले असते, आधुनिक शरीरक्रियाशास्त्र आणि शरीररचनाशास्त्र यांच्याशी सुसंगत ठरेल अशा रीतीने आयुर्वेदातील संकल्पनांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न झाला असता आणि ज्याचा असा अर्थ लावता येणे शक्य नसेल त्या त्याज्य ठरल्या असत्या. म्हणजे पारंपरिक ज्ञानातील वैज्ञानिक आशयाकडे आपण ऐतिहासिक दृष्टीने पाहू लागलो असतो.

मग पारंपरिक ज्ञानातून ज्ञान म्हणून काय टिकून राहिले असते? ह्याचे उत्तर असे देता येईल की, त्यातील तत्त्वज्ञानात्मक आशय आणि विज्ञानात्मक आशय हा भेद स्पष्ट झाला असता आणि तत्त्वज्ञानात्मक आशय टिकून राहिला असता. मग ह्या तत्त्वज्ञानाची टक्कर आधुनिक ज्ञान व सामाजिक विचार यांतून निर्माण होणाऱ्या चिकित्सक आणि ऐतिहासिक दृष्टीने पाहू लागलो असतो. थोडक्यात, बंदिस्त तत्त्वज्ञानात्मक प्रश्नांशी झाली असती. म्हणजे पारंपरिक तत्त्वज्ञानाकडेही आपण समाज निर्माण होत होता आणि घडवायचा होता त्याला अभिमुख राहून त्याच्यात काम करण्याची वृत्ती आणि शक्ती त्यांच्यांत निर्माण होणे आवश्यक होते. आणि म्हणून ह्या भावी समाजाला आधारभूत असलेले ज्ञान आणि विचार ह्यांची ओळख त्यांना करून देणे हा अध्यापनाचा एक भाग करण्यात आला होता. म्हणजे पारंपरिक शास्त्रे आणि आधुनिक शास्त्रे असे एक द्वंद्व निर्माण झाले होते. आधुनिक ज्ञान आणि विचार सुखी आणि बलशाली समाज निर्माण करायला आवश्यक होता हे दिसत होते. पण हे ज्ञान आणि विचार परकी होता. परकी होता म्हणून त्याज्य नव्हता. पण हे जेत्यांनी आणलेले ज्ञान आणि विचार होता. आपली अस्मिता दृढ करणे आवश्यक होते; कारण राजकीय पारतंत्र्याशी मुकाबला करण्याचा तो एक मार्ग होता. आपली अस्मिता आपल्या परंपरेवर आधारलेली होती आणि म्हणून तिची पुनःस्थापना करणे आवश्यक होते; पण ही पुनःस्थापना आधुनिक ज्ञान आणि विचार यांच्या संदर्भात करणे आवश्यक झाले होते. तसे केले नसते तर वर्तमानाशी आणि भविष्याशी संबंध तुटला असता.

पारंपरिक अस्मिता आणि आधुनिक ज्ञान ह्या द्वंद्वाचा प्रखरपणा पारतंत्र्यामुळे निर्माण झाला होता. समजा, स्वतंत्र मराठी राज्य टिकून राहिले असते तर एकोणिसाव्या शतकात स्वातंत्र्य टिकवून धरण्यासाठी शिक्षणव्यवस्थेत कोणते बदल घडवून आणावे लागले असते? (अठराव्या शतकातली भारताची सामाजिक आणि राजकीय परिस्थिती ध्यानात घेता हे घडणे अर्थात अशक्यप्राय होते.) एकतर आधुनिक युद्धकला हस्तगत करावी लागली असती. म्हणजे शस्त्रास्त्रे, दारूगोळा यांचे उत्पादन महाराष्ट्रात करावे लागले असते, नकाशे बनवावे लागले असते, दळणवळण सुधारण्यासाठी चांगले रस्ते, पूल वगैरे बांधावे लागले असते. आणि ह्या तंत्राबरोबरच त्यांना आधारभूत असलेले वैज्ञानिक ज्ञान- रसायनशास्त्र, भौतिक आणि विशेषतः गणित- आत्मसात करणे आवश्यक झाले असते. लष्करी सिद्धतेसाठी आवश्यक असलेल्या उत्पादनतंत्रांचा वापर अर्थात औद्योगिक क्षेत्रातही झाला असता. पारंपरिक कारागीर जातींनी ही नवीन उत्पादनतंत्रे हस्तगत केली असती असे मानू या. त्यांना आधारभूत असलेला वैज्ञानिक आशय पारंपरिक बुद्धिजीवी जातींनी आत्मसात केला असता असे मानू या. समजा, ब्राह्मणांनी सोवळेपणाच्या कल्पनेने हे ज्ञान शिकायचे अमान्य केले असते तर बुद्धिजीवी असलेल्या ब्राह्मणेतर जातींनी आणि रुद्ध असलेले भारतीय ज्ञान मानवी ज्ञानाच्या मध्यवर्ती प्रवाहात येऊन मिसळले असते. पण ह्या

प्रक्रियेत आपण आपले स्वत्व गमावून बसत आहोत असे आपल्याला वाटले नसते, तर ज्ञाननिर्मितीचे मध्यंतरात स्थगित झालेले कार्य आपण परत सुरू केले आहे असा अभिमान आपल्याला वाटला असता आणि पारंपरिक ज्ञानात आणि विचारात जे टिकाऊ आहे ते मानवी ज्ञानाच्या सामायिक धनात समाविष्ट झाले असते.

राजकीय पारतंत्र्यामुळे एरवी स्वाभाविकपणे घडून आली असती अशी ही प्रक्रिया घडून आली नाही. पण ह्या प्रक्रियेची आवश्यकता आणि महत्त्व प्राज्ञपाठशाळेच्या संस्थापकांनी ओळखले होते आणि अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आपल्या शक्तीप्रमाणे तिला चालना दिली होती. ती जर यशस्वीपणे पार पडली असती तर कोणत्या प्रकारचे विद्वान तिच्यातून निर्माण झाले असते त्याचे एकुलते एक उदाहरण म्हणजे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी. 'भारतीय प्रबोधनाचे प्रतीक असलेला पुरुष' असे मानवेन्द्र रॉय यांनी त्यांचे जे वर्णन केले आहे ते यामुळे यथार्थ आहे.

**(प्राज्ञपाठशाळा व तिची परंपरा,**
**संपा. लक्ष्मणशास्त्री जोशी, के. ल. दप्तरी, महादेवशास्त्री दिवेकर,**
**रा. ना. चव्हाण, मे. पुं. रेगे, ना. बा. मराठे,**
**प्राज्ञपाठशाळा, वाई, १९९६)**

❍❍❍

# ३५.
# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी
## शरद बेडेकर

संस्कृतचे गाढे विद्वान, हिंदू संस्कृतीचे अभ्यासक, तत्त्वचिंतक, पुरोगामी विचारवंत, भाष्यकार, वक्ता अशा अनेक नात्यांनी गेली पाऊणशे वर्षे लक्ष्मणशास्त्री जोशी उभ्या महाराष्ट्राला परिचित होते. त्यांचे सांस्कृतिक, शैक्षणिक, सामाजिक इत्यादी क्षेत्रांतील योगदान केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित नव्हते, तर राष्ट्रीय स्तरावरही ते वाखाणण्याजोगे होते.

लक्ष्मणशास्त्रींचा जन्म १९०१ सालचा व मृत्यू १९९४ सालचा. शालेय शिक्षण न झालेल्या या तीक्ष्ण बुद्धीच्या मुलाने लहानपणीच वाई येथे केवलानंद सरस्वती यांच्या मार्गदर्शनाखाली न्याय, वेदान्त वगैरे प्राचीन शास्त्रांचे बारा वर्षे अध्ययन केले. केवलानंद सरस्वतींचे विचार धर्मसुधारणा व स्वातंत्र्य चळवळ यांना पोषक होते. लक्ष्मणशास्त्रींनी स्वतःही तरुण वयातच जोतिबा फुले, आगरकर, रानडे आदी मागील शतकातील समाजसुधारकांच्या विचारांचे वाचन केले होते. वयाच्या बाविसाव्या वर्षीच त्यांनी कलकत्त्याच्या संस्कृत महाविद्यालयातून 'तर्कतीर्थ' ही पदवी मिळविली. वयाच्या पंचविसाव्या वर्षीच सनातन धर्मपरिषदेत व अखिल भारतीय संस्कृत पंडित संमेलनात त्यांनी हिंदू धर्म सुधारण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. त्यांच्या पुढील आयुष्यात लोक त्यांना शास्त्रीजी म्हणू लागले.

संस्कृत व मराठी भाषांवरील प्रभुत्वाने व पौर्वात्य तत्त्वज्ञानाने शास्त्रीजींची ज्ञानाची तहान भागणे शक्य नव्हते. तेव्हा वयाच्या तिशीच्या आसपास राजकीय कारावासात मिळालेला वेळ वापरून त्यांनी इंग्रजी भाषा, इंग्रजी साहित्य आणि पाश्चात्त्य तत्त्वज्ञान यांचाही खोल अभ्यास केला. पुढे त्यांनी मार्क्सवाद आणि तत्सम इतर तत्त्वज्ञानांचाही तसाच सखोल अभ्यास केला.

त्यानंतर राजकीय व सामाजिक जीवनातील सहभाग चालू असतानाच त्यांनी ग्रंथलेखन सुरू केले. त्यांची 'हिंदुधर्माची समीक्षा व सर्वधर्म समीक्षा', 'वैदिक संस्कृतीचा विकास' इत्यादी पुस्तके मान्यता पावलेली आहेत. परंतु शास्त्रीजींचे सर्वांत महनीय कार्य म्हणून बोट दाखवावे लागेल ते त्यांच्या 'धर्मकोश' व 'विश्वकोश' या कार्याकडे. आपल्या प्राचीन संस्कृतीचा सर्वांगीण वेध घेणारा प्रमाणग्रंथ म्हणून धर्मकोशाचे कार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. तसेच प्रचंड आवाका असलेल्या मराठी विश्वकोशात, आधुनिक ज्ञानकोशांच्या पद्धतीनुसार सर्व ज्ञानविषय संकलित केलेले आहेत. या विश्वकोशात 'आधुनिक ज्ञानविज्ञाना'वर अधिक भर दिलेला आहे, हे त्याचे वैशिष्ट्य आहे. अशा प्रकारे आजच्या काळाला योग्य असे मोठेच ज्ञानसाधन त्यांनी महाराष्ट्राला मिळवून दिलेले आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात महात्मा गांधींना अस्पृश्यता निर्मूलनासारख्या कार्यासाठी पारंपरिक शास्त्रप्रामाण्याचे अधिष्ठान हवे होते. त्या काळात असे अधिष्ठान पुरविणे म्हणजे सनातनी शास्त्री पंडितांचे शत्रुत्व ओढवून घेणेच होते. परंतु असा संकुचित विचार न करता, स्वतःच्या पांडित्यावर पूर्ण विश्वास असलेल्या तत्त्वनिष्ठ शास्त्रीजींनी गांधीजींची ज्ञानात्मक गरज समर्थपणे भागविली. शास्त्रीजींच्या तरुणपणीच्या कार्यावर गांधीजींचा प्रभाव होता हे खरे आहे. मात्र वैचारिकदृष्ट्या ते कधीही 'गांधीवादी' झाले नाहीत. कारण गांधीवादात विशुद्ध बुद्धिवाद नव्हता आणि शास्त्रीजी मात्र बुद्धिवादी होते.

त्याचप्रमाणे मानवेंद्रनाथ रॉय यांना त्यांचा नवमानवतावाद मांडण्यासाठी पौर्वात्य आणि पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाचा समन्वय करणे जरूर होते. रॉय यांची ज्ञानाची ही गरज यथार्थपणे पुरी करणे केवळ शास्त्रीजींना शक्य होते व त्यांनी ते केले. रॉयवादातील बुद्धिवादाच्या बैठकीवर त्यांची निष्ठा होती. शास्त्रीजींना स्वतःला रॉयिस्ट म्हणवून घेण्यात गौरव वाटे, तेही त्यामुळेच. तसेच १९३६ पासून १९४८ मध्ये पक्ष विसर्जित होईपर्यंत ते रॉयप्रणित रॅडिकल डेमोक्रॅटिक पक्षाचे क्रियाशील सदस्यही होते.

भारतीयांच्या पारंपरिक तत्त्वज्ञानाची आणि जुन्या धर्ममूल्यांची शास्त्रीजींनी परखड चिकित्सा केली. त्यातील परलोकपरायणता इत्यादी मूल्ये त्यांना आजच्या काळाला अयोग्य वाटली. अशी मूल्ये टिकवून धरली तर भारतीयांना आजच्या जगात मानाने जगता येणार नाही, अशी त्यांची खात्री झाली. त्यामुळेच त्यांनी आधुनिक काळातील विज्ञानमूल्यांचा व सामाजिक मूल्यांचा सतत पुरस्कार केला.

शास्त्रीजींना जशी आंधळी परंपराभक्ती मान्य नव्हती, तशीच वेंधळी पश्चिमपूजाही मान्य नव्हती. परंपरा आणि परिवर्तन यांचा कालानुरूप समन्वय करणे, त्यांना आवश्यक वाटले. स्वतः धर्मपंडित असूनही त्यांच्या विचारांची बैठक धार्मिक दृष्टिकोनात नव्हती; तर ती मानवतावाद व उदारमतवाद यांत होती. किंबहुना, तीच त्यांच्या एकूण विचारसरणीची दोन मुख्य सूत्रे होती, असे म्हणता येईल.

शास्त्रीजींच्या धर्मपांडित्यामुळे अनेक वेळा अध्यात्मवाद्यांना शास्त्रीजी खरे तर त्यांचे आहेत आणि त्यांनी कशाला हा पाखंडाचा पक्ष घेतला, असे वाटत असे. याउलट, आधुनिकांना शास्त्रीजींच्या पुरोगामित्वामुळे त्याच्याविषयी कौतुक आणि आपलेपण वाटत असे.

इ. स. १९५१ साली तत्कालीन राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद यांच्या हस्ते सौराष्ट्रात, सोरटी सोमनाथाच्या प्रतिष्ठापनेचा सोहळा मोठ्या थाटात साजरा झाला. त्या सोहळ्याचे पौरोहित्य केवलानंद सरस्वती आणि शास्त्रीजी यांनी (नेहरूंचा विरोध पत्करून) केले. त्या वेळी काही जणांना शास्त्रीजी भाविक, अध्यात्मवादी आहेत की काय असे वाटू लागले होते. परंतु सोमनाथ प्रतिष्ठापनेचे पौरोहित्य करण्याचे शास्त्रीजींचे कारण आपण समजून घेतले पाहिजे. अगोदर ते पौरोहित्य तत्कालीन शंकराचार्यांनी करायचे ठरत होते. परंतु अस्पृश्यांना सोहळ्यात प्रवेश दिला तर पौरोहित्य करायला शंकराचार्य तयार नव्हते. या दुराग्रहाला कुणीतरी आव्हान देणे जरूर होते. आणि त्यासाठीच शास्त्रीजींनी ते पौरोहित्य केले होते.

शास्त्रीजींचा कुठल्याही अद्भुत चमत्कारांवर विश्वास नव्हता; मंत्रतंत्राच्या सामर्थ्यावर विश्वास नव्हता. दैवी चमत्कार घडू शकतात, हे त्यांना मान्य नव्हते. भारतीयांच्या अंधश्रद्धा नाहीशा करून त्यांच्यात वैज्ञानिक मूल्ये रुजविण्याची आवश्यकता आहे असे त्यांचे स्पष्ट आणि ठाम मत होते.

शून्यवादी तत्त्वज्ञान मांडणारा बौद्ध तत्त्ववेत्ता नागार्जुन हा शास्त्रीजींचा एक आवडता तत्त्ववेत्ता होता. अनेक तत्त्वप्रणालींच्या अभ्यासाने व चिंतनाने शास्त्रीजींनी स्वतःही एक प्रकारचा शून्यवाद स्वीकारला होता असे वाटते. त्या मताप्रमाणे कोणतीही तत्त्वप्रणाली सर्वांगानी समाधानकारक होऊ शकत नाही. म्हणजेच, कुठलेही बौद्धिक तत्त्वज्ञान अखेरपर्यंत सुसंगतपणे विकसित होऊ शकत नाही व त्यात सैद्धांतिक अडचणी उरतात. अर्थात म्हणून काही कोणी व्यवहार सोडून देत नाही. नागार्जुनाच्या मते पारमार्थिक दृष्टीने जग शून्य आहे आणि निर्वाणाची कल्पनाही शून्यात्मकच आहे. परंतु व्यावहारिकदृष्ट्या जगाला सापेक्ष असे अस्तित्व आहे. म्हणून लौकिक जीवनात लोकसंगत संकेतांचा स्वीकार करूनच जगावे लागते. शास्त्रीजींचे स्वतःचे विचारही असेच काहीसे होते, असे म्हणता येईल.

शास्त्रीजींना वेदांविषयी आदर असूनही वेदांना ते निर्दोष अथवा अपौरुषेय मानीत नव्हते. त्यांना उपनिषदांतील अद्वैत तत्त्वज्ञानाचे परिपूर्ण आकलन झालेले असूनही, 'मोक्ष' हा व्यक्तीचा सर्वश्रेष्ठ पुरुषार्थ आहे असे मानायला ते तयार नव्हते. किंबहुना, हिंदू धर्मातील मोक्ष कल्पनेवरच त्यांचा विश्वास नव्हता. धर्मसंस्थेचा इतिहास पाहिला तर माणसानेच देव निर्मिला याचा भरपूर पुरावा मिळतो असे ते म्हणत. म्हणून समाज, संस्कृती व देव किंवा ईश्वर या सर्व गोष्टी माणसाची निर्मिती समजून तपासायला पाहिजेत असे त्यांचे मत होते. या त्यांच्या मताप्रमाणे त्यांच्या स्वतःच्या घरातले देव त्यांनी कृष्णेच्या पाण्यात सोडून दिले होते.

शास्त्रीजींना चार्वाकांच्या नास्तिक मतांविषयी सहानुभूती होती, आणि त्यांची स्वतःची मतेसुद्धा निरीश्वरवादी होती. हे दाखविण्यासाठी त्यांच्याच लिखाणातून उदाहरणादाखल काही अवतरणे खाली दिलेली आहेत. त्याबरोबर ते ते अवतरण ज्या मूळ ग्रंथातून घेतले आहे त्याचे नाव व त्याच्या प्रथम आवृत्तीच्या प्रकाशनाचे वर्ष ही मुद्दाम दिलेली आहेत.

(१) 'चार्वाक : इतिहास आणि तत्त्वज्ञान' या प्रा. सदाशिव आठवले लिखित ग्रंथाला शास्त्रीजींनी लिहिलेली प्रस्तावना. सन १९५८.

(अ) 'वैज्ञानिक दृष्टिकोनाचे बीज प्रथम चार्वाक मतानेच पेरले, पहिली धर्मसमीक्षा म्हणजे चार्वाकांचे तत्त्वज्ञान होय.'

(ब) 'देवता... स्वर्ग-नरक... मंत्रांची व यज्ञादी कर्मांची अलौकिक शक्ती, मरणोत्तर गती इत्यादी पारलौकिक तत्त्वे ही कामनांची अपत्ये आहेत.' (म्हणजे या गोष्टी सत्य नव्हेत.)

(२) 'चार्वाक समीक्षा' ह्या डॉ. गणेश थिटे संपादित लेखसंग्रहाला शास्त्रीजींनी लिहिलेली प्रस्तावना, सन १९७८.

'चार्वाकांचा देहात्मवाद (देह हाच आत्मा) आता विसाव्या शतकात काळाने उजळून दाखविला आहे.'

(३) शास्त्रीजींच्या 'लेखसंग्रह' या ग्रंथाची प्रस्तावना. सन १९८२.

(अ) 'ईश्वर हे गृहीतकृत्य म्हणून विज्ञानाला आवश्यक नाही.

(ब) 'धर्मसंकल्पनेतील अलौकिक दिव्य शक्ती म्हणजे देव होय. त्या देवाचे विवरण करताना, त्याच्या अस्तित्वाचे कसलेही प्रमाण दाखविता येत नाही. जे दाखविले जाते ते युक्तिवादांनी सहज खोडता येते.' शास्त्रीजींनी निरीश्वरवादी मतांचा प्रसार करण्याकरिता मुद्दामहून योजनापूर्वक काही केले नाही, हे म्हणणे बरोबर आहे. पण वैदिक संस्कृतीत चार्वाक मताचा स्वीकार हे धर्मशास्त्राविरुद्ध मोठे पाप मानले होते. शास्त्रीजींनी मात्र स्वतः वैदिक पंडित असूनही चार्वाक मत मनोमन स्वीकारले होते, याविषयी त्यांची वरील अवतरणे वाचल्यावर काही शंका राहू नये असे वाटते.

**('विचारवंतांचा ईश्वर' (डिसेंबर, १९९७) मधून उद्धृत)**

०००

# ३६.
# तर्कतीर्थांची विचारयात्रा
## प्राचार्य राम शेवाळकर

शास्त्रीजी गेले, तेव्हा मी कार्ल्याला डॉ. बालाजी तांबे यांच्याकडे उपचार घेत होतो. तिथून मुक्तता झाल्याबरोबर त्यांच्या कुटुंबीयांच्या सांत्वन भेटीसाठी मी वाईला जाऊन आलो. त्यांच्या सुनेकडून जे कळले त्यावरून शास्त्रीजी शेवटपर्यंत ठणठणीत होते. आदल्याच संध्याकाळी ते महाबळेश्वरातील आपल्या घरातून फिरायला बाहेर पडले होते. महाबळेश्वराच्या दर्शनालाही गेले होते. मंदिराच्या व्यवस्थेबद्दल व भविष्यकालीन सुधारणांबद्दल त्यांनी विचारपूसही केली होती. रात्री त्यांना शांत झोप लागली. सकाळी नोकर चहासाठी त्यांना उठवायला गेला. त्या वेळी शास्त्रीजी आपल्या अंथरुणावर शांतपणे डोळे मिटून पडलेले होते.

-शास्त्रीजींनी जगाचा निरोप घेतला होता. 'विना दैन्ये जीवनम्। अनायासेन मरणम्' या दोन्ही भाग्यकारक गोष्टी शास्त्रीजींनी आपल्या आयुष्यात साध्य करून घेतल्या होत्या. खरोखर असे मरणे तर धन्य आहेच; पण असे जीवनही धन्यच आहे. खानदेशातील पिंपळनेरला जन्मलेला पांढरपेशा कुटुंबातील एक मुलगा. वाईला नारायणशास्त्री मराठ्यांकडे शिकायला म्हणून येतो. केवळ प्राज्ञपाठशाळेचाच नव्हे, तर स्वामी केवलानंदांचाही अखंड ज्ञानक्षेत्राचा वारसा पुढे चालवतो, अधिक उजळ करतो. वैचारिक क्षेत्रामध्ये तळपत राहून सर्वमान्य होतो. शासनाकडून वा प्राज्ञांकडून सर्व प्रकारचे सन्मान मिळवतो. नियमित फिरणे व योगासने यांच्या साह्याने आपले आरोग्य शेवटपर्यंत निकोप राखतो. वयाचा कोणताही विकार बुद्धीवर, व्यासंगावर किंवा विचारशक्तीवर होऊ न देता बौद्धिक मार्गदर्शनाची आपली क्षमता अखेरपर्यंत अक्षीण ठेवतो यापेक्षा जीवनामध्ये अन्य धन्यता कोणती असू शकते?

अशा जीवनाला असेच मरण शोभून दिसते. कुठेही मन गुंतलेले नाही, वासना फारशा शिल्लक राहिलेल्या नाहीत. अशा कृतकृत्य व आत्मतृप्त जीवनाचा अंत असाच व्हायला हवा. शास्त्रीजी जुन्या सनातनी परंपरेत वाढले होते. हयात गेली तीही वाईमध्ये. ते गावही

ज्ञान व संस्कृतीबरोबरच जुने वळण कसोशीने पाळणारे. कृष्णामाईचे सान्निध्य असल्यामुळे सर्व घाट, घाटावरची जुनी देवळे व वाडे तिच्याप्रमाणेच दोन्ही काठ सांभाळून वागणारी व वाहणारी. त्या वातावरणाच्याच भरवशावर केवलानंदांना व शास्त्रीजींनाही मीमांसा कोश, धर्म कोशासारखे भव्य प्रकल्प तडीला नेण्याची हिंमत धरता आली. वेदांततीर्थ, काव्यतीर्थ, व्याकरणतीर्थ, न्यायतीर्थ अशा पदव्या मिळविलेली ग्रंथनिष्ठ, अल्पसंतुष्ट पंडित मंडळी मिळवता आली. धोतर, टोपी, मांजरपाटाचा सदरा घातलेली व मानेवर खडा ठेवून एकाग्रतेने काम करणारी माणसे पाहिली, आणि घरी आल्यावर शास्त्रीजींना मी विचारले, 'वाई हे एके काळचे धर्मपीठ होते. आता अशी किती वैदिक घराणी वाईमध्ये शिल्लक आहेत?'

''अद्याप साडेतीनशे उंबरठा आहे.'' शास्त्रीजींनी ठामपणे उत्तर दिले.

''ही मंडळी गेल्यानंतर पुढे काय?'' मी कुतूहलाने विचारले.

या प्रश्नावर शास्त्रीजींचे शांत उत्तर होते.

''प्रकल्प!''

वाईचे वातावरण जुन्या वळणाचे असले, तरी प्राज्ञपाठशाळेचे वळण एकांतिक परंपरानिष्ठ नव्हते. तिथे सगळ्या विषयांचा अभ्यास करण्याची मोकळीक होती. परंपरेपेक्षा वेगळे किंवा विरोधी विचार समजावून घेण्याची सिद्धता होती व ऐकून घेण्याची सहिष्णुता होती. स्वतः स्वामीजी स्वातंत्र्यवादी होते. त्यामुळे स्वराज्यासाठी चाललेल्या लढ्यामध्ये सहभागी होण्यास पाठशाळेला मज्जाव नव्हता. या मुक्त वातावरणाचे संस्कार शास्त्रीजींच्या युवामनाने आतुरतेने स्वीकारले.

प्राचीन विद्यांचा पारंपरिक पद्धतीने अभ्यास संपल्यावर १९३० पासून पाश्चात्त्य वैचारिक साहित्य वाचून काढण्याची जिज्ञासा शास्त्रीजींमध्ये उत्पन्न झाली. त्यांनी मिल्ल, स्पेन्सर, सिजविक वाचून काढले. १९३४ / ३५ मध्ये त्यांनी मार्क्सचा अभ्यास केला. हेगेल आणि स्टेसच्या विचारांचीही ओळख करून घेतली. त्यांना मार्क्स पटला. आपल्या उच्च भावनांना पोषक असा युक्तिवाद माणसाच्या मनाला स्वाभाविकपणेच पटतो असे त्यांच्या लक्षात आले. मार्क्सवादाने व्यक्तीच्या सामाजिक अंगाला नि सामुदायिक प्रयत्नांना महत्त्व दिले, पण व्यक्तीच्या स्फूर्तीला नि आत्मप्रेरणेला नकार दिला. व्यक्तीची सर्जनशीलताही दृष्टिआड केली. त्यामुळे स्वतः मार्क्सची स्वप्ने रशियाच्या राज्यव्यवस्थेत वा समाजव्यवस्थेतही उतरू शकली नाहीत. उलट ती विकृत झाली.

मार्क्सवादामुळेच शास्त्रीजींचा मानवेंद्रनाथ रॉय यांच्याशी संबंध आला. रॉय यांच्या व्यक्तित्वाने, विद्वत्तेने नि विचारांनी शास्त्रीजी प्रभावित झाले. रॉय यांचे चिंतन मार्क्सवादाच्या चाकोरीत अडकून पडलेले नव्हते. मार्क्सवादी असूनही मार्क्सपेक्षा वेगळ्या दिशेने, वेगळा आणि बव्हंशी मार्क्सच्याही पलीकडचा विचार करण्याची व मांडण्याची धिटाई त्यांच्या

व्यक्तिमत्त्वात होती. म्हणून पोथीनिष्ठा न जुमानणाऱ्या व वैचारिकदृष्ट्या अधिक निकोप राहिलेल्या रॉय यांच्याकडे शास्त्रीबुवा आपोआपच आकृष्ट झाले. नव्या वैचारिक विश्वावरचे मार्क्सचे ऋण त्यांना अमान्य नव्हते. विश्वव्यवस्थेबद्दलच्या सर्व पारंपरिक वैचारिक चाकोऱ्या ग्राह्य ठरविता येत नसल्याची प्रचिती त्यांना मार्क्सवादामुळेच घेता आली. आतापर्यंतच्या तत्त्वज्ञांनी जग कसे आहे? हे परोपरीने वर्णन करून सांगितले. जग कसे बदलायचे? हे मार्क्सनेच पहिल्या प्रथम निदर्शनास आणून दिले. 'हिंदुधर्माची समीक्षा' शास्त्रीजींनी मार्क्सवादाच्या प्रभावाखाली असतानाच केली. कारण मार्क्स म्हणत असे, ‘धर्मसमीक्षा हाच सर्व समीक्षांचा आरंभ असतो.’ त्यामुळे परिचयाच्या परंपरापूजक दृष्टिकोनापेक्षा वेगळा चिकित्सक दृष्टिकोन स्वीकारून हिंदू धर्माकडे पाहण्याचा पहिला प्रयत्न या ग्रंथाद्वारे शास्त्रीजींनी केला. नवथर मार्क्सवादी आरंभी कडवा असतो, आक्रमक व आग्रहीसुद्धा असतो. एका नव्या दिशेने तुम्हाला तो विचार करायला प्रवृत्त करतो; पण त्यानंतर आपले निष्कर्ष व आपली मते तुमच्यावर लादण्यासाठी तो सरावत जातो.

‘वैदिक संस्कृतीचा विकास' ही 'हिंदुधर्माची समीक्षा' या ग्रंथाचीच अधिक प्रगल्भ वृत्तीतून सुधारून वाढवलेली आवृत्ती आहे. त्यामध्ये शास्त्रीजी आकलनाच्या बाबतीत अधिक सुजाण, विचारांच्या बाबतीत अधिक उदार व प्रतिपादनाच्या बाबतीत तटस्थ झालेले आहेत.

शास्त्रीजी आरंभी वेदांती होते. राष्ट्रीय आंदोलनामध्ये उतरल्यामुळे त्यांची दृष्टी आपोआपच व्यापक बनली. धर्मवादाचे राष्ट्रवादामध्ये विकसन झाले. म्हणूनच त्यांनी गांधीजींच्या अस्पृश्योद्धाराच्या चळवळीला पाठिंबा दिला. इतर नेत्यांच्या शाब्दिक सहकार्यापेक्षा शास्त्रीजींच्या पाठिंब्याला गांधीजींच्या लेखी अर्थातच फार मोठे महत्त्व होते. कारण शास्त्रीजींनी या चळवळीला धर्मशास्त्राचे प्रामाण्य मिळवून दिले. सर्व सनातनी हिंदू अस्पृश्यतेचे कडवे समर्थक होते. चातुर्वर्ण्याची निर्मिती गुणकर्मविभागशः आपण स्वतः केली असल्याचे भगवंतांनी गीतेत सांगितले, म्हणून सामाजिक विषमतेला धर्माचा आधार मिळाल्यासारखे झाले. ओघानेच अस्पृश्यता पाळणे हा एक धर्मश्रद्धेचाच भाग मानला जाऊ लागला. धर्मोपदिष्ट अशा महत्त्वाच्या जीवनावश्यक गोष्टी पाळण्याबद्दल उदासीन असणारे धार्मिक लोक अस्पृश्यता-पालनाबद्दल बाकी अतिशय तत्त्वनिष्ठ होते. यातून दोनच मार्ग काढता येण्याजोगे होते. वर्णविषमतेला दैवी आधार देणाऱ्या धर्मग्रंथाचेच प्रामाण्य झुगारून देणे, किंवा अस्पृश्यतेला शास्त्राधार नाही हे अधिकारवाणीने सिद्ध करणे. डॉ. आंबेडकरांनी पहिला मार्ग स्वीकारला, गांधीजी दुसरा मार्ग स्वीकारण्यासाठी धडपड करीत होते. मुळात चातुर्वर्ण्याच्या संकल्पनेत व अस्पृश्यतेच्या उत्पत्तीबाबत विद्वानांमधेही बराच गोंधळ असल्याचे गांधीजी जाणून होते; पण आत्मविश्वासाने परंपरेच्या विरुद्ध जाण्याची हिंमत दाखवायला कुणी पुढे येत नव्हते. महामहोपाध्याय श्रीधरशास्त्री पाठक

आणि लक्ष्मणशास्त्री जोशी हे पारंपरिक पठडीतून तयार झालेले प्राज्ञपंडित सुदैवाने त्यांच्या हाती लागले. गांधीजींच्या सांगण्यावरून शास्त्रीजींनी धर्ममार्तंडांशी या मुद्द्यावर शास्त्रचर्चा केली.

वर्णविषमतेचे समर्थन करण्यासाठी नेहमी अत्यंत विश्वासाने पण सवंग रीतीने मनुस्मृतीचा आधार घेतला जातो. शास्त्रीजींनी मनुस्मृतीच्याच आधारे, अस्पृश्यता अग्राह्य ठरवून दाखवली. मनूने 'साधारण धर्म' मानला आहे. साधारण धर्मच श्रेष्ठ आहे. कारण तो सनातन आहे. तो सर्व वर्णाश्रमांना व जातींनाही लागू असल्याचे मनूने सांगितले आहे.

'दशकम् धर्मलक्षणम् - अद्वेष रागिभिः हृदयेना भ्यु ज्ञातो यो धर्मस्तं निबोधत।'

-अस्पृश्यतेचे पालन या वचनाच्या विरुद्ध जाते. कारण अस्पृश्यता पाळल्याने सामूहिक द्वेष उत्पन्न होतो.

आणि मनुस्मृतीच वेदप्रमाण मानायची ठरवली, तर अनेक अवघड बाबींना तोंड देण्याची पाळी येते. उदा. द्विजत्व संस्कार न झालेला ब्राह्मणही शूद्र ठरतो. एका पिढीनंतर असा ब्राह्मण व्रात्य होतो. ब्राह्मणाने संध्यावंदन केले नाही, तर तो तीन दिवसांत ('त्र्यहेण पतति।') पतित होतो. याच्या उलट ब्रह्मसूत्रावरील श्रीकंठ भाष्यात कठोपनिषदातील एक वचन उद्धृत केले आहे. त्यानुसार एखाद्या चांडाळाने जरी शिवनामाचा उच्चार केला, तर त्याच्याबरोबर संवाद, सहवास व भोजनदेखील करायला हरकत नाही.

'अपि यश्चांडालः शिव इति वाचं वदेत,
तेन सह संवदेत्, तेन सह संवसेत्, तेन सह भुंजीत।'

म्हणूनच शास्त्रीजींच्या मते जातिव्यवस्था पूर्णपणे काल्पनिक ठरते आणि वर्णव्यवस्था ही कर्ममूलक असल्याचे महाभारतात सांगितलेच आहे. शास्त्रीजींच्या या प्रागतिक पण शास्त्रपूत विचारसरणीमुळेच देवदास गांधींच्या प्रतिलोम विवाहात पौरोहित्य करण्यासाठी गांधीजींनी त्यांना पाचारण केले होते. शास्त्रीजींच्या मते गांधीजी व राजगोपालाचारी या विषमवर्णीय सोयर संबंधात अधर्म्य असे काहीच नव्हते. कारण दोन घरांत समान संस्कृती व समान आचारधर्म असतील, तर ते दोघेही शास्त्रीजींच्या मते समानवर्णीयच मानले पाहिजेत.

शास्त्रीजी वेदांती होते. त्या वेळी त्यांना मायावाद मान्य होता. माया म्हणजे हे वेगवेगळे भ्रम, शुक्तीवर रजताचा भ्रम होणे ही माया. शुक्ती आणि रजत हे वस्तुतः वेगवेगळे असतात. पण त्यातील साम्यामुळे ते आपल्याला एकच वाटतात. शुक्तीवर आपल्याला रजताचा भास होतो. याला शास्त्राने 'प्रातिभासिक सत्ता' म्हटले आहे. हा भ्रम तात्पुरता असतो. दुसराही एक भ्रम कायम टिकण्याजोगा असतो. उदा. बाह्य विश्व सत्य असल्याचे आपण समजून चालतो. पण ते वेदांतमते तसे नसते. याला 'व्यावहारिक सत्ता' म्हणतात. हा मायावाद काही काळपर्यंत आपल्याला बौद्धिक समाधान देत असला, तरी मनात खोल असमाधान राहून जाते. जैनांचा स्याद्वाद या पेचातून आपली सुटका करू शकतो.

मायावाद, राष्ट्रवाद, विश्ववाद अशी शंकराचार्य, गांधीजी व मार्क्स यांच्या वैचारिक नेतृत्वाखाली वाटचाल करीत शास्त्रीजी कॉम्रेड रॉय यांच्या मानवतावादापर्यंत येऊन पोचले. ही त्यांची वैचारिक विकासयात्रा म्हणावी लागेल. कोणत्याही एका विचाराला किंवा संप्रदायाला शेवटपर्यंत चिकटून राहणे निष्ठा म्हणून कौतुकास पात्र ठरू शकेल; पण त्यामुळे बौद्धिक आलस्याचाही आळ चुकवता येणार नाही. विचार कुंठित झाला की, माणूस बौद्धिकदृष्ट्या अपंग बनतो. अपरिहार्यपणे पराधीन होतो. या वैचारिक पारतंत्र्याच्या आपत्तीतून नागार्जुनाने आपली सुटका केली आहे : नागार्जुनाच्या मते कोणतेही तत्त्वज्ञान स्वीकारायला हरकत नाही; पण त्यानंतर त्यातून बाहेर पडणेही शिकले पाहिजे.

वेल्स आणि जुलियन हक्सले यांचा जीवनशास्त्रावरचा निबंध वाचून शास्त्रीजींनी जडवादावर पुस्तक लिहिले असले, तरी ते स्वतःला जडवादी मानीत नाहीत. शेवटी शेवटी कोणत्याही एका वादात कैद व्हायला त्यांचे मन तयार नव्हते. आरंभी ते स्वाभाविकपणेच ईश्वरवादी होते. मार्क्सवादाच्या स्वीकारानंतर ते निरीश्वरवादी झाले. पण शेवटी शेवटी निरीश्वरवादाचेही परकोट आपण समजतो तितके मजबूत व विश्वासार्ह नाहीत असे त्यांच्या लक्षात येत गेले. आत्मा अमान्य मानणाऱ्या चार्वाकांनाही शेवटी व्यवहार- सौकर्यासाठी आत्म्याचे अस्तित्व गृहीत धरणे भाग पडले. प्रत्येक प्रामाणिक विचारवंतांना आपल्या आग्रहाची टोके पुढेपुढे अप्रस्तुत व अनुपयोगी वाटू लागतात, एवढाच त्याचा अर्थ.

शार्दा नावाच्या एका कॅथॉलिक धर्मगुरूने 'नुस्फियर'ची उपपत्ती मांडली होती. शार्दा हा मूळचा जीवशास्त्रज्ञ होता. त्याने नुस्फियर म्हणजे मनोमंडळाचा सिद्धांत मांडला. हे मनोमंडळ मानवानेच निर्माण केले असून ते संपूर्ण मानवजातीला व्यापून टाकते. सर्व मानवजातीचे मिळून एक सर्वसमावेशक असे मनोविश्व असावे, असा शार्दाचा संकल्प यातून सूचित होतो.

शास्त्रीजींना शेवटी शेवटी या मनोमंडळाच्या सिद्धांताचा मोह पडला होता.

विविध कोशनिर्मितीचे जे भव्य प्रकल्प शास्त्रीजींनी हाताळले, त्यामुळे अनेक विषयांचा अभ्यास त्यांना घडला व अनेक विचारांवर सखोल चिंतन करता आले. सुदैवाने आपले हे चिंतन वाणी व लेखणीद्वारे श्रोत्या-वाचकांपर्यंत संक्रमित करण्याची शब्दसिद्धी त्यांच्यावर प्रसन्न होती. त्यामुळे शास्त्रीजींचे भाषण कानाला तृप्त, बुद्धीला उत्तेजित व मनाला उन्नत करणारे ठरायचे. त्यांचे लेखनही विचारांचे व अभिव्यक्तीचे व आशयघन उतरत असे. शास्त्रीजींचे व्यक्तित्व नित्य विकसनशील होते. प्राचीन अनुशासन काटेकोरपणे पाळणारे होते. त्यामुळे त्यांचे साहित्य ज्ञानगर्भ, विचारवरिष्ठ संचिताचे अभ्यासक असूनही नव्या साहित्याचे, विचाराचे, कल्पनेचे किंवा आकृतिबंधाचे स्वागत व रसग्रहण करण्यात ते सदैव तत्पर असत. जुन्यात नवा व नव्यातही नवाच राहू शकणारा त्यांच्यासारखा व्युत्पन्न पंडित दुर्मीळच मानावा लागेल.

मानवी बुद्धिमत्तेच्या व ज्ञानमत्तेच्या या अत्युच शिखराच्या सावलीत वावरण्याचे व विसावण्याचे भाग्य ज्यांना लाभले, अशांपैकी आपणही एक होतो, ही जाणीव अगणित नगण्यांनाही संतोषप्रद ठरत असेल, यात शंका नाही.

**('प्रतिध्वनीचे मानस' (१९८८) मधून उद्धृत,)**

०००

## ३७.

# साध्या वृत्तीचा प्रकांड पंडित

## मे. पुं. रेगे

शास्त्रीजींशी (तर्कतीर्थांशी) माझा परिचय १९५५ च्या मे महिन्यात झाला. समाजप्रबोधन संस्थेची स्थापना करण्याच्या संदर्भात विचारविनिमय करण्यासाठी शंकरराव देवांनी गारगोटीला एक बैठक बोलाविली होती. या बैठकीसाठी मला अर्थात निमंत्रण नव्हते. कारण आचार्य भागवत, रावसाहेब पटवर्धन, खुद्द शंकरराव देव असे अतिरथी महारथी तेथे जमले होते. त्यांच्यात मला स्थान नव्हते हे सांगायचेही कारण नाही. पण देवदत्त दाभोलकर, अ. भि. शहा, भा. शं. भणगे ही तरुण मंडळीही तेथे जमली होती. त्यांच्यात शिरकाव होणे शक्य होते. केवळ योगायोगाने मी त्या वेळी गारगोटीला येऊन ठेपलो होतो. देवदत्त दाभोळकर तेव्हा कीर्ती कॉलेजमध्ये होते आणि मीही तेथेच होतो. तेव्हा त्यांची माझी ओळख होती, तिचा आधार घेऊन धृष्टपणे मी मंडळीत प्रवेश मिळविला. शहा आणि दाभोलकर घनिष्ठ मित्र होते. रात्री जेवणाच्या वेळी शहांनी शास्त्रीजींशी माझी ओळख करून दिली. 'रेगे' हे नाव ऐकून शास्त्रीजींनी मला विचारले, "गेल्या 'छंद'मध्ये गो. वि. करंदीकरांच्या 'ॲरिस्टॉटलच्या काव्यशास्त्र' या पुस्तकाचे परीक्षण केलेले ते तुम्ही काय?' मी 'हो' म्हटले आणि ते सत्य होते. ते म्हणाले, "चांगले परीक्षण आहे. तुम्ही एक महत्त्वाचा मुद्दा मांडला आहे. तो माझ्याही नजरेतून निसटला होता." मी अर्थात खूश झालो. या प्रतिष्ठित मंडळींत आता मला प्रवेश मिळाला, असे मला वाटले.

दुसऱ्या दिवशी आचार्य भागवत, तर्कतीर्थ इत्यादी मंडळी ज्या खोलीत उतरली होती तेथे त्यांच्या गप्पा ऐकायला गेलो. तर्कतीर्थांवर त्या वेळी नुकतीच किडनीची शस्त्रक्रिया झाली होती आणि त्यांना बरेच पथ्य होते. तेलकट, तुपकट काही खायचे नाही असे बंधन होते हे मला समजले. प्राचीन भारतीय संस्कृती, महाभारत इत्यादी गप्पांचे विषय होते. बोलता बोलता गाडी नियोगाच्या चालीवर आली. हा धर्मशास्त्रातला, म्हणून तर्कतीर्थांच्या अखत्यारीतील विषय होता. त्यांनी नियोगाविषयी बरीच माहिती आम्हाला दिली. त्यांनी

या गोष्टीवर भर दिला, ती ही होती, की जी नियोगात स्त्री आणि परपुरुष यांचा संबंध येत असला, तरी तो केवळ कर्तव्यभावनेने करण्यात येत असे. त्यात कामुक आनंदाला स्थान नसे. त्यांच्या एका विधानात तुपाचा संदर्भ आला. हे बोलणे होते आहे तो नोकर न्याहरीसाठी शिऱ्याच्या बशा घेऊन आला. एक बशी तर्कतीर्थांच्या टेबलावर ठेवणार तो मी त्याला म्हणालो, "तर्कतीर्थांना देऊ नका, त्यांना तुपातले काही चालत नाही." हा माझा आगाऊपणाच होता. पण तर्कतीर्थांनी गडगडाटासारखे हसून त्याला दाद दिली. हा त्यांचा स्वभावविशेष पुढे माझ्या चांगला परिचयाचा झाला. अत्यंत गंभीर पातळीवरून महत्त्वाच्या विषयाचा विचार करीत असतानाही त्यांचा बौद्धिक खट्याळपणा जागृत असे.

गारगोटीला शहांची आणि माझी स्वतंत्रपणे मैत्री जुळली. गोवर्धन पारिखांचा माझा अगोदरच परिचय होता. त्या दोघांमुळे तर्कतीर्थांच्या अंतुर्वर्तुळात मला सहजपणे प्रवेश मिळाला. त्या वेळी शास्त्रीजी मुंबईला येत तेव्हा पारिखांकडे आणि नंतर शहा एस. आय. ई. एस. कॉलेजचे प्राचार्य म्हणून आल्यावर त्यांच्याकडे उतरत. त्या काळात त्यांचे लक्ष साहित्य संस्कृती मंडळावर केंद्रित झाले होते. अर्थात, वाईला त्यांच्या प्रमुख संपादकत्वाखाली धर्मकोशाच्या रचनेचे कामही स्थिर चालू होतेच. लोकशाही भक्कम करायची, तर ती सुजाण असली पाहिजे आणि आधुनिक, सामाजिक. राजकीय तत्त्वज्ञान, भौतिक विज्ञाने आणि वैज्ञानिक विचारपद्धती इत्यादींचा बहुजन समाजाला लोकभाषेतून मराठीतून परिचय करून देण्यानेच ती सुजाण होईल अशी त्यांची धारणा होती. मराठी भाषा आधुनिक ज्ञानाचे माध्यम बनली पाहिजे, हे सर्व ज्ञान मराठीत उतरले पाहिजे आणि लोकांना उपलब्ध असले पाहिजे, याची विलक्षण आच त्यांना होती. साहित्य संस्कृती मंडळाच्या वतीने अनेक उपक्रमांची योजना करून ते अमलात आणण्यात ते पुरते गढून गेले होते. अभिजात पाश्चात्त्य ग्रंथांचे भाषांतर करण्याची योजना, महाराष्ट्राचा संपूर्ण इतिहास अनेक खंडांत प्रकाशित करण्याची योजना, बृहत मराठी शब्दकोशाची योजना आणि 'मराठी विश्वकोशा'ची प्रसिद्ध योजना या कार्यक्रमाला महाराष्ट्रीय विद्वानांनी जर यथायोग्य प्रतिसाद दिला असता, तर मराठी वैचारिक साहित्यात बहुमोल आणि समृद्ध भर पडली असती, पण तसे झाले नाही.

आधुनिक ज्ञानाचे मराठीकरण करण्याच्या या कार्यक्रमाविषयी मलाही मनापासून उत्साह होता हे मला जाणवत असे. 'तुम्ही मराठीवादी आहात म्हणून तुम्हाला हे सांगतो,' असे ते मला अनेकदा म्हणत. हा कदाचित पारीख आणि शहा यांना दिलेला टोमणा असावा, तसे असेल तर तो त्या दोघांवरील अन्याय ठरेल. पण एक गोष्ट होती. पारीख आणि शहा या दोघांनाही भारतीय विचारवंतांत महत्त्वाचे स्थान होते आणि त्या परिवाराचे भाषिक माध्यम इंग्रजी होते. शास्त्रीजींनाही अर्थात अखिल भारतीय विचारवंतांत असाधारण स्थान होते. हे तिघे रॉयवादी, एम. एन. रॉय यांच्या प्रभावळीत होते हे सांगण्याचे कारण नाही. पण एक भेद होता. पारीख आणि शहा हे रॉय यांचे अनुयायी होते. शास्त्रीजींना रॉय यांचे

सहकारी विचारवंत हा दर्जा होता. जो भारतीय रेनेसान्स रॉय यांना घडवून आणायचा होता, त्याचे शास्त्रीजी हे त्यांच्या दृष्टीने प्रतीक होते. 'मॅन ऑफ इंडियन रेनेसान्स' म्हणून रॉय यांनी शास्त्रीजींना गौरविले होते. शास्त्रीजींच्या विचारांना, सार्वजनिक आचरणाला नेहमी अखिल भारतीय संदर्भ असे. भारतीय लोकशाही हा त्यांच्या निष्ठेचा विषय होता. हे सर्व असले तरी शास्त्रीजींचे कार्यक्षेत्र मराठी भाषा, महाराष्ट्राचे वैचारिक जीवन हेच होते. यात काही द्वैत नव्हते. महाराष्ट्राच्या बौद्धिक, सांस्कृतिक जीवनात त्यांची पाळेमुळे खोल रुजलेली होती. सबंध संतसाहित्य त्यांच्या जिभेवर होते आणि त्या साहित्याला जी भारतीय तत्त्वज्ञानाची, दर्शनांची, वैदिक साहित्य आणि धर्मशास्त्र यांची पार्श्वभूमी होती, तिच्यावर त्यांची असाधारण पकड होती. रामदासांनी 'माया' या संकल्पनेची एक वेगळी उपपत्ती लावली आहे असे त्यांनी मला अनेकदा सांगितले होते. या विषयावर तुम्ही विस्ताराने लिहिले पाहिजे, असे मी त्यांना अर्थात म्हटले, पण त्यांनी दाद दिली नाही. भारतीय गुरुशिष्य परंपरेत ते वाढले होते, तेव्हा त्यांची परंपराही मौखिक राहणे स्वाभाविक होते असे म्हणून समाधान मानून घेणे भाग आहे. एकोणिसाव्या शतकात आणि नंतर महाराष्ट्रात जे वैचारिक प्रबोधन झाले, त्याच्याविषयी त्यांना केवळ उत्साह नव्हे तर बांधिलकी होती. त्यांच्यातील भिन्न प्रवाह आणि उपप्रवाह यांचे व्यापक आणि सखोल ज्ञान त्यांना होते. त्यांच्या स्वतःच्या पिढीत या प्रबोधनाचे ते पाईक आणि नेते होते. या साऱ्यांमुळे अखिल भारतीय दर्जाचा आणि कीर्तीचा मराठी विचारवंत असेच त्यांच्या वैचारिक व्यक्तिमत्त्वाचे स्वरूप राहिले.

भारतीय दर्जाचा विद्वान आणि विचारवंत म्हणून त्याच्या व्यक्तिमत्त्वाला असलेल्या एका परिणामाची नीट ओळख मराठी समाजाला नाही. मराठी विश्वकोशाचे शिल्पकार, संयोजक आणि प्रमुख संपादक म्हणून महाराष्ट्र त्यांना ओळखतो, पण आपले गुरू केवलानंद सरस्वती यांच्या सोबत ते धर्मकोशाचे प्रमुख संयोजक आहेत आणि गुरूच्या आशीर्वादाने त्यांनी धर्मकोशाचे प्रमुख संपादक ही धुरा आमरण वाहिली आहे. महाराष्ट्राबाहेर सर्व भारतात आणि युरोप-अमेरिकेतील विद्यापीठांत जेथे जेथे संस्कृतचे अध्ययन होते, तेथे तेथे त्यांना धर्मकोशाचे रचनाकार म्हणून आदराने ओळखतात. एकदा त्यांच्याबरोबर वाराणशीला गेलो असता संस्कृत पुस्तकांच्या एका दुकानात विक्रेत्याला समोरचा व्यक्ती तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी आहे हे कळल्यावर जो आनंद झाला, विस्मयाचे, उल्हासाचे, आदराचे जे भाव त्याच्या चेहऱ्यावर दाटले ते मी पाहिले आहेत. धर्मकोशाचा थोडक्यात परिचय असा- वेद, धर्मसूत्रे स्मृती, त्यांच्यावरील टीका आणि त्यांतील विषयांवर स्वतंत्रपणे पण साधार लिहिलेले निबंध असा धर्मशास्त्राच्या प्रमाण साहित्याचा पसारा आहे. ग्रंथलेखनाची ही परंपरा १८ व्या शतकापर्यंत तरी अव्याहतपणे चालू होती. धर्मकोशात धर्माचे विशिष्ट अंग घेऊन, वैदिक साहित्यापासून निबंधापर्यंत त्याच्याविषयांची जी प्रमाण वचने आढळतात त्यांच्या कालानुक्रमे संग्रह केला आहे. उदा. धर्मशास्त्रात कायद्यासाठी 'व्यवहार' हा शब्द

आहे. या कायद्यांचे १८ विभाग आहेत. एखादा विशिष्ट विभाग घेतला- उदा. स्वामी व नोकर यांच्या संबंधांविषयीचा कायदा किंवा व्यापारात झालेला नफा-तोटा संबधितांनी कसा विभागून घ्यावा या विषयीचा कायदा. तर वेदांपासून अठराव्या शतकातील निबंधापर्यंत या कायद्याचा अर्थ कसा वेगवेगळया प्रकारे लावण्यात आला आहे, त्याचा ऐतिहासिक आलेख धर्मकोशाच्या संबंधित विभागात मिळतो. थोडक्यात, भारतीय समाजाच्या एका मोठ्या विभागाच्या बहुसंख्याक विभागाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहासाला आधारभूत ठरेल अशा ग्रांथिक सामग्रीचा संग्रह धर्मकोशात केला आहे. धार्मिक, सामाजिक, राजकीय इ. संकल्पना कशा बदलत गेल्या आणि त्याचा परिणाम म्हणून सामाजिक व्यवहारात कशी स्थित्यंतरे होत गेली, याचा ऐतिहासिक आराखडा धर्मकोशात आढळतो. एका लहान गावात, मूठभर पंडितांच्या साह्याने, एवढे प्रचंड काम शास्त्रीजींनी कसे पार पाडत आणले आहे, याचा पाश्चात्त्य संशोधकांना झालेला विस्मय त्यांनी मोकळेपणे व्यक्त केला आहे. आनंदाची गोष्ट अशी, की शास्त्रीजींच्या निधनानंतरही त्यांच्या निष्ठावान सहकाऱ्यांनी हे काम समाधानकारक रीतीने चालू ठेवले आहे.

एकंदरीत मला असे वाटते, की भारतीय संस्कृतीचा त्यांना लाभलेला वारसा आणि आधुनिकतेविषयीचा त्यांचा नैतिक जिव्हाळा या त्यांच्या बौद्धिक व्यक्तिमत्त्वाच्या दोन अंगांचा सुसंगत मेळ त्यांना घालता आला नाही. उथळ माणसे असा मेळ सहजी घालू शकतात किंवा दुहेरी जीवन जगून या दोन्ही अंगांना अवकाश देऊ शकतात. ते अर्थात शास्त्रीजींना जमू शकलेच नसते. एक गोष्ट नक्की, आधुनिक विचार आणि मूल्ये आत्मसात केल्यावरही त्यांची बैठक भारतीयच राहिली. भारतीय परंपरेत बहरलेली आध्यात्मिकता आणि आध्यात्मिक नैतिकता चांगल्या परिपूर्ण मानवी जीवनासाठी आवश्यक आहेत अशीच त्यांची धारणा होती.

एवढे प्रकांड पांडित्य त्यांनी लीलेने पेलले. त्यांची वृत्ती, राहणी साधी होती. माणसांच्या गर्दीत ते रमत. महाराष्ट्रीय गृहस्थी सभ्यपणा त्यांच्या रोमारोमांत भिनला होता. ही शिकवण त्यांना त्यांच्या वडिलांपासून मिळाली असणार. पण त्यांच्या पत्नी सतीकाकू यांची जन्मभराची संगतही त्यांना खूपच उपकारक ठरली. कारण बाहेरून शांत दिसणारा हा माणूस विलक्षण मनस्वी होता, स्वतःला झोकून देणारा होता. सतीकाकूंनी त्यांना त्यांच्या सार्वजनिक जीवनात सर्व आवश्यक ते स्वातंत्र्य दिले. पण सर्व तऱ्हेच्या स्थित्यंतरांत, यशापयशात अतिशय बिकट परिस्थितीत, वैयक्तिक जीवनातील त्यांचा तोल कधी ढळू दिला नाही.

**(दैनिक सकाळ, पुणे/ रविवार/ प्रतिभा / दि.२३ जानेवारी, २०००)**

○○○

# ३८.

# कर्मयोगी विद्वान

## रा. ग. जाधव

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (२७ जानेवारी १९०१-२७ मे १९९४) यांची जन्मशताब्दी येत्या २७ जानेवारीपासून सुरू होत आहे. आपल्या प्रदीर्घ जीवनकाळातील सुमारे साठ वर्षे शास्त्रीजींनी समाजप्रबोधनाच्या विविध कार्यक्षेत्रांत एखाद्या कर्मयोग्याप्रमाणे व्यतीत केली. महाराष्ट्रभरच्या सुजाण घरोघरी शास्त्रीजी पोचले होते. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठाही त्यांना लाभली होती. अखंडपणे वाहत राहिलेला प्रज्ञाप्रवाह असेच त्यांच्या बाबतीत सार्थपणे म्हणता येते. म्हणूनच नाना रूपांनी मराठी समाज त्यांना हयातभर ओळखत आला. व्यासंगी प्राच्यविद्यापंडित, पश्चिमी तत्त्वज्ञान व संस्कृती यांचे गुणग्राहक अभ्यासक, धर्मसुधारणा व आधुनिकता यांचे पुरस्कर्ते, स्वातंत्र्यसैनिक, स्वातंत्र्योत्तर भारतीय राजकारणाचे भाष्यकार, टिळक-रॉय-गांधी तसेच फुले-आंबेडकर या सर्वांचे समन्वयक, 'धर्मकोशा'चे व 'मराठी विश्वकोशा'चे संपादक आणि शेकडो जिज्ञासूंचे मार्गदर्शक अशा विविध नात्यांनी शास्त्रीजी मराठी समाजाशी दीर्घ काळपर्यंत रमून गेले. हे विसावे शतक आणि शास्त्रीजी यांच्यात जुळ्या भावंडासारखेच जन्मजात नाते होते. या शतकाचे जे भलेबुरे संचित पुढील शतकासाठी संभवते, त्यातील विशेषतः वैचारिक प्रबोधनात्मक संचितात शास्त्रीजींचा खास वाटा असेल, यात शंका नाही.

शास्त्रीजी यांचा जन्म धुळे जिल्ह्यातील पिंपळनेर येथे झाला. ते दोन वर्षांचे असतानाच त्यांची आई निवर्तली. वयाच्या चौदाव्या वर्षी ते वाईच्या प्राज्ञ पाठशाळेत अध्ययनार्थ दाखल झाले. हे अध्ययन एक तपभर चालले. १९२३ मध्ये कलकत्त्याच्या शासकीय संस्कृत महाविद्यालयातून 'तर्कतीर्थ' ही पदवी त्यांनी संपादन केली. स्वातंत्र्य आंदोलनात त्यांनी भाग घेतला. (१९३०-१९३२) आणि वर्षभराचा कारावासही भोगला. कारावासातच त्यांनी इंग्रजी भाषा व वाङ्मय यांचाही अभ्यास केला. पुढे १९३६ ते १९४८ ही बारा वर्षे ते

मानवेंद्रनाथ रॉय यांच्या रॅडिकल डेमोक्रॅटिक पक्षाचे क्रियाशील सदस्य होते, स्वातंत्र्योत्तर कालखंडात ते एक राजकीय मीमांसक म्हणून काँग्रेस पक्षाशी अधिक निगडित राहिले.

वाईच्या प्राज्ञ पाठशाळेतर्फे त्यांनी संस्कृत धर्मकोशाचा मोठा प्रकल्प सुरू करून क्रमाक्रमाने त्याचे वीस खंड प्रकाशित केले. महाराष्ट्र राज्य स्थापनेपासून (१९६०) ते साहित्य संस्कृती मंडळाचे व १९८० नंतर विश्वकोश मंडळाचे अध्यक्ष होते.

सोरटी सोमनाथाच्या मंदिराची पुनःस्थापना झाली. त्याचे पौरोहित्य शास्त्रीजींनी केले. वाराणसी, कुकुरमुंडे येथील सनातन धर्मपरिषदांतून त्यांनी धर्मसुधारणांचे प्रभावी समर्थन केले. भारतीय संविधान संहितेचे संस्कृत भाषांतरही त्यांनी केले. दिल्ली येथील अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांना लाभले (१९५४). त्या पुढच्या वर्षात 'वैदिक संस्कृतीचा विकास' या त्यांच्या ग्रंथाला साहित्य अकादमीचा पहिलावहिला असा पुरस्कार देण्यात आला. संस्कृत पंडित, पद्मभूषण, पद्मविभूषण इत्यादी सन्मानही त्यांना प्राप्त झाले.

लिहिण्यापेक्षा बोलणे हेच शास्त्रीजींना अधिक पसंत होते, म्हणून त्यांची ग्रंथसंपदा मोजकीच पण मौलिक आहे. 'हिंदुधर्माची समीक्षा' व 'सर्वधर्मसमीक्षा', 'जडवाद', 'ज्योति-निबंध', 'वैदिक संस्कृतीचा विकास' इत्यादी त्यांचे ग्रंथ महत्त्वाचे आहेत. विश्वकोशासाठी त्यांनी केलेल्या लेखनाचा एक निवडक लेखसंग्रहही प्रकाशित झालेला आहे. लो. टिळक व राजवाडे यांचे लेखसंग्रह त्यांनी मार्मिक व विस्तृत प्रस्तावनांसह संपादित केले आहेत. पण शास्त्रीजींचे विचारधन हे त्यांच्या शेकडो भाषणांतून साठलेले व म्हणूनच बहुधा, संपलेले अढळेल.

शास्त्रीजींना अर्धशतकाचे वैवाहिक जीवन लाभले (१९२७-१९७८). त्यांच्या पत्नी सत्यवती यांनी या कर्मयोगी विद्वानाचा संसार सांभाळला व सगळ्या प्रतिकूलतेतही शास्त्रीजींना मोलाची साथ केली. शास्त्रीजींनी त्यांना वाहिलेली 'भावपुष्पांजली' (१९७८) मन हलवून सोडणारी आहे. हा माणूस शास्त्रीपंडित की कवी, असा प्रश्न पडावा, अशी ही भावोत्कट श्रद्धांजली आहे.

टिळकयुगाचे संस्कार व प्राज्ञ पाठशाळेचा धर्मसुधारणावाद यांचे पाथेय घेऊन शास्त्रीजी गांधीयुगात प्रविष्ठ झाले, पण त्यांचा कल होता; मार्क्सवादाकडे व त्याच्या वाटेनेच पुढे रॉययादाकडे, गांधीजींचा करिश्माही न टाळता येणारा. गांधीयुगातील शास्त्रीजींसारख्या सगळ्याच कर्मयोगी प्रबोधनकारांना तत्कालीन उलटसुलट तत्त्वसरणीच्या लाटांचा भडिमार थोपविता येणे शक्य नव्हते. तरीही 'भारतीय प्रबोधनयुगाचे सर्वोत्कृष्ट अपत्य' असा शास्त्रीजींचा मानवेंद्रनाथांनी गौरव केला आहे, तो फार बोलकाही आहे. शास्त्रीजी गांधीभक्त होते; पण ते गांधीवादी आचार्य मात्र झाले नाहीत. टिळकवाद, रॉयवाद, मार्क्सवाद, गांधीवाद या सर्वांना आत्मसात करूनही शास्त्रीजी त्यांच्यापासून आतून अलिप्त राहिले असे वाटते. याचे कारण बहुधा शास्त्रीजींचा पिंड हा मूलतः अध्यात्मप्रवण जीवनोपासनेचा होता. पण तो

कर्मसंन्यासवादी नव्हता; कर्मयोगी होता. विविध तत्त्वप्रणालींमधील शास्त्रीजींची गोवणूक ही त्यांच्यातील प्रेरक कर्मलक्ष्यी घटकांमध्ये अधिक होती. तत्त्वज्ञानाच्या पातळीवर ते त्या सर्व तत्त्वप्रणालींचे सम्यक भाष्यकार व समीक्षक होते. एका दृष्टीने शास्त्रीजी मनोमन शून्यवादीच असावेत व म्हणून नागार्जुनासारख्या आचार्याबद्दल त्यांना विशेष नवळीक वाटत राहिली.

शास्त्रीजींच्या ज्ञानविज्ञानदृष्टीत स्वयंभू द्रष्टेपण वा दार्शनिकता नव्हती असे वाटते. पण दर्शने व दर्शनकार यांचे द्रष्टेपण नेमकेपणाने जाणण्याची व विशद करण्याची क्षमता त्यांच्यात होती. म्हणूनच रशियन क्रांतिप्रयोगाच्या विघटनानंतरही मार्क्सवादाला पर्याय नाही. असा त्यांचा दावा होता.

विसाव्या शतकाचे योगदान काय, या प्रश्नाला १९९१ मध्ये शास्त्रीजींनी पुढील उत्तर दिले:

''समाजवादी क्रांती आणि अणुशक्तीवर आधारलेले वैज्ञानिक तंत्रज्ञान यांच्या योगाने जगातील सगळ्या मागासलेल्या आणि विकसित झालेल्या जनतेला समृद्धीचे आणि सर्वांगीण विकासाचे सामाजिक जीवन साध्य करत येईल, असा जबरदस्त आशावाद निर्माण झाला. मार्क्सवादाने या आशावादात अर्थशास्त्रीय दृष्टिकोनाचे महत्त्व स्थापित केले. त्यामुळे तो आशावाद बळकट झाला.''

शास्त्रीजीप्रणित असे हे या शतकाचे योगदान असेलच, तर त्याची स्वप्नपूर्ती प्रत्यक्षात करण्यासाठी पुढील शतकाला प्रवृत्त करणे, हाच त्यांच्या जन्मशताब्दीचा तुम्हा-आम्हाला दिलेला संदेश होय.

**(रविवार, सकाळ/प्रतिमा / २३ जानेवारी, २०००)**

ooo

# ३९.

# तर्कतीर्थः प्राज्ञ धर्मसमीक्षक

## डॉ. मो. गो. धडफळे

'तर्कतीर्थ' ही पदवी खरे तर महाराष्ट्रात अनेक पंडितांना लाभली आहे. या पदवीला मोठेपण आलं ते लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या समृद्ध आणि बव्हंगी कर्तृत्वानं. शास्त्रीजींनी 'तर्क' (खरं तर 'न्याय' हा शब्दच वापरायला हवा) या विषयावर फार मोठं लेखन केलं असंही नाही. पण त्यांच्या सर्व विचारसरणीला जी 'प्रमाणभूतता' प्राप्त झाली ती मात्र या न्यायाच्या अधिष्ठानामुळे. एखाद्या बाबीचं प्रमाणांनी परीक्षण करणं म्हणजे 'न्याय' (प्रमाणैरर्थपरीक्षण न्यायः) विश्वकोशाचं कामही मोठं व्यापक व महत्त्वाचं. पण 'विश्वकोशकार' म्हणून शास्त्रीजींची ओळख करून घेणं अपुरंच ठरेल. माझ्या मते शास्त्रीजींचा परिचय 'धर्मकोश'कार म्हणून करून घ्यायला हवा. त्यांचे गुरू केवलानंद सरस्वती (नारायणशास्त्री मराठे) यांच्या हाताखाली शास्त्रीजींनी धर्मकोशाचं कार्य सुरू केलं आणि स्वामीजी ब्रह्मभूत झाल्यानंतरही ते चालू ठेवून पूर्ण केलं. या धर्मकोशाच्या खंडांतून वर्णाश्रम धर्म, व्यवहार, राजनीती, श्रौतकर्म, प्रायश्चित्ते, तत्त्वज्ञान या सर्वांची सप्रमाण चर्चा झाली आहे. धर्म म्हणजे केवळ 'रिलीजन' नाही. भारतात धर्म हा अधिक करून समाजधर्म होता; सामाजिक नियमांची मीमांसा म्हणजे धर्म; एका परीनं कुठल्याही देशाचा इतिहास हा मुख्यत्वे सामाजिक संस्कृतीचा इतिहास असतो. काहीसं वाग्विरोधात्मक (पॅरॅडॉक्सिकल) वाटेल, पण प्राचीन भारतीय साहित्यात 'धर्म' हा शब्दच मुख्यत्वानं 'लौकिक' (सेक्युलर) अर्थाचा द्योतक आहे. शास्त्रीजींसारखा ऐतिहासिक विरोध-विकास वादाचा स्वीकार करून धार्मिक बदलांचा जो अभ्यास करेल त्याला सामाजिक परिवर्तनाची उत्तम कल्पना येईल. शास्त्रीजी हे धर्मसुधारणावादी आणि म्हणूनच समाजसुधारणावादी होते.

### प्राज्ञ-पाठशाळेचे संस्कार

लेखाच्या शीर्षकात 'प्राज्ञ' हा शब्द आवर्जून वापरला आहे. गौडपाद हे जसे शंकराचार्यांचे आजेगुरू तसे प्रज्ञानंद सरस्वती हे तर्कतीर्थांचे आजेगुरू, केवलानंदांनी आपल्या गुरूंचं नाव

पाठशाळेला दिले. प्राज्ञमठाची प्राज्ञपाठशाळा झाली. याच शाळेत तर्कतीर्थांची वैचारिक घडण झाली. जो प्रकर्षानं सर्व जाणतो तो प्रज्ञ. व 'प्रज्ञ' याचेच अर्थामध्ये कोणताही बदल न होता झालेलं संवृद्ध रूप म्हणजे 'प्राज्ञ'. भवभूतीनं उत्तररामचरित्रात लवासाठी हा शब्द वापरला आहे. (प्राज्ञ: खलु कुमारः). लवाच्या बरोबरीच्या इतर मुलांनाही वाल्मीकींनीच शिकवलं होतं. पण शंभर शंभर धनुर्धारी, दण्डधारी, कवचधारी पाहिल्यानंतर एकट्या लवालाच 'हा घोडा अश्वमेधाचा आहे' हे कळलं. शिकलेल्या माहितीचा नेमका अर्थ उमगणं आणि शिक्षणाचा जीवनात विनियोग करता येणं हे प्राज्ञपणाचं लक्षण आहे. 'सहा महिन्यांचा दिवस अन् सहा महिन्यांची रात्र' अशी वेदातली वर्णनं वाचून एका बाळ गंगाधरांनाच त्याचा अर्थ उमगला. वैदिक आर्यांची वस्ती उत्तर ध्रुवावर एकेकाळी असावी 'असूर्या नाम ते लोका' यातील 'असूर्य' हे असीरियाचं नाव असावं हे वि. का. राजवाडे अन् सर रामकृष्ण भांडारकर यांना 'प्राज्ञ'पणामुळं सुचलं. प्राचीन धार्मिक तरतुदींचा ऐतिहासिक प्रकाशात अर्थ लावणं, धर्माची म्हणजेच सामाजिक परिस्थितीची परिवर्तनशीलता समजून घेणं हे प्रज्ञानंदांपासून तर्कतीर्थांपर्यंत केवलानंदांच्या माध्यमातून आलं. 'पाहुणा आल्यावर बैल किंवा भाकड गाय मारण्यात येते' असा उल्लेख ऐतरेय ब्राह्मणात आल्यानंतर सायणाचार्य प्राज्ञपणानं म्हणतात, 'युगान्तरधर्मोद्रष्टव्यः' ब्राह्मणी हिंदू धर्मात एका जुन्या युगात ही चाल होती; आज धर्म बदलला आहे. एका अवस्थेत जैन भिक्षू हेदेखील मांस स्वीकारत होते असे संदर्भ मिळाले तरी नंतर स्थिरावलेल्या अहिंसक जैन धर्मात हे मांसाशन पूर्ण बंद झालं हेच खरं. थंडपणे ऐतिहासिक स्थित्यंतरांचा आढावा घ्यायला हवा. 'यस्तकर्णे अनुसंधते स धर्मं वेद नेतरः' असं स्मृती सांगते. तर्कतीर्थ हे केवलानंदांपासून तर्काच्या निकषांवर, बुद्धिवादी स्वरूपानं धार्मिक परिवर्तनाचा अभ्यास करण्यास शिकले व आवश्यक धार्मिक सुधारणांचाही आग्रह धरू लागले. 'धर्मनिर्णय' मंडळानं मोठं प्रागतिक व पुरोगामी धोरण स्वीकारलं होतं. त्याला अनुसरून शास्त्रीजी सतत सांगत राहिले. ''वेद हे कोणत्याही रीतीने 'अपौरुषेय' नाहीत; ते मानवनिर्मित असल्यानं वेदांतही प्रमाद संभवतात. वैदिक शब्द व शैली यांचा ऐतिहासिक-शास्त्रीय रीतीनं अभ्यास करायला हवा. प्राचीन स्थित्यंतरांचा इतिहास या दृष्टीनेच वेदांकडे पाहायला हवं. स्मृती व पुराणांतही वेळोवेळी परिवर्तन झालं आहे. धर्मभ्रष्ट झालेल्यांसाठी 'व्रात्य-स्तोम' यासारखे विधी वेदांतच सांगितले आहेत. हिंदुधर्मातल्या सर्व जाती व पोटजाती धार्मिक व सामाजिक दृष्टीने एकच आहेत. विधवांच्या केशवपनाला विकल्प आहे. विधवांचा पुनर्विवाह वेदविहीत आहे. स्पृश्यास्पृश्यता ही धर्मानं सांगितली नाही.''

### मार्क्सवाद व रॉय मतप्रणाली

रॉय मतप्रणाली 'प्राज्ञ नवमानवतावादी' असल्यानंच शास्त्रीजी रॉयिस्ट झाले. मार्क्सवादही पोथी म्हणून त्यांनी कधीच स्वीकारला नाही. दा. ध. कोसंबी म्हणाले होते, "मार्क्सवाद ही एक विचाराची पद्धत आहे, विचाराला असलेला पर्याय नव्हे." (Marxism is a method

of thinking and not a substitute for it) हे मला श्री. कऱ्हाडकर यांच्याकडून कळले होते. शास्त्रीजींना सांगितल्यावर ते कमालीचे आनंदून गेले होते.

महाराष्ट्राच्या वैशिष्ट्यांचं अनेक परीनं वर्णन होऊ शकतं. "दगडांच्या देशा आणिक फुलांच्याही देशा" अशा विरोधी धर्मांचं सार्थ वर्णन गोविंदाग्रजांनी केलं आहे. वाङ्मयतपस्व्यांचं एक सिद्ध क्षेत्र दैनिके, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके यांचा देश; दर्जेदार पण आर्थिक अडचणीत येऊन बंद पडलेल्या संशोधनपत्रिकांचा देश, साहित्यिक मेळाव्यांचा, चर्चासत्रांचा, परिसंवादांचा आणि सभा- व्याख्यानांचा देश हेही महाराष्ट्राचं ठळक वैशिष्ट्य आहे.

टिळक-आगरकर, लोकहितवादी-भांडारकर इत्यादी कर्त्या सुधारकांच्यानंतर महाराष्ट्राचं सामाजिक, साहित्यिक, सांस्कृतिक आणि राजकीय व्यासपीठ प्रमुख वक्ता किंवा अध्यक्ष या नात्यानं भूषविणाऱ्या दोन समर्थ व्यक्ती म्हणजे (कै.) दत्तो वामन पोतदार आणि (कै.) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी. दोघेही उत्तम व्यासंगी, वेदविद्येचे व प्राचीन भारतीय संस्कृतीचे चिकित्सक अभ्यासक, प्रमाणभूत इतिहासाचे पुरस्कर्ते आणि सुबुद्ध पुरोगामी विचारवंत. दोघांच्या घडणीत मात्र मोठा फरक.

पोतदार हे आर्थिकदृष्ट्या सुस्थितीत असलेल्या कुटुंबात जन्मलेले. यामुळेच इंग्रजी पद्धतीचं शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण त्यांना प्राप्त झालं. प्रथम एका चांगल्या शाळेत शिक्षकाची व नंतर महाविद्यालयीन प्राध्यापकाची त्यांना नोकरी मिळाली. अविवाहित राहिल्यानं कुटुंबाची जबाबदारी नव्हती. त्यामुळं सर्व जीवन समाजकारण, संस्थात्मक कार्य आणि वाचन संशोधनात ते व्यतीत करू शकले. तर्कतीर्थांना मात्र इंग्रजी पद्धतीचं शालेय शिक्षणही प्राप्त झालं नाही. तिथं महाविद्यालयीन प्रवेशाचा प्रश्नच उरला नाही. खानदेशातलं पिंपळनेर सोडून वाईत नारायणशास्त्री मराठे यांच्या मठात वयाच्या चौदाव्या वर्षी दाखल झाले अन् वाईतच रमले. पारंपरिक वैदिक व भारतीय दर्शनाचं शिक्षण हे तर तिथं त्यांना मिळालंच, पण त्याचबरोबर, पारंपरिक पद्धतीत समाविष्ट न होणारे असे इतिहास, भूगोल, व्यावहारिक शिक्षण व आधुनिक गद्य हे विषयही शिकायला मिळाले. काही काळ तेथे येऊन राहिलेल्या विनोबाजींकडून इंग्रजीचे प्राथमिक पाठ मिळाले. पुढे स्वतःच्या वाचनानं त्यांनी इंग्रजी पूर्ण आत्मसात केलं आणि फ्रॉइडचं मानसशास्त्र, कार्ल मार्क्सची विचारसरणी, पाश्चात्त्य धर्म व तत्त्वज्ञान, आधुनिक समाजशास्त्र इत्यादी विषय आत्मसात केले.

अनुचित रूढी अन् अयोग्य सांस्कृतिक परंपरांची लक्ष्मणरेषा ओलांडणारे प्रागतिक व पुरोगामी लक्ष्मणशास्त्री हे भारतीय धर्मशास्त्र आणि संस्कृतीवर सडेतोड भाष्य करणारे 'रामशास्त्री' बाण्याचे समीक्षक व धर्ममीमांसक होते. त्यांच्या विचारात अन् वर्तनात एक कमालीचा आंतरिक समतोल होता. एकीकडे अस्पृश्यतानिवारण चळवळीत सहभाग, त्याचबरोबर सोमनाथांच्या मंदिराचं ब्राह्मण म्हणून जीर्णोद्धार करण्याचं कार्य, पशुहिंसेला

विरोध पण यज्ञात एखाद्या वेळेस पशुहिंसा होत असली तर तेवढ्यावरून यज्ञ करणाऱ्यांविषयी रान उठवणाऱ्यांना शांत करणारे, शंकराचार्य व गीतेची महती सांगत असताना प्रसंगी या दोहोंविषयीही परखड टीका करायला यत्किंचितही न बुजणारे नीडर समीक्षक. बोलण्यात गुळमुळीतपणा त्यांना अजिबात पसंत नव्हता. 'मला असं म्हणायचे नाही की' अशा वाक्यांशांची उजळणी करत दबत-दबकत बोलणं त्यांना पसंत नसायचं. इतिहासाचार्यांची आक्रमकता त्यांच्यात नसेल पण विधानं स्वच्छ व सरळ असायची. शंकराचार्यांचा मायावाद हा 'कुंठित विचारसरणीचे आणि अगतिकतेच्या भोवऱ्यात सापडलेल्या बौद्धिक चिकित्सेचं फलित आहे' हे ते स्पष्टपणे सांगत. सभा समारंभांच्या निमित्तानं अभ्यासाविना काहीतरी बोलायचं म्हणून 'अमक्यातमक्याचे विचार व कार्य आजमितीलाही मार्गदर्शक ठरतात' असली भोंगळ विधानं करणाऱ्यांना शास्त्रीजींचे गीतेवरील काही अभिप्राय एक बौद्धिक फटकाच वाटेल. गीतेतील शाश्वत उपदेश प्रत्येक युगाला मार्गदर्शक ठरेल ही ॲनी बेझंटबाईची धारणा. तर शास्त्रीजी म्हणतात, ''दोन अडीच हजार वर्षांपूर्वीची गीता आजच्या प्रश्नापुढे काय करणार?... गीतेची मांडणी पौराणिक पद्धतीची आहे, त्यात स्वाभाविक तर्कशुद्धता व प्रमाणबद्धता नाही... अशा या गीतेचा बुद्धिवादी विज्ञाननिष्ठ युगात काय उपयोग होणार?'' (हिंदुधर्माची समीक्षा, १९४२, पृ. २२०). पण हेच शास्त्रीजी हिंदू परंपरेत 'धर्ममीमांसा' म्हणून प्रकार संभवतो व सातत्यानं धर्मपरीक्षण, वेदपरीक्षण करून अनिष्टपरिहार व इष्ट स्वीकार या पद्धतीचा अंगीकार हिंदुपरंपरेतच झाला आहे हे सांगतात तेव्हा हिंदुत्ववादीही खुलतात. 'धर्म ही अफूची गोळी आहे' या मार्क्सवादी विचारानं नव्हे तर 'धर्माची समीक्षाच सर्व समीक्षांचा प्रारंभ आहे' हा सुयोग्य मार्क्सविचार पटल्यामुळे शास्त्रीजी त्याला अनुसरून "वैदिक संस्कृतीचा विकास" हाही विरोध विकासवादाच्या दृष्टीतूनच आपल्यापुढे मांडतात. त्यांचं प्रतिपादन समजून घ्यायला हवं. "बौद्ध व जैन हे धर्म म्हणजे वैदिक परंपरेच्या विरुद्ध बंड करून निघालेली हिंदूंचीच पाखंडे आहेत. विकासाकरता विरोधही करावाच लागतो. बीज भग्न झाल्याखेरीज अंकुर फुटून बाहेर येत नाही आणि म्हणूनच कित्येकदा पूर्वीचा विचार हाच उत्तरकालीन विरोधी विचारांचा जनक असतो. अतिशय मोलाचे विचार आणि नवीन संशोधन 'अपूर्व' प्रतिपादनाचा कोठेही आव न आणता शास्त्रीजी सरळ, सुबोध, प्रवाही वाक्यातून मांडत जातात. श्रमण व मुनी हेच भारतातले मुख्य पाखंड पसरवणारे होते आणि महाभारताच्या प्रतिपादनानुसार भोगवादी वाटणारा तत्त्वज्ञ चार्वाक हाही एक गंभीर भिक्षुमुनी होता (हिंदुधर्माची समीक्षा, पृ. १९५) हे त्यांनी अचूकपणे दाखवून दिलं आहे. शास्त्रीजींच्या प्रतिपादनातल्या अनहंकारी वृत्तीचं अप्रूप वाटतं. 'इंडॉलॉजी'साठी भारतीय विद्या हा शब्दप्रयोग चुकीचाच आहे; भारतविद्या हा शब्दच योग्य आहे हे प्रतिपाद्य डॉ. ग. ना. दांडेकर यांनी त्यांच्या अध्यक्षीय भाषणात (बृहन्महाराष्ट्र प्राच्यविद्या परिषद, पहिले अधिवेशन, पुणे २०-४-९६) आपल्या प्रभावी

शैलीत मांडलं. आनंदाची बाब हीच की मॅक्सम्युलरच्या बाबतीत 'भारतविद्या पंडित' हा शब्द अगदी सहजपणानं शास्त्रीजी वापरून गेले (वैदिक संस्कृतीचा विकास पृ. २६४).

## साहित्यिक - काव्यरसिक

काव्य, कथा, नाट्य, कादंबरी अशा प्रकारचं लेखन शास्त्रीजांनी कधीच केलं नाही. तसं पाहता वैचारिक लेखन करणाऱ्या धर्मानंद कोसंबींनीही एक 'नाटक' लिहिलं होतं. श्री. व्यं. केतकर व स्वातंत्र्यवीर सावरकर हे एकाच वेळी साहित्यिक, समाजधुरीण व राष्ट्रधर्मी होते. दुर्गाबाई आणि इरावतीबाई जितक्या उत्तम अभ्यासक तितक्याच सरस लेखिका. शास्त्रीजींचीही लेखनशैली फार सुंदर होती. मात्र त्यांनी ललितलेखन कधी केलं नाही; शास्त्रीय लेखन सरळ ललित शैलीत केलं. चांगली समीक्षा त्यांच्या पदरी आहे. 'आनंदमीमांसा' (१९३८) व 'मराठी साहित्याची समीक्षा आणि रससिद्धांत' हे लेखन मराठीच्याच नव्हे तर संस्कृतच्या अभ्यासकांनाही प्रमाणभूत ठरावं. १९५४ मध्ये दिल्ली येथे भरलेल्या मराठी साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष या नात्यानं त्यांनी सामाजिक स्थित्यंतरांचा मराठी वाङ्मयानुसार घेतलेला वेध लक्षणीय आहे. या त्यांच्या लेखनाची तुलना मला करावीशी वाटते ती 'भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास' या इतिहासाचार्यांच्या ग्रंथाला मराठी नाट्यकृतींना मार्क्सवादी निकष लावून लिहिलेल्या अभ्यासपूर्ण व साहित्यगुणमंडित अशा कॉ. डांगे यांच्या सुंदर प्रस्तावनेशी. ज्ञानदेवांच्या काव्यापासून दलित साहित्यातील आक्रोशापर्यंत शास्त्रीजी समरसतेनं लिहीत- बोलत गेले. आज असते तर अशोक नायगावकर, लक्ष्मीनारायण बोल्ली, बेळगावचे लोकापूर यांच्याविषयी आमच्या चर्चा- मैफली झाल्या असत्या. "गुंतागुंतीची वाक्यरचना प्रगल्भतेची द्योतक असते," असं जितकं मुखानं तितकंच हातानं सांगणाऱ्या शास्त्रीजींची स्वतःची वाक्यरचना मात्र अगदी 'गुंतागुंती'च्या 'जटिल' विषयाबाबतही पूर्णपणे बिगर गुंत्याची, एखाद्या कामिनीच्या स्वच्छ विंचरलेल्या केशपाशासारखी आकर्षक अन् चमकदार अशीच आहे. वैदिक काव्य, मर्ढेकर, दलितांच्या व्यथांचा आविष्कार हे सहृदयतेनं समजून घेणारे आणि कुमारगंधर्वांच्या गाण्याची गोडी कानाची जिव्हा करून चाखणारे शास्त्रीजी साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष झाले हे त्या संमेलनाचं भाग्य! खंत मला वाटते आणि शास्त्रीजींनाही वाटत राहिली असावी असं वाटतं ती फक्त दोन व्यक्तींना हे पद मिळायचं राहून गेल्याची. कॉ. डांगे आणि 'युगान्त'कर्त्या इरावतीबाई!

### जनजागरण व समाजप्रबोधन

शास्त्रीजी आयुष्यभर जनजागरण व समाजप्रबोधन तळमळीनं करत राहिले. ते प्रभावी ठरले. याचं कारण साक्षात उपदेश पद्धतीचा त्यांनी कधी अंगीकार केला नाही. "असं वागावं, तसं वागू नये," या प्रकारच्या शैलीनं माणसं कित्येकदा गांजतात! एका खासगी पत्रात (अमेरिकेतल्या थोरल्या मुलाला, मधूला लिहिलेलं पत्र, ८-१२-८१) त्यांनी गंभीरपणे केलेल्या 'हित-मितोपदेशाचं' मला याचमुळे फार अप्रूप वाटतं. शास्त्रीजी लिहितात, "जीवन

हे एक अंतिम मूल्य आहे. आई-बापांपासून निरोगी व अव्यंग काया लाभावी, आरोग्याचे नियम पाळावे; पृष्ठवंशाच्या दोन टोकांना (जीभ व उपस्थेंद्रीय) सांभाळावे म्हणजेच मिताहार-विहार असावे. या दोन टोकांना विवेकाने सांभाळण्यात यश ज्याला येते तो मानसिक व शारीरिक जीवन विवेकयुक्त होऊन जगतो."

मधुला लिहिलेल्या एका पत्रातच शास्त्रीजींमधला पक्का संस्कृताभ्यासक मला दिसला. त्रैगुण्य हा शब्द रूपावरून भाववाचक वाटतो पण वस्तुतः 'तीन गुण म्हणजे त्रैगुण्य' अशी त्याची संस्कृतमध्ये उपपत्ती आहे. सहा गुण म्हणजेच 'षाड्गुण्य'. संस्कृत 'ऋत' या शब्दाची मी एका व्याख्यानात बरीच भाषाशास्त्रीय चर्चा केली. शास्त्रीजी संध्याकाळी म्हणाले, "मोहनराव, ऋतू हा शब्द विवेचनातून निसटला. माझा हा शब्द जसा 'निसटला' तसा एक शब्द शास्त्रीजींच्या तोंडातून विवेचनाच्या भरात 'सटकला'. शहा-स्मृती व्याख्यान देताना फर्गसनच्या वाडिया ग्रंथालयात शास्त्रीजी एकदम बोलून गेले. "...असं झालं की समाजव्यवस्था बोंबलते." क्षणार्धात थांबून ते म्हणाले, "माफ करा हं! अ-सभ्य शब्द तोंडातून बाहेर पडला." समोर पु. लं. होते. त्यांना तो भावोत्कट शब्द भावला. मी शास्त्रीजींना म्हणालो, "आबा, काहीच चूक झाली नाही. अहो, आयुर्विम्याला जसा पर्याय नाही असं 'निगम' सांगतो तसे मराठीत 'बोंबलण्याला' समर्थ पर्याय नाही. समाजव्यवस्था 'कोलमडल्या'चा परिणाम होत नाही. 'बोंबलण्या'चा निश्चित होतो."

शास्त्रीजी म्हणाले, "मोहनराव निगम वचनाचा दाखला एकदम मान्य!"

## सु-धारणावादी आबा

खरं तर माझा अन् शास्त्रीजींचा परिचय त्यांच्या आयुष्यातल्या शेवटच्या २५-३० वर्षांपुरताच होता. जो होता तो मात्र, फार दाट होता. एका चर्चासत्रात बुद्धाचे सर्व प्रमुख शिष्य ब्राह्मण होते; ब्राह्मणांना बौद्ध विचारांचे फार मोठे आकर्षण होते हा मुद्दा मी प्रमाण देऊन मांडत होतो. त्यांना माझं विवेचन आवडलं. या विषयावर मी त्यांना एक टिपण लिहून द्यावं, असं त्यांनी सुचवलं. माझा पटलेला मुद्दा त्यांनी स्वतः अनेक व्याख्यानांमध्ये आवडीने सांगितला. मला कल्पना नव्हती की माझे विवेचन शास्त्रीजींच्या लेखनातील एका मुद्द्याचा प्रतिवाद करणारं होतं. 'हिंदुधर्माची समीक्षा' या ग्रंथांत त्यांनी विधान केलं होतं ''हिंदुस्थानाबाबत व्यापक प्रचारशील बौद्ध धर्म ब्राह्मणेतर वर्गांनीच स्थापन केला.'' विरोधी मत सप्रमाण मांडलं गेलं तर कोणता अभिनिवेश न ठेवता त्याचा अभिनंदनपूर्वक स्वीकार करण्याची त्यांची खुली मनोवृत्ती मला फार आदरणीय वाटली. विश्वकोशाच्या सल्लागार समितीवर मी सहा-एक वर्षे काम केलं. एखादेवेळी सर्किट हाऊसवर जागा मिळाली नाही की 'आबा' माझ्या फर्गसन परिसरातल्या बंगल्यावरच मुक्कामाला असायचे. रामच्या संगतीनं मी त्यांना 'आबा' म्हणू लागलो. त्यांना कैक अधिक वर्षे साथ देणारे मे. पुं. रेगे त्यांना शास्त्रीजीच म्हणत. माझी पत्नी वैदिक संशोधन मंडळाची कार्यवाह होती व आबा त्यांच्या कार्यकारिणीचे अध्यक्ष होते हाही एक संबंधाचा धागा होता.

नित्य फिरण्याचा व्यायाम, योगासनं, सतत काम करत राहणं आणि आनंदी स्वभाव यांमुळे शेवटपर्यंत त्यांची प्रकृती ठणठणीत होती. वेणीमाधवशास्त्रींइतके (त्यांचे थोरले बंधू) नाही तरी पण आयुर्वेदाचे ज्ञान आबांनाही चांगले होते. धर्मशास्त्रानं कांदा व लसूण वर्ज्य मानला आहे. पण आयुर्वेद म्हणजे धर्मशास्त्र नव्हे. तेथे 'लसूण' अमृतसमान तर 'दुग्धपलांडू' (पांढरा कांदा) मोठा गुणकारी सांगितला आहे. आयुर्वेद हे नीतिशास्त्रही नाही. त्यामुळे 'मद्य' हे तत्त्वतः आयुर्वेदाला 'वर्ज्य' नाही. मात्र सर्वत्रच 'पथ्य- हित- मित' या त्रयीचं भान ठेवायला पाहिजे हे आयुर्वेदाचं तत्त्व त्यांना माहीत होतं व त्यांच्या आचरणातही होतं. रामायणात सीतेनं रामाला 'उत्तम मद्य' (सुरा) म्हटलं आहे तर रावणाला 'हलकं मद्य' (सौबीर) म्हटलं आहे हे ते खुलून व खुलवून सांगत. तर्कतीर्थ असल्यानं 'प्रमाण' या शब्दाचा त्यांना फार लोभ. संस्कृतातील हा शब्द फारसीमध्ये ‘फर्मान’ (शासन, नियम, कानून) या रूपात तर उर्दूतील त्याचं दुसरं रूप 'पैमाना' (मद्याचे प्रमाण, ‘डोसेज’, चषक) या स्वरूपात आहे हे सांगितल्यावर ते अगदी दिलखुलासपणानं हसले.

जिभेवरच्या संयमामुळेच म्हातारपणीही त्यांच्या जिभेची चव कमी झाली नव्हती. मूळ खानदेशी असल्यानं त्यांचं गुठळयांचं धावरं पिठलं त्यांना भारी आवडायचं. माझ्या पत्नीकडे साटोऱ्यांची ‘फर्माईश’ही ते करायचे. एकदा तिनं केलेल्या कोथिंबिरीच्या वड्या त्यांना इतक्या आवडल्या की जाताना त्यांचं कौतुक म्हणून "पुढच्या वेळी मेथीच्या वड्या!" असं प्रेमानं सांगून गेले. माझ्याकडे येतानाही ते अधूनमधून महाबळेश्वरचे लाल बटाटे (वाईकरांचा शब्द 'माल्टा') घेऊन यायचे तर सोलापूरहून राम पुजारींकडून आले तर मंगळवेढ्याची दगडी ज्वारी घेऊन यायचे. वाईलाही माझं स्वागत एकतर चिकणे किंवा सावित्रीच्या हातचे पदार्थ देऊन व्हायचं. एकदा खास माझ्यासाठी ते वाईच्या बाजारातून 'चटक'दार आंबे घेऊन आले. पुण्याला महत्त्वाची सभा असल्यानं मला जेवायला थांबता आलं नाही. पुढच्या वेळेला येताना ते त्या आंब्यांच्या रसाची सारी घेऊन आले आणि माझ्या पत्नीला म्हणाले, "खरं तर तुमच्या विद्वान यजमानांच्या डोक्यावरच रस थापायला हवा होता. पण त्याच्याऐवजी ताटलीत थापून हे करून आणलं आहे."

शास्त्रीजींचा खरा ध्यास समाज धर्मसुधारणेचा. संस्कृतातली बहुतेक पारंपरिक निर्वचनं ऐतिहासिक भाषाशास्त्राच्या निकषावर ग्राह्य ठरत नाहीत. 'धर्मो धारयते प्रजाः' हा एक ठळक व सुखद अपवाद. धरण पाणी धरून ठेवतं तसा धर्म समाज एकत्र धरून ठेवतो; त्याला विसकळीत होऊ देत नाही. शास्त्रीजी धर्मसुधारणावादी होते. मी एका बैठकीत त्यांना म्हणालो, "शास्त्रीजी संस्कृत उपसर्गांचे उपयोग गमतीशीर पद्धतीनं झाले आहेत. ऐतरेय आरण्यक 'संन्यास' या रूढ पदासाठी उपसर्गरहित 'न्यास' एवढाच शब्द वापरते आणि म्हणून पुढे गीतेला "काम्यानां कर्मणां न्यासं संन्यासं कवयो विदुः" असे अर्थश्लिष्ट वचन वापरता आले. A thousand visions and re-visions असं टी. एस. एलिअट म्हणतात, त्या वेळी

'रि-व्हिजन' म्हणजे 'पुन्हा एकदा नजर टाकणं' हा अर्थ चमकून उठतो. धर्माच्या बाबतीतही हेच खरे आहे ना? 'धारणा' म्हणजे जर म्हणजे 'धर्म' तर 'सु-धारणा' म्हणजे 'सु-धर्म' व्हायला हवा व आपण सातत्यानं धर्माकडून सुधर्माकडे जायला हवं." शास्त्रीजींना एखादी गोष्ट एकदम पटली की शाब्दिक प्रतिक्रिया फारशी नसायची. माझ्या बोलण्याचा एकच परिणाम झाला. डोळे लकाकले, हात वर गेला. बाही खाली घसरली. माझ्या मांडीवर थाप पडली अन् शास्त्रीजी एका आवेगात उठलेच. आमची बैठक तिथेच संपली. मी गाडीपर्यंत निरोप द्यायला गेलो. छोटूनं (वाहनचालक) दार उघडलं. निघताना शास्त्रीजी अंगठा आणि तर्जनी गोलाकार करून 'एक्का' मुद्रा करून गेले.

शास्त्रीजी पूर्ण 'नरायु' जगले. 'जिजीविषेत् शतं समाः' यातील 'शतम्' वर भाष्य करताना उवर म्हणतो, हे पद 'उपलक्षणार्थ' आहे. शंभरीच्या आसपास म्हणजे शंभरच! धर्ममीमांसेतल्या या 'उपलक्षण' पद्धतीचं महत्त्व शास्त्रीजी नेहमी सांगत. 'ब्राह्मणांनाच पालनम्' एवढं भर्तृहरी म्हणाला, की टीकाकार समचि भिक्षू सरसावून सांगतो, "ब्राह्मण हे उपलक्षणार्थी. सर्वच वर्णांचं राजानं पालन करायचं असतं." खरंच, स्मृतींची सर्व परिभाषा जर आजमितीस लोकांना अवगत होईल तर अनेक प्रकारचे वृथा गैरसमज दूर होतील.

पूर्वी मुमूर्षु गंगेच्या काठी मुक्कामालाच जायचे. शास्त्रीजी मोठे नशीबवान. त्यांचं घर दक्षिण काशीत गंगापुरीत गंगेच्या काठी! स्वयंपाकघरातली खिडकी उघडली की गंगामातेचं दर्शन! पण त्यांचं शेवटचं श्वसन त्याहीपेक्षा अधिक उंचीवरच्या 'मधु वाता ऋतायते, मधु दक्षरन्ति सिन्धवः' अशा महाबळेश्वरी व्हायचं होतं. पंच पंच उषःकाली, दैहिक निद्रा आटोपून ताजेतवाने झाल्यावर पूर्ण निरामय स्थितीत, पंचप्राण पंचत्वात विलीन करून शास्त्रीजींनी आपली सुफल जीवनयात्रा समाप्त केली.

आता आपल्यापुढे सतत राहणार आहे तो लक्ष्मणप्रणित स्मृतीतला सतत परिवर्तनशील आणि म्हणून 'सनातन' राहणारा धर्मसमीक्षेचा एक प्राज्ञ आदर्श!

**(दैनिक सकाळ, पुणे रविवार, दि. २१ मे, २०००)**

ooo

# ४०.

# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी: शतकाचा वाटसरू

## मे. पुं. रेगे

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री यांचा जन्म २७ जानेवारी १९०१ चा. त्यांचे निधन २७ मे १९९४ रोजी झाले. हे वर्ष त्यांच्या जन्मशताब्दीचे वर्ष आहे, म्हणजे जवळजवळ संपूर्ण विसाव्या शतकाचे ते साक्षी होते. पण या शतकाचे ते केवळ विचक्षण साक्षी नव्हते. या कालावधीत जी मूलभूत आणि जगड्व्याळ स्थित्यंतरे झाली, ज्या उलथापालथी झाल्या, त्या त्यांनी केवळ पाहिल्या नाहीत, त्यांच्यात त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. एक भारतीय म्हणून त्यांनी हा सहभाग घेतला आणि एक माणूस, मानवजातीचा एक घटक म्हणूनही घेतला. जगात जी स्थित्यंतरे घडत होती, त्यांना समांतर अशी स्थित्यंतरे त्यांच्या वैयक्तिक आयुष्यात घडत होती; बाह्य वेषभूषेतही घडत होती. असामान्य बुद्धिमत्तेची देणगी त्यांना लाभली होती. उत्कटता हा अशा बुद्धिमत्तेतील एक अनिवार्य घटक असतो. तर्कतीर्थ उत्कटतेने जगले. पण त्यांच्या मनाचा तोल क्वचितच ढळला. व्यावहारिक सावधपणावर हा तोल आधारलेला नव्हता. आपल्या जवळपास घडणाऱ्या विशिष्ट घटना कितीही महत्त्वाच्या वाटल्या, त्यांचे कितीही मोठे निनाद उमटले, तरी त्यांच्याकडे समग्र मानवी जीवनाच्या ओघाच्या संदर्भात, ऐतिहासिक दृष्टीने पाहाण्याची बौद्धिक आणि भावनिक शिस्त त्यांच्या अंगवळणी पडली होती. त्यामुळे ते क्वचितच विचलित होत.

तत्त्ववेत्ता हा सर्व कालांचा आणि प्रदेशांचा साक्षी असतो, असे म्हणतात. या अर्थाने ते खरेखुरे तत्त्ववेत्ते होते. निदान चार हजार वर्षे सातत्याने नांदलेल्या भारतीय संस्कृतीचे वारस आपण आहोत, ही जाणीव त्यांच्या मनात ताजी असे. या संस्कृतीचा आविष्कार ज्या श्रेष्ठ ग्रंथांतून झाला, त्यातील उदात्त, एकाच वेळी सूक्ष्म, तरल आणि रोखठोक असणारे, मानवी जीवनाच्या गाभ्याला भिडणारे विचार त्यांनी आत्मसात केले होते. कोणत्याही सामाजिक, व्यावहारिक समस्येविषयी चिंतन करताना या विचारांचा संदर्भ त्यांच्या मनात नेहमी जागृत असे. त्यांची स्वाभाविक वृत्ती अंतर्मुख होती. गर्दी त्यांना आवडे. किंबहुना त्यांचे बाह्य जीवन

पाहिले, तर लोकांत असण्याची, भोवताली गर्दी जमलेली असण्याची त्यांची आंतरिक गरज होती, असे कुणालाही वाटले असते. पण गर्दीत असतानाही चिंतनाचा अंतःप्रवाह त्यांच्या मनात चालू असे. हा आपल्याला जवळचा असलेला माणूस आहे, ज्याला कधीही जाऊन भेटावे, ज्याच्याशी कधीही मोकळेपणे बोलावे असा हा माणूस आहे, अशी आश्वासक जाणीव त्यांच्याशी परिचित असलेल्या सर्व माणसांना असे. पण त्याच वेळी आपल्या निकट असलेला हा माणूस आपल्यापासून खूप अंतरावर आहे, ही जाणीवही त्यांना असे. पण तर्कतीर्थांच्या ठिकाणची अभिजात माणुसकी अशी होती की, हे अंतर जाणवत असूनही पुसले जाई.

### नवमानवतावादाचा प्रसार

तर्कतीर्थांच्या (किंवा त्यांच्या रॉयवादी सहकाऱ्यांच्या पद्धतीने त्यांचा उल्लेख करायचा तर शास्त्रीजींच्या) जन्माच्या वेळी ब्रिटिश साम्राज्यावर सूर्य मावळत नव्हता. (पण तो मावळतीकडे कलला आहे. मध्यान्ह टळून गेली आहे. हे जाणकारांच्या ध्यानी आले होते.) आपल्या दीर्घ जीवनाच्या मध्यकालात या साम्राज्याचे विघटन होऊन भारत स्वतंत्र झालेला त्यांनी पाहिला. स्वातंत्र्यासाठी झालेल्या भारतीय आंदोलनात त्यांनी स्वतःला झोकून दिले होते. आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धात दुसरे एक साम्राज्य स्थापन झालेले त्यांनी पाहिले. साम्यवादी, सोव्हिएत साम्राज्य याही साम्राज्याचे विघटन झालेले त्यांनी पाहिले. हे विघटन कधी ना कधी होणार- अस्तित्वात आलेल्या प्रत्येक वस्तूंचे विघटन होते. या सामान्य नियमामुळे नव्हे; तर त्यांच्या स्वतःच्या आंतरिक दुबळेपणामुळे हे भाकीत त्यांनी इतर काहीजणांप्रमाणे केले होते. सोव्हिएत साम्राज्याविषयीचा हा शब्दप्रयोग अनेकांना खटकेल- त्यांची वृत्ती द्विधा होती. कारण साम्यवादी समाजाच्या स्थापनेचे हत्यार म्हणून ते साम्राज्य अस्तित्वात आले होते आणि एकेकाळी शास्त्रीजी मार्क्सवादी, साम्यवादी होते. साम्यवादी समाजाचे नैतिक ध्येय शास्त्रीजींनी कधी सोडून दिले नाही. पण मार्क्सवादी विचारसरणी, तत्त्वज्ञान आणि साम्यवादी समाज स्थापन करण्यासाठी लेनिनने अंगीकारिलेली रणनीती (स्ट्रॅटेजी) यांचा त्यांनी अव्हेर केला. एम. एन. रॉय यांच्या नेतृत्वाखाली आणि त्यांचा एक समाजशील सहचिंतक म्हणून त्यांनी नवमानवतावाद या एका वेगळ्याच सामाजिक तत्त्वज्ञानाची रचना करून त्याचा प्रसार करण्याचे कार्य आपल्या आयुष्याच्या अखेरच्या पर्वात केले. त्यांनी आयुष्यभर केलेल्या चिंतनाचे अंतिम फलित म्हणजे नवमानवतावाद. या प्रदीर्घ वैचारिक प्रवासाचा प्रारंभबिंदू तर भारतीय होता; पण अखेरपर्यंत त्याचे अधिष्ठानही भारतीय होते, असा माझा समज आहे.

त्यांचा जन्म प. खानदेशातील पिंपळनेर या गावी झाला. त्यांचे वडील एक भिक्षुक होते; पण आपल्या मुलांच्या जन्मजात बुद्धिमत्तेवर त्यांचा विश्वास होता. लक्ष्मणला उत्तम पारंपरिक शिक्षण मिळावे म्हणून त्याला त्यांनी वाई येथील प्राज्ञपाठशाळेत दाखल केले. (शास्त्रीजींचे

थोरले बंधू कै. वेणीमाधवशास्त्री हेही अव्वल दर्जाचे संकृततज्ज्ञ आणि आयुर्वेदाचार्य होते.) वयाच्या चवदाव्या वर्षी शास्त्रीजी वाईला आले, ते कायमचे वाईतच राहिले. माधुकरी मागून त्यांचे शिक्षण झाले. 'माधुकरी मागणे जिवावर येई', असे एकदा त्यांनी मला म्हातारपणी सांगितले. प्राज्ञपाठशाळेत वेद, धर्मशास्त्र, न्याय, अद्वैत इ. दर्शने यांचा त्यांनी अधिकारी गुरूंच्या खाली कसून अभ्यास केला. केवलानंदांचे ते लाडके शिष्य बनले आणि काही वर्षांत त्यांचे पट्टशिष्य म्हणून ओळखले जाऊ लागले. बरोबरीच्या विद्यार्थ्यांच्या तुलनेने त्यांची या सर्व शास्त्रांत खूपच अधिक प्रगती झालेली असे. 'तुला एकट्याला गुरुजी गुप्तपणे शिकवितात का?' असा प्रश्न त्यांचे सहाध्यायी गमतीने आणि कदाचित काहीशा असूयेने त्यांना विचारीत. या सर्व विचारधनावर शास्त्रीजींची पक्की पकड बसली.

## धर्मसुधारणा अटळ

प्राज्ञपाठशाळा ही पारंपरिक पाठशाळा खरी; तरीही ती वेगळ्या प्रकारची पाठशाळा होती. संस्कृत विद्या सतेज, टवटवीत, प्रवाही राखणे हे तिचे एक उद्दिष्ट होते. हिंदू समाजाच्या पुनरुत्थानाला वाहून घेतील, असे पंडित शिकवून तयार करणे, हे तिचे दुसरे पूरक उद्दिष्ट होते. पारतंत्र्याची अवस्था ज्यांना झोंबत होती, अशा मंडळींत स्वामीजी होते. या मरगळलेल्या समाजाला परत चैतन्यशील करायचे, तर धर्माच्या नावाखाली ज्या अनेक बेड्या त्याने आपल्या हातापायांत अडकवून घेतल्या होत्या, त्यांच्यापासून त्याची सुटका केली पाहिजे, अशी स्वामीजींची पक्की धारणा होती. धर्मसुधारणा तर करणे अटळ होते; पण ही सुधारणा परंपरेचे विसर्जन न करता, परंपरेच्या आधारानेच, परंपरेला एक नवे रूप देऊन करायची होती. म्हणजे हिंदू धर्मपरंपरेला जी नैतिक तत्त्वे आणि जीवनाची दृष्टी आधारभूत होती, त्यांच्या पायावरच, आजच्या सामाजिक परिस्थितीच्या संदर्भात, वेगळ्या प्रथा, वेगळ्या स्वरूपाचे सामाजिक संबंध, मूल्ये प्रस्थापित करणे आवश्यक झाले होते.

पारंपरिक श्रद्धा अशी होती: वेद, तसेच धर्मसूत्रे आणि स्मृती हे ऋषिप्रणीत ग्रंथ हे प्रमाण आहेत. त्यांच्यात आचरणाचे जे नियम सांगितले आहेत, ते बंधनकारक आहेत. हे सर्व नियम म्हणजे धर्म. या प्रमाण ग्रंथांतील सर्व वचने परस्परांशी सुसंगत आहेत. त्यांच्यात ज्या विसंगती असल्यासारख्या दिसतात, तो केवळ आभास आहे. मीमांसाशास्त्राच्या पद्धतीने या सर्व विसंगतींचे निराकरण करता येते. या सर्व सुसंगत वचनांतून संपूर्ण धर्म प्रकट होतो, तो सनातन आहे, अपरिवर्तनीय आहे, सदैव बंधनकारक आहे आणि इहपरलोकी कल्याणप्रद आहे. स्वामीजी हे मीमांसेचे पहिल्या दर्जाचे पंडित होते; पण या पारंपरिक दृष्टीला विरोधी अशी वेगळी दृष्टी त्यांनी मांडली. ही परिवर्तनवादी, ऐतिहासिक दृष्टी होती. तिचा आशय असा की, या 'सनातन' धार्मिक परंपरेत, वेळोवेळी, धर्माच्या आशयात परिवर्तन करण्यात आले आहे. विद्वानांनी, समाजाला हितकारक काय आहे याचे सम्यक ज्ञान असलेल्या अधिकारी व्यक्तींनी हे परिवर्तन केले आहे. तेव्हा आजच्या बदललेल्या सामाजिक

परिस्थितीत, समाजहिताला अनुकूल असे धार्मिक परिवर्तन करण्याचा अधिकार आजच्या विद्वानांना आहे आणि ती त्यांची जबाबदारी आहे.

## परिवर्तनवादी पक्षाचे प्रवक्ते

समन्वयवादी सनातनी विरुद्ध ऐतिहासिकतावादी (परिवर्तनवादी) शास्त्रीपंडित यांच्यामधील हा वाद या शतकाच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या दशकांत अनेक विद्वत्परिषदांतून रंगला. अनेकदा शास्त्रीजी हे परिवर्तनवादी पक्षाचे प्रमुख प्रवक्ते असत. त्यांचा धर्मशास्त्राचा सखोल आणि व्यापक व्यासंग, सेवेसाठी सदैव सिद्ध असलेली उपस्थिती, सूक्ष्म भेद स्पष्ट करण्याची, बिनतोड तार्किक युक्तिवाद करण्याची त्यांची शक्ती यामुळे शास्त्रीपंडितांच्या अखिल भारतीय समुदायात त्यांची कीर्ती पसरली. तरुण तेजस्वी, विद्वान (जटाधारी) ब्राह्मण अशी त्यांची प्रतिमा या वर्तुळात रूढ झाली. पंडित मालवीयजी यांच्यासारखे मातब्बर नेते त्यांचा आदर करू लागले.

येथे एक आठवण सांगण्यासारखी आहे. अस्पृश्यतेला शास्त्राधार आहे की नाही, याची चर्चा करून निर्णय देण्यासाठी गांधीजींनी एकदा काही पंडितांना बोलाविले होते. तिच्यात शास्त्रीजी अस्पृश्यतेविरुद्ध बाजू मांडणार होते. सनातनी पक्षाची बाजू मांडण्यासाठी जे शास्त्री आले होते त्यांत राजेश्वरशास्त्री द्रवीड आणि त्यांचे वडील लक्ष्मणशास्त्री द्रवीड हेही होते. राजेश्वरशास्त्री हे तर्कतीर्थांच्या पिढीतील सर्वश्रेष्ठ नैय्यायिक म्हणून विख्यात होते. चर्चेच्या आदल्या दिवशी शिष्टाचार म्हणून तर्कतीर्थ त्यांना भेटायला गेले. बोलण्याच्या ओघात तर्कतीर्थांनी नव्या न्यायातील एक कूट प्रश्न राजेश्वरशास्त्रांना विचारला. राजेश्वरशास्त्र्यांनी त्यांना म्हटले, 'या प्रश्नावर विचार करावा लागेल. उद्या उत्तर देतो.' दुसऱ्या दिवशी राजेश्वरशास्त्र्यांना भेटल्यावर तर्कतीर्थांनी आपल्या प्रश्नाचे आपल्याला सुचलेले उत्तर त्यांना सांगितले. 'उत्तर बरोबर आहे,' असे राजेश्वरशास्त्री म्हणाले. लक्ष्मणशास्त्री द्रवीड जवळ होते. ते आवेगाने तर्कतीर्थांना म्हणाले, 'अहो, तुम्ही आमचे आहात. तुम्ही कशाला पाखंडी लोकांच्या नादी लागता?' तर्कतीर्थ नक्कीच शास्त्रीपंडितांतील होते. पण ते अधिक काहीतरी होते. (अस्पृश्यतेविषयीचा हा वाद कसा करावा, या पद्धतीविषयी एकमत न झाल्याने हा वाद झालाच नाही.)

धर्मशास्त्राचा अधिकारी; पण परिवर्तनवादी असलेला पंडित अशी तर्कतीर्थांची जी कीर्ती पसरली होती, तिचा एक परिणाम असा की, अस्पृश्यतेच्या प्रश्नाविषयी धर्मशास्त्रींची भूमिका काय आहे, याबाबतीत सल्ला देण्यासाठी गांधीजींनी त्यांना बोलावले. शास्त्रीजींचा निर्णय असा की, "काही जमातींना अस्पृश्य म्हणून वागवावे, असा धर्मशास्त्राचा आदेश आहे खरा; पण ज्या जमातींविषयी हा आदेश आहे, त्या आज अवशिष्ट नाहीत आणि ज्या लक्षणांच्या आधारावर या जमाती अस्पृश्य ठरविल्या गेल्या, त्या लक्षणांच्या जमाती आज आढळत नाहीत. तेव्हा अस्पृश्यता पाळावी असा आदेश असला, तरी आज तो रिक्त, पोकळ, निराशय

आहे. काळाच्या ओघात अस्पृश्यता रद्द झाली आहे." या वकिली निर्णयावर गांधीजींची प्रतिक्रिया अशी होती की, धर्मशास्त्र काहीही सांगो; माझ्या सदसद्विवेकबुद्धीला अस्पृश्यता पटत नाही व म्हणून मी ती अमान्य करतो. गांधीजींचे हे म्हणणे शास्त्रीजींनी मान्य केले.

## धर्मकोशाची रचना

समन्वयवाद विरुद्ध ऐतिहासिकतावाद यांच्यामधील विवादाचे एक फलित म्हणजे 'धर्मकोशा'ची रचना. ही स्वामीजींच्या प्रेरणेने शास्त्रीजींनी केलेली रचना आहे. हिंदू (वैदिक) धर्माच्या सर्व अंगांवर, वेद, धर्मसूत्रे, स्मृती इ. प्रमाण ग्रंथांत जी वचने आढळतात त्यांचा आणि अधिकारी भाष्यकारांनी आणि निबंधकारांनी या वचनांवर जी टीकाटिप्पणी केली आहे, तिचा कालानुक्रमे केलेला संग्रह असे धर्मकोशाचे स्वरूप आहे. धर्मकोशाची ११ कांडे आणि ४० खंड संकल्पित आहेत. त्यातील पाच कांडे व २१ खंड प्रकाशित झाले आहेत. धर्मकोश हा वैदिक धर्माचा खराखुरा विश्वकोश आहे. जगात जेथे जेथे संस्कृत भाषेचे व भारतीय संस्कृतीचे अध्ययन-संशोधन होत आहे, तेथे तेथे धर्मकोशाचे खंड आढळतील. धर्मकोशाने शास्त्रीजींना जागतिक कीर्तीचा लाभ झाला. अर्थात ही कीर्ती प्राच्यविद्येच्या संशोधकांपुरती मर्यादित आहे. शास्त्रीजींच्या निधनानंतरही धर्मकोशाची रचना, त्यांनी प्रशिक्षित केलेल्या पंडितांनी चालू ठेवली आहे, ही समाधानाची गोष्ट आहे.

पण हिंदू धर्मात परिवर्तन करू पहात असतानाच स्वतः शास्त्रीजींमध्ये १९३०च्या सुमाराला मूलगामी परिवर्तन घडून आले. १९१७ मध्ये स्वामीजींकडे शांकरभाष्याचे अध्ययन करण्यासाठी विनोबाजी वाई येथे वर्षभर राहिले. त्यांच्यापाशी शास्त्रीजी इंग्रजी शिकले. विनोबाजींकडून इंग्रजीचे प्राथमिक धडे घेतल्यानंतर शास्त्रीजींनी त्या भाषेचा अभ्यास स्वतःच्या हिमतीवर चालू ठेवला. सामाजिक शास्त्रे, इतिहास, तत्त्वज्ञान या विषयांवरील इंग्रजीतील कोणत्याही अभिजात ग्रंथाचे वाचन करता येईल, त्याच्या आशयाचे पूर्ण आकलन होईल, या दर्जाचे प्रभुत्व त्यांनी इंग्रजीवर मिळविले. या वाचनातून ज्ञानाचे एक नवीन विश्व त्यांच्या पुढून उलगडत गेले. त्यांची दृष्टी आता वैदिक संस्कृतीपुरती सीमित राहिली नाही. ग्रीक, रोमन, ख्रिस्ती, इस्लामी, आधुनिक युरोपीय ही मानवी संस्कृतीची अनेकविध रूपे, त्यात विकसित झालेली मूल्ये, जीवनदृष्टी, तत्त्वज्ञान या सर्वांशी त्यांचा निकटचा परिचय झाला. ऐतिहासिक, तौलनिक, चिकित्सक दृष्टी त्यांना प्राप्त झाली आणि या दृष्टीने ते वैदिक, भारतीय संस्कृतीकडे पाहू लागले. तिच्यातील दुबळेपणाचे घटक त्यांनी हेरले, तिच्या अंगभूत सामर्थ्याचे, चैतन्यशीलतेचे नवीन दर्शनही त्यांना झाले. तत्त्ववेत्ता सर्व युगांचा, सर्व प्रदेशांचा प्रेक्षक असतो, असे म्हणतात. या अर्थाने ते खरेखुरे तत्त्ववेत्ते बनले.

त्यांच्यात झालेल्या परिवर्तनाचे दुसरे अंग असे की, ते राजकीय कार्यकर्ते बनले. असहकाराच्या, सत्याग्रहाच्या आंदोलनात त्यांनी उत्साहाने भाग घेतला. (याच्या मागेसुद्धा प्राज्ञपाठशाळा मंडळाची प्रेरणा होती.) या आंदोलनातील त्यांचे कार्य प्रामुख्याने

लोकशिक्षणाचे होते. पूर्ववयात शास्त्रीजींचा अनेक सशस्त्र क्रांतिकारकांशी संबंध आला होता. पारतंत्र्याची अवस्था ही राष्ट्रीय मानहानी आहे, स्वातंत्र्य मिळवून आत्मसन्मान प्रस्थापित केला पाहिजे, ही या क्रांतिकारकांची प्रेरणा होती. पण आता, पारतंत्र्यामुळे समाजाची कशी आणि किती हानी होते आणि स्वातंत्र्यामुळे समाजहिताचे कसे रक्षण आणि संवर्धन करता येईल हे लोकांना सांगून स्वातंत्र्याच्या लढ्यात त्यांना सहभागी करून घ्यायचा प्रयत्न ते करू लागले. आता ते सोवळे ब्राह्मण राहिले नाहीत. लोकांच्या गर्दीत ते शिरले आणि ही गर्दी त्यांना कायमची चिकटली.

### मार्क्सवादाचा स्वीकार

स्वातंत्र्याचा अर्थ लोकांना शिकवीत असताना ते स्वतःच अंतर्मुख झाले; स्वातंत्र्याचा सामाजिक आणि आर्थिक आशय काय असावा, याचे चिंतन करू लागले आणि या शतकाच्या तिसऱ्या आणि चवथ्या दशकांतील अनेक विचारवंतांप्रमाणे ते मार्क्सवादी झाले. समग्र मानवजातीचे सर्व प्रकारच्या शोषणापासून विमोचन करून, ज्याच्यात प्रत्येक व्यक्तीचे स्वातंत्र्य ही सर्वांच्या स्वातंत्र्याची अट असते, अशा समाजाची स्थापना करणारी रणनीती मार्क्सवादाने स्पष्ट केली आहे आणि तिला आधारभूत असलेले तत्त्वज्ञान विकसित केले आहे, अशी त्यांची मनोमन खात्री पटली. ते जडवादी, ऐतिहासिक भौतिकतावादी झाले. मार्क्सवादाचा स्वीकार त्यांनी केला; पण ते अधिकृत कम्युनिस्ट पक्षाकडे वळले नाहीत. एम. एन. रॉय यांचे वैचारिक आणि राजकीय नेतृत्व त्यांनी स्वीकारले. मेक्सिको, चीन इत्यादी देशांत साम्यवादी क्रांती घडवून आणण्याच्या प्रयत्नांचे नेतृत्व करणारे, वासाहतिक देशांत क्रांती करण्यासाठी कोणत्या रणनीतीचा अवलंब करावा या प्रश्नावर प्रत्यक्ष लेनिनशी दोन हात करणारे जागतिक प्रतिष्ठेचे कम्युनिस्ट विचारवंत हे तेजोवलय रॉय यांच्या भोवती होते. म्हणून त्यांनी रॉय यांचे अनुयायित्व स्वीकारले नाही. भारतातील राजकीय, सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीचे रॉय जे विश्लेषण करीत, ते इतके मार्मिक आणि तर्कशुद्ध असे की ते मान्य केल्याशिवाय गत्यंतर नसे व म्हणून आपण रॉयवादी झालो, असे त्यांनी एकदा मला सांगितले. दुसऱ्या महायुद्धाच्या काळी फॅसिझमचा पूर्ण पाडाव करण्याला अग्रक्रम दिला पाहिजे आणि म्हणून ब्रिटनसारख्या लोकशाही राज्याला, ते साम्राज्यवादी असले तरी, सर्वतोपरी साहाय्य केले पाहिजे ही भूमिका रॉय यांनी आणि त्यांच्या अनुयायांनी मांडली आणि त्यामुळे जो राष्ट्रद्रोहाचा आरोप आणि लोकांची तीव्र अप्रियता वाट्याला आली, ती त्यांनी शांतपणे सहन केली. या खंबीर अनुयायांत शास्त्रीजी अग्रस्थानी होते.

रॉय आपल्या आयुष्याचा बराच काळ मार्क्सवादी होते खरे; पण अखेरच्या पर्वात सोव्हिएत राजवटीविषयी, विमोचनाच्या कम्युनिस्ट रणनीतीविषयी आणि तिला आधारभूत असलेल्या मार्क्सच्या तत्त्वज्ञानाविषयी त्यांचा भ्रमनिरास झाला. 'व्यथित अंतःकरणाने'

त्यांनी मार्क्सवादाचे पुनर्मूल्यांकन केले आणि नवमानवतावादाची स्थापना केली. या वैचारिक प्रवासात शास्त्रीजी, रॉय यांचे केवळ अनुयायी नव्हते; ते त्यांचे सांगाती, सहकारी होते. नवमानवतावाद हा मार्क्सवादाप्रमाणे जडवादी आहे. पण तो ऐतिहासिक भौतिकतावाद नाकारतो. त्याचे सार थोडक्यात असे आहे: नियमबद्ध निसर्गाच्या पार्श्वभूमीवर उदयाला आलेला माणूस स्वभावतःच विवेकशील (रॅशनल) आहे. स्वातंत्र्य आणि जिज्ञासा या त्याच्या नैसर्गिक प्रेरणा आहेत आणि म्हणून स्वातंत्र्य आणि ज्ञान ही मूलभूत मूल्ये आहेत. मानवी व्यक्ती प्रथम आणि प्रधान आहे आणि सर्व मानवी समूह, समाज- राष्ट्र, जात, वंश इत्यादी हे दुय्यम आणि गौण आहेत. सर्व सामाजिक संस्था, रचना प्रथा या व्यक्तींच्या स्वातंत्र्याला, स्वायत्ततेला पोषक असल्या पाहिजेत. विवेकशील माणूस स्वतंत्रपणे संकल्पना, मूल्ये निर्माण करू शकतो आणि त्यांचे इतर विवेकशील व्यक्तींना आवाहन होऊ शकते, हे त्यांचे सामर्थ्य असते. या संकल्पना स्वतःच्या आशयाला अनुसरून विकसित होऊ शकतात, नवीन रूपे धारण करू शकतात आणि त्यांचा जनमानसावर प्रभाव पडत असतो. संकल्पनांची आणि मूल्यांची विवेकावर आधारलेली स्वायत्तता हा नवमानवतावादाचा मूलभूत सिद्धांत आहे. उत्पादनतंत्रे आणि उत्पादन संबंध यांच्या मिळून बनलेल्या भौतिक अधिष्ठानाकडून मानवी संकल्पना आणि मूल्ये निर्धारित होतात या मार्क्सवादी, ऐतिहासिक भौतिकतावादी सिद्धांताचा अव्हेर करून मानवी विवेकशीलतेचा आणि स्वायत्ततेचा तो उद्घोष करतो.

## मूल्ये रुजविण्यासाठी...

आपल्या दीर्घ आयुष्याच्या अखेरच्या पर्वात शास्त्रीजी नवमानवतावादी होते. भारतीय लोकशाही सुदृढ करण्यासाठी जनमानसात व्यक्तिस्वातंत्र्य, मानवी समता, विवेकशीलता, सहकार्य इत्यादी मूल्ये रुजविण्याच्या कार्याला त्यांनी वाहून घेतले होते. एक व्यक्ती म्हणून, प्राज्ञपाठशाळा मंडळ, समाज प्रबोधन संस्था इत्यादींचे सदस्य म्हणून आणि साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष म्हणून. 'मराठी विश्वकोशा'च्या निर्मितीमागे हीच प्रेरणा होती. सर्व आधुनिक ज्ञान लोकांच्या भाषेतून लोकांना उपलब्ध असले पाहिजे, हा त्याच्या मागचा विचार होता.

शास्त्रीजींचे दोन भिन्न गोतावळे होते. एक, शास्त्रीपंडितांचा. याच्याविषयी त्यांना उत्कट आदर, आपुलकी, जिव्हाळा होता. पण त्याच्याशी असलेला त्यांचा संबंध १९३० च्या सुमाराला तुटला. तो परत जुळला नाही. दुसरा गोतावळा नवमानवतावादी 'रॅडिकल्स'चा होता. व. भ. कर्णिक, द्वा. भ. कर्णिक, गोवर्धन आणि इंदुताई पारीख, अ. भि. आणि जशोद शहा इत्यादी आपापल्या कर्तृत्वाने स्वतंत्रपणे ओळखण्यात येणाऱ्या व्यक्ती त्यात प्रमुख होत्या. आपल्या अंतर्यामातल्या गोष्टी या मंडळींशी शास्त्रीजी बोलू शकत.

व्यवहार आणि परमार्थ यांत अद्वैत तत्त्वज्ञान भेद करते. 'व्यवहारे भाट्टनयः' ही उक्ती प्रसिद्ध आहे. अर्थ असा की, व्यवहाराच्या पातळीवर असताना धर्म्य काय आणि अधर्म्य

काय हे कुमारिलभट्टाच्या पद्धतीप्रमाणे ठरवावे. पण पारमार्थिक पातळीवर केवळ सचिदानंद ब्रह्म ठरते. वैज्ञानिक ज्ञान व तंत्रे, मानव्यवादी मूल्ये आणि त्यांच्यावर आधारलेली विवेकी नीती यांनी व्यवहाराचे नियमन व्हावे, अशी शास्त्रीजींची शिकवण निश्चितपणे होती. पण यावर त्यांचे पूर्ण समाधान नव्हते हे मला जाणवत असे. अस्तित्वाच्या आणि ज्ञानाच्या समस्यांत जेव्हा ते खोल शिरत, तेव्हा ते केवलाद्वैताचा स्वीकार करीत, असे मला वाटे. ते परत परंपरेकडे आले होते. व्यवहार बदलला होता. पण पारमार्थिक सत्य अढळ राहिले होते. "व्यवहारे रॉयनयः!"

**(दैनिक महाराष्ट्र टाइम्स, मुंबई. २८ मे २०००)**

ooo

# ४१.

# 'मराठी विश्वकोश'कर्ते: शास्त्रीजी

## प्रा. रा. ग. जाधव

महाराष्ट्र राज्य १९६० साली अस्तित्वात आले व त्याच वर्षी महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृती मंडळही स्थापन करण्यात आले. या मंडळाचे अध्यक्षपद शास्त्रीजींकडे होते. सर्वविषयसंग्राहक असा मराठी विश्वकोश निर्माण करणे हा सदर मंडळाने लवकरच हाती घेतलेला एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प होय.

'मराठी विश्वकोशा'चा प्रकल्प हा पूर्णपणे शासकीय प्रकल्प असल्याने व तो साहित्य-संस्कृती मंडळाचा प्रकल्प असल्याने, औपचारिक दृष्टीने तो इतर शासकीय योजनांप्रमाणेच सरकारी व म्हणून व्यक्तिनिरपेक्ष परिप्रेक्ष्यात पाहणे शक्य आहे व स्वाभाविक वाटणारेही आहे. तथापि सरकारी योजनांतही व्यक्तिसापेक्ष योगदान असतेच व ते महत्त्वाचेही ठरते. मानवी कर्तृत्व कोणत्याही यंत्रणेतून या प्रायोजक संकेतांतून निर्माण होत असले, तरी त्याचे अंतिम मूल्य व्यक्तिसापेक्षच ठरते. अशा अर्थानेच मराठी विश्वकोशकर्ते हे बिरूद राज्यशासनाला वा साहित्य-संस्कृती मंडळाला जेवढे शोभून दिसेल, त्यापेक्षा अधिक ते शास्त्रीजींना शोभून दिसावे अशी वस्तुस्थिती आहे.

मंडळाची कल्पना व स्थापना शासकीय असली, तरी 'मराठी विश्वकोशा'ची संकल्पना ही शास्त्रीजींची होती. सांस्कृतिक कार्य करण्याची सुविधा सरकारने उपलब्ध करून दिली होती, पण त्या कार्याची व्याख्या, व्याप, विस्तार व परिपूर्ती करण्याचे काम शास्त्रीजींना मंडळाच्या मदतीने पार पाडावयाचे होते. महान संकल्प, संकल्पना आणि उपलब्ध सुविधा यांचा मेळ घालणे व त्यातून परस्परांना समर्थन प्राप्त करून देणे, हे अवघड आव्हान धुरिणांसमोर कायमचे खडे असते. स्वातंत्र्योत्तर कालखंडात शासकीय आणि स्वयंसेवी क्षेत्रांतील कितीतरी प्रकल्प असे आव्हान न पेललेल्या नेतृत्वामुळे थंडावत गेल्याचे दिसून येईल. यास मराठी विश्वकोशाचे प्रमुख संपादक म्हणून शास्त्रीजींनी सुमारे तीन तपे जे धुरावाहन केले, ते अपवाद ठरले.

'मराठी विश्वकोश' हा साहित्य-संस्कृती मंडळाच्या प्रयोजनाची व्याख्या करणारा एक

प्रकल्प होता. या मंडळाच्या सांस्कृतिक भूमिकेचा निदर्शक असा तो एक साक्षात नमुना होता. शास्त्रीजींना विश्वकोशाची संकल्पना अंतःप्रेरणेने स्फुरली हे खरे आहेच, तथापि त्या अंतःप्रेरणेत मराठी समाज व संस्कृती यांच्याही सामुदायिक स्फुरणाचा अंशभाग असावा, असे आता वाटते. आधुनिक ज्ञानविज्ञानांचा सुबोध परिचय सामान्य मराठी माणसाला मायभाषेतून करून देणे, ही एक प्रकारची ऐतिहासिक गरज होती. या कालोचित अशा सांस्कृतिक गरजेचे भान पूर्वपश्चिमी ज्ञानक्षेत्रांत मनस्वीपणे व समर्थपणे जगत आलेल्या शास्त्रीजींना एक प्रकारच्या सहजपणाने येऊ शकले. ही निकड खरे तर या शतकाच्या प्रारंभापासूनच मराठी समाजाला जाणवत होती. 'विश्वकोश' ही संज्ञा इंदूर येथील मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष ग. ज. आगाशे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात वापरली होती (१९१७). याच संदर्भात महामहोपाध्यय द. वा. पोतदार यांचा अहमदनगरच्या साहित्य संमेलनातील (१९३९) अध्यक्षीय भाषणातील अभिप्राय उद्बोधक आहे. हा अभिप्राय असा: "या जगातील सर्वोच्च शास्त्रज्ञान मराठीत आणण्याचे काम एकांगी संस्कृत पंडित किंवा एकांगी इंग्रजी पंडित कधीच करू शकणार नाहीत... आम्हांस सर्व इत्थंभूत शास्त्ररचना मराठीत करावयाची आहे. तेव्हा संस्कृतचे प्रगाढ पांडित्य, नव्या शास्त्रांचे उच्च व आनुभविक ज्ञान आणि मराठीचा दीर्घ व्यासंग ही तीन सामर्थ्ये एकवटलेले काही समर्थ पुरुष आम्हाला अवश्य पाहिजेत. तेच आम्हाला मराठी परिभाषा रचून देतील - पोतदारांना अर्थातच मराठी विश्वकोश अभिप्रेत नव्हता. तथापि शास्त्रज्ञान व त्याची मराठी परिभाषा यांची मराठी समाजाला गरज आहे व ती भागविणारी समर्थ माणसे पुढे आली पाहिजेत, याची जाणीव त्यांना तीव्रतेने झालेली होती. ज्ञानकोशाकडून विश्वकोशाकडे वळू लागलेले मराठी सांस्कृतिक मानस त्यांनी नेमकेपणाने ओळखले होते. महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली आणि प्रबुद्ध मराठी मानसिकतेची ही कालोचित अपेक्षा पुरविणारी संधी व सुविधा मराठी विश्वकोशाच्या प्रकल्पाच्या रूपाने पुढे आली. मंडळ आणि विश्वकोश हाही एक सुवर्णकलशच होता, तो मात्र शास्त्रीजींनी आणला. या आलंकारिक विधानाचा अर्थ तारतम्यानेच घ्यावयाचा, हे वेगळे सांगावयास नकोच!

साहित्य-संस्कृती मंडळ हा शासनाच्या विचारपूर्वक स्वीकारलेल्या सर्वांगीण स्वरूपाच्या सांस्कृतिक धोरणाचा घटक असावा, असे वाटत नाही. खरे तर स्वतंत्र भारतात केंद्रीय व प्रांतिक स्तरांवर कोणत्याच प्रकारचे स्पष्ट, सर्वांगीण व वास्तववादी सांस्कृतिक धोरण पुरस्कृत झाल्याचे आढळत नाही. वेगवेगळे सांस्कृतिक प्रकल्प बेटाबेटांप्रमाणे अस्तित्वात आले व आपापल्या बेटांवर कार्य करीत राहिले. यातच भर म्हणून सांस्कृतिक कार्यक्षेत्र उत्तरोत्तर गुंतागुंतीचे, संदिग्ध व अनपेक्षित ताणतणावांनी खरे तर दिशाहीन भरकटत राहिले. ऐन विशीतच संस्कृती मंडळ अशा ताणतणावातूनच फुटले व मराठी विश्वकोश मंडळ त्यापासून अलग करण्यात येऊन त्याची सूत्रे शास्त्रीजींच्याच हाती राहिली. नवजात मराठी राज्याचे सर्वांगीण सांस्कृतिक धोरण सुसूत्र करण्याचे व राबविण्याचे सामर्थ्य शास्त्रीजी व

त्यांचे संस्कृती मंडळ यांच्यात होते. महाराष्ट्राचे लोकनिर्वाचित शासनकर्ते हेदेखील मराठी बौद्धिक परंपरेचेच वारसदार होते. तथापि आज-उद्याच्या सांस्कृतिक जडणघडणीचे नेमके भान राखून सांस्कृतिक कार्याचा एक वास्तव व विधायक पैस आखण्याची दृष्टी दोहोंतही नसावी. त्यामुळे मराठी विश्वकोश, साहित्य-संस्कृती मंडळाची इतर प्रकाशने व प्रकल्प हे साठोत्तरी मराठी समाजाच्या मध्यवर्ती सांस्कृतिक धारेत येऊन अपेक्षित कार्य करू शकले नाहीत, असे वाटते. त्यांना फ्रेंच एन्सायक्लोपीडिस्ट चळवळीप्रमाणे लोकसंवेदन प्राप्त होऊ शकले नाही. शिक्षणव्यवस्था, पाठ्यपुस्तके, नवी तांत्रिक दृक्श्राव्य अशी अध्ययन-अध्यापन तंत्रे, औद्योगिकीकरणाच्या कुशल मनुष्यबळाच्या गरजा, वाङ्मयीन संस्कृतीचा वाढता परीघ, देशीयतावादाचे नवे प्रबोधन, दलितांचे संस्कृतीकारण यांसारख्या परस्परसंबंधित घटकांचे तारतम्य राखणारे सुश्लिष्ट सांस्कृतिक धोरण अस्तित्वातच नव्हते. साठोत्तरी सांस्कृतिक जडणघडणीचे प्रश्न विलक्षण गुंतागुंतीचे होते. सांस्कृतिक प्रकल्पांच्या बेटाबेटांच्या कोषांमध्ये राहून त्यांचा ताण विसरण्याची सोय होती. मराठी विश्वकोश, शास्त्रीजी आणि शेकडो मराठी व्यासंगी विद्वान व अभ्यासक यांनी विश्वकोशरचना उत्तम प्रकारे पार पाडली; पण आधुनिक ज्ञानविज्ञानसंपन्न अशा वर्गाची नेतृत्वशाली प्रभावी विश्वसनीय प्रतिमा मराठी माणसाच्या मनात प्रतिष्ठित करणे त्यांना जमले नाही. या प्रकारची प्रतिमा फक्त शास्त्रीजी या व्यक्तीपुरतीच निर्माण होऊन थांबली. या अभिप्रायाचे पूर्णपणे समाधानकारक स्पष्टीकरण करणेही सोपे नाही. १९८० च्या सुमारास साहित्य-संस्कृती मंडळाचे विभाजन होऊन याच नावे उरलेल्या मंडळाची धुरा नामवंत तत्त्वज्ञ डॉ. बारलिंगे यांच्याकडे आली. त्यांनाही तत्त्वज्ञांची बौद्धिक नेतृत्वाची सामाजिक भूमिका मराठी समाजात प्रतिमारूपाने प्रतिष्ठित करता आली नाही. बेटाबेटांच्या सांस्कृतिक मोहिमेचे हे अटळ फलित म्हटले पाहिजे.

सर्वविषयसंग्राहक असा वीस-खंडीय विश्वकोश निर्माण करण्याचे ठरल्यानंतर त्याचे मॉडेल म्हणून इंग्रजी एन्सायक्लोपीडिया स्वीकारणे भाग होते. भारतीय ज्ञानविज्ञान परंपरेत विविध प्रकारची कोशरचना प्राचीन काळापासून व संस्कृत-प्राकृत-पाली अशा विविध भाषांतून निर्माण झाल्याचे दिसून येते. शास्त्रीजींना याची जाणीव होती. तथापि भारतीय परंपरेतील लेखनवाचनाच्या सवयी व गरजा आधुनिक वातावरणात स्वीकारार्ह नव्हत्या. त्या प्राधान्याने मौखिक पठण व पद्यात्मकता यांच्याशी निगडित असल्याने ज्ञानविज्ञानांच्या आधुनिक गद्यात्मक व वाचनीय प्रथेशी सुसंगत ठरणारे पश्चिमी कोशरचनेचे मॉडेल शास्त्रीजींनी निवडले. ऐतिहासिक संदर्भात पाहिल्यास या निवडीला त्या वेळी तरी अन्य पर्याय नव्हता. वसाहतोत्तर असा आजचा दृष्टिकोन पत्करल्यास या मॉडेल निवडीबाबतही मतभेद होणे शक्य आहे. पण असे करणे अनैतिहासिक ठरेल की काय, अशी शंका वाटते.

सर्वविषयसंग्राहक विश्वकोशाची संकल्पना व तिला प्रत्यक्षात साकार करण्याचा तपशीलवार असा रचनेचा आराखडा, या मूलभूत महत्त्वाच्या बाबींचे श्रेय शास्त्रीजींना दिले

पाहिजे. ज्ञानविज्ञानशाखांतील सुमारे नव्वदाहून अधिक अशा नेमक्या विषयांची निवड करणे, या प्रत्येक विषयाखालील नोंदींचे विषय निश्चित करणे, त्यांची प्रत्येकी शब्दमर्यादा ठरवून देणे व समग्र कोशाच्या संदर्भात प्रत्येक विषय व प्रत्येक नोंद यांचे स्थान, महत्त्व व परस्परसंबंध लक्षात घेणे या सर्व गोष्टी आपणांस भासतात तितक्या सरळ व सोप्या नाहीत. प्रत्येकी एक हजार पृष्ठांचे सतरा संहिता खंड, पुढील परिभाषा, सूची व नकाशासंग्रह यांचे अनुक्रमे अठरा, एकोणीस व वीस असे खंड प्रत्येक पृष्ठाची शब्दसंख्या (७५०), प्रत्येक नोंदीतील चित्रे, आकृत्या कोष्टके यांच्यासाठी करावयाची पृष्ठ पूरक नोंदसंदर्भाची मजकुरांतर्गत व्यवस्था व नोंदीच्या अखेरची निर्देश व्यवस्था, संदर्भग्रंथ व त्यांतील विविध प्रकारांतील व भाषांतील ग्रंथनामांच्या उल्लेखांची पद्धत, रंगीत चित्रपत्रांची निवड यांसारख्या कितीतरी महत्त्वाच्या बाबी निश्चित करूनच विश्वकोशाचा श्रीगणेशा करता येणे शक्य होते. विश्वकोशवास्तूच्या प्रत्यक्ष बांधकामाचा हा तपशीलवार रचनाकल्प (किंवा 'ब्ल्यूप्रिंट') शास्त्रीजींच्या मार्गदर्शनातूनच सिद्ध झाला. या कार्यात अर्थातच ज्ञानविज्ञानक्षेत्रातील शेकडो तज्ज्ञांचे व अभ्यासकांचे साहाय्य महत्त्वाचे होते. तथापि संकल्पित विश्वकोशरचनेच्या समग्र व्यापक परिप्रेक्ष्यात नव्वदाहून अधिक विषयांचा वाटा काटेकोर तारतम्यबुद्धीने ठरवणे वा सीमित करणे; हे सर्वांत महत्त्वाचे व जिकिरीचेही काम होते. हे काम करण्याचा सर्वतज्ज्ञसंमत अधिकार शास्त्रीजींना लाभला होता. सर्वसंग्राहक अशा पश्चिमी एन्सायक्लोपीडियांचा एक संकेत शास्त्रीजींनी मोडला आणि विज्ञाने व तंत्रविद्या या शाखेला मराठी विश्वकोशात मानव्य विद्यांच्या बरोबरीने समान अशी (म्हणजे ८५०० पृष्ठे) पृष्ठसंख्या बहाल केली. मराठी समाजाला विज्ञाने व तंत्रविद्या यांच्या माहितीची गरज ही मानव्य विद्यांच्या परिचयाइतकीच, आवश्यक आहे, असे शास्त्रीजींना रास्तपणे जाणवत होते.

विश्वकोशाचे प्रत्यक्ष निर्मितिस्वरूप तपशीलवार ठरवणे सोपे नव्हते. ही एक आगळीवेगळी मुद्रणरीती आहे. ती निश्चित करताना भिन्नभिन्न दृष्टिकोनांचा आदर राखून मेळ साधणे मोठे आव्हानप्रद होते. विष्णुपंत भागवत, बापूराव नाईक यांसारख्या तज्ज्ञांशी यथार्थ संवाद साधून शास्त्रीजींनी हा महत्त्वाचा टप्पाही उत्तम प्रकारे पार पाडला. विश्वकोशाच्या काही खंडांना अखिल भारतीय स्तरावरील मुद्रण पुरस्कारही लाभले, हे अर्थपूर्ण आहे.

मंडळाच्या स्थापनेपासूनच्या पहिल्या दशकात विश्वकोशांचा पायाभूत रचनाकल्प तपशीलवार सिद्ध होऊन लेखन-समीक्षण-संपादनाचे प्रत्यक्ष कामही त्यानुसार सुरू झाले व त्या दशकाच्या अखेरीस विश्वकोशाच्या पहिल्या पाच खंडांची मुद्रणप्रत छपाईसाठी सोपविण्यात आली. हा वेग त्यानंतरच्या काळात टिकून राहिला असता, तर एव्हाना विश्वकोशाचे सर्व खंड प्रकाशित झाले असते. असे घडले नाही, यास अनेक कारणे होती. शासकीय किंवा सार्वजनिक क्षेत्रातील विश्वकोशासारख्या प्रकल्पाला शासनयंत्रणेच्या थंड, ढिल्या व वेळकाढू प्रतिसादामुळे विविध प्रकारच्या कुचंबणा, अगतिकता व विलंब यांना

तोंड देत देत पुढे जाणे भाग असे. विज्ञाने, तंत्रविद्या, कारागिरी, कनिष्ठ कला यांसारख्या विषयांतील लेखक-समीक्षक मिळवणे जिकिरीचे ठरत असे. विश्वकोशाच्या बहुतेक लेखक-समीक्षकांनी तुटपुंज्या मानधनाचा स्वीकार करून मोठ्या आत्मीयतेने या प्रकल्पाचा भार वाहिला पण कधी कधी विलंब व शोधाशोध अपरिहार्य ठरत. तथापि या सर्व प्रकारच्या अडथळयांच्या शर्यतीतून शास्त्रीजींनी कमालीच्या संयमाने, सौजन्याने व लवचिकपणाने विश्वकोश जारी राखण्यात यश मिळवले. विश्वकोशाच्या विद्वान पण मनस्वी आग्रही लेखक-समीक्षकांशी जुळवून घेण्यात त्याच गुणांचा त्यांनी यशस्वी वापर केला. विश्वकोश प्रकल्पाला स्वतःपेक्षा मोठा मानून आत्मनिरपेक्ष अशा कार्यनिष्ठेने त्यांनी त्याची वाटचाल निर्वेधपणे चालू ठेवली. एका बाजूला काहीसे उदास, अडाणी शासक व प्रशासक, दुसऱ्या बाजूला प्रचंड व्यासंगाचे पण विश्वकोशीय विचार-लेखनाच्या सवयी नसलेले विद्वज्जन, तिसऱ्या बाजूला शिकाऊ कार्यालयीन संपादकवर्ग व चौथ्या बाजूला आवश्यक अंतःसुविधांची-इन्फ्रास्ट्रक्चरची चणचण अशा चारही बाजूंनी कोंडीत सापडलेल्या विश्वकोशप्रकल्पाला शास्त्रीजींनी सुखरूपपणे बाहेर काढले. विश्वकोशाची धुरा आमरण शास्त्रीजींच्याच खांद्यावर राहिली; धुरान्तराची गरज शासन व समाज यांना जाणवली नाही, आणि तसे काही आततायीपणाने घडलेही नाही. सार्वजनिक क्षेत्रातील सांस्कृतिक प्रकल्पांच्या नेतृत्वाचा-सामूहिक नेतृत्वाचा- एक अनुकरणीय नमुना शास्त्रीजींनी साकार केला.

शास्त्रीजींच्या गतिमान कार्यक्षमतेचे व उरकशक्तीचे प्रत्यंतर देणाऱ्या अनेक बाबी आहेत: विश्वकोशाच्या छपाईसाठी वाईला स्वतंत्र शासकीय छापखाना काढण्याची कल्पना अल्पकाळात प्रत्यक्षात साकार करण्याचे श्रेय शास्त्रीजींनाच द्यावे लागेल. सगळ्याच विषयांतील मराठी परिभाषा उपलब्ध असणे, ही गोष्ट विश्वकोशीय लेखक-समीक्षक-संपादक यांच्या दृष्टीने अगत्याची होती. म्हणून अखंडपणे बैठक मारून शास्त्रीजींनी शेकडो मराठी पारिभाषिक शब्द निश्चित केले व त्यांचा अठरावा खंड आधीच प्रकाशित केला. (त्याची परिवर्धित आवृत्ती यथावकाश मिळेल.) मात्र परिभाषेबद्दल ते ताठर आग्रही नव्हते. याही बाबतीत त्यांनी विश्वकोशीय लेखक-संपादकांना वैकल्पिक स्वातंत्र्य दिले. नकाशा खंडाविषयी त्यांनी खरोखरीच खूप आटापिटा केला. सूचिखंडाच्या कामाची रीतसर योजना निश्चित करून क्रमशः ते काम पार पाडण्याची कार्यवाही केली. विशेषतः विश्वकोशाच्या अद्ययावत ग्रंथालयाची उभारणी करण्यात त्यांनी सर्वांना व सहकाऱ्यांना उत्तेजन दिले. विश्वकोशाचे ग्रंथालय हा महाराष्ट्रातील ग्रंथसंपदेचा अमोल ठेवा होय. त्यातील प्रत्येक ग्रंथाला शास्त्रीजींचा हस्तस्पर्श व नेत्रस्पर्शही झालेला आहे.

एक दिवस तर शास्त्रीजींनी प्राज्ञपाठशाळेच्या इमारतीत तळमजल्यावर असलेली त्यांची स्वतःची बैठकीची जागा विश्वकोशाच्या ग्रंथालयाशेजारी हलविली. ही एक काचेची खोली होती, तीतून कार्यालयीन संपादक पाहता येत; करपल्लवी, नेत्रपल्लवी यांच्या आधारे

त्यांच्याशी झटपट संपर्क साधता येई. वेळेची बचत होई आणि लेखक-संपादकानाही सहजपणे शास्त्रीजींकडे प्रवेश मिळे.

शास्त्रीजींचे कार्यालय सर्वांसाठी मुक्तद्वार होते. कोशाचे काम, कर्मचारी हे आधी; मग इतर कामे व माणसे, हा संकेत त्यांनी रूढ केला होता.

सर्व विषयांतील नोदींच्या मुद्रणप्रतींचे वाचन शास्त्रीजी तासन् तास बैठक मारून पूर्ण करीत. संबंधित कार्यालयीन संपादक या वाचनासत्रात उपस्थित राहात. अशी वाचनसत्रे म्हणजे संपादकवर्गाचे प्रशिक्षण शिबिरच होई आणि हे प्रशिक्षण यथासमय विश्वकोशीय लेखकांपर्यंत पोहोचत असे. शास्त्रीजी मुद्रणप्रतीतील शब्द, परिभाषा, वाक्यरचना, परिच्छेद, आशय, बाणांकने, संदर्भग्रंथ, चित्रे/आकृत्या या सर्व घटकांवर मार्मिक अभिप्राय देत. विश्वकोशातील 'फर्निचर' ही नोंद बटाट्याच्या चाळीतून आयुष्य घालविलेल्या पांढरपेशा वर्गातील संपादकांना सिद्ध करता येणार नाही, असे गमतीदार व अर्थपूर्ण उद्गारही ते उत्स्फूर्तपणे काढत. उलट 'दाढी' ही नोंद त्यांनी 'आमच्याकडून 'नगरकरी' सफाईने करवून घेतली हेही खरे! वाचनसत्रात बसले की, आपण एखाद्या प्राचीन गुरुकुलात आचार्यांकडून संथा घेत आहोत, असे वाटत राही. विश्वकोशरचना करू शकणारी निदान पंचवीस कार्यालयीन संपादक माणसे शास्त्रीजींनी घडविली. ही माणसे विद्वान नसतील, पण विद्वत्तेचा कोशस्वरूप आविष्कार कसा करावयाचा याची जाणकारी मात्र त्यांना आहे.

विश्वकोशकर्ते म्हणून शास्त्रीजींच्या एका गुणविशेषाचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे. तो गुणविशेष म्हणजे विश्वकोश-प्रकल्पाची स्वायत्तता जपण्याचा! हा एक शासकीय प्रकल्प असूनही कोणत्याही प्रकारच्या बाह्य दडपणाचा जाच कुणाही लेखक-संपादक-कर्मचाऱ्यांना केव्हाही होणार नाही, याची काळजी शास्त्रीजी घेत. मूळच्या नोंदयादीत भर घालणे, नवे विषय समाविष्ट करणे, जुने विषय गाळणे, नोंदीची शब्दसंख्या कमी-जास्त करणे यांसारख्या बाबींचा निर्णय ते कार्यालयीन संपादक व तज्ज्ञ यांच्याच साह्याने करीत. नोंदीतील दोष, उणिवा इत्यादींबद्दल स्वतः जबाबदारी पत्करून त्यासंबंधी संबंधित आक्षेपकांना योग्य स्पष्टीकरण देत. बाह्य जाचक संपर्कापासून विश्वकोश-यंत्रणा अलिप्त व अबाधित राखण्यात, शास्त्रीजींच्या शास्त्रीय नेतृत्वातील माणुसकीचा व कर्तव्यशील बांधिलकीचा उबदार भावघटक प्रतीत होतो. अगदी विश्वकोश मंडळाच्या सदस्यांनाही दिवाणखान्यात प्रवेश असे पण विश्वकोशाच्या माजघरात जाणे मात्र शक्य नसे. खरे तर याची गरजच शास्त्रीजींनी त्यांना कधी भासू दिली नाही.

ज्ञानविज्ञानक्षेत्रातील कोणताही ज्ञानविषय शास्त्रीजींना अविषय नव्हता. त्यांचा बहुपैलू व्यासंग, प्रथम श्रेणीची नैसर्गिक व संपादित बुद्धिमत्ता, शीघ्र ग्रहणक्षमता आणि कधीकधी भाबडी वाटावी इतकी सरळ व विदग्ध गुणग्राहकता इत्यादी गुणविशेषांचा हरघडी प्रत्यय येत असे. वस्तुनिष्ठता, सारभूतता व संक्षेप हे कोशीय लेखनाचे प्राथमिक घटक म्हणजे

नेमके काय, याचे धडे सगळ्याच विश्वकोशीय लेखक समीक्षकांना शास्त्रीजींकडून प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे मिळत गेले. विशेषणांची व क्रियाविशेषणांची भरजरी आलंकारिकता ही मराठी लेखनसवयीची (- व म्हणून विचारसवयीचीही-) खास बाजू पण ही सवय मोडण्यात वा क्षीण करण्यात शास्त्रीजींच्या मराठी विश्वकोशाचा मोठाच वाटा आहे. शास्त्रीजींना केवळ मराठी विश्वकोश संपादित करावयाचा नव्हता, तर काटेकोर विवेकाची भाषिक मराठी शैलीही निर्माण करावयाची होती. हे कार्य त्यांनी केलेच पण ते कितपत मुरले हे ग्राहक मृत्तिकेच्या कसावर अवलंबून असणेही स्वाभाविक आहे.

धर्म, तत्त्वज्ञान, राज्यशास्त्र, मानवशास्त्र, समाजशास्त्र हे शास्त्रीजींचे खास विषय! या विषयांतील शेकडो नोंदी त्यांनी लिहिल्या, समीक्षून दिल्या, संस्कारित केल्या. महाभारत-रामायण, वेदोपनिषदे, कृष्णादी विभूती, संत, प्राचीन तत्त्वज्ञ ऋषिमुनी, प्राच्यविद्या, पश्चिमी तत्त्वज्ञाने यांसारख्या विषयांतील त्यांच्या नोंदी विश्वकोशाला भूषणभूत ठरलेल्या आहेत. जातिसंस्थेसारखा विषय कसा हाताळावा, हे शास्त्रीजींच्या नोंदींवरून लक्षात येते. संतांच्या नोंदीत चमत्कारांना स्थान आहे, असे त्यांचे मत होते. आधुनिक अभ्यासकांना नोंदीचा ज्ञानविषय नेमकेपणाने व्याख्यात करता येत नाही, एखाद्या विषयाचे समग्र परिप्रेक्ष्य न्याहाळता येत नाही. ऐतिहासिक जटिल संदर्भांचे भान राखता येत नाही, साध्या सुबोध भाषाशैलीत सुस्पष्ट विवरण करता येत नाही आणि एकूणच मराठी व्यासंगाचा व विद्वत्तेचा कस व शिस्त समाधानकारक नाही, असे शास्त्रीजींचे स्वागतस्वरूपी गाऱ्हाणे होते. एक आदर्शवत् प्राज्ञ-निधी - ब्रेन ट्रस्ट त्यांना विश्वकोश प्रकल्पाच्या रूपाने व साधनाने महाराष्ट्रात निर्माण करावयाचा होता. यासाठी आवश्यक असलेली सहनशक्ती, अथक परिश्रमांची तयारी, आपल्या सहकाऱ्यांना, ज्येष्ठ-कनिष्ठांना त्यांच्या गुणदोषांसकट आपुलकीने स्वीकारण्याची ऋजुता याही बाबी शास्त्रीजींजवळ होत्या. ज्ञानविज्ञानांच्या समग्र क्षेत्राला लीलया पेलणारी भाषिक व्यवहाराची एक प्रभावी क्षमता त्यांना जनमानसात निर्माण करावयाची होती. विश्वकोशकर्त्या शास्त्रीजींच्या स्वप्नाचा वाच्यार्थ विश्वकोशाचे खंड हाच असला, तरी त्याचा ध्वन्यर्थ मोठा व वेगळा होता. स्वतः शास्त्रीजींनीही तो ध्वन्यर्थ म्हणूनच स्वतःजवळ बाळगला.

१९६० ते १९८० ही विश्वकोशाची विशी म्हणजे एक मंतरलेले उद्योगपर्व होते. या उद्योगपर्वाचे प्रणेते व केंद्र शास्त्रीजी होते. ज्ञानविज्ञानात्मक मराठी बुद्धिमत्ता व व्यासंग एका नवनिर्मितीच्या ध्यासाने भारलेले होते. एकापाठोपाठ अशा मराठी विश्वकोश खंडांच्या मुद्रणप्रती तयार होत होत्या, छापल्या जात होत्या. एका शब्दातीत उत्साहाने आणि जिद्दीने केवलानंद सरस्वती स्मारक वास्तू हेलावत होती.

पण सुरू होणारी प्रत्येक अवस्था केव्हातरी समाप्त होते, या नियमाला विश्वकोशाचे मंतरलेले उद्योगपर्व कसे अपवाद ठरणार? दुसऱ्या दशकाच्या अखेरच्या सुमारास मंडळाचे

विभाजन झाले व विश्वकोश प्रकल्प त्यापासून अलग झाला. शास्त्रीजींना या फाळणीचे प्रयोजन पटवून घेता आले नाही. पण ही स्थिती एकट्या शास्त्रीजींचीच होती, असे मात्र नाही. एक विकल्प मात्र त्यांच्या मनात कायमचा रेंगाळत राहिला. या विकल्पाचा परिणाम विश्वकोशकर्त्या भूमिकेवर कितपत झाला हे सांगणे अवघड आहे. एव्हाना शास्त्रीजींनी वयाची ऐंशी वर्षेही पूर्ण केलेली होती. मूळ मंडळाच्या कामातही पुरेशी समाधानकारक प्रगती अनेक आवाक्याबाहेरच्या कारणांनी होत नाही, असा ग्रह निर्माण झाला होता. कार्याचे विकेंद्रीकरण, जबाबदाऱ्यांचे विभाजन, सेवानिवृत्तीचे वयोमान यांसारख्या साचेबंद कल्पनांचा प्रभाव मंडळाच्या विभाजनावर पडला असावा! अखिल महाराष्ट्राच्या सांस्कृतिक धोरणाची व्यापक चौकट उभारण्याचे काम शास्त्रीजींच्या नेतृत्वाखाली हाती घ्यावे किंवा त्यांच्या हाती यावे, अशा अवस्थेत ज्या वेळी शास्त्रीजी होते त्या अवस्थेतच त्यांना केवळ विश्वकोशाचे वाटेकरी करण्यात आले, असे समजणाराही एक वर्ग त्या वेळी अस्तित्वात होता.

या टप्प्यावर विश्वकोशाची यंत्रणा मात्र पूर्णपणे सुविहित स्वरूपात कार्यप्रवण झालेली होती. या यंत्रणेला एक प्रकारची स्वयंचलन गती प्राप्त झालेली होती. तिच्यात एक विश्वासार्ह कार्यक्षमता निर्माण झालेली होती. आता या यंत्रणेला नव्या आव्हानांना सन्मुख करण्याचे भविष्यवेधी वळण देणे इष्ट होते.

या टप्प्यावर मात्र पुरेसा प्रतिसाद देण्यात शास्त्रीजी काहीसे अडखळले, असे मला व्यक्तिशः वाटते. उद्याच्या जबाबदाऱ्या हेरून त्या दृष्टीने विश्वकोश यंत्रणेला सुसज्ज करण्याचे काम अगत्याचे होते. आधीचा तंत्रकुशल संपादकीय कर्मचारी वर्ग क्रमाक्रमाने निवृत्त होऊ लागला होता. यासाठी दुसरी फळी तयार करण्याची गरज होती. त्याचप्रमाणे अखंडपणे चालणारा प्रकल्प म्हणून व विसाव्या शतकातील अद्ययावत तंत्रयुगात कार्य करणारा प्रकल्प म्हणून काही पायाभूत गोष्टींचा उपक्रम करणे आवश्यक होते. विश्वकोशीय कार्यालयासाठी म्हणून स्वतंत्र रीतीचे फर्निचर, स्वतंत्र पद्धतीची स्टेशनरी प्रपत्रे, प्रगतिशील प्रलेखपोषणासाठी (प्रोग्रेसिव्ह डॉक्युमेंटेशन) आवश्यक ती कार्ड-पाकिटे, प्रकाशित झालेल्या खंडांतील मजकुराचे, नोंदींचे सर्वांगीण पुनर्विलोकन, सूचिखंडाच्या कामासाठी स्वतंत्र व्यवस्था, वार्षिक प्रकाशनाची यंत्रणा, परिभाषासंग्रहाचे संस्करण यांसारख्या कितीतरी बाबींसाठी विचारपूर्वक नियोजन करून कार्यवाही सुरू करण्याची गरज होती. पश्चिमी देशातील प्रगत एनसायक्लोपीडिक यंत्रणा कशा प्रकारे व स्वरूपात वर्षानुवर्षे काम करीत आल्या आणि त्यांतील आपणांस ग्राह्य व योग्य काय आहे, याचाही शोध घेण्याची व त्यासाठी त्या यंत्रणा प्रत्यक्षात पाहण्याची व्यवस्था करणे इष्ट होते. संगणकीय तंत्राचा अवलंब चाचपून पाहण्याची गरज होती. विश्वकोश प्रकल्पाचे काम चालू राहण्यासाठी बदलत्या गोष्टींचे भान राखून भविष्यासाठी आधीच योग्य त्या सुविधा, सोयी व पद्धती नियोजित करणे आवश्यक होते. १९८० नंतरच्या कालखंडात विश्वकोश दैनंदिन कामात

तरबेज झाला; पण भविष्यलक्षी नियोजनात मात्र तो मागे पडला. कुमारकोशासारखे उपप्रकल्प या दृष्टीने कितपत समर्थनीय ठरतील हे सांगणे कठीण आहे.

विश्वकोशाच्या उपयोगितेचा योग्य प्रकारे प्रसार होणेही अगत्याचे होते. विश्वकोशाच्या पहिल्या पाच खंडांचे प्रकाशन झाले, तेव्हापासूनच ही निकड जाणवत होती. विश्वकोशाची निर्मिती ही ज्या हेतूने हाती घेण्यात आली. त्या हेतूशी तर्कसंगत ठरणारी प्रसाराची जबाबदारी महत्त्वाची होती. वृत्तपत्रे, शाळा-कॉलेजे, विद्यापीठे, ग्रंथालये, सांस्कृतिक संस्था व नित्यनैमित्तिक कार्यक्रम, सार्वजनिक सण व उत्सव, संशोधनसंस्था इत्यादींच्या क्षेत्रांत विश्वकोशाची उपयोगिता प्रसृत करणे फलदायी ठरले असते. यासाठी तालुका, जिल्हा व महानगरीय पातळ्यांवर परिसंवाद, शिबिरे, चर्चासत्रे आयोजित करता आली असती. विश्वकोशाचेच लेखक-समीक्षक-संपादक यांना यासाठी सहकार्य मागता आले असते. विश्वकोश या विविध थरांतून कमी-अधिक प्रमाणात वाचला गेला असता व वाचकांच्या प्रतिक्रियाही जाणून घेता आल्या असत्या. खरे तर अशा कामाची एक विश्वकोशांतर्गत कायमची पुनर्विलोकन कार्यशाखा असण्याचीही गरज होती. सर्वविषयसंग्राहक विश्वकोश हा नवा प्रयोग होता व त्याविषयीची अभिरुची निर्माण करण्याची जबाबदारीही कोशकर्त्यांवर होतीच. हे मात्र घडू शकले नाही.

आणखी एक: पूर्वी संस्कृती मंडळाच्या व नंतर विश्वकोश मंडळाच्याही नियमित बैठकी होत. अजूनही त्या होतातच. त्याचबरोबर विश्वकोश लेखक समीक्षकांच्याही अनौपचारिक बैठकी होत राहणे इष्ट होते. विश्वकोशाच्या पहिल्या दीड-दोन दशकांत अनेक नामवंत तज्ज्ञ लेखक वाईला येऊन काम करीत. तथापि त्यांच्या प्रासंगिक अशा या उपस्थितीचा फायदा घेऊन बैठकी घेणे, आपापल्या विषयांतील नव्याजुन्या ज्ञानविषयांचा परिचय करून देणे व घेणे, कार्यालयीन संपादकवर्गाला एकूणच कामाविषयी व त्यातील अडीअडचणीसंबंधी चर्चा करण्याची संधी उपलब्ध करून देणे ही मोठी उपकारक ठरणारी बाब होती. विश्वकोश हा तज्ज्ञांचा प्रांत आहे हे खरे; पण तो सामान्य मराठी वाचकांसाठी आहे, सामान्य संपादकीय कर्मचाऱ्यांसाठी आहे, तेव्हा या सर्वांत संवाद घडवून आणणे उपकारक ठरले असते. शिवाय विश्वकोशामागे एक सांस्कृतिक भूमिका आहे, त्याचे म्हणून काहीएक तत्त्वज्ञान आहे. त्याचा म्हणून काही पैसही आहे आणि मर्यादाही आहेत. या गोष्टींचे प्रकट भान सगळ्याच विश्वकोशीय लेखक-समीक्षक-संपादकांना असणे इष्ट होते. तज्ज्ञांना या व्यापक परिप्रेक्ष्याची जाणीव नसेल, तर त्यांचे लेखन त्यांना व विश्वकोशालाही पुरेसे समाधान कसे देणार? खरे तर मंडळाच्या नियमित बैठकीप्रमाणेच विश्वकोशीय लेखक-समीक्षक-संपादक वर्गाच्याही नियमित बैठकी घेणे गरजेचे होते. अशा अनौपचारिक संवादातून विश्वकोशाचा प्रत्येक लेखक हा नकळतपणे विश्वकोशाचा उत्तम प्रसारकही होऊ शकला असता. पण याही गोष्टीकडे पुरेसे लक्ष देण्यात आले नाही.

'आधी कळस मग पाया' हा सांस्कृतिक मराठी माणसाचा गूढवादी पण अर्थपूर्ण असा बाणा आहे. समाजातील ज्ञानवंत ज्ञाननिर्मितीचे प्रचंड कार्य करतात आणि मग त्या ज्ञाननिर्मितीच्या प्रचंड प्रवाहाला पाट पाडून त्याचे पाणी घरोघर पोचविण्याचे काम विश्वकोशकारांना करावे लागते. आपण पश्चिमी ज्ञानगंगेच्या आयत्या पाण्यात हात धुऊन घेण्याचे व पाट काढण्याचे कोशकार्य हाती घेतले. हे ठीकच आहे व आवश्यकही आहे. कदाचित मराठी विश्वकोशाच्या मूळ संकल्पनेचा सर्वांगीण व सखोल वेध घेण्याची उसंत त्या वेळी नसावी किंवा ही गरज जाणवावी अशी मन:स्थितीही त्या वेळी नसावी! शास्त्रीजींचा विश्वकोश हे आमच्या ज्ञानविज्ञानविषयक आशा-आकांक्षांचे एक कालोचित प्रतीक आहे. पश्चिमी तंत्राच्या व प्रभावाच्या सावटाखालील हे ज्ञानविज्ञान आत्मसात करण्याचीही ऐतिहासिक गरज होती व आहे. पण एवढ्यावरच एवढ्याच अर्थाने व अशाच रीतीने हे कार्य पुढे चालविता येईल वा चालवावे, असे मला तरी वाटत नाही. ज्ञानविज्ञानप्रसाराच्या देशी पद्धतीही कधीकधी इथे होत्या, त्यांतील व पश्चिमी तंत्रातील ग्राह्यांश स्वीकारून आमची अशी विश्वकोशीय धाटणी निर्माण करण्याची या पुढे गरज आहे. त्या दृष्टीने विश्वकोश प्रकल्प प्रगत करणे योग्य ठरेल. दुसरे म्हणजे, विज्ञाने व तंत्रविद्या यांत वस्तुनिष्ठ परिचयाची कमाल मर्यादा गाठणे शक्य असते व योग्यही ठरते. परंतु मानव्य विद्यांच्या बाबतीत हे कठीण ठरते. वस्तुनिष्ठता पाळूनही भर देण्याची आत्मनिष्ठा टाळता येत नाही. मराठी विश्वकोशातील अशा अटळ आत्मनिष्ठ वळणाचे स्वरूप काय व कसे असावे हेही विश्वकोशकारांना लक्षात घ्यावे लागेल. ज्ञानसाधनेचा सर्वोच्च हेतू ज्ञानसाधना हाच असतो. तथापि विश्वकोश म्हणजे ज्ञानसाधनाच केवळ नव्हे, हे उघडच आहे. ज्ञानविज्ञानांच्या लोकोपयोगी वितरणाची ती एक बांधिलकीही आहे.

सतत चिंतनमननाचा ध्यास घेतलेले, परोपरीने आत्मपरीक्षण करणारे, नव्या ज्ञानविज्ञान क्षितिजांचा वेध घेणारे आणि आपल्या समाजाच्या ज्ञानविज्ञानात्मक बदलत्या गरजांचा शोध घेणारे, स्वस्थचित्त व भरपूर उसंत असणारे व पूर्ण वेळ कार्य करणारे धुरिणत्व ही यापुढील विश्वकोशकार्याची खरी गरज आहे. शास्त्रीजींच्या स्पृहणीय नेतृत्वातील न्यूनाधिक्य त्यामुळे पुरतेसरते होऊन जाईल, असे मला वाटते.

शास्त्रीजींनी अभिजात पौर्वात्य व पाश्चात्त्य पायांवर प्रभावी मराठी विश्वकोश अधिष्ठित केला. शुद्ध ज्ञानविज्ञानसाधनेचे तो प्रतीक होय. उद्याचा विश्वकोश अभिजात भारतीय व महाराष्ट्री पायावर उभा राहावा व तो विकसनशील अशा आधुनिक मराठी माणसाच्या प्रत्यक्ष जीवनसाधनेचा प्रतीक व्हावा, असे मला वाटते.

**(तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी जन्मशताब्दी विशेषांक/**
**प्राज्ञपाठशाळा, वाई/२७ जानेवारी, २०००)**

ooo

## ४२.

# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी: एक 'विभज्यवादी' विचारवंत

**प्रा. डॉ. मो. गो. धडफळे**

### 'विचार आजमितीलाही मार्गदर्शक'

आधी रामायण सांगितलं गेलं आणि मग म्हणे रामायण घडून आलं. शब्दांच्या मागून अर्थानं धाव घेतली (वाचमर्थोऽनुधावति). वाल्मीकींची दिव्य प्रतिभा या स्वरूपाची होती. अशा प्रकारचं प्रतिभेचं लेणं तर्कतीर्थांना लाभलं नव्हतं. मात्र समोर असलेल्या विषयांचं शास्त्रशुद्ध, तार्किक विश्लेषण करून त्यांच्यातील ग्राह्य-अग्राह्य अंशांचं नेमकं प्रतिपादन करण्याची विलक्षण वैचारिक क्षमता त्यांच्याकडे होती. तर्कतीर्थांच्या वैचारिक योगदानाची जरादेखील ओळख करून न घेता आणि त्यांच्या विपुल व मौलिक लेखनाचं काहीही वाचन न करताही त्यांच्याविषयी बोलताना ''तर्कतीर्थांचे विचार आजमितीलाही मार्गदर्शक'' असं वृत्तपत्रांना ठळक मथळयाचे वाक्य पुरविणाऱ्या व्यक्तींच्या वचनांनाही खरीखुरी अर्थवत्ता प्राप्त होते, ती याचमुळे. आजमितीला गाजत असलेला एक विवाद्य विषय म्हणजे फलज्योतिषासकट प्राचीन भारतीय ज्योतिर्विज्ञान विद्यापीठीय स्तरावर 'विज्ञान' म्हणून शिकवलं जावं का नाही? तसं ते शिकवलं जावं असा विद्यापीठ आयोगाचा फर्मानवजा फतवा आहे.

डॉ. जयंत नारळीकरांसारखे थोर वैज्ञानिक याला कसून विरोध करीत आहेत. डॉ. गोवारीकर यांना हा 'वैज्ञानिक युगातील घातक निर्णय' वाटतो. डॉ. चित्रा नाईक "कोणत्या पुराव्याच्या आधारे हा निर्णय घेतला?" असा खडा सवाल करतात. डॉ. जनार्दन वाघमारे याला ''संस्कृतीच्या नावावर अंधश्रद्धा आणण्याचा प्रयत्न'' समजतात. कृ. प्र. वाईकरांसारख्या अगदी मोजक्या व्यक्तींनाच 'सरकारच्या उपक्रमाला पाठिंबा' द्यावासा वाटतो, तर संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर "ज्योतिर्विज्ञानाच्या सर्व अंगांचा निदान शोध घेऊनच याबाबत निर्णय घ्यावा" असा सबुरीचा सल्ला देतात. या सर्वच बाबतींत तर्कतीर्थांचं मत काय पडलं असतं हे त्यांच्या 'वैदिक संस्कृतीचा विकास' ह्या बहुमोल ग्रंथाची १९६ ते २००

ही पानं आपल्याला सांगतील. ''प्राचीन भारतातील गणित व फलज्योतिष या विद्या गणित ज्योतिषाचे भाग म्हणून प्रथम निर्माण झाल्या व वाढल्या. फलज्योतिष हे विज्ञान नव्हेच. अवलोकन व मोजमाप करून व केलेले अवलोकन तर्कशुद्ध रीतीने तपासून फलज्योतिष निर्माण झाले असे म्हणता येणार नाही. गणित व गणित ज्योतिष ही खरीखुरी विज्ञाने होत. बऱ्याच ज्योतिषग्रंथांमध्ये गणित व फलज्योतिष ही समाविष्ट केली आहेत. काहींनी गणित ज्योतिष व फल ज्योतिष यांवर स्वतंत्र पुस्तके लिहिली आहेत. वराहमिहिराची बृहत्संहिता हा फलज्योतिषावरील महत्त्वाचा ग्रंथ आहे. या मोठ्या ग्रंथात इतरही माहिती पुष्कळ आहे. भारतीयांच्या तत्कालीन धार्मिक व लौकिक जीवनाचे अध्ययन करण्याच्या दृष्टीने या ग्रंथाचे फार महत्त्व आहे.'' वरील अवतरण हे तर्कतीर्थीय विचारपद्धतीतील तौलनिक युक्ततेचा एक खासा नमुना आहे. यातील मार्गदर्शन सुस्पष्ट आहे. फलज्योतिष हे विज्ञान नाही; गणित ज्योतिष हे खरंखुरं विज्ञान आहे. बृहत्संहिता ही मुख्यत्वे फलज्योतिषाला वाहिलेली असली तरी त्यामुळे ती पूर्णपणे त्याज्य ठरत नाही, कारण तत्कालीन भारतीयांच्या धार्मिक व लौकिक जीवनाचे ऐतिहासिक पुरावे तिच्यात मिळतात.

या एकूण विचारप्रणालीसाठी मी पाली-बौद्धधर्मीय परिभाषा वापरतो. ही 'विभज्जवादी' (संस्कृत विभज्यवादी) विचारसरणी आहे. गौतमबुद्ध हा 'विभज्जवादी' होता. व्हिस डेव्हीडस व स्टीड यांचा पाली-आंग्लकोश या शब्दाचं स्पष्टीकरण 'The Religion of Logic And Reason' ('तर्क' व 'युक्तता' असणारा विचारसम्प्रदाय) असं देतो. 'तर्क-तीर्थ'ता (किंवा तर्कपावनता) ही तर्कतीर्थांच्या विचारसरणीची कायम बैठक होती. तर्कनिष्ठ, शास्त्रपूत, समंजस व व्यवहार्य विवेकशीलता हे त्यांच्या विचारांचं स्वरूप होतं. या विभज्यवादाच्या परिभाषेत तर्कतीर्थांच्या कार्याचा व वैचारिक योगदानाचा संक्षेपात, सूचकतेनं (Suggestivly) पण पूर्ण आढावा, मूल्यमापनासकट घेता येईल, असा माझा विश्वास आहे. हां! आता विभज्यवाद एकदा का आपणही स्वीकारला की तर्कतीर्थांच्या विचारातीलही ग्राह्य-अग्राह्यता आणि त्यांच्या कार्याच्या थोरवीबरोबरच त्यातील मर्यादा यांचाही उल्लेख अटळ ठरतो.

## 'स्वयं-बुद्ध' अथवा 'प्रत्येक-बुद्ध'

हा 'विभज्यवाद' शास्त्रीजी गौतम बुद्धापासून शिकले नाहीत. बुद्धाच्या ठिकाणी तो जसा स्वतः निर्माण झाला तसाच शास्त्रीजींच्या तार्किक चिंतनातून तो आपोआप अवतरला. याचमुळं शास्त्रीजींचे विचार कधीच एककल्ली ठरले नाहीत. मार्क्सवादाच्या परिपूर्ण अभ्यासानं त्यांच्यावर मार्क्सचा प्रभाव निश्चितपणे निर्माण झाला, पण ते 'मार्क्सवादी' कधीच बनले नाहीत. सिग्मंड फ्राइडचा मानसविश्लेषणवाद व्यवस्थित समजावून घेऊनही केवळ 'कामानुसारी मनोविश्लेषणा'शी ते थांबून राहिले नाहीत. मानवेन्द्रनाथ रॉय हे केवलानंदांनंतरचे त्यांचे दुसरे वैचारिक गुरू. 'नवमानवतावादी विचारसरणीचा विश्वाचा खराखुरा नागरिक होणं' या ध्येयानं शास्त्रीजी भारावून गेले होते यात संशय नाही. पण

विचारप्रसारणाच्या बाबतीतला रॉय यांचा काहीसा विक्षिप्त ढंग त्यांनी कधीच अंगीकारला नाही. रॉय यांच्या वैचारिक प्रसारातला मुख्य अडथळा खरा तर मानवेन्द्रनाथ रॉय हेच होते. प्रागतिक मानवतावादात अभिप्रेत असलेलं मानवाचं 'प्राथम्य' आणि 'श्रेष्ठत्व' हे शास्त्रीजींच्या मनावर चांगलंच ठसलं होतं; पण त्याचबरोबर प्राचीन भारतीय साहित्याच्या साक्षात्परिचयामुळे हेच तत्त्व महाभारताच्या शान्तिपर्वाच्या २९७ व्या अध्यायात 'गुह्यं ब्रह्म तदिदं ब्रवीमि न मानुषात् श्रेष्ठतरं हि किञ्चित्' (''रहस्यात्मक विचार सांगतो, तो असा की माणसाहून अधिक थोरवीचं असं काही नाही'') सांगितलं आहे हे ते जाणत होते. पण हे 'पुराण-वचन' रॉयना सांगण्यात हशील नाही, हे त्यांची व्यवहार-बुद्धी त्यांना सांगत होती. रॉयना भूतकालीन ध्येयांना मूलरूपात किंवा नवा वेष देऊन सादर करण्याबाबत एक प्रकारची ॲलर्जी होती. (वैसंवि., पृ. ४६८), भूतकाळाच्या अवशेषांचा जीर्णोद्धार करण्यानं भूतकाळाची बंधनं अधिकच बळकट होतात अशी त्यांची धारणा होती. म्हणूनच 'जुने जाऊ द्या मरणालागुनि' या वृत्तीचा अतिरेक करणाऱ्या आपल्या गुरुजींना काही सांगण्याच्या फंदात न पडता त्यांच्या प्रतिपादनातील ग्राह्यांश स्वीकारून त्यांच्याविषयी मार्मिकपणानं मीमांसकांच्या 'अर्थवाद' शैलीचा अवलंब करून शास्त्रीजी लिहितात, "जुन्या व नव्या देवांच्या विरोधी, धाडसी व मूर्तिभञ्जक प्रवृत्तीचा कळस म्हणजे मानवेन्द्रनाथ रॉय.'' (तेथेच).

आपल्या मौलिक "वैदिक संस्कृतीचा विकास" या ग्रंथाच्या समर्पणपत्रिकेवर शास्त्रीजी उद्धृत करतात नेमका ऋग्वेदातील विरुद्ध आशयाचा अर्थगर्भ मंत्र- "अयं पन्था अनुवित्तः पुराणो यतो देवा उदजायन्त विश्वे" (ऋग्वेद ४.१८.१)

("हा अनुसरलेला प्राचीन मार्ग आहे. यात सर्व देव प्रकट झाले आहेत.")

सिग्मंड फ्रॉइड हा विश्लेषणर मानसशास्त्राचा प्रवर्तक मानला जातो. शास्त्रीजी फ्रॉइडवर पडलेल्या संभाव्य बौद्ध प्रभावाविषयी प्रतिष्ठित तर्क बांधू इच्छितात. बुद्धाच्या योगविद्येचं भाषान्तराद्वारा त्यानं अध्ययन केलं असावं असं सुचवतात. (वैसंवि. पृ. १८१). मला त्यांचं हे संशोधन फार मोलाचं वाटतं. जर्मन तत्त्वज्ञ शॉपेनहॉवर याच्या तत्त्वज्ञानावर 'ऑउफनिखाट्' (उपनिषदं) यांच्या फारसी-ग्रीक अशा माध्यमांद्वारा निर्माण झालेल्या भाषांतराची विलक्षण छाप होती. कामवृत्ती (Libido) आणि त्याचबरोबर निर्वाण तत्त्वाचं (Nirvana Principle) आकर्षण असं एक गृहीतक स्वीकारूनच फ्रॉइडनं 'सुखाकर्षण तत्त्वाच्या पलीकडे' (Beyond Pleasure Principle) हा सिद्धान्त मांडला असावा असं म्हणतात. तर्कतीर्थांच्या 'मूलगामी' विचारसरणीचं मला फार अप्रूप आहे. बुद्धाच्याही अगोदर जीवात्म्याची नैसर्गिक स्थिती ही 'काममयोऽयं पुरुषः' (बृहदारण्यक ४.४.५) अशी असल्याचं उपनिषदांनी केलेलं प्रतिपादन ते आपल्या नजरेस आणून देतात. विभज्यवादाप्रमाणेच 'मूळ हुडकून काढण्याच्या प्रवृत्तीला' बौद्ध परिभाषेत एक खास नाव आहे- 'योनिसो मनसिकार' ('योनिशः मनस्कार'

Radical Thinking म्हणजे मूळ 'मनस्कार' म्हणजे विचार). "शास्त्रीजी, तुम्ही या पाली-बौद्ध वचनाची उपनिषदातील 'यथान्यायं यथायोनि' या पदावलीत आहे असं दाखवून दिलं असतं मला अधिक आनंद झाला असता" असं मी म्हटलं की शास्त्रीजी खुलायचे आणि माझ्या हातावर टाळी द्यायचे. पाली त्रिपिटकातलं "अलायरामा खो पनायं पजा, आलयरता", 'आलयसम्मुदिता' म्हणजे 'ही सर्व प्रजा कामरामा, कामरता' आहे या अर्थाचं वाक्य सांगितलं की मी फारच काही मोलाचं सांगतो आहे असा आविर्भाव करून मला ते तिथल्या तिथं लिहून द्यायला सांगत.

## मार्क्सवादाचं भारतीय वृत्तीनं आकलन

शास्त्रीजी मूळ वैदिक पठडीतील, संस्कृतचे निष्णात विद्यार्थी. 'स्मृती' म्हणजे धर्मशास्त्राचे विशेष अभ्यासक. आपले गुरू केवलानंद सरस्वती (नारायणराव मराठे) यांच्याबरोबर स्मृतीची पारायणं करून त्यांनी धर्मकोशाच्या खंडांचं संपादन केलं. या पार्श्वभूमीवरच पुढे इंग्रजीचा परिचय करून घेऊन 'मार्क्सवाद' त्यांनी समजावून घेतला. मनाची भूमी भारतीय विचारांच्या सरींनी भिजलेली. तिच्यात 'जडवाद', 'विरोधविकासवाद', 'उत्पादन साधनांचं महत्त्व', 'साम्यवाद' अशा पदांच्या बिया पेरल्या गेल्या. सगळयांत जास्त पीक फोफावलं ते 'धर्माची चिकित्सा हीच सर्व प्रकारच्या चिकित्सेचं मूळ आहे' ह्या विचारसरणीचं. नागपूरला १९४१ साली म्हणजे वयाच्या ४१ व्या वर्षी परांजपे व्याख्यानमालेत हिंदुधर्माची जी चिकित्सा शास्त्रीजींनी केली त्यावर मार्क्सवादाची गडद छाया होती. कै. मे. पुं. रेगे प्रभृतींनाही असंच जाणवलं आणि तशा प्रकारची कबुली खुद्द शास्त्रीजींनीही प्रांजळपणानं दिलेली होती. पण शास्त्रीजींच्या स्वतःच्या या कबुलीनं आपण फार चकून जाऊ नाही, अस मला वाटतं. जडवाद हा भारतीय सांख्यप्रणालीत, लोकायतदर्शनात आणि बऱ्याच प्रमाणात वैशेषिकांच्या 'धर्मा'मध्ये अभिप्रेत आहे, हे शास्त्रीजी निश्चितच जाणत होते, कॉम्रेड रघुनाथ कऱ्हाडकर उपनिषदांत 'विरोधविकासवाद' असल्याचा सातत्यानं दावा करीत होते, म्हणूनच शास्त्रीजींच्या विचारांवर मार्क्सच्या 'वादा'चा प्रभाव होता, असे म्हणण्यापेक्षा मार्क्सवादी विचारपद्धतीची, परिभाषेची व विश्लेषक शैलीची मोहिनी होती असं म्हणणं मला जास्त रास्त वाटतं. पुढे पुढे ही मोहिनीही कमी होऊ लागली. मूळ भारतीय आध्यात्मिक श्रेष्ठतेची मनावरची पकड अधिक वाढू लागली. केवळ भाकरीच्या भुकेहूनही आणखी कसली तरी अनामिक भूक व तहान खरोखरीच असू शकते याचं भान येत गेलं. या सर्व नवीन मानाचं एक फार सुंदर वैचारिक फळ म्हणजे शास्त्रीजींचा वैदिक संस्कृतीचा विकास हा परिपूर्ण ग्रंथ. या एका पुस्तकाच्या वाचनानंही समग्र 'तर्कतीर्थ दर्शन' घडेल असं मला वाटतं. इथली 'कबुली' जास्त मोलाची आहे. ती म्हणजे "आध्यात्मिक किंवा वैचारिक स्थिर मूल्यांची शक्ती समाजातील भौतिक प्रवृत्तीवरही आधिपत्य गाजवू शकते." मार्क्सवादाच्या पलीकडची शास्त्रीजींची ही धारणा 'उजव्या' आणि भारतीय विचाराच्या

समर्थकांना कमालीची आवडेल अशीच आहे. तपशिलाचा फार प्रपंच न करता आणखी एक गोष्ट सांगू इच्छितो. आयुष्यात प्रथमपासून शेवटपर्यंत शास्त्रीजी आपल्या लेखनातून व भाषणातून एका विचाराचा सातत्यानं प्रसार करत होते. 'धर्ममीमांसा' किंवा 'सातत्यानं धर्माची प्रागतिक चिकित्सा' व त्याबरोबरीनं धर्मग्रंथांचं अनेकविध निकषांनी केलेलं नवंनवं अर्थापन हे हिंदुधर्माचेच वैशिष्ट्य आहे. विधान स्वच्छ, पूर्णपणे ऐतिहासिक व सुखावह आहे. "अहो, कसला फ्रॉइड अन् कसला मार्क्स? सरतेशेवटी पिंपळनेरच्या मातीतले आणि वाईच्या गंगातीर्थी स्नान करणारे, नेसूचं धोतर अन् गळयात जानवं असलेले यजुर्वेदी जोशीच ते!'' असं याबाबत कोणी म्हटलं तर झटकन प्रतिक्रिया देण्यात मी बहुतेक वेळा अयशस्वीच झालो आहे. गमतीनं कोणाला असं म्हणावसं वाटल्यास म्हणावं, पण शास्त्रीजींना एवढं संकुचित करू नाही, असं मला मनापासून वाटतं. त्यांच्यावरचा 'विश्वाचा नागरिक होण्याचा' मानवेन्द्रनाथी संस्कार कधीही पुसला गेला नाही.

### सर्वधर्मीय मैत्री

हिंदुसंस्कृती म्हणजे वैदिक संस्कृतीचाच काळाच्या ओघात झालेला सर्वसमावेशक विस्तार ही शास्त्रीजींची धारणा होती. त्यातील 'धर्ममीमांसा' तत्त्वाविषयी त्यांना सार्थ अभिमान असला तरी फादर लेदर्ले, फादर डीसा, सेठ नोएल यांसारखी किरिस्ताव मंडळी, डॉ. आंबेडकर, लामा रिन पोछे यांसारखे बौद्ध व हमीद दलवाई, मेहरुन्निसा दलवाई, सय्यदभाई, मुमताज़ रहिमतपुरे यांसारख्या इस्लामधर्मीयांशी त्यांचे जिव्हाळयाचे संबंध होते. त्यांचा विश्वास तत्त्वबोधपर वादावर होता; वृथा विवादावर व 'वितण्डे'वर नव्हता. एकदा संकेश्वरच्या शंकराचार्यांशी त्यांची जुंपली होती. प्रशासकीय निर्णयामुळे कै. डी. के. बेडेकर विश्वकोशाविरुद्ध न्यायालयात गेले होते. आचार्य अत्र्यांच्या बोलण्यात व लेखनात 'तर्कतीर्थ' या पदाचा वेगळाच पाठ यायचा. या क्षुल्लक वादांचा तर्कतीर्थांनी कधीच बाऊ करून घेतला नाही. वाद चिघळू दिले नाहीत. त्यामुळे अत्रे-माटे, अत्रे-फडके अशा स्वरूपाचे शाश्वतिक विरोध त्यांच्याबाबत निर्माण झाले नाहीत. भारतीय मुस्लीम समाजाविषयीचे तर्कतीर्थांचे विचार तर मोठे उदारपणाचे आहेत. ते म्हणतात, "एका संस्कृतीतील माणसे दुसऱ्या संस्कृतीच्या समाजात गेल्यास त्या संस्कृतीशी तद्रूप होतात, मग ती माणसे कोणत्याही वंशाची असोत. उदाहरणार्थ, भारतीय मुसलमान'' ('वैदिक संस्कृतीचा विकास' आवृत्ती ३ री १९९६, पृ. ७-८)

### व्यापुनि विभज्यवादा शास्त्री 'दशांगुळे' उरले!

'गाळीव' मार्क्सवाद, 'निवडक' नवमानवतावाद व 'आंशिक' फ्रॉइडवाद ही तर्कतीर्थांच्या विभज्यवादी वृत्तीची निदर्शने झाली. पण विभज्यवाद व्यापूनही तर्कतीर्थ 'दहा अंगुळे' उरतात याचं भान आपण ठेवलं पाहिजे. या त्यांच्या कर्तृत्वाचा एक फार मोठा हिस्सा म्हणजे त्यांचे मराठीला योगदान.

## मराठीला योगदान

शास्त्रीजी मूळचे संस्कृतचे, पण जीवनभर अधिक रमले ते मराठीच्या गोतावळयात. १९३४ साली त्यांनी 'शुद्धिसर्वस्वम्' म्हणून एक छोटासा संस्कृत प्रबंध लिहिला होता. त्याला फारशी प्रसिद्धी मिळाली नाही. सहकाऱ्यांच्या साहाय्यानं भारतीय राज्य घटनेचा संस्कृत अनुवाद त्यांनी सादर केला. याखेरीज प्रत्यक्षात संस्कृतमध्ये लेखन त्यांनी केले नाही. काही मोजक्या वादसभांत संस्कृतमध्ये जेवढे बोलले त्या पलीकडे संस्कृतभाषणाकडेही त्यांनी कधी ओढा दाखवला नाही. प्राचीन स्मृतिसाहित्य, वेदांपासून ते जगन्नाथापर्यंतच्या साहित्याचे आलोडन, 'आनंदमीमांसा' (१९३८), 'हिंदुधर्माची समीक्षा' (१९४१), 'वैदिक संस्कृतीचा विकास' (१९५१) ही संस्कृत विचारधनावरील मराठीत, मराठी माणसांसाठी लिहिलेली पुस्तके आहेत. 'जडवाद' (१९४१), 'ज्योति-निबंध' (१९४७), 'आधुनिक मराठी साहित्याची समीक्षा व रससिद्धांत' (१९७३), 'राजवाडे लेखसंग्रह' (१९७३) व 'लो. टिळक लेखसंग्रह' (१९७६) या संपादनग्रंथांना दिलेल्या विवेचक प्रस्तावना आणि 'सर्वधर्मसमीक्षा' (१९८४) हे सर्व लेखन मराठीतच आहे. डॉ. रा. चिं. ढेरे यांच्या इतक्या आग्रही वृत्तीनं नाही तर काहीशा स्वतःच्या सोयीच्या दृष्टीनं म्हणा, तर्कतीर्थांनी जे मराठीत लेखन केलं त्यामुळे शास्त्रीय विषयदेखील मराठीत किती समर्थपणानं मांडला जाऊ शकतो आणि वाचकांपर्यंत सुबोधरीतीनं पोहोचवला जाऊ शकतो याचा एक आदर्शपाठ सहजपणे मिळाला. मराठी विश्वकोश तर ह्यांचं दुसरं आणि फार बोलकं व प्रत्ययकारी उदाहरण आहे- शास्त्रीजींचं मराठी शुद्ध, सोपं, लहान वाक्यांनी घडवलेलं, रामदासी पद्धतीचं, रोखठोक शैलीचं आणि रोचक आहे. इतरांच्या लेखनाबाबत ''गुंतागुंतीची वाक्यरचना विदग्धतेची द्योतक असते" असं प्रशंसापर लिहिणारे शास्त्रीजी स्वतःची अतिशय प्रगल्भ वाक्यरचना गुंतागुंतीपासून सतत दूर ठेवू शकले. परभाषीय शब्दांचे त्यांचे मराठी अनुवाद फार 'समर्थ' आहेत. Indology म्हणजे 'भारतीय विद्या' नव्हे, 'भारतविद्या'; Anthropology म्हणजे 'मानववंशशास्त्र' नव्हे, 'मानवशास्त्र'. संस्कृत शब्दांचे मराठीतील अर्थ ते आवर्जून सांगत असत, कटूपासून मराठीत 'कडू' शब्द आला खरा, पण संस्कृत 'कटू' म्हणजे तिखट, 'तिक्त' पासून मराठीत 'तिखट' शब्द आला, पण मूळ 'तिक्त' म्हणजे कडू. पु. ल. तर्कतीर्थांना नेहमी एक आग्रह करायचे, ''तुम्ही आत्मचरित्र लिहा.'' पण हे लेखन करण्याचा विचारही कधी शास्त्रीजींच्या मनाला शिवला नाही. जाहीर सभेत शास्त्रीजी भाईंना म्हणाले, "अहो, आत्मचरित्र लिहिणं सोपं नसतं. त्यात स्वतःला फार 'उघडं करावं लागतं.' 'उघडं' म्हटल्यावर पुलंनी नेहमीप्रमाणे चश्म्याच्या वरच्या भागातून पाहत भिवया प्रश्नार्थक रीतीनं उंचावल्या. त्यावर शास्त्रीजी म्हणाले, "आपण एकटेच जगत नसतो. स्वतःला 'उघडं' करताना स्वतःबरोबर जे जे 'बसले' त्यांनाही 'उघडं' करावं लागेल" आणि यावर मात्र भाई खदखदून हसले. माझी शास्त्रीजींकडून तशी माफक अपेक्षा होती. 'मधुस पत्रे' अशा

प्रकारचं 'पत्रलेखन' त्यांनी करावं असं वाटायचं. एवढा अनुभव, एवढे वाचन, एवढी विद्वत्ता असतानाही तर्कतीर्थ 'बाळबोध', 'उपदेशपर' असं फार बोलत नसत. याचमुळे अपवादस्वरूप असलेल्या त्यांच्या मधुला (थोरल्या मुलाला ) लिहिलेल्या पत्रातला (८.१२.८१) मजकूर मला उद्धृत करावासा वाटतो.

"जीवन हे एक अंतिम मूल्य आहे. आई-बापांपासून निरोगी व अव्यंग काया लाभावी; आरोग्याचे नियम पाळावे, पृष्ठवंशाच्या दोन टोकांना (जीभ व उपस्थेन्द्रिय) सांभाळावे म्हणजेच मिताहार-विहार असावे. ह्या दोन टोकांना विवेकाने सांभाळण्यात ज्याला यश येते तो मानसिक व शारीरिक जीवन विवेकयुक्त होऊन जगतो." या एका छोट्या उताऱ्यात काय नाही? योग आहे. आयुर्वेद आहे, समग्र जीवनयोगच आहे.

शास्त्रीजींनी आत्मचरित्र लिहिलं नाही. एवढंच नाही तर 'श्री विद्ये'च्या मधुकाकांना ज्या ग्रंथलेखनाचं आश्वासन त्यांनी दिलं ते 'शंकराचार्य चरित्र'ही ते लिहू शकले नाहीत. याला कारण आलस्य नव्हतं (ते त्यांच्याकडे कधीच नव्हतं), तर ऐतिहासिक विश्वसनीय आधार त्यांना शोधूनही सापडेनात. जवळजवळ सगळे 'शांकर-दिग्विजय' त्यांनी तपासून पाहिले. अनेक ठिकाणी मीच त्यांच्याबरोबर होतो. माझं मन काही संदर्भांच्या बाबतीत उचल खायचं, पण त्या संदर्भांनी त्यांचं समाधान व्हायचं नाही. आता भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिराच्या द्वारा डॉ. वा. रा. अंतरकरांचे शंकराचार्यांच्या जीवनावरचे पुस्तक माझ्या प्रस्तावनेसकट छापलं जाणार आहे. मला खात्री आहे शास्त्रीजी असते तर त्यांनी त्यातील कित्येक भागांबाबत स्वच्छपणे असहमती व्यक्तवली असती.

### ज्ञानसिंधूच्या मर्यादा

संस्कृतविषयक अनेक सन्मान शास्त्रीजींना लाभले. राष्ट्रीय संस्कृत पंडित (१९७३), राष्ट्रीय संस्कृत संस्थानाचे सदस्यत्व, संस्कृतविषयक कार्यासंबंधी राजस्थान संस्कृत संस्थानचा गौरव (जयपूर १९). संस्कृतशी संबद्ध संस्थांचे ते अध्यक्षही होते (वैदिक संशोधन मंडळ व भांडारकर संशोधन संस्था). पण अखिल भारतीय प्राच्यविद्या परिषद किंवा विश्वसंस्कृत सम्मेलन यातील एखाद्या विभागाचेही अध्यक्षत्व त्यांना लाभले नाही. मग साधारण अध्यक्षपद (General Presidentship) तर सोडाच ! खरं तर १९८३ साली 'इलस्ट्रेटेड वीकली'नं पन्नास नामांकित व्यक्तींमध्ये गणलेल्या सहा महाराष्ट्रीय व्यक्तींमध्ये शास्त्रीजींचा समावेश होता; पण हा मानाचा निर्देशच म्हणायचा! प्रत्यक्षात महाराष्ट्राची सीमा ओलांडून, अखिल भारतीय पातळीवरही त्यांचे विचार फारसे पोहोचू शकले नाहीत. जागतिक पातळीवर तर नाहीच नाही. या मर्यादेचं कारण त्यांचं लेखन व भाषण हे मुख्यत्वे मराठीतच झालेले आहे. मराठीला त्यांनी योगदान केलं; मराठीनं त्यांना दिल्लीच्या मराठी साहित्य संमेलनाचं अध्यक्षपद दिलं; पण शास्त्रीजी मराठी भाषक व महाराष्ट्र यापुरतेच मर्यादित राहिले हे मान्य करायला हवं. त्यांनी स्वतः मान्य केलं असतं. महत्तेचं मूल्यमापन

करताना नेहमी ध्यानात धरायला हवं की, किनारा महासागरालाही असतो. शास्त्रीजींच्या मर्यादा म्हणजे ज्ञानसिंधूच्या सीमा. कै. मे. पुं. रेगे त्यांच्या काही लेखनाचे इंग्रजी भाषांतर करण्याचा मनसुबा अनेकदा व्यक्त करीत असत; पण त्यानंही फार काही साधलं जाईल, असं मला वाटत नाही. गडकरी इंटरही होऊ शकले नाहीत, पण गडकऱ्यांची नाटकं एम. ए. ला अभ्यासविषय म्हणून लावली जातात व त्यांच्या साहित्यावर शोधप्रबंधही लिहिले गेले आहेत, हे सर्व मान्य करूनही गडकऱ्यांच्या लेखनात इंटरपलीकडच्या औपचारिक शिक्षणाचे महत्त्वाचे संस्कार दिसत नाहीत हेही जाणवतं. या जाणिवेला विभज्यवादी मान्यता द्यायला हवी. तर्कतीर्थांचंही आंग्लपद्धतीनं महाविद्यालयीन शिक्षण झालं असतं तर त्यांच्या कर्तृत्वाला 'चार चंद्रांची कला' प्राप्त झाली असती. जागतिक थोरवीची चमक दमक आली असती. मात्र याचा अर्थ इतर कोणतीच पदवी नसल्यानं मराठी माणसांनी त्यांचा मान राहावा म्हणून त्यांना आयुष्यभर 'तर्कतीर्थ' म्हणून संबोधलं असं मानू नये. तर्कतीर्थ रघुनाथशास्त्री कोकजे यांच्यासारख्यांनी 'तर्क' वा 'न्याय' या विषयावर स्वतंत्र पुस्तके लिहिली. विश्वकोशातली एक 'न्यायदर्शन'विषयक नोंद एवढंच काय ते शास्त्रीजींचं या विषयीचं लेखन. पण न्यायविषयी प्रभूत लेखन करूनही विचारात 'न्यायदोष' राहू शकतात. तर्कतीर्थांचे विचार (केवळ शब्दावर कोटी म्हणून म्हणत नाही) मात्र खरोखरच सदैव 'न्याय-पूत' होते. वाईच्या गंगातीर्थीच्या या तर्कतीर्थानं मराठी विचारसरणीला शास्त्रपूतता आणली. मला हे खरंखुरं 'शुद्धि-सर्वस्व' वाटतं. वैचारिक शुद्धी ही खरीखुरी शुद्धी.

दत्तोपंत पोतदार असताना व विशेषतः ते निवर्तल्यावर महाराष्ट्रातील सर्वविध सभा सम्मेलनांचा एक अधिकारी अध्यक्ष म्हणून जे कार्य मराठीबाबत तर्कतीर्थांनी केलं आहे ते केवळ अजोड आहे. वादाच्या भरात टोकाच्या भूमिका घेतल्या जातात, कलायला लागतात, त्यांना टेकू देणं गरजेचं होतं, लाकडी विचारांच्या निबर गाठींवर रंधा फिरवून, त्यांना 'गोलाई' देऊन त्या विषयीचा एक समतोल, समंजस, तर्कपूत ‘विभज्यवादी’ विचार समाजापर्यंत पोहोचविण्यात शास्त्रीजी विलक्षण यशस्वी झाले. आज म्हणायचं तर विशेषकरून बिहार व उत्तर-प्रदेश या प्रांतांना, पण खरं तर भारतातील प्रत्येक प्रांताला एका तरी तर्कतीर्थाचा लाभ जरी झाला तरी हा बुद्धाचा भारत ‘सुबुद्ध’ व्हायला फार मोठी मदत होईल. अजूनही हवा आहे तो एक अभ्यासू ‘विभज्यवादी विचारवंत.’

**(महाराष्ट्र साहित्य पत्रिका, एप्रिल-मे, जून-२००१)**

ooo

## ४३.

# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : धर्मसुधारणा आणि समाजसुधारणा

### स. मा. गर्गे

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा परिचय होण्याची संधी मला औरंगाबाद येथे होणाऱ्या व्याख्यानमाला, ग्रंथालयाची कामे इत्यादी कार्यक्रमांच्या निमित्ताने मिळाली. अशा कामांमध्येही निजाम राज्यात अनेक निर्बंध असत. पण त्यातून काही मार्ग काढत तरुण मंडळी वाङ्मयीन मंडळाच्या नावाखाली राजकीय विचार प्रसाराची कामेही करीत असत. पण अशा कामांनाही अध्यक्ष मिळणे दुर्मीळ असे. कायदा असा की संस्थानबाहेरचा वक्ता कोणीही असो, सभेचा अध्यक्ष मात्र संस्थानातील असला पाहिजे. तोच जबाबदार धरला जाई. त्याच्यावर खटला भरला जात असे. व्याख्यानाचे विषय व शब्दाचे अर्थ यांचा अर्थ नीटसा न कळल्यामुळे आणि समजला तरी, त्याचा अर्थ विपर्यास करून सभेच्या अध्यक्षाला कोर्टात खेचले जात असे. त्यामुळे संस्थान बाहेरचा वक्ता भाषण करून निघून जात असे; पण सभेचा अध्यक्ष मात्र दोषी ठरवला जाई. अशा स्थितीत सभेचा अध्यक्ष व्हावयास कोणी तयार होत नसे. असेच एकदा आम्ही तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना निमंत्रित केले होते. व्याख्यानाचा नियोजित कार्यक्रम संपल्यानंतर पुढे दोन दिवस त्यांना मुक्काम करण्याचा आग्रह केला आणि त्या त्यांच्या मुक्कामात व आमच्या अभ्यासवर्तुळात त्यांच्याशी चर्चा करण्याची संधी घेतली. त्यांच्या दोन दिवसांच्या अनेक विषयांचे विवेचन केले. समाज, धर्मकारण, राजकारण असे सर्वच विषय चर्चेच्या ओघात शास्त्रीजींकडून आम्हाला समजून घेता आले. दुसऱ्या महायुद्धाचा तो काळ होता आणि युद्धाला अनुकूल, प्रतिकूल अशी दोन्ही बाजूंची चर्चा होत असल्यामुळे युद्धातील संभाव्य जयापजयाची आणि युद्धानंतरच्या भारताच्या पुनर्रचनेसंबंधी विविध अंगांनी चर्चेत परामर्श घेतला जात असे. शास्त्रीजींचा अभ्यास प्राचीन, अर्वाचीन विषयांचे ज्ञान आणि अस्खलित वक्तृत्व यांच्यामुळे अभ्यास वर्तुळात खूपच विषयांची होणारी चर्चा आम्हाला उपयोगी पडत असे. त्यामुळे त्यांचा परिचय बराच वाढला. आणि मग दोन-तीन वेळा आम्ही त्यांच्या व्याख्यानाचा आनंद घेतला.

मी १९५० मध्ये पुण्याला आलो. त्यानंतर शास्त्रीजी पुण्यात आले की आवर्जून त्यांची भेट घेत असे. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर शास्त्रीजींनी 'विश्वकोश' संपादनाची जबाबदारी स्वीकारली होती. त्यात लेख लिहिण्याची संधीही मला मिळाली. इ. स. १९८६ मध्ये मी संपादन केलेल्या 'भारतीय समाज विज्ञान कोशा'च्या पहिल्या खंडाचे प्रकाशन त्यांच्याच हस्ते झाले. अशा अनेक कारणांनी झालेल्या भेटीगाठींमुळे शास्त्रीजींचे सांस्कृतिक, राजकीय, सामाजिक विचार ऐकण्याची संधी मिळत असे हे सद्भाग्यच म्हटले पाहिजे.

***

पुणे आकाशवाणी केंद्रावर ५-११-२००० रोजी 'तर्कतीर्थ व धर्मसुधारणा' या विषयावर मी अलीकडेच भाषण केले. त्यात शास्त्रीजींचा या विषयासंबंधी कोणता दृष्टिकोन होता याचे विवेचन करण्याचा योग आला.

## धर्मशास्त्राचे चिकित्सक अभ्यासक

महाराष्ट्राचे थोर तत्त्वचिंतक आणि संस्कृतचे गाढे पंडित तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी धर्मशास्त्राचे चिकित्सक अभ्यासक होते आणि सामाजिक सुधारणांचे पुरस्कर्तेही होते. मराठी विश्वकोशाचे मुख्य संपादक म्हणून आरंभापासून अनेक वर्षे त्यांनी संपादन कार्य केले. तसेच समाज, संस्कृती, भौतिकवाद, तत्त्वज्ञान इत्यादी विषयांवर त्यांनी ग्रंथलेखनही केले आहे. वाईच्या प्राज्ञ पाठशाळेत स्वामी केवलानंद सरस्वती यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी न्याय वेदान्तादी प्राचीन विषयांचे अध्ययन केले. कलकत्त्याच्या संस्कृत महाविद्यालयाने त्यांना तर्कतीर्थ ही पदवी दिली. प्राचीन शास्त्राप्रमाणेच त्यांनी आधुनिक पाश्चात्त्य ज्ञान-विज्ञानाचे व्यापक अध्ययनही केले होते.

अशा या थोर प्रकांडपंडिताच्या धर्मसुधारणेसंबंधी विचार व्यक्त करताना त्यांच्या अभ्यासाची ही पार्श्वभूमी लक्षात घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात धार्मिक व सामाजिक सुधारकांची एक थोर परंपरा आहे. त्यात लोकहितवादी, महात्मा फुले, न्या. महादेव गोविंद रानडे, गोपाळ गणेश आगरकर, लोकमान्य टिळक, डॉ. भांडारकर, कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या तेजस्वी, बुद्धिमान व्यक्तींचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. त्यांनी परंपरागत रूढी, चालीरिती, धार्मिक पूजाप्रकार या सर्व कर्मकांडांतून निर्माण होणारी अंधश्रद्धा, जातीयता, स्पर्शास्पर्श यांसारख्या अनेक प्रकारांवर प्रखर टीका केली आहे. अशा रूढिग्रस्त व्यवहारालाही धार्मिक आधार असल्याचे सांगण्यात येते. पण हे सर्व अर्थहीन व्यवहार आधुनिक विचारांच्या, ऐहिक जीवनाच्या आणि मानवी प्रगतीच्या दृष्टीने निरर्थक आहेत, किंबहुना सामाजिक परिवर्तनाला निर्बंधित करणारे आहेत असे त्यांनी म्हटले आहे.

असे सर्व प्रकार धर्मसुधारकांनी व सामाजिक सुधारकांनी स्पष्टपणे त्याज्य मानलेले आहेत. तर्कतीर्थ शास्त्रीजींनी अशा प्रगती विरोधी रूढीसंबंधी असे म्हटले आहे की 'पाश्चात्त्य

संस्कृतीचा सार्वत्रिक प्रभाव ब्रिटिशांनी भारतात राज्यशासन केल्यापासून पडू लागला. भारतीय संस्कृतीवर पाश्चात्त्य संस्कृतीचा आघात प्रथम शिक्षण पद्धतीच्या प्रवेशामुळे झाला. धर्मपरिवर्तन, संस्कृती परिवर्तन होण्यासाठी विचारांचे व मनाच्या संस्कारांचे परिवर्तन व्हावे लागते. त्या परिवर्तनाचे कार्य ब्रिटिश सत्ता आणि त्यांची शिक्षणपद्धती यांच्यामुळे सुरू झाले असे म्हणावे लागते. धर्मपरिवर्तनाच्या आंदोलनामुळे जुन्या जीर्ण विचारांना व अंधश्रद्धांना खिळखिळे केले. नव्या उच्च विचारांच्या व्यापक श्रद्धा निर्माण झाल्या.'

## आपण पराभूत व परतंत्र का झालो?

''आपण पराभूत व परतंत्र का झालो याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे आपल्या सामाजिक रूढींनी आपल्या प्रगतीचा मार्ग अनेक शतके रोखून ठेवला. समाजाची शक्ती धार्मिक कर्मकांडात आणि व्रत वैकल्यांत अडकून पडली. यामुळे हिंदू समाज रूढींच्या अंधारात चाचपडत राहिला. तो दुर्बल होत गेला. प्रथम मुसलमानांच्या आक्रमणाने तो जर्जर झालाच होता. ब्रिटिशांच्या नव्या औद्योगिक व वैज्ञानिक प्रगतीने भारतीय समाजाला आत्मसंशोधन करण्याची नवी दृष्टी दिली.''

इंग्रजी शिक्षण पद्धतीने परंपरागत भारतीय संस्कृतीच्या जीवनमूल्यांची समीक्षा करणारी सुशिक्षितांची नवी पिढी निर्माण झाली. त्यांतून महाराष्ट्रात एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात आधुनिक प्रबोधनाचे दोन थोर प्रणेते पुढे आले. ते म्हणजे लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख व महात्मा जोतीराव फुले.

पण त्याहीपूर्वी अठराव्या शतकाच्या अखेरीस बंगालमध्ये धर्मसुधारणांचा आरंभ राजा राममोहन रॉय यांनी केला होता. त्यांनी ब्रह्म समाजाची स्थापना केली व जीर्ण धार्मिक रूढींना आणि कालबाह्य श्रद्धांना प्रखर टीकेचे लक्ष्य बनविले. त्याबरोबरच धार्मिक सुधारणेची आवश्यकताही आग्रहाने प्रतिपादन केली. त्यासाठी समाजाला शुद्ध नैतिक विचारांचे महत्त्व पटवून दिले. मंत्र, तंत्र, तीर्थस्थाने, मूर्ती आणि मंदिरे यांच्यामुळे अंधश्रद्धा दृढ होतात, हे समाजाला सांगितले. त्यामुळे सुशिक्षित वर्गात बुद्धिवादाचा प्रचार वाढू लागला. त्या विचाराचा प्रचार आणि प्रसार महाराष्ट्रातही होण्याची गरज तत्कालीन सुशिक्षितांना जाणवू लागली. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनी महाराष्ट्रात 'प्रार्थना समाज' स्थापन करून ब्रह्म समाजाच्या विचारांना शुद्ध धार्मिक तत्त्वाची बैठक दिली. गुजराथमध्येही स्वामी दयानंद सरस्वती यांनी 'आर्य समाज' स्थापन करून वेदविद्येचा प्रसार शुद्ध पद्धतीने सुरू केला. थोडक्यात, बंगाल, महाराष्ट्र आणि गुजराथ या तीनही प्रदेशांत धर्म सुधारणेची चळवळ वाढू लागली. या तीनही संस्थांच्या कार्यात आणि प्रमुख उद्देशात काही फरक जाणवत असला तरी, त्या सर्वांत मूर्तिपूजा, अवतार कल्पना, जातिभेद, स्पर्शास्पर्श यांचा निषेध केलेला आढळतो. अशा व्रतवैकल्याने आणि रूढी प्राबल्यामुळे धर्माचे खरे स्वरूप जाणवत नाही. म्हणून या सर्व रूढी निषेधार्ह आहेत, अनावश्यक आहेत. या संबंधी या तीनही संस्थांची

सामान्यतः एकवाक्यता होती. पुराणात भाकडकथा आहेत आणि स्मृती ग्रंथात स्त्रिया आणि अस्पृश्य यांच्यावर अन्याय केलेला आहे. या धार्मिक-सामाजिक विचारांवर त्यांचे एकमत होते. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात नव्या विद्येच्या अशा वैचारिक प्रकाशापासून सुशिक्षित वर्गाने प्रेरणा घेतली.

## तरुण वर्गाच्या विचारावर परिणाम

अशा सर्व नव्या प्रगतिपर विचारांचा परिणाम महाराष्ट्रातील सुशिक्षित वर्गावर होणे अपरिहार्य होते. महात्मा फुले यांचा सत्यशोधक समाज आणि न्या. रानडे यांचा प्रार्थना समाज यांच्यामुळे मराठी प्रदेशात धार्मिक सुधारणांची भूमिका अधिक स्पष्ट झाली, दृढ होत गेली. त्यातून परिवर्तनवादी व्यक्ती आणि संस्था वाढू लागल्या. नव्या विचारांचा आणि विद्येचा प्रसार होऊ लागला. सुधारणावादी नवी पिढी तयार झाली.

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात तरुण वर्गावर अशा सुधारणावादी विचारांचा प्रभाव अधिक वाढू लागला. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा त्या पिढीतील सुधारणावादी विचारवंतांत प्रामुख्याने समावेश करावा लागेल. त्यांच्या समकालीन विचारवंतांची भूमिका नवी विद्या आणि पाश्चात्त्य सांस्कृतिक जीवनपद्धती यांवर आधारलेली होती.

शास्त्रीजींनी वेदान्ताचा आणि प्राचीन संस्कृत भाषेतील ग्रंथांचा सखोल अभ्यास केलेला होता. त्यांनी हिंदू धर्माचे तत्त्वज्ञान आत्मसात केलेले होते. शिवाय, आधुनिक पाश्चात्त्य ज्ञान-विज्ञानाचेही त्यांनी अध्ययन केलेले होते. त्यामुळे एकीकडे त्यांना जुन्या धार्मिक व्यवहारातील दोष आणि रूढी स्पष्ट दिसत होत्या आणि दुसरीकडे नव्या शास्त्रातील कोणते विचार समाज सुधारणेसाठी उपकारक ठरतील हेही लक्षात येत होते. थोडक्यात, त्यांनी पौर्वात्य आणि पाश्चात्त्य धार्मिक विषयांचा अभ्यास केलेला असल्यामुळे त्यांच्या सुधारणाविषयक विचारांना अधिक व्यापकता आलेली होती. त्यांचे धार्मिक सुधारणावादी विचार समकालीन सुधारकांपेक्षा अधिक मूलगामी, अधिक प्रगतिपर आणि समाजासाठी अधिक उपयुक्त होते, असे म्हणावे लागते. परंपरागत रूढींच्या विचारांनी आणि शब्दप्रामाण्याने यापुढे समाजाची प्रगती होऊ शकणार नाही. उलट आपला समाज जुन्याच अंधश्रद्धेत अधिक गुरफटून पडेल, असे त्यांचे ठाम मत होते.

## धर्मग्रंथांनी अंधश्रद्धेची वाढ

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री यांच्या अगोदरच्या पिढीतील समाज सुधारकांनी विशेषतः, लोकहितवादींनी तर कालबाह्य धर्मग्रंथांची आवश्यकता नसल्याचे स्पष्ट केले होते. महात्मा फुले यांनी मागासलेल्या समाजाचे शिक्षण व शूद्र अतिशूद्रांची प्रगती यांवर भर दिलेला होता. आगरकरांनी स्त्रियांची सुधारणा, व्यक्तिस्वातंत्र्य व बुद्धिप्रामाण्यवाद या तत्त्वावर स्त्रीशिक्षणाची आणि कुटुंबसंस्थेच्या सुधारणेची गरज हिरिरीने मांडली होती. शास्त्रीजींनी या सर्व सुधारणावादी विचारांचे स्वागत केले. किंबहुना त्यांच्या विचारांचा पाया या सर्व

सुधारणावादी विचारांच्या भूमिकेवरच उभारलेला होता. पण त्यांनी त्याच्याही पुढे जाऊन धर्मसुधारणेसाठी एक नवा विचार अधिक स्पष्ट केला. त्यांच्या विचारांचे सूत्र असे की, ''धर्मदृष्टी बदलल्याशिवाय सामाजिक बंधने नष्ट करण्याचे मानसिक सामर्थ्य लाभत नसते. कारण हीन प्रकारच्या धार्मिक अंधश्रद्धेने सामाजिक रूढी बळकट केलेली असते. धार्मिक अंधश्रद्धेचे पोषण धार्मिक ग्रंथ करतात. म्हणून धर्मसुधारकांना ग्रंथप्रामाण्यावर पहिला आघात करावा लागतो. तरच समाज सुधारणेचा मार्ग मोकळा होऊ शकतो.'' तर्कतीर्थांच्या सामाजिक सुधारणेचा हा मध्यवर्ती सिद्धांत आहे. शास्त्रीजींचे काही समकालीन विचारवंतही धर्मसुधारणावाद मांडीत होते. पण ते आपल्या सुधारणांसाठी धर्मग्रंथातच आधार शोधीत असत. धर्मग्रंथातील वचनांचा आधार एका अर्थाने रूढींचाच पुरस्कार करीत असतात. अशा विचारांनी काही प्रमाणात धर्मसुधारणा केल्याचे समाधान वाटले तरी, त्यातून समाज परिवर्तन होऊ शकत नाही. धार्मिक सुधारणांसाठी शब्दच्छल करून काहीतरी नवे सापडले असा मात्र भ्रम होऊ शकतो पण सुधारणा होऊ शकत नाही. त्यासाठी परंपरागत धर्मनियमांना मागे सारून विज्ञानप्रणित सामाजिक सुधारणा आणि नवीन समाज व्यवस्था करणे शक्य असते. धर्मसंस्था एका समाजाला दुसऱ्या समाजापासून आणि एका समाजगटाला दुसऱ्या समाजगटापासून मानसिकदृष्ट्या अलग करते. त्यामुळे समाजात सांस्कृतिक सहकार्य आणि तत्जन्य बंधुभाव यांची वाढ होऊ शकत नाही. परिणामतः एकूण सर्व समाजाची सुधारणा व स्वातंत्र्य वाढीस न लागता ते अधिकच कुंठित होत जाते. धर्मग्रंथातील वचनांनी जातिधर्ममूलक आचारांचे शब्दप्रामाण्य अधिक वाढत जाते, असा धर्मविचार मागे सारून विवेक बुद्धीवर अधिष्ठित समाजव्यवस्था उभी केली, तरच धर्मसुधारणा होऊ शकते. थोडक्यात, रूढ धार्मिक दृष्टी आमूलाग्र बदलल्याशिवाय समाजातील रूढींची बंधने नष्ट होत नाहीत. अशा बंधनांनीच अंधश्रद्धेची वाढ होते असे शास्त्रीजींचे मत होते.

### वैज्ञानिक दृष्टिकोन

अंधश्रद्धेचे पोषण धार्मिक ग्रंथ करतात म्हणून विवेकवादी बुद्धिनिष्ठा, वैज्ञानिक दृष्टिकोन व मानवतावादी नैतिक प्रेरणा यांची तर्कतीर्थांनी सामाजिक सुधारणांसाठी गरज प्रतिपादन केलेली आहे. कुटुंबसंस्था, जातिसंस्था आणि शिक्षणसंस्था यांत मूलभूत बदल होण्याची गरज आहे. कौटुंबिक व्यवहारातून रूढींचे प्राबल्य वाढते. जातिसंस्थेमुळे समाजात विषमतेची भावना वाढत जाते. आणि सदोष शिक्षण पद्धतीने मानवतेचा ऱ्हास होतो. म्हणून विवेकवादाचे जीवनमूल्य आत्मसात करून समाजपरिवर्तन करणे हाच धर्मसुधारणांचा एकमेव मार्ग होय.

शास्त्रीजींचे धर्मसुधारणेसंबंधीचे हे विचार अधिक मूलभूत, अधिक प्रगतिपर आणि अधिक प्रेरणादायी आहेत.

## भौतिक सुधारणावादी मार्ग

धर्म आणि समाज यांच्यासंबंधी श्री. शास्त्रीजींचा एक सिद्धांत असा की सामाजिक सुधारणा भौतिक सुधारणांच्या अनुषंगाने पाहता येतात. आणि भौतिक सुधारणा, शास्त्रीय संशोधनाने जी प्रगती केली आहे तिच्या अनुषंगाने होऊ शकतात. १९व्या शतकाच्या आरंभी इंग्रजी सत्तेचा या देशात प्रभाव वाढला. इंग्रजांनी आपल्या आधुनिक विद्येच्या आणि शास्त्रांच्या संदर्भात विशेषतः, मराठ्यांच्या सत्तेचे बळ मोडून टाकले. त्याचे एक महत्त्वाचे कारण असे की मराठ्यांचे शस्त्र, मराठ्यांची युद्धनीती आणि मराठ्यांच्या सामाजिक पद्धती या सर्व पुढारलेल्या इंग्रजांच्या सामर्थ्यापुढे दुर्बल ठरल्या. इंग्रजांनी महाराष्ट्रात सर्व सत्ता हाती घेतल्यानंतरच आधुनिक शिक्षण आणि आधुनिक न्यायपद्धती सुरू केल्या. अशी सुधारलेली राज्यव्यवस्था स्थापन केल्यामुळे स्वाभाविकच अनेक काल्पनिक समजुतींना धक्का बसला. इतिहास, गणित, भूगोल, सृष्टिविज्ञान इत्यादी आधुनिक विद्यांनी धर्मग्रंथांचे स्थान घेतले. त्यामुळे नवविचारांची एक तरुण पिढी तयार झाली. या पिढीने मराठी भाषेला नव्या इंग्रजी दर्जाचा आकार देण्यास आरंभ केला. या नवशिक्षित वर्गाने रूढीचे प्रामाण्य आणि शब्दप्रामाण्य कमी अधिक प्रमाणात झुगारून दिले. ज्या जुन्या धर्मकल्पनांनी आपले व्यवहार चालतात त्या कल्पना शास्त्रीय संशोधनाच्या प्रकाशात त्याज्य ठरविल्या. मध्ययुगीन अंधारात वाढलेल्या व टिकून राहिलेल्या सनातन समाजव्यवस्थेचे अंतरंग झपाट्याने अधिक उघडकीस आले आणि अशा प्रकारे अंधश्रद्धेने स्वीकारलेली विचारसरणी झुगारून बुद्धिवादाचा आश्रय ही नवीन पिढी घेऊ लागली. पाश्चात्त्य विद्येत तीन नवी मूलभूत मूल्ये या देशात प्रथम आणली. बुद्धिवाद, व्यक्तिस्वातंत्र्य आणि समता ही ती तीन मूल्ये होत. समतेसंबंधी असे स्पष्ट करण्यात आले की राष्ट्रभेदनिरपेक्ष व वंशभेदनिरपेक्ष अशी मानवाची समता वास्तव नैसर्गिक समता होय. या तीन मूल्यांची वैशिष्ट्येही लक्षात घेतली पाहिजेत. बुद्धिवादामुळे जुन्या परंपरेतील दोष आणि वैगुण्ये लक्षात येतात. विज्ञानाच्या कसोटीवर उतरलेली आचार-विचार पद्धती रूढ करण्याचा मार्ग प्राप्त झाला. व्यक्ती स्वातंत्र्याच्या विचाराने जुन्या समाजव्यवस्थेतील व्यक्तीच्या विकासावर पडलेली बंधने नाहीशी करण्याची नव्या पिढीला दृष्टी लाभली. आणि समतेच्या कल्पनेमुळे जगातील इतर राष्ट्रांच्या संस्कृतीबद्दल वाटणारी तुच्छतापूर्ण, पूर्वग्रहदृष्टी नष्ट होते आणि सारासार बुद्धी जागृत होऊन सर्व संस्कृतीच्या विचारांतील काही अंश स्वीकारण्याची उदारता वाढते. अशा प्रकारे या तीन मूल्यांमुळे ऐहिकता प्रधान विचारसरणी उत्पन्न झाली. परलोकापेक्षा इहलोकातील जीवनक्रम यशस्वी झाला पाहिजे आणि तो शुद्ध असावा हा विचार अधिक बळावत गेला. नवीन पाश्चात्त्य संस्कृतीच्या प्रभावाने प्रथम काही व्यक्ती दिपून गेल्या. तर काही व्यक्तींना तो प्रकाश सहन झाला नाही. अशा व्यक्तींना आपला धर्म, आपली संस्कृती, आपला जीवनमार्ग हाच सर्वश्रेष्ठ आहे असे ठामपणे वाटू लागले. उलट जी व्यक्ती

दिपून गेली ती पाश्चात्त्य संस्कृतीच्या आहारी जाऊन काहीशा अतिउत्साही मार्गाने वागू लागली. पण ज्यांना नव्या संस्कृतीविषयी आस्था वाटू लागली, त्यांनी आत्मसंशोधन करून आपल्या परंपरेतील गुणदोषांची तुलना केली. आणि नव्या संस्कृतीचे भौतिक सुधारणावादी मार्ग, त्यांची राज्यव्यवस्था, त्यांची सामाजिक विचारांतील उदारता असे स्वीकारले. त्याच प्रमाणात आपल्या प्रगतीला अडथळा निर्माण करणाऱ्या परंपरा, रूढी नाकारल्या. अशा परंपरांमुळे सामाजिक विषमता वाढली. जातिभेद निर्माण झाले. व्यक्तीच्या जीवनावर कर्मकांडाचे ओझे लादले आणि त्यामुळे समाज दुर्बल बनला. राज्यव्यवस्थेत दुराग्रहाचे प्रमाण वाढले आणि परिणामतः आर्थिक मार्गही शतकानुशतके त्याच पद्धतीने चालू लागले. संस्कृतीने नव्या विद्येच्या माध्यमातून शिकविलेला बुद्धिवाद, व्यक्तिस्वातंत्र्य म्हणून पाश्चात्त्य आणि नैसर्गिक समता स्वीकारण्याची आवश्यकता प्रतिपादन केली.

**(आकाशवाणी भाषण पुणे, ५-११-२०००. /**
**'भेटीगाठी'मधून उद्धृत, १४ जानेवारी २००२)**

○○○

# ४४.
# तर्कतीर्थ : एक चालते, बोलते विद्यापीठ
## अ. पां. देशपांडे

प्राचीन काळापासूनचा भारताचा सांस्कृतिक इतिहास पाहिला तर तो मौखिक परंपरेचा आहे. शंकराचार्य, मंडनमिश्र असोत, संघाच्या परंपरेतील गोळवलकर, देवरस असोत, बाबासाहेब पुरंदरे, शिवाजीराव भोसले असोत, दत्तो वामन पोतदार असोत की तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी असोत. या लोकांनी कितीही लिखाण केलेले असले तरी त्यांनी चर्चा आणि भाषणाद्वारे व्यक्त केलेले विचारधन हिमनगाएवढे प्रचंड आहे. (१९२० सालापासून १९९४ साली मृत्यू होईपर्यंतची ७४ वर्षे तर्कतीर्थांचे हे अग्निहोत्र धडधडत होते. एवढ्या प्रचंड काळात तर्कतीर्थांनी किती लेख लिहिले, कोठे कोठे लिहिले, किती ठिकाणी भाषणे दिली आणि चर्चा केल्या आणि त्याचे विषय कोणते होते याची गणतीच नाही. पुढील ५०-१०० वर्षे पीएच. डी. करणाऱ्या १०-२० विद्यार्थ्यांची ही सामग्री आहे. दुर्दैवाने शिस्तबद्धतेने त्यांची नोंदणी आपण करून ठेवत नसल्याने संशोधकाचा ७०-८० टक्के वेळ सामग्री शोधून काढण्यात जातो.)

२७ जानेवारी १९०१ रोजी लक्ष्मण बाळाजी जोशी यांचा जन्म धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्याच्या पिंपळनेर गावी झाला. वडील बाळाजी आणि आई चंद्रभागा यांना त्या काळाला अनुरूप अशी ११ मुले झाली आणि त्यातील दोनच खऱ्या अर्थाने जगली. वैद्य वेणीमाधवशास्त्री आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री, पण बाकीची नऊ भावंडे लवकर वारली, तर उरलेली दोघे दीर्घायुषी झाली. वेणीमाधवशास्त्री ९२ वर्षे आणि लक्ष्मणशास्त्री ९३ वर्षे जगले आणि दोघेही असे जगले की 'भयचकित नमावे तुजला' या न्यायाने. एकाच आयुष्यात एवढे करता येते हे पाहून दर्शक भयचकित व्हावा आणि नम्रही व्हावा.

लक्ष्मणशास्त्रींचे प्राथमिक शाळेत मराठी दुसरीपर्यंत शिक्षण झाले. पुढे शिक्षणात गोडी वाटेना. वडील याज्ञिकी, वेदाध्ययन, संस्कृत ग्रंथाचे अध्ययन, फलज्योतिष अशा नाना गोष्टी करणारे होते. त्यामुळे लक्ष्मणशास्त्रींचा बालपणचा बहुतेक वेळ वडिलांबरोबर धर्मकृत्यात

भाग घेण्यात जात होता. वडिलांनी महाभारत, रामायण आणि संतांच्या चरित्रांत त्यांचे मन गुंतवले. लहानपणी गावच्या पांझरा नदीत ते तासन् तास पोहत आणि इतर व्यायामही भरपूर करीत. त्यांचा व्यायामाचा छंद कायम टिकला. त्याला पुढे फिरण्याची जोड मिळाली. त्यांनी पुढे चांगले अध्ययन करून एखाद्या व्याख्यानमालेत वक्ता म्हणून पुढे येऊन नाव कमवावे अशी वडिलांची माफक अपेक्षा होती. प्रत्यक्षात पुढे लक्ष्मणशास्त्रींनी एवढी भाषणे, व्याख्यानमाला आणि चर्चा गाजवल्या की त्यांच्याशिवाय कोणाचे पान हालत नसे. त्यांची व्याख्याने वैयक्तिक निंदा, कुचाळक्या यांना स्पर्श न करता बौद्धिक पातळीवरची असत. त्याला विद्वान आणि विद्वानेतरांची उपस्थिती नेहमीच लक्षणीय राहिली. त्यांच्या विचारांना भाषिक सौंदर्याचे स्तर असत. १९६५ साली हैदराबादला मराठी साहित्य संमेलन झाले. प्रा. वा. ल. कुलकर्णी अध्यक्ष होते. संमेलनात संज्ञानिर्मिती, परिभाषावृध्दी आणि एकूण भाषासमृध्दी या विषयावर चर्चा, परिसंवाद झाले. आचार्य अत्रे वगैरे अनेक दिग्गज बोलले, पण संमेलनावर छाप राहिली ती वा. ल. कुलकर्णी आणि तर्कतीर्थांची. पुण्याच्या श्रीविद्या प्रकाशनातर्फे पुस्तके छापून त्याचे प्रकाशन समारंभ होत. १०-१२ वर्षे ओळीने अशा सर्व कार्यक्रमांचे अध्यक्ष तर्कतीर्थच असत. त्यावरून एक व्यंगचित्र प्रसिद्ध झाले होते आणि त्याखाली मजकूर होता ‘प्रकाशन समारंभ अनेक, अध्यक्ष मात्र एकच. कोण ते, हे तर्काने जाणावे.’ १९३३ मध्ये म. गांधी, येरवडा जेलमध्ये असताना आंबेडकरांनी मागितलेल्या अस्पृश्यांसाठीच्या स्वतंत्र मतदारसंघाबद्दल चर्चा चालू होती. वाराणशीचे बाबू भगवानदास, अहमदाबादचे प्रा. ध्रुव, आर्यसमाजी शास्त्रीपंडित, केवलानंद सरस्वती, नागपूरचे के. ल. दप्तरी, पुण्याचे सिद्धेश्वरशास्त्री चित्राव, श्रीधरशास्त्री पाठक, तर्करत्न भट्टाचारजी अशा सर्वांबरोबर चर्चा झाली. गांधींनी तर्कतीर्थांना सांगितले होते की, धर्मशास्त्राचा आधार आणि आधुनिक विचार या दुहेरी अंगांनी मला मदत करण्यासाठी या प्रत्येक माणसाच्या चर्चेच्या वेळी तुम्ही हजर राहात चला. १९०८-०९ साली वडिलांनी एखाद्या व्याख्यानमालेत वक्ता म्हणून पुढे यावेस, ही व्यक्त केलेली माफक अपेक्षा तर्कतीर्थांनी अवघ्या ३२ व्या वर्षीच किती परिणत केली पाहा!

मुंजीनंतर तर्कतीर्थांनी वयाच्या नवव्या वर्षी शुक्ल यजुर्वेदाची संथा घेतली. त्याच वेळी पिंपळनेरला आलेल्या देवकुळे नावाच्या वनाधिकाऱ्याने पुढील अध्ययनासाठी वाराणसीला जायची गरज नाही, वाईला प्राज्ञ पाठशाळेत नारायणशास्त्री मराठ्यांकडे जा, असे सांगितले आणि लक्ष्मणशास्त्री वडिलांबरोबर वाईत पोहोचले. मग वाईत वेदाध्ययन, रूपावली, समासचक्र, शास्त्रशुद्ध मंत्रोच्चार, ऋचा-मंत्र नुसते मुखोद्गत करण्याशिवाय त्याचा अर्थ समजावून घेणे, व्युत्पत्तीची कल्पना माहीत करून घेणे या मार्गाने ते शिकले. इतर मुले तेथे फक्त कर्मकांडे शिकत, पण लक्ष्मणशास्त्री त्यावर चर्चा करू लागले. ‘हितोपदेश’, ‘रघुवंश’, ‘किरातार्जुनीय’, ‘शिशुपालव’ध ही संस्कृत काव्ये ते शिकले. बाणाची कादंबरी

शिकले. मग नारायणशास्त्री मराठे त्यांना न्याय वैशेषिक शिकवू लागले. 'तर्कसंग्रहदीपिका', विश्वनाथ पंचाननाची 'सिद्धांत मुक्तावली', 'भाषापरिच्छेद', पाणिनीची 'अष्टाध्यायी' यांची तयारी त्यांनी करून घेतली. चर्चा करताना आचार्य न्याय व व्याकरणाची गुढे त्यांना समजावून देऊ लागले. जगदीश व गदाधराच्या नवन्यायावरील उच्च शिक्षण, वेदान्त परिभाषा, 'वेदांतसार', 'शांकर ब्रह्मसूत्र', पूर्वमीमांसेचे अर्थसंग्रह, 'आपदेवी', 'शाबरभाष्य', कुमारभट्टाचे 'श्लोकवार्तिक' त्यांनी अभ्यासले. तर्कतीर्थ एकपाठी. ग्रंथ वाचनानंतर अर्थासह तो ग्रंथ त्यांच्या मनावर बिंबत असे. १९१४ ते १८ या चार वर्षांच्या काळात लक्ष्मणशास्त्रींनी शास्त्राध्ययन पूर्ण करून कलकत्त्याच्या प्रथमा व मध्यमा या तर्कशास्त्राच्या दोन परीक्षा दिल्या. याच वेळी 'ब्रह्मसूत्र', 'शांकरभाष्य', 'उपनिषद शंकरभाष्य' आणि 'गीताभाष्य' नारायणशास्त्री मराठ्यांकडे शिकण्यासाठी विनोबा भावे येऊन राहिले होते. विनोबांना इंग्रजी येत असे. मग तर्कतीर्थांनी विनोबांकडे प्राथमिक इंग्रजीचे धडे घ्यायला सुरुवात केली. तर्खडकरांच्या भाषांतरमालेपासून सुरुवात झाली. सोपी आणि महत्त्वाची इंग्रजी पुस्तके वाचायला सुरुवात झाली. प्राज्ञपाठशाळेतून ते विनोबांचे शिक्षण संपल्यावर विनोबांबरोबर सहा महिने पळून गेले आणि गिबनचे 'डिक्लाइन ऑफ रोमन एंपायर', टॅनचे 'हिस्टरी ऑफ सिव्हिलायझेशन इन इंग्लंड', मिलचे 'लिबर्टी' व 'रिप्रेझेंटेटिव्ह गव्हर्नमेंट' ही पुस्तके वाचतो. मग विनोबांनी तर्कतीर्थांना गांधींच्या आश्रमाचे सेवक व्हा, असे सुचवल्यावर ते तेथून गुपचूपपणे पळून परत वाईला दाखल झाले. या वेळी नारायणशास्त्री मराठ्यांनी नव्या विज्ञाननिष्ठ विचारांशी परिचय वाढविला. विद्यार्थ्यांना त्याचा परिचय ते करून देऊ लागले. राष्ट्रीय प्रेरणा देणारे विचार, नव्याने पुढे येणारे पाश्चात्त्य, उदात्त व वैज्ञानिक ज्ञान विद्यार्थ्यांना मिळू लागले. १९१८ साली तर्कतीर्थ वाराणशीला पुढील अध्ययनासाठी गेले. विविध शाखांची तयारी असलेल्या अनेक विद्वानांच्या आपापल्या खाजगी पाठशाळा तेव्हा वाराणशीला होत्या. एका गुरूकडे न राहता त्यांनी बऱ्याच जणांकडे नवन्यायाचे पाठ घेतले आणि त्या बळावर कलकत्त्याची तर्कतीर्थ ही तिसरी परीक्षा त्यांनी १९२३ साली दिली. प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाल्यावर तर्कतीर्थ तेथून परत वाईला आले. १९२७ साली तर्कतीर्थांनी लग्न केले आणि वाईत बिऱ्हाड थाटले.

या सुमाराला ते राष्ट्रीय आंदोलनाकडे आकर्षित होऊ लागले. हिंदू धर्माकडे ते नव्याने बघू लागले. हिंदूधर्माची ते नव्याने मीमांसा करू लागले, सनातन्यांनी भुवया चढवल्या, तर सुधारणावादी त्यांना जागोजागी भाषणासाठी बोलावू लागले. १९३० सालच्या म. गांधींच्या कायदेभंगाच्या चळवळीत त्यांनी भाग घेतल्याने त्यांना सहा महिन्यांचा तुरूंगवास घडला. परत आल्यावर वाईला त्यांनी धर्मकोशाचे काम सुरू केले. तर्कतीर्थांचे घरात मुलांकडेही लक्ष असे. त्यांनी त्यांना 'धातुरूपावली', 'अष्टाध्यायी सूत्र', 'सुभाषिते', 'रामरक्षा', शंकराचार्यांची 'चर्पटपंजरी' शिकवली. ना. धों. ताम्हनकर, साने गुरुजी इत्यादींची अनेक

पुस्तके ते मुलांना विकत घेऊन देत. थोरला मुलगा मॅट्रिक झाल्यावर त्याला साहित्य-काव्य यांत रस होता पण लक्ष्मणशास्त्रींनी त्याला पुण्याला फर्गसन महाविद्यालयात विज्ञान शाखेकडे पाठवले व नंतर अभियांत्रिकी महाविद्यालयात टाकून अभियंता केले. इतर मुलांनाही महाविद्यालयीन शिक्षण दिले अशी त्यांची दृष्टी आधुनिक होती. त्यांच्या मते आधुनिक जगाचा व्यवहार गणित आणि विज्ञानानेच होत असतो. मुलाचे तोंड भरून कौतुक करणे हा त्यांचा स्वभाव नव्हता पण प्रत्यक्ष वा पत्राद्वारे ते समपातळीवरून चर्चा करीत. मुलांचे, नातवांचे नवनवीन विषय समजून घेण्याची त्यांना विलक्षण उत्कंठा असे. एके काळी सत्य आणि योग्य मानलेल्या विचारप्रणालीत दोष दृष्टोत्पत्तीला आल्यावर तो बाजूला करून नव्या प्रणालीकडे वळताना तर्कतीर्थांना कधीही मानसिक संघर्षातून जावे लागले नाही. त्यांची मुलगी काही कौटुंबिक आपत्तीनंतर मनःशांतीसाठी इगतपुरीला विपश्यना केंद्रात जाणार होती. तेव्हा तिला तर्कतीर्थ म्हणाले, ‘शांती मनात असावी लागते. कितीही शांत जागी जाऊन बसले तरी मनाची अस्वस्थता जात नाही. रोजनिशी लिहीत जा. मनात जे जे विचार येतात ते टिपत जा. अशा दुःख तप्ततेतूनच मोठे साहित्य निपजू शकते. भावनांचा उद्रेक होऊ देऊ नये. दुसऱ्यावर रागावू नये. त्याच्यावर न रागावता आपण विजय मिळवावा.’ १९९२ साली आंबेडकरांचे नाव विद्यापीठाला देण्याच्या नामांतर चळवळीत तर्कतीर्थांनी मांडलेल्या मतांमुळे त्यांच्यावर खूप जाहीर टीका झाली. पण स्वत:च्या बुद्धीने दिलेला कौलच त्यांनी योग्य मानला. इतरांबाबत तितिक्षा वा दोषांकडे दुर्लक्ष करणे हेच त्यांनी ठरवले. सचिवालयाचे मंत्रालय हे नामांतर त्यांच्या सल्ल्याने झाले. पुस्तक प्रकाशनाऐवजी पुस्तक विमोचन हा शब्द त्यांनी रूढ केला. पुढे पुढे त्यांना कमी ऐकू यायचे तेव्हा ते यंत्र वापरू लागले, त्याला ते त्यांचे कर्णेद्रिय असे म्हणायचे.

१९३०-३२ मध्ये महाराष्ट्रात सर्वत्र शेतकऱ्यांचे उठाव झाले. त्या वेळी नाशिक जिल्ह्यातील बागलाण तालुक्यात, तर्कतीर्थांनी शेतकऱ्यांच्या जागृतीचे काम केले. कायदेभंगाच्या चळवळीत सहा महिने ते धुळयाच्या तुरुंगात होते. १९२५ साली कुकुरमुंडे येथील सनातन धर्म परिषदेत आणि वाराणशीच्या अखिल भारतीय संस्कृत पंडितांच्या संमेलनात भाग घेऊन तर्कतीर्थांनी धर्मसुधारणेचे समर्थन केले.

महात्मा गांधी आणि मानवेंद्रनाथ रॉय या असामान्य महापुरुषांच्या निकट सहवासात तर्कतीर्थ वर्षानुवर्षे आल्याने त्यांनी या दोघांचे तत्त्वज्ञान स्वीकारले. मात्र गांधींचे तत्त्वज्ञान त्यांनी पुढे सोडून दिले. १९२० ते ४० अशी वीस वर्षे त्यांनी काँग्रेसचे काम केले. मात्र १९३४ साली त्यांनी मार्क्सवादाचा अभ्यास सुरू केला तो मानवेंद्रनाथ रॉय यांच्यामुळे. पुढे शंकरराव देवांनी ही गोष्ट गांधींच्या कानावर घातल्यानंतर गांधी म्हणाले, ‘मी लक्ष्मणशास्त्रींना पूर्ण अध्यात्मवादी समजत होतो पण आता ते मार्क्सवादी झाल्याने माझ्यापासून दूर गेल्याचे मला मान्य करावे लागेल.’ मात्र शेवटी शेवटी एकदा निराश होऊन तर्कतीर्थ म्हणाले,

'मी गांधींची साथ सोडायला नको होती. विचाराधिष्ठित समाज घडवण्यास इकडच्या (भारतीय) माणसास अपयश आले आहे. गांधींच्या विचारास नंतरच्या काँग्रेसवाद्यांनी फक्त शाब्दिक सहानुभूती दाखवली आहे. गांधीनिष्ठा पोथीनिष्ठा ठरली. आणि तशा निष्ठेमुळे इतर काँग्रेसजनांना राजकीय स्थाने, अधिकार, बंगले, गाड्या मिळाल्या. माझ्यापाशी माझे स्वतंत्र घरदेखील नाही.' हे ऐकणारे म्हणाले, 'तर्कतीर्थ, तुम्ही संपादिलेला मीमांसा कोश धर्मकोशाचे खंड, विश्वकोशाचे हजारो पृष्ठांचे १४ खंड या तुमच्या क्षय न पावणाऱ्या इमारती आहेत. ते तुमचे अपहृत न होणारे धन आहे.' त्या क्षणी ते फक्त हसले आणि सांगणाऱ्यालाही शब्दांची कसरत करतच हे सांगावे लागले.

मानवेंद्रनाथ रॉय यांच्या प्रभावळीत मणिबेन कारा, व्ही.बी. कर्णिक, डी. बी. कर्णिक, यशवंतराव चव्हाण, गोवर्धन पारीख, व्ही. एम. तारकुंडे, इंदुमती पारीख, जस्टीस व्ही. ए. नाईक, ह. रा. महाजनी, गोविंद तळवलकर, ए. बी. शहा, आर. बी. कर्णिक, विश्वास व दत्ता नाईकनवरे, शिवनारायण राय अशी अनेक मित्रमंडळी तर्कतीर्थांना मिळाली आणि ती आयुष्यभर पुरली. १९३६ ते ४८ अशी बारा वर्षे तर्कतीर्थ रॉय यांच्या डेमॉक्रेटिक पार्टीचे सक्रिय सदस्य होते. मार्क्सवाद, रॉयवाद यांच्या प्रभावातून तर्कतीर्थांनी १९४२ साली 'हिंदुधर्माची समीक्षा' आणि १९५१ साली 'वैदिक संस्कृतीचा इतिहास' हे दोन ग्रंथ लिहिले.

१९३३ साली राजगोपालाचारी यांची मुलगी लक्ष्मी आणि महात्मा गांधींचा मुलगा देवीदास यांचे लग्न गांधींच्या येरवड्यातील पर्णकुटीच्या परिसरात तर्कतीर्थांनी लावले. ब्राह्मण कन्या आणि वैश्य वर यांचा विवाह धर्मशास्त्रानुसार होण्यात अडचणी असल्याचे कोणीतरी गांधींना सांगितले. गांधींनी तर्कतीर्थांना विचारले. तर्कतीर्थ गांधींना म्हणाले, 'चातुवर्ण्य व्यवस्था गेली काही शतके कोलमडून पडत आहे, असे शंकराचार्यही म्हणत आहेत. म्हणजे वर्णव्यवस्था धर्मशास्त्रातून बाहेर पडण्यास सुरुवात झालेली आहेच. याशिवाय राजगोपालाचारी आणि गांधी यांच्या धार्मिक निष्ठा, सामाजिक मूल्ये एकसारखी आहेत. समान आचारामुळे वर्णदेखील समान ठरतात. मला त्यात काही अडचण वाटत नाही.' 'मग तुम्ही विवाह लावाल का?' म्हणून गांधींनी विचारले आणि तर्कतीर्थांनी विवाह लावला. तर्कतीर्थ सर्व प्रकारची कर्मकांडे शिकले होते. त्यांच्या बरोबर प्राज्ञ पाठशाळेत शिकलेले काही जण आयुष्यभर तेच करीत राहिले. तर्कतीर्थांची पातळीच वेगळी होती. पण जेव्हा जेव्हा सामाजिक पातळीवर काही वाद होऊ लागले तेव्हा तर्कतीर्थांनी तेही करायला मागेपुढे पाहिले नाही. सोरटी सोमनाथाच्या देवळाचा जीर्णोध्दार करायचा होता. त्या वेळी असाच वाद चालू होता आणि राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्याकडून तर्कतीर्थांना विचारणा झाली की हे काम तुम्ही कराल का आणि तर्कतीर्थांनी त्याचे पौरोहित्य केले. तर्कतीर्थांनी धर्मकोशाचे काम सुरू केले आणि त्याचे २६ पैकी १९ खंड छापून त्यांनी हे काम पुरे केले. हिंदुधर्मातील अनेक विषय, संकल्पना यांचा ऐतिहासिक क्रमाने मूळ संहिता संकलित करून

रचलेला हा धर्मकोश म्हणजे हिंदूधर्माच्या व्यापक ज्ञानभांडाराचे सुव्यवस्थित वर्गीकरण होय.

दिल्लीला १९५४ साली मराठी साहित्य संमेलन भरले होते. तर्कतीर्थ संमेलनाचे अध्यक्ष होते. पं. नेहरू उद्घाटक होते आणि मंत्री न. वि. तथा काकासाहेब गाडगीळ स्वागताध्यक्ष होते.

यशवंतराव चव्हाण रॉयवादी मेळाव्यात १९३६-३७ साली तर्कतीर्थांना जे भेटले ते चव्हाणांच्या १९८४ सालच्या मृत्यूपर्यंत त्यांची मैत्री अखंड टिकली. मैत्री म्हणणे धारिष्ट्याचे ठरेल पण सारा महाराष्ट्र तर्कतीर्थांना यशवंतराव चव्हाणांचे राजकीय गुरू म्हणूनच ओळखत होता आणि यशवंतरावांच्या मनात आणि कृतीत तर्कतीर्थांचे गुरुपद अढळ होते. १९६२ साली यशवंतरावांना पं. नेहरूंनी संरक्षणमंत्री म्हणून दिल्लीत बोलावल्यावर त्यांनी मी काय करावे म्हणून तर्कतीर्थांना विचारले होते. फोनवर आणि प्रत्यक्ष त्यांच्या अनेक चर्चा होत. दोघे एकमेकांच्या घरी जात, उतरत, राहात. अगदी वेणूताई चव्हाण गेल्यावरही 'वियोगाचे दु:ख कसे सहन करू?' असे यशवंतरावांनी तर्कतीर्थांना विचारले होते. १९६० साली यशवंतरावांनी तर्कतीर्थांना साहित्य संस्कृती मंडळ आणि विश्वकोश मंडळाचे अध्यक्ष केले. १९८० साली ही दोन मंडळे वेगळी झाली आणि तर्कतीर्थ विश्वकोश मंडळाचेच फक्त अध्यक्ष राहिले. पण १९६० ते ९४ या ३४ वर्षांच्या काळात तर्कतीर्थांनी प्रत्येकी हजारच्यावर पृष्ठांचे १४ खंड प्रकाशित केले आणि त्यात तर्कतीर्थांनी १४७ नोंदी लिहिल्या आहेत.

वेद, उपनिषदे, व्याकरण, न्याय, अद्वैत इत्यादींबरोबर मार्क्स, भारतीय तत्त्वज्ञान आणि पाश्चात्त्य तत्त्वज्ञान तर्कतीर्थांनी आत्मसात केले. आणि हे सर्व कमी पडले म्हणून नव्हे पण काळाबरोबर राहण्यासाठी आधुनिक विज्ञानाकडे ते आस्थेने आणि कुतुहलाने पाहत. गणित आणि विज्ञानाकडे तर्कदृष्ट्या पाहावे लागते आणि लक्ष्मणशास्त्री तर तर्कतीर्थ होते. त्यामुळे वेदाभ्यासात गुंतलो नसतो तर विज्ञानाचा संशोधक किंवा गणिती झालो असतो असे ते म्हणत, हे तर्काला पटणारे विधान आहे. खरे म्हणजे तर्कतीर्थांनी एवढे वाचन केले होते की त्यांना कोणताही विषय वर्ज्य नव्हता. १९८४ साली देवासला कुमारगंधर्वांच्या एकसष्टी समारंभात कुमारांचीच काय पण कोणाचीही एकही मैफल न ऐकलेल्या तर्कतीर्थांना एक तासभर बोलायचे होते. कुमार गंधर्वांनी संगीतसाधनेतून मोक्षाचा अनुभव घेतला आहे. त्यात त्यांनी श्रोत्यांनाही सहभागी करून घेतले आहे. कुमारांनी पारंपरिक रागांवर प्रयोगशीलतेचे नवे संस्कार केले. अनोख्या रागांची बांधणी करून पश्चिमी संगीताच्या आव्हानांवर त्यांनी मार्ग काढला. कुमारांमध्ये उस्ताद आणि शागीर्द अशा दोन्ही भूमिका एकवटल्या आहेत. शिक्षक जोपर्यंत स्वत: शिकत असतो तोपर्यंत त्याच्या ज्ञानात विशेष भर पडते. त्यांच्या या भाषणावर पु. ल. देशपांडे उत्स्फूर्तपणे म्हणाले, ''शास्त्रीबुवा, हा तर तुमचा बडा ख्याल होता.''

तर्कतीर्थ २७ मे १९९४ रोजी वयाच्या ९३ व्या वर्षी महाबळेश्वरला झोपेत वारले. लेखन, वाचन, मनन आणि जनजागृतीसाठी मिशनरी वृत्तीने आयुष्य व्यतीत केलेल्या आणि आणखी काम करण्याची युयुत्सू वृत्ती असणाऱ्या तर्कतीर्थांना म्हणूनच मृत्यू जागृतावस्थेत घेऊन जाऊ शकला नाही. मृत्यूपूर्वी काही दिवस तर्कतीर्थांची भेट मुख्यमंत्री शरद पवारांशी झाली असता वेदांत आणि आधुनिक विज्ञान यांवरच ते बोलत होते. मराठी साहित्यात वैज्ञानिक साहित्याचे दारिद्र्य असल्याची खंत त्यांना होती. वैज्ञानिक दृष्टिकोन आणि वैज्ञानिक पध्दती प्रतिपादित करणारा ग्रंथ मराठीत हवा असे ते बोलत असत. साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या विज्ञानविषयक पुस्तकाच्या प्रस्तावनेत त्यांनी लिहिले आहे की, मराठी भाषेत किंवा अन्य भारतीय भाषेत विज्ञान, सामाजिक शास्त्रे व तंत्रविज्ञान या विषयांचे प्रतिपादन करावयास उपयुक्त अशी परिभाषा सूची किंवा परिभाषा कोश तयार होत आहेत. प्रतिपादनाच्या ओघात त्यांचा वापर करावा म्हणजे अर्थ व्यक्त करण्याची शक्ती त्याला येते. शब्दकोशात पडून राहिले तर ते अर्थशून्य राहतात. जुने ज्ञान आणि नवे विज्ञान या दोन भिन्न पातळ्यांचा सहज समन्वय साधण्याचे कौशल्य तर्कतीर्थांकडे होते. मराठी विज्ञान परिषदेच्या १९६७ च्या पुण्यातील संमेलनाचे ते उद्घाटक होते. १९८६ साली मराठी विज्ञान परिषदेने सुरू केलेल्या हरिभाऊ मोटे पुरस्कार देण्याच्या पहिल्या समारंभास ते अध्यक्ष म्हणून आले होते. परिषदेची छोटीशी वास्तू पाहून ते सुखावले होते आणि हे काम फोफावले पाहिजे अशा शुभेच्छा दिल्या होत्या. वयाच्या ८६ व्या वर्षी कोणीतरी दीर्घायुष्यायद्दल 'दैवयोगी' आहात म्हटल्यावर ते म्हणाले, 'निसर्गयोग म्हणा. मी व्यायाम, योगासने करतो, मित आहार आणि उत्तम विश्रांती घेतो, मी दीर्घायुषी होणारच.'

**('विद्वज्जन', २००५ मधून उद्धृत)**

○○○

## ४५.

# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

## वी. र. काळे

धुळे जिल्ह्यातील पांझरा नदीच्या तीरावर वसलेल्या पिंपळनेर नावाच्या खेड्यात 'मार्तंड जे तापहीन' असा ज्यांचा गौरवाने उल्लेख केला गेला, त्या लक्ष्मणशास्त्र्यांचा जन्म झाला. त्या गावात मराठी सातवीपर्यंत शिक्षणाची सोय होती. पण लक्ष्मणशास्त्र्यांचे शिक्षण मराठी दुसरीपर्यंतच झाले. त्यानंतर त्यांनी 'याज्ञिकी'चे शिक्षण घेतले.

वयाच्या १४व्या वर्षी नारायणशास्त्री मराठे यांची कीर्ती ऐकून वाईच्या प्राज्ञपाठशाळेत दाखल झाले. शास्त्रीबुवांचे वेदाध्ययन झाले असले तरी संस्कृत अध्यनासाठी लागणारी प्राथमिक तयारी नव्हती; ती नारायणशास्त्र्यांनी करून घेतली. शास्त्रीजींना सुरुवातीचे वर्षभर माधुकरी मागावी लागली. पण तर्कशास्त्रात प्रावीण्य मिळाल्यामुळे त्यांना चौदा रुपयांची शिष्यवृत्ती मिळू लागली व उदरनिर्वाहाचा प्रश्न सुटला. चार वर्षांच्या काळात त्यांनी सर्व शास्त्रांची तयारी पूर्ण केल्यामुळे त्यांच्या गुरूंची त्यांच्यावर खास मर्जी बसली.

१९१७ मध्ये विनोबा वाईस शांकरभाष्याचा अभ्यास करण्यासाठी आले. त्यांच्याजवळ शास्त्रीजींनी इंग्रजी शिकण्यास सुरुवात केली. १९१८ मध्ये न्यायशास्त्राच्या विशेष अभ्यासासाठी ते वाराणासीला गेले. १९२० पासून प्राज्ञपाठशाळेत ते अध्यापक म्हणून काम करू लागले.

१९२५ साली नारायणशास्त्र्यांनी 'धर्मकोशा'चे काम सुरू केले. प्राज्ञपाठशाळेतील वातावरण जुन्या पठडीतील नव्हते. १९२६ मध्ये शास्त्रीजींचा विवाह झाला. १९२८ मध्ये त्यांनी 'आनंदमीमांसा' हा निबंध लिहिला. आनंदाचे शुद्ध स्वरूप कळणे म्हणजेच सर्वश्रेष्ठ आनंद - ब्रह्मानंद हे त्यांनी त्यात पटवून दिले.

१९३१ मध्ये नारायणशास्त्री यांनी संन्यास घेतला. केवलानंद सरस्वती तीर्थयात्रा झाल्यानंतर वाईला परत आले. पण त्यांनी प्राज्ञपाठशाळेशी संबंध सोडला. त्यामुळे 'धर्मकोश' व प्राज्ञपाठशाळा यांची सर्व जबाबदारी लक्ष्मणशास्त्र्यांवर पडली.

१९३३ मध्ये अस्पृश्यतेबद्दल चर्चा करण्यासाठी महात्मा गांधींनी लक्ष्मणशास्त्र्यांना बोलावले. पण त्यांचे त्या वेळचे विचार जमलेल्या इतर धर्मशास्त्र्यांना पेलवणारे नव्हते. त्यामुळे चर्चा होऊ शकली नाही. पण ते महात्मा गांधींचे त्या विषयावरचे धर्मशास्त्रविषयक प्रमुख सल्लागार राहिले. गांधीजींच्या मार्गाने गेलो तर स्वराज्यप्राप्ती होईल या खात्रीने त्यांनी १९३० व १९३२ मध्ये सत्याग्रह करून तुरुंगवास भोगला. १९३३ मध्ये बडोदा येथे प्राच्यविद्या परिषदेत 'भारतीय धर्मेतिहासतत्त्वम्' हा संस्कृत निबंध वाचला. ह्या निबंधामध्ये त्यांनी हिंदू धर्म असा शब्द न वापरता 'सनातन धर्म' असा उल्लेख केला आणि समन्वय हेच सनातन धर्माचे मुख्य सूत्र असल्याचे सांगून हे समन्वय तत्त्व ख्रिश्चन, मुस्लीम इत्यादी संप्रदायांमध्ये नसल्याचे प्रतिपादन केले.

१९३७ मध्ये ते मानवेंद्रनाथ रॉय यांच्या संपर्कात आले. ७ वर्षांची गांधींची साथ सोडून रॅडिकल ह्युमनिस्ट पार्टीचे क्रियाशील सदस्य झाले. १९४९ मध्ये त्यांनी य. गो. जोशी यांच्या 'वादविवेचनमाले'साठी 'जडवाद अर्थात अनीश्वरवाद' हा निबंध लिहिला. कणाद, कपिल, बुद्ध व चार्वाक हे सत्त्वशील, शुद्ध चारित्र्याचे आदर्श असलेले तत्त्वज्ञानी व मनुष्यजातीचे मार्गदर्शक ईश्वराच्या वाटेला गेले नाहीत, त्या वाटेस जाऊ नका असा संदेश देऊन गेले, असा सिद्धान्त त्यांनी या निबंधात मांडला. त्यामुळे महाराष्ट्रात खळबळ माजली.

नागपूर विद्यापीठात त्यांनी 'हिंदुधर्माची समीक्षा' या विषयावर व्याख्याने दिली. ती पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाली. त्यावर मार्क्सवादी विचारसरणीचा प्रभाव पडलेला दिसतो. १९४९ साली पुणे विद्यापीठात दिलेल्या 'वैदिक संस्कृतीचा विकास' या व्याख्यानांचा संग्रह चांगलाच गाजला. त्याला साहित्य अकादमीचा पुरस्कारही मिळाला.

१९६० साली संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाली. १९६० च्या डिसेंबरमध्ये 'साहित्य संस्कृती मंडळा'ची स्थापना झाली. त्याचे अध्यक्षपद त्यांनी २० वर्षे भूषविले. १९६२ साली 'मराठी विश्वकोशा'चा प्रकल्प हाती घेण्यात आला. शास्त्रीजींनी ही संस्था सरकारी हस्तक्षेपापासून दूर ठेवली. शेकडो ज्ञानवंतांना एकत्र आणून हे कार्य तडीस नेताना त्या ज्ञानवंतांची बूज राखणे व त्याच वेळी मोती जड होऊ न देणे ही तारेवरची कसरत त्यांनी पार पाडली.

सोमनाथ मंदिर हे सर्व हिंदूंना पूजेसाठी आणि अहिंदूंना दर्शनासाठी खुले राहणार होते. सनातन्यांनी मंदिराच्या प्रतिष्ठापनेवर बहिष्कार घातला. शास्त्रीबुवांनी त्याचे पौरोहित्य केले. तेच महात्मा गांधींचा मुलगा व राजगोपालचारी यांची मुलगी यांच्या आंतरजातीय विवाहाचे पौरोहित्यही त्यांनी केले.

शास्त्रीजींची वैचारिक भूमिका पुढे पुढे बदलत गेलेली आढळते. मंडल आयोगासंदर्भात त्यांनी प्रथम घेतलेली भूमिका पुढे बदलली. रामजन्मभूमीबद्दलची त्यांची काही विधाने वादग्रस्त ठरली. तरीही एक विचारवंत म्हणून विचार करीत असता ते मूळ प्रवाहापासून कधीही दूर गेलेले आढळत नाहीत.

त्यांनी राजकीय चळवळीत कारावास भोगला, पण नेतेपण कधी केले नाही. त्यांना लेखनापेक्षाही व्याख्यानांची हौस दांडगी होती. शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, सांस्कृतिक संघ, सभा, संमेलने, वर्धापन दिन यांच्या निमित्ताने त्यांनी असंख्य व्याख्याने दिली. पण ती देताना त्यांची भूमिका वक्त्याची नव्हती, व्याख्यात्याची होती. त्यांच्या व्याख्यानात प्रवचन आणि पुराण यांचा सुरेख संगम असे. ते प्रबोधन करीत ते श्रोत्यांना ताप न देता.

२७ मे १९९४ रोजी त्यांचे वयाच्या ९४व्या वर्षी (जन्म २७ जानेवारी १९०१) निधन झाले. "लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या पांडित्याची खरी ओळख महाराष्ट्राला झाली नाही," असे उद्गार प्रा. मे. पुं. रेगे यांनी काढले.

१९४९ साली इचलकरंजीचे नारायणराव घोरपडे स्मारक व्याख्यानमालेतर्फे 'वैदिक संस्कृतीचा विकास' या विषयावर तर्कतीर्थांनी व्याख्याने दिली. ती व्याख्याने ग्रंथरूपाने प्रसिद्ध झाली. त्याला साहित्य अकादमीचा पुरस्कार प्राप्त झाला.

वेदकाळापूर्वी वैदिकेतरांच्या महान संस्कृतीचा संसार भारतवर्षात चालला होता. त्यांची राज्ये, ग्रामे, नगरे येथील नद्यांच्या तटावर व पर्वतांच्या परिसरात उभारली गेली होती. भाषा, धर्म, कला, स्थापत्य, शेती, व्यापार, लेखन इत्यादी सुधारलेल्या मनुष्यगणांचे व्यवहार त्यांना अवगत होते. या वेदपूर्वकालीन संस्कृतींनी आपले अवशेष वैदिक संस्कृतीच्या आधिपत्याखाली आणून ठेवले. त्यांनी आपले अस्तित्व जरी ठेवले तरी ते वैदिक संस्कृतीचे अंगभूत ठरले. जैन व बौद्ध यांच्या विचारांचे सार उपनिषदातील व सांख्य दर्शनातील विचारांशी अत्यंत निगडित आहे हे जोशींनी या निबंधात सिद्ध केले आहे. बौद्ध धर्म हा औपनिषद विचारांचीच परिणती आहे. वेदपूर्वकालीन संस्कृतींना आत्मसात करण्याचा प्रयत्न वैदिकांनीच प्रथम सुरू केला.

संस्कृतीची भौतिक व आध्यात्मिक अशी दोन रूपे दिसतात. ही दोन रूपे वस्तुस्थितीत एकाच अखंड वस्तूची स्वरूपे होत. आध्यात्मिक व आधिभौतिक हे विचारांच्या सोयीकरिता केलेले काल्पनिक विभाग आहेत. मानवी शरीरधारणा भौतिक शक्तीच्या साहाय्याशिवाय होऊ शकत नाही.

'हिंदुधर्माची समीक्षा' या ग्रंथात मार्क्सवादी विवेचन पद्धतीचा प्रभाव आहे. त्यांनी मानवी विचारांना भौतिक व आर्थिक उत्पादन पद्धतीच्या मर्यादांचे बंधन वाजवीपेक्षा अधिक प्रमाणात मानले आहे. या प्रभावापासून या निबंधातील विचार मुक्त झाले आहेत.

भौतिक विज्ञानाची अपरिमित प्रगती आणि यांत्रिक व औद्योगिक सुधारणांचा प्रचंड विस्तार यांच्या योगाने मनुष्यजातीला संपूर्ण समृद्धीचे युग जवळ आले आहे असा भास या विनाशकालीही पाश्चात्त्य संस्कृती निर्माण करीत आहे. यांत्रिक संस्कृतीने उत्कर्षाची व विनाशाची अशी दोन्ही प्रकारची साधने निर्माण केली आहेत. मनुष्याची बुद्धी किंवा जाणीव भ्रष्ट झाली असल्यामुळे जग नष्ट होण्याचा प्रसंग आला आहे.

आज विश्वव्यापी मानवसंस्कृती उत्पन्न होऊ पाहात आहे; परंतु परंपरेच्या पूर्ण विनाशातून नवे उत्पन्न होऊ शकत नाही. परंपरेतील स्थिर मूल्यांना आत्मसात करूनच हे होऊ शकेल. भारतीय संस्कृती या महान समन्वयात केवळ भागीदाराचीच भूमिका बजावणार नाही तर तिचे पोषण करू शकेल, ती तिची अन्तःप्रवृत्ती आहे हे तर्कतीर्थांनी निबंधात दाखविले आहे. त्याच वेळी त्या कामातील अडचणीही त्यांनी दाखवून दिल्या आहेत. तर्कतीर्थ म्हणतात,

''भिन्न संस्कृतींचा विकास भिन्न प्रकारचा असला तरी संस्कृतींची साधना करणारी मानवी बुद्धी आणि मन यांचे व्यापार समान पद्धतीनेच चालत असतात. म्हणूनच संस्कृतीच्या विकासातील भिन्न भिन्न पातळीवर असलेले मानवसमाज संस्कृतीची देवघेव करू शकतात. मनुष्य व्यक्तिशः व समुदायशः जी जीवनपद्धती निर्माण करतो आणि जीवन साफल्यार्थ स्वतःवर व बाह्य विश्वावर संस्कार करून जे आविष्कार करतो ती पद्धती व तो आविष्कार म्हणजे संस्कृती. निसर्गामध्ये बदल करून किंवा संस्कार करून मनुष्याची जीवितयात्रा चालत असते. निसर्गावर विजय मिळविण्याचा क्रम म्हणजेच संस्कृती होय.''

"आधिभौतिक आणि आध्यात्मिक असे संस्कृतीचे दोन भाग कल्पिलेले आहेत. ते पूर्ण पृथक नाहीत. आध्यात्मिक भागात निसर्गावर विजय मिळविण्याची क्रिया असतेच. श्रद्धा, सत्यनिष्ठा, मैत्री, औदार्य, ज्ञानलालसा हे सद्गुण आणि अश्रद्धा, मत्सर, द्वेष, विद्याविमुखता इत्यादी दुर्गुण मनुष्याच्या स्वभावात बीजरूपाने असतात. मनुष्याला विचाराने सत्प्रवृत्तीची निवड करून वाढ करावी लागते. म्हणून उच्च आध्यात्मिक मूल्ये एका अर्थाने चिरंतन आहेत व दुसऱ्या अर्थाने मानवनिर्मित आहेत. उच्चतम मूल्ये शाश्वत असूनही माणसास शोध करून निर्माण करावी लागली. या शोधात त्याला यश-अपयश ही दोन्ही प्राप्त झाली आहेत. वारंवार बदल करावा लागला आहे.''

''वंशवाद्यांच्या मते सर्व मानववंश सारख्याच स्वभावाचे व सामर्थ्याचे नसतात. जन्मतःच त्यांच्या स्वभावात व सामर्थ्यात तारतम्य असते. आपल्याहून पृथक असलेल्या वंशाच्या संस्कृतीचे अनुकरण केवळ वरपांगीच करू शकतो.''

संस्कृतीची ही वंशवादी उपपत्ती निर्दोष नाही. परिस्थितीत महत्त्वाचा बदल झाल्यास परिस्थितीवर विजय मिळविण्यासाठी मनुष्य आपली जीवनपद्धती बदलून टाकतो. तिच्या घटक संस्थांचा, ध्येयांचा व पद्धतींचा विकास होतो. हाच संस्कृतीचा विकास होय. प्राप्त परिस्थितीवर विजय मिळविण्यात अपयश आले म्हणजे प्रगती स्थगित होते किंवा विनाशही होतो. प्रगतीच्या खालच्या पायीवर असताना उपयुक्त होणाऱ्या संस्था, भावना व आचारपद्धती कालांतराने बंधनभूत ठरतात व अवनतीला नेणाऱ्या शक्तीची प्रभावी साधने बनतात. याकरिता कोणत्याही संस्कृतीतील शाश्वत उच्चतम मूल्यांचे आविष्कार कोणते आणि परिस्थितिजन्य संकुचित अंश कोणते, यांचे विवेचक बुद्धीने परीक्षण करावे लागते.

''व्यक्तित्वाचा विकास हाच प्रगतीचा मुख्य मानदंड होय. समाजात राहाणाऱ्या

व्यक्तींना पुरुषार्थ साधण्यात किती स्वातंत्र्य लाभते, यावर समाजाची प्रगती अवलंबून असते. व्यापकता ही विकासाची शक्ती होय. व्यापकतेमुळे मानवी सहकार्य वाढत जाते. सहकार्याशिवाय व्यक्तित्व हे गुणसंपन्न होऊ शकत नाही. मागच्या पिढ्यांच्या सांस्कृतिक वैभवानेच पुढच्या पिढ्या अधिक वैभवसंपन्न होतात. म्हणूनच संस्कृतीच्या उच्चतम स्वरूपास मानवधर्म अशी संज्ञा आहे. "

वैदिक संस्कृती व विद्यमान हिंदू संस्कृती यांचा ऐतिहासिक संबंध स्पष्ट करताना तर्कतीर्थ म्हणतात, "भारतीय संस्कृती म्हणजे मुख्यतः हिंदू संस्कृती होय. हिंदू संस्कृती ही वैदिक संस्कृतीचेच विस्तार पावलेले स्वरूप होय. वेदांचा अधिकार नसलेल्या वर्णिकबाह्य हिंदू जमातीसुद्धा वैदिक संस्कृतीच्या पालक आहेत. कारण त्यांचे आदर्श वैदिक स्फुरणांनी भारलेले आहेत. जैन, बौद्ध धर्मसुद्धा वैदिक संस्कृतीचेच विस्तार होत. हे विस्तार मुळापासून फारकत झाल्याची कल्पना बाळगतात. म्हणूनच त्यास वैदिक म्हणत नाहीत. जैनांच्या व बौद्धांच्या कर्मविपाक, संसारबंध व मोक्ष या अंतिम कल्पना वैदिकच आहेत."

आधुनिक पंडितांना हे मत मान्य नाही. त्यांच्या मते विद्यमान हिंदू संस्कृती वैदिक व अवैदिक, आर्य व अनार्य लोकांच्या विविध संस्कृतींच्या मिश्रणाने बनली आहे. जैन व बौद्ध धर्म वैदिकधर्माच्या विरुद्ध निर्माण झालेले बंड आहे. विद्यमान हिंदू संस्कृतीची परिणती मूळ वैदिक संस्कृतीतून झाली आहे हे दाखवणे हा तर्कतीर्थांच्या ह्या ग्रंथाचा हेतू आहे.

तर्कतीर्थांनी ऋग्वेद काळात लोकांनी समृद्धीचे सुवर्णयुग कसे निर्माण केले होते हे सुरुवातीला दाखविले आहे आणि या समृद्धीमुळे त्यांची प्रतिभात्मक बुद्धी विश्वाचे समग्र रहस्य समजून घेण्याकरिता विश्वशक्तीशी सलगी व सख्य करू लागली असे विधान केले आहे. मनुष्याच्या अंतरंगातील नैतिक सत्य आणि विश्वशक्तीच्या अस्तित्वास व व्यापारास प्रेरक असलेले सत्य एकच होय, अशा निश्चयाला विशाल वैदिक प्रतिभा पोचली. तर्कतीर्थ म्हणतात,

"ऋग्वेदात अनेक देवता आहेत; परंतु त्या ऋग्वेदपूर्व परंपरेतील अवशेष भाग आहे. जी देवता ज्या ऋषीस इष्ट असेल अथवा ज्या समयी इष्ट असेल त्या देवतेस तो ऋषी परमेश्वर मानून स्तवितो. मॅक्समुलरने याला इष्ट-देवतावाद अशी संज्ञा दिली आहे. 'एक सत्' हे तत्त्व ऋग्वेदाने प्रतिपादले. हे प्रतिपादन हिंदू धर्माच्या इतिहासाला विशिष्ट कायमची दिशा देण्यास कारण झाले. सर्व प्रकारचे धर्ममार्ग शेवटी त्याच्याचकडे वळतात ही दृष्टी वेदांनी प्रथम निर्माण केली."

"परलोक व इहलोक यांचा सांधा वेदातील संस्कृतीने पूर्णपणे सांधलेला होता. शरीर, इंद्रिये, मन व बुद्धी यांचे आकर्षण करणारे हे जग वैदिक ऋषीला स्वर्गाइतकेच सुंदर दिसत होते. हे मृत्युस्थान आहे, म्हणून येथील मृत्यूला भिऊन या जगाबद्दल विरक्ती त्याच्या मनात डोकावली नाही. या जगातील रम्य जीवन हे स्वर्गप्राप्तीचे साधन होय असे तो समजत होता.

याच भौतिक जगात त्याला स्वर्गातील देवांचा साक्षात्कार चर्मचक्षूंनी नित्य होत असे. इह आणि पर यांची अखंडता हा वेदांच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानाचा गाभा आहे."

"स्वर्गातील देवतांचे या जगातील संगमस्थान वैदिक माणसाने यज्ञरूपाने निर्माण केले. म्हणून यज्ञसंस्था ही वैदिक संस्कृतीच्या विस्ताराचे केंद्र बनले होते."

''ज्या समाजाचे भौतिक व आध्यात्मिक वैभव समाजातील सर्व थरांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीने अनुभविता येते, त्याच्या वैभवाचे चांगले परिणाम सर्व समाजावर होतात; तो समाज निरोगी राहतो. ज्या समाजातील कोणत्याही प्रकारचे विशिष्ट सामाजिक गटातच निरुद्ध होऊन पडते आणि समाजातील बहुसंख्याकांच्या वाट्यास दौर्भाग्य येते, तो समाज कितीही पुढारलेला असला तरी रोगट समजला पाहिजे. वैदिक काळी सामाजिक जीवन निरोगी व प्रसन्न होते, याचे प्रत्यंतर वैदिक वाङ्मयात सापडते. भारतीयांचे वैदिक काळातील कौटुंबिक व सामाजिक जीवन बौद्धिक संस्कृतीच्या निकोप वाढीस कारण झाले होते. स्त्री व पुरुष किंवा उच्चवर्णीय व हीनवर्णीय यांच्यात संपूर्ण मानसिक फारकत दर्शित करणारी सामाजिक विकृती त्या युगात निर्माण झाली नव्हती. बौद्धिक विकास ही सर्वांगीण सुधारणेची निशाणी आहे, कारण ज्ञान हे उच्चतम अंतिम मूल्य आहे. ज्ञानाचा संबंध सर्व मानवी व्यवहारांशी अत्यंत निगडित असतो. जीवनविषयक प्रयत्नांचे जितके प्रकार तितक्या कला व विद्या असतात. म्हणून ज्ञानास सर्वांगीण स्वरूप प्राप्त होण्यास समाजातील सर्व प्रकारच्या घटकांची ज्ञानार्थ प्रयत्नात भागीदारी असावी लागते. सर्व प्रयत्नांचे साफल्य ज्ञानावर अवलंबून असते. ज्ञान हे मुख्य साधन व अंतिम साध्य आहे.''

प्राचीन भारतीयांच्या ज्ञानविकासातील उपनिषदांचे स्थान विशद करताना तर्कतीर्थ म्हणतात,

"उपनिषदामध्ये विशाल, भव्य व शुद्ध कल्पनांचे सर्जन कार्य दिसून येते. पण कल्पनांची व्यवस्थित मांडणी उपनिषदात नाही. उपनिषदांचे लेखन बांधीव स्वरूपाचे नाही. उच्च विचारांचे ते प्राथमिक आविष्कार आहेत. धर्म, सृष्टी व अंतिम वस्तुतत्त्व हे तीन विषय उपनिषदात प्रतिपादिले आहेत. अंतिम वस्तुतत्त्व सांगणे हे मुख्य उद्दिष्ट. ते नीट समजावे म्हणून सृष्टीविषयक विचार, धर्म हे सत्यदर्शनाचे साधन यज्ञाशी संबद्ध उपासना किंवा स्वतंत्र उपासना उपनिषदात प्रतिपादल्या आहेत. उपनिषदातील तत्त्वज्ञानाचा वैचारिक कार्यकारणभाव समजण्यास चारी वेदांतील देवतांविषयक व यज्ञविषयक विचार ध्यानात घेतले पाहिजेत. कर्मकांडाचा व ज्ञानकांडाचा एकजीव सांधा जर समजला नाही तर उपनिषदातील ज्ञानकांड कसे प्रकट झाले, हे समजणे शक्य नाही. धार्मिक व तात्त्विक कल्पनांचा अर्थ समजण्यास त्यांचा इतिहास ध्यानात धरावा लागतो.

विधाच्या अंतिम सत्याचा उल्लेख 'पुरुष' किंवा 'ब्रह्मन्' या शब्दाने उपनिषदपूर्व वैदिक वाङ्मयात सुरू झाला. 'आत्मन्' या शब्दाने विश्वसत्याचा निर्देश मोठ्या प्रमाणात

उपनिषदातच सुरू झाला आहे.. 'आत्मा' ही जागतिक तत्त्वज्ञानात महत्त्वाची कल्पना आहे. उत्पत्ती, स्थिती व लय या अवस्थांतून विश्व जात असते. या सर्व अवस्थांना व्यापणारी जीवनशक्ती या अर्थी आत्मा हा शब्द परमपुरुषाला उपनिषदांनी लावला.

विश्वशक्तीची देव म्हणून भक्ती करणारा माणूस देवाशी आपले अभेदाचे नाते स्थापित करण्यास किंवा शोधण्यास आतुर आहे. ही गोष्ट उपनिषदपूर्व वैदिक वाङ्मयात अनेक ठिकाणी व्यक्त झाली आहे.

तार्किक बुद्धीचा प्रथम आविष्कार उपनिषदात झाला. संगतीपूर्ण व व्यवस्थित विचार म्हणजे तर्क. त्या दृष्टीने बुद्धीचे सर्व स्वरूप तर्कात्मक आहे.

विश्व कसे व कशाचे निर्माण झाले? प्रारंभी काय होते, मनाची व इंद्रियांची प्रेरणा कोठून येते, इत्यादी मूलभूत प्रश्न हा बुद्धीचाच व्यापार आहे. शंकराचार्यांनी तर्क याचा अर्थ 'अनुमान' असा केला आहे; परंतु तर्क शब्दाचा एक व्यापक अर्थ आहे. तो म्हणजे ज्ञान निर्माण करणारी प्रमाणव्यवस्था. प्रमाणव्यवस्थेशिवाय ज्ञान उत्पन्न होणे अशक्य आहे.

छांदोग्य उपनिषदाच्या सहाव्या अध्यायात 'तत्त्वमसि' हा सिद्धान्त प्रथम सांगितला आहे. प्रयोगयुक्त तार्किक संशोधनाचा प्रथम उगम तेथे सापडतो.

'जे एक जाणले असता बाकीचे न जाणलेले किंवा न पाहिलेले ज्ञात होते' ते काय आहे अशा प्रश्नापासून या अध्यायातील तत्त्वचर्चा सुरू झाली आहे. उपनिषदानंतर षडङ्गे (शिक्षा, कल्प व्याकरण, निरुक्त, छन्दस्, ज्योतिष) व इतर भारतीय विद्या विस्तार पावल्या. त्यांच्यात तार्किक विवेचन पद्धती अनेक दृष्टीने पूर्णत्वास पोचली. ईश्वर नाही, वेद प्रमाण नाहीत अशा तऱ्हेचे नास्तिपक्षीय विचार मांडल्यावरच अस्तिपक्षीय विचार भारतीय तत्त्ववेत्त्यांनी मांडले आहेत. वैचारिक विरोध ही विचारवाढीची प्रवर्तक शक्ती आहे.

अथर्ववेद संहितेच्या काळातच सांख्यदर्शन प्रादर्भूत झाले. सांख्यदर्शनाचा कपिलप्रणित ग्रंथ विद्यमान नाही. सांख्यदर्शनाशी संबद्ध दुसरे दर्शन म्हणजे योगदर्शन, सैरावैरा पळणाऱ्या नैसर्गिक स्थितीतल्या जनावरांना माणसाळून रथाला किंवा गाडीला जसे जुंपतात त्याप्रमाणे मनाला व इंद्रियांना योग्य मार्गाने नेण्याकरिता ताब्यात ठेवणे, वळण देणे यास योग म्हणतात. योगक्रियेचा आरंभ वेदपूर्वकालापासून आहे. योगविद्येचा मनोविजय हा मुख्य विषय आहे. आधुनिक मानसशास्त्र व योगदर्शनातील मानसशास्त्र यांच्यात एक अत्यंत मूलभूत फरक आहे.

मनुष्यास शुद्ध सत्य ज्ञान होणे शक्य नाही किंवा शुद्ध आदर्शवादी उदात्त निर्मल जीवन जगता येणे शक्य नाही. कारण मनुष्याचे मन ज्ञात, अर्धज्ञात अशा हीन कामनांच्या संस्कारांच्या बंधनातून मुक्त होणे शक्य नाही. साधुत्व व सत्यनिष्ठा यांचा पाया अज्ञात पाशवी वासनांनी भरलेला असतो. साधुत्व व सत्यनिष्ठा हा केवळ बाह्यदेखावा आहे. मानवी अंतरंगाचा स्वभाव इंद्रियांची हाव व मांसविकार हाच आहे. अप्रत्यक्ष वा प्रत्यक्ष स्वरूपात, पर्यायाने

किंवा साक्षात या दैहिक लालसाच उदात्त व शुद्ध स्वरूपाचा देखावा निर्माण करतात. हे मात्र खरे की मानवी संस्कृतीची उभारणी संयमाशिवाय होऊ शकत नाही; परंतु संयमाच्या योगाने वासना दवतात, नष्ट होत नाहीत, केवळ परिस्थितीस जुळतील अशी रूपे त्या धारण करतात व विकृत वा अशुद्ध रूपात मनाच्या अज्ञ दालनात राहून कार्य करीत असतात. त्या वासनांना उदात्त रूप धारण करणे जेव्हा शक्य होत नाही तेव्हा मानसिक व्यथांच्या रूपाने त्या बाहेर येतात. मानवी संस्कृतीचा फार मोठा भाग मनोविकृतीच्या प्रभावानेच उभारला आहे; कारण निरोगी मनःस्थिती दुर्लभ आहे. निरोगी मनाचा मनुष्य क्वचित सापडतो. हे आधुनिक मानसशास्त्रज्ञांच्या मताचे सार आहे. शास्त्रीजींनी हे विचार खोडून काढले आहेत. ते म्हणतात,

"नैसर्गिक वासना हीन स्वरूपाच्याच असतात असे नाही. रज व तम हे जसे प्रकृतीचे दोन गुण आहेत, त्याचप्रमाणे सत्त्व हा तितकाच नैसर्गिक प्रकृती गुण आहे. त्याच्या आश्रयाने राजस व तामस प्रवृत्तींना जिंकून मनाचे स्वाभाविक सात्त्विक रूप विकसित करता येते. तुलनात्मक मानसशास्त्र निर्माण करण्यासाठी योगशास्त्रातील मानसशास्त्र विस्ताराने तपासण्याची मोठी आवश्यकता आहे."

पुढच्या व्याख्यानात शास्त्रीजींनी वैदिकांची कुटुंबसंस्था व समाजसंस्था यांचा विचार केला.

व्यक्ती, समाज व कुटुंब यांच्या धारणेकरिता आवश्यक मानवी क्रियेस धर्म हे नाव वैदिकांनी दिले. यज्ञ हाच त्यांचा पहिला धर्म होता. नीतिशास्त्रदृष्ट्या मूलभूत व व्यापक अशा अनेक कल्पना वेदात प्रथम प्रकट झाल्या आहेत. ज्या आचारात व संस्थेत वैदिक तत्त्वे अधिक तो आचार व संस्था अधिक प्रगत समजली जात असे.

ऋग्वेदात व अथर्ववेदात माणसामाणसातील सद्भावना वारंवार प्रशंसिली व प्रार्थिली आहे. वेदात सत्याचा महिमा अगाध सांगितला आहे. देवांचा क्रोध होऊ नये म्हणून पापापासून दूर राहण्याचा प्रयत्न वेदकालीन मनुष्य करीत होता.

धर्म व ऋण अशा दोन मूलभूत कल्पना वेदांनी भारतीय समाजशास्त्राला दिल्या. या दोन कल्पना वैयक्तिक व सामाजिक जीवनक्रमाला आवश्यक असलेल्या संस्था निर्माण करतात. आश्रमव्यवस्था व आश्रमधर्म ऋण कल्पनेवर उभारले आहेत. धनसंबंधी ऋणाच्या विशेष कल्पनेवरून ऋणाची कल्पना व्यापक बनली. देवऋण, ऋषिऋण, पितृऋण व मनुष्यऋण अशी चार ऋणे मानवास असतात असे वेद म्हणतात.

ऋषींचे ऋण ब्रह्मचर्याने, देवांचे ऋण यज्ञाने, पितरांचे ऋण प्रजोत्पादनाने फेडता येते. मनुष्याच्या ऋणाची कल्पना ही ऋणकल्पनेतील सुधारणा आहे. एकमेकांच्या सहकार्याने मानवी प्रपंच चालत असतो. हेच मनुष्यऋण आहे. औदार्याने किंवा दानाने या ऋणातून मुक्त होता येते.

इंद्रियांच्या गरजांना यत्किंचितही नीतिमूल्य न देणे हे अवास्तव, काल्पनिक व अव्यवहार्य

नीतिशास्त्रास जन्म देते. त्यामुळे मिथ्याचार वाढीस लागतो, समतोलपणा नाहीसा होतो. त्यामुळे त्रिवर्गाची किंवा पुरुषार्थाची विचारसरणी पुढे आली. धर्म, ऋण व त्रिवर्ग अथवा पुरुषार्थ (धर्म, अर्थ व काम) या तीन तत्त्वांच्या अधिष्ठानावर भारतीयांची जीवनपद्धती व संस्कृती वाढली आहे.

वेदपूर्व काळापासून सूत्रकाळापर्यंत जे सामाजिक किंवा धार्मिक आचार रूढ होते त्यांचा संग्रह स्मृतींमध्ये कमीजास्त प्रमाणात केला आहे. यातील काही आचार वेदातही सापडतात.

गृह्यसूत्रे व धर्मसूत्रे वैदिक समाजातील केवळ निवडक आचारांचे व कर्मकांडांचे विवरण करतात. न उल्लेखलेला आचारधर्म रूढीवरून समजून घ्यावा अशी अपेक्षा होती. त्यामुळे सदाचाराला प्रामाण्य दिले गेले. वैदिक लोकांच्या समाजविषयक विचारसरणीला ऐहिक दृष्टी लाभल्याचे लक्षण मनुस्मृतीत सापडते. धर्मसूत्रात ते सापडत नाही. मनुस्मृतीपेक्षाही धार्मिक व सामाजिक विचारांच्या दृष्टीने महाभारतातील ही धर्ममीमांसा बुद्धिवादी आहे.

'वेदकालीन कुटुंबसंस्थे'बद्दल शास्त्रीजी म्हणतात,

''ऋग्वेदातील कुटुंबसंस्था पितृप्रधान असली तरी साधारणपणे पिता व माता यांची कुटुंबव्यवस्थेत प्रतिष्ठा सारखीच मानली जात होती. पुत्र नसेल तर मुलीचा अधिकार पुत्रवत मानला जात होता. अशा मुलीस पुत्रिका म्हणतात. क्षत्रिय कुलातील स्त्रियांना युद्धात सारथ्य करण्याचाही अधिकार असे. विवाहित स्त्रीवर पतीचे एक प्रकारचे स्वामित्व असले तरी ती घरची स्वामिनी आहे ही कल्पना वैदिक काळापासून आजपर्यंत मान्य ठरली आहे. 'पुरंध्री' म्हणजे गृहसंस्थेचा भार उचलणारी स्त्री. ऋग्वेदात कालात एकपत्नीत्वाची चाल प्रशस्त मानीत असत. सप्तपदीच्या मंत्रात पत्नी सखी होते असे सांगितले आहे. यावरून वैदिक लोकांचा वैवाहिक आदर्श म्हणजे पती-पत्नीचे मित्रत्वाचे समानपणाचे नाते असे निश्चितपणे म्हणता येते. श्रीमंत व कारागीर वर्गात बहुपत्नीत्वाची चाल प्रचलित होती. प्रजेचा विस्तार हे त्याचे कारण होते. दासी म्हणजे गुलाम स्त्री असा अर्थ ऋग्वेदात नाही. इजिप्त व इराण येथील संस्कृतीत सदोहरांचा विवाह होत असे. त्या चालीचा निषेध ऋग्वेदकालीन वैदिकांनी केलेला आढळतो.

'कुलायैव कन्या दीयते' (कन्यादान कुळाला केलेले असते, वराला नाही) असे आपस्तंभसूत्रात सांगितले असल्याने नियोगाच्या चालीचे समर्थन होत असे. पुढे ती चाल मनुस्मृतीने निषिद्ध ठरवली.

स्त्रीप्रधान समाजसंस्था वैदिक व अवैदिक भारतीयांमध्ये प्राचीन काळी होती. नागामध्ये मातृप्रधान होती. अर्जुन उलुपीचा पुत्र बभ्रुवाहन आपल्या आईपाशी राहिला. ही संस्था पुढे अल्प गटात शिल्लक राहिली. मातृपूजा अवैदिकांपासून वैदिकांनी वेदकालीच स्वीकारली होती. भूमीची वाटणी होत नसे. तिच्यावर सामुदायिक स्वामित्व असे. तिच्यावरील उत्पन्नाची वाटणी होई. ही परंपरा स्मृतिग्रंथाच्या काळी बदलली.

त्रैवर्णिकांचे आचार न पाळणाऱ्या भटक्या लढाऊ जमातींना म्हणजे व्रात्यांना व्रात्यस्तोमाने पावन करून घेऊन त्रैवर्णिकात समाविष्ट केले जाई. त्यामुळे राष्ट्राची हानी टळते असे अथर्ववेदाचे वचन आहे. 'भारत' काळांपर्यंत ब्राह्मांचा समावेश त्रैवर्णिकात करून त्यांना वैदिक धर्माची दीक्षा देण्याचे काम चालू होते ते पुढे मंदावत गेले व बंद पडले.

स्वतंत्र आर्थिक जीवन जगणारा शूद्रवर्ण हाच प्राचीन भारतीयांच्या अर्थशास्त्राचा मूळ घटक होता. पण त्याला सामाजिक दर्जा खालचा होता. यामुळे श्रमजीवी जीवनाचा महिमा वाढला नाही. सुसंस्कृत व बुद्धीचा विकास झालेले वर्ग सामान्यतः औद्यगिक काळापासून दूर राहिले. या गोष्टीचा भारतीयांच्या आर्थिक विकासावर विपरीत व अनिष्ट परिणाम झाला.

सर्व मानवांना पारमार्थिकदृष्ट्या समता इतिहास-पुराणातील धर्माने दिली. इतिहास-पुराणांनी भक्तिमार्गाची स्थापना केली. पुढे पुढे पौराणिक वाङ्मयात अस्ताव्यस्तपणे भेसळ झाली. त्यामुळे पुराणांचे धर्मेतिहास व भारतीयांचा अतिप्राचीन इतिहास या दृष्टीने असलेले त्यांचे महत्त्व नष्टप्राय झाले. अज्ञानी, पोटभरू, मूर्ख भिक्षुकवृत्तीच्या ब्राह्मणांनी पुराणांच्या शुद्ध स्वरूपाला बिघडवून टाकले.''

यापुढे शास्त्रीजींनी पुराणांसंबंधी जे विवेचन केले आहे. त्याचा हेतू पुराणांचा उगम वैदिक संस्कृतीच्या साहाय्याने झाला व पुराणांनी भारतीय संस्कृतीला भव्य व कलात्मक वैभव प्राप्त करून दिले हे दाखवावे हा आहे. शास्त्रीजी म्हणतात,

''अवैदिकांची परंपरा वैदिकांनी मोकळ्या मनाने स्वीकारली. यज्ञमंडपात नाग जातीचे लोक, पारधी, गारुडी, शिकारी, वेद न शिकलेले लोक संमिलीत होत. या सर्वांची करमणूक करण्याकरिता कथा, गायन, नृत्य यांचे कार्यक्रम होत. यातूनच भेदभावातीत पौराणिक संस्कृती जन्म पावली. यज्ञसंस्थेला पौराणिक धर्माने मागे टाकले. भागवत धर्मात वेदविहित यज्ञांना दूषण दिले आहे. पौराणिक, बौद्ध व जैन धर्माची यज्ञविरोधी प्रवृत्ती वेदातही प्रतिबिंबित झाली आहे. बाह्य क्रियाकलापासून निवृत्त होऊन मानसिक उदात्त धार्मिक भावनेकडे वळणे हे विचार विकासाचे लक्षण आहे. असा विचार विकास सर्वसामान्य अप्रगल्भ जनांना झेपत नसतो. म्हणून पौराणिकांना, बौद्धांना, जैनांना नवे पूजाप्रकार निर्माण करावे लागले. यज्ञमंडपापेक्षा अधिक सुंदर व कलात्मक मंदिरसंस्था त्यांनी उत्पन्न केली. वेदमंत्राच्या ऐवजी गद्यपद्यात्मक स्तोत्रे व प्रार्थना रचल्या. ऋत्विजांच्या ठिकाणी पुजारी, यज्ञसमारंभाच्या ऐवजी उत्सव आले. ब्राह्यकर्मकांड हे स्वरूप निराळया प्रकाराने स्वीकारावेच लागले.''

पुराणातील इतिहास कथनाबद्दल शास्त्रीजी म्हणतात, "पुराणातील इतिहासात अद्भुत वर्णने, अतिशयोक्ती व कल्पनाविलास ह्यांचा भाग मुख्य असल्यामुळे वास्तविक इतिहासाचा अंश पूर्णपणे झाकून गेलेला असतो. इतिहासाचा भाग कोणता व काल्पनिक अंश कोणता याचा विवेक करणे बहुशः अशक्य होते. भूगोल वर्णनही काल्पनिक. जंबुद्वीपातील भारतवर्षाचे वर्णन सत्य, पण मेरुपर्वत दधिसमुद्र इत्यादी कल्पना अद्भुत होत."

बौद्ध व जैन धर्माबद्दल बोलताना शास्त्रीजी म्हणतात,

"यज्ञसंस्थेची उपेक्षा करणारी एक प्रवृत्ती वैदिककालीन भारतीय संस्कृतीत होती. या प्रवृत्तीचा वैदिक विचारसरणीवरही प्रभाव पडला. मानसिक उपासनेला महत्त्व देणारी प्रवृत्ती आरण्यकात व उपनिषदात प्राधान्यास पावली. बौद्ध व जैन धर्म म्हणजे वैदिक परंपरेच्या विरुद्ध बंड करून निघालेली हिंदूंचीच पाखंडे होत. वैदिक संस्कृतीच्या गर्भात बीजारोपण झालेल्या विचारसंपदेचीच जैन व बौद्ध धर्म ही परिणत झालेली भव्य रूपे होत. विरोधाने विकास होणे हे ज्ञानाच्या वाढीचे तत्त्व आहे. बुद्ध व महावीर यांचा जन्म होऊन बौद्ध-जैनांची पाखंडे जागृत झाली.

जैन व बौद्ध संप्रदाय अवैदिक संस्कृतीतून जन्मले अशी एक उपपत्ती आहे. पण ही उपपत्ती मानण्यास तीन अडचणी आहेत. बुद्ध व महावीर हे क्षत्रिय होते. ज्या लोकगणात ते जन्मले त्यांची भाषा संस्कृत भाषाकुलापैकी होती व ह्या लोकगणास चातुर्वर्ण्य, वैदिक देवता व वैदिक ऋषी मान्य होते.

नैष्ठिक ब्रह्मचर्य किंवा संन्यास हे मोक्षाचे मुख्य साधन होय हा जैनांचा व बौद्धांचा प्रधान सिद्धांत उपनिषदामध्ये प्रथम मांडलेला आढळतो. बौद्ध व जैन धर्माचा वैदिक धर्माशी असलेला ऐतिहासिक संबंध अगदी निकटचा आहे ही गोष्ट सिद्ध करणारी अनेक प्रमाणे देता येतात. आपल्या विचारांच्या प्रसाराकरिता वैदिक तसेच बौद्ध आणि जैन देशपर्यटन करीत असत. बुद्धोदयकालीन विचारसंग्रामाचे तीन भाग पडतात. विश्वचिंतन, आत्मचिंतन व साध्यसाधनचिंतन. मनुष्याच्या अत्यंत जिव्हाळयाच्या प्रश्नाला- साध्यसाधनांच्या विचाराला बुद्धाने प्राधान्य दिले. मानवी जीवनाचे प्रश्न विश्वाचे प्रश्न सुटल्याशिवाय सोडविता आले पाहिजेत, कारण जीवित अल्पकाळ टिकणारे आहे. विश्वाचा प्रश्न सुटेपर्यंत थांबण्यास अवसर नाही. म्हणून जीवनाचा प्रश्न सोडविण्याचे बुद्धाने निश्चित केले. विश्व व आत्मा यासंबंधी चालणाऱ्या तत्त्वचर्चांची बुद्धाने उपेक्षा केली. कारण ते विचार म्हणजे गोंधळात टाकणारे जंगल आहे. अत्यंत निश्चित, प्रत्यक्षसिद्ध, नित्य अनुभवाच्या, निर्विवाद अशा तथ्यांवर विचारसरणी उभारण्याचा प्रथम प्रयत्न बुद्धाने केला. संयम व त्याग यांची गरज परलोकाकरिता नाही, हे साधन याच जगातील जीवनाला यशस्वी करण्याकरिता आहे, या जीवितातच या साधनांनी परमार्थ अनुभवता येतो, याची साक्ष बुद्धाने दिली. बुद्धावाचून बुद्धाच्या विचारसरणीस पोचलेले ज्ञानी लोक त्या समयी बुद्धाच्या प्रांतात होते.

बुद्धाने साधनमार्ग शोधला याचा अर्थ नवीन साध्ये व नवीन साधने प्रकाशात आणली असा नव्हे. तत्कालीन भारतीय संस्कृतीत परमार्थाच्या साध्यसाधनांची गर्दी उडाली होती. त्यातून बुद्धाने साध्यसाधनांची निवड केली. वैदिक काम्यकर्मकांड एका टोकाला आणि जैनांचा आत्मक्लेशाचा तपोमार्ग हा दुसऱ्या टोकाला असे आत्यंतिक मार्ग कसे सदोष आहेत हे निदर्शनास आणून बुद्धाने मध्यम मार्ग दाखविला.

वैदिक वाङ्मयात धर्म हा शब्द संशय निर्माण करीत नाही. पवित्र कर्म, कर्तव्य कर्म एवढाच अर्थ वैदिक वाङ्मयात या शब्दाला आहे. बौद्ध वाङ्मयात संदर्भानुसार धर्म शब्दाचा अर्थझ बदलतो. विस्तृत व संकुचित या दोन्ही अर्थांनी बौद्ध वाङ्मयात हा शब्द वापरला आहे.

ऐहिक जीवन दुःखमय आहे हा विचार बौद्ध धर्माच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानातील मूलभूत विचार आहे. या विचाराचा उगम उपनिषदात झाला. प्रापंचिक सुखे व सुखसाधने अस्थिर व विनाशी आहेत, म्हणून अखेरीस दुःख हा परिणाम ठरलेलाच आहे, या विचाराचा प्रारंभ उपनिषदात झालेला दिसतो; परंतु हा विचार सांख्य, बौद्ध, जैन किंवा वेदोत्तरकालीन सर्व भारतीय विचारसरणीवर प्रभाव गाजवीत आहे. उत्तरकालीन चार्वाक-दर्शनावरसुद्धा याची पकड बसली. उपनिषदपूर्व वाङ्मयात दुःखवादाचा मागमूसही सापडत नाही. आध्यात्मिक आनंद व आधिभौतिक सुख यांचे वैदिक वाङ्मयात संगनमत झालेले आहे.

बुद्ध धर्माच्या पूर्वीचे धर्म विशिष्ट समाजापुरतेच किंवा राष्ट्रापुरतेच मर्यादित होते. सर्व मानवांना व्यापू व पुनित करू अशी प्रेरणा त्यांच्यात नव्हती. अशा विशिष्ट अर्थाने विश्वव्यापी धर्म ही संज्ञा बौद्ध, ख्रिश्चन व मुसलमान या तीनच धर्मांना देण्यात येते.''

भारतात बौद्ध धर्माचा ऱ्हास होण्याची कारणे देताना शास्त्रीजी म्हणतात,

"जैन व बौद्ध धर्मीयांनी धार्मिक विधीचे महत्त्व जाणले नाही. मानसिक दौर्बल्य किंवा विकृती टाळण्याचे कार्य धर्मविधीच्या योगाने होते. ब्राह्मणांनी वैदिक परंपरेच्या बाहेरील देवता व धर्मविरोधी यांच्यात सोयीप्रमाणे बदल करून स्वीकार केला व सामान्य जनतेत आपले स्थान दृढमूल केले. बौद्ध धर्माची जनमतावरील पकड भक्तिमार्गाने घालविली. म्हणून बौद्ध धर्म भ्रष्ट झाला व हिंदुस्थानातून निघून गेला-

भारतीय संस्कृतीत भारताबाहेरील संस्कृतींचे अनेक प्रवाह येऊन मिसळले व ते बेमालूमपणे या संस्कृतीत मिसळून गेले तसे मुसलमान संस्कृतीच्या बाबतीत का होऊ शकले नाही याचाही ऊहापोह शास्त्रीजींनी आपल्या व्याख्यानात केला आहे."

'धर्माचे इतिहासातील स्थान' स्पष्ट करताना तर्कतीर्थ म्हणतात,

"ऋग्वेदापासून उपनिषदापर्यंतच्या काळात जी आर्य संस्कृती नांदली, तिने शाश्वत मूल्यांचे तत्त्वज्ञान निर्माण केले. इजिप्त व असुर राष्ट्रे यांच्यापेक्षा भिन्न असे हे नितांत महत्त्वाचे वैशिष्ट्य आर्य संस्कृतीचे आहे. तत्त्वज्ञान हे सर्व विषयांचे सार होय आणि ते मार्गदर्शक म्हणून ज्ञानसाधनेत राहते. अत्यंत मूलभूत व वरिष्ठ अशा विचारांचा आणि प्रश्नांचा परामर्श घेणे हे तत्त्वज्ञानाचे एक मुख्य कार्य असते. वैदिक तत्त्वज्ञानाने असे कार्य निश्चितपणे केले आहे. आजच्या पाश्चात्त्य विद्येच्या परिसीमेला पोचलेल्या शिक्षितासही जे विचार आणि प्रश्न गूढ वाटतात आणि ते सोडवण्यात व त्यांचे मनन करण्यात परमार्थ साधनेचा आनंद होतो, असे विचार आणि प्रश्न वैदिक तत्त्वज्ञानाने उपस्थित केले आहेत: त्यांनी विश्वाचा आणि जीवनाचा तळापासून ठाव घेऊन त्यात जो अर्थ निश्चितपणे पाहिला तो आज जरी त्यावर

अधिक वैचारिक संस्कार केल्याशिवाय ग्राह्य वाटला नाही; तरी त्याची उंची आणि खोली ही मानसिक गांभीर्य निर्माण केल्याशिवाय राहत नाही."

१९४१ मध्ये नागपूर विश्वविद्यालयाने 'तर्कतीर्थां'ना 'हिंदुधर्माची समीक्षा' या विषयावर व्याख्याने देण्यासाठी पाचारण केले होते. ती व्याख्याने ग्रंथरूपाने १९४१ मध्ये प्रसिद्ध झाली. त्या काळी तर्कतीर्थ मानवेंद्रनाथ रॉय यांच्या सान्निध्यात आले होते. या व्याख्यानातही तो तत्त्वप्रणालीचा प्रभाव पडणे साहजिक होते. या व्याख्यानातही तो प्रभाव दृष्टीस पडतो. ही गोष्ट लक्षात घेऊनच तर्कतीर्थांच्या विचारांचा मागोवा घ्यावयास हवा.

इतिहासाधिष्ठित धर्मपरीक्षेची आवश्यकता पटवून देताना तर्कतीर्थ म्हणतात,

"धर्म ही एक सामाजिक म्हणजे समाजनिर्मित व समाजाच्या इतिहासाबरोबरच तिचा विकास होतो अशी वस्तू आहे. समाजेतिहासाशी धर्मेतिहास पूर्णपणे निगडित असतो. धर्म अत्यंत प्राकृत अवस्थेपासून तो अतिशय उच्च अशा अवस्थेपर्यंत परिणत पावलेली अशी ऐतिहासिक घटनांची मालिका असते. समाजाच्या निरनिराळ्या ऐतिहासिक अवस्थेशी संवादी असेच धर्माचे स्वरूप असते.

अमुक एक धर्मच संपूर्ण सत्य व दुसरा धर्म अधोगतीचा व पतनाचा मार्ग होय, या भावनेला शास्त्रीय धर्मसमीक्षेत थारा नाही. समीक्षा म्हणजे बुद्धीच्या साहाय्याने, बुद्धिवादाचे नियम उपयोगात आणून तपासणी करणे. एकदा अलौकिक हेच धर्ममूळ व धर्मप्रमाण मानले म्हणजे धर्माची चिकित्साच करणे अशक्य होते. मग अलौकिक साक्षात्काराने प्राप्त झालेल्या धर्माची बुद्धीच्या साहाय्याने व्यवस्था लावणे, नीटनेटकी मांडणी करणे एवढेच काम राहते.

समीक्षेतून नवा धर्म उत्पन्न होतोच असे नाही, निदान यापुढे तरी होणार नाही; कारण नवधर्मसंस्था उत्पन्न होण्याचे युग संपले आहे. आतापर्यंत चार्वाक, व्हॉलटेर, थॉमस पेन, रॉबर्ट इंगरसोल इत्यादींनी केलेली धर्मचिकित्सा एकांगी होती. त्यांनी धर्मसंस्थांचे इतिहासातील महत्त्वाचे स्थान ओळखले नाही. त्यांनी धर्मातील खुळचटपणा उघडा करून दाखविला. धर्म म्हणजे भ्रामक विचारांची व दडपलेल्या जिवांची दीर्घ काळोखी रात्र असे सांगून जनतेला सूर्यप्रकाश दाखविण्याचा प्रयत्न केला."

"ऐतिहासिक धर्म म्हणजे दुसरे तिसरे काही नसून बेदरकार बदमाशांनी अज्ञ जनतेची निरंतर पिळवणूक करण्याकरिता जाणूनबुजून रचलेला कट आहे," असे व्हॉलटेर म्हणत असे. मेल्यावर शेवटी सगळयांना न्याय मिळणार आहे ह्या सिद्धान्ताबद्दल तो म्हणाला, "हा सिद्धान्त म्हणजे एका मूर्खाला फसविण्यासाठी एका लुच्याने काढलेली युक्ती आहे."

बुद्धिवादाचे जोरावर धार्मिक सिद्धान्त खोडून काढण्याची ही विध्वंसक प्रवृत्ती मानव प्रगतीस अत्यंत आवश्यक असली तरी ती अपुरी आहे. या विचाराचा मध्यबिंदूच निराळा आहे. तो म्हणजे धर्मसंस्था ही एक सामाजिक शक्ती आहे, हा विचार होय. आज धर्मातील वेडगळपणा व बालिशपणा उघडकीस आणणे इतके महत्त्वाचे नाही. धर्माच्या क्षेत्रात इतका

बालिशपणा असूनही मानवानी युगानुयुगे धर्माला आश्रय का दिला, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. याचा अर्थ असा की, धर्मसंस्था ही एक समाजातील विशिष्ट हितसंबंधाचे रक्षण करणारी सामाजिक शक्ती आहे. या दृष्टीने या संस्थेच्या सर्वांगाचे समीक्षण करणे अगत्याचे आहे. जेव्हा चालू, हीन समाजरचना नष्ट होऊन धार्मिक भ्रांतीची गरज नसलेली श्रेष्ठ दर्जाची समाजरचना उत्पन्न होईल, तेव्हा धर्मसंस्थांचा लोप होईल."

"नव्या परिस्थितीतील नवे अनुभव मनुष्याला जुन्या संस्थात बदल करण्यास किंवा त्यांचा नाश करण्यास प्रवृत्त करतात. ही बदल करण्याची किंवा नष्ट करण्याची प्रवृत्ती बुद्धिजन्य असते. जेव्हा जुनी ध्येये व जुने आचारविचार लय पावू लागतात तेव्हा त्यांच्या पोटातून नवी ध्येये आचारविचार जन्माला येतात.

प्रत्येक वेळी नव्या विचारसरणीस जुन्या विचारसरणीचे लोक अश्रद्धा, पाखंड व नास्तिक असे संबोधीत आले आहेत. वस्तुतः श्रद्धा म्हणजे विशिष्ट विचारांच्या सत्यतेची खात्री. हल्ली ज्ञानाचा कमी उपयोग करणाऱ्यांच्या मनातील खात्रीस श्रद्धा म्हणतात. प्रत्येक विचारसरणी, मग ती जुनी असो अथवा नवी असो, उदात्त असो की अवनत असो, त्यात निश्चितपणा असायचाच. त्यास शून्यवादी व संशयवादी हेच अपवाद होत. त्यांच्या ठिकाणीसुद्धा काही विचार निश्चित स्वरूपाचे असतात. या निश्चयासच श्रद्धा म्हणता येईल. पण भाषेत श्रद्धा हा शब्द तर्काचा व बुद्धिवादाचा प्रतियोगी या अर्थी वापरतात. याचे कारण मानसशास्त्राचे अज्ञान होय. श्रद्धा व विचार यांत विरोध असतो, पण तो विरोध म्हणजे जुन्या विचारांचा व नव्या विचारांचा विरोध होय. जुन्या श्रद्धामय विचारांची तपासणी सुरू झाली म्हणजे ती श्रद्धा हादरू लागते. म्हणून नव्या विचारांना पाखंड म्हणतात. धर्मसमीक्षा हे खरोखरच पाखंड आहे. या पाखंडामुळेच नव्या युगाचा अवतार होतो. कृष्ण, बुद्ध, ख्रिस्त, महंमद हे धर्मसंस्थापकसुद्धा या धर्माच्या दृष्टीने महापाखंडीच होते.

गतेतिहासात अनेक राष्ट्रांची उत्थानपतने झाली, पण मानव संस्कृतीचा विकास क्रमाक्रमाने होत गेला व त्याबरोबर धर्माचाही विकास झाला. समाज विकासाच्या ज्या अवस्थेत असतो, त्याच अवस्थेत धर्मही असतो. सामाजिक जीवन ज्या मानाने विकसित किंवा अवनत होत जाते, त्या प्रमाणात धर्मही विकसित किंवा अवनत होत जातो. धर्म पहिल्यांदा ऐहिक गरजांकरिता निर्माण झाला. काही काळाने त्यात पारलौकिक स्थितीला प्रामुख्य आले. देहाहून जीव किंवा आत्मा निराळा आहे व तो देहावेगळा राहू शकतो या कल्पनेचा उदय झाल्यामुळे पारलौकिक स्थिती व पारलौकिक ध्येये यांची कल्पना उत्पन्न झाली. दुसरी गोष्ट म्हणजे रूढ धार्मिक मार्गाने ऐहिक साध्ये प्राप्त होत नाहीत असा अंदाज येऊ लागला. परलोक मनुष्याच्या ऐहिक जीवनातील दौर्बल्यातून व वैफल्यातून जन्मतो. प्रत्येक धर्मसंस्थेचा परलोक निराळ्या प्रकारचा असतो. कारण प्रत्येक धर्म निराळ्या विशिष्ट सामाजिक स्थितीत उत्पन्न झाला आहे. समाजातील काही वर्गांचे हितसंबंधही धर्मातील

विचारसरणीच्या आधारावर सुरक्षित राहू शकतात. मनुष्य चालू समाजस्थितीपेक्षा श्रेष्ठ समाजस्थिती निर्माण करू शकतो, अशी कल्पना येईपर्यंत धर्मसंस्था स्थिर राहते."

"ईश्वर व मानव कर्तृत्व यांचा फार जुना झगडा आहे. विज्ञान युगाचे सामाजिक जीवनात वर्चस्व झाल्यावरच या झगड्याचा निकाल लागेल. समाजवादी क्रांतीशिवाय विज्ञानाचे वर्चस्व स्थापित होणार नाही व विज्ञानाच्या वर्चस्वाशिवाय समाजातील जंगलीपणा व पशुत्व नष्ट होणार नाही."

"धार्मिक मनःस्थिती ही व्यक्तीच्या जीवितावर गूढ रीतीने सत्ता गाजविणाऱ्या सामाजिक शक्तीचे विकृत प्रतिबिंब आहे. समाजवादी क्रांतीनंतरच्या स्थितीत बिंबच राहणार नाही तर प्रतिबिंब कोठून राहणार?"

"विश्वाचे संपूर्ण ज्ञान मनुष्यास होऊ शकत नाही, हे बरोबर आहे. पण जीवनावर नियंत्रण करणाऱ्या सामाजिक शक्तीचे तर गूढ उकलले आहे. त्याप्रमाणे अंमलबजावणी केल्यास धार्मिक मनोभावनाच उत्पन्न होणार नाही व धर्मापेक्षा श्रेष्ठ भावना व धर्मापेक्षा उच्च दर्जाची मानसिक संस्कृती समाजात अवतरेल."

धर्माचे लक्षण व प्रमाण हा तर्कतीर्थांच्या दुसऱ्या व्याख्यानाचा विषय आहे. त्यात ते म्हणतात,

"अलौकिक शक्तीच्या कल्पनेवर आधारलेले व श्रेयस्कर मानलेले मानवी आचरण म्हणजे धर्म होय. हे आचरण शारीरिक किंवा मानसिक दोन्ही तऱ्हेचे असते. श्रेयस म्हणजे व्यक्तीचे, वर्गाचे किंवा समाजाचे हित होय. हे हित अलौकिक शक्तीच्या साहाय्याने प्राप्त होते ही कल्पना सर्व धार्मिक आचरणाच्या मुळाशी असते.''

सगळ्या विश्वाच्या घडामोडींच्या मुळाशी गृहीत धरलेल्या धर्माचे अलौकिक शक्तीच्या कल्पनेवर आधारलेले श्रेयस्कर मानलेले मानवीय आचरण म्हणजे धर्म होय, अशी सुधारलेल्या धर्माची व्याख्या आहे. प्राथमिक मनुष्याचे मन दैनंदिन योगक्षेमाच्या विवंचनेत गढलेले असते. त्यामुळे त्याच्या धर्मात विश्वव्यापक तत्त्वाची कल्पना नसते. प्रगल्भ समाजसंस्थेत विश्वाचा व जीवनाचा विचार करण्यास मन सुरुवात करते, शारीरिक श्रमातून मुक्त झालेला वर्ग उच्च धर्मसंस्था निर्माण करतो. त्या धर्मास लागणारे विश्वविषयक तत्त्वज्ञान निर्माण करण्याची फुरसत त्यालाच लाभलेली असते.

पूर्वमीमांसकांच्या मते, उपदेशाने, आज्ञेने किंवा विधीने ज्ञात होणारी श्रेयस्कर क्रिया म्हणजे धर्म (चोदना लक्षणोऽर्थो धर्मः) अशी धर्माची व्याख्या जैमिनीने केली आहे. दैवी उपदेश म्हणजे चोदना Divine Inspiration ही आज्ञापक वाणी वेद होय. काही धार्मिक संप्रदाय योगसामर्थ्याने संपन्न असे ऋषिमुनी हेच धर्मोपदेशाचे मुख्य प्रणेते असे मानतात.

जैमिनीची धर्मव्याख्या जगातील सर्व धर्मांस नीटपणे लागू पडते. झरतुष्ट मोझेस, कन्फ्यूशस, येशू किंवा महंमद यांना ईश्वर संकेताचा साक्षात्कार झाला आणि त्याप्रमाणे

त्यांनी उपदेश दिला अशी त्या धर्मसंस्थांची दृढ श्रद्धा आहे. श्रेयस्कर आचरण कोणते हे ठरविण्याचे काम मानवबुद्धीचे नसून ते केवळ या दिव्य अलौकिक शक्तीचेच आहे असे सर्व धर्म मानतात. व्यासांनी महाभारतात सांगितलेली धर्ममीमांसा ही बुद्धिवादी आहे. नैतिक तत्त्वे ही सर्व धर्मांचा आधार आहे.

धर्मनिर्णयाचे प्रमाण केवळ वैदिक शब्दच नव्हे तर सर्वांच्या हिताचा विचार करणाऱ्या साधूंचे विचार आणि मानवबुद्धी होय असा उदात्त विचार शांतिपर्वात आला आहे. या विचाराने वास्तविक जीवनाला महत्त्व प्राप्त झाले. पारलौकिक कल्पनांना उतरती कळा लागली.

धारण करतो म्हणजे धर्म असे म्हणतात. कारण धर्मानेच प्रजेचे धारण होते. (धारणाद्धर्म इत्याहुः धर्मेण विघृताः प्रजाः। यः स्याद्धारण संयुक्तः सं धर्म इति निश्चयः)

चार वेद नसतानासुद्धा समाज उच्च स्थितीत राहिला होता. विवाह संस्थेत सवर्णांतील व्यभिचारास मान्यता होती. यावरून विवाह संस्थेत अनेक परिवर्तने झाल्याचे दिसून येते. पशुयज्ञसंस्था लोभी माणसांनी प्रवृत्त केली आहे. सत्य, अहिंसा, संयम इत्यादी नैतिक परमधर्मसुद्धा पूर्ण नाहीत. त्यांचेही तारतम्य पाहून आचरण करावे लागते.

वैशेषिकांच्या मते ज्यांच्या योगे अभ्युदय व निःश्रेयस यांची प्राप्ती होते तो धर्म. अभ्युदय म्हणजे ऐहिक किंवा पारलौकिक आनंद व त्याची साधने. निःश्रेयस म्हणजे मोक्ष. त्यांच्या मते धर्म म्हणजे प्रत्यक्ष आचरण किंवा क्रिया नव्हे, तर आचरणाचा कर्त्याच्या आत्म्यावर होणारा अदृष्ट असा शुभसंस्कार.

बौद्ध, जैनांनी वेद ही मनुष्यकृती ठरवली. कामक्रोधादी विकारांनी ग्रस्त अशा हीन मनाचीच वेदही कृती आहे; म्हणून वेद हे धर्मप्रमाणच नव्हे. धर्माधर्माचा निर्णय करण्याचे साधन क्रामक्रोधादी मळ ज्यांनी आहेत त्यांचे अन्तःकरणच. ध्यानधारणेत निमग्न होणारे, वीतराग झालेले धुवून टाकले आणि त्यामुळे योगशक्तीचा लाभ होऊन सर्वज्ञ बनलेले मन धर्माचा मार्ग सांगते. जिन किंवा बुद्ध ही पदवी याच मनास लाभते.

आत्मानात्म विवेकाने संपन्न अशी बुद्धी हेच धर्मनिर्णयाचे साधन होय. सर्वव्यापी एक आत्मा ज्याला ओळखता येतो, तो स्थितप्रज्ञ मनुष्यच आपल्या शुद्ध बुद्धाने धर्मनिर्णय करण्यास समर्थ होतो हे टिळकांच्या प्रतिपादनाचे सार आहे. आपलाच आत्मा दुसऱ्याचे ठायी आहे, असे ज्यास प्रत्ययास येते, तोच इतरांनी कसे वागावे याचा निर्णय करू शकतो.

कोणत्याही धर्मसंस्थेचा आधार कमीजास्त प्रमाणात मागासलेली उत्पादन पद्धती, हीन समाजरचना व सृष्टीशास्त्राचा कोतेपणा व अपुरेपणा हाच असतो. मानव समाजाच्या सुधारणेची पातळी जितकी उंच, तितकी धर्मसंस्थाही उंच असते. गणधर्म, राष्ट्र धर्म, विश्वधर्म ही धर्मसंस्थेच्या सामाजिक अधिष्ठानातील परिवर्तनाची सूचक परंपरा आहे."

''कोणताही विचार किंवा आचार जितका विज्ञानावर प्रतिष्ठित असतो तितका तो

उन्नत असतो. मनुष्याचे सृष्टीबद्दलचे ज्ञान जितके वाढते, त्यामानाने त्याची सृष्टीवर सत्ता वाढते. जेव्हा सृष्टीवरील सत्ता वाढण्यास अनुकूल अशी समाजरचना होते तेव्हा समाजातील पारलौकिक, अदृष्टवादी, देववादी विचारसरणी क्षीण होत जाते व मर्यादित होत जाते.''

स्पेंगलरच्या संस्कृती मीमांसेबद्दल बोलताना ते म्हणाले,

"संस्कृती म्हणजे आध्यात्मिक व आधिभौतिक शक्तींना सामाजिक जीवनास उपयुक्त बनविण्याची कला. भौतिक संस्कृती व आध्यात्मिक संस्कृती यांच्यात पृथकत्व दाखविणारी रेषा सापडणे कठीण आहे. कारण आधिभौतिक संस्कृती हे आध्यात्मिक संस्कृतीचे अधिष्ठान आहे. प्रत्येक संस्कृतीचा आत्मा पृथक असतो."

"मानवी संस्कृतीचा प्रत्येक आत्मा संस्कृती व भौतिक सुधारणा अशी दोन रूपे धारण करतो. त्यात क्रम आहे. प्रथम संस्कृती (Culture) व नंतर सुधारणा (Civilization). सुधारणेच्या युगात स्फूर्ती मंदावते, विज्ञान व यंत्र, अर्थ व स्वास्थ्य यांच्याकडे कल होतो. रुक्ष बुद्धिवाद, व्यक्तिस्वातंत्र्य, समता, उदारमतवाद, लोकसत्ता इत्यादी ढिल्या विचारांना ऊत येतो. भावना व श्रद्धा, निष्ठा व आज्ञाधारकपणा, संघटितपणा व कायदा यांचा लोप होऊ लागतो; जीवन थिजते, रक्त गारठते, सर्वांग बधिर होते."

मार्क्सच्या ऐतिहासिक भौतितकवादाने जी सर्वांगीण तर्कशुद्ध उपपत्ती लावली; तिच्याशी तुलना करता स्पेंगलरची मीमांसा गूढ, अस्पष्ट व अव्यक्त कल्पनांचा विलास वाटतो. उत्पादन, विनिमय, विभजन व व्यवस्था करण्याच्या पद्धतीमुळे श्रमविभाग होऊन मनुष्याचे समाजात गट पडतात. उत्पादन पद्धती व तज्जन्य मानवीवर्ग यांच्या अधिष्ठानावर समाजाचा आध्यात्मिक प्रासाद उभारला जातो. धर्म विशिष्ट परिस्थितीतील समाजाच्या आध्यात्मिक प्रासादाचा एक भाग आहे, असे मार्क्स सांगतो. समाजाचा भौतिक आश्रय बदलला किंवा अधिष्ठान बदलले की त्याचा आध्यात्मिक प्रासादही बदलतो. पूर्णतेस पोचलेला समाज व पूर्णतेस पोचलेले राज्य ही वस्तुस्थितीस सोडून असलेली कल्पना आहे. प्रत्येक सामाजिक रचना व संस्था विकासाच्या मालेतील एक दुवा आहे. ती नष्ट होऊन त्या ठिकाणी दुसरी येते. प्रत्येक स्थिती तेवढ्या काळापुरतीच आवश्यक व न्याय्य असते. एका विशिष्ट कालमर्यादेबाहेर तिचे अस्तित्व अनावश्यक व अन्याय्य असते. नव्या समाजरचनेला अवसर देऊन पूर्वीच्या समाजरचनेने नष्ट व्हावयास पाहिजे. जी गोष्ट समाजरचनेस लागू तीच मानवी विचार व क्रिया यांना लागू आहे. संपूर्ण सत्य गवसले म्हणून कोणी कृतार्थतेने विशिष्ट विचारसरणीला आलिंगन द्यावयास लागेल तर त्याची फसवणूक झाल्याशिवाय राहणार नाही. हिंदुस्थानात राष्ट्रवाद आल्यानंतर उपनिषदात व गीतेत सांगितलेला वैयक्तिक मोक्ष गौण मानला गेला."

"हिंदू धर्माची चिकित्सा करताना रानटी लोकांपासून तो सुधारलेल्या समाजांच्या मुळाशी असलेल्या तत्त्वांचा विचार करावयास पाहिजे. कारण हिंदू धर्माचे स्वरूप अत्यंत

गुंतागुंतीचे, बहुरूपी, उच्चनीच अशा सर्व पातळीवरील समाजांच्या धर्मसंस्थांशी जुळणाऱ्या आचारविचारांनी भरगच्च भरलेले आहे."

"मनुष्याला त्याच्या अवतीभोवती चाललेल्या व दैनंदिन जीवनावर परिणाम करणाऱ्या सृष्टीतील घडामोडींचा वास्तविक अर्थ कळत नाही. सृष्टीतील शक्तीवर त्याची सत्ता चालत नाही. त्यासाठी तो काल्पनिक अलौकिक शक्ती व व्यक्ती यांचे साहाय्य घेण्याचा प्रयत्न करतो. हा प्रयत्न म्हणजेच धार्मिक वर्ग होय. त्यातून कर्मकांड उदयास येते. मनुष्याच्या भौतिक गरजांची पूर्ती त्याच्या सामुदायिक जीवनातच होते. ही सामुदायिक जीवनाची गरज धर्माचे दुसरे मूळ आहे. सामुदायिक जीवनाची संवेदना प्राथमिक संस्कृतीतील व्यक्तीत फार तीव्र असते."

'हिंदू धर्माचे स्वरूप' हा तर्कतीर्थांच्या तिसऱ्या व्याख्यानाचा विषय होता. ते स्पष्ट करताना तर्कतीर्थ म्हणतात,

''ऐहिक मानवी व्यवहाराची व्यवस्था ज्याच्याने सिद्ध होते असा नियम समुच्चय किंवा कायदा हेच हिंदू धर्माचे वास्तविक स्वरूप आहे, असे म्हणणारा पक्ष आज अस्तित्वात आहे. असा पक्ष महाभारत काळीसुद्धा होता. या पक्षाचे म्हणणे असे आहे की, चातुर्वर्ण्य, देशजातिकुलधर्म, आश्रमव्यवस्था, सत्य, अहिंसा इत्यादी मुख्य नीतिनियम, व्यवहारधर्म व राजधर्म यांनाच हिंदू धर्मात प्राधान्य आहे. प्रजाधारण हेच हिंदू धर्माचे साध्य आहे. अलौकिक दैवी शक्तींची आराधना आणि पारलौकिक कल्पना हा हिंदू धर्माचा मुख्य भाग नाही. तो गौण आहे. काही लोक असेही प्रतिपादन करतात की ईश्वर, परलोक, पापपुण्य, अवतार, विभुती, योगशक्ती, देवता इत्यादी पदार्थ केवळ सांकेतिक कल्पनांची निर्मिती आहे, सामान्य लोकांनी समाजाचे कायदे योग्य रीतीने पाळावेत म्हणून कल्पिलेले हे संकेत आहेत. परलोकाचे भय व प्रलोभन लोकास कायदे पाळण्यास प्रवृत्त करते. वैदिक धर्म हा भौतिकवादी धर्म आहे. प्रस्तुतच्या पराभूत व अवनत स्थितीतून बाहेर पडण्यासाठी हिंदू समाजाने अदृष्टवादी, निवृत्तमार्गी व भक्तीपंथी स्मृती पुराणांचा व संतांचा हिंदू धर्म टाकून द्यावा व मागे पडलेल्या वैदिक धर्मांची स्थापना करावी.''

दुसऱ्या पक्षाच्या मते प्रपंच व परमार्थ साधण्याचा मार्ग हेच हिंदू धर्माचे स्वरूप आहे. याच दृष्टीने चतुर्विध पुरुषार्थ महाभारतात व स्मृतीत उपदेशिले आहेत.

समाजातील जाणत्या व कर्त्या व्यक्तींनीच धर्मग्रंथ व धर्मपंथ निर्माण केले आहेत ही गोष्ट पुष्कळअंशी खरी आहे. पण या मताने केलेला अदृष्टाचा अर्थ बरोबर नाही. पापपुण्ये मनुष्याची स्वबुद्धीने विद्यमान तर्कशास्त्राचे नियम लागू करून निश्चित केली आहेत, असे म्हणता येत नाही.

वेदोक्त अभ्युदयमार्गावरील श्रद्धा मागासलेल्या खालच्या दर्जाच्या प्राकृत, भाबड्या बुद्धीचेच लक्षण आहे. वैदिक धर्मापेक्षा परलोकप्रधान पारमार्थिक धर्मच अधिक बौद्धिक

विकासाचे लक्षण आहे. वैदिक युगाच्या शेवटी उपनिषदांनी वैदिक कल्पनात क्रांती केली. वेदाचा अंत केला व पुढील बौद्धिक प्रगतीचा मार्ग तयार केला.

तिसऱ्या पक्षाच्या मते हिंदू धर्म हा पूर्ण आध्यात्मिक धर्म आहे. ऐहिक ध्येये हा गौण उद्देश आहे. मोक्षमार्ग अचूक दाखविणे हे हिंदू धर्माचे कार्य आहे.

आजकाल याच पक्षाची हिंदूंतील बहुजन समाजाच्या मनावर आणि शिक्षित बहुमतावर छाप आहे.

हिंदू धर्म हा बहुरूपी व परस्पर प्रवृत्तींचे संमिश्रण होऊन बनलेला आहे. विशिष्ट प्रकारच्या सामाजिक चालीरीती व समाजरचनेचे विशिष्ट कायदे ही याची प्रमुख अशी बाजू आहे आणि परस्परविरोधी, पारमार्थिक संप्रदाय ही याची दुसरी बाजू आहे. जगातील ख्रिश्चन, मुसलमान इत्यादी धर्मसंस्थांचे लक्षण पारमार्थिक संप्रदायावरून निश्चित करता येते. लक्षणनिश्चयाचे वेळी त्यांचे सामाजिक स्वरूप पाहण्याची गरज नसते. हिंदू धर्माचे लक्षण निश्चित करताना हा सामाजिक भागच प्रामुख्याने पुढे येतो. वर्णसंस्था, जातिसंस्था, विवाहादी संस्कार, वारसाहक्कांचे नियम, एकत्र कुटुंबपद्धती ही हिंदू धर्माची सामाजिक बाजू आहे. हीच विविष्ट समाजव्यवस्था हिंदू धर्माचे प्रमुख लक्षण बनले आहे. या चालीरीतींच्या पाठीशी असलेली पारमार्थिक कल्पना सामाजिक नियमांचे समर्थन करण्यासाठी उपयोगात आणली गेली आहे. हिंदू धर्मात पारमार्थिक किंवा आध्यात्मिक संप्रदाय अनेक परस्पर विरुद्ध कल्पनांनी बनलेले आहेत. त्या कल्पनांमध्ये अविरोध उत्पन्न करण्याचा कितीही प्रयत्न केला तरी तो व्यर्थ ठरतो.

'प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु साधनामनेकता। उपास्यानामनियमः एतत् धर्मस्य लक्षणम्।' हे लोकमान्य टिळकांचे हिंदू धर्मलक्षण समाधानकारक नाही. ज्यांना वेदाधिकार नाही, ज्यांच्या चालीरीती वैदिक धर्मावर आधारलेल्या नाहीत असे शेकडा ७० टक्के लोक हिंदू समाजात आहेत. देवतोपासनाविषयक आचारापेक्षा सामाजिक चालीरीतींनाच हिंदू धर्मात अधिक महत्त्व दिले जाते. तेव्हा हिंदू धर्माचे पृथक्करण ऐतिहासिक तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने करणे आवश्यक आहे.

ऐतिहासिक तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने सगळ्या धार्मिक कल्पनांना सामाजिक विकासात सारखेच स्थान नाही. समाजसंस्था सामाजिक विकासाच्या ज्या ज्या उच्चनीच अशा अवस्थांतून जाते, त्या त्या अवस्थांना अनुरूप अशा उच्च किंवा नीच अशा धार्मिक कल्पनाही ती घडवीत असते. हिंदू धर्माच्या शरीरात अशा विविध थरांचे संकलन आहे. एकेश्वरवादी इतर धर्मांनी अशा अवशेषांना झाकून टाकून निष्प्रभ केले आहे. हिंदू धर्मात अत्यंत हीनतर अशा प्राचीन आचारांस व कल्पनांस अगदी उजळ माथ्याने वावरता येते.

काही निसर्गवस्तू किंवा त्यांच्या प्रतिकृती अजूनही हिंदू धर्मात पुजिल्या जातात. पशुपक्ष्यांच्या पूजांचे मूळ प्राथमिक अवस्थेत सापडते. अग्नि, सूर्य, पर्जन्य, वायु इत्यादी

निसर्गदेवता, पितृपूजा ह्या वेगवेगळ्या विकासाच्या स्तरावरील अवशेष हिंदू धर्माने राखून ठेवले आहेत. याबरोबरच एकेश्वरवाद हे धर्माचे उच्चतम लक्षण हिंदू धर्मात आहे. हिंदू धर्माच्या उच्चतम शाखा कर्मकांड, वर्णाश्रम धर्म, पूजा, व्रते, तीर्थे, यात्रा इत्यादिकांना गौणच समजतात. काही आधुनिक पंडित हिंदू धर्माच्या ह्या संकीर्ण स्वरूपाचे समर्थनच करीत असतात. राधाकृष्णन हे त्यांचे अध्वर्यु आहेत. अनेक ऋषी, अनेक साधू, अनेक तत्त्ववाद, अनेक देवपूजा व अनेक प्रकारचे पारमार्थिक उन्नतीचे पंथ यांच्यामुळे हिंदू धर्म हा परमतसहिष्णु झाला आहे."

''हीन धर्मकल्पनांचा संभाळ करणे किंवा स्वीकार करणे ही उदारता आहे असे म्हणण्यापेक्षा दुर्बलता आहे असे म्हणणे अधिक युक्त'' असे तर्कतीर्थांना वाटते. त्यांच्या मते परमताबद्दल असहिष्णु असण्यापेक्षा परभ्रांतीबद्दल सहिष्णु असणे हा मोठा गुन्हा आहे.

ते पुढे म्हणतात,

"हिंदू धर्म उदार नाही, कृपण आहे. उपासना संप्रदायांच्या बाबतीतील शिथिलतेला उदारता हे नाव आहे. हिंदू धर्माच्या जातिसंस्था व वर्णसंस्था या अनुदारतेच्या मूर्ती आहेत. लहानमोठे अपधर्म हिंदू धर्मात टिकू शकले, याचे कारण उत्तम धर्मकल्पनांना पूर्ण प्रभावी स्वरूप देणारी संघटित लोकशक्ती त्यात निर्माण झाली नाही. उच्च कल्पनांच्या छत्राखाली अनंत हीन कल्पना सहिष्णुतेच्या नावाने वावरू देणे हे बौद्धिक व मानसिक अधोगतीचे लक्षण आहे. त्या त्या समाजापुरत्या असलेल्या संकुचित चालीरीती व विशिष्ट मानवगटास मान्य असलेले संस्कारविधी यांना धार्मिक दृष्टीने गौणत्व दिल्याशिवाय उच्चतत्त्ववादी धर्म प्रसरणशील व प्रचारशील होऊ शकत नाहीत.

या संकीर्ण हिंदू धर्माला जगविण्याचे कार्य पुरोहित ब्राह्मणवर्गाने दीर्घकालपर्यंत केले. त्यामुळे ऐहिकप्रधान वस्तुवादी विचारसरणीत प्रगल्भता आली नाही व तशा विचारसरणीस पोषक अशी समाजरचनाही अस्तित्वात आली नाही. हिंदू धर्माच्या अस्ताव्यस्त स्वरूपास पुरोहितवर्ग जबाबदार आहे.

नवग्रहपूजा, लिंगपूजा, देवदासी पद्धती, मूर्तिपूजापद्धती, मुहूर्त- फलज्योतिष, सातवार इत्यादी गोष्टी भूमध्यसमुद्रीय मानव संस्कृतीचीच अंगे होत. नाईल, युफ्राटिस, तैग्रीस, सिंधू यांच्या तीरावर वाढलेल्या प्राचीन संस्कृतीचा वारसा हिंदू समाजाकडे अजूनही चालू आहे. हीच वेदपूर्व भारतीय संस्कृती होय. त्यातील धर्म हिंदू धर्माचा महत्त्वाचा भाग आहे.

भटक्या, शिकारी, युयुत्सु आर्यांनी अवैदिक प्रजेवर सत्ता स्थापन केली. पण ते सार्वभौम सत्ता स्थापन करू शकले नाहीत. भटक्या टोळयांच्या ठिकाणी चपलता, काटकपणा, लष्करी संघटना इत्यादी युद्धोपयुक्त गुण अधिक प्रमाणात वाढीस लागलेले असतात. ऋग्वेदातील बहुतेक भाग या टोळया स्थिरस्थावर झाल्यावर निर्माण झाला आहे. ऐहिक जीवनातील योगक्षेम नीट चालवण्यास लागणाऱ्या भौतिक साधनांची प्राप्ती करून घेण्यासाठी यज्ञकर्म

हे धर्माचे प्रमुख ध्येय ठरले. सूर्याचे शुद्ध भौतिक स्वरूप आकलन करण्याची पात्रता ज्या वेळी मानव समाजात नव्हती तेव्हा त्याचे ठिकाणी देवता आरोपिली गेली. अग्नि व सूर्य यांच्यावर पुष्कळच प्राथमिक भौतिक गरजा अवलंबून असल्यामुळे त्यांची नित्य उपासना वैदिक गृहस्थ करीत. पशुपालन मुख्य व कृषि गौण असे जीवन आर्य घालवीत.

वानप्रस्थ व संन्यास यांचा स्वीकार वैदिक आर्यांनी अवैदिक लोकांच्या संस्कृतीतून घेतला आहे. हिंदुस्थानात अवैदिक समाजांनी सुधारणा व संस्कृती मोठ्या उच्च पदवीस नेली होती. वैदिक लोकांच्या व्यतिरिक्त असलेली प्रजा रानटी व मागासलेली होती, म्हणून वैदिकांनी त्या प्रजेला कनिष्ठ दर्जा दिला या कल्पनेला ऐतिहासिक आधार नाही. वैदिकेतर प्रजा कृषी, शिल्प इत्यादी व्यवहारात कुशल होती. त्या संस्कृतीची मोठमोठी राष्ट्रे हिंदुस्थानात होती. आर्यांनी त्यांना जिंकून त्या प्रजेवर दास्यधर्म किंवा शूद्रधर्म लादला. कृषी, शिल्प व उच्चवर्णसेवा हे तीन व्यवसाय त्यांना नेमून दिले. व्यवसायजन्य फलाचा उपहार सुरू केला. वैदिक यज्ञांनी व स्मार्त धर्मांनी पवित्र झालेला आर्यच समाजातील खरा स्वामी ठरला. हे पावित्र्य ब्राह्मणाच्या पौरोहित्याने प्राप्त होते असे म्हणून ब्राह्मणास वरिष्ठ स्थान वैदिक धर्माने दिले.

स्मृती म्हणजे वैदिक आर्यांच्या चालीरीतींची, कायद्यांची व सामाजिक व धार्मिक संस्थांच्या नियमांची स्मरणपूर्वक केलेली नोंद. धर्मशास्त्रात वेळोवेळी वेदोत्तर काळी बरीच भर पडली व परिवर्तनेही झाली ही गोष्ट स्मृतीवरून दिसून येते. गृहस्थधर्म व यज्ञधर्म झेपणे कठीण होऊ लागले म्हणून वैराग्य, अरण्यवास यांना महत्त्व देणारी मननप्रधान विचारसरणी उपनिषत्काली उगम पावली.

कोणत्याही परिस्थितीतील, जातीतील व समाजातील उच्चनीच, पतित व उन्नत मानव शुद्ध होऊन धार्मिक परमपदवीस पोचू शकतात, अशी घोषणा करणारे विश्वधर्म हिंदुस्थानात इतर समाजापेक्षा किंवा राष्ट्रापेक्षा पहिल्यांदा उदयास आले. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे सगळेच भगवत् भक्तीने शुद्ध होऊन मुक्त होतात या विचारसरणीला एकेश्वर भक्तीच्या शैव व वैष्णव संप्रदायांनी महत्त्व आणले. उत्तर हिंदुस्थानच्या पूर्व भागात बौद्ध व जैन है दोन महान विश्वधर्म प्रकट झाले.

कोणतेही जीवनविषयक तत्त्वज्ञान एका विशिष्ट सामाजिक परिस्थितीचाच परिपाक असतो, हे दुःखवादी तत्त्वज्ञान अडीच हजार वर्षांपूर्वीच्या सामाजिक जीवनाचा, त्या सामाजिक जीवनाचा पडसाद होता. सत्य, अहिंसा, साधी राहणी, मिताहार, तृष्णाक्षय आणि जीवनाची क्षणभंगुरता या गोष्टींवर बुद्धाने भर दिला. ईश्वर व जगाचे मूल कारण यांच्या शोधाच्या भानगडीत न पडणे बरे असे त्याचे मत होते. त्याने गृहस्थाश्रमाला गौण लेखले नाही. जैन-बौद्धांची धर्मपीठे निर्माण झाल्यावर त्यांचे बौद्धिक चळवळीचे हत्यार बोथट झाले. ऐदी, फुकटखाऊ, आळशी, उनाडटप्पू भिक्षू-संन्यासी यांचे संघ देशभर माजले.

त्यामुळे या संप्रदायांना हतवीर्य करणे ब्राह्मणांना सोपे गेले. त्यांनी मूर्तिपूजा, देवता व हिंदू धर्माच्या स्थापनेस सुरुवात झाल्यावर हिंदू समाजात क्रांतिकारक विचारसरणी व नवजीवन निर्माण करणारी चळवळ उत्पन्नच झाली नाही.

सातव्या शतकात कुमारिलभट्टांनी धर्मशास्त्रनिर्णयाची एक विशिष्ट पद्धती स्थापली. तिची पकड धर्मशास्त्रावर इतकी बसली की त्या पद्धतीनेच गेल्या बाराशे वर्षांतील धर्मव्यवस्था व स्मार्त गृहस्थाश्रमधर्मांचे पुनरुज्जीवन करून संन्यास व निवृत्तीमार्ग यांचे निराकरण करावयाचे होते. ते मात्र त्यांना साधले नाही. शंकराचार्यांच्या दिग्विजयाने कुमारिलभट्टांची मनीषा विफल झाली.

आठव्या शतकातील शंकराचार्यांची बौद्धिक व मानसिक संस्कृती अत्यंत श्रेष्ठ दर्जाची होती. त्यांनी परंपरेने प्राप्त झालेली सर्व तत्त्वज्ञाने व विचार संप्रदाय बुद्धीच्या निकषावर तपासून विश्वविषयक किंवा वस्तुविषयक प्रत्येक उपपत्ती विशिष्ट मर्यादेबाहेर तर्कदुष्ट होते हे सिद्ध करून सगळ्या विचारमार्गांची बौद्धिक अगतिकता सिद्ध केली. श्रुतीने 'ब्रह्म सत्य' सांगितले म्हणून त्यांना जगत मिथ्या असे सांगता आले. पण त्यांचा मायावाद हा कुंठित विचारसरणीचे, अगतिकतेच्या भोवऱ्यात सापडलेल्या बौद्धिक चिकित्सेचे फल आहे."

त्यांनी शब्दप्रामाण्याचा आश्रय घेतला. उपनिषद कालापासून विकसित होणाऱ्या भारतीय बुद्धिवादास व तत्त्वज्ञानास शब्दप्रामाण्याच्या शिलातलाखाली जिवंतच समाधी दिली. पुराण्या वैदिक मानवांच्या मर्यादित अपूर्ण बुद्धीला पूर्णत्व अर्पण करून बौद्धिक विकासाची मुळेच नष्ट केली. सामाजिक परिस्थिती विज्ञानास अनुकूल नव्हती. सगळा बौद्धिक पराक्रम वाया गेला. शेवटी संसारविरक्ती, ईश्वरशरणता व अनन्यभक्ती हेच धर्मरहस्य शिल्लक राहिले.

इंग्रजी राजवटीत नाना शाखांच्या आधारे जुन्या चालीरीतींचे समर्थन पूर्णतः किंवा अंशतः करणारे अनेक प्रतिगामी विचारसरणीचे लोक उत्पन्न झाले. पूर्वपरंपरेचा अभिमान हाच हिंदी राष्ट्रवादाचे मुख्य अंग बनले आहे.

काही विचारवंतांनी नव्या परिस्थितीशी जुन्या धर्मकल्पना व आचार जुळत नाहीत हे पाहून धार्मिक परिवर्तनास व सुधारणेस सुरुवात केली. लोक म्हणतात की, मूळ वैदिक धर्माचे पुनरुज्जीवन करून हिंदूंचा यापुढे खरा उत्कर्ष होईल. पण वेदातील सृष्टीविषयक व समाजजीवनविषयक विचार अगदी कोते व भ्रामक स्वरूपाचे आहेत. त्यांच्या स्वीकाराने समाज अधिक दुर्बल बनेल. वेदांचे श्रेष्ठत्व त्या काळातच शोभणारे व त्या परिस्थितीस अनुरूप असेच होते. आजच्या सुधारणेशी व संस्कृतीशी त्यांची तुलना न केलेलीच बरी.

गीतेतील प्रवृत्ती मार्गाने व अध्यात्मयोगाने बऱ्याच शिक्षितांचे लक्ष खेचून घेतले आहे. पण गीतेतील पुनर्जन्म, परमेश्वर, कर्मविपाक हे मूलभूत सिद्धान्त तर्कशास्त्राच्या नियमानुसार मानवबुद्धीने निश्चित करण्यात येत नाहीत. आज वृत्तिवाद की निवृत्तिवाद हा प्रश्न समाजाच्या

जीवनात महत्त्वाचा नाही. खरा प्रश्न निराळा आहे, समाज प्रगती कुंठित झाली आहे व नव्या समाजरचनेचे प्रश्न पुढे उभे आहेत. दोन-अडीच हजार वर्षांपूर्वीची गीता आजच्या प्रश्नापुढे काय करणार? गीतेची मांडणी पौराणिक पद्धतीची आहे. त्यात स्वाभाविक तर्कशुद्धता व प्रमाणबद्धता नाही.

धर्मनिर्णय मंडळाची विद्वान मंडळी नवा हिंदू धर्म रचण्याचा प्रयत्न करून लागली आहेत. या महान समाजक्रांतीच्या विज्ञानयुगात नवी भौतिकशास्त्रे व समाजशास्त्रे यांचा उपयोग न करता केलेले प्रयत्न व्यर्थ ठरतील यात शंका नाही.

**('विस्मृतीतील विचारवंत' (६ डिसेंबर २०११) मधून उद्धृत)**

ooo

४६.

# अभिवादनः तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री

## अथर्व देसाई

काही काही व्यक्तींबद्दल आपल्या मनात उगीचच एक प्रकारचं कुतूहल असतं आणि तरीसुद्धा त्या व्यक्तीपाशी पोहोचायला आपल्याला उशीर लागतो म्हणा, अथवा आपण उशीर करतो म्हणा. लक्ष्मणशास्त्री जोशींबाबतही माझं असंच झालं. वैचारिक साहित्य वाचायला सुरुवात केल्याच्या आसपासच मी पहिल्यांदा या नावाच्या जवळ आलो, पण डोक्यातल्या 'पुरोगामी' वृत्तीला त्यातलं शास्त्रीत्व तेव्हा अवघडून टाके. पुढे जेव्हा मे. पुं. रेगे वाचत होतो तेव्हा मेपुंच्या लिखाणात अनेकदा शास्त्रीजींचे संदर्भ येत. तोपर्यंत पुरोगामित्वाचा साजही उतरला होता, आणि मेपुंसारखा थोर तत्त्वचिंतकही ज्यांना मानतो अशा व्यक्तीचं साहित्य आपण वाचलेच पाहिजे हे ठरवलं. खरं तर या वेळेपर्यंत शास्त्रीजींची पार्श्वभूमी समजली होती, हे म्हणजे कोणी देवधर्मवादी पुराणिक पुरोहित नसून एक थोर मार्क्सवादी विचारवंत आहेत हे वरवर समजलं होतं. पुढे जेव्हा शास्त्रीजींचे लिखाण वाचत गेलो तसतसा अधिकच स्तिमित होत गेलो.

शास्त्रीजींचा बौद्धिक प्रवास थक्क करणारा आहे. त्यांचा जन्म धुळे जिल्ह्यातल्या पिंपळनेर या गावात २७ जानेवारी १९०१ सालचा. म्हणजे या आठवड्यात त्यांची ११६ वी जयंती आहे. जातीपाती, जुन्या रूढी-परंपरा, सोवळे वगैरे मानणाऱ्या कुटुंबातला आणि समाजातला. वेदशास्त्र शिकण्याच्या इच्छेने चौदाव्या वर्षी त्यांनी केवलानंद सरस्वती यांच्या वाईच्या प्राज्ञपाठशाळेत प्रवेश घेतला आणि प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानाचा मूळ संस्कृत व इतर भाषेतल्या ग्रंथांमार्फत १५ वर्षे सखोल अभ्यास केला. या दरम्यान कलकत्त्याच्या संस्कृत पाठशाळेची 'तर्कतीर्थ' ही पदवी त्यांनी संपादित केली. ते गांधीजींच्या आंदोलनामध्येही सहभागी झाले, अनेकदा कारावास भोगला. धुळ्याच्या तुरुंगात त्यांची विनोबांशी भेट झाली आणि त्यांच्या प्रोत्साहनाने इंग्रजी भाषा शिकले व पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला.

याच काळात त्यांना मार्क्सबाबा भेटला. तर्कतीर्थांवर मार्क्सचा प्रभाव होता, हे निश्चित. मात्र ते कधीच कम्युनिस्ट झाले नाहीत, किंबहुना शास्त्रीजींच्या आयुष्याकडे आणि लेखनाकडे पाहताना आपल्याला सतत जाणवतं की त्यांनी कधीच स्वतःला कोणत्याही विचारप्रणालीशी बांधून घेतलं नाही. समाजवाद, मार्क्सवादाप्रत त्यांना आपुलकी होती, पण मानवी जीवनाचं हेच अंतिम स्वरूप असल्याचं त्यांना मान्य झालं नाही. मार्क्सवादाच्या प्रभावातूनच त्यांनी 'हिंदुधर्माची समीक्षा' आणि 'सर्वधर्मसमीक्षा' हा थोर ग्रंथ लिहिला. मात्र त्यांच्या नंतरच्या साहित्यावर हा मार्क्सवादी प्रभाव तेवढा जाणवत नाही, याचा दाखला मेपुंनीसुद्धा दिला आहे. वैचारिकदृष्ट्या लक्ष्मणशास्त्रींना मानवेंद्रनाथ रॉय फार जवळचे वाटत. गांधीजी आणि एम. एन. रॉय या दोघांशीही त्यांचा फार जवळचा संबंध आला. आजच्या काळात विचार करता रॉय हे विस्मृतीला गेलेले आहेत, मात्र आधुनिक भारताच्या इतिहासातील सर्वश्रेष्ठ विचारवंत व तत्त्वज्ञानांपैकी ते एक आहेत हे निश्चित. मानवेंद्रनाथांनी मूलगामी मानवतावाद (Radical Humanism) या विचारधारेची मांडणी केली. शास्त्रीजींच्या आयुष्यावर मानवेंद्रनाथांचा खूप प्रभाव पडला होता. रा. ग. जाधव यांच्या मते, रॉय यांच्या विचारसरणीचा मनःपूर्वक स्वीकार करणाऱ्या मोजक्या बुद्धिवंतांत शास्त्रीजींचे स्थान अनन्यसाधारण होते. १९३६ ते १९४८ या काळात ते रॉय यांच्या रॅडिकॅल डेमोक्रॅटिक पार्टीचे सदस्य होते. तर्कतीर्थांच्या विचारविश्वाचे आकलन करून घेण्यासाठी ज्येष्ठ समीक्षक रा. ग. जाधव यांनी मांडलेला पुढील अभिप्राय महत्त्वपूर्ण आहे. ते म्हणतात-

''प्राचीन परंपरेतील प्रखर ज्ञानयोगी व आधुनिक पश्चिमी ज्ञानविज्ञानाचा साक्षेपी मीमांसक अशी वरवर दुहेरी वाटणारी पण आतून एकात्म असलेली भूमिका लीलया पेलावणारे शास्त्रीजी अद्वितीयच होते. म्हणून परंपरेचे कालोचित पावित्र्य श्रद्धापूर्वक जपणारे महात्माजी व 'समग्र क्रांतीचा युटोपिया' आपल्या क्रांतिदर्शी प्रतिभेने रंगवणारे रॉय या दोहोंना शास्त्रीजी आपलेच वाटत. मानवेंद्रनाथ रॉय यांनी शास्त्रीजींचा उल्लेख, भारतीय प्रबोधनाचा सर्वोत्कृष्ठ प्रतिनिधी (The Best Product of Indian Renaissance) असा केला आहे.''

गांधी आणि रॉय यांच्याबद्दल एका मुलाखतीत शास्त्रीजी म्हणतात, ''त्यांच्या स्वतंत्र प्रज्ञेचे विलक्षण तेजस्वी पैलू पाहून मी वारंवार स्तिमित झालो आहे, परंतु मी माझे वैचारिक स्वातंत्र्य गमावून त्यांच्याशी पूर्ण ऐकमत्य झालो असल्याचे माझ्या अनुभवात कधीही नाही. याचे कारण माझे भारतीय तत्त्ववेत्त्यांचे दर्शन होय. या तत्त्वदर्शनात गौतम मुनीचे विचार कपिल मुनी खंडित करतो, कपिल मुनीचे विचार द्वैपादन व्यास मुनी खंडित करतो आणि या सर्वांचे विचार बौद्ध तत्त्वज्ञ नागार्जुन अमान्य करतो, अशी ही उच्च विचारांची मीमांसा माझ्या विचार पद्धतीचा अविभाज्य भाग बनली आहे.''

आपल्या जडण-घडणीचे श्रेय भारतीय विचारपरंपरेला देणारे शास्त्रीजी, प्राचीन भारतीय हिंदू परंपरेचं मूल्यांकनही तेवढ्याच काटेकोरपणे आणि कोणतेही पूर्वग्रह न बाळगता

करतात. हिंदू धर्माच्या साहिष्णुतेबद्दल आपण सर्वच बोलत असतो. धर्माभिमानी लोक हिंदू धर्म कसा सहिष्णूच होता हे सांगत असतात, तर स्वतःला सेक्युलर म्हणवणारे काही लोक हिंदू हाच कसा सर्वांत असहिष्णू धर्म आहे हे सांगतात. याच्या मधले समतोल भाष्य तर्कतीर्थ करतात. 'हिंदू धर्मात जी सहिष्णुता आहे त्याचे तात्त्विक स्वरूप संदिग्ध आहे, तशी बौद्ध धर्माची गोष्ट नाही. हिंदू धर्मात सहिष्णुता आहे' परंतु तो विश्वव्यापी नव्हता. अत्यंत संकुचित, क्षुद्र, अनुदार आणि भिकार असे विविध धर्मसंप्रदाय जसेच्या तसे शतकानुशतके त्याने जपून ठेवले. म्हणून तो मनुष्यजातीच्या उद्धारास बौद्ध धर्माइतका समर्थ झाला नाही आणि त्याने हिंदुस्थानात इस्लामसारख्या असहिष्णू धर्मास वाढण्यास अनुकूल अशी सामाजिक स्थिती निर्माण केली. मनुष्य जमातीच्या लहान-मोठ्या सांस्कृतिक भेदांना विरघळून टाकून एकजीव करण्याऐवजी ते भेद दृढमूल केले. यालाच आत्मनिरीक्षणाची न्यायनिष्ठुरता आणि धैर्य नसलेले आधुनिक हिंदू विद्वान सहिष्णुता असे गोंडस नाव देतात. हिंदू धर्माची तर्कतीर्थ जेवढ्या प्रखरपणे चिकित्सा करतात तेवढीच प्रखर आणि सत्य अशी चिकित्सा ते इस्लामचीही करतात. त्यामुळेच ते इस्लामला केवळ धार्मिकच नव्हे तर राजकीय अर्थसुद्धा होता, असे म्हणतात. कारण अरब राष्ट्रांची संघटना करून जेव्हा देवाची तलवार दिग्विजयासाठी बाहेर पडली, तेव्हा ती तलवार असे सांगू लागली की, एकतर इस्लामचा स्वीकार करा नाहीतर खंडणी द्या! हे मांडायला शास्त्रीजी कचरत नाहीत. आणि दुसरीकडे इस्लामच्या मुळाशी असणाऱ्या नैतिक प्रेरणांप्रती आदर दाखवायलाही कमी करत नाहीत.

अशाच चिकित्सक आणि प्रगाढ पांडित्यपूर्ण अधिकाराने त्यांनी १९५२ मध्ये लिहिलेला, 'आधुनिक भारतीयांतील तत्त्वज्ञानाचे दारिद्र्य' हा निबंध आपल्याला अंतर्मुख होऊन विचार करायला भाग पाडतो. प्राचीन ज्ञानविज्ञानचे प्रकांडपंडित असलेले आणि योगशास्त्राचे अवलंब करणारे तर्कतीर्थ या दारिद्र्याच्या कारणांची यादी करताना प्राचीन विचारांच्या कोषांतून बाहेर न पडण्याच्या आपल्या वृत्तीला त्यात ठेवायला आढेवेढे घेत नाहीत. लक्ष्मणशास्त्रींना भारतीय विचारांची सखोलता, त्यातील बुद्धिवादाच्या प्रेरणा आणि त्याचे महत्त्व मान्य आहे, मात्र त्यांचे हे ज्ञान प्रचारकी स्वरूपाचे नाही. 'एकम् सद् विप्रह:'... वर श्रद्धा असणाऱ्या त्यांच्यासाठी ते काही जीवनाच्या अंतिम सत्याचे एकमेव दर्शनही नाही. त्यांच्या मते आधुनिक भारतीयांपाशी प्राचीन तत्त्वज्ञानाचा साठा आहे व अंतिम सत्य सापडल्याची कृतार्थ वृत्ती आहे. आधुनिक भारतातले तत्त्वज्ञानाचे दारिद्र्य हे त्या कृतार्थतेतून उत्पन्न झालेल्या जाड्याचे लक्षण आहे. कृतार्थतेने जिज्ञासा मरते आणि जिज्ञासा मेली म्हणजे विचार संपतो! अध्यात्म विचारांचे अभ्यासक आणि साधक असणारे अरविंद असोत अथवा मानवेंद्रनाथ रॉय किंवा गांधीजी असोत या सर्वांच्या विचारांचे व आधुनिक काळात प्रबळपणे रुजू होत चाललेला नवअध्यात्मवाद या प्रवाहातील एक महत्त्वाचे व्यवच्छेदक

लक्षण लक्ष्मणशास्त्री मांडतात. मनुष्य आणि मानवी समाज बदलण्याची प्रक्रिया दर्शित करणारे तत्त्वज्ञान आपल्याला पाहिजे. आधुनिक भारतीयांमध्ये मान्यता पावलेला गूढ अध्यात्मवाद या दोन्ही आव्हानांस अपुरा आहे. (कारण) जाणूनबुजून बौद्धिक अशा विचारप्रक्रियेस तो पाठमोरा होतो आणि ज्वलंत व खडतर सामाजिक प्रश्नांना काल्पनिक, अव्यवहार्य व विसंगत उत्तरे देतो. खऱ्याखुऱ्या तत्त्वज्ञानाच्या दारिद्र्याचे ते मुख्य गमक आहे. शास्त्रीजींचे वरील मत वाचताना आपल्याला जाणवतं की, तात्त्विक पातळीवर अत्यंत उदार आणि श्रेष्ठ असणारं प्राचीन भारतीय तत्त्वज्ञान, वास्तवाच्या पातळीवर फोल का ठरतं. आणि गांधी अथवा रॉय यांनी ज्या प्रकारे अंतर्गत जग आणि बाह्य जग यांचा मिलाफ साधून जे तत्त्वज्ञान मांडलं, त्याद्वारे समाज कशा प्रकारे मुक्तिमार्गावर जाऊ शकतो. मानवी जीवन हे नक्कीच एकसुरी अथवा एकजिनसी नाही, त्यामुळे सर्व व्यक्तींच्या उद्धारासाठी कोणताही एकच विचार योग्य ठरू शकत नाही, याची जाणीव आपल्याला तर्कतीर्थांच्या साहित्यात सापडते. मात्र याचा अर्थ त्यांच्या लिखाणात व विचारात तर्कदोष नाहीतच असाही होत नाही. कारण त्यांच्या लिखाणातून हलकी अशी अनेक विधाने काढून दाखवणे अगदीच शक्य आहे. (मात्र तो काही या लेखाचा हेतू नव्हे.) आजच्या काळात जिथे बुद्धिवंत लोक समोर येणाऱ्या प्रत्येकाला विचारधारांच्या कंपार्टमेंट्समध्ये टाकण्यास अधीर असतात, तिथे लक्ष्मणशास्त्री जोशींचे विचारधन वाचताना, आपण ज्या मुक्त विचारविश्वामध्ये वावरतोय आणि त्या विचारांचा एक थोर पूर्वसूरी सापडल्याचं समाधान मिळतं. डी. डी. कोसंबी यांनी एकदा म्हटल्याप्रमाणे विचारधारा हा विचारांचा एक मार्ग आहे, विचारांना पर्याय नाही. त्यामुळे कोणत्याही एका विचारधारेशी स्वतःला जुंपून न घेणाऱ्या सर्वांसाठी तर्कतीर्थ हे प्रेरणेचा स्रोत राहतील एवढे निश्चित!

**(साप्ताहिक साधना, पुणे , दि. ४ फेब्रुवारी २०१७, पृ. २९ ते ३१)**

ooo

# ४७.

# इहवादी ऋषी

## नरेन्द्र चपळगावकर

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींना तसे मी सार्वजनिक कार्यक्रमात अनेक वेळा पाहिले होते. पण त्यांची प्रत्यक्ष ओळख होण्याचा प्रसंग आला नव्हता. पंचवीस-तीस वर्षे झाली असतील, 'एका बैठकीसाठी शास्त्रीबुवा औरंगाबादला आले आहेत आणि संध्याकाळी त्यांच्याबरोबर गप्पा मारण्यासाठी जमायचे ठरले आहे. तू अवश्य ये,' असा माझ्या मित्राचा निरोप आला. शासकीय विश्रामगृहावर शास्त्रीबुवा उतरले होते. परंतु संध्याकाळी ते माझ्या मित्राच्या घरी येणार होते. शास्त्रीबुवा तेव्हा महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे आणि मराठी विश्वकोश मंडळाचेही ते अध्यक्ष होते. त्यापैकी कोणत्यातरी एका संस्थेच्या बैठकीसाठी ते औरंगाबादला आले होते. मंडळाच्या एकदोन सदस्यांना त्यांनी बरोबर आणले होते. मित्राने आम्हाला जेवायलाच बोलावले होते. अडीच-तीन तास शास्त्रीबुवांबरोबर आम्हा पाच-सहा जणांच्या गप्पा झाल्या. खरे म्हणजे शास्त्रीबुवाच बोलत होते आणि त्यांना बोलते करण्यासाठी आम्ही एखाद दुसरा प्रश्न विचारत होतो. ब्राह्मणांतले शाखाभेद, त्यांचा ज्ञानशाखांशी असलेला संबंध, रक्तशुद्धीच्या अनैतिहासिक व अशास्त्रीय कल्पना, मौजीपासून कन्यादानापर्यंत अनेक विधींची उपयुक्तता आणि कालबाह्यता अशा अनेक विषयांबद्दलच्या मनातल्या शंका कोणीतरी बोलून दाखवे आणि शास्त्रीबुवांच्या मुखातून माहितीचा प्रवाह सुरू होई. पुढे शास्त्रीबुवांचे असे अनौपचारिक बोलणे ऐकण्याचा अनेक वेळा योग आला. त्या काळात आमच्यापैकी कोणाजवळही ध्वनिमुद्रणाची साधने नव्हती, याची आज खंत वाटते. व्यासंगातून मिळालेले माहितीचे धन शास्त्रीबुवा आमच्यासमोर उघडे करत होते. आज त्यातले फारच थोडे स्मरणात शिल्लक राहिले आहे.

शास्त्रीबुवा नुसती माहितीच सांगत नसत. ती तर होतीच; पण त्या सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहासातील तपशील सांगता सांगताच त्याचे विश्लेषण करून त्यातून निघणारे निष्कर्षही ते सांगत. हे निष्कर्ष त्यांनी स्वत: काढलेले आणि तर्क आणि समाजशास्त्र यांच्या

निकषावर टिकणारे असत, म्हणून शास्त्रीबुवांशी बोलण्याचे आम्हाला विशेष आकर्षण असे. संस्कृतमध्ये असलेली प्राचीन विद्या आणि तिचे अध्ययन करणारे शास्त्रीपंडित यांच्याविषयी माझ्या मनात आदर असला तरी लक्ष्मणशास्त्री वगळता इतर कोणाशी मुद्दाम परिचय करून घ्यावा, असे अजिबात वाटले नव्हते. मला संस्कृत येतही नव्हते आणि शास्त्रवचनांचा अर्थ समजून घेण्यासाठी परिश्रम करण्याची इच्छासुद्धा नव्हती. शास्त्रीबुवांची ओळख मात्र फक्त संस्कृत विज्ञान आणि पारंपरिक ज्ञानाचे पंडित एवढीच नव्हती. शास्त्रचौकटीची मर्यादा सांभाळतही धर्मसुधारणेचा सकारात्मक विचार करणाऱ्या वाईच्या नारायणशास्त्री मराठ्यांच्या- केवलानंद सरस्वतींच्या- शिष्यांपैकी प्रमुख म्हणूनही त्यांची ओळख होती. स्वातंत्र्याच्या चळवळीला या ज्ञानपीठाची सहानुभूती तर होतीच; पण प्रत्यक्ष सत्याग्रहातही त्यातील अनेकांनी भाग घेतला होता. महात्मा गांधींनी अस्पृश्यतेविरुद्ध चळवळ सुरू केली तेव्हा शास्त्रांत अस्पृश्यतेला खरोखरच अनिवार्य मानले गेले आहे का, की शास्त्राचा विपरीत अर्थ काढून त्या चुकीच्या सामाजिक रूढीला बळ देण्यात आले आहे, असा प्रश्न निर्माण झाला. तेव्हा केवलानंद आणि लक्ष्मणशास्त्री जोशी या दोघांनीही गांधीजींच्या निमंत्रणावरून श्रीधरशास्त्री पाठकांसारख्या समविचारी अभ्यासकाबरोबर येरवडा तुरुंगात जाऊन तेथे चर्चा करून अस्पृश्यता मानण्याची गरज नसल्याचा निर्वाळा दिला होता. बिहार आणि उत्तर प्रदेश अशा राज्यांत जेथे अस्पृश्यतेच्या प्रश्नावर धर्मचर्चा आयोजित होत, तेथे लक्ष्मणशास्त्रींनी जावे अशी गांधीजींची इच्छा असे. त्याप्रमाणे शास्त्रीजी जात. एक पुरोगामी विचाराचे शास्त्री अशी देशभर त्यांची ओळखही झाली होती.

गांधीजींचे चिरंजीव देवदास आणि राजगोपालचारींची मुलगी लक्ष्मी यांनी एकमेकांशी विवाह करण्याचे ठरवले. या विवाहाला साहजिकच गांधीजींची संमती हवी होती. देवदास वैश्य तर लक्ष्मी ब्राह्मण त्यामुळे हा प्रतिलोम विवाह ठरणार होता. असा विवाह शास्त्रसंमत होईल का? याविषयी लक्ष्मणशास्त्र्यांना गांधीजींनी मत विचारले. शास्त्रीबुवांनी जाती या कर्मनिविष्ठ असल्याचे सांगून गांधीजींना तुम्ही आता वैश्य उरलेला नाहीत, तर लोकांना मार्गदर्शन करणारे ब्राह्मण झालेला आहात व या विवाहात काहीच अडचण नाही, असे आपले मत दिले. या विवाहाचे पौरोहित्य करण्यासही त्यांनी संमती दिली व हा विवाह लावला. जेव्हा सोमनाथाचा जीर्णोद्धार झाला त्या वेळी झालेल्या प्राणप्रतिष्ठा विधीचे मुख्य म्हणून शास्त्रीजींनी काम केले. लक्ष्मणशास्त्रींच्या अशा पुरोगामी भूमिकेची सर्वसाधारण ओळख मलाही होती; पण त्यांना जवळून पाहण्याची व त्यांच्याशी बोलण्याची संधी मात्र फार उशिरा मिळत होती.

औरंगाबादेत असा परिचय झाल्यानंतर दोन-तीन वेळा वाईला मी गेलो. एकदा वाईच्या सरस्वत्युत्सवात शास्त्रीबुवांनी मलाच भाषण करायला सांगितले. शिवाय त्यांनी न्याय या विषयावर तू बोल असे म्हटले. माझ्यासमोर धर्मसंकट उभे राहिले. प्राचीन न्यायशास्त्राची

माझी ओळखही नव्हती. संस्कृत कधीच न शिकल्यामुळे ती वाट बंद होती. विश्वकोशातली आणि झळकीकरांच्या पुस्तकातील जुजबी माहिती मी वाचलेली होती. तेवढ्या सामग्रीवर न्याय विषयावर भाषण करणे आणि तेही वाईत ही फारच औद्धत्याची गोष्ट ठरली असती. आल्या प्रसंगाला तोंड देण्याचे मी ठरवले. शास्त्रीबुवांनी स्वत: हजर राहू नये अशी मनोमन इच्छा केली; पण नंतर पाहतो तर शास्त्रीबुवाच अध्यक्षस्थानावर विराजमान झाले आहेत. व्याख्यानाचा प्रारंभ करण्यापूर्वी मी त्यांना नमस्कार केला. ते बोलले काही नाहीत; पण नजरेने त्यांनी काळजी करू नकोस, असे आश्वासन दिले. माझे भाषण आटोपल्यानंतर स्वतः शास्त्रीबुवांनी जो समारोप केला तो अवघ्या दहा मिनिटांचा असला तरी आधुनिक काळातही प्राचीन न्यायशास्त्राच्या अभ्यासाचे महत्त्व सांगणारा होता.

मी न्यायाधीश झाल्यानंतर प्रथम वाईला गेलो तेव्हा पत्नी आणि मुलेही बरोबर होती. आम्ही सरकारी विश्रामगृहात उतरलो होतो. मी कुटुंबीयांसह आलो आहे व विश्रामगृहात उतरलो आहे हे कळताच शास्त्रीजींनी आम्हा सर्वांना आपल्या घरीच आणण्यासाठी त्यांच्या मुलाला- वासुदेवला गाडीसह पाठवले. आम्ही शास्त्रीबुवांच्या घरी पोहोचलो, त्या वेळी रात्रीचे आठनऊ वाजले असतील. शास्त्रीबुवा धर्मशास्त्रवेत्ते असले तरी ते आतिथ्यशील गृहस्थाश्रमीही होते. त्यांनी आमचे स्वागत केले, सर्वांना जेवू घातले आणि मुलांचीसुद्धा झोपण्याची व्यवस्था स्वतः उभे राहून करून घेतली. या प्रसंगानंतर हळूहळू मी वासुदेवप्रमाणेच शास्त्रीबुवांना 'आबा' म्हणू लागलो. आबांचे आतिथ्य बिनचूक असे. रात्री कितीही वेळ गप्पा होवोत आणि जेवणाला उशीर होवो, शास्त्रीबुवा जातीने जेवायला बसलेल्या सगळ्यांची विचारपूस करीत. त्यांच्या जेवणघरात एक टेबल होते. मित्रमंडळी असोत की माझ्यासारख्या एखाद्याचे कुटुंबीय, शास्त्रीबुवा सर्वांना जेवायला बसवून स्वतः पाठीमागे हात गुंतवून त्या टेबलाभोवती चकरा मारीत आमच्या पानात काय कमी आहे हे जातीने पाहत. त्यांच्या घरी स्वयंपाक करण्यासाठी सावित्री नावाच्या बाई येत. आबांच्या घरी अस्पृश्यता असणे तर शक्यच नव्हते. आम्ही जेवत असताना सावित्रीबाई गरम पोळ्या करीत आणि आबा कुटुंबातल्या एखाद्या वडीलधाऱ्याप्रमाणे आम्हाला आग्रह करीत.

रात्री झोपायला दोन वाजले तरी आबा पहाटे बरोबर चार वाजता जागे होत. अर्ध्यापाऊण तासात प्रातःर्विधी आटोपून, शूचिर्भूत होऊन ते पूर्ण जामानिमा चढवत आणि फिरायला बाहेर पडत. घरालगतच कृष्णा वाहत होती आणि वाईला कृष्णेचा घाटही सुंदर आहे. या घाटावर ते फेऱ्या मारीत. एकदा त्यांच्याकडे थांबलो असताना सकाळी जाग आली. आपणही कृष्णेच्या घाटावर फिरायला जावे, आबाही तेथे भेटतीलच असे वाटले आणि मी गेलो. आबांनी फेऱ्या मारण्याला सुरुवात केली होती. मी त्यांच्याबरोबर चालू लागलो. आबांनी कृष्णेला लोकांनी दिलेले देवतेचे रूप मला समजावून सांगायला आणि तिच्या स्तुतिपर रचनातील काही उद्धरणेही सांगायला सुरुवात केली. कृष्णेच्या घाटावर दरवर्षी

उत्सव होतो. त्या कृष्णोत्सवाची माहिती सांगता सांगता घाटावरच असलेल्या एका दोन मजली छोट्याशा इमारतीजवळ ते थांबले. खालच्या भागात मारुतीचे देऊळ होते. एक छोटासा जिना वर जात होता: वर सातआठ खणांची माडी होती. या माडीकडे निर्देश करून आबा म्हणाले, ''गुरुवर्य येथे राहत. दिवसाचा त्यांचा बहुतेक वेळ याच ठिकाणी व्यतीत होई.'' मग ते गुरुवर्यांची- केवलांनदांची- दिनचर्या सांगू लागले. सकाळच्या प्रसन्न वेळी वाईच्या सांस्कृतिक जीवनातील कृष्णाघाटावरच घडलेली एका ज्ञानसाधनेची हकिगत ती घडत असताना पाहिलेल्या, त्यात सहभागी असलेल्या व्यक्तीकडून ऐकण्याचे भाग्य मला लाभत होते.

समाजाचे नियमन करणाऱ्या पारंपरिक धर्मसंस्थांच्या उपयुक्ततेवर त्यांची श्रद्धा असली तरी ते अंधश्रद्ध अजिबात नव्हते. पुराणकथा आणि इतिहास कथांकडे पाहण्याचा शास्त्रीजींचा दृष्टिकोन तर्कनिष्ठ असे. मी नुकताच केरळला जाऊन आलो होतो. त्याबद्दल बोलणे निघताच त्यांनी मला विचारले, 'तू कालडीला गेला होतास का?' प्रश्नाचे होकारार्थी उत्तर मी दिले. तेथे शंकराचार्यांचे मंदिर आहे तेही मी पाहिले होते. शास्त्रीजींनी मला वेगळाच प्रश्न विचारला. 'कालडीची नदी केवढी आहे?' त्यात पाणी कितपत असते? नदी अगदी छोटीशी आहे व त्यात फारसे पाणीही नव्हते, असे मी त्यांना सांगितले. त्यांच्या मनात वेगळेच विचार चालू होते. माझे उत्तर ऐकल्यानंतर ते स्वतःशीच बोलल्याप्रमाणे म्हणाले, "म्हणजे मगर प्रत्यक्ष नसणार. आचार्यांचा पाय मगरीने धरला ही वस्तुस्थिती नव्हती. तर ते कवीप्रतिभेने योजिलेले रूपक होते." त्या वेळी शास्त्रीबुवा आद्य शंकराचार्यांवर एक पुस्तक लिहिण्याचा विचार करत होते. श्रीविद्या प्रकाशनाच्या मधुकाका कुलकर्णींनी त्या संकल्पित पुस्तकाची जाहिरातही सुरू केली केली होती. पुढे शास्त्रीबुवांनी इतर कामे हाती घेतली आणि हे काम मागे पडले. 'शंकराचार्यांच्या चरित्रातील काही कथा या कवीकल्पना आहेत, वास्तवात त्या घडलेल्या नसाव्यात हे तुमचे मत तुम्ही चरित्र लिहिले तरच मांडता येईल, आमच्यासारख्या इतर कोणी लिहिले तर लोक त्याला पाखंडी समजून त्याचा विचारच करणार नाहीत,' असे मी त्यांना म्हणालो. त्यांनी ऐकून घेतले; पण पुढे आद्य शंकराचार्यांचे चरित्र त्यांच्याकडून लिहिले गेलेच नाही.

समाजनियमन करण्यासाठी धर्मसंस्थेची आवश्यकता आहे, असेच शास्त्रीबुवा मानत. शंकराचार्यांसारख्या नियामकांची आवश्यकता आहे, असे त्यांचे मत होते. न्या. महादेव गोविंद रानड्यांनीसुद्धा हेच मत व्यक्त केले होते; परंतु नियामकाबद्दल आणि धर्मसंस्थेबद्दल आदर असला तरी त्यांची मते कालबाह्य झाली असतील तर ती मानणे बंधनकारक नाही. हिंदू धर्मात चर्चेला वाव आहे व म्हणून सुधारणेलाही वाव आहे, असे त्यांना वाटे. साताऱ्याला १९८१ साली कांचीचे शंकराचार्य जयेंद्र सरस्वती यांचा चतुर्मासानिमित्त मुक्काम होता. त्यांनी वर्णव्यवस्था आजही आवश्यक आहे, असे मत जाहीरपणे व्यक्त

केले होते. त्याबद्दल त्यांच्याशी शास्त्रार्थ करावा, आपले मतभेद मांडावेत या उद्देशाने लक्षमणशास्त्री त्यांना भेटावयास जाणार होते. सातारमधील पार्थ पोळके, किशोर बेडकीहाळ आणि इतर काही तरुणांनाही शंकराचार्यांची वर्णव्यवस्था आणि जातव्यवस्थेबद्दलची मते मान्य नव्हती. त्यांच्यापैकी एक-दोन जण शास्त्रीजींबरोबरच जयेंद्र सरस्वतींना भेटावयास गेले. आचार्य समोर दिसताच शास्त्रीबुवांनी त्यांना साष्टांग नमस्कार घातला आणि नंतर निर्भयपणे त्यांच्याशी चर्चा करून मतभेद सांगायला सुरुवात केली. या वेळी शास्त्रींबरोबर पार्थ पोळके होते. त्यांनी या प्रसंगाचा वृत्तांत 'मनोहर'मध्ये लिहिला आहे. ज्यांच्याशी मतभेद आहेत व ज्यांच्याबरोबर वाद घालावयाचा आहे त्यांनाच आपण साष्टांग प्रणिपात कसा केला, असा प्रश्न शास्त्रीजींना विचारण्यात आला होता. माझा प्रणिपात त्या आचार्य परंपरेला आहे, तिच्याविषयी आदर बाळगूनही मला माझे मतभेद व्यक्त करण्याला अडचण वाटत नाही, असे त्यांनी उत्तर दिले. जातपात मानू नये, हेच त्या तरुण कार्यकर्त्यांप्रमाणेच शास्त्रीबुवांचे मत होते व ते त्यांनी अजिबात सोडले नव्हते; पण धर्मनियामक संस्थेच्या परंपरेविषयी शास्त्रीबुवांच्या मनात त्या परंपरेतच वाढल्यामुळे असलेला आदर इतरांच्या मनात असण्याचे कारण नव्हते.

कराडला १९७५ साली अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरले होते. दुर्गाबाई भागवत अध्यक्ष होत्या. यशवंतराव चव्हाण स्वागताध्यक्ष तर शास्त्रीजी उद्घाटक होते. आणीबाणी लादली गेली होती. सर्वत्र प्रसिद्धीपूर्व नियंत्रणांचा अंमल सुरू झाला होता. वातावरणात एक प्रकारचा तणाव होता. दुर्गाबाई आपल्या अध्यक्षीय भाषणात अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या संकोचाचा धिक्कार करतील हे तर गृहीतच होते. शास्त्रीबुवा काय बोलणार याकडे सर्वांचे लक्ष होते. यशवंतराव आणि शास्त्रीबुवा यांच्या भूमिका एकमेकांशी जुळणाऱ्या असतील की विरोधी याचेही कुतूहल शास्त्रीबुवांना न ओळखणाऱ्या काहींच्या मनात होते. प्रारंभी वंदे मातरम् म्हटले गेले. वंदे मातरम्‌चे पहिले कडवे राष्ट्रगीत मानले जाते. पण काही, विशेषतः हिंदुत्ववादी मंडळी, संपूर्ण वंदे मातरम् म्हणण्याचा आग्रह धरतात. पहिले कडवे होईपर्यंत सर्वांप्रमाणेच शास्त्रीबुवासुद्धा आदरार्थ उभे होते. पहिले कडवे संपल्यानंतर गायकाने पुढचा भाग म्हणावयास सुरुवात केल्यानंतर शास्त्रीजींनी खणखणीत आवाजात आता राष्ट्रगीत संपले असे सांगितले आणि ते खाली बसले. स्वाभाविकपणेच व्यासपीठावरची सगळीच मंडळी खाली बसली. या छोट्याशा घटनेने शास्त्रीबुवांचे औचित्याचे भान उठून दिसले. नंतर शास्त्रीजींनी उद्घाटनाचे भाषण केले. या भाषणात अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या आणि नागरिक हक्कांच्या करण्यात आलेल्या संकोचाचा शास्त्रीजींनी स्पष्ट शब्दांत निषेध केला. उद्घाटनाचा सोहळा संपल्याबरोबर त्या वेळचे मुख्य प्रसिद्धिपूर्वनियंत्रक विनोद राव यांचा तातडीचा संदेश आला आणि शास्त्रीजींचे भाषणच छापू नका असा हुकूम बजावण्यात आला.

प्राचीन विद्यांच्या अभ्यासकांची जी प्रतिमा आमच्या मनात होती, त्यापेक्षा लक्ष्मणशास्त्री वेगळे होते. केवलानंदांना मी पाहिले नाही, पण तेही वेगळे असणारच. शास्त्रीबुवा तर सोवळेओवळे आणि पूजाअर्चेसारखे कर्मकांड यांच्यापासून पूर्णपणे मुक्त झाले होते. त्यांचा वेषसुद्धा ते आपल्यापैकीच आहेत, असे सामान्यजनांना आश्वस्त करणारा होता. ते समाजासमोरील नव्या प्रश्नांचाही विचार करू शकत होते. त्यांचे हे वेगळेपण त्यांच्या बुद्धिनिष्ठतेतून आणि त्याचबरोबर केवलानंदांच्या संस्कारांतून निर्माण झालेले होते.

खानदेशात जन्मलेल्या लक्ष्मणशास्त्र्यांचा ओढा लहानपणापासून प्राचीन संस्कृत विद्येकडे होता. त्यातच घरासमोर राहत असलेल्या एका विरक्त गृहस्थामुळे त्यांच्यावर संतवाङ्मयाचेही संस्कार झाले. वडिलांनी त्यांना अमरकोश शिकवून त्यांच्या संस्कृत अभ्यासाचा पाया घातला. नवव्या वर्षी १९१४ साली मौंज झाल्यानंतर वडील त्यांना वाईला घेऊन गेले आणि तेथे नारायणशास्त्री मराठ्यांकडे त्यांचे अध्ययन सुरू झाले. नारायणशास्त्री मराठ्यांच्याजवळ आणि वाईतील इतर ज्ञानवंत गुरूंजवळ शिकणाऱ्या मुलांचा चरितार्थ हा माधुकरीवरच चालत असे. वाईमध्ये विद्यार्थ्यांना भिक्षा घालण्याची एक चांगली परंपरा होती. स्वतः नारायणशास्त्री याच पद्धतीने भिक्षा मागत असत. नारायणशास्त्र्यांनी परंपरागत संस्कृत ज्ञानाबरोबरच समाजशास्त्रज्ञ स्पेन्सर आणि उदारमतवादी मिल यांचे ग्रंथही वाचले होते. पाठशाळेला जी नवी दृष्टी मिळाली, त्याला आणखी एक कारण घडले. कोल्हापुरातून तळेगावात स्थलांतरित झालेले विजापूरकरांचे समर्थ विद्यालय तेथेही ब्रिटिश सरकारने बंद पाडले. त्या वेळी त्या विद्यालयातील अनेक विद्यार्थी आणि शिक्षक प्राज्ञपाठशाळेत येऊन राहू लागले. साहजिकच धर्माच्या आणि तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाचे राष्ट्रप्रेमाशी नाते जोडले गेले. विनोबा भावे १९१७ साली प्रस्थानत्रयी शिकण्यासाठी वाईत सात-आठ महिने राहिले. त्यांनी नारायणशास्त्र्यांकडून शांकरभाष्यही ऐकले. विनोबांच्या तेथील वास्तव्यामुळे म. गांधींचा विचारही प्राज्ञपाठशाळेत आला. प्राज्ञपाठशाळेतील स्वातंत्र्यचळवळीशी नाते असलेले शिक्षक आणि विनोबासारखे विचारवंत यांच्या आगमनामुळे वातावरणात खूपच बदल झाला. गुरुवर्य तर अनुकूल होतेच; या परिस्थितीत लक्ष्मणशास्त्री जोश्यांची घडण झाली. त्या काळी शास्त्री पंडितांचा फार मोठा गट धर्म हा अपरिवर्तनीय आहे, असे मानणारा होता. जातिसंस्था, बालविवाहाची प्रथा, विधवाविवाहबंदी या गोष्टींचे समर्थन ही मंडळी करीत. वेद हा अपौरुषेय आहे, म्हणून त्यात बदल करता येत नाही, असे त्यांचे मत असे. याउलट नारायणशास्त्री मराठे (संन्यास घेतल्यानंतरचे केवलानंद सरस्वती) हे परिवर्तनवादी झाले होते. व्यवहारात ते तडजोडींना मान्यता देत; परंतु अंतिमतः समाजाने परिवर्तनाकडे गेले पाहिजे असेच त्यांना वाटे. ही भूमिका लक्ष्मणशास्त्र्यांना भावत होती. ते स्वतः धर्मपरंपरेच्या शोधनाच्या बाजूचे होते. १९२३ साली वाईला झालेल्या ब्राह्मण परिषदेमध्ये ब्राह्मणांच्या सर्व पोटजातींच्या एकीकरणाबद्दल चर्चा झाली. अनेक पोटजातींबद्दल ज्या

काल्पनिक कथा निर्माण झाल्या होत्या, त्यांना विरोध लक्ष्मणशास्त्र्यांनी जाहीरपणे केला व पोटजातींना अर्थ नसल्याचे प्रतिपादन केले. धुळयाजवळ सोनगीर येथे एक पंडित परिषद भरली होती. भारतातील अनेक पीठांचे आचार्य त्याचबरोबर इंग्रजी अध्ययन झालेल्या पंडितांनाही त्यांनी बोलावले होते. तेथे वेद अपौरुषेय नाहीत, ते माणसांनीच रचले आहेत, म्हणून त्यातील प्रतिपादनात दुरुस्ती होऊ शकते, असे मत लक्ष्मणशास्त्र्यांनी मांडले, पण अशा प्रत्येक वेळी परंपरावाद्यांकडून खूपच विरोध होई. परंपरा म्हणजे केवळ एखाद्या गोष्टीची सतत होणारी पुनरावृत्ती असे ते मानत नव्हते. परंपरा हा एक जिवंत प्रवाह असतो, त्यात सतत अंतर्गत सुधारणा होत असते, परंपरेतही नवतेला वाव असतो, असे मानणारे होते. एखाद्या धर्मग्रंथातील प्रत्येक शब्द अंतिम आहे, असे भारतीय धर्मपरंपरेने कधीही मानले नाही, या वैशिष्ट्याची शास्त्रीबुवांना चांगली जाण होती.

१९३२ साली येरवड्याच्या तुरुंगात गांधीजी होते. कारावासात असेपर्यंत राजकीय चळवळ करणार नाही, असे त्यांनी सरकारला आश्वासन दिले होते त्यामुळे त्यांना तेथे बरीच मोकळीक होती. अस्पृश्यता शास्त्राने अनिवार्य मानली आहे काय, याबद्दल चर्चा करण्यासाठी त्यांनी अनेक विद्वानांना तेथे बोलावले होते. चर्चेनंतर अस्पृश्यता निवारण धर्मशास्त्रदृष्ट्याही होऊ शकते असे सांगणारा जाहीरनामा प्रसिद्ध करावयाचा होता. गांधीजींनी ते काम केवलानंदांना सांगितले. केवलानंद म्हणाले, ''जाहीरनामा लक्ष्मण लिहील आणि मी तो तपासून पाहीन व तुमच्यासमोर मांडेन.'' 'हरिजन'मध्ये प्रसिद्ध झालेला हा जाहीरनामा मुळात लक्ष्मणशास्त्री जोशींनी लिहिलेला आहे. सोमनाथाच्या मंदिराचा जीर्णोद्धार करण्याचे ठरले तेव्हा त्याचे पौरोहित्य अस्पृश्यता न मानणाऱ्या आचार्यांकडून करावयाचे होते. ते पौरोहित्य केवलानंदांच्या मार्गदर्शनानुसार लक्ष्मणशास्त्र्यांनी केले. आमच्या घरातसुद्धा एकदा एका धर्मकृत्याबद्दल शास्त्रीबुवांचे मार्गदर्शन घेण्याचा प्रसंग आला. मुलाची मौज करण्याची गरज नाही, असे मला वाटत होते, तर ती व्हावी असा घरातील इतरांचा आग्रह होता. शेवटी शास्त्रीबुवांचे मत विचारले, तेव्हा त्यांनी तडजोड सुचवली. उपनयनाचे आवश्यक विधी करा; परंतु भिकावळ, आहेर, जेवणावळी, बँड वगैरे गोष्टींना अजिबात थारा देऊ नका, असे शास्त्रीबुवांनी सांगितले. त्याप्रमाणे आम्ही केले.

ज्या प्राज्ञपाठशाळेमध्ये शास्त्रीबुवांचे शिक्षणही झाले आणि नंतर त्यांनी शिकवलेही त्या प्राज्ञपाठशाळेतील दिनक्रमामबद्दल स्वतः शास्त्रीजींनी माहिती दिली आहे. पहाटे पाच वाजता पाठशाळेची घंटा व्हायची, वेदकालीन प्रार्थनेबरोबरच राष्ट्रीय प्रार्थनाही त्यात समाविष्ट झाली होती. त्यानंतर विद्यार्थी आपापल्या इच्छेप्रमाणे सूर्यनमस्कार घालत. शास्त्रीजी स्वतः दीडशे सूर्यनमस्कार घालीत. सकाळी आठ ते साडेअकरा शिक्षणपाठ होई. नंतर विद्यार्थी माधुकरी मागण्यासाठी बाहेर पडत. व्रताचा भाग म्हणून शास्त्रीबुवाही भिक्षा मागण्यासाठी गुरुजीबरोबर बाहेर पडत. पुन्हा दुपारी दोनपासून सूर्यास्तापूर्वी पंधराएक मिनिटांपर्यंत पुन्हा पाठ चाले. त्यानंतर संध्यावंदन आणि स्तोत्रपाठ होत. रात्रीच्या भोजनानंतर विश्राम.

विनोबा काही महिने प्राज्ञपाठशाळेत होते. प्राचीन अध्ययन हे घटपटाची खटपट आहे, त्यामुळे देशाचा उद्धार थोडाच होईल, असे विनोबा म्हणत. तोपर्यंत लक्ष्मणशास्त्र्यांनी आगरकरांचे निबंध वाचले होते. नव्या विचारांनी भारून काही वेगळे करण्यासाठी गुरुवर्य केवलानंदांना न सांगताच लक्ष्मणशास्त्री विनोबांबरोबर गेले. त्यांच्याबरोबर आणखी दोन-तीन सहकारी होते. बडोदा स्टेशनवर पोहोचल्यानंतर लक्ष्मणशास्त्र्यांनी आपले केस काढून टाकून गोटा करून घेतला. नंतर विनोबांच्या घरी सर्व जण गेले. बडोद्यातल्या रावपुऱ्यात विद्यार्थी मंडळ होते. तेथे विनोबा इंग्रजी शिकवू लागले. इंग्रजी शिक्षण संपल्यानंतर विनोबांनी लक्ष्मणशास्त्रींना साबरमतीच्या सत्याग्रहाश्रमात जायला सांगितले, शास्त्रीजींच्या मनात इंग्रजी शिकून अमेरिकेत जावे आणि देशाला यंत्रसज्ज करण्याचा प्रयत्न कसा होईल याचा अभ्यास करावा असे होते. त्याऐवजी फक्त विणकाम करायचे आणि चरखा चालवयाचा हे काही त्यांना पटेना. म्हणून तेथूनही ते गुपचूप आपल्या एका सहकाऱ्याबरोबर पळून गेले. त्यानंतर पुन्हा ते वाईला आले. गुरुजींच्या पाया पडून क्षमा मागितली आणि त्यांचे वाईतले शिक्षण पुन्हा सुरू झाले.

संस्कृत पारंपरिक ज्ञानाबरोबरच आधुनिक पाश्चात्त्य तत्त्वज्ञानही शास्त्रीबुवा आता अभ्यासू लागले होते. भौतिक प्रगतीचा संदर्भ लक्षात घेऊन तत्त्वज्ञानाचा विचार पाश्चात्त्य मंडळी जसा करतात तसा करणे आवश्यक आहे, असे त्यांना वाटू लागले. मार्क्सवादाच्या अभ्यासानंतर त्यांचे मानवेंद्रनाथ रॉय यांच्या लिखाणाकडे लक्ष गेले. मार्क्सवादाचा भारतीय संदर्भात योग्य अर्थ लावून रॉयच मार्गदर्शन करू शकतात असे त्यांना वाटले. पुढील काळात ते रॉय यांच्या पक्षातही सामील झाले होते. रॉय यांचा पक्ष विसर्जित झाल्यानंतर शास्त्रीजी सर्वसाधारणरीत्या विचाराने काँग्रेस पक्षाला जवळचे होते. यशवंतराव चव्हाण आणि शास्त्रीजींचे संबंध मानवेंद्रनाथ रॉय यांच्या अभ्यासातून आणि त्या वेळच्या साहचर्यातून निर्माण झाले होते. त्यांचे नाते मित्राचे होते, यशवंतरावजी शास्त्रीबुवांना मानही देत; परंतु त्यांचे नाते गुरू-शिष्याचे नव्हते. दोन मित्रांत असावा, असा विश्वास त्यांच्यामध्ये होता.

शास्त्रीजींच्या बरोबर बोलणे हा एक सुखावणारा अनुभव होता. समाजाच्या रचनेशी निगडित असलेल्या श्रद्धांचे मूळ शोधत, त्यातील ग्राह्य स्वीकारत, त्यातले हीन बाजूला सारत धर्मसंस्थेचे पुनर्मूल्यांकनही करावयाचे ही त्यांची मनोभूमिका होती. त्यामुळे समाजरचनेबद्दलच्या कोणत्याही प्रश्नाबाबत एका नव्याच पद्धतीने विचार करून ते उत्तर देत. ब्राह्मण जातीतील ऋग्वेदी- यजुर्वेदी अशा पोटभेदांबद्दल एकदा त्यांना मी आणि काही मित्रांनी विचारले, शास्त्रीबुवांनी वेदाध्ययन करणाऱ्या टोळ्या विविध भागांत कशा स्थिरावल्या व परंपरेने त्यांनी एकएका वेदाचे पठण सातत्याने कसे चालू ठेवले असा तर्काधारित सामाजिक इतिहासही सांगितला. त्यामागे केवळ त्यांची बौद्धिक क्षमता नसे, तर त्यामागे आयुष्यभरच्या डोळस अध्ययनाने निर्माण झालेली एक नवी विचारपद्धती

असे. म्हणून त्यांच्याबरोबर बोलणे हा जसा आनंदाचा भाग असे तसाच तो आपल्या प्रशिक्षणाचाही भाग असे.

पटवर्धनांनी प्राज्ञपाठशाळेसाठी गंगापुरीतला एक वाडा देणगीदाखल दिला होता. या वाड्याच्याच एका भागात शास्त्रीबुवा राहत. आजच्या राहणीमानाला अनुसरून चांगले स्वच्छतागृह आणि स्नानगृह, चांगल्या अवस्थेत बांधकाम असलेला इतर भाग हेसुद्धा तेथे नव्हते; पण शास्त्रीबुवांनी त्याबाबत कधी असमाधान व्यक्त केले नाही. तुटपुंज्या व्यवस्थेतही आलेल्या पाहुण्याची गैरसोय होऊ नये याकडे त्यांचे लक्ष असे. पाण्याच्या बादलीत उघडी कॉईल ठेवून पाणी गरम करण्याचा प्राचीन मार्ग तेथे अद्याप अमलात होता. कित्येक वेळा शास्त्रीजी पाहुण्याच्या आंघोळीचे पाणी गरम झाले आहे की नाही, हे स्वतः पाहत. गृहस्थाश्रमी ऋषी कसे असतील हे शास्त्रीबुवांकडे पाहून कळावयाचे.

महाराष्ट्रातील ज्ञानपरंपरेत लक्ष्मणशास्त्री जोशींचे एक विशिष्ट स्थान आहे. पारंपरिक ज्ञान आणि धर्माने निर्माण केलेल्या संस्था यांचा संपूर्ण अनादर न करताना त्यात घुसलेले हीन काढून टाकावे, स्वातंत्र्य आणि समता या सुसंगत अशी समाजव्यवस्था निर्माण व्हावी असे त्यांना वाटत होते. जे केवलानंदांनी प्रारंभ केले त्याचा विस्तार शास्त्रीबुवांनी पाठशाळेतच नव्हे तर त्याच्या बाहेरही अनेक व्यासपीठांचा वापर करीत केला. ज्ञानपरंपरेकडे पाहण्याची नवी दृष्टी त्यांनी दिली. या परंपरेत शास्त्रीबुवांचा विद्यार्थी होण्याचे भाग्य मला लाभले नाही, पण त्यांना जवळून पाहण्याची, त्यांच्या सहवासात काही काळ राहण्याची संधी मला मिळाली. अनेक शंकांचे निरसन त्यांच्याकडून करून घेता आले हा फारच महत्त्वाचा लाभ होता. माझे सुदैव असे की, शास्त्रीबुवांमधला ऋषी जसा मला जाणवला तसाच त्यांच्यातला 'आबा'ही मला अनुभवायला मिळाला.

**('हरवलेले स्नेहबंध', एप्रिल, २०१८)**

ooo

# ४८.

# महाराष्ट्रीय विचारविश्वाचे अजातशत्रू नेतृत्व

## श्री. मा. भावे

२७ मे १९९४ या दिवशी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी अगदी सहजपणे २७ पंचत्वात विलीन झाले. त्या वेळी ते ९४ वर्षांचे होते. 'अनायासेन मरणं, विनायासेन जीवनम्' असे सुभाषित आहे. त्यातील पूर्वार्ध शास्त्रीजींच्या मरणाने लोकांच्या अनुभवाला आणून दिला. पण उत्तरार्ध मात्र खरा नव्हता. लहानपणी व तरुणपणी माधुकरी मागून शास्त्रीजींना पोट भरावे लागले होते. वाईच्या प्राज्ञ पाठशाळेतील सगळ्याच विद्यार्थ्यांना भिक्षा मागूनच अन्नाची सोय करावी लागे. शास्त्रीजी पुढे सांगत असत की, माधुकरी मागायला लाज वाटे. चोरट्यासारखे होई.

लक्ष्मण या आपल्या मुलाला त्याची हुशारी पाहून त्याचे वडील बाळाजीपंत जोशी यांनी वाईला नेले आणि 'प्राज्ञमठ' या नारायणशास्त्री मराठे यांनी चालविलेल्या पाठशाळेत दाखल केले. ते साल होते १९१४. पुढे १९१६ साली प्राज्ञमठाचे रूपांतर प्राज्ञ पाठशाळेत झाले. प्राज्ञ पाठशाळेतही मुख्य शिक्षक श्रेष्ठ विद्वान नारायणशास्त्री हेच होते. शाळेतील शिकवण्याची पद्धती विद्यार्थ्यांचा कस पाहणारी असे. नारायणशास्त्री व इतर शास्त्री मंडळी यांना महत्त्वाचे ग्रंथ मुखोद्गत असत. एखादा विषय, उदा. न्याय- शिकवायचा झाला की नारायणशास्त्री त्या विषयातील मुख्य ग्रंथ (उदा. 'तर्कसंग्रह') विवेचनाला घेत. काही टप्प्यांपर्यंत विषयाची गाडी आणून सोडत. मग विद्यार्थ्यांना सांगत की, 'इथून पुढचे उरलेले प्रकरण तुमचे तुम्ही शिकायचे. त्यासाठी दोन आठवड्यांचा वेळ घ्या.' दोन आठवड्यांनंतर, तर्कसंग्रहातील नवीन मुद्द्यांचे सांगोपांग विवेचन विद्यार्थ्यांना करावे लागे. त्यासाठी दोन पक्ष करून त्यांच्यात वाद घडवून आणत. मुख्य आचार्यांच्या अध्यक्षतेखाली हा वाद चाले. समजा, लक्ष्मणाला एखादा मुद्दा नीट विवरून सांगता आला नाही, तर त्याला त्या मुद्द्याचा अभ्यास पुन्हा करावा लागे व फिरून वादाला सामोरे जावे लागे. अशा रीतीने प्रत्येक विषयाची अगदी काटेकोर तयारी करून घेतली जाई.

विनोबाजी १९१७ साली वाईला आले होते आणि नारायणशास्त्र्यांकडे उपनिषदांचा अभ्यास करत होते. तेव्हा शास्त्रीजी विनोबांपाशी गीतेचा अभ्यास करीत. त्या वेळी लोकमान्य टिळकांच्या 'गीतारहस्य'ची फारच वाखाणणी झाली होती. शास्त्रीजी, विनोबा व पाठशाळेतील विद्यार्थी 'गीतारहस्य'ची पारायणे करीत. एक दिवस विनोबांनी शास्त्रीजींना 'गीतारहस्य'तील निरनिराळ्या ठिकाणची तीन वाक्ये सांगितली व 'ही कुठल्या संदर्भात आली आहेत?' असे विचारले. शास्त्रीजींनी पुस्तक न उघडता संदर्भ तर सांगितलेच, पण त्या वाक्यांचे उत्तम विवेचनही केले. विनोबा शास्त्रीजींवर फार खूश झाले. यावरून तिथे किती साकल्याने अभ्यास होत असे हे कळून येते.

पाच-सहा वर्षांनंतर शास्त्रीजींनी नारायणशास्त्री यांची परवानगी घेऊन वाराणसीला प्रयाण केले आणि तेथील राजराजेश्वरशास्त्री द्रविड व इतर नामांकित पंडितांच्या सहवासात त्यांनी नारायणशास्त्र्यांच्या मार्गदर्शनाखाली राहून तर्कशास्त्राचा अभ्यास केला. नंतर त्यांनी कोलकात्याच्या एका संस्थेची 'तर्कतीर्थ' ही पदवी मिळवली आणि ते वाईला परत आले. त्यांनी पाठशाळेत शिकविल्या जाणाऱ्या मीमांसा, काव्य, वेदांत इत्यादी शाखांचाही अभ्यास केला. नारायणशास्त्री निवृत्त झाल्यावर प्राज्ञ पाठशाळेची जबाबदारी घेण्याची ही तयारी होती. शास्त्रीजी सांगत की, "पाठशाळेचा मुख्य आचार्य होण्यासाठी एका शाखेचा समग्र अभ्यास हवाच; पण इतर शाखांचीही चांगली माहिती हवी. यासाठी कमीत कमी बारा ते चौदा वर्षे शिक्षणात घालवावी लागत."

नारायणशास्त्री यांनी १९३१ साली संन्यास घेऊन 'केवलानंदसरस्वती' हे नाव घेतले. त्यानंतर त्यांनी पाठशाळेतील जबाबदाऱ्या सोडल्या. मात्र, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचे काम १९५६ साली ते समाधिस्थ होईपर्यंत त्यांनी केले. त्यांनी कार्यभार सोडल्यानंतर प्राज्ञ पाठशाळेची धुरा लक्ष्मणशास्त्र्यांकडे आली.

### धर्मसुधारणा

नारायणशास्त्र्यांनी संन्यास घेतल्यानंतर लोक त्यांना स्वामीजी म्हणू लागले, स्वामीजींनी वेद व वेदांगे यांचा तपशीलवार अभ्यास केला होता. सनातन वैदिक धर्माचा त्यांना अभिमान होता मात्र, स्वामीजी कर्मठ सनातनी नव्हते. धर्म हा परिवर्तनशील आहे, तो स्थिर नाही, कालमानानुसार त्यात बदल झाले पाहिजेत, असे त्यांचे मत होते. स्वामीजींची ही सर्व मते लक्ष्मणशास्त्री यांना पूर्ण मान्य होती, प्राचीन शास्त्रांमध्ये सर्व धर्मसुधारणांना वाव मिळू शकतो. अशी त्यांची खात्री होती.

विधवाविवाह, प्रौढविवाह, अस्पृश्यता निर्मूलन अशा अनेक सुधारणांना धर्मशास्त्राचा विरोध नाही असे या दोघांनी हिरिरीने दाखवून दिले. त्या काळी धार्मिक परिषदा भरवल्या जात, तेथे परंपरावादी शास्त्री आणि सुधारणावादी शास्त्री यांच्यात कडाडून भांडणे होत. सभा उधळली जाण्याचा प्रसंग येई. धर्माचा निर्णय करणे साध्यासुध्या माणसाचे काम नाही,

असे सनातन्यांचे म्हणणे होते. त्यावर मात करण्यासाठी स्वामीजी, शास्त्रीजी, कोकजेशास्त्री आणि नागपूरचे भाऊजी दप्तरी यांनी 'धर्मनिर्णय मंडळ' नावाची संस्थाच काढली.

## अस्पृश्यता निवारण

१९३२ साली गांधीजींनी अस्पृश्यता निर्मूलनाची चळवळ हाती घेतली. स्वामीजी व शास्त्रीजी दोघांचेही ठाम मत होते की, धर्मशास्त्रात अस्पृश्यतेला आधार नाही. गांधीजींनाही हे मत मान्य होते. अनेक सनातनी शास्त्री मंडळींशी लक्ष्मणशास्त्रींचे वाद झाले. 'धर्मशास्त्रात अस्पृश्यतेला आधार नाही' अशा आशयाचा जाहीरनामा तर्कतीर्थांनी तयार केला व तो गांधीजींनी 'हरिजन'मध्ये प्रसिद्ध केला.

अस्पृश्यांचा मंदिरप्रवेश हाही वादाचा मुद्दा होता. त्यासाठी सत्याग्रहही झाले. शास्त्रीजींना हे मान्यच होते की अस्पृश्यांना देवळात जायचा अधिकार आहे. पुढे १९५१ साली सौराष्ट्रातील सोमनाथाच्या भग्न मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला. हे काम करणाऱ्या समितीने देऊळ दलितांसाठी खुले ठेवले जाईल असा ठराव केला होता. त्यामुळे सोमनाथाच्या परंपरेने आलेल्या पुरोहितांनी मूर्तीच्या प्रतिष्ठापनेस नकार दिला. असा 'भ्रष्टाचार' त्यांना मान्य नव्हता. तेव्हा स्वामीजी आणि शास्त्रीजी सोमनाथाला गेले. त्यांनी मूर्तीची यथाविधी स्थापना केली.

धर्मसुधारणेच्या बाबतीतील पाठशाळेचे सैद्धांतिक कार्य म्हणजे धर्मकोशाचा प्रकल्प. वैदिक धर्म हा परिवर्तनशील आहे हे दाखवण्यासाठी प्राचीन धर्मग्रंथातील वचनांची कालमानानुसार यादी करून धर्माच्या निरनिराळ्या उपांगांत- उदा. सोळा संस्कार- कसे बदल होत गेले ते सिद्ध करायचे. १९३० साली नारायणशास्त्री यांनी प्रकल्पाचा आराखडा तयार केला. तर्कतीर्थांनी त्यांच्या मृत्यूपर्यंत या अवाढव्य कोशाचे १८ भाग प्रसिद्ध केले. अजूनही हे काम चालूच आहे.

## सर्वगामी विद्वत्ता

शास्त्रीजींनी स्वातंत्र्यलढ्यात उत्साहाने भाग घेतला. १९३० साली आणि १९३२ साली ते तुरुंगात गेले. तर्कतीर्थांनी इंग्रजीचे पद्धतशीर शिक्षण घेतले नव्हते. स्वतःच्याच प्रयत्नांनी ते इंग्रजी वाचण्यास शिकले. तुरुंगात असताना त्यांनी मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचा त्याच्या मूळ ग्रंथांवरून अभ्यास केला. त्यातून 'हिंदुधर्माची समीक्षा' व 'जडवाद' हे त्यांचे ग्रंथ १९४१ साली प्रसिद्ध झाले. मार्क्सवादी दृष्टिकोनातून त्यांनी केलेली हिंदू धर्माची परखड समीक्षा त्या काळी फार गाजली.

१९५१ साली शास्त्रीजींचा 'वैदिक संस्कृतीचा विकास' हा विख्यात ग्रंथ प्रसिद्ध झाला. भारतातील नृत्य, गायन, शिल्प, चित्र या कला; व्याकरण, काव्य यांसारख्या विद्या; विज्ञान, रसायन, गणित, खगोल ही शास्त्रे यांची बीजे वैदिक संस्कृतीत आढळतात. अवैदिक संस्कृती होती खरी; पण नंतर ती वैदिक संकृतीतच सामावून गेली, असे शास्त्रीजींचे प्रतिपादन आहे.

हा एक अलौकिकच ग्रंथ म्हणावा लागेल. साहित्य अकादमीने पुरस्कार देऊन या ग्रंथाचा गौरव केला.

खेरीज साहित्य, समीक्षा, इतिहास, धर्म, प्राच्यविद्या आणि समाजशास्त्र अशा विषयांच्या विद्वत परिषदांना उपस्थित राहून त्यांनी आपले चिंतन वेळोवेळी पंडितांच्या समोर मांडले. शासन, विद्यापीठे, साहित्य परिषदा आणि आंतरराष्ट्रीय संस्थांनी त्यांचा गौरव केला. ते साहित्य संमेलनाचेही अध्यक्ष झाले. शासनाने त्यांना पद्मभूषण (१९७६) व पद्मविभूषण' (११९२) हे किताब दिले.

**मराठी विचारविश्वाचे नेतृत्व**

महाराष्ट्र शासनाने मराठीतील साहित्य व्यवहाराला आर्थिक साह्य देण्याच्या हेतूने 'महाराष्ट्र. राज्य. साहित्य संस्कृती मंडळा'ची स्थापना केली. त्याचबरोबर अद्ययावत ज्ञानकोश निर्माण करावेत म्हणून 'विश्वकोश मंडळ' स्थापन केले. या दोन्हींचे अध्यक्षपद शास्त्रीजींनी भूषविले. या संस्थांमुळे मराठी विचारवंतांना एकत्र येण्यासाठी व्यासपीठ मिळाले. शास्त्रीजींचा दीर्घ अनुभव, प्राचीन विद्या व आधुनिक शास्त्रे आणि तत्त्वज्ञान यांचा प्रचंड अभ्यास, त्यांचे आकर्षक व्यक्तिमत्त्व व वक्तृत्व आणि ही अधिकारपदे यांमुळे मराठीतील विचारविश्वाचे नेतृत्व त्यांच्याकडे आले आणि पुढे ३० वर्षे त्यांनी ते तपश्चर्यापूर्वक सांभाळले. चर्चेला उत्तम माध्यम म्हणून 'नवभारत' हे मासिक त्यांनी चालवले. कितीही जटिल मुद्दा चर्चेला असो; तर्कतीर्थांनी केलेला समारोप सर्वांचे समाधान करून जाई.

शास्त्रीजींच्या ठिकाणी प्रथमदर्शनी परस्परविरोधी वाटावेत अशा गुणांचा मनोज्ञ मिलाफ दिसून येई. त्यांनी धर्मशास्त्रांचा दांडगा अभ्यास केला, पण धर्मशास्त्राविषयी श्रद्धा बाळगली नाही. मार्क्सवादाच्या सिद्धांतातील गुंतागुंतीची समजूतदार चर्चा ते करीत, मात्र भारतातील अध्यात्म हेच श्रेयस प्राप्त करून देते असा त्यांचा विश्वास होता. राजकारणाच्या धकाधकीत त्यांनी भाग घेतला आणि कठोर विरोधाला ते सामोरे गेले. तरीही यातून आपणांस काही साधायचे आहे असा हव्यास त्यांनी बाळगला नाही, विसाव्या शतकातील वैचारिक घडामोडींचा साक्षेपी अभ्यासक या भूमिकेतच ते शेवटपर्यंत वावरले.

**(दैनिक लोकसत्ता, रविवार, लोकरंग, २६ मे, २०१९.)**

○○○

## ४९.

# प्रज्ञातीर्थ : लक्ष्मणशास्त्री जोशी

## डॉ. सुनीलकुमार लवटे

कोण होते तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी? संस्कृत पंडित, वेदांग अभ्यासक, धर्मसुधारक, स्वातंत्र्य सैनिक, मार्क्सवाद, अस्पृश्यता निवारण कार्यातील महात्मा गांधींचे सल्लागार, हरिजनांच्या मंदिर प्रवेशाचे समर्थक, काँग्रेस कार्यकर्ते, गांधीवादी, रॉयवादी, भारतीय घटनेचे संस्कृत भाष्यांतरकार, स्वतंत्र महाराष्ट्राच्या ज्ञानव्यवस्थेचे जनक, साहित्य आणि संस्कृतीचे आधुनिकीकरण करणारे कृतिशील उपासक, 'मराठी विश्वकोश', 'धर्मकोश', 'मीमांसाकोश', 'संस्कृत हस्तलिखितांची सूची'चे संपादक, विविध नियतकालिके नि दैनिकांचे संपादक, वक्ते, साहित्यकार, समीक्षक, प्रस्तावनाकार असं बहुआयामी, बहुपेडी व्यक्तिमत्त्व! या प्रश्नेने छाती दडपून जाते.

मी त्यांना समजून घेण्याचा प्रयत्न करतो तेव्हा लक्षात येतं, तर्कतीर्थांचा प्रवास हा सतत शब्दप्रामाण्याकडून बुद्धिप्रामाण्याकडे, सनातनी पांडित्याकडून धर्मसुधारकाकडे, गांधीवादाकडून रॉयवाद, काँग्रेसी समाजवादाकडे, ज्ञान तपस्वीकडून ज्ञान व्यवस्थापकाकडे, वक्त्याकडून प्रबोधकाकडे, कार्यकर्त्याकडून संघटक, नेत्याकडे, भाषांतरकाराकडून भाष्यकाराकडे, साहित्यकाराकडून संपादक कोशकाराकडे असा सतत कायाकल्पाचा, मतांतराचा, कल्पांतराचा होत राहिला आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचं हे वाहातंपण त्यांच्या निरंतर वैचारिक विकासाचं लक्षण म्हणून पाहाता येतं. ते शब्दप्रमाण वेद, उपनिषद, पुराणचे अभ्यासक. त्यांना मार्क्स, महात्मा गांधी, मानवेंद्रनाथ रॉय यांचं आकर्षण का वाटावं? वैदिक संस्कृती, हिंदु धर्म, शीख पंथ, सर्वधर्मसमीक्षा करणारा हा पंडित नवमानवतावादी का व्हावा? राजकारण, समाज, संस्कृती, साहित्य व्यवहारात सक्रिय असणाऱ्या या कार्यकर्त्याने प्रबोधक, चिंतक, मीमांसक, समीक्षकाच्या भूमिका का वठवाव्यात? तर तर्कतीर्थांच्याच शब्दात सांगायचं तर, 'मी सतत वाहात आलो. पाय टेकायला कुठे जागाच सापडली नाही.' याचा दुसरा अर्थ असा, स्थैर्य वर्ज्य असणारे असे ते स्थितप्रज्ञ होते की त्यांना नित्य

वर्तमानापेक्षा उत्कट भविष्य जगण्याचा ध्यास होता. 'उत्कट तेंचि घ्यावे। मळमळीत अवघेचि टाकावे।' अशा ध्यासपर्वाच्या मागे धावणारा हा योगी 'कायदा पाळा गतीचा। थांबला तो संपला' असं गुणगुणत नित्य नव्याचा शोध घेत राहिला.

## संस्कृत पंडिताची घडण

धुळे शहराच्या पश्चिमेस ४६ मैल अंतरावर एक छोटं गाव आहे पिंपळनेर. तिथे बाळाजी कृष्ण जोशी जोशपणाच्या व्यवसायावर म्हणजे पौरोहित्य, भविष्य, कुंडली इ. द्वारे आपली जीविका चालवत. पत्नीचे नाव चंद्रभागा, या दांपत्यास दहा अपत्ये झाली. पैकी तीन जगली. मोठा वेणीमाधव. तो पुढे आयुर्वेदाचार्य झाला. त्याच्यापूर्वी झालेले त्रिवेणी व श्रीराम. श्रीराम ११ व्या वर्षी निवर्तला, त्रिवेणी विधवा होऊन माहेरी परतलेली. तिला कावेरी नावाची कन्या होती. ती आजोळीच वाढली. बाळाजीपंतांना झालेलं शेंडेफळ लक्ष्मण. तो दीड वर्षांचा असताच आई निवर्तल्याने कावेरीनेच त्याचा सांभाळ केला. तो आपल्या या नात्याने भाची असलेल्या कावेरीला आईच म्हणायचा. लक्ष्मणाला ती आबा म्हणायची तेच त्याचं घरातलं नाव होऊन गेलं. ते इतकं की लक्ष्मणाची मुलं, मुली, सगेसोयरे, पत्नी सतीपण आबाच संबोधी.

पिंपळनेरला तशी सातवीपर्यंतची शाळा होती. गण बाळाजीपंतांनी शेंडेफळ लक्ष्मणाला संस्कृत पंडित बनवायचं ठरवून दुसरीपर्यंतचं शिक्षण झाल्यावर वयाच्या चौदाव्या वर्षी वाईच्या प्राज्ञपाठशाळेची कीर्ती ऐकून वेदाभ्यासासाठी पाठवायचं ठरवलं. दरम्यान वडिलांनी लक्ष्मणास याज्ञिकी शिक्षण दिलं होतं. २ फेब्रुवारी, १९१४ ला लक्ष्मण वडिलांसह बैलगाडीने प्रवास करत वाईला दाखल झाला. नारायणशास्त्री मराठे जे पुढे स्वामी केवलानंद सरस्वती आले, ते लक्ष्मणाचे गुरू झाले. इथे एक वर्ष माधुकरी मागून लक्ष्मण शिकला. पुढे १४ रुपये शिष्यवृत्ती मिळाली. वाई येथील चार वर्षांच्या अभ्यासात 'रूपावली', 'समासचक्र' शिकला. ‘हितोपदेश’, 'रघुवंश', 'किरातार्जुनीय', 'शिशुपालवध' वाचन, अभ्यासाने, संस्कृत साहित्याची गोडी लागली. ऋचा, मंत्र, व्युत्पत्ति शिकला. ‘तर्कसंग्रहदीपिका', 'सिद्धांत मुक्तावली', 'अष्टाध्यायी' शिकला. तर्कशास्त्र, न्याय वेदांतात त्याची गती होती. पुढे ते नवन्यायाकडे वळले. सन १९१७ ला विनोबा भावे प्राज्ञ पाठशाळेत 'शांकरभाष्य' अभ्यासासाठी आले. त्यांच्याबरोबर 'ब्रह्मसूत्र', 'शांकरभाष्य', 'उपनिषदे', 'गीताभाष्य' शिकत ते लक्ष्मणशास्त्री जोशी झाले नि प्राज्ञपाठशाळेत शिकवू लागले. सन १९१८ ला ते न्यायशास्त्र शिकण्यासाठी काशीला गेले. सन १९२२-२३ ला ते कलकत्ता येथील शासकीय संस्कृत महाविद्यालयाची 'तर्कतीर्थ' पदवी धारण करून वाईस परतले व प्राज्ञपाठशाळेत पूर्ववत अध्यापन करू लागले.

## स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व

कोल्हापूर येथील राजाराम महाविद्यालयातील संस्कृत व इंग्रजीचे प्राध्यापक विष्णु

गोविंद विजापुरे यांनी नोकरीचा राजीनामा (१९०५) देऊन सन १९०६ मध्ये 'राष्ट्रहिताच्या सर्व उद्योगाचा पाया राष्ट्रीय शिक्षणावर आहे' या धारणेने समर्थ विद्यालय सुरू केले होते. पण सरकारी जाचामुळे त्यांना ते मिरज, तळेगाव येथे स्थलांतरित करावे लागले होते. त्यावरही सन १९१० ला ब्रिटिश सरकारने बंदी आणल्यामुळे तेथील विद्यार्थी व शिक्षक वाईच्या प्राज्ञपाठशाळेत सामील झाले होते. ते सर्व राष्ट्रीय चळवळीने भारलेले क्रांतिकारी होते. त्यांच्या विचार, आचारांचा प्रभाव व नारायणशास्त्री मराठे यांचा स्वातंत्र्य पुरस्कार यांमुळे इथे लोकमान्य टिळक, महात्मा गांधी येऊन गेलेले. लोकमान्य टिळकांचा तर्कतीर्थांवरील प्रभाव बालपणापासूनचाच.

तर्कतीर्थ झाल्यानंतर प्राज्ञपाठशाळेच्या धर्मसुधारणा मोहिमेंतर्गत नारायणशास्त्री मराठे यांच्याबरोबर अनेक धर्मसभा, परिषदा, संमेलनांमधून धर्मसुधारणा, शुद्धी, धर्मांतर इ.वर आपले विचार व्यक्त करत सनातनींविरुद्ध खंडन मंडन, वादविवाद करत राहात. पण इथल्या शब्दप्रामाण्याचा, 'बाबा वाक्यं प्रमाणम्' चा वीट येऊन तर्कतीर्थांनी धर्मकार्यापेक्षा राष्ट्रकार्य श्रेष्ठ समजून स्वातंत्र्य चळवळीत स्वतःस गुंतवून घेतले.

सन १९३० च्या कायदेभंग चळवळीत आपल्या अमोघ वक्तृत्वाची मोहिनी तर्कतीर्थांनी सातारा जिल्ह्यावर घातली. 'शास्त्राचे रूपांतर शस्त्रात केल्याशिवाय तरुणोपाय नाही' म्हणत ते महाराष्ट्रभर व्याख्यान देत, संघटन कार्य करू लागले. नामांतर, वेषांतर, मतांतर करत ते ब्रिटिश पोलिसांना चकवा देत राहिले. ते कायदेभंगाच्या 'वॉर काऊंसिल'चे सदस्य झाले. ब्रिटिश इंटिलिजन्सच्या रिपोर्टात त्यांच्या चळवळीच्या, व्याख्यानांच्या, खटल्या, शिक्षांच्या नोंदी आढळतात. अहमदनगर जिल्हा शिबिर, बागलाण जंगल सत्याग्रह, कराड व्याख्यानांद्वारे असंतोष पसरविण्याचा वहिम, गाव कामगार पाटलांचे शेकडो राजीनामे, आदिवासीचे संघटन, निदर्शकांवर पोलिसांचा गोळीबार, तर्कतीर्थ फरार इ. घटनांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे त्या काळात ब्रिटिशांच्या नोंदीत 'अनंत स्वामी' नाव धारण करून भूमिगत कार्य करत असल्याची नोंद आढळते. त्यांना सन १९३० व १९३२ ला अनुक्रमे सहा नि दहा महिन्यांची सश्रम कारावासाची शिक्षा व ५० रु. दंड करून त्यांची रवानगी धुळे तुरुंगात करण्यात आली होती.

## गृहस्थ संन्यासी तर्कतीर्थ

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे सार्वजनिक व्यक्ती होते. माणूस सार्वजनिक झाला की त्याचं व्यक्तिगत जीवन गौण होऊन जातं. खरं तर या गौण होण्यातून समाजात गैरसमजही परभारे पसरत राहतात. तर्कतीर्थांचं पंडित असण्यातून एक पसरलेला गैरसमज म्हणजे ते संन्यासी होते. हा गैरसमज त्यांच्या सतत समाजात असण्या, राहण्यातून तयार झालेला. वस्तुस्थिती अशी की ते विवाहित होते. त्यांच्या तरुणपणाच्या काळात संस्कृत पंडित ब्रह्मचारी राहण्याचा प्रघात होता हे खरे आहे, परंतु तर्कतीर्थ विद्याध्ययन करण्याच्या काळात

गृहस्थ व्हावे की ब्रह्मचारी राहावे असे द्वंद्व निर्माण झाले असता त्यांचे गुरू नारायणशास्त्री मराठे यांनी तर्कतीर्थांची प्रवृत्ती लक्षात घेऊन विवाह करण्याचा सल्ला दिला. यानुसार तर्कतीर्थांचा विवाह सन १९२६ मध्ये मुल्हेरनिवासी वासुदेवबुवा पंडित यांची कन्या कावेरी हिजबरोबर झाला. लग्नानंतरचे त्यांचे नाव सत्यवती झाले. वाई येथील घरीदारी त्या सतीकाकू म्हणून ओळखल्या जात.

या दांपत्यास चार अपत्ये झाली. मधुकर, मालती, सुमन, आणि वासुदेव. पैकी मधुकर हा इलेक्ट्रिक इंजिनिअरिंग आणि मॅटॅलर्जिकल सायन्स अशा दोन क्षेत्रांतील पदवीधर होऊन त्यांनी अमेरिकेतल्या येल विद्यापीठातून मॅटॅलर्जिकल सायन्समधील पीएच.डी. संपादली व तो इंदुमती दातार यांच्याशी विवाहित होऊन अमेरिकेत स्थायिक झाला होता. त्यांना चार अपत्ये- रमा, विजय, लक्ष्मी नि शीला. हे चौघेही सध्या अमेरिकेत आहेत. मधुकर जोशी यांचे सन २०१८ मध्ये निधन झाले. मालती जोशी या श्रीमती नाथीबाई ठाकरसी महिला विद्यापीठातून बी. ए. झाल्या. पुढे त्यांचा विवाह अमेरिकास्थित मधुकर कुलकर्णी यांच्याशी झाला. तेही मेटलर्जिक सायन्समधील पीएच.डी. होते. येले विद्यापीठ, अमेरिकेतूनच त्यांनी ही पदवी संपादली. डॉ. मधुकर जोशींबरोबरच ते आय.बी.एम. या विश्वविख्यात संगणक कंपनीत उच्च पदावर कार्यरत होते. सन २०१६ ला त्यांचे निधन झाले. श्रीमती मालती कुलकर्णी अमेरिकेत स्थायिक आहेत. तिसरी कन्या सुमन. ती एम.ए. पीएच.डी. होऊन प्राध्यापक झाली. या सायन (मुंबई) येथील एस.आय.ई.एस. महाविद्यालयात तत्त्वज्ञान शिकवत. यांनी तर्कतीर्थांची तीन चरित्रे लिहिली आहेत. एक भाषणसंग्रह संपादित केला आहे. एक चरित्र व लेखसंग्रह इंग्रजीत ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसने आणि लोकवाङ्मय गृहाने गतवर्षीच प्रकाशित केलं आहे. त्या सध्या सिंगापूर येथे स्थायिक आहेत. चौथे चिरंजीव वासुदेव जोशी मराठी विश्वकोशात सेवा करीत होते. ते निवृत्त असून वाई मुक्कामी निवासी आहेत.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी लौकिक अर्थाने घरसंसार, कुटुंब जबाबदाऱ्या शेवटपर्यंत सांभाळल्या. नातवांना मराठी यावे म्हणून त्यांची धडपड असायची, पण मूळ वृत्ती संन्याशाची. म्हणजे असे की लेखन, वाचन म्हटले की भरल्या घरात एकटे होऊन समाधिस्थ होत. एका मुला की मुलीच्या लग्नात लेख पाठवायची घाई होती म्हणून लोक तिकडे अक्षता उधळत होते नि इकडे हा संन्यस्त गृहस्थ तन्मयतेने लिहीत असल्याचेही लोकांनी पाहून लिहून ठेवले आहे. सतीकाकू सन १९७८ ला निवर्तल्या, तर शास्त्रीजींनी सन १९७८ ते १९९४ असं तपभर मुला, नातवांसदर्भात आईचीपण भूमिका पार पाडल्याचं त्यांच्या आप्तस्वकीयांनी लिहून ठेवलं आहे.

ते नित्य संचारी गृहस्थ, पण घरी येताना ते रिकाम्या हातांनी परतलेत असं कधी झालं नाही. वाईच्या मंडईत तर्कतीर्थांना भाजी-फळं घेताना पाहिलं की सुशिक्षितांना या बुद्धिवादी

माणसाच्या गृहस्थपणाचं अप्रूप वाटल्याशिवाय रहात नसे. ढोंग त्यांनी आयुष्यात कधीच, कुठल्या गोष्टीचं केलं नाही. शंकराचार्यांशी अनिंस आणि पुरोगामी मंडळींसह जाहीर वादविवाद करायला गेलेले तर्कतीर्थ लोटांगण घालून अभिवादन करतात नि नंतर प्रश्न विचारून शंकराचार्यांना निरुत्तर करतात, हे सातारकरांनी अनुभवले आहे. मुलं शिकतानाच्या काळात पत्र लिहून समुपदेशन, मार्गदर्शन करणारे अबा (तर्कतीर्थांचं घरातलं नाव!) मुलं विसरलेली नाहीत. जेवणानंतर वामकुक्षी असला प्रकार नाही. पण रात्रीच्या जेवणानंतर शतपावली झाल्याशिवाय पाठ टेकत नसत. त्याला तर्कतीर्थांनी 'चरणयोग' नाव रूढ केले होते. खाण्यापिण्यात ते मोकळे होते. सामीष निरामीष दोन्ही प्रकारची भोजने चालत, पण वासनेने नाही. म्हणत, ‘मी इंद्रिय नियंत्रण केलं, जिभेचं नाही करू शकलो’. याचा संदर्भ नित्य भाषणबाजीशीही होता. ते ब्राह्मण असले तरी त्यांच्यात ब्राह्मण्य, कर्मकांड नव्हतं. त्यांची ऊठबस बहुजन, दलितांत अधिक असे. विद्यार्थी दलित होते. विशेष म्हणजे घरी स्वयंपाक करणाऱ्या बाई दलित होत्या, हे वाईतल्या सनातनी ब्राह्मणांना वर्षे उलटली तरी माहीत नव्हतं. आपल्या पुरोगामीपणाचा डिंडिमही त्यांनी कधी मिरवला, वाजवला नाही.

## अस्पृश्यता निवारण कार्यातील महात्मा गांधींचे सल्लागार

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी सन १९३२ ला दुसऱ्यांदा धुळयाच्या तुरुंगात होते, तेव्हा त्यांच्यासोबत होते जमनालाल बजाज, गुलजारीलाल नंदा, आचार्य विनोबा भावे, साने गुरुजी, पुरुषोत्तमदास त्रिकम, जाधवजी सेठ इ. याच काळात आचार्य विनोबांनी तुरुंगात दिलेली गीतेवरील प्रवचने साने गुरुजींनी लिहून काढली होती. 'गीता प्रवचने' हे विनोबांचे पुस्तक त्यातून जन्मलेले. या काळात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी कलकत्त्याच्या माधव सेठ यांना 'उपनिषद' शिकवीत असत. माधवजी सेठ ते हिंदीत लिहून काढत. यात तर्कतीर्थ प्राचीन ग्रंथातील धर्म आधुनिक दृष्टीने कसा वाचला पाहिजे ते समजावत. या अस्पृश्यता निवारण संबंधी झालेली चर्चा जमनालाल बजाज यांच्या वाचनात आली. ते त्या विवेचनांनी प्रभावित झाले, तुरुंगातून निरोप घेताना मी हे महात्मा गांधींच्या लक्षात आणून देतो, असे आश्वासन दिले होते. त्यानुसार यांनी हा नवा विचार व दृष्टिकोन महात्मा गांधींच्या लक्षात आणून दिला.

महात्मा गांधी तेव्हा येरवडा (पुणे) तुरुंगात होते. त्यांनी लक्ष्मणशास्त्री जोशी यांना निरोप पाठवून बोलावून घेतले. १३ डिसेंबर १९३२ ते ३१ डिसेंबर १९३२ या काळात महात्मा गांधींशी झालेल्या त्यांच्या भेटी, चर्चांची नोंद ‘दि कलेक्टिव्ह वर्क्स ऑफ महात्मा गांधी’ (खंड- २८, पृ. ३२६ ते ३३०) मध्ये आढळते. या काळात महात्मा गांधींनी भारतभरच्या सनातनी आणि पुरोगामी धर्म पंडित, अभ्यासकांशी चर्चा करून 'हरिजन' पत्राच्या पहिल्याच अंकात (११ फेब्रुवारी, १९३३, पृ. ६) सात शास्त्री, पंडितांच्या स्वाक्षरी पत्रक प्रसिद्ध केलेले आढळते. ते तर्कतीर्थांनी तयार केलेले होते. त्यावर त्यांची स्वाक्षरीही आहे. यातून महात्मा

गांधींचा अस्पृश्यता निवारण कार्यक्रम व तत्संबंधी महात्मा गांधींचे लेखन सिद्ध झाले. अनेक निवेदने (स्टेटमेंट्स) तयार झालेली दिसतात. पुढे महात्मा गांधींचे चिरंजीव देवदास नि राजाजींची कन्या लक्ष्मी यांचा आंतरजातीय विवाह झाला. त्याचे पौरोहित्य तर्कतीर्थांनीच केले होते. त्या वेळी महात्मा गांधींनी केलेल्या भाषणात तर्कतीर्थांचा गौरव 'who knew that a man of great learning and spotless character' अशा शब्दांत केला होता. त्यानंतर महात्मा गांधींनी केवळ आंतरजातीय-आंतरधर्मीय विवाहांना उपस्थित राहाण्याचं व्रत घेतलं व आयुष्यभर पाळलं.

महात्मा गांधींच्या अस्पृश्यता निवारण कार्याचा एक भाग म्हणून हरिजनांच्या मंदिर प्रवेश चळवळीकडे पाहिलं जातं. साने गुरुजींनी प्रचार प्रसार, प्रबोधनाने महाराष्ट्रातील अनेक मंदिरे त्या वेळी हरिजनांना खुली केली. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात हरिजनांना प्रवेश मिळावा म्हणून साने गुरुजींनी केलेल्या आमरण उपोषणामुळे ते १० ऑक्टोबर, १९४७ रोजी हरिजनांना खुले झाले तसेच गुजरातमध्ये नंतर ते घडले. जुनागढ संस्थान विलीनीकरणाच्या वेळी सरदार वल्लभभाई पटेल यांनी संस्थानातील प्राचीन सोमनाथ मंदिराच्या जीर्णोद्धाराची घोषणा केली. या मंदिराच्या पुनःनिर्माणाची योजना घेऊन सरदार पटेल महात्मा गांधींकडे गेले, तेव्हा गांधींनी त्यांना हे कार्य लोक सहभाग व लोकवर्गणीतून करून सर्वांसाठी खुले (हरिजनांसह) करण्याविषयी सुचविले. योजनेप्रमाणे सदर मंदिर सन १९५१ मध्ये बांधून तयार झाले. मंदिराचा प्राणप्रतिष्ठा समारंभ ठरत असल्याच्या काळात हे मंदिर हरिजनांना खुले होणार म्हणून ब्रह्मवृंदानी त्यावर बहिष्कार टाकला. तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांना ही समस्या कळली. तेव्हा त्यांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींशी संपर्क साधून प्राणप्रतिष्ठा उत्सवाचे पौरोहित्य करण्याची विनंती केली. ती मान्य करून तर्कतीर्थ नि स्वामी केवलानंद सरस्वती यांनी त्याचे पौरोहित्य स्वीकारले ते केवळ सदरचे मंदिर हरिजनांना खुले होणार म्हणून. इकडे वाईतल्या ब्रह्मवृंदांनी तर्कतीर्थांना बहिष्कृत घोषित केले. आपल्या पुरोगामी विचार, व्यवहार कृतीपोटी तर्कतीर्थांवर अनेकदा बहिष्कार, अवमान सहन करण्याचे प्रसंग उद्भवले, पण तर्कतीर्थ आपल्या प्रागतिक विचारांपासून तसूभरही ढळले नाहीत. तर्कतीर्थांचे हे मोठेपण ऐतिहासिक खरे. पण इतिहास, साहित्य, समीक्षा, मीमांसा इ. क्षेत्रांतील विद्वानांनी तर्कतीर्थांच्या या कार्य व कृतीकडे कानाडोळा केल्याचे लक्षात येते. आज सात दशकांनंतर या देशात परत जात, धर्माची कट्टरता दृढमूल होत असतानाच्या काळात तर्कतीर्थांची कृती ही काळापुढे असणारी होती, हे लक्षात येते. हा माणूस सनातनी धर्म पंडित राहिला नाही, कारण त्याने इतिहास, पुराण, धर्म, जातिभेद इ. ना नव्या काळात, नव्या संदर्भात वाचून, नवा अर्थ प्रदान केला म्हणून.

### रॉयवादी तर्कतीर्थ

मानवेंद्र रॉय यांनी १९३९ मध्ये काँग्रेस पक्षाशी मतभेद होऊन 'रॅडिकल डेमॉक्रेटिक

पार्टी'ची स्थापना केली. तत्पूर्वी त्यांचे कम्युनिस्ट आंतरराष्ट्रीय पक्षाशी मतभेद होऊन ते १९३० ला भारतात परतले होते. चीन, जपान, रशिया, अमेरिका, जर्मनी, इंडोनेशिया, फिलिपाईन्स इ. देशांतील क्रांतिकार्याचा त्यांना अनुभव होता. मुळात ते विदेशात गेले होते ते भारतात क्रांती करण्यासाठी जनमत व रसद मिळवण्यासाठी. फैजपूर येथे भरलेल्या काँग्रेसच्या राष्ट्रीय वार्षिक अधिवेशनातील मानवेंद्र रॉय यांच्या भाषणाने तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना आकर्षित केले. सन १९३०-३१ च्या तुरुंगवास काळात त्यांनी केलेला मार्क्सवादाचा अभ्यास त्याची खरी पार्श्वभूमी होती.

गांधीवाद, काँग्रेस सोडून रॉय यांच्या पक्षात येणे ही काही एका रात्रीत घडलेली घटना नव्हती. स्वातंत्र्य चळवळीत क्रांतिकाऱ्यांचा सहवास व मुळात पुरोगामी विचाराकडे असलेली ओढ नि आकर्षण यांमुळे ते रॅडिकल डेमॉक्रॅटिक पक्षाचे सक्रिय कार्यकर्ते झाले. पुढे महाराष्ट्राचे या पक्षाचे सरचिटणीस झाले. हा पक्ष रुजावा म्हणून त्यांनी महाराष्ट्रभर व्याख्यान दौरे, जनता समित्यांची स्थापना, मोर्चे, परिषदा, शिबिरे इ. सर्व प्रकारचे संघटन कार्य करून मोठा विरोध, उपेक्षा, अपमान सहन करत केलेले कार्य तर्कशुद्ध व्यवहार व कृती होती. राजकीय क्षेत्रातील रॉय यांची तर्कशुद्ध विधायकता तर्कतीर्थांच्या हृदयाला भिडलेली होती. त्यांचा सामाजिक दृष्टिकोन तर्कतीर्थांना विचारप्रवर्तक वाटला. अंधश्रद्धेविरुद्धचा मानवेंद्र रॉय यांचा विवेकवादी दृष्टिकोन त्यांना मानवी जीवनास कलाटणी देणारा वाटला. मानवी एकतेच्या सत्याने तर्कतीर्थ आकर्षित होऊन समर्पित झाले होते. पण भारतीय जनमानस अशा प्रकारच्या मूलभूत परिवर्तनास तयार नसल्याची जाणीव होऊन सन १९४८ ला रॅडिकल डेमॉक्रॅटिक पक्ष विसर्जित करण्यासाठी कलकत्त्याला बोलविलेल्या राष्ट्रीय अधिवेशनाचे अध्यक्षपद तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींना बहाल करून त्यांच्या पक्षनिष्ठ कार्याचा एका अर्थी सन्मानच होता. त्यातील अध्यक्षीय भाषणात तर्कतीर्थांनी मांडलेला 'नवमानवतावाद', त्यांचे नवे तत्त्वज्ञानच होते.

## भारतीय राज्यघटनेचे संस्कृत भाषांतरकार

घटनेचा मसुदा सलग दोन वर्षे मोठ्या मेहनतीने, कलमवार चर्चा करून बहुमताने तयार केला. त्या वेळी घटनेच्या सहाव्या परिशिष्टानुसार, १४ भाषांना राज्यभाषा म्हणून मान्यता देण्यात आली होती. मान्य घटनेतील तरतुदीनुसार या चौदा भाषांत घटनेचे प्रारूप भाषांतरित करणे अनिवार्य होते. घटनेच्या इंग्रजी व हिंदी प्रती प्रथमतः तयार करण्यात आल्या. कारण त्या भारतीय संघराज्याच्या अधिकृत राज्यभाषा म्हणून स्वीकारण्यात आल्या होत्या. भारतीय राज्यघटनेच्या आठव्या परिशिष्टात अंतर्भूत १४ मान्य राज्यभाषांपैकी घटनेचे भाषांतर संस्कृतमध्ये करणे अनिवार्य होते. कारण ती आठव्या परिशिष्टातील मान्य १४ भाषांपैकी एक होती. (आज ही भाषासंख्या २२ झाली आहे.)

संविधान समितीने घटनेच्या मसुद्यांचे राज्यभाषांमध्ये भाषांतर करण्याचा निर्णय

घेतल्यानंतर लोकसभा सभापतींनी त्यांच्या मान्यतेने घटनेच्या संस्कृत भाषांतरासाठी समिती नियुक्त केली. त्या समितीचे अध्यक्ष भारतरत्न पां. वा. काणे होते तर प्रमुख भाषांतरकार व समिती निमंत्रक म्हणून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची नियुक्ती करण्यात आली होती. सहभाषांतरकार होते डॉ. मंगलदेव शास्त्री, अन्य सदस्यांत सर्वश्री डॉ. सुनीतीकुमार चतर्जी, के. बालसुब्रम्हण्यम् अय्यर, महामहोपाध्याय गिरीधर शर्मा चतुर्वेदी, डॉ. बाबूराम सक्सेना, पंडित राहुल सांकृत्यायन, डॉ. रघुवीर, श्री. मुनिजिनविजय, डॉ. कुन्हनराजा यांचा समावेश होता. ही सर्व मंडळी भाषा, विज्ञान, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, साहित्य, संस्कृत विधी (कायदा) इ. विद्याशाखांतील आंतर्राष्ट्रीय व राष्ट्रीय मान्यताप्राप्त विद्वान होते.

घटनेचे योजनेनुसार, संस्कृत भाषांतर करताना मूळ अडसर होत तो संस्कृत कालखंडानंतर तयार झालेल्या शब्दांना प्रतिशब्द देण्याचा व प्रतिशब्द वैधानिक असण्याचा. यामुळे घटनेचे हिंदी भाषांतर आधारभूत ठरवून भाषांतर करण्याचे धोरण अंगीकारण्यात आले. तरी काही शब्द विशेषत: (इंग्रजी, उर्दू) त्यांना संस्कृत, हिंदीतील प्रचलित पर्यायी शब्द स्वीकारण्यात आले. उदाहरणार्थ शर्त, हक, फायदा, दावा, नौकरी. भाषांतर लोकाभिमुख व्हावे म्हणून व्याकरणास मुरड घालून वयस्क, वृत्तिक, आंतर्राष्ट्रीयसारख्या शब्दांना मान्यता देण्यात आली.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी घटनेच्या कलम १ ते २६२ चे आणि संविधान दुरुस्ती कलमांचे भाषांतर केले तर मंगलदेव शास्त्री यांनी कलम २६४ ते ३९५ चे भाषांतर केले. घटनादुरुस्ती भाषांतर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी केले. भाषांतरानंतर सुमारे २२ दिवस बसून भाषांतराचे कलमवार वाचन करून दुरुस्तीसह अंतिम मसुदा लोकसभा सभापतींना सादर करण्यात आला. लोकसभेने तो मंजूर केल्यावर संस्कृत घटना अस्तित्वात आली (अधिकृत झाली). संस्कृत घटनेच्या भाषांतराची पहिली आवृत्ती प्राज्ञपाठशाळा मुद्रणालय, वाई येथे सन १९५२ ला मुद्रित करण्यात आली. तेव्हा तिची किंमत २ रुपये (३ शिलिंग) होती. हे मुद्रण तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या देखरेखीखाली तयार झाले. त्याचे मुद्रितशोधन कार्य स्वतः तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी केले होते. ही मुद्रितशोधित प्रत आजही प्राज्ञपाठशाळा, वाई यांचेकडे सुरक्षित आहे. त्यानंतर झालेल्या वेळोवेळीच्या घटना दुरुस्तीचे संस्कृत भाषांतर करत संस्कृत घटना अद्ययावत करून प्रकाशित करण्याचा प्रघात लोकसभा सचिवालयाने ठेवला असून लोकसभा ग्रंथालयात तो जिज्ञासू वाचकांना वाचण्यास उपलब्ध असतो. शिवाय ही प्रत नागरिक विकतही घेऊ शकतात. सुधारित प्रतीत घटनेतील महत्त्वाच्या संस्कृत शब्दांच्या इंग्रजी प्रतिशब्दांची सूची व घटना दुरुस्ती भाषांतरे अंतर्भूत आहेत.

## तर्कतीर्थः संयुक्त महाराष्ट्र लढ्यातील काँग्रेसी

भारतीय राज्यघटनेच्या संस्कृत भाषांतराचे कार्य सुरू होण्यापूर्वीच रॅडिकल डेमॉक्रॅटिक

पार्टी विसर्जनानंतर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यापुढे राजकीय दिशा व मार्ग ठरविण्याच्या प्रश्नाने काहूर माजविले होते. ते ज्या सातारा जिल्यातील वाईत प्राज्ञ-पाठशाळा, धर्मकोश, मीमांसाकोश, लेखन इ. कार्य करीत, त्या जिल्ह्यात काँग्रेस सक्रिय होती व तेथील अनेक कार्यकर्ते, नेते त्यांचे अनेक वर्षांचे राजकीय सहयात्री होते. विशेषतः यशवंतराव चव्हाण आणि किसन वीर यांच्याशी त्यांचे सख्य होते. राजकीय मार्ग भिन्न असले तरी समाजवादी समाजरचना, विचार, स्नेह नि सहकार्याचा समान धागा होता. महात्मा गांधींचे अनेक वर्षांचे साहचर्य आपण बुद्धिवादाच्या जोरावर नाकारल्याचे शल्यही तर्कतीर्थांच्या मनात होते. विचार आणि भावना यांच्या द्वंद्वात विचाराची सरशी झाली होती, पण मनुष्य संबंधात अंतर नव्हते. बुद्धिवाद व आध्यात्मिक अनुभवांचे अंतर्द्वंद्व हा तर्कतीर्थांचा स्थायीभाव दिसून येतो. या सर्व परिस्थितीत स्वगृही परतणे योग्य वाटून त्यांनी सन १९५० मध्ये पुनःश्च काँग्रेसमध्ये प्रवेश केला. सन १९५२ साली तर्कतीर्थांना सातारा जिल्हा काँग्रेस सहकाऱ्यांनी महाराष्ट्र प्रांतिकचे सदस्य म्हणून निवडून दिले.

यशवंतराव चव्हाण सन १९५५-५६ च्या राज्य पुनर्रचना आंदोलनात काँग्रेसचे नेते म्हणून उदयाला आले नि महाराष्ट्रात 'चव्हाण पर्व' सुरू झाले. त्याची परिणती म्हणून १ नोव्हेंबर, १९५६ ला यशवंतराव चव्हाण द्विभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झाले, पण त्यांना सतत संयुक्त महाराष्ट्र चळवळीला तोंड द्यावे लागले. त्यांच्या बरोबर तर्कतीर्थांनाही समर्थक म्हणून फार मोठ्या टीकेस व मानहानीस सामोरे जावे लागले, पण त्यांनी आपली काँग्रेस निष्ठा अविचल ठेवली. मराठीसाठी स्वतंत्र राज्य करणे आवश्यक असल्याचे यशवंतराव चव्हाण यांनी पंडित नेहरूंना पटवून दिले. त्यामुळे स्वतंत्र महाराष्ट्र राज्याचे (१ मे १९६०) पहिले मुख्यमंत्री होण्याचा बहुमान त्यांना मिळणे ही क्रमप्राप्त गोष्ट होती. प्रतिकूल काळात किसन वीर आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी चव्हाण नेतृत्वावर जो खंबीर विश्वास दाखवला, त्यामुळे ते द्विभाषिक मुख्यमंत्री म्हणून जसे यशस्वी ठरले तसेच स्वतंत्र महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणूनपण. तर्कतीर्थांच्या बुद्धिवादी, प्रबोधन, व्याख्यान, लेखनाचा लाभ यशवंतराव चव्हाण यांना मार्गदर्शनाच्या रूपात सतत मिळत गेल्याने त्यांनी कधी कच खाल्ली नाही.

## महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची अध्यक्षीय कारकिर्द

१ मे, १९६० रोजी स्वतंत्र महाराष्ट्र राज्य स्थापन झाले, ते भाषावार प्रांत रचनेच्या धोरणाचा भाग म्हणून. मराठी भाषेसाठी हे राज्य स्थापन झालेले असल्याने त्याची स्थापना होताच पहिले मुख्यमंत्री नामदार यशवंतराव चव्हाण यांनी दोन निर्णय जाहीर केले- १. मराठी भाषा संचालनालयाची निर्मिती २. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना. पैकी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या अध्यक्षपदी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची नियुक्ती करण्यात आली. सदस्य व सल्लागार ठरविण्यात आले

आणि १९ नोव्हेंबर १९६० रोजी स्थापन करण्यात आलेल्या या मंडळाचे विधिवत उद्‌घाटन २२ डिसेंबर १९६० रोजी नागपूर येथे संपन्न झाले.

तर्कतीर्थांनी या मंडळाच्या कामाचे नियोजन करून प्रत्यक्ष कार्य सुरू केले. त्यात दोन महत्त्वाच्या गोष्टींचा अंतर्भाव होता- १) जगातील अभिजात ग्रंथांची भाषांतरे करून घेऊन ते ग्रंथ मराठीत प्रकाशित करणे २) मराठी विश्वकोशाची निर्मिती. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी सन १९ नोव्हेंबर, १९६० ते ३० नोव्हेंबर, १९८० या दोन दशकांच्या काळासाठी या मंडळाचे अध्यक्ष राहिले. या काळात त्यांनी इतिहास, विज्ञान, तत्त्वज्ञान, संगीत, क्रीडा, सौंदर्यशास्त्र, कला, निसर्ग, उद्योग, अर्थशास्त्र, साहित्य, पुराण, धर्म, भाषा, लिपी, यंत्रे, स्त्रीजीवन, दलित-आदिवासी, समग्र वाङ्मयविषयक जे शेकडो ग्रंथ लिहून घेऊन प्रकाशित केले, ते केवळ अतुलनीय! महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती प्रकल्पाचे ते सन १९६० ते १९९४ (मृत्यूपर्यंत) अध्यक्ष होते. त्यांच्या कार्यकाळात मराठी विश्वकोशाचे १४ खंड प्रकाशित झालेले असले तरी आजवर प्रकाशित मूळ २० खंड व परिभाषा नि सूची खंड धरून तो प्रकल्प पूर्णत्वास गेला, त्यात सिंहाचा वाटा तर्कतीर्थांचाच हे कोण नाकारेल? महाराष्ट्र राज्याच्या ज्ञान आणि संस्कृतीचे सर्जक व संवर्धक म्हणून तर्कतीर्थांनी केलेले कार्य केवळ वादातीत! प्रकाशित २१ खंडांची पृष्ठ संख्या २२,३८५ पृष्ठे असून त्यात सुमारे ३ लाख निर्देशित नोंदी आहेत. हा केवळ मराठीचा ज्ञानविस्तार नसून ज्ञानविश्वातील मराठीची प्रगल्भता सिद्ध करणारी गोष्ट होय. भारतीय भाषांत असे कार्य अपवादस्वरूप असावे.

## टीका, अवमानातून उजळलेले व्यक्तिमत्त्व

'जया अंगी मोठेपण, तया यातना कठीण' हे सर्वश्रुत आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या व्यक्तिमत्त्वात नित्य नूतनतेचा अंगीकार दिसून येतो. त्यांनी आपल्या जीवन प्रवासात परस्परभिन्न मतप्रवाहांचा स्वीकार केला. याची कसोटी होती, अर्थातच स्वतःचा विवेक. ''सत्य असत्याशी मन केले ग्वाही। नाही मानियले बहुमता।'' ही प्रत्येक बुद्धिवाद्याची जीवन नि निर्णय प्रक्रिया असते. हे प्रवाहाविरुद्ध पोहणं असतं. परिणामी अशी माणसं टीकेचे धनी होणं स्वाभाविक असतं. तर्कतीर्थांच्या जीवनात वाद, टीका, बहिष्कार, अगदी चपलांची माळ गळयात घालण्याचेही प्रसंग आले. मारझोड, दगडफेकीचे प्रसंग, सभा, परिषदांत झाले, तरी तर्कतीर्थ अशा प्रसंगी विचलित न होता स्वतःची मते मांडत राहिले. हे धाडस 'Courage of Conviction' असल्याशिवाय शक्य होत नाही. दक्षिण आफ्रिका, इंग्लंडमध्ये महात्मा गांधींची कमी का उपेक्षा, अवमान झाले?

सन १९४६ साली झालेल्या निवडणुकांच्या काळी तर्कतीर्थ रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टीत होते. या पक्षाने काँग्रेस विरुद्ध उमेदवार उभे केले होते. साताऱ्यात म्हणजे स्वगृही दगडफेक, शेणाचा मारा त्यांनी सहन केला. ऋजुतेबद्दल सर्वत्र प्रसिद्ध असलेल्या साने गुरुजींनी या वेळच्या वाईतील एका सभेत 'हा. कसला आलाय नवमानवतावाद? आणि त्याचे प्रणेते

कोण? तर तर्कतीर्थ! हे तर तर्कटतीर्थ नव्हे, मर्कटतीर्थ' म्हणून यांचा उपहास केला. या अनपेक्षित टीकेचा प्रतिवाद तर्कतीर्थांनी केला. पण काँग्रेसच्या लोकप्रियतेपुढे तो टिकू शकला नाही हे खरे.

त्या पूर्वीही वाईत असे प्रसंग आलेच. सन १९३३ मध्ये तर्कतीर्थांनी महात्मा गांधींचे सर्वांत लहान चिरंजीव देवदास नि राजाजींची कन्या लक्ष्मी यांच्या विवाहाचे पौरोहित्य केल्याचे आपण या पूर्वी इथेच वाचले आहे. हा विवाह ब्राह्मण-वैश्य असा आंतरजातीय विवाह होता, त्या काळात प्रायश्चित्त करवून घेऊन तत्कालीन संमत शास्त्रानुसार केलेल्या विवाहाचा निषेध वाईत तत्कालीन ब्रह्मवृंदानी केला. संकेश्वरच्या शंकराचार्यांचा त्या काळात वाईत संचार होता. ढोल्या गणपती घाटावर निषेध सभा झाली. वाईत सनातनी वृत्तीच्या लोकांचे त्या काळात बहुमत असल्याने तीन-चार हजार श्रोते उपस्थित होते. शंकराचार्य म्हणाले, ''लक्ष्मणशास्त्री जे करीत आहेत, त्या पापाची शुद्धीही धर्मशास्त्राप्रमाणे होत नाही, त्यांना फळे ही भोगावीच लागतील. लक्ष्मणशास्त्र्यांना नरकवास भोगवा लागणार आहे.'' प्रत्युत्तर म्हणून तर्कतीर्थांनी 'ज्ञानप्रकाश'मध्ये लिहिलं होतं, "शंकराचार्यांच्या म्हणण्याप्रमाणे मी नरकात जाणार आहे स्वर्गात काहीच काम करायला असत नाही, तिथं नुसतं सुखच उपभोगायचं असतं. म्हणून नरकात सेवा करणं मी पत्करीन. हे शाली पांघरून संन्यासी झालेले, पालखीत बसणारे, रेशमी वस्त्र परिधान करणारे संस्थानिक आहेत. उपभोगाची सर्व साधने त्यांना मिळतात. भगवी वस्त्रे ते खऱ्या अर्थाने ते नेसीत नाहीत, भगवी वस्त्रे चढवितात इतकेच. पालखी चौऱ्या, मुजरे, मोठमोठी उत्पन्ने भोगतात, त्यांना आम्हाला जेथे पाठवणार आहात तेथेच पाठवतात असे शास्त्रात म्हटलेले आहे." विशेष म्हणजे हे महात्मा गांधींच्या वाचनात आले होते. त्यात गांधींनी आपली असहमती दर्शविली होती. तरी तर्कतीर्थ धर्मपंडिताने त्यागाने विरक्ती व संन्यस्तपद आचरायचे असते, या आपल्या विचारावर ठाम राहिले, ही असते वैचारिक प्रतिबद्धता. ती तर्कतीर्थांनी जपली, जोपासली.

तर्कतीर्थांनी आपले पुरोगामीपण जपण्यासाठी कमी सोसलं नाही. वाईतच तर्कतीर्थांच्या या पुरोगामी आचार-विचाराविरोधात, खंडनार्थ एका वसंत व्याख्यानमालेत कुशाभाऊ अभ्यंकर यांनी पुण्याच्या गो. म. जोशींची सलग तीन व्याख्याने योजली होती. चौथ्या दिवशी तर्कतीर्थांचे उत्तरमीमांसा करणारे भाषण खरे खंडन व्याख्यान ठरले. तर्कतीर्थांनी काही केले नाही. गो. म. जोशी यांनी आपल्या व्याख्यानांना आपणाला हवं तेवढं जे अर्धं सांगितलं होतं त्याचा उरलेला भाग सांगितला आणि त्यांचं व्याख्यान खोडून काढून सभा जिंकली.

असंच आचार्य अत्रेंच्या संदर्भातही एकदा तर्कतीर्थांनी केलं. ही गोष्ट बहुधा सन १९६५ च्या हैदराबाद इथे संपन्न झालेल्या अखिल भारतीय साहित्य संमेलनातील. एका परिसंवादात आचार्य अत्रे यांनी महाराष्ट्र शासनाने प्रकाशित केलेल्या व तर्कतीर्थांनी

संपादिलेल्या पदनाम'कोश'वर टीका केली 'बदनामकोश' म्हणून. यातले शब्द कुणाला, काय ‘घंटा’ कळतात काय? म्हणून अंगविक्षेपासह टीका केली. तर्कतीर्थ प्रतिवादासाठी सामोरे गेले. म्हणाले, ‘‘माझ्याकडे शब्दांची शस्त्रे नाहीत. आहेत शास्त्रे. मानसशास्त्रातला एक प्रयोग आहे. त्यात घंटा आहे. ती फक्त कुत्र्यास कळते, माणसास नाही. माणसास भाषा आई शिकवते. ती त्याची मातृभाषा. इतर भाषा माणसाचा वकुब, वृत्ती सिद्ध करणारी.’’ सभा तर्कतीर्थांनी जिंकली. परिसंवादानंतर आचार्य अत्रे तर्कतीर्थांच्या जवळ आले. जेवणाची वेळ झालेली, जेवायला कुठे जाणार म्हणून विचारले. तर्कतीर्थांनी यजमानाचं नाव सांगितलं. म्हणाले, ‘‘त्यांच्याकडे काय पाला खायला जाणार? चला माझ्याबरोबर. राजकारण नि वृत्तपत्रे, साहित्यादी क्षेत्रात मतभेद असतात, मनभेद नाही.’’ संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात हे दोन्ही मित्र वेगवेगळया व्यासपीठांवर असत, पण वाईतलं आचार्य अत्रेंचं जेवण हे तर्कतीर्थांकडेच असायचं. या ओळी मी लिहितोय खरा, पण संस्कृतिक क्षेत्रात आपण किती लांब गेलो आहोत, याचा विषाद वाटल्यावाचून राहात नाही.

**कोशकर्ते तर्कतीर्थ**

पदनाम कोशावरून नि मराठी विश्वकोशावरून आठवलं. तर्कतीर्थांचे गुरू स्वामी केवलानंद सरस्वतींच्या काळात त्यांनी ‘मीमांसा कोश’ निर्मिण्यास आरंभ केला होता. हे कोशकार्य तर्कतीर्थांनी पूर्णत्वास नेले. त्यानंतर त्यांनी ‘धर्म कोश’ निर्मितीचे कार्य हाती घेतले. सुमारे २५ खंडांच्या योजनेपैकी तर्कतीर्थांच्या जीवनकाळात १९ खंड (भाग) प्रकाशित झाले, ज्यांचे संपादक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी होते. सन १९५० ते १९८४ या काळात हे खंड प्रकाशित झालेत. उर्वरित सुमारे ६ खंड गोविंदशास्त्री केळकर यांच्या संपादकत्वाखाली पूर्ण झाले आहेत. कुमार कोशाची योजना ही त्यांच्या काळात आखली गेली होती. त्याचेही नंतरच्या काळात तीन खंड (भाग) प्रकाशित झाले आहेत. डॉ. विजया वाड यांनी त्यासाठी भरपूर मेहनत घेतली होती. तर्कतीर्थ त्यांना कळायला लागल्यापासून ते मृत्यूपर्यंतच्या (सुमारे सात दशके) काळात येनकेन प्रकारेण कोश निर्मितीशी संलग्न राहिले. कोशवाङ्मय ही त्यांच्या जीवन, कार्य, विचाराची ओळख होऊन बसली होती.

मराठी विश्वकोश प्रकल्प हा पूर्णतः शासकीय अर्थसाहाय्यावर साकारलेली योजना असली तरी त्याच्या संकल्प ते सिद्धीचे श्रेय तर्कतीर्थांनाच द्यावे लागेल. संस्कृतचे ज्ञान, नवशास्त्रांचे भान नि कोश निर्मितीची जाण अशा कौशल्य त्रयींचे अपत्य म्हणून विश्वकोशाकडे पाहावे लागेल. या त्रिगुणांचा संगम तर्कतीर्थांच्या व्यक्तिमत्त्वात होता. तर्कतीर्थांना खरे तर महाराष्ट्रात युरोपासारखी ज्ञानकोश चळवळ उभारायची होती, पण महाराष्ट्र संस्कृतीत अशी परंपरा नसल्याने व ज्ञानाच्या प्रगल्भ नि प्रगत शिस्तीअभावी ही चळवळ उभी राहू शकली नाही. आपला स्थायीभाव जितका रंजकतेत रमतो तितका वैचारिकतेत नाही. मुद्रण पद्धती, कोशाचा आकार, टंक (फाँट) निवड, लेखन पद्धती, वस्तुनिष्ठता, नोंदीचा रचनाबंध, संदर्भ,

चित्रे, नकाशे, आरेखन, आलेख इ. बारीक-सारीक तपशील ठरवणे म्हणजे विश्वकोशाची रचना व लेखन शैली ठरवणे होते. तर्कतीर्थांनी शेकडो विश्वकोशांचा अभ्यास करून मराठी विश्वकोशाचा रचनाबंध ठरवला होता. स्वतः सुमारे दीडशे नोंदी त्यांनी लिहिल्या असल्या तरी आरंभी पंधरा खंडांच्या प्रत्येक नोंदीवर त्यांचा हात फिरला होता. तत्कालीन विद्वान, लेखक, तज्ज्ञ, संपादक, भाषांतरकार इ.ची फौज उभा करणे नि त्यांची मोट बांधणे असे तर्कतीर्थांनी केलेले कार्य त्यांच्या ज्ञाननिष्ठेमुळेच शक्य झाले. बाह्य हस्तक्षेप मुक्त असे विश्वकोश प्रशासन शासकीय असून स्वायत्त राहिले. ही किमया तर्कतीर्थच करू जाणे. 'अन्यांना विश्वकोशाच्या दिवाणखान्यात प्रवेश असे, पण माजघरात जाणे शक्य नसे.' या प्रा. रा. ग. जाधवांच्या सूचक वाक्यात विश्वकोशाच्या सिद्धीचे गमक आहे.

## अनाकलनीय व्यक्तिमत्त्व

सन १९२३ ला 'तर्कतीर्थ' पदवी संपादन केल्यापासून लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे सार्वजनिक जीवन सुरू होते. प्रारंभी धर्मसभांमधून शुद्धी, धर्मांतर, वेद-पुराणांचे प्रागतिक अर्थ अशा अंगांनी त्यांनी धर्मसुधारणा कार्याने आपल्या जीवित कार्याचा आरंभ केला. शेवटच्या श्वासापर्यंत त्यांनी आपलं पुरोगामी जीवन विचार आणि व्यवहारांनी जपलं. उक्ती नि कृतीचं अद्वैत त्यांचं बलस्थान होतं. सन १९२८ पासून ते लिहायला लागले. अंतापर्यंत लिहीत राहिले. भाषण, लेखन, समीक्षा, अभ्यास, संशोधन यांना सीमा नव्हत्या. वेद, पुराण, उपनिषद, इतिहास, तत्त्वज्ञान, विज्ञान, भाषा, साहित्य, संगीत, कला, क्रीडा जीवनाचं असं क्षेत्र की ज्यात त्यांना गती नव्हती. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी चालताबोलता ज्ञानकोश होते. कोणतेही औपचारिक शिक्षण न घेतलेले हे गृहस्थ संस्कृत, मराठी, हिंदी, इंग्रजीत अस्खलित लिहीत, बोलत. हे पाहिले की विश्वास उडून जावा स्वतःवरचा, असा हा अक्षरशः प्रकांड पंडित म्हणून प्रसिद्ध ज्ञानयोगी, तपस्वी. कोणताही विषय द्या, बोलण्यास, लिहिण्यास, वाद करण्यास (घालण्यास नाही!) सदैव तत्पर! माणूस म्हणून चैतन्यशील. नवं शिकण्या, वाचण्याचा अतृप्त ध्यास. वैश्विक भान, परंपरेला आधुनिकतेचा साज चढवण्याचा छंद. कुणी याला वाया गेलेला विद्वान म्हटलं. कुणी त्यांची वेषांतरं, मतांतरं, दिशांतरं मोजली. हा मात्र युगांतर, मन्वंतरामागे धावणारा प्राज्ञ पुरुष ठरला अंतिमत:. तसा मूलतः बुद्धिवादी वेदांती, पण शब्द प्रमाण न राहाता बुद्धिप्रामाण्य तर्कावर पेलत राहिला. भल्याभल्यांना बुद्धिबळाच्या पटावर चितपट करणारा हा खेळाडू स्वत: शेवटपर्यंत अजेय योद्ध्यासारखा तळपत राहिला. अस्ताचलाला न गेलेला ज्ञानभास्कर हा! आधुनिक महाराष्ट्रामध्ये ज्ञान संस्कृती यानं रुजवली, असं म्हटलं तर ते अतिशयोक्त ठरू नये. शास्त्रांना शस्त्र बनवून अहिंसक द्वंद्व निर्माण करणारा नि उठलेलं एखादं वादळ आपल्या चाणक्यीय कौशल्याने शमवणारा, शांत करणारा समाज हितचिंतक. ही त्यांची शहाणी स्वतःची मिळकतं. संघर्ष, संघटन, मीमांसा, समीक्षा, चिकित्सा, वाचन, विचार, चिंतनातून पाझरलेली. एकाच

वेळी समाजकारण, राजकारण, संस्कृतिकारण, अर्थकारण, शिक्षणकारण समानशीलपणे समजणारा नि प्रत्येक प्रश्न, संकट, समस्यांत मार्ग काढणारा संकटमोचक. घटनेचे भाषांतर नि धर्ममीमांसा एकाच वेळी स्वतंत्रपणे करणारा. स्वतः मुलाच्या लग्नात लिहीत बसणारा हा गृहस्थ! त्याला गृहस्थ समजावे की संन्यासी कळत नाही. अजातशत्रू व्यक्तिमत्त्व, ऋषितुल्य साधना, भाषा, साहित्य, तत्त्वज्ञान या त्रयींत सदैव रममाण तपस्वी! स्वातंत्र्य, समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता, समाजवाद, विज्ञाननिष्ठा तर्कतीर्थांच्या लेखी बोलघेवडी मूल्ये न राहाता तो आचारधर्म होता. त्यांची ओढ सामान्य-असामान्य सर्वांना समान असायची. असा हा अक्षरशः प्रकांड पंडित असलेला गृहस्थ, पण ते एक अनाकलनीय कोडं होते खरं!

**(जडणघडण मासिक, पुणे: दिवाळी अंक २०२०)**

ooo

## ५०.

# माहीत नसलेले तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी


## डॉ. सुनीलकुमार लवटे


तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या संदर्भात 'माहीत नसलेले तर्कतीर्थ'सारख्या विषयावर वाईत येऊन बोलणे हे धारिष्ट्याचं कार्य आहे, शिवाय तो उद्धटपणाही ठरेल. तरी या विषयावर भाषण करायचे मी ठरवले, ते केवळ त्यांच्या साहित्याचा आस्वादक वाचक, त्यांच्या कार्याचा पाईक आणि पुरोगामी विचाराच्या पालखीचा भोई म्हणूनच. तर्कतीर्थांच्या समग्र वाङ्मयाचं संपादन करताना जे तर्कतीर्थ मला समजले, ते तुम्हांस सांगणे इतकाच हेतू हा विषय घेण्यामागे आहे. मागे केव्हातरी तर्कतीर्थांबद्दल वाचत असताना लक्षात आलं की, तर्कतीर्थ समग्र वाचायचे तर सोय नाही. त्यांचे अधिकांश साहित्य विखुरलेले आहे. तीच गोष्ट त्यांच्या सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक कार्याबद्दलही. त्यांच्यावर चरित्रात्मक अनेक ग्रंथ उपलब्ध असले तरी त्यांच्या कार्यांचे सर्वकष मूल्यमापन अद्याप झालेले नाही, अशी माझी विनम्र धारणा आहे.

तर्कतीर्थांनी आपलं लेखन, वाचन, अध्ययन प्रारंभी संस्कृतमधूनच केलं, कारण त्यांना संस्कृत पंडित व्हायचं होतं. त्यांचं मराठीत विपुल साहित्य उपलब्ध आहे. काही हिंदी, इंग्रजीत पण आहे, मात्र त्याचं स्वरूप भाषांतरित आहे. प्रकाशित अधिकांश साहित्य भाषण, लेखरूपात आहे. विश्वकोशातील नोंदींचा संग्रह नाही. शिवाय त्याची मीमांसाही झालेली नाही. त्यांनी आपल्या हयातीत ज्या मुलाखती दिल्या, त्यांचे समग्रतः संकलन न झाल्याने अभ्यास होऊ शकलेला नाही. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी अनेक ग्रंथांना प्रस्तावना लिहिलेल्या आहेत. त्यांनी अनेक ग्रंथांच्या समीक्षा, परीक्षणं केली आहेत. त्यांनी विपुल व्यक्तिलेख लिहिलेले आहेत. तर्कतीर्थ यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात 'प्रमोद', 'संग्राम', 'चित्रा', 'लोकमान्य' यांसारख्या दैनिक साप्ताहिकांमधून भरपूर लिहिलं आहे. त्यात स्तंभ, सदरे, लेखमालांचा समावेश आहे. तर्कतीर्थांचा मनुष्यसंग्रह मोठा होता, तसा संपर्क, संवादही सर्वदूर होता. त्या काळात याचे साधन पत्रव्यवहार होते. त्यांची पत्रे हा

तत्कालीन इतिहासावर प्रकाशझोत ठरण्याची शक्यता आहे. तर्कतीर्थांनी केलेली संस्कृत हस्तलिखितांची सूची, धर्मकोशांचे संपादन, कुमारकोशाची योजना, मीमांसाकोशकार्य या सर्वांतून 'कोशकते तर्कतीर्थ' हा त्यांच्या कार्य-कर्तृत्वाचा नवा अध्याय ठरेल. हे सर्व माहीत नसलेलेच तर्कतीर्थ नाहीत का?

## लक्ष्मणशास्त्री जोशींचं 'तर्कतीर्थ' बनणं

आधुनिक महाराष्ट्रातील थोर विचारवंत, राष्ट्रीय संस्कृत पंडित, मराठी विश्वकोशाचे संस्थापक, भारतीय राज्यघटनेचे संस्कृत भाषांतरकार, शास्त्र-पुराणांतील कथनांना आधुनिक पुरोगामित्वाची जोड व दृष्टी देणारे धर्मसुधारक म्हणून लक्ष्मणशास्त्री जोशी यांना ओळखले जाते. संस्कृत साहित्याचा अभ्यास करण्यासाठी ते पिंपळनेर (जि. धुळे) येथून वाई (जि. सातारा) येथील नारायणशास्त्री मराठे यांच्या प्राज्ञपाठशाळेत वयाच्या चौदाव्या वर्षी सन १९१४ मध्ये दाखल झाले. धर्मसुधारणा व राष्ट्रीय भावना निर्माण करणारे विद्याकेंद्र म्हणून प्राज्ञपाठशाळा त्या वेळी ओळखली जायची. प्राथमिक शिक्षण पिंपळनेरच्या प्राथमिक शाळेत झालं, तिथं ते लिहायला, वाचायला शिकले. पिंपळनेरच्या त्यांच्या घरासमोर बाबासाहेब देशमुखांचा वाडा होता. ते धर्मानुरागी गृहस्थ होते. 'एकनाथी भागवत', 'तुकारामांचे अभंग', 'कबीर भजने' यांचे वाचन, गायन, पारायण चालायचे. वाड्यात दर मंगळवारी प्रसिद्ध होणारे साप्ताहिक केसरी गुरुवारी यायचे. त्याचे नियमित, सार्वजनिक वाचन होत राहायचे. या सर्वांतून बाल लक्ष्मणावर धर्म नि राष्ट्रीय भावनेचे संस्कार होत गेले. १९०८ ला राजद्रोहाच्या खटल्यात लोकमान्य टिळकांची रवानगी मंडालेच्या तुरुंगात झाली. याचा विलक्षण प्रभाव अन्य जनांबरोबर बाल लक्ष्मणावर पडल्याचे त्यांनी आपल्या आठवणीत नमूद केले आहे![१]

प्राज्ञपाठशाळेत येऊन प्रथम ते व्युत्पत्ती शिकले. 'शास्त्रसेवामधारय' म्हणत व्याकरण, न्याय, वेदांत शिकले. न्याय मुक्तावलीच्या अभ्यासातून तर्कशास्त्र, न्याय वैशेषिक शिकले. पुढे 'वेदान्तसार', 'पञ्चदशी', 'लघुसिद्धान्तकौमुदी', 'तर्कदीपिका'चे अध्ययन झाले. त्या बरोबरीने इंग्रजी, इतिहास, भूगोल, भौतिकशास्त्र व्याकरण, गणितही त्यांना शिकवले गेले. प्राज्ञपाठशाळा केवळ संस्कृत पाठशाळा नव्हती, तर राष्ट्रीय शिक्षण देणारी माध्यमिक शाळापण होती. तिच्यात आधुनिक शिक्षणही देण्यात येत असे.[२] ही शाळा पूर्वी जरी मठ असली, तरी तिला आता आश्रमाचं रूप आलेलं होतं.

आश्रमाचा दिनक्रम म्हणजे परिपाठ असायचा प्रातःकाळी ५ वाजता उठणे, नंतर सामूहिक प्रार्थना, स्नान, संध्या, सूर्यनमस्कार, योगासने होत. अध्यापनात चमत्कार, अवतार, कर्मकांडापेक्षा विवेकवाद, बुद्धिवाद, राष्ट्रवादावर भर असायचा. ब्रह्मचर्य विद्याध्ययनाची अट होती. पूर्वावलोकन, पाठ, चिंतनिका असा घडणीचा क्रम असे. परीक्षा व्हायच्या. ‘‘प्रत्येक सोमवारी सुट्टी असे. सुट्टीत सकाळपासून दुपारपर्यंत अंगमेहनतीची कामे विद्यार्थी

व शिक्षक करीत. त्यात सारवणे, शौचकूप साफ करणे इत्यादी कामे व्हायची. सायंकाळी ४ ते ६ पर्यंत व्याकरण व पुराण प्रवचने चालत. संध्याकाळचे सुमारास दोन तास मंत्रपुष्प व शास्त्रचर्चा चाले. ही शास्त्रचर्चा संस्कृतमध्ये होई. मी न्याय वैशेषिक दर्शनाचे अध्ययन करू शकलो. तेव्हा म्हणजे १९२३ साली या शास्त्रचर्चेत भाग घेऊ शकलो. व्याख्यानांमध्ये मला क्रमांक गुरुवर्यांनी बराच काळ शेवटून पहिला दिला.''[३] ''परंतु शास्त्रचर्चेत वरून पहिला दिला.'' अशांतून एक बटु विद्याभ्यासी पंडित बनला.

अशा शास्त्रचर्चांतील प्रावीण्यापूर्वी लक्ष्मण जोशी यांचा परिचय सन १९१६ ला विनोबा भावे यांच्याशी झाला. ते प्राज्ञपाठशाळेत शांकरभाष्य शिकण्यासाठी बडोद्याहून आले होते. सुमारे दहा एक महिने ते वाईच्या प्राज्ञपाठशाळेत होते. विनोबांचा वाचन, अध्ययनाचा व्यासंग मोठा होता. गीर्वाणवाणी (संस्कृत) वर त्यांचे प्रभुत्व होते. त्यांचे संस्कृत पठन-पाठन ऐकून साक्षात् स्वामी केवलानंद सरस्वती (नारायणशास्त्री मराठे) जे लक्ष्मण जोशींचे गुरू होते, एकदा म्हणाले होते की, 'गीर्वाणवाणीचे इतके सुंदर उच्चारण ऐकले म्हणजे ही देववाणी आहे. असे प्रत्ययास येते; आद्य शंकराचार्यांची ही वाणी आहे, अशी ओळख पटते.'[४] विनोबा भावे यांचे वक्तृत्व लक्ष्मण जोशी यांच्यापेक्षा तेव्हा सरस होते. त्यासंबंधीचा प्रसंग मूळातूनच वाचला पाहिजे.[५] शास्त्रार्थ स्पर्धा आणि अशा वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद, खंडनमंडन इत्यादींतून लक्ष्मण जोशी या तरुण विद्यार्थ्याचे वक्तृत्व संस्कारित होत फुलत गेले. पुढे इंग्रजी शिकायचे म्हणून लक्ष्मण जोशी यांनी आपले सहाध्यायी दामोदरशास्त्री कोनकर व धुंडिराज देव यांचेसह वाईहून गुरुजींना न सांगता पलायन केले. यामागे अमेरिकेत जाऊन आधुनिक शिक्षण घेण्याचे स्वप्न होते. पण ते अपूर्णच राहिले.[६]

नंतर लक्ष्मण जोशी यांनी पदवी शिक्षण घ्यायचे म्हणून सन १९१८ ला वाराणसी (काशी)ला प्रस्थान ठेवले. स्वामी केवलानंद सरस्वती यांचे शिष्य योगानंद यांचे मठात राहून ते तिथे नसल्याने लक्ष्मण जोशी यांनी मठाजवळील लक्ष्मणशास्त्री द्रवीड यांच्या पाठशाळेत पदवी शिक्षणाचा अभ्यास पूर्ण केला. या पाठशाळेत लक्ष्मणशास्त्री द्रवीड, त्यांचे चिरंजीव राजेश्वरशास्त्री, नित्यानंद पर्वतीयशास्त्री प्रभृतींकडून शिक्षण पूर्ण केले. नित्यानंद पर्वतीयशास्त्री 'चतुःशास्त्री' म्हणून विख्यात होते. ते व्याकरण, न्याय, मीमांसा आणि अलंकारशास्त्र या चार विषयांचे अधिकारी होते. प्राज्ञपाठशाळा, वाई येथील गत चार-पाच वर्षांचे (१९१४-१९) अध्ययन-अध्यापन उत्तम झाल्याने वाराणसीत फारशी अडचण आली नाही. इथेच राजेश्वरशास्त्रींचे गुरू महानैयायिक वामाचरण भट्टाचार्य यांचे सान्निध्य व मार्गदर्शन लाभले. त्या काळी काशीत (वाराणसी) संस्कृत महाविद्यालय होते. पण लक्ष्मण जोशी यांनी त्याऐवजी गुरुकुल शिक्षण पसंत केले. हा प्राज्ञपाठशाळेच्या अनौपचारिक शिक्षणाचा प्रभाव परिणाम होता.

१९१९ ते १९२१ अशी तीन वर्षे काशीत राहून पदवी परीक्षा देण्यासाठी म्हणून रेल्वेने ते

सर्व १९२३ ला कलकत्त्याला निघाले होते. वाटेत गाडी बारडोली स्टेशनवर थांबली होती. स्टेशनवर प्रचंड गर्दी पाहून ते गर्दी कशासाठी झाली, हे पाहण्यासाठी उतरले. तेव्हा कळले की, स्टेशनच्याजवळच असलेल्या बारडोलीच्या स्वराज्य आश्रमात महात्मा गांधी असून चौरीचौरा (जि. गोरखपूर, उत्तर प्रदेश) येथील आंदोलनाला हिंसाचाराचे गालबोट लागले म्हणून महात्मा गांधींनी उपोषण सुरू केले होते. २ फेब्रुवारी १९२२ ला चौरीचौरा येथे झालेल्या निदर्शनात पोलिसांनी क्रूर लाठीमार केला. त्याचा निषेध म्हणून ५ फेब्रुवारीला सुमारे अडीच हजार निदर्शक जमले होते. पोलिसांनी निदर्शक सत्याग्रहींवर गोळीबार केला होता. ३ सत्याग्रही हुतात्मा झाले होते. उग्र झालेल्या निदर्शकांनी पोलीस ठाण्यालाच आग लावली. त्यात २२ पोलीस मृत झाले. संचारबंदी लागू करण्यात आली. गांधीजींनी हिंसेचा विरोध म्हणून ५ दिवस उपोषण सुरू करून नंतर आंदोलन मागे घेतले होते.

तरुण लक्ष्मण जोशी यांची घडण ज्या राष्ट्रीय वृत्तीच्या वातावरणात झाली होती, तिचा प्रभाव इतका प्रखर होता की त्यांनी परीक्षा, प्रवास सोडून महात्मा गांधींच्या आश्रमाचा रस्ता धरला. ते दोन महिने आश्रमात राहिले. १९२० ला महात्मा गांधींनी प्राज्ञपाठशाळेस भेट दिलेली होती. तोही प्रभाव होता. पुढे वर्षानंतर १९२३ मध्ये त्यांनी कलकत्त्याच्या शासकीय संस्कृत महाविद्यालयातून 'तर्कतीर्थ' ही पदवी संपादन केली. त्यानंतर ते प्राज्ञपाठशाळेत विधिवत अध्यापक म्हणून कार्य करू लागले. न्याय, वेदांत हे त्यांचे अध्यापनाचे विषय होते. तेव्हापासून ते 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी' म्हणून ओळखले जाऊ लागले.

### वक्तृत्वाद्वारे धर्मसुधारणेचे कार्य

प्राज्ञपाठशाळा, वाई; योगानंद मठ, काशी येथील अध्ययन, अध्यापन, शास्त्रार्थ संगती, व्याख्याने, चर्चा, वादविवाद, चिंतनिका, व्युत्पत्ती, मीमांसा, पंक्ती लावणे, अर्थसंग्रह, तर्कसंग्रह इ. ज्ञानसाधना व उपक्रमांमधून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे वक्तृत्वकौशल्य दिवसांगणिक विकसित होत गेले. वाचन, चिंतन, मनन इ. प्रक्रियेतून तर्कतीर्थ स्वमत तयार करीत. 'बाबा वाक्यं प्रमाणम्'च्या विरुद्ध 'विद्यावतां भागवते परीक्षा' अंगीकारून त्यांनी स्वतःची अशी प्रतिपादन, चिकित्सा, मीमांसा शैली विकसित केली. त्यामुळे सनातन वा पारंपरिक पंडितांशी वादविवाद ही नित्याचीच गोष्ट होऊन बसली होती.

सन १९२३ ला वाईमध्ये ब्राह्मण परिषदेचे आयोजन करण्यात आलेले होते. परिषदेत ब्राह्मण पोटजातींच्या एकीकरणाचा मुद्दा उपस्थित झाला. मुळात या पोटजाती आख्यायिकांवर आधारित आहेत. तर्कतीर्थांनी परिषदेत आख्यायिकांच्या आधारे पोटजाती करणे वा मानणे आणि त्याआधारे आचारप्रामाण्य सिद्ध करणे चुकीचे असल्याचे प्रतिपादन केले. त्यावर परिषदेत प्रक्षोभ तयार झाला. परिषद उधळायची वेळ आली. स्वामी केवलानंद सरस्वतींनी तर्कतीर्थांचा प्रतिवाद हा धर्मशास्त्रानुसार अर्थवाद असल्याचे स्पष्ट केले. अर्थवाद मानू नये असे धर्मशास्त्रात म्हटलेले आहे. त्यावर एवढा गहजब करण्याचे कारण नाही. या

पहिल्या जाहीर वादविवादामुळे तर्कतीर्थ हे स्वतंत्र विचाराचे शास्त्री असल्याचे सर्वांच्या लक्षात आले. तद्वतच जरी त्यांचे मत स्वीकारार्ह ठरले नाही तरी आपली मते धीटपणे व्यक्त करण्याच्या त्यांच्या बाण्याचा परिषदेवर प्रभाव पडणे स्वाभाविक होते.

सोनगीर हे धुळे जिल्ह्यातील एक ऐतिहासिक गाव. तेथे सन १९२६ (माघ, शके १८४७) मध्ये केशवदत्त महाराज त्यांच्या पुढाकाराने धर्मपरिषद योजण्यात आली होती. या परिषदेस सर्व धर्मपीठांच्या शंकराचार्यांना व धर्मनिर्णय, शास्त्रार्थ करणाऱ्या पंडित, पुरोहितांना आमंत्रित करण्यात आले होते. सदर परिषद कुकरमुंडा (जि. सुरत, गुजरात) येथील वैष्णव संस्थानचे अधिपती यांनी योजली होती. गुजरातेतील वल्लभ संप्रदायाचे पुष्टिमार्गी आचार्य, शारदापीठाचे शंकराचार्य, पुरीचे शंकराचार्य, करवीर पीठाचे शंकराचार्य कुर्तकोटी इ. आमंत्रित करण्यात आले होते. काशी, कलकत्ता, मद्रास येथील मोठे पंडित बोलवण्यात आले होते. काशीचे लक्ष्मणशास्त्री द्रवीड, राजेश्वरशास्त्री द्रवीड, कलकत्त्याचे महावेदांती अनंत कृष्णशास्त्री इ. उपस्थित होते. स्वामी केवलानंद सरस्वती, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशीही परिषदेस उपस्थित होते. परिषद ही धर्मसुधारणेबाबतची विविध आचार्य पंडित इ. ची मते जाणून घेण्यासाठी योजण्यात आली होती. या परिषदेत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी प्रतिवाद केला.[७] चर्चा मीमांसा पद्धती विरुद्ध ऐतिहासिक पद्धतीच्या दृष्टिकोनावर आधारित अशी झाली. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी 'मानवी बुद्धीला धर्म-परिवर्तन करता येते' हे ऐतिहासिक पद्धतीने सांगितले. वेद, स्मृती, पुराणादींमध्ये ऋषी-मुनींनी परस्परविरोधी जे आचार सांगितले आहेत, ते सप्रमाण सादर केले. शिवाय वेद हे 'अपौरुषेय' नाहीत, पौरुषेयच आहेत, असे ठाम प्रतिपादन नेले. अनंतकृष्ण शास्त्री यांनी तर्कतीर्थांच्या मताचा प्रतिवाद करत 'वेद हे स्वयंसिद्ध प्रमाण आहेत' असे स्पष्ट केले. मग तर्कतीर्थांनी 'शंकराचार्य ईश्वर नसून माणूसच आहेत' असे आपले मत मांडले. ऋषी-मुनी, आचार्य त्रिकालदर्शी नसून माणसंच आहेत. सबब वेद पौरुषेयच आहेत, असे त्यांनी म्हटले म्हणून परिषदेत क्षोभ निर्माण झाला. त्यावर स्वामी केवलानंद सरस्वतींनी 'आपली वादपद्धती दार्शनिक आहे. चार्वाक, शंकराचार्य, बुद्ध सर्वांचे विचार पूर्वपक्ष होत. वैदिक, अवैदिक चर्चा हा नित्यक्रम आहे. त्यामुळे मतस्वातंत्र्य पूर्वापार आहे,' हे सिद्ध केले. त्यामुळे परिषद चर्चा सुरू राहिली. पण तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी इतक्या मोठ्या संख्येने उपस्थित आचार्य, पंडितांच्या परिषदेपुढे प्रगत, पुरोगामी दृष्टिकोन मांडून आपण पढिक पंडित नसून नवविचारक धर्मसुधारणावादी आहोत हे आपल्या वक्तृत्व, विवेचनातून स्पष्ट केले. त्याची ऐतिहासिक नोंद महत्त्वाची आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे सहाध्यायी श्री. शं. नवरे यांनी म्हटलेले खरे आहे की, ''जुन्या पंडितांचे वादविवादाचे विशिष्ट आडाखे ठरलेले असतात. त्या परंपरेतच शास्त्रीबुवा वाढलेले असल्यामुळे केवळ या आडाख्यांच्या चापांत पकडून त्यांना कोणीही अडवू शकत नाही.''[८]

यानंतर सन १९२७ ला हैदराबाद येथे हिंदुधर्म परिषदेचे अधिवेशन झाले. त्यात वरील विचारांचाच आढावा घेण्यात आला. वामनराव नाईक यांनी ही परिषद आयोजित केली होती. पुढे याच वर्षी डिसेंबरमध्ये अकोला येथे ब्राह्मण परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. स्वामी केवलानंद सरस्वतीच या परिषदेचे अध्यक्ष मुक्रर करण्यात आले होते. महादेवशास्त्री दिवेकर (प्राज्ञपाठशाळा शिक्षक) यांनी परिषदेत मोठे कार्य केले. त्यांनी ब्राह्मणांच्या पोटजातींची माहिती गोळा करून पुस्तिका प्रकाशित केली. पोटजाती एकीकरणाच्या कार्यास यामुळे गती आली व बळ मिळाले. परिषदेस 'ब्राह्मणपत्रिका' इस्लामपूरचे वासुदेवराव मुंडले, बापूजी अणे, डॉ. मुंजे, हैदराबादचे वामनराव नाईक, पां. वा. काणे, श्रीधरशास्त्री पाठक, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, कानडेशास्त्री प्रभृती उपस्थित असल्याची नोंद स्वामी केवलानंद सरस्वतींच्या आत्मचरित्र हस्तलिखितात आढळते.[९]

प्राज्ञपाठशाळेच्या पुढाकारातून स्वामी केवलानंद सरस्वती आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींनी १९२० पासून जे प्रयत्न सुरू केले होते, त्यास १९२५ च्या धर्मकोश, १७ खंड व १९५२ नंतरच्या मीमांसाकोशाच्या ७ खंडांमुळे गती येत गेली, हे जरी खरे असले तरी अशा परिषदांमधून तर्कतीर्थांनी भीडभाड न बाळगता बिनतोड युक्तिवाद केले, ते त्यांचा संस्कृत भाषेवरील अधिकार, सभाधीटपणा आणि प्रभावी वक्तृत्वचातुर्य यांमुळे समाजमान्य व स्वीकृत होत गेले. १९२८ च्या २९ ऑक्टोबर ते ७ नोव्हेंबर असे सलग दहा दिवस काशी येथे जे 'अखिल भारतवर्षीय ब्राह्मण महासंमेलन' संपन्न झाले, ते तर्कतीर्थांच्या आक्रमक भूमिकेमुळे बहुचर्चित झाले. या महासंमेलनासाठी केवळ संस्कृत पंडितांनाच आमंत्रित करण्यात आले होते. चर्चेसाठी समयबंध निश्चित करण्यात आला होता. तो पक्षपाती असल्याने के. ल. दफ्तरी, मुरुडकर शास्त्री, सिद्धेश्वरशास्त्री चित्राव प्रभृतींनी महासंमेलनातून सभा त्याग करत बहिष्काराचे अस्त्र अवलंबिले. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी वादविवाद करून चर्चा घडवून आणण्याचे धोरण अवलंबिले. या संमेलनात धर्मशास्त्राचे जाणकार व विशेषाधिकारी गणले गेलेले सर्वश्री महामहोपाध्याय पंचानन शास्त्री, तर्करत्न भट्टाचार्य, महामहोपाध्याय वामाचरण भट्टाचार्य, महामहोपाध्याय लक्ष्मणशास्त्री द्रवीड, महामहोपाध्याय अनंत कृष्णशास्त्री, न्यायाचार्य राजेश्वरशास्त्री, ताराचरण भट्टाचार्य, शिरोळकर शंकराचार्य यांच्यासारखे अनेक मान्यवर, पीठासीन पंडित, शास्त्री असे ७०० विद्वान जमले होते. एकट्या बंगालमधूनच १५० पंडित आलेले होते. तर्कतीर्थांनी संमेलनाच्या प्रारंभीच नियमांतील पक्षपातीपणा लक्षात आणून देऊन खुलासा मागितल्याने एकच गोंधळ उडाला. पहिल्या दिवशी संमेलन संपल्यावर काशीच्या टाऊन हॉलमध्ये सनातनी वर्चस्वास आव्हान देऊ पहाणाऱ्या पुरोगामी पंडितांची स्वतंत्र बैठक बोलवण्यात आली होती. त्यास सुमारे ३५ पंडित उपस्थित होते. या दबावगटाने पुरोगामी धोरणावर दृढ राहण्याचे ठरवल्याने संमेलनात खडाजंगी चर्चा होत राहिल्या. संमती वय, विवाह वय, पोटजाती,

जातिद्वेषमूलक यांचे अप्रामाण्य, पोटजाती विवाह अशा अनेक विषयांवर तर्कतीर्थांच्या नेतृत्वाखाली वादळी चर्चा झडत राहिल्या. त्यामुळे या पूर्वी संमेलनावर असलेल्या सनातनी ब्रह्मवृंदाच्या एकांगी वर्चस्वास आव्हान दिले गेले. एक विरुद्ध ७०० असेच ते स्वरूप होते. शंकराचार्यांनी अधिकाराचा वापर करत सनातनी ठराव केले तरी वृत्तपत्र इ. तून चर्चेस मोठी प्रसिद्धी मिळाल्याने धर्मसुधारणा विचारांचा व्यापक प्रचार, प्रसार देशभर होण्यास साहाय्य झाले. धार्मिक क्षेत्रात धर्मसुधारणेसंबंधी लोकजागृती करण्याचे महत्त्वाचे ऐतिहासिक कार्य स्वामींच्या नेतृत्वाखाली तर्कतीर्थांनी केले.

पुढील वर्षी लगेचच १९२९ मध्ये पं. मदनमोहन मालवीय यांनी प्रयागला सनातन धर्म परिषदेचे आयोजन केले होते. त्यात यांच्या मंत्राधिकार चर्चा झाली. 'नमः शिवाय' की 'शिवाय नमः' म्हणायचे यावर वादंग झाले. तर्कतीर्थ या संमेलनास गेले नव्हते. पंडित मालवीय यांनी पुण्यास चित्रशाळेच्या पत्त्यावर तार करून मत मागवले. ही होती तर्कतीर्थांच्या व्यासंगी धर्मसुधारणा प्रयत्नांना मान्यता व पावती.

या सर्व धर्मसुधारणांच्या पार्श्वभूमीवर पुढे १९३२-३३ मध्ये महात्मा गांधींनी सुरू केलेल्या अस्पृश्यतानिवारण मंदिरप्रवेश अशा उपक्रमांना समाजाचा पाठिंबा चढत्या भाजणीने मिळत राहिला. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी न थांबता पुढे वृत्तपत्रांतून लेख लिहिले. निबंध प्रकाशित केले. 'शुद्धसर्वस्वम्' (१९२८), 'भारतीयधर्मेतिहासतत्त्वम्' (१९३३), 'अस्पृश्यत्व मीमांसा' (१९३४) सारखे साहित्य म्हणजे धर्मसुधारणा चळवळीसंदर्भातील सप्रमाण संशोधनपर लेखनच होय. ते आज सुमारे शतकानंतर वाचत असताना ती तर्कतीर्थांची भविष्यवेध घेत केलेली पुरोगामी भरारीच वाटते. सन १९३० मध्ये तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी 'नवा मनु'[१०] मासिकातून 'धर्मशास्त्र विरुद्ध समाजसुधारणा' शीर्षकांतर्गत लेखमालिका लिहून एक प्रकारे धर्मसुधारणांसंबंधी आपली प्रतिबद्धता आणि प्रतिबद्धताच जाहीर केलेली दिसून येते.

## स्वातंत्र्य चळवळीतील जनजागृती व जनसंघटन

वेदविद्या शिकण्याच्या हेतूने तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी वाईच्या प्राज्ञपाठशाळेत १९१४ ला दाखल झाले होते; तेव्हाची प्राज्ञपाठशाळा केवळ वेदाध्ययनाचे धडे देणारी वेदशाळा राहिली नव्हती. स्वतः नारायणशास्त्री मराठे हे राष्ट्रीय शिक्षणाचे पुरस्कर्ते होते. प्रा. वि. गो. विजापुरे यांनी पुण्याजवळील तळेगाव दाभाडे येथे १९०६ ला राष्ट्रीय शिक्षण देण्याचे हेतूने सुरू केलेले समर्थ विद्यालय ब्रिटिश सरकारने नाशिक येथील ब्रिटिश कलेक्टर जॅक्सन यांची हत्या होताच १९१२ ला तडकाफडकी बंद केले. ब्रिटिशांचा संशय होता की, तेथे सशस्त्र क्रांतीचे धडे दिले जातात. अचानक समर्थ विद्यालय बंद झाल्याने तेथील शिक्षक व विद्यार्थ्यांपुढे पर्याय शोधणे अनिवार्य झाले. समविचारी शाळा म्हणून त्यांनी प्राज्ञपाठशाळेची निवड केली. नारायणशास्त्री मराठे यांनी त्यास संमती दिली. १९१२ लाच

दिनकरशास्त्री कानडे, महादेवशास्त्री दिवेकर हे शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांसह प्राज्ञपाठशाळेत आले. 'त्यांना असे वाटत असे की, क्रांतीच्या मागे वेदांताची प्रेरणा पाहिजे.'[११] खुदिराम बोस हा क्रांतिकारी फाशीला जाताना 'भगवद्गीता' घेऊन गेला होता, ही घटना त्यामागची प्रेरणा होती.

"प्राचीन गुरुकुल पद्धतीचा पुनरुद्धार व्हावा व तिच्या द्वारे मातृभाषेचे माध्यम धरून नव्या व जुन्या विद्यांच्या शिक्षणाचा प्रसार व्हावा, भारतीय अध्यात्म-विद्येची महती वाढावी, स्वदेशाच्या स्वाभिमान पोषक इतिहासाची मांडणी व्हावी व उत्तम धर्मनिष्ठ सेवकांची निर्मिती व्हावी असा विचार प्रभाव गाजवू लागला. कै. विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या 'निबंधमाले'ने स्वभाषेचा अभिमान उत्पन्न केला होता. लोकमान्य टिळकांनी राष्ट्रीयत्वाची प्रेरणा उत्पन्न केलेली होती आणि बाबू अरविंद घोष, विवेकानंद व रामतीर्थ यांनी भारतीय अध्यात्मविद्येचा महिमा वाढविला होता. या सर्व गोष्टींचा संकलित प्रभाव आमच्या आश्रमावर पडला होता. स्वधर्म आणि स्वदेश यांची सेवेची दीक्षा घेतलेले लोक पाहिजेत, अशी अपेक्षा त्या वेळच्या राजकीय चळवळीत निर्माण झाली होती.[१२] या वर्णनातून तर्कतीर्थ स्वातंत्र्य चळवळीत कसे ओढले गेले, हे स्पष्ट होते.

धर्मसभा नि धर्मपरिषदांतील एकांगीपण व हेकेखोरपणा यांचा वीट येऊन तर्कतीर्थांनी स्वतःला स्वातंत्र्य चळवळीशी बांधून घेण्याचे ठरवले अन् १९३० च्या महात्मा गांधींच्या कायदेभंग आंदोलनात ते सक्रिय झाले. वाईतील त्यांची व्याख्याने प्रभावित करणारी ठरत होती. ते लक्षात घेऊन कराड येथे प्राज्ञपाठशाळेच्या वतीने तेथील विद्यार्थी 'आम्ही पांडवांसारखी शिस्त पाळू' असं आश्वासन देत प्रभात फेऱ्या काढत. याच सुमारास कृष्णेच्या घाटावर कराड येथे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची सलग आठ-दहा भाषणे झाली. ४-५ मे १९३० ला मिठाच्या सत्याग्रहात महात्मा गांधींना अटक झाली. जनतेतील क्षोभ टोकाला गेलेला होता. त्या पार्श्वभूमीवर झालेल्या भाषणांच्या अनेक आठवणी यशवंतराव चव्हाण यांनी लिहून ठेवल्या आहेत. अनेक लेख व 'कृष्णाकाठ' या त्यांच्या आत्मचरित्रात यांच्या नोंदी आहेत. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी शेतकऱ्यांत जाऊन एकंदर पंचेचाळीस भाषणे दिली. कऱ्हाडच्या घाटावर सतत सात दिवस कायदेभंगावर व्याख्याने दिली. दहा-दहा हजार लोक व्याख्यानासाठी जमत. 'काय नाटकावानी बोलतुया' असे काही शेतकऱ्यांनी उद्गार काढले. तेव्हा तेथील प्रसिद्ध वकील आळतेकर, पांडु अण्णा शिराळकर, राघुअण्णा धोपाटे वगैरे मंडळींनी शास्त्रीबुवांना सांगितले, ''हे उद्गार म्हणजे तुम्हाला कॉम्प्लिमेंट्स आहेत, गैरसमज करून घेऊ नका.''[१३] यातून तर्कतीर्थांच्या वक्तृत्वाचे प्रभावीपण स्पष्ट होते.

कराडच्या कृष्णा नदीच्या घाटावर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी दिलेल्या भाषणांमुळे कराड परिसरातील जनतेत कायदेभंग चळवळीच्या माध्यमातून भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीसंदर्भाने मोठी जनजागृती घडून आली. त्यातून जनता ब्रिटिशांविरुद्ध संघर्ष

करण्यासाठी संघटित आणि कटिबद्ध झाली. या त्यांच्या भाषणांना परिसरातील शेतकऱ्यांसह सर्व सुशिक्षित, व्यापारी आणि इतर मंडळी तोबा गर्दी करीत. तीस वर्षांचा तरुण, चेहऱ्यावरती बुद्धिमत्तेचे प्रखर तेज, अंगावर बंगाली पद्धतीने घेतलेली शाल या तर्कतीर्थांच्या यशवंतराव चव्हाण यांनी केलेल्या व्यक्तिमत्त्व वर्णनास[१४] भाई माधवराव बागलांनीही आपल्या एका लेखात दुजोरा दिलेला आहे.[१५] ही भाषणे जनतेच्या दृष्टीने अविस्मरणीय ठरली. आपल्या भाषणांमधून तर्कतीर्थांनी पारतंत्र्याची खूप नवी मीमांसा केली. ते आपल्या भाषणांतून देशातील क्रांतीची उदाहरणे देऊन लोकमत चेतवत असत. या भाषणांचा वैचारिक प्रभाव सामान्य माणसावर आणि विशेषतः तरुण वर्गावर जास्त पडला. तर्कतीर्थांच्या भाषणाची शैलीच आगळीवेगळी होती. त्याला देशभक्तीची धार होती. विचारांची पकड होती.

१९३० च्या मे महिन्याची संध्याकाळ असेल. सभा कृष्णाघाटावर होती. हजारो माणसे उन्हात तापलेल्या घाटावर बसली होती. उन्हाने तापलेला कातळ त्यावर बसणाऱ्या माणसाला भाजेल इतका गरम होता. शास्त्रीबुवा बोलण्यासाठी उभे राहिले आणि त्यांनी पहिले वाक्य उच्चारले ते असे, ''तुम्ही बसला आहात, तो घाट जसा गरम झाला आहे, तशी तुमची बुद्धी व मनं गरम झाली पाहिजेत... देशाची तुमच्याकडे आज ही मागणी आहे.''[१६] तरुण शास्त्र्यांचे हे एकच वाक्य सभा जिंकून गेल्याची नोंद यशवंतराव चव्हाण यांनी 'कृष्णाकाठ'मध्ये जशी करून ठेवली, तसेच एक वाक्य आपल्या मनात कायम घर करून राहिले असल्याचे सांगत त्यांनी ते नोंदवले आहे, -

"मी माझ्या गुरूंच्या पायांशी बसून सहा शास्त्रांत[१७] पारंगत झालो आहे आणि आता मला या शास्त्रांचे रूपांतर शस्त्रांत करायचे आहे. ही मोठी शास्त्रे आता शस्त्रे बनली नाहीत, तर हिंदुस्तानात कायमची गुलामगिरी राहील.''[१८]

वरील भाषणानंतर कराड ब्रिटिश पोलिसांनी तर्कतीर्थांवर खटले भरले. या खटल्यांमुळेही लोकजागृती होण्यामध्ये भर पडली. याची चक्षुर्वैसत्यम् नोंद करत यशवंतराव चव्हाण यांनी लिहिले आहे की, ''या दोन्ही खटल्यांच्या वेळी मी मॅजिस्ट्रेट कचेरीमध्ये हजर राहून या खटल्यांची संपूर्ण हकिगत व कामकाज ऐकले व पाहिले आहे. सरकारी रिपोर्टरने त्यांच्या भाषणातील त्यांना वाटणाऱ्या आक्षेपार्ह मजकुरांची साक्ष द्यायची आणि ह्या वक्त्यांनी आपण हे बोललो आहोत आणि बचावाच्या कामात आपल्याला भाग घ्यावयाचा नाही, असे ठामपणे निवेदन करायचे, हाच परिपाठ पडला होता. माझ्या आठवणीप्रमाणे दोघांना (तर्कतीर्थ व काकासाहेब गाडगीळ. उभयतांची त्या वेळी भाषणे झाली होती.) सहा-सहा महिन्यांच्या सक्तमजुरीच्या शिक्षा झाल्या. तरीसुद्धा दोघेही हसतमुख होते. ते लोकांना नमस्कार करत आपल्या कोठडीत शिरल्याचे मी पाहिले आहे.''[१९]

या खटल्याची व अन्य शिक्षा भोगून परत आल्यावर ब्रिटिश पोलिसांनी तर्कतीर्थांवर पुन्हा खटला भरला. त्याची नोंद तत्कालीन साप्ताहिक केसरीमध्ये आढळते. 'वाईचे

बातमीपत्र' (दि. १३-१-१९३१) मध्ये खालील मजकूर प्रसिद्ध झाला होता. त्याने याची पुष्टी होते- ''येथील तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री यांची नाशिक जिल्ह्यातील शिक्षा भोगून सुटका झाली असून सातारा जिल्ह्यातील पर्वाच्या गुन्ह्याबद्दल येथे त्याजवर खटला भरण्यात आला आहे. त्याची तारीख २३-१-१९३१ ही नेमली असून ते जामिनावर खुले झाल्यामुळे आजच ते वाईस आले. मोटार स्टॅण्डवर डिक्टेटर[२०] श्री. वेलणकर यांनी त्यांस पुष्पहार घालून त्यांचे स्वागत केले व गांधी चौकात झेंडावंदन होऊन आपल्या बिऱ्हाडी गेले.''[२१]

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत वक्ते, प्रबोधक, संघटक, मार्गदर्शक अशा विविध भूमिकांतून कार्य केले. या कार्यामुळे ते भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील अग्रणी नेते म्हणून पुढे आले. केवळ सातारा जिल्ह्यातच नाही तर नाशिक, धुळे, नंदुरबार, बागलाण, कळवण, संगमनेर, अकोला, अहमदनगर इ. परिसरात त्यांनी अनेक भाषणे देऊन विविध सत्याग्रहांचे नेतृत्व केले.

## बागलाणचा जंगल सत्याग्रह व तुरुंगवास

कायदेभंगाच्या चळवळीचा प्रारंभ मिठाच्या सत्याग्रहाने झाला. दांडीयात्रेद्वारे मीठ लुटल्यानंतर महात्मा गांधींना अटक झाली. महाराष्ट्रात सविनय कायदेभंग चळवळ चालू ठेवण्यासाठी राज्यस्तरीय समितीच्या मार्गदर्शन व नियंत्रणाखाली महात्मा गांधींच्या संमती व मार्गदर्शनाने समित्यांचे गठन करण्यात आले. समित्या 'वॉर काऊंसिल्स' म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या तर समितीचे प्रमुख संघटक 'डिक्टेटर' म्हणून ओळखले जाऊ लागले. डिक्टेटर जिल्हा, तालुका पातळीवर नेमून आंदोलन भारतभर पसरेल, परंतु नियंत्रक व मार्गदर्शक तत्त्वांनुसार चालेल याची खबरदारी घेण्यात आली. आंदोलन सर्वत्र व्हावे म्हणून केवळ मिठाचा सत्याग्रह होऊन चालणार नाही. कारण समुद्र सर्व ठिकाणी नाही. अशा समुद्र नसलेल्या ठिकाणी लुटलेले मीठ विकून स्वराज्य फंडासाठी निधी संकलित करण्याची मोहीम कार्यकर्त्यांनी राबवली. महाराष्ट्र राज्यासाठी ज्या प्रमुख समर्पित कार्यकर्त्यांची राज्यस्तरीय समिती नेमण्यात अली, तिचे प्रमुख शंकरराव देव व आचार्य शं. द. जावडेकर होते. समितीत ज्या समर्पित व प्रमुख नेत्यांचा अंतर्भाव करण्यात आला होता. त्यात सर्वश्री गंगाधरराव देशपांडे, प्रा. धर्मानंद कोसंबी, अच्युतराव पटवर्धन, लालजी पेंडसे, श्री. शं. नवरे, कमलादेवी चटोपाध्याय, द्वा. भ. कर्णिक, धनाजी नाना चौधरी प्रभृती मान्यवरांच्या बरोबरीने तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशीही होते. तशी नोंद मुंबई इलाखा गुप्तचर पोलीस नोंदीत आढळते.[२२]

ही चळवळ पुढे जंगल सत्याग्रह, अटकसत्र, विदेशी कापडावर बहिष्कार, दारूबंदी आंदोलन, मेळावे, मोर्चे, मिरवणुका, सभा, प्रभात फेऱ्या इ.च्या रूपाने शहरे, गावे, वाडी, वस्ती, पाडे इ.पर्यंत पोहोचवण्याचे नियोजन करण्यात आले होते. या आंदोलनात सर्व थरांतील जनता- मध्यमवर्गीय, शिक्षित-अशिक्षित, कामगार, शेतकरी, विद्यार्थी, आदिवासी,

महिला सर्वांचा सहभाग राहील, आंदोलन सर्वव्यापी व सर्वसमावेशक होऊन ते राष्ट्रीय आंदोलन बनेल असे नियोजन करण्यात आल्याची नोंदही पोलीस अहवालात दिसून येते.

नाशिक जिल्ह्यातील जंगल सत्याग्रहाची जबाबदारी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यावर सोपवण्यात आली होती. तर्कतीर्थांनी बागलाण, कळवण, चांदवड, मालेगाव, नांदगाव, साक्री, चाळीसगाव इ. अनेक ठिकाणी सभा घेऊन प्रभावी लोक जागृती व लोकसंग्रह घडवून आणला. त्यांचे शस्त्र होते भाषण. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, शेठ गोविंद, देवचंद भिका पाटील प्रभृती कार्यकर्ते टांग्याने खेड्यापाड्यांत फिरून सभा घेत. हा सत्याग्रह ६ ऑगस्ट, १९३० रोजी मुक्रर करण्यात आला होता. त्याची पत्रके छापून गावोगावी वाटण्यात आली होती. जंगल सत्याग्रहासाठी 'भिलवाड' गावाची निवड करण्यात आली होती. कारण तेथील जंगल ब्रिटिशांनी पूर्णपणे राखीव घोषित केले होते. ब्रिटिश सरकारने स्वातंत्र्यपूर्व काळात वनराईचा कायदा केला होता. प्रत्येक शेतकऱ्याला जुलै, ऑगस्ट महिन्यांत नोटिसा निघत. १५ ऑगस्टपर्यंत वनचराई कर भरणे अनिवार्य असे. एवढे करून ही जनावरे जंगलात गेली की, ब्रिटिश वनरक्षक जनावरे पकडून कोंडवाड्यात ठेवून त्यांचा लिलाव करीत. या आंदोलनात तर्कतीर्थांनी भाषणे देऊन कोंडवाडे फोडण्याची, सारा न भरण्याची मोहीम राबवली. सरकार विरोध दर्शविण्यासाठी २७५ गावकामगार पाटलांचे राजीनामे[२३] गोळा करण्यात आले. ते नाशिकचे तत्कालीन कलेक्टर आर. जी. गॉर्डन (१९२७-१९३२) यांच्याकडे पाठवण्यात आले. नाशिक जिल्ह्याचे काँग्रेस नेते दादासाहेब गद्रे, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, सीताराम शास्त्री प्रभृतींनी बागलाण जंगल सत्याग्रहाचे नेतृत्व केले. जून महिन्यापासून जनजागर करण्यात आले होते. प्रत्यक्ष सत्याग्रह ५ ऑगस्ट १९३० रोजी मांगी-तुंगी डोंगर येथे पार पडला. तिथल्या जैन मंदिर परिसरात शेतकरी, कातकरी, आदिवासी असे लाखभर सत्याग्रही जमले होते. त्यात २००० आदिवासी स्त्रियाही होत्या. प्रत्येक सत्याग्रहींच्या हाती विळा, कोयता इ. हत्यारे होती. गवत नि झाडे तोडण्यासाठी प्रत्येकाने मूठभर पेंडी कापून कायदेभंग करण्याचे ठरविण्यात आले होते. प्रारंभी गो-पूजा करून चांदीच्या कुऱ्हाडीने घाव घालण्यात आला. चांदीच्या विळयाने गवत कापण्यात आले. 'भारत माता की जय', 'महात्मा गांधी की जय', 'चले जाव' या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. नाशिक जिल्ह्याचे उपपोलीस अधीक्षक मोठी कुमक, बंदुका घेऊन तैनात होते. पण सत्याग्रहींच्या संख्येपुढे पोलीस कुमक मूठभरही नव्हती. तर्कतीर्थांच्या वक्तृत्व आणि संघटनकौशल्याने यशस्वी झालेल्या या सत्याग्रहाची नोंद घेत संशोधक इतिहासकारांनी लिहून ठेवले आहे की, ''Forest satyagrah in Baglan taluka recieved considerable importance. Baglan had earned reputation of being a 'Mini Bardoli' in those days.''[24] १७, १८ आणि १९ ऑक्टोबर १९३० या तीन दिवशी कळवणजवळ सत्याग्रह करण्यात आला. या सत्याग्रहात पोलिसांनी धरपकड सुरू

केल्यानंतर गोळीबार झाला. तर्कतीर्थ जंगलात फरार झाले. जंगलात त्यांची शाल सापडली पण ते सापडले नाहीत. ते पोलीस गोळीबारात ठार झाल्याची अफवा पसरली. दुसऱ्या दिवशी वाईत केवलानंद सरस्वतींच्या अध्यक्षतेखाली शोकसभा झाली. स्वामी केवलानंद सरस्वती शोक व्यक्त करून उद्गारले होते, 'एकेकाच्या नशिबी काय लिहिलेले असते.' नंतर फंदफितुरी होऊन तर्कतीर्थांना अटक झाली. त्यांच्या अटकेचे वृत्त, साप्ताहिक केसरीमध्ये सचित्र प्रसिद्ध झाले होते.[२५]

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे जंगल सत्याग्रहातील कार्य, भाषणे, फरार होणे, फंदफितुरीने अटक, त्यानंतर तीन महिने सक्तमजुरीची शिक्षा व ५० रुपये दंड,[२६] सुटकेनंतर नवनव्या खटल्यांचा ससेमिरा या सर्व गोष्टी त्यांना स्वतंत्रता सेनानी ठरविण्यास खरे तर पुरेशा आहेत. या सर्व घडामोडींतून तर्कतीर्थ तावूनसुलाखून निघाले. त्यांचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान अधोरेखित करत द्वा. भ. कर्णिकांनी लिहिले आहे की, ''१९३० सालच्या सत्याग्रहाचे एक पुढारी म्हणून ते महाराष्ट्रात अग्रगण्य झाले. त्या सत्याग्रहात ते सामील झाले, त्याच वेळी त्यांच्या जीवनाला कलाटणी मिळाली. कारण त्या सत्याग्रहामुळे ते प्राज्ञपाठशाळेच्या वैराग्यशील वातावरणातून बाहेर पडले आणि बऱ्या-वाईट, त्यागी आणि सुखलोलुप, श्रद्धावान आणि निःश्रद्ध भावनोत्कट आणि विचारशील अशा सर्व प्रकारच्या मंडळींच्या जीवनाशी ते समरस झाले.''[२७]

## गांधीवाद ते रॉयवाद प्रवास

''गांधीजींनी १९३० साली कायदेभंगाची मोहीम सुरू केली तेव्हा शास्त्रीबुवांनी आपल्या परंपरेचा, तसेच संस्थेच्या (प्राज्ञपाठशाळा) भवितव्याचाही विचार न करता या संग्रामात उडी घेतली. शास्त्रीबुवांचे वैशिष्ट्य असे की कोणतेही कार्य वा चळवळ हाती घेतल्यानंतर हातचे राखून काम करावयाचे नाही असा त्यांना मनःपिंड आहे. कायदेभंगाच्या या चळवळीत त्यांनी आपल्या प्रभावी वक्तृत्वाने उभा ग्रामीण महाराष्ट्र चेतविला, पेटविला. ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध ते नुसती आग ओकीत गेले आणि सत्याग्रहासाठी त्यांनी प्रक्षुब्ध वातावरण तयार केले.''[२८] हे निरीक्षण नोंदवले आहे त्यांचे कायदेभंग चळवळीतील व नंतर रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टीतील सहकारी द्वा. भ. कर्णिक यांनी. या कर्णिक बंधुंमुळेच (द्वा. भ. आणि वसंतराव कर्णिक) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा मार्क्सवाद, मार्क्सवादी साहित्य, मानवेंद्र रॉय, रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टी इत्यादींशी क्रांतिकारी वाचन, विचार नि व्यवहाराच्या अंकाने परिचय झाला व ते डाव्या विचारांकडे ओढले गेले.

१९३० ची कायदेभंगाची चळवळ १९३४ पर्यंत सक्रिय राहिली. तर्कतीर्थ १९३२ मध्ये पुन्हा पकडले जाऊन त्यांच्यावर खटला दाखल झाला. परत दहा महिन्यांसाठी धुळयाच्या तुरुंगात त्यांची रवानगी करण्यात आली.[२९] धुळे कारागृहात त्यांना भेटलेल्या महत्त्वाच्या व्यक्ती म्हणजे विनोबा भावे, जमनालाल बजाज, साने गुरुजी, गुलझारीलाल

नंदा, पुरुषोत्तमदास त्रिकम या होत.[३०] १९३२ च्या फेब्रुवारी-मार्चमध्ये अटक झाल्यावर १९३२ च्या नोव्हेंबरमध्ये ते तुरुंगातून बाहेर आले. या काळात ते पुण्यात अधिक असत.

धुळयातील तुरुंगात असताना तर्कतीर्थ कलकत्त्याच्या माधवजी सेठ यांना 'उपनिषद' शिकवीत असत. माधवजी सेठ त्याची टिपणे काढत. त्यात अस्पृश्यतेसंदर्भात झालेल्या चर्चेची टिपणे होती. ती जमनालाल बजाज यांच्या पाहण्यात आली होती. ती टिपणे पुरोगामी होती. तुरुंगातून सुटका होताना निरोप देत जमनालाल म्हणाले होते की, 'तुमची अस्पृश्यतेवरील मते महात्माजींच्यापर्यंत कशी पोहोचवावी याबद्दल विचार करतो.'[३१] त्यानुसार त्यांनी पुढे ती महात्मा गांधींपर्यंत पत्राद्वारे पोहोचवली. तर्कतीर्थ तुरुंगातून येऊन वाईस प्राज्ञपाठशाळेत येऊन जाऊन अध्यापन कार्य करीत असत. तर्कतीर्थांचे एक मित्र धुंडिराजशास्त्री देव महात्मा गांधींचा निरोप घेऊन वाईस आले. त्यानुसार तर्कतीर्थ महात्मा गांधींना भेटण्यासाठी म्हणून येरवडा (पुणे) कारागृहात गेले. १३ डिसेंबर, १९३२ ते ३१ डिसेंबर, १९३२ या पंधरवड्यात सात वेळा महात्मा गांधींशी भेट होऊन चर्चा झाल्याच्या नोंदी आहेत.[३२] त्यांच्या सोबत के. ल. दफ्तरी, श्रीधरशास्त्री पाठक, कोकजे शास्त्री, आनंद शंकर वैद्य, भगवानदास, हरिभाऊ फाटक प्रभृती मान्यवर वेळोवेळी उपस्थित असत. महात्मा गांधींनी मंदिरात प्रवेश व अस्पृश्यता निवारणाचा जो कार्यक्रम पुढे हाती घेतला, त्यात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, स्वामी केवलानंद सरस्वती यांची भूमिका मोठी होती. पुढे महात्मा गांधींनी आपल्या 'हरिजन' पत्रात अस्पृश्यता निवारण कार्यक्रमासंबंधी शास्त्री-पंडितांचा अभिप्राय स्पष्ट करणारे पत्रक[३३] प्रसिद्ध केले होते. तो 'हरिजन' पत्राचा पहिलाच अंक होता. त्यावर ज्या सात पंडितांच्या स्वाक्षऱ्या होत्या त्यांपैकी एक लक्ष्मणशास्त्री होते. ते पत्रक तर्कतीर्थांनीच तयार केले होते. यातून तर्कतीर्थांची वाक्पटुता, तर्कबुद्धी व मीमांसाकौशल्य स्पष्ट होते.

त्यानंतर भारतात हरिजनांना मंदिर प्रवेश मिळावा म्हणून आंदोलन सुरू झाले. नाशिक, त्रावणकोर, वायकोम इ. ठिकाणी सत्याग्रह झाले. मंदिर प्रवेश कायदा करण्याचं आश्वासन देण्यात आलं. या नियोजित कायद्याविरोधात सनातनी मंडळींची मोठी सभा शिवाजी मंदिर, पुणे येथे झाली. सनातन्यांच्या विरोधार्थ भाषण करण्यासाठी तर्कतीर्थ उभे राहिले. तेव्हा चाळीसएक लाठीबंद तरुण गरजले, 'तुम्ही खाली बसा, नाही तर तुम्हांस आम्ही मारू.' शास्त्रीबुवा त्यांस भ्याले नाहीत, पण मारणाऱ्यांना एक प्रकारचे आव्हान देऊन ते तेथेच अखेरपर्यंत बोलत उभे राहिले. ज्येष्ठ गांधीवादी कार्यकर्ते हरिभाऊ फाटक यांनी ही गोष्ट नंतर महात्मा गांधीजींच्या कानांवर घातली. तेव्हा गांधीजी उद्गारले, 'He is the greatest satyagrahi.'[34] वक्ता म्हणून आपल्या मताशी प्रतिबद्ध राहून अत्यंत निडरपणे आपली मते मांडण्याच्या त्यांच्या या स्वभावामुळेच ते पुढे गांधीवादाकडून सशस्त्र क्रांतीच्या विचारांकडे आकर्षित झाले.

सन १९३४-३५च्या दरम्यान तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी मार्क्सवादाचे विधिवत वाचन, चिंतन, मनन सुरू केले. याला तुरुंगातील दिवसांची पार्श्वभूमी होती. सन १९३०च्या तुरुंगवासात त्यांची द्वा. भ. कर्णिकांशी गाठ पडली. सन १९३२च्या तुरुंगवासात तुरुंगात मानवेंद्र रॉय यांची सशस्त्र क्रांतीसंबंधीची पत्रे येत. त्यामुळे तर्कतीर्थांच्या मनात मार्क्सवादाबद्दलचे कुतूहल जागे झाले. त्यांनी एंगल्स वाचला. 'अँटी-ड्यूरिंग', 'डायलेक्टिस ऑफ नेचर' वाचले. रायझानोव्हच्या भाष्यासह कार्ल मार्क्सचा 'मॅनिफेस्टो ऑफ दि कम्युनिस्ट पार्टी' वाचला. नंतर सबंध प्लेखानोव्ह वाचला. प्लेखानोव्ह हा लेनिनचा गुरू, रशियन मार्क्सवादाचा संस्थापक, स्टेलचे 'हेगेल'वरचे पुस्तक वाचले. यातून त्यांचे मार्क्सवाद, क्रांती, समाजवाद इ.बद्दलचे आकर्षण वाढले. त्याची परिणती मानवेंद्र रॉय यांच्या ‘रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टी’मध्ये सक्रिय होण्यात झाली. फैजपूर काँग्रेस अधिवेशन (१९३६) झाले. त्यात मानवेंद्र रॉय यांचे भाषण सर्वांपेक्षा वेगळे वाटले. विशेषतः त्या भाषणातील समांतर सत्ताकेंद्रे (States Within a State) निर्माण करण्याचा विचार अभिनव होता. पुढे १९४०ला मानवेंद्र रॉय यांनी स्वतंत्र पक्ष स्थापन केल्यावर ते गांधीवादाला रामराम ठोकून नव्या पक्षात सक्रिय झाले.

‘मी रॉयवादी का झालो?’[३५] हा शीर्षक लेख लिहूनच तर्कतीर्थांनी पक्षांतरविषयक आपली भूमिका विशद केली आहे. हे दिशांतर सहज घडले नाही. त्यामागे त्यांना मोठ्या वैचारिक झगड्यातून जावे लागले, ते या लेखातून स्पष्ट होते. ‘मूलतःच विरोधी असलेली विचारसरणी माझ्या विचारपंथात आल्याबरोबर क्षोभ उत्पन्न करून मला विचारास प्रवृत्त करते’[३६] याची कबुली तर्कतीर्थ प्रस्तुत लेखात देतात. 'मौलिक विलक्षणता' हे पक्षांतराचे कारण असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे. पक्ष कार्यरत झाल्यावर देशभर शाखा उघडण्यात आल्या. शिबिरे, व्याख्याने, मेळावे, निवडणुका, संघटन सर्व आघाड्यांवर तर्कतीर्थ सक्रिय सहभागी असत. अभ्यास शिबिरे, (स्टडी कॅम्प्स) होत. जत, वज्रेश्वरी, आकलोळी, कुंड, कुलाबा, कराड, पोयनाड, अलिबाग, कणकवली इ. शिबिरांत वक्ते म्हणून तर्कतीर्थांनी केलेल्या कार्यामुळे पक्षास शेतकरी, तरुण विद्यार्थी यांचे मोठे पाठबळ लाभले.

### लेखन प्रारंभ

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या लेखन, संपादन, समीक्षा कार्याचा प्रारंभ प्राज्ञपाठशाळेतच झाला. स्वामी केवलानंद सरस्वती हे लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे गुरू. त्यांनी २२ ऑक्टोबर, १९३१ ला संन्यासदीक्षा घेतली. पण त्यापूर्वी त्यांनी १९२५ पासून प्राज्ञपाठशाळेतून अंग काढून आपले सारे लक्ष धर्मसुधारणांकडे केंद्रित केले. जानेवारी, १९२६ मध्ये सोनगीर (खानदेश) येथील वै. केशवदत्त महाराज यांनी ह. भ. प. संतोजी महाराज यांच्या नेतृत्वाखाली गोविंद महाराज यांच्या अमृतमहोत्सवाच्या निमित्ताने जो अर्चामहोत्सव आयोजित केला होता, त्यानिमित्ताने जी पंडित परिषद बोलविली होती, त्यास

ते लक्ष्मणशास्त्रींसह उपस्थित होते. नंतर सन १९२७ ला हैद्राबाद येथे हिंदुधर्मपरिषद झाली, त्यालाही ते उपस्थित होते. १९२८ ला अखिल भारतीय ब्राह्मण परिषदेतही ते सहभागी होते. सनातनी पंडित 'बाबा वाक्यं प्रमाणम्'चा ठेका सोडायला तयार नव्हते. स्वामी केवलानंद सरस्वती कालानुसारी धर्मसुधारणेचे पक्षधर होते. धर्मसुधारणा व धर्मजागृतीच्या उद्देशाने स्वामींनी तत्त्वनिष्ठ परिवर्तनवादी परिषद १९३४ मध्ये गठित केली. नंतर त्याचे रूपांतर धर्मनिर्णय मंडळात १९३७ मध्ये केले. १९२५ पासून एकीकडे धर्मकोश निर्मितीचे कार्य, तर दुसरीकडे मीमांसाकोश रचना असे करत स्वामींनी कायावाचामने धर्मसुधारणेचे कार्य हाती घेतले. त्यात तर्कतीर्थांचा सक्रिय सहयोग असे. यातून तर्कतीर्थांच्या लेखन, वाचन, अध्यापन, संशोधन, समीक्षा कार्यास सन १९२३ नंतर खरी उभारी आली.

## आनंदमीमांसा (१९२८)

तर्कतीर्थांनी 'लेखसंग्रह 'च्या प्रस्तावनेत स्पष्ट केले आहे की 'आनंदमीमांसा' हा निबंध म्हणजे माझे अगदी पहिले लेखन होय.[३७] हे ग्रंथ संदर्भातील विधान म्हणून पहावे लागते. कारण याच दरम्यान साप्ताहिक केसरीत 'निर्णयाची शास्त्रशुद्धता' शीर्षकाने सलग ५ लेख काशी येथे संपन्न ब्राह्मण महासंमेलनाच्या अनुषंगाने प्रसिद्ध झालेले दिसतात.[३८] 'आनंदमीमांसा' या ६८ पृष्ठांच्या निबंधामध्ये प्रपंचविषयक दुःखवाद व आनंदवाद यांचे ऐतिहासिक व तात्त्विक संक्षिप्त समालोचन करण्यात आलेले आहे. आनंदसिद्धान्ताचे मूळ उगमस्थान उपनिषदात सापडते. हे लिहिणाऱ्या ऋषींनी आनंदसिद्धान्ताच्या नावाखाली दुःखवादच सांगितला असल्याचे तर्कतीर्थांनी या ग्रंथात स्पष्ट केले आहे. दुःखवाद हा धर्म, नीती आणि मानवी प्रगतीस मारक असल्याने त्याज्य समजला पाहिजे. आनंदसिद्धान्तच प्रगती पोषक आहे. आधिभौतिक व अध्यात्मिक सुखवादच (सात्त्विक सुखवाद) भारतीय समाजहिताचा आहे. सदर ग्रंथ मराठीत लिहिला आहे.

## शुद्धिसर्वस्वम् (१९२८)

आनंदमीमांसानंतरचा हा तसाच छोटा, अवघा ३७ पृष्ठांचा निबंध होय. संस्कृतमध्ये लिहिलेल्या या निबंधात सनातन धर्मानुसार हिंदुधर्मेतरांच्या हिंदुधर्म प्रवेशासंदर्भातील प्रायश्चित्तांची चर्चा आहे. म्लेंच्छपदार्थ, म्लेंच्छ संसर्ग झाल्यास प्रायश्चित्त, पतन पदार्थ, संसर्ग स्वरूप, संसर्गपातित्ये, कालसंसर्गविशेष नियम, कामाकामकृत प्रायश्चित्त, पतित संतती, शिष्टाचार प्रामाण्य, व्रात्यशुद्धी, म्लेंच्छ इत्यादींचे सनातन धर्माधिकार, अंत्यजविषयक अस्पृश्यता इत्यादी विषयांची सदर निबंधात चर्चा करण्यात आली आहे.[३९] थोडक्यात, हा ग्रंथ म्हणजे धर्मशुद्धी सातत्य राखण्यासाठीच्या विविध मार्गांची चर्चा करणारा एका अर्थाने 'प्रायश्चितविधान ग्रंथ' होय. १९२८ च्या काशी येथील ब्राह्मण महासम्मेलनात झालेल्या निर्णयांच्या पार्श्वभूमीवर लिहिण्यात आलेला हा ग्रंथ होय.[४०] तो त्या वादांचा सारसंग्रह होय.[४१] यात तर्कतीर्थांनी लोकसंग्रह हेतूने धर्मशुद्धीचे समर्थन व पुरस्कार केला आहे. यात

'चांडाल' शब्दाची मीमांसा करण्यात आली आहे. हिंदुधर्मीय सार्वजनिक ठिकाणी अन्य धर्मीयांना अस्पृश्य मानत नाहीत. तर मग स्वधर्मीयांना अस्पृश्य मानण्यात काय अर्थ आहे? अशी पृच्छा करणारा ग्रंथ तर्कतीर्थांना पुरोगामी पंडित सिद्ध करतो. या ग्रंथाच्या मराठी भाषांतराची योजना होती, पण ती फलद्रूप झालेली दिसत नाही.

## भारतीयधर्मेतिहासतत्त्वम् (१९३३)

प्राच्यविद्या परिषद, बडोदा (गुजरात) येथे सादर करण्यासाठी म्हणून तयार करण्यात आलेला हा शोधनिबंध. अवघ्या १६ पृष्ठांच्या या संस्कृत निबंधात ऐतिहासिक पद्धती व मीमांसा पद्धतीचा समन्वय करून तिचे फलित शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

सदर निबंधात बदलता काळ व परिस्थिती संदर्भात धर्माचा विचार करण्याची आवश्यकता तर्कतीर्थांनी स्पष्ट केली आहे. धर्मस्वातंत्र्य ही गोष्ट सनातन (शाश्वत) मूल्य आहे. राज्याचा कोणताही धर्म असो, प्रजेच्या विविध धर्मांचे स्वातंत्र्य अबाधित राखणे हे राजसत्तेचे कर्तव्य असते. संयुक्त राष्ट्रसंघ (युनो) सारखी संस्था अस्तित्वात येऊनही तिला हे करणे शक्य झाले नाही. हे लक्षात घेता व धर्माचा समाजजीवनावर असलेला पगडा लक्षात घेऊन यापुढे संकुचित अशी कोणतीही धार्मिक व सामाजिक परंपरा आत्मोद्धारास व विश्वोद्धारास समर्थ ठरेल असे वाटत नाही. म्हणून धर्मातील शाश्वत मूल्ये अंगीकारून कालोचित धर्मसुधारणा करणे यातच मानवाचे कल्याण सामावलेले आहे. ते भारतीय धर्माचे खरे मर्म आहे.

## जडवाद अर्थात् अनीश्वरवाद (१९४१)

जडवाद हे एक तत्त्वज्ञान आहे. तत्त्वज्ञान हे जीव आणि जगत किंवा आत्मा आणि सृष्टी यांच्या संबंधांचा अभ्यास करते. जडवाद हे तत्त्वज्ञान विज्ञानपूरक आहे, पण विज्ञान ही स्वतंत्र व तत्त्वज्ञानापेक्षा श्रेष्ठ गोष्ट होय. जडवादानुसार द्रव्याच्या तीन श्रेणी होत जड, जीव आणि चेतन. शरीर, आत्मा आणि बुद्धी यांचा विचार करता विज्ञान व ईश्वर यांतील सत्य काय हे तर्क, अनुभव आणि नियम या आधारे स्पष्ट होते. जीवनात असलेली ईश्वरीय संकल्पना ही आईन्स्टाईननी म्हटल्याप्रमाणे केवळ वाङ्मयीन कल्पना-विलास आहे. नियमबद्ध पद्धतीने जे सत्य सिद्ध होत नाही, ते व्यक्त करणे म्हणजे मानवी दौर्बल्याचेच प्रकटीकरण असते. आत्मा, ईश्वर या केवळ कल्पना, तर्क होत. ते गूढ या पलीकडे त्याचे अस्तित्व नाही. विज्ञान गूढ उकलून सत्यरूप नियम, सूत्र पद्धतीने अनुभवजन्य बनवते. ते सार्वत्रिक सत्य असते. कणाद, कपिल, बुद्ध, चार्वाक हे श्रेष्ठ तत्त्वज्ञ अशासाठी की त्यांनी ईश्वरीय सत्ता नाकारून माणूस व त्याचा लौकिक आचारविचार प्रमाण मानला. विज्ञानात अलौकिक, चमत्कार, अवतारास वाव असत नाही. 'चक्षुर्वसत्यं प्रमाणं'च्या कसोटीवर उभा असलेला जडवाद हा अनिश्वरवाद अशासाठी की तो ईश्वरीय सत्ता नाकारून भौतिक विश्व प्रमाण मानतो. मानवी जीवन चरित्र व वर्तन व्यवहारासाठी ईश्वराची गरज नाही. ईश्वरी संकल्पनेच्या आधारे मानवी

जीवन वेठीस धरणे म्हणजे पारलौकिक, गूढ, अलौकिक सृष्टीचे समर्थनच असते. जडवाद त्यास छेद देणारे व बरोबर त्याच्याविरुद्ध सत्य सांगणारे वैज्ञानिक तत्त्वज्ञान होय.

## प्रकाशित भाषणसंग्रह

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी अनंत विष्णु पाटणकरांना दिलेल्या मुलाखतीत सन १९५३ साली हे विचारल्यानंतर की, 'आजपर्यंत आपली सामान्यपणे जाहीर व्याख्यानांची संख्या कुठपर्यंत पोहोचली आहे?' उत्तर दिले होते की, ‘एक सहस्रापेक्षा अधिक भाषणे आजपर्यंत दिली असतील.’[४२] या उत्तरानंतर तर्कतीर्थ चार दशके भाषणे देत राहिले. सन १९२३ मध्ये तर्कतीर्थ जाहीर भाषणे देऊ लागले. ३० वर्षांत हजार भाषणे, नंतरचा काळ तर त्यांच्या सामाजिक मान्यता नि वक्ते म्हणून लोकमान्य होण्याचा. ‘साहित्य संमेलनाला अध्यक्ष म्हणून ते दिल्लीला जेवढ्या सहजपणे गेले, तेवढ्याच सहजपणे एखाद्या छोट्या दुकानाच्या उद्घाटनालाही जात राहिले.’[४३] तर्कतीर्थ एक व्याख्याते म्हणून प्रा. रा. ग. जाधव यांच्यासारख्या त्यांच्या सहकारी, चरित्रकार, संपादक, समीक्षक म्हणून अनेक वर्षे सहवासात राहिलेल्या सव्यसाची साहित्यिकांनी नोंदवलेली पुढील निरीक्षणे खरोखरीच लक्षवेधी होत- ‘‘शास्त्रीजींना लिहिण्यापेक्षा बोलणे अधिक प्रिय होते... ते जसे लिहीत तसेच बोलत. त्यांची बोलण्याची शैली पुस्तकी नसे... लिहिण्याची शैली बोलकी असे... शास्त्रीजींच्या बाबतीत मौखिक आणि ग्रांथिक असा भेद संभवत नसे... वाणी आणि लेखणी यांच्यातील आशय-अभिव्यक्तीचे अद्वैत हे शास्त्रीजींचे वैशिष्ट्य होते. बहुधा महिन्याच्या तीस दिवसांपैकी जवळ-जवळ वीस-बावीस दिवस शास्त्रीजी व्याख्यानांच्या निमित्ताने महाराष्ट्रभर व महाराष्ट्राबाहेरही संचार करीत असत... सुमारे अर्धशतकभर व त्यातील दोन-तृतीयांश काळ समाजाचे नाना प्रकारे वैचारिक उद्बोधन करण्यासाठी व्याख्यानव्रत चालवणे, ही सोपी गोष्ट नाही. शास्त्रीजींच्या व्याख्यानकलेत पारंपरिक आचार्यवंशाच्या खुणा अधिक दिसून येतात.’’[४४] ‘‘तर्कतीर्थांनी वर्षानुवर्षे प्रसन्न अशा व्याख्यानांच्या धारा नित्य बरसत ठेवल्या...

**वाग्वै तत्सर्वं विज्ञापयति वाचमुपास्स्वेति स यो वाचं ब्रह्मेत्युपास्ते।**
**यावद्वाचो गतं तत्रास्य यथा कामचारो भवति यो वाचं ब्रह्मेत्युपास्ते।। (उपनिषद)**

वाणीमुळे सर्वज्ञान प्राप्त होते, म्हणून वाणीची ब्रह्म समजून उपासना करावी. तर्कतीर्थांनी ती केली.’’[४५]

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी आपल्या जीवनकाळात वरील सर्व पार्श्वभूमीवर अक्षरश: हजारो व्याख्याने दिली असतील. त्यांच्या नोंदींची जंत्री उपलब्ध नाही. हे जरी खरे असले तरी उपलब्ध व्याख्यान संहिता, वृत्ते, पुस्तिका, भाषण संग्रह यांच्या आधारे त्यांच्या भाषणांचा स्थूल असा आढावा घेणे शक्य आहे. एकतर त्यांनी विविध विद्यापीठे, संस्था, स्मृती व्याख्यानमाला, साहित्य संमेलने यांमधून जी विद्वत्तापूर्ण भाषणे दिली, त्यांचे

संग्रह उपलब्ध आहेत. तर्कतीर्थ साहित्य म्हणून जे ग्रंथ समोर येतात, त्यातील अधिक भाषण संग्रहच आहेत. 'हिंदुधर्माची समीक्षा' (१९४१), 'ज्योति-निबंध' (१९४७), 'वैदिक संस्कृतीचा विकास' (१९५१), 'आधुनिक मराठी साहित्याची समीक्षा आणि रससिद्धान्त' (१९७३), 'सर्वधर्मसमीक्षा' (१९७६), 'शिखांचा पंथ व इतिहास' (१९८४), 'आद्यशंकराचार्य: जीवन आणि विचार' (संपा. अरुंधती खंडकर) (१९९७), 'साहित्याचे तर्कशास्त्र' (संपा. सीताराम रायकर, द. दि. पुंडे, पंडित टापरे) (२०१२) या संग्रहांमधून दीर्घ अशा ३२ भाषणांच्या संहिता आपणापुढे येतात. यांशिवाय सुमारे शंभर एक व्याख्यानांच्या पुस्तिका, संहिता, वृत्तांत, हस्तलिखिते इ. संशोधन संग्रहाच्या निमित्ताने हाती आल्या आहेत. भारतात स्वातंत्र्यलढ्यापासून वक्तृत्व कलेस विशेष स्फुरण चढल्याचे दिसते. महाराष्ट्रात सामाजिक सुधारणा, प्रबोधन, स्वातंत्र्य चळवळ, संयुक्त महाराष्ट्र आंदोलन, आणीबाणी, मंडल आयोग, दलित चळवळ, राजकारण इत्यादींमुळे वक्तृत्व कला उजळत गेल्याचे दिसते. गेल्या शतकात शि. म. परांजपे, नाथ पै, स्वातंत्र्यवीर सावरकर, साहित्यिक आचार्य प्र. के. अत्रे, प्रा. ना. सी. फडके, वि. स. खांडेकर, समाजसेवक डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, प्राचार्य शिवाजीराव भोसले यांच्यासारख्या वक्त्यांची भाषणे गाजली. त्यांच्या गाजलेल्या भाषणांचे संग्रहही मराठी साहित्यात उपलब्ध आहेत. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी याच पठडीतील वक्ते होत. 'स्वप्नसृष्टी', 'अत्रे उवाच', 'हशा आणि टाळ्या', 'चिंतन', 'जागर', 'तीन भाषणे', 'शतकातील दलित विचार', 'शतकाची विचार शैली' (चार खंड), 'संमेलनाध्यक्षांची भाषणे' असे अनेक भाषण संग्रह मराठी साहित्यात उपलब्ध आहेत. त्या पार्श्वभूमीवर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचेवरील भाषण संग्रह आणि आगामी भाषण खंडांत संग्रहित तर्कतीर्थांची अन्य अनेक भाषणे त्यांचे वक्तृत्व समजून घ्यायला म्हणून आपल्या हाती आहेत. ती तर्कतीर्थांच्या विचारधारेची निदर्शक होत.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या कार्याचा विचार केवळ प्राज्ञपाठशाळामंडळ, मराठी विश्वकोश निर्मिती, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्याद्वारे केलेला मराठीचा ज्ञानभाषा म्हणून केलेला विकास या मर्यादेत आजवर झाला आहे. महाराष्ट्रभर समग्र साहित्य संपादनाच्या निमित्ताने फिरताना व साधन संग्रहातून लक्षात आलेली गोष्ट अशी की त्यांनी मुंबईसारख्या महानगरात 'सेंटर फॉर दि स्टडी ऑफ सोशल चेंज' नावाची संस्था सन १९७२ मध्ये आपल्या रॉयिस्ट सहकारी प्रा. गोवर्धन पारीख, प्रा. अ. भि. शहा, प्रा. एन. व्ही. सोहनी, गोविंदराव तळवलकर, नीलकंठ कल्याणी प्रभृती मान्यवरांसह सुरू केली होती. ती आज ग्रंथालय, संशोधन, समाज परिवर्तन, महिला सबलीकरण, मनुष्यबळ विकास क्षेत्रात राष्ट्रीय स्तरावर आघाडीवर आहे. तर्कतीर्थ मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचे अनेक वर्षे अध्यक्ष होते. त्यांच्या कार्यकाळात ती संस्था कर्जमुक्त होण्यास साहाय्य होऊन तिला

स्थैर्य प्राप्त झाले. वाईतील सध्याचे किसनवीर महाविद्यालय तर्कतीर्थ यांनी जनता शिक्षण संस्था स्थापून सुरू केले होते, ते वाईसारख्या तत्कालीन छोट्या गावात उच्च शिक्षणाची सोय व्हावी म्हणून. तर्कतीर्थांनी प्राच्यविद्या विकासाच्या क्षेत्रात आंतरराष्ट्रीय स्तरावर केलेली भाषणे, सादर केलेले शोधनिबंध कुणास माहीत आहेत? मुंबईच्या एशियाटिक सोसायटी, गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्थांतील त्यांची भाषणे कोण जाणतो? भांडारकर प्राच्यविद्या संस्थेतील त्यांचे कार्य आणि झालेला गौरव अद्याप अंधारात आहे. साहित्य अकादमी पुरस्कार मराठीस प्रथम मिळवून देणारे तर्कतीर्थ सर्वांना माहीत आहेत, पण साहित्य अकादमीने त्यांना आपले 'महदत्तर सदस्यत्व' (फेलोशिप) बहाल केले होते व त्या वेळी त्यांनी केलेले भाषण व त्यांना मिळालेले सन्मानपत्र अद्याप गुलदस्त्यात आहे. 'तर्कतीर्थ' पदवी कुणी पाहिली आहे? या नि अशा कितीतरी पैलूंवर अद्याप प्रकाश पडलेला नाही. 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय' संपादन व प्रकाशन प्रकल्प हे या संदर्भात उचललेले छोटेसे पाऊल होय. त्याद्वारे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या जीवन, कार्य, विचारांचा समग्र आढावा घेणे शक्य होईल. त्यातून त्यांच्या संशोधन आणि पुनर्मूल्यांकन कार्यास गती येईल, असे वाटते. माहीत नसलेले तर्कतीर्थ समजून घेणे म्हणजे तर्कतीर्थांच्या जीवन, कार्य, विचारांचा समग्र धांडोळा ठरेल.

**संदर्भ आणि टीपा :**


१. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, 'माझ्या शब्दात मी', *पाक्षिक रुद्रवाणी*, १५ जानेवारी १९७२, पृ. ७.

२. मे. पुं. रेगे, 'अध्ययन आणि वैचारिक वाटचाल' तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (मुलाखत), *नवभारत*, फेब्रु.-मार्च १९८१, पृ. ७.

३. 'माझ्या शब्दांत मी', पूर्वोक्त, पृ. ८.

४. 'गुरुवर्य श्री. विनोबा यांच्या संबंधी काही स्मृतिशेष,' तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी जन्मशताब्दी विशेषांक, २००१, पृ. ५४.

५. कित्ता, पृ. ५५.

६. 'अध्ययन आणि वैचारिक वाटचाल,' पूर्वोक्त, पृ. ११.

७. अ) लक्ष्मणशास्त्री जोशी, 'स्वामी केवलानंद सरस्वती आणि प्राज्ञपाठशाळेची धर्मसुधारणा चळवळ,' (मुलाखत), *नवभारत*, डिसेंबर १९७८, जाने १९७९, पृ. १.
(आ) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, *मी व माझे वक्तृत्व*, संपा. अनंत विष्णु पाटणकर (१९५३), पृ. १२ ते १४.

८. 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी,' साप्ता. मौज, १३ डिसेंबर १९४४, पृ. ५.

९. श्री. गुरुवर्य स्वामी केवलानंद सरस्वती - लक्ष्मणशास्त्री जोशी, *प्राज्ञपाठशाळा व तिची परंपरा*, संपा. तर्कतीर्थ आणि अन्य मान्यवर, पृ. ५२.

१०. अरुंधती खंडकर, *तर्कतीर्थ, एक प्रज्ञाप्रवाह*, पृ. ८०.
११. 'स्वामी केवलानंद सरस्वती आणि प्राज्ञपाठशाळेची धर्मसुधारणेची चळवळ,' पूर्वोक्त, पृ. ३.
१२. लक्ष्मणशास्त्री जोशी 'कृष्णातीरावरील प्राज्ञमठात,' *सत्यकथा*, सप्टेंबर १९६०, पृ. ३३.
१३. दि. वि. देव, 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी,' *नवयुग*, दि. २६ नोव्हें. १९४४ पृ. २.
१४. यशवंतराव चव्हाण, *कृष्णाकाठ*, पृ. ६५.
१५. भाई माधवराव बागल, 'माझ्या सहवासात आलेल्या तीन व्यक्ती', *नवभारत*, जुलै १९६६, पृ. ४७.
१६. यशवंतराव चव्हाण, *कृष्णाकाठ*, पृ. ६६.
१७. सहा शास्त्रे (षडंगवेद) - शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छंद, ज्योतिष.
१८. यशवंतराव चव्हाण, 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी शास्त्र आणि शस्त्र,' *नवभारत,* फेब्रु-मार्च, १९८१, पृ. ४५.
१९. यशवंतराव चव्हाण, *कृष्णाकाठ*, पृ. ६६.
२०. त्या काळात राष्ट्रीय चळवळीमार्फत गाववार संघटक नेमले जात. त्यांना 'डिक्टेटर' संबोधले जायचे.
२१. साप्ताहिक *केसरी*, पुणे, मंगळवार, २० जानेवारी १९३१, पृ. ७.
22. Bombay Presidency Police Abstracts of Intelligence, Part II, p. 574, Cultural.Maharashtra.gov.in.
२३. दि. वि. देव, पूर्वोक्त, पृ. २.
24. अ) Forest Satyagrah, Chapter III, shodhganga.inflibnet.ac.in, p. 110.

    आ) वाईचा राजकीय इतिहास, प्रकरण २, shodhganga.inflibnet.ac.in, p. 110.

    इ) स्वातंत्र्यचळवळ व राष्ट्रसेवा दलातील कार्य, प्रकरण २, pp. 64, 65, Lib. unipune.ac.in 8080, PP.35-37

    ई) रमेश पडवळ, 'सत्याग्रहींचे नामपूर,' *महाराष्ट्र टाईम्स*, १२ नोव्हें. २०१७.
२५. साप्ताहिक *केसरी*, पुणे, मंगळवार, २८ ऑक्टोबर १९३०, पृ. १०.
२६. कित्ता.
२७. द्वा. भ. कर्णिक, 'आधुनिक महाराष्ट्राचे बुद्धिवादी वेदांती : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी,' *मनोहर*, मे १९५१, पृ. १४९, १५०.
२८. द्वा. भ. कर्णिक, 'शास्त्रीबुवा आणि रॉयवादी चळवळ,' *नवभारत*, फेब्रु. १९७५, पृ. ११.

२९. दि. वि. देव, पूर्वोक्त, पृ. २.
३०. अरुंधती खंडकर, पूर्वोक्त, पृ. १०५.
३१. कित्ता.
32. The collected works of Mahatma Gandhi, Vol. 58, p. 320 to 330.
३३. *हरिजन*, संपा. महात्मा गांधी, ११ फेब्रुवारी १९३३, पृ. ६.
३४. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, *नवयुग*, २६ नोव्हेंबर १९४४, पृ. १५.
३५. *धनुर्धारी* (दिवाळी), ऑक्टोबर १९४६.
३६. कित्ता, पृ. १३२.
३७. *लेखसंग्रह*, खंड १, 'प्रस्तावना,' श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९८२.
३८. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, 'निर्णयशास्त्रशुद्धता,' साप्ता. *केसरी*, २५ डिसें. १९२८ ते २९ जाने. १९२९.
३९. *आनंदमीमांसा*, मलपृष्ठ मजकुराच्या आधारे.
४०. श्री. शं. नवरे, 'शास्त्रीबुवांची मतांतरे आणि वेषांतरे,' *लोकमान्य*, १५ डिसें. १९४४, पृ. ६.
४१. दि. वि. देव, पूर्वोक्त, पृ. १५.
४२. *मी आणि माझे वक्तृत्व*, पृ. २०८.
४३. अरुण गोडबोले, अक्षरधन, पृ. १४८.
४४. शास्त्रीजी, प्रतिमा प्रकाशन, पुणे, पृ. ४२ ते ५२, २१३,२१४.
४५. अरुंधती खंडकर, पूर्वोक्त

**(प्राज्ञ पाठशाळा मंडळाच्या वतीने २७ जानेवारी २०२१ रोजी वाई येथे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या स्मृतिसभेत दिलेल्या व्याख्यानावर आधारित लेख.)**

**(नवभारत मासिक, मार्च, २०२९, पृ. २३ ते ३८)**

ooo

## ५१.

# रंग, रेषांच्या पलीकडचे व्यक्तिचित्र : वाईचे शास्त्रीजी

### डॉ. सुनीलकुमार लवटे

गेल्या शतकाच्या आठव्या शतकात (१९७०-८०) मी शिक्षक होतो. तेव्हा शालान्त परीक्षेसाठी हिंदीला असलेल्या निम्नस्तरीय पाठ्यपुस्तकात असलेला 'कृष्ण'-भक्ति निबंध शिकवत असे. तो निबंध आचार्य विनोबा भावे यांचा होता. त्यात सृष्टी निर्मिती, मनुष्य आणि त्याच्या घडण्या-बिघडण्याची चर्चा आहे. आत्मपरीक्षण, मौन आणि कर्मयोगाने माणसाचं जीवन मधुर होतं, असं विनोबा त्यात समजावतात. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचं जीवन, कार्य, विचार समजून घेत असताना, मला तो निबंध वारंवार आठवत राहतो नि त्यामुळेच कदाचित वाईच्या या शास्त्रींचं फेअर स्केच माझ्यापुढे उभं राहातं.

हा माणूस बहुप्रज्ञ खरा. अखंड जीवन ज्ञानसाधना, वाईस ते शास्त्री, पंडित होण्यासाठी आले. इथे ते संस्कृत शिकले, गुरुकुल पद्धतीच्या शिक्षणातून. व्युत्पत्ती, व्याकरण, न्याय, वेदांत, तर्कशास्त्र शिकत ते समांतर इंग्रजी, इतिहास, भूगोल, भौतिकशास्त्र, गणित शिकले. मूळ भारतीय शिक्षण पद्धती ही आंतरविद्याशास्त्रीयच होती. आज 'नवे शिक्षण धोरण- २०२०' मध्ये ज्या 'लिबरल आर्ट्स' चं समर्थन आहे, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी त्याचं रोल मॉडेल व प्राज्ञपाठशाळा तत्कालीन नालंदा, तक्षशिलाची प्रतिकृती, वाईच्या या शास्त्रींचं जीवन म्हणजे निरंतर मतांतर, वेषांतर नि परिवर्तनाचा ध्यास. त्यांच्या बालपणापासून ते मृत्यूपर्यंतच्या नुसत्या छायाचित्रांवरून नजर फिरवली तरी या माणसाचा कायाकल्प लक्षात यायला वेळ लागत नाही. वाईत तेरा वर्षे पूर्ण झाल्यानंतर ज्ञानलालसेनं आलेला बटू लक्ष्मण, वाठार रेल्वे स्टेशनापासून वाईस बैलगाडीतून आला तेव्हा जटाधारी, कटीस लंगोरी, अंगावर तिरके जानवे, गळ्यात ताईत, हातात काठी असलेला साक्षात ज्ञानसाधक होता (१९१४). पुढे धोतर, अंगरखा नि खांद्यावर शाल आली (१९२६). पुढे जटा, अंगरखा गेला नि चक्क गोटा, शेंडी नि अंगावर उपरणे, धोतर आले. हा काळ १९३० च्या कायदेभंग चळवळीचा. पुढे डोक्यावर गांधी टोपी, अंगावर नेहरू शर्ट नि कमरेला धोतर

आले. डोळयांवर चश्मा आला. हा काळ 'चले जाव चळवळी'चा, पण तर्कतीर्थांसाठी रॉयवादी होण्याचा. सन १९६० नंतर म्हणजे महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यावर महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे ते अध्यक्ष झाले. लाल दिव्याची गाडी आली तसे अंगावर जॅकिट आले. त्या वेळच्या बहुधा सर्व मंत्र्यांचा तो अघोषित पोषाखच होता. तो पुढे कायम राहिला. माणसात आधी मतांतर घडतं. वेषांतर ही मतांतराची परिणती असते.

लक्ष्मणशास्त्री जोशी सन १९२३ ला 'तर्कतीर्थ' पदवी प्राप्त करून वाईच्या प्राज्ञ पाठशाळेत शिक्षक झाले. शिक्षक झाल्यावर आपले गुरू नारायणशास्त्री मराठे यांच्याबरोबर धर्मसभा, पंडित परिषदा इत्यादींमध्ये भाग घेत वादविवाद करू लागले. वादविवादात प्रारंभीपासून त्यांनी जात, धर्म, परंपरा, रूढी इ.च्या सुधारणांचा आग्रह धरला. सन १९३५ च्या दरम्यान नारायण शास्त्री मराठे यांच्या पुढाकार नि मार्गदर्शनाखाली जे धर्मसुधारणा मंडळ अस्तित्वात आले, त्यात तर्कतीर्थ शास्त्रीजी सक्रियतेने आघाडीवर होते. शुद्धी आणि प्रायश्चित्त संबंधी त्यांची मते पुरोगामी असल्याने सनातन्यांचा त्यांना विरोध राहिला. अल्पमतात असूनही ते स्वमतावर दृढ राहात आले. पण पुढे त्यांच्या लक्षात आले की हिंदुधर्मातील पंडित, पुरोहित, वेदविद्यासंपन्न, महामहोपाध्याय म्हणवून घेणारे आचार्य, शंकराचार्य प्रभृती शब्दप्रामाण्य, वेद अपौरुषेय आहेत या मतापलीकडे जाण्यास तयार नाहीत, त्यांच्याशी वादविवाद करणे म्हणजे कपाळमोक्ष करून घेणे होय, हे लक्षात घेऊन त्यांनी धर्मक्षेत्र सोडून स्वातंत्र्य लढ्यात स्वतःला गुंतवून घेतले.

१९३० ते १९४० हा तर्कतीर्थ शास्त्रीजींच्या जीवनातील स्वातंत्र्यलढ्याचा काळ. प्राज्ञ पाठशाळेत तळेगावच्या समर्थ विद्यालयातील जे शिक्षक, विद्यार्थी आले होते ते राष्ट्रीय बाण्याचे होते. ते क्रांतिकारी विचारांचे समर्थक होते. सन १९२१ पासूनच खरे तर तर्कतीर्थ महात्मा गांधींच्या विचारांकडे आकृष्ट झाले. त्या वेळी बारडोली लढ्याच्या दरम्यानचा महात्मा गांधी आश्रमातील निवासकाळ व सहवास हेही या परिवर्तनाचे एक कारण होते. याआधी ते लोकमान्य टिळकांच्या विचारांनी प्रभावित होत होते. सन १९३० च्या कायदेभंग चळवळीत प्राज्ञ- पाठशाळेचे विद्यार्थी वाई, कऱ्हाड येथे प्रभात फेऱ्या काढत. भूपाळया म्हणत, 'आम्ही पांडवांसारखी शिस्त पाळू' अशी प्रतिज्ञा घेत. शिक्षक स्वातंत्र्य जागृतीची व्याख्याने देत. त्यात तर्कतीर्थांची व्याख्याने श्रोत्यांत क्षोभ निर्माण करीत. ती प्रभावी असायची. यातून लोकजागृती व लोकसंघटन घडून यायचे. मिठाच्या सत्याग्रहानंतर स्वातंत्र्य आंदोलन खेड्यापाड्यात पोहोचवण्याचा निर्णय 'वॉर काऊन्सिल'नी घेतल्यावर तर्कतीर्थ आपल्या सहकारी - मित्र श्री. शं. नवरे, द्वा. भ. कर्णिक, वसंतराव कर्णिक प्रभृतींसह नगर, नाशिक, धुळे परिसरात जनसंघटन कार्यात सक्रिय झाले. त्यातून कळवण, बागलाण, नामपूरचे जंगल सत्याग्रह यशस्वी झाले. या लढ्यातच तर्कतीर्थांना दोनदा अटक झाली व तुरुंगवास भोगावा लागला.

तुरुंगातून सुटून आल्यानंतर त्यांनी १९३२च्या दरम्यान धर्मसुधारणा प्रयत्नांना सामाजिक उपक्रमाची जोड देऊ केली. २४ सप्टेंबर, १९३२ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा गांधी यांच्यामध्ये दलितांना स्वतंत्र मतदार संघाऐवजी लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व देण्याबाबत एकमत झाले. या पुणे करारानंतर महात्मा गांधी यांनी अस्पृश्यता निवारणाकडे लक्ष केंद्रित केले. हिंदुधर्म व प्राचीन ग्रंथांचा अभ्यास करून महात्मा गांधी सनातनी आणि पुरोगामी विचारांच्या धर्म-पंडितांशी येरवडा कारागृहात चर्चा करीत. त्या वेळी नारायणशास्त्री मराठे, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी प्रभृती धर्माचा व ग्रंथांचा आधुनिक अन्वयार्थ महात्मा गांधींना समजावून सांगत. त्यातून महात्मा गांधींचा अस्पृश्यता निवारण संबंधी दृष्टिकोन तयार झाला. या विचारांचा प्रभाव गांधींवर इतका पडला की त्यांनी आपले लक्ष राजकीय आंदोलनाकडून सामाजिक कार्याकडे केंद्रित केले. सेवाग्राम येथे सन १९३६ मध्ये आश्रम स्थापन करण्यापूर्वी सन १९३३ मध्ये येरवडा तुरुंगातून बाहेर आल्यावर 'हरिजन यात्रा' करून या प्रश्नाचे राष्ट्रीय स्वरूप समजून घेतले. सेवाग्रामला आल्यावर तपभर महात्मा गांधींनी खादी, ग्रामोद्योग, सफाई इ. सामाजिक उपक्रमांद्वारे भारत घडणीचा कार्यक्रम हाती घेतला. या दरम्यानच सन १९३३ मध्ये आपला सर्वांत धाकटा मुलगा देवदास याचा विवाह राजाजींची कन्या लक्ष्मीशी आंतरजातीय करून महात्मा गांधी यांनी एक पाऊल पुढे उचलले व पुढे आयुष्यभर जपले. त्याची प्रेरणा तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशीच होते. या विवाहाचे पौरोहित्य केले, म्हणून सनातनी ब्रह्मवृंदांनी तर्कतीर्थांवर बहिष्कार टाकला होता. असेच पौरोहित्य त्यांनी सन १९५५ मध्ये सोमनाथ मंदिर पुनर्निर्माण कार्यक्रम प्रसंगी केले होते, ते एकाच कारणासाठी की ते मंदिर हरिजनांना खुले करण्यात येणार होते. त्या वेळीही ब्रह्मवृंदाने तर्कतीर्थांवर बहिष्कार टाकला होता. इतकेच नव्हे तर या विरुद्ध वाईच्या वसंत व्याख्यानमालेत पुण्याच्या अभ्यंकर शास्त्री यांची व्याख्याने योजली होती. तेव्हाही तर्कतीर्थांनी एक व्याख्यान देऊन सनातनी धर्मग्रंथातील संदर्भ सोयीस्कर व अनुकूल तेवढेच सांगून समाजाला कसे फसवतात, ते सप्रमाण मांडून आपले मत धाडसाने व्यक्त करण्याची परंपरा कायम राखली होती. धर्म म्हणजे 'बाबा वाक्यं प्रमाणम' 'नव्हे तर परिस्थितीप्रमाणे धर्म परिवर्तनाचा अधिकार समाजास असतो, हे कृतिशील पद्धतीने समाजात रुजविण्याचे कार्य करणारे ते 'कर्ते धर्मसुधारक' होते.

तर्कतीर्थांचं चित्र, चरित्र नि चारित्र्य ते कसे दिसत, काय पोषाख करीत, काय खात-पीत यावर रेखाटणं हे त्यांचं 'रफ स्केच'च. 'फेअर स्केच' म्हणाल तर त्यांचं लेखन, वाचन, भाषण, संपादन, परीक्षण प्रस्तावना, मुलाखती, भाषांतरे, पत्रव्यवहार हेच. तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी यांनी सन १९२७ ते १९९४ अशा सुमारे सात दशकांत दोनशेहून अधिक लेख लिहिले. ते धर्मशास्त्र, तत्त्वज्ञान, राजकारण, समाजकारण, संस्कृती, इतिहास, मानसशास्त्र, नीतिशास्त्र, कला, भाषा, साहित्य, विज्ञान, विविध वाद, व्यक्ती, विचार, काव्यशास्त्र, तंत्र, मंत्र, तंत्रज्ञान

अशा परस्परपूरक व परस्परविरोधी विषयांवर. कोणताही विषय मुळात समजून घ्यायचा व मग लिहायचा हा त्यांचा वस्तुपाठ. त्यांना मानसशास्त्रातील पंथ, संप्रदाय, शाखा माहीत होत्या. 'मानसशास्त्रातील दोन आधुनिक संप्रदाय' यावर त्यांचं भाषण मिळू शकतं आणि 'मानस-लिंगपूजा' विषयावर लेखही. विश्वकोशांतील नोंदींवर नजर फिरवली तरी लक्षात येतं त्यांचं बहुश्रुतपण व बहुआयामी वाचन आणि चिंतन. लेखनात आणि व्याख्यानात कशाचंच वावडं नसतं. वेद, वाद, व्यक्ती, संस्कार, श्रद्धा-अंधश्रद्धा, ईश्वर, भूत-प्रेत, संत साऱ्यांवर ते समरसून लिहिताना दिसतात. 'प्राचीन भारतीय संस्कृतीतील मद्यविषयक आचार-संहिता' विषयावर तर्कतीर्थ लिहून आपण सोवळे शास्त्रीजी नाही हे सिद्ध करतात तर दुसरीकडे 'गांधीवादाच्या थडग्यावर उभारलेला नेभळा सुधारणावाद' लिहून आपण कोणा व्यक्ती वा विचाराचे अंधभक्त नाही हे स्पष्ट करतात. सोमनाथ मंदिराच्या प्राणप्रतिष्ठा महोत्सवात विचारापेक्षा व्यवहार, कृती श्रेष्ठ बजावत मानवेंद्रनाथ रॉय यांना काय वाटेल याचा ते विचार करत बसत नाहीत. ते धर्मांध नव्हते, म्हणून 'हिंदुधर्माची समीक्षा'सारखा ग्रंथ लिहू शकले. मौलिक विलक्षणतेचं त्यांना अमर्याद आकर्षण होतं. 'मूलत: विरोधी असलेली विचारसरणी आपल्या विचारपंथात आल्याबरोबर क्षोभ उत्पन्न करून ती मला विचारास प्रवृत्त करते' असे त्यांनी एके ठिकाणी लिहिलं आहे. श्रद्धा आणि विचारांचं द्वंद्व घेऊन ते जगले. पण त्यांची कठोर फारकत मात्र त्यांना घेता आली नाही. शंकराचार्य भेट, मंडल आयोग इ. प्रसंगांतून ते स्पष्ट होतं. ते पुरोगामी होते असं म्हणण्यापेक्षा ते स्वतंत्र मताचे बुद्धिवादी होते, असं म्हणणं अधिक सयुक्तिक होईल. त्यामुळे समकालाशी विरोध करण्याचं धारिष्ट्य ते दाखवू शकले. ही त्यांची स्वतंत्र प्रज्ञा होती.

वाईचे शास्त्रीजी खासगी बैठकीत गोष्टी वेल्हाळ तर समाज जीवनात मनुष्यसंग्रही. या संग्रहात राजकारणी, बुद्धिजीवी, कार्यकर्ते, संपादक, पत्रकार तसेच नि तितकेच सर्वसामान्यही. पण रोजची ऊठबैस ज्ञानवंत, प्रज्ञावंतांतच. सतत ग्रंथ, कोश, वृत्तपत्रे, नियतकालिकात गढून जाणारे शास्त्रीजी सभा, समारंभ, परिषदा, बैठका इत्यादींमध्ये तितकेच समरस. लिहिण्याची समाधी शिस्तीची. वाचन, संदर्भ संग्रह, चिंतन-मननानंतर त्यांचं लेखन साकारायचं. स्मरणशक्ती तल्लख तितकाच तर्कही! लेखनात मुद्देसूदपणा ठरलेला. पण पांडित्यास मात्र त्यांना फाटा नाही देता आला. त्याची एक आठवण माधवराव बागल यांनी लिहिली आहे. त्यांनी तर्कतीर्थलिखित 'जडवाद' हे पुस्तक वाचले. पण त्यांना जडवादावर लिहिलेली इंग्रजी पुस्तके सोपी वाटली, जडवादातील मराठी शब्द समजण्यासाठी इंग्रजी डिक्शनरी उघडावी लागली. हे ऐकून तर्कतीर्थ म्हणाले, ''हे काहीच नाही. मी हे पुस्तक एका मित्रास पाठवले, तर तो चक्क म्हणाला की, पुस्तक वाचनीय, मननीय व अभ्यासनीय आहे, पण आपण ते मराठीत लिहिले असते, तर बरे झाले असते.'' माधवराव बागल यांची टीका या मित्रापेक्षा किती तरी सौम्य असल्याचे मान्य करून तर्कतीर्थ म्हणाले होते की, ''प्रयत्न करूनही सोपे

लिहायला येतच नाही मला!'' हा प्रांजळपणा तर्कतीर्थांच्या व्यक्तिमत्त्वाचा अविभाज्य भाग होता.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे स्नेही, सहकारी उत्तराधिकारीही म्हणता येईल असे प्रा. मे पुं. रेगे. या उभयतांना मी अनेकदा ऐकले, पाहिले आहे. वाचलेही आहे. प्रश्न पडतो की, हे दोघे एकत्र असतील तेव्हा कोण, कोणाशी, काय बोलत असेल? कोण, कोणाचं, काय ऐकत असेल? उभयता एकमेकांच्या तर्कास महातर्क कसा देत असतील? विशेषत: प्रा. मे. पुं. रेगे यांनी तर्कतीर्थांच्या घेतलेल्या मुलाखती वाचताना किंवा प्रा. मे. पुं. रेगे यांनी तर्कतीर्थांवर लिहिलेले लेख वाचत असताना पडलेले हे कोडे अद्याप न सुटलेले. 'सुटलेली कोडी' शीर्षकाची मुलाखत वाचताना तर हे कोडं अधिक गूढ, न सुटणारं, न उकलणारं होत राहातं. अन् वाटत राहातं, अशा माणसांची तुम्ही कितीही रफ, फेअर अँड लव्हली अशी रेखचित्रं रेखाटत राहा; त्यांचं खरं व्यक्तिमत्त्व, व्यक्तिचित्र, रंग-रेषांच्या पलीकडे राहातं हेच खरं!

**(साप्ताहिक साधना, पुणे. दि.२९ मे, २०२१)**

ooo

# ५२.
# तर्कतीर्थांचे वाचन
## डॉ. सुनीलकुमार लवटे

मान. प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, मान. प्रा. डॉ. रणधीर शिंदे, प्रमुख, मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, मान. प्रा. डॉ. नंदकुमार मोरे, सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, आणि उपस्थित विद्यार्थी बंधु-भगिनींनो...

वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने शिवाजी विद्यापीठाने मला 'तर्कतीर्थांचे वाचन' विषयावर विचार व्यक्त कण्यासाठी आमंत्रित केले, याबद्दल मी आभार व्यक्त करतो आज डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जन्मादिनाच्या पूर्वसंध्येस त्यांच्या स्मृतीस भाषणाने अभिवादन करताना आनंद होत आहे. त्यांच्या राष्ट्रपती पदाच्या कारकिर्दीत त्यांनी सर्वाधिक संवाद साधला, तो विद्यार्थ्यांशीच. आज आपण जो संवाद साधत आहेत तो महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या सहयोगाने. या मंडळाचे संस्थापक अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशीच होते. यांनी या मंडळातर्फेच प्रथम मराठी विश्वकोश प्रकल्पाचा संकल्प सोडला होता, नंतर तो उत्तर काळात सिद्धीस नेला तो महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाने. या प्रकल्प व मंडळाचेही संस्थापक अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशीच होते. या दोन्ही मंडळांच्या पुढाकार व कार्यातून महाराष्ट्र राज्याची ज्ञानव्यवस्था निर्माण झाली, ती मराठीतील मूलभूत भाषांतरे, प्रकाशने, कोश इत्यादींच्या निर्मितीतून. हे जरी खरे असले तरी त्यामागे तर्कतीर्थांच्या वाचन, लेखन व व्याख्यानांचे सातत्य होते. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण स्वातंत्र्य चळवळीत आले, ते तर्कतीर्थांची स्वातंत्र्य व क्रांतीवरील रोमांचक भाषणे ऐकून. सर्वश्री यशवंतराव चव्हाण, वि. स. खांडेकर आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी- तिघांनी आयुष्यभर वाचन, व्याख्यान व लेखनाद्वारे महाराष्ट्राची सांस्कृतिक जडणघडण केली. यशवंतराव चव्हाण, इतके वाचनव्यासंगी होते की विदेश दौऱ्यातील काही वेळ ते पुस्तक खरेदीसाठी राखून ठेवत. वि.

स. खांडेकरांनी तर लिहूनच ठेवले आहे की, ''पुस्तकाच्या दुकानातून मी सहसा रिकाम्या हाताने परतत नाही.'' तर्कतीर्थांचा सारा ग्रंथ संग्रह म्हणजे मूलभूत संदर्भ ग्रंथांचा खजिनाच होता, असे म्हटले तर ते वावगे होणार नाही.

तर्कतीर्थांचे वाचन समजून घेत असताना एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की त्यांची शैक्षणिक जडणघडण आपल्यासारखी शाळा, महाविद्यालय वा विद्यापीठीय औपचारिक शिक्षणातून झाली नाही. ते लिहायला-वाचायला धुळे जिल्ह्यातील पिंपळनेर या जन्मगावी असलेल्या शाळेतील बिगरी, पहिली, दुसरी व तिसरी इयत्ता शिकले. तेच काय त्यांचे औपचारिक शिक्षण. वयाच्या चौदाव्या वर्षी सन १९१४ मध्ये ते नारायणशास्त्री मराठे तथा केवलानंद सरस्वती संचालित प्राज्ञपाठशाळेत दाखल झाले. इथे गुरूकुल पद्धतीच्या शिक्षणातून त्यांचे वाचन आकारले नि विस्तारलेही. इथे ते संस्कृत पंडित होण्यासाठी म्हणून आले. इथे येण्यापूर्वी त्यांचे वडील बाळाजी जोशी यांनी त्यांना 'अमरकोश' पढविला. 'अमरा निर्जरा देवास्त्रिदशा विबुधाः सुराः' असे म्हणून घ्यायचे. त्याचे पठण व्हायचे. उच्चार नीट तपासले जात. वाईत येऊन तर्कतीर्थ 'षडंग वेद' शिकले. शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छंद व ज्योतिष ही सहा वेदांगे ते शिकले. यातून वैदिक साहित्याचा पाया मजबूत झाला. 'ऋग्वेद', 'यजुर्वेद', 'अथर्ववेद' आणि 'सामवेद' वाचन, अध्ययन, पठन, मीमांसेतून तर्कतीर्थ न्यायवेदांताकडे आकर्षित झाले. पुढे मुक्त संस्कृत वाचनात कविकुलगुरू कालिदासाच्या 'रघुवंश', 'अभिज्ञान शाकुंतल'ने संस्कृत वाचन शास्त्राकडून साहित्याकडे नेले. बाणभट्टाच्या 'कादंबरी'ने काव्यात्मक नाटकाइतकेच कथात्मक संस्कृत साहित्य रोचक नि मनोहारी असते, याची प्रचिती दिली.

गुरुकुलातील प्राथमिक अभ्यासाच्या अवघ्या नऊ महिन्यांत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी आपली व्युत्पत्ती तयार केली, म्हणजे गुरुजींच्या मदतीशिवाय टीकाग्रंथांचे वाचन आणि मीमांसा स्वाध्यायाच्या आधारे सुरू ठेवली. 'न्यायमुक्तावली'च्या वाचनातून तर्कशास्त्र व न्यायवैशेषिक पूर्ण केले. त्याच्यावरची टीका शिकायची म्हणून 'दिनकरी', 'जागदीशी', 'गादाधारी', 'पञ्चलक्षणी', 'चतुर्दशलक्षणी' वाचत, पठन-पाठन करत 'सिद्धांतलक्षण' ग्रंथ पूर्ण केला. मग गुरूंना 'शास्त्र सेवामवधारय' संबोधन करीत व्याकरण, न्याय; वेदांत यांचे पूर्वपक्ष केले. अलंकारशास्त्र, वाक्यमीमांसा करत शास्त्रान्तरसंचार केला. म्हणजे विविध शास्त्रांच्या आंतरसंबंधांचे वाचन, पठन-पाठन, मीमांसा करत आकलन करून घेतले. पंक्ती लावणे शिकले. कीर्तनकार, प्रवचनकार, पुराणिक होता यावे म्हणून तर्कतीर्थांनी 'तर्कदीपिका' अभ्यासली. अर्थसंग्रह करून घेतला. 'वेदांतसार' आणि 'पंञ्चदशी' वाचत 'लघुसिद्धान्तकौमुदी' पूर्ण केली. यातून यांची नैयायिक, वैय्याकरणी म्हणून घडण झाली.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी वाईच्या प्राज्ञपाठशाळेत शिक्षण घेत असताना विनोबा भावे तर्कतीर्थांचे सहपाठी होते. ते 'शांकरभाष्य' शिकण्यासाठी प्राज्ञपाठशाळेत आले होते.

सुमारे वर्षभर ते वाईत होते. त्या काळात विनोबा तर्कतीर्थांना म्हणत असत की, "हे जे प्राचीन अध्ययन आहे, घटपटाची खटपट आहे, त्याने देशाचा काही उद्धार व्हायचा नाही, तर आधुनिक शिक्षण घेतले पाहिजे आणि देशामध्ये यंत्रोद्योग आले पाहिजेत. यासाठी तुला अमेरिकेत जावे लागले तरी जा." पुढे विनोबा वाई सोडून सन १९१७ ला बडोद्याला गेले. पाठोपाठ तर्कतीर्थ आणि त्यांचे दोन मित्र दामोदरशास्त्री कोनकर आणि धुंडीराज देव यांनी वाईतून पलायन केले. वेषांतर केले. जटाधारी लक्ष्मणशास्त्री बडोद्यात चक्क चमन गोटा करून भूमिगत विद्यार्थी म्हणून विनोबांकडे इंग्रजी शिकू लागले. विनोबांनी त्यांना तर्खडकर भाषांतर पाठमाला (भाग १ ते ३) शिकविली आणि तर्कतीर्थ इंग्रजी वाचू, बोलू, लिहू लागले. स्पेलिंग कच्चे होते पण भाषांतराच्या सहायाने यांनी टॉल्सटॉय वाचला. पुढे 'टेल्स फ्रॉम शेक्सपिअर' वाचले. चार्ल्स लँब शिकले. इतके सारे तर्कतीर्थांनी तीन महिन्यांत कमावले, हे सांगून कुणाला खरे वाटणार नाही. पण तर्कतीर्थांमध्ये उपजतच एक अशांत, अतृप्त ज्ञानलालसा होती, ती त्यांना नित्य नव्या वाचनाकडे आकर्षित करीत राहिली. इंग्रजी शिक्षण पूर्ण झाल्यावर विनोबा तर्कतीर्थांना महात्मा गांधींच्या साबरमती आश्रमात नेण्याच्या तयारीत होते. त्याची कुणकुण लागताच तर्कतीर्थांनी अर्ध्या रात्रीत बडोदा सोडून वाई गाठली. गुरुजी नारायणशास्त्री मराठ्यांची क्षमा मागून ते शिक्षक म्हणून रुजू झाले. पण पदवी मिळविण्याच्या इराद्याने नंतर त्यांनी काशी गाठली. सन १९१८ ले २१ या तीन वर्षांत त्यांनी 'तर्कतीर्थ' पदवी पाठ्यक्रम (Essence of Logic) पूर्ण केला. सन १९२२ ला परीक्षेसाठी कलकत्त्याला जाताना बारडोली स्टेशनवर स्टेशनवर दंगा झाल्याचे निमित्त होऊन ते तिथे आश्रमात महात्मा गांधी आहेत, हे लक्षात आल्यावर परीक्षा नि गाडी सोडून महात्मा गांधींच्या आश्रमात दाखल झाले. ती त्यांची नि महात्मा गांधींची पहिली भेट. पुढे वर्षानंतर ते तर्कतीर्थ पदवीस बसले व उत्तीर्ण झाले. काशी मुक्कामी त्यांनी राजेश्वर शास्त्री द्रवीड, पर्वतीयशास्त्री, वामाचरण भट्टाचार्य इत्यादींकडून न्याय, राज्यशास्त्र इ. संस्कृतमधून ग्रहण केले.

सन १९२१ ते १९३० या काळात ते प्राज्ञपाठशाळेत शिकवीत. त्या काळात संस्कृत, इंग्रजीनंतर त्यांनी आपल्या वाचनाची दिशा बदलून ते मराठी वाचू लागले. गोविंद सखाराम सरदेसाई यांचे 'मराठी रियासत' (आठ खंड) वाचले. विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या 'निबंधमाला'ने मराठी साहित्य समीक्षेची दृष्टी दिली. गोपाळ गणेश आगरकरांच्या 'निवडक लेखसंग्रह' वाचनाने तर्कतीर्थ अंधश्रद्धा आणि कर्मकांडातून मुक्त होत धर्मनिरपेक्ष व पुरोगामी बनले. शि. म. परांजपे यांच्या 'काळातील निबंध' ने आणि 'तर्कसंग्रह दीपिका' ने तत्त्वज्ञानाची गोडी निर्माण केली. काव्यात केशवसुत, चंद्रशेखर, गोविंदाग्रज, अनिल, बा. भ. बोरकर वाचत मराठी काव्यातील तरल परतत्त्वाने ते प्रभावित झाले. साप्ताहिकांचा तो काल होता. 'केसरी', 'अग्रणी', 'चित्रा', 'प्रमोद', 'स्वराज्य' वाचत ते सन १९२३ पासून

लिहिते झाले. 'संग्राम' दैनिकात आणि 'प्रमोद'मध्ये त्यांनी 'कला', 'ठिणगी' सारखी सदरे (स्तंभ) सन १९३९ ते १९४५ च्या दरम्यान लिहिली. गांधीवादी असलेले तर्कतीर्थ रॉयवादी बनून गांधीवादावर टीका करू लागले. मानवेंद्रनाथ रॉय प्रभावामुळे ते क्रांतिकारक बनले. स्वातंत्र्यपूर्व काळात ते वक्ते, लेखक, टीकाकार, संपादक, भाषांतरकार बनत पंडित, शास्त्रीचे साहित्यकार केव्हा बनले, हे त्यांचे त्यांना कळले नाही. स्वातंत्र्योत्तर काळात सन १९५४ ला दिल्ली येथे संपन्न अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदी विराजमान झालेल्या तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी साहित्य अकादमी पुरस्काराच्या पहिल्याच वर्षी (१९५५) आपल्या 'वैदिक संस्कृतीचा विकास' या भाषण संग्रहासाठी तो मिळवून ते मराठी साहित्याच्या सर्वोच्च पदी विराजमान झाले.

सन १९३०-३२ च्या दरम्यानच्या कायदे मंडळाच्या चळवळीत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना दोनदा तुरुंगवास भोगावा लागला. या काळात त्यांचा परिचय द्वा. भ. कर्णिक यांच्याशी झाला. त्या काळात मानवेंद्रनाथ रॉय यांची क्रांतीसंदर्भातील पत्रके तुरुंगात येत असत. या नव्या विचारांनी तर्कतीर्थ प्रभावित झाले. "मूलतःच विरोधी असलेली विचारसरणी माझ्या विचारपंथात आल्याबरोबर क्षोभ उत्पन्न करून मला विचारास प्रवृत्त करते असा माझा फार जुना अनुभव आहे" असा कबुलीजबाब तर्कतीर्थांनी स्वतःच 'मी रॉयवादी का झालो' ('धनुर्धारी', दिवाळी, - ऑक्टोबर, १९४६, पृ. १३२) या शीर्षक लेखात देऊन ठेवला आहे. तुरुंगातून बाहेर आल्यावर तर्कतीर्थांनी 'मॅनिफेस्टो ऑफ दि कम्युनिस्ट पार्टी'चे वाचन 'न्यायमुक्तावली' आणि 'तर्कसंग्रहदीपिका'प्रमाणे उपपत्ती समजून घेऊन केले. यांनी एंगल्स, प्लेकानोव्ह वाचला. 'अँटी ड्युअरिंग', 'डायलेक्टिक्स ऑफ नेचर' वाचले. मार्क्सवादाच्या त्यांच्यावरील प्रभावाची साक्ष देणारे तर्कतीर्थांचे दोन ग्रंथ सांगता येतात- १) हिंदुधर्माची समीक्षा (१९४१) व जडवाद अर्थात अनीश्वरवाद (१९४१). 'धर्माची समीक्षा ही सर्व समीक्षेची सुरुवात असते' या मार्क्सच्या विचारांनी तर्कतीर्थांना समीक्षक बनवले. याच काळात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी मानवेंद्रनाथ रॉय यांच्या 'इंडिया इन ट्रांझिशन', 'दि व्हाइस ऑफ़ इंडिया', 'इंडिया: इट्स पास्ट, इटस प्रेजेंट अँड इट्स फ्युचर' सारखे ग्रंथ वाचले आणि ते पूर्णतः रॉयवादी झाले (१९४०).

तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी यांच्या वाचनाची कक्षा रुंदावली ती त्यांच्या कोशसंपादन कार्याने. प्रारंभीच्या काळात नारायणशास्त्री मराठे, 'धर्मकोश' आणि 'मीमांसा कोश' तयार करत असल्याच्या काळात (१९२५ ते १९६६) त्यांना कोश संपादनाचे अनौपचारिक प्रशिक्षण लाभले. त्यातून उपरोक्त कोशांशिवाय 'डिस्क्रिप्टिव्ह कॅटलॉग ऑफ संस्कृत मॅन्युस्क्रिप्ट्स' (भाग १व २) ची निर्मिती तर्कतीर्थांनी केली. 'मीमांसाकोश' (७ खंड) आणि 'धर्मकोश' (१५ खंड) यांच्या संपादन अनुभवावर 'मराठी विश्वकोश' (१५ खंड) त्यांनी निर्मिले, पण समग्र मराठी विश्वकोश (२० खंड) मध्ये त्यांचे लेखन दिसते. कोश संपादन

कार्यातील त्यांच्या प्रस्तावना त्यांच्या वाचन व्यासंगाची प्रचिती देणाऱ्या आहेत. या कार्यात त्यांनी २० हजार संस्कृत पोथ्या हाताळल्या. त्यांचा स्वतःचा ग्रंथसंग्रह ६० हजारांच्या घरात होता. मराठी विश्वकोशाचे ग्रंथालय त्यांच्या वाचन व्यासंगातून साकारले. इतके करूनही 'Encyclopaedia of Ignorance' (१९७७) चं वाचन त्यांना अस्वस्थ करतं आणि त्यांना आपले वाचन तोकडे असल्याची जाणीव मन कुरतडत राहाते. याच वर्षी (१९७७) 'एन्साक्लोपीडिया ब्रिटानिका' आपल्या कोशाच्या १५ व्या आवृत्तीच्या निमित्ताने २० बृहत खंडांबरोबर ८० लघु खंड प्रकाशित करते. आणि 'प्रोपीडिया' शीर्षक एक पथदर्शी खंड प्रकाशित करून तर्कतीर्थांना अस्वस्थ करतो.

हे खंड अनेक प्रकारे तर्कतीर्थांच्या पूर्वनाचनास आव्हान देतात. म्हणजे असे की 'एकूण' (Total) आणि 'संपूर्ण' (Whole) शब्द एक नाहीत. पहिला संख्यावाचक आहे तर दुसरा स्थितिदर्शक. 'एन्सायक्लोपीडिया ऑफ इग्नोरन्स' वाचून त्यांच्या लक्षात येतं की 'का' (Why) हा प्रश्न जोवर माणसाच्या मनात राहील, तोवर ज्ञात प्रदेशापेक्षा अज्ञाताचा समुद्र कायमच विस्तीर्ण राहाणार. स्वप्न, झोप, भूगर्भ, अवकाश, सापेक्षता या संकल्पना मानवाने अद्याप पूर्ण आकळलेल्या नाहीत. त्यांना पूर्णत्व येईपर्यंतचं वाचन अपूर्णच म्हणावे लागेल मानणारे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी आयुष्याच्या अंताच्या प्रवासापर्यंत अतृप्त, अस्वस्थ वाचक म्हणूनच जगले. मृत्यूच्या अंतिम क्षणी त्यांच्या छातीवर उपडं पडलेलं उघडं पुस्तक हेच सांगत होतं... माणसाला अंत आहे, वाचनाला नाही!

**(वाचन प्रेरणा दिन, मराठी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.**
**भाषण ,दि. १५ ऑक्टोबर, २०२१ दुपारी - १२.३०)**

○○○

# ५३.

# प्राज्ञपाठशाळा, 'नवभारत' आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

## प्रतिभा मिस्त्री (पोरे)

या शीर्षकातील तीन एकत्र पदे, ही स्वयंअर्थाने, प्रत्येक पद हे महाराष्ट्रातील एका पर्वाचे नाव आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासातील हे पर्व एक महत्त्वाचे पान आहे, या तीनही गोष्टींशी आपल्या आयुष्याचा कालखंड कुठे तरी जोडलेला असणे ही माझ्यासाठी खूप खोल समाधानाची बाब आहे. या तीनही पर्वांवर स्वतंत्रपणे लिहिणारे तज्ज्ञ येथे आहेत याचे मला भान आहे. माझी भूमिका येथे माझ्या जडण-घडणीत या साऱ्यांचा जो एक सामायिक परिणाम झाला त्याचा शोध घेणे ही आहे. एका अर्थाने ते प्रातिनिधिक चिंतन ठरावे. या सर्वांनी ज्या बौद्धिक संस्कृतीचा वारसा आम्हाला दिला, त्याचे आणि जो कालखंड त्यांनी आपल्या कामगिरींनी प्रकाशित केला त्याचेही, ही भूमिका माझी आहे.

### १. मराठी विश्वकोश

हा कालखंड आहे १९७१ ते १९८० या दशकाचा. मी मराठी विश्वकोशात १९७१-७८ या कालखंडात संपादकीय सहायक म्हणून काम करत होते. महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करून मी तेथे रुजू झाले होते. विश्वकोशाच्या इतिहासातही हा काळ खूप फलदायी झाला. पहिल्या खंडाचे मुद्रितशोधन पूर्ण करण्यासाठी मौज प्रेसला मी व एक सहकारी महिनाभर होतो. दीर्घ काळानंतर पहिला खंड प्रसिद्ध झाला. नंतर शासकीय मुद्रणालय वाई येथे आले व पुढील खंडांच्या छपाईला वेग चढला. सहा खंड या काळात प्रसिद्ध झाले. पुढील तीन खंडांच्या मुद्रित प्रती तयार झाल्या व त्यापुढील खंडांचे संपादन काम जवळजवळ पूर्ण झाले. इतके हे काम वेग घेत गेले. मी होते त्या वेळी रा. ग. जाधव मानव्यविद्या कक्षाचे प्रमुख संपादक होते व विज्ञान विभागाचे होते श्री. भदे. ज्यांना मी संपादकीय सहायक म्हणून मदत करत होते ते भा. ग. सुर्वे यांच्याकडे पाच विषय होते : तत्त्वज्ञान ज्यामध्ये भारतीय व पाश्चात्त्य दोन्हीही, धर्म ज्यामध्ये सर्व धर्मांच्या बाबतच्या नोंदी, मराठी सोडून

इतर सर्व भारतीय भाषा व साहित्य, मानसशास्त्र आणि भाषाशास्त्र (लिंग्विस्टिक्स) व लिपी. धर्म विषयांतर्गत हिंदू धर्मातील सर्व प्रमुख बाबींवर तर्कतीर्थ लिहीत व पारंपरिक बाबींवर 'धर्मकोशा'तील रंगनाथशास्त्री जोशी, श्री. केळकरशास्त्री इत्यादी शास्त्रीमंडळी लिहीत. पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाच्या नोंदी मुख्यत्वे प्रा. मे. पुं. रेगे लिहीत. त्यामुळे या सर्वांशी कामानिमित्ताने संपर्क येत होता, विशेषतः मी मा. शास्त्रीजींची लेखनिक म्हणून खूप काम केले. ते सत्तरीपुढे होते त्यामुळे तोंडी मजकूर सांगत. त्यांचा माझ्यावर विशेष लोभ होता. संदर्भाची पुस्तके काढणे, संदर्भ तपासणे, मजकूर नीट वाचून टाइप प्रत तपासून त्यांना वाचावयास देणे इ. सर्व काही केले. त्यांच्या घरीही प्रवेश होता. त्यांच्या काही दौऱ्यांतही बरोबर होते. त्यांच्यासमवेत कितीतरी बैठकांमध्ये नोंद ठेवण्यासाठी असे. व्यक्तिशः मी सामाजिक चळवळींमध्येही आघाडीवर होतेच. अचानक काही राजकीय हस्तक्षेपाने माझ्या प्रमोशनवरच्या जागेवर बाहेरील व्यक्ती आली. माझ्यामागे क्रम असलेले तिघे (रिझर्वेशन उमेदवार) होते. मी राजीनामा दिला (डिसेंबर १९७८). शास्त्रीजी व्यथित झाले. तुम्हाला पूर्वानुसारी प्रमोशन मिळवून देतो म्हणाले. पण मी म्हणाले, मग तुम्ही जे मला दिले आहेत त्या संस्कारांचाच हा पराभव होईल. माझ्या राजीनाम्याने त्यांना दुःख झाले.

**२.** या लेखात मी या कालखंडाचा दोन भागांमध्ये विचार करणार आहे. पहिला भाग आहे : ‘नवभारत, प्राज्ञपाठशाळा यांचा ज्ञानवारसा’ आणि दुसरा भाग आहे ‘मराठी विश्वकोश’ आणि तर्कतीर्थ यांचा. समूहाचे अध्वर्यू वाईकर जगन्नाथ जाधव यांचा मोलाचा वाटा होता. या ग्रंथ संग्रहाचे जतन होणे फार आवश्यक आहे. विशेषतः दुर्मीळ प्राचीन पोथ्यांचे हे ग्रंथालय दानशूर व्यक्तीच्या प्रतीक्षेत आहे.

### ३. नवभारत

डॉ. सरोजा भाटे, अध्यक्ष प्राज्ञपाठशाळामंडळ यांनी ‘नवभारत’वर व त्यामधील ज्ञानसंदर्भावर उत्तम लिहिले आहे. एक-एक अंक संदर्भमूल्य असलेला आहे. ही एक दीर्घ परंपरा आहे. मला अजून आठवतात ते काँग्रेस पक्ष (तत्कालीन राजकीय पक्ष) याच्यावर त्यांनी काढलेले दोन ऐतिहासिक दस्तऐवज असलेले खंड. एका महत्त्वाच्या भारतीय इतिहासाच्या एका पर्वाच्या साक्षीदार असलेल्या या पक्षावर असे संपूर्ण मूलभूत चर्चा करणारे असे अंक भारतात अन्यत्र कुठे निघाले असतील असे मासिकांच्या इतिहासात मला वाटत नाही. अशी खूप उदाहरणे आहेत. तत्त्वज्ञ, तज्ज्ञ व अभ्यासक यांना एकत्र करणारे हे त्रैमासिक महाराष्ट्राच्या सांस्कृतिक सारस्वताचा एक गौरवास्पद आलेख दाखवते. ते आजही उत्तम चालू आहे याचा आनंद आहे. पण त्यांतील संदर्भमूल्ये असणाऱ्या लेखांची स्वतंत्र ग्रंथरूपाने नोंद व्हावी व ते जतन व्हावेत असे वाटते. दानशूर व्यक्तींची यासाठीही प्रतीक्षा प्राज्ञपाठशाळामंडळ करत असेलच.

## ४. प्राज्ञपाठशाळामंडळ, नवभारत आणि विश्वकोश

'धर्मकोशा'च्या वरच्या मजल्यावरच मराठी विश्वकोश कार्यालय प्राज्ञपाठशाळामंडळाच्या इमारतीत आहे. तळमजल्यावर 'कला-विषयक' काम (फोटो, चित्रे, प्लेट्स इ.) विज्ञान विभाग होता व मराठी विश्वकोश ऑफिस आणि दुसऱ्या मजल्यावर मानव्यविद्या, तर्कतीर्थ यांचे कार्यालय. विश्वकोशाची ४०,००० संदर्भ पुस्तके असलेली व सर्व उत्तम नियतकालिके, उपलब्ध असलेली उत्तम ग्रंथालयही तेथेच आहे. विज्ञान विषयांतर्गत ६५ वर विषय व मानव्यविद्या अंतर्गत तेवढेच, असे एकूण एकशे चाळीस विषयाचे संपादन तेथे होई. त्यासाठी भारतभरातून अतिथी संपादक येत. याचा फायदा नवभारत, प्राज्ञपाठशाळामंडळ व वसंत व्याख्यानमालेला होई. मंडळ या अतिथी संपादकांच्या निवासाची भोजनाची व्यवस्था ठेवी. हे विद्वान नवभारतमध्ये लिहीतही असत. प्राज्ञपाठशाळामंडळाच्या 'सरस्वत्युत्सवा'ची बौद्धिक मेजवानी हाही एक समृद्ध अनुभव असे आम्हा सर्वांना वाटे. 'केवलानंद सभागृह' तेव्हा या उत्सवात श्रोत्यांनी भरलेले असे. अनेक दुर्मीळ नेते ऐकले आहेत. बॅ. नाथ पै यांचे भाषण अजूनही लक्षात आहे.

## दुसरा भाग : विश्वकोश व तर्कतीर्थ यांचा वारसा

### १. विश्वकोशातील प्रगल्भ बौद्धिक वातावरण

शास्त्रीजी व प्रा. मे. पुं. रेगे यांचा या बौद्धिक वातावरणनिर्मितीत फार मोठा वाटा आहे. हे दोघे आम्हा तरुणांचे स्फूर्तिस्थान होते. रेगे यांनी तरुणांसाठी शिबिरे घेतली होती. छान चर्चा होत. अभ्यागतांचे, विचारवंतांचे आदान-प्रदान होई, त्यांचा साक्षात परिणाम होई. दुराग्रह, दुराभिमान यांना थारा नसे कारण इतके तज्ज्ञ तेथे वावरत अतिथी म्हणून, की भाग्यच आमचे त्यांना जवळून ऐकता-पाहता आले. प्रत्येक टेबलवर पुस्तकांचे, संदर्भाचे अक्षरशः ढीग असत. ग्रंथांच्या जगातले ते एक मुक्त व्यासपीठ होते! त्याबरोबरच लेखन संक्षेप, लिखाणातील अचूकता, नेमके संदर्भ आणि नेमक्या शब्दांमध्ये अभिव्यक्ती करणे हे सर्व शिकता आले. प्रत्येक नोंदीला शब्दमर्यादा असे व ती पाळली जाई. चित्रे, फोटो, रेखाटने इत्यादीही अचूक असावे लागे, संदर्भाची नेमकी व नीट नोंद हवी हेही पाहिले जाई. अतिथी अभ्यागत तज्ज्ञांच्या लेखांचे संपादन होई. आंतरराष्ट्रीय सहकार्य मिळवले जाई. मला आठवते त्या काळात सोव्हिएत युनियनने काही खास संदर्भ केवळ या विश्वकोशातील विज्ञान विभागाला उपलब्ध करून दिले होते. माझा साहित्य विषय होता, मला भारतीय भाषा-साहित्य यांचा परिचय झाला व मनाच्या जाणिवा अधिक व्यापक व विकसित झाल्या. मला खात्री आहे, विद्यार्थ्यांवरही 'विश्वकोश' खंड असाच परिणाम करतील, भारतातील एकमेव असा हा विज्ञान व मानव्यविद्या यांचा संगम साधणारा 'ब्रिटिश एन्स्लायकोपीडिआ'सारखा महाकोश आहे.

**२. विश्वकोश आणि राजकारण**

शास्त्रीजी आणि यशवंतराव चव्हाण यांचे मैत्र सर्वांना परिचित आहे. महाराष्ट्र निर्मितीचे स्वप्न प्रत्यक्षात आणून ते वास्तवात उतरवणारे हे नेतृत्व साहित्य-साधनेने परिपोष केलेले प्रगल्भ, सुजाण, समंजस व शांत स्वरुपाचे होते. त्यांना ऐकणे हा फार आनंददायक अनुभव असे. त्यांच्या नेतृत्वाखाली वाई येथे 'मराठी विश्वकोशा'ची मुहूर्तमेढ रोवली गेली व त्यांचा पूर्ण सहकार्याचा वरदहस्त या कार्यालयाला मिळाला. महाराष्ट्रातील सर्व लहानथोर राजकीय नेते शास्त्रीजींना भेटायला येत. तसेच किसन वीर अनेकदा तिथे असत. असा महाराष्ट्राच्या राजकीय समृद्धीचा हा काळ होता. 'मराठी विश्वकोशा'च्या प्रांगणात कोणताही राजकीय हस्तक्षेप शास्त्रीजी असेपर्यंत कधीही झाला नाही. एका भेटीत मला आठवते यशवंतराव तर्कतीर्थांना म्हणाले होते, "बरे झाले तुम्ही या खिंडीत (प्राज्ञपाठशाळा गल्ली, ती अरुंद आहे.) राहता, राजकारणात पडून आम्हाला खिंडीत पकडले नाहीत!'' यशवंतरावांचाही माझ्यावर प्रभाव आहे.

**३. कार्यालयीन काम करणाऱ्यांचाही विकास**

या वातावरणात काम करणारे आम्हीही विकसित होत होतो. माझ्या कविता 'सत्यकथा', 'हंस', 'संदर्भ', 'अनुष्टुभ' इ. मध्ये प्रसिद्ध झाल्या. 'समाज प्रबोधन पत्रिके'त (तेव्हा भा. शं. भणगे संपादक होते.) लिहायला सुरुवात केली होती. एस. डी. इनामदार, अनिल रघुनाथ कुलकर्णी कथाकार म्हणून नावारूपाला येत होते. डॉ. सु. र. देशपांडे यांचे पुरातत्त्वविद्येवरील लिखाण गाजत होते. (पुढे या सर्वांची पुस्तकेही आली.) चंद्रहास जोशी लिहीत होते. रा. ग. जाधव यांची पुस्तके बाहेर येत होती. असे अनेक जण आम्ही विकसित होत होतो. व्यक्तिशः त्या वेळी मी मार्क्सवादाकडे आकर्षित झाले होते, आणीबाणीत एक शिबिर केले ते शास्त्रीजींनी मला सांभाळायला सांगितले होते, कारण मी सरकारी नोकरीत होते! मला आठवते, एकदा लेखन चालू असताना या काळात एक महत्त्वाचा फोन आला. तो शास्त्रीजींना 'पद्म' सन्मान देण्याबाबत होता, पण शास्त्रीजींनी स्पष्ट सांगितले होते, माझ्या व्यक्तिस्वातंत्र्यावर कोणताही संक्षेप येता कामा नये. विशेषतः अभिव्यक्ती व लेखनस्वातंत्र्यावर! अगणित चर्चा व बैठका होत. कामांच्या संदर्भात आणि शास्त्रीजींचे मार्गदर्शन अचूक असे. एक उदाहरण, तसे साधे बारा ज्योतिर्लिंगाच्या नोंदीला फोटो शिवलिंगाचे का मंदिर वास्तूचे त्यावर एका क्षणात त्यांनी सांगितले, मंदिर वास्तूचे द्या, त्या परिसराचा तीर्थक्षेत्राचा संदर्भ हवा!

**४. प्राज्ञपाठशाळामंडळ, 'धर्मकोश', 'नवभारत', 'विश्वकोश' आणि शास्त्रीजी**

या लेखाचे शीर्षक असे एकत्र करण्याचे कारण असे की, या सर्वांना म्हणजे धर्मचिंतन, समाजकारण, साहित्यकारण आणि ज्ञानसंगोपन या सर्वांचा एकच ठिकाणी संगम असे हे असाधारण काम या परिसरात झाले. तज्ज्ञ आणि सामान्य माणूस व विद्यार्थी यांना एकत्र आणले गेले. स्वतः शास्त्रीजी कोणत्याही सभेला बोलावयाला नाही म्हणत नसत.

लहान-थोर साहित्यिक त्यांना भेटत. लहानमोठ्या पुस्तकांना ते अभिप्राय लिहून देत. प्रचंड जनसंपर्क हे त्यांचे वैशिष्ट्य होतेच, त्याच वेळी ज्ञानक्षेत्रांमधील तज्ज्ञांमध्येही एक आदरपूर्वक दबदबा होता त्यांचा. राजकारणातील सर्व पक्षांची लहान-थोर मंडळी त्यांना भेटल्याशिवाय वाईतून क्वचितच जात. तसेच प्रा. मे. पुं. रेगे, तरुण कार्यकर्ते, लेखक यांच्या कायम वेढ्यात रमलेले रेगे आठवतात. दोघेही रसिक व उत्तम विनोदबुद्धी लाभलेले. रेग्यांनी 'न्यायशास्त्रा'चा अभ्यास शास्त्रीजींसमवेत केला.

त्यामुळे प्राज्ञपाठशाळामंडळ हे महाराष्ट्राच्या प्राज्ञ संस्कृतीने गाठलेले एक शिखर आहे, त्याच्या दर्शनाने ज्ञानोपासनेला आपल्या वारीची धन्यता झाली असे वाटेल.

**५. माझ्यावरील शास्त्रीजींचा प्रभाव**

माझ्या राजीनाम्याने मी जरी बाहेर पडले तरी मनात खंत नाही, इतके काही मला तेथे मिळाले आहे. धर्माबाबतची डोळस चिकित्सक वृत्ती, त्यामधील नीर-क्षीर विवेक, तत्त्वज्ञानाची मूलभूत बैठक पक्की होणे आणि वैश्विक तत्त्वज्ञानाची तोंडओळख ही काही महत्त्वाची. एका प्रसंगाने येथे शेवट करते. 'संत ज्ञानेश्वर' या विषयावर लेखन चालू होते. वेळ संध्याकाळची असावी. संत नामदेवांच्या ज्ञानदेव समाधीचा मजकूर चालू होता. आम्ही शांत व एकाग्र झालो होतो आणि अचानक शास्त्रीजी थांबले. संत निवृत्तिनाथांसारखेच तेही सद्गदित झाले होते. डोळ्यांतून पाणी वाहत होते. माझीही तीच गत होती. मी लेखन थांबवून बाहेर पडले.

- ज्ञान, ज्ञानी आणि ज्ञानेश्वर यांचा तो भावोत्कट ज्ञानसंगम होता!

**(नवभारत, ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर, २०२३, पृ. ४५ ते ४८)**

○○○

## ५४.

# 'नवभारत' आणि तर्कतीर्थांमधील अनुबंध

## डॉ. सुनीलकुमार लवटे

''भारत स्वतंत्र झाल्यावर महाराष्ट्रातील लोकांचे वैचारिक प्रबोधन व्हावे, यासाठी वैचारिक मासिक काढावे असा मनोदय श्री. हरी कृष्ण मोहनी यांनी शंकरराव देव यांच्याजवळ व्यक्त केला. शंकररावांनीही या विचाराला पुष्टी देऊन आचार्य शंकरराव जावडेकर तसेच आचार्य स. ज. भागवत यांच्याशी चर्चा करून 'नवभारत' मासिक काढण्याचे ठरवले.''[१] त्यानुसार २ ऑक्टोबर, १९४७ रोजी 'नवभारत'चा पहिला अंक प्रकाशित झाला. अंकाचे प्रकाशन सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला, ३६१, सदाशिव पेठ, पुणे - २ यांचेमार्फत करण्यात आले. प्रारंभिक संपादक मंडळात आचार्य शंकरराव द. जावडेकर, आचार्य स. ज. भागवत, हरी कृष्ण मोहनी, शंकरराव देव (संचालक) व प्रा. वि. म. बेडेकर (कार्यकारी संपादक) यांचा अंतर्भाव होता. नवभारत कचेरी २१९, शिवाजीनगर, पुणे - ५ होती. अंक विश्वास प्रेस, २९१, शनिवार पेठ, पुणे येथून मुद्रित व्हायचा. अंकाची किंमत १/- रुपया होती. अंकाची वार्षिक वर्गणी ९/- रुपये तर सहामाही ५/- रुपये मुक्रर करण्यात आली होती. मुद्रक व प्रकाशक चिं. ग. मराठे होते.

पहिल्या अंकाच्या प्रारंभी पृ. ३ ते ५ वर 'संचालकांचे मनोगत' शंकरराव देवांच्या स्वाक्षरीने प्रकाशित करण्यात आले होते. त्यातून 'नवभारत' सुरू करण्यामागील ध्येय व भूमिका स्पष्ट होते. त्यानुसार सात्विक सुखाची व शांतीची दिवाळी उजाडावी म्हणून 'नवभारत' सुरू केले होते. 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' तद्वतच 'सत्यं शिवं सुंदरम्' हे मासिकाचे ब्रीद होते. पशुत्व आणि देवत्वाच्या सीमेवर उभ्या मानवास देवत्व व अमरत्व लाभावे म्हणून हा खटाटोप होता, हे स्पष्ट होते. त्यागाने अमरत्व लाभते या उपनिषद ऋचेवर ('न धनेन, न प्रजया त्यागेनैके अमृतत्वमानुशः') विश्वास ठेवत मानवाची घडण या मासिकाद्वारे करण्याचा मनोदय संचालक व्यक्त करतात. व्यष्टी व समष्टी यांचा संबंध काय? व्यष्टीला स्वातंत्र्य आहे काय? असले तर त्याची मर्यादा कोणती? समष्टीसाठी व्यक्तीने आपले स्वातंत्र्य व सुख होम

करावे का? अशा प्रश्नांच्या गुंत्याची सोडवणूक करण्याचा इरादा हे मासिक सुरू करण्यामागे संचालकांच्या मनात होता, हे सदर मनोगत वाचत असताना लक्षात आल्यावाचून राहात नाही. 'संचालकांचे मनोगत' जिज्ञासूंनी मिळवून वाचावे इतके, ते मनोज्ञ आहे. खरे तर ‘नवभारत’ मासिकाने आपल्या स्थापनेचा 'अमृत महोत्सव' साजरा करत असताना ते पुनर्प्रकाशित करणे औचित्यपूर्ण ठरेल असे मला वाटते. ते माझ्या संग्रही आहे.

ध्येय नि वास्तव यांतील सामाजिक दरी नेहमी विषम राहात आली आहे. इतके मोठे ध्येय उराशी बाळगून या ध्येयवादी, स्वातंत्र्य चळवळीतील सेनानींनी हे मासिक सुरू केले खरे, पण त्याला बुद्धिजीवी वर्गाचा अपेक्षित वर्गणी-आधार न लाभल्याने केवळ ध्येयवादावर मासिक चालवणे दुरापास्त असल्याची जाणीव आरंभिक पाच-सहा वर्षांतच संचालक मंडळास झाली. हे मासिक कोणत्यातरी ध्येयवादी संस्थेने घेऊन सुरू ठेवावे असा प्रयत्न सहा वर्षे पूर्ण होताच संचालक मंडळाने (सुरस राष्ट्रीय ग्रंथमाला) सुरू केला. तत्पूर्वी समाजातील समविचारी व्यक्ती व संस्थांकडून मासिकाच्या आर्थिक स्थैर्यासाठी, स्थायी निधी उभारायची कल्पना पुढे येऊन त्यानुसार समाजातील काही मान्यवरांची तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठित करण्यात आली. सदर समितीत न्यायमूर्ती भवानीशंकर नियोगी, श्री. देवकीनंदन नारायण, आचार्य स. ज. भागवत, श्री. बाबुराव जगताप, स्वामी रामानंद तीर्थ, प्रा. गोवर्धन पारीख, प्रा. म. अ. चान्सरकर, श्री. वि. म. बेडेकर, श्री. कृ. ना. फडके, श्री. मा. प. मंगुडकर (कार्यवाह) यांचा समावेश होता. या समितीने ‘नवभारत’ मासिकाच्या आर्थिक स्थैर्यासाठी निधी संकलनासाठी साहाय्य करावे म्हणून 'विनंती पत्र' प्रसृत केले होते. या विनंती पत्रावर महाराष्ट्रातील ७५ मान्यवरांच्या संमतीदर्शक स्वाक्षऱ्या होत्या. त्यांच्या नावाने हे आवाहन करण्यात आले होते. त्यात सर्वश्री. महर्षी धों. के. कर्वे, डॉ. मुकुंदराव जयकर, महामहोपाध्याय डॉ. मा. श्री. अणे, स्वामी केवलानंद सरस्वती (वाई), स्वामी कुवलानंद (लोणावळे), बा. ग. खेर, महामहोपाध्याय द. वा. पोतदार, डॉ. के. ल. दप्तरी, डॉ. धनंजयराव गाडगीळ, केशवराव जेधे, न. वि. तथा काकासाहेब गाडगीळ, भाई माधवराव बागल, नामदार यशवंतराव चव्हाण, वि. द. घाटे, वि. स. खांडेकर, इतिहासकार न. र. फाटक, गं. त्र्यं. माडखोलकर, आचार्य प्र. के. अत्रे, डॉ. इरावती कर्वे, प्रा. प्रभाकर पाध्ये, साथी ग. गोरे, साथी एस. एम. जोशी, दानशूर प्रभाकरपंत कोरगावकार, डॉ. जे. पी. नाईक प्रभृती मान्यवरांचा अंतर्भाव होता. पुढे त्यात संत तुकडोजी महाराजांच्या नावाचीही भर पडलेली दिसते. तरीही दोन वर्षे जिवापाड धडपड आणि पराकाष्ठेचे नि निकराचे प्रयत्न करून पण अवघे ५०००/- रुपयेच (पाच हजार) जमू शकले. तेपण मागील दोन वर्षांतील (१९५५-५७) तोटा भरून काढण्यात खर्ची पडले असे माझ्या संग्रही असलेल्या ‘नवभारत’ कागदपत्रे व पत्रव्यवहारांतून स्पष्ट होते. हे मासिक श्री. मौनी विद्यापीठ, गारगोटी किंवा प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाईने चालविण्यास

घ्यावे असा प्रयत्न होता. अंतिमतः सन १९५४-५५ पासून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी केलेले साहाय्य लक्षात घेऊन सदर मासिक सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला ट्रस्ट, पुणेच्या १४ जुलै १९५७ रोजी उरळी कांचन, पुणे येथे संपन्न झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाईस देण्याचा निर्णय घेण्यात आला. या सभेस प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाईचे विश्वस्तही उपस्थित होते. त्याचा दीर्घ पत्रव्यवहार अटी, शर्ती, अपेक्षा इ. उपलब्ध आहे. त्यानंतर तर्कतीर्थांनी प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाईच्या सभासद चालक मंडळींस प्राज्ञपाठशाळा मंडळाचे अध्यक्ष नात्याने दि. ६ ऑगस्ट, १९५७ रोजी एक पत्र लिहिले होते. त्यात त्यांनी मंडळाकडे 'नवभारत' मासिक चालविण्याची अनुमती मागत म्हटले होते की,

*"मी नवभारत मासिक स्वतःच्या जबाबदारीवर गेली चार वर्षे चालविले. सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला ट्रस्टचे त्यावर केवळ औपचारिक नाव होते. ते आता जात आहे. सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला ट्रस्ट प्राज्ञपाठशाळा मंडळास हे मासिक सर्व हक्कांसह देण्यास उत्सुक आहे.*

*ते प्राज्ञपाठशाळा मंडळाने मासिक स्वतःच्या हक्काने चालवावे. मी आपणास आश्वासन देतो की, प्राज्ञपाठशाळा मंडळाच्या इतर कोणत्याही निधीस किंवा उत्पन्नास धक्का न लावता म्हणजे त्यातील अंश न उचलता हे मासिक चालविता येईल.*

*असे मासिक चालविणे ही गोष्ट प्राज्ञपाठशाळा मंडळाच्या सांस्कृतिक संवर्धन कार्यात बसेल. संपादक मंडळाची पुन्हा नवी घडी मंडळाने मासिक हाती घेतल्यावर प्राज्ञपाठशाळा मंडळास करता येईलच.*

*तरी हे मासिक चालविण्यास कृपया संमती द्यावी.*

*कळावे ही विनंती.*

*आपला,*
लक्ष्मणशास्त्री जोशी
*अध्यक्ष,*
*प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई.*

प्रत्यक्षात ऑक्टोबर-नोव्हेंबर, १९५६ च्या जोड अंकापासून 'नवभारत' मासिक प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाईमार्फत सुरू झाले. कार्यकारी संपादक म्हणून प्रा. गोवर्धन पारीख कार्यरत झाले. मासिकाचे दहावे वर्ष होते. तत्पूर्वी ९ वर्षे 'नवभारत' मासिकात वैचारिक साहित्याबरोबर ललित साहित्यही प्रकाशित होत असे. या काळातील 'नवभारत' मासिकाचे साहित्यिक योगदान अधोरेखित करणारा एक लेख ''नवभारत'ची तपस्या'[२] शीर्षकाने प्रा. वसंत ज. जोशी यांनी लिहिला आहे. त्यात त्यांनी 'नवभारत'मध्ये प्रकाशित साहित्यविषयक वैचारिक लेख, समीक्षा, परीक्षणे, कथा, कविता, अनुवाद, चरित्र, आत्मचरित्र, व्यक्तिलेख इत्यादींचा परामर्श घेतला आहे. या काळातील वृत्तपत्रे, नियतकालिके इत्यादींनी

'नवभारत'च्या या कामगिरीची प्रशंसा केल्याचे दिसून येते. मात्र खांदेपालटानंतर 'नवभारत' मासिक जे पूर्ण वैचारिक नियतकालिक बनले, ते आजअखेर त्या स्वरूपात फारसा फरक पडलेला नाही. तसाच 'नवभारत'च्या आर्थिक स्थितीतही बदल झालेला दिसत नाही. कारण 'नवभारत'च्या सन १९९१ च्या दिवाळी अंकात अर्थसाहाय्य करण्याचे, आर्थिक स्थिती ठीक नसल्याने स्थायी निधीसाठी मदतीचे आवाहन करण्यात आलेले असून त्यावर सर्वश्री. बापू काळदाते, वि. भि. कोलते, ना. ग. गोरे, गोविंद तळवलकर, देवदत्त दाभोळकर, वि. वा. शिरवाडकर, राम शेवाळकर, गोविंदभाई श्रॉफ, बा. द. सातोस्कर यांची नावे आहेत.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा 'नवभारत'च्या जडणघडणीत प्रारंभीपासूनच संबंध असल्याचे वरील विवेचनावरून स्पष्ट होईल. ते जरी संस्थापकांपैकी नसतील, पण प्रस्तुत मासिकाच्या गेल्या ७५ वर्षांच्या विकास वाटचालीत किमान सात दशके तरी त्यांचा सिंहाचा वाटा राहिला आहे. हा वाटा केवळ व्यवस्थापनाचा नसून नियोजन, संपादन, लेखन यातूनही तो दिसून येतो. 'नवभारत' मासिकाच्या मे, १९४८ च्या अंकात त्यांचा पहिला लेख प्रकाशित झाला होता. 'भारतीय तत्त्वज्ञानः उदय व विकास' असे त्याचे शीर्षक होते. तर शेवटचा लेख 'विज्ञान व संस्कृती' असून तो जानेवारी, १९९१ च्या अंकात प्रकाशित आहे. सन १९४८ ते १९९१ या ४३ वर्षांच्या काळात लेख, भाषणे, परीक्षणे, मुलाखती, पत्रे असे तर्कतीर्थांचे विपुल साहित्य 'नवभारत'मध्ये प्रकाशित झालेले आहे. प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाईस शंभर वर्षे सन २०१६ ला झाली. त्या अनुषंगाने मंडळाच्या विकास व कार्याचा आढावा घेणारा जो इतिहास ग्रंथ 'प्राज्ञप्रबोध'[३] श्री. मा. भावे यांनी संपादला आहे, त्यात 'नवभारत' मासिकाचाही साद्यंत इतिहास आहे. त्यामुळे त्याची उजळणी येथे करण्याचे काहीच कारण नाही.

परंतु तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या 'नवभारत'मधील लेखांचा विचार क्रमप्राप्त ठरतो. त्यातही 'नवभारत'मध्ये प्रकाशित व्याख्याने उल्लेखनीय आहेत. 'ज्योतिषशास्त्रापुढील प्रामाण्याचे आव्हान' या सन १९६१ च्या 'महाराष्ट्र राज्य ज्योतिष परिषद, मुंबई'च्या अध्यक्षीय भाषणात तर्कतीर्थांनी स्पष्ट केले आहे की, धर्मशास्त्र आणि ज्योतिषशास्त्र यांचा निकटचा संबंध आहे. ज्योतिष पंचांगावर आधारित असते. पंचांगे ही पूर्वी 'नॉटिकल अल्मनॅक'वरून तयार केली जात असत. त्यांना सायन गणना मान्य असे. अठराव्या शतकात (१७९१) ती दृक् गणिताच्या आधारे तयार होऊ लागली. सर्वश्री. केरोपंत छत्रे, शंकर बाळकृष्ण दीक्षित, व्यं. बा. केतकर, के. ल. दप्तरी प्रभृती मान्यवरांच्या प्रयत्नांतून समन्वयी पंचांगे तयार होऊ लागली. सन १९५२ ला भारत सरकारने पंचांग सुधार समिती नेमली होती. हा इतिहास विशद करून तर्कतीर्थांनी आपल्या या अध्यक्षीय भाषणात फलज्योतिष, मुहूर्तशास्त्र हे ज्योतिषाचे अंग असल्याचे स्पष्ट केले आहे. ज्योतिषशास्त्राशी गणिताचा निकट संबंध त्यांनी सांगितला आहे. अलीकडच्या काळात या शास्त्राने स्वतःस

खगोलशास्त्र व भूगोलशास्त्रास जोडून घेतल्याने ज्योतिषाचा प्रवास अनुमानाकडून अचूकतेकडे होत आहे. असे असले तरी ते गणितासारखे अचूक व पूर्ण विज्ञान नाही हे सांगायला तर्कतीर्थ कचरत नाहीत. गणित व ज्योतिष यांतील अंतर कमी होण्यावर आणि नव्या अल्मनॅकशी जुळणारी नवी पंचांगे हवीत जी प्रामाण्याच्या कसोटीवर खरी उतरतील असे त्यांचे म्हणणे होते.

एशियाटिक सोसायटी, मुंबईच्या ८ मे, १९७८ रोजी संपन्न भारतरत्न डॉ. पां. वा. काणे वर्षदिन (७ मे) व्याख्यानात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी 'हिंदूंच्या धार्मिक व सामाजिक सुधारणांचा इतिहास' या विषयावर आपले विचार व्यक्त केले होते. त्यात त्यांनी राजा राममोहन रॉय, महात्मा जोतीराव फुले, 'सुधारक'कार गोपाळ गणेश आगरकर, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, डॉ. रा. गो. भांडारकर प्रभृती मान्यवरांनी केलेल्या हिंदूंच्या धार्मिक व सामाजिक सुधारणांवर प्रकाश टाकत हे रेखांकित केले आहे की, ब्रिटिशांच्या आगमनामुळेच आणि विशेषतः विको, स्लेंगर, टॉयन्बी, सोरोकिन यांचा सरळ रेषेतील ऐतिहासिक आकृतिबंध मान्य केल्यानेच पारंपरिक चक्रनेमी सिद्धान्तास येथे शह दिला गेला. हे सर्व तर्कतीर्थ तर्क आणि प्रमाण यांच्या संयोगाने मांडत आपल्या धारणा स्पष्ट करताना दिसतात.

'विज्ञान व मानवी मूल्ये' या विषयास केंद्रित करून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी नगरपरिषद, कराड आयोजित 'यशवंतराव चव्हाण व्याख्यानमाला' अंतर्गत तीन व्याख्याने दिली होती. पैकी दोन व्याख्याने ‘नवभारत’मध्ये प्रसिद्ध झालेली आढळतात. 'जीवविज्ञानात दिसणारा मानव' आणि 'विज्ञान आणि संस्कृती'विषयक व्याख्यानांतून विचार व्यक्त करत तर्कतीर्थांनी म्हटले आहे की, माणूस समजून घेण्याचा प्रयत्न पूर्वापार होत आला आहे. वेदांत नि उपनिषदात 'कोऽयमात्मा' म्हणत आत्मा म्हणजे 'मी' सांगितले गेले आहे. सॉक्रेटिस वा येशू ख्रिस्ताने 'Know Thyself' म्हणत स्वतःस जाणून घेण्याचे केलेले आवाहन हा मानव शोधाचाच प्रयत्न होय. तर दुसरीकडे तर्कशास्त्र 'I Think, therefore I am' म्हणत मानवी अस्तित्वाची ठाम ग्वाही देत होते. जीवशास्त्र 'होमोसेपियन'ला शहाणा, प्रगल्भ जीव सिद्ध करते. काव्य, साहित्यात हाच जीव गंधर्व, अप्सरेच्या रूपात आपणांस आढळतो. ज्योतिर्विज्ञान, भौतिकशास्त्रानेही मानवाचा शोध घेतला आहे. ज्ञान-विज्ञानाच्या सांस्कृतिक प्रवासात मनुष्य बुद्धिजीवी बनत चालला आहे, तो बुद्धिबळाच्या आधारे. मंत्र, तंत्रावर आधारित जग कधीच बदलताना दिसत नाही. जग बदलते ते केवळ विज्ञान नि तंत्रज्ञानाच्या आधारे. मानवाचा सारा प्रयत्न सत्य शोधाचा असतो. त्यातून वीज, अणू, संदेशवाहन व्यवस्था मानवाच्या हाती आली. मानव प्रगत झाला तरी अपूर्णच आहे. पूर्णत्व मूल्याधारित असते. ते नैतिक असते. म्हणून नैतिकतेस सत्यमूल्य असते. तर्कतीर्थ या व्याख्यान त्रयींतून मानवी जीवनाच्या आत्मिक, भौतिक व नैतिक अंगांचा शोध घेत समजावतात की, या तीन

तत्त्वांचा समन्वय म्हणजे संस्कृती होय. विज्ञान हे संस्कृतीचे साधन व साधक तत्त्व होय. विज्ञान केवळ भौतिक अंगाने पाहणे तर्कतीर्थांना अपूर्णतासूचक वाटते. मानवी जीवनास पूर्णत्व मूल्य व नैतिकतेनेच लाभते.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी मराठीशिवाय हिंदी, इंग्रजीत भाषणे दिलेली आढळतात. ती महाराष्ट्राबाहेर उत्तर प्रदेश (वाराणसी) नि गुजरात (अहमदाबाद) येथे संपन्न अखिल भारतीय व्याख्यानमालेतील आहेत. त्यांची मराठी भाषांतरे 'नवभारत'ने वेळोवेळी प्रकाशित केली आहेत. लालमनी स्मृतिव्याख्यानमालेत सारनाथ (वाराणसी) येथे १८ फेब्रुवारी १९८७ रोजी झालेल्या व्याख्यानाचा विषय होता 'बौद्धधर्म व भारतीय संस्कृती'. हे व्याख्यान केंद्रीय उच्च तिब्बती शिक्षा संस्थान, सारनाथ, जि. वाराणसी या भारत सरकार स्थापित संस्थेतर्फे योजण्यात आले होते. मूळ भाषण हिंदीत झाले होते. ही संस्था दलाई लामा यांच्या विनंतीवरून पंडित जवाहरलाल नेहरू यांनी सुरू केली होती. या संस्थेत तिबेटी निर्वासित विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जायचा. त्यांना त्यांच्या सांस्कृतिक पार्श्वभूमीचे ज्ञान देऊन परंपरेचे उच्च शिक्षण दिले जायचे. आपल्या या भाषणात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्रींनी त्या विद्यार्थ्यांना सांगितले की, भारतीय संस्कृती समन्वयी असून तिच्यात हिंदू, बौद्ध, जैन धर्मांचा समावेश आहे. यात विविध दर्शने अंतर्भूत आहेत. हिंदू धर्मातील असहमत तत्त्वे व आचारांचा निरास व्हावा म्हणून बौद्ध नि जैन धर्म अस्तित्वात आले असले तरी त्यांचे पायाभूत तत्त्वज्ञान एकच आहे. वर्ण कर्माधारित आहेत, जन्माधारित नाहीत. या तीनही धर्मांत अनेक साम्यस्थळे आहेत. त्यांचा सविस्तर ऊहापोह या भाषणात तर्कतीर्थांनी केला आहे. भारतीय संस्कृतीची उच्च मूल्ये गौतम बुद्धांनी सांगितलेल्या चार आर्यसत्य नि अष्टांगिक मार्गात आहेत. उच्च नीतिशास्त्र सर्व धर्मांत एकच आहे. ते वैश्विक असून त्याचा मूलाधार विवेक आहे. दोन हजार वर्षांचा वैदिक, बौद्ध, जैन धर्मांचा इतिहास हा तात्त्विक संघर्षाचा असला तरी तो अंतिमतः सत्यशोधनाचाच ठरतो.

असेच आणखी एक भारतीय पातळीवरील तर्कतीर्थांचे व्याख्यान श्री. भानुभाई अध्वर्यु स्मारक व्याख्यानश्रेणीत २१ फेब्रुवारी, १९८८ रोजी संपन्न झाले होते. त्याचा विषय 'धर्म आणि नीती' असा होता. मूळ भाषण हिंदीत झाले होते. भानुभाई अध्वर्यू गुजरातेतील शिक्षक व पत्रकार होत. ते तेथील 'जनसत्ता' दैनिकास 'दुनिया : जैसे हमने देखी' हा स्तंभ लिहीत. वंचित, उपेक्षित, श्रमजीवी, शेतकरी वर्गाबद्दल त्यांना कणव होती. गुजरातमधील सेंटर फॉर सोशल चेंज ॲण्ड ॲक्शन, अहमदाबाद, गुजरात शेती विकास परिषद, अहमदाबाद, श्रमजीवी, भिलोडा इ. स्वयंसेवी संस्था मिळून ही व्याख्यानश्रेणी योजत असत. या व्याख्यानात आपले विचार व्यक्त करत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणाले होते की, धर्म नाही असा मनुष्यसमाज जगात नाही. जग हे धर्माच्या आधारावरच विभागलेले आहे. समाजावर राष्ट्रवाद व धर्मवादाचा प्रभाव आहे. आधुनिक वैज्ञानिक व तंत्रज्ञान क्रांतीमुळे

विभाजित जग एक होत आहे. त्यामुळे धर्मनिरपेक्ष समाज अस्तित्वात येत आहे. हे नवे जग इहवादी व मानवाधिकार समर्थक राहणार आहे. उच्च नैतिक मूल्ये प्रस्थापित होण्याचा हा अनुकूल काळ होय. धर्म कर्मकांड नि आत्मिक बाबींचा विचार करतो. आजची विज्ञाने मानवावरील धर्म प्रभावांचा अभ्यास करत आहेत. सर्व धर्मांच्या प्रचलित स्वरूपांपेक्षा नव्या विवेकाधारित, ऐहिक, कर्मकांडमुक्त, नैतिक आचरणावर भर देणाऱ्या समता व एकतेच्या धर्माची या भाषणात तर्कतीर्थांनी केलेली कल्पना व अपेक्षा असल्याने अनुकरणीय ठरते. त्यासाठी समाज प्रगल्भ असणे ही पूर्वअट खरी! असा समाज निर्माण करण्याचे आव्हान तर्कतीर्थांचे हे भाषण आपणापुढे ठेवते.

'नवभारत'च्या ऑगस्ट-सप्टेंबर, १९८१ च्या जोडअंकात 'भाषा व राष्ट्रीयत्व' या विषयावरील एक महत्त्वपूर्ण भाषण प्रकाशित झाले होते. ते 'व्यावहारिक मराठी : गरज, मागणी व पूर्ती' विषयावरील चर्चासत्राचे उद्‌घाटनपर भाषण होय. हे चर्चासत्र कुठे, केव्हा झाले त्याचा शोध घेऊनही लागला नाही. यात तर्कतीर्थांनी राष्ट्र आणि भाषासंबंध विशेषत्वाने वर्णिला आहे. राष्ट्र, राष्ट्रीयत्व, राष्ट्रवाद या साऱ्या संकल्पना भाषेशी निगडित असल्याचे अठराव्या शतकापासून दिसून येते. भाषेच्या आधारावर राष्ट्र निर्माण झाल्याचा इतिहास म्हणजे युरोप खंडातील अनेक राष्ट्रे होत. जर्मन, स्पेन, फ्रान्स, ब्रिटन, इटली, रशिया, अमेरिका ही मूलतः एकभाषिक राष्ट्रे होत. स्विट्झर्लंड, कॅनडासारखी बहुभाषी राष्ट्रेही जगात आहेत. भारत त्यांपैकीच एक. अन्य देशांतील राष्ट्रवाद आणि भारतातील राष्ट्रवादात फरक आहे. परकीय सत्तेला झुगारून देण्याच्या भावनेतून आपला राष्ट्रवाद उदयाला आला. स्वातंत्र्योत्तर काळातील भाषावार प्रांत रचनेतून इथे भाषिक अस्मिता टोकदार झाली. स्वातंत्र्यकाळात आपण राष्ट्रीयत्व व राष्ट्रवाद न जोपासल्याने आपणाकडे प्रांताप्रांतांमध्ये असंपर्क स्थिती निर्माण झाली आहे. भाषिक, गरज, मागणी व तिच्या पूर्ततेचे साधन शिक्षण होय. त्याचे माध्यम देशी भाषा (हिंदी) होऊ न शकल्याने आणि उच्च शिक्षणात इंग्रजी भाषेचे स्तोम माजवण्यातून इथे 'एक भाषा - एक राष्ट्र' असा अन्य देशांप्रमाणे असलेला राष्ट्रवाद व राष्ट्रीयत्वाची भावना आपल्याकडे रुजली नाही. भाषा व राष्ट्रीयत्व यांचा अभिन्न संबंध असतो, हे लक्षात घेणे गरजेचे आहे.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी 'नवभारत'मध्ये १९४७ ते १९९१ अशा सुमारे चार दशकांच्या काळात तत्त्वज्ञान, राजकीय, विविध वाद, धर्म, राजकीय पक्षविषयक, राजकीय कार्यकर्त्यांचं राजकारण, सामाजिक, ऐतिहासिक, शैक्षणिक, साहित्यिक, सांस्कृतिक लेख लिहिलेच; त्याशिवाय व्यक्तिलेख, प्रवासवर्णन, भाषांतरे इत्यादींचेही लेखन केले. विविध परिसंवादांतून मते व्यक्त केली. त्यांनी लिहिलेले विविध आत्मपर लेख एकत्र केले तर छोटेखानी आत्मचरित्र साकारू शकेल. तर्कतीर्थांनी विविध वृत्तपत्रे नि नियतकालिकांतून दिलेल्या आत्मपर मुलाखतीही अशाच आहेत. त्यातून तर्कतीर्थ आपल्या जीवनाच्या अनेक

अज्ञात पैलूंवर प्रकाश टाकतात. ‘नवभारत’मध्ये त्यांनी अनेक पुस्तकपरीक्षणे लिहिली आहेत.

त्यांनी ‘नवभारत’मध्ये तत्त्वज्ञानाविषयी जे गंभीर लेख लिहिलेत त्यात 'भारतीय नवजीवनाची पार्श्वभूमी', 'भारतीय तत्त्वज्ञान : उदय व विकास', 'मानवतावादी मूल्यांचा साक्षात्कार', 'आधुनिक भारतीयांतील तत्त्वज्ञानाचे दारिद्र्य', 'स्वातंत्र्यवीर सावरकरांची तात्त्विक बैठक व व्यवहार' उल्लेखनीय होत. राजकीय विचारधारांच्या दृष्टीने पाहू लागू तर मार्क्सवादाचे विवेचन करणारे लेख अनेक आहेत. त्यातून त्यांचा मार्क्सवादावरचा अधिकार स्पष्ट होतो. तो खरे तर ‘हिंदुधर्माची समीक्षा’ (१९४१) आणि ‘जडवाद अर्थात् अनीश्वरवाद’ (१९४१) ग्रंथांमधूनही सिद्ध होतो. एकीकडे महात्मा गांधींची प्रशंसा तर दुसरीकडे गांधीवादावर कोरडे ओढणारे लेखन (विशेषतः साप्ताहिक ‘चित्रा’मधून केलेलं) तर्कतीर्थच करू जाणोत. प्रमोदमधील 'ठिणग्या' सदरात केलेलं स्तंभलेखन आणि विविध राजकीय लेख, तसेच संग्राम दैनिकातील लेखन सूची उपलब्ध आहे, पण प्रत्यक्ष लेखन शोध घेऊन अद्याप हाती लागलेलं नाही. या सर्व लेखनाचा आणि विविध राजकीय पक्षांचा ऊहापोह करणारे लेखन वाचले की, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे क्रियाशील राजकारणी, राजकीय मतांचे विश्लेषक व अभ्यासक असल्याचे स्पष्ट होते. सन १९३६ ते १९४८ या त्यांच्या ‘रॅडिकल डेमोक्रॅटिक पार्टी’ काळातील राजकीय लेखन व अन्य काळातील राजकीय लेखन एखाद्या अभ्यासकाने संशोधन, तुलना, विश्लेषण करून निष्कर्ष काढायचे ठरवले तर त्याची मती गुंग झाल्याशिवाय राहणार नाही. तर्कतीर्थ राजकीय लेखनात 'लेफ्ट', 'राईट' करतात की 'अबाऊट टर्न' कळत नाही. म्हणून त्यांचे स्नेही व सहाध्यायी प्रख्यात पत्रकार, संपादक, समाजसेवक श्रीपाद शंकर नवरे यांना ‘शास्त्रीबुवांची मतांतरे आणि वेषांतरे’[४] व ‘शास्त्रीबुवा : एक प्रचंड कोडे’[५] असे दोन लेख लिहिणे भाग पडले होते.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या आत्मपर, परात्मपर, व्यक्ती आणि विचार, धर्म, संस्कृती, तत्त्वज्ञान, राजकारण, शिक्षण, भाषा, साहित्यविषयक पाऊणशेहून अधिक मुलाखती प्रकाशित आहेत. त्यापैकी सर्वाधिक मुलाखती एकट्या अनिल जोशी (सध्याचे प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाईचे कार्यवाह व पूर्वीचे दैनिक केसरीचे प्रतिनिधी) यांनी घेतल्या असून त्यांचा एक संग्रहच ‘संवाद : तर्कतीर्थांशी’[६] प्रसिद्ध आहे. त्या विविध विषयस्पर्शी असून तर्कतीर्थांचे सर्वंकष आकलन त्याद्वारे शक्य होते. प्रा. मे. पुं. रेगे यांनी घेतलेल्या व ‘नवभारत’मध्ये प्रकाशित 'अध्ययन व वैचारिक वाटचाल', 'शास्त्री-पंडितांच्या परिसरात तर्कतीर्थ', 'महाराष्ट्रातील संस्थात्मक जीवन' आणि 'सुटलेली कोडी' या प्रदीर्घ मुलाखती असून त्यातून तर्कतीर्थांची घडण, जीवनदृष्टी आणि वैचारिक बैठक अधोरेखित होते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या विविध मुलाखती वाचताना लक्षात येते की, त्या एकतर तर्कशुद्ध असतात, शिवाय सप्रमाणही! काही मुलाखतींतील

(विशेषतः 'आकाशवाणी'वरील) त्यांचे मौन मोठे बोलके असते. या मुलाखती तर्कतीर्थांना प्रज्ञावंत, ज्ञानवंत, पंडित, राजकारणी, मुत्सद्दी, व्यासंगी, बुद्धिजीवी सिद्ध करणाऱ्या आहेत. काही मुलाखतींत ते वर्तमानात प्रचलित, विचार प्रवाहांविरुद्ध भूमिका घेतात व त्यावर अटळ राहतात. काही मुलाखतींतील त्यांची मते त्या-त्या वेळी वादग्रस्त झालेली असतील, पण कालौघात शनैः शनैः ती समाजास सत्याची प्रचिती देत राहतात, यातच तर्कतीर्थांमधील द्रष्टा विचारक अनुभवास येतो. कालजयी मते मांडणारे तत्त्वज्ञ असोत की तर्कशास्त्री, समाज अंतिमतः त्यांचा उपासक व अनुयायी होतो. तर्कतीर्थ निवर्तून सुमारे तीन दशके लोटली. मागे वळून पाहताना त्यांच्या विद्वत् व्यक्तिमत्त्वाचा अचंबा वाटल्याशिवाय राहात नाही. 'कालाय तस्मै नमः' हेच खरे !

***

**संदर्भ सूची** :


१) **नवभारत : स्वरूप आणि कार्य,** डॉ. प्रतिभा प्रदीप पाटणे, स्नेहवर्धन प्रकाशन, ८६३, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३०. प्रथमावृत्ती - ११ मे, २०१४, पृष्ठे - ९०, किंमत ९०/- रुपये, संदर्भ पृष्ठ क्र. ५४.

२) **नवभारतची तपस्या,** वसंत द. जोशी, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, वर्ष - ५०, अंक २००-२०३, जानेवारी ते जून १९७७, पृष्ठ क्र. २६ ते ३५.

३) **प्राज्ञप्रबोध**, संपादक श्री. मा. भावे (शताब्दी ग्रंथ), प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई. प्रथमावृत्ती, डिसेंबर २०१६, पृष्ठे २४७, किंमत २५०/- रुपये.

४) **शास्त्रीबुवांची मतांतरे आणि वेषांतरे,** श्री. शं. नवरे, लोकमान्य, दि. १५ डिसेंबर, १९४४.

५) **शास्त्रीबुवा : एक प्रचंड कोडे**, श्री. शं. नवरे, मराठा, २२ फेब्रुवारी, १९७५.

६) **संवाद : तर्कतीर्थांशी,** अनिल जोशी (मुलाखत संग्रह), श्री. यशोदा प्रकाशन, कृष्णा, पत्रकारनगर, पुणे. प्रथमावृत्ती, २६ मे, २००१, पृ. १५८, किंमत १५०/- रुपये.



**(नवभारत, ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर- २०२२, पृ. ४९ ते ५५).**


○○○

# (ब) श्रद्धांजली लेख

५५.

# ज्ञान भास्कराचा अस्त

## डॉ. यु. म. पठाण

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना महाराष्ट्रात नि मऱ्हाटी माणसाच्या मनात गेली दशकानुदशकं एक अनोखं आदरणीय, श्रद्धामय स्थान होतं. त्यांचा नि माझा विशेष संबंध साहित्य संस्कृती मंडळ नि विश्वकोश मंडळ यांच्यामुळे आला असला तरी त्यापूर्वीच कित्येक वर्षांपासून मी त्यांच्या सहवासात होतो. सोलापूरच्या दयानंद महाविद्यालयात १९५३ ते ५९ पर्यंत मी मराठीचे अध्यापन करीत होतो, त्या वेळी मराठी वाङ्मय मंडळाच्या एका कार्यक्रमाच्या निमित्तानं आम्ही त्यांना निमंत्रित केलं होतं, त्या वेळेपासून.

तर्कतीर्थांच्या अनेक अभ्यासपूर्ण ग्रंथांच्या अध्ययनावर माझ्यासारख्या अनेक संशोधकांचा पिंड पोसला आहे. 'वैदिक संस्कृतीचा विकास' यासारखे त्यांचे ग्रंथ तर भारतीय संस्कृतीच्या व धर्मविचारांच्या अभ्यासकांना नंदादीपासारखे वाटतात. धर्मशास्त्राविषयीचं विपुल लेखन शास्त्रीजींनी केलं... सातत्यानं... वर्षानुवर्षं... त्यांच्या लेखनामुळे प्राचीन भारतीय धर्म नि संस्कृती यांच्या कितीतरी कक्षांवर प्रकाश पडला.

धर्म, दर्शन आणि संस्कृती यांविषयी वर्षानुवर्षे चिंतन व लेखन करूनही शास्त्रीजींच्या लेखणीला कधी एकरंगी वा अनावश्यक आग्रही विचारसरणीची मर्यादा पडली नाही. रॉयवादी विचारांचा फार मोठा प्रभाव त्यांच्या विचारसरणीवर असला तरी या विचारांचं परखड परिशीलन नि तिची कालसापेक्षता पारखून घेण्याची परखड वृत्तीही त्यांच्या स्वभावात होती, बुद्धिप्रामाण्य नि तर्कनिष्ठा यांचा सुंदर समन्वय त्यांच्या वाणीत आणि लेखणीत होता, आणि या अर्थानेही ते खरेखुरे 'तर्कतीर्थ' होते.

त्यांच्याबरोबरचे साहित्य-संस्कृती मंडळातले नि विश्वकोश मंडळातले दिवस मला आजही आठवतात. आजही दोन स्वतंत्र मंडळे आहेत नि त्याचे दोन स्वतंत्र अध्यक्ष नि समित्या आहेत. पण तर्कतीर्थांनी एके काळी या दोन्ही मंडळांचे अध्यक्षत्व अत्यंत समर्थपणे भूषविलं. या दोन्ही मंडळांनी कितीतरी प्रकल्प निर्माण केले नि ते पूर्णही केले. ग्रंथप्रकाशनार्थ

अनुदान, संशोधनवृत्त्या नि गौरववृत्त्या, नव्या लेखकांना प्रकाशनार्थ अनुदान, महत्त्वाच्या जागतिक साहित्याचा मराठीत अनुवाद, वाङ्मयप्रकल्प, नियतकालिकांना अनुदान इत्यादी कितीतरी योजना अनुमानून शास्त्रीजींनी साहित्य संस्कृती मंडळाच्या साह्यानं त्या प्रत्यक्ष कार्यान्वित केल्या. या कार्याचा त्यांचा उरक किती प्रचंड होता, याचा मला चांगलाच प्रत्यय आहे. कारण त्याचा एक साक्षीदार मीदेखील आहे.

साहित्य संस्कृती मंडळाचा एवढा प्रचंड व्याप सांभाळूनही शास्त्रीजी विश्वकोशाशीही तितकेच रममाण झाले होते. विश्वकोशाचं प्रत्यक्ष कार्यालय वाईलाच स्थापन केलं असल्यानं त्याच्या दैनंदिन कामकाजाशीही शास्त्रीजींचा प्रत्यक्ष संबंध येई. विश्वकोशाची योजना अनेक खंडांची असून, त्यांत कितीतरी विषयांच्या कितीतरी नोंदी मिळवणं, त्यांचं संपादन करणं, त्यांचं पुनर्सम्पादन नि पुनर्लेखन करणं, नवीन माहिती (नोंद मिळाल्यावर) मिळाली तर तिच्यामध्ये भर टाकून ती अद्ययावत करणं या साऱ्यांसाठीच शास्त्रीजी अहर्निश मार्गदर्शन व सुसूत्रीकरण करीत व हे काम त्यांनी जवळ जवळ पूर्ण करीत आणलं होतं. ज्ञानकोशकार डॉ. केतकर यांच्या डोंगराएवढ्या कामानंतर पुन्हा त्या प्रकारचं, काहीसं अधिक व्यापक स्वरूपाचं प्रचंड कोशकार्य शास्त्रीजींनी केलं. आता अशा स्वरूपाचं कार्य मराठी भाषेत नजीकच्या भविष्यकाळात होईल की नाही, याबद्दल मनात साशंकता दाटते.

या सर्व कार्यावरच शास्त्रीजींचं स्वतःचं लेखनही चालूच होते. प्रा. रा. ग. जाधव यांनी संपादित केलेल्या त्यांच्या लेखसंग्रहात शास्त्रीजींच्या विचारविश्वाच्या कितीतरी कडा उजळून निघतात. शास्त्रीजी केवळ अभ्यासिकेत बसून चिंतनमनन- लेखन परणारे पोथीपंडित नव्हते, तर ते लोकाभिमुख वृत्तीचे प्रखर विचारवंत होते. आपल्या प्रभावी वक्तृत्वाने त्यांनी उभ्या महाराष्ट्राच्या प्रबोधनाचे व्रत अंगीकारलं होतं. त्यासाठी त्यांनी केलेला अखंड संचार पाहिला, की महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार यांचं स्मरण होतं. वाईनं या संशोधनमहर्षींबरोबर जे तिसरे संशोधनमहर्षी दिले, ते होते प्रा. डॉ. ग. ह. ऊर्फ तात्यासाहेब खरे. माझ्या आयुष्यातले शास्त्रीजींचे दिवस हे आठवत राहावेत, असे दिवस होते. साहित्य संस्कृती मंडळ नि विश्वकोश यांच्या सभांच्या वेळी तर त्यांचा सहवास लाभेच, पण एरवीही त्यांना भेटायला मी अध्येमध्ये वाईला जात असे.

मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी विभागाचा प्रमुख असताना मी त्यांना दोन-तीन वेळा निमंत्रित केल होतं. एकदा ते आमच्या विभागाच्या व्याख्यानमालेचे महनीय प्रवक्ते होते. त्या वेळी ते संत साहित्याविषयी फार समरसून बोलले होते. ही व्याख्यानं आम्ही मुद्दाम विद्यापीठात आयोजित न करता शहरातल्या प्रमुख सभागृहात आयोजित केली होती नि त्यांना प्रचंड गर्दी लोटली होती. मी एकनाथ संशोधन मंदिराच्या संशोधन शाखेचा मानद संचालक असतानाही ते एकदा या संस्थेत बोलले होते. चोंभा या ज्ञानदेवसमकालीन कवीच्या ‘उखाहरण’ या मी संपादिलेल्या ग्रंथाला शास्त्रीजींनी पुरस्काररूपानं प्रदीर्घ आस्वादक

प्रस्तावना लिहिली होती. माझ्या संशोधन प्रकल्पात व संशोधनपर लेखनात त्यांनी जे मनःपूर्वक मार्गदर्शन केलं, त्याबद्दल या लेखनात कृतज्ञता व्यक्त करणं, मी माझं कर्तव्य समजतो. मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी विभागानं तीन-चार हजार हस्तलिखितांचा संग्रह केला याचं त्यांना नेहमीच कौतुक वाटे. ज्यांनी हिमालयाएवढं प्रचंड संशोधन-लेखन केलं, त्या शास्त्रीजींच्या कार्यापुढे आमच्यासारख्या संशोधकांचं कार्य खरंतर नगण्य होतं; पण अशा वेळी हिमालय थोडंसं ओणवून आपल्या पाठीवर प्रेमानं हात फिरवतो आहे, असं वाटल्यावाचून राहवत नसे. शास्त्रीजींच्या मनाच्या मोठेपणाची ही साक्षच होती.

**(दैनिक केसरी, पुणे, रविवार, २९ मे, १९९४)**

○○○

५६.

# संस्कृतीचा इतिहासकार

## मे. पुं. रेगे

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची माझी गाठ अ. भि. शहा यांच्यामुळे पडली. शहांची आणि माझी मैत्री होती आणि शहा हे शास्त्रीजींच्या अगदी आतल्या वर्तुळातले होते, ज्याची त्रिज्या अतिशय लहान असे हे वर्तुळ होते. आणि शहांमुळे या वर्तुळात मी सहजपणे आणि अनायासे दाखल झालो. हा केवढा मोठा आणि दुर्लभ विशेषाधिकार (प्रिव्हिलेज) होता, याची मला तेव्हा कल्पना नव्हती. ती जेव्हा आली तेव्हा त्या विशेषाधिकाराची मला सवयही झाली होती. त्याबद्दल मला जेवढी धन्यता वाटणे योग्य ठरले असते तेवढी कधी वाटली नाही, याचे आता नवल वाटते.

शहांमुळेच मी त्यांचा 'शास्त्रीजी' असा उल्लेख करायला लागलो. एरवी त्यांचे कौटुंबिक नाव 'आबा' होते. ते वाईकरांचे आबा होते. वाई तालुक्याचे आबा होते. बहुधा सबंध सातारा जिल्ह्याचे आबा होते. महाराष्ट्राचे ते तर्कतीर्थ होते, पण व. भ. कर्णिक, गोवर्धन पारीख आणि इंदुताई पारीख, अ. भि. शहा आणि जशोद शहा, गोविंदराव तळवलकर हा जो त्यांचा खास रॉयवादी परिवार होता, त्यात ते 'शास्त्रीजी' होते. त्यातील 'जी' या आदरार्थी प्रत्ययाची जबाबदारी एम. एन. रॉय यांच्याकडे असणार असा माझा तर्क आहे. रॉय यांनी शास्त्रीजींचे मोठेपण हेरले होते. पारंपरिक भारतीय दर्शनांत आणि शास्त्रांत पारंगत असलेला, पारंपरिक ब्राह्मणी वेश परिधान करणारा हा विद्वान जडवादी, पाखंडी तत्त्वज्ञानाचा. हे तत्त्वज्ञान बौद्धिक निकषांचे समाधान करते, या केवळ कारणासाठी सहजपणे स्वीकार करतो आणि सामाजिक रचनेमध्ये मूलगामी परिवर्तन करण्याच्या कार्यक्रमाला वाहून घेतो, हे दृश्य रॉय यांना अद्भुत आणि भारताच्या भवितव्याच्या दृष्टीने अत्यंत आश्वासक वाटले असणार. तेव्हा भारतीय प्रबोधनाचे प्रतिनिधित्व करणारी व्यक्ती म्हणून रॉय यांनी शास्त्रीजींचा गौरव केला यात नवल नाही. उलट शास्त्रीजी हे रॉय यांच्याकडे आकर्षित झाले ते केवळ रॉय यांच्याभोवती आंतरराष्ट्रीय स्तरावरील साम्यवादी क्रांतिकारक म्हणून जे अद्भुतरम्यतेचे

वलय होते, त्यामुळे नव्हे, रॉय यांनी भारतीय राजकीय, सामाजिक परिस्थितीचे जे विश्लेषण केले होते आणि भारतीय जनतेच्या राजकीय आणि सामाजिक, आर्थिक विमोचनासाठी ज्या रणनीतीची आखणी केली होती तिची तर्कशुद्धता त्यांना पटली होती. तिच्यात जी वैचारिक झेप होती, तिची मोहिनी त्यांच्यावर पडली होती, हे रॉय यांचे अनुयायित्व त्यांनी स्वीकारले याचे खरे कारण होते. हे गुरुशिष्य वैचारिक सहकारीही होते.

## अविस्मरणीय मैफिली

तेव्हा शास्त्रीजींचा जो खास परिवार होता, त्याचे रॉय हे अदृश्य केंद्र होते. या परिवारात मला प्रवेश मिळाला असला तरी त्याच्यात मला स्थान नव्हते. मी गेली पस्तीस वर्षे शास्त्रीजींच्या सहवासात आहे आणि गेली दहा वर्षे तर मी वाईला त्यांच्या कुटुंबातला माणूस म्हणून राहत आलो आहे. पण कर्णिक किंवा पारीख किंवा शहा हे जसे शास्त्रीजींच्या अंतरंगातले त्यांचे मित्र होते, तसा मी नव्हतो, आणि ते स्वाभाविक होते. एका समान तत्त्वज्ञानाचा ज्यांनी निष्ठेने स्वीकार केला होता आणि या तत्त्वज्ञानावर आधारलेल्या सामाजिक परिवर्तनाच्या आंदोलनात सक्रिय भाग घेतला होता, त्यासाठी कमालीची अप्रियता सहन केली होती, संकटांना तोंड दिले होते, असे हे एकमेकांचे जन्मभरचे सहकारी होते. या वर्तुळात स्थान लाभण्यासाठी जी किंमत देणे आवश्यक होते ती मी मोजली नव्हती. पण एक साक्षी म्हणून मला त्यात प्रवेश मिळाला आणि माझा स्वीकार झाला, हेच माझे मोठे भाग्य होते. कर्णिक, पारीख, शहा, गोविंद तळवलकर, पु. ल. देशपांडे, सर्जेराव घोरपडे यांच्या चर्चा, विवाद, गप्पागोष्टी, (सौम्य व सभ्य अशी अभिजात) टिंगलटवाळी यांनी रंगलेल्या मैफिलीत सहभागी होण्याची संधी मला मिळाली, हा माझ्या आयुष्यातील मोठा आनंद आहे. पण ती माझी कमाई नव्हती. ती मला लागलेली लॉटरी होती. या अविस्मरणीय मैफिली होत्या. माझी कल्पना अशी आहे की, माझ्याप्रमाणे सर्जेरावही साक्षी म्हणून, मैफिलीत पूर्णपणे रंगून गेलेले साक्षी म्हणून उपस्थित असत. पु. ल. देशपांडे यांना महाराष्ट्रातील कोणत्याही मैफिलीत मानाचे स्थान असते, हे उभ्या महाराष्ट्राला माहीत आहे. मग ती गाण्याची मैफिल असो किंवा प्लेटोला अभिप्रेत असलेली वैचारिक मैफिल असो. (तत्त्वज्ञान हे आत्म्याचे संगीत आहे, असे प्लेटोने म्हटले आहे.)

पण शास्त्रीजींच्या आंतरिक जीवनाची एक बाजू या त्यांच्या अगदी जवळच्या दोस्तांना आणि सहकाऱ्यांना माहीत नव्हती आणि ती मला माहीत होती, असे मला वाटते. ती म्हणजे: त्यांची 'पारंपरिक' किंवा 'भारतीय' बाजू. भारतीय तत्त्वज्ञानाचे, वेद, स्मृती, पुराणे यांचे शास्त्रीजींना अतिशय व्यापक, खोल आणि चोख ज्ञान होते आणि या माहितीच्या संग्रहावर त्यांची पकड होती, आवश्यक तेव्हा कितीही दीर्घ किंवा क्लिष्ट वचन ते सहजतेने उद्धृत करू शकत, हे अर्थात या मित्रांना माहीत होते आणि त्याबद्दल त्यांना आदर आणि कौतुकही होते. पण एवढेच. शास्त्रीजींच्या जीवनाचा एक अंतःप्रवाह हा विशुद्ध भारतीय

प्रवाह होता याची पुरेशी जाण त्यांना नव्हती, असे मला वाटते. वेद, उपनिषदे, धर्मसूत्रे, भगवद्गीता, रामायण, महाभारत, षड्दर्शने, नव्यन्यायाची अतिशय अमूर्त आणि काटेकोर अशी परिभाषा यात शास्त्रीजींच्या मनाचा एक भाग सदैव रमलेला असे. या सांस्कृतिक, बौद्धिक परिसरात ते सतत विहार करीत असत. ही सबंध परंपरा ते आपली मानीत. तिचे प्रवर्तक, भाष्यकार, तिचा विकास करणारे अधिकारी पंडित यांच्या परिवारातले आपण आहोत ही त्यांची धारणा होती.

वाईतले जुने वैदिक पंडित, दर्शनांचे व्यासंगी अभ्यासक इत्यादींच्या आठवणी ते रंगून सांगत. कै. राजेश्वरशास्त्री द्रवीड हे शास्त्रीजींहून वयाने वडील पण त्यांच्याच पिढीतले. त्यांच्या वेळचे ते सर्वश्रेष्ठ नैयायिक असा त्यांचा लौकिक होता. त्यांच्या हयातीतच काशीचे पंडित त्यांना काशी विश्वनाथाचा अवतार कसे मानू लागले, हे शास्त्रीजी अभिमानाने सांगत. गांधीजींनी अस्पृश्यतेवर शास्त्रार्थ करण्यासाठी काशी व इतर ठिकाणच्या ज्या पंडितांना बोलावले होते, त्यांत राजेश्वरशास्त्री द्रवीड हे होते. शास्त्रार्थ ज्या दिवशी व्हायचा होता, त्याच्या आदल्या दिवशी शास्त्रीजी या पंडितांना भेटायला गेले. बोलता बोलता राजेश्वरशास्त्र्यांना नव्यन्यायातील एक शंका विचारली. शंका ऐकून राजेश्वरशास्त्री काहीसे चपापले. ‘विचार करावा लागेल, उद्या उत्तर सांगेन’ असे ते म्हणाले. दुसऱ्या दिवशी सकाळी शास्त्रीजी त्यांना भेटायला गेले आणि आपल्या शंकेचे बहुधा हे उत्तर असावे, असे आपल्याला वाटते, असे त्यांनी स्वतःच राजेश्वरशास्त्र्यांना सांगितले. राजेश्वरशास्त्री म्हणाले, ‘बरोबर आहे. मलाही हेच उत्तर योग्य ठरेल असे वाटते आहे.’ आता शास्त्रीजी अस्पृश्यतेच्या विरुद्ध पक्षाचे होते. काशीहून आलेली शास्त्रीमंडळी अस्पृश्यतेची समर्थक होती आणि त्यांच्याशी वाद करायला शास्त्रीजी मैदानात उतरले होते. पण नव्यन्यायावरील त्यांचा अधिकार पाहून लक्ष्मणशास्त्री द्रवीड त्यांना म्हणाले, ‘अहो, तुम्ही आमचे आहात. तुम्ही खरे शास्त्री आहात. तुम्ही काय या पाखंडी सुधारकांच्या नादी लागता?’

शास्त्रीजी त्यांच्या खोल अंतरंगात ‘त्यांचे’ होते. शास्त्री पंडितांचे, वैदिकांचे, दार्शनिकांचे होते यात शंका नाही, पण ते पाखंडी सुधारकांचेही होते. अगदी ठामपणे होते. रॉय यांना तत्त्वज्ञानाविषयी काही शंका जेव्हा मी उपस्थित केल्या होत्या, तेव्हा त्यांनी कट्टर रॉयवादी ज्या अभिनिवेशाने रॉय यांच्या मूलसिद्धांतांचे समर्थन करील, त्या अभिनिवेशाने रॉय यांची बाजू उचलून धरली. पण पारंपरिक भारतीय तत्त्वज्ञान आणि आधुनिक जडवादी तत्त्वज्ञान यांचे द्वंद्व त्यांच्या मनात आहे. या द्वंद्वाचा बौद्धिक, भावनिक ताण त्यांना जाणवत आहे, असे मला कधी वाटले नाही. याचे रहस्य काय असेल?

**‘व्यवहारे भाट्टनयः’**

त्यांनीच या रहस्याचा केलेला उलगडा असा की, ते 'शून्यवादी' होते. कोणतेच बौद्धिक तत्त्वज्ञान- 'वैज्ञानिक' तत्त्वज्ञान धरून- अखेरपर्यंत सुसंगतपणे विकसित करता येत नाही,

प्रत्येक तत्त्वज्ञानात काही बौद्धिक अडचणी उरतातच; त्यांचे सैद्धान्तिक समाधान करता येत नाही, पण त्यामुळे 'व्यवहार' सोडून देणे अविवेकी असते, या मताशी येऊन ते ठेपले होते. सर्व भारतीय आणि अनेक पाश्चात्त्य दर्शनांचा कसोशीने अभ्यास केल्यानंतर तेव्हा यात बौद्धिक आळशीपणा नव्हता. त्यांच्या मनाची स्वाभाविक ठेवण अशी होती की, व्यवहाराला सिद्धान्ताचे अधिष्ठान, आधार असल्याशिवाय ते समाधानी नसत. पण सबंध मानवी व्यवहारच, सबंध व्यक्तिजीवनाचा आणि सामाजिक जीवनाचा आधार ठरेल असे सुसंगत तत्त्वज्ञान रचणे मानवी बुद्धीच्या पलीकडे आहे, अशी त्यांची खात्री पटली होती. हे शून्यवादी मत. पण शून्यवाद आणि अद्वैत तत्त्वज्ञान यात एवढे थोडे अंतर आहे की, शून्यवादाला अद्वैताचाच एक प्रकार मानता येईल आणि अद्वैती हे 'व्यवहारे भाट्टनयः' हे तत्त्व स्वीकारतात. म्हणजे (थोडक्यात) व्यवहारात वैदिक धर्मशास्त्र पाळावे अशी ही तडजोड आहे.

शास्त्रीजींनी व्यवहारात 'रॉयनय' स्वीकारला. कारण तो अद्वैताशी सुसंगत होता. ह्या अर्थाने सुसंगत की सबंध मानवजाती हे बंधुभावाने, परस्पर सहकार्याने, सुसंवादाने नांदणारे एक कुटुंब व्हावे- सर्व सामाजिक व्यवहाराचे हे साध्य असले पाहिजे असे एक भव्य स्वप्न रॉयवादाच्या गाभ्याशी आहे. हे स्वप्न, आणि तर्कशुद्ध विचारातून माणूस विश्वाविषयीचे आणि स्वतःविषयीचे सत्य जाणून घेऊ शकतो, हा विश्वास ह्या दोन्ही गोष्टी शास्त्रीजींना मान्य होत्या. तर्काने, वैज्ञानिक विचारपद्धतीने अंतिम गवसणार नाही ही भूमिका स्वीकारलेली असतानाच, यशस्वी व्यवहारासाठी वैज्ञानिक ज्ञान उपयुक्त आणि आवश्यक असते हे सत्यही ते मनापासून स्वीकारीत.

## पांडित्याची चुणूक

त्यांच्या पांडित्याची खरी ओळख महाराष्ट्राला झाली नाही असे वाटते. 'वैदिक संस्कृतीचा विकास' ह्या त्यांच्या ग्रंथात पांडित्याची थोडीशी चुणूक जिज्ञासूंना दिसून आली. जे ग्रंथ ते लिहू शकले असते ते त्यांनी लिहिले नाहीत. आता दुसरा कोणी ते (किंवा त्यांच्यासारखे ग्रंथ) लिहू शकणार नाही. भारतीय संस्कृतीचा आत्मा ज्या ग्रंथात मूर्त झाला आहे, त्यांच्यावर त्यांची जी पकड होती, तशी पकड परंपरागत पद्धतीने या ग्रंथाचे जो अध्ययन करील, त्यालाच कमावता येईल. आणि ही पद्धती आता नष्ट झाल्यासारखी आहे. पण याहूनही महत्त्वाची गोष्ट अशी की, ह्या संस्कृतीचे जे चैतन्यदायी तत्त्व होते, त्याचे यथार्थ आकलन करण्यासाठी आवश्यक असलेली मर्मदृष्टी (इन्साइट) त्यांच्याकडे होती. उपनिषदांचा अभ्यास केलेले अनेक विद्वान आहेत. पण उपनिषदांतून जी एक वैशिष्ट्यपूर्ण अशी जीवनदृष्टी व्यक्त झाली आहे, तिचे आंतरिक आकलन करण्यासाठी, अंतरंगात शिरून तिच्याशी एकरूप होण्यासाठी जी कल्पनाशक्ती लागते ती विरळा असते. ती शास्त्रीजींकडे होती. ही एक प्रकारची प्रतिभा असते. संस्कृतीच्या इतिहासकाराला आवश्यक असलेली

प्रतिभा. हे ज्ञान आणि प्रतिभा त्यांच्याबरोबर गेली. पण अनेक प्रकारच्या लौकिक व्यवहारात असताना, अनेक श्रेष्ठ पदे भूषवीत असतानाही ज्या अलिप्ततेने ते जगले- आणि जिचा भेद करणे त्यांच्या जवळच्या मित्रांनाही शक्य झाले नाही- ती अलिप्तता एका आंतरिक समृद्धतेवर आधारलेली होती. त्यांच्या प्रतिभाशाली व्यासंगाचे ते फलित होते.

**(दैनिक महाराष्ट्र टाइम्स, मुंबई, दि. २९ मे, १९९४)**

○○○

## ५७.

# जिव्हाळ्याचा सुहृद हरपला

## द्वा. भ. कर्णिक

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे जीवन वैचित्र्यपूर्ण तर खरेच, पण तितकेच ते चैतन्यमय आणि स्फूर्तिदायी झाले. वाईच्या पाठशाळेत ते संस्कृतचे शिक्षण घेण्यासाठी आले. त्यांचे गुरू केवलानंद यांनी त्यांना वेदशास्त्रसंपन्न केले. पुढे वेदांती पंडित म्हणून बनारसच्या विद्वानांनी त्यांना मान्यता दिली. बनारसमध्येच अस्पृश्यता निवारणाच्या प्रश्नावर वेदशास्त्रसंपन्न पंडितांबरोबर त्यांनी चर्चा केली. त्याची आठवण ठेवूनच गांधीजींनी अस्पृश्योद्धाराच्या आंदोलनासाठी त्यांची मदत घेतली. गांधीजींच्या व्यवहार्य भूमिकेला या आंदोलनासाठी शास्त्राधार हवा होता. शास्त्रीजींनी तो आधार दिला आणि गांधीजींच्या प्रभावळीत त्यांना मानाचे स्थान प्राप्त झाले. या सन्मानाचे चिन्ह म्हणून देवदास गांधी आणि चक्रवर्ती राजगोपालाचारी कन्या लक्ष्मी यांच्या विवाहाचे शास्त्रीजींनी केलेले पौरोहित्य, याकडे बोट दाखविता येईल.

शास्त्रीजींचा पिंड क्रांतिकारकाचा होता. १९३० साली गांधीजींनी कायदेभंगाची जी मोहीम आखली, या सुमारास शास्त्रीजींचा महाराष्ट्रातील काही क्रांतिकारक गटांशी संबंध जडलेला होता. सशस्त्र क्रांतीच्या लढ्यासाठी काही राजकीय दरोडे घालण्यात आले होते, यात शास्त्रीजींचा सहभाग होता असे बोलले जात असे. त्यांच्याबद्दल या प्रकारच्या दंतकथाही प्रचलित होत्या. १९३० सालच्या आंदोलनात मिठाचा सत्याग्रह आणि जंगल सत्याग्रह अशा दोन मोहिमा महाराष्ट्रात मोठ्या हिरिरीने पुकारण्यात आल्या होत्या. शास्त्रीजींनी मिठाच्या सत्याग्रहासाठी सारा सातारा जिल्हा पेटवून उठविला होता. त्यांची त्या वेळची भाषणे वीरश्रीपूर्ण असत. त्यांच्या भाषणात जो जोश येत असे तो महाभारतातील एकेक कथानके ते रंगवून सादर करीत असत, त्यामुळे. त्या भाषणातून अशी वीरश्री संचरली जात असे की काही वेळा प्रेक्षकांचे देहभान हरपून जात असलेले मी प्रत्यक्ष पाहिले, अनुभवले आहे. त्या भाषणांतून सातारा जिल्ह्यात नेतृत्वाची मालिका तयार झाली, जिच्या अग्रस्थानी

पुढे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठित झाले आणि कालांतराने नवमहाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून त्यांनी यश संपादन केले.

जंगल सत्याग्रहासाठीसुद्धा शास्त्रीजी संगमनेरमध्ये रानोमाळ हिंडले. काही काळ ते या मोहिमेसाठी इतक्या दाट जंगलात जात असत की त्यांचा ठावठिकाणाही सापडत नसे. मग वदंता उठे की शास्त्रीजी अज्ञातवासात गेले आहेत. त्या संदर्भात एके दिवशी अशी घटना घडली की, जंगल विभागात पोलिसांना एक शाल सापडली. ती शास्त्रीजींची शाल नसेल ना, असा पोलिसांना संशय आला. शास्त्रीजींचे क्रांतिकारक गटांशी संबंध असत, त्यामुळे या संशयाला बळकटी आल्याशिवाय राहिली नाही. पुढे मात्र जाहीर झाले की ही शाल शास्त्रीजींचे अज्ञातवासातील सहकारी मनोहर शास्त्री यांची होती. शास्त्रीजींच्या भोवती गुप्ततेचे जे वलय निर्माण झाले होते त्याची यावरून कल्पना करता येण्यासारखी आहे.

राजकारणाशी त्यांचा संबंध अव्याहत चालू राहिला. १९३० सालच्या मोहिमेत त्यांची आणि माझी भेट झाली ती कळवणच्या पोलीस कोठडीत. सत्याग्रहाचा पुरस्कार करणारी भाषणे दिल्याबद्दल आम्हा दोघांनाही पकडण्यात आले. शास्त्रीजींची आणि माझी त्या वेळी जी भेट झाली ती उभ्या जन्मभर कायम राहिली. योगायोग असा की माझ्याप्रमाणेच शास्त्रीजीही रॉयवादी तत्त्वज्ञानाकडे आणि विचारांकडे आकर्षित झाले. रॉय हे क्रांतिवादी कम्युनिस्ट, पण त्यांच्या क्रांतिकारक भूमिकेला व्यवहार्यतेची झालर असे. शिवाय मार्क्सवादाच्या तात्त्विक भूमिकेबरोबरच मानवतावादी विचारांचा पगडा रॉय यांच्यावर बसलेला शास्त्रीजींना आढळला. म्हणून गांधीवादाचा त्याग करून शास्त्रीजी रॉयवादाकडे वळले.

रॉय हे विचक्षण त्याचप्रमाणे गुणग्राहक होते. शास्त्रीजींशी त्यांची जी चर्चा होत असे ती उच्च पातळीवरील बौद्धिक चर्चा होत असे. शास्त्रीजींनी हिंदुधर्मसमीक्षेवर जो ग्रंथ लिहिला तो रॉय यांना एवढा मूलग्राही वाटला की एका जाहीर सभेत रॉय यांनी त्यांचा गौरव करताना म्हटले, ''या महापंडितापुढे आज नतमस्तक होण्याची मला इच्छा झाली.'' शास्त्रीजींचे वैशिष्ट्यच असे होते की ज्ञानसाधनेचा त्यांना ध्यासच लागलेला असे. यशवंतराव चव्हाण यांना त्यांच्या विद्वत्तेबद्दल इतका आदर वाटत असे की महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेच्या प्रसंगी आपल्या ध्येयधोरणाचे दिग्दर्शन करताना शास्त्रीजींच्या अध्यक्षतेखाली साहित्य संस्कृती मंडळाची स्थापना करीत असल्याचेही त्यांनी जाहीर केले. पुढील वीस वर्षांच्या काळात शास्त्रीजींच्या स्थानी दुसऱ्या कोणालाही नेमण्याचा यशवंतरावांनी विचारही केला नाही, शास्त्रीजींनी एकाग्र चित्ताने या कामी लक्ष घातले आणि अत्यंत मौल्यवान अशा वैचारिक आणि साहित्यिक ग्रंथांची मराठी साहित्यात भर टाकली.

शास्त्रीजींनी गुरुस्थानी दोनच महापुरुषांची निवड केली. एक महात्मा गांधी आणि दुसरे मानवेंद्रनाथ रॉय. रॉयसाहेबांबद्दलची त्यांची निष्ठा इतकी एकात्मतेची राहिली की दुसऱ्या

महायुद्धाचे फॅसिस्ट विरोधी युद्धात विश्लेषण करून उभ्या राष्ट्रवादी भारताचा जो क्षोभ त्यांनी आपल्यावर ओढवून घेतला, त्या कसोटीच्या वेळी शास्त्रीजींनी आपली सारी लोकप्रियता पणास लावून रॉय यांच्या वैचारिक भूमिकेला पाठिंबा दिला आणि अक्षरशः त्यासाठी वनवास पत्करला.

शास्त्रीजींनी एकदा तर्कशुद्ध भूमिका स्वीकारली की त्यांना त्यातून ओढवणाऱ्या परिणामांची कधी खंत वाटली नाही. अस्पृश्यांच्या बरोबर मंदिरप्रवेशासाठी त्यांनी सनातन्यांचा रोष ओढवून घेतला आणि बाबासाहेब आंबेडकरांना निर्व्याज पाठिंबा दिला. शास्त्रीजी हे कर्मयोगी खरे. अस्पृश्य समाजात ते लोकप्रिय झाले याचे कारण असे की कृतीने ते अस्पृश्य समाजाशी समरस झाले. अस्पृश्य आणि तळागाळातील लोकांबरोबर सहभोजन करण्याची त्यांनी प्रथाच पाडली होती. त्यामुळे हा विद्वान शास्त्री त्यांच्या जीवनाशी पूर्णपणे समरस झाला होता. मानवतावाद त्यांनी स्वीकारला तो विचारांनी त्याचप्रमाणे कृतीने. आपल्या स्नेहशील आणि आतिथ्यशील आचरणाने त्यांनी जन्मभर माणसे जोडली आणि ज्ञानदानाचे आपले व्रत अखंडपणे चालू ठेवून त्यांनी खऱ्याखुऱ्या लोकशिक्षणाचा पाया घातला.

शास्त्रीजी विद्वान होते इतकेच नव्हे तर महापंडित होते. पौर्वात्य आणि पाश्चिमात्य तत्त्वज्ञान त्यांनी आत्मसात केले होते. त्यांना एकच ध्यास होता तो ज्ञानदानाचा आणि लोकशिक्षणाचा. विश्वकोशाचे खंड हे शास्त्रीजींचे जिवंत स्मारकच होणार आहे. शास्त्रीजींचे जीवन संघर्षमय राहिले, पण त्यांनी कोणाशीही शत्रुत्व ठेवले नाही. हेवादावा, असूया, द्वेष यांपासून ते अलिप्त राहिले आणि म्हणून त्यांचे जीवन समाधानी राहिले. त्यांचे जीवन शारीरिक आरोग्य आणि मानसिक समाधान यांच्यामुळे सतत फुलत राहिले होते. त्यांच्या निधनाने तळागाळातील लोकांबद्दल जिव्हाळा वाटणारा एक सुहृद नाहीसा झाला आहे आणि एक हसरे आनंदी व्यक्तिमत्त्वही लुप्त झाले आहे.

**(साप्ताहिक साधना, पुणे; शनिवार, दि. ४ जून, १९९४, पृ. ६ व १८)**

OOO

## ५८.

# विश्व संस्कृतीचे स्वप्न पाहणारे: तर्कतीर्थ जोशी

### अनिल जोशी

शुक्रवार दि. २७ मे ९४ ची सकाळ.

सूर्योदयाच्या प्रथम किरणांनी भूमीला सचेतन करण्याची पूर्ण तयारी केली आणि कृष्णातीरावर सुमारे ८० वर्षे ज्ञान साधनेत गढून गेलेले आणि ज्ञानसूर्याचे तेज ज्यांना प्राप्त झाले होते ते तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी कृष्णेच्या उगमस्थानावर, क्षेत्र महाबळेश्वरातील आपल्या 'कृष्णादर्शन' या निवासस्थानात चिरनिद्रेच्या आधीन गेलेले. या घटनेची मोजक्या शब्दांत सकाळी सहाच्याच सुमारास तर्कतीर्थांचे कनिष्ठ चिरंजीव व त्यांचे स्वीय साहाय्यक म्हणून काम पहाणारे वासुदेव जोशी यांनी मला फोनवर वार्ता सांगितली. दोनच शब्द कानांवर आले, 'आबा गेले'. या दोन शब्दांनी क्षणार्धात भोवतालच्या सर्व वातावरणाची स्थिती बदलून टाकली. वासुदेवच्या आवाजातील कापरेपण, त्याची सद्गदित अवस्था माझ्या मनाला धक्के देऊ लागली. सर्व काही सुन्न भासू लागले. पायांची गती थांबली. एक प्रचंड पोकळी नजरेसमोर निर्माण झाली. वासूच्या घराकडे म्हणजे प्राज्ञपाठशाळा मंडळाच्या कार्यालयाकडे माझी पावले वळली. वासू मला पाहताच गळयामध्ये पडला. मिठीतच बोलत राहिला. ''आबांनी असं न सांगता जायला नको होतं. सावलीसारखी ज्यांची साथ केली ते आबा (शास्त्रीजी ) काळाच्या पडद्याआड निघून गेले. आपण पोरके झालो''. माझ्या मुखातून शब्द बाहेर येईनासा झाला. वासूच्या पाठीवर सांत्वनाचा हात फिरवत होतो पण त्या हातामध्ये स्थैर्य नव्हते. हात थरथरत होता. ज्या डोळ्यांनी शास्त्रीजींच्या सहवासात अनेक घडामोडी पाहिल्या, ते माझे डोळे अश्रूंच्या धारा सांडत होते. पण स्वत:ला सावरण्याची गरज होती. शास्त्रीजींचा निरोप यायचा आणि क्षणार्धात धावत सुटायचे ही गेल्या ३०-३२ वर्षांची सवय माझ्या अंगवळणी पडली होती आणि आता तर जो निरोप मिळाला होता तो शास्त्रीजींच्या, आबांच्या निधनाचा. माझे मित्र सुरेश यादव यांना दूरध्वनीवर या घटनेची मी माहिती दिली. आणि डॉ. सुभाष कुलकर्णी यांना बरोबर घेऊन क्षेत्र महाबळेश्वरकडे

निघालो. बरोबर आमचे स्नेही प्रा. स. रा. फडणीस हे होते. वाटेत आम्ही सर्व शांत नजरेने एकमेकांकडे पाहात होतो. नजरेनेच बोलत होतो. प्रत्येकजण आपापले डोळे पुशीत होता. ७|| च्या सुमारास क्षेत्र महाबळेश्वरातील 'कृष्णादर्शन' या नयनरम्य निवासस्थानासमोर गाडी थांबली. शास्त्रीजी त्यांच्या शयनखोलीत निर्विकार चेहऱ्याने स्थिरावले होते. या जगाची, सूर्योदयाची चाहूल लागण्यापूर्वीच, त्यांनी अंतिम निरोप घेतला होता. कोणालाही न सांगता, कोणालाही न बोलता. शास्त्रीजींची नेहमीची चाल ही पावलाचा आवाज न करणारी आणि त्याच चालीने शास्त्रीजी येथून निघून गेले.

शयनगृहाच्या आसपास मी नजर टाकली. शास्त्रीजींच्या नित्याच्या सवयीप्रमाणे सूर्योदयापूर्वीचे सर्व कार्यक्रम त्यांनी आटोपले होते असे समजले. शेजारच्या टेबलावर पुस्तक होते ते एका पाश्चात्त्य तत्त्ववेत्त्याचे, बर्ट्रांड रसेल यांचे. जीवनाच्या अखेरच्या क्षणापर्यंत ज्ञानसाधनेत शास्त्रीजी मग्न राहिले याची ती साक्ष होती. अलीकडे अलीकडे त्यांच्या विचारांनी एक दिशा निश्चित केली होती आणि ती होती या जगातील मानवाच्या भवितव्याची. त्याच्या केवळ एका संस्कृतीची. शास्त्रीजी विश्वसंस्कृतीची स्वप्ने रंगविण्यात अलीकडचा काळ घालवीत होते. क्लेश व कलहहीन जीवन जगणारा मानव पाहायचा होता. निरनिराळे सिध्दान्त सांगत सांगत या मानवाच्या हिताची आपली भावना बोलून दाखवतच शास्त्रीजी अलीकडच्या गप्पा मैफिली रंगवत होते. निसर्ग हा त्यांचा स्नेही बनला होता. माणसावर त्यांनी जितके प्रेम केले, त्यापेक्षा अधिक प्रेम त्यांनी निसर्गावर केले. महाबळेश्वरातील सदाहरित वनश्रीने सजलेल्या त्या निसर्गाच्या सान्निध्यात मूक मनाने तासन्तास शास्त्रीजी स्वतःचा काळ घालवीत होते. रानफुलांनी बहरलेल्या झुडपांचे आणि वृक्षांचे नयनरम्य रूप स्वत:च्या नजरेत साठवत होते. तो त्यांचा छंद होता. हे सर्व सुरू असताना शास्त्रीजी अबोल असायचे पण निसर्गाच्या बहुविध दृश्यांचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावरून ओसंडत असायचा. हात मागे बांधून त्या पानाफुलांशी बातचीत करणारे शास्त्रीजी एखादेच वाक्य बोलत. "अरे हा काय चमत्कार आहे! या निसर्ग सौंदर्याच्या दर्शनाने मन तृप्त होतंय. भोवतालच्या चित्रविचित्र रंगांच्या पक्ष्यांचे नादमधुर स्वर काय आगळं समाधान देत आहेत". समोर दिसणाऱ्या कृष्णेच्या प्रवाहाने शास्त्रीजींचा चेहरा अनेक वेळा प्रफुल्लित झाल्याचा मला पाहायला मिळाला. शास्त्रीजी मनात साठलेले समाधान चेहऱ्यावर किंचित हास्याची छटा उमटवून प्रदर्शित करायचे आणि एकच शब्द बाहेर पडायचा, ''सुरेख!'' शास्त्रीजी या चैतन्याने बहरलेल्या निसर्गाच्या सहवासातच रमले आणि बऱ्याच वर्षांपूर्वी त्यांनी बोलून दाखवलेल्या एका इच्छेची तृप्ती त्यांनी संपादन केली. त्या अदृश्य शक्तीच्या, चैतन्याच्या स्वाधीन झालेले तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी इहलोकीचा प्रवास संपविला.

एका आनंदयात्रीने आपल्या चिरप्रवासाला वेगळया अर्थाने आरंभ केला. शास्त्रीजींचा तो अचेतन देह पाहतापाहता मनामध्ये अनेक मैफिलींची, अनेक व्याख्यानांची, अनेक

सहप्रवासांची, अनेक सल्लामसलतींची, सुखदुःखाच्या अनेक आठवणींची मालिका माझ्या मनःपटलावर झरझर सरकत राहिली. ज्या शास्त्रीजींच्या स्वागतासाठी स्वतःच्या एका विशिष्ट लकबीने अनेक वेळा हात जोडलेले आम्ही पाहिले, ते हात अचेतन झाले होते. प्रेमाचा स्पर्श, भावनांचा स्पर्श या सर्वांपासून ते हात आता दूर गेले होते. शास्त्रीजींच्या समोर स्वतःचे मन मोकळे करण्याची अनेक प्रसंगी माझ्यावर पाळी आली होती. त्यांचा अनुभवसंपन्न सल्ला आणि आशीर्वादाचा आणि एका अर्थाने आधाराचा हस्तस्पर्श मला लाभला होता. सर्व सर्व काही आता थांबले होते.

गेली सुमारे बत्तीस वर्षे अनेक प्रसंगांनी शास्त्रीजींच्या वाई येथील निवासस्थानी मी जात राहिलो. त्यांच्या मनामध्ये एका वेगळ्या नात्याचे ऋणानुबंध निर्माण झाले. शास्त्रीजी आमचा आधारवड बनले. ज्ञानाच्या अनेक क्षेत्रांतील विविध छटांचे दर्शन या बत्तीस वर्षांच्या सहवासात मला मनमुरादपणे लुटता आले. हे माझे व्यक्तिगत सद्भाग्य. शास्त्रीजींच्याकडे विविध विषयांच्यावर रंगलेल्या मैफिलींचा मला साक्षीदार होता आले. त्यांनी केलेल्या ज्ञानसाधनेचा मागोवा घेणे ही गोष्ट मला शक्य नाही, हे मला प्रामाणिकपणे सांगावेसे वाटते. त्या ज्ञानयोग्याच्या संपर्कात आपणांस अनेक वर्षे घालविता आली हीच व्यक्तिगत जीवनातील माझी खरी संपत्ती आहे. ते धन आहे. त्यांच्याबद्दलच्या आदराने आणि प्रेमाने मला दिवस कंठायचे आहेत याची मला जाणीव आहे. स्वतःच्या मर्यादा मला ओळखता आल्या हे जरी खरे असले तरी तर्कतीर्थांनी जे अलोट प्रेम केले, जो स्नेह दिला, जी प्रेरणा आणि स्फूर्ती दिली त्याचे अनेक ठसे उमटलेले आहेत. शास्त्रीजींनी विविध सामाजिक, राजकीय, धार्मिक चळवळी किंवा जागतिक घडामोडी यांमागील विचारप्रवाहांचे, ऐतिहासिक संदर्भांचे जे चिंतन व्यक्त केले, त्यामध्ये कोणतीही काटकसर केली नाही. शेकडो मुलाखती त्यांनी मला आजवर दिल्या. अगदी अलीकडच्या काळात लोकमान्यांच्या गीतारहस्यावर त्यांनी केलेले भाष्य मला मुलाखतीच्या स्वरूपात टिपता आले. केवळ वीस दिवसांपूर्वी त्यांच्या अलीकडच्या चिंतनातून विश्वसंस्कृतीविषयीचे विचार मी शब्दांकित करू शकलो.

सुमारे ८० वर्षे शास्त्रीजींनी कृष्णातीरावर वाई येथे वास्तव्य केले. एका ज्ञानयोग्याच्या म्हणजे स्वामी केवलानंद सरस्वती यांच्या सहवासाचा त्यांना लाभ झाला. संन्याशी असलेले स्वामी केवलानंद सरस्वती यांनी शास्त्रीजींना नवविचारांची दिशा दाखवली. धर्मशास्त्रांच्या अध्ययनाबरोबरच मानवतावादाकडे नेणाऱ्या विचारांची दिशा स्वामींनी शास्त्रीजींना दाखवली होती आणि त्याचा परिणाम म्हणूनच वयाच्या चौदाव्या वर्षी संस्कृत भाषेच्या अध्ययनाच्या निमित्ताने वाई येथे आलेला लक्ष्मण बाळाजी जोशी हा विद्यार्थी एका वेगळ्या अर्थाने ज्ञानयोगी बनला आणि ९४ वर्षांचे प्रदीर्घ आयुष्य जगून एका श्रेष्ठतम, ज्येष्ठतम ज्ञानमहर्षींच्या स्वरूपात या ठिकाणी कार्यरत राहिला. संस्कृतचे अध्ययन,

भारतीय व पाश्चिमात्य तत्त्ववेत्त्यांचे चिकित्सक भूमिकेतून केलेल्या तत्त्वज्ञानाचे अध्ययन, धर्मग्रंथाचे अध्ययन, त्यावरील स्वतःचे भाष्य, विविध धर्मांचे अनेक विचार व त्यातील साम्य व विरोध, धर्ममार्तंडांच्याबरोबर केलेल्या चर्चा, व्याकरण, राज्यशास्त्र, न्यायशास्त्र, भौतिकविज्ञान हे सर्व विषय शास्त्रीजींनी अभ्यासले. त्यावर चिंतन केले. मानवहिताविरोधी आलेल्या निरनिराळ्या धर्मशास्त्रातील विचारांचे खंडन केले. राजनीतीचे अध्ययन केले. राजकीय मतप्रणालींचे इतिहास तपासले आणि लोकशाहीसारख्या राज्यप्रणालीला आदर्श मानले. भारतीय लोकशाही ही संकल्पना अत्यंत दिव्य स्वरूपाची आहे असे मत अनेक सभासंमेलनांतून ते ठामपणे मांडत राहिले. शास्त्रीजींचा जीवनप्रवास अनेक विषयांना स्पर्शून गेला.

हिंदुधर्मशास्त्राच्या अध्ययनास वाहून घेतलेले अनेक धर्मपंडित, पुरोहित वाईमध्ये स्थिरावले होते. या सर्वांना छेदून शास्त्रीजी स्वतंत्र विचारांनी बाहेर पडले. विद्यार्थिदशेत असताना राजकीय क्षेत्रात सशस्त्र क्रांतीचा ध्यास घेणारे काही कार्यकर्ते प्राज्ञपाठशाळेत निवास करीत होते. राष्ट्रीय शिक्षणाचा अर्थ वेगळया प्रकारे त्या वेळच्या तरुणांच्या मनावर ठसवीत होते. शास्त्रीजी सशस्त्र क्रांतिकारक झाले नाहीत; परंतु त्यांनी जी वैचारिक क्रांती केली, तिची दखल इतिहासाने घेतली. आरंभीच्या काळात वाई येथील अध्ययन संपविल्यानंतर त्यांना काही काळ कलकत्त्यात जावे लागले. लो. टिळकांचा केसरी त्यांच्या विचारास एक वेगळी दिशा देत होता. प्राज्ञपाठशाळेत अध्यापक म्हणून काम करणाऱ्या एका ज्येष्ठ शिक्षकाने लक्ष्मणशास्त्र्यांना कलकत्त्यास जाण्यापूर्वी पुणे येथे जाऊन गायकवाडवाड्यात लोकमान्यांचा आशीर्वाद घ्यावा, त्यांचे दर्शन घ्यावे व पुढील वाटचाल करावी असे सुचविले. शास्त्रीजींच्या पाठीवरून लो. टिळकांचा हात फिरलेला होता. ही त्याची आठवण गेल्या ५ वर्षांपूर्वी त्यांनी मला सांगितली आणि ती सांगत असतानाही शास्त्रीजींच्या चेहऱ्यावर लोकमान्यांविषयीचा आदर स्पष्ट होत होता.

१९३० नंतर शास्त्रीजी म. गांधींच्या विचाराने प्रभावित झाले. येरवडा येथे म. गांधी आले असता शास्त्रीजींची त्यांच्याबरोबर चर्चा झाली, त्या वेळी शास्त्रीजींचा पेहराव हा एका धर्मपुरोहिताचा होता पण अस्पृश्यतेला हिंदुधर्मशास्त्रामध्ये कोठेही आधार नाही याचे साधार विवेचन ते महात्मा गांधींच्या समोर करीत होते. महर्षि वि. रा. शिंदे यांनी हे दृश्य पाहिले पण या दोघांमधील चर्चेचा विषय आणि त्यातील संदर्भ महर्षिंच्या कानावर गेला नव्हता. महात्मा गांधी धर्ममार्तंडाच्या आहारी जात आहेत अशी त्यांची कल्पना झाली. तर्कतीर्थांची ओळख शिंदे यांना झालेली नव्हती. १९३३ साली म. शिंदे वाई येथे ब्राह्मसमाजाच्या उद्घाटन समारंभासाठी आले. प्राज्ञपाठशाळेत त्यांच्या निवासाची सोय करण्यात आली होती. उद्घाटन समारंभाचे अध्यक्षस्थान शास्त्रीजींच्याकडे होते. प्राज्ञपाठशाळेत प्रवेश करताच म. शिंदे यांच्यासमोर एक अस्पृश्य समाजातील विद्यार्थी येऊन उभा राहिला. त्या

दोघांचा एकमेकांशी पूर्वपरिचय होता. शिंदे यांनी विद्यार्थ्यास विचारले "तू इकडे कोणाकडे व कशासाठी आलास?'' विद्यार्थी म्हणाला, ''मला आण्णांनी (कर्मवीर भाऊराव पाटील) शास्त्रीजींच्याकडे संस्कृतच्या अध्ययनासाठी पाठविले आहे". पुढचा प्रश्न "तू येथे कोणाकडे राहतोस व भोजनाचे काय करतोस?'' उत्तर मिळाले, "मुक्काम शास्त्रीजींच्याकडे आणि भोजन काकूकडे (त्यांच्या पत्नीकडे)", यातून म. शिंदे यांच्या मनात हे शास्त्रीजी कोण याचे कुतूहल निर्माण झाले आणि जी व्यक्ती गांधीजींच्या बरोबर येरवडा येथे चर्चा करीत होती तेच हे शास्त्रीजी हे त्यांच्या निदर्शनास आले. धर्म पुरोहित लक्ष्मणशास्त्री जोशी हा गृहस्थ आपल्या घरात एका अस्पृश्य मुलास संस्कृतचे पाठ देतो आहे हे गुपित म. शिंदे यांनी वाईच्या गणपती घाटावर त्याच दिवशी सायंकाळी एका जाहीर सभेत उघड केले. हा सामाजिक सुधारणेचा धागा शास्त्रीजींनी जीवनाच्या अखेरपर्यंत जपलेला होता. गेली ३५ वर्षे ते स्वतःच्या घरात एका हरिजन महिलेच्या हातून तयार झालेल्या भोजनाचे ग्रहण करीत राहिले. ती सावित्री शास्त्रीजींच्या अकस्मात निधनाने कोसळली होती.

शास्त्रीजी खऱ्या अर्थाने जीवनाचे मनमुराद आस्वादक म्हणूनच जगत राहिले. जिथे सौंदर्याचे दर्शन आहे तेथे त्यांचे पाय रेंगाळलेले होते. हे सौंदर्यदर्शन फुलामुलात, निसर्गात, विचारात, धर्मचर्चेत, चित्रशिल्पात, संगीतात त्यांनी घेतले होते. कुमार गंधर्वांचा सहवास आणि त्यांचे गायन यांची एक वेगळी मोहिनी शास्त्रीजींच्या मनावर पडली होती. शास्त्रीजी गायक नव्हते पण संगीताची प्रचंड जाण त्यांना त्यांच्या गुरूपासून मिळाली होती. शास्त्रोक्त संगीताची बैठक त्यांनी गुरूंच्या सान्निध्यात पक्की केली होती. केवलानंदांच्यामागे अनेक कीर्तनांतून शास्त्रीजींनी साथ केली होती. १०-१२ वर्षांपूर्वीच पंडित कुमार गंधर्वांनी वाई येथे शास्त्रीजींना कबीराची भजने ऐकविली. रात्री भारतीय संगीतशास्त्रावर कुमारजी बोलत राहिले. सुमारे अर्ध्या-पाऊण तासाच्या त्यांच्या समृध्द माहिती व निवेदनानंतर भारतीय शास्त्रीय संगीत आणि सामवेद यावर शास्त्रीजींनी भाष्य केले. कुमारजींनी, ''भारतीय संगीताच्या आत्म्याचे आपण मला दर्शन घडविले, याचा परमानंद मला होतो आहे." अशी प्रतिक्रिया व्यक्त केली आणि संगीत शास्त्रातील महान गुरू आपण आहात असे मी मानतो असे सांगून कुमारजींनी शास्त्रीजींच्या पायावर डोके ठेवले. एका शास्त्रींनी संगीततज्ज्ञाच्या पाठीवरून आशीर्वादाचा हात फिरवला. अलीकडच्या काळात संध्याकाळच्या निवांत वेळी शास्त्रीजी कुमार गंधर्वांचे संगीत मुक्तपणे ऐकत राहिले. त्यातील शब्दापलीकडचा आनंद ते अनुभवत राहिले.

केवळ तीन आठवड्यांपूर्वीच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांनी शास्त्रीजींची सपत्नीक भेट घेतली. नवीन वाचन, नवीन विचार यातच दोघेही रमले. तर्कतीर्थ यांनी नवीन सिध्दान्त मुख्यमंत्र्यांच्याशी बोलून दाखविला. सर्व मानवाची संस्कृती आधुनिक विज्ञानाने एकत्र गुंफली आहे. भारतीय संस्कृती वेदान्ताच्या स्वरूपात पूर्णतेस जाते. आणि वेदान्त

भौतिकतेला टाकत नाही म्हणजे भौतिक शास्त्रांचा स्वीकार करणारी भारतीय संस्कृती आहे. वेदान्त म्हणजे विश्वाचे तत्त्वज्ञान. विश्व ही परमेश्वराची शक्ती म्हणजेच 'एनर्जी' होय. म्हणून अध्यात्म विद्या आणि भौतिक विद्या यांत सुसंगती आहे. आधुनिक उच्च भौतिक शास्त्रज्ञ वेदान्त नाकारत नाहीत. अशा रीतीने मानवाची एक आत्मसंस्कृती हल्ली निर्माण होत आहे. संस्कृतीचे मौलिक भेद आता राहिले नाहीत. शास्त्रीजींचे हे विचार ऐकून मुख्यमंत्री शरद पवार नतमस्तक झाले. विश्वसंस्कृतीचे स्वप्न पाहणारे तर्कतीर्थ जोशी यांनी स्वजीवनाची अखेर निसर्गाच्या कुशीत व्हावी असे एकदा बोलून दाखविले होते. सौंदर्याने नटला सजलेला निसर्ग भोवताली असावा, वनराईच्या अंगाखांद्यावर खेळणारे आणि जीवनाचे संगीत गाणारे विविधरंगी पक्षी मुक्तपणे विहार करीत असावेत. सुंदर छोटीशी बंगली असावी. फुलांचे गेंद फांद्याफांद्यांवर खेळवणारी फुलझाडे भोवताली असावीत. जीवनसंगीताची लयबध्द साथ देणारा निर्झर समोरून वाहात असावा. समृध्द ग्रंथालय असावे. आणि या सर्वांचा स्नेह, सहवास लुटतलुटत अंतिम सत्याकडे जाण्यासाठी चिरनिद्रेच्या आधीन व्हावे.

शास्त्रीजींचे हे स्वप्न सत्यात उतरले. स्वपत्नी सौ. सत्यवतीबाई जोशी आणि स्वतः शास्त्रीजी वेदनारहित, क्लेशरहित जीवनावस्थेत वावरत असतानाच त्यांनी जीवनाचा अखेरचा श्वास घेतला हे त्यांच्या जीवनातील साम्य. या संकेताचा अर्थ अनाकलनीय आहे.

**(दै. केसरी, ऐसी अक्षरे, रविवार, दि. २६ जून, १९९४, पान-३)**

○○○

५९.

# नि:शेष प्रेम करणारे : आबा

## डॉ. मधुकर जोशी

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणजे माझे वडील, आबा. तर्कतीर्थ जोशी आणि आबा ही दोन व्यक्तित्वे आहेत. अगदी एक की वेगळी? हा प्रश्न मला पडतो. हा प्रश्न सामाजिक संदर्भ असलेल्या व्यक्तीच्या बाबतीतच विचारला गेलेला आहे. आजच्या संदर्भात या प्रश्नाचे उत्तर अगदी सोपे आहे. खासगी व्यक्ती आणि सामाजिक व्यक्ती म्हणून दोन आबा वेगळे आहेत. आबा नाहीत म्हणून सामाजिक पोकळी आणि कौटुंबिक पोकळी निर्माण झाली; पण या पोकळ्या एका जातीच्या आहेत. एक वेगळा माणूस कायमचा गेला. त्यामुळे जे दु:ख होते, हेच दु:ख आम्हा कुटुंबीयांना झाले, आबांना ओळखणाऱ्या समाजाला झाले.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी ही व्यक्ती ऐतिहासिक आहे की नाही याबद्दल चर्चा होऊ शकते. कदाचित विश्वकोशाच्या खंडात वर्षकाळात केलेली नोंद ते एक ऐतिहासिक व्यक्ती म्हणून केली की काय, याबद्दल मला माहिती नाही. प्लेटो, ॲरिस्टॉटल, सॉक्रेटिस हे असेच होते. त्यांनी तत्कालीन ग्रीक सामाजिक जीवनाबद्दल जे आशयपूर्ण भाष्य केले व त्या काळातील ग्रीक मनाचा जो ठाव घेतला, त्यामुळे सबंध पूर्वोत्पन्न वा पाश्चात्त्य संस्कृतीमध्ये वैचारिक पुरुषार्थ व सांस्कृतिक स्पंदनांचे हे पंडित आणि स्फूर्तिदाते ठरले. इतिहासात चिरंजीव झाले. या अर्थाने हे पंडित लोक ऐतिहासिक म्हणून गणले गेले. लक्ष्मणशास्त्री जोशींतील अर्थात या देशाच्या स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कालखंडातील ऐतिहासिक व्यक्तिमत्त्व होऊन गेले. विशेषत: महाराष्ट्रामध्ये विसाव्या शतकात धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक चळवळीमध्ये जी महान व्यक्तित्वे अवतरली, त्यांमध्ये शास्त्रीबुवांचे नाव घेतल्याशिवाय पर्याय नाही. डॉ. मधुकर लक्ष्मण जोशी काही इतिहासतज्ज्ञ नव्हे, भी भारतीय नागरिक, अमेरिकेत गेलेला शास्त्रीजींचा थोरला मुलगा. मी वडिलांची सेवा फार केलेली नाही; पण वडील म्हणून मला जे आबांचे दर्शन घडले, ते दर्शन जगातील सर्व मुलांना उपयोगी पडेल.

मी गेली ३५ वर्षे शास्त्रीबुवांपासून दहा हजार मैल दूर होतो. हे भौगोलिक अंतर दूरत्व वाढविण्यास मदत करते; पण आमच्यामध्ये असलेल्या या दूरत्वानेच आम्ही खूप जवळ आलो.

आबा वडील म्हणून माझ्या जीवनातील 'मंगलमूर्ती' होते. आबांचे माझ्यावर, माझ्या भावंडांवर, नातेवाईकांवर निःशेष प्रेम होते. माझ्यातील गुण व अवगुणांची त्यांच्या डोक्यात नोंद असे. माझ्याकडून त्यांच्याविषयीच्या वागण्यात अपराध घडलेही आहेत; आपल्या वडिलांच्या बाबतीत अपराधी नाही, असा एकही मुलगा नसेल, असे मला वाटते. मीही त्याला अपवाद नाही. भारतीय संस्कृतीमध्ये वडिलांच्या बाबतीत एखादे आगळे स्फुरण असेल, तर ते म्हणजे मुलाने वडिलांना वाचवायचे असते, जसे रामाने दशरथाला वाचविले. पुंडलिक हा महाराष्ट्रातील सांस्कृतिक स्फुरणांचा प्रतिनिधी आहे. आबांच्या गेल्या ३५ वर्षांच्या माझ्या भौगोलिक दुराव्यात मला एकच खंत होती की, मुलगा म्हणून आबांसाठी काय केले म्हणजे त्यांच्या मृत्यूनंतर जीवनात ते मला पुन्हा पुत्र म्हणून वांछतील!

अमेरिकेत अनेकदा आबांच्या खांद्यावर हात टाकून सोफ्यावर पेयपान करताना, गप्पा मारताना अमेरिकेतील अनेक मित्रमैत्रिणींनी मला पाहिजे. ते जेव्हा जेव्हा भेटत, तेव्हा तेव्हा ते थक्क होत असत. त्यांना आमचा हेवा वाटत असे. काही वेळेस या हेव्याचे रूपांतर माझ्यावर टीका करण्यात व्हायचे. मी त्यांना म्हणायचो की, पुत्र म्हणून मला जे भाग्य लाभले, ते तुम्हाला नाही. आबा गुणदोषांच्या पलीकडे जाऊन आम्हा मुलांवर प्रेम करीत, तसेच ते इतरांवरही करीत. त्यांच्या स्वभावात गतकटुतेची आठवण ठेवणे बसत नसे. माझ्या आईशी- सतीशी त्यांचे जे आचरण होते, ते 'लय ग्वाड' होते. जगातील सर्व स्त्री-पुरुषांनी आई-बाप म्हणून मुलांशी आणि पती-पत्नी म्हणून एकमेकांशी कसे वागले पाहिजे, याचा वस्तुपाठच आबा आणि सतीच्या जीवनातून मिळतो. सर्वांनीच जर त्यांच्यासारखे आचरण ठेवले तर सर्वच आईबापांचे व पति-पत्नीचे जीवन मधुर होईल.

शास्त्रीबुवांचे सामाजिक व्यक्तित्व घडले ते त्यांच्या आदर्शामध्ये! त्यांचे आदर्श म्हणजे वेदऋषी शंकराचार्य, छत्रपती शिवाजी महाराज, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, कार्ल मार्क्स, एम. एन. रॉय आणि सर्वांत शेवटी आईनस्टाइन आणि मार्क्स. या सगळ्या आदर्श व्यक्तींनी शास्त्रीजींचे मन मोठे केले. भगवत्गीतेमुळे शास्त्रीबुवांना भांडकुदळ पंडित जगतामध्ये कृष्णासारखी भांडकुदळ बुद्धी मिळाली. त्यांनी भावनांच्या घोड्यांचे वैचारिक सारथ्य केले. शंकराचार्यांनी त्यांना व्यावहारिक सत्य व पारमार्थिक सत्य शिकविले. त्यांना शिवाजीइतका थोर राजा जणू काही माहिती नव्हता. ज्याने भारताचे नाव अजूनही 'हिंदुस्थान' म्हणून टिकवले. शिवाजीराजे हे मुस्लीम राजकारणाच्या विरोधी होते. मुस्लीम

धर्माच्या विरोधी ते कधीच नव्हते. शिवरायांपासून त्यांनी हिंदू राष्ट्रवादाचा धडा घेतला. लोकमान्य टिळकांपासून भारतीय राष्ट्रवादाचा शेवटचा धडा घेतला. महात्मा गांधींपासून हिंदू धर्मातील सामाजिक दोष नाहीसे करण्यासाठी स्फूर्ती मिळवली. अधिकारलालसा कशी नाहीशी करायची, याबाबत एम. एन. रॉय यांच्यापासून मौलिक धडे घेतले.

पारमार्थिक सत्य हे या जगतातील मौलिक अर्थ कळल्याखेरीज कळत नाही. जगातील थोर भौतिकतज्ज्ञ (क्लासिकल फिजिक्स) आईन्स्टाइनचे व्यक्तित्व आणि ज्ञान यांचे उच्च मेतकूट जमल्याचे शास्त्रीबुवांना 'क्वांटम मेकॅनिक्स'चा अभ्यास करताना समजले. कारण  ३" २ = २" ३ ही सैद्धांतिक पदार्थविज्ञानाची (क्लासिकल फिजिक्स) गणिती भाषा 'क्वांटम मेकॅनिक्स'ने चुकीची ठरवली, म्हणजे जगाचे नियम शोधताना 'क्वांटम मेकॅनिक्स'ने 'कॉमननेस'चा अंत केला, म्हणून ते चक्रावून गेले. व्यावहारिक सत्याच्या पलीकडे शंकराचार्यांनी सांगितलेले पारमार्थिक सत्य हेसुद्धा असेच चक्रावून टाकणारे होते, हे त्यांना अगोदरच कळून चुकले होते. त्यांच्या मृत्यूच्या वेळी महाबळेश्वर येथे रिचर्ड पी. फेनमन यांच्या 'क्वांटम इलेक्ट्री डायनॅमिक्स' या पुस्तकातील प्रस्तावनेतील "The theory of quantam electro dynamics describes nature as absurd from the point of view of commonsense. And if agrees fully with experiment. So I hope you can accept nature as She is absurd." हा तर्क तर्कतीर्थांना कुतर्क वाटला. अंतिम सत्य शोधताना 'भ्रम' झाल्यास आश्चर्य काय? ते शंकराचार्यांच्या पठडीतच बसू शकते.

१९४७ मध्ये भारत देश स्वतंत्र झाला आणि घटनात्मक लोकशाही आली. शास्त्रीजींना त्याचा मनस्वी आनंद झाला आणि सबंध आयुष्यभर या लोकशाही तत्त्वाच्या बाजूने ते राहिले. सॉक्रेटिस म्हणतो त्याप्रमाणे सामान्य जनता मेंढरासारखी असते. मेंढपाळ जसा मेंढरांना मार्गावर ठेवतो, तसा तत्त्वज्ञ राजा जनतेला मार्गावर ठेवतो. मात्र शास्त्रीजींची खात्री होती की, जनतेला स्वतःचे हित कळते आणि दुसऱ्या कुठल्याही राज्यपद्धतीपेक्षा लोकशाही राज्यपद्धतीतच लोकांचे हित आहे. त्यांच्या मते तत्त्वज्ञान हे सर्वांसाठी असते. गणित, अर्थशास्त्र इत्यादी ज्ञानशाखा या तज्ज्ञांसाठी असतात; पण तत्त्वज्ञान सर्व 'मानवां'साठी असते. कारण त्यांना माहिती होते की, हे अमंगल जीवन, माणूस केवळ प्रसन्न तत्त्वज्ञानानेच मंगल करू शकतो. म्हणून ते सर्व मानव जगताबाबत आशादायी होते. ते स्वतः व्यावहारिक चिखलातील कमळासारखे राहिले.

शास्त्रीबुवा २७ मे रोजी पहाटे पाचच्या सुमारास अत्यंत शांत रसाच्या डोहात शिरले आणि आनंदाने निघून गेले. वैदिक वाङ्मयात वर्णन केलेला ऐतरेय महिदास हा ११६ वर्षे जगला होता. तो त्यांची स्फूर्ती होता. शांतरस हा रस आहे की नाही, याबाबत रसतज्ज्ञांत मोठी चर्चा कायम आहे. मात्र याबाबत शास्त्रीजींना शंका नव्हती.

त्यांनी मात्र शांतरस मीमांसा आणि आनंदमिश्रित फारकत केली नाही. गेल्या वर्षी अमेरिकेतून भारताकडे परतताना त्यांनी मला संदेश दिला होता की मोक्ष म्हणजे आनंद आणि आनंद म्हणजे शांतरस. हा संदेश ज्या भारतीय तत्त्वज्ञाने शिकविला, ते म्हणजे शंकराचार्य. शास्त्रीजी मला म्हणाले, ''मधुकर, तू शंकराचार्यांचं चरित्र लिही. मी असेन तर आपण दोघेही लिहू.'' शास्त्रीबुवा मी हिंदुस्थानात नसताना नुकतेच निघून गेले. आशा आहे की, मी त्यांची इच्छा पूर्ण करेन.

**शब्दांकनः प्रा. बाबूराव शिंदे**

**(रविवार, सकाळ, पुणे, दि. ३ जुलै १९९४)**

ooo

६०.

# ज्ञानदानात रमणारे तर्कतीर्थ

## एस. डी. इनामदार

मी विश्वकोशात १९६८ ला नोकरीस लागलो. त्यासाठी मुंबईत सचिवालयात मुलाखतीला जावे लागले. याप्रसंगी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना मी प्रथम पाहिले. त्यांनी विचारलेला एक प्रश्न मला अजून आठवतो. आम्हाला एम. ए. ला 'सावित्री' ही कादंबरी नेमली होती. ही 'सावित्री' कोणाची? असा तो प्रश्न होता. त्या प्रश्नात खोच होती. कारण मराठीत 'सावित्री' नावाच्या दोन कादंबऱ्या आहेत. ग. त्र्यं. माडखोलकरांची व पु. शि. रेगे यांची. मी त्या कादंबरीचा उल्लेख करून आम्हाला पु. शि. रेगे यांची लघुकादंबरी अभ्यासाला नेमल्याचे सांगितले. कविश्रेष्ठ पु. शि. रेगे यांची 'सावित्री' ही पत्ररूप लघुकादंबरी. सावित्री या आधुनिक, स्वतंत्र व मुक्त व्यक्तिमत्त्वाच्या स्त्रीची व तिच्या सहवासात आलेल्या व्यक्तींच्या सहसंबंधांची, काव्यात्म शैलीतील श्रेष्ठ दर्जाची कादंबरी. त्या कादंबरीवर त्यांनी अनेक बारीकसारीक प्रश्न विचारले. माझ्या उत्तरांनी त्यांचे समाधान झाल्याचे दिसले व माझी विश्वकोशाच्या संपादकपदी नियुक्ती झाली. सुरुवातीला त्यांच्याशी बोलताना एक आदरयुक्त दरारा व संकोच वाटायचा, पण विश्वकोशाच्या कामानिमित्ताने अनेक अशा चर्चा होत गेल्या आणि लक्षात आले की ज्ञानाच्या बौद्धिक विद्याव्यासंगाच्या क्षेत्रात ते लहानथोर असा दुजाभाव बाळगत नाहीत. कोणत्याही शंकेला, प्रश्नाला ते अगदी सविस्तर, खुलासेवार उत्तरे देत व ज्ञानाच्या आनंदात, ज्ञानदानात इतके मनापासून रममाण होत की बोलताना त्यांना काळवेळाचे अजिबात मान उरत नसे. त्यांना उपजतच दैवी प्रज्ञेची व प्रतिभेची देणगी असल्याने एखाद्या विषयावर ते एकदम नव्यानेच प्रकाश टाकत. त्या विषयासंबंधात या जाणिवा नवी दृष्टी देत. एखाद्या साक्षात्कारी सत्याचे नव्यानेच दर्शन घडावे व त्याच्या प्रकाशाच्या तेजःपुंज झळाळीने मन उजळून निघावे अशी अनिर्वचनीय अनुभूती त्यांच्या सहवासात येत असे.

प्राचीन संस्कृती, धर्म, पौर्वात्य व पाश्चात्त्य तत्त्वज्ञान, इतिहास, राज्यशास्त्र, संस्कृत वाङ्मय ही त्यांच्या व्यासंगाची खास ज्ञानक्षेत्रे होती व त्यांच्या पांडित्याने ती उजळून निघाली होती,

त्या क्षेत्रात त्यांनी अधिकारवाणीने उच्चारलेला शब्द हा 'अखेरचा शब्द' मानला जायचा. ती त्या ज्ञानसिद्धीची अंतिम परिपूर्ण अवस्था होती. पण त्याचबरोबर आधुनिक पाश्चात्त्य ज्ञानविज्ञाने, कला साहित्ये यांतही त्यांना विलक्षण रुची व आस्था होती. आधुनिक भौतिक विज्ञाने, त्यांतील नवनव्या अद्ययावत घडामोडी, नवनवे सिद्धांत व उपपत्ती यांविषयी त्यांना तीव्र कुतूहल व जिज्ञासा असे, त्यांच्या प्रत्येक अमेरिका भेटीनंतर झालेल्या वार्तालापांत ते तेथील नव्या वैज्ञानिक घडामोडी व प्रयोग यांविषयीची अगदी रसरसून तपशीलवार माहिती सांगत. त्यांचे या विषयावर अफाट व अद्ययावत वाचन शेवटपर्यंत चालू होते.

त्यांचा निरनिराळ्या धर्मांचा, धर्मांच्या मूलतत्त्वांचा, धर्मसंस्थापकांचा, त्या त्या धर्मांच्या तत्त्वसिद्धांतांचा अगदी सखोल व चिकित्सक व्यासंग होता. धर्माकडे कधीही त्यांनी श्रद्धा, अंधश्रद्धा वा वादविषय म्हणून पाहिले नाही. धर्माचा त्यांनी सदैव निरपेक्ष वा चिकित्सक दृष्टीनेच विचार केला. ते ईश्वरवादी जसे नव्हते तसेच निरीश्वरवादीही नव्हते. ते संदेहवादी (स्केप्टिक) होते. या विश्वातील अनेक गूढ रहस्ये, अनेक भौतिक व आधिभौतिक समस्या यांची उकल बुद्धी वा तर्क यांच्या साह्याने करता येत नाही. त्यामुळे एक दैवी ईश्वरसदृश शक्ती मानावी लागते. पण निरपराध व निष्पाप सज्जनांना जी दुःखे व संकटे भोगावी लागतात, त्यामुळे ईश्वरी अस्तित्वावरही विश्वास ठेवता येत नाही. म्हणून याबाबत एक प्रकारची संदेहावस्था निर्माण होते, असे या भूमिकेचे सार आहे. मूलतः कोणताही धर्म हा मानवकल्याणार्थ अवतरतो, अशी त्यांची धर्मविषयक दृढ धारणा होती.

शास्त्रीजींच्या सहवासात आमची वैचारिक जडणघडण झाली. कोणत्याही विषयाचा मूलगामी दृष्टिकोनातून सर्वांगपरिपूर्ण चिकित्सक अभ्यास कसा करावा, हे त्यांच्या सहवासात शिकता आले. विश्वकोशाच्या संपादन कार्यात याचा खूपच उपयोग झाला.

माझ्याकडे विविध कला, साहित्य असे विषय संपादनार्थ सोपवले असल्याने या विषयांची चर्चा त्यांच्याशी करण्याचा योग अनेकदा येत असे. त्यांचे शिक्षण पारंपरिक पंडिती पठडीत झाले असले, तरी त्यांचा दृष्टिकोन सनातनी नव्हता. कलेकडे ते विशुद्ध निकोप सौंदर्यवादी दृष्टीने पाहत असत. त्यात कर्मठ सनातनी सोवळेपणा नव्हता. कला साहित्यातील शृंगार, कामभाव, लैंगिकता, तथाकथित अश्लीलता अशा विषयांची ते अगदी मोकळेपणाने चर्चा करीत. याची दोन-चार उदाहरणे देता येण्याजोगी आहेत. प्रख्यात ब्रिटिश शिल्पकार जेकब एपस्टाइन यांच्यासंबंधी मी विश्वकोशात चरित्रपर टिपण लिहिले. त्याच्या 'ॲडम' या शिल्पाविषयी शास्त्रीजींशी चर्चा झाली. खुल्या ब्रिटिश समाजातही हे नग्न मूर्तिशिल्प अश्लीलतेच्या कारणास्तव अत्यंत वादग्रस्त ठरले, ट्रॅफल्गार स्क्वेअरमध्ये ते लावू नये म्हणून निदर्शने झाली. वादाचा गदारोळ उठला. शास्त्रीजींनी हे शिल्प प्रत्यक्ष पाहिले होते. (ते युरोप-अमेरिकेच्या दौऱ्यांवर जात, तेव्हा तेथील चित्रे - शिल्पे - वास्तू आवर्जून पाहत. कला प्रदर्शनांना भेटी देत, ही त्यांच्या अभिजात कलारसिकतेची खूणच आहे.) ‘ॲडम'

या शिल्पाविषयी त्यांनी केलेली कलामीमांसा फार सुंदर आहे. ते म्हणाले होते, 'ॲडमचे पाय मातीत घट्ट रुतले असले, तरी त्याची दृष्टी वर आकाशाकडे खिळली आहे. भौतिक सुखोपभोगात मानव कितीही रममाण झाला तरी आत्मिक उन्नतीची, आध्यात्मिक मुक्तीची स्वाभाविक ओढ त्याला त्यातून वर खेचत असतेच.' खजुराहोच्या कामशिल्पांबाबतही त्यांनी मार्मिक टीकाटिप्पणी केली. ती शिल्पे मंदिराच्या बाहेरच्या भिंतीवर आहेत. तेव्हा सर्व ऐहिक सुखोपभोग बाहेर पूर्णपणे उपभोगून कामभावाचे विरेचन व्हावे व नंतर शुद्ध, संन्यस्त, आध्यात्मिक वृत्तीने मंदिरात देवाच्या सान्निध्यात जावे, अशी या मागची भूमिका असल्याचे ते म्हणत. 'नायक नायिका भेद' ही भारतीय चित्रकलेतील एक पारंपरिक संकल्पना आहे. त्यात 'अष्टनायिका' व त्यांचे शृंगार-विरहादी विविध भाव यांची चित्रणे येतात. या अनुषंगाने त्यांनी संस्कृत साहित्यातील शृंगाररस व अष्टनायिका यांचे सुरेख रसाळ विवेचन केले होते. रससिद्धान्त हाही त्यांच्या व्यासंगाचा एक खास विषय होता.

शास्त्रीजींच्या ठायी अलौकिक प्रज्ञा व प्रतिभा यांचा संयोग झाला असल्याने, कोणत्याही विषयावर ते सर्वस्वी नव्या दृष्टिकोनातून नवी मते मांडून विस्मयचकित करून टाकत, एखाद्याला अनेक व्याख्याने देऊन वा पुस्तके लिहून जे साधता येणार नाही, ते शास्त्रीजी एखाद्या भौतिक सूत्रातून वा वाक्यातून साधत असत. वि. स. खांडेकरांच्या समग्र वाङ्मयाचे मूल्यमापन त्यांनी एकाच वाक्यात केले. खांडेकरांनी दारिद्र्याचे नीतिशास्त्र (एथिक्स ऑफ पॉव्हर्टी) मांडले, जी. ए. कुलकर्णी यांच्या 'काजळमाया' या कथासंग्रहाचे व विशेषतः 'विदूषक' या कथेचे त्यांनी केलेले विश्लेषण असेच मार्मिक होते.

शास्त्रीजींनी १९७३ मध्ये पॅरिस येथील आंतरराष्ट्रीय प्राच्यविद्या परिषदेत ‘द कॉस्मिक स्टेट अँड कलेक्टिव्ह किंगशिप ऑफ वेदिक गॉड्स’ हा शोधनिबंध वाचला होता. या शोधनिबंधाचे श्रुतिलेखन (डिक्टेशन) मी घेतले होते. हा विषय त्यांच्या मनात इतका पक्का रुजला होता की, एकदाही त्यांना संदर्भ ग्रंथ पाहावे लागले नाहीत, की कुठेही ते स्मरणादाखल थांबले नाहीत. त्यांची इंग्रजीवरही ठाम पकड होती. ते एका ठाम, संथ सुरात, स्पष्ट उच्चारात सांगत होते आणि मी लिहून घेत होतो. कुठेही खाडाखोड नाही, की इंग्रजी स्पेलिंगच्या चुका नाहीत. मी तो शोधनिबंध टाइप करून त्यांना दिला. तेव्हा त्यांचे समाधान झाले. हा क्षण माझ्यासाठी आनंदाचा व आंतरिक समाधानाचा होता.

शास्त्रीजी जरी देहरूपाने आपल्यातून गेले असले, तरी त्यांनी विश्वकोश कार्याच्या व ग्रंथ निर्मितीच्या रूपाने- 'वैदिक संस्कृतीचा विकास', 'आधुनिक मराठी साहित्याची समीक्षा व रससिद्धान्त’, 'ज्योतिनिबंध' इत्यादी- मागे ठेवलेला अमर ठेवा शाश्वत व चिरंतन स्वरूपात उरणार आहे.

**(रविवार, सकाळ, पुणे, दि. ३ जुलै १९९४)**

ООО

# ६१.
# ज्ञानतपस्वी
## सुभाष भेंडे

एखादी महान व्यक्ती काळाच्या पडद्याआड गेल्यावर निधनाने निर्माण झालेली पोकळी भरून निघणे 'कठीण आहे' अशी ठरावीक शब्दांत त्या व्यक्तीस श्रद्धांजली वाहण्याची पद्धत आहे. शास्त्रीजींच्या बाबतीत ही श्रद्धांजली अशी औपचारिक म्हणता येणार नाही. उपनिषदांपासून मार्क्सवादापर्यंत कोणत्याही गहन विषयावर अधिकारवाणीने बोलणारा प्राचीन आणि अर्वाचीन विचारांचा समन्वय सेतू बांधणारा प्रकांडपंडित पुनःपुन्हा जन्माला येत नाही. विचारांची उपासना पूर्ण झाली असे न मानणारे, विचारांच्या या कक्षांकडे सतत आकर्षित होणारे असे ते एक आदर्श विचारवंत होते. अर्ध्या हळकुंडाने पिवळे होणारे असंख्य विचारवंत आज अवतीभोवती वावरताना दिसतात. त्यांच्याकडे पाहताना तर शास्त्रीजींची उणीव कायमची जाणवल्यावाचून राहणार नाही.

'विश्वकोशा'च्या कामासाठी पंचवीस वर्षे वाईला जात राहिलो. प्रारंभीच्या खंडातील अर्थशास्त्रावरील नोंदींचे लेखन करण्यासाठी उन्हाळ्याच्या सुटीत महिनाभर राहत होतो. पुढे विश्वकोश सल्लागार मंडळावर सहा वर्षे सदस्य म्हणून काम केले. त्यामुळे या 'आचार्यकुलातील ज्ञानोपासका'च्या निकट सान्निध्यात येण्याचे भाग्य लाभले. एकदा वाईहून मुंबईला जाणार होतो. शास्त्रीजींना कळले तेव्हा त्यांनी आपल्याबरोबर चलण्याचा आग्रह केला. मनात धास्ती होती. पाचसहा तासांच्या प्रवासात त्यांच्याशी काय बोलायचे? शास्त्रीजींनी विविध विषयांवर इतक्या रंगतदार गप्पा केल्या की मुंबईला कधी पोचलो ते समजलेच नाही! नंतर त्यांच्याबरोबर खूप प्रवास केला. मराठवाडा, खानदेश, विदर्भ, गोवा.... तासन्तास चालणाऱ्या गप्पांच्या मैफिली कधी माझ्याकडे, कधी माधवराव गडकऱ्यांच्या घरी, कधी रामकृष्ण नाईकांकडे, कधी द्वा. भ. कर्णिक यांच्या फ्लॅटवर, घाटकोपरला त्यांच्या मुलीच्या- प्रा. अरुंधती खंडकर यांच्या घरी- मधुकाकांच्या प्रशस्त कचेरीत... कोणताही विषय त्यांना वर्ज्य नसे. आमच्यासारख्या अज्ञजनांनी निरागसपणे विचारलेल्या प्राथमिक

स्वरूपाच्या प्रश्नांना ते न कंटाळता उत्तरे देत. अनेक विषयांची उजळणी होई. केवलानंद सरस्वती यांचे तेजःपुंज व्यक्तिमत्त्व... विनोबाजींनी दिलेले इंग्रजीचे धडे, प्राज्ञ पाठशाळेतील राष्ट्रवादी वातावरण, सशस्त्र बंडाळीत भाग घेतल्यामुळे वाट्याला आलेला तुरुंगवास, महात्मा गांधीजींशी झालेली पहिली भेट- मानवेंद्रनाथ रॉय यांच्या विचारांचा प्रभाव... देशातील व विशेषत: महाराष्ट्रातील राजकीय वातावरण... परदेशचे प्रवास आणि तेथील अनुभव...

शास्त्रीजी प्रभावी वक्ते होते. कीर्ती महाविद्यालयात त्यांनी षड्दर्शनावर दिलेली व्याख्याने श्रोत्यांना मंत्रमुग्ध करून गेली. साहित्य संघात त्यांनी शीख धर्माचे सुरेख विश्लेषण केले होते. कराडच्या साहित्य संमेलनात आणीबाणीवर त्यांनी केलेला हल्ला श्रोत्यांना अनपेक्षित होता. १९८०-८१ मध्ये 'विश्वकोशा'वर टीकेची झोड उठली त्या वेळी पत्रकार परिषदेत त्यांनी शांतपणे टीकेला दिलेली उत्तरे आजही स्पष्ट आठवतात. 'श्रीविद्या प्रकाशन'च्या अनेक पुस्तकांचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले. त्या वेळी केलेल्या भाषणांच्या निमित्ताने ते नवा विचार मांडत. वयाची नव्वदी उलटली तरी खाली बसून भाषण करण्याची सवलत त्यांनी घेतली नाही. शेवटची काही वर्षे भाषण करताना विषयांतर होत आहे असे वाटत असतानाच ते मूळ विषयाचे सूत्र पकडून भाषण पुढे चालू ठेवीत. जुन्या-नव्या ग्रंथांतील संदर्भ अचूक देत. शेवटपर्यन्त त्या बाबतीत स्मरणशक्तीने दगा दिला नाही.

शास्त्रीजी सदाबहार वृत्तीचे होते. प्रखर विद्वत्तेचे ओझे ते सहजपणे वागवीत. विद्वत्ता आणि रसिकता यांचा इतका अपूर्व संगम क्वचितच पाहायला मिळतो. त्यांचे विचार आणि आचार यांत द्वैत नव्हते. ते कृतिशील तत्त्ववेत्ते होते. गांधीजींची हत्या झाली तेव्हा शास्त्रीजी कलकत्त्याला एम. एन. रॉय यांच्या घरी होते. दुसरे दिवशीपासून जाळपोळीच्या वार्ता प्रसिद्ध होऊ लागल्या. सांगली, कोल्हापूर, वाई भागांत जाळपोळ सुरू असल्याच्या बातम्या वाचूनही शास्त्रीजी शांत आहेत हे पाहून रॉयना नवल वाटले. त्यांनी म्हटले, "शास्त्रीजी, तुम्ही अस्वस्थ झालेले दिसत नाही?"

''अस्वस्थ का होऊ? माझ्या घराभोवती मी मंत्र टाकलेला आहे! माझं घर कोण जाळणार?''

गोष्ट खरी होती. फुले-आंबेडकरांच्या विचारावर त्यांनी लेखन केले होते आणि अनेक व्याख्याने दिली होती. सावित्री नावाची अस्पृश्य स्त्री कितीतरी वर्षे त्यांच्या घरी स्वयंपाकाला होती. महात्मा गांधींनी अस्पृश्योद्धाराची चळवळ सुरू केल्यावर कर्मठ सनातन्यांनी त्यांना विरोध केला. ही चळवळ हिंदुधर्माविरुद्ध आहे अशी आदळआपट ते करू लागले. तेव्हा धर्मशास्त्राला अस्पृश्यता मान्य नाही हे शास्त्रवचन दाखवून सप्रमाण सिद्ध केले शास्त्रीजींनीच. अशा या ब्राह्मणाचे घर जाळण्याचा वेडेपणा कोण करील?

गझनीच्या महंमदाने भग्न केलेल्या सोरटी सोमनाथाची पुनर्बांधणी वल्लभभाई पटेल यांनी करून घेतली. मंदिर सर्व जातिधर्माच्या लोकांना खुले करण्याचे सरकारने जाहीर केल्यामुळे मूर्तीच्या प्रतिष्ठापनेचे पौरोहित्य करण्यास देशभरातील सर्व आचार्यांनी नकार दिला. शेवटी शास्त्रीजींना पाचारण करण्यात आले. आणि देव न मानणारे रॉयिस्ट पौराहित्य करण्यासाठी आनंदाने गेले. पाच लाख लोकांच्या उपस्थितीत शास्त्रीजींनी धार्मिक संस्कार केले. अनेकांना त्यांच्या वागण्यातील ही विसंगती खटकली. त्यांच्यावर भरपूर टीका झाली. पण शास्त्रीजींनी ठामपणे आपली बाजू मांडली. दलितांना मंदिर प्रवेश आणि पूजेचा हक्क मिळतो म्हणून देशातील नामवंत विद्वान तिकडे फिरकणार नसतील तर तेथे आवर्जून जाणे आपले कर्तव्य आहे ही त्यांची भूमिका होती.

सर्वसामान्य लोकांत सहज मिसळणाऱ्या शास्त्रीजींचे राजकारणातील आडाखे अचूक असायचे. आणीबाणीनंतर जनता पक्ष सत्तेवर आला आणि महिन्या-दोन महिन्यांतच नेतेमंडळी एकमेकांवर चिखलफेक करू लागली. शास्त्रीजी दिनकर साक्रीकरांना सांगत असत, 'साक्रीकर, तुमचे मित्र जॉर्ज फर्नांडिस, मधु लिमये यांना सांगा, राज्य करणे म्हणजे पिकनिक नव्हे!' यशवंतरावांनी, चरणसिंग सरकारमध्ये उपपंतप्रधानपद स्वीकारले तेव्हा, 'यशवंतरावांनी फार चुकीचा निर्णय घेतलाय' असे ते सांगत असत आणि यशवंतराव स्वगृही परत येण्याचा प्रयत्न करू लागले तेव्हा 'ते खूप दार ठोठावतील पण इंदिराबाईंनी दार उघडायला नको?' असे परिस्थितीचे अचूक निदान करीत.

शास्त्रीजी अनेक वर्षे साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष होते. काही वर्षांपूर्वी विश्वकोशाचे काम मंडळाच्या कामापासून वेगळे करून दोन मंडळे स्थापण्यात आली आणि 'विश्वकोश मंडळा'च्या अध्यक्षपदी शास्त्रीजींना नेमण्यात आले. विश्वकोशाची वेगळीच चूल मांडण्यात आली हे त्यांना आवडले नाही. हा सगळा खटाटोप निकटवर्तीयांनी केल्याचे समजल्यावर तर ते फार अस्वस्थ झाले. हे शल्य अखेरपर्यन्त त्यांच्या मनाला लागून राहिले.

पहाटे साडेचार वाजता उठून रोज ऐंशी मिनिटे व्यायाम व योगासन करणारे शास्त्रीजी दिवसभर वाचन, लेखन, मनन यांत गुंग असायचे. प्रवास, व्याख्याने सतत चालू असायची. इंग्लंडहून एक तरुण मुलगी तंजावरच्या वाचनालयातून 'प्राचीनकाळच्या स्त्रीजीवना'संबंधी एक संस्कृत हस्तलिखित घेऊन वाईला आली. शास्त्रीजींच्या घरीच मुक्काम होता. रोज दुपारी ती शास्त्रीजींकडून अर्थ समजावून घ्यायची. खणखणीत आवाजात शास्त्रीजी रोज दुपारी एक ते चार, हस्तलिखितामधील मजकुराचे विश्लेषण करून सांगत आणि ती सारी प्रश्नोत्तरे टेप करून घेत असे. दहा वर्षांपूर्वीची ही गोष्ट. त्या वेळी मी दोन आठवडे वाईला होतो. शास्त्रीजींचा हा दैनंदिन पाठ येता जाता ऐकत होतो.

महिन्या दोन महिन्यांनी शास्त्रीजी मुंबईस भेटले तेव्हा तिची चौकशी केली. शास्त्रीजी म्हणाले, 'परवाच गेली इंग्लंडला.' मग आपण होऊन सांगू लागले, "जाताना विचारत होती,

सर, गुरूदक्षिणा काय देऊ?" मी म्हटलं, 'गुरुदक्षिणा मी घेणार नाही!' जायच्या आदल्या दिवशी विचारू लागली- 'तुमचा निरोप घ्यायचाय- भारतीय पद्धतीप्रमाणं तुमच्या पायांना हात लावू की आमच्या पद्धतीप्रमाणं गालाचा मुका घेऊ?' मी म्हटलं, 'बाई गं, माझे पाय मातीचे आहेत. तेव्हा...' असे म्हणून थांबले आणि मिस्किलपणे हसू लागले.

मुल्हेरच्या पंडित घराण्यातील सत्यवतीबाई शास्त्रीजींच्या पत्नी म्हणून वाईला आल्या आणि त्यांच्या जीवनाशी समरस होऊन गेल्या. विवाहानंतर प्रथमच एम. एन. रॉय घरी जेवायला आले होते. सत्यवतीबाईंना पाहून रॉयनी मोकळेपणाने पाश्चात्त्य पद्धतीने शास्त्रीजींना म्हटले, "तुमची पत्नी सुरेख आहे शास्त्रीजी." झाले! सत्यवतीबाई इतक्या रागावल्या की पुन्हा वाढायला बाहेर आल्या नाहीत. ह्याच सत्यवतीबाईंनी जवळजवळ पन्नास वर्षे शास्त्रीजींकडे येणाऱ्या विविध थरांतील माणसांची हसतमुखाने ऊठबस केली. जातपात न पाहता अनेकांना स्वयंपाकघरात खुलेपणानं वावरू दिले. ‘विश्वकोश कार्यालया’त काम करण्यासाठी 'मे' महिन्याच्या सुट्टीत अभ्यागत संपादक म्हणून तीस-चाळीस प्राध्यापक मंडळी येत. कुणाला सकाळी बिनसाखरेचा चहा लागतो, कुणाला रात्री दूध हवे आहे, या तपशिलाकडे त्या जातीने लक्ष पुरवीत. एकदा डिसेंबर महिन्यात वाईला गेलो होतो. रात्री चादर अंगावर घेऊन झोपलो. तेव्हा सतीकाकू स्वतः रजई घेऊन आल्या आणि म्हणाल्या, ‘पहाटे खूप थंडी पडते इथं- कृष्णाकाठचा वारा येतो- ही रजई घ्या पांघरायला.’

अशा या प्रेमळ, समंजस ऋजू स्वभावाच्या सतीकाकू गेल्या तेव्हा शास्त्रीजी एकाकी झाले. घर सुने सुने झाले. थोरला मुलगा मधुकर अमेरिकेहून आला. तीर्थरूपांची अवस्था पाहून चेष्टेच्या सुरात म्हणाला, ‘‘आबा, तुम्ही दुसरे लग्न का नाही करत? या वयात कंपॅनियनची गरज असते-’’

शास्त्रीजी उद्गारले, 'सगळया स्त्रिया तुझ्या आईसारख्या नसतात बाबा! कंपॅनियन म्हणून कुणी बोलभांड घरात आली तर?'

स्वीय सचिव म्हणून वाईचे राम कोल्हटकर सतत त्यांच्याबरोवर असत. त्यांची स्मरणशक्ती संगणकीय. दूरध्वनी क्रमांक, पत्ते, सगळे तोंडपाठ. प्रवासात ड्रायव्हरजवळ डोळे मिटून बसलेले असायचे. मागे शास्त्रीजींच्या गप्पा रंगात आलेल्या. एखादी तारीख चुकली की, ‘आबा, हे चौसष्ट साली नाही, त्रेसष्टमधल्या ऑगस्ट महिन्यात घडलं-’ ‘इंदूर नव्हे, आबा- जळगाव’ असे तपशील पुरवीत आणि पुन्हा डोळे मिटून बसत. कोल्हटकर अकाली वारले आणि शास्त्रीजी खचल्यासारखे झाले. सावलीसारखा सतत सोबत करणारा 'राम' गेल्यामुळे त्यांचे प्रवास कमी झाले. मुंबईच्या फेऱ्या क्वचित होऊ लागल्या.

कधी भेटले की चौकशी करायचो, 'शास्त्रीजी प्रकृती कशी आहे?'

‘आता झाड वठत चाललंय. यापुढं हे असंच चालू राहणार.’

पुण्याला प्राचार्यांच्या परिषदेसाठी गेलो होतो. आदले दिवशी मधुकाकांशी गप्पा झाल्या.

नेहमी निघायचा तसा त्या दिवशीही शास्त्रीजींचा विषय निघाला. 'शास्त्रीबुवा फार थकलेत-' मधुकाका म्हणाले, 'सध्या महाबळेश्वरला मुक्कामाला आहेत-'

दुसरे दिवशी पहाटे झोपेत, शांतपणे शास्त्रीजींनी अखेरचा श्वास घेतला.

मधुकाकांनी वाईला जाताना माझ्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. तो न झाल्याने मुलासह निघून गेले. मला कळलं तेव्हा सारेच संपले होते. ज्ञानतपस्वीची इहलोकीची यात्रा आटोपली होती. त्यांचे अखेरचे दर्शन घ्यायचा योग नव्हता.

मनात आले, शास्त्रीजींच्या जाण्याने महाराष्ट्रातील विद्वत्तेची पातळी कितीतरी खाली आलीय...

**(ललित मासिक, मुंबई, जुलै १९९४, पृष्ठ १३ ते १७)**

ooo

# ६२.

# अखंड चाललेल्या ज्ञानयज्ञाचे कुंड विझले

## यशवंत दिनकर फडके

२७ मे १९९४. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या निधनाची दुःखद वार्ता सकाळीच समजली. नव्वदी ओलांडलेल्या शास्त्रीजींचे निधन अकाली नसले तरी अनपेक्षित होते. दोन-चार दिवसांपूर्वीच रामदास आठवले यांनी आयोजित केलेल्या एका शिबिरात भाषण करताना घेण्यात आलेले त्यांचे छायाचित्र वृत्तपत्रात प्रकाशित झालेले पाहिले होते. चांगलेच पिकलेले पान निसर्गनियमानुसार केव्हातरी गळून पडणारच होते, खरे पण ते असे अचानक गळून पडले तेव्हा वाटले, हा अखेरपर्यंत क्रियाशील असलेला पंडित शतायुषी व्हावयास हवा होता. अभ्यासकांच्या आणि कार्यकर्त्यांच्या किमान दोन पिढ्यांच्या मस्तकावरचे छत्र असे कालपुरुषाने हिरावून घ्यावयास नको होते.

खानदेशात जन्मलेले शास्त्रीजी संस्कृत विद्या शिकण्यासाठी वाईला प्राज्ञपाठशाळेत दाखल झाले त्यालाही पाऊणशे वर्षांहून अधिक काळ लोटला. त्यांचे गुरुजी नारायणशास्त्री मराठे ऊर्फ केवलानंद सरस्वती हे पट्टीचे विद्वान आणि ज्ञानवंतांचे मुकुटमणी होते. वाईचा दक्षिणेतील काशी हा लौकिक केवलानंदांनी वाढवला होता. त्यामुळे आचार्य विनोबा भावे यांच्यासारखा प्रज्ञावंत काशीस विद्यार्जन करून, गांधीजींच्या कोचरब आश्रमात राहून नंतर वाईला आजोळी परतला. ब्रह्मसूत्रभाष्यादी ग्रंथांचे पूर्वग्रहरहित आणि सूक्ष्म अध्ययन केलेल्या केवलानंद सरस्वतींशी विनोबांनी १९१७ सालच्या जानेवारीत प्रश्नोत्तरांच्या पारंपरिक पद्धतीने संवाद साधला तेव्हा लक्ष्मणशास्त्री हे प्राज्ञपाठशाळेत विद्यार्थी होते. प्रज्ञानंद सरस्वती, त्यांचे पट्टशिष्य केवलानंद सरस्वती आणि केवलानंदांचे पट्टशिष्य लक्ष्मणशास्त्री जोशी अशी ही गुरुशिष्य परंपरा असली तरी शास्त्रीजींनी गुरुजींप्रमाणे संन्यास न घेता आयुष्यभर नेटका प्रपंच केला. संन्याशाच्या विरक्त वृत्तीने आयुष्य जगण्यापेक्षा रसिकतेने त्यांनी एखाद्या प्रापंचिकाप्रमाणे जीवनातील सुखोपभोगांचा मनसोक्त आस्वाद घेतला. आपल्या गुरुजींप्रमाणे त्यांनी अखंड ज्ञानसाधना केली. हिंदू धर्मात सुधारणा व्हावी

असा केवलानंद सरस्वतींनी ध्यास घेतला होता. त्या पारतंत्र्याच्या काळात देश स्वतंत्र करण्यासाठी काँग्रेसच्या नेतृत्वाखाली चाललेल्या चळवळीशी केवलानंदांचे लागेबांधे होते. ते वाईच्या तालुका काँग्रेस समितीचे उपाध्यक्ष होते. प्राज्ञपाठशाळेने स्वातंत्र्य चळवळीला स्वयंसेवक आणि प्रचारक पुरवले. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, दिनकरशास्त्री कानडे, महादेवशास्त्री दिवेकर, श्रीपाद शंकर नवरे, भय्याशास्त्री वाटवे, श्रीराम सावरगावकर वगैरे प्राज्ञपाठशाळेच्या विद्यार्थ्यांनी आणि अध्यापकांनी स्वातंत्र्यचळवळीत कारावास भोगला.

## गुरुशिष्य आघाडीवर

१९३० सालच्या सत्याग्रह आंदोलनात अहमदनगर जिल्ह्यात संगमनेर आणि अकोला तालुक्यात तसेच नाशिक जिल्ह्यात बागलाण, कळवण या तालुक्यांत जंगल सत्याग्रह जोरात चालला होता. या सत्याग्रहात लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी हिरिरीने भाग घेतला आणि या सत्याग्रहाचे एक प्रमुख नेते म्हणून तेव्हाच्या गुप्तचर विभागाने त्यांच्या कार्याची दखल घेतली. १९३०-३२ च्या चळवळीत कारावासात असताना तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, भय्याशास्त्री वाटवे, वामनराव कुलकर्णी, ह. रा. महाजनी वगैरेंना मानवेंद्रनाथ रॉय यांच्या विचारांनी मोहिनी घातली. मंदिर प्रवेशाबाबत सार्वजनिक पाणवठ्यांचा वापर करण्याबाबत तसेच शिक्षणसंस्थांत प्रवेश करण्याबाबत अस्पृश्यांना आडकाठी असू नये, असे मत व्यक्त करणाऱ्या पंडितांमध्ये केवलानंद सरस्वती आणि लक्ष्मणशास्त्री जोशी हे गुरुशिष्य आघाडीला होते. शास्त्रीजींनी तर गांधीजींची बाजू उचलून धरून काशीच्या पंडितांशी वाग्युद्ध खेळले होते. महात्मा गांधींचे चिरंजीव देवदास आणि राजाजींची कन्या लक्ष्मी यांच्या आंतरजातीय विवाहाचे पौरोहित्य शास्त्रीजींनीच केले होते. स्वातंत्र्योत्तर काळात सरदार पटेलांच्या प्रेरणेने सोमनाथाच्या ऐतिहासिक मंदिराचे पुनरुज्जीवन करण्यात आले तेव्हा मूर्तीची प्रतिष्ठापना करण्याचे निमंत्रण शास्त्रीजींनी स्वीकारले आणि मानवेंद्रनाथ रॉय यांची त्याबद्दल टीकाही ओढवून घेतली.

## खाजगी मैफली

शतकानुशतके दृढ झालेल्या परंपरा शास्त्रीजींनी सर्वस्वी त्याज्य मानल्या नाहीत. त्यातला जो भाग त्यांना जतन करण्यासारखा वाटला तो करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्याचबरोबर कालबाह्य झालेल्या, टाकाऊ ठरलेल्या अनेक परंपरांवर त्यांनी प्रहारही केले. संस्कृत विद्येप्रमाणेच पाश्चिमात्यांच्या तत्त्वविचारांचे त्यांनी सूक्ष्म अध्ययन केले. 'शाहू छत्रपती आणि लोकमान्य' या माझ्या ग्रंथातील वेदोक्ताच्या तसेच ताई महाराजांनी घेतलेल्या दत्तकाबद्दलच्या वादांचे विवेचन करू शकलो ते शास्त्रीजींच्या मार्गदर्शनामुळेच. एका लग्नसमारंभात केवळ योगायोगाने मला भेटलेल्या शास्त्रीजींना मी कसलीही पूर्वसूचना न देता संस्कृत ग्रंथातील वचनांचा अर्थ विचारला, तो त्यांनी मला तिथल्या तिथे स्पष्ट करून सांगितलाच, शिवाय माझा युक्तिवाद बळकट व्हावा म्हणून मला माहीत नसलेले

अनेक संदर्भ शोधण्यास सांगितले. त्या दिवशी तास-दीड तास केवळ स्मरणशक्तीच्या जोरावर त्यांनी जे श्लोक उद्धृत केले ते ऐकून विद्या पाणी भरते म्हणजे काय याचा सुखद प्रत्यय मला आला. 'लोकमान्य टिळक आणि क्रांतिकारक' या माझ्या पुस्तकाचे प्रकाशन त्यांनी केले तेव्हाही असाच अविस्मरणीय अनुभव आला. लोकमान्य टिळकांपासून प्रेरणा घेतलेल्या काही क्रांतिकारकांचा प्राज्ञ पाठशाळेशी जवळचा संबंध होता. त्यांचा माझ्या प्रास्ताविक भाषणात मी नामनिर्देश करताच शास्त्रीजींनी पाहिलेल्या त्या क्रांतिकारकांच्या आठवणींचे भांडार त्यांनी अध्यक्षीय भाषणात खुले केले. मित्रांच्या आणि सहकाऱ्यांच्या बरोबर बातचीत करताना शास्त्रीजी खासगी मैफली रंगवीत असत, असे म्हणतात. मी अशा काव्यशास्त्रविनोदाने भरलेल्या त्यांच्या मैफलीत कधीही सामील झालो नसलो तरी केवळ जिज्ञासेपोटी त्यांना शंका विचारण्याची संधी मला जेव्हा मिळाली, तेव्हा तेव्हा मला त्यांच्या ज्ञानाने स्तिमित केलेले आहे.

## सांस्कृतिक संचितात भर

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आल्यानंतर राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी अनेक नवीन उपक्रम हाती घेतले. १९ नोव्हेंबर १९६० रोजी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना करण्यात आली. वीस वर्षे शास्त्रीजींनी अध्यक्षपदाची धुरा वाहिली. मंडळाच्या कार्याची पायाभरणी आणि उभारणी करण्याचे श्रेय सर्वस्वी शास्त्रीजींनाच द्यावयास हवे. आजही चालू असलेल्या अनेक प्रकल्पांची मूळची कल्पना शास्त्रीजींचीच होती. हे प्रकल्प पुरे झाले नसले तरी त्यातील काही भाग प्रकाशित करणे मंडळाला शक्य झाले ते त्यांच्या नेतृत्वामुळे. अखेरच्या क्षणापर्यंत धर्मकोशाचे तसेच विश्वकोशाचे काम त्यांनी चालवले होते. विश्वकोशाचे बरेचसे खंड प्रकाशित झाले आहेतच. याखेरीज विज्ञानविषयक ग्रंथ, संशोधनपर ग्रंथ, अन्य भाषेतील अभिजात साहित्यकृतींचे अनुवाद, दुर्मीळ ग्रंथांचे पुनर्मुद्रण अशा नानाविध प्रकल्पांचा पाठपुरावा करून शास्त्रीजींनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक संचितात भर घालण्याचे अथक प्रयत्न केले. लोकांनी, राज्यकर्त्यांनी तसेच विद्वानांनी त्यांच्या पांडित्याची नेहमीच कदर केली. त्यामुळे अनेक मानसन्मान त्यांना लाभले यात नवल नाही. त्यांच्या मृत्यूने अखंड चाललेल्या त्या ज्ञानयज्ञाचे कुंड कायमचे विझले आहे. त्यांनी लिहिलेले ग्रंथ हे पुढील पिढ्यांना प्रेरणा देतील.

**(दैनिक लोकसत्ता, मुंबई; २८ मे, १९९४)**

○○○

## ६३.

# चालता-बोलता ज्ञानकोश हरपला

## मधुकाका कुलकर्णी

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची प्राणज्योत शुक्रवार दिनांक २७ ला पहाटे पाच वाजता मालवली. महाराष्ट्रातील प्रकांड पांडित्य पडद्याआड गेले. पहाटे चार वाजता शास्त्रीजी स्वतः बाथरूमधून जाऊन आले. ते दररोज पाच वाजता उठत व चहा घेऊन बाहेरून फिरून येत, पण शुक्रवारी त्यांचा ड्रायव्हर छोटू, पाच वाजता चहा घेऊन आला आणि उठण्यासाठी त्यांनी हाक मारली, 'आबा, चहा झाला आहे. आणला आहे, उठा.' चार-पाच वेळा हाक मारूनही आबा उठेनात तेव्हा त्यांनी शास्त्रीजींच्या अंगाला स्पर्श केला. त्याला तो गारपणा निराळाच भासला. म्हणून जवळ राहणाऱ्या डॉक्टरांना तो घेऊन आला. त्यांनी तपासणी करून अर्ध्या तासापूर्वी ते कालवश झाले आहेत, असे सांगितले.

शास्त्रीजींनी एक छोटे घर श्रीक्षेत्र महाबळेश्वर येथे बांधले आहे. त्या दिवशी सोबतीला फक्त ड्रायव्हर छोटूच होता. शास्त्रीजींचे धाकटे चिरंजीव वासुदेव हे वाईत होते. ते वास्तविक त्यांच्याबरोबर असायचे. परंतु काही काम निघाले म्हणून ते वाईस गेले होते.

दोन दिवस आधी सायंकाळी पाच वाजता मुख्यमंत्री शरद पवार आणि त्यांच्या पत्नी सौ. प्रतिभा पवार हे महाबळेश्वरला त्यांच्या भेटीसाठी फोन करून आले होते. मुख्यमंत्री जवळजवळ दीड तास निरनिराळ्या विषयांवर शास्त्रीजींशी बोलत होते. शुक्रवारी त्यांनी पुन्हा येऊन शास्त्रीजींचे अंत्यदर्शन घेऊन त्यांना श्रद्धांजली वाहिली.

शास्त्रीजींचा जन्म १९०१ मध्ये धुळे जिल्ह्यातील पिंपळनेर येथे झाला. घराणे शास्त्री पंडितांचे असल्यामुळे संस्कृत साहित्य, वेद, उपनिषदे यांचा अभ्यास करण्यासाठी त्यांना त्यांच्या पालकांनी वाई येथे प्राज्ञ पाठशाळेत स्वामी केवलानंद सरस्वती उर्फ नारायणशास्त्री मराठे यांच्याकडे विद्यार्जनासाठी पाठविले. या आश्रमीय विद्यार्थ्यांची त्या वेळी अध्यापनाची तशी वास्तू वगैरे नव्हती. तसेच जेवण्या राहण्यासाठी वसतिगृह नव्हते. माधुकरी मागून कोणाच्या तरी घरी वस्ती करून विद्याभ्यास करायचा अशी पहिली पद्धत होती. कृष्णेच्या

काठी गंगावेस असून त्या ठिकाणी मोठ्या पिंपळाच्या वृक्षाखाली केवलानंद आपल्या शिष्यांना घेऊन त्यांच्याकडून वेद व उपनिषदे यांचे अध्ययन करून घेत.

ही परिस्थिती बघून एक धनवान विद्वान गृहस्थ कै. सीतारामपंत पटवर्धन यांनी आपला प्रचंड मोठा असा सर्व वाडा केवलानंदांच्या प्राज्ञ पाठशाळेस बक्षीस दिला. हे सीतारामपंत पटवर्धन म्हणजे महाराष्ट्रातील प्रसिद्ध राजकीय व सामाजिक कार्यकर्ते कै. रावसाहेब अच्युतराव पटवर्धन यांचे काका होत.

## राष्ट्रवादाकडे ओढा

शास्त्रीजींचे अध्ययन चालू असताना अनेक क्रांतिकारक हे स्वामी केवलानंद यांना भेटावयास येत. काही भूमिगत क्रांतिकारकांचे आश्रयस्थान प्राज्ञ पाठशाळा हे होते. त्यामुळे त्या वेळच्या ब्रिटिश सरकारच्या पोलिसांना त्यांचा प्राज्ञ पाठशाळेत संशय घेता येत नसे. त्यामुळे शास्त्रीजींचा ओढा जसजसे ते तारुण्याकडे झुकत चालला, तसतसे ते जास्त राष्ट्रवादी बनत चालले.

पुढे-पुढे राजकीय कार्य करणारी मंडळी शास्त्रीजींच्या आजूबाजूला जास्त जमू लागली. शास्त्रीजींनी टिळकयुग पाहिले. लोकमान्यांच्या कार्याबद्दल त्यांना नितांत आदर वाटत होता. परंतु महात्मा गाधींचे सर्वच युग त्यांच्या हयातीत त्यांना पाहावयास मिळाले.

पुढे १९२२-२३ मध्ये शास्त्रीजींना कलकत्त्याच्या संस्कृत पाठशाळेची 'तर्कतीर्थ' ही पदवी प्राप्त झाली. प्राज्ञ पाठशाळेशी संबंध ठेवून व त्या ठिकाणी अध्यापन करून शास्त्रीजींनी निराळे बिऱ्हाड केले. १९२६ मध्ये त्यांचा विवाह सौ. सत्यवतीबाई यांच्याशी झाला. शास्त्रीजींच्या पुरोगामी विचारांशी सत्यवतीबाई जमवून घेत. त्यांचेही विचार पुरोगामीच होते. शास्त्रीजी व सतीकाकू हे संसारात पूर्णपणे रमलेले होते. वाई हे तसे सनातन्यांचे गाव. ब्राह्मणी रीतिरिवाज सोडून सहसा कोणी ब्राह्मण वावरत नसे, पण शास्त्रीजींच्या घरी स्वयंपाकघरातील कामकाज व स्वयंपाक करण्यास जी बाई होती ती अस्पृश्य, दलित समाजातील होती. नाना फडणवीस यांचं मेणवली गाव हे तिथून दोन मैलांवर आहे. ती बाई त्या ठिकाणाहून दररोज वाईस शास्त्रीजींकडे येऊन अद्यापही काम करते. ब्रह्मवृंदानी पहिल्या पहिल्यांदा जरा कुरकुर केली, पण शास्त्रीजींचे स्थान सर्वच वर्तुळात वाढत चालल्यामुळे कुरकुर करणे थांबले गेले.

मनू पालटत होता. महात्मा गांधींची चळवळ फोफावत होती. वाई प्रांतातील शास्त्रीजी एक नेते होते. पुढे ३१-३२ मध्ये शेतकऱ्यांचा एक उठाव प्रचंड प्रमाणात महाराष्ट्रात झाला. त्या वेळी शास्त्रीजी, वाघोलीकर वकील वगैरे मंडळी नाशिक जिल्ह्यात बागलाण तालुक्यात शेतकऱ्यांत काम करून जागृती निर्माण करीत. त्याच सुमारास शास्त्रीजींच्या नावाने बागलाण येथे पोलिसांचे 'वॉरंट' आले. बागलाण सोडून शास्त्रीजी दुसऱ्याच कुठल्या तरी गावाला निघून गेले. मात्र कार्यकर्त्यांनी ते हरिश्चंद्रगडच्या बाजूला गेले आहेत, असे पोलिसांना सांगितले. इतकेच नव्हे तर शास्त्रीजींचा एक कुडता व जाकिट हरिश्चंद्रगडच्या

एका दगडावर नेऊन ठेवले. पोलिसांच्या बरोबर काही कार्यकर्तेही होते. त्यांनी ते जाकिट व कुडता पोलिसांना दाखविला व शास्त्रीजींचे निधन झाले असावे, असे पोलिसांना भासविले. पोलीस ती बातमी घेऊन नाशिकला आले. सर्व नाशिक शहरात बातमी पसरली की, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे निधन झाले. कार्यकर्त्यांतही चलबिचल सुरू झाली. पुढे काही दिवसांनी शास्त्रीजी पकडले गेले आणि सरकारने त्यांना धुळयाच्या तुरुंगात ठेवले. त्या ठिकाणी आचार्य विनोबा भावे यांची शास्त्रीजींशी गाठ पडली. धुळयाच्या तुरुंगात असताना विनोबांनी शास्त्रीजींना इंग्रजी शिकू दिले. प्रकांडपंडित शिष्य लक्ष्मणशास्त्री आणि तितकाच प्रकांडपंडित गुरू आचार्य विनोबा भावे. तेव्हा इंग्रजी शिकण्यास किती वेळ लागणार! सहा महिन्यांत शास्त्रीजींनी इंग्रजी पूर्णपणे आत्मसात केले. बर्ट्रांड रसेल, शेक्सपिअर, रुसो, टॉलस्टॉय यांचे ग्रंथ त्यांनी भराभर वाचून काढले.

शास्त्रीजींच्या विचारात पौर्वात्य व पाश्चिमात्य विचारांचा जो संगम झाला तो त्यामुळे झाला. १९३५-३६ मध्ये काशीला जी धर्मपंडितांची परिषद झाली, तिच्यात तर्कतीर्थांनी आपला अधिकार त्या मंडळींना दाखविला.

त्यानंतर मॉस्कोला सोव्हिएट रशियात एक सर्व धर्म परिषद भरली होती. मॉस्कोजवळ १०० मैलांवर अर्थोडॉक्स कॅथेड्रल व कॅथॉलिक विद्यापीठ आहे. दुसरे व्हेटिकन असे आजही त्या स्थानास संबोधिले जाते. भारतातून तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे भारतातर्फे त्या ठिकाणी धर्मशास्त्रावर बोलण्यासाठी उपस्थित राहिले. शास्त्रीजींनी संपूर्ण भाषण इंग्रजीत केले व आपल्या धर्माचे श्रेष्ठत्व त्यांनी त्या ठिकाणी सांगितले.

### त्या वेळचे पौरोहित्य

१९३२ चा कारावास. त्यानंतरची सुटका या गोष्टी झाल्यानंतर १९३४ मध्ये महात्मा गांधींचा मुक्काम पुण्यातच ठाकरसी यांच्या बंगल्यावर होता. गांधींचा मुलगा व चक्रवर्ती राजगोपालाचारी यांची मुलगी हा विवाह तेथे ठाकरसी बंगल्यात संपन्न झाला. पौरोहित्य करण्यासाठी महात्मा गांधींनीच तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची निवड केली होती. हिंदु धर्म सनातन पद्धतीने शास्त्रीजींनी सर्व पौरोहित्य केले. महात्मा गांधी आणि राजाजी हे सर्व पाहत होते. समारंभ संपल्यानंतर गांधीजींनी शास्त्रीजींना कडकडून मिठी मारली.

सोरटी सोमनाथाची प्राणप्रतिष्ठा त्या वेळचे गृहमंत्री व संस्थेचे प्रमुख विश्वस्त सरदार वल्लभभाई पटेल यांनी शास्त्रीजींच्या पौरोहित्याखाली केली. भारतातील अनेक विद्वान दशग्रंथी व जटापाठी तेथे आले होते. परंतु प्रमुख स्थान शास्त्रीजींना होते. प्राणप्रतिष्ठेप्रीत्यर्थ लोकांनी दिलेली वस्त्रे व द्रव्य इतके होते की एक ट्रक भरला असता. परंतु शास्त्रीजींनी त्यातील एका पैशासही हात लावला नाही. दान करून टाका, असे सांगून ते महाराष्ट्रात निघून आले.

त्यानंतर शास्त्रीजींनी धर्मकोशाचे काम अंगावर घेतले. हे काम प्रचंड होते, अनेक विद्वान

शास्त्री या कामास लागत होते. दिल्लीचे अखिल भारतीय साहित्य संमेलन १९५४ मध्ये झाले. त्या वेळी धर्मकोशाचे चार खंड पूर्ण झाले होते. 'वैदिक संस्कृतीचा विकास' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला होता. पुणे येथे गोखले सभागृहात शास्त्रीजींनी जी व्याख्यानमाला दिली होती ती व्याख्याने म्हणजेच हा ग्रंथ होय. 'ज्योतिनिबंध' व 'हिंदुधर्माची समीक्षा' हेही त्यांनी व्याख्याने दिलेली होती त्यांचे ग्रंथरूप आहे. नंतर त्यांनी जडवाद इत्यादी विचारांवर ग्रंथ तयार केले होते त्यातील ‘जडवाद’ हा ग्रंथ कै. य. गो. जोशी यांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्याकडून लिहून घेतला. दुसरा एक स्वतंत्र ग्रंथ म्हणजे ‘तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लेखसंग्रह’ हा ग्रंथ १९८२ मध्ये श्री विद्या प्रकाशनाने प्रसिद्ध केला. डबल क्राऊन आकाराचा ७०० पृष्ठांचा हा ग्रंथराज आहे. समारंभ टिळक स्मारक मंदिरातील प्रेक्षागृहात महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्त्व पु. ल. देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली झाला आणि त्यांनीच तो विमोचित केला.

१९५४ च्या दिल्ली साहित्य संमेलनाचे अध्यक्ष शास्त्रीजी होते. भारताचे त्या वेळचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू होते आणि काकासाहेब गाडगीळ हे स्वागताध्यक्ष होते. पुढे संयुक्त महाराष्ट्राची चळवळ व महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. पहिले मुख्यमंत्री कै. यशवंतराव चव्हाण होते. १९६० मध्ये शास्त्रीजींच्या अध्यक्षतेखाली राज्य साहित्य संस्कृती मंडळ अस्तित्वात आले आणि १९७५ मध्ये वीस भागांतील विश्वकोश तयार करावयास घेतला. त्याचा पहिला खंड १९७६ मध्ये प्रसिद्ध झाला. आज मितीस १५ खंड प्रसिद्ध झाले आहेत. पुढचे पाच खंड व्हावयाचे आहेत. नोंदी करण्यासाठी जो अतिथी संपादकवर्ग हवा असतो तो दिवसेंदिवस मिळेनासा झाला आहे. जुने संपादक एकतर कालवश झाले किंवा विकलांग झाले आहेत. धर्मकोशाची परिस्थिती तशी आहे. प्रकांड पंडित शास्त्री त्या काळाला हवे असतात. होते ते कालवश झाले. प्रा. मे. पुं. रेगे यांची एक कल्पना अशी आहे की तंजावर, बंगलोर, पुणे अशा ठिकाणी जी संस्कृत उच्च शिक्षणाची सेंटर्स आहेत, त्या ठिकाणी एक एक भाग तयार करावयास द्यावयाचा. अलीकडे या जागतिक कामासाठी फोर्ड फौंडेशनने मदत देऊ केली होती.

त्यांच्या पत्नी देखण्या होत्या. १९४५-४६ मध्ये शास्त्रीजी पुण्यास राहात होते. त्या वेळी ते रॉयिस्ट होते. चिमणबागेत एकदा भाई मानवेंद्रनाथ रॉय हे व काही रॉयिस्ट त्यांच्याकडे भोजनास आले. इतर स्त्रियांप्रमाणेच सतीकाकू वाढीत होत्या. कोणीतरी रॉयना सांगितले की, या शास्त्रीजींच्या पत्नी सतीकाकू. रॉय हे पाश्चात्त्य देशात राहिलेले गृहस्थ. ते एकदम म्हणाले 'What a beautiful she is!' सतीकाकू खूप रागावल्या, त्या नंतर वाढावयास आल्या नाहीत. शास्त्रीजींना कारण कळले. ते सतीकाकूची समजूत घालू लागले. सतीकाकू म्हणाल्या, 'शोभत नाही!' रॉयना काय झाले हे शेवटपर्यंत कळलेच नाही.

शास्त्रीजींचे वर्तन शुद्ध चारित्र्याचे होते. अधूनमधून त्यांचे मित्र चेष्टा करीत असत.

दिल्लीच्या अमेरिकन वकिलातीतील एक अमेरिकन स्त्री शास्त्रीजींना नेहमी भेटे व त्यांच्याशी सल्लामसलत करी. दिल्लीत किसनवीर, शास्त्रीजी वगैरे मंडळी कै. यशवंतराव चव्हाण यांच्या घरी मुक्काम करीत. एकदा रात्री आठ वाजले तरी शास्त्रीजी येईनात. यशवंतरावांनी विचारले, 'शास्त्रीजी दिसत नाहीत.' किसनवीर लगेच म्हणाले, 'गेले असतील त्या अमेरिकन बाईकडे. पडले असतील तिथे.' पुढे दहा मिनिटांतच शास्त्रीजी आले. सर्व मंडळी हसायला लागली. हसण्याचे कारण शास्त्रीजींनी विचारले. यशवंतरावांनी किसनवीर काय म्हणाले ते सांगितले. शास्त्रीजींनी मी कोणत्या विषयावर त्या विदुषीशी चर्चा केली हेही सांगितले. सर्वांचे समाधान झाले. ती अमेरिकेच्या पाकिस्तानमधील राजदूत कचेरीत व बांगला देशाच्या राजूदत कचेरीत अनेक दिवस काम करीत होती. तिचा आणि शास्त्रीजींचा पत्रव्यवहारही बरेच दिवस होत होता.

राजकारणातील प्रमुख प्रवाह कुठला व दुय्यम दर्जाचा प्रवाह कुठला आहे याची शास्त्रीजींना जाणीव होती. यशवंतराव मध्यंतरी काँग्रेस सोडून एस. काँग्रेसमध्ये दाखल झाले होते. चरणसिंगांच्या मंत्रिमंडळात उपपंतप्रधान या पदावर विराजमान झाले होते. परंतु हे औटघटकेचे राज्य होते. तीन महिन्यांनंतर निवडणुका होऊन पुन्हा इंदिरा गांधींनी मंत्रिमंडळ बनविले. यशवंतराव बाहेर फेकले गेले. काही दिवसांनी खंबाटकी घाटात शास्त्रीजींची गाडी व यशवंतरावांची गाडी क्रॉस होत होती. दोघेही खाली उतरले व एका दगडाच्या चिऱ्यावर बसून राहिले. यशवंतरावांनी वेदना सांगितल्या. शास्त्रीजी त्यांना म्हणाले की, 'यशवंतराव, तुम्ही आजवर सत्तेचं राजकारण केलं आहे. दुसरं राजकारण तुम्हाला जमलं नाही. इंदिरा गांधी जे देतील त्यात समाधान माना.' त्यानंतर काही दिवसांनी यशवंतरावांनी इंदिरा काँग्रेसमध्ये प्रवेश केला आणि बऱ्याच काळानंतर ते आठव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष झाले.

अनेक संस्थांशी असलेला शास्त्रीजींचा संबंध सर्वांना परिचित आहे. मुंबई विद्यापीठांनी त्यांना मानद डी. लिट. (एल.एल.डी.) पदवी दिली होती. पद्मभूषण त्यांना मिळाला आहे. अनेक संस्थांचे त्यांना पुरस्कार लाभले आहेत. शास्त्रीजींच्या घराण्यात दीर्घायुष्य हा एक वारसा आहे. त्यांचे थोरले बंधू पंडित वेणीमाधवशास्त्री त्यांच्या वयाच्या ९० व्या वर्षी गेले. शास्त्रीजींनी गेल्या २७ जानेवारीला ९३ वर्षे पुरी केली होती व ९४ व्या वर्षात पदार्पण केले होते. एक मोठा ज्ञानाचा साठा, चालता बोलता ज्ञानकोश, प्रकांड पांडित्य, नवसमाज निर्मितीची दृष्टी आणि पुढे काय होणार आहे याचे ज्ञान असा महापुरुष आपणांतून निघून गेला आहे. महाराष्ट्राचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे. सांस्कृतिक पोकळी निर्माण झाली आहे. हे भरून न येणारे असे नुकसान झाले आहे.

**(दैनिक केसरी, पुणे; दि २९ मे, १९९४)**

ooo

# (क) आठवणी

## ६४.

# कौटुंबिक जीवनातील शास्त्रीजी

## सौ. अरुंधती खंडकर

आबांच्या कौटुंबिक आणि सामाजिक जीवनात सीमारेषा कशी सापडणार? आबांनी आयुष्याची आठ दशके वाटचाल केली हे 'नवभारत'च्या संपादकांनी नजरेस आणून दिले हे बरे झाले. खणखणीत आवाजात अनेक प्रकारच्या सभांमध्ये वैशिष्ट्यपूर्ण विचार आबा मांडत असतात. विशेषतः परगावी असले म्हणजे हा त्यांचा नित्यक्रम असतो. वाईहून निघायचे, वाटेत पुण्याला घाईघाईने त्यांचे स्वीय सहायक राम कोल्हटकर काही कामे उरकतात, मुंबईला यायला निघतात. आबांबरोबर प्रवासात असणाऱ्याला सत्य साईबाबांपासून सोलर एनर्जीपर्यंत अनेक विषयांवर विचारांची देवाणघेवाण करावयास मिळते. वाटेत रस्त्याला ताजी भाजी व फळे दिसली तर ती पिशव्यांमधून भरली जातात. घरी आल्यावर मी म्हणते 'आबा, ही एवढी भाजी म्हणजे मला आणखी एक रेफ्रिजरेटर घ्यावा लागणार.' आबा मोटारगाडीच्या प्रवासात कधी डुलकी घेणार नाहीत. त्यांचा एक सिद्धांत असा की, आपण बोलत राहिलो की ड्रायव्हरला डुलकी येण्याची शक्यता कमी- मग आपला विषय त्याला नाही समजला तरी चालतो. आबांना दुपारची वामकुक्षीसुद्धा लागत नाही. संध्याकाळी जावयाच्या सभेची तयारी- रात्री अनेक वेळा त्यांना उशीर होतो. त्यांना दार उघडल्यावर माझ्या हातात गुच्छ, हार देऊन बाबा निजण्यास निघून जातात. मला कळत नाही ते थकत कसे नाहीत. गादीवर अंग टेकले की, आबांना शांत झोप लागते. अधूनमधून वाऱ्याबरोबर त्यांच्या हारातील फुलांचा सुगंध दरवळत राहातो.

गेली सहा वर्षे आणि सतीच्या निधनानंतर अलीकडे अडीच वर्षे आबांचा सहवास मला अधिक लाभतो. तरी त्यांच्यासंबंधी लिहिण्याविषयी प्रा. रेगे यांनी सांगितल्यावर हे स्वीकारावे की नाही याविषयी मी थोड्या संभ्रमात पडले. त्यांच्या जीवन-नाट्यात अनेक वेळा वावरणारे मी एक पात्र आणि आता रंगभूमीवरून अलिप्त होऊन प्रेक्षागारात जाऊन प्रेक्षकाची वा तटस्थ समीक्षकाची भूमिका बजावायचे काम कठीण वाटते. शिवाय आबांच्या

बौद्धिक व्यक्तिमत्त्वापासून प्रापंचिक बाजू निराळी करण्याने निवेदनात कृत्रिमता येईल अशी भीती वाटते.

माझ्या आयुष्यातील पहिल्या चार वर्षांतील आबा मला अजिबात आठवत नाहीत. त्या काळात स्वातंत्र्याच्या आंदोलनात सक्रिय भाग घेताना, बहुधा तुरुंगवासात नाहीतर आंदोलनाच्या प्रचारास ते बाहेर होते. १९३६ ते १९४० ही चार वर्षे आम्ही पुण्याला चिमणबागेत आपट्यांच्या घरात बिऱ्हाड केले होते. त्या वेळी प्राज्ञपाठशाळेकडे मुद्रणालय नव्हते. धर्मकोशाचे प्रथम खंड वा. गो. परांजप्यांच्या 'आर्यसंस्कृती' छापखान्यात छपाईसाठी दिले होते. विविध आकारांच्या अक्षरांमध्ये ग्रंथ छापावा लागणार म्हणून धर्मकोशाचे कार्यालय पुण्याला आणले होते. त्या वेळचे मोजके प्रसंग मात्र अजून डोळयापुढे स्पष्ट उमटतात. ती सर्व जागा- मोठे अंगण, मध्ये फणसाचे झाड असे चित्र डोळयांसमोर येते- भाड्याने घेतली होती. पहिल्या खोलीत आबांना अनेक मंडळी भेटायला येत. पांढरे लोड, स्वच्छ तक्के अशी भारतीय बैठक होती. आबांच्या आजूबाजूला पुस्तके रचलेली. त्यांतील एक छोटेसे पुस्तक, मला वाटते धर्मकोशाची परिचय-पत्रिका होती, ती मी काढली. पहिले पान उलटल्यावर लगेच आबांचा फोटो होता. आबांचा पेहराव म्हणजे शाल पांघरलेली, शेंडी, दाट काळ्या मिशा वगैरे. मी म्हटले, 'आबा, असला फोटो मैत्रीणींना दाखवायला मला लाज वाटते; तुम्ही शर्ट, भांग काढून फोटो काढून घ्या.' आबा त्यावर खळखळून हसले.

याच घरात, कॉलेजमधील प्राध्यापक, बी. ए. चे छान कपडे केलेले विद्यार्थी, राजकारणात मुरलेले नेते, 'ब्रँडीची बाटली' नुकतेच प्रदर्शित केलेले आचार्य अत्रे, सामाजिक रूढींचे जतन करणारे सनातनी तसेच एम. एन. रॉय वगैरे मंडळी आलेली मला आठवतात. या सर्वांची ऊठबस होई, त्यावरून आबा नक्की वेगळे आणि मोठे असावेत असा आम्हा भावंडांवर परिणाम झाला.

आबांकडे मंडळी येत तेव्हा आम्ही बाहेरच्या खोलीत घुटमळायचो. त्यांच्या पाठीला लोंबकळायचो किंवा मधूचे आणि माझे तेथे भांडण जुंपायचे. चिमटे ओरबाडणे चालू असले तरी आबांना त्रास झाला नाही. ते कधी ओरडले नाहीत. अजूनही रागाने आबांनी आवाज चढवला असे घडत नाही.

१९३७ मध्ये एके दिवशी घरात पोलीस ३/४ तास वावरत होते. झडती घेत होते. सामान उपसले गेले होते. बाहेर खिडकीतून पाहिल्यावर आजूबाजूची माणसे गोळा झाली होती असे दिसले. मी आमच्या घरी पोलीस आले आहेत असे ओरडून खाली मुलींना सांगत होते. बाजूला सती उभी होती. तिने डोळ्याने दटावले. संध्याकाळी सर्व सामसूम झाल्यावर आबांकडे सती रागे भरली म्हणून चुगली केली. तेव्हाही आबा नुसते हसले. सतीला रागावले नाहीत, म्हणून माझा विरस झाला. सशस्त्र कटाशी संबंध कागदोपत्री सापडतो की

काय यासाठी ही झडती झाली, असे मी थोडी मोठी झाल्यावर मला कळले.

पुण्याहून वाईला आल्यावर म्युन्सिपालटीच्या शाळेत माझे नाव घातले. मधू हायस्कूलमध्ये ५ वीत गेला. मला वाटते या काळात रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टीच्या निमित्ताने आबा आज दिल्लीला तर उद्या डेहराडून, तर पुढील आठवड्यात कलकत्ता असे हिंडत असत. केव्हा येणार व पुढील कार्यक्रम काय याविषयी त्यांचे पत्र कधी विठ्ठलशास्त्री जोशी तर कधी मधुकर साठेला येत असे. त्यात 'चि. सौ. सत्यवतीला आशीर्वाद' असे.

आबा आले की, घर आणखीच प्रसन्न. एरवी ते परगावी असले तरी घरात पै-पाहुणे नित्याचेच. यात कधीच मावशी, मामा, काका असे नातेवाईक नसत. सती त्या सर्वांची व्यवस्था चोख ठेवी. विशेषतः संस्थेचे काही समारंभ असले की, आबांचे स्नेही न. र. फाटक, श्री. शं. नवरे, पुंडलीकजी कातगडे, प्रा. पारीख, डॉ. कर्णिक आणि त्यांचे बंधू काका तांबे यांच्या घोळक्यात आबा असत. त्या घोळक्यातील प्रत्येकाच्या आवडीनिवडीनुसार चहापाणी, जेवणे सती पार पाडत असे. चर्चा, हास्याला ऊत येई. रात्री उशिरापर्यंत बैठकी रंगत. आबांना कधी तिला सांगावे लागले नाही- तिलाही कधी अमुक करू का नको याविषयी विचारण्याची जरूर पडली नाही. आबांच्या कर्तृत्वाविषयी तिला अभिमान आणि तिच्या नैपुण्यावर आबांचा नितांत विश्वास. त्या दोघांमधील संवादित्व कौतुकास्पद. तंटा, वादविवाद, रुसणेफुगणे अपवादालाही नाही.

आबांनी सतीच्या स्वातंत्र्याला फार जपले. आमची शिक्षणे, आजारपणे, विवाह यांतसुद्धा आबांना कधी लक्ष घालावे लागले नाही. आबांच्या सहकाऱ्यांची तिला फार साथ लाभली. आबा असत, नसत; पण त्यांचे मित्र आणि त्यांचा परिवार अनेक वेळा वाईला दीर्घकाळ राहून जाई. सामाजिकदृष्ट्या वादग्रस्त असणारे अनेक निर्णय सतीने धडाडीने घेतले. १९३३ साली कर्मवीर भाऊराव पाटलांनी एका हरिजनाला पदवी परीक्षेसाठी लागणाऱ्या संस्कृत अध्ययनासाठी पाठशाळेत पाठविले. सती त्याच्या अडीअडचणी स्वतः समजावून घेऊन त्याला सर्व मदत करत असे. हा मुलगा पुढे महाराष्ट्र विधिमंडळाचा सभासद झाला, भिंगारदिवे त्यांचे नाव. आबांचा बुद्धिवाद काकणभर पुढे नेऊन सती प्रत्यक्षात उतरवत असे. प्रापंचिकदृष्ट्या आबा पूर्णतः सुखी म्हटले पाहिजेत. संसारात सतीने त्यांना निश्चिंत ठेवले.

आबांच्या ७० व्या वाढदिवसानंतर, दैनंदिन कौटुंबिक जबाबदाऱ्या खूपच कमी झाल्यामुळे सती त्यांच्याबरोबर प्रवासात साथ देई. तिच्या आयुष्यातील अखेरची ७/८ वर्षे रक्तदाब आणि किडनीचा विकार तिला होता. महिने न् महिने ती फळांवर आणि मीठवर्जित आहारावर असे. वाईला अगर इकडे आबा स्वतः मंडईत जाऊन भरपूर फळे आणत, त्यांचा रस काढून वेगवेगळ्या ग्लासमध्ये भरून रेफ्रिजरेटरमध्ये ठेवत. दुपारी जेवावयास आल्यावर तिने ते बरोबर घेतले आहेत की नाहीत हे स्वतः बघत. त्यांना रस काढल्यावर सर्व स्वच्छतेची पण घाई असे. साले उचलून, सुरी साफ करून व पुसण्याचे कामही आबा त्वरेने करीत.

आबांचे, त्यांच्या सहकाऱ्यांशी एक अनौपचारिक जाते जुळत असे. मधुकर साठे, शंकरराव जोशी, विठ्ठलशास्त्री जोशी, वासुदेवशास्त्री कोनकर, बाबा लेले, विठ्ठलराव जगताप, किसन वीर घरातल्यासारखे वागत. ते व्यवहारदृष्ट्या नातेवाईक नाहीत, हे पुढे समजले; पण पटले नाही. खाजगी आणि बिगरखाजगी असे वागण्यातील भेद नसत. किसन वीरांची कन्या ज्योती कॉलेज शिक्षणासाठी एक वर्षभर वाईला आमच्या घरी राहिली होती. तसेच सोलापूरच्या भोसल्यांची मुलगी शामा काही महिने होती. अनेकांचा या मुली आमच्या नात्यातील कोणीतरी आहेत असा समज होई. मधुकर साठेकडे प्राज्ञ-प्रेसची जबाबदारी होती, आणि विश्वकोशाच्या स्थापनेपर्यंत आबांचा तो वैयक्तिक सचिव म्हणून पत्रव्यवहार वगैरे बघे. तो २० वर्षे आमच्या घरातच राहिला. त्याच्या लग्नानंतर पाच वर्षे उलटून गेल्यावर संस्थेच्या परिसरात त्याचे कुटुंब विभक्त झाले. या दरम्यान संस्थेत आणि घरात त्याने स्वतःच्या घरासारखेच लक्ष घातले. आबांचे त्याला कौतुक- पण व्यवहारात आबा चुकल्यास तो त्यांची खरडपट्टी काढे. मालूच्या विवाहात आबा त्यांच्या मित्रांमध्ये रात्रंदिवस होते. सकाळी धार्मिक व्यवहाराच्या वेळी गैरहजर. आबा आल्यावर चारचौघांत तो म्हणाला 'विद्वान झालात म्हणून असा गाढवपणा कशाला करता' आबा न बोलता अभ्यासिकेत गेले. 'पुनः जरूर असल्यास हाक मारा मी जवळच आहे' असे सांगितले.

शंकरराव जोशी संस्थेचे प्रचारक. आम्ही त्यांना तात्या म्हणत असू. वर्षातील ८/१० महिने प्रचारासाठी ते महाराष्ट्रात दौऱ्यावर असत. ४ आण्यापासून ५०० रु. पर्यंतची वर्गणी गोळा करत शहरे फिरत. ते बोलके, मोकळे होते. ते परगावी असले की आम्ही भावंडे रात्री माईंच्या सोबतीला निजण्यासाठी तिकडे जात असू. एकत्र खाणी पिणी, जेवण हे नित्याचे. सुख, दुःख, चढ, उतार एकत्र सोसलेली ही कुटुंबे. शंकरराव फिरतीहून आले की आम्हा सर्वांना एकत्र बसून खाऊ देत असत. त्यांच्या मुलींत आणि आम्हांत भेद केला नाही. संध्याकाळी बुवासाहेबाच्या मंदिरापर्यंत ३/४ मैल ते फिरवून आणत.

पण पुढे केव्हा तरी या नात्यातील ऊब कमी झाली. मला वाटते, आबा साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष झाले. आणखी एका निराळया मोठ्या संस्थेचा कारभार सुरू झाला. शंकररावांना मनातून आवडले नाही. प्रचारात असताना ते त्यांच्यावर उघड टीका करू लागले. आबांच्या कानी येई, पण त्याबद्दल आबांनी त्यांना कधीही जाब विचारला नाही. आबा कानाडोळा करत. त्यांना कधी कोणी विचारलेच तर ते दासबोधातील रामदासांची एक उक्ती उद्धृत करत : 'धकेचपेटे सोसावे। नीच शब्द सहात जावे।' कोठे गैर चालले असल्यास आबांच्या ध्यानी लगेच येते. पण त्याबद्दल कधी तीक्ष्ण शब्द आबा वापरत नाहीत.

प्राज्ञपाठशाळेतील एक महत्त्वाचे कार्य म्हणजे संस्कृतचे शिक्षण थांबत आले होते. त्यावर उपजीविका होत नाही म्हणून विद्यार्थिवर्ग रोडावत गेला. तेव्हा धर्मकोश, मग विश्वकोशाचे काम आबांनी स्वीकारले. आबांना कोणत्याही चौकटीत घाला, त्यांना ती अपुरी पडते.

त्यांचे कार्यक्षेत्र हे सतत विस्तारत गेले आणि त्याबरोबर त्यांचे स्नेही, चाहते, सहकारी यांचे वर्तुळ मोठे झाले.

संस्थेच्या आणि राजकारणाच्या संबंधात आबांना लाभलेल्या साथीमध्ये प्रा. पारिखांचा क्रमांक पहिला लावावा लागेल. पारिखांच्या आणि त्यांच्या गप्पा फार दिलखुलास चालत. मुंबईतील मुक्कामात आबांचे वास्तव्य पारिखांकडेच असे. पारीख त्यांना सल्ला देत, थट्टामस्करी करत. परंतु शास्त्रीबोवांबद्दल त्यांना आदरही फार वाटे. आबांच्या डोळ्यात मी दोन वेळाच अश्रू पाहिले. त्यातील प्रथम पारीख गेले तेव्हा. आदल्या दिवशी ६ डिसेंबरला एका बैठकीत संध्याकाळपर्यंत ते दोघे एकत्र होते. त्यानंतर आबा दुसऱ्या दिवशी मालूच्या पुतण्यांच्या मुंजीला केंजळला जाणार होते. गेले नसते तर सतीने हजेरी घेतली असती. मुंबई सोडताना पारीख म्हणाले, 'आज राहून जा.' आबांना शक्य नव्हते. दुसऱ्या दिवशी पारीख निवर्तल्याचे समजल्यावर आबा सतीबरोबर येण्यास निघाले. वाटेत अडचणी. पारिखांची अंत्ययात्रा खोळंबली होती. शेवटी रात्री फार उशिरा आबा मुंबईत पोहोचले. निकटवर्ती मित्राचे अखेरचे दर्शन मिळाले नाही. संस्थेचा इतर सेवकवर्ग घरात वावरत असतो. पण त्यांना वैयक्तिक काम सांगणे आबांना आवडत नाही. त्यांच्याविषयी त्यांना कणव फार. त्यांना हुकूम तर कधीच करत नाहीत. रामा हा ८० वर्षांचा. तब्येतीने चांगला. मुलावर भार टाकणे आवडत नाही, पण त्याला ऐकू कमी येते. आबांचे म्हणणे रामा म्हातारा होतो आहे, त्याला फारसे काम सांगू नये. आता सती नाही. पण सणावाराला या सर्वांसाठी फराळाचे करवून घेऊन स्वतःच्या हाताने त्यांना देतात. या बाबतीत वासू व माझ्यावर विश्वास कमीच.

मणिबेन कारा, कर्णिक बंधू, ए. बी. शहा, जगताप, किसन वीर या सर्वांची मंत्री वेगवेगळ्या कारणांस्तव तितकीच मोलाची. राम कोल्हटकर हा त्यांचा निजी सेवक, सहकारी. त्यांच्या बरोबर सर्वांत अधिक काळ तोच असतो. त्यांची व्याख्याने, लेख, बैठकी, मेजवान्या सर्व कार्यक्रम तोच ठरवतो. प्रवासात त्यांच्या औषधाची काळजी तोच घेतो. कोल्हटकर ३/४ वर्षांपूर्वी व्हर्टिगोने आजारी होता. हॉस्पिटलमध्ये आबा आणि सती चकरा मारत व त्यानंतर त्याच्या पथ्यपाण्याची काळजी या दोघांनी घेतली. अजूनही ते सकाळी उठल्यावर मुंबईत पहिला फोन राम कोल्हटकरला करतात. 'काय चहापाणी झाले का?' अशी चौकशी करतात. सहकाऱ्यांना वागवण्याचा आबांचा खाक्या हा असा आहे. हा मित्र, हा सेवक, हा लेखक, हा नातेवाईक अशा मर्यादा अस्पष्ट होतात.

श्री. शं. नवरे आणि आबा विद्यार्थिदशेपासून मित्र. नवऱ्यांच्या एका मुलीने ख्रिश्चन कुटुंबात व दुसरीने मराठा कुटुंबात लग्न केले. स्वागतसमारंभ झाले नाहीत. पण आबांना कळताच मनापासून अभिनंदन करावयास वाईहून मुंबईस आले. दुसऱ्या महायुद्धात मुंबईवर बॉम्बहल्ला होणार या अफवेने अनेकांनी मुंबईतील घरेदारे सोडली होती. त्यामुळे नवरे यांनी आपली पत्नी आणि दोन मुली वाईला आमच्याकडे राहण्यास पाठवून दिल्या. चार

महिन्यांचा आमचा एकत्र काळ फार मजेत गेला.

आम्हा मुलांना विशेषतः शालेय शिक्षण पूर्ण होईपर्यंत आबांचा सहवास कमी मिळाला. तरी ते वाईला असले की आमच्यात फार गुंतून जात. संध्याकाळी रामायण, महाभारत, ग्रीक आणि रोमन पुराणांतील अनेक कथा आम्हाला आणि नातवंडांना त्यांनी रंगवून सांगितल्या आहेत, शिवाय रामरक्षा, भगवद्गीता इत्यादी स्तोत्रे मुखोद्गत करण्यासाठी संधी मिळे. उच्चार शुद्ध असला पाहिजे यावर त्यांचा भर. त्यांना पटेपर्यंत ते पुनरुक्ती करावयास लावत. मला जरा कंटाळाच. मी त्यांना म्हणत असे, 'मी बरोबर म्हणते, तुमच्या ऐकण्यात चूक होते आहे.' ते सांगायचे, 'सुमन, तुला म्हणायचे नसेल तर थांब'. बस, इतकेच. दटावणी नाही.

मधुकडून त्यांनी रूपावली, रामचंद्रचंद्रिका तयार करवून घेतली. मधूच्या शिक्षकांची त्याच्याकडून शंकरशेट शिष्यवृत्तीची अपेक्षा होती, मधू तयारी करीत होता. पण तो बहुमान हुकलाच. कॉलेजमध्ये शिरताना संस्कृत घेऊन एम. ए. व्हावे अशी माफक महत्त्वाकांक्षा त्याने बोलून दाखविली. आबांनी त्याला सांगितले, 'प्रगत जगाचा अर्थ समजावून घ्यावयाचा असेल तर आधुनिक तंत्रज्ञान घे.' बस. मधूने फर्ग्युसन कॉलेजमध्ये विज्ञान घेतले. तो इंजिनीयर झाला. मी व मालू कॉलेजमध्ये दाखल होणार होतो. आबांनी आम्हाला काय विषय निवडावा याबद्दल कधीही सुचवले नाही. वाटले, आम्ही मुली म्हणून त्यांना दुय्यम वाटते की काय? परंतु तसे नव्हते. मधू, मी आणि मालू मागेपुढे एकदम कॉलेजमध्ये वसतिगृहात राहून शिकलो. पिढीजात श्रीमंत कुटुंबातील मुलांनाही दुर्लभ अशी संधी आम्हाला मिळाली. मुलांनी दुसऱ्यांच्या कुटुंबांत उपकाराच्या ओझ्याखाली वावरता कामा नये ही त्यांची भूमिका होती. उद्याचे काय हा विचार त्यांच्या मनामध्ये कधी डोकावला नाही.

आबांनी आमच्यावर कोणत्याही कल्पना लादल्या नाहीत. अप्रत्यक्षपणे दडपण आणले नाही, कोणत्याच बाबतीत. आमच्या विवाहातही आम्हाला पूर्ण स्वातंत्र्य होते. आमच्या पतींनी आम्हाला निवडले आणि आम्ही त्यांना पसंत केले. जे आमच्या बाबतीत, तेच नातवंडांच्या बाबतीत. स्वातंत्र्य उपभोगलेले आम्ही, आमच्या मुलांनाही स्वातंत्र्य प्रिय. त्यावरून माझ्यात आणि मुलांमध्ये वाद होतो. तडजोडीसाठी धाव घेतली तर निकाल त्यांच्या बाजूचा लागतो. मुलांवर कोणतीही दडपणे आणू नयेत, त्यांच्या आतील ऊर्मी त्यांना मार्ग दाखवतात असे आबांचे म्हणणे. इकडे पॅवलावचा शिक्षणातील Conditioning चा सिद्धांत त्यांना फार पटलेला. शिकवताना रागावण्याने, मारण्याने ज्ञानाची आवड उत्पन्न होत नाही, म्हणून पंतोजी हत्यार त्यांना अमान्य.

मुलांच्या आणि नातवंडांच्या आरोग्याची जपणूक ते हळूवारपणे करतात. वासूला फार मायेने स्वतः विविध उपचार करत. औषधांची टाळाटाळ करण्यात मी आणि मालू तरबेज. आम्हाला सबब सापडू नये म्हणून एका हातात औषधाचा चमचा आणि दुसऱ्या हातात

पाण्याचे भांडे घेऊन आबा पुढे येऊन 'तोंड उघड' एवढीच सूचना देत असत.

आबांना नातवंडांची ओढ बरीच. मधू व त्याची पत्नी इंदू अमेरिकेत होते. मधूची मुले राम, विजय वयाच्या ७/८ वर्षापर्यंत वाईलाच वाढली. सकाळच्या कार्यक्रमानंतर पाणी घालायला आबाच लागत. शिवाय आंघोळ त्यांनीच घातली तर बरे; म्हणजे साबण लावण्याची भानगड उरत नसे. आबा गावाहून येताना अनेक प्रकारची फळे आणत. राम, विजय दिवाळीसारखी आबांची वाट बघत. आम्ही लहान असताना सफरचंद, हापूस आंबा, चिकू ही फळे वाईकरांना केवळ ऐकून माहीत असत. आबा आवर्जून आणायचे. मग संध्याकाळी निवडक फळे घेऊन स्वामी केवलानंदांच्या मठीच्या पायऱ्या चढून आम्ही जात असू. पाठोपाठ दबकत मैत्रिणी येत. स्वामींना नमस्कार करून आम्ही फळे त्यांच्यासमोर ठेवत असू. तजेलदार, गौरकाय स्वामी स्मित करत विचारत, 'लक्ष्मण कधी आला?'

आबा मला अनेक वेळा कोड्याप्रमाणे बुचकळ्यात टाकतात. चांगल्या तब्येतीची माझी मुले केव्हा अभ्यासात, प्रकृतीत घसरतात तेव्हा मी चिंतेत असते. काही वेळा आबा म्हणतात, 'अगं, मुले दृष्टावतात'. मी थक्क! 'आबा, तुम्ही असल्या भ्रामक समजुतीवर विश्वास कसे ठेवता?' सती म्हणत असे, 'काजळ वगैरे घालू नकोस. युरोपियन मुले सुदृढ असतात, त्यांना नाही नजर वगैरे लागत. तू डोक्यातून काढून टाक.' आबांनी मला विचारले, ''तू ॲलिक्सिस कॅरेलचे 'Manः The Unknown' हे पुस्तक वाचलेस का? कॅरेलला 'इंद्रिय विज्ञाना'त नोबेल पुरस्कार लाभला आहे.' भौतिक शक्तीप्रमाणे मानसिक शक्तीसुद्धा मनुष्याचे भले बुरे करू शकतात.'' आमचा मोठा मुलगा अशोक पुढील अभ्यासासाठी अमेरिकेला जाण्यापूर्वी वयाच्या २३ व्या वर्षी मुंज करून घ्यावयाचे म्हणाला. मी व माझ्या नवऱ्याने हा प्रस्ताव उडवून लावला. मग अशोकने आबांकडे विषय काढला. झाले, आबानी युंग या पंडिताचा हवाला देऊन, सामाजिक रूढींचे, धर्माचे संस्कार किती दृढपणे माणसांच्या अंतर्मनात बसत असतात ते सांगितले. मग उत्साहमूर्ती मालू आणि लक्ष्मी आणि जोडीला वासुदेव या सर्वांनी अशोकच्या मुंजीचा घाट घातला. अगदी धर्मशास्त्राधारे वाईतील १०/१२ पुरोहितांच्या हस्ते अशोकचा व्रतबंध पार पडला. ता. ३ जून १९८० ला घरातील मोजकी १०/१२ मंडळी हजर होती. आबांना समाधान, कारण ते अशोकचे समाधान करू शकले. आम्ही दोघे पाहुण्यासारखे हजर होतो.

आबांच्या तर्कशास्त्राला समाजशास्त्र, धर्मशास्त्र आणि आधुनिक विज्ञानाच्या अध्ययनाची जोड लागलेली. मी त्यांच्यावर अनेक वेळा आरोप करते की, निष्णात वकिलाप्रमाणे कोणतीही बाजू ते लढवू शकतात.

आबांपाशी नाटक सिनेमासाठी कधी वेळ नसतो. एक दोन वेळा सतीच्या आग्रहाखातर गेले होते, पण कंटाळले. त्यांना लिहावयाचे असते अगर मनन करावयाचे असते, तेव्हा त्यांच्या अभ्यासिकेत एकांतात तासन् तास ते रमून जातात. तेथील ॲश-ट्रे याची साक्ष देतो.

माझा चुलत भाऊ मोठा तंत्रज्ञ. अमेरिकेतील चांगली नोकरी, तितकीच चांगली सेक्रेटरी, गाडी, घर सर्व सोडून भारतात नुकताच परत आला! त्याला एक ध्यास लागला आहे तो म्हणजे त्याच्या तंज्ञज्ञानावर भारतात, एक कारखाना सुरू करायचा. वास्तविक कंपनी रजिस्टर करायची, कर्ज आणि राज्य सरकारने देऊ केलेली जागा स्वीकारून प्रत्यक्ष काम सुरू करण्यापूर्वी इतके कागदी घोडे नाचवावे लागले की, कच्च्या दिलाचा माणूस एव्हाना परत अमेरिकेत जाऊन बसला असता. माझ्या नवऱ्याचे म्हणणे की तो वेणीमाधवशास्त्र्यांचा मुलगा. या जोशी घराण्याचे काही वैशिष्ट्य आहे. वेणीमाधवशास्त्री, आबांचे वडील बंधू. वयाच्या ८५व्या वर्षी आयुर्वेदाच्या उज्ज्वल भवितव्याची स्वप्ने बघतात. अजून रोग्यांचे निदान करून औषधोपचार करतात.

आबांना आपण अजून ४।५ वर्षे बौद्धिक काम करू शकू याची खात्री वाटते. त्यांनी प्रकृती चांगली ठेवली आहे. आयुर्वेदाच्या प्रमाणग्रंथावरून स्वतःच स्वतःची औषधे पक्की केली आहेत. पण आधुनिक वैद्यकशास्त्राकडे ते डोळसपणे आदराने बघतात. बाबासाहेब कर्णिक, यशवंतरावांबरोबर राजकीय स्थितीवर चर्चा करून आबा शेतकरी आंदोलनाची भूमिका शरद जोशींकडून समजावून घेतात. स्वामी अगेहानंद या सीरेक्युज विद्यापीठातील मानवशास्त्राचे प्रमुख प्राध्यापकाबरोबर तत्त्वज्ञानासंबंधी चर्चा करतात. आणि रात्री निघण्यापूर्वी 'तू तुझी वेळ झाली की जा, मी टोस्ट करून घेईन.' असे बजावून सांगतात. जीवनाच्या विविध थरांवर आबांचे कसे लक्ष राहते समजत नाही. म्हटले तर सर्वांचे, म्हटले तर कोणाचेच नाहीत. या वृत्तीमुळे सर्व थरांतील मंडळीमध्ये नेहमी राहूनही आबांच्या हाती बरेच गवसले आहे. 'उद्या काय' याची विवंचना मनाला शिवू देत नाहीत. शारीरिक आणि बौद्धिक आत्मविश्वासाने यापुढेही आबा अशीच यशस्वी वाटचाल करू शकतील असा भरवसा वाटतो.

**(नवभारत मासिक, वाई; फेब्रुवारी-मार्च, १९८१, पृ. ६१ ते ६६)**

ooo

६५.

# आबा व मी

## डॉ. मधुकर जोशी

**त्वमक्षरं परमं वेदितव्यम्**
**त्वमस्य विश्वस्य परं निधानम!।**
**त्वमव्ययः शाश्वतधर्मगोप्ता**
**सनातनस्त्वं पुरुषो मतो मे।।**

- श्रीमद्भगवद्गीता : ११ : १८

### ओळख

मी मधुकर, आबांच्या चार मुलामुलींमधला थोरला मुलगा. आबांची ८० संपली. माझी ५१ संपली. आबा राहातात यंत्रयुगात शिरणाऱ्या हिंदुस्थानात वाईला कृष्णातीरी. मी राहातो यंत्रयुगानंतरच्या अमेरिकेत; भारतात २९ वयापर्यंत होतो; सध्या तात्पुरता जर्मनीत कामानिमित्त वसतीला आहे. बाबा कामानिमित्त भारतभर हिंडतात. मी मधूनमधून अमेरिकेला वाऱ्या करतो. मी धंद्याने आहे अभियंता (Engineer) व तांत्रिक व्यवस्थापक (Technical Manager). माझे शिक्षण तंत्रशास्त्र, घनस्थिती पदार्थविज्ञान व रसायनशास्त्र या विषयांत झाले आहे. आबांचा धंदा... अं... कोणास ठाऊक? चटदिशी एक असे वर्णन सापडत नाही. पण मला माहीत आहे, ते विद्वान आहेत; लेखक आहेत; समाजशास्त्रज्ञ व राज्यशास्त्रज्ञ बाहेत; कोशकार आहेत हे तर प्रसिद्धच आहे; घरात व दारात मैलभर आवाज पोचेल असे गर्जक वक्ते आहेत; एनर्जी सिस्टिम्स प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे अध्यक्ष आहेत... अलौकिक द्विपदी-प्रवासी वा टायरी-प्रवासी आहेत... थोडक्यात, महाचळवळे आहेत. बाप रे! विसरलो; ते औषधपण देतात!

अपचनापासून तो वेडेपणापर्यंत सर्व रोगांवर त्यांना औषधोपचार माहिती आहेत. ते तावडीत सापडेल त्याच्यावर अनेक वेळा उपचार करतात व तो न बधल्यास त्याची हळुवार

निर्भर्त्सना करतात. आबांचा एक भाचा आहे; तो स्वतः वैद्य आहे; त्याचे नाव यशवंत उपासनी. यशवंता एकदा मला व आबांना बोरीबंदरवर भेटला. आबा, मी अमेरिकेहून आणलेली त्यांची आवडती, केंट झुरकत होते. यशवंता त्याच्या तब्येतीचे गाऱ्हाणे आबांना सांगत होता. यशवंता म्हणाला, ''खरं सांगतो आबा, अगदी बरे नाही.'' आबांनी उत्तर दिले, ''सिगरेट फुंकत जा, तब्येत बिघडेल नाही तर काय होईल?'' भाचाला मामांकडून परदेशी सिगरेट हवी होती. बिचारा यशवंता ओशाळला. आबांनी एक पुन्हा दीर्घ झुरका घेतला! आबांचे थोरले बंधू वैद्य वेणीमाधवशास्त्री, आमचे अण्णा. ते महान धन्वन्तरी; त्यांच्या वैद्यकीय यशाने डॉक्टरांचे डोळे दिपतात. पण त्यांची आयुर्वेदावर धर्मशास्त्रासारखी अपरिवर्तनीय श्रद्धा. त्यांना आबांची काही डोळस, काही आंधळी, आयुर्वेदातील लुडबुड पसंत नाही. ते म्हणतात, ''आबांना संस्कृत कळते याचा अर्थ चरक समजतो असे नाही.'' मला या दोघाही भावांचा आयुर्वेद अगम्य आहे व माझा अपरिवर्तनीय शास्त्रांवर विश्वास नाही. तरीदेखील कौटुंबिक सलोख्यासाठी म्हणतो... ''त्रिदोष मानतो, पण त्रिफळा आवरा...''

आबांना अनेक मित्र आहेत. त्यातले एक प्रो. ए. बी. शहा. त्यांना मी एकदा विचारले, ''आपल्या भारतात सर्वविद्यावाचस्पती (Polymath) कोण?'' ते म्हणाले, ''कोणीऽ नाही. चुकलो, आबा आहेत.'' याचा अर्थ असा, की मलाच केवळ नाही तर इतरांनादेखील आबा प्रचंड दिसतात. म्हणून 'जग व डॉ. आईन्स्टाईन' या बार्नेटच्या पुस्तकनामानुसार 'आबा व मी' असे या लेखाचे, नाव ठेवले आहे. गेली २२ वर्षे आबांचा व माझा घनिष्ठ सहवास संपला आहे. पण तीन अक्षांची (Three Dimensions) पृथ्वी आर्मस्ट्राँगला चांगली कळली चंद्रावर गेल्यानंतर! तसेच बहु-अक्षांचे आबा मला अमेरिकेहून आता चांगले कळत आहेत.

मी आईन्स्टाईन नाही हे माझ्या अप्रसिद्धीवरून तुम्हाला माहीत असणारच. पण मुले आईन्स्टाईनसारखीच क्ष-किरणी असतात. त्यांना बाप कळतो. मुलांना बाप नुसता 'दिसत' नसतो. मुले जाणण्यासाठी कान, जीभ आदी सर्व इंद्रिये समतोल वापरतात. बाप त्यांच्या रोमारोमांत जाणला जातो. मुलाला दिसलेला बाप धादांत असतो. पाश्चात्त्य कुटुंबात पाहुणा आला आणि त्याने जर घरातील लहान मुलाला, ''काय रे, तुझे बापाविषयी काय मत आहे?'' असे विचारले तर सरासरी बाप थिजतो वा थरकापतो. बापाचे वाभाडे पोर जितके जालीम काढील तितके हितशत्रूदेखील काढणार नाहीत. हिंदी मूल बापाच्या धाकाने वा सांस्कृतिक लाजरेपणाने कदाचित उघड मत देणार नाही. पण हे खरे की नागव्या राजाकडे मिरवणुकीतील पोरच बोट दाखवते! हल्ली पाश्चात्त्य जगात चक्कर मूल मानसवैद्याकडे आल्यास तो अनेक वेळा मुलाला घरी पाठवतो व आईबापांना उपचाराला बसवतो. बापाचे प्रचंड महत्त्व यावरून लक्षात येते. थोर माणूस घरी कसा वागतो यामध्ये जनतेला पुरातन कालापासून गोडी आहे या जाणिवेतून मी हा लेख लिहिला आहे. अनेक केवळ स्तुतिपर परीक्षणांपेक्षा तो वेगळा असेल.

## प्रथम मंगलमूर्ती व नंतर कसरती

दारचे आबा व घरचे आबा वेगळे आहेत. थोर माणसे काय, सामान्य माणसे काय; घरी वेगळी, दारी वेगळी. पण थोर माणसे विशेषतः बाहेरच्या जगात सर्कशीतल्या कसरत्यासारखे वागतात. एका पाटणीखाली वर्षोवर्षे घरात संचारणाऱ्या लोकांना मात्र थोर माणूस साधा पोशिंदा असतो. बाप असावा लागतो प्रेम करणारा, पोषण करणारा. तो तसा नसेल तर गप्प बसवूनही मुले कुरकुर करतात. जशी सगळी मुले बापाला ओळखून असतात तसे सगळे बाप मुलांना टरकले असतात. समंजस घरात दोघेही त्याचा पत्ता एकमेकाला लागू देत नाहीत. येवढ्या प्रस्तावानंतर मी सांगतो, आमचे लहानपणी आबा मला कसे भासले ते. लहानपणी आम्हा भावंडांना मला, सुमनला, मालूला (वासू फार नंतर जन्माला आला.) आबा म्हणजे प्रेमळ, मृदू, न रागावणारे, रसाळ गोष्टी सांगणारे, प्रवासी पण परतताना फळे व मेवा आणणारे, आईशी नेहमी ममतेने बोलणारे, कोणाच्याही कसल्याही प्रश्नांना योग्य, बिनचिडके उत्तर देणारे, पडल्यास जखमेस मलम लावणारे, पोट वा डोके दुखल्यास काढा देणारे व काहीही होत नसले तरी त्रिफळा घ्यायला लावणारे असे मातृहृदयी मंगलमूर्ती होते. जगाच्या कोठल्याही वाङ्मयात मी अजून न वाचलेल्या, कदाचित त्यांनी स्वतःच काही निर्माण केलेल्या कथा त्यांच्याकडून ऐकल्या आहेत. 'सुसुल सुसुल डुलक्या मारी' ही एका सशाची तशी कथा मी विसरणार नाही. धर्माला पाणी पिऊ न देणाऱ्या यक्षाने विचारलेले प्रश्न तर कधीही विसरणार नाही. भारतीय प्राचीन वाङ्मयाची गोडी माझ्या कानामध्ये अजून टिकून आहे. गोष्टी सांगणारा बाप ही मुलांना मिळालेली दैवी भेट असते. भारतात धपाटे न मारणारा बाप तर अतिदैवी भेट! बाबांनी धपाटा मारलेला आठवत नाही. जर धपाटा कधी मारलाच असेल तर त्यांच्या आधिभौतिक व पारमार्थिक सर्व अधिष्ठानालाच तडा गेला असे यांना वाटले असेल!

पण आम्ही वाढत असताना हळूहळू लक्षात यायला लागले, की आबाही आमच्याबरोबर बदलत आहेत. माझी समजूतही वाढत होती. आणि आबांमधले बारीक दोष दिसायला लागले व त्यांतले काही जाचायला लागले. तेराव्या वर्षी मला चांगले लिहिता व भारदस्त वाचता येऊ लागले आणि ‘दृष्टिकोन’ही येऊ लागला. आबा कायम प्रवासात असत. गृह उपस्थितीची नोंदणी जर ठेवली असती, तर वार्षिक परीक्षेस (बापत्वाची जर परीक्षा घेतली तरचाच प्रश्न आहे) बसण्यासाठी लागणारी परवानगीच माझ्या आईने म्हणजे आबांच्या मुख्याध्यापिकेने- नाकारली असती. घर म्हणजे कायम बाहेर पडण्यापूर्वीची मुलांची तालीम. बापाची, उपस्थितीखेरीज, दोन महत्त्वाची कर्तव्ये असतात. प्रेम द्यायचे व मूल्ये द्यायची. ती त्यांनी तशी फार चांगल्या नेकीने पाळली. स्वातंत्र्यपूर्व काळच्या जलद घडणाऱ्या सामाजिक व राजकीय घटनांबरोबर आबा बदलत होते. जुन्या शास्त्री-परंपरेतील आबा अगदी क्रांतिकारक-विचारी अशा रॉयिस्ट चळवळीत ओढले जात होते व ताणले जात होते!

परंपरागत मध्ययुगीन संस्कृती व बुद्धिवादी पाश्चात्त्य संस्कृती यांची मानसिक तडजोड करताना त्यांना शंकरासारखे फार नाचावे लागले. मूळचे अलिप्त आबा हळूहळू घरी वा दारी हिमालयावर राहू लागले. आमचे मंगलमूर्ती आता अलिप्त शिव बनले. आमची सती विचारे, "काय हो, तेथे वर कसे काय चालले आहे? आमच्यात केव्हा येणार?"

### मध्ययुगातून यंत्रयुगात

आबांचा जन्म एकोणीस व विसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर खानदेशातील पिंपळनेर नावाच्या गावात झाला. त्या काळी रात्री गावात अंधार व घरात मिणमिणता तेलाचा दिवा असे. केवळ श्रुती व स्मृती संपून शतके होऊन गेली होती, पण आधुनिक पुण्या-मुंबईच्या यंत्रसंस्कृतीचा तेथे पत्ता नव्हता. श्रुतिस्मृतीचे जग म्हणजे केवळ नादब्रह्म. आबांच्या जन्माचे जग मध्ययुगीन शेतीवाल्यांचे व पोथ्या वाचणाऱ्या ब्राह्मणांचे होते. पोथ्या व इतर हस्तलिखितांच्या जगात लेखन आणि वक्तृत्व आणि पांडित्य यांची वाढ सुरू होते. वळणदार हस्ताक्षरांचे, शुद्धलेखनाचे फार महत्त्व वाढते. व्याकरणातील पंडित व्याकरणातील चूक काढून तत्त्वज्ञानातल्या पंडितांना या जगात फार हसतात. पण प्रवचने, कथापुराणे यांची मानवी ओढ संपलेली नसते. आबांच्या जन्माच्या वेळेस प्रवचनपटू व कीर्तनकारांचा महाराष्ट्रात मोठा संचार होता. श्रवण व वचनभक्त थोड्या लेखन व वाचनभक्तांबरोबर साहचर्याने राहात. नादब्रह्मात अक्षरब्रह्म मिसळत होते. मी जटाधारी वीतरागी बटूचे, तेराव्या वर्षी वाईला आल्यानंतरचे आबांचे चित्र पाहिले आहे. ते मी पाहिले आणि दया आली. लहान बाळाचे पोर खेळायच्या वयात जटाधारी मुनी बनले होते. ख्रिश्चन कॅथलिक चर्चमध्ये संगीतमंचकात (Choir) मुख्य गाणाऱ्या मुलाचे पूर्वी वयात येताना आवाज बिघडू नये म्हणून खच्चीकरण करत असत. त्या गवई कॅथलिक पोराचे चित्र विसकळीतपणे दिवास्वप्नासारखे माझ्या मनःचक्षूंपुढे तरळून गेले.

मी पोथ्या, विशेषतः हस्तलिखिती पोथ्या, प्राज्ञ-पाठशाळेत कोणी बघत नसताना हाताळल्या आहेत. सुंदर, वळणदार, क्वचित रंगीत अक्षरे मी जेव्हा हात लावी तेव्हा ती जणू जिवंत होत. गुटेनबर्गने आधुनिक छापखाना प्रबोधनकाळी शोधला आणि छपाई जग येऊ लागले. आधुनिक निर्णयसागरी पोथ्यांच्या अक्षरांतला गोड स्पर्श आता संपला! नुसती तटस्थ डोळ्यांनी बघायची ती चिन्हे म्हणजे मुळाक्षरे बनली. ज्ञान वाढू लागले; त्याबरोबरच वर्तमानपत्रे व पुस्तके वाढली. जग, विशेषतः पुण्या-मुंबईला, छापब्रह्मात विलीन झाले!

वाईला जटाधारी बटू लक्ष्मण नारायणशास्त्री मराठ्यांच्या प्राज्ञपाठशाळेत १९१४ च्या सुमाराला आला. जटा विंचरण्यापासून स्वामींनी त्याची निगा केली. नंतर लक्ष्मण शास्त्रीबुवा झाले. नंतर नारायणशास्त्री स्वामी झाले. काही लोक म्हणाले, लक्ष्मणाने त्यांना स्वामी केले. ते खरे नाही. नैष्ठिक ब्रह्मचारी नारायणाचे तार्किक फुलपाखरू म्हणजे स्वामी! या स्वामींचे, केवलानंदांचे गुरुकुल त्या काळी दुभंगलेले होते: राष्ट्रीय शिक्षणवाले विरुद्ध परंपरागत

शास्त्रीय शिक्षणवाले यांचे तट होते. आबा त्यातून तसे अलिप्त होते. ते महान नैयायिक होत होते. पूजाअर्चेला आबा वेळेवर आले नाहीत तर स्वामी कानाडोळा करत. इतर विद्यार्थ्यांच्या पक्षपाताच्या तक्रारीला स्वामी दाद देत नसत. स्वामींच्या संन्यासाश्रमाच्या अगोदरच लक्षात आले होते की लक्ष्मण विदारला आहे! तो महान जुना शास्त्री आहे पण नवीन राष्ट्रीय जगातही तो पुण्या-मुंबईच्या आधुनिक विश्वात धुरीण होऊ शकेल असे आबांच्या बाबत स्वामींच्या लक्षात आले असेल. त्यांनी स्वतःच्या घरात बंडखोर जणू पोसला होता. गांधींनीदेखील त्यांच्याजवळ नेहरू नावाचे बंडखोर तसेच पाळले होते. गांधींच्या ग्रामोद्योगाची विल्हेवाट धरणे व कारखान्यांची संस्कृती वाढवून नेहरूंनी केली. शास्त्रीबुवा प्राज्ञपाठशाळेचे धुरीण संकोचाने राष्ट्रीय चळवळीच्या धुरिणांच्या आग्रहाखातर झाले. राष्ट्रे छपाईच्या जगानंतर निर्माण होतात, हे प्रसिद्ध आहे. पुण्या-मुंबईच्या आधुनिक यंत्रयुगाच्या प्रभाती आबा भारले गेले. गुटेनबर्गने निर्माण केलेल्या छपाईच्या मुळाक्षरी जगतातील पुणे, मुंबई ही शहरे प्रखर नक्षत्रे होती. वर्तमानपत्रे, मासिके, त्रैमासिके, छोट्या पुस्तिका, मोठे ग्रंथ आता छापखान्यात जशी कारखान्यातून बिस्किटे बाहेर पडावीत तसे पडू लागले होते. लेखक व वक्ते यांचा मान वाढू लागला होता व बहुश्रुत प्रवचनकारांचा जम कमी होत होता. टिळक राष्ट्रीय चळवळीचे पुढारी झाले होते. पण केसरीचा छापखाना व गीतारहस्याशिवाय टिळक कोण हा प्रश्न भविष्याने विचारला असता! टिळक छपाई-संस्कृतीचा तारा होते. छपाईसंस्कृतीत लेखनाला वाजवीपेक्षा महत्त्व येते. कान-डोळयांमधला समधातपणा सुटतो. यांत्रिक बुद्धिवादाला महत्त्व येते. मी या बुद्धिवादाला यांत्रिक का म्हणतो हे माझा लेख संपता संपता वाचकाला कळेल याविषयी मला आशा आहे. सामान्य जनतेचा, विशेषतः ग्रामीण मध्ययुगीन जनतेचा या बुद्धिवादी लोकांबद्दल मोठा दांडगा विश्वास नसतो. वक्तृत्व नसलेले, मोठे लेखक नसलेले, फार मोठा युक्तिवाद न करणारे गांधी आले आणि सामान्य जनतेने त्यांच्यावर विश्वास टाकला. माध्यम पंडित मॅक्लुहन एकदा म्हणाला होता की, "छपाईने हृदय व डोके यांच्यात भेद केला आणि मॅकिॲव्हॅलीपासून सुरू झालेल्या या भयंकर जखमेने युरोपला अजून ग्रासले आहे."

आबांना टिळक आदर्श त्यांच्या वडिलांमुळे प्रथमतः झाले. आबांना त्यांचे वडील बाळाजी म्हणत, ''लक्ष्मण, तू टिळकांच्या गायकवाडवाड्यात जाऊन व्याख्यान दिलेस तर तुला मी हुशार समजेन.'' मॅकिॲव्हॅलीला भग्न इटली जोडायचा होता. टिळकांना प्रांत विदीर्ण भारत जोडून स्वतंत्र करायचा होता. आबा टिळक व गांधी दोघांकडे ओढले गेले. त्या ओढीत उपरणे सुटून सदरा आला. टिळक यंत्र-युगवादी होते. गांधी यंत्रयुगविरोधी ग्रामोद्योगी अर्थशास्त्राचे प्रवक्ते होते. टिळकांनंतर गांधी आता राष्ट्रीय पुढारी बनले होते. आबा गांधींकडे ओढले गेले. पण ते आकर्षण मोठे जबरीचे नव्हते.

गांधींना अस्पृश्यता निवारणाला सनातन्यांविरुद्ध युक्तिवाद पाहिजे होता. परंपरेतले पण

बंडखोर शास्त्रीबुवा त्यांना उपयोगी पडले. माझ्या जन्माच्या वेळेस मी येणार या भीतीने की काय, किंवा गांधींच्या प्रेमाने असेल ते तुरुंगात गेले! पण नंतर ५ वर्षांत भारतीय राजकारणात मानवेंद्रनाथ रॉय आबांना दिसले. रॉय होते टिळकोत्तम. टिळकांची त्यांना वाणी नव्हती, पण टिळकांनी जेवढे लेख लिहिले तेवढे रॉयसाहेबांनी ग्रंथ लिहिले. शिवाय रॉयसाहेब साहेब होते! रॉयसाहेबांचा महाराष्ट्रात फार मोठा बुद्धिवादी वर्ग अनुयायी होता. त्यांच्यामध्ये आबा रमले व धुरीण झाले. या काळात आबांनी जडवाद व हिंदुधर्मसमीक्षा ही तर्ककर्कश पुस्तके लिहिली. युरोपमधल्या समाजवादी, असाम्यवादी बुद्धिवाद्यांचे हे लोक भारतीय प्रतिबिंब होते. ते १९३५ ते स्वातंत्र्यसाल १९४७ पर्यंत चकचकत राहिले. आबांना टिळकोत्तम दिसले आणि आबा बंदी झाले. माझ्या मते जायबंदी झाले. बंदी झाले, कारण त्यांचा गांधीजींकडेही ओढा होता. पण अ मधून ब मधून क ही फारशी प्रकाश न पाडणारी कारणसाखळी त्यांच्या पायांत पडली. कठोर बुद्धिवादात तडजोड नसते; नुसती तड असते. त्यांचा प्रकाशपुंज कण असतो किंवा लाट असते. १९३० मध्ये पुँजीय-भौतिकी आली आणि या द्वैताचा अंत झाला. पण युरोपमधल्या बुद्धिवाद्यांना व तत्त्वज्ञान्यांना हतबुद्धता आली. हिंदी बुद्धिवाद्यांना त्यांचा पत्ता लागला होता; पण न गोंधळता ते उबदार अ ब क ला चिकटून राहिले. आबा एकदा म्हणाले, "आम्हा रॉयिस्टांचा कुत्रादेखील तर्क भुंकतो." आबांचे याच काळात धोतर गेले व यंत्र-युगाचा गणवेष म्हणजे पँट आली. आबांना गांधींचा त्याग करावा लागला. आबा जायबंदी झालेले मला वाटले, कारण पक्षविसर्जनानंतरही मॅक्लुहनने सांगितलेल्या जखमेतून त्यांचे व्यक्तित्व तसे संपूर्ण बरे झाले नाही.

डोळा व कान यांच्या लेखनसंस्कृतीपासून सुरू झालेल्या भेदाचे साधे उदाहरण म्हणजे पूर्वीचे 'वचन देणारे' आता निशापाणी न करता 'लिहून' देऊ लागतात. कारखानदारीच्या जगतात या भेदाची खिंड तयार होते. सरकारी अधिकारी कागदाच्या ढिगामागे लपतात. बघा ना आबांना कोठेही: ग्रंथ- संग्रहालयात, बैठकीच्या खोलीत, गाडीत, बसमध्ये, मित्रांकडे ते पुस्तकात असतात, नाहीतर पुस्तकांजवळ असतात. त्यांच्या गुरुवर्य स्वामींनीदेखील धर्मशास्त्रकार काण्यांना 'पार्लमेंट सोडा पण कोश पुरा करा' म्हणून सांगितले. तीन अक्ष (3D) व चार अक्षी सुंदर पार्लमेंटच्या जगातून लेखक होऊन म्हणजे दोन अक्षी कागदी जगात किड्यासारखे शिरा असा जणू तो संदेश. पण या लोकांना हसायचे कारण नाही. आता पुण्या-मुंबईला, वाईलादेखील प्रातःकाळची शुद्धी करताना वर्तमानपत्र लागते! अमेरिकन मूलदेखील मुळाक्षरांच्या लाह्या न्याहारीला दुधात घालतात. मुळाक्षरे, गणवेश, दैनिक, कारखान्यांतील यंत्रे यांतला प्रगतीचा अक्ष (Axis) एकच आहे. साचीवपणातून उत्पादन! उत्पादनासाठी तज्ज्ञ लागतात आणि डोळे व कान यांची किंबहुना सर्व इंद्रिय-मंडळाची (Sensorium) विभागणी करावी लागते. यंत्रयुगापूर्वी भूमिका (Role) करणारी माणसे यंत्रयुगात पोकळया करायला लागतात. भूमिकेत नोकरी व विरंगुळा यांचे मेण होते.

आता विरंगुळ्याचा वेळ वेगळा असतो. म्हणजे यंत्रयुगातली माणसे भंगलेली असतात. भंगलेल्या माणसाचे सर्वांत सुंदर उदाहरण म्हणजे सर्कशीतल्या कसरती.

चला सर्कशीत! तेथे दोन प्रकारची माणसे मुख्यतः सापडतील. कसरती व विदूषक. तारेवरचा कसरती तटस्थ, गंभीर, शेलाटा, साजऱ्या पोशाखाचा, घाटाच्या चालीचा, तोल साधणारा, बिनचूक हलत्या तारेवर चालणारा थोडक्यात तज्ज्ञ असतो. विदूषक प्रेक्षकांत मिसळणारा, भावना व्यक्त करण्यास न लाजणारा, मुखवटा घातलेला, गबाळ्या पोशाखाचा, सदोष चालीचा, कधीकधी तारेवरून चालून कसाबसा सटकणारा थोडक्यात सामान्य असतो. त्याची सदोष चाल व चमत्कारिक चेहरा हा त्याच्या सामान्यतेवर केलेला अतिशयोक्ती अलंकार आहे. कसरती तज्ज्ञ म्हणून भंगलेला व विदूषक सामान्य म्हणून पूर्ण असतो. मी लहान होतो तेव्हा (व अजूनही) मला सर्कस आवडे. पण सर्वांत आवडे विदूषक. मला विदुषकाला, बाबा दिवास्वप्नांत उंच तारेवर अनेक वेळा दिसत. सतीला दिसलेले शिवसुद्धा माझ्या उंच तारेवरच्या कसरत्यापेक्षा वेगळे नाहीत. बुद्धिवाद्यांच्या यांत्रिक तणावाने आबांनी सिगरेटही सुरू केली. आत्मा जसा शरीरे बदलतो तसे त्यांनी त्या काळी पोशाख बदलले! व ते म्हणत गीतेतील वचनानुसारच ते आहे. पण मला माहिती होते मंगलमूर्ती सूट घालवून आत्मा बदलत होते.

## दुसरे महायुद्ध

वाईला १९४० साली मी द्रवीड हायस्कूलमध्ये जाऊ लागलो. आबांनी वाईला पुण्याहून थोड्या महिन्यांत तेथला धर्मकोश हालवला, पण आबांचा मुक्काम तसा वाईला थोडाच. आबांनी आमच्या घरी अप्पा साठे नावाचा तरुण गृहस्थ त्याच्या कोवळ्या वयापासून सांभाळला होता. आबांच्या अनुपस्थितीत तो आमचा पालक बनला होता; त्यांच्या उपस्थितीतही तो आमचा प्रतिपालक होता. आमच्यावर अप्पाची अपूर्व माया होती. माझ्या आईचे व त्याचे महाचिवट मंगल सख्य होते. अप्पाचा पोशाख बगळ्याच्या तलम पंखासारखा असे. तो काटेकोर हिशेबी, दिलदार, उत्तम संघटक, कार्यक्षम, सहकारी व पुढारपण घेऊन कामे करणारा होता. पण अप्पा शिवीगाळ करणारा, परदोषांबद्दल कठोर निंदा करणारा, तिखट, चिडखोर व स्त्रीजातीविषयी कमी आदर असलेला पुरुषी अहंकारी. अप्पाविरुद्ध तक्रार करायला आबा थाऱ्यावर नसत. हिटलर विरोधी व काँग्रेसविरोधी राजकीय चळवळीत रॉयवाद्यांच्या बाजूने प्रचार करण्यात ते गुंतले होते. बौद्धिक व राजकीय बंडखोर, अस्खलित वक्ते, ग्रंथकार, लेखक व अल्पसंख्याक म्हणून ते महाराष्ट्रात चमकत होते. प्रखर बुद्धीचे जडवादी व हिंदुधर्माची तिखट समीक्षा मार्क्सिस्ट पद्धतीने करणारे पुरोगामी विचारवंत म्हणून त्यांची मुख्यतः निंदा व थोडा गौरव मला ऐकू येत होता. घरी जेव्हा आबा काही काही वेळेस सुटाबुटात दिसत, तेव्हा मी भांबावे व क्वचित दूर जाई. पण हळूहळू भीड मोडत होती; मी त्यांना सद्यःपरिस्थितीवर प्रश्न विचारी; ते माझ्याशी

चर्चा करत. मी शाळेतल्या पुस्तकांच्या बाहेरचेही विषय वाचायला शिकू लागलो होतो. युद्धानिमित्त आता जगाचा नकाशाही उत्तम समजत असे. निरनिराळे इझमही समजायला लागले होते. जर्मन तत्त्वज्ञ हेगेल आधुनिक सरकारला पृथ्वीवरचा चालता परमेश्वर माने हेही कळले होते. वाईगावात अनेक ब्राह्मण, मग ते जमीनदार वा दुकानदार वा वकील वा इतर कोणीही असोत, हिटलरच्या प्राथमिक विजयाने आनंदत होते. सदावर्त्यांच्या गंगापुरी पेठेतल्या दुकानात मी तेलसाखर अनेक वेळा आणायला जाई; मी तेथे गप्पा मारत बसलेल्या लोकांना हिटलर वंशद्वेषी असून तो जिंकल्यास भारतीय लोक गुलाम होतील असे सांगे; मग ते मला हसत. मग मी चिडून सांगे, सेव्हॅस्टोपोलला रशियाने नवीन शोधलेली तोफ आहे तेथपर्यंत हिटलर आल्यास त्याची दाणादाण होईल; मग ते माझी टर उडवत. माझी शाळेतही थट्टा होई. आता माझ्या शाळेत माझ्या सवंगड्यांत मी आबांसारखाच अल्पसंख्याक झालो होतो. गांधीवाद्यांत स्थान नाही म्हणून मी गेलो संघात; मला तेथे फार चांगले मित्र मिळाले. पण मग घरातले तर्कतीर्थ मला विचारायला लागले, "'हिटलर' व 'गुरुजी'त काय फरक?" व मी झालो त्रिशंकू!

आबा ४३ साली काविळीने खूप आजारी पडले. प्रवास संपला. सगळे घर काळजीने चुर झाले. आबा आरशात सारखे स्वतःच्या डोळ्यांकडे बघत. मला त्या काळी रोग व मृत्यू यांची मोठी जाणीव नव्हती. पत्री सरकारने एका रात्री कोर्टाला आग लावली. कोर्टाच्या लाल आगीने वाई गाव लखलखले होते. आबांच्या डोळ्यांतली पिवळी झाक त्या लालीत मी बघितली आणि मी जणू मेलो. त्या रात्री आबांची तब्येत चिंताजनक होती, पण आबा बरे झाले. आबा आजारात नेहमी शांत. आबा एकदा जिन्यातून पडले आणि पाय मोडला; आमची सती त्यांना भयंकर दुःख असताना गुळासारखी हसली! आबा तिच्यावर रागावले नाहीत. आदर्श रुग्ण म्हणून आमचे वैद्यराज काका त्यांना बक्षीस देतात. माझ्या मते केवळ भावाच्या प्रेमासाठी आबा आडुळशाच्या रसाचे पिंप प्यायले व त्यांनी हिरड्याचे ढीग खाल्ले. श्रद्धेने नियमित औषध, पथ्य-पाणी करणारी, दूध पिणारी, भोवतालच्या शुश्रूषकांना व नातेवाईकांना धीर देणारी आबांच्यासारखी व्यक्ती पाहिली आहे म्हणूनच माझा विश्वास आहे. आमचा प्रतिपालक अप्पा याच्या अगदी उलट त्याचे डोके दुखायला लागले तर सगळ्या कुटुंबीयांना ॲस्पिरिन घ्यावे लागे! आबा काविळीतून बरे झाले आणि आबांच्या प्रकृतिस्थापनासाठी आम्ही सगळे थोडे महिने पांचगणीला रहायला गेलो. आबांनी त्या काळी संस्कृत काळजीपूर्वक मला शिकवले. रामचन्द्रिका नामरूपावली १० दिवसांत पाठ केली व थोड्या आठवड्यांत एक छोटी धातुरूपावलीही संपवली. आबांनी माझी खूप स्तुती केली. अशी तोंडावर स्तुती करण्याचे मात्र आबांच्या हातून हळूहळू कमी कमी होत होते. हिंदी बापाची काहीतरी चुकीची समजूत आहे की स्तुतीने मुले बिघडतात! आणि स्तुतीला मोठा खर्चही पडत नाही!!

'लिटल प्रोफेसर' नावाचा, टी. आय. नावाच्या अमेरिकन कंपनीचा, अंकगणित

शिकवणारा एक सांख्यिक (Calculator) आहे. त्याच्यावर रंगीबेरंगी बटनांचा सर्कशी प्रोफेसर चितारलेला आहे. मुलाचे उत्तर चुकले, की तो 'चूक', पुन्हा चूक झाल्यास आर्जवी आवाजात ‘पुन्हा कर’ व पुन्हा पुन्हा चुका झाल्यास आवाज न बदलता 'पुन्हा कर' म्हणतो व शेवटी बरोबर उत्तर आले की ‘छान बबडा!’ म्हणतो व आनंदी गाणेही म्हणतो. तो कावत नाही; हजार वेळा चुकले तरी कावत नाही. तो विद्यार्थ्यांच्या चुकांची वा गुणांची यादीही करत नाही. परंपरा नसलेल्या घरातील मुले, भावना दुखावल्यास बिचकणारी मुले, बारीक शारीरिक मेंदूतील दोषांची मुले, थोडक्यात सामान्य मुले, ज्यांच्याबाबत सामान्य मास्तर आशा सोडतात, अशी मुले आज अमेरिकेत शिकत आहेत. प्रजाशिक्षणात विजेच्या पेन्सिलीने कारखानदार, तंत्रज्ञ व विज्ञानी अमेरिकेत क्रांती घडवत आहेत. त्याला मोठा विरोध कोणाचा होता तर पालकांचा व शिक्षकांचा. पालकांना सांख्यिकाची भीती होती व शिक्षकांना कदाचित पोटापाण्याची भीती वाटे. विश्वविद्यालयीन मानव्यपंडित अजूनही ३० वर्षांच्या आयसी (Integrated Circuit) क्रांतीनंतर लाकडी पेनसिली तोंडात घालून चावत आहे! ते आहेत लायनो टाईपच्या छपाईतले सुरवंट! या लोकांनी खरे आघाडीवर राहायला पाहिजे. पण मानव्यपंडितांना तंत्रज्ञ व विज्ञानी गेले ५०० वर्षे प्रगतीच्या मार्गावर ढकलत आहेत. म्हणूनच या जगाला आशा आहे. आबा लहान मुलांना 'लिटल प्रोफेसर', पण इतरांना तटस्थ गुरुवर्य असतात. ते त्या काळी तैलबुद्धी, घृतबुद्धी व बुरणूसबुद्धी असे विद्यार्थ्यांचे वर्गीकरण मनात करीत. ते निंदक मुळीच नाहीत, पण ते बुरणूसबुद्धीच्या लोकांशी जरुरीपेक्षा जास्त तटस्थ राहात. मी फार भाग्यवान! माझे वर्गीकरण घृतबुद्धी म्हणून मी गृहीत धरले होते; आबांनी माझी समजूत बदलण्याचा प्रयत्न केला नाही. मला सगळ्यांत वाईट वाटले असते जर त्यांनी मला डालडाबुद्धी म्हटले असते तर!

वाईला आमच्या घरी पाहुण्यांची गर्दी कायमची. पाहुण्यांच्या झुंडी येत. माझी आई, अप्पा व प्राज्ञपाठशाळेतले सर्व अधिकारी पाहुणचारात प्रसन्न रत असत. सर्व प्रकारचे राजकीय पुढारी येत; प्रखर बुद्धिवादी, विशेषतः रॉयवादी ठाण मांडत. मी अवती-भोवती असे. माझी समजूत जोरात वाढत होती. पण बुद्धिवाद्यांचे आमच्याकडे लक्ष नसे; आमच्या आईकडे जेवायला फार चांगले म्हणून तिच्याशी मात्र ते प्रसन्न गोड बोलत, असे त्या काळी मला वाटे. एकाही आबांच्या मित्रांनी आम्हा मुलांना विचारले नाही, "तुम्हाला काय वाटते?" पण भारतीय घर म्हणजे कोष असतो. मुले अळीची फुलपाखरे होतात; पण कोषातल्या इतरांना हे असे कसे होते याचा पत्ता नसतो. पाणी वा चहा लागल्यास मात्र 'अरे मधूऽऽ इकडे ये.’ असे मी फार वेळा आबांच्या मित्रांकडून त्या काळी ऐकले आहे. आमच्या सतीला पन्नाशीनंतर हळूहळू आबांच्या मित्रांच्या घरांत येण्याजाण्याचा मान मिळायला लागला. यात जसा आबांचा दोष आहे तसा त्यांच्या मित्रांचाही! आबांशी ह्या काळात माझ्या खाजगी चर्चा मात्र वाढू लागल्या होत्या. मी तत्त्वज्ञानही गंभीरपणे वाचे. ऐतिहासिक

पद्धती, भाषा-विश्लेषण व विज्ञानविश्लेषण ह्या तिन्ही तत्त्वज्ञानात्मक पद्धतीत गोडी आली होती. थोडेबहुत कळे. इपिमिनिउसचा विरोधाभास 'सगळे फीटम्स खोटारडे असतात'; पर्मिनाईउसचे इंद्रियगोचर भ्रामक जग; सॉक्रेटिसचे संवाद; कांटचे काही विरोधसमुच्चय (Antinomies) इ. वाचत होतो. जे थोडे कळे त्यांतले काही क्षुद्र वाटे; काही रम्य वाटे. मला आता विशेष 'दृष्टिकोन' येत होता. पण आबा शाबासकी देत नसत. त्यांना वाटे मी लुडबूड करतो! पण त्या काळी कांटचा अवकाशविरोधी समुच्चय वाचला आणि लक्षात आले, कांट भौतिकीत लुडबूड करतो! पण त्या काळी कळत नव्हते की कांट तत्त्वज्ञानातील फार उच्च पायंडावाला आहे. माझ्या बुद्धीतले दोष आबांना कळत होते; त्यांना मी अती उथळ वाटे. ते मला सहन करत, पण त्यामुळेच मला त्यांचा राग वाटे. मी ज्या वेळेस सारखा 'का?' विचारे, तेव्हा एखादे वेळेस त्रासून म्हणत, "सर्व 'का'चा अंत 'कसे' मध्ये शहाण्या माणसाने केला पाहिजे." शब्दांचे निरनिराळ्या संदर्भात निरनिराळे अर्थ होतात. मला त्या काळी अनेक अर्थ पेलवत नसत. आबा काही वेळेस चिडत. आपल्याला समजले आहे की नाही हे तपासण्यासाठी परावर्तन ही क्रिया फार उपयोगी पडते. मी व आबा अनेक वेळा एकमेकाला त्या काळापासून आरसा करू लागलो होतो. पण तत्त्वज्ञानाची चर्चा करताना मात्र मी मला आबांच्या आरशात कुरूप दिसू लागलो.

## जोरदार आबा, कमकुवत मी

मी द्रवीड हायस्कूलमध्ये १९४० साली शिरलो. १९४७ साली शालान्त झालो. या काळात मला वेळेप्रमाणे काही विषयांत अभ्यासासाठी आबा मदत करीत. इतिहास मला अप्रिय होता; कारण सन, नावे-गावे लक्षात राहात नसत. बुद्ध कोठे जन्मला हे आबांनी विचारल्यास कधीही आठवले नाही. मला त्या काळी सध्या ज्याला Q तंत्र म्हणतात त्याचा शोध लागला; हिमालयाच्या पायथ्याशी असे मी म्हटले, की कपिलवस्तु नामक शहरात बुद्धाचा जन्म झाला हे आठवायचे. मला Q तंत्र शोधावे लागले, कारण आबा एखाद्या वेळेस झोपेतदेखील उठवायचे व विचारायचे 'बुद्ध कोठे जन्मला?' मला परीक्षेत यश चांगले होते. पण भीती कायम बसली. तेव्हापासून अजून परीक्षांची स्वप्ने पडतात. परीक्षेला उशिरा गेलो; कागद संपले; शाई संपली वा परसाकडला लागली! फ्रॉईडचीही परीक्षा आली म्हणजे फाटी व्हायची व तो परीक्षा स्वप्नांनी जर्जर होता हे आता कळते व आपण विचित्र नाही याचा आनंद वाटतो. ४५ साली हिटलर संपला; ४६ साली जपान दोस्तांना शरण गेला व ४७ साली स्वातंत्र्यप्रभात झाली. आबा काही काळ स्वस्थ झाले, पण त्यांचा पिंड सामाजिक व राजकीय! ते अस्वस्थ होते. त्यांना सापाने वेढल्याची स्वप्ने पडत; 'मेलो, मेलो' म्हणत रात्री उठत. ४७ साली मी शालांत झालो, पण शंकरशेट शिष्यवृत्ती मिळाली नाही म्हणून खट्टू झालो. आबा म्हणाले, 'फळावर लक्ष ठेवू नये!' मी म्हणालो, 'श्लोक म्हणू नका!' मला राग आला.

त्याच सुमारास ते मधून मधून फुशारकी मारत, "मी शेळी मारायची तयारी करून वाघ

मारायचो; तुम्ही वाघ..." मी म्हणे, ''समजले, वाक्य नका पूर्ण करू.'' मग मी आणखी खट्टू होई. आबांना काय कळणार? कधी शिक्षण-गिरणीत शिकले नाहीत; ते गुरुकुलांतले! मला त्यांच्या बुद्धिवादी मित्रांत स्थान नव्हते. आबांची तटस्थ वृत्ती हळूहळू वाढत होती. मला त्यांनी अनेक वर्षे 'बाळ बोलेल व कमीपणा येईल, किंवा बाळाला कठोर बुद्धिवादी खरचवटतील' या भावनेने दडवलेच होते. मी माझ्या शंकरशेट शिष्यवृत्ती न मिळाल्याने झालेल्या पराभवामुळे खचलो होतो. आणि मग ते मला धार्मिक सुभाषिते व तत्त्वज्ञान पाजू लागले. माझा राग वाढला. मधूनच म्हणत, "तू महत्त्वाकांक्षी आहेस; महत्त्वाकांक्षा रोग आहे; ठेविले अनंते तैसेची रहावे." मी मग मात्र भडके. मला सहा अध्यायांपर्यंत गीता माहिती होती. रणांगणावर व्याकुळलेल्या अर्जुनाला एका क्लृप्तिबाजाने मारलेल्या त्या मला बाता वाटल्या होत्या. मी म्हणे, ''मला थोतांड सांगू नका. माझ्या प्रवृत्तिअश्वांना तुमचा युक्तिवाद समजत नाही. सगळी तत्त्वज्ञाने मला पोकळ आहेत.''

विश्वविद्यालयात शिरण्यापूर्वी आबांनी माझ्यावर स्फोटक गोळा फेकला! ते म्हणाले, ''तू जर मानव्यामध्ये व विशेषतः संस्कृतमध्ये शिरणार असशील, तर मी तुझ्या विश्वविद्यालयीन शिक्षणासाठी खर्च करू शकणार नाही. माझ्याजवळ फक्त दीड हजार रुपये आहेत. मला मुलींचीही शिक्षणे करायची आहेत. हिंदुस्थानातले मानव्य शिक्षण जुनाट आहे. ते भाकरी देत नाही; मला म्हातारपणचे बघायला हवे. तू विज्ञाने व तांत्रिकीकडे जा.'' मी विरोध केला. माझ्या प्रिय शिक्षकांनीही आबांना निरोप पाठवून माझ्या मताला पुष्टी दिली. आबा मला बधले नाहीत. मी हट्ट सोडला. पण त्याच वेळेस लक्षात आले की आपण कमकुवत मनाचे आहोत. मी दोन वर्षे फर्ग्युसन महाविद्यालयात व साडेतीन वर्षे इंजिनियरिंग महाविद्यालयात पुण्याला घालविली आणि अभियंता झालो. माझे माझ्या शिक्षणात, गोडी कमी म्हणून फार लक्ष नव्हते. मी मानव्यविद्या गोडीने वाचत राहिलो. आबा पुण्याला मला भेटायला येत व मी सुट्टीला वाईला जाई तेव्हा नेहमी चर्चेत्सुक असत. पुष्कळ वेळा अगदी परीक्षेच्या वेळी भेटायला येऊन आईन्स्टाईन असे का म्हणाला वा हायसेनबर्ग असे का म्हणाला असे विचारीत. मग मात्र त्यांना घालवायचे कसे हेच मुख्यतः माझ्या डोक्यात असे!

पन्नास सालाच्या परिसरातला काळ होता. एकांगी मार्क्सिस्ट पद्धतीने लिहिलेल्या 'हिंदुधर्माची-समीक्षा'नंतर. आता संकल्पनांच्या विकासावर आधारलेली वैदिक संस्कृतीची समीक्षा ते करू लागले होते. त्यांनी त्या काळी वैदिक संस्कृतीच्या विकासावर पुण्याला तीन व्याख्यानमाला गुंफल्या, मी त्या ऐकल्या. अमोघ वक्तृत्व व पांडित्य मी असे कधी एकत्र अजून जगात ऐकलेले नव्हते. भारतातला हा प्रचंड माणूस माझा बाप हे कळून खूश झालो व थिजलो. वैदिक संस्कृतीचा विकास झाला की केवळ वाढ झाली हे मात्र मला अजूनही कळले नाही. पण मी त्यांना तो प्रश्न कधी विचारला नाही. उगाच वाद कशाला? मी हळूहळू तत्त्वज्ञानातून निवृत्त होण्याचा प्रयत्न करत होतो. एखादे वेळेस ते स्वतःविषयी म्हणत,

"मला गणित येत नाही. माझे मोठे नुकसान झाले आहे." 'माझे नशीब हे गणित शिकले नाहीत!' असे माझ्या मनात त्या वेळेस यायचे. मी त्यांना म्हणे, 'बोलभाषा विज्ञानातील कठीण संकल्पनादेखील फार चांगल्या पद्धतीने (शिस्त मोडूनही) समजावून देण्यास समर्थ आहेत." ते म्हणत, ''आशा आहे तू गणित चांगले शिकशील आणि ती सत्ये आत्मसात करशील." माझे गणित श्रेष्ठ नव्हते; कामचलाऊ होते व अजूनही तसेच आहे. पण त्या वेळेस माझ्या हे मात्र लक्षात आले होते की विज्ञाने व तंत्रशास्त्रे इतकी पुढे गेली आहेत की महत्त्वाचे प्रश्न विचार-ण्यात कायम पटाईत असलेले तत्त्वज्ञ आता युरोपमध्येही मागासत आहेत. आबांना विज्ञान समजावून सांगण्याची माझी ताकदही मला अपुरी वाटत होती. आबांच्या व माझ्यामध्ये ज्ञानशाखातील अति विशिष्टीकरणामुळे (Overspecialization) खिंड पडत होती. आबा एकदा म्हणाले, "बाहेर झाडांकडे बघितल्याशिवाय पक्षी उडतो आहे हे कळत नाही. सगळ्या गत्या सापेक्ष बाहेत." पॉयन्कारने आईन्स्टाईनला पुष्टी दिल्यानंतर युरोपमध्येही असेच तत्त्वज्ञ म्हणायला लागले होते हे खरे आहे. पण मॅक्सवेलच्या समीकरणातून केवल-गती मोजण्याची आशा शास्त्रज्ञांना आईस्टाईनपूर्वी आली होती हे मला कळले होते; म्हणून आईन्स्टाईनचे वैशिष्ट्य आहे हेही मला त्या काळी माहिती होते; पण मी आबांना ते कसे समजावून सांगणार? शिवाय मला फोकाल्टचा लंबक माहिती होता आणि खोलीच्या बाहेर न बघता पृथ्वी गोल फिरते ते सांगता येते हेही माहिती होते. पण मी बोललो नाही. पॉपरने एके ठिकाणी तक्रार केली आहे, की तत्त्वज्ञान्यांनी आधुनिक विज्ञाने तपासायची शिस्त धरली नाही म्हणून विश्वाविषयी खोल प्रश्न विचारण्याची कांटिअन परंपरा बुडत आहे. आबांना ही जाणीव चांगली आहे. पण त्यांच्या आरशात मी अनेक वर्षे कुरूप दिसल्यामुळे मी त्यांच्याशी तत्त्वज्ञानसंवाद काही काळ मंद केला होता; तरीदेखील अमेरिकेत आल्यावर माझा आत्मविश्वास वाढला व गेली कित्येक वर्षे आमचा पत्रव्यवहार ९० टक्के तत्त्वज्ञान व इतर १० टक्के ऐहिक अशा पद्धतीने पुन्हा चालू आहे.

अमेरिकेत जाण्यापूर्वी तीन वर्षे मी मुंबईत अणुकेंद्रात अभियंता म्हणून होतो. या काळात मला यशे आली, अपयशे आली. अपयशांत फक्त आता इतिहास दिसतो; कडवटपणा मुळीच राहिला नाही. आबांनी माझे १९५६ साली माझी अगोदर संमती न घेता लग्न ठरवले. अप्पा व सतीने मधूला काही कळत नाही; कु. इंदू दातार नक्षत्रासारखी मुलगी आहे व 'मधू समंजस आहे' या विचारांनी आबांना पटवून निर्णय केला. समंजस मी शेवटी हो म्हणालो; माझे कल्याण झाले, व दोन्ही घराण्यांची अब्रू वाचली. आबा नित्य पारिखांकडे तंबू ठोकलेले. मला व सतीला पारिखांचा हेवा वाटायचा. कृष्णार्जुनासारखी त्यांची मैत्री होती. पारिखांचे वय मोठे व माझा अपरिपक्वपणा मोठा व आम्हा दोघांचेही जाडे 'अहम्' होते. मी दूर गेलो. पारिखांशी व्यक्तिगत संबंध ठेवण्याचे प्रोत्साहन लहानपणापासून मिळाले असते तर मी मानवी संबंधातील नाजुकता लवकर शिकलो असतो. पण भारतीय

घर मुलांसाठी मानवी संबंधांची मोठी तालीम नसते. आज आबा वाईला पारिखांशिवाय-वृंदावनाला महाप्रस्थानानंतर कृष्ण जसा एकटा येऊन राहिला तसे राहिले आहेत. माझी सर्वांत प्रिय बहीण सुमन हिला टाळयामध्ये दोष असलेले मूल जन्मले; ती कष्टी व कठोर झाली; अशा वातावरणात आम्हा दोघांचे संबंध बिघडायला लागले. आबांना म्हणालो, मध्यस्थी करून आम्हा दोघांत तडजोड करा. त्यांनी तटस्थतेचा निर्णय घेतला. मी खट्टू झालो. आमचे संबंध आता गोड आहेत; पण त्याला लागले एक पर्व. या सर्व घटनांकडे बघता असे कोणाच्या लक्षात येईल की मी कमकुमत व्यक्तित्वाचा मुलगा आहे. माझे काका सत्ता गाजवणारे, अप्पा ताबा गाजवणारा, सुमन कठोर आणि ज्या आबांच्या मित्राजवळ गेलो ते भेटले जबरदस्त. आणि बघा ना माझे तटस्थ महाप्रचंड आबा! मी काय करू? मी पळालो अमेरिकेत. हिंदुस्थान सोडला नसता तर माझे पिट्ट पडले असते. पण खरे सांगू का अमेरिकेत गेलो? माझे प्रबंध प्राध्यापक प्रो. वाग्नर यांची पहिली सलामी झाली आणि मी पायात शेपटी घातली!

### दोन छावण्या

मी अमेरिकेत आलो आणि आबांच्या नैमित्तिक जीवनावर पडदा पडला. पत्रव्यवहार व अधूनमधून भेटी यांनी मी आबांशी संगत ठेवण्याचा निकराचा पण पुष्कळ वेळा केविलवाणा प्रयत्न करतो. दहा-हजार मैलांचे भौगोलिक जबरदस्त अंतर खट्टू करणारे असते. आबांच्या स्वभावाची अधिक वैशिष्ट्ये, व त्यांचे व्यक्तित्व व जीवनतत्त्वज्ञान मी पुढील लिखाणात सांगत आहे. यात माझा अहम् वाटलेला दिसेल. मी आबांना व्याख्यान देताना दिसेन. आबांची वैशिष्ट्ये व त्यांचे थोडे बारीक दोषही दिसतील. अहो, आबा हाडामासाचाच माणूस आहे!

आबा मला अगदी लहानपणी मी मुळाक्षरे शिकताना मंगलमूर्ती दिसले असे मागे मी म्हटले आहे. शिवाने मंगलमूर्ती माणूस आणि हत्ती जोडून केले. मंगलमूर्ती व्यासापुढे लेखक (Scribe) म्हणून बसले. प्लेटो सॉक्रेटिसचा लेखकू होता. पायथॅगोरस, सॉक्रेटिसने काहीही 'लिहिलेले' नाही. व्यासानेही काहीही 'लिहिले' नाही. मध्ययुगातल्या पांडित्याचे मंगलमूर्ती हे रूपकाने व प्लेटो हा खरोखरी 'दर्शनकार' आहेत. ग्रीकांनी व भारतीयांनी याच काळात केवळ संख्या, मुळाक्षरे व संकल्पना यांच्या आधारे काव्ये, नाटके, गणिते, तत्त्वज्ञाने निर्माण केलीत. मुळाक्षरी-संस्कृतीत मी इंद्रिय मंडळाचा वा काना डोळयाचा भेद होऊन मनुष्य भंजित व्हायला लागतो असे या लेखात पूर्वी म्हटले आहे. मंगलमूर्ती हा लेखक या अर्थी व त्याच्या जन्माच्या दंतकथेतूनही भंजित आहे. आबा प्लेटोसारखे पिंडाने क्लासिकल! कांटपर्यंत त्यांनी सहज मजल मारली; रसेलपर्यंत ते थोड्या कष्टाने पोचले, पण पॉझिटिव्हिस्टांपासून मात्र ते वेगळे राहिले. मी तत्त्वज्ञ नाही; पण मला माझ्या अंतर्मनी हे पक्के कळलेले आहे. विज्ञानाला शेवटचा क्लासिकल म्हणजे आईन्स्टाईन; आबांची त्याच्यावर अंतिम श्रद्धा.

पण पुँजीयभौतिकीने क्लासिकल विज्ञानाचा अंत केला व आता ती आईन्स्टाईनच्या प्रकाशगतीच्या सिद्धांताचा अंत करायला टपली आहे. आबा पॉझिटिव्हिझमने व पुँजीय भौतिकीने चक्रावून गेले आहेत.

आबांनी कायम प्रश्न मला विचारला आहे: ग्रीक हिंदुस्थानात आले, पण त्यांच्यामुळे आपल्याकडे विज्ञान का वाढले नाही? मी आबांना एकदा नुकतेच सांगितले की विज्ञान 'मोजण्यातून' निर्माण होते व ग्रीकांमधला मातबर तत्त्वज्ञानी वर्ग, ॲरिस्टॉटलखेरीज, मोजण्याविरुद्ध होता. अंकगणित; बीजगणित, थोडे ज्योतिष आपल्याकडे आले; बुद्धाच्या मूर्ती ग्रीक दिसू लागल्या; ग्रीकांजवळ विज्ञान 'नव्हते.' त्यांच्याजवळ लंबक होता व पाणघड्याळदेखील होते. पण त्यांनी गुरुत्वाकर्षणाचा सातत्य अंक 'ग' व आवाजाचा वेग काही शोधला नाही. आर्किमिडीजला त्याचे विज्ञानग्रंथ लिहिण्याची लाज वाटली होती! तत्त्वज्ञान्यांना मुळाक्षर, संख्या व संकल्पना यांतून केवळ सर्व जग निर्माण करायचे होते. ग्रीक काय दगड भारताला विज्ञान देणार? आबांना माझ्याविषयी कीव आली, "अमेरिकेला जाऊन माझा मुलगा एवढा शिकला; पण उथळ राहिला." ते जणू म्हणाले, 'बाळ बोलला!'

आबांनी मला अनेक वेळा विचारले आहेः आईन्स्टाईन म्हणतो "वस्तुमानामुळे अवकाश वाकतो. म्हणजे काय?" मी अनेक प्रकारे समजावून सांगितले पण माझी ताकद कमी पडली. पण मी एकदा म्हणालो, "अहो, रबराचा तक्ता घ्या. त्यावर आलेखासारख्या उभ्या आडव्या रेषा काढा. आता रबराबर जड गोळा ठेवा; त्या रेषा गोळयाच्या जवळ वाकड्या झालेल्या दिसतील. आता रबर विसरा व नुसत्या वाकड्या आलेखी रेषा मनात आणा व नंतर त्या रेषा विसरा आणि फक्त गोळा मनात आणा." आबांच्या क्लासिकल आत्म्याची तृप्ती झाली.

आबांचे सैद्धांतिक विज्ञानाचे ज्ञान विशेषतः आईस्टाईनपर्यंतच्या विज्ञानाचे ज्ञान अबोल पण पक्के आहे. सगळा तपशील उत्तम समजला नाही तरी अंतश्चक्षूंत प्रचिती आहे. खार झाडावरून उडी मारताना उड्डाणरेषेचे अचूक रचित करते; ते गणित तिला सांगता यायचे नाही एवढेच. पण पुंजीय भौतिकी मात्र त्यांनी अंतःचक्षू वापरून समजावून घेतली नाही म्हणून ते व्यवहारी आयुष्यातही खड्ड्यात पडले. मी मागे म्हणालो आहे की पुंजीय भौतिकीत प्रकाशपुंज कण की लाट, विद्युत्पुंज कण की लाट हा प्रश्न उरत नाही; या द्वंद्वाचा अंत होतो. नौखालीत हिंदुमुसलमान दंगलीत एका सुरेवाल्याला एक माणूस भेटला व त्या सुरेवाल्याने विचारले, "तू हिंदू का मुसलमान?" तेव्हा काठी घेऊन तो माणूस म्हणाला, ''अरे, मी न्हावी आहे!'' पुंजीय भौतिकीला हे उत्तर अगदी तार्किक वाटेल असे आहे; ॲरिस्टॉटलच्या अनुयायांना अजून ते पटलेले नाही. याच अडचणीतून "तू रॉयचा अनुयायी का गांधींचा अनुयायी?" या प्रखर विदारक प्रश्नाला त्यांनी खिन्न होऊन मी 'रॉयचा अनुयायी' हे उत्तर दिले व ते पँट घालून दृढ केले. त्यांनी पुंजीय भौतिकीचे मर्म समजावून घेतले असते तर ते म्हणाले असते, "अहो, मी तर्कतीर्थ आहे!"

मी आबांना नेहमी सांगतो: लहान कणांसाठी पुंजीय भौतिकीला प्रतिस्पर्धी असलेले दुसरे विज्ञान नाही. ती भौतिकी शुद्ध प्रयोगवादी आहे म्हणून वैज्ञानिक आहे. आईन्स्टाईनला सापेक्षता सिद्धांताबद्दल नोबेल पारितोषिक मिळालेले नाही; पुंजीय भौतिकीतल्या प्रकाश-विजेच्या परिणामाबद्दल (Photoelectric Effect) मिळाले आहे. याचे कारण नोबेल मंडळ सिद्धांताच्याबाबत बक्षिसे देऊन काही वेळेला मागे हास्यास्पद ठरले होते. किंवा सिद्धांतात चूक सापडल्याखेरीज विज्ञानात प्रगती नाही हे सर्व शास्त्रज्ञांना कळते. धादांतता (Realism), आगम (Induction) व आईन्स्टाईन वियोजन (प्रकाशाचा अत्युच्च स्थिर वेग) ह्या तीन तत्त्वांचा आश्रय घेऊन १९६५ साली सूक्ष्मकणांसाठी बेलचा सिद्धांत आला व तो बरोबर का चूक याचे प्रयोग झाले. पुंजीय भौतिकेचे भवितव्य बेल बरोबर का चूक यावर चिंताजनकपणे अवलंबून होते. बेलच्या सिद्धांताप्रमाणे सूक्ष्मकण वागत नाहीत हे प्रयोगाने आता निष्पन्न केले आहे. आज १९८० साली आईन्स्टाइनचे वियोजन धोक्यात आले आहे. पुंजीय तत्त्वज्ञानाला धादांतता म्हणजे सत्य जग बाहेर तटस्थ बघणाऱ्याच्या पुढे असते हे तर मान्यच नाही. क्लासिसिस्ट आबांना मी याविषयी अनेक वेळा लिहिले आहे. ते तटस्थ  आहेत. बघणारा सूक्ष्म बघताना सूक्ष्म बदलवतो हे आता सर्व शास्त्रज्ञांना मान्य आहे. पण पॉझिटिव्हिस्ट तत्त्वज्ञान्यांशिवायचे तत्त्वज्ञानी त्या सत्यापासून अलिप्त आहेत. मी आबांना एकदा म्हणालो, ‘‘हायसेनबर्गचे अनिश्चिति तत्त्व सांगते की ऊर्जा (Energy) भागिले काळ हा भागाकार, काळ जेव्हा शून्याजवळ पोचतो, तेव्हा अनंत होतो व अजस्त्र स्फोट होतो." ते म्हणाले, "म्हणजे काय होते?" मी म्हणालो, "अहो, म्हणजे जग निर्माण होते. मला ‘का?’ फार वेळा विचारू नये म्हणणारे आबा तेव्हा म्हणाले, "असे का?" मी म्हणालो, "अहो हायसेनबर्गचा शिपाई बघत नसला म्हणजे सगळया 'का' चा अंत होतो. त्या जवळजवळ शून्य वेळेच्या सुमारास तो शिपाई न्याहारीला जातो व त्या वेळेस विज्ञानातले व समंजसपणाचे कायदे निसर्ग मोडतो. आबांना खुळयासारखे झाले व ते म्हणाले, "ॐ!"

खरोखरच नुसत्या तत्त्वज्ञानाच्या चर्चा आमच्या पत्रव्यवहारात असतात का, असा संशय आतापर्यंतच्या माझ्या लिखाणातून निर्माण झाल्यास आश्चर्य नाही. "कंपुचियात एक वेडसर पोलपेट नावाचा साम्यवादी राज्यकर्ता होता; त्याने राजधानी नॉंपेन्हमधून सगळी माणसे बाहेर घालवून शहर रिकामे केले; निम्म्याच्यावर बौद्धभिक्षू ठार मारले व जवळजवळ निम्मी कंपुचियाची प्रजा 'नवसमाज निर्मितीसाठी' साम्यवादाच्या वेदीवर आज खून, उपास व आजारामुळे मेली आहे," हेही मी त्यांना सांगितले आहे. ते म्हणाले, "अरेरे!" पण त्यांच्या प्रतिक्रियेवरून असेही लक्षात आले की त्यांना व इतर भारतीयांना हे फारसे माहिती नाही. भारतीय माणसे सध्या इतकी स्वतःच्या समस्यांनी मेकली आहेत, की ती आता अंतर्मुख बनली आहेत. आशियात, आफ्रिकेत, दक्षिण अमेरिकेत लक्षावधी राजकीय कारणास्तव शरणार्थी बनलेले निराधार कुजत आहेत, पण भारतीय तटस्थ सुन्न आहेत. गांधी व नेहरू

यांच्या काळचे आंतरराष्ट्रीय तटस्थ भारतराष्ट्र आता केवळ अक्षरशः तटस्थ राष्ट्र बनले आहे. आबा विचारतात, "गरिबी नाहीशी होईल का? शांतता राहील का?" मी आशावादी तंत्रज्ञ म्हणतो, "ते प्रश्न निगडित आहेत. शांतता आणि गरिबीमुक्ती दोन्ही शक्य आहेत व फार दूर नाहीत." माझ्या मते ह्या समस्येची यशस्वी फलश्रुती वैज्ञानिक व तंत्रज्ञच करणार आहेत; मानव्यपंडित व सरकारे करणार नाहीत. आबांना मी उथळ, माणसाची स्थिती माहिती नसलेला व भाबडा आशावादी दिसल्यास मला आश्चर्य नाही. १९५६ साली सी. पी. स्नोने 'दोन संस्कृती' वर्णिल्याः शास्त्रज्ञ तंत्रज्ञ विरुद्ध मानव्य पंडित! त्याने असेही सांगितले, की अतिविशिष्टीकरणामुळे या दोन संस्कृतींच्या भिन्न छावण्या निर्माण झाल्या आहेत व त्यांच्यातील गैरसमजाची खिंड हा मानवजातीला मोठा धोका आहे. पण आबांच्या व माझ्या प्रेमामुळे बाप-मुलातील खिंड हळूहळू बुजली आहे.

### निर्णय तहकुबी

आता मी आबांचे वैयक्तिक तत्त्वज्ञान व काही व्यक्तिविशेष यांच्याकडे वळतो. स्वातंत्र्य ४७ साली आले; निवडणुका झाल्या; रॉयवादी पक्षाच्या लोकांचे निवडणुकीच्या वेळेस हाल झाले व ते अनामत रक्कम जप्त होऊन पडले! आबांना निवडणूक-संग्रामसभांमध्ये शेण व धोंडे यांचा मारा होई. एकदा ते लाथाबुक्यांचा मारा खाऊन घरी परतले. शांतपणे संध्याकाळी आम्ही मुलांनी हेगेलचा एक जाडा ग्रंथ वाचताना त्यांना पाहिले आहे. दु:ख सहन करणारा व शूर बाप आम्ही धादांत पाहिला आहे. बघितला आहे. त्यांच्या तटस्थतेचा हा एक अर्थ मी विसरू शकत नाही. शूर बुद्धिवादी इतिहासात खूप आहेत; आबा आमच्या वर्तमानात आमच्या मुलांच्यापुढे जिवंत होते. आम्ही कुटुंबीय मात्र त्या काळी भेदरलेले होतो; पण आबांनी आम्हाला धीर दिला. घरात भावनाविवश कुटुंबीयांत अनेक वेळा स्फोट होत. आबा आकाशयान एंटरप्राईझमधल्या केवलबुद्धिवादी डॉ. स्पॉकसारखे विचाराधिष्ठित चर्चा करून शांतता निर्माण करीत.

मित्रांच्या व हाताखालच्या सहकाऱ्यांच्या दोषांकडे कानाडोळा त्यांनी कायम केला आहे. त्यांना दुसऱ्यांविषयी शंका आली तरी ते ती दाबून विश्वासानेच वागत. पण मी त्यांच्या तटस्थतेमुळे नेहमी कायम अस्वस्थ होतो व आहे. मला भारतीय साधू हे कोडे आहे. मला त्यांच्याविषयी त्यांच्या तटस्थतेमुळे रागही आहे. मला सेवातत्पर ख्रिश्चन परिवारिक मिशनऱ्यांविषयी लोभ आहे. आधुनिक विसाव्या शतकाची बुद्धिवादी परंपरा निर्णय तहकुबी (Suspended Judgement) सांगते. आबांचा 'निर्णय तहकुबी' हा परवलीचा शब्द आहे. न्यायाधीशाची तटस्थता व निर्णय तहकुबीत न्याय मिळतो हे खरे आहे; पण निर्णय तहकुबीने न्यायालाही उशीर लागतो. व्यवहारात- विशेषतः कौटुंबिक व कारखानदारी आणि सरकारी व्यवहारांत- त्यामुळे फार उशिरा निकाल लागतात. निकालांतील उशीर ह्यातील अन्याय भारतीय लोकांना फार जाचत नाही असे वाटते. व तेथल्या न्यायालयांना तर याची पर्वाच

नाही! अमेरिकन न्यायालयांत हल्ली या अन्यायाबद्दल जाणीव होताना दिसत आहे. 'निर्णय तहकुबी'तून आबांना थोडी अपयशे आहेत. भांडकुदळपणा हा पंडित-मेळाव्यांचा स्वभाव असतो; ते मेळावे चालवण्यात आबांचे यश मात्र मला असामान्य कायम वाटलेले आहे. आबांनी माझ्यापुढे लहानपणापासून शल्यविशारदाच्या ताटस्थ्याचे कौतुक केले आहे. पण रोग्याशी आधुनिक मनोवैद्य ताटस्थ्य ठेवता ठेवता स्वतः मनोरोगी होतो हे प्रसिद्ध आहे. त्याने फार ताटस्थ्य ठेवले तर रोगी समजत नाही व कमी ताटस्थ्य ठेवले तर मनोवैद्य आजारी पडतो. याकरता तटस्थता मोडताना येणारा धोका आधुनिक मनोवैद्याला पत्करायलाच हवा. बघा ना, सध्या मेंदूवरच्या अतिसूक्ष्म शल्यक्रियेत रोगी व शल्यक्रियातज्ज्ञ यांचे सहकार्य असते. त्याशिवाय ती शल्यक्रिया शक्य नाही. आजारी मेंदूशी शल्यक्रियेत तज्ज्ञ मेंदूला बोलावे लागत आहे. यांत्रिक बुद्धिवाद्यांच्या तमाम ताटस्थ्याचा अस्त होत आहे.

आबांचे वडीलही मला वाटते तटस्थ होते. आबांची आई लहानपणीच वारली व आबांचे वडील तारुण्यातच विधुर झाले. वडिलांनी आई होण्याचा कितीही प्रयत्न केला तरी त्याला नैसर्गिक मर्यादा आहे. पण आबांचे वडील फार चाणाक्ष होते. लक्ष्मण ब्रह्मचारी होईल का, याची त्यांना थोडी धास्ती होती. ब्रह्मचाऱ्याचा पराभव करायला कामदेवाला फार कष्ट पडत नाहीत याच्या कथा त्यांनी आबांना सांगितल्या आहेत. सतीला आबांनी बघितले आणि बाबांच्या निखालस खाजगीपणाचा अंत झाला. बाबा जर थोडे अतटस्थ असते तर आम्हा मुलांच्या दृष्टीने ते कदाचित अधिक हितकर ठरले असते. आम्हा सर्वांचे नशीब पारिखांसारखा जबरदस्त मित्र आबांना भेटला. त्या मित्राने आबांचा बालेकिल्ला भेदून, "काय आबा, थोडी घेणार का?" विचारले. म्हणूनच आमचे आबा मानव्यपूर्ण शंभू बनले!

आबांचा 'अभंगव्यक्तित्व' (Integrated Personality) हा एक आणखी परवलीचा शब्द. लेखक आबा अभंग असू शकत नाहीत. मंगलमूर्तीदेखील मी मागे म्हटल्याप्रमाणे चमत्कारिक अभंग आहेत! काया-वाचा-मने अभंग साधणारी तज्ज्ञ माणसे मला दयनीय वाटतात. मी आहे विदूषक! मला तज्ज्ञांविषयी आदर आहे, पण मला विदूषक लोकच साहचर्याला आवडतात. आबा फार पूर्वी पंढरपूरच्या विठोबाला ब्राह्मणांच्या मगरमिठीतून सोडवण्यासाठी न्यायालयात साक्षीदार म्हणून गेले होते. घनपंडित आबांना वकिलाने विचारले, 'राम शब्दाची व्युत्पत्ती काय?' आबांनी आयत्या वेळेस त त प प केले. माझ्या आयुष्यभर मी त त प प करतो आहे. मला एखादे वेळेस चूक करणारे आबा अभंग माणूस वाटतो. पूर्वीचे आबा म्हणजे जडवाद व हिंदुधर्माची समीक्षा करणारे तर्कतीर्थ. त्यांनी सोमनाथाची प्रतिष्ठा केली, मला फार आवडले. पण बुद्धिवादी मित्रांना फार राग आला! आबा ज्ञानेश्वरीच्या पालखीबरोबर फिरतात असे मी अमेरिकेहून ऐकले आहे. मला ते फार आवडले, मी आहे पुंजीय भौतिकी-वादी. मला कण व लहर यात फरक नाही. जडवादी आबा व शास्त्रीबुवा या नीट वर्गीकरणाने मी त्यांचे व्यक्तित्व फाडू शकत नाही. शिवाय संपूर्ण

माणूस हा मोठे शहाणपण व काही खुळेपण याचेही मजेदार मिश्रण असतो. त्यांचा पाय पडून एकदाच फक्त मोडला आहे असे नाही. मला ते नेहमी सांगत, 'मागच्याला ठेच पुढचा शहाणा!' दुसरे असेही ते मला बजावत की, 'हे मधू, तू ढांपण लावलेला एकलक्षी बैल आहेस, तू पर्यायांचा विचारच करत नाहीस!' पण एवढे त्यांना कळत असूनही, माझे लहानपणी वाचताना डोळे दुखत व त्यामुळे तिरळे होत ह्यासाठी मला काही त्यांनी चवकशी करून नेत्रतज्ज्ञाकडे पाठवला नाही. ते एक दिवस मी त्यांच्याकडे तिरळे बघत असताना भडकले व म्हणाले, 'तू हस्तमैथुन करतोस म्हणून असे होते!' मी अनेक वर्षे वाचनातील डोकेदुखी उगाचच सहन केली; अमेरिकेत येईपर्यंत उगीच डोळे वाईट राहिले. लेखनसंस्कृतीतल्या माणसांमध्ये दुभंग व्यक्ती व हा मनोरोग (Schizophrenia) येतो हे माध्यम पंडितांचे मत प्रसिद्ध आहे. स्कित्सो माणूस भयंकर शंकेखोर असतो. आबा विश्वास टाकणारे, निःशंक व्यक्तित्वाचे. लोक त्यांचा फायदा घेतात व ते करू देतात. आबा स्कित्सो नाहीत. त्यांचे काही मित्र मी स्कित्सो पाहिले आहेत! पण त्यांनी तरीदेखील आबांना फार प्रेम दिले आहे; यातूनच मला आबांच्या पुढच्या आयुष्यातील यशाची खात्री वाटते. तटस्थतेतून यांत्रिक जगातील तणाव दुसऱ्याला वाटला तरी स्वतःला कमी होतो ह्यात थोडे सत्य आहे. आबा ८१ त शिरले यात मला त्यांच्या तटस्थतेतीलच शक्ती दिसते. शंकरासारखी आबांनी विषे उगाच नाही पचवली!

**मुलाचा बापाला उपदेश**

आता मी आबांच्यावर सोडलेला प्रकाशझोत मंद करतो. मीही लेखनसंस्कृतीत वाढलो आहे. वडिलांकडे तटस्थ वृत्तीने त्यामुळे बघितले आहे. माझी मुले आता पढत आहेत. त्यांच्यातही स्वतंत्र व्यक्तित्व व त्याबरोबर तटस्थपणा येत आहे. ते मी उपदेश पाजू लागलो की म्हणतात, "थोबाडीत मारा, पण व्याख्यान आवरा." तीही अनेक वेळा माझे दोष काढू लागली आहेत. मुलांच्या क्ष-किरणातून अस्थिपंजर न दिसता बाप जाऊ शकत नाही!

आबांची चाल कायमची तुरूतुरू करडूसारखी. ते रस्त्यात चालताना आम्हा मुलांच्यापुढे दूर पुढे; आम्ही त्यांना गाठता गाठता दमू. सती काही काही वेळा म्हणे, ''अहो, आम्हालाही तेथेच जायचे आहे.'' आबांची ज्ञानातली प्रगती मात्र आम्ही कधी रोधू शकलो नाही. आज आबा तंत्रज्ञान व मानवाचे भवितव्य अभ्यासत आहेत. मी त्यांच्या मित्रांच्या सल्ल्याला न जुमानता म्हणतो, आबांनी लाकडी पेनसील व दोन-अक्षी (Two Dimensions) कागद यांत रमू नये. निकोलस जेनसन प्रबोधन-प्रभाती ५८ व्या वर्षी छपाई शिकला व ज्या वयात सेवानिवृत्त होऊन दहा वर्षे लोटली असतात त्या सत्तरीत त्याने व्हेनिसमध्ये पुस्तक लिहून स्वतःच छापले. आबांनी आता दूरदर्शनाचे (Television) माध्यम शिकावे. दूरदर्शन विजेची पेनसील व पाटी असते. माध्यमतज्ज्ञांचे मत आहे की यंत्रयुगातला दुभंगलेला माणूस विजेच्या युगात अभंग होतो. आबांनी आता भारतीय संताची सर्व मानवांच्या

ऐक्याची गाथा- मग तो कंपुचियातील निराश्रित असो नाहीतर कृष्णेच्या वाळवंटात थंडीत थरकापणारा कातकरी असो- टीव्हीवरून गावी.

हा 'आबा व मी' लेख मी प्रथमपुरुषी मुलाने तृतीयपुरुष-विभक्तीने आबांना उद्देशून आतापर्यंत लिहिला आहे. आता आबांना द्वितीय पुरुषांत घालून त्यांच्याशी बोलतोः

आबा, त्रिवार अभिनंदन! तुम्ही पितृत्वाच्या परीक्षेत पहिल्या वर्गात पहिले आलात. थोडा निकालाला उशीर झाला हे खरे. पण क्षमस्व. तुम्ही पेढे वाटा. सती टाळी वाजवायला नाही. अप्पा पेढे खायला नाही. पण नात्यागोत्यांच्या व मित्रांच्या जगात टाळ्यांचा गजर होईल यात मला शंका नाही. तुम्हाला जोशी महाविद्यालयाने तीन महिने अमेरिकेत दूरदर्शनाचा अभ्यास करण्याकरिता शिष्यवृत्तीही जाहीर केली आहे.

आबा, तुम्ही आहात भटके. सती म्हणे, 'आबांच्या पायाला भिंगरी आहे. पण आम्हाला कधीही असे वाटले नाही की तुम्ही आम्हाला टाकले. बापाचा शोध लागला आणि कुटुंब सुरू झाले. पुरुष-माकड बाई माकडाशी कितीतरी लक्ष वर्षे स्थिर नव्हते. फार माकड-पोरे मरत. पुरुष-माकड बाई- माकडाबरोबर स्थिर झाले आणि चमत्कार घडला. भराभर पोरे तगायला लागली. आबा, तुमच्या शोधामुळे आम्ही जन्मलो, तगलो व तुमच्यामुळेच आमची शान आहे.

सती तुमच्यामुळेच कायम सनाथ होती व सनाथ गेली. तुमच्यामुळेच तिच्या आनंदाची भरती कधीही संपली नाही. ती गेली आणि तुम्ही पोरके झालात. माझ्या जिवाला घोर लागला आहे. ख्रिस्तीन मॅकव्ही या अमेरिकन कवयित्रीसारखा मी कष्टी आहे and I can't walk away from you, baby, if I tried. तुम्ही माझे जणू ठेचाळलेले पोर बनला आहात.

आबा, धीर धरा. तुमची सुमन-वासू, राम व अजेय हे नातू तुमच्याजवळ आहेत. अनोळखी अमेरिकन नात, लक्ष्मी तुमच्यापाशी वर्षभर राहून गेली. लक्ष्मीने पाया पडण्याच्या तटस्थ संस्कृतीत तुम्हाला मिठीची गोडी शिकवली आहे. सातव्या वर्षापासून अंतरलेला तुमचा सर्वांत प्रिय नातू विज्ञान व मानव्य या दोन्हींतही रस घेऊन मॅक-गिलमध्ये शिकत आहे. तो आजोबा धुंडाळायला लवकरच येत आहे. राम कोल्हटकर तुमची काळजी करतो. शहा, रेगे आदी कितीतरी मित्र तुमच्या लोभाचे अभिलाषी आहेत. आता पारीख नाहीत हे खरे! पण त्याला कोण काय करणार? आमचे अण्णा, इंदूचे अण्णा इत्यादी कितीतरी जवळचे नातेवाईक तुमच्या भोवताली आहेत. आबा, खचू नका.

आबा, तुम्ही सिगरेट फार पिता. मी तुम्हाला वाऱ्यामध्ये न विझणारी जादुची ज्योत पाठवून गुन्हा केला आहे असे वाटते. तुम्ही सिगरेट सोडा; लगेच लक्षात येईल की मन प्रसन्न करणाऱ्या अमाईन्सचा सुकाळ डोक्यात होत आहे. तुम्ही मला माहिती आहे नेहमी ध्यान-धारणा व योगाचे व्यायाम करता. पण व्यसन हे फार वाईट! मला माहिती आहे सती

गेल्यानंतर तुमची आबाळ होते आहे. पण आता त्याला मी दहा हजार मैलांवरून काय करू? नका आबा बेकार खाऊ; दूध व अंडी तुम्हाला नेमाने घ्यायला काय हरकत आहे? आपला वासू नाही का तुम्हाला या साध्या गोष्टींत मदत करणार? आबा, कृपा करून नीट जेवा.

आबा, मी तुम्हाला सापाच्या स्वप्नांतून मुक्त करू शकत नाही. अहो, तुम्ही कितीही उच्च मानव असला तरी आर कॉम्प्लेक्स (R Complex) ह्या मानवी मेंदूच्या सर्पासम भागापासून मुक्तता होऊ शकत नाही. तुम्ही सगळे विश्व सर्परज्जूप्रमाणे भास मानणारे ब्रह्मवादी शंकराचार्यही नाहीत. मला हल्ली वाटते तुम्ही 'मेलो मेलो' म्हणत उठल्यावर तुम्हाला मिठी द्यायला मी जवळ हवा. माझा स्पर्श हा 'स्पर्शवतां वरः' हे तुम्हाला सांगायला युधिष्ठिर नको. पण सातासमुद्रांच्या पलीकडून आपण मिठी कशी मानणार? आबा, पण कृपा करून निराश होऊ नका; तुम्हाला तो साप बाधणार नाही. तो तुमचा कायमचा पाळलेला प्राणी आहे!

आबा, काळजी घ्या. तुम्ही जगला आहात तोपर्यंत माझ्या मरणाची जाणीव मला स्पर्श करणार नाही. वंशशास्त्राचे DNA हे मूलतत्त्व! ते मला सांगते, तुम्ही माझ्यात व मी तुमच्यात आहे. आपण दोघेही शहाण्यासारखे वागू या. आबा, मला चिरंजीव करा!

**('नवभारत' मासिक, वाई; फेब्रुवारी-मार्च, १९८१, पृ. ४७ ते ६०)**

०००

## ६६.

# माझे आजोबा

## लक्ष्मी जोशी

माझ्या आजी-आजोबांच्या आठवणीतील सर्वांत उजळ आठवण म्हणजे १९७७ साली ते आमच्याकडे आले तेव्हाची. माझे आजोबा एक विद्वान गृहस्थ आहेत; व आजी एक असामान्य बाई आहे हे मला माहीत होते. तेव्हा ते येणार हे कळल्यावर माझे अंतःकरण भीती व आनंद याने भरून गेले. मला भीती वाटली याचे कारण कधीच न भेटलेल्या आजी-आजोबांशी आपण काय बोलायचे? कसे वागायचे? मी हिंदी पद्धतीने भेटायला- नमस्कार करायला- शिकले होते. इतक्या जवळच्या माणसाला अशा प्रकारे भेटणे मला जरा कृत्रिम वाटते. पण मग मनात आले अजून तरी त्यांची माझी ओळख नाही. तेव्हा हीच भेटण्याची तऱ्हा योग्य.

त्यांनी अमेरिकेत आमच्याबरोबर जो वेळ घालवला त्या काळात माझी आणि सतीआजीची थोडीच ओळख झाली. मुख्य कारण म्हणजे भाषा. मला मराठी येत नसे आणि तिला इंग्रजी येत नसे. आजोबांबाबत भाषा ही अडचण नव्हती. त्यांना उत्तम इंग्रजी येते. परंतु त्यांना माझे इंग्रजी समजत नसे. माझे इंग्रजी हे अमेरिकन इंग्रजी आहे. तेव्हा मी ठरवले की आपण त्यांच्याशी मोडक्या तोडक्या मराठीतच बोलायचे. परंतु मी जेव्हा जेव्हा मराठी बोलायची, तेव्हा तेव्हा आजोबा माझ्या हितासाठी म्हणून माझे उच्चार व वाक्यरचना सुधारायचे. त्यामुळे मला हा मार्ग सुखद वाटेना. आजोबांना सर्व अचूक लागते. ते प्रवीण आहेत. माझ्यात ती अचूकता नाही. त्यामुळे आमच्या संबंधांत बोच आली. अशा तऱ्हेने आजोबांची व माझी पहिली सलामी झाली.

यानंतर १९७९ सालापर्यंत माझी व आजोबांची भेट झाली नाही. मध्यंतरी आमच्या कटुंबावर विशेषतः आजोबांवर दुःखद घटना कोसळली होती. आमची प्रेमळ आजी व त्यांची प्रिय पत्नी निवर्तली होती. १९७९ साली मी भारतात एक वर्षभर फर्ग्युसन कॉलेजमध्ये शिकायला आले होते. मला न्यायला आजोबा मुंबईला विमानतळावर आले होते. तेव्हा

आजोबा मला थकलेले व कृश दिसले. पण त्यांना पाहून मला खूप आनंद झाला. मी त्यांना अमेरिकन पद्धतीने भेटले. मी त्यांना मिठी मारली. मला त्यात काहीच चूक वाटले नाही. नंतर गाडीत वाईच्या रस्त्यावर ते मला म्हणाले, 'मुलगी एकदा १२ वर्षांची झाली की नंतर अशा भावना दाखवत नाहीत.' मी म्हणाले, 'फार वाईट गोष्ट! तुम्ही अभागी आहात.' आता मी एक वर्ष भारतात राहणार आहे तेव्हा ह्या भारतीय चालीरीती मला जाणल्या पाहिजेत, हे मात्र माझ्या त्या क्षणी लक्षात आले.

माझ्या वडिलांनी मला आजोबांशी चांगले वागायला व जरूर पडेल तर माझ्या स्वतःच्या वर्तनात बदल करायला सांगितले होते. परन्तु मला प्रयत्नपूर्वक असे काहीच करायला लागले नाही. त्या पहिल्या दिवसापासूनच आमच्यात स्नेह निर्माण झाला. आजोबांना अजूनसुद्धा माझे इंग्रजी समजत नव्हते. त्यांना अडचण आली की ते रामची मदत घेत. राम माझा थोरला भाऊ. तो त्यांना मी काय बोलले ते पुन्हा सांगे. जसजसा काळ गेला तशी मी हळू व स्पष्ट भाषा वापरायला लागले. माझे अमेरिकन इंग्रजी आता हिंदी इंग्रजी बनले. माझी ओळख करून देताना नुसते शास्त्रीजींची नात म्हटले की पुरे होत असे. त्यात मला आजोबांच्या लौकिकाचीच जाणीव होत होती. मला वाटायचे, ''वा ! काय नशीब आहे. लोक माझ्याकडे पाहून कौतुकाने हसतात, व काय मदत हवी का म्हणून विचारतात.'' आजोबा अशा वेळेस स्वस्थपणे अलिप्त राहात असत. त्यांच्या हा फरक लक्षात येत नसे. कदाचित येत असेल तर ते कोणाच्याच नजरेस येऊ देत नसत.

मला नेहमी आश्चर्य वाटे की श्री. इंदिरा गांधींजवळ बसणारे, यशवंतराव चव्हाणांशी राजकारणावर चर्चा करणारे माझे आजोबा वाईच्या मंडईत भाजीवाल्यांशी भाव करत, खरेदी करत याचे. आजोबा सर्वांना सारखे वागवतात. परन्तु काही लोक स्वतःच्या फायद्यासाठी त्यांच्या नावाचा उपयोग करतात, असे माझ्या लक्षात आले. ते मी त्यांना सांगितले. त्यावर फक्त ते 'असू दे' म्हणायचे.

आजोबा आम्हा नातवंडांकडे जातीने लक्ष पुरवतात. प्रथम ते आमच्यासाठी स्वतः जेवढे शक्य तेवढे करणार. मग इतर उद्योगाला जाणार. त्यांना जे शक्य नाही ते दुसऱ्याकडून करवून घेणार. आजोबांना माहीत आहे की मला डाळिंबे आवडतात. एक दिवस मुंबईत असताना आजोबा व मी डाळिंबे आणायला गेलो. खूप दुकाने धुंडाळून आजोबांनी माझ्यासाठी खूप मोठी, रसाळ सुरेख डाळिंबे निवडली. घरी आल्यावर मला आजोबांनी ती सोलून दिली. ते तोंडात टाकल्याबरोबर मला पारख पटली.

माझ्या पिढीतील लोक आजी-आजोबांना टाळतात अगर त्यांना सहन करतात. परन्तु आजोबांजवळ राहाणे मला कधी पुरेच होत नाही. मला असे वाटते की इतकी वर्षे मी आजोबांच्या सहवासाला दुरावले होते आणि आता मला ते भरून काढायचे आहे. मला आजोबांच्या सहवासात राहायला फार आवडते. मी आजोबांना अनपेक्षित भेटी देण्यात

मजा मानत असे. पण एक दिवस त्यांनीच आम्हाला अनपेक्षित धक्का दिला. आजोबांचा ८० वा वाढदिवस होता. म्हणून मी व रामने वाईला जाऊन त्यांना भेटायचे ठरवले. आम्ही घरी आलो तर आजोबांच्या कॉटजवळ दोन डॉक्टर बसलेले होते ते त्यांची तपासणी करीत होते. मला किती दुःख झाले आणि भीती वाटली हे कोणत्याच शब्दांत मला सांगता येणार नाही. हतबल झाले. आम्ही त्याच दिवशी त्यांना पुण्याला K. E. M. मध्ये नेले. तेथील डॉक्टरांनी लघवीच्या मार्गात मूत्रखडे आहेत असे सांगितले. पण गोविंदमामाने आम्हाला मुळीच काळजी करू नका म्हणून सांगितले, तेव्हा आमचा जीव भांड्यात पडला.

फेब्रुवारीच्या अखेरीला मला मित्र मिळाले. इतके दिवस बिनमित्रांचे घालवल्याने साहजिकच मी मित्रांबरोबर अधिक वेळ घालवू लागले. मी जेव्हा मित्र म्हणते तेव्हा मला पुरुष मित्र म्हणायचे आहे; आणि मुलीला मुलगा-मित्र ही भारतात लोकांना धक्का देणारी घटना आहे. पुष्कळशा लोकांना दुसऱ्या लिंगाची मैत्रीण अगर मित्र याचा अर्थ त्यांच्यात काही शारीरिक संग असला पाहिजे असाच होतो. त्यांच्यात निवळ मैत्री असू शकते हे त्यांना खरेच वाटत नाही. आता मला असे कळते की माझ्या ह्या वागण्याने पुण्यात मोठी खळबळ झाली. अमितामामीचे पेशंट तिला विचारायचे, "तुमची भाची पुण्याच्या रस्त्यांवर कशी जाते तुम्हाला माहीत आहे का?" तसेच आजोबांचे मित्र त्यांना विचारायचे, ‘तुमच्या नातीला असं तुम्ही कसं वागू देता?’ असं बोलल्यावर आजोबा नुसते हसायचे आणि म्हणायचे 'अहो, ती अमेरिकन आहे.' माझ्या सर्व नातेवाईकांनी मला पाठिंबा दिला. त्यांना माहीत होते की लहानपणापासून मी मुलांत खेळले. त्यांच्याशी कसं वागायचे व स्वतःची काळजी कशी घ्यायची ते मला कळते. आजूबाजूच्याच लोकांना घरच्यांपेक्षा माझ्या ह्या वागण्याची जास्त चिंता पडली होती. मला अशी शंका आहे की त्यांना भीती वाटत होती की त्यांना अकल्पनीय प्रथा मी पाडते की काय?

सतीआजी असताना घर कसं होतं मला माहीत नाही. पण मला माहीत आहे की स्वयंपाकघर फार सुरळीत चालते. मी असं ऐकले आहे की सतीआजी पाहुण्यांसाठी नेहमीच फराळाचे तय्यार ठेवत असे. त्यांच्या आवडीप्रमाणे त्यांना चहा, कॉफी नेहमीच मिळत असे. आजोबांना ते तसंच आजपण चालावं असे वाटते. ते पाहुण्यांच्या आदरातिथ्यासाठी फार कष्ट करतात. स्वतः स्वयंपाकावर देखरेख करतात व सुचतील त्या सूचना देऊन जास्तीत जास्त छान सुग्रास जेवण व्हावं ह्याकडे लक्ष देतात. पण मला असं वाटतं त्यांचे काही पाहुणे त्यांचे आदरातिथ्य टाळतात. कदाचित त्यांना कसलं जेवण मिळणार असे वाटत असेल. पण खरं म्हणजे त्यांना भ्यायचे कारण नाही. इतरांसारखेच आजोबांना जेवायला पाहुणे आलेले आवडतात. आणि ते त्यांच्या आदरातिथ्याची पण खूप काळजी घेतात.

माझे भारतातील एक वर्ष संपत येऊ लागले, तसे माझ्या मनात परत जाण्याच्या विचाराला दुय्यम स्थान येऊ लागले. एक दिवस आजोबांच्या घरी मी, आई व आजोबा

बसलो असताना जे घडायचे होते ते घडले. दादांकडून माझे परत जाण्याचे तिकीट आले. माझ्या डोळ्यांत अश्रू आले. पण मला माहीत होते की मला अमेरिकेत जायलाच हवे. मी माझी परत जाण्याची तयारी केली; आणि पुन्हा एकदा परंतु अखेरचाच मुंबईचा रस्ता धरला. गाडीत मी सारखी रडतच होते. कारण मी नुकताच माझ्या प्रिय गोविंदमामा, अमितामामी, उमा व नील यांचा निरोप घेतला होता. आजोबांनी माझ्या खांद्यावर हात ठेवून समजावण्याचा प्रयत्न केला. गाडीत आम्ही दोघेही गप्पच होतो. मी दुसऱ्या दिवशी रात्री अमेरिकेला निघाले. निघण्यापूर्वी मी माझ्या जुन्या सवयींना मानले. मी आजोबांचा निरोप घेताना त्यांना मिठी मारली; आणि ह्या वेळी त्यांनीपण मला न बोलता मिठी मारली.

**('नवभारत' मासिक, वाई, फेब्रुवारी- मार्च, १९८१, पृ. ६९ ते ७१)**

ooo

## ६७.

# माझे सासरे

## सौ. इंदू जोशी

१९५६ साली माझे लग्न मधुकर जोशी यांच्याशी ठरले. आमचे लग्न जुन्या पद्धतीनेच ठरले. परन्तु 'मुलगी पाहाणे' अगर 'दाखवणे' हा प्रकार अजिबात झाला नाही. मी मूळची दातार; जोशी व दातार हे कित्येक वर्षे शेजारी राहात आहेत. परन्तु आबांनी मला कधी पाहिले होते असे मला वाटत नाही. सतीकाकूंची व माझी भेट दररोज सकाळी ६-६॥ च्या सुमाराला घाटावर होत असे. लग्न ठरल्यावर एक दिवस संध्याकाळी मी फिरायला जात असताना सतीकाकूंनी मला मुद्दाम दारात बोलत थांबवले. त्यांचा त्यात उद्देश असा होता, की आबा विश्वकोशातून बाहेर येत होते तर त्यांची माझी भेट व्हावी. आबांनी मला दारात पाहिले. सतीकाकूंनी त्यांना 'येथूनच जा' असे सांगितले. आबा ह्या वेळेपर्यंत छापखान्याच्या दाराशी आले होते. ते तेथे क्षणभर घोटाळले व दुसऱ्या क्षणी ते छापखान्याच्या दारातून हळूच निघून गेले.

लग्न झाल्यावर माझे वडील मला नेहमी म्हणायचे ''इन्दू, खूप मुली सासू-सासऱ्यांविषयी तक्रार करतात. पण तू जर तक्रार केलीस तर मला तुझ्या सासू-सासऱ्यांच्या दोषांआधी तुझेच दोष दिसतील.'' माझ्या वडिलांच्या ह्या म्हणण्याची प्रचिती मला अनेक वेळा आली. लग्नानंतर आमचे बिऱ्हाड मुंबईला गिरगावातच थाटले होते. परन्तु माझा मुक्काम बहुधा वाईला आबांकडेच असायचा. तेथील प्रसन्न वातावरण मला नेहमीच आवडत असे. आम्हाला लग्नानंतर तीन वर्षांत २ मुलगे झाले. दुसरा मुलगा १५ दिवसांचा असतानाच मधुकर येल विश्वविद्यालयात उच्च शिक्षणासाठी म्हणून अमेरिकेला गेले. अर्थात मी व मुले आबांकडे रहाणार यांत शंकाच नव्हती. कारण मधुकरची शिष्यवृत्ती फक्त त्यांचे भागण्याइतपतच होती. विजय १० महिन्यांचा असताना ह्यांचे पत्र आले की आता माझा अभ्यासात छान जम बसला आहे. मी संध्याकाळी नोकरी करून तुझ्या भाड्यापुरते पैसे साठवले आहेत. तू एकटीच आलीस तर आपले काटकसरीने भागू शकेल. मी ह्या पत्राचा

क्षणभर मोठ्या अधीरतेने विचार केला. पण लगेच राम-विजयला टाकून इतक्या लांब जायचे हे शक्य नाही. म्हणून तो विचार दुसऱ्याच क्षणी सोडून दिला. परंतु आबा आणि सासूबाई ह्या दोघांनी मुलांची पूर्ण जबाबदारी घेण्याचे ठरवले. आबांनी मला वारंवार सांगितले, ''इन्दू, मुले तुझीच आहेत. ती तुझीच राहतील. नवरा जरी तुझा असला तरी तो ठेवावा लागतो. इतका काळ दूर राहाणे तुझ्या हिताचे नाही. परक्या देशी एकटेपणा अधिक भासतो. आम्ही मुलांची जिवापाड काळजी करू'', अर्थातच त्यांचा विचार मला मान्य झाला. तो मला तपासून पहायचा नव्हता; आणि मुलांची काळजी खरे म्हणजे सर्वतोपरी ते करीतच होते. मी त्या मे महिन्यात ६० साली बोटीने अमेरिकेला गेले व राम-विजय आजी-आजोबांकडे त्यानंतर ६ वर्षे राहिले. आजोबा घरी असले की मुले त्यांच्याच जवळ असत. सकाळच्या न्याहारीपासून ते रात्रीच्या झोपेपर्यंत दोघांनाही आबाच हवे असत. आबा वेळ काढून सर्व प्रेमाने करत. माझा मोठा मुलगा राम सध्या पुण्याला कॉलेजमध्ये आहे. तो नुकताच आम्हाला भेटून गेला. तो सांगत होता, आबा अनेक वेळा त्याच्यासाठी त्याच्या आवडीचे पदार्थ खास करवून घेतात, व ते त्याच्या खोलीवर आणून देतात.

१९६६ साली मी, मधुकर व आमच्या अमेरिकेत जन्मलेल्या दोन मुली लक्ष्मी व शीला भारतात परत आलो. या सुमारास राम ७ वर्षांचा व विजय ६ वर्षांचा होता. मधुकरांनी Ph. D. संपवली होती व त्यांना इंजिनीअर म्हणून नोकरी लागली होती. आम्ही आता राम - विजयला अमेरिकेत नेण्याचा विचार करत होतो. आबांनी आग्रहाने मुंजीचा घाट घातला. ते म्हणाले, ''तुम्ही मुलांना तिकडे नेता. मुले परत येतील तेव्हा मोठी झालेली असणार. हा संस्कार फार महत्त्वाचा आहे. तो आपण आताच करायला हवा.'' अर्थातच मुलांच्या मुंजी झाल्या. रामच्या मुंजीचे देवक आम्ही बसवले व विजयच्या मुंजीचे देवक आजी-आजोबांनी बसवले. माझ्या दोन्ही मुलांना लहानपणापासून फुले आवडत नसत. अर्थात मुंजीत हार, मुंडावळया वगैरे फुलांचे असणार. मुलांनी प्रथम आम्हाला ते अजिबात नको म्हणून सांगितले. पण नंतर थोडी चर्चा, लाडी गोडी लावून झाल्यावर रामने अगदी थोडा वेळ हार-मुंडावळया घालायचे कबूल केले. विजयवर काही परिणाम झाला नाही. त्याने सर्व विनंत्या अमान्य केल्या. मुंजीचा एक भाग म्हणजे गोटा करणे. रामचा गोटा केलेला विजयने पाहिला. त्याने आजोबांना सांगितले, 'माझं आपलं नेहमीसारखं कटिंग करायच हं. मला गोटा आवडत नाही.' आबांनी खूप समजावून सांगितले. शेवटी १४ व्या रत्नाची पण भीती दाखवली, परंतु शेवट विजयपुढे त्यांना माघार घ्यावी लागली.

मी ते एक वर्ष भारतात राहून चारही मुलांना घेऊन अमेरिकेत परत आले. निघण्यापूर्वी आबांनी मुलांना काही ऐतिहासिक ठिकाणे स्वतः नेऊन दाखवून आणली. व आम्हा सर्वांना एकदा नाशिकच्या त्र्यंबकाच्या दर्शनाला आवर्जून पाठवले. मुले दादांकडे अमेरिकेत जायचे म्हणून खूश होती. मी पण आता आम्ही सर्व एकत्र राहणार म्हणून समाधानात होते. पण

येथील प्रेमळ जगाचा निरोप घ्यायचा म्हणून अश्रू वारंवार आवरणे कठीण होत होते. इतके दिवस जिवापलीकडे आजी-आजोबांनी जपलेली मुले सातासमुद्रापलीकडे आपल्या जवळ कशी राहतील अशी पण शंका मधूनमधून जिवाला टोचत होती. पण अमेरिकेत आल्यावर मुले आमच्याजवळ ताबडतोब रुळली. ती जणू सतत आमच्यापाशीच वाढली. एक दिवस मी त्यांना विचारले, 'काय रे, तुम्हाला आजी-आजोबांची आठवण कशी येत नाही?' त्यावर दोघांचे एकच उत्तर, 'आठवण येते गं. आमचे दोघांनी खूप लाड केले. पण ते आम्हाला नेहमीच सांगत असत, की तुम्ही आई-दादांकडे राहायला जाणार. आता हेच आमचं घर.'

**('नवभारत' मासिक, वाई; फेब्रुवारी-मार्च, १९८१, पृ. ६७ व ६८.)**

ooo

## ६८.

# आबा: एक 'आनंदयात्री'

## सुमन खंडकर

आबांची अखेरची गाठ डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात पडली. आय. आय. टी. (पवई) येथे भारतीय प्राचीन विद्या व आधुनिक तंत्रविज्ञान चार दिवसांच्या चर्चासत्राच्या उद्घाटनात भाग घेण्यासाठी त्यांना निमंत्रण होते. ते संपवून दुसऱ्या दिवशी सकाळी परतताना नेहमीप्रमाणे मी गाडी सुरू होईपर्यंत निरोपाचा हात हलवत राहिले. अलीकडे प्रत्येक वेळी ते मुंबई सोडून जाताना मला नकळत भीती वाटायची- ही भेट अखेरची तर नाही ना! याला कारण होते. सकाळच्या चहासाठी बसलो की, ते सांगत, 'सकाळी उठायचा कंटाळा येतो. मी स्वतःला बिछान्यातून जबरदस्तीने उठावयास सांगतो. म्हातारपण गाठते आहे.'

सती, म्हणजे माझी आई. ती १९७८ मध्ये अचानक गेली. त्यानंतर आम्ही दिवाळी ही वाईला आबांबरोबर करायचा रिवाज पाडला. या वेळी मात्र दिवाळी महाबळेश्वरला त्यांच्या नव्या घरात जरी केली. या स्वतःच्या अशा पहिल्याच वास्तूत आबा प्रसन्नपणे वावरत होते. दुपारी वामकुक्षी वगैरे नाहीच. त्या वेळी आंध्र प्रदेशात झालेल्या चक्रीवादळामुळे तिकडील हवेत विशेष बदल झाला होता. त्याचा प्रतिसाद महाबळेश्वरला अनुभवला. दोन रात्री पहाटेपर्यंत सतत सोसाट्याच्या वाऱ्याने ॲसबेस्टॉसचे छप्पर हालत होते. पण पहाटे वारे पडत होते. उत्साहाने अबा जाळीतून बाहेर पाहात होते. त्या घराच्या प्रवेशद्वारात उभे राहिले की, समोर कृष्णेचे हिरवेगार खोरे नजरेत भरते. मी चहा करत असतानाच आबांनी बाहेर बघून आडाखा बांधला. दाट निळ्या ढगांतून नारिंगी प्रकाशाचे पट्टे पाहिल्यावर फिरावयास बाहेर पडण्याचा त्यांचा बेत नक्की झाला. बरोबर वासुदेव, अजय व त्याचा मित्र सुनील होते. दीड-दोन तासांनी ते सर्व परतले. दुपारी त्या सर्वांना आजूबाजूची जुनी मंदिरे बघण्यास ते स्वतः घेऊन गेले. मंदिरातील गुरवांनी दिलेली माहिती ऐतिहासिकदृष्ट्या बरोबर नाही असे म्हणून मग त्यांनी ती केव्हा आणि कोणी बांधली हे पटवून दिले. महाबळेश्वरला दुपारचे ऊनही फार कोवळे असते. तिकडील कडूलिंब, करवंद, जांभूळ वगैरे झाडांच्या किनारी

असलेल्या चढउताराच्या रस्त्यावर आबा पुनःपुन्हा जात. ती निसर्गाची रम्यता न्याहाळत असताना, 'काय? कसे काय वाटते हे ठिकाण?' हे परत परत विचारत.

आबांची अखेरची तीन पत्रे मधुकर, मालू व मला साधारण एकाच वेळी म्हणजे ‘मे महिन्या’च्या पहिल्या आठवड्यात आली. थोडासा मजकूर सोडल्यास, "मी महाबळेश्वरला वास्तू बांधल्याचे माहीत आहे ना, मी तेथे राहतो आहे. उन्हाळ्याचा त्रास होत नाही. त्यामुळे माझे वाचन व मनन चांगले होते." गेली दहा वर्षे वाईच्या रुक्ष उन्हाळ्यात ते थकायचे. त्याच काळात मधुकर व मालू यांनी त्यांना तीनचार वेळा अमेरिकेत बोलावले होते. तिकडून येणाऱ्या पत्रात तिकडच्या निसर्गाचे, जोपासलेल्या विस्तीर्ण हिरवळीच्या पट्ट्यांचे, तळी व डोंगरांचे वर्णन असे. त्यामुळे आबा फार खूश होऊन जात. उन्हाळ्यात उघड्यावर व्यायामाच्या अनेक प्रकारांत तिकडील मंडळी कशी व्यग्र होतात याचे त्यांच्या पत्रात वर्णन असायचे.

मधुकर व इंदू आणि पाठोपाठ मालू व मुरलीधर तीस वर्षांपूर्वी अमेरिकेत गेले. मधू व मुरलीधर येल विद्यापीठात पीएच. डी. च्या अभ्यासक्रमात व्यस्त राहिले. आबांचा मधुकरशी पत्रव्यवहार मोठा होता. अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर त्या दोन्ही कुटुंबांनी तिकडेच कायमचे वास्तव्य ठेवले. मधुकरने मॅट्रिकला असताना शंकरशेठ शिष्यवृत्ती मिळविण्याचा प्रयत्न केला, पण त्याची ती हुकली. त्या वेळी वाई, सातारा भागात महाविद्यालये नव्हती. म्हणून त्याने पुण्याच्या फर्ग्युसन महाविद्यालयात, विज्ञान शाखेत नाराजीनेच प्रवेश घेतला. नाराजी एवढ्याचसाठी की, पुढील अध्ययन साहित्य काव्य क्षेत्रातच करावे अशी त्याची इच्छा होती. पण आबांना त्यासाठी त्याच्या होस्टेलचा खर्च करणे मान्य नव्हते. आबांच्या मते, आधुनिक जगाचा व्यवहार गणित, विज्ञानाने होत असतो. पण संस्कृत काव्य, व्याकरण आणि इंग्रजी साहित्य तो वाचत राहिला. त्याची जाण वाढत होती. वादविवादात तात्त्विक, सामाजिक विषयात तो योग्य प्रश्न उपस्थित करत असे. आपल्या मुलांचे तोंडभर कौतुक करणे हा आबा व सती यांच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग नव्हता. पण त्यांचा मधुकरशी सतत पत्रव्यवहार हा समपातळीवरील सुहृदासारखा होता. भारतीय शास्त्रांमधील आबांची अजोड वैचारिक बैठक असूनही नव्या ज्ञानशाखा कशा विस्तारत आहेत याचे त्यांना भान होते. पाश्चात्त्य देशांतील प्रचलित नवे सिद्धान्त, संशोधन मधू त्यांना लिहीत असे. पाश्चात्त्य देशांतील वैचारिक परखडपणा इकडील वडीलधाऱ्या माणसांच्या विचारांशी तडजोड करणारा नसतो. मधू हा स्पष्टवक्ता, जरुरीपेक्षा थोडा अधिकच, पण अबांनी तो स्वीकारला आणि इकडच्या ज्ञानातील अपुरेपणाचा दोष मान्य केला.

एकेकाळी मार्क्सवादाने भारलेल्या आबांना मधूने कंपुचियात साम्यवादी राजवटीत नवसमाज निर्मितीसाठी, बौद्धभिक्षुंचे व जवळजवळ अर्ध्याअधिक जनतेच्या झालेल्या हत्याकांडाविषयी सांगितले. अबांच्या प्रतिक्रियेवरून आबांना त्याबद्दल माहीत नसावे असे

त्याच्या लक्षात आले. त्याने तसे बोलूनही दाखवले. जिज्ञासा हा मानवातील गुणविशेष फार वेगळ्या तऱ्हेने व्यक्त होतो. त्यातूनच भौतिक शास्त्रांची प्रगती झाली. मानवाला केव्हाही शिकण्याची क्षमता आहे. इच्छा असल्यास (Permanent Educability) यावर आबांचा दृढविश्वास होता. मानव व इतर प्राणिवर्ग यामधील हा एक महत्त्वाचा फरक. त्यामुळे स्वतःला बदलणे, जीवनदृष्टी विस्तारणे आणि आत्मबोध करून स्वतःला सुधारणे हे मनुष्यालाच शक्य होते. त्यामुळे एकेकाळी सत्य व योग्य मानलेल्या विचारप्रणालीतील दोष दृष्टोत्पत्तीस आल्यावर ती बाजूला करून नव्या प्रणालीकडे वळताना मानसिक संघर्षातून त्यांना जावे लागले नाही.

आबा मालूलाही खुशालीची पत्रे नियमित लिहीत. तिच्या स्वच्छ गोलघाट अक्षराकडे पाहून म्हणत, यात तिचे निर्मळ मन प्रकट होते. मी राहिले मुंबईला. माझ्याशी पत्रव्यवहाराची वेळ फारशी आली नाही. फोनवरील संपर्काव्यतिरिक्त माझे सुट्टीनिमित्त दोनतीन वेळा जाणे होत असे. महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळाच्या कार्यालयाची सुरुवात झाल्यावर आबा वारंवार मुंबईत येऊ लागले. प्रा. गोवर्धन पारीख हे त्यांचे फार निकटचे स्नेही. आबा प्रथम त्यांच्याकडे उतरत असत. मी घाटकोपरला मोठ्या जागी हलल्यानंतर, १९७५ सालानंतर, आबा- सती माझ्याकडे उतरू लागले. म्हणजे गेली अठरा-एकोणीस वर्षे आबांचा सहवास मला लाभला. माझ्या जाणतेपणी आणि प्राध्यापकीय व्यवसायात मी स्थिरावल्यानंतर आबांचे वैचारिक जीवन जाणून घेण्याचा माझा प्रयत्न चालू होता. त्यांच्याशी होणाऱ्या महत्त्वाच्या लोकांच्या चर्चा मला समजू लागल्या. व्ही. बी. कर्णिक, डी. बी. कर्णिक, डॉ. इंदुताई पारीख, मणिबेन कारा, जे. बी. एच. वाडिया, शिवनारायण राय ही मंडळी आली गेली. कै. प्रा. ए. बी. शहा, प्रा. मे. पुं. रेगे, डॉ. नाना इनामदार, सुभाष भेंडे, माधवराव गडकरी, अरुण टिकेकर, राम पुजारी, मधु मंगेश कर्णिक यांचेही आबांच्या निमित्ताने माझ्याकडे येणे असे. काही वेळा माझेही निमित्ताने त्यांच्याकडे जाणे झाले. सिनेसृष्टीत दबदबा असणारे रामानंद सागर व फणी मुझुमदार हेदेखील 'रामायण' दूरदर्शनसाठी तयार करताना स्त्रीसंघटनांना न दुखावता काही प्रसंग कसे सादर करावेत याविषयी चर्चा करायला येऊन गेले. माझ्या घराला एक वेगळे वजन आले होते. आबांभोवती राहात असणाऱ्या प्रथितयश मंडळींची आवक जावक सुरू असल्यामुळे आबांची स्वभाववैशिष्ट्ये व सर्वांशी होणारे व्यवहार, वर्तन यांतून माझ्यावर प्रौढ वयातही आणखी नवे संस्कार झाले असे वाटते. माझ्या परदेशस्थ भावंडांपेक्षा आबांशी असा परिचय होण्यास मला संधी लाभली होती.

आबांकडे आकर्षित झालेल्या मंडळींमध्ये सामाजिक, राजकीय, साहित्यिक विषयांवरील गप्पा फार रंगत. अत्रे, माडखोलकर, यशवंत, अनिल, बा. भ. बोरकर वगैरेंबरोबरचे हलकेफुलके क्षण आबा सांगत असत. सगळ्यांत वयाने मोठे व राजकीय आणि सांस्कृतिक चळवळीतील एक म्होरके म्हणून आबांचा या सर्वांशी जवळचा संबंध आलेला होता. एकदा

आत्माराम बापू पाटलांकडे यशवंतराव चव्हाण व आबा गेले असताना त्यांनी सांगितले, "इतक्यात कुठे जाता? जेवूनच चला." दुपारचे तीन वाजत आले. जेवणाची काही हालचाल दिसेना. यशवंतराव त्यांना म्हणाले, "शास्त्रीजी, या तयारीने आपल्याला बहुतेक उद्या जेवण मिळेल. चला, उठू या. बाहेर खाऊन घेऊ." ही गोष्ट ते संध्याकाळी आमच्याकडे जमलेल्या त्यांच्या स्नेहीमंडळींना सांगत होते. अशा वेळी हास्याची खसखस अनेक वेळा पिकत असे.

१९८० पर्यंत अबा महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष होते. मुंबईत असत तेव्हा नियमित इतर चाकरमान्यांप्रमाणे सकाळी दहापासून संध्याकाळी पाचपर्यंत सचिवालयातील कार्यालयात जात असत. लिफ्टपुढील रांगा पाहिल्यावर मग ते त्यासाठी न थांबता सरळ पाठ फिरवून संगमरवरी पायऱ्या चढून पाचव्या मजल्यावरील कचेरीकडे तरातरा चढून जात. राम कोल्हटकरला मग ब्रीफकेस सांभाळत त्यांच्यामागे चढत जावे लागे. शारीरिक नियमित व्यायामाचा, निसर्ग-सौंदर्य टिपण्याचा आबांना जेवढा उत्साह, तेवढाच अनुत्साह कोल्हटकरमध्ये होता. अबांबरोबर कोठेही केव्हाही जाण्यास तत्पर असणाऱ्या कोल्हटकरने आबांना त्यांच्या व्यायामात मात्र साथ दिली नाही.

व्यायाम व शरीरस्वास्थ्य यांमधील पक्के समीकरण आबांनी मानले होते. धार्मिक प्रथांइतके त्यांनी ते कसोशीने पाळले, आणि त्याचे महत्त्व ते इतरांना पटवून देत. अमेरिकेतील वास्तव्यात मला त्यांनी काही पत्रे लिहिली. १४ जुलै १९९० रोजी लिहिलेल्या पत्रात ते लिहितात, "मी रोज दोनतीन मैल फिरतो. या अमेरिकन जगात स्त्रिया व पुरुष दमविणारा व घामाघूम करणारा व्यायाम घेतात. व्यायामच माणसाची प्रकृती बिघडवू देत नाही. माणसाचा इतिहासच तसा आहे. पाच लाख वर्षे माणूस भटक्या होता. त्याशिवाय अन्न संपादन करता येत नव्हते. स्थिर वसतिस्थान, शेती, बागायत चांगली जमली तेव्हा तो स्थिरावला. या गोष्टीला फार थोडी म्हणजे सहा-सात सहस्र वर्षे झाली. कदाचित त्यापेक्षा दुप्पट. परंतु देहाची रचना सुदृढ निरामय राहण्यासाठी फिरण्याशिवाय गत्यंतर नाही. वाईत मी योग-व्यायाम करतो. फिरणे कमी केले तेव्हा हातपाय दुबळे होऊ लागले. येथे आल्यावर योग (प्राणायाम व आसने) आणि चरणयोग (फिरणे) हे दोन्हीही चालू केले. इंदूच्या नियमित व्यायामसरावामुळे तिची प्रकृती कशी निकोप राहिली आहे," असे म्हणून त्यांनी पत्र संपवले.

आबा आणि मी १९८६ साली अमेरिकेत पाठोपाठच गेलो होतो. आम्ही वेगवेगळया गावी होतो. पण पुढे एक आठवड्यासाठी अबा 'सॉल्ट लेक सिटी' मध्ये आले. तेव्हा 'शुगर हाऊस पार्कात' अशोक खंडकर अगर अशोक जोशी आम्हाला फिरण्यासाठी सोडून पुढे कामावर जात. त्यानंतर दीड-दोन तासांनी सुरेखा जोशी आम्हाला नेण्यास येई. आबा मला म्हणायचे की, तू ज्या तऱ्हेने चालतेस त्यावरून तुझी प्रकृती उतारवयात निरोगी राहील. मी तुला प्राणायाम शिकवतो. मी 'हो' म्हणायची. विद्यार्थी उत्सुक नसेल तर शेवटी काय उपयोग? प्राणायाम जरी नाही तरी त्यांनी सांगितलेला मनुस्मृतीतील त्या संदर्भातील एक

श्लोक मला येऊ लागला -

**दह्यन्ते ध्यायमानानां धातुनां हि यथा मलाः।**
**तथेन्द्रियाणां दह्यन्ते दोषाः प्राणस्य निग्रहात्॥**

विश्वकोश निर्मिती मंडळ साहित्य संस्कृती मंडळापासून स्वतंत्र झाल्यावर, १९८० नंतर मंडळाच्या समस्यांसाठी, बैठकींसाठी आबा मुंबईच्या कार्यालयात जात. एरवी त्यांच्या कार्यक्रमासाठी बाहेर पडेपर्यंत ते घरीच असत. माझ्याबरोबर चहा झाला की सकाळी ते फिरण्यासाठी बाहेर पडत. निघताना, मी कधी परतणार ते विचारून, 'मी टोस्ट करून घेईन. तू चिंता करू नकोस' हे आवर्जून सांगत. मी घरी आल्यावर, "आज जेवणात काय करणार?'' असे विचारत. मी फोडणीत काय घालते हे बघत. मग पुढच्या वेळी वाईला आलीस की, सावित्रीला आपल्या पद्धतीचे आंबट वरण करावयास शिकव म्हणून सांगायचे. मला स्वयंपाक यावयास हवा होता. तुझ्या आईने कधी शिकवला नाही. पाश्चात्त्य पुरुष स्त्रीच्या बरोबरीने स्वयंपाकघरात काम करतो. तेव्हा आपल्याला हे यावयास हवे असे वाटते. अमेरिकेतील सफरीमध्ये 'फास्ट फूड' सर्व्हिस देणारी अनेक हॉटेल्स त्यांच्या बघण्यात आली होती. त्यातील लहानमोठ्यांना आवडणारी म्हणजे 'पिझ्झा हट्स'. आबा तिकडे काही वेळा गेले होते. पिझ्झा त्यांना विशेष आवडला नाही. पण इकडे जेव्हा मंत्रालयाच्या वाटेवर अनेक प्रकारच्या फास्ट फूडच्या जाहिराती दिसत तेव्हा ते 'फास्ट फूड काय आहे हे एकदा बघू या, अमेरिकेत असते तसे असेल तर मला स्वतंत्र राहता येईल.' अमेरिकन जीवनात कोणी ओळखीचे भेटल्यास आलिंगनाने वा हस्तस्पर्शाने अगर ओठ-स्पर्शाने अभिवादन करण्यात येते याची त्यांना गंमत वाटे. आपल्याकडील शक्यतो स्पर्श टाळण्याची प्रवृत्ती, त्यातून जाणवणारे दूरत्व यापेक्षा पाश्चात्त्य पद्धत अकृत्रिम असल्याचे त्यांचे मत होते. पाश्चात्त्य घरात आढळणाऱ्या यांत्रिक सुखसोयी आपल्याकडे यायला हव्यात असे त्यांना वाटे. उत्साह, औत्सुक्य, कौतुक यात आबा रतीभरही कमी नव्हते. 'प्रौढत्वी निज शैशवास जपणे', हे त्यांच्या बाबतीत प्रत्ययाला येई.

मला भाज्या नीट करण्यात विशेषतः मटार, घेवड्याच्या शेंगा सोलण्यात, मक्याची कणसे किसण्यास आबा मदत करीत, जेवणातील सर्व रसांचे मनापासून त्यांना कौतुक होते. आमटीच्या वाटीत कधी त्यांनी ताक घेतले असे झाले नाही, तर प्रत्येकाच्या ताटाच्या बाजूला त्यासाठी ग्लास ठेवणे त्यांना आवडत होते. जेवणासाठी टेबल तयार करण्याची ते गडबड करीत. 'अनेक इंद्रियांवर नियंत्रण जमले तरी या जिभेवर मला बंधन घालता येत नाही. अजून सर्वच पदार्थ आवडतात ते पुढे आले की, हात पुढे सरसावतोच' असे हसून आबा सांगत.

दुपारची थोडी वामकुक्षी बसल्याबसल्या घेऊन माझ्या खोलीत दारापाशी उभे राहून म्हणत, "का गं, तुला दुपारच्या झोपेची सवय नाही ना? त्या सवयीने लठ्ठपणा येतो." मी

नाखुशीने उठून चहा करावयास सुरुवात करून मग दोन-तीन तास वेगवेगळया विषयांवर त्यांच्याशी बोलत असे. माझे तत्त्वज्ञानातील प्रश्न त्यांना बाळबोध वाटायचे व मी एम.ए.ला सध्याचे पाश्चात्त्य तत्त्वज्ञान शिकवते म्हटले की, हाताने त्यात काही विशेष नाही असे म्हणत. मग चट्दिशी उठून माझ्या पुस्तकांच्या शेल्फवरील पुस्तक काढून कांट आणि हेगेलच्या सिद्धान्तांचे कौतुक करून रसेलपर्यंत येऊन पोहोचायचे. रसेलच्या आकारिक तर्कशास्त्राचे (Symbolic Logic) त्यांना फारसे कौतुक नव्हते. माझ्या एखाद्या पुस्तकाची बांधणी सैल पडली तर ती दाखवून ते पुस्तक वाईला नेत व पुढील मुंबईच्या खेपेत प्राज्ञपाठशाळेच्या प्रेसमधून त्याची पुनर्बांधणी करवून घेऊन इकडे आल्यावर जाग्यावर ठेवत.

त्यांचे मला म्हणणे की, तू व्यासंग वाढवला नाहीस आणि लिहिण्याचीही सवय केली नाहीस. कॉलेजात जेव्हा गांधीवादावर एक नवा विषय सुरू केला तेव्हा मी त्याविषयी अनेक पुस्तके वाचल्यावर म. गांधींवर आपण काही लिहावे म्हणून लिहिण्यास सुरुवात केली. तो लेख बाहेरच बैठकीच्या खोलीत राहिला होता. आबा सकाळी पुण्याला निघणार होते. घरी आल्यावर माझ्या लेखाच्या खाली अबांच्या हस्ताक्षरात मजूकर होता, ‘‘तुझा गांधींवरील लेख चांगला जमला आहे. अर्धाअधिक शब्दशः वाचला. त्यांच्या अर्थशास्त्राबाबत काही सूचना करावयाच्या आहेत. त्या पुढल्या भेटीत करीन.’’ त्या दिवशी वाईला पोहोचल्यावर त्यांनी फोनवर तसेच सांगितले.

माझ्या व्यक्तिगत जीवनातील काही घटनांमुळे मी कोसळण्याची  पाळी आली होती. माझे पती श्री. खंडकर एकाएकी १९८३ साली वारले. सती तर आधीच गेलेली. आबा माझी 'माय' बनले. त्यांनी माझ्याकडील मुक्काम वाढवत नेला. मी कशी सावरते हे ते शांतपणे पाहात. कॉलेजमध्ये मला सोडण्याची काही दिवस त्यांनी व्यवस्था केली होती. तीन-चार महिन्यांनी मी इगतपुरीला 'विपश्यना केंद्रा'त मनःशांतीसाठी जाणार आहे असे त्यांना म्हटले. त्यांचे सांगणे होते, 'शांती मनात नांदावी लागते; कितीही शांत भागात जाऊन बसले तरी मनाची अस्वस्थता जात नाही. तू रोजनिशी लिही. मनात जे जे विचार येतात ते टिपत जा. अशा दुःखतप्ततेतून मोठे साहित्य निपजू शकते.' मला पुनः ताठपणे उभे राहता आले ते त्यांच्या जागरूक आधाराने. त्यांनी आपल्या भावनांचा उद्रेक होऊ दिला नाही. माझ्या बारीकसारीक गोष्टींत त्यांनी रस घेऊन अजूनही कसे संपन्नतेने जगावे हे दाखविले.

माहीमच्या माझ्या राहत्या जागेबाबत कोर्टात खटला चालू झाला होता. आबा म्हणाले, "तुला ही स्वतःची मोठी जागा असताना, भाड्याच्या जागेवर कसा हक्क ठेवता येईल? हे नैतिकदृष्ट्या योग्य नाही. माझे सांगणे होते की, वकिलापासून प्रत्येकजण, ही जागा हातची जाऊ शकत नाही, असे मला सांगताहेत. कोर्टात एवढी दिरंगाई असते की, खटला सुरू झाल्यावर कोर्ट घोर निद्रेत राहते. दरम्यान दुसऱ्या कोणाला जागा हस्तांतरित करून निदान पैसे करावे असे अनेकजण सुचवीत. अबा उठले आणि मला एका रॉयवादी वकील मित्राकडे

(ॲड. काणे) घेऊन गेले. त्यांचे व आबांचे म्हणणे एकच होते. ते खरे ठरले. माझ्यावरील खटल्याच्या वेळी कोर्ट जागृत राहिले. मी हरले.

माझा वडील मुलगा जन्मला तेव्हा एक शारीरिक अडचण घेऊन जन्मला. मला माझ्या खोलीत काही वेळाने आणल्यावर माझ्यासमोर आबा, अप्पा शांतपणे बसलेले दिसले. त्यांच्या देखत डॉक्टरांनी माझ्या कानावर ती बातमी घालून ते बाहेर पडले. अबांनी मला शोक आवरायला सांगितले. पुढील दोन दिवस मी अस्वस्थ राहिले. आबा फिरकले नव्हते, मी सर्वांचा विरस केला असे वाटले. पण नंतर आबा आले. ते मुंबईला जाऊन डॉ. इंदुताई पारिखांना भेटून आले होते. बरोबर इंदुताईचे पत्र व सोबत इंडियन मेडिकल जर्नलमधील काही पाने होती. त्यात अशोकच्या अडचणींवर सहज उपाय असून मुंबईत कोणते शल्यविशारद कोणत्या ठिकाणी शस्त्रक्रिया करतात याची माहिती होती. मी निर्धास्त झाले.

अशोक पुढील शिक्षणासाठी अमेरिकेत गेला. त्याच्यापेक्षा चौदा वर्षांनी लहान असलेला अजय आबा-सतीपाशी तीन वर्षे वाढला. विश्वकोशाच्या लिखाणासाठी आलेल्या अनेकांच्या सहवासात अजय वाढत होता. त्याचे बोलणे जरा भारदस्त शब्दांनी युक्त असे. तो 'सकाळ आहे का?' असे न विचारता, ‘सूर्यनारायण उगवला का?’ असे विचारत असे. त्याच्या भाषेवर आबा खूष होते. त्याच्यासाठी दुधाची बाटली तयार करणे, त्याला त्याच्या हट्टासाठी वेळीअवेळी घाटावर फिरवून आणणे आबा सहज आनंदाने करत. अजय त्यांचा चश्मा ओढू लागल्यावर मी म्हणत असे, 'द्या एक चापट ठेवून.’ ते फक्त त्याचा हात पकडून ठेवायचे. मग दोघांचे खुदुखुदू हसणे सुरू होई. मुले पालकांचे अनुकरण करतात असे आबांचे म्हणणे असे. आबांची मते कधी कोरडा उपदेश वा रुक्ष सिद्धान्ताच्या रूपाने मांडली जात नसत. त्याबरोबर एखादे चटकन पटणारे कथानक येई. यासाठी त्यांनी उत्तमोत्तम अश्व घ्यावयाचे आणि त्यांना प्रशिक्षित करून दौड करणाऱ्या राजाची गोष्ट सांगितली. नीट पारख करून एका सौदागराकडून या राजाने अश्व खरीदला. त्याच्यासाठी चांगला अश्वशिक्षक निवडला. काही काळाने राजा त्या घोड्याचे कौशल्य पाहण्यासाठी गेल्यावर राजाच्या लक्षात आले की, तो घोडा एका पायाने थोडा लंगडतो. तेव्हा त्याने अश्ववैद्याकडून घोड्याची चांगली परीक्षा करविली. त्याच्यात काहीच दोष नव्हता. मग एकाएकी राजाला उमगले की, अश्वशिक्षकाची एका पायाला मुडपून चालण्याची सवय होती. घोडा ते अनुकरण करी. आबांची मते युक्तीने टाळण्याचा त्यामुळे आम्हाला कधी प्रयत्नच करावा लागला नाही. पुढे अजयला शिकवणी चालू होती. तो फक्त मुसूमुसू रडत होता. शिक्षिका गेल्यानंतर आबांनी माझी चांगली खरडपट्टी काढली. ते म्हणाले, ‘‘मानसशास्त्र वाचतेस पण पॅव्हलावचा साधा सिद्धान्त कसा लक्षात येत नाही? ज्या शिक्षण घेण्यात आनंद नाही ते शिक्षण कसे होणार?’’

आबांचे अजयच्या विकासावर सतत लक्ष होते. अजयच्या खोलीतच ते मुख्यतः असत. अजय रात्री उशिरापर्यंत टेबलावर अभ्यास करत बसे. निजताना प्रकाशाचा त्यांना त्रास होत

नाही असे त्यांचे म्हणणे असे. सकाळी मला सांगायचे की तो आता चांगली मेहनत घेतो. त्याची आणि आबांची मजेशीर गट्टी असे. आबा बाहेरून आले की, तो त्यांना मिठी मारून, 'काय चिरंजीव' असे म्हणे व त्याच्या मिठीतून ते हळूच हसत बाहेर पडत.

वाईच्या घरात अलीकडची करमणुकीची कोणतीही साधने नव्हती. तेथे १९६७ साली प्रथम रेडिओ आला. तेव्हा आबांची रेडिओवर होणारी भाषणे आम्ही ऐकत असू. दूरदर्शन हे फारच दूरवर होते. माझ्याकडे १९८० साली दूरदर्शन संच आला. आबा बातम्या ऐकण्यासाठी बाहेर येऊन बसत. अधूनमधून चित्रपट चालूच असला तर थोडा वेळ रेंगाळून आत जात. हिंदी चाकोरीतील चित्रपटात मालकाने नोकराच्या थोबाडीत मारणे, भावाने भावाच्या वा पतीने पत्नीच्या वा करारी आईने नालायक मुलाच्या श्रीमुखात लगावणे अशी दृश्ये अनेक. आबा म्हणत, 'ही कोणती संस्कृती दाखवतात?' त्यांना आम्ही ऑस्कर विजेत्या 'क्रेमर व्हर्सस क्रेमर' व 'गॉड फादर' भाग दुसरा, या चित्रपटांना घेऊन गेलो. पहिल्यात थोडी नग्नता सूचकपणे होती आणि दुसऱ्यात अनेक नातेवाईक व जिवलगांचे खुबीदारपणे केलेले हत्याकांड, दोन्ही बोलपटांनी मनावर मोठा प्रभाव पाडला. प्रतिक्रियेसाठी आबांकडे पाहिले. ते म्हणाले, ''उत्तम चित्रपट आहेत. 'ऑस्कर'साठी असलेली निवडसमिती खरोखरच योग्य निर्णय देते.''

आबांनी मोजकेच चित्रपट पाहिले. त्यातील एक 'राम जोशी'. अबांनी तो दोन वेळा पाहिला. त्या काळी चित्रपट गाण्यांची पुस्तके मिळत. त्यांतील लावण्यांच्या सवाल जबाबांना ते दाद देत होते. घरात त्याविषयी चर्चा होत असे. मला वाटायचे तर्कतीर्थ असलेले आमचे आबा, लावण्यांत कसा काय रस घेऊ शकतात! 'ब्रँडीची बाटली' हा अत्र्यांचा चित्रपट, १९४० च्या सुमारास फार गाजला, तो अनेक कारणास्तव. अत्रे पुण्याच्या आमच्या चिमणबागेतील घरात येऊन जात. आबांशी चर्चा करत. पुढे आम्हाला त्या सिनेमाचे पासेस आले. आम्हाला खूप आनंद झाला. या चित्रपटामुळे महाराष्ट्रातून विशेषतः पुण्यातील पुराणमतवाद्यांनी- त्यात श्री. म. माटे, कृष्णराव मराठेही होते - निषेधसभा घेण्यास सुरुवात केली. अत्र्यांच्या बाजूने, पुरोगामी गटाचे नेतृत्व आबांकडे आले. 'ब्रँडीच्या बाटली'चे समर्थन करण्यास काकासाहेब गाडगीळ, काकासाहेब लिमये, धुंडिराजशास्त्री विनोद, व्ही. शांताराम, मास्टर विनायक त्या सभेस आले होते. आबांनी जाहीर केले की, बुद्धी या मापदंडाने, भावनांच्या काहुराने नव्हे, ही चर्चा होईल. 'बँडीच्या बाटली'तील कृष्णाचा उल्लेख बदनामीकारक नाही. महाभारतातील कृष्ण हा रसिक वृत्तीचा आहे. त्याला तसेच दाखवण्याने त्याच्या पावित्र्याचे विडंबन होत नसून उलट तसे दडवण्याचा प्रयत्न हास्यास्पद ठरतो. आबांच्या तेव्हाच्या भाषणात 'सेक्स' व शृंगाररसाचे प्रतिपादन आले. त्यांच्या भाषणास उत्स्फूर्तपणे टाळ्या व हशांचा प्रतिसाद लाभला होता. आबा बोलावयास उभे राहिले की, ते सभा जिंकणार याविषयी कोणाचे दुमत नसायचे.

आबांच्या नजरेतून काहीही बारीकसारीक गोष्टी सुटत नसत. पण काही गोष्टी अप्रिय असतील तर त्याविषयी ते उघड नापसंती दाखवत नसत. कोणावर डाफरणे, कडक शब्दांत हजेरी घेणे वा अपमान करणे हे त्यांच्या स्वभावाशी विसंगत होते. पण त्याविषयी आग्रहाने छेडले तरच ते मत देत. त्यांचे सांगणे असे- 'अक्रोधेन जयेत् क्रोधम्', दुसरा रागावला तरी आपण रागावू नये. बुद्धाने सांगितलेल्या पारमिता त्यांच्या स्वभावात उतरल्या होत्या. त्यांच्या व्याख्यानात समर्पकपणे ते त्या मांडत असत. त्यांच्या कट्टर विरोधकांवरही त्यांनी सहसा आपणहून वैचारिक हल्ला केला नाही. 'रिडल्स इन हिंदुइझम्' हे डॉ. आंबेडकरांचे लिखाण महाराष्ट्र सरकारने १९८९ मध्ये प्रसिद्ध केले. त्याच सुमारास व्ही. पी. सिंग प्रधानमंत्री असताना त्यांनी बारदानातून मंडल कमिशनच्या अहवालानुसार तरतुदी करण्याची १९९० साली घोषणा केली आणि १९९२ मध्ये 'नामांतर'च्या चळवळीने जोर केला. या प्रत्येक वेळी सामाजिक, वैचारिक वावटळीत आबा केंद्रस्थानी होते. त्या अस्थिर सामाजिक परिस्थितीतदेखील आबांनी खंबीरपणे त्यांची मते मांडली, व्याख्याने दिली, मुलाखती दिल्या. त्यांच्याविरुद्ध काहूर माजूनही आबा विचलित झाले नाहीत. अस्पृश्यता निर्मूलनात एकेकाळी पुढाकार घेतलेल्या आबांनी सद्यः परिस्थितीत या नव्या उपक्रमांची विफलता मांडली. स्वतःच्या बुद्धीने दिलेला कौलच त्यांनी योग्य मानला. इतरांबाबत 'तितिक्षा' या दोषांकडे दुर्लक्ष करणे हे त्यांनी योग्य ठरविले.

मधुकरचे व माझे घनिष्ठ संबंध १९६० सालानंतर काही वर्षे शिथिल झाले होते. मधुकरने परस्पर त्यांना आमचे नाते दुरुस्त करण्यास मध्यस्थीची गळ घातली होती. आबांनी त्यावर कधी भाष्य केले नाही. त्यांनी आमच्या अंतःप्रेरणांवर ते सोडून दिले. झाले ते एकपरीने ठीक झाले. कारण पुनः दृढ झालेले बंध कृत्रिमतेचे वा औपचारिकतेचे नव्हते. निकटवर्तीयांच्या काही नापसंत आचरणातही हा स्वभावधर्म त्यांनी टिकवून धरला. बरं, त्यात आपण मोठे सोशीक असल्याचा आविर्भावही नव्हता. हा गुण की दोष?

अशाच एका प्रसंगाची आठवण झाली. अबांची एक रोजनिशी चाळताना त्यातही हा प्रसंग त्यांनी टिपला होता. मे. पुं. रेगे हे गेली पंचवीस वर्षे त्यांना अनेक दृष्टींतून समीप होते. वैचारिक जीवनातही त्यांमध्ये समानता होती. रेगे संस्थेचे तेव्हा उपाध्यक्ष, 'नवभारत'चे संपादक, धर्मकोश व विश्वकोश संपादनातील मदतनीस म्हणून आबांच्या नजीक होते. १९८३ साली रिचर्ड अटेनबरोने दिग्दर्शित केलेला 'म. गांधी' रीगलमध्ये दाखल झाला. त्याविषयी वाचताना तो पाहावा असे आम्ही ठरविले. दिवस, वेळ ठरवली गेली. रेगे म्हणाले, की माझी पत्नी तिकिटे काढेल, तुम्ही तिला वांद्र्याहून घेऊन या. मी परस्पर येतो. आबा, अजय आणि मी साहित्य सहवासमध्ये गेलो. तेव्हा मिसेस रेगे तिकडे आधीच गेल्याचे कळले. आम्ही रीगल थिएटरमध्ये चार वाजता सुरू होणाऱ्या खेळासाठी गेलो. राम कोल्हटकर ऑफीसमधून परस्पर येऊन आमची वाट पाहात होते. आम्ही खेळ सुरू

झाल्यावर पाच वाजेपर्यंत थिएटरबाहेर रेंगाळलो. मी डोअरकीपरकडे आमच्यासाठी कोणी तिकिटे दिली का म्हणून पुनःपुन्हा चौकशी केली. आबा म्हणाले, ‘चला निघू या.’ वाटेत आम्ही नेहरू तारांगणाकडे जाऊन आलो. शिवाजी पार्कला अण्णांकडे (आबांचे बंधू) थांबून चहा वगैरे घेऊन परतलो. दुसऱ्या दिवशी अबा वाईस परतणार होते. तिकिटे कोठे होती, ती न मिळाल्यास कळवले का नाही याविषयी त्यांनी रेग्यांना कधीही विचारले नाही. अपेक्षाभंगाचा थोडा विषाद काही दिवस माझ्या मनात रेंगाळला. पण या प्रसंगाने त्यांच्या स्नेहात अंतर व कटुता आली नाही हे मात्र खरे.

राम कोल्हटकर हे आबांचे निजी सहायक. आबांच्या व्हिजिटिंग कार्डावर दुसऱ्या बाजूला माझा पत्ता व फोन नंबर असे. त्यांचे मुंबईत वारंवार कार्यक्रम असत. कार्यक्रम जवळ आला की, नियोजकांचे फोन माझ्याकडे सुरू होत. यावरून रामचे व माझे खटके उडत. माझे म्हणणे असे की, तुमचे कार्यक्रम मला नीट कळवत जा, म्हणजे मला उत्तर द्यायला बरे पडते. आबा रामला काहीच म्हणत नसत, उलट मला म्हणत, 'आपला माणूस म्हटले की तो गुणदोषांसकट स्वीकारावा लागतो.' आबांच्या नजरेत रामचे पारडे जड तर सुमन नको त्यापेक्षा अधिक आग्रही आहे झालं.

बापूराव नाईक हे आबांचे चांगले मित्र. ते वाईच्या संस्थेच्या मंडळावरही होते. ते ८९च्या शेवटी आजारी पडले. त्यांच्या भेटीला आम्ही अनेक वेळा घरी व काही वेळा हॉस्पिटलमध्येही जात असू. वाईला ३१ डिसेंबरला मी रेडिओवर त्यांच्या निधनाचे वृत्त ऐकले. आबा अंघोळीला गेले होते. मी कोल्हटकरला फोन करून बातमी दिली म्हटले, "आपण बापूरावांना त्यांच्या आजारात वरचेवर भेटतच होतो तेव्हा घाईने निघण्यात अर्थ नाही. पुढच्या आठवड्यात- मुंबईला येत आहात तेव्हा सांत्वनाला घरी जाऊच." पण कोल्हटकर व अबा यांनी मुंबईला लगेचच निघण्याचा बेत केला. दुसऱ्याच दिवशी अचानक आणि प्रथमच आबांचा रक्तदाब वाढला, आबा वाईच्या वाटेवर असणार म्हणून मी रेंगाळत घरी परतले तर आबांचे आजारपण कळले. पंधरा दिवसांची सक्त विश्रांती घेऊन आता मुंबई सोडण्याची वेळ आली. पण आदल्या दिवशी संध्याकाळी, त्यांचे रॉयवादी, वयस्कर, एक वकील मित्र श्री. फडके यांच्या कादंबरीच्या प्रकाशनाला आबा-कोल्हटकर निघाले. मीही बरोबर निघाले. तत्पूर्वी मी त्यांना विनवत होते की, इतक्यात सार्वजनिक कार्यक्रमाला जाऊ नये. समारंभाच्या निमित्ताने ठेवलेल्या चहापानाबरोबर बटाटेवडा वगैरे पदार्थ असतात, सध्या ते आबांना वर्ज्य आहेत. पण त्यांनी जायचेच असे ठरवल्यामुळे मी गप्पच आणि कोल्हटकरही रुष्ट. आबा मला म्हणाले, "तू रामवर डाफरू नकोस. माझ्या मनाविरुद्ध माझ्यावर कोणी सक्ती करू शकत नाही. हे मिळणे मिसळणे मलाच हवे असते."

नवे शब्द रूढ करणे आबांना सहज जमे. 'सचिवालयाचे' 'मंत्रालय' त्यांच्या सल्ल्याने झाले. ‘सचिवालयाच्या’ नव्या नामकरणामुळे महाराष्ट्र टाइम्सकरांना २०.९.१९७६ रोजी

एक अग्रलेख लिहावा लागला- शास्त्रीबोवांची गफलत. लोकसत्तेत डॉ. ग. मा. पाटील यांनी भाषा सल्लागार मंडळाचा सल्ला न विचारता तर्कतीर्थांसारखा मोलाचा मोहरा यासाठी खर्च केल्याबद्दल खंत व्यक्त केली. यावरून वृत्तपत्रात त्यांची थट्टा व व्यंगचित्रे पण येऊन गेली. १९८० नंतर प्रकाशन समारंभाची त्यांना आमंत्रणे असत. 'पुस्तक-विमोचन' हा शब्द त्यांनी रूढ केला. पाच-सहा वर्षांपूर्वी सकाळी चहाच्या टेबलावर बसलो तेव्हा त्यांनी विचारले, ''का गं, तुझी रजोनिवृत्ती झाली का?'' हा शब्द मला नवा होता. मला अर्थ कळायला काही सेकंद जावे लागले. वासुदेव चहासाठी आत शिरत असता, मला म्हणाला, 'त्यांना माहिती आहे तू कधी रिटायर होणारे ते, मग पुनः कशाला प्रश्न विचारतात?' मग त्यांच्या प्रश्नाचा अर्थ मी त्याला समजावून दिला. वासुदेव मान डोलवत म्हणाला, 'वा! काय छान शब्द आहे!'

त्यांचे नवीन गोष्टींबद्दलचे कुतूहल कायम राहिले. साधारणतः वाढत्या वयाबरोबर ते झपाट्याने कमी होऊ लागते. पारंपरिक त्यांच्या अभ्यास व मननातून त्यांच्या विचारांची पक्की बैठक होऊनही ज्ञानाच्या नव्याने विस्तारणाऱ्या क्षेत्रांकडे त्यांचे मन झेपावत असे. अमेरिकेच्या दोन भेटींतून त्यांनी पाठीवर भलेमोठे ओझे वाहून आणलेले ग्रंथ म्हणजे कार्ल सेगनचे 'गार्डन ऑफ इडन', 'कॉसमस', रिचर्ड मारिसचे 'टाइम्स ॲरोज', अर्थर कंपलानचे 'दि सोशोबायॉलॉजी डिबेट' वगैरे. मधुकर हा व्यवसायाने अभियांत्रिक राहिला तरी सतत विविध विषयांचे वाचन करणारा. त्यांच्या ग्रंथसंग्रहालयातील आधुनिक ज्ञानविज्ञानाने भरलेले ग्रंथ पाहून ते भारावून जात.

पीएच. डी. च्या प्रबंधासाठी आबांचे मार्गदर्शन घेण्यासाठी वाईत आलेली एक महिला म्हणजे मेरी मग्गी. ती आता हार्वर्ड विद्यापीठात शिकवते. तिने आबांना हार्वर्डला 'व्रत' या विषयावर भाषणासाठी बोलावून घेतले. तेव्हा १९९० च्या वास्तव्यात त्यांनी मला लिहिलेल्या एका पत्रात खंत व्यक्त केली होती, "मला क्वांटम मेकॅनिक्स (पुंजयामिकी) यावयास हवे होते. त्याशिवाय विश्वरचना, विश्वोत्पत्ती, विश्वाकार कसा कळणार? आइन्स्टाइनचा सापेक्षवाद आता समजणार नाही. विज्ञानरहित तात्त्विक आधारावर आधुनिक ज्ञानविज्ञान संस्कृतीच्या माणसास विश्वरचना मी कशी समजावणार?"

पुस्तकांच्या जगात आबा तासन् तास घालवत. त्यांच्या अभ्यासिकेत इतिहास, धर्म, संस्कृती, तत्त्वज्ञान, जगप्रसिद्ध चित्रकर्त्यांचे कलेविषयक निवडक ग्रंथ होते. ते नेमके हवे ते काढत आणि पुनः जाग्यावर ठेवत. त्यांची व्यवस्था उगीचच बिघडवली तर त्यांना ते कळे. त्याच ठिकाणी औपचारिक भेटीसाठी येणाऱ्या मंडळींना ते भेटत. अलीकडे आमच्या वाईच्या वास्तव्यात अजयही येथे पडलेल्या ग्रंथांत आणि महागड्या विज्ञानविषयक नियतकालिकांत डोके घालून बसायचा. तो विचारे, ''आजोबा, 'विल' करणार असाल तर पुस्तके तेवढी मला द्या.'' ते म्हणायचे, ''हे तुमचेच आहे. आत्ताही घेऊन जा.'' नित्याच्या प्रवासात पुस्तकांनी भरलेली एक स्वतंत्र बॅग असे. त्यात रोजनिशी व कर्णेन्द्रिय- (हिअरिंग

एड) हा त्यांचाच शब्द- या व्यतिरिक्त आणखी काही नसे. ती भरणे व मोकळी करणे हे काम त्यांनी इतर कोणाला करू दिले नाही.

वाईला संस्थेच्या परिसरातील राहात असलेल्या या घरासमोर प्रशस्त फरशी घातलेला भाग येई. त्याच्या मधोमध आंब्याचे दाट सावली देणारे झाड. जवळपास नारळ, पेरू, सिताफळे, चिकू या व्यतिरिक्त अनेक प्रकारची फुलझाडेही असत. आबांचे त्या सर्वांकडे लक्ष असे. झाडांवर फुले, फळे, केव्हा धरतात, येणारे पक्षी कोणते, यांवर त्यांचे बारकाईने लक्ष असे. माझे लग्न झाल्यावर एकदा श्रावणात मी वाईत होते. तेव्हा सोनटक्का, अनेक रंगांनी फुललेले तेरडे होते. कर्दळीची व कांचनची झाडे बहरात होती. सकाळी बागेत चक्कर मारताना त्यांनी एक मोठी टोपली घरातून नेली. त्यात भरभरून फुले काढली. घरात येऊन सतीला म्हणाले, "तू हिची मंगळागौर करून टाक. आयत्या वेळी मंगळागौर पुजायला आणखी नवविवाहिता कोण मिळणार! मग दोनतीन घरी निरोप पाठवून माझ्या बरोबरीच्या मुलींना सतीने बोलाविले. सवयीप्रमाणे त्या दिवशी आबांनी मंडईतून अधिक भाज्या आणल्या व दुपारचे विशेष जेवण मोठ्या कौतुकाने ते जेवले. काही धार्मिक ग्रंथांची अचानक मध्येच आठवण येत असे. अशोकची, माझ्या वडील मुलाच्या मुंजीची तयारी सती करणार होती. पण सती गेली. मग त्याचे अमेरिकेत जावयाचे ठरल्यावर आबा त्याला म्हणाले, ‘‘अरे, आजी तुझी मुंज करणार होती, आता तू निघालास. मी सर्व तयारी करून घेतली तर तू वाईला येशील का?’’ मग वयाच्या तेविसाव्या वर्षी अशोकची मुंज वाईला केली गेली. आम्ही दोघे दोन दिवस पाहुण्यासारखे गेलो.

आबांचे संस्थात्मक जीवन हे जसे विद्वानांना आकर्षित करत असे तसे राजकीय स्पर्धेतील नेत्यांनाही तेथे भेट द्यावयास आवडत असे. त्या नेत्यांच्या अवतीभवती असणारे इतर मान्यवर यांचे नेहमी येणेजाणे चालू होते. नागपूरचे स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतलेले पक्के गांधीवादी हरिभाऊ मोहनी, शंकरराव देव गांधींच्या आश्रमातील एक साधे कार्यकर्ते बाबा फाटक, बेळगावचे उंच भारदस्त पुंडलिकजी कातगडे, भय्याशास्त्री वाटवे ही मंडळी सहज महिना-दीड महिना राहून जात ते घरी, संस्थेचे पाहुणे म्हणून नव्हेत. या सर्व खादीधाऱ्यांसाठी सतीला गायीच्या तुपाची व्यवस्था करावी लागे. गोशाळेतून असे तूप न मिळाल्यास किंचित चुटकीभर हळदीने साजूक तुपाचे रूपांतर गायीच्या तुपात होताना ती फक्त नजरेने आम्हाला याबाबत आळीमिळी गुपचिळी सांभाळण्याचा हसत इशारा करत असे. कुटुंबातील वेगळा खाजगीपणा आम्हाला अपरिचित राहिला. बाहेरच्या मंडळींच्या आगत-स्वागताची कायम सिद्धता असे. सती स्वतः प्राज्ञ पाठशाळेतील इतरांच्या सहकार्याने उत्साहाने ते सांभाळत असे. त्यामुळे आम्हा सर्वांना स्वादिष्ट खाण्यापिण्याची सवय जडली होती. आल्यागेल्याचा कंटाळा त्यांनी कधी अनुभवला नाही. घरात नेहमीच प्रसन्न व खेळकर वातावरण. आबांना घरदार, सोनेनाण्याचा लोभ नव्हता. त्यांना माणसांबद्दलचा लोभ मात्र भरपूर.

शाळेत निघताना मैत्रिणींना हाका मारून, त्या तयार होईपर्यंत थांबून आम्ही एकत्र शाळेत जात असू. त्यांतील कितीतरी जणींचे घर, जमीनजुमला असे. विशेष प्रसंगी त्यांच्या हातात सोन्याचे बिलवर, गळयात साखळी वगैरे अलंकार असायचे. आमच्या घरात सतीजवळही हे अलंकार नव्हते, तरीही घरच्या मोकळया वातावरणामुळे आमच्या चेहऱ्यावर हसू नेहमीचे. आम्हाला लहानपणापासून आपले घर चारचौघांपेक्षा वेगळे व सुंदर आहे असे वाटे. आभूषणांचे महत्त्व कधी जाणवलेच नाही. घरात धार्मिक कर्मकांडे झाली नाहीत. सोवळयाओवळयाचे इतरांच्या घरातील वातावरण पाहून आम्ही गोंधळून जावयाचो. दानशूर मंडळींच्या व सरकारी अल्प देणग्यांवर चालणाऱ्या या संस्थेतील तळमळीने काम करणाऱ्या मंडळींचे वेतन अल्प होते. आबांना अध्यक्ष म्हणून रु. ३५०/- वर्षानुवर्षे मिळत. पण घरी कधी ओढग्रस्त दिसली नाही.

घरातील जेवणे कधी निमूटपणे एकमेकांशी न बोलता झाली नाहीत. कोणत्या ना कोणत्या विषयावर गप्पा होत व जेवलेले हात पार सुकून जात. एकदा वाईला दुपारचा चहा चालू असताना बाजूला पडलेल्या मर्ढेकरांच्या कविता वाचावयास सुरुवात झाली- ‘पिपात मेले ओल्या उंदीर, माना पडल्या मुरगळल्याविण’ व नंतर 'तू एक मुंगी, मी एक मुंगी.' आबांना मी म्हटले, ‘‘याला कविता का म्हणायचे?’’ तोपर्यंत अत्र्यांनी संपादित केलेल्या अरुण वाचनमालेतील व ‘पाच कवींतील’ केशवसुत, बालकवी वगैरेंच्या कविता तोंडपाठ करण्याची आमची सवय होती. अबा फक्त हसले. काही दिवसांनी अबांचा सत्यकथेत प्रसिद्ध झालेला लेख माझ्या वाचण्यात आला. त्यात त्यांनी मर्ढेकरांच्या काव्यावर टीका केली होती. “नव्याने निर्माण होणाऱ्या कवितेत वेडाविद्रा, नागडाउघडा व शिथिलगात्र माणूस दाखविला जातो. मर्ढेकरांच्या कवितेत ‘‘विदीर्ण, शीर्ण अस्ताव्यस्त झालेले, ठिकऱ्या उडालेले, चिंध्या झालेले आधुनिक मानवाचे अंतःकरण दाखवले आहे. एका हातात तलवार तर दुसऱ्या हातात ढाल असणारा मी लढू कसा, म्हणून विचारणारा रडतराऊ नव्या युगाचा प्रतिनिधी कसा मानावयाचा?’’ असा प्रश्न त्यांनी त्या लेखात विचारला होता. त्यांच्या मते कवीला प्रथम जीवन जगण्याची कला हस्तगत व्हावयास हवी. मन आणि बुद्धीच्या जोरावर त्रैलोक्याचे राज्य जिंकण्याची जिद्द त्याच्यात असावी लागते.

त्यांच्या काही लाडक्या कवींपैकी केशवसुत हे एक. त्यांनी त्या लेखात म्हटले आहे की, ‘‘महाराष्ट्रातील पहिले नवकवी केशवसुत होत. त्यांची 'तुतारी' गगनाला भेटून गेली. त्यानंतर अशी कविता झाली नाही. दिक्कालाचा भेद करून अज्ञाताच्या कुंपणापलीकडे उडी ठोकून त्यांची दृष्टी भविष्याचा शोध घेत होती. नव्या दमाचा, 'नव्या मनूचा' शूर शिपाई त्यांनी निर्मिला.’’ इतिहासाचार्य राजवाड्यांनी कवित्वाबद्दल केलेले विवेचन आबांनी मानले. कवित्व प्रासादिक असावे. रामदासांनी कवींना म्हणजे प्रतिभावान व्यक्तींना पुरुषार्थाचे वैभव, स्वधर्माचा आश्रय, अध्यात्मरत्नांच्या खाणी, योग्याचा गुप्त पंथ, मोक्षाचे

पडिभर, भाग्याचे भूषण, सुखाचे संरक्षक, स्वदेशाचे उद्धारक" वगैरे नाना तऱ्हेच्या प्रशंसेने आळविले आहे.

अनेक साहित्य संमेलनांच्या अध्यक्षपदावरून साहित्याची समीक्षा आणि काव्यारसाची उत्पत्ती अभिनव पद्धतीने करणारे अबा रघुवंशातील काही श्लोक पटदिशी उद्धृत करत. मी उत्कंठतेतून तो उतरवू लागल्यास, 'थांब, मी तुझ्यासाठी लिहितो' म्हणत, त्यांच्या हस्ताक्षरात माझ्या एका साध्या वहीवर लिहिलेले ते श्लोक-

**वागर्थाविव संपृक्तौ वागर्थप्रतिपत्तये।**
**जगतः पितरौ वन्दे पार्वतीपरमेश्वरौ।।**
**अनुरागवती संध्या दिवसस्त पुरःसरः।**
**अहो दैवगतिः विचित्रा तथापि न समागमः।।**

आबा कवी नव्हते. ते आनंदयात्री होते. त्यांच्याजवळ सुखी माणसाचा सदरा नक्की होता. एका अजोड अशा रसायनाने त्यांचे व्यक्तित्व बनले होते, जीवन कसे जगावे हे त्यांच्याकडून शिकावे. पण साध्या व्यवहारात ते गफलती करत.

वाईला संस्थेच्या परिसरात अभ्यासगतांसाठी श्रीमती उषा साठे यांनी पाच-सहा वर्षे 'मेस' चालवली होती. त्याच सुमारास संस्थेला मिळालेला हातकागद कारखाना नव्याने चालू करण्यासाठी मुंबईतील एक छोटा उद्योजक वाईत पुनःपुन्हा येई. त्याने बरोबर आणलेले यू. पी. कडील दोन कामगारपण होते. ते सर्व 'मेस'मध्ये जेवत, उषाबाईंनी त्यांना पैशाबद्दल विचारले की, ते कोल्हटकरकडे बोट दाखवीत. दोन वर्षे वाट पाहून उषाबाईनी आबांच्या कानांवर ही गोष्ट घातली. त्यांनी झीज सोसली होती पण आबा म्हणाले, ''धंद्यात तोटाही होण्याची शक्यता ध्यानात घ्यावी लागते.'' उषाबाईनी हळूहळू 'मेस' चालविणे बंद केले. त्याच मंडळींशी झालेला कागद कारखान्यासंबंधीचा नंतरचा व्यवहार पूर्णतः कायदेशीररीत्या झाला नसावा. कारण तो हातकागद कारखाना संस्थेच्या नदीकाठच्या चांगल्या जागेसकट संस्थेच्या हातातून जवळजवळ गेला. कोर्टकचेरी झाल्यावर नाममात्र अधिकार टिकला. माझा चुलतभाऊ अशोक जोशी नवे तंत्रज्ञान घेऊन उद्योग सुरू करण्याच्या हेतूने भारतात आला होता. सरकारी पातळीवर नेहमी भेटी घ्याव्यात तेव्हा कागदपत्रे पुढे सरकवली जातात हे त्याला कळले होते. आबांच्या वरिष्ठ सरकारी व्यक्तींच्या ओळखींमुळे कामातील दिरंगाई कमी होऊ शकते म्हणून आबा त्या कंपनीचे अध्यक्ष व्हावयास तयार झाले. पण त्या पदाबरोबर सरकारी व निमसरकारी संस्थांमार्फत मिळालेल्या अर्थसाहाय्याची परतफेड करण्याची औपचारिक जबाबदारी अध्यक्षांची राहते, हे त्यांच्या लक्षात आले नाही. अशोक जोशी तीन वर्षे इकडे काढून, निराश होऊन अमेरिकेत परतला. अबांना त्याने चिंता मुळीच करू नका म्हणून बजावले. तरीही त्या निमित्ताने खटला सुरू झाल्यावर अबा गडबडले. पण एरवी त्यांना नेहमीच वाटले की, आपल्याला आर्थिक व्यवहार सर्व समजतात, ते तितकेसे खरे नव्हते.

आबा मार्क्सवादी अर्थमीमांसा, गांधींचे अर्थसिद्धान्त व त्यावरील चिकित्सा उत्तम करत. पण प्रत्यक्ष आर्थिक व्यवहारात सहज चुका करत. वाईहून काही तातडीच्या मुंबईमधील बैठकीसाठी त्यांना निघावे लागले, जोडीला प्रा. हाट्यांचीही गाडी होती. वाटेत कात्रज बोगद्याच्या आधी एका हॉटेलमध्ये चहा घेऊन आम्ही निघत असताना एक मध्यमवयीन बरे कपडे घातलेला इसम पैसे मागू लागला. त्याचे म्हणणे होते की, तो कोणत्यातरी मुलाखतीसाठी पुण्याला निघाला होता. त्याची शिफारसपत्रे, पदवीपत्रे आणि पैसे चोरीला गेले. आबांनी पाकीट बाहेर काढून त्याला वीस रुपये दिले. त्यापूर्वी मी 'नको' म्हणून. खाणाखुणा करून थकले- अहो, तो पण मध्येच उतरून काय करणार होता? खासगी गाडीने जाणाऱ्यायेणाऱ्याला त्या हॉटेलमध्ये थांबता येते. तेथे एस. टी. थांबत नाही. पण आबांच्या मनात त्याच्याबद्दल फक्त कणव होती.

अलीकडे आबा चहा झाल्यावर हाक मारली की टेबलापाशी येत. ''काय आबा, फिरायला जाऊन येणार ना?'' ते थोड्या वेळात त्यासाठी तयार होऊन निघत. पण अर्ध्या तासाने परतून "मी लायन्सपार्कमध्ये चार फेल्या मारल्या. उतार वयाचे बरेच स्त्री-पुरुष तेथे दिसतात," असे म्हणत. पूर्वी ते तासभर तरी फिरायचे. तेव्हा मला धास्ती वाटायची की मी कॉलेजला निघण्यापूर्वी येतात की नाही? त्यांचा सकाळी फिरावयास जाण्याचा उत्साह आता थोडा कमी झाला होता. पाचएक वर्षांपूर्वी वाईला सकाळी बाहेर पडल्यावर नित्याचा फिरण्याचा मार्ग सोडून ते सोनजाईच्या डोंगराच्या वाटेने गेले. डोंगर चढून खाली आले ते नेहमीपेक्षा दोन तास उशिरा. तोपर्यंत त्यांची काळजी लागल्यामुळे कोल्हटकरने शोधायला माणसे पाठविली, व स्वतः छोटूला गाडी बाहेर काढायला लावून सातारा रस्त्याकडे आबांच्या तपासाला निघाला. आबा त्याला परतताना दिसल्यावर त्याच्या छातीवरचे दडपण एकदम कमी झाले. त्याच्या चेहऱ्यावर काळजी स्वच्छ दिसत होती. आबा हसत म्हणाले, "मला माझी खात्री वाटते, मी भलते धाडस करणार नाही.'' तेच आबा आता विचारू लागले की, तुला मी थकल्यासारखा वाटतो का? मी म्हणे, 'हे थोडेफार होणारच.' 'तुला संथारा व्रताची माहिती आहे ना?' मी म्हणायची 'हो. पण तुम्ही कशाला विचार करता? तुमची वाणी, तुमचे विचार, तुमचे चापल्य मंदावले तरी सर्व छान आहे.'

याच वर्षी वाईच्या स्वयंपाकघरातून पाचगणीच्या डोंगराकडे बघत ते सांगत होते, मी गांधींची साथ सोडावयास नको होती. मी चमकून विचारले, पण त्यांच्या सहवासाने तुम्ही खूप नवीन काही शिकला म्हणाला होतात. शिवाय एम. एन. रॉय यांचा निखळ बुद्धिवाद तुम्ही आत्मसात केल्यावर तुम्हाला असे का वाटते? त्यांच्या पुढील उत्तराने विचार करावयास लावला. त्यांचे म्हणणे होते की, विचाराधिष्ठित वर्तन घडवण्यास इकडच्या माणसास अपयश आले आहे. गांधींच्या विचारसरणीस नंतरच्या काँग्रेसवाद्यांनी फक्त शाब्दिक सहानुभूती दाखविली. गांधीनिष्ठा पोथीनिष्ठा ठरली, आणि तशा निष्ठेमुळे इतर

काँग्रेसजनांना राजकीय स्थाने, अधिकार, बंगले, गाड्या मिळाल्या. माझ्यापाशी माझे स्वतंत्र घरदेखील नाही. त्यावर मी म्हटले होते, 'आबा, तुम्ही संपादिलेला मीमांसा कोश, धर्मकोशाचे खंड आणि विश्वकोशाचे हजारो पृष्ठांचे हे खंड, या तुमच्या क्षय न पावणाऱ्या इमारती आहेत. ते तुमचे अपहृत न होणारे धन आहे.' आबा फक्त हसले. त्या क्षणी मी करत असलेल्या शाब्दिक कसरतीची मला तीव्र जाणीव झाली.

कोल्हटकरच्या पश्चात वासुदेव हा त्यांचा स्वीय सहायक झाला होता. आबा १९९३ च्या उन्हाळयात मधुकरकडे अमेरिकेत असताना, अनेक वर्षांपूर्वी घेतलेल्या महाबळेश्वर येथील जमिनीवर वासुदेवने एक छोटेसे घर बांधून घेतले.

आबा अमेरिकेहून परतल्यावर त्या घराकडे ओढले गेले. तिकडे त्यांनी नेहमी लागणारे ग्रंथ बरोबर ठेवलेच. पु. ल. देशपांड्यांच्या पंचाहत्तराव्या वाढदिवसानिमित्त वृत्तपत्रांत सत्काराचे वृत्त त्या सुमारास पुनःपुन्हा झकळत होते. पु. ल. त्यांचे चाहते. ते आपले प्रत्येक पुस्तक आबांना पाठवत असत. त्या वेळी आबा वरवर ते चाळत. पण या वेळी समग्र पु. ल. वाङ्मय वाईहून त्यांनी मागवून घेतले. ते वाचले. आता संस्थेत विशेष अतिथी येणार असल्यासच ते वाईस जात, पण पुन्हा महाबळेश्वरला परतत. भेटायला येणाऱ्या व कसल्या ना कसल्या समारंभाचे निमंत्रण देणाऱ्या मंडळींचा राबता कमी झाला होता. २६ मे १९९४ हा दिवस आबांचा नेहमीसारखाच गेला. सकाळचे फिरणे, नाश्ता, वृत्तपत्रवाचन, जेवण, डुलकी वगैरे. ऊन उतरल्यावर पुढील मोकळया जागेत थोडे फिरून विसावणे हा दैनंदिन कार्यक्रम झाला. अलीकडे शास्त्रीय संगीताच्या ध्वनिफिती ऐकत ते झोपी जात. पण त्या संध्याकाळी संगीत ऐकल्यावर उठून, एक चांगला तयार आंबा निवडून, स्वतः स्वच्छ करून, प्लेटमध्ये व्यवस्थित कापून खाल्ला. एरवी संध्याकाळनंतर त्यांनी खाणे सोडले होते. झोप त्यांना सहज वश होत असे. नित्याच्या झोपेइतकेच सहज, अलगद ते मृत्यूच्या स्वाधीन झाले. आबांची उमेदीची वर्षे व जीवनाची सांज कृष्णाकाठावर गेली आणि त्यांनी अखेर साधली तीही कृष्णानदीच्या आणखी समीप जाऊन! असे मरण येण्यास साधना लागते. जीवनाचा असा निरोप घेणे हे फार थोड्यांना जमते. आनंदयात्री आबा शेवटी विसावले.

**(तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी जन्मशताब्दी विशेषांक,**
**प्राज्ञ पाठशाळा मंडळ, वाई.**
**दि. २७ जानेवारी, २००१, पृ. ६७ ते ७५)**

○○○

# ६९.
# माझे काका : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी
## वैद्य सौ. शुभदा अ. पटवर्धन

*(वैद्य सौ. शुभदा पटवर्धन तर्कतीर्थांचे जेष्ठ बंधू वैद्य वेणीमाधवशास्त्री जोशी यांची कन्या. सामान्य वाचकांना ठाऊक नसलेले तर्कतीर्थांचे अनेक पैलू त्यांच्या पुतणीने या लेखात प्रस्तुत केले आहेत. 'धर्मभास्कर'च्या लक्षावधी वाचकांच्या वतीने आम्ही तर्कतीर्थांस श्रद्धांजली अर्पण करीत आहोत.* -अवधूत शास्त्री)

पिंपळनेर या महाराष्ट्रातील एका खेडेगावी, १९०१ साली, रथसप्तमीच्या दिवशी एका श्रेष्ठ विचारवंताचा जन्म झाला. पुढे सर्व आयुष्यभर त्याने स्वतःच्या क्रांतिकारक विचारांनी व आचारांनी केवळ महाराष्ट्रच नव्हे तर अवघा भारतखंड ढवळून काढला. स्वातंत्र्यपूर्व काळात ज्वलंत देशप्रेमींना व इतर क्रियाशील कार्यकर्त्यांना स्वातंत्र्य लढ्यात सक्रिय प्रोत्साहन दिले. त्यांच्याबरोबर स्वतः तुरुंगवास भोगला व त्यांना सतत खणखणीत नैतिक आधार दिला. पुढे स्वातंत्र्योत्तर काळात आघाडीच्या राजकीय नेत्यांना वेळोवेळी नवनवीन दिशा दाखविणारे राजकीय विचार दिले.

या निवडक राजकीय नेत्यांमध्ये "कै. यशवंतराव चव्हाण" यांचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे. किंबहुना 'तर्कतीर्थ' हे यशवंतरावांचे राजकीय क्षेत्रातील गुरू होते. तर्कतीर्थांचे हे राजकीय क्षेत्रातील पायाभूत कार्य त्यांच्या शेवटच्या श्वासापर्यंत चालू होते. त्यांचे सर्वच विचार त्यांच्या सहवासात आलेल्या राजकीय नेत्यांना पटले असतील असे नाही. परंतु तर्कतीर्थांनी वेळोवेळी जे महाराष्ट्राचे तसेच देशाचे, सर्वांगीण, सखोल, सर्वसमावेशक व राजकीय चित्र मांडले, त्यामुळे या नेत्यांना वेळोवेळी राजकीय निर्णय घेताना तर्कतीर्थांच्या राजकीय दृष्टीचा बहुमोल उपयोग झाला हे नाकारता येणार नाही.

या सर्वांमध्ये यशवंतरावांशी त्यांचा प्रदीर्घ संबंध आला. तर्कतीर्थांच्या प्रत्ययकारी राजकीय दृष्टीमुळे तसेच त्यामागील मूलगामी, सामर्थ्यवान व निर्विवाद विचार सूत्रामुळे

यशवंतराव त्यांच्याकडे कायमचे आकर्षित झाले होते. मात्र तर्कतीर्थांनी कधीही आपली 'मूलभूत विचारवंत' ही भूमिका सोडली नाही. त्यांना राज्यसभेचे सदस्यत्व चालून आले होते, व नंतर काही काळाने भारताच्या उपराष्ट्रपतिपदाकरिता त्यांच्या नावाचा विचार होणार होता, परंतु दोन्ही प्रसंगी त्यांनी स्पष्ट नकार दिला. थोर ग्रीक तत्त्ववेत्ता 'सॉक्रेटीस'प्रमाणे राजकीय क्षेत्रात व तसेच सामाजिक क्षेत्रात आयुष्यभर त्यांनी मूलभूत विचार-प्रबोधनाचे कार्य केले, जणू ते भारत वर्षाचे 'आधुनिक सॉक्रेटीस' होते.

तर्कतीर्थ लोकसंपर्काची एकसुद्धा संधी सोडत नसत. काही वेळा त्यांचे एकांगी टीकाकार या गोष्टीचा उपहास करीत असत. परंतु तर्कतीर्थांच्या प्रत्येक वर्तनाला समर्थ वैचारिक अधिष्ठान असल्यामुळे त्यांनी या एकांगी टीकाकारांची कधीच दखल घेतली नाही. शास्त्रीजींनी त्यांचे समाज प्रबोधनाचे कार्य सर्व पातळ्यांवर निरंतर चालू ठेवले. जेव्हा महात्मा गांधींना 'अस्पृश्यते'संदर्भात हिंदू धर्माची भूमिका समजून घ्यायची होती तेव्हा, तर्कतीर्थांनी महात्मा गांधींसमोर एकापेक्षा एक सज्जड धर्मशास्त्रीय पुरावे सादर करून सप्रमाण पटवून दिले की, हिंदू धर्मामध्ये अस्पृश्यतेला बिलकूल स्थान नाही. तसेच सोमनाथ मंदिरातील मूर्ती प्रतिष्ठापनेचे कार्यसुद्धा तर्कतीर्थांनी केवळ समाज प्रबोधनाच्या उद्देशाने केले व त्यानुसार जातिभेद न मानता ते मंदिर सर्वच्या सर्व हिंदू बांधवांना खुले करून दिले.

तर्कतीर्थांना त्यांच्या जीवनकालात अनेकानेक व्यासपीठांवर त्यांचे विचार प्रकट करण्याची संधी वेळोवेळी मिळाली व त्याचा त्यांनी समाज प्रबोधनासाठी पुरेपूर उपयोग केला. किंबहुना ते त्यांचे जीवित कार्य होते. एखाद्या वास्तूचे उद्घाटन असो, की एखाद्या कार्याचा शुभारंभ असो की, एखादा त्यांच्या हस्ते होणारा सत्कार समारंभ असो अथवा एखादे वसंत व्याख्यानमालेतील व्याख्यान असो, तर्कतीर्थांनी प्रत्येक वेळी त्या त्या प्रसंगाला उचित असे लक्षवेधक नवे विचार दिले व त्यामुळेच प्रत्येक समारंभाला त्यांच्या हजेरीने एक संजीवन प्राप्त होत असे. ते जेव्हा मराठी साहित्य सम्मेलनाचे अध्यक्ष झाले तेव्हासुद्धा त्यांनी दलित साहित्याकडे पाहण्याचा एक मूलभूत सर्वस्वी नवा विधायक दृष्टिकोन देऊन ते साहित्य सम्मेलन संस्मरणीय केले होते.

शास्त्रीजींनी आपल्या आयुष्य कालावधीत अनेकानेक ग्रंथांना समर्पक प्रस्तावना दिल्या व मार्मिक समीक्षा केली. परंतु केव्हाही त्यांचा तत्त्वचिंतकाचा पिंड लपून राहिला नाही. प्रथम ते लेखकाच्या दृष्टिकोनातून सर्व पंथांचे चिकित्सक परिशीलन करीत व नंतर स्वतंत्रपणे त्याच ग्रंथाचे पुनः परिशीलन तितक्याच चिकित्सकपणे करीत, त्यामुळे त्यांना नाण्याच्या दोन्ही बाजू सुस्पष्ट होत असत. त्यांच्या प्रत्येक समीक्षेत अनिवार्यपणे सम्यक विशाल दृष्टीची प्रचिती येत असे. याचमुळे त्यांचे विविध विषयांवरील लेख सुद्धा नेहमीच वजनदार व मार्मिक ठरत असत.

शास्त्रीजींना कै. राम कोल्हटकर हे प्रचंड स्मरणशक्तीचे चाणाक्ष स्वीय चिटणीस लाभले

होते. ते प्रत्येक कार्यक्रमानंतर वेळात शास्त्रीजींशी इतरांसह वार्तालाप करताना शास्त्रीजींनी मांडलेल्या नवीन व उद्बोधक विचारांकडे त्यांचे लक्ष्य वेधीत असत व त्यावर उद्बोधक चर्चा घडवून आणीत असत. शास्त्रीजींना अशा राम कोल्हटकरांच्या उमद्या व उत्साही भूमिकेचे मनापासून कौतुक वाटे. शास्त्रात राम कोल्हटकरांची निष्ठा असामान्य होती, अशा बलदंड स्वीय सचिवामुळे शास्त्रीजींचे दैनंदिन कार्य मोठ्या प्रमाणात हलके होत असे.

शास्त्रीजींना विचारवंतांचा ओढा होता. त्याचमुळे त्यांच्या श्री. मे. पुं. रेगे, माधवराव गडकरी, द्वा. भ. कर्णिक, न. र. फाटक, कै. गोवर्धनदास पारीख इत्यादी विचारवंतांबरोबरच्या गप्पांच्या मैफली झकास रंगायच्या. मुंबईला तर्कतीर्थांचे वास्तव्य त्यांचे ज्येष्ठ बंधूकडे (कै. वेणीमाधवशास्त्री जोशी, आयुर्वेदाचार्य) असायचे, तेव्हा त्यांच्या वेणीमाधव शास्त्रींबरोबर ते करीत असलेल्या आयुर्वेद शास्त्रीय कार्यावर प्रदीर्घ चर्चा व्हायच्या. उभय बंधूंचा चिंतनशील पिंड असल्यामुळे अनेक वेळा एखाद्या मुद्द्यावर दोघंही जण उत्स्फूर्त स्वतंत्रपणे चिंतन करायचे व तेव्हा बैठकीच्या खोलीत दोघेही बसलेले व प्रदीर्घ काळ 'नीरव शांतता' असे मोठे उत्कंठापूर्ण दृश्य असायचे. तिऱ्हाइताला वाटायचे की आज यांचा मौनाचा साप्ताहिक दिवस दिसतोय!

एकदा तर्कतीर्थ वेणीमाधवशास्त्र्यांच्या मुंबईच्या घरी आले तर त्यांच्या लक्षात आले की अण्णा (वैद्य वेणीमाधवशास्त्रींना ते अण्णा या नावाने संबोधत असत) कोणत्यातरी मोठ्या कार्यात गढलेले आहेत, चौकशी केल्यावर त्यांना कळले की "आयुर्वेदीय महाशब्द-कोशाचे काम सुरू आहे." मग तर्कतीर्थांनी अण्णांच्या कार्यात रस घेतला व पुढे 'आयुर्वेदीय महाशब्दकोश' हा जाडजूड ग्रंथ मराठी साहित्य व संस्कृती मंडळातर्फे प्रसिद्ध झाला.

मध्यंतरी तर्कतीर्थांना 'किडनी स्टोनचा' त्रास झाला होता व तीन वेळा शस्त्रक्रिया करूनसुद्धा गुण आला नाही. तेव्हां वेणीमाधवशास्त्रींनी स्वतः त्यांच्यावर आयुर्वेदीय उपचार करून त्यांच्या किडनी स्टोनचे समूळ निर्मूलन केले व तर्कतीर्थांची या कटकटीतून कायमची मुक्तता केली.

"आण्णा व तर्कतीर्थांचे एकमेकांवर इतके निस्सीम प्रेम होते की एकाच्या पायात काटा खुपला तर दुसऱ्याच्या डोळ्यात अश्रू यावेत! वैद्य वेणीमाधवशास्त्री यांचे १९८७ साली निधन झाले. तेव्हा तर्कतीर्थांना अतीव दुःख झाले; परंतु तो प्रसंग त्यांनी मोठ्या धीरोदात्तपणे पार पाडला. या प्रसंगी स्वतः निश्चल राहून त्यांनी माईंना (वेणीमाधवशास्त्री यांच्या पत्नी) जो निःशब्द व शांत मनाने असीम आधार दिला तो अनाकलनीय होता. माईंनासुद्धा तर्कतीर्थांबद्दल परम आदर होता. माईंच्या हातच्या पुरणपोळ्या व गुळाच्या पोळ्या तसेच ताकातल्या पालेभाज्या व आंबट गोड आमटी हे पदार्थ तर्कतीर्थांना अत्यंत प्रिय होते. व त्यांच्या वेळोवेळच्या वास्तव्यात हे पदार्थ घरामध्ये हमखास होत असत.

तर्कतीर्थांच्या यशस्वी सार्वजनिक जीवनात त्यांच्या पत्नीचा (कै. सतीकाकू) फार

मोठा वाटा होता. सतीकाकूंनी कौटुंबिक आघाडी समर्थपणे सांभाळल्यामुळे शास्त्रीजींना एकदिलाने अंगीकृत कार्यात स्वतःला झोकून देता येत होते. तसं ते स्वतः कबूलसुद्धा करीत असत. सतीकाकूंचे १९७८ साली निधन झाले, तेव्हा दुःखामुळे त्यांचे अंतःकरण अत्यंत सद्गदित झाले. हे दुःख पचवून एकट्याने जीवन जगण्याची सुरुवात करण्यास त्यांना काही कालावधी लागला.

तर्कतीर्थांना लहान मुले व तरुण वर्ग अत्यंत प्रिय होता. त्यांच्या सहवासात ते रमून जात असत. लहानग्यांना ते निरनिराळी ताजी फळे कापून देत असत तसेच त्यांना स्वतःला सुकामेवा अत्यंत आवडत असे. ते तो खाऊ म्हणून आम्हा सर्व लहान मुलांना आवर्जून देत असत. लहान मुलांनी स्वतःच्या आवडीचे क्षेत्र निवडावे व तन मन व धनाने प्रयत्न करून खूप खूप नाव कमवावे असे त्यांना मनापासून वाटत होते. लहानमोठ्या मुलांच्या अभ्यासातसुद्धा ते आपुलकीने लक्ष घालीत. त्यांची पुतणी 'सुनंदा' हिला त्यांनी एम. ए. संस्कृतच्या अभ्यासात मोठी मदत केली होती.

माझी आबांबाबतची (तर्कतीर्थांना आम्ही भावंडे 'आबा' या नावाने संबोधत होतो, ते माझे काका होते.) सर्वांत पहिली आठवण म्हणजे माझ्या बालपणीची! मी तीन वर्षांची असेन, व तोवर मी बोलायला लागले नव्हते. तेव्हा आबा वारंवार अण्णांसमोर माझ्याबद्दल काळजी व्यक्त करायचे. तेव्हा अण्णा म्हणायचे "आबा, बिलकूल काळजी करू नका, सुलोचना मज्जासार आहे. त्यामुळे तिने उशिरा बोलायला सुरुवात केली तरी एकदा सुरुवात केल्यावर ती संपूर्णपणे अस्खलित बोलेल व तिचा स्वर मधुर असेल." ('अण्णा' म्हणजे माझे वडील-वेणीमाधवशास्त्री) त्यानंतर काही आठवड्यांनी योगायोगाने त्यांच्या समोरच मी माझ्या आयुष्यातले पहिले बोल उच्चारले तेव्हा प्रेमभराने आबांनी मला अगदी जवळ घेतले, तो क्षण मला अजून आठवतो. माझे 'सुलोचना' (माहेरचे नाव) हे नावसुद्धा आबांनी अण्णांना उत्स्फूर्तपणे सुचवले होते. आबा म्हणाले होते, ''अण्णा, हिचे डोळे सुंदर व बोलके आहेत. आपण हिचे नांव 'सुलोचना' ठेवू या!''

आबा प्रत्येक चांगल्या गोष्टीचे रसिक होते. सकाळी फिरायला गेल्यावर बगीचातल्या प्रत्येक फूलझाडापाशी थबकायचे. त्यांचा मनमुराद आस्वाद घ्यायचे व मगच पुढे पाऊल टाकायचे, मग भले घरी यायला उशीर झाला तरी बेहत्तर! आबांचा "सकाळच्या फिरायला" जाण्यावर मोठा विश्वास होता, याला ते 'चरण-योग' म्हणत तसेच ते नियमितपणे घरी शीर्षासन व सूर्य नमस्काराचा व्यायाम करीत असत. अलीकडे ते एकभुक्त झाले होते. म्हणजे फक्त एक वेळ सकाळी भोजन करायचे व रात्र बहुधा काहीही खात नसत.

तर्कतीर्थांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडण-घडणीत प्राज्ञपाठशाळा, बारा वर्षांची संन्यस्त तपश्चर्या व त्यांच्या जीवनात आलेले त्यांचे गुरू स्वामी केवलानंद यांचा प्रामुख्याने फार मोठा वाटा आहे. पुढे त्यांनी अखंड आयुष्यभर ज्या प्रचंड आत्मविश्वासाने व ज्या ताकदीने

जीवनाच्या सर्व रंगांना स्वतःमध्ये लीलया सामावून घेतले, व समाज प्रबोधनाचे कार्य ज्या दुर्दम्य उत्साहाने आयुष्यभर अखंड चालू ठेवले त्यावरून त्यांना निश्चितपणे "अक्षय ज्ञानाचा ठेवा" प्राप्त झाला होता. याबाबत मला तीळमात्र शंका वाटत नाही. असा अलौकिक, शांतताप्रिय व मितभाषी प्रज्ञावान तत्त्ववेत्ता शुक्रवार दिनांक २७ मे १९९४ रोजी आपल्यातून निघून गेला. त्याला माझे शतशः प्रणाम!

**('धर्मभास्कर' मासिक, मुंबई, जुलै, १९९४, पृ. ९ व १०)**

OOO

७०.

# तर्कतीर्थांच्या सहवासात

## माधव गडकरी

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी.

नव्या-जुन्या तत्त्वज्ञानाचा मेळ घालणारे महाराष्ट्रातील वयोवृद्ध विद्वान, प्रज्ञावंत म्हणून त्यांचे नाव सर्वांना माहीत आहे. परंतु त्यांचे सबंध नाव काय, असे कुणाला विचारले तर त्यांच्याबरोबर वावरणाऱ्यालाही सांगता येणार नाही. आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा व कार्याचा नेमका वेध घ्यायचा ठरविले तर तेही एक कठीण काम आहे, असे बैठकीत बसणाऱ्यांनाही वाटल्याशिवाय राहणार नाही. मीही त्यातलाच एक. आज निदान वीस वर्षे शास्त्रीजींच्या सहवासात वावरतो आहे, परंतु त्यांचे सबंध नाव अनेक वर्षे मलाही माहीत नव्हते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री बाळाजी जोशी यांचा जन्म दिनांक २७ जानेवारी १९०९ चा. १९९४ च्या जानेवारीत वयाला ९३ वर्षे पूर्ण झाली. आजपर्यंत ते अनेक स्नेह्यांच्या घराच्या पायऱ्या तुरूतुरू चढत येत. सदैव हसतमुख. आले की म्हणत 'वा: छान!' प्रसन्नता व विद्वत्ता इतकी हातात हात घालून चालताना पाहायला मिळणे म्हणजे कपिलाषष्ठीचा योग. गांधी टोपीसह ते बसतील व मग त्यांचे जे बोलणे सुरू होते ते टिपेतले. ऐकणाऱ्याने सहजपणे ऐकावे व सतत मनात साठवीत जावे, हृदयसंपुटात साठवावे असे विचार वेळोवेळी तर्कतीर्थांनी आम्हाला दिले व एकापरीने आमचे जीवन संपन्न केले. नवा विचार आपण ज्या दिवशी वाचतो किंवा ऐकतो, तो दिवस आपल्याला खरंच किती आनंदाचा जातो! शास्त्रीजींच्या सहवासातून हा आनंद आम्ही अनेकांनी मिळविला. तरीही शास्त्रीजी हे नेमके कसे आहेत, याबद्दल अनेकजण विविध तऱ्हेची चर्चा करताना मी ऐकतो. त्यांच्याबरोबर गेल्या वीस वर्षांत झालेल्या बैठकीचे सार या लेखात दिले आहे. शास्त्रीजींचा आवाज, त्यांची खास उच्चारपद्धती, मध्येच मान डोलावून 'हो' म्हणून समेवर येणे हे ज्यांनी अनुभवले आहे, त्यांना हे सर्व बोलणे शास्त्रीजींचे आहे हे निश्चित पटेल. त्यांची विद्वत्ता, ज्ञानसाधना आणि पांडित्य यांचा अभिमान असणाऱ्यांना या सामग्रीतून त्यांच्या विचाराचे सूत्र सापडेल अशी मला खात्री आहे.

शास्त्रीजी हे मूळचे खानदेशचे, पिंपळनेरचे. त्यांचे वडील धर्मशास्त्र जाणणारे होते व भिक्षुकी करीत होते. वयाच्या दुसऱ्या वर्षी आई निधन पावली. १९१४ साली शास्त्रीजी वाईला आले व नवे जीवन सुरू झाले. तेव्हा त्यांना तेरा वर्षे पूर्ण होऊन चौदावे लागले होते. हरिद्वारच्या गुरुकुलात पाठवायचा त्यांच्या वडिलांचा आधी मानस होता. ते आर्यसमाजिस्टांचे कुलगुरू होते. भारतीय संस्कृतीचे अध्ययन मुलाने करावे अशी वडिलांची इच्छा. त्या वेळी देवकुळे या नावाचे वन विभागाचे रेंजर वाईला होते. त्यांचा नारायणशास्त्री मराठे यांचा परिचय होता व शास्त्रीजींचे वडील देवकुळयांना ओळखत होते. तळेगावला जाणे हा आणखी एक पर्याय होता. परंतु शेवटी नियतीने वाई लिहिले होते. शास्त्रीजी वाईला प्राज्ञ पाठशाळेत आले व आज ज्या गावात त्यांनी विश्वकोशाच्या कामासाठी प्राज्ञ पाठशाळा मंडळाची प्रचंड इमारत व अद्ययावत ग्रंथालय उभे केले, तेथे त्यांनी काही दिवस माधुकरी मागितली.

"तीन वर्षे माधुकरी मागितली," शास्त्रीजींनी बोटे दाखवून व डोळे वळवून सांगितले.

"कसं वाटलं?"

"कंटाळा आला, संकोच वाटायचा!'' शास्त्रीजी.

श्री. राम कोल्हटकर त्यांचे चिटणीस म्हणून त्यांच्याबरोबर वावरत असत. आता त्यांचेही निधन झाले आहे. त्यांच्या पणजीने शास्त्रीजींना माधुकरी घातलेली आहे. अर्थात त्या वेळी ती काही विचित्र गोष्ट नव्हती. परंतु आज ज्ञानार्जन पुरे करण्यासाठी वृत्तपत्रे घरोघर टाकण्याचे कामही कमीपणाचे वाटणाऱ्या मुलांनी या विद्वानाच्या या पहिल्या पायऱ्यांना नमस्कार करायला हरकत नाही.

त्यात वाई हे क्रांतिकारकांचे केंद्र होते. अनेक भूमिगत क्रांतिकारक लपण्यासाठी प्राज्ञ पाठशाळेत येत. शास्त्रीजींना येथे नुसता धर्मशास्त्राचा परिचय झाला नाही तर स्वातंत्र्यलढ्याचाही परिचय झाला. त्यांच्यातील नव्या-जुन्यांच्या संयमाचे मूळ हे येथे आहे. भारतीय तर्कशास्त्राचा अभ्यास त्यांनी वयाच्या १५व्या वर्षी सुरू केला व दीड वर्षानंतर ते न्यायशास्त्रावर संस्कृत भाषेवर होणाऱ्या चर्चेत भाग घेण्यासाठी नागपूरला गेले. तेथे न्यायमूर्ती किनखेडे यांनी शास्त्रीजींचे अध्ययन व मांडणी ऐकली व त्यांनी या 'विद्यार्थ्या'साठी १४ रुपयांची शिष्यवृत्ती सुरू केली. ते १४ रुपये वाईला येऊ लागले व शास्त्रीजी म्हणाले, ''माधुकरीशिवाय जेवायला मिळायला लागलं.''

शास्त्रीजींच्या अध्ययनाला असलेले आधुनिकतेचे कवडसे प्रथम पडले ते १९२९ मध्ये काशी येथे भरलेल्या भारतातील पंडित महासंमेलनात. १९२२ मध्ये कलकत्ता संस्कृत महाविद्यालयाने त्यांना "तर्कतीर्थ" ही पदवी प्रदान करून त्यांचा गौरव केला होता, त्यामुळे हे काशीचे निमंत्रण आले. शास्त्रीजी एकदा गमतीने म्हणाले की, "१९२३ पर्यंत मी दाढी ठेवलेली होती. त्या वेळी मी खानदेशातील माझ्या मित्रांच्या गावी गेलो की कुत्री अंगावर यायची आणि लोक पाया पडायचे. १९२४ मध्ये दाढी काढली व पुन्हा गावी गेलो. कुत्री

अंगावर यायची थांबली व लोक पाया पडायचेही थांबले!" विद्वत्ता व दाढी यांचा समन्वय लोकमानसात असा जबर होता. आणि १९२९ मध्ये गुळगुळीत चेहऱ्याचे शास्त्रीजी, वयाच्या २८ व्या वर्षी विद्वत्सभेत काशीला गेले. येथे शास्त्रीजींच्या पुढील सर्व कार्याची सुरुवात आहे. अस्पृश्यतेवर गांधीजींना सल्ला देणारे शास्त्रीजी, सोरटी सोमनाथाची पूजा करण्यास जाणारे रॉयवादी शास्त्रीजी, प्राज्ञ पाठशाळेच्या आपल्या राहत्या घरात १९६१ पासून गेली ३३ वर्षे सावित्री नावाच्या दलित स्त्रीला स्वयंपाकासाठी ठेवणारे शास्त्रीजी, आणि ते स्वीकारणाऱ्या त्यांच्या पत्नी सतीकाकू, जोतिबा फुल्यांच्या तत्त्वज्ञानाचा अन्वयार्थ वाईच्या ब्राह्मो समाजात सांगणारे तर्कतीर्थ व त्यामुळे ज्यांचे घर, वाईतील अनेक ब्राह्मणांचे वाडे जाळले तरी वाचले, असे शास्त्रीजी हा ज्ञानसंकीर्तनाचा महान व आधुनिक चमत्कार आहे. त्याची सुरुवात काशीला व्हावी हा योगायोगही मोठा. ७००-८०० पंडित हजर होते. शास्त्रीजींची स्मृती विद्युल्लतेप्रमाणे चपल आहे. बोलता बोलता ते तेथे हजर असलेल्या २५ संस्कृत व त्या काळी नामवंत असलेल्या पंडितांची नावे सांगतात. गीता वाचस्पती भिडे शास्त्री, सिद्धेश्वरशास्त्री चित्राव, लक्ष्मणशास्त्री मुरगुडकर, श्रीधरशास्त्री पाठक, नागपूरचे केशव लक्ष्मण दफ्तरी, या सर्वांनी तेथे हजेरी लावलेली होती.

पंडित महासंमेलन सुरू झाले. शास्त्रीजींबरोबर त्यांचा आधुनिक विचार असलेले काही पंडित आलेले होते. परंतु या संमेलनाने एक 'समयबंध' आखून दिलेला होता, प्रतिशब्द सुचविण्याचे एक कार्य सर्व तऱ्हेची टीका सोसत त्यांचे चाललेलेच आहे. 'टर्म्स ऑफ रेफरन्स'ला 'समयबंध' हा शब्द त्यांनी बोलताना वापरला. वेद, श्रुती, स्मृती, पुराणे यांच्याविरुद्ध बोलता कामा नये, असा हा कठीण समयबंध घातलेला होता व ज्यांना तो मान्य असेल त्यांनी सही करायची व मगच मंडपात शिरायचे असा दंडक होता. बंधन पाहताच शास्त्रीजींबरोबर आलेले त्यांच्या विचाराचे वरील पंडित सह्या न करताच परत गेले. त्यांनी आधीच मंडप सोडला. शास्त्रीजी एकटेच राहिले. ते म्हणाले, "मी वेद, श्रुती, स्मृती, पुराणे यांच्याविरुद्ध बोलणार नाही, परंतु त्यांचा मी अर्थ करीन.'' आणि वाईचे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी वयाच्या २८ व्या वर्षी अखिल भारतीय पंडित महासभेत विरोधी भूमिका मांडायला एकटे गेले. शास्त्रीजींची भूमिका अशी की बायबल हा पवित्र ग्रंथ एकच, परंतु खिश्चन धर्माचे शंभर पंथ आहेत. ख्रिस्त हा संत होता की देव होता याबद्दल वाद आहे. मग आमच्या धर्मग्रंथात नवा अर्थ शोधण्यात चूक कोणती?

१९२९ मध्ये शास्त्रीजी हे अर्थात आंतरजातीय विवाहांचे व विधवा विवाहांचे पुरस्कर्ते होते. बालविवाहाचे विरोधक होते. आगरकरांच्या सामाजिक विचारांच्या पुष्ट्यर्थ धर्मग्रंथांचे आधार आपण काढून दिले पाहिजेत या तळमळीने ते भाषण करीत होते. दाढी गेली होती. तर्कतीर्थ झालेले होते, परंतु सनातन विचारांच्या समर्थनार्थ आपले पांडित्य खर्ची घालण्यास ते तयार नव्हते. शेवटी काशीच्या पंडितांच्या सभेत असे चित्र उभे राहिले की एकटे तर्कतीर्थ

लक्ष्मणशास्त्री जोशी एका बाजूला व ७०० मधील उरलेले सर्व पंडित दुसऱ्या बाजूस. चार दिवस हा तुंबळ शब्दसंग्राम चालू होता. चौथ्या दिवशी ब्राह्मण पोटजातीतील लग्ने होण्यास काहीच हरकत नाही, आपापसांत लग्ने करण्याचा शब्दार्थ शास्त्रीजी सांगत असताना त्यांनी एक चूक केली. शास्त्रीजी गप्पात म्हणाले, ''टॅक्टीज चुकली! स्कंध पुराणातील सह्याद्री खंडात चुकीचं लिहिलं आहे असं बोललो! समयबंध मोडला.''

मग काशीतील मुक्कामाला शास्त्रीजी परतले. आता उद्यापासून पंडित सभेत त्यांना जाण्याची गरज उरली नव्हती. ते स्वस्थचित्त बसले होते, तर सकाळीच राजेश्वरशास्त्री द्रविडांचे वडील लक्ष्मणशास्त्री द्रवीड, त्या वेळचे नामवंत शास्त्री शास्त्रींकडे आले.

''तुम्ही आलं पाहिजे.'' ते म्हणाले.

"परंतु मी येऊ शकत नाही. तुमचा समयबंध मी तोडलाय..." शास्त्रीजी.

''तरी या. कारण तुम्ही नाहीत तर चर्चा कसली करायची? कारण इतरांचे एकमत आहे आणि तुमच्यासारखी दुसरी बाजू कोण मांडणार?"

शास्त्रीजी पंडित सभेत मानाने परत गेले. चर्चा संपली आणि आपला विचार पक्का करून शास्त्रीजी परतले. शास्त्रीजींचे म्हणणे असे होते की धर्मपंडित आपल्या पीठांचे महत्त्व रहावे म्हणून एकांगी अर्थ लावतात. लोकांना अप्रिय वाटेल असे बोलायला तयार नसतात. काश्मीरचे उदाहरण तर्कतीर्थांनी अनेकदा बोलण्यात दिले आहे. हे सर्व मूळ हिंदू, आक्रमणाने मुस्लीम झाले. ''आम्हाला धर्मांत परत घ्या,'' अशी त्यांनी विनंती केली होती. परंतु त्या काळी पंडित लोकांनी विरोध केला. आमच्या धर्मग्रंथात प्रत्येकाला प्रायश्चित्त आहे. ते दिले की सर्व काही घडते. अस्पृश्यता निवारण, विधवा विवाह यांच्यासाठीही धर्मार्थ आहेत ते शोधले पाहिजेत.

शास्त्रीजींनी मांसाहार व मदिरापान यांवरही शास्त्रार्थ काढून दिले. त्यामुळे शास्त्र म्हणजे सनातन विचार अशी भावना जोपासणारे, १९५०-५५ मध्ये रागावलेले मी पाहिले आहेत.

शास्त्रीजी म्हणाले, ''आता अशा विषयांवर चर्चासुद्धा होत नाहीत याचं कारण नुसता व्यवहारच नव्हेतर कायदाही पुढे गेला आहे.''

शास्त्रीजी हे मोठे प्रवासी आहेत. मला त्यांच्यात नेहमी फिरस्ता दिसतो. डॉ. आंबेडकरांनी मनुस्मृती महाडला ज्या दिवशी जाळली, त्या दिवशी शास्त्रीजी महाडमध्ये हजर होते. कुणीतरी आंबेडकरांना सांगितले की, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री गर्दीत दिसले. शास्त्रीजींना त्यांनी बोलावून घेतले. उभयतांच्या भेटीचा संवाद शास्त्रीबुवांनीच सांगावा. आधी हळू आवाजात, मग मोठ्यानं व शेवटी स्वतःच मोकळेपणे हसून.

"काय करीत होतात?" आंबेडकर.

"तुम्ही मनुस्मृती जाळलीत, त्याच्या राखेत काही राहिलंय का ते पाहात होतो." तर्कतीर्थ.

"मग काय सापडलं"

"सुखदु:खाच्या व्याख्या!"

"कोणत्या व्याख्या?"

"जे परवश ते दु:ख, जे आत्मवश ते सुख!" तर्कतीर्थ.

"काय छान आहे!" असे डॉ. आंबेडकर म्हणाल्याचे शास्त्रीजी सांगतात. परंतु ते शब्द तसे नसावेत. कारण "काय छान आहे!" हे शब्द तर्कतीर्थांचे आवडते. असे शास्त्रीजी १९३० मध्ये पूर्ण बदलले. काशीच्या पंडित सभेने त्यांना आत्मविश्वास दिला व १९३० च्या गांधीजींच्या चळवळीने त्यांना आपल्या पुढच्या जीवनाचा मार्गही दाखविला. बॉंब बनविणारे लोक वाईच्या प्राज्ञ पाठशाळेत होते. त्यामुळे हिंसात्मक मार्गाचा अवलंब काही बाबतीत अपरिहार्य आहे असे एक मन सांगत असतानाच १९३०चा सत्याग्रह आला. आपले संस्कृतचे अध्ययन, प्राज्ञ पाठशाला, गुरू केवलानंद सरस्वतींचे विचार या कशाचीही पर्वा न करता ते सत्याग्रहात सामील झाले व धुळ्याच्या तुरुंगात गेले.

त्यापूर्वी शास्त्रीजींवर ब्रिटिश सरकारने वॉरंटच काढले होते. शास्त्रीजी नाशिक जिल्ह्यात बागलाण येथे होते. नगर जिल्ह्यातील अकोला तालुक्यात मनोहर शास्त्री म्हणून होते. संगमनेरला शिबिर झाले. मनोहर शास्त्रींवरही वारंट काढले होते, म्हणून त्यांची रवानगी काशीला झाली होती. काही दिवसांनी हरिश्चंद्र गडावर एक शाल तेवढी सापडली. लक्ष्मणशास्त्रीच गडावरून घसरून पडले अशी सर्वांची समजूत झाली. ही बातमी टाईम्सला कै. श्री. रा. टिकेकरांनी पाठविली व प्रसिद्ध झाली. वाईत केवलानंदांच्या अध्यक्षतेखाली याच घाटावर शास्त्रीजींच्या 'निधनाबद्दल' शोकसभा झाली. मृत्युंजय शास्त्रीजी प्रकट झाले व त्यांचा जणू दुसरा जन्मच सुरू झाला.

१९३२ सालचा धुळयाचा तुरूंग म्हणजे नंतरच्या सर्व श्रेष्ठ नेत्यांचे संमेलनच होते. १९३२ मध्ये गांधीजींनी हरिजनांसाठी चळवळ सुरू केली तेव्हा पुन्हा शास्त्रीजी त्यात पडले. ३० ते ३२ या दरम्यानची शास्त्रीजींची व्याख्याने माझ्या पिढीने ऐकलेली नाहीत, परंतु त्यांनी आपल्या प्रभावी वक्तृत्वाने त्या वेळी ग्रामीण महाराष्ट्र चेतविला.

'ब्रिटिश साम्राज्यशाहीविरुद्ध ते नुसते आग ओकीत गेले आणि सत्याग्रहासाठी त्यांनी प्रक्षुब्ध वातावरण तयार केले,' असे वर्णन श्री. द्वा. भ. कर्णिक यांनी शास्त्रीजींवरील एका लेखात केले आहे.

''श्री. द्वा. भ. कर्णिक तुम्हाला आधी भेटले की व. भ.?,'' असे मी शास्त्रीजींना विचारले. द्वा. भ. यांची माझी पहिली भेट कळवणच्या कच्च्या कैदेत झाली. त्या वेळीच ते रॉयिस्ट होते व मी नव्हतो. जमनालाल बजाज धुळे तुरुंगात होते. विनोबाजी होते. कलकत्त्याचा व्यापारी माधवजी, धुळे तुरुंगात होता. त्याला शास्त्रीजींनी उपनिषदे शिकविली. विनोबाजींनी टिपणे पाहिली. त्यांना आवडली. जमनालाल बजाज यांनी विचारलं, ''अस्पृश्यतेबद्दल काय मत आहे" ?

"शास्त्राचा नीट अर्थ लावला तर धर्मग्रंथात अस्पृश्यता नाही", शास्त्रीजी उत्तरले.

"बापूंना भेटाल काय?"

"जरूर भेटेन", तर्कतीर्थ.

आणि जानेवारी १९३३ मध्ये येरवडा तुरुंगात गांधीजींबरोबर शास्त्रीजींची पहिली भेट झाली.

गांधीजींनी विचारलं, "हिंदुधर्मात आजची अस्पृश्यता न मानणे हे पाप होतं काय?"

''मानणं हेच पाप आहे!'' शास्त्रीजी उत्तरले.

"ते कसं काय?" गांधीजी.

"हिंदुधर्माची मूळ तत्त्वं वेगळी आहेत. त्यांच्याविरुद्ध हे आहे. जातिभेद हा खरा मुळात नाही. जन्मावरून जातिभेद मानू नयेत हे महाभारतावरून सांगता येतं. जन्मजाती या खऱ्या नव्हेत असं व्यासच सांगतो. चातुर्वर्ण्य म्हणजे जाती नव्हेत. त्याचा समाजातील 'स्टेटस'शी, दर्जाशी संबंध आहे. जाती वेगळ्या व दर्जानुरूप स्थान वेगळे. समाजातील माणसांचं स्थान हे त्याचा व्यवसाय, त्याचं शील यावर ठरलं व त्याला चातुर्वर्ण्याचे स्वरूप आलं. चातुर्वर्ण्याचं 'डीजनरेशन'- अधःपतन जातिसंस्थेत झाले. जीवनपद्धतीच बदलली आणि चातुर्वर्ण्य बाजूला राहून जातिसंस्था मूळ धरून बसल्या. त्या मूळ धरून बसल्या म्हणून आम्ही त्या मानण्याचे काण नाही," शास्त्रीजींनी गांधीजींपुढे आपली विचारपद्धती ठेवली व तेव्हापासून सनातन्यांना उत्तरे देण्याचे काम गांधीजींनी तर्कतीर्थांवरच सोपविले.

पुढे जूनमध्ये देवदासचे- गांधीजींच्या मुलाचे राजाजींच्या मुलीशी- लक्ष्मीशी लग्न उभे राहिले, वैश्य-ब्राह्मण विवाह लावण्यासाठी गांधीजींनी शास्त्रीजींना बोलाविले. १९३३ साली धार्मिक संस्कारही करायचा आहे असे सांगितले. इथे वाईला तर्कतीर्थांच्या निषेधाची सभा भरली. वाई तसे गांधीविरोधीच. सुधारकांचा फार छोटा गट वाईला होता, परंतु बहुमत सनातन्यांचे. शास्त्रीजींनी हा विवाह लावण्यास जाऊ नये म्हणून संकेश्वराच्या शंकराचार्यांना बोलावून ढोल्या गणपतीच्या घाटावर सभा झाली. तीन-चार हजार लोक जमले. शंकरचार्यांनी सभेत सांगितले की, "लक्ष्मणशास्त्री जे करीत आहेत त्या पापाची शुद्धीही धर्मशास्त्राप्रमाणे होत नाही. त्यांना फळं भोगावीच लागतील- लक्ष्मणशास्त्र्यांना नरकवास भोगावा लागणार आहे."

शास्त्रीजींनी वाईच्या एका बैठकीतच ही हकीकत सांगितली. ते पुढे म्हणाले, "त्या वेळी 'ज्ञानप्रकाश' दैनिक सुरू होतं. ते सुधारकांच्या बाजूने होते. त्यांनी अभिनंदन केलं नि आशीर्वाद दिला. मी 'ज्ञानप्रकाश'ला पत्र पाठविलं नि त्यात माझे विचार मांडले. शंकराचार्यांच्या म्हणण्याप्रमाणे मी नरकात जाणार आहे. स्वर्गात काहीच काम करायला असत नाही, तिथं नुसतं सुखच उपभोगायचं असतं. म्हणून मी नरकात सेवा करणं पत्करीन. हे शाली पांघरून संन्यासी झालेले, पालखीत बसणारे व रेशमी वस्त्र परिधान करणारे संस्थानिक आहेत. उपभोगाची सर्व साधने त्यांना मिळतात. भगवी वस्त्रे ते खऱ्या अर्थाने

नेसत नाहीत, भगवी वस्त्रे चढवितात इतकेच. पालखी, चौऱ्या, मुजरे, मोठमोठी उत्पन्ने जे भोगतात त्यांना आम्हाला जेथे पाठवणार आहात तेथेच पाठवतात, असे शास्त्रात म्हटले आहे.''

गांधीजी नेमके पुण्यात होते. त्यांनी ते वाचले. तर्कतीर्थांना निरोप आला, ''भेटीला या!'' शास्त्रीजी गेले. गांधीजी म्हणाले, ''कठिन शब्दसे हिंसा होती है! ऐषाराम करते हैं, रेशमवस्त्र पहनते हैं, लेकिन अनासक्ती से लेते हैं तो पाप कैसे हो सकता है? आसक्ती से लेना पाप है।''

'जमनालाल बजाज आपली मिळकत माझ्या हाती देऊन मोकळे होतात; यात अनासक्ती आहे' असे उदाहरण गांधीजींनी दिले, परंतु तर्कतीर्थांचे अजूनही म्हणणे असे की संन्याशाने वस्तूचा त्याग केला तर तो खरा विरक्त व संन्यासी. आमचे धर्मपंडित कशाचाच त्याग करीत नाहीत.

शास्त्रीजी वाईत आणि उभ्या महाराष्ट्रात दीर्घकाळ पाय रोवून उभे राहिले. त्यामागे ही सर्व तपश्चर्या आहे. अनेक दिव्यांतून त्यांना जावे लागले व एक गोष्ट सातत्याने दिसते की तर्कतीर्थांनी धर्मशास्त्रांचा अभ्यास करून आधुनिकतेची कास धरली व वाईसारख्या सनातन धर्मपंडितांच्या गावी राहूनही आपल्या विचारांचा वसा सोडला नाही. वाईला कृष्णेच्या तीरावर एकूण सात घाट आहेत. सात घाटावर सात उत्सव. त्यांची स्पर्धा असे. त्या वेळी नानासाहेब रिसबूड नावाचे एक सावकार होते. मोठे बडे प्रस्थ. ते एका स्त्रीकडे गेले. कुणीतरी लक्ष ठेवून बाहेरून कडी लावली. गावात आरडाओरड झाली. कुणीतरी आप्पाशास्त्री राशिवडेकरांचे नाव घेतले. तेही मोठे संस्कृतचे पंडित. 'सुनृतवादिनी' या नावाचे संस्कृत साप्ताहिक चालवीत. परंतु रिसबूड सावकारांची थट्टा केली असा आरोप आल्याने त्यांना वाई सोडावे लागली. ते आपले साप्ताहिक घेऊन कोल्हापूरला गेले व वाईला कोपरापासून नमस्कार केला. "नमो वाई क्षेत्राय। दुर्जन कण्टकिताय नमो नमः" असे लिहिले. ही सर्व हकिगत सांगून शास्त्रीजी म्हणाले, मीही खंबीर नसतो तर माझ्यावरही तीच वेळ आली असती. वाईला कुशाभाऊ अभ्यंकर या नावाचे एक नामांकित वकील होते. पूर्णपणे सनातनी विचारांचे. तर्कतीर्थांचे हे वैचारिक मूर्तिभंजन निकालात काढण्यासाठी वाईच्या वसंत व्याख्यानमालेत पुण्याच्या गो. म. जोशींची तीन व्याख्याने या अभ्यंकर वकिलांनी ठरवली. शास्त्रीजी सांगत होते की गो. म. जोशींशी त्यांचा वैयक्तिक स्नेह, एकमेकांचे अतिशय प्रेम, परंतु 'पब्लिक'मध्ये विरुद्ध.

अभ्यंकर वकिलांनी शास्त्रीजींना विचारले,

"जोश्यांच्या भाषणानंतर तुम्ही किती दिवस खंडन करणार?"

"मला एक दिवस पुरे." शास्त्रीजी उत्तरले. त्याप्रमाणे वाईच्या घाटावर वसंत व्याख्यानमालेत गो. म. जोशींची तर्कतीर्थांच्या विचारांचे खंडन करणारी व्याख्याने झाली. चौथ्या दिवशी शास्त्रीजी उभे राहिले. "दीड तास मी बोललो, सभा मंत्रमुग्ध झाली होती. मी

काय केले?" शास्त्रीजींनी रहस्य सांगितले, "गो. म. जोशी ज्या ग्रंथांच्या आधारे बोलले ते ग्रंथ मला माहीत होते. ते मी घरी आणून ठेवले. त्या ग्रंथातील त्यांनी कोणता भाग सांगितला व कोणता भाग गाळला यावर खुणा करून ठेवल्या, आणि श्रोत्यांना दोन्ही भाग धडाधड ऐकवले. गाळलेला सर्व भाग सांगितलेल्या भागाचा खंडन करणारा होता. गो. म. जोशींनी आपल्याला हवं तेवढंच घेतलं व गैरसोयीचं तेवढं सोडलं होतं. शास्त्रीजींचा हा विजयही वाईने पाहिला.

शेवटी वाईने शास्त्रीजींना घडविलेही. त्यांना स्वामी केवलानंद सरस्वती यांच्या रूपाने उत्तम गुरू तर भेटलेच, परंतु वाईच्या कृष्णेने त्यांच्या मनाला एक अथांगता दिली. शास्त्रीजींचे घर, प्राज्ञ शाळेची ती इमारत तर काठावरच आहे. त्यांच्या घराचे स्वयंपाकघर तर अगदी कृष्णेच्या जणू प्रवाहात आहे. नाना फडणविसांच्या मेणवलीतून रोज दलित सावित्री या स्वयंपाकघरात येऊन कामाला उभी राहते. हा उक्ती कृतीचा विचार त्यांनी गांधीजींपासून घेतला. परंतु त्याचबरोबर वाईकर सावकारांचे व विद्वानांचे छंद पाहिले, पण घेतले नाहीत.

शास्त्रीबुवांचे मिश्कील बोलणे व घरगुती गप्पांचे रूप ज्यांनी ऐकले आहे, त्यांना त्याची लज्जत चांगली माहिती आहे. आचार्य अत्रे यांचे उपद्व्याप तर्कतीर्थ व त्यांच्या पत्नी सतीकाकू यांच्या उभयतांमधील गप्पांत येत. एक दिवस शास्त्रीजींनी पत्नीला वाईतील जवळच्या वाड्यातील प्रकार ऐकवला. तिथं दुसरे एक व्युत्पन्न पंडित राहात. त्यांच्याकडे दर महिन्याला पत्नीची अडचण उभी राहिली की एक स्त्री सरळ कंदील घेऊन माडीवर जाई. खालचे लोक पाहत. त्यांची पत्नी शास्त्रीजींच्या पत्नीशी कट्ट्यावर येऊन गप्पाही मारी.

एक दिवस शास्त्रीजी सतीकाकूंना म्हणाले, ''त्या विद्वान पंडितानं काही केलं तरी चालतं. त्याची बायको सर्व खपवून घेते. तुझ्याशी येऊन इथं गप्पा मारत बसते!''

त्यांचं बोलणं थांबवून सतीकाकू म्हणाल्या, "तुम्ही अशी काही भानगड केली तर अत्र्यांना जाऊन सांगेन."

शास्त्रीजी हसले. "मी हसलो व तिला म्हणालो, अत्रे पण काय करतो? आणि तू त्याला काय सांगणार?"

"त्यांना करू द्या, पण तुम्हाला ते शोभायचं नाही."

सतीकाकूंनी सांगितले आणि शास्त्रीजींनी पाळलं, सतीकाकूंचे १९७८ मध्ये निधन झाले व वाईच्या त्या घराचा आत्माच गेला. शास्त्रीजींच्या जीवनातही फार मोठी पोकळी निर्माण झाली. त्यांचा खरा आधारच गेला. शास्त्रीजींना दोन मुलगे व दोन मुली. त्यापैकी सौ. मालूताई पुन्हा अमेरिकेत. श्रीमती सुमनताईचे यजमान श्री. चंद्रशेखर खंडकर हे १९८३ च्या जानेवारीत आकस्मिक निधन पावले. शास्त्रीजींनी या वयात तो आघातही सोसला. श्रीमती सुमनताई मुंबईत- घाटकोपरला असतात व धाकटा मुलगा वासुदेव वाईला असतो.

१९८० मध्ये श्री. मधुकडे शास्त्रीजी परदेशी गेले, तेव्हा पाश्चात्त्य संस्कृतीत मुरलेल्या मुलाने वडिलांना म्हटले, ''तुम्ही दुसरे लग्न का करीत नाही? तुमच्याकडे ती लक्ष देईल.''

शास्त्रीजी उत्तरले, "तुझी आई सती होती, आणि घरात सटवाई आली तर काय होईल?" शास्त्रीजी तसे घरात एकटेच आहेत. म्हणून तर ते तेथे फारसे विसावत नाहीत. विचाराचे पंख नेतील तिकडे ते जातात.

सर्व शास्त्रांत पारंगत असलेल्या शास्त्रीजींना 'सेक्स' या विषयाचे वावडे तर नाहीच उलट पार्टीत तोच अधिक असतो. एका वाईकर पंडितांची त्यांनी सांगितलेली हकिगतही तेथील समाजस्थितीवर प्रकाश टाकणारी आहे. १९ व्या शतकातील ही वाई आहे, त्या वेळी वेदांचे पाठांतर करणाऱ्यांच्या समोरासमोर स्पर्धा होत असत. वाईचा गणेशोत्सव होता. रात्री वेद-पार्ट्या समोरासमोर बसायच्या होत्या. वाईचे एक पंडित बाबाशास्त्री जोशी रात्री आले. खांद्यावर शेला पांघरून आले होते. बाबाशास्त्री म्हणजे दशग्रंथी ब्राह्मण. समोर उपस्थिती भरपूर. वेदपठन सुरू झाले. बोलता बोलता बाबाशास्त्र्यांच्या लक्षात आले की जेवणानंतर 'माडीवर' गेलो तेव्हा शाल तिथं ठेवून हिरवा शेला पांघरून आपण आलो आहोत. पालुपदे चालू होती. ५०-५० ची पालुपदं- परंतु चूक नव्हती. लोक शेल्याकडे पाहून हसत होते. विशेषतः दुसऱ्या 'पार्टी'चे वेद म्हणणारे हसत होते. प्रतिस्पर्ध्याचा दोनदा पालुपदाचा धागा सुटला. लोकही बुचकळ्यात पडले. पठन लांबले. पानसुपारी झाली. अत्तर-गुलाब झाले. बाबाशास्त्र्यांनी विलंब न लावता आपल्या अंगावरचा शेला कांढला व समोरच्या पार्टीतील तरुणांकडे पाहून ते म्हणाले, "अरे दिन्या, विन्या, हा शेला तुमच्या अंगावर घालण्यासाठी मुद्दाम आणला आहे!"

अशा वाईने शास्त्रीजींचे मन सतत हिरवे ठेवले व त्यात विज्ञान व बुद्धिनिष्ठेचे कोंदण असल्याने जे जे प्रसंग त्यांच्या आयुष्यात आले त्याबद्दल त्यांना योग्य वाटले ते निर्णय घेतले व ते पुढे गेले. सोरटी सोमनाथ मंदिराची पुनर्स्थापना झाली तेव्हा रॅयिस्ट- मूर्तिपूजा न करणारे तर्कतीर्थ- शास्त्री म्हणून तेथे गेले. त्या वेळीही त्यांच्यावर टीका झाली. नव्या पिढीला ते प्रकरण माहीतही नसेल.

सरदार वल्लभभाई पटेलांनी डॉ. राजेंद्रप्रसाद राष्ट्रपती असताना गुजरातेतील सोरटी सोमनाथ मंदिराची नव्याने बांधणी केली व मूर्तीच्या प्रतिष्ठापनेसाठी देशातील शास्त्री मंडळींना पाचारण केले. १६ लाखांचा कर्मकांडाचा खर्च ठरविला. १५० ब्राह्मणांना पाचारण केले. प्रत्येकाला ५०० रुपये दक्षिणा व पहिल्या वर्गाचे रेल्वे भाडे मिळेल असे जाहीर करण्यात आले. परंतु वल्लभभाईंनी एक महत्त्वाची अट घातली व तशी घोषणा केली. १९५१ ची ही घटना आहे. गझनीच्या महंमदाने फोडलेले सोरटी सोमनाथाचे मंदिर पुनर्स्थापित होत आहे. परंतु त्यात अस्पृश्याला पूजेचा अधिकार मिळेल. हरिजनाला नुसता प्रवेशच नव्हे तर पूजेचा अधिकार या विषयावर सर्व ब्रह्मवृंद आखडले. नाशिकच्या श्रीधरशास्त्री वारे यांनीही येण्यास नकार दिला. पुनर्प्रतिष्ठापना ठरली. परंतु भटजी मिळेना, अशी स्थिती झाली. १६७४ मध्ये शिवाजी राजाच्या राज्याभिषेकाच्या वेळी असेच घडले होते. सरदार वल्लभभाई पटेल

इतके खमके की त्यांनी विश्वस्त मसुद्यातच दलितांच्या या अधिकाराचा समावेश केला होता.

तेव्हा कन्हैयालाल मुन्शीनी तर्कतीर्थांना निमंत्रण धाडले व त्यांना शास्त्री म्हणून येण्याची विनंती केली. शास्त्रीजींनी ताबडतोब होकार दिला. ‘‘अस्पृश्यता निवारण हे माझे व्रत आहे. त्यासाठी मी येईन.’’ वाईचे शास्त्री सोरटी सोमनाथाच्या प्रतिष्ठापनेसाठी गेले. वादंग माजले. लोक विसरले. आजही त्या मंदिरात हरिजन जाऊ शकतात, जातात व इतर शास्त्रीही जाऊ लागले आहेत. पुरोगामी विचार पुढे नेण्याचे काम सतत करीत राहणे हा तर्कतीर्थांचा बाणा आहे व म्हणूनच ते जे करतात, त्याला अर्थ येतो. शास्त्रीजींनी एका बैठकीत या समारंभाचं आपल्या पद्धतीनं वर्णन केलं. ते म्हणाले, "पाच लाख लोक जमले होते. मायक्रोफोनवर मी मंत्र म्हणत होतो. सर्व जातीजमातींचे दलित सर्व जण जमले होते. त्यांना सोप्या भाषेत मी देव व धर्माचे महत्त्व व त्यांचा अर्थ सांगितला. विद्वत्जनांनी हे समजून घेतले पाहिजे की अज्ञ लोकांना देव मूर्तीमध्ये दिसतो, तज्ज्ञांना तो सर्वत्रात दिसतो. मूर्ती हे एक प्रतीक आहे, सामाजिक मनाचं प्रतीक आहे. तिथं सामाजिक मनानं गेलं पाहिजे. आणि त्या सामाजिक मनात बदल होतो. तो बदल घडविण्याची प्रक्रिया आपण थांबविता कामा नये".

या प्रक्रियेला शास्त्रीजींनी कधी खीळ घातली नाही म्हणूनच गांधीजींच्या हत्येनंतर वाईत अनेक वाडे पेटविले गेले, परंतु तर्कतीर्थांच्या घराला अगर त्या प्राज्ञपाठशाळेला कसलीही झळ पोहोचली नाही. ज्या कुशाभाऊ अभ्यंकर वकिलांनी शास्त्रीजींविरुद्ध गो. म. जोशींची व्याख्याने वाईत ठरविली होती, त्या अभ्यंकर वकिलांना लोकांनी कोर्टातून फरफटत बाहेर काढले. ते सतत गांधीजींची निंदा करीत असत म्हणून हा क्षोभ होता. ते त्या वेळी वृद्धही झालेले होते. अशा ह्या थैमानात प्राज्ञ पाठशाळा कायम राहिली व त्यातही शास्त्रीजी वाईत स्वत: हजर नसताना.

ती सर्व हकीकतही एकापरीने रोमहर्षक आहे. कलकत्त्यामध्ये एम. एन. रॉय यांची पाच व तर्कतीर्थांची तीन अशी भाषणे त्या वेळी ठरलेली. गांधीजींच्या हत्येच्या बातमीनंतरच, 'कॅटस्ट्रॉफी हॅज ओव्हरटेकन द कंट्री' हे उद्गार एम. एन. रॉय यांनी काढले. नंतर जाळपोळीच्या बातम्या येऊ लागल्या. तेव्हा रॉयनी अस्वस्थ होऊन शास्त्रीजींना विचारले, ‘‘तुमचे काय? तुमची पाठशाळा कशी राहणार?’’

‘‘मी मंत्र घातलेला आहे,’’ शास्त्रीजी उत्तरले. "कसला मंत्र?" रॉयनी विचारले.

"जोतीराव फुल्यांवर तीन व्याख्यानं मी नुकतीच वाईच्या ब्रह्मोसमाजात दिली आहेत. माझा लोकांवर विश्वास आहे. ते आमच्या वाड्याला काही करणार नाहीत!"

शेवटी विचारांचाच प्रश्न होता. १९३५ पासून शास्त्रीजी हे रॉयवादाकडे झुकत चालले होते व १९४९ नंतर तर काँग्रेस पक्षाच्या जवळ होते.

१९३० ते १९४५ या १५ वर्षांत शास्त्रीजींना वाईकरांनी व सातारा जिल्ह्यातील लोकांनी

पाहिले ते एक विद्वान पंडित म्हणून तर कधी आधुनिक विचारांचे तत्त्वज्ञानी म्हणून. १९३० मध्ये कऱ्हाडच्या घाटावर त्यांनी सात व्याख्याने दिलेली होती. युरोपातील क्रांत्यांचा इतिहास त्यांनी तरुण पिढीला सांगितला होता. रशियन, अमेरिकन, फ्रेंच या क्रांत्यांचे इतिहास तर्कतीर्थांच्या ओजस्वी वाणीतून सातारा जिल्ह्यातील ज्या तरुणांनी ऐकले होते, तेच चळवळीचे नेते बनले होते. १९३२ मध्ये तुरुंगवासानंतर शास्त्रीजी कम्युनिस्टच झाले होते. किंबहुना सर्व पुरोगामी लोक मार्क्सवादी होण्याचाच तो काळ होता, असेच म्हणावे लागेल. नाना पाटलांबरोबर ते दोन महिने फिरलेले होते. या विचारांच्या मंत्राने त्यांच्या वाड्याला वाचविले. परंतु शेवटी अपमानित होण्याची स्थिती आली ती १९५६ मध्ये संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत.

थोडीही कटुता न बाळगता कोल्हापूरला आपल्याला जी मारहाण झाली त्याचे वर्णन ऐकावे ते शास्त्रीजींकडूनच.

"श्री. मोरारजी देसाई महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. दि. १ ऑगस्टचा दिवस. १९५६ साल. लोकमान्य टिळकांवर माझं भाषण. कोल्हापूरच्या कॉमर्स कॉलेजात ही घटना घडली. मी भाषणाला उभा राहिलो तर पुढे बसलेल्या एकाने मेलेला साप काठीने माझ्या गळयात अडकविला. पण तो आपोआप खाली पडला. नंतर एकजण पुढे आला व त्याने जुना जोडा काढून माझ्या गालात लगावला. तिसऱ्याने जोड्यांची माळ गळयात घातली. पोलिसांना कुणकुण होतीच. त्यांनी मला आधी सूचनाही दिली होती. परंतु हे सर्व झटक्यात झालं. पोलिसांनी त्यांना पकडून नेलं."

मिरजेचे श्री. घोरपडे शेजारी बसले होते. ते म्हणाले, "शास्त्रीजी, घाबरलात काय?"

"मन त्रस्त आहे." शास्त्रीजी उत्तरले. त्यानंतर खटला उभा राहिला. श्री. मोरारजी देसाईंच्या तेथील पोलिसांना सूचना होत्या की आरोपींना शिक्षा होतील असे पाहा.

श्री. पुंडलिक कातगडे भेटायला आले. खटल्यासाठी शास्त्रीजी कोल्हापूरला गेले. कातगडेंची इच्छा होती की त्या चळवळ्यांना शिक्षा होता कामा नये.

शास्त्रीजी त्यांना म्हणाले, ''तुम्ही काळजी करू नका. त्यांना शिक्षा होणार नाही याची मी उत्तम तऱ्हेने काळजी घेईन.''

आणि शास्त्रीजींनी आपल्या साक्षीत कुणालाही ओळखले नाही. ते म्हणाले, "चेहरे माझ्या लक्षात नाहीत बुवा!" आणि चळवळीतील बंडखोर सुटले.

ज्यांचे आयुष्य चळवळीत गेले, त्यांच्यामुळे चळवळ करणाऱ्यांना शिक्षा होणे शक्य नव्हते. शास्त्रीजींच्या घट्ट मनोभूमिकेची ज्यांना कल्पना आहे त्यांना ते कोणत्या विषयात कोणती भूमिका घेतील हे सहज सांगता येणारे आहे.

कै. बापूसाहेब माटे यांनी पंडित नेहरू व लेडी माऊंटबॅटन यांच्या संबंधांबद्दल लिहिले, तेव्हा खूप गहजब झाला होता. कै. श्री. म. माटे यांना बाहेर पडणे कठीण झाले, त्यांना लपून

बसायची वेळ आली. शंकरराव मोरे, जेधे व त्यांचे अनुयायी माटे मास्तरांबद्दल स्फोटक बोलत होते. महाराष्ट्रातील श्रेष्ठ काँग्रेस नेत्यांनी तर्कतीर्थांना मध्यस्थी करण्यास सांगितले. सर्व एकत्र जमले. शास्त्रीजींनी आपला अन्वयार्थ कथन केला. ते म्हणाले, ''नेहरू हे आधुनिक जगातील आहेत. लेडी माऊंटबॅटनना घेऊन नेहरू काश्मीरमध्ये गेले ही वस्तुस्थिती आहे की नाही? दुसऱ्या कुणाच्या बाबतीत तुम्ही हे चालू द्याल काय?'' शास्त्रीजी काँग्रेसजनांना म्हणाले, ''पंडितजी म्हणजे तुकाराम का? तो पाश्चिमात्य आचारपद्धतीने वागणारा रसिक मनुष्य आहे. देव कसा आहे ते समजून पूजा करावी. भगवान कृष्णाची पूजा करताना त्याच्या १६ हजार ८ बायका आपण आठवीत नाही. माटे यांची बुद्धी कुत्सित आहे असे म्हणू शकतो, परंतु म्हटले ती वस्तुस्थिती आहे.''

आणि मग वादळ शमले. महाराष्ट्र राज्य झाले. श्री. यशवंतराव चव्हाण शिवाजी व संयुक्त महाराष्ट्र चळवळीशी द्रोह करण्याचा सल्ला देणारे शास्त्रीजी त्यांचे रामदास असे त्या वेळी समीकरण होते. भाषिक प्रांतरचनेला शास्त्रीजींचा खरोखरच विरोध होता. राष्ट्रीय एकात्मतेला ही गोष्ट बाधक आहे, अशी त्यांची धारणा होती. परंतु हे न पटणारे नव्हते. देशातील सर्व प्रांत भाषिक बनत असताना फक्त महाराष्ट्राला भाषिक राज्य नाही हा विचार सर्वसामान्य माणसांना पटला नाही. संयुक्त महाराष्ट्र निर्माण झाला व मंगल कलशासह श्री. यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री झाले. श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी त्यानंतर साहित्य संस्कृती-मंडळाच्या कामाला वाहून घेतले. त्या कामावर कितीही चर्चा होवो, परंतु जे शास्त्रीजींच्या काळात झाले ते आता कुणाच्याही कालखंडात होणार नाही. दुसरी गोष्ट फार महत्त्वाची की सर्वांना सत्तास्थानांचा लोभ सुटलेला असताना शास्त्रीजी त्या राजकीय सत्तेच्या सिंहासनाकडे जराही वळले नाहीत.

"यशवंतरावांनी तुम्हाला राज्यसभेवर कसं पाठवलं नाही?" मी एकदा शास्त्रीजींना विचारले.

त्यांची उत्तरे नेहमीच गमतीदार असतात. ते म्हणाले,

"किसनवीरांना लोकसभेत पाठवलं तेव्हा मलाही विचारलं होतं. मी नको म्हटलं."

यशवंतराव म्हणाले, "निवडून येईल की नाही याची शंका वाटते का?"

''किसनवीर शिंपी समाजाचे असतानाही त्यांना निवडून यायला अडचण पडली नाही, तर माझीही फसगत होणार नाही...''

परंतु त्या दिशेने शास्त्रीजी कधीच वळले नाहीत. ३० वर्षे त्यांनी अखंडपणे विश्वकोश व साहित्य संस्कृती मंडळाची इतर कामे यात आपले आयुष्य वेचले. हल्ली कोणाला एस.टी. सदस्यत्व मिळाले की दिव्याची गाडी मिळते. शास्त्रीजींकडे गाडी खूप उशिरा आली. नाहीतर या खंबीर प्रवाशाच्या एस. टी. तून फेऱ्या चालू होत्या. महाराष्ट्रात असे गाव नसेल की जेथे त्यांचे अमोघ वक्तृत्व व लोकांना सज्ञान करणारे विचार लोकांनी ऐकले नसतील.

आज मुंबईतील व महाराष्ट्रातील काही घरांत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्र्यांच्या बैठकी नेहमी चालतात. त्यांच्या वाईच्या प्राज्ञ पाठशाळेच्या वाड्यात जाऊन राहणे हाही एक आनंद असतो. तो माझ्यासह अनेक जण घेतात. सर्व वेळ शास्त्रीजी अफाट उत्साहाने बोलत असतात. त्यांच्याकडे अध्ययनासाठी येणारे अनेक. मध्यंतरी ऑक्सफर्ड विद्यापीठात पीएच.डी. करणारी एक तरुणी तर्कतीर्थांकडे वाईला मार्गदर्शनासाठी आली. ''अशी एक विद्यार्थिनी आली आहे व रोज तिला चार ते पाच तास मी शिकवतो!" असे शास्त्रीजींनी सांगितले. तेव्हा बैठकीत पहिला प्रश्न आला, ''तिचं वय काय आहे ? ...सतीकाकूंचा पहारा नाही म्हणून विचारतो." शास्त्रीजी त्यांच्या दिलखुलास पद्धतीने हसले व चेहऱ्याजवळ हाताची मूठ घेऊन म्हणाले, "चौतीस!"

''ती काय शिकते?''

''हिंदू स्त्री आणि धर्मशास्त्र. ज्यूलिया लेस्ली नाव तिचं. १८ व्या शतकात तंजावरच्या राज्यात लिहिल्या गेलेल्या एका संस्कृत ग्रंथाचं तिला अध्ययन करायचं होतं. त्याचं इंग्रजी भाषांतर उपलब्ध नव्हतं. परंतु तिनं तो ग्रंथ मिळवला होता. त्या ग्रंथांचं वाचन आम्ही रोज करीत होतो.''

शास्त्रीजींच्या प्राज्ञ पाठशाळेत असे अनेक अभ्यासक येतात, राहतात व त्यांच्याशी अनेकविध विषयांवर शास्त्रीजींची चर्चा चालू असते. हा वाडा ग्रंथ व ज्ञानयज्ञ यांचा भुकेलेला आहे. एक दिवस शास्त्रीजी स्त्री विमोचनावर भाषण करून आले. स्त्री-मुक्ती वर्षानिमित्त हे भाषण होतं. ज्युलिआ लेस्लीनं विचारलं, ''काय बोललात?'' शास्त्रीजी म्हणाले, ''मनुस्मृतीतील 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' हे वाक्य उद्धृत करून 'स्त्रीला स्वातंत्र्यच नाही' असा अर्थ पंडित मंडळी सांगतात, तो बरोबर नाही. स्त्री स्वत:चं संरक्षण करण्यास समर्थ नसते. तिला आईबाप, नवरा व मुलगा अशा तिघांचे वेगवेगळया स्तरांवर संरक्षण लागते. या संदर्भात स्त्री स्वतंत्र नाही असा मनुस्मृतीतील विधानाचा अर्थ आहे."

ज्युलिया लेस्लीनं हिंदू स्त्रीचं केलेलं चित्रण तितकंच वेधक आहे. ती म्हणाली, ''कोणत्या धर्मातील स्त्री पतीला देव मानत नाही. फक्त हिंदू स्त्री नवऱ्याला देव मानते.''

ती स्वत:बद्दल सांगताना शास्त्रीजींना म्हणाली, "मूल होणं न होणे हे स्त्रीच्या ताब्यात आलं तेव्हा स्वातंत्र्याचा स्पर्श झाला. नाहीतर मी एव्हाना आजी झाले असते." ज्युलिआ लेस्ली जायला निघाली, तेव्हा ती शास्त्रीजींना म्हणाली, तुमच्या पद्धतीनं मी तुमच्या पायांना वंदन करू की आमच्या पद्धतीनं तुमचं आदराने कानाजवळ चुंबन घेऊ."

शास्त्रीजी उत्तरले, पाया पडू नकोस. कारण ते मातीचे आहे. तिने चुंबन घेतले. पूर्वेकडच्या एका शास्त्र्याचा पाश्चिमात्य पद्धतीने तिने निरोप घेतला.

३४ वर्षांची ज्युलिआ अविवाहित होती. पीएच.डी.चा अभ्यासक्रम पुरा झाल्यावर ती विवाह करणार होती. तसा तिने केलाही. तिची ज्ञानलालसाही जबर होती. तंजावरच्या या

संस्कृत ग्रंथाचे तामीळमध्ये भाषांतर झाले आहे व त्याची माहिती कांची पीठाचे शंकराचार्य चंद्रशेखरेंद्र सरस्वती यांना आहे, अशी माहिती ज्युलिआने आणली, तेव्हा शास्त्रीजी तिला घेऊन शंकराचार्यांकडे निघाले. त्या वेळचे राष्ट्रपती संजीव रेड्डी व पंतप्रधान श्रीमती गांधी याच शंकराचार्यांना भेटून गेले होते. साताऱ्याला श्रीमती गांधी त्यांना भेटल्या. शंकराचार्य बाहेर आले नाहीत, परंतु त्यांनी हात दाखविला. तो सूचक मानून गांधींनी 'हात' ही निवडणूक निशाणी घेतली. पंढरपूरला ते आहेत असे कळले म्हणून शास्त्रीजी तिकडे निघाले होते. परंतु शंकराचार्य पोखरापूर खेड्यात ग्रामपंचायत कार्यालयात थांबले होते. विश्रांती घेत होते. या शंकराचार्यांचे वय तेव्हा ८७ वर्षांचे होते. ८७ वयाच्या एका प्रवाशाला ८१ वर्षांचा दुसरा प्रवासी भेटण्यास निघाला होता. केवळ ज्ञानाची देवघेव करायला.

शास्त्रीजी पंचायत कार्यालयात गेले, परंतु शंकराचार्यांची भेट होईना, कारण त्या वेळी व्यतिपात योग असल्याने शंकराचार्यांनी काष्ठमौन धारण केलेले होते. काष्ठमौन म्हणजे मानेनेही 'नाही' अशी खूण करायवाची नाही. मग इलाज नव्हता. शास्त्रीजींनी वाद तात्पुरता सोडला, परंतु ज्युलियासह त्यांनी मोहोळला पुन्हा गाठलं. त्यांचे सेक्रेटरी म्हणाले, ‘‘शंकराचार्यांचे जपध्यान चाललेले आहे. तुम्हाला दर्शन मिळेल.’’ शास्त्रीजी म्हणले, "दर्शन नको. त्यासाठी मी आलो नाही." मग चिटणीसांनी आत जाऊन सांगितले. ‘‘धर्मकोशाचे संस्थापक आले आहेत.’’ त्यांनी आत बोलाविले, भेट झाली. तंजावरच्या ग्रंथाबद्दल चौकशी केली. ‘‘म्हातारा झालोय, आठवत नाही.’’ मग काही काळानंतर त्यांना आठवणही झाली. पंचापगेश शास्त्री यांनी केलेले त्याचं फक्त तामीळमध्ये भाषांतर झालेलं आहे. हे त्यांनी सांगितले, ग्रंथाचा काळ बरोबर सांगितला. याच शंकराचार्यांना शास्त्रीजी दोनदा भेटले होते. साताऱ्याला प्रश्नोत्तरे झाली होती. शेवटी शास्त्रीजी हे 'धर्म' या विषयावरचे तज्ज्ञ म्हणून बैठकीत तो विषय कुठून तरी येतोच. शास्त्रीजी हे शास्त्रपारंगत, विद्याविभूषित, ज्ञानी व त्याचबरोबर विज्ञाननिष्ठ. त्यामुळे शंकराचार्य, त्यांनी सांभाळलेली पीठे व धर्माचे खरे स्वरूप या विषयांवर ते बोलतात तेव्हा त्यांच्यातील खरा तर्कतीर्थ जागा होतो.

एकदा शास्त्रीजी म्हणाले, "हे शंकराचार्य पीठावर असतात म्हणून परंपरेत बसेल असे सांगतात. पीठावर आहेत म्हणून असं सांगावं लागतं. त्यांना प्रामाणिकपणे जे वाटतं ते बोलत नाहीत. तुम्ही धर्माच्या गादीवर बसलेले संन्यासी आहात. तुम्हाला कसलीच बंधने असता कामा नयेत." शास्त्रीजी पुढे म्हणाले की असे शंकराचार्यांना सांगितले तेव्हा ते म्हणाले, ‘‘असे बोलून दुसऱ्याचा अपमान होतो म्हणून परंपरेत बसेल तेवढंच बोलायचं.’’

एकदा धर्म या विषयावर शास्त्रीजी बोलत होते. त्यांचे विचार अगदी स्पष्ट आहेत व कुणालाही समजतील अशा भाषेत ते बोलतात. ते म्हणाले, ‘‘माणसामाणसांचे संबंध चांगले व्हावेत, एकमेकांबद्दल सहानुभूती निर्माण व्हावी यासाठी धर्म आहे. धर्माची मूलतत्त्वे ही असावयास हवीत. एखाद्या माणसाला देव अस्तित्वात नाही असे वाटत असेल तर त्याचा

द्वेष करण्याचे काय कारण आहे? धर्माच्या नावाखाली दुसऱ्याचे अगर स्वतःचे अहित करू लागला तर अयोग्य आहे. मूर्तिपूजकालाही मूर्तीतील देव हवा असतो. त्याला मूर्ती नको असते. परंतु म्हणून देव नाही हे पटवून द्या, नाहीतर तुम्ही पापी आहात असे म्हणण्याचे कारण नाही. देव हा निराकार आहेच. देव सद्बुद्धी देतो, तशाच वेगवेगळ्या इच्छाही मनात निर्माण करतो. म्हणून देव किंवा धर्माच्या नावाने आपले वर्तन बिघडविण्याचे कारण नाही."

शास्त्रीजींचे बैठकीतील व्याख्यान अशा वेळी रंगात येते. मैफिलीत ते जेव्हा धर्मावर बोलतात तेव्हा त्यांच्या वाणीला व उच्चारांनाही धार येते. शास्त्रीजींच्या दृष्टीने सर्व धर्मांतील मोठा दोष असा की माझा धर्म तेवढा श्रेष्ठ व इतरांचे धर्म हे पापाचे मार्ग आहेत असे त्यात प्रतिपादन केले जाते. जो भेद पाडतो तो खरा धर्म नव्हेच. यासाठी सर्व धर्मांची पुनर्रचना करण्याची आज गरज आहे. धर्मविरोध किंवा धर्मविग्रह हे त्यावरचे तोडगे नाहीत. युद्धाचा प्रारंभ प्रथम हृदयात होतो. मग शस्त्रास्त्रे येतात. हृदयातील युद्ध काढायला पहिलं धार्मिक युद्ध नष्ट करायला हवं."

"परंतु ते कसं नष्ट करणार? पोलंडमधल्या कम्युनिस्ट वालेसालाही पोप लागतो."

"धर्म हे इल्यूजन आहे. मनुष्याच्या मनानं कल्पिलेलं ते इल्यूजन आहे." शास्त्रीजी.

"परंतु एकदा तुम्ही फ्राईडचा दाखला देऊन म्हणाला होतात की जोपर्यंत माणसाला आपल्या भविष्याबद्दल उत्सुकता आहे, तोपर्यंत धर्म जाणार नाही..."

''खरं आहे, मी असं बोललो होतो. फ्राईड- 'फ्यूचर ऑफ इल्यूजन' हे लिहितो व हे मान्य करतो. परंतु माणसानं हे लक्षात घेतलं पाहिजे की शेवटी ते 'इल्यूजन' आहे. मोहजाल आहे. माणूस धर्म निर्माण करतो, धर्मपरिस्थितीत जगतो, परंतु शेवटी त्याने लक्षात घ्यावयाला हवं की धर्म हे काही सत्य नाही. कारण सत्य हे परमेश्वरविरोधी नसते. धर्म निरनिराळ्या श्रद्धा निर्माण करतात. ती काही सत्यं असू शकत नाहीत. सत्याचा त्या पुरावा होऊ शकत नाहीत. सूर्य उद्या उगवणार यात मतभेद कुठे आहे? ते फक्त सत्य आहे. 'खिश्चन धर्म स्वीकारला तरच मोक्ष, नाहीतर नरकवास' असं येशूचे धर्मगुरू सांगतात, हे खोटं आहे. हे सर्व मोहजाल त्यांचे धर्मगुरू नि आमचे धर्मगुरू निर्माण करतात. परंतु ते सारेच माणसाला सत्यापासून दूर नेत असतात. तुमचं, तुम्हाला मिळालेलं जीवन हे, अद्भुत सृष्टी हे खरं सत्य, तिचा विनियोग बुद्धीच्या निकषावर करा, तुम्हाला सत्याचा शोध लागेल.''

अंतुले महाशयांनी सर्व धर्म समभावाचे सोयीस्कर नाटक सुरू केले त्यानंतर शास्त्रीजी भेटले. शास्त्रीजींना असे काही विचारले की ते एकदम समुद्रात जातात. ज्ञानसमुद्राच्या तळाला एक सूर मारून येतात. विचारांचे चार मोती हातात उचलून आणतात व आमच्यापुढे करतात.

त्यांनी सुरुवात केली- ''सर्वधर्म समभावाचा विचार हा प्रथम राजा राममोहन रॉय यांनी मांडला. मूर्तिपूजेविरुद्ध तो होता म्हणून घरातून आईवडिलांनी हाकलून दिलेला हा बुद्धिवान तरुण. त्याला आपल्या मातृभाषेसारख्या १७ भाषा उत्तम येत होत्या. अरबी-फारशी भाषेत

त्याने आपलं शिक्षण घेतलं. नंतर एकीकडे इंग्रजी शिक्षण व दुसरीकडे संस्कृतचा पंडित झाला. मौलवी त्याच्याशी वाद घालायला कचरत, कारण त्यांचे धर्मग्रंथ राजा राममोहन रॉयनी अधिक चांगले अभ्यासलेले होते. बंगालीतलं पहिलं व्याकरण त्यांनी लिहिलं. हिंदी भाषेतही विपुल लेखन केलं. असा हा विद्वान पंडित ब्रिटनमध्ये गेला तर पार्लमेंटचे सदस्य त्याचं स्वागत करायला आले."

राजा राममोहन रॉय व एम. एन. रॉय अशा दोन रॉयांनी फार मोठा वैचारिक प्रभाव शास्त्रीजींवर टाकलेला आहे. त्यामुळे त्यांना एका रॉयवर माझ्या घरच्या बैठकीत मुद्दाम बोलते केले. राजा राममोहन रॉय हा शास्त्रीजींच्या दृष्टीने भारतातील आधुनिक युगाचा अग्रदूत आहे. भारतामधील लोकांना इंग्रजी शिकवले तर ते उद्या स्वातंत्र्य मागतील, याची जाणीव इंग्रजांना होती. त्यांनी राजा राममोहन रॉयशी चर्चा केली आणि हे शिक्षण सुरू करण्यास इंग्रज कार्यकर्त्यांना प्रवृत्त केले. कलकत्ता ही त्या काळात ब्रिटिशांची राजधानी होती व म्हणून रॉयने साहेबाला तयार केले नसते तर पाश्चिमात्य ज्ञानाचा प्रकाश निदान इतक्या लवकर आपल्याला दिसला नसता, असे शास्त्रीजींना उत्कटतेने वाटते.

शास्त्रीजी सांगत होते की, म्हणून राजा राममोहन रॉयने आधी इंग्रजीतून शिकवणारे व इंग्रजी शिकवणारे कॉलेज कलकत्त्यात काढले. आपल्या संस्कृतीशी त्यांचे तसेच दृढ नाते होते. त्यांनीच संस्कृतचे वेदांत कॉलेज काढले. आपले हे सगळे जग धार्मिक भांडणात बुडणार आहे, त्यासाठी सर्व धर्मपंडितांनी एकत्र आले पाहिजे म्हणून कलकत्त्यात युनिव्हर्सल चर्चची स्थापना केली. ज्यांच्यावरून तुम्ही भांडणे करता ती तत्त्वे नाहीत, ते सर्व अधार्मिक आहे. कर्मकांडांनी काही होणार नाही, धर्मवंतांनी भांडता कामा नये. सर्व धर्मग्रंथ माणसांनी लिहिले, देवांनी कोणतेही लिहिले नाहीत." आणि शेवटी शास्त्रीजींनी आपले आवडते वाक्य पुन्हा उच्चारले, "देव हृदयातून बोलत असतो."

'राजा राममोहन रॉयचा महाराष्ट्रावर कितपत परिणाम झाला.' याच्या चर्चेत ''आगरकरांनी राजा राममोहन वाचला नव्हता'' या टीकेचा विषय निघाला. महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासाच्या दृष्टीने त्यांनी काढलेले निष्कर्ष महत्त्वाचे आहेत.

शास्त्रीजी म्हणाले, "महादेव गोविंद रानडे यांच्यावर राजा राममोहनर रॉयचा मोठा प्रभाव पडला. आर्य संस्कृतीच्या इतिहासात असा माणूस झाला नाही," असे रानडे म्हणत. सर्व मानवजात एक आहे असा लोकविलक्षण विचार राजा राममोहन रॉयनी मांडला. यामुळे रानडे-भांडारकरांनी 'प्रार्थनासमाज' काढला.

"रानड्यांवर इतका प्रभाव राजा राममोहन रॉयचा होता तर आगरकरांवर तो कसा पडला नाही? ...आगरकरांनी राजा राममोहन रॉय वाचलाच नव्हता अशी टीका मध्यंतरी झाली होती, त्याबद्दल तुमचं काय म्हणणं आहे?"

दोन्ही प्रश्न शास्त्रीजींना त्या बैठकीत मी विचारले. शास्त्रीजींनी स्पष्टपणे सांगितले की,

"आगरकरांनी राजा राममोहन रॉय वाचला नाही हे अगदी खरं. परंतु आगरकरांनाही तुम्ही आधी समजून घेतलं पाहिजे. प्युअर नॅशनालिस्ट इंटलेक्चुअल, तो आज्ञेयवादी होता. भांडारकर रानडे महान विद्वान परंतु सरकारी नोकरीत. बंगालमधील विद्वानांनी नोकऱ्यांवर लाथा मारल्या व इंग्रजीचा स्वीकार करून त्यांनी आधुनिकता व पाश्चात्त्य विचार बंगालमध्येच नव्हे तर देशात आणण्याचा प्रयत्न केला."

'राजा राममोहन रॉयने इंग्रजी भाषा स्वीकारली नसती तर इंग्रजीचे स्तोम आज माजले आहे ते माजले नसते' अशी टीका कृष्णा कृपलानींनी कलकत्त्याच्या एका भाषणात केली होती. एका गप्पात शास्त्रीजींचे त्याकडे मी लक्ष वेधले.

शास्त्रीजी म्हणाले, "इंग्रजीचा स्वीकार केला नसता तर स्वातंत्र्याची चळवळ झाली नसती."

"नवी मूल्ये आली नसती."

"सतीची चाल गेली नसती."

"सामाजिक सुधारणा झाल्या नसत्या."

"भाषा म्हणजे माणसाच्या मनाचा आरसा, सर्व नवा विचार इंग्रजीतून आला." शास्त्रीजींनी प्रत्येक वाक्य त्यांच्या पद्धतीप्रमाणे सावकाश आमच्यापुढे टाकले.

"मी तुमच्याकडे जेवायला येतो, पूर्वी असा आलो असतो तर वाईकरांनी माझ्यावर बहिष्कार टाकला असता."

‘‘स्वयंपाकघरात २० वर्षांपूर्वी हरिजन स्त्री जेवण करायला ठेवली. राजा राममोहन रॉय आणि इंग्रजीतून आणलेला आधुनिक विचार आला नसता तर वाईकरांनी माझ्यावर बहिष्कार पुकारला असता."

"जिथे जिथे युरोपियन भाषा गेली तिथं क्रांती झाली."

"१९८१ मध्ये औद्योगिक क्रांती झाली. जपान हे एक राष्ट्र असे की त्याने आपली भाषा कायम ठेवून औद्योगिक क्रांती घडविली. जपानच्या मालावर अबकारी कर बसवा म्हणजे आपला माल खपेल अशी मागणी युरोपातील, अमेरिकेतील कामगारांनी केली. सर्व देशांची सरकारे विचार करण्यास बसली. जपानला त्यांचं म्हणणं मांडण्यास सांगितलं. जपानचा व्यापारमंत्री म्हणाला, ‘‘आमचा माल तुमच्या देशात जाईनासा झाला तर तुमच्या मालाची गुणवत्ता घसरेल. जे भारतात झालं आहे. तुमच्याशी स्पर्धा होती म्हणून आमची गुणवत्ता सुधारत राहिली.’’

"जपानने त्रिभाषा सूत्री अमलात आणली आहे. पहिली जपानी, नंतर इंग्रजी, नंतर फ्रेंच. 'ॲप्लाइड सायन्स' मध्ये जपान केव्हाच पुढे गेलं. आतां ते 'प्युअर सायन्स' मध्ये पुढं चाललं आहे. ते सर्व आधुनिक तंत्रज्ञान इंग्रजी नि फ्रेंच भाषेतून घेतात. परंतु जपानी भाषेत आणून ठेवतात.

‘‘लिहायचं जपानीत, ज्ञान घ्यायचं इंग्रजीत किंवा फ्रेंचमधून हे तिथं चालतं...’’

शास्त्रीजी आज जगभर फिरले आहेत. सतत भ्रमंती करणारे म्हणूनच शास्त्रीजींना महाराष्ट्र ओळखतो. पुन्हा सारे स्मरणात. नव्या पाश्चात्त्य लेखकांची नावे असोत की ग्रंथांची नावे असोत, क्योटो-टोकिओ हे ४७० मैलांचे अंतर जपानची रेल्वे तीन तास दहा मिनिटांत कशी तोडते ते त्यांनी अनुभवले आणि ते तोडायला साडे आठ तास त्यांना कसे लागले, हे ते वर्णन करून सांगतील.

प. जर्मनीत मुलाकडे गेले तर पाठीवर ग्रंथांचे ओझे घेऊन निघाले. ते अजूनही तुरुतुरु चालतात. सिगारेट मात्र सोडली आहे नातवाच्या आग्रहाने. '१९४० ते १९७८ पर्यंत ओढली,' हे ते मान्य करतात, पण सिगारेटने कॅन्सर होतो हे नातवाने ऐकले. शास्त्रीजी घाटकोपरच्या घरी आले मुलीकडे. नातू धावत आला व त्याने शास्त्रीजींच्या खिशातील पाकीट काढून घेतले. "तुम्ही सिगारेट ओढायची नाही. कॅन्सर होतो." नातू म्हणाला.

शास्त्रीजींनी ते मानले. परंतु ७८ वयापर्यंत सिगारेट व्यवस्थित ओढणारा, धर्मशास्त्राचा अर्थ सांगणारा ज्ञानयोगी सापडणे अशक्यच. म्हणून शास्त्रीजींच्या गप्पांचा कधीच कंटाळा येत नाही. अखंड ज्ञानसंकीर्तन चालू राहावे, असे वाटते. भल्याभल्यांना ते विचार करावयास लावते. वाईला असले की ते दिवसभर वाचनात घालवितात. प्रत्येक विषयावरच्या नव्या पुस्तकाची त्यांना माहिती असते. महाराष्ट्रातील बुद्धिप्रामाण्यावाद्यांचे ते नेते आहेत. शास्त्रीजी मूळ रॉयवादी. त्यामुळे ते देव मानत नाहीत. देव न मानणारा हा कर्मपंडित आहे. व्रत वैकल्यात न अडकलेला हा कर्माचा भाष्यकार आहे. एखाद्या गावी गेले की इतरांबरोबर ते देवळात जातील. ''मी मंदिराचे शिल्प पहातो," ते म्हणतील.

पुनर्जन्म ते मानीत नाहीत. जे घडावयाचे ते याच जन्मात. या जन्मातील पापांची मुळे माणूस त्या जन्मात भोगतो. वर्तमानातील अस्तित्व आणि कर्तृत्व महत्त्वाचे.

असा हा गंगासागर आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी या सार्थ व भारदस्त नावाने ज्ञानाचा प्रसाद वाटत हिंडतो आहे, एखाद्या चिरप्रवाशासारखा. त्या प्रसादाचे भांडार वाचकांच्या चरणी उधळून आज मी मोकळा झालो आहे.

**('साहित्यातील हिरे आणि मोती' १ मे, १९८४, मधून उद्धृत, पृ. ५ ते २४)**

OOO

# ७१.

# तर्कतीर्थ : सहवास आणि संवाद

## मधु मंगेश कर्णिक

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणजे प्रकांड पंडित व्यक्तिमत्त्व. माझ्या पिढीतील ते एक तपस्वी विद्वान. महाराष्ट्रामध्ये एकही महत्त्वाचे शहर नसेल, की जेथे शास्त्रीजींचे व्याख्यान झाले नसेल. संथ, रसाळ शैलीत अत्यंत जटिल विषय सोपा करून सांगणारे तर्कतीर्थ व्याख्याने तन्मयतेने देत. समोरचा श्रोतृवृंद कोणत्या श्रेणीचा आहे याची खूणगाठ पटल्याशिवाय ते व्याख्यानाला सुरुवात करीत नसत. विद्वत्सभेसमोर द्यायचे व्याख्यान वेगळे, कॉलेजच्या विद्यार्थ्यांसमोरचे वेगळे, राजकारणी पुढाऱ्यांसमोरचे वेगळे आणि खेड्यापाड्यातील अज्ञानी समाजासमोरचे बोलणे वेगळे. शास्त्रीजी श्रोते ओळखण्यांत तज्ज्ञ होतेच, पण यांच्यासाठी बोलण्यातही ते तरबेज होते. फार फार वर्षांपूर्वी मी विद्यार्थी दशेत असताना त्यांचे व्याख्यान मी..........ला ऐकले होते. पण ते समजण्याएवढे माझे वय नव्हते व जागाही नव्हती. नंतरच्या काळात योगायोगाने शास्त्रीजींचा परिचय झाला. त्यांचा सहवास लाभला आणि त्यांच्याशी संवादही घडून आला. पण त्यासाठी बरीच वर्षे जावी लागली.

१९६३ मध्ये माझ्या 'तोरण' या कथासंग्रहाचा प्रकाशन समारंभ मुंबईच्या साहित्यसंघाच्या वास्तूमध्ये झाला. तेव्हा ती वास्तू बांधली जात होती नि खालचा रंगमंच खुलाच होता. त्या उघड्या पण प्रशस्त सभागृहात प्रकाशन समारंभ आयोजिण्यात आला होता. माझे प्रकाशक जयहिंद प्रकाशनाचे ग. का. रायकर हे सात्त्विक स्वभावाचे सद्गृहस्थ. प्रकाशन समारंभ तकतीर्थांसारख्या विद्वान व धर्मपरायण थोर व्यक्तीच्या हस्ते व्हावा अशी त्यांची इच्छा होती. ते म्हणाले, 'आपण तर्कतीर्थांना बोलावू या. आमच्या प्रकाशनाचे हे पहिलेच पुस्तक आहे.' (याआधी त्यांनी 'गोड गोड गाणी' नावाची अनेक छोटी पुस्तके छापली होती. पण 'तोरण'पासून त्यांना आपले पुस्तक प्रकाशन सुरू करायचे होते व स्वस्त पुस्तक योजनाही) त्यामुळे त्याच्या प्रकाशनासाठी तर्कतीर्थांचे शुभ हात मिळाले तर...

माझी छाती दडपलीच. मी एक तेव्हाचा नवोदित लेखक तर्कतीर्थांच्या मानाने कितीतरी

लहान. वयाने तर लहानच, पण ज्ञानाने, साहित्यक्षेत्रांतील अधिकारानेही- तर्कतीर्थ एवढ्या लहान व नवोदित लेखकासाठी येतील? पण ग. का. रायकरांना खात्री होती. ते म्हणाले, ''आपण पुस्तक त्यांना आधी पाठवून 'वाचायला देऊ.' त्यासोबतच निमंत्रण देऊन पुस्तक त्यांना आवडले तर ते नक्कीच येतील.''

त्याप्रमाणे रायकरांनी पुस्तक आणि निमंत्रण पाठवले. तारीखही कळवली आणि काय आश्चर्य! तर्कतीर्थांनी निमंत्रण स्वीकारले. 'ठरल्या तारखेला, ठरल्या वेळी व स्थळी मी येईन. तुम्ही गाडीबिडी पाठवू नका. मी मानधनही स्वीकारणार नाही. मला पुस्तक आवडले आहे. या नवोदित लेखकाला आशीर्वाद देण्यासाठी मी अवश्य येईन.' माझी छाती दडपली होती, ती एकदम फुगू लागली.

आश्वासन दिल्याप्रमाणे तर्कतीर्थ कार्यक्रमाला आले. रायकरांचा उत्साह द्विगुणित झाला होता. त्यांना प्रकाशन समारंभ दणक्यात करायचा होता. त्या काळात आजच्यासारखे प्रकाशन समारंभ होत नसत. साहित्यप्रेमी रसिकांची गर्दी झाली होती. रायकरांनी वक्तेही "एकाहीपेक्षा एक सरस बोलावले होते. तर्कतीर्थ तर मुख्य वक्तेच होते, पण त्यांच्या जोडीला प्रा. अनंत काणेकर, गो. नी. दांडेकर, प्रा. मं. वि. राजाध्यक्ष, प्रा. शांता शेळके, पु. रा. बहेरे हेही वक्ते होते. त्यामुळे तर्कतीर्थांचे भाषण अधिकच रंगतदार झाले. त्यांनी सर्व पुस्तक वाचले होते. त्यातील कथांची त्यांनी जाणकारीने समीक्षा केली. हे पुस्तक उत्तम खपेल, असा आशीर्वाद त्यांनी दिला. तो एवढा गुणकारी होता की स्वस्त पुस्तक योजनेतील त्या पुस्तकाची पहिली आवृत्ती पहिल्या दिवशीच संपून गेली. रायकरांना आणि मलाही तर्कतीर्थांचा हात शुभंकर वाटला व त्याची प्रचितीही लगेच आली.

तर्कतीर्थांची त्या निमित्ताने झालेली ओळख नंतर वाढत गेली. ते तेव्हा 'महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ' आणि 'विश्वकोश मंडळ' या मान्यवर शासकीय संस्थांचे अध्यक्ष होते. कालांतराने मी सचिवालयामध्ये (तेव्हा 'मंत्रालय' हा शब्द प्रचलित नव्हता) मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचा प्रसिद्धी अधिकारी म्हणून काम करू लागलो. माझे दालन सहाव्या मजल्यावरच मुख्यमंत्र्यांच्या दालनाला भिडून होते. तर्कतीर्थ शासकीय कामासाठी मुख्यमंत्र्यांच्या भेटीस आले की, बोलावणे येईपर्यंत माझ्या दालनात बसून रहात. त्यांची सचिवालयातील छन्न मार्गिकेवरून संथपणे चालत येणारी मूर्ती आजही डोळयांपुढून हलत नाही. मध्यम उंची, सावळा वर्ण, डोक्यावर ठाकठीक बसवलेली गांधी टोपी, खादीचा झब्बा, त्यावर किरमिजी रंगाचे जाकीट, जाकिटाची सर्व बटणे लावलेली नि पायघोळ धोतर, पायांत वहाणा. हा त्यांचा वेश. सोबत राम कोल्हटकर हे सचिव. ते सावलीसारखे त्यांच्यासोबत असत. तर्कतीर्थ नेहमी मंद स्मित करीत. एरवी धीरगंभीर वाटणाऱ्या त्यांच्या मुद्रेवरील ते मायाळू मंदस्मित मोठे आश्वासक वाटे.

ते खोलीत प्रवेश करण्यापूर्वी कोल्हटकर पुढे येत. 'आबा आले आहेत.' मी चटकन उठून

उभा राही, तोवर तर्कतीर्थ आत आलेले असत. मी पुढे होऊन त्यांच्या पायांना हात लावणार तोवर त्यांनी वर उठवलेले असे. पाठीवर हात फिरवून मायेने म्हणत, ‘बसा.’

तर्कतीर्थांना सरकार दरबारी खूप मान होता. मुख्यमंत्री ते आले की उठून उभे रहात. त्या काळातील शंकरराव चव्हाण, यशवंतराव मोहिते, पी. के. सावंत हे मंत्री त्यांना वाकून नमस्कारही करीत. तर्कतीर्थ मुख्यमंत्र्यांकडील काम संपले की, थेट आपल्या गाडीत जाऊन बसत. अन्य कोणाही मंत्र्यांकडे किंवा सचिवांकडे ते जात नसत. माझ्या दालनात ते पाचदहा मिनिटे थांबले तर घरगुती चौकशी करीत. मुलं कशी आहेत. कोकणात काय चाललंय, इत्यादी.

त्यांचा माझ्यावर का कुणास ठाऊक खूप लोभ होता. त्याचा आधार घेऊन मी एकदा माझ्या गावी कोकणात बोलावले. निमित्त होते, गावच्या शाळेचे वार्षिक स्नेहसंम्मेलन आणि पारितोषिक वितरण समारंभ! ते स्वभावानुसार चटकन म्हणाले, 'येईन.' आणि मग मला चूक उमगून आली. एवढ्या थोर व्यक्तीला- महाविद्वान पंडितांना- मी एका लहानशा गावातल्या लहानशा शाळेच्या कार्यक्रमासाठी बोलावले तरी कसे? त्यांनी होकार दिला हे त्यांचे सौजन्य, मोठेपणा. पण आपण चुकलोच, नाही का! ज्यांची राष्ट्रीय पातळीवरील विद्वत्सभेमध्ये अधिकारवाणीने बोलण्याची ज्येष्ठता, त्यांनी एवढ्या दूर एका खेड्यात यायचे- लहान मुलांसमोर व्याख्यान द्यायला!

पण पश्चात बुद्धीचा उपयोग नव्हता. मी निमंत्रण दिले होते आणि त्यांनी तिष्ठभरही आढेवेढे न घेता ते स्वीकारले होते.

ठरल्याप्रमाणे तर्कतीर्थ स्वतःच्या गाडीतून वाईहून कोल्हापूरमार्गे करुळ येथे येऊन दाखल झाले. तर्कतीर्थ कोकणात येणार, ही मोठीच बातमी होती. वृत्तपत्रांनी ती ठळकपणे छापली. मग कणकवलीला तेथील श्रोत्यांसाठी तर्कतीर्थांचे खास व्याख्यान ठेवले. विषय होता, 'समग्र क्रांती'. गांधींचे, जयप्रकाशजींचे राजकारण, संघर्ष तेव्हा तीव्र झालेला होता. त्या पार्श्वभूमीवर तर्कतीर्थ काय बोलतात, याबद्दल कोकणवासीयांमध्ये कुतूहल होते.

याआधी तर्कतीर्थ दुपारी माझ्या कोकणी कौलारू घरात पाटावर बसून साधे जेवण चवीने जेवले, सोलकढीची त्यांनी वाखाणणी केली. पुन्हा एकदा वाटीभर सोलकडी ते प्यायले, माझ्या खोलीत घटकाभर विश्रांती घेऊन त्यांनी सर्वत्र फिरून माझ्या घराची, परड्याची पाहणी केली. म्हणाले, "तुम्ही जो जांभ्या दगड (चिरा) भिंतीसाठी वापरला आहे, त्याचा गुणधर्म माहीत आहे का? हा दगड उन्हाळ्यात थंडावा देतो आणि थंडीच्या दिवसात ऊब निर्माण करतो, त्याची सच्छिद्रता नैसर्गिकपणे वातावरण शीतोष्ण ठेवते. नॅचरल एअरकंडिशनिंग!" आणि खरंच, तर्कतीर्थ म्हणत होते, त्याचा आम्ही वर्षानुवर्षे अनुभव घेत होतो. पण त्यांच्या ज्ञानाचे मला मोठे कौतुक वाटले. कोणताही विषय त्यांना वर्ज्य नव्हता. मग ते अंगणातील शेणाने सारवलेल्या जमिनीवर, परड्यातील लाल मातीवर अनवाणी चालले. परड्यातील

सागवानांची गर्दी पाहून ते खूश झाले. सागवान असे साठवलेले अलीकडे आढळत नाहीत, ते असेच सांभाळा, हा मंत्र त्यांनी मला दिला. मग फर्लांगभर चालतच ते आमच्या शाळेत आले. जयवंत दळवी, माधव गडकरी व मी या तिघा साहित्यिकांनी शाळा बांधण्यासाठी पुढाकार घेतला होता. शाळेच्या आवारात छोट्या चिमण्या मुलांची अशी शंभर गावकऱ्यांची मर्यादित गर्दी! हजारोंच्या सभांची सवय असलेल्या शास्त्रीजींना मी या चिमुकल्या गर्दीसमोर बोलायला लावले होते.

पण त्यांच्या भाषणाआधी एक वृक्षारोपणाचा कार्यक्रम आम्ही योजिला होता. मुंबईत जयवंत दळवींच्या बिल्डींगवर परिवारांच्या चोचीतून पडलेल्या बीमधून एक तरतरीत पिंपळाचा बालक वड, उंबरासह वाढत होता. वड, पिंपळासारखे वृक्ष इमारतीच्या पटीने वाढू लागले तर पुढे इमारतीला धोका निर्माण होतो. त्यामुळे ते लहान असतानाच उपटून काढावे लागतात. जयवंत दळवींच्या बिल्डींगवरील पिंपळाबरोबरच वड आणि उंबर असे आणखी दोन वृक्ष तिथे रुजले होते. हिंदू धर्माप्रमाणे वड, पिंपळ, औदुंबर एकत्र उगवले तर ती श्री दत्तगुरूंची देणगी समजतात. ब्रह्मा, विष्णु, महेश तसेच ते पवित्र वृक्ष. ते वाढवताही येत नाहीत आणि तोडताही येत नाहीत.

त्या काळात आम्ही करूळ गावी, शाळेच्या आवारात आणि माळावर झाडे लावण्याचा, 'वनराई' उभारण्याचा मोठा कार्यक्रम हाती घेतला होता. त्या कार्यक्रमाचा भाग म्हणून मुंबईतील ही तीन रोपटी करूळला शाळेच्या आवारात लावायचे आम्ही ठरवले. ती तिन्ही कोवळी रोपे अलगद भिंतीतून काढून कुंडीत घालून गाडीतून मी करूळला नेली होती. आज ना उद्या त्यांना मोकळ्या जमिनीत लावणे महत्त्वाचे होते.

तर्कतीर्थ येणार, म्हणजे त्यांचा शुभ हातगुण घेऊन ते येणार असे मनाशी ठरवून ती तिन्ही रोपे त्यांच्या शुभ हस्ते शाळेजवळ लावायची असे ठरले. त्या दिवशी 'नाथ पै' यांची पुण्यतिथी होती. आमची शाळा ‘बॅ. नाथ पै यांच्या स्मरणार्थ’ त्यांच्या नावाने आम्ही सुरू केली होती. त्यांचे तेथील झाडांपेंडावर खूप प्रेम, त्यांच्या नावेच या झाडांचे वृक्षारोपण करायचे ठरले आणि आम्ही तर्कतीर्थांना विनंती केली.

खरं म्हणजे जानेवारी महिना म्हणजे पानगळीचा पौष महिना. या महिन्यात झाडे लावत नसतात. कुणीतरी आम्हांस म्हणालेसुद्धा- ‘या पौष महिन्यांत तुम्ही वड, पिंपळ, औदुंबरासारखी दांडगी वाढणारी दीर्घायुषी झाडे लावता आहात, पण ती जगणार नाहीत. त्यासाठी मृग नक्षत्राचा पावसाळी मोसम हवा.’

मी म्हणालो, 'हे देववृक्ष आहेत आणि तीर्थासारखा देवदत्ती बोलणारा ऋषितुल्य माणूस त्यांचे रोपण करणार आहे. त्यांची पुण्याई नक्कीच त्या वृक्षांना लाभेल.'

आम्ही तर्कतीर्थांच्या हस्ते वृक्षारोपण केले.

आश्चर्य म्हणजे ती तिन्ही झाडे दिसामाशी वाढू लागली, तरारू लागली. विद्यार्थी

आळीपाळीने पाणी घालीत भर घालीत. आज पंचवीस वर्षे होत आली. तर्कतीर्थांच्या शुभहस्ते लावलेले ते तीनही वृक्ष चांगलेच फोफावले आहेत. त्यांच्या सावलीत विद्यार्थी अभ्यास करतात, खेळतात, डबे खातात. त्या वृक्षांना पार बांधलेला आहे. त्या वृक्षांच्या वाढीला तर्कतीर्थांची पुण्याई खतपाण्यासारखी लाभली आहे.

त्यानंतर मुख्य कार्यक्रम झाला. विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन तर्कतीर्थांनी त्यांच्यासाठी वेदांतील झाडांच्या छोट्या छोट्या गोष्टी सांगितल्या आणि गावकऱ्यांनाही वेद-उपनिषदे यांचे दाखले सोप्या भाषेत देत पर्यावरणाचे, वृक्षसंगोपनाचे महत्त्व वर्णन करून सांगितले. त्यांचे बोलणे माझ्या आजही ध्यानात आहे. तर्कतीर्थ म्हणाले होते, 'या पृथ्वीवर सर्वांत प्रथम गवताचे पाते जन्माला आले, त्यानंतर माणूस जन्मला. त्यामुळे त्या दोघांमध्ये असे ठरले की वनस्पतीने माणसाला सांभाळायचे आणि माणसाने वनस्पतीची काळजी घ्यायची. वृक्षवल्ली आपले म्हणणे अजूनही खरे करीत आहेत. माणूस मात्र अप्रामाणिकपणे वागतो आहे. बेबंदपणे जंगलतोड, वृक्षतोड करतो आहे. त्यामुळे पर्यावरणाचा तोल ढासळून त्याची शिक्षा माणसालाच मिळत आहे.'

पर्यावरणावर इतके सोपे फक्त तर्कतीर्थच बोलू शकत होते. माझे गावकरी आणि शाळेतील विद्यार्थी या आजोबांवर फारच खूश झाले होते.

सायंकाळी कणकवलीला झालेल्या ‘समग्र क्रांती’वरील भाषणालाही उदंड गर्दी. शास्त्रीजींनी अत्यंत मुद्देसूद मांडणी करून तोही कठीण विषय श्रोत्यांसाठी सोपा करून टाकला.

एवढा महान विद्वान एवढ्या गहन विषयावर एवढं सोपं बोलतो, आणि सोप्या शब्दांत प्रबोधन करतो, हा चमत्कारच म्हटला पाहिजे.

तर्कतीर्थांच्या घरी वाईला जाणे म्हणजे एक आनंद योग असे. कृष्णेच्या काठावर जुन्या पद्धतीचे, प्रशस्त, हवेशीर असे ते घर तर्कतीर्थांएवढेच शुचिर्भूत आणि प्राचीन वाटायचे. तेथून कृष्णेचे संथ पात्र दिसे आणि झाडावरचे घाट, मंदिरे, प्राचीन वाडे. विश्वकोशाचे ऑफीस म्हणजे एक कर्मयोग्याचे ज्ञानक्षेत्र. रस्त्याने शास्त्रीजींची मूर्ती संथगतीने जाऊ लागली की वाईतील रस्ते जणू पुनीत होत.

कालांतराने शास्त्रीजी वयोमानानुसार थकत होते. पण त्यांचा उत्साह उदंड होता. जिव्हाळ्याची माणसे भेटली की त्यांच्या रसवंतीला पाझर फुटत. विषय कोणताही असो, त्यावर त्यांचे असे स्वतंत्र आणि मार्मिक भाष्य असे. ते ऐकत राहावेसे वाटे.

साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय निवडणुकीसाठी मी उभा राहिलो तेव्हा सर्वप्रथम त्यांचे आशीर्वाद मागितले. ते त्यांनी दिलेच, पण निवडून आल्यावर अभिनंदनाचा निरोप पुण्याच्या "श्री विद्या प्रकाशना’च्या मधुकाका कुलकर्णींकडे पाठवला. एवढेच नव्हे तर रत्नागिरीला मुद्दाम साहित्य संमेलनाला ते उपस्थितही राहिले. साहित्य संमेलनाच्या सन्मानापूर्वी मी

ज्यांना लेखन कारकिर्दीच्या प्रारंभापासून दैवते मानत आलो होतो, त्या तिघांचे आशीर्वाद घेतले होते. त्यातील एक होते तर्कतीर्थ, दुसरे होते पु. ल. देशपांडे आणि तिसरे होते कविवर्य कुसुमाग्रज, त्या पैकी दोघांना तर्कतीर्थ आणि पु. ल. यांना साहित्य संमेलनाच्या वेळी पूर्वाध्यक्ष म्हणून व्यासपीठावर बसलेले पाहून माझ्या डोळयांत आनंदाश्रू आले होते आणि त्यांच्या बरोबरीने 'अध्यक्ष' म्हणून व्यासपीठावर बसताना विलक्षण संकोच वाटत होता आणि अभिमानही वाटत होता.

माझ्या शेजारच्याच खुर्चीवर तर्कतीर्थ बसले होते आणि त्यांचा आशीर्वादाचा शुभंकर हात माझ्या पाठीवर होता. साहित्य संमेलन अथपासून इतिपर्यंत निर्विघ्नपणे, अत्यंत यशस्वी प्रमाणात संपन्न झाले.

पुण्यवंतांची पुण्याई फळाला आली.

**(दक्षिण महाराष्ट्र साहित्य पत्रिका, कोल्हापूर.**
**जानेवारी-फेब्रुवारी, मार्च, २००६, पृ. ११ ते १६)**

OOO

## ७२.

# यशवंतराव, किसन वीर आणि तर्कतीर्थ

## अनिल जोशी

सातारा जिल्ह्याचा इतिहास घडला, त्यामध्ये क्रांतिकारकांची कामगिरी ही अत्यंत प्रामुख्याने नोंदली गेली आहे. राजकारण आणि समाजकारण यांना स्वतःच्या विचारांनी आणि कर्तृत्वाने वळण लावणाऱ्यांची असंख्य नावे या इतिहासाच्या पानापानांवर गर्दी करून राहिली आहेत. ज्ञानाच्या क्षेत्रात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे अग्रस्थानी राहिले तसे पारतंत्र्याच्या काळातील राजकीय क्षेत्रात किसन वीर, नाना पाटील यांच्यासारखी नेतेमंडळी नेतेपण करीत राहिली. पारतंत्र्याच्या अखेरच्या पर्वात विचार आणि आचार या दोन्ही स्तरांवर नेतृत्व करणाऱ्यात यशवंतराव चव्हाण हे अग्रस्थानी राहिले. त्यांनी जे कार्य केले त्यामध्ये 'घडविणे' हा एकमेव दृष्टिकोन होता. विचार आणि आचार या दोनही प्रकारांत यशवंतरावांची वृत्ती ही घडविणाऱ्याचीच राहिली. त्यांच्या एकूण स्वभावातच कोठेही 'मोडणे' हा प्रकार आढळत नाही. माणसे जोडणे आणि त्यांना राजकारण, समाजकारण, साहित्य, संस्कृती या सर्वच क्षेत्रांत संस्कारित करणं हाच त्यांचा स्थायीभाव ठरला. विधायकता ही यशवंतरावांच्या संपूर्ण जीवनाशी स्थिरावलेली वृत्तीच होती. सातारा जिल्ह्याची संपूर्ण घडण त्यांनी याच वृत्तीने करण्यात आयुष्य वेचले. आणि हीच नव्हती. वृत्तपत्राचे रकाने अनेक अनुकूल-प्रतिकूलतांनी भरण्याचा सपाटा जिल्ह्यात आणि राज्यात सुरू होता. सगळ्यांचे डोळे दिल्लीकडे वळले होते आणि यशवंतरावांनी या संबंधात तत्काळ निर्णय देण्यात विलंब केला होता. अनेकांनी या तणावमुक्त वातावरणात अधिकाधिक ताण निर्माण करण्याच्या कारवाया सुरू ठेवल्या होत्या. वेळ आणि साधारण कल पाहूनच यशवंतराव आपले मत व्यक्त करीत असल्याचा अंदाज बांधला जात होता. ठाम होकार, किंवा नकार दिल्लीकडून येईनासा होताच 'कुंपणावरचे राजकारण' या शब्दप्रयोगाचा जन्म झाला आणि त्याचा वायुवेगाने प्रसारपण झाला.

अखेरीस प्रत्यक्ष बैठक आयोजित करायची आणि कार्यकर्ते व नेते यांची मते जाणून

घ्यायची अशी स्थिती निर्माण झाली. खुद्द यशवंतरावजी दिल्ली ते सातारा या प्रवासात अत्यंत बेचैन मानसिकतेत आले. सातारा जिल्हा अखेरच्या निर्णायक शब्दाची वाट पाहात राहिला. यशवंतरावांचे मौन अनेकांना सुन्न करीत होते. सातारच्या सर्किट हाऊससमोर जमलेल्या कार्यकर्त्यां मानसिकता कमालीची ताणली गेली होती. रात्र पुढे सरकत राहिली तशी बेचैनी वाढत्या प्रमाणात कार्यकर्त्यांना सैरभैर करणारी ठरली. दोन मित्र आणि दोघेही नेते रात्री एकमेकांशी अत्यंत अंतराने बोलणार आहेत, असे विचार जमलेल्या आणि ताटकळलेल्या अन्य नेत्यांच्या मनास छळत राहिले. किसन वीर जसे मैत्रीस पक्के तसेच निर्णयाच्या बाबतीत कठोर होते. किसन वीरांची प्रतिक्रिया ही त्यांच्या चेहऱ्यावरच प्रकट होत होती. रात्र पुढे सरकली. अंधार लोपला आणि कानात प्राण आणून जमा झालेल्या कार्यकर्त्यांच्या समुदायास उद्देशून खुद्द यशवंतरावांनी प्रतिक्रिया आणि निर्णय म्हणून एकच वाक्य उच्चारले, "मी किसन वीर यांच्या पाठीशी सावलीसारखा उभा आहे." या सावलीची ताटातूट केवळ १९७९ च्या डिसेंबरात किसन वीर यांच्या मृत्यूनेच झाली.

किसन वीर यांचे निधन म्हणजे यशवंतरावांना बसलेला असह्य धक्का ठरला. २७ डिसेंबर १९७९ हा दिवस म्हणजे यशवंतरावांना अक्षरश: काळा दिवसच वाटला. किसन वीर यांचा मृत्यू म्हणजे आपल्या वैयक्तिक जीवनात निर्माण झालेली कमालीची पोकळी अशीच भावना यशवंतरावांना छळत राहिली. किसन वीर यांची वाई येथे निघालेली अंत्ययात्रा आणि त्यांच्या पार्थिवावरचे अंत्यसंस्कार यशवंतरावांना निराधाराच्या विचाराने घेरणारे ठरले. बालसदृश त्यांचा दुःखावेग आणि स्वतःचे वय, राजकीय स्थान, समोरचा हजारो लोकांचा जनसमुदाय या सर्वांचे विस्मरण करून यशवंतरावांचे हळवे मन त्यांच्या डोळ्यातील अश्रूधारांनी व्यक्त होत राहिले, यशवंतराव कृष्णेच्या तीरावर मित्रशोकाने अक्षरशः ढसाढसा रडताना कृष्णेच्या प्रवाहाने पाहिले. त्या दिवशीचा सूर्यास्त अत्यंत सूचक ठरला. पश्चिमेस दाटलेले मळभ नैराश्याच्या, शोकाच्या, पोरकेपणाच्या भावांनी अधिकच गडद झाले होते.

किसन वीर यांच्या वियोगाने यशवंतरावांचे राजकीय जीवन किमान सातारा जिल्ह्यात अस्थिर करण्याची भाषा बोलणारे लोकसंख्येने वाढत गेले. यशवंतरावांनी मूळची काँग्रेस सोडली होती. त्यामुळे नवीन पक्षाचे नेतृत्व स्वीकारून स्वतंत्रपणे वेगळे नेतृत्व उभे करण्यात त्यांची दमछाक होत असतानाचे अनेकांनी अनुभवले होते. खुद्द सातारा मतदार संघातच त्यांना आव्हान देणारी माणसे उभी राहिली. किसन वीर यांनी जी बाजू आजपर्यंत अत्यंत निष्ठेने आणि जबाबदारीने सांभाळली होती, ती बाजू समर्थपणे सांभाळेल असे नेतृत्व अद्याप उभे राहिलेले नव्हते. त्यामुळे १९८० ची लोकसभेची निवडणूक लढविताना यशवंतरावांना ज्या तऱ्हेने सर्व यंत्रणा उभी करावी लागली, त्यामध्ये विश्वासापेक्षा अविश्वासाने सर्व वातावरण व्यापून टाकल्याची जाणीव त्यांना होत राहिली. खुद्द बाबासाहेब मोरे यांची उमेदवारी म्हणजे यशवंतरावांना घरचेच आव्हान उभे राहिले होते.

"केंद्रातली सत्ता तुम्ही सांभाळा, आम्ही तुमचा मतदारसंघ अबाधित ठेवतो," असे आश्वासनात्मक बोलणे करणारी माणसे विचलित होत राहिली होती. शालिनीताई पाटील यांनी यशवंतरावांच्या विरोधात आपली उमेदवारी जाहीर केली. पारतंत्र्याच्या चळवळीत एकाच ध्येयाने आणि प्रेरणेने एकत्र राहिलेली वसंतदादांसारखी नेतेमंडळी आता राजकारणाच्या आखाड्यात प्रतिस्पर्धी म्हणून समोर आली होती. अत्यंत दर्जाहीन प्रचाराची भाषा सर्वत्र वापरली जात होती. आणि किसन वीर यांच्यासारखा खंदा पाठीराखा काळाच्या पडद्याआड गेला होता. शालिनीताईंच्या सभा सातारा मतदार संघात वेगाने सुरू होत्या. यशवंतरावांच्या पक्षबदलावर घणाघाती हल्ला होत होता. समर्थपणे आणि जशास तसे या प्रकारची प्रत्युत्तरे देणाऱ्या नेत्यांची दुसरी फळी कच खाताना यशवंतरावांनी अनुभवली होती. एकीकडे मित्राच्या निधनाने मन हळवे झाले तर दुसरीकडे सगेसोबती प्रतिस्पर्ध्यांच्या छावणीत सामील होत राहिल्याचे त्यांना दिसत होते. नुकतेच उदयास येत राहिलेले प्रतापराव भोसले यांच्यासारखे तरुण नेतृत्व यशवंतरावांना साथ देण्यासाठी धडपडत. त्यांच्याकडे राजसत्ता होती. पण संपूर्ण जिल्ह्यावर किंबहुना सातारा मतदार संघावर स्वतंत्र छाप राहील अशी स्थिती प्रतापरावांना यायची होती. निष्ठावंत पाठीराखा अशी त्यांनी निर्माण केलेली भूमिका अद्याप सर्वमान्य व्हायची होती.

जनसमूहाच्या गर्दीने ओसंडणाऱ्या सभा या वेळी आकाराने आकुंचित होत राहिल्या. वसंतदादा पाटील, यशवंतराव मोहिते आणि शालिनीताई यांनी यशवंतरावांच्या विरोधात उघडलेली आघाडी फार मोठे आव्हानाचे रूप धारण करीत होती. टीकेची पातळी घसरत होती. जानेवारी १९८०च्या पहिल्या आठवड्यात आता मतदार संघातील निवडणूक प्रचाराच्या अखेरच्या सभा आयोजित होत होत्या. शिरवळशेजारी असणाऱ्या शिंदेवाडीपासून दौऱ्यास आरंभ झाला. गावोगावच्या वेशींवर आजपर्यंत जयघोषाच्या घोषणा यशवंतरावांनी ऐकल्या होत्या. त्याच गावात लोक समोर येताना दबकत होते. एकदोन ठिकाणी त्यांच्याअभावी सभा करणे भाग पडले होते. यशवंतरावांच्या चेहऱ्यावर स्थिरावणारा विश्वास काहीसा अस्थिर होताना अनुभवास येत होता. लोहोम, कणेरी, असवली या ठिकाणच्या सभांना अत्यल्प प्रतिसाद मिळाला. खंडाळा येथील सभा आश्वासनात्मक झाली आणि पुढे झालेल्या एका सभेत खुद्द यशवंतरावांना त्यांच्या विरोधातल्या घोषणा ऐकविण्याचे जाणीवपूर्वक झालेले प्रयत्न त्यांच्यावर आघात करणारे ठरले. लोणंद, वाठार आणि देऊर येथील प्रचार सभा आटोपून आम्ही सर्व जण सातारच्या शासकीय विश्रामगृहात दाखल झालो तेव्हा रात्रीचे दोन वाजले होते. खुद्द सौ. वेणुताई तेथे सर्वांच्या भोजनाची वाट पाहात होत्या. अगदीच मोजकी मंडळी या वेळी बरोबर होती. रामभाऊ जोशी, भिलारे गुरुजी, सातारच्या काही ठरावीक मंडळींसमवेत रात्रीचे भोजन झाले. एकूण त्या दिवसाच्या प्रचार सभांतून जे ध्वनित झाले, त्याबद्दल यशवंतराव मोकळेपणाने बोलले नाहीत. पण त्यांचे अत्यंत मोजके पण दबक्या

आवाजातले बोलणे बरेच अर्थपूर्ण होते. अत्यंत सूचक शब्दांत यशवंतरावांनी रामभाऊ जोशी यांनी प्रश्न विचारला, "रामभाऊ, एकूण काय वाटते?" रामभाऊंचे तितक्याच मोजक्या शब्दांतले उत्तर अत्यंत सूचक होते, "साहेब, आपण मतदारसंघ सोडू नये. लक्ष ठेवणे बरे." रामभाऊ जोशी यांच्या या वाक्यातला अर्थ सर्व काही स्पष्ट करणारा होता. यशवंतरावांनी सातारा मतदारसंघ त्या वेळी अजिबात सोडला नाही. त्याचा परिणाम म्हणूनच यशश्री त्यांच्या बाजूने उभी राहिली. केवळ पन्नास हजारांच्या मताधिक्याने मिळालेले यश हे अत्यंत सूचक ठरले.

मित्रप्रेमाचा वियोग हा यशवंतरावांचा 'विक पॉइंट' होता. किसन वीर यांच्या स्मरणार्थ प्रतिमासी झालेल्या स्मरणसभांचा समारोप समारंभ वाईच्या द्रवीड हास्कूलच्या मैदानावर झाला. अत्यंत व्याकूळ मनःस्थितीत त्यांनी केलेले भाषण आणि त्यांच्या मनात कार्यकर्त्यांबद्दलची भरून राहिलेली आपुलकी या सर्व गोष्टी मन हेलावणाऱ्या होत्या. स्थिरतेची जागा अस्थिरता घेते आहे याची जाणीव त्यांच्या शब्दांतून ध्वनित होत होती. पण आपले खचलेपण प्रदर्शित न करता एका स्वतंत्र विषयाकडे वळायचे आणि मनास सावरायचे, हा यशवंतरावांचा स्वभाव याही वेळी अनुभवण्यास मिळाला. किसन वीर यांच्या शौर्य गाथा सांगण्यात त्यांना वेगळा आनंद आणि समाधान मिळत होते. स्वातंत्र्य लढ्यातील ४२ वे पर्व हा त्यांच्या दृष्टीने अत्यंत थरारक भाग होता. किसन वीर , छन्नुसिंग चंदेले आणि त्यांच्या साथीदारांनी येरवड्याच्या तुरुंगातून ज्या धाडसाने उड्या घेतल्या, त्यांचा इतिहास सांगून आपले मन मोकळे करीत राहायचे, असेही धोरण या त्यांच्या अखेरच्या पर्वात सातारा जिल्ह्यातील सभांमध्ये त्यांनी स्वीकारले होते.

वाई तालुक्यातील सुरूर या गावच्या एका शाळेच्या परिसराचे 'वीरबाग' असे नामकरण करण्याचा समारंभ आयोजित करण्यात आला होता. जयंतराव टिळक, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी आणि यशवंतरावजी यांच्या साक्षीने हा समारंभ साजरा झाला. आजपर्यंत राजकीय विषयांवर भाष्य करणारे यशवंतराव, सामाजिक प्रश्नांवर मते मांडणारे यशवंतराव, महाराष्ट्राच्या शैक्षणिक धोरणावर बोलणारे यशवंतराव, कार्यकर्त्यांना प्रेरित करणारे यशवंतराव, देशातील आर्थिक स्थितीवर मते मांडणारे यशवंतराव, राज्यातील पाणीपुरवठा योजनांवर धोरणात्मक रीतीने बोलणारे यशवंतराव या समारंभात मात्र अत्यंत वेगळेच रूप घेऊन सर्वांसमोर आलेः

लोकप्रतिनिधी म्हणून आपण संसदेत कोणती कामगिरी केली आणि लोकप्रतिनिधीचे संसदेत कोणते काम महत्त्वाचे ठरते, हा त्यांनी भाषणासाठी निवडलेला खास विषय होता. यशवंतराव अत्यंत वेगळ्या रूपात सर्वांसमोर आल्याचे त्या वेळी अनुभवास आले. सत्तेमध्ये वावरणारे यशवंतराव आणि लोकप्रतिनिधी म्हणून वावरलेले यशवंतराव, सामान्य माणसाचे प्रतिनिधित्व करणारे यशवंतराव, याच सामान्य माणसाच्या दैनंदिन प्रश्नावर भूमिका घेऊ

पाहात असलेले यशवंतराव आणि सामान्य माणसाला संसद समजावून सांगणारे यशवंतराव अशा विविध पैलूंचे रूप त्यांनी 'वीरबाग' नामकरणाच्या भाषणातून प्रदर्शित केले.

सामान्य माणसासदेखील यशवंतराव आपले वाटत राहिले; याचे कारण म्हणजे त्यांनी परिसर आणि परिसरातील इतिहास-भूगोल, संस्कृती, परंपरा आणि इथल्या माणसाची आपुलकीची नाळ जपण्यात दाखविलेला भावनिक ओलावा होता.

पुणे-कराड प्रवासात एका प्रसंगी सारोळयाजवळील नीरेचा पूल ओलांडला आणि यशवंतरावांची गाडी अचानक थांबली. त्यांच्या गाडीचे चाक पंक्चर झाले होते. मागून आलेल्या दुसऱ्या गाडीतून प्रवास सुरू ठेवणे त्यांनी नाकारले आणि दुसरे चाक बसवून होईपर्यंत पायी चालणे त्यांनी पसंत केले. वेळ सायंकाळची होती आणि भोरच्या दिशेने सूर्य डोंगराआड जाण्याच्या तयारीत होता. पायी चालताना यशवंतरावांना आसमंतातील गड-किल्ल्यांच्या आठवणी खुणावत राहिल्या. हात मागे बंधून झपाझप पावले टाकणारे यशवंतराव ह्या वेळी इतिहासातील पाने उलगडत होते. बरोबर चालणारे त्यांचे सचिव डोंगरे, रामभाऊ जोशी, कुमार जोशी, दोन कार्यकर्ते यांच्याच संगतीने मी पाऊल टाकीत होतो. एका टप्प्यावर यशवंतराव थोडे थांबले आणि पश्चिमेकडे नजर टाकीत शिवरायांच्या जीवनकथांच्या आठवणींनी सद्गदित झाले. प्रथमची राजधानी असणारा राजगड, पलीकडे उभा असणारा सिंहगड आणि पाठीशी उभा असणारा पुरंदर या सर्वांकडे अंगुलीनिर्देश करीत यशवंतरावांच्या वाणीतून शिवरायांच्या शौर्यगाथेतील प्रसंग ऐकताना हा इतिहासप्रेमी नेता पूर्वसुरींच्या कर्तृत्वाबद्दलची कृतज्ञता व्यक्त करताना मला पाहण्यास मिळाला. त्यांची भाषा, इतिहासप्रेम, मावळयांच्या त्यागाबद्दलचा कृतज्ञताभाव आणि खुद्द मातीवरचे प्रेम यांचे घडलेले सम्यक दर्शन यांतून यशवंतरावांबद्दलच्या सर्व आदराच्या भावना माझ्या मनात भरून राहिल्या. या घटनेस आता तीन दशकांहून अधिक वर्षांचा काळ लोटला तरी इतिहासाचा सार्थ अभिमान प्रदर्शित करणारा यशवंतरावांचा चेहरा आजही डोळयांसमोर येत राहतो.

सत्तेच्या स्थानांचा अत्यंत काटेकोर वापर करून काही व्यावहारिक मूल्ये जपणे हा यशवंतरावजींचा स्वभावविशेष होता. सातारा जिल्ह्याच्या दौऱ्यावर आल्यानंतर प्रतागडावरच्या भवानी मातेचे दर्शन घेऊन सश्रद्ध मनाने आशीर्वादासाठी देवीस साकडे घालणारे यशवंतराव अत्यंत भक्तिभावाने मन जपणारे म्हणून समोर आलेले आहेत.

असाच एक दौरा कराड-सातारा-महाबळेश्वर-महाडमार्गे मुंबईसाठीचा झाला. बरोबर मोजकी मंडळी होती. महाबळेश्वरच्या हॉलीडे कॅम्पमध्ये रात्रीचे वास्तव्य होते. या परिसरातील वनश्री आणि इतिहासाची साक्ष देणारा प्रतापगड यांचे यशवंतरावांना जितके आकर्षण होते त्याहीपेक्षा प्रतापगड ही त्यांची अभिमानाची बाब होती. सायंकाळी मावळतीचा सूर्य आणि त्याच्या पश्चिमेस उमटलेल्या बहुरंगी किरणांच्या लाटा निरखताना यशवंतरावांच्या चेहऱ्यावर

त्यांच्यातील सारी रसिकताच एकवटली होती. ती पाहण्याची मला संधी मिळाली. मंत्रमुग्ध मनाने त्या सूर्यास्ताचे दर्शन घेणारे यशवंतराव हे वेगळ्या रूपात पाहण्यास मिळाले. सूर्यास्त झाला आणि पश्चिमेच्या वाऱ्याचा सुखद अनुभव आणि नंतरच्या राजकारणविरहित गप्पा यांत रमलेले यशवंतराव ज्या मनाने आम्हा सर्वांत मिसळले होते, त्याच्या आठवणी मनात गर्दी करून राहिल्या आहेत.

रात्री भोजनानंतर ठरावीक चार-दोन विश्वासू मंडळींशी गप्पा आणि काही विशेष बोलणी हा यशवंतरावांचा नित्याचा शिरस्ता होता. त्या दिवशी भोजनोत्तर गप्पांत किसन वीर, भिलारे गुरुजी, श्रीपाद डोंगरे, रामभाऊ जोशी आणि या सर्वांच्या आजूबाजूस मला असण्याची संधी लाभली होती. अत्यंत सूचक बोलणी आणि सातारा जिल्ह्यातील राजकीय घटनांबद्दलचे सूचक शब्दांतील सल्ले देणारे यशवंतराव याप्रसंगी अनुभवता आले. या सर्व प्रकारात अत्यंत मार्मिक विनोदानंतर केवळ स्मितहास्याने प्रतिसाद देणारे यशवंतराव हे स्वतंत्र रूपातले पाहण्यास मिळाले. वेणूताईंच्या या वेळच्या उपस्थितीने प्रत्येकासच विनोदाच्या मर्यादा निर्माण झाल्या होत्या; पण हास्य-विनोदात रमलेले हे राजकीय नेतृत्व अनुभवताना नवा ठसा मनावर उमटवून गेले.

सकाळच्या सर्व गोष्टी उरकल्यानंतर एकत्र नाश्ता ही यशवंतरावांची खासियत अनुभवता आली. प्रवासाची पुढील आखणी आणि महत्त्वाची कामे या बाबत श्री. डोंगरे यांच्याबरोबरची चर्चा संपली. एकत्र नाश्त्याचा आस्वाद झाला आणि यशवंतरावांनी विचारले, "डोंगरे, नाश्ता कोठून आणला?" डोंगरेंनी खुलासा केला. यशवंतरावांनी वेणूताईंना सूचित केले, ''वेणू, बिलाचे पैसे दिलेस का?''

वेणूताईंनी पैसे पुढे करताच डोंगरे म्हणाले, ''साहेब, पैसे दिले आहेत.'' "डोंगरे, आज बरोबर असणारे सर्वजण माझे पाहुणे आहेत. हे शासकीय अधिकारी नाहीत. यांच्या नाश्त्याचे पैसे मलाच दिले पाहिजेत." यशवंतरावांच्या या बोलण्यानंतर डोंगरेंनी सौ. वेणूताईंकडून बिलाचे पैसे स्वीकारले. हा प्रसंग अनुभवताना सत्तेची झूल बाजूस ठेवून गृहस्थाच्या कर्तव्यभावनेने वागणारे यशवंतराव समोर आले.

यशवंतरावांच्या मित्रपरिवारात विश्वासाचे आणि आदराचे स्थान तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे होते. राजकारण, साहित्य, संस्कृती, समाजकारण, शिक्षण आणि या सर्वांपलीकडे हृदयाचे बोलणे ज्यांच्याजवळ करायचे त्यात तर्कतीर्थ जोशी होते. शास्त्रीजींचे आणि यशवंतराव यांचे संबंध सुमारे पंचेचाळीस वर्षांचे होते. सातारा जिल्ह्यात येणे झाले की, शास्त्रीजींच्या बरोबरची बैठक ही ठरलेलीच असायची. राजसत्तेत असताना निर्माण झालेल्या कटु-गोड प्रसंगात तर्कतीर्थ जोशी यांनी दिलेली साथ ही वैचारिक स्वरूपाची होती; पण त्याचबरोबर ध्येय-धोरणांच्या चर्चांचीसुद्धा होती. सुखदुःखाची बोलणी करण्याचे हक्काचे घर म्हणूनच शास्त्रीजींच्या घराशी यशवंतरावांचे नाते जडले होते.

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर इथल्या मराठी माणसाच्या ज्ञानवृद्धीसाठी ज्या प्रकल्पांची निर्मिती यशवंतरावांनी केली, त्यामध्ये मराठी विश्वकोशाचा विशेषत्वाने समावेश होता. शास्त्रीजींच्या ज्ञानसाधनेसंबंधात असणारा आदर आणि त्यांच्या बौद्धिक उंचीवरचा विश्वास म्हणूनच मराठी विश्वकोश प्रकल्प यशवंतरावांनी शास्त्रीजींकडे सोपवला. साहित्य-संस्कृती मंडळाची स्थापना आणि त्याची जबाबदारी शास्त्रीजींकडेच सोपविण्याचा यशवंतरावांनी घेतलेला निर्णय अत्यंत दूरदर्शीपणाचा ठरला. या विश्वकोशाच्या कामाची वाटचाल पाहणे हे यशवंतरावांना केंद्रसत्तेमधील कामामुळे अनेकदा शक्य झाले नाही, तरीदेखील सातारा-पुणे परिसरातील राजकीय किंवा अन्य कामांच्या दौऱ्यात या दोघांची होत राहिलेली भेट आणि चर्चा एवढे पुरेसे ठरत होते. प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या राजकीय निर्णयात व्यक्त होणारी धोरणे आणि तर्कतीर्थ जोशी यांच्या समीक्षा यांमध्ये सापडणारी साम्यस्थळे अर्थपूर्ण होती. आपला वैचारिक प्रवासातील ज्येष्ठ साथीदार म्हणूनच यशवंतरावांनी तर्कतीर्थ जोशी यांना अखेरपर्यंत मान्यता दिली होती. आणीबाणीच्या काळातील कराडचे साहित्यसंमेलन आणि तर्कतीर्थ जोशी यांचे त्या वेळचे भाष्य हा मराठी माणसाच्या अत्यंत कुतुहलाचा भाग होता. खुद्द यशवंतरावांच्या यजमानपदाच्या या साहित्य संमेलनातील दुर्गा भागवत आणि तर्कतीर्थ जोशी यांची भाषणे या अत्यंत वादग्रस्त बाबी ठरणार, याची शक्यता म्हणूनच त्यांची भाषणे ही प्रसृत झाली नाहीत. परंतु त्या वेळची यशवंतरावांची बेचैन मानसिकता तर्कतीर्थांनी अनेक वेळा बोलून दाखविली होती. राजकीय चढ-उतारामध्ये जशी किसन वीर यांनी यशवंतरावांची अनेक प्रसंगी पाठराखण केली, तशीच तर्कतीर्थ जोशी यांची साथ राजकारणासहित जीवनव्यवहारात होत राहिली होती.

१९७५ मध्ये तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या अमृत महोत्सवी सोहळयाचा कार्यक्रम आखला गेला. खुद्द यशवंतरावांकडे या अमृत महोत्सव समितीचे अध्यक्षपद राहिले. हा कार्यक्रम म्हणजे बौद्धिक मेजवानी ठरावी असा यशवंतरावांचा सांगावा होता. न. र. फाटक यांच्या अध्यक्षतेखाली आणि ज्ञानपीठ पुरस्कार विजेते उमाशंकर जोशी यांच्या हस्ते हा अविस्मरणीय सोहळा वाई येथेच यशवंतरावांनी घडवून आणला. अ. भि. शहा, वि. म. दांडेकर, रा. ना. दांडेकर, पु. ल. देशपांडे, सेतू माधवराव पगडी, न. र. फाटक यांच्या उपस्थितीत या अमृत महोत्सवी सत्कार सोहळयाच्या निमित्ताने यशवंतरावांनी तर्कतीर्थ जोशी यांच्या जीवन प्रवासातील सांगितलेल्या प्रसंगांतून जो आदर, जे प्रेम आणि स्नेह व्यक्त झाला त्यातून त्या दोघांतील नात्यांचे पैलू निदर्शनास आले. मैत्रीच्या नात्यात व्यवहार येणार नाही याबाबतची उभयतांच्या वर्तनातील साम्यस्थळे वारंवार समोर येत राहिली.

राष्ट्रीय काँग्रेसचे यशवंतरावांनी मध्यंतरीच्या काळात संबंध तोडले आणि इंदिरा काँग्रेसचे नेतृत्व स्वीकारले. ही घटना तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना पसंत पडली नाही. संसदेमध्ये विरोधीपक्षात राहून सत्तेवरील नेत्यांच्या ध्येयधोरणांवर अंकुश ठेवणे, प्रसंगी

टीकेची झोड उठविणे आणि अत्यंत कडाडून विरोध करणे अशी यशवंतरावांची मानसिकता नव्हती, असे मत तर्कतीर्थ जोशी यांनी अनेक वेळा व्यक्त केले होते. विरोधकांत वावरताना होणारी कुचंबणा यशवंतराव अनुभवीत होते आणि आपले स्वकीय दुरावल्याचे असीम तणावदेखील सोसत होते. ही त्यांची स्थिती त्यांना दीर्घकाळ टिकविता येणारी नाही अशी सूचकता तर्कतीर्थ जोशी यांनी मांडण्याचा अटोकाट प्रयत्नदेखील केला होता. राज्यातील आणि केंद्रातील असंख्य छोटे-मोठे नेते आणि कार्यकर्ते बेचैनीस सामोरे जात होते.

दरम्यान यशवंतरावांच्या कार्याशी आणि विचारांशी एकरूप झालेले नेते इंदिरा गांधींच्या धोरणांशी एकरूप होणे कठीण होते. त्यामुळे इंदिरा गांधी आणि त्यांचे समर्थक आणि यशवंतराव आणि त्यांचे समर्थक अशी फळी सातारा जिल्ह्यात उभी राहिली. १९७८ च्या निष्ठावंतांचा स्वतंत्र गट आकार घेत राहिला. यशवंतरावांच्या कार्यकर्त्यांच्या मनात इंदिरा गांधींबद्दल कमालीचा विरोध आणि असंतोष उफाळत राहिला. तो इतका टोकास गेला की, इंदिरा गांधींच्या पश्चिम महाराष्ट्राच्या दौऱ्याप्रसंगी हा संताप कृतीतून बाहेर आला. इंदिरा गांधी सातारा जिल्ह्यात येणार म्हणून निष्ठावंतांनी रस्त्यारस्त्यावरच छोटेखानी सभांचे आयोजन केले होते. जनसमुदायासमोर इंदिराजी बोलत राहिल्या. त्यांचा हा धावता दौरा वाई तालुक्यातील पाचवड या ठिकाणी आलेल्या लोकांच्या घोळक्यासमोर काही काळ थांबविण्यात आला. वाई तालुक्यातील इंदिरानिष्ठ नेते के. बी. जमदाडे हे या सभा आयोजनात अग्रभागी होते. परंतु अनेक संस्थांच्या पदांवर आरुढ झालेले ग्रामपातळीवरचे आणि तालुका पातळीवरचे नेते-कार्यकर्ते एकत्र येऊनदेखील इंदिराजींच्या स्वागतास पुढे सरसावले नाहीत. उलटपक्षी इंदिराजींनी सभा संपविली आणि उपस्थितांसमोर निरोप घेण्यासाठी हात जोडले. त्या वेळी त्यांच्या मोटारीच्या दिशेने दगडफेक करणारे नेते-कार्यकर्ते आपल्या या दगडफेकीच्या कृत्याचे रसभरीत वर्णन करण्यातच रमले होते. ही अत्यंत लांच्छनास्पद अशी घटना सातारा जिल्ह्यातच घडावी, याचे वृत्त यशवंतरावांच्या कानी जाताच ते कमालीचे अस्वस्थ झाले. त्यांनी आपली ही अस्वस्थता तर्कतीर्थ जोशी यांच्याशी झालेल्या टेलिफोनवरील संभाषणात व्यक्त केली आणि ही स्थिती काँग्रेस पक्षास आणि पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या दृष्टीने उचित नसल्याचे मत यशवंतरावांनी नोंदविले होते.

पक्षत्यागाने झालेली सत्ताावियोगाची स्थिती फार काळ राहिल्यास महाराष्ट्रातील सामान्य कार्यकर्त्यांची होणारी फरफट यशवंतरावांच्या जिव्हारी लागली होती या सर्व अवस्थेतून बाहेर पडणे ही काळाची गरज असल्याची जाणीव वाढत राहिली. त्याच सुमारास केवळ आपली मानसिक कुचंबणा बोलली पाहिजे, त्यामधून काही मार्ग दिसतो का तो शोधावा, कार्यकर्त्यांना दिलासा मिळावा अशा विचारांतच रात्रंदिवस गुंतलेले यशवंतराव वाईस तर्कतीर्थ जोशी यांच्या निवासस्थानी आले. अत्यंत खासगी स्वरूपाची ही भेट म्हणूनच त्याकडे पाहिले जात होते. त्यामुळे कार्यकर्त्यांचा अगर स्थानिक नेत्यांचा कोणताही गराडा

यशवंतरावांबरोबर नव्हता. तर्कतीर्थ जोशी यांच्या अभ्यासिकेत शास्त्रीजी, श्रीपाद डोंगरे आणि रामभाऊ जोशी यांचीच ही बैठक झाली. परंतु या सर्वांना चहापान पोचविण्याच्या कामांची जबाबदारी तर्कतीर्थ जोशी यांनी माझ्यावर सोपविली होती. हळूहळू मनातील विचारांना यशवंतराव अत्यंत मोजक्या शब्दांत वाट करून देत होते. वातावरणात कमालीचा तणाव होता, गांभीर्य होते. शांतता सूचक होती. सुमारे अर्धा तास चर्चा सुरूच राहिली आणि यशवंतरावांच्या मनातील विचारांची मांडणी होताच शास्त्रीजींचा अत्यंत गंभीर शब्दांतील सल्ला होता, ''यशवंतरावजी, आपण स्वगृही यावे हे उचित ठरेल.'' यावर यशवंतरावजींची प्रतिक्रिया होती, ''शास्त्रीजी, पाहू या.'' यावरच चर्चेचा शेवट झाला. परंतु हा प्रवेश लांबवला गेला. शास्त्रीजींनी यानंतर यशवंतरावांना लिहिलेले पत्र फारच स्पष्ट होते.

वाई येथून ३ ऑगस्ट १९८१ रोजी तर्कतीर्थ जोशी यांनी यशवंतरावांना लिहिलेले हे पत्र:

आपला इंदिरा काँग्रेस प्रवेश लांबलेला दिसतो. आपल्या प्रवेशाच्या संकल्पावरच्या प्रतिकूल प्रतिक्रिया मी येथून जर्मनीस जाण्यापूर्वीच सुरू झाल्या होत्या. प्रवेश लांबल्याबद्दल, म्हणजे प्रवेश न मिळाल्याबद्दल अनेकांचे मत अधिक प्रतिकूल झाले आहे. जे अनुकूल होते तेही विषण्ण झाले आहेत. अनेक महत्त्वाच्या व्यक्ती खासगी रीतीने माझ्यावरही टीका करीत आहेत. मी फार चुकीचा सल्ला देऊन प्रमाद केला आहे, असेही म्हणतात. अनेक मित्रांना असेही वाटते की, महाराष्ट्राला एक फार चांगला, समंजस, धोरणी, चिंतनशील, विवेकी, राजकारणी, मुत्सद्दी यशवंतरावांच्या रूपाने योगायोगाने लाभला होता. परंतु या नव्या इंदिरा काँग्रेस प्रवेशाच्या संकल्पामुळे आणि विशेषतः इंदिराजींनी प्रवेश न देता अपमानित केल्यामुळे महाराष्ट्राच्या सुपुत्राचे महान यत्न कलंकित झाले आहेत.

यश आणि अपयश, मान आणि अपमान या द्वंद्वांना विशेष महत्त्व नाही. त्यांना महत्त्व आहे ते केवळ आपल्या स्वत:च्या आचरणाचे व कृतीचे मूल्यमापन करण्याकरिता. हा दृष्टिकोन मला भगवद्गीतेपासून मिळाला आहे. कारण 'भगवद्गीता' ही राजनीतिशास्त्रातून निघालेली परमार्थनीती होय. राजनीतिशास्त्राचे अधिष्ठान असलेली परमार्थनीती त्यात सांगितली आहे. ख्रिस्ताने म्हटले आहे, 'दार ठोठवा म्हणजे उघडेल.' यावर माझे म्हणणे असे की, 'द्वारापर्यंत जावे, दार ठोठवावे. नाही उघडले तर उघड्यावर बसावे.' महाराष्ट्राची हवा समशीतोष्ण असल्यामुळे उघड्यावर बसले तरी हरकत नाही, राजकारणाच्या दृष्टीने पाहिले असता असे दिसते की, भारतीय लोकशाहीने आतापर्यंत बेबंदशाही, हुकूमशाही किंवा अधिकारशाही टाळली आहे. आणि याचे श्रेय गेल्या दीडशे वर्षांच्या भारतीयांच्या राजकीय इतिहासाला आहे. दादाभाईंपासून नेहरूपर्यंतच्या नेतृत्वामध्ये लोकशाही मूल्यांचे संदेश प्रकट झाले आहेत. इंदिरादेखील या परंपरेशी निष्ठेने वागण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु परिस्थितीच्या शक्ती इतक्या विलक्षण आणि जबरदस्त आहेत की, त्यामुळे ही महान लोकशाही टिकवून धरणे, दिवसेंदिवस अधिकाधिक कठीण होणार आहे. अधिकारशाही,

हुकूमशाही किंवा लष्करशाही भारताचे दुर्दैवच ठरेल. हे दुर्दैव टाळता येण्याची शक्ती, भारतीय माणसाला आहे की नाही याची अग्निपरीक्षा होण्याची वेळ येऊन ठेपली आहे.

आजच्यासारख्या परिस्थितीत आपल्यासारख्या अनुभवी, मुरब्बी व्यक्तीचे सहकार्य हे फार मोलाचे ठरेल, याची इंदिराजींना जाणीव असावयास पाहिजे. तशी ती जाणीव आहे की नाही, हे नजीकचा काळ ठरवेल. तरुणांना संधी द्यावी, हेही योग्य होय; परंतु 'तारुण्य' हे शहाणपणाचे मूल्यमापक नव्हे. तरुणांना संधी देताना फार काळजी घ्यावी लागेल. ज्ञानवृद्धत्व हेच खरे शहाणपणाचे मूल्यमापक ठरते. ज्ञान म्हणजे अनुभवजन्य प्रज्ञा.

वाई, जि. सातारा ३ ऑगस्ट १९८१

यशवंतरावांनी स्वगृहात पुनर्प्रवेश केला. महाराष्ट्रातील हजारो कार्यकर्त्यांनी सुटकेचा श्वास सोडला. कोंडी फुटली होती.

यशवंतरावजींच्या जीवनातील अखेरचे पर्व अनेक दुःखद आणि क्लेश निर्माण करणाऱ्या घटनांनी व्यापलेले होते. त्यांच्या पुतण्याचे शिरवळनजीक झालेले अपघाती निधन ही त्यांच्या दृष्टीने अत्यंत धक्कादायक घटना होती. वेणूताईंचे निधन ही यशवंतरावांच्या जीवनाच्या अखेरच्या टप्प्यातील नुसती धक्कादायक घटना ठरली नाही तर त्या घटनेने यशवंतरावांची जगण्याची उमेदच कमी कमी होत राहिली.

मुंबई येथे सागरात अस्थिविसर्जनाचा कार्यक्रम संपवून कमालीच्या खिन्न मनोवस्थेत यशवंतराव पुण्यास आले होते. सेनापती बापट पथावरील त्यांच्या पुतण्याच्या घरी त्यांचे वास्तव्य होते. सांत्वनासाठी आपण समक्ष गेले पाहिजे असा निर्णय घेऊन दुपारी चारच्या सुमारास आम्ही पुण्यात दाखल झालो. बैठकीच्या खोलीत शास्त्रीजी, त्यांचे स्वीय साहाय्यक राम कोल्हटकर, मी स्वतः आणि भेटावयास आलेली अन्य चार-दोन मंडळी यांची उपस्थिती होती. आत यशवंतरावजी विश्रांती घेत होते. पण शास्त्रीजी भेटण्यास आले आहेत, या निरोपाने बाहेरच्या बैठकीच्या खोलीत आले. नैराश्य, औदासीन्य आणि शोकभावनांनी निस्तेज झालेला यशवंतरावजींचा त्या वेळचा तो चेहरा पाहून जमलेल्या माणसांचे डोळे अश्रूंनी डबडबले. शास्त्रीजी आणि यशवंतराव एकाच कोचावर एकमेकांशेजारी बसले. आणि मुखातून शब्द बाहेर येण्याअगोदरच दोघांच्याही डोळ्यांतून दुःखाश्रूंनी वाट काढली. यशवंतरावांनी शास्त्रीजींच्या खांद्यावर डोके टेकले आणि व्याकूळ झालेल्या एखाद्या मुलासारखे हुंदके देताना त्यांना मी पाहिले. आम्हा उपस्थितांची याप्रसंगी जी अवस्था झाली ती सांगण्यास शब्दच नाहीत. सुमारे पाच-सात मिनिटे त्या ठिकाणी जी शांतता होती ती जितकी भेदक होती तितकीच डोळ्यांचे बांध फोडणारी होती. कोणीच कोणाशी बोलत नव्हते. शास्त्रीजींनी यशवंतरावांच्या पाठीवरून सांत्वनाचा हात फिरवला. या स्पर्शाने यशवंतरावांनी स्वतःस सावरले. आपले डोळे पुसले आणि ते शास्त्रीजींना म्हणाले, ''शास्त्रीजी, माफ करा. पण हे आता सहन होत नाही.''

शास्त्रीजीः यशवंतरावजी, वेणुताईचा आणि आपला किती काळचा सहवास राहिला?

यशवंतरावः चाळीस वर्षांहून अधिक!

शास्त्रीजी: आपल्या संपूर्ण वैवाहिक जीवन प्रवासात वेणूताईंची मोलाची साथ लाभली, सावली होती ती आपली.

यशवंतरावजीः खरे आहे, शास्त्रीजी. वेणूने असंख्य चढउतार सोसले. पण कधी तक्रार नाही केली. मला तिने नुसती साथ दिली नाही, तर मला प्रसंगात उभे करण्याचे तिचे प्रयत्न होते.

शास्त्रीजी: तिला माऊलीचे मन होते आणि योगिनीचे रूप होते.

शास्त्रीजींच्या या बोलण्याने यशवंतराव अधिकच सद्गदित झाले. डोळयांच्या कडा पुन्हा ओलावल्या.

शास्त्रीजी: वेणुताईंचा हा सहवास आता उरला नाही. पण त्यांनी जे काही तुम्हांस दिले त्याची कृतज्ञता आपल्या डोळयांतील अश्रूंनी बोलून दाखविली. पत्नीच्या वियोगाने आपल्या डोळयांत जमा झालेले अश्रू हे दुःखाश्रू नाहीत. ते कृतज्ञतेचे अश्रू आहेत.

शास्त्रीजींच्या वरील बोलण्याने यशवंतरावांच्या चेहऱ्यावरचे भाव क्षणार्धात बदलले आणि आपले डोळयातले अश्रू हे दुःखाचे नाहीत तर कृतज्ञतेचे आहेत. हा अश्रूंचा अर्थ शास्त्रीजींनी सांगताच यशवंतराव जागेवरून उठले आणि शास्त्रीजींचें अक्षरशः त्यांनी पाय धरले. ते म्हणाले, "शास्त्रीजी, मी आपला आभारी आहे."

दोन मित्रांमधला हा संवाद जितका भावनिक होता तितकाच वेगळे जीवनार्थ सांगणारा होता.

तर्कतीर्थ जोशी आणि यशवंतराव हे साहित्य, राजकारण, समाजकारण या क्षेत्रातले सहप्रवासी होते. त्यांचे एकमेकांतील संवाद म्हणजे महाराष्ट्राचा साठ वर्षांचा इतिहासच म्हणावा लागेल. यशवंतरावांच्या प्रत्येक निवडणुकीच्या उमेदवारी अर्जात शास्त्रीजी सूचक-अनुमोदक अशी भूमिका बजावत होते. एवढेच नव्हे; तर यशवंतरावांच्या निवडणूक सभांची सुरुवातच शास्त्रीजींनीच केली होती.

सत्तेतून झालेली पीछेहाट आणि जीवनसाथी वेणूताईंचे निधन या घटना यशवंतरावांना नुसत्या असह्य ठरल्या असे नाही तर त्यामुळे ते खचत गेले. मनाची उभारी हळूहळू लोपत राहिली. जीवनसाथीचा वियोग हा जसा जबरदस्त धक्का देणारा आणि पोकळी निर्माण करणारा होता, तसाच प्रकार राजकारणातले साथीदार दूर होत आहेत याची भेदक जाणीव यशवंतरावांना सतावत राहिली आणि अशाच मनःस्थितीत त्यांनी इहलोकीचा प्रवास संपविला. त्यांच्या निधनाची वार्ता संपूर्ण राज्याची झोप उडविणारी होती. संपूर्ण महाराष्ट्र आता 'आपल्या' नेत्याच्या निधनाने दुःखसागरात बुडाला.

यशवंतरावांच्या लेखी किसन वीर आणि तर्कतीर्थ जोशी यांच्या संबंधांत ज्या नात्याच्या भावना होत्या त्यांचा राज्यातील राजकीय नेत्यांना धागा कितपत सापडला हा संशोधनाचा विषय आहे. पण किसन वीर यांच्या निधनानंतर वेणूताईंनी किसन वीर यांचा फोटो त्यांच्या देवघरात ठेवला आणि देवाचे दर्शन घेताना, किसन वीर यांचे स्मरण करताना दोघांच्याही मनातील पूज्य भाव व्यक्त होत राहिला. यातूनच राजकारणातील सत्तेच्या अंगाने गेलेली नाती आणि मनाच्या गाभाऱ्यात मित्रास ध्यान देताना यशवंतराव चव्हाण यांनी व्यक्त केलेला आदर हे रसायन जाणणारी नेतेमंडळी संख्येने अत्यल्प असावीत हे दुर्दैव म्हणावे लागेल.

**('यशवंत स्मृतिसुगंध' मधून, संपा. राजाभाऊ जोशी,**
**एप्रिल - २००९ . पृ. १९१ ते २०३)**

○○○

## ७३.

# शास्त्रीजींबद्दलच्या काही व्यक्तिगत आठवणी

## श्री. ना. नानजकर

२७ मे १९९४ रोजी शुक्रवारी पहाटे महाबळेश्वर येथे "कृष्णादर्शन" या त्यांच्या आवडत्या वास्तूत तर्कतीर्थांचे अकस्मात अकल्पित देहावसान झाले. पंचपंच उषःकाली, कोणालाही न पत्ता लागू देता शास्त्रीजी अनंताच्या प्रवासाला निघून गेले. सर्वांगीण परिवर्तनाचा चालताबोलता ज्ञानकोश अशा शब्दांत त्यांचे वर्णन करता येईल. कवी कुलगुरू कालिदासाच्या शब्दांत "पूर्वापरी ज्ञाननिधी वगाह्य स्थितः शारदायाइव मानदंड:।" असे त्यांचे वर्णन करता येईल.

या लेखामध्ये शास्त्रीजींच्या काही व्यक्तिगत आठवणी मी सांगणार आहे. सध्याचे किसन वीर महाविद्यालय हे वाईच्या प्राज्ञपाठशाळेने सुरू केले. १९६२ ते ६९ पर्यंत चालविले. १९६२ साली वाई महाविद्यालय पुणे विद्यापीठाच्या कक्षेत येत होते. पुणे विद्यापीठाचे कमिशन महाविद्यालयाची प्राथमिक पाहणी करण्यासाठी आले. त्यामध्ये पुण्याच्या एका प्रसिद्ध महाविद्यालयाचे प्राचार्य हे एक सभासद होते. ते शास्त्रीजींना म्हणाले, "अहो शास्त्रीबुवा, उद्या तुम्ही पसरणीला महाविद्यालय मागाल!" शास्त्रीबुवा म्हणाले, "मी हे महाविद्यालय सध्याच पसरणीला मागतोय." सर्वजण आश्चर्यचकित झाले. कारण महाविद्यालयाची वास्तू डॉ. गोखले यांचा पूर्वीचा दवाखाना- स्वस्तिक सॅनिटोरियम- वाई नगरपालिकेच्या हद्दीच्या बाहेर, पसरणी ग्रामपंचायतीच्या हद्दीत येते. अनेक वेळा व्याख्यानांतून शास्त्रीबुवांनी हा किस्सा रंगवून सांगितलेला आहे. आज या महाविद्यालयात मानव्य-वाणिज्य व विज्ञान अशा शाखा असून तीन हजारांवर मुले-मुली शिक्षण घेत आहेत. ग्रामीण भागातील मुलामुलींची शिक्षणाची ओढ शास्त्रीबुवांनी अचूकपणे हेरली होती. आमच्याकडील शहरी शिक्षणतज्ज्ञांना हे प्रश्न कधी कळलेच नाहीत.

महिलांच्या शिक्षणाबाबत शास्त्रीजी विशेष आग्रही होते. या देशाची संस्कृती ही महिलांनीच टिकविली आहे, असे ते वारंवार म्हणत. उत्कृष्ट सुशिक्षित माता हीच बालकाचा

पहिला शिक्षक असते, असे ते म्हणत. "स्त्रियांना जोपर्यंत प्रतिष्ठा मिळत नाही, तोपर्यंत हा समाज विकास पावणार नाही", असा त्यांचा आग्रह होता. त्यांची दृष्टी याबाबत इतकी परिपूर्ण होती की, मी प्राज्ञपाठशाळेचा त्या वेळी चिटणीस असल्यामुळे, मला असे म्हणाले, प्राज्ञपाठ-शाळेची एक तरी विश्वस्त महिला असली पाहिजे व कार्यकारी मंडळावर काही महिला असल्या पाहिजेत. वाई नगरपालिकेच्या १३० वर्षांतील इतिहासात सौ. शामलाबाई जोग पहिल्या महिला नगराध्यक्ष झाल्याने त्यांची निवड प्राज्ञपाठशाळेच्या विश्वस्तपदी केली.

शास्त्रीजींना ९२ व्या वाढदिवसानिमित्त भारत सरकारने पद्मविभूषण हा किताब देऊन गौरविले, त्या वेळी त्यांची मुलाखत दै. "पुढारी"चे श्री. मोहन कुलकर्णी यांनी घेतली. त्या वेळी शास्त्रीजी म्हणाले, "देशात फिरतो, परदेशात फिरतो. माणसामाणसांत संवाद होतो. खूप नवे शिकायला मिळते. अनुभवायला मिळते. अजूनही विद्यार्थी असल्यासारखे अनेक गोष्टींत कुतूहल असते. मी जीवनाकडे निरामय आनंदाने पाहतो. मी एक आनंदयात्री आहे.''

२० मे १९९४ रोजी शुक्रवारी सकाळी १० च्या सुमारास महाराष्ट्राचे गव्हर्नर डॉ. अलेक्झांडर हे विश्वकोश कार्यालय व प्राज्ञपाठशाळा मंडळ यांना भेट देण्यासाठी येणार होते. आम्ही सर्व जण त्यांच्या स्वागतासाठी प्राज्ञपाठशाळेत हजर होतो. गव्हर्नर येण्यास थोडा उशीर झाला. गप्पा सुरू झाल्या. सहज आबांना म्हटले, "आबा तब्बेत कशी काय आहे?" अत्यंत आनंदी प्रसन्न असणारे आबा म्हणाले, "खरं. सांगू, गाडं आता थकलं, आता पाऊल उचलतानासुद्धा सर्व शक्ती एकवटून ते उचलावं लागतं." पुढे ते म्हणाले, "माझी कायम स्मृती (Permanent Memory) उत्तम आहे. पण तत्कालीन स्मृती (Immediate Memory) ही दगा देते. पाच मिनिटांपूर्वी भेटलेल्या माणसाचे नाव आठवत नाही, पण १४ व्या वर्षी याच कृष्णा नदीत कसा डुंबलो हे माझे मला अजून स्पष्ट दिसते."

१९९५ हे विनोबाजींचे जन्मशताब्दी वर्ष आहे. शास्त्रीजी आणि विनोबाजी हे सहाध्यायी. विनोबाजी वाईला प्राज्ञपाठशाळेत स्वामी केवलानंदतीर्थांपाशी शांकरभाष्य शिकले. विनोबांना सोळा भाषा येत होत्या. वर्ष-दीडवर्ष राहिल्यानंतर विनोबा बडोद्याला गेले. जाताना त्यांनी आपल्याबरोबर शास्त्रीजींना नेले. बडोद्याला असताना माधुकरीसुद्धा मिळायची नाही. मग अहमदाबादी बोरे खाऊन ते राहायचे. बरं, त्याबद्दल खंत किंवा खेद नव्हता. हे सांगून, ते पुस्ती जोडायचे, ''बोराने वजन वाढते.'' आता या माणसाला स्थितप्रज्ञ म्हणायचे नाही तर काय म्हणणार? "मी किती गरिबी पाहिली आहे, व सोसली आहे, याची तुम्हाला कल्पना येणार नाही" असे ते म्हणायचे. पुढे दिवस बरे आल्यावर ते चांगल्या तऱ्हेचे पदार्थ खाऊ लागले. तसे शास्त्रीजी रसिक होते. जीवनातील विविध रसांचा त्यांनी स्वाद घेतला होता. पण त्यांत ते अडकून पडले नाहीत. पुण्याला माझ्या मुलीच्या लग्नामध्ये जेवण झाल्यावर ते म्हणाले, पुण्याचे लोक हे खरेच खवैये. बरेच दिवसांनी इतकी उत्कृष्ट

जिलबी खायला मिळाली. विविध पक्वान्न ते खात. काही वेळा सामीष भोजनेही घेत, पण त्यांची खरी आवड, मला त्यांच्या खालील वाक्यामध्ये दिसते. मला एकदा सहज जेवताना म्हणाले, ''पक्वान्नांची नावे सांगा.'' मी सांगितली, "जिलेबी, पुरणपोळी, श्रीखंड, बासुंदी." एकदम ते म्हणाले, "वरण-भात, उत्कृष्ट लोणकढे तूप, लिंबू पिळलेले, आणि मीठ यासारखे उत्कृष्ट पक्वान्न नाही. सुरुवातीला पहिला भात, गरम गरम उकळत्या वाफांचाच असला पाहिजे," अशी त्यांची आवड होती.

अलीकडच्या काळामध्ये ते विश्वसंस्कृतीबद्दल विशेष बोलत. शास्त्रीजींसारखी माणसं अशी एखाद्या पंथाला, धर्माला, पक्षाला अडकून बसणारी नसतात. शास्त्रीजी मानवेंद्रनाथ रॉय यांच्या प्रभावाखाली दीर्घकाळ राहिले. पण अलीकडे मात्र ते म्हणत, गांधींना मी सोडलं ही माझ्या हातून फार मोठी चूक झाली. या भारतीय समाजाची खरी नस कोणाला सापडली असेल तर ती म. गांधींनाच, असे ते मनमोकळेपणे सांगत.

"शास्त्रीबुवा हे बुद्धिप्रामाण्यवादी होते का?" या प्रश्नाचे उत्तर मला वाटते, भाऊ धर्माधिकारी म्हणतात त्याप्रमाणे "ते बुद्धिप्राधान्यवादी होते" हे आहे. अनेक वेळा शास्त्रीजींना परदेशात जाताना स्वामी केवलानंदांची समाधी उघडायला लावून पाच मिनिटे त्यासमोर उभे राहून, नमस्कार करून मगच अमेरिकेच्या प्रवासाला गेलेले मी पाहिले आहे.

'चरणयोग' हा शब्द शास्त्रीजींनी काढलेला आहे. ते म्हणायचे, चालत राहिल्याने माणसाचे आरोग्य चांगले राहते. रोज ते ३-३, ४-४ मैल चालायचे. डॉक्टर दातारांचे लो. टिळक ग्रंथसंग्रहालयात एक भाषण झाले होते. त्या वेळी त्यांनी चित्रांच्या साहाय्याने असे दाखवून दिले होते, की चालल्यामुळे, म्हणजे पोटऱ्यांच्या आणि मांडीच्या स्नायूंच्या चलनवलनामुळे हृदयाला थोडीशी विश्रांती मिळते. शास्त्रीबुवांनी आपल्या अनुभवांतून हे ताडले होते.

एवढा श्रेष्ठ ज्ञानयोगी असून सर्वसामान्यांत मिसळणारा; पु. ल. देशपांडे म्हणतात त्याप्रमाणे ज्यांची विद्वत्ता चांदण्यासारखी शीतल आहे, असे शास्त्रीजी होते. हा माणूस कधीही लोकांना कंटाळला नाही. त्यामुळे लोक कधी या माणसाला कंटाळले नाहीत. एवढे प्रचंड विद्वान असूनही त्यांच्या अहंकाराचा कोणालाही वास आला नाही. जो माणूस या विसाव्या शतकातच जन्मला, विसाव्या शतकाचा जुळा भाऊ असल्याप्रमाणे वाढला, विसाव्या शतकाने जे अद्भुत चमत्कार पाहिले तेच शास्त्रीजींनीही पाहिले, फक्त हे शतक संपण्यापूर्वी सहा वर्षे आधी विसाव्या शतकाचा हा जुळा भाऊ त्याचे बोट सोडून आधीच निघून गेला. ही प्रा. रा. ग. जाधव यांची कल्पना मला अतिशय समर्पक वाटते.

**('नवभारत' मासिक, वाई, जून-जुलै, १९९५, पृ. ५५ व ५६)**

○○○

## ७४.

# शास्त्रीजींच्या सहवासात

## अशोक भट

मूळचे खानदेशाच्या भूमीतील शास्त्रीजी १९१४ साली शिक्षणासाठी वाईला आले. या वेळचे वाई गाव म्हणजे सनातनी व कर्मठ विचारांचा एक बालेकिल्लाच होता. परंतु तेथेच धर्मसुधारणा, समाजसुधारणा, राजकीय क्रांती यांची तडफदारी करणारे गुरू त्यांना स्वामी केवलानंद सरस्वती यांच्या रूपाने मिळाले. लोकहितवादी, आगरकर, टिळक, मिल स्पेन्सर, सावरकर आणि विनोबा भावे यांचे विचारही त्यांनी अभ्यासले. पुढे ते धर्मपरिवर्तनवादाचे पुरस्कर्ते झाले. मानवेंद्रनाथ-रॉयप्रणित नवमानवतावादाचेही ते एक प्रमुख भाष्यकार झाले. प्रगाढ विद्वत्ता आणि तर्कशुद्ध विचारसरणी त्यांच्या लेखनात आणि वक्तृत्वात दिसून येत असे. त्यांच्या विचारांतील ताजेपणा, वैचारिक विनिमयासाठी आवश्यक असणारी सर्वसमावेशक व समन्वयवादी वृत्ती, व्यक्तिमत्त्वातील चैतन्य आणि ऋजुता यांचा प्रत्यय त्यांच्याशी चर्चा करताना नेहमीच येत असे.

'वेदाभ्यासजड' असा शब्द नेहमी वापरला जातो. परंतु शास्त्रीजी वेदाभ्यासाने अगदी हलके झालेले होते. त्यांची विद्वत्ता प्रखर असून शीतलही होती. त्यांच्याशी बोलताना माझ्या स्वतःच्या अज्ञानाबद्दल कधीच संकोच वाटलेला नाही. सहज बोलतानासुद्धा ते एकदम एखादे वाक्य असे उच्चारीत की, ऐकणाराला एकदम काही तरी मूलभूत आणि नवीन समजले असे वाटावे. एकदा अद्वैत धर्माबद्दल बोलताना ते म्हणाले की, "अद्वैत धर्म असला तरी अस्पृश्यता टिकून आहे. त्यामुळे यात काही तरी चूक आहे." देशाच्या प्रगतीबाबत बोलताना ते एकदा म्हणाले की, "देशाची खरी प्रगती व्हायची असेल तर बुद्धिवाद आणि मानसिक स्वातंत्र्य असले पाहिजे."

शास्त्रीजींशी चर्चा करण्याचा अनेकदा योग येत असे. विशेषत: त्यांच्याबरोबर प्रवासात असताना ते अचानकपणे अगदी नवीन अशी माहिती सांगत. अशा प्रकारे निरनिराळ्या निमित्ताने त्यांनी सांगितलेली माहिती टिपून ठेवण्याचा परिपाठ मी ठेवला होता. त्यांतील

काही महत्त्वाचा भाग यापुढे दिला आहे.

१) शास्त्रीबुवांबरोबर अनेकदा प्रवासाला जाण्याचा योग यायचा. नांदेडच्या साहित्य संमेलनाला जाण्यासाठी शास्त्रीजी, राम कोल्हटकर आणि मी पहाटे पाच वाजता पुण्याहून निघालो. शास्त्रीजींचा एक विशेष म्हणजे एकदा किती वाजता निघायचे नक्की झाले की त्याच्या अगोदर दाढी, अंघोळ वगैरे सर्व उरकून कपडे करून ते तयार असायचे. त्यांची ही सवय माहीत असल्याने आम्ही दोघेही तयार होतो. बरोबर पाच वाजता पुण्याच्या सर्किट हाऊसमधून निघालो.

जरा वेळाने गाडीतल्या रेडिओवर भक्तिसंगीत सुरू झाले होते. राम मराठे यांनी म्हटलेला एक अभंग सुरू होता. शास्त्रीजी मला म्हणाले, "हा राम मराठे कोणाचा हो शिष्य!" "मास्तर कृष्णरावांचा." मी उत्तर दिले. ''तरीच मी मघापासून विचार करतोय, की हा अगदी कृष्णामास्तरांसारख्या ताना मारतोय. तुम्ही अगदी बरोबर माहिती दिलीत,'' असे त्यांनी मला सर्टिफिकेट दिले.

नांदेड जसे जवळ येऊ लागले तसे वाई म्हणून एका गावाची पाटी लागली व भोगाव अशा गावाचीही एक पाटी लागली. तेव्हा शास्त्रीजी म्हणाले, "आता उलगडा झाला. वामन पंडित हा शेष घराण्यातील आणि हे घराणे मराठवाड्यातीलच. वामन पंडित वाईजवळच्या भोगावला समाधिस्त झाला असे आपण समजतो. पण ती वाई आणि भोगाव ही गावे येथीलच असावीत."

नांदेड जवळ आल्यावर एकदम शास्त्रीजींनी मला प्रश्न केला, "नगरपासून नांदेडपर्यंत येताना एक गोष्ट तुमच्या लक्षात आली का? ती म्हणजे एवढ्या मोठ्या अंतरात एकही सुदृढ स्त्री अगर पुरुष रस्त्यावर दिसला नाही. सर्वांची पोटे खपाटीला गेलेली. यानंतर त्यांनी मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीबाबत भाष्य सुरू केले.

नांदेड साहित्य संमेलनाच्या उद्घाटनाला पी. व्ही. नरसिंहराव येणार होते. परंतु ते उद्घाटनासाठी येणार नाहीत व तुम्हालाच संमेलनाचे उद्घाटन करावे लागेल, असा निरोप शास्त्रीजींना पुण्यालाच मिळाला होता. त्यावर त्यांनी कोणतेही संदर्भ अगोदर न पाहता जे उद्घाटनाचे भाषण केले ते सर्वांना थक्क करणारे होते. मराठवाड्याचा राजकीय व सांस्कृतिक इतिहास, मराठवाड्यात सुरू झालेली संतांची परंपरा, मराठवाड्यातील साहित्यिकांची परंपरा अशा अनेक विषयांवर ते बोलले. एकनाथापासून नरहर कुरुंदकरांपर्यंत साहित्यिकांच्या साहित्याचा परामर्श त्यांनी घेतला. पैठणच्या गागाभट्टाच्या शिवाजीमहाराजांना राज्याभिषेक करण्यातील राजकीय आणि सामाजिक महत्त्व त्यांनी सांगितले. शास्त्रीजींचे उद्घाटनाचे भाषण ऐकून श्रोतृवृंद अगदी थक्क होऊन गेला.

"या भाषणाची तयारी केव्हा केलीत?" असे विचारले असता शास्त्रीजी म्हणाले, "आपण पुण्याहून निघाल्यापासून नांदेडला पोहोचेपर्यंत माझ्या अंतर्मनात सारखा विचार चालू होता.

मी जरी अनेक विषयांबद्दल तुमच्याशी बोलत होतो, तरी मला उद्घाटनाचे भाषण करायचे आहे, याचे कायम भान होते आणि त्याबद्दलचा सुसूत्रपणे विचार अंतर्मनात चालू होता. नांदेडचे संमेलन सुरू असतानाच मुंबई येथे शास्त्रीजींचे मित्र व्ही. बी. कर्णिक हे फार आजारी असल्याबाबतची माहिती समजली. शास्त्रीजींच्या जिवाची फार घालमेल झालेली दिसली. ताबडतोब मुंबईला गेले पाहिजे असे ठरवून एक दिवस आधीच आम्ही निघालो. नांदेडहून पुण्याला येईपर्यंत व्ही. बी. कर्णिक आणि एम. एन. रॉय यांच्याबद्दलच सारखे बोलत होते.

एम. एन. रॉय आणि स्टॅलिन यांची किती दोस्ती होती हे सांगताना त्यांनी रॉय यांची एक आठवण सांगितली. लेनिन यांनी एकदा संपूर्ण दारूबंदी करण्याचा हुकूम काढला व दुसऱ्या दिवसापासून या हुकमाची अंमलबजावणी होईल असा फतवा निघाला. त्या वेळी रॉय हे मॉस्कोत होते. स्टॅलिनने त्यांना आपल्या घरी बोलाविले. तेथे रशियातील बरीच अधिकारी मंडळी जमली होती. त्या सर्वांना उद्देशून स्टॅलिनने सांगितले की, ''उद्यापासून दारूबंदी आहे. आजच्या दिवस जेवढी प्यायची आहे, तेवढी पिऊन घ्या.'' असे म्हणून त्याने स्वतः व्होडकाची बाटली उघडून रॉय यांचा पेला भरला. मोठ्या जल्लोशात पार्टी सुरू झाली. जसजशी रात्र होऊ लागली तसतसा एकेका अधिकाऱ्याने काढता पाय घेतला. शेवटी स्टॅलिन आणि रॉय दोघेच राहिले. त्यावर स्टॅलिन म्हणाला, ''हे युरोपियन लोक सर्व अगदी असेच! आपण दोघे एशियन आहोत. म्हणूनच पहाटेपर्यंत टिकून राहिलो. तुम्ही भारतातले, आणि मी जॉर्जियाचा!''

असे निरनिराळे किस्से सांगताना पुणे कधी आले ते समजले नाही. शास्त्रीजी म्हणाले, "आता पुण्याला थांबायचे नाही. ताबडतोब मुंबईला निघायचे. व्ही. बी. कर्णिक यांना केव्हा भेटीन असे मला झाले आहे." एक रात्र विश्रांती घेऊन मग पुढे जाऊ असा रामने आग्रह केल्यावर कसेबसे रात्री पुण्यात थांबण्यास तयार झाले व दुसऱ्या दिवशी पहाटे पाच वाजता मुंबईस जाण्यास निघायचे असे बजावून झोपी गेले.

२) तर्कतीर्थ आणि सातारचे सुप्रसिद्ध वकील कै. मनोहरपंत भागवत यांची वैशिष्ट्यपूर्ण मैत्री होती. भागवत मूळचे कम्युनिस्ट पक्षाचे, कार्ड होल्डर, स्त्रीवादी. त्यामुळे त्यांचा सूर जुळत असे. त्यातून दोघांनाही यशवंतराव चव्हाण यांच्याबद्दल आदर. भागवत हे कधीही काँग्रेस पक्षात नव्हते. परंतु यशवंतरावांच्या प्रत्येक निवडणुकीच्या वेळी उमेदवारी अर्ज भरताना त्यांना भागवत आणि शास्त्रीजी हे दोघेही लागायचे. असा एक वैशिष्ट्यपूर्ण संबंध शास्त्रीजी आणि भागवत यांच्यामध्ये होता. भागवतांचे सातारला वास्तव्य असे. स्वभाव फार आतिथ्यशील. त्यांनी शास्त्रीजींना सांगूनच टाकले होते की, केव्हाही सातारला आलात, अगर सातारवरून नुसते जाणार असला तरीही माझ्याकडे आलेच पाहिजे आणि येताना अशोकला घेऊन या, असेही सांगायचे. त्यामुळे शास्त्रीजींबरोबर भागवतांकडे किती वेळा गेलो हे सांगताच येत नाही. तेथे निरनिराळे लोक भेटत असत. सातारचे कलेक्टर, डी.

एस. पी.पासून अधिकारीही भेटत. एकदा फलटणचे मालोजीराव नाईक-निंबाळकर असेच अचानक तेथे आले ते चांगले आठवते.

भागवतांकडील मैफिलीत बुद्धीला खाद्य मिळायचे. निरनिराळ्या विषयांवर चर्चा व्हायची. राजकारण, समाजकारण, धर्म, रूढी, कायदा वगैरे निरनिराळे विषय असत. एकदा अगदी अचानकपणे आम्ही भागवतांकडे गेलो. तो प्रसंग असा की, संपूर्ण देशातून रामशीलांचे पूजन करून त्या शीला अयोध्येला पाठविण्याचे अभियान सुरू होते. शास्त्रीजींना कोणीतरी या शीलापूजनाच्या कार्यक्रमासाठी बोलावले. आणि भिडस्त स्वभावामुळे त्यांनी निमंत्रण स्वीकारले. लगेच संपूर्ण गावात ध्वनिवर्धकावरून शास्त्रीजींच्या हस्ते रामशीलांचे पूजन असे जाहीर करण्यास सुरुवात झाली. ते ऐकून मी शास्त्रीजींकडे गेलो.

"आज आपल्याला भागवतांकडे जायचे आहे. त्यांनी बोलावले आहे." असे सांगितले. ते लगेचच निघाले आणि सातारला गेल्यावर "आज वाईहून पळून आलो" असे म्हणाले. उद्या सर्व वर्तमानपत्रांत रामशीलांचे पूजन करताना माझे फोटो प्रसिद्ध झाले असते. मग ते नाकारणार कसे? सर्वांची हसता हसता पुरेवाट झाली.

३) निफाड येथे सामाजिक परिषदेचे पुनरुज्जीवन करण्याचा कार्यक्रम ठरला. मुंबई हायकोर्टाच्या न्यायाधीश सुजाता मनोहर, शास्त्रज्ञ उदगावकर, माधवराव गडकरी वगैरे नामवंत लोक येणार होते. शास्त्रीजींबरोबर राम आणि मी असे दोघेजण होतो. पुण्याहून मधुकाका कुलकर्णी त्यांची गाडी घेऊन निघाले. पण गप्पा मारण्यासाठी शास्त्रीजींच्या गाडीतच आले. पुस्तक-प्रकाशनाबाबतची इतकी माहिती शास्त्रीजींनी सांगितली की ती ऐकून आश्चर्य वाटले. निर्णयसागर छापखाना, कर्नाटक पब्लिशिंग हाऊस या मुंबईतील जुन्या संस्थांबाबत बोलले. त्यांची प्रकाशने आणि नव्या पुस्तकाला येणारा वैशिष्ट्यपूर्ण वास याचीही माहिती दिली.

वाटेत एका डाकबंगल्यात जेवणासाठी थांबलो. रामच्या पत्नीने झुणका भाकरीचा डबा करून दिला होता. शास्त्रीजींनी झुणका भाकर आवडीने खाल्ली. आणि शेवटी म्हणाले, "आचार्य अत्र्यांच्या भाषेत म्हणायचे असेल तर इतका चांगला झुणका मी जन्मात कधी खाल्ला नव्हता." सायंकाळी नाशिकला पोहोचलो. माधवराव गडकरी हे Riddles in Hinduism या डॉ. आंबेडकरांच्या पुस्तकावरील टीकेने सर्व दलितांचे लक्ष्य झाले होते. त्यामुळे मोठाच पोलीस बंदोबस्त होता. एका मोठ्या हॉटेलात भोजनाची व्यवस्था होती. तेथे अनेक प्रसिद्ध व्यक्ती जमल्या होत्या. कवी कुसुमाग्रज, नाटककार वसंत कानिटकर हेही होते. अनेक स्त्रियाही होत्या. त्यांचा गराडा कुसुमाग्रजांच्या भोवती पडला होता. ते पाहून शास्त्रीजी विनोदाने म्हणाले, "कुसुमाग्रज कवी असल्याने त्यांच्याबद्दल आकर्षण आहे. आमच्यासारख्या शास्त्र्याला कोण विचारतो?"

दुपारी निफाड येथे जाण्यास निघालो. माधवराव गडकरी परिषदेचे मुख्य संयोजक

होते. त्यामुळे त्यांच्याविरुद्ध निदर्शने करणार असे काही दलित नेत्यांनी सांगितले. त्यामुळे सामाजिक परिषदेत विघ्न निर्माण होते काय, असे वाटू लागले. विशेषतः नामदेव ढसाळ हे त्यामध्ये मुख्य होते. शास्त्रीजी आणि कुसुमाग्रज यांनी दलितांच्या नेत्यांना एका बाजूस घेतले आणि "तुमचा आमच्यावर विश्वास आहे का नाही?" असा प्रश्न केला. आणि 'माझ्या भाषणात मी माधवरावांच्या भूमिकेवर माझे मत मांडतो. तुम्ही निदर्शने वगैरे करून परिषदेत गोंधळ करू नका', असे दलित नेत्यांना सांगितले. त्यांनीही ते मान्य केले. त्यानंतर परिषदेचा नियोजित कार्यक्रम निर्विघ्नपणे पार पडला.

शास्त्रीजींनी या परिषदेत केलेल्या भाषणात न्यायमूर्ती रानडे यांच्या कार्याचा गौरव केला. आणि निफाड हे रानड्यांचे जन्मग्राम असल्याने येथे सामाजिक परिषदेचे पुनरुजीवन करण्यातील औचित्य सांगितले. तसेच Riddles of Hinduism हे काही डॉ. आंबेडकरांनी छापण्यासाठी तयार केलेल्या पुस्तकाची प्रेस कॉपी नाही. ती फक्त टिपणे केलेली आहेत आणि त्यांनी शब्दही "हिंदू धर्मातील कोडी" असा वापरला आहे. अशी कोडी अनेकांना पडतात असे सांगून चिंतामणराव वैद्य यांनीही Riddles in Ramayana या विषयावर लिखाण केले होते. त्या वेळीही लो. टिळकांसारख्यांनी त्यांच्यावर कडाडून टीका केली नव्हती. तर वैद्यांनी हे लिहिले नसते तर चालले असते; एवढीच टीका केली होती याची आठवणही दिली.

पुण्याकडे परतताना याच विषयावर शास्त्रीजी बोलत होते. बोलण्याच्या ओघात त्यांनी महाराष्ट्रातील तीन ब्राह्मणांनी हिन्दुस्थानला राष्ट्रवाद शिकविला असे सांगितले. आणि ते तीन ब्राह्मण म्हणजे रानडे, टिळक आणि गोखले हे ठासून सांगितले. मध्येच नेहरूंचा विषय निघाला. त्यावर शास्त्रीजी म्हणाले, "नेहरूंना जगाच्या इतिहासाची Glimpses दिसली. परंतु त्यांना इतिहासाचे Vision सापडले नाही. परंतु नेहरूंनी केलेली एक मोठी गोष्ट म्हणजे भारत आणि रशिया मैत्री. या मैत्रीमुळे भारताला अनेक गोष्टी साध्य करता आल्या.

४) नानासाहेब गोरे यांचा ७५ वा वाढदिवस पुण्यात साजरा झाला. त्या वेळी अच्युतराव पटवर्धन, बॅरिस्टर तारकुंडे, एस. एम. जोशी, यशवंतराव चव्हाण यांच्याबरोबर शास्त्रीजींचेही व्याख्यान झाले. बरेच वक्ते असल्यामुळे संयोजकांनी प्रत्येक वक्त्याने १५ मिनिटे बोलावे असे सांगितले. शास्त्रीजींनी आपल्या भाषणात ब्रह्मसूत्रसुद्धा १५ मिनिटांत म्हणून होते, असे सांगून नानासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाचे उत्तम चित्रण केले. "आकाशगंगा ही जीवनविरहित आहे. परंतु त्यामध्ये पृथ्वी हा नवा सभासद येणार आहे आणि तो केवळ बुद्धीच्या जोरावर! माणसाने बुद्धिवादी आणि मानसिकदृष्ट्या स्वतंत्र असले पाहिजे. यथा राजा तथा प्रजा. शासन लोकांना बदलू शकत नाही. परंतु लोक शासनाला बदलतात. स्वातंत्र्य हे महत्त्वाचे मूल्य आहे. येशू ख्रिस्तानंतर महात्मा गांधीच त्याच्या तोडीचे असे महामानव झाले. अशा नेत्याचे नेतृत्व स्वीकारल्याने एस. एम. आणि नानासाहेब यांच्यासारख्या नेत्याला एक विशेष असे तेज प्राप्त झाले," असे शास्त्रीजींनी शेवटी सांगितले.

५) एस. एम. जोशींचा ८० वा वाढदिवस होता. या कार्यक्रमाला शास्त्रीजी उपस्थित होते. आम्ही काही मित्र स्वतंत्रपणे गेलो होतो. तो कार्यक्रम चालू असताना यशवंतराव चव्हाण फार आजारी आहेत अशी बातमी आली. कार्यक्रम संपल्यावर एका हॉटेलमध्ये जेवणासाठी गेलो. तेथे यशवंतराव चव्हाण गेल्याची बातमी समजली. आता काय करायचे असा प्रश्न पडला. शास्त्रीजी सर्किट हाऊसवर उतरले होते. सर्वांनी तिकडेच जायचे ठरवले. आम्हीही सर्किट हाऊसवर गेलो. यशवंतरावांबद्दल अनेक आठवणी शास्त्रीजींनी सांगितल्या. तेवढ्यात शरद पवार येत आहेत असा निरोप आला. मागोमाग ते आलेच. शास्त्रीजींनी कसेबसे त्यांचे सांत्वन केले. आम्ही सर्व जण खोलीच्या बाहेर येऊन थांबलो. शरद पवारांना अनावर दुःख झाले होते. जवळजवळ तासभर ते शास्त्रीजींच्या या खोलीत लहान मुलासारखे रडत बसले होते. त्यांच्याबरोबर सुशीलकुमार शिंदे होते. तासाभराने शरद पवार बाहेर आले. शास्त्रीजी त्यांना म्हणाले की, "तुम्ही आता निळूभाऊ लिमयांकडे जा आणि तेथे विश्रांती घ्या."

त्यानंतर लगेच कऱ्हाडहून आणि मुंबईहून फोन येऊ लागले. मुंबईच्या लोकांचे असे म्हणणे होते की, चौपाटीवर दहन करावे. शेवटी दोन्ही बाजूनेही शास्त्रीजी जो निर्णय देतील, तो मानायचे ठरविले. शास्त्रीजींनी फोनवरूनच सांगितले की, शास्त्राप्रमाणे जेथे निधन झाले तेथेच दहन करणे श्रेयस्कर आहे. परंतु यशवंतरावांचे निधन तर दिल्लीला झाले आणि त्यांचा पार्थिव देह मुंबईला आणला गेला आहे. आता तो तसाच मुंबईहून कऱ्हाडला न्या आणि तेथेच दहन करा. कारण यशवंतरावांचा प्रवास कऱ्हाड, मुंबई, दिल्ली असा झाला होता. आता त्यांच्या पार्थिवाचा प्रवासही दिल्ली, मुंबई, कऱ्हाड असा होऊ द्या. शास्त्रीजींनी हे सांगितले आणि सर्वांनी मानले. कऱ्हाडच्या प्रीतिसंगमावर यशवंतरावांचा अंत्यविधी झाला आणि पुढे तेथेच त्यांची भव्य समाधी बांधली गेली. आणि कृष्णा-कोयना प्रीतिसंगमाचा सर्व परिसरच बदलून गेला.

६) एकदा शास्त्रीजींबरोबर मुंबईला जायला निघालो. त्या वेळेला एकदम त्यांनी "हिंदू कोण?" असा मला प्रश्न केला आणि निरनिराळ्या लोकांनी हिंदूबाबत केलेल्या व्याख्यांची माहिती सांगण्यास सुरुवात केली.

**१) लो. टिळक यांनी केलेली व्याख्या-**
**प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु साधनानाम् अनेकता।**
**उपास्यानामनियमः एतत् धर्मस्य लक्षणम्॥**
**२) स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी केलेली व्याख्या-**
**आसिंधुसिंधुपर्यन्ता यस्य भारतभूमिका।**
**पितृभूः पुण्यभूश्चैव स वै हिन्दुरिति स्मृतः।।**
**३) भालाकार भोपटकर यांनी केलेली व्याख्या-**
**धेनुर्यस्य महामाता वेदा धर्मस्य जीवनम्।**
**प्रतिमापूजनं चैव, स वै हिन्दुरिति स्मृतः॥**

या तीन व्याख्या सांगून त्यांतील फोलपणा त्यांनी विशद केला. संपूर्ण प्रवासात या एकाच विषयावर ते बोलत होते. भालाकार भोपटकर यांनी केलेली व्याख्या सनातन्यांचे प्रतिनिधित्व करणारी, स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी केलेली व्याख्या हिन्दुत्वाच्या राजकारणासाठी केलेली व लोकमान्य टिळकांनी केलेली व्याख्या ही संपूर्णतः अप्रमाण अशी असल्याने या तिन्हीही व्याख्या स्वीकारताच येणार नाहीत असे त्यांचे प्रतिपादन होते.

प्रथम भालाकार भोपटकर यांनी केलेल्या व्याख्येबद्दल बोलताना ते म्हणाले की, गायीच्या हंबरण्यावाटे प्रत्येक क्षणी वेदवाणी बाहेर पडते. पंचगव्य ही हिन्दू धर्माची संजीवनी आहे. असे पंचगव्य ज्या धेनुरूपी महामातेपासून उत्पन्न होते, त्या गोमातेला जो पूज्य मानतो, तोच हिन्दू होय. वेदांचे प्रामाण्य व जीवनतत्त्व ज्यांना मान्य नसेल, ते सर्व अहिन्दू होत. मग ते बाह्यतः हिन्दूंसारखे दिसोत अगर या भरतभूमीत अनादीकाळापासून राहात आलेले असोत, गाय- गायत्री- गजानन ही त्रयी मान्य करणाराच हिन्दू ही विचारसरणी सनातन्यांशिवाय कोणाला पटणार? ही व्याख्या करणाऱ्यांनी स्वतः काय केले? तर जन्मभर अस्पृश्यतेचे निर्लज्ज समर्थन केले. अस्पृश्यतेत काय वाईट आहे असे सांगताना "आपल्या पत्नीसही चार दिवस अस्पृश्य समजत नाही का?" असा असभ्य युक्तिवाद केला. त्या गृहस्थांनी केलेली हिन्दू धर्माची व्याख्या कशी मानायची? स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी केलेल्या व्याख्येबद्दल ते म्हणाले, की ज्यांचे पितर म्हणजे वाडवडील सिंधुसागरापासून गंगासागरापर्यंत भरतखंडात म्हणजे हिन्दुस्थानात वसत आले, आणि म्हणूनच ती ज्यांची पितृभू आहे, आणि ज्यांचे धर्म-संस्थापक याच भूमीत व त्याच पितरांच्या उदरी उत्पन्न होऊन आपापले धर्म स्थापिते झाले, म्हणूनच ती ज्यांची पुण्यभू आहे, तो हिन्दू होय. या व्याख्येतील हिन्दुत्वाचे राजकारण सहज लक्षात येते. बुद्ध, जैन, शीख इत्यादींना हिन्दू धर्मात ओढून आणण्याचा हा एक चांगला प्रयत्न होता. या व्याख्येवर टीका करताना भालाकार भोपटकर असे म्हणाले, की सावरकरांच्या व्याख्येतील लक्षणांनी युक्त अशी व्यक्ती हिन्दू होणार नसून ती हिन्दी किंवा भारतीय होईल. परंतु दुर्दैवाची गोष्ट ही की स्वतःला सावरकरवादी म्हणविणारे बहुसंख्य लोक भोपटकरांना अभिप्रेत असणारा हिन्दू धर्म मानणारे आहेत. त्यामुळे "हिन्दुत्व" याऐवजी "भारतीयत्व" असा शब्द वापरला गेला नाही. हिन्दू धर्माची व्याख्या करताना त्यात राजकीय दृष्टी ठेवणे योग्य नाही.

आता शेवटी राहिली लो. टिळकांनी केलेली व्याख्या. "प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु" हे पहिले लक्षण. दुसरे म्हणजे मोक्षाची अनेक साधने व उपास्यदेवतांची विपुलता आणि साकार परमेश्वराची पूजा यांतील पहिले लक्षणच संपूर्णतः पूर्णतः अप्रमाण आहे. कारण हिन्दू धर्माच्या अनेक एकनिष्ठ भक्तांनी व प्रवर्तकांनीही वेदांचे श्रेष्ठत्व मानलेले नाही. "वेद आम्हासी रुसला। आम्ही धरले त्याच्या बाला॥" असे उद्गार काढणारे तुकाराम हिन्दूच होते. "त्रयो वेदस्य कर्तारः धूर्तभाण्ड निशाचरः।।" असे म्हणणारा बृहस्पती हिन्दू धर्मातीलच होता!

आणि "त्रेमुण्य- विषया वेदः निस्त्रेगुण्यो भवार्जुन" असा अर्जुनास उपदेश करणारा श्रीकृष्णही येथे वेदांपेक्षा जास्त उंच दृष्टी ठेवण्याचा प्रयत्न करीत आहे, तेथे "प्रामाण्यबुद्धिर्वेदेषु टिकणार कोठून?"

बोलण्याच्या ओघात शास्त्रीजींनी अच्युत बळवंत कोल्हटकर यांनी केलेली हिन्दू धर्माची "स्वातंत्र्याचा धर्म" अशी व्याख्या सांगितली. प्रत्येक व्यक्तीस येथे मतस्वातंत्र्य आहे. तुम्ही द्वैत माना किंवा अद्वैत माना, तुम्ही एकच जन्म माना किवा पुनर्जन्म माना, तुम्ही मूर्तिपूजा माना किंवा अमूर्तिपूजा माना, तुम्ही जातिभेद माना किंवा सबगोलंकार माना, इतकेच काय तुम्ही परमेश्वर आहे असे माना किंवा नाही असे माना, तरी तुम्ही हिन्दू आहात. षड्दर्शने ही मतस्वातंत्र्याची पताका आहे. दर्शन म्हणजे दृष्टी आणि दृष्टी म्हणजे दृष्टिकोन. धर्माकडे पाहताना प्रत्येकास आपला दृष्टिकोन स्वतंत्र ठेवण्याचा पूर्ण अधिकार आहे.

"सर्व देव नमस्कारः केशवं प्रतिगच्छति।" याप्रमाणे कोणतेही मत असले, तरी त्याला हिन्दू धर्मात स्थान आहे. हिन्दू धर्म हा विविध मतांचा, विविध ग्रंथाचा सर्वांगसुंदर बगीचा आहे. यात कोणतेही निषिद्ध फळ (Forbidden Fruit) नाही. ज्याचा जसा हात पोहोचेल, त्याने या बगीचातील फळ तोडावे आणि तृप्त व्हावे. तृप्ती हे हिन्दू धर्माचे ध्येय आहे. शास्त्रीजींचे वरीलप्रमाणे विवेचन चालू असताना गाडी मुंबईपर्यंत पोहोचली हे लक्षातच आले नाही.

७) पुण्याच्या टिळक स्मारक मंदिरात श्रोताचार्य बापटशास्त्री यांच्या जन्मशताब्दीचा कार्यक्रम होता. त्या वेळी मी शास्त्रीजींबरोबर होतो. तळमजल्यावरील दालनातच कार्यक्रम होता. कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी तेथे लावलेली लो. टिळकांची अनेक छायाचित्रे वगैरे शास्त्रीजींनी बारकाईने पाहिली. कार्यक्रम संपून सर्किट हाऊसवर परतताना आणि तेथे पोहोचल्यावरही टिळकांबद्दलच बोलत होते. ते म्हणाले की, लो. टिळक हे केवळ राजकीय पुढारी अगर पत्रकार नव्हते; तर ते फार मोठे तत्त्ववेत्ते होते. त्यांनी भारतीय व पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचा फार विचार केलेला होता. उपनिषदे, वेदान्त सूत्रे व भगवद्गीता यांना प्रस्थानत्रयी असे म्हणतात. प्रस्थानत्रयी म्हणजे निवृत्ती व प्रवृत्ती या दोन्ही मार्गांचे विवेचन करणारे तीन आधारभूत ग्रंथ. या तिन्हींचाही त्यांनी सखोल अभ्यास केला होता. श्रीमद्भगवद्गीतारहस्य अथवा कर्मयोगशास्त्र हा त्यांचा ग्रंथ प्रसिद्धच आहे. महाराष्ट्रातील जनतेला कर्मप्रवण करण्याची त्यांची इच्छा होती. गीतारहस्याची अर्पण पत्रिका फार महत्त्वाची आहे. "समर्पयामि ग्रंथमिदं श्रीशाय जनतात्मने" सर्व जनतेला हा ग्रंथ अर्पण केला. ब्रह्मसूत्रावरील टिपणेही प्रसिद्ध झाली आहेत. ब्रह्मसूत्रे, शांकरभाष्यही त्यांनी वाचली होती. 'ब्रह्मसूत्र शांकरभाष्यरहस्य' असा ग्रंथ लिहिण्याचा त्यांचा नक्कीच विचार होता. The Orian - Researches into the Antiquity of the Vedas, The Artic Home in the Vedas, Vadic Chronology हे प्रबंधही प्रसिद्ध झाले आहेत.

लो. टिळकांनी अनेक राजकीय अग्रलेख लिहिले. समाज आणि संस्कृती, जीवनध्येय यांविषयीही विपुल लिखाण केलेले आहे. यांतील अनेक अग्रलेख म्हणजे तत्त्वचिंतन आहे. अग्रलेखांवर विषयाला अनुरूप असे सुभाषित घालण्याची त्यांची पद्धत होती. उदा., कर्मनबद्दलच्या अग्रलेखावर-

**रात्रिर्गमिष्यति भविष्यति सुप्रभातम्।**

**हा हंत! हंत! नलिनीं गज उज्जहार॥**

**हर्बर्ट स्पेन्सर यांच्याबद्दल लिहिताना-**

**नहि ज्ञानेन सदृश्यं पवित्रमिहं विद्यते॥**

आगरकरांच्या मृत्यूबद्दल "डेक्कन एज्युकेशन सोसायटीतील पाचवा मृत्यू" हा हृदयस्पर्शी अग्रलेख त्यांनी लिहिला. त्या अग्रलेखावर ‘‘सर्व यस्य वशादगा स्मृतिपथं कालाय तस्मै नमः।’’

**दादाभाई नौरोजी 'एम.पी.' या अग्रलेखावर**

**उद्यमेन ही कार्याणि सिध्यन्ति न मनोरथैः॥**

**नहि सुप्तस्य सिंहस्य प्रविशन्ति मुखे मृगाः॥**

याप्रमाणे जी निरनिराळी सुभाषिते घातलेली आहेत; ती विचार करायला लावणारी आहेत. यातूनच टिळकांमधील तत्त्ववेत्ता दिसून येतो.

अर्थात तत्त्वचिंतनात्मक आणि सर्वसामान्यांना आकलन होऊ शकणारा ग्रंथ म्हणजे गीतारहस्य. गीतेचे अनेक अर्थ सांगितले गेले. शंकराचार्यांनी गीताभाष्यात संन्यासमार्ग, ज्ञानेश्वरीत भक्तिमार्ग आणि टिळकांनी कर्मयोग सांगितला. गीतारहस्य हा ग्रंथ मंडालेच्या तुरुंगात लिहिला. तेथे अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले. इतक्या अडचणीत हा ग्रंथ कशासाठी लिहिला? टिळकांना जो परकीयांशी लढा द्यायचा होता, त्याचे तत्त्वज्ञानच गीतारहस्यात त्यांनी मांडले. अशा तऱ्हेच्या वैचारिक ग्रंथातून क्रांती होऊ शकते का? याचे उदाहरण म्हणजे फ्रेंच राज्यक्रांती! व्होल्टायरने लोकांच्या मनातील देवाचे सिंहासन प्रथम उद्ध्वस्त केले. त्यानंतर रूसोने राजाचे सिंहासन उद्ध्वस्त केले. या विचारामुळेच फ्रेंच राज्यक्रांती झाली.

महाराष्ट्रात गीतारहस्यावर फार मोठा वाद झाला. याचे कारण म्हणजे ज्या निवृत्तिवादाचा पगडा हजारो वर्षे होता, त्याचे खंडन केले. शंकराचार्यांनी निवृत्तिवादाची परंपरा सुंदर आणि तर्कशुद्ध भाषेत मांडली आहे. शंकराचार्यांचे विचार खंडित केले. त्यामुळे जुन्या पिढीतील शास्त्र्यांना सात्त्विक संताप आला. आणि त्यांनी गीतारहस्याचे खंडन केले. वाईलाच काशीनाथ वामन ऊर्फ भाऊशास्त्री लेले यांनी गीतारहस्यावर फार मोठी टीका केली. अर्थात हे फार चांगले झाले. कारण विचारांचा संग्राम व्हावा लागतो आणि या संग्रामातूनच विचार पुढे जातो. महाराष्ट्रात असे संग्राम बरेच वेळा झाले आहेत.

लोकमान्यांनी जो असंतोष निर्माण केला, तो नैतिक असंतोष आहे. ते स्वतःला कधी साक्षात्कारी पुरुष म्हणत नसत. ते अत्यंत साधे होते. त्यांनी कोणाला कधी मंत्र दिला नाही किंवा उपदेश केला नाही. कसलीही कसोटी लावा, त्यातून उत्तम असे सुवर्णच बाहेर येईल असे त्यांचे पवित्र जीवन होते. अशा या आदर्श माणसाने मानवी आदर्शाचा आध्यात्मिक विचार सांगितला तो गीतारहस्यात. टिळकांनी हे एक उच्च दर्जाचे नीतिशास्त्र लिहिले आहे. ज्ञानेश्वरीच्या उपसंहारात ही भगवंतांची वाङ्मयमूर्ती आहे असे म्हटले आहे. म्हणजे गीतेच्या योगाने भगवंत आपल्याला भेटतात, तसेच टिळक आपल्याला कशात दिसतात, तर गीतारहस्यात! तेथे ते अमररूपाने उभे आहेत. प्रस्तावनेत ते

**''संतांची उच्छिष्टे बोलता उत्तरे।**
**काय म्यां पामरे जाणावे हे।''**

असे म्हणतात. परंतु हा त्यांचा विनय आहे.

**कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन।**
**मा कर्मफलेतुर्भूः मा ते संगोऽस्त्वकर्मणि।**

## कर्मयोगाची चतुःसूत्री

१) कर्मे करण्याचा तुझा अधिकार आहे. २) कर्मफलाच्या ठायी तुझा अधिकार नाही. ३) कर्मफलाची हाव मनात ठेवून कोणतेही काम करू नको ४) कर्मे न करण्याचा आग्रह धरू नको.

कर्मयोगदृष्ट्या हे चारही सिद्धान्त इतके महत्त्वाचे आहेत की, वरील श्लोकांचे चारही चरण म्हणजे कर्मयोग शास्त्राची किंवा गीताधर्माची चतुःसूत्रीच आहे. लो. टिळकांची प्रसिद्ध चतुःसूत्री १) स्वराज्य, २) स्वदेशी, ३) बहिष्कार, ४) राष्ट्रीय शिक्षण.

चतुःसूत्री हा शब्द नक्कीच कर्मयोगाच्या चतुःसूत्रीवरून टिळकांना सुचला आहे.

"असंतोष हा सर्व भावी उत्कर्षांचे प्रयत्नांचे ऐश्वर्याचे व मोक्षाचेही बीज आहे," असेही एक वाक्य गीतारहस्यात आलेले आहे. लोकमान्यांनी तत्त्वज्ञान आणि तत्त्वचिंतन व्यवहारात आणले त्याचे हे उत्तम उदाहरण आहे. सध्याच्या संदर्भात टिळकांचे तत्त्वज्ञानविषयक विचार फार महत्त्वाचे आणि चिंतनीय आहेत.

**('नवभारत' मासिक, वाई, जून - जुलै, १९९५, पृ.४८ ते ५४)**

ООО

## ७५.

# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री यांच्या सहवासात

## रा. कृ. बाबर

वाई, जिल्हा सातारा येथे वेदोक्त नारायणशास्त्री मराठे (स्वामी केवलानंद सरस्वती) यांनी वैदिक धार्मिक शिक्षणासाठी प्राज्ञपाठशाळा कृष्णा नदीच्या रम्य काठी, भानूंच्या भव्य वाड्यात स्थापन केली. या पाठशाळेत ठिकठिकाणचे विद्यार्थी शिक्षणासाठी येत होते.

सन १९३० साली भिंगारदवे हा मांग-विद्यार्थी या शिक्षणासाठी प्राज्ञपाठशाळेत राहिला होता. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी त्याला संस्कृत शिकविले. तसेच वैदिक धर्माची माहिती दिली.

सन १९३२ साली श्रीमंत सयाजीराव गायकवाड (बडोदा) हे महाबळेश्वर येथे आले होते. त्या वेळी वाई तालुका मंडळाने त्यांना मानपत्र दिले. मंडळाचे अध्यक्ष गणपतराव पिसाळ (बावधन), उपाध्यक्ष नारायणराव चव्हाण (वाई) हे उपस्थित होते. ठरल्याप्रमाणे श्रीमंत गायकवाड सरकार हे कृष्णेश्वर थिएटरात आले. त्यांनी कार्यकर्त्यांच्या ओळखी करून घेतल्या. या वेळी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री उपस्थित होते. नारायणराव चव्हाण यांनी त्यांना स्वागताचे भाषण आपण करावे असे सांगितले. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्रीजींचे भाषण चालले असताना श्रीमंत सयाजीराव महाराजांचे लक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री यांच्याकडे वेधले. त्यांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री यांच्या विद्वत्तेची पारख केली. महाराजांनी त्यांना भेटीस महाबळेश्वरी बोलाविले. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री यांनी श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांची भेट घेतली. प्राज्ञपाठशाळेची माहिती दिली. श्रीमंत सयाजीराव महाराजांनी प्राज्ञपाठशाळेस देणगी दिली. नारायणराव चव्हाण यांनी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री यांची वाहवा केली.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी वाईतील रविवार पेठेतील कार्यकर्ते नारायणराव चव्हाण, ताईसाहेब बाबर, शंकरराव जेजुरीकर, यज्ञेश्वर भांडारकर, भगिनी जनाक्का शिंदे (महर्षी वि. रा. शिंदे यांच्या भगिनी) यांच्या साह्याने तारीख ४ जुलै १९३३ साली ब्राह्मसमाजाची

स्थापना केली. या समाजाचा पहिला वार्षिक उत्सव करण्याचे ठरविले. उत्सवासाठी मुंबई, पुणे येथून प्रार्थना समाजाच्या येणाऱ्या मंडळींची भोजनाची व निवासस्थानाची सोय कोठे करावी हा विचार पडला. चटदिशी प्राज्ञपाठशाळेची इमारत डोळयांपुढे उभी राहिली. ती प्राप्त करण्यासाठी महर्षी वि. रा. शिंदे, नारायणराव चव्हाण यांच्यासह आम्ही स्वामी केवलानंद सरस्वती यांना भेटण्यास प्राज्ञपाठशाळेत गेलो. स्वामीजींची भेट झाली. समाजाच्या उत्सवाची माहिती त्यांना सांगितली.

स्वामींना महर्षी शिंदे यांचे कार्य माहीत होते. त्यांनी संमती दिली. त्याप्रमाणे तर्कतीर्थांनी प्राज्ञपाठशाळा मोकळी करून आमच्या हवाली केली. इतकेच नव्हे, तर उभयता उत्सवात सहभागी झाले. समाजाच्या कार्यक्रमात गंगापुरीतील हरिजन वस्तीत सफाईच्या कार्यात भाग घेतला. मुंबई प्रार्थना समाजाचे सेक्रेटरी द्वा. गो. वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली टिळक मंदिरात त्यांचे तारीख ३।११।१९३४ रोजी 'धर्मसमन्वय' या विषयावर व्याख्यान झाले.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री यांनी देवीदास गांधी यांच्या विवाहाचे पौरोहित्य वैदिक विधी करून केले होते. हे वाईच्या सनातनी लोकांना पसंत पडले नाही. म्हणून तर्कतीर्थांवर बहिष्कार टाकला होता. त्यांच्या भाषणास कोणी येत नव्हते आणि भाषणासही त्यांना कोणी बोलवीत नव्हते. अशा परिस्थितीत ब्राह्मसमाजाच्या कार्यकर्त्यांनी आपले ब्राह्म समाज व्यासपीठ त्यांना मोकळे केले. या व्यासपीठावरून महात्मा फुले विचार व्याख्यानमाला सुरू केली. त्यांची बारा व्याख्याने झाली. महात्मा फुले यांच्या विचारांचा प्रसार वाईत तर्कतीर्थांनी केला.

दिल्ली येथे भरणाऱ्या अखिल साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी त्यांची निवड झाली होती. स्वामी केवलानंद सरस्वती यांच्या अध्यक्षतेखाली ब्राह्म समाजात तर्कतीर्थांचा सत्कार झाला. या प्रसंगी स्वामी केवलानंद यांनी 'माझा आशेचा तंबू लक्ष्मण आहे' असे उद्गार काढले. सन १९४७ साली तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री यांनी 'ज्योतिर्निबंध' रा. ना. चव्हाण यांच्या साह्याने लिहिला. या निबंधासाठी मजजवळ असलेले महात्मा फुले यांचे समग्र वाङ्मय त्यांच्या हवाली केले होते. या विषयावर चर्चाही करीत असे. 'ज्योतिर्निबंधा'चे प्रकाशन येवले थिएटरमध्ये केशवराव जेधे (पुणे) यांनी केले. मार्क्सवादी चळवळीस तर्कतीर्थांनी वाईस सुरुवात केली. या पक्षाची संपूर्ण माहिती देण्यासाठी टिळक मंदिरात वर्ग चालविला होता. या वर्गातील व्याख्याने मी ऐकली होती. या पक्षाच्या निवडणुकीत विठ्ठलराव जगताप यांना उमेदवार म्हणून उभे केले होते. पक्षाच्या प्रचारासाठी तर्कतीर्थांची व्याख्याने झाली.

आपण पक्षांतर का केले, असे त्यांना विचारताच तर्कतीर्थ म्हणाले, 'दोन्ही पक्षांची मूलभूत तत्त्वे देशाला स्वातंत्र्य मिळवून देणे' ही एकच आहेत. काँग्रेस पक्षात राहूनच कार्य करण्याचे ठरविले आहे.

सन १९५५ साली बापूजी साळुंखे यांनी कोल्हापूर येथे 'स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था' स्थापन केली. या संस्थेने वाई ब्राह्मण समाजाच्या सहकार्याने महर्षी शिंदे विद्या मंदिर (हायस्कूल) ब्राह्म समाजात तारीख ११ जून १९५६ रोजी सुरू केले. येथे कॉलेज काढण्यासाठी बापूजी साळुंखे प्रयत्न करू लागले. वाई व खेड्यांतील कार्यकर्ते यांनी त्यांना विरोध केला. वाई नगरपालिकेच्या गांधी सभागृहात मोठी सभा झाली. कॉलेजबाबत खूप चर्चाही झाली. अखेर जनता कॉलेज या नावाने प्राज्ञपाठशाळेने कॉलेज सुरू केले. या कॉलेजचे किसन वीर महाविद्यालय असे नामकरण झाले.

वाईतील सामाजिक कार्यकर्ते नारायणराव चव्हाण यांचे निधन २१ जानेवारी १९६० रोजी झाले. निधनाची बातमी समजताच तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री हे त्यांचे शेवटचे दर्शन घेण्यासाठी आले. त्यांच्या सामाजिक कार्याचे वर्णन केले. ‘उदार धर्मवादी, गोरगरिबांचा वाली, सत्य, प्रामाणिक कृतीने सुधारणा करून समाजास मार्ग दाखविणारा, निगर्वी, आपली संपत्ती गरिबांसाठी खर्च करणारा, प्रेम, दया, क्षमा या गुणांचा वाईतील थोर पुरुष हरपला, याबद्दल दुःख होत आहे.’ ‘पुढे असला पुरुष होणे कठीण’ असे गौरवपर उद्गार काढले.

वाई ब्राह्म समाजाने बालकाश्रमाची शाखा तारीख १-७-६३ रोजी काढली. मुंबई प्रार्थना समाजाचे अध्यक्ष ग. ल. चंदावरकर यांनी वाई बालकाश्रमासाठी द्रविडांचा रविवार पेठेत असलेला वाडा खरेदी करावा असे ठरविले. हा वाडा प्राज्ञपाठशाळेस द्रवीड यांनी बक्षीस दिला होता. तो वाडा मिळविण्यासाठी चंदावरकर, नारायणराव चव्हाण असे आम्ही तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री यांच्याकडे गेलो होतो. चंदावरकर यांनी बालकाश्रमाची माहिती सांगितली. अडचणींचे निवेदन केले. त्यावर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री म्हणाले, "तुम्ही सार्वजनिक कार्यासाठी द्रवीड वाडा घेत आहात म्हणून मी तुम्हांस देईन."

वाड्याची तपासणी इंजिनीअरकडून केली. वाडा जुना आहे. बालकाश्रमास उपयोगी नाही असे सांगितले. त्यामुळे व्यवहार झाला नाही. तथापि सामाजिक कार्यास त्वरित मदत करण्याची वृत्ती दिसून येते.

वाई बाह्य समाजात तारीख २८ मे १९९१ रोजी 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे आणि वाई ब्राह्म समाज’ (वाई ब्राह्म समाजाचा इतिहास) या ग्रंथाचे प्रकाशन तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या हस्ते झाले. ग्रंथ लेखक श्री. रा. कृ. बाबर व त्यांच्या पत्नी सौ. माणिकबाई बाबर या उभयतांचा सत्कारही त्यांच्या हस्ते झाला. या वेळी श्री. गो. मा. पवार, श्री. रा. ना. चव्हाण यांची भाषणे झाली. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री आपल्या भाषणात म्हणाले, "महर्षी शिंदे यांनी अस्पृश्यतेचे कार्य त्या कठीण काळात केले. आजही त्यांच्या विचारांची गरज आहे." सेक्रेटरी श्री. द. ना. चव्हाण यांनी आभार मानले.

वाईस तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी या ज्ञानयोगी महापुरुषाचे वास्तव्य झाल्यामुळे

वाईचा लौकिक जगभर झाला. विश्वकोशाच्या निर्मितीमुळे वाई शहराच्या वैभवात भर पडली. विश्वकोश, हेच त्यांचे खरे स्मारक आहे. त्यांच्या निधनामुळे सामाजिक व साहित्य क्षेत्रात पोकळी निर्माण झाली. अशा व्यक्तीचा सहवास मला सहा दशकांहून अधिक काळ घडला.

**(नवभारत, जुलै-ऑगस्ट, १९९५)**

000

## ७६.

# दोन महापुरुषांचे विचारधन

## विश्वास नाईकनवरे

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना मी प्रथम पाहिले ते सोलापूरला आमच्या सार्वजनिक वाचनालयाच्या सभागृहात ते व्याख्यान देत असताना. या गोष्टीला आता पन्नास-पंचावन वर्षे होऊन गेली. तेव्हा मी एक हायस्कुलात जाणारा विद्यार्थी होतो आणि शास्त्रीजी मानवेंद्रनाथ रॉय यांच्या रॅडिकल डेमोक्रॅटिक पार्टीचे नेते होते. त्या राजकीय पक्षाच्या प्रचारसभेत ते बोलत असत. ते एक प्रभावी वक्ते होते. आणि रॅडिकल पार्टीच्या राजकीय व आर्थिक विचारांची मांडणी चित्तवेधक पद्धतीने व उपमा, उत्प्रेक्षा व दृष्टान्तांच्या साहाय्याने ते करत असत. संस्कृत भाषेच्या व्यासंगामुळे भाषासौंदर्यही त्यांच्याकडे होते. त्या सर्वांचा परिणाम होऊन सुशिक्षित श्रोतृवृंद त्यांच्या भाषणांनी भारून गेला असेल तर नवल नाही. शास्त्रीबुवांच्या विचारसंपदेने भारलेले ते वातावरण होते व त्यात मीही सापडलो होतो.

पुढे मी बी.ए. ची परीक्षा देऊन पुढचे शिक्षण घेण्यासाठी सोलापूरचा निरोप घेऊन पुण्यात आलो. नोकरी मिळवून स्वतःच्या पायावर एम. ए. चे शिक्षण घेण्याचे डोक्यात होते. त्यासाठी कारकुनीची नोकरी मिळवावी असे प्रयत्न चालले होते. तर्कतीर्थांची व शिक्षणखात्याचे डायरेक्टर श्री. पावटे यांची चांगली ओळख होती, ही माहिती मिळाल्यावर मी तर्कतीर्थांचा मुक्काम पुण्यात आहे ही बातमी कळताच त्यांना जाऊन भेटलो व मला कारकून म्हणून पावटे यांनी नेमावे यासाठी त्यांनी शब्द टाकावा अशी विनंती केली. शास्त्रीबुवांनी आनंदाने हे काम स्वीकारले. दुसऱ्याच दिवशी नारायण पेठेत सकाळी जाऊन त्यांना भेटलो. माझ्यासारख्या बेकाराच्या खिशात काही नव्हतेच. त्यामुळे शास्त्रीबुवांना रिक्षा करून नेणे अशक्यच होते. म्हणून मी मनातून शरमिंदा झालो होतो. पण शास्त्रीबुवा म्हणाले, "सकाळची प्रसन्न वेळ आहे. आपण चालतच पावट्यांच्या बंगल्यावर जाऊ." एकूण आम्ही चालतच गेलो. बंगल्यात शिरताच पावटे यांनी आनंदाने शास्त्रीबुवांचे स्वागत केले. त्यांना शास्त्रीबुवांविषयी केवढा आदर वाटत असावा हे माझ्या आपोआपच लक्षात

आले. शास्त्रीबुवांनी मला ती नोकरी मिळवून दिली व माझा मार्ग निष्कंटक झाला.

अर्थात शास्त्रीबुवा मला एक तरुण रॉयवादी म्हणून ओळखत होते यात काही शंका नाही. म्हणून तर मी हक्काने त्यांची मदत मागण्याचे धाडस केले. या नोकरीसाठी वशिला लावण्याचे काम करण्यापूर्वी बेळगावला आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेत माझ्या कॉलेजला मी ढाल मिळवून दिली होती, तीही त्यांच्याच हस्ते मला दिली गेली होती. त्या १९४८ साली झालेल्या बक्षीस समारंभात त्यांनी केलेले अध्यक्षीय भाषण माझ्या अजून स्मरणात आहे. वक्तृत्व म्हणजे एक नाटकी प्रकार नव्हे तर जे विचार वक्ता मांडतो त्या विचारांना कृत्यात सर्वांत महत्त्वाचे स्थान असते ही गोष्ट त्यांनी आवर्जून सांगितलेली होती. मुळात विचार प्रभावी नसेल तर केवळ वक्तृत्वाच्या कौशल्याचा काही उपयोग नाही हे त्यांनी त्या वेळी मांडले होते.

लौकरच डेहराडून येथे रॉयवाद्यांचा एक मेळावा होता तिथे जमलेल्या मंडळींत वयाने सर्वांत लहान असा मीही होतो. तिथल्या इंग्रजी भाषेत चालणाऱ्या तत्त्वचर्चेत होणारा शास्त्रीबुवांचा सहभाग पाहून मला नवल वाटले. कारण ते इंग्रजीत शिक्षण देणाऱ्या कोणत्याही शाळेत गेलेले नव्हते. पण शास्त्रीबुवा मांडत असलेले मुद्दे स्वतः मानवेंद्रनाथ रॉय किती लक्षपूर्वक ऐकत असत व त्यांच्या विचारांना केवढा मान देत असत हे मला चांगले आठवते. मी अर्थातच केवळ श्रवणभक्ती करत होतो. पण शास्त्रीबुवा, प्रा. गोवर्धन पारीख वगैरे मंडळींनी आग्रह करून मला एकदोनदा भाग घेऊन काही ना काही बोलायला लावले. मी मराठीत जरी आत्मविश्वासाने बोलू शकत असलो तरी इंग्रजीत आपले विचार व्यक्त करण्याचा आत्मविश्वास नव्हता. शास्त्रीबुवांनी प्रोत्साहन दिल्यामुळेच त्या थोर मंडळींत तोंड उघडू शकलो.

यथावकाश एम. ए. ची पदवी पदरात पडल्यावर माझे पुण्यात नोंदणी पद्धतीने लग्न झाले. कसलेही विवाहविधी करण्यावर माझा विश्वास नसल्यामुळे रजिस्ट्रारला बोलावून त्याच्या हस्ते नोंदणीचा समारंभच जाहीर विवाह समारंभ झाला. या लग्नात त्यानंतर वधुवरांना आशीर्वाद देणारी दोनच भाषणे होती. पहिले भाषण कर्मवीर भाऊराव पाटलांचे झाले व दुसरे तर्कतीर्थांचे झाले. भाऊरावांनी आपल्या भाषणात आम्हांला संततिनियमन न करण्याचा सल्ला दिला! त्यांचे म्हणणे असे होते की, सुशिक्षित मंडळी संततीवर मर्यादा घालतात. त्यामुळे त्यांची संख्या कमी होते; पण अशिक्षितांची संख्या मात्र भरमसाठ वाढतच राहते. तेव्हा हे काही बरोबर नाही. म्हणून सुशिक्षितांनी संततीचे नियमन करू नये. अर्थात शास्त्रीबुवांनी या विचाराचे खंडन केले व अष्टपुत्रांऐवजी इष्ट मर्यादित संततीच योग्य, असे विचार मांडले. शास्त्रीबुवांचा आमच्याकडे अनेकांच्या लग्नात पुरोहित म्हणून सहभाग लाभलेला आहे. माझ्या मामांचा विवाह त्यांनीच लावला. माझ्या वडील बंधूच्याही विवाहाचे ते एक पुरोहित होते. सोमनाथाच्या प्रतिष्ठापनाचे आणि गांधीजी राजाजींच्या

मुला-मुलींच्या लग्नाचे पौरोहित्य शास्त्रीजींनी केल्याचे तर प्रसिद्धच आहे.

प्रा. गोवर्धन पारीख आणि शास्त्रीबुवा यांची अभेद्य मैत्री होती. दोघेही एकमेकांची थट्टा करण्यात प्रवीण होते. शास्त्रीबुवांच्या विसराळूपणाविषयी पारीख यांनी रचलेली गोष्ट त्यांच्या अभिनयासहित ऐकणे ही एक मेजवानी असे. एकदा म्हणे शास्त्रीबुवा माटुंग्याला पारीख यांच्या घरी असताना तीन कामे करण्यासाठी घरून निघाले. नंतर जेव्हा ते परत आले ते हात हालवीत आलेले पाहून पारीखसाहेब आश्चर्यचकित झाले. त्यांनी विचारले, ''झाली का सगळी कामे?'' तर शास्त्रीबुवा म्हणाले, ''हो, सगळी कामे झाली.'' पण झाले होते ते असे की, घरून निघून बसमध्ये बसले, तिथे टोपी काढून ठेवली होती ती बसमध्ये विसरले. बसचे तिकीट बरोबर घेऊन वाईचे तिकीट काढायला गेले तिथे बसचे तिकीट ठेवून वाईचे तिकीट घेतले. पुढे लायब्ररीत पुस्तक बदलून घेताना वाईचे तिकीट लायब्ररीत विसरून फक्त पुस्तक घेऊन घरी येण्यासाठी बसमध्ये चढले. शेवटी ते पुस्तकही बसमध्ये विसरून घरी आले. बहुतेक ही सगळी गोष्ट पारिखांच्या थट्टेखोर मेंदूतूनच निघाली असणार. शास्त्रीबुवादेखील अशा हास्यविनोदात भरपूर भाग घेत असत.

आम्ही डेहराडूनला असताना एकदा सगळेजण झाडाखाली बसून कसलीतरी चर्चा करत होतो. पण मधूनच एका पक्ष्याचा ठरावीक लय असलेला असा गोड आवाज येत होता. सगळ्यांचे लक्ष वेधून घेणारा तो ठेका अखेर शास्त्रीबुवांनी एक कल्पित गोष्ट सांगून समजावून सांगितला. ते म्हणाले, नवीन मुलगी पहिल्यांदाच सासरी आली आहे. ती लाजून चूर झालेली आहे. सगळी माणसे तिने काही बोलावे म्हणून प्रयत्न करताहेत. पण ती काही बोलायला तयार नाही. अशी एकंदर अवस्था असताना लोक तिला म्हणताहेत- "गं पोरी, बोल!" त्या छोट्या वाक्यातला तो ठेका त्या पक्ष्याच्या लयीत आहे. असला तर्क शास्त्रीबुवांच्याच डोक्यातून निघू जाणे!

पुणे स्टेशनवरून हैदराबाद एक्स्प्रेसने रॉय आणि एलन रॉय हैदराबादला (मुंबईहून निघालेले) जाणार होते. गाडी पुणे स्टेशनवर थांबण्याच्या काळात त्यांना भेटण्यासाठी आम्ही काही मंडळी स्टेशनवर जमलो होतो. शास्त्रीबुवा अर्थातच त्यांत होते. पण माझ्या सहज लक्षात आले की, त्यांच्या सदऱ्याची कॉलर मानेवर विरलेली होती. मी ही गोष्ट त्यांच्या ध्यानात आणून दिल्यावर त्यांनी काय म्हणावे? "काही बिघडत नाही. आपल्या मागे कोणीच नाहीत. तेव्हा कॉलर फाटल्याचे कोणाला दिसणार?"

महात्मा गांधी आणि मानवेन्द्रनाथ रॉय अशा दोन महापुरुषांचे विचारधन शास्त्रीबुवांच्या गाठीला होते. वास्तविक वैचारिक भूमिकांचा विचार केल्यास हे दोन ध्रुव म्हणता येतील इतके एकमेकांपासून वेगळे विचार होते. तरीही त्यांचा सुरेख समन्वय शास्त्रीबुवांच्या जीवनधारणेत पडलेला होता. रॉय यांनी दिलेली जडवादी विचारसरणी त्यांनी मनोमन स्वीकारली, तरी धर्मविचाराचा खोल ठसा शास्त्रीबुवांच्यामध्ये होताच. महात्मा गांधींची

निर्मम हत्या झाली, तेव्हा शास्त्रीबुवा किती विव्हळ झाले होते हे मला माहीत आहे. ते त्या मानसिक धक्क्यातून सावरण्यासाठी कितीतरी काळ जावा लागला.

शास्त्रीबुवांनी १९४० साली 'हिंदुधर्माची समीक्षा' लिहिली. त्या पुस्तकात हिंदू धर्माची कठोर समीक्षा करणारे शास्त्रीबुवा कालौघामध्ये पुष्कळ निवळले, हे त्यांची १९८४ मध्ये प्रकाशित झालेली 'सर्वधर्मसमीक्षा' वाचली माणजे समजते. पण त्याच वेळी 'हिंदुधर्म समीक्षे'ची तिसरी आवृत्ती काढताना त्यांनी त्यात एका अक्षराचाही बदल केला नाही. मार्क्सवादाच्या प्रभावाखाली असताना केलेली मीमांसा जरी पुढे त्यांनी सोडली असली, तरी मूळ समीक्षेमागची विचारसरणी बव्हंशी त्यांनी कायमच ठेवली होती. आयुष्यभर केलेल्या अध्ययनानंतरही त्यांच्या बुद्धिवादी भूमिकेत तसा फारसा बदल घडला नाही.

जुन्या दर्शनांचा अभ्यास करून त्यांपैकी जेवढे आजच्या नव्या शास्त्रीय ज्ञानाशी सुसंगत असेल तेवढेच स्वीकारण्याची दृष्टी शास्त्रीबुवांनी अखेरपर्यंत कायम ठेवली. म्हणूनच मानवेन्द्रनाथ रॉय यांनी शास्त्रीबुवांचे जे वर्णन केले होते, ते म्हणजे "He represents the best elements of Indian Renaissance" हे- आजही स्वीकारावे लागते. अशा लोकोत्तर तत्त्वज्ञाला माझी विनम्र श्रद्धांजली.

**(तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी: व्यक्तित्व, कार्य आणि विचार**
**संपादक - वसंत पळशीकर, प्रकाशक - प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई**
**वर्ष १९९६, पृष्ठ- १६४, किंमत- २००रु., पृष्ठे-१४ ते १६)**

ooo

७७.

# बहुजन समाजातील विवेकवंतांचे लाडके व जवळचे तर्कतीर्थ

## रा. ना. चव्हाण

प्राज्ञपाठशाळेच्या सरस्वती उत्सवातील व्याख्याने श्रवण करण्याचा माझा क्रम मी हायस्कूलचा विद्यार्थी असल्यापासूनचा आहे. तीर्थाच्या ठिकाणी जन्म होणे व रहिवास होणे हे तर भाग्याचेच पण या तीर्थाचे तीर्थपण प्राज्ञपाठशाळेने जतन केले व वाढविले. वैदिक पंडितांची वाई येथील परंपरा जुनी आहे. पण या परंपरेला संस्थाबद्ध आकार देण्याचे मुख्य श्रेय स्वामी केवलानंद व त्यांचे शिष्य तर्कतीर्थ ह्यांच्याकडेच जाते. ही संस्था येथे नसती, तर येथील ज्ञानाची परंपरा खुंटली असती आणि तिचा परिवर्तनवादी दृष्टिकोनही येथे आला नसता. प्राज्ञपाठशाळेत गंगापुरीच्या घाटाजवळील त्यांच्या निवासस्थानी, तसेच वाकडे यांच्या घरी येता-जाताना मी स्वामींना पाहिले. विशेषतः भद्रेश्वरला जाताना तेथे कृष्णेच्या घाटावरून पाय धुऊन वर येताना मी त्यांना पाही आणि त्यांना वंदन करण्याचे भाग्य मला लाभे. भद्रेश्वरच्या कळसाचे दर्शन घेताना स्वामी ध्यानस्थ उभे राहत. त्या वेळी त्यांच्या जवळ उभे राहण्याचे प्रसंग मी अनुभविले आहेत. तर्कतीर्थांकडे माझे जाणे-येणे होते; आणि त्यांचे गुरू स्वामी केवलानंद ह्यांच्याशी माझा जवळचा संबंधही तर्कतीर्थांमुळेच आला. धर्म आणि समाजसुधारणा यांच्यासंबंधी अनुकूल अशी केवलानंदांची भूमिका होती व त्यांना तर्कतीर्थांसारखा विशाल दृष्टीचा शिष्य भेटला. पूर्वी परंपरावाद्यांवर बाहेरून हल्ले होत असत. पण केवलानंद व तर्कतीर्थ ह्यांनी आतून (वेगळा पंथ व समाज न काढता) जे निर्णय घेतले, त्यामुळे सनातनी पंडितांची बाजू लुळी पडली व ते निष्प्रभ झाले.

तर्कतीर्थ व महर्षी विठ्ठल रामजी शिंदे ह्यांच्या गाठीभेटी होत असत. अस्पृश्यता निवारणाच्या कार्यास प्राचीन ग्रंथांचा आणि संदर्भांचा आधार प्राप्त करून देण्याच्या कामी महात्मा गांधींना तर्कतीर्थांनी भक्कम साहाय्य केले. विठ्ठल रामजी, गांधीजी व तर्कतीर्थ हे तिघेही एकदा ह्या संदर्भात एकत्र आले होते. पुढे विठ्ठल रामजी ह्यांनी वाई येथील ब्राह्मो समाजाच्या कार्यात विशेष लक्ष घातले. ब्राह्मो समाजाला वाईत स्वतःची वास्तू नव्हती,

म्हणून विठ्ठल रामजींनी तर्कतीर्थांना पत्र पाठवून प्राज्ञपाठशाळेत जागा मिळावी अशी विनंती केली आणि तर्कतीर्थांनी ती मान्यही केली. प्राज्ञपाठशाळेत संगतसभेचा आणि सहभोजनाचा एक महत्त्वपूर्ण कार्यक्रमही १९३४ सालच्या सरस्वती उत्सवाच्या निमित्ताने झाला. 'धर्मसमन्वय' ह्या विषयावर व्याख्यान झाले.

बेळगाव येथून प्रसिद्ध होणाऱ्या 'राष्ट्रवीर' ह्या पत्रात १९४५ सालच्या सुमारास तर्कतीर्थांनी महात्मा जोतीराव फुले ह्यांच्यावर विदर्भात दिलेल्या एका व्याख्यानाचा वृत्तान्त आला होता, तो मी वाचला. तिकडले लोक महात्मा फुल्यांवर तर्कतीर्थांचे व्याख्यान ठेवतात, त्यांच्या विद्वत्तेचा लाभ आपण का घेऊ नये, असा विचार मनात येऊन मी तर्कतीर्थांकडे वाई ब्राह्मो समाजाचा चिटणीस ह्या नात्याने गेलो. वाई येथील सत्यशोधक समाजाच्या रौप्य महोत्सवानिमित्त त्यांची व्याख्याने घडवून आणली. 'सत्यशोधक समाज व महात्मा फुले', 'सत्यशोधक समाज व ब्राह्मो समाज' आणि 'शेतकरी-कामकरी जनतेचे स्वराज्य' अशा तीन विषयांवर शास्त्रीजींनी व्याख्याने दिली. त्यानंतर त्यांचा आणि माझा सहवास वाढत गेला. त्या वेळी तर्कतीर्थ मानवेंद्रनाथ रॉय ह्यांच्या रॅडिकल पार्टीत असल्यामुळे त्यांचा पवित्रा काँग्रेसविरोधी असे. परंतु काँग्रेसला अनुकूल असलेल्या बहुसंख्य लोकांचा मुलाहिजा न ठेवता तर्कतीर्थांची अनेक व्याख्याने आम्ही घडवून आणली. उपर्युक्त तीन व्याख्यानांचा सारांश प्रसिद्ध करावा, असे मनात आले आणि शास्त्रीजींनी त्यास मान्यता दिली. रोज सकाळी साडेसहानंतर वरील व्याख्याने लिहून घेण्यासाठी मी तर्कतीर्थांकडे जाऊ लागलो.

माझ्यापाशी महात्मा जोतीराव फुले ह्यांची 'गुलामगिरी', 'सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक' आणि 'इशारा' अशी काही पुस्तके होती. जोतीरावांचे चरित्र लिहिण्याची अद्याप अपुरी असलेली माझी इच्छा त्या वेळीदेखील माझ्या मनात होतीच. पण ह्या पुस्तकांचे 'इंगित' मला चांगले समजले नव्हते. ही पुस्तके मी शास्त्रीजींना दिली, तेव्हा त्यांनी त्यांचे सखोल अध्ययन करून त्यांचे सार मला सांगितले व लिहून घेण्याचे कारकुनी कार्य मी केले. 'जोतिनिबंध' छापून झाल्यावर त्याचे नोव्हेंबर १९४७ मध्ये वाईच्या येवले थिएटरात (आताचे चित्रा थिएटर) जाहीर प्रकाशन झाले. पुढे ह्या निबंधाचे इंग्रजी भाषांतर रॅडिकल पक्षाच्या मुखपत्रातही प्रसिद्ध झाले. हा 'जोतिनिबंध' महर्षी विठ्ठल रामजी शिंदे ह्यांच्या स्मृतीस अर्पण करण्यात आला. महर्षींना त्यांच्या निधनानंतर समर्पिलेले हेच पहिले मराठी पुस्तक होय. 'जोतिनिबंधा'चा परिणाम व्यापक ठरला. महात्मा फुले ह्यांच्यावर त्यानंतर इतर अनेक विद्वान लिहू लागले. ह्या पुस्तकातील उतारे घेऊन फुले ह्यांच्या कार्याचे विवेचन अनेक जण करू लागले, अजूनही निबंध ताजा आणि प्रभावी वाटतो. ह्या निबंधामुळे तर्कतीर्थ बहुजनसमाजातील विवेकवतांचे लाडके व जवळचे झाले. हा निबंध प्रकाशित व्हावा म्हणून त्यांच्या मागे मी चिकाटीने तगादा लावला होता. 'जोतिनिबंधा'ला माझे प्रास्ताविक त्यांनी स्वतःच मागून घेतले व प्रारंभी छापले. ह्या प्रास्ताविकात विठ्ठल रामजींनी

म. फुले ह्यांच्यावर रचलेले काव्य मी समाविष्ट केले होते. तेच आचार्य अत्रे ह्यांच्या म. फुले ह्यांच्यावरील चित्रपटारंभी आहे.

'जोतिनिबंधा'च्या प्रकाशनानंतर शास्त्रीजींनी बहुजनसमाजातील सुधारकांचा इतिहास लिहिण्याचे काम अंगावर घेतले. महात्मा फुले व त्यांच्या प्रवाहातील कर्त्या पुरुषांची चरित्रे म्हणजे एकच व्यापक विषय होतो, अशी भूमिका तर्कतीर्थांनी घेतली. म. फुले, डॉ. विश्राम रामजी घोले, नारायण मेघाजी लोखंडे, कृष्णराव भालेकर, भास्करराव जाधव, शाहू महाराज, मुकुंदराव पाटील व तर्खडकर ह्यांची चरित्रे लिहून झाली. मी अनेक दुर्मीळ साधने व पुस्तकांचा संच जमविला होता. तर्कतीर्थांच्या वजनामुळे आणखी कित्येक साधने मिळू शकली. वरील सर्वांची चरित्रे लिहिताना त्यांच्या साहित्याचा मुख्यतः परामर्श घेण्यात आला. महर्षी शिंदे ह्यांच्यावरही एक पानभर मजकूर लिहिला होता. नंतर हा उपक्रम अपुरा राहिला आणि हे सर्व लेखन अप्रकाशितही राहिले. पण यामुळे मला तर्कतीर्थांचा सहवास घडला. त्यांची वैचारिक बैठक आणि विषय थोडक्यात सांगण्याची शक्ती इ. गुण मी समक्ष पाहू शकलो. सामाजिक सुधारणांचा इतिहास व गेल्या शतकातील एकूण समाजप्रबोधन ह्यांचा व्यापक आशय मला समजला. बहुजनसमाजातील थोर समाजसुधारकांचा इतिहास लिहिताना महात्मा फुले ह्यांचेही चरित्र शास्त्रीजींनी लिहिले होते. त्याचे हस्तलिखित व इतर साधने ह्यांचा आचार्य अत्रे ह्यांना महात्मा फुले ह्यांच्यावरील चित्रपट काढताना मोठा उपयोग झाला.

ना. यशवंतराव चव्हाण ह्यांच्या रूपाने बहुजनसमाजाला व्यापक दृष्टी आणि विचार असलेले नेतृत्व मिळाले. त्यांना साथ देण्यात तर्कतीर्थ मागे राहिले नाहीत. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष म्हणून यशवंतरावांनी तर्कतीर्थांची केलेली निवड अचूक ठरली. वाईत विश्वकोश उभा राहिला आणि त्याचे विराट कार्य आजही चालू आहे.

**(तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी: व्यक्तित्व, कार्य आणि विचार**
**संपादक- वसंत पळशीकर, प्रकाशक- प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई**
**वर्ष - १९९६, किंमत २०० रु., पृष्ठे-१६४)**

ooo

## ७८.

# मोहनदासांचे चेलेः तर्कतीर्थ

## बाबा फाटक

२६ जानेवारी हा माझा जन्मदिवस. १९५९ साल होते. त्या वर्षीच्या २६ जानेवारीस मी आबांना सांगितले. ‘‘आबा, मी आज तुम्हाला आणि सौ. सतीकाकूंना सूत कातण्याची दीक्षा देणार आहे.’’ आबांनी मला लगेच संमती दिली. रात्रीचे ८ वाजले होते. घोंगडी पसरली. चरखा उघडला आणि लहान मुलांना जशी हातात पेन्सील धरून अक्षरे शिकवतात, तसा मी आबांचा हात धरला आणि त्यांना चरखा फिरवण्यास आणि कापसाचा पेळू धरण्यास शिकवले. आबा मला म्हणाले, ‘‘१९१९ साली साबरमती आश्रमात राजेंद्र प्रसादांबरोबर एकदा सूत काढण्याचा प्रयत्न; केला पण त्या वेळी मला ते जमले नाही, म्हणून तेव्हा जो चरखा सोडला, तो आज तारखेपर्यंत हातात धरला नाही.’’ मी आबांना दोन-तीन धागे काढण्याचे दाखविले. लगेच ते म्हणाले, "द्या चरखा." मी चरखा त्यांच्या हातात दिला. त्यांनी भराभर सूत काढण्यास सुरुवात केली. दोन-तीन वेळा चुकले; दोन-चार वेळा फक्त सूत तुटले. पण एकाच वेळी त्यांनी अर्धे चाक सूत काढले. दुसऱ्या दिवशी पहाटे ५ वाजता आबा चरखा घेऊन पुन्हा सूतकताईच्या अभ्यासाला बसले. मी जवळच बसून मार्गदर्शन करीत होतो. थंडी फार पडली होती. सौ. सतीकाकूनी भला मोठा कपभर चहा करून आणला. आबांच्या जवळच घोंगडीवर ठेवला. सौ. सतीकाकूंनी ‘चहा ठेवला आहे’ असे सांगितले; पण शास्त्रीजी सूत काढण्यात दंग झाले होते. समाधी लागली होती. मीसुद्धा पाहात होतो. चहाच्या गोडीपेक्षा सूतकताईची गोडी त्यांना अधिक होती. चहा थंड झाल्यावर मी त्यांच्या पायावर चापटी मारून मोठ्याने ओरडून सांगितले, ‘‘आबा, चहा थंड झाला!’’ तेव्हा आबांची समाधी उतरली आणि तो थंड चहा पिऊन परत सूतकताईत दंग झाले. सूत सफाईदार काढण्यासाठी आबांना अर्धा तासही शिकावे लागले नाही, ह्याचे मलाच मोठे आश्चर्य वाटले. आबा म्हणाले, "तुमच्यासारखा चांगला गुरू मिळाला म्हणून मला चटकन सूत काढता आले. गोडबोले फोटोग्राफरना आज बोलावून आणा आणि गुरुशिष्यांचा फोटो काढून घेऊ".

१९७२ सालची गोष्ट आहे. वाईला सरस्वती उत्सवाला आम्ही सर्व एकत्र जमतो. जुन्यापुराण्या आठवणी, स्वामींच्या (केवलानंदांच्या) गोष्टींत उत्सवाचे तीन दिवस फार मजेत जातात. अश्विन शुद्ध नवमीला उत्सव संपतो. दुसऱ्या दिवशी दसरा असतो. जो तो आपापल्या घरी जातो. मी दापोलीला घरी जेवायला जाणार होतो. पुण्याच्या मीमांसा विद्यालयाचे श्री. तांबेशास्त्री पुण्याला आपल्या मित्राकडे जेवावयास जाणार होते. पण त्या दिवशी सकाळीच आबांच्या अभ्यासिकेत त्यांच्याजवळ मी व श्री. तांबेशास्त्री आबांचे विचार ऐकत बसलो. ब्रह्मसूत्रांवर आबा बोलत होते. आबा गुरुजी आणि आम्ही दोघे शिष्य असा वर्ग सुरू होता. सकाळी १० वाजले, ११ वाजले; पण आमचा वर्ग संपेचना. मी दापोलीला जाण्याचे विसरलो आणि तांबेशास्त्री पुण्याला जाण्याचे विसरले आणि मग आम्ही त्या दिवशी सौ. सतीकाकूंच्या घरचे पाहुणे म्हणून तेथेच जेवण केले. असे आहेत आमचे आबा, मोहनदासचे चेले!

**(तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी: व्यक्तित्व, कार्य आणि विचार,**
**संपादक- वसंत पळशीकर,**
**प्रकाशक - प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई,**
**वर्ष - १९६६ किंमत- २०० रु., पृष्ठे १६४, पृ. २६)**

OOO

## ७९.

# समाजशिक्षक शास्त्रीजी

## अनिल जोशी

१९६२ ते १९९४ या सुमारे बत्तीस वर्षांच्या काळात आबांचा अत्यंत जवळून सहवास मला लाभला. मी माझ्या आयुष्यातील हा अत्यंत मोलाचा असा भाग मानतो. सुरुवातीला शास्त्रीजींच्याबद्दल मनामध्ये असणारी आदरयुक्त भीती कालांतराने नाहीशी झाली व त्यांच्या व माझ्यात एक प्रकारचे आपुलकीचे नाते निर्माण झाले.

वृत्तपत्र व्यवसायाशी मी निगडित असल्याने तालुक्यात व जिल्ह्यात घडणाऱ्या विविध राजकीय घटनांची माहिती करून घ्यावी म्हणून शास्त्रीजी वरचेवर मला बोलवीत असत. विशेषतः सातारा जिल्ह्यातील दोन प्रमुख राजकीय नेते, एक किसन महादेव वीर व दुसरे यशवंतरावजी चव्हाण यांच्या संबंधांत शास्त्रीजींना विशेष प्रेम होते आणि या दोघांच्याही राजकीय हालचालींची त्यांना माहिती हवी असे. यशवंतरावजींनी घेतलेल्या भूमिकांसंबंधी शास्त्रीजी उलटसुलट प्रतिक्रिया व्यक्त करीत असत. इंदिरा गांधी यांच्या मंत्रिमंडळात काम करीत असताना यशवंतरावांनी स्वीकारलेली भूमिका शास्त्रीजींना रुचेल अशी नव्हती आणि त्यासंबंधी अनेक वेळा ते आपली नाराजी व्यक्त करीत असत. आणीबाणीनंतर केंद्रामध्ये आलेल्या आघाडीच्या सरकारात विरोधी पक्षनेता म्हणून यशवंतरावजींनी घेतलेली भूमिका शास्त्रीजींना पसंत नव्हती. ते म्हणत, "आमचे मित्र हे अत्यंत मृदू स्वभावी असल्याने त्यांच्या मुखातून विरोधी नेत्यांची धोरणे, वक्तव्ये बाहेर पडणे कठीण आहे. विरोधी पक्षनेता हा नेहमी आक्रमक स्वभावाचा असावा लागतो, त्याचा सत्ताधारी पक्षावर एक वेगळा अंकुश असावा लागतो. अहो, आमच्या माणसास हे कसे जमणार?" नंतरच्या काळात यशवंतरावजींच्या राजकीय वाटचालीत जी विविध वळणे आली, त्याबद्दलही शास्त्रीजींच्या प्रतिक्रिया वैशिष्ट्यपूर्ण असत. देशातील मुख्य सत्ताधारी पक्षाच्या म्हणजे इंदिरा काँग्रेसच्या प्रवाहापासून यशवंतरावजी दूर गेले, ही गोष्ट शास्त्रीजींना रुचली नाही. त्या काळात यशवंतरावजींची जी अवस्था निर्माण झाली त्यामुळे शास्त्रीजी अत्यंत अस्वस्थ व बेचैन असायचे आणि यातून बाहेर पडण्यासाठी यशवंतरावजींची भेट होणे आवश्यक आहे असे ते नेहमी म्हणत.

हा योग प्राज्ञपाठशाळेच्या अभ्यासिकेत अचानक घडून आला आणि यशवंतरावजी व शास्त्रीजी यांची सल्लामसलत झाली. झालेल्या चर्चेचा कोणताही सुगावा शास्त्रीजींनी लगेच लागू दिला नाही. पण त्यांच्याबरोबर वाई-पुणे प्रवासात झालेल्या राजकीय घडामोडींच्या चर्चेमध्ये शास्त्रीजी अनवधानाने बोलून गेले, "मी चव्हाणसाहेबांना म्हटले- आता स्वगृही येण्याखेरीज पर्याय दिसत नाही. महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांची आपल्याकडे नजर लागून राहिली आहे. त्यांना या अवस्थेतून बाहेर काढले पाहिजे". ही घटना यशवंतरावजींनी 'आपण स्वगृही परतत आहोत' असे जाहीर करण्यापूर्वी सुमारे चार महिने अगोदरची.

या दोघांच्यामध्ये निर्माण झालेले स्नेहबंध चकित करणारे होते. यशवंतरावजींचा एक पुतण्या एका मोटार अपघातामध्ये निधन पावला आणि त्यासंबंधी शास्त्रीजींनी यशवंतरावजींचे दूरध्वनीवरून सांत्वन केले. यशवंतरावजी म्हणाले, "शास्त्रीजी, जीवनातला आनंद गेला". आणि हे विधान जणू काही यशवंतरावजींनी भविष्यातील घटनांची आपणास कल्पना आहे यास धरूनच केले. सौ. वेणूताईंचे (यशवंतरावांच्या पत्नी) निधन झाले. शास्त्रीजींना या संबंधात प्रतिक्रिया विचारण्यास गेलो. शास्त्रीजी म्हणाले, "माझा मित्र एकाकी राहिला. आता पुढचे सर्व कठीण दिसते." पुतण्या आणि त्यामागोमाग पत्नी यांचे निधन यशवंतरावजींच्या मानसिक अवस्थेस घेरणारे ठरले. ते खचले. वेणूताईंच्या निधनानंतर औपचारिकपणे सांत्वनपर पत्रलेखनाचा भाग शास्त्रीजींनी पूर्ण केला होता हे खरे. पण दोघांच्याही मनात एकमेकांच्या भेटीची तीव्र इच्छा होती आणि ती भेट घडली. वडीलधारी व्यक्ती म्हणून यशवंतरावजींनी शास्त्रीजींच्यासमोर मनातील दुःखावेग व्यक्त केला. डोळ्यांतून अश्रुधारा वाहत होत्या. शास्त्रीजी गंभीर झाले. काय बोलावे हे सुचेनासे झाले. पाच-दहा मिनिटांच्या कालावधीनंतर शास्त्रीजींनी चव्हाणसाहेबांच्या पाठीवरून हात फिरवला आणि त्या स्पर्शाने यशवंतरावजी अधिकच गहिवरले. आपणांस हे आवरले पाहिजे हे ध्यानात येताच ते थांबले. शास्त्रीजींनी हा प्रसंग एका प्रवासात मला सांगितला. या प्रसंगाचा उत्तरार्ध अत्यंत अनपेक्षित व चकित करून सोडणारा होता. यशवंतरावजींना शास्त्रीजी म्हणाले, "यशवंतरावजी, आता हे आवरले पाहिजे. पण मला जे दर्शन घडलं ते फार सुरेख होतं. वेणूताई ही एका परक्या कुटुंबातील मुलगी आपल्याकडे पत्नी या नात्याने आली. आपल्या जीवनातील अनेक चढउतार तिने पाहिले. आपल्या सुखदुःखांशी एकरूप झाली. आणि यामुळे त्यांच्यासंबंधीचा प्रेमभाव, आदरभाव आपल्या मनात भरून राहिला. त्यांनी केलेल्या दीर्घकाळच्या सेवेबद्दलची कृतज्ञता आपल्या डोळ्यांतील अश्रूंमुळे व्यक्त झाली. आपले मन मोठे आहे." यशवंतरावजी ऐकत राहिले. शांत झाले आणि या शास्त्रीजींच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावर इतक्या मोठ्या प्रमाणात झाला की, त्यांनी शास्त्रीजींच्या पुढे हात जोडले. घटनांचा अशा तऱ्हेने अर्थ लावून शास्त्रीजी अनेकांना त्या विशिष्ट प्रसंगातून बाहेर काढीत असत.

यशवंतरावजींचे निधन हे शास्त्रीजींना अस्वस्थ करणारे ठरले. मित्र या नात्याने वेळोवेळी प्रकृतीची काळजी घेण्यासंबंधी शास्त्रीजी त्यांना सल्ला देत असत. दिल्लीतील आपल्या निवासस्थानाभोवती असणाऱ्या मोकळया मैदानात आपण सकाळ-संध्याकाळ फिरत राहावे हा त्यांचा नित्याचा सल्ला असे. राजकीय धकाधकीत यशवंतरावजींना साधी दखल घेता आली नाही. आणि त्याचा परिणाम त्यांच्या प्रकृतीवर झाला. घरातील दोन प्रिय व्यक्तींचे निधन, राजकीय क्षेत्रातील मानहानी आणि प्रकृतिअस्वास्थ्य यांतूनच यशवंतरावजींचे निधन झाले असे स्पष्ट मत शास्त्रीजी व्यक्त करीत असत. दिल्ली येथून यशवंतरावजींच्या निधनाची वार्ता आली, त्या वेळी शास्त्रीजी पुण्यातील शासकीय विश्रामधामात होते. यशवंतरावजींचे अंत्यसंस्कार मुंबई येथे होणार असल्याचे सूचित झाले होते. पुणे येथे भल्या सकाळीच शास्त्रीजींची आम्ही गाठ घेतली. शास्त्रीजी सुन्न स्थितीत होते. यशवंतरावांचा चाहतावर्ग बहुसंख्येने सातारा, सांगली, कोल्हापूर या भागातला असल्याने त्यांचे अंत्यसंस्कार कराड येथील कृष्णा-कोयनेच्या संगमावरच व्हावेत असे शास्त्रीजींचे मत होते. त्यांनी वसंतदादा पाटील यांना आपले मत फोनवरून सांगितले. उलटसुलट चर्चा झाल्या, पण शास्त्रीजी आपल्या मताशी पक्के होते. कराडचे नगराध्यक्ष पी. डी. पाटील यांनाही शास्त्रीजींनी आपले मत स्पष्ट करून सांगितले. दोघांचेही एकमत झाले. त्याच शासकीय विश्रामधामात त्या वेळचे एस. काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांचा मुक्काम होता आणि याबाबत शास्त्रीजी त्यांच्याशीही बोलले. या सर्वांच्याच एकमताच्या रेट्यातून वसंतदादा पाटील यांनी आपला निर्णय बदलला व यशवंतरावांच्या पार्थिव देहावर कराड येथे अंत्यसंस्कार करण्याचे निश्चित झाले. आकाशवाणीवरून हा निर्णय जाहीर झाला आणि लाखोंच्या संख्येतील जनसमुदाय त्या प्रीतिसंगमावर एकत्रित झाला. शास्त्रीजींनी जे मत व्यक्त केले त्याचे प्रत्यक्ष दर्शन कराड येथे झाले. शास्त्रीजींच्या या भूमिकेपाठीमागे त्या परिसरातील जनतेचे मन होते, तितकीच एक प्रकारची राजकीय खुबी होती.

शास्त्रीजींना लो. टिळकांच्याविषयी कमालीचा आदर होता. त्यांची राष्ट्रभक्ती, त्यांचे राजकारण, त्यांचे तत्त्वज्ञान, त्यांचे वाङ्मयीन श्रेष्ठत्व या सर्व गोष्टींचे संदर्भ शास्त्रीजी वेळोवेळी देत असत. मी शास्त्रीजींना विचारले, "या लोकमान्यांशी आपला किती वेळा संबंध आला?" "चार वेळा त्यांची माझी भेट झाली. पहिली भेट बडोदा येथे त्या वेळचे कलेक्टर श्री. शारंगपाणी यांच्या निवासस्थानी झाली. या भेटीच्या वेळी विनोबा भावे हे उपस्थित होते. दुसरा योग लो. टिळक १९१७ मध्ये वाई येथे आले असता आला. नंतर मी उच्च शिक्षणासाठी वाराणसी येथे जाण्यास निघालो असता महादेवशास्त्री दिवेकरांनी मला सांगितले, 'पुणे येथे जा. लोकमान्यांचे दर्शन घे आणि मगच पुढे जा.' दिवेकरशास्त्रींच्या या आदेशाचे मी पालन केले. पुण्याच्या गायकवाड वाड्यात लोकमान्यांचे दर्शन घेतले आणि लोकमान्यांनी आशीर्वादासाठी माझ्या पाठीवर जो हात ठेवला तो स्पर्श आजही

माझ्या स्मरणात आहे.'' या संदर्भातील शास्त्रीजींची पुढची आठवण अशी. ते म्हणाले, "आम्ही प्राज्ञपाठशाळेतील सर्वच लोक लोकमान्यांच्या 'गीतारहस्या'चे समर्थक होतो. भाऊशास्त्री लेले हे 'गीतारहस्या'चे टीकाकार होते. नागपूर येथे यावर वाद झाला. त्या वेळी समर्थन करण्यासाठी दिनकरशास्त्री कानडे हे प्रमुख होते. 'गीतारहस्या'ची पहिली प्रत प्रसिद्ध झाल्यानंतर मी त्याचे तीन वेळा पारायण केले. विनोबा भावे १९१७ मध्ये वाईस आले असता त्यांनी हे पाहिले. त्यांनी मला 'गीतारहस्या'तील तीन वाक्ये सांगितली आणि ती कोणत्या संदर्भात, कोणत्या प्रकरणात आली आहेत याचे बिनचूक उत्तर मी दिले. त्यावर विनोबा अत्यंत खूश झाले. लोकमान्यांचा राष्ट्रवाद आम्हांस मान्य होता; कारण तो राष्ट्रवाद मानवतावादावर आधारित होता. केवळ हिंदुत्ववादावर नव्हे."

शास्त्रीजी खऱ्या अर्थाने समाजशिक्षक म्हणूनच लोकांसमोर राहिले. व्यासंगी विद्वान, तत्त्वज्ञानाचे अभ्यासक, राजकीय-सामाजिक घटनांचे समीक्षक, एक श्रेष्ठ साहित्यिक या गोष्टींचे त्यांच्याशी झालेल्या चर्चा, त्यांची सभासंमेलनांतील भाषणे, मुलाखती यांमधून दर्शन होत असे. पण यापेक्षाही मला शास्त्रीजींच्यामधला माणूस फार आकर्षक वाटायचा. आपल्या विद्वत्तेची सर्व वस्त्रे बाजूला ठेवून सामान्य लोकांशी एकरूप होण्याची त्यांची एक विशेष ढब होती. वाई तालुक्यातील वहिगाव या ठिकाणी एका शिवमंदिराच्या उद्घाटनासाठी जाण्याचा प्रसंग आला. शास्त्रीजी त्या वेळी ८१ वर्षांचे होते. मुख्य रस्त्यापासून मंदिराकडे जाणारा रस्ता हा कच्चा होता. शेतजमिनीतून जाणारा हा रस्ता फारच खराब होता. मोटारप्रवास अशक्य होता. ग्रामस्थांनी बैलगाडीची व्यवस्था केलेली होती. रामभाऊ कोल्हटकर व मी यामुळे थोडे बेचैन झालो पण शास्त्रीजी खूश होते. "अहो, हा प्रवास अत्यंत मजेशीर असतो." सुमारे २५ मिनिटांच्या गाडीप्रवासानंतर मंदिराच्या ठिकाणी आम्ही सर्व जण पोहोचलो. ग्रामस्थांनी व महिलांनी यथोचित स्वागत केले. या शिवमंदिराच्या उद्‌घाटनासाठी पंढरपूरहून सहजानंद नावाचे एक साधुपुरुष तेथे आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्वागत, परिचय यांसारख्या औपचारिक गोष्टी झाल्यानंतर सहजानंद स्वामींचे भाषण झाले. सुरुवातीला स्वामींनी 'जय शंभो, शिवशंभो' असे भजन केले, टाळयांच्या नादात सुरू झालेले भजन, त्याच्याशी एकरूप झालेला समोरील स्त्री-पुरुषांचा समुदाय पाहताच शास्त्रीजी खुर्चीवरून उठले आणि स्वतः तोंडाने 'जय शंभो, शिवशंभो' असे भजन करीत स्वामीजींच्याबरोबर अक्षरशः नाचू लागले, तल्लीन झाले. शास्त्रीजींमधील विद्वान पंडित बाजूला राहिला. आणि आपल्या या कृतीचा समोरच्या जनसमुदायावर झालेला परिणाम लक्षात येताच शास्त्रीजींनी या समारंभात ग्रामसुधारणेवर सुमारे अर्धा तास भाषण दिले आणि कुटुंबनियोजनाचे महत्त्व हा मुख्य मुद्दा उपस्थित महिलांसमोर त्यांनी मांडला. सामान्य लोकांशी एकरूप होण्याची शास्त्रीजींची ही रीत विलक्षण होती. अनेक विद्वत्सभा गाजविणारा हा महान पंडित एका पादत्राणांच्या दुकानाचे उद्घाटन करतो आणि तेथे देशी बनावटीतील पादत्राणांचे महत्त्व

सांगतो हे पाहिल्यावर अनेकांना शास्त्रीजी आपल्यातील वाटत असत. वाई-सोलापूर प्रवासामध्ये त्यांच्या एका मित्राच्या घरी ऐन एप्रिल महिन्यातील उन्हाळ्यात भोजनास जाण्याचा प्रसंग आला. मुख्य रस्त्यापासून शास्त्रीजींच्या मित्राचे हे घर थोडे दूर होते. दुपारचा एकचा सुमार. घरी पोचताच मित्राने व त्याच्या पत्नीने शास्त्रीजींचे स्वागत केले. थंडगार लिंबूसरबत घेतल्यानंतर भोजनाचा विषय आला. शास्त्रीजी आपल्या मित्राला म्हणाले, "अहो, थोडा वेळ लागला तरी चालेल, माझ्याबरोबर कृष्णाकाठचा एक शाकाहारी ब्राह्मण आहे." मित्राने हे लक्षात घेतले. शास्त्रीजींसह जमलेल्या अन्य लोकांना मांसाहारी भोजन व माझ्यासाठी शाकाहारी भोजन असा बेत होता. केळीच्या पानावर भोजन होते. माझ्या पानात एका बशीत असणारा शाकाहारी रस्सा पाहून शास्त्रीजी उद्गारले, "तुमच्या पानात जे आहे ते अधिक रुचकर, चमचमीत व चविष्ट आहे. त्याचा रंगच सांगतो आहे." थोडीफार हास्याची लहर उमटली आणि शास्त्रीजींनी पेशवाईच्या काळातील केळीच्या पानावरील भोजनाच्या पंक्तींचे रसभरीत वर्णन केले. समोरच्या भोजनाचा आस्वाद घेताघेताच पेशवाईतील भोजनप्रसंगाचे शास्त्रीजी करीत असलेले वर्णन उपस्थित लोकांना एक वेगळा आनंद देत होते. भोजन उरकल्यानंतर सोलापूरच्या दिशेने पुन्हा प्रवास सुरू होताच शास्त्रीजींना मी प्रश्न विचारला, "आज केळीच्या पानावरील भोजनाचे हे आख्यान कसे काय सुचले?" शास्त्रीजी म्हणाले, "अहो, भर दुपारची वेळ. माझ्या स्वागताच्या निमित्ताने अपेक्षेपेक्षा जादा संख्येने आलेले मित्र व आप्तेष्ट यांमुळे माझ्या मित्राची व त्याच्या पत्नीची कुचंबणा मला दिसली. त्यांची कुजबूज माझ्या कानी आली. सर्व लोकांना एकाच वेळी भोजनास बसण्यासाठी स्टीलची ताटे नाहीत आणि म्हणून त्या उभयतांनी केळीच्या पानांचा वापर केला. त्यांचा हा निर्णय तसा योग्य होता. त्याचे समाधान त्यांना मिळणे आवश्यक होते. याच हेतूने केळीच्या पानावरील भोजन ही बाब वेगळा आनंद देणारी कशी आहे हे सांगावे असे मला वाटले". शास्त्रीजींच्या मित्रास व त्याच्या पत्नीस यामधून वेगळे समाधान मिळाले हे खरे.

दीर्घायुषी ठरलेले शास्त्रीजी जीवनाचे खऱ्या अर्थाने आस्वादक होते. प्रत्येकाबद्दलची कृतज्ञता व्यक्त करण्याची त्यांची एक विशिष्ट रीत होती. कधीकधी धीरगंभीर तर कधी उल्हसित, कधी मिस्कील तर कधी थट्टेखोर अशा विविध भावछटांचे दर्शन मला घडलेले आहे. हेच शास्त्रीजी अत्यंत दुःखावस्थेतही असल्याचे मी पाहिले आहे. मला प्रसंग आठवतो तो त्यांचे स्वीय सहायक रामभाऊ कोल्हटकर हे असाध्य रोगाने ग्रस्त असतानाचा.

एखाद्या मातेच्या ममतेने शास्त्रीजी कोल्हटकर यांच्या स्वास्थ्याची काळजी घेत होते. अंतिम दिवशी डॉ. प्रयाग यांनी कोल्हटकर औषधास प्रतिसाद देत आहेत असे सांगताच शास्त्रीजी उल्हसित झाले. स्वतः पुण्याच्या मंडईमध्ये जाऊन रसरशीत नारिंगे, मोसंबी व शहाळी त्यांनी खरेदी केली. शहाळ्याचे पाणी त्यांनी कोल्हटकर यांच्या तोंडात घातले. त्या वेळचे दृश्य वर्णन करण्यास शब्द सापडणे कठीण आहे. शास्त्रीजी थोडेफार सुखावले.

पण काळ एक प्रकारचा खेळ खेळत होता हे ध्यानात आले नाही. १५ फेब्रुवारीच्या मध्यरात्री कोल्हटकर यांनी अखेरचा श्वास घेतला. त्या वेळी शास्त्रीजी पुण्याच्या शासकीय विश्रामधामात होते. त्यांना ही वार्ता कळली आणि ते कोसळले. इष्टमित्रांचे दुःखद प्रसंगी सांत्वन करणारे शास्त्रीजी श्रद्धांजलीच्या सभेमध्ये आपल्या जणू काही पुत्रशोकाची भाषा बोलत राहिले आणि बोलता बोलता ८८ वर्षांचे महान पंडित एका सामान्य माणसासारखे भावनावश होऊन ढसढसा रडू लागले. आणि मुखातून या प्रसंगी त्यांनी जे वाक्य बाहेर काढले ते होते, "अहो, माझ्या जीवनातील राम गेला."

शास्त्रीजींच्याबरोबरचा तीन दशकांहून अधिक काळचा सहवास नियतीने अनपेक्षितरीत्या खंडित केला. महाबळेश्वर येथे 'कृष्णादर्शन' या आपल्या निवासस्थानात २७ मे १९९४ च्या पहाटे भोवतालच्या निसर्गरम्य वनश्रीच्या साक्षीने शास्त्रीजींनी आपला प्रवास शांतपणे संपविला. 'कृष्णादर्शन' हे त्यांचे निवासस्थान त्यांच्या मनातील विचारांचे मूर्तरूप होते. वयाची ९४ वर्षे माणसांच्या दुनियेत रममाण झालेले शास्त्रीजी कृष्णेच्या उगमापाशी एकांतात राहिले आणि अचानकपणे त्यांनी हा प्रवास संपविला. डॉ. कुमार सप्तर्षी हे ९१ साली शास्त्रीजींच्याकडे सपत्नीक आले होते. 'सत्याग्रही' नावाचे मासिक आपण सुरू करीत आहोत असा मनोदय त्यांनी शास्त्रीजींसमोर व्यक्त केला. डिसेंबर महिन्यातील ८ तारखेची दुपारची चारची वेळ. डॉ. सप्तर्षी यांनी आपल्या मासिकाच्या उद्दिष्टांची रूपरेषा मांडली. शास्त्रीजींना त्यांनी सल्ला विचारला. जगाची सद्यःस्थिती सुधारण्यासाठी कोणत्या विचारांचा प्रचार व प्रसार आवश्यक आहे, यासंबंधीचे मत शास्त्रीजी व्यक्त करीत होते. ते म्हणाले, "जगाची सद्यःस्थिती सुधारण्यासाठी सत्यम् शिवम् सुंदरम् यांचे अधिष्ठान असणारे राजकीय विचार हवेत. विज्ञान हे सत्याधिष्ठित असते, पण त्याचे अंतिम उद्दिष्ट शिवम् हवे. कला, साहित्य आदींमध्ये शिवम् सुंदरमचा मिलाफ हवा," हे सांगत असताना शास्त्रीजी स्वतःच्या मनातील वेगळेच विचार व्यक्त करू लागले. आपणांस लाभलेल्या या दीर्घायुष्याच्या संबंधात ते म्हणाले, "आता हे सर्व नको वाटते. लक्ष पैलतीराकडे आहे. जगाचे आणि जगण्याचे आता कोडे म्हणून राहिले नाही. मालक आपल्या घरगड्यास हाक मारतो. तो गडी त्या हाकेस तत्काळ प्रतिसाद देतो आणि मालकाकडे धावत सुटतो. मला त्या 'अंतिका'ने (नियन्त्याने) हाक मारली की मी निघणार आहे. मन गुंतावे असे काही राहिले नाही. त्याची हाक आली की मी सिद्ध आहे. त्याचे बोट धरायचे आणि जायचे." शास्त्रीजींनी नियंत्याची हाक ऐकली. एका अर्थाने ते सत्यवचनी ठरले.

**(तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी: व्यक्तित्व, कार्य आणि विचार**
**संपादक - वसंत पळशीकर, प्रकाशन १९९६,**
**पृष्ठे १६४, किंमत २००/- रु, पृष्ठ क्र. ३९ ते ४३)**

○○○

## ८०.

# माझे सहाध्यायी शिक्षक : तर्कतीर्थ

## पुंडलीकजी कातगडे

वाईच्या प्राज्ञपाठशाळेत असताना मी व माझे एक स्नेही भय्याशास्त्री वाटवे ह्यांनी केवलानंद सरस्वती ह्यांच्याकडे वेदान्तकारिका शिकण्याचा प्रारंभ केला होता. परंतु एके दिवशी चढाओढीने पुरणपोळ्या खाल्ल्यामुळे पाठाच्या वेळी आम्हा दोघांना झोपेची अनावर सुरसुरी आली. आम्ही झोपलो असल्याचे लपवून ठेवण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. पू. केवलानंद सरस्वती ह्यांनी आम्हा दोघांना झोपेतून जागे करण्याच्या हेतूने विचारले, "पुंडलीकजी, भैय्याशास्त्री, पाठ संपला आहे. मी आज आपल्याला शिकविलेले समजले ना?" आम्ही दोघांनी 'होय, समजले' असे उत्तर दिले. आम्ही झोपलो होतो ही गोष्ट केवलानंदांना समजली असेल काय? असा विचार करीत असताना हातात पाटी घेऊन केवलानंदांकडून एक विद्यार्थी आला. त्या पाटीवर लिहिले होते ''उद्यापासून पाठाला येऊ नका. कारण तुम्हाला झोपेतदेखील समजते.'' त्यावर आम्ही दोघांनी केवलानंदांची माफी मागितली व वस्तुस्थिती निवेदन केली. पण तेवढ्यावर ते प्रकरण मिटू शकले नाही. केवलानंदांचा ठाम नकार पाहून मी त्यांचे म्हणणे मान्य केले तेव्हा केवलानंद म्हणाले, ''तुम्हाला शिकावयाचेच असेल, तर आमचा लक्ष्मण शिकवील''. माझी हरकत नव्हती; पण माझे सहाध्यायी म्हणाले, ''हा लक्ष्मण वयाने माझ्यापेक्षा लहान आहे. मी त्याच्यापुढे शिष्य म्हणून बसणार नाही.'' मी त्यांची समजूत घालण्याच्या हेतूने म्हटले, ''त्याला विद्या लाभली आहे. त्याला येते व आपल्याला येत नाही. ह्याला उपाय काय?'' पण माझ्या सहाध्यायांनी माझे म्हणणे मानले नाही.

शेवटी मी एकट्यानेच वाटल्यास शिकावे, अशा थराला गोष्टी आल्या. आठ आणे लग्न ठरल्यासारखे झाले. पण हा लक्ष्मण मला एकट्याला शिकवायला तयार झाला पाहिजे ना? (त्या काळात आम्ही एकमेकांना एकवचनीच संबोधीत होतो. पुढे हा लक्ष्मण भलताच मोठा झाला आणि आम्ही होतो तिथेच राहिलो!) तर तेही झाले. त्याने मला एकट्याला

शिकवण्याचे मान्य केले. लक्ष्मणाने शिकविलेल्या वेदान्तकारिका मला अधिक चांगल्या समजत होत्या. केवलानंद व लक्ष्मणशास्त्री यांच्या शिकविण्याच्या पद्धतींची मला येथे तुलना करावयाची नाही; पण केवलानंदांना शंका विचारण्यासाठी मला भीती वाटत असे, तशी ती लक्ष्मणाला विचारताना वाटत नसे. जीवशिवाचा संबंध समजावून सांगताना 'जीव हा अपूर्ण आहे' असे लक्ष्मणाने मला शिकविले. येथपर्यंत माझी काही तक्रार नव्हती. परंतु 'येथे अपूर्णत्व म्हणजे पूर्णत्वाचा अभाव असा अर्थ नाही: पूर्णत्वाचाच तो एक भाग आहे,' असे त्याने मला सांगताच माझी बुद्धी खवळून उठली.

मी त्याला म्हटले, ''अपूर्णत्व म्हणजे पूर्णत्वाचा अभाव नव्हे, ही गोष्ट मी ब्रह्मदेव प्रत्यक्ष आता तरी मानणार नाही. मला ह्या गोष्टी समजत नाहीत म्हणून वाटेल ते सांगून टिंगलबाजी करू नये.'' अशी भाषा केवलानंदांपुढे बोलण्याची आमचीच काय, कोणाचीच छाती नव्हती. हा विषय लक्ष्मण मला तीन दिवस सांगत होता. त्या तीन-चार दिवसांत वेदान्त तत्त्वज्ञानात माझा खरा प्रवेश झाला. मला त्याची शिकवण आजही स्पष्टपणे आठवते.

भारतात अत्युच्च दर्जाची जी संस्कृतज्ज्ञ व धर्मज्ञ विद्वान माणसे आहेत, त्यांत लक्ष्मणशास्त्री ह्यांचा दर्जा श्रेष्ठ पातळीवर मोजावा लागेल. अनेक विद्वान विशेष वादविवादाच्या प्रसंगी लक्ष्मणशास्त्रींना बोलावून नेत. पोथी- पुस्तकांतील जरूर ते संदर्भ पटकन शोधून देण्यात व ते संस्कृतात व्यवस्थित मांडण्यात लक्ष्मणशास्त्रींचा हातखंडा. अस्पृश्यता हिंदू धर्मात कोठून व कशी आली, या प्रश्नाचा विचार करून सनातनी पढिक विद्वानांशी झुंज देण्यासाठी महात्माजींना लक्ष्मणशास्त्र्यांची भरपूर मदत झाली. हुदली येथील गांधी सेवा संघाच्या संमेलनावेळी महात्माजींनी गंगाधरराव देशपांडे ह्यांना लिहून लक्ष्मणशास्त्र्यांना हुदलीला मुद्दाम बोलावून घेतलेले होते. त्यांचा मुक्काम आठ दिवस हुदली येथे होता. आपल्या बुद्धीची झेप व चमक वादविवादाच्या सुरुवातीलाच प्रतिपक्षाच्या नजरेस आणून देण्यात लक्ष्मणशास्त्री पटाईत असल्यामुळे प्रतिपक्षी त्यांच्याशी हुज्जत घालताना जपूनच पावले टाकीत, हे मी पाहिलेले आहे.

मुंबईस झालेल्या एका ज्योतिष संमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मणशास्त्री होते. या संमेलनास चक्री पागोटे वापरणाऱ्या वयोवृद्ध ज्योतिषांपासून युवा ज्योतिषांपर्यंतचे सर्व ज्योतिषी मुंबईस ब्राह्मणसभेत एकत्र जमले होते. ह्या संमेलनास एक प्रेक्षक म्हणून मीही उपस्थित राहिलो होतो. माझी ज्योतिषशास्त्रावरील श्रद्धा कुप्रसिध्दच आहे; पण माझ्या मनातील विचार दुसराच होता. वेदान्तशास्त्र, व्याकरण, तर्कशास्त्र अशा विषयांपैकी ज्योतिषशास्त्र नव्हे. तेव्हा या याबतीत आमचे लक्ष्मणशास्त्री काय बोलतात ते ऐकू या तरी, असे मला कुतूहल होते. केवळ हाच एक विषय घेऊन जन्मभर ह्याचा अभ्यास करणारे प्रथितयश महापंडित तेथे जमले होते; पण आपल्या अध्यक्षीय भाषणाने लक्ष्मणशास्त्र्यांनी त्या सर्वांना अवाक केले. एवढेच नव्हे, तर त्या सर्वांना आपण आज काही नवीन शिकलो आहोत, असे

वाटावयास लावले. ज्योतिषशास्त्र ह्या नव्या दृष्टीने पुन्हा अभ्यासावयास पाहिजे, असेच जो तो ज्योतिषी बोलत होता.

लक्ष्मणशास्त्र्यांच्या पायाला पूर्वी काहीतरी भोवरीसारखा रोग झाला होता. वैद्याने तो मुळापासूनच जाळून काढण्याचे ठरविले. तो प्रयोग मुंबईस सचिवालयातच झाला. किंबहुना मीच तो घडवून आणला होता. प्रत्यक्ष डाग देताना रोग जळत होता, धूर निघत होता व जात होता. पण लक्ष्मणशास्त्री यांच्या चेहऱ्यावर कसलाच बदल झालेला नव्हता, हे मी प्रत्यक्ष पाहिले आहे. ही त्यांच्या उतारवयातली घटना आहे. सेनापती बापट आणि वल्लभभाई पटेल ह्यांच्यामध्येही अशी शक्ती होती.

**(तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी: व्यक्तित्व, कार्य आणि विचार**
**संपादक - वसंत पळशीकर, प्रकाशक- प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई.**
**वर्ष- १९९६, पृष्ठे १६४, किंमत. २००/- रु. पृष्ठ क्र. ४३ , ४४)**

○○○

# ८१.

# परमतसहिष्णू व समंजस व्यक्तिमत्त्व

## श्रीकृष्ण नीलकंठ लेले

माझे वडील वेदभूषण नीलकंठशास्त्री लेले हे अग्निहोत्री व अत्यंत कर्मठ सनातनी होते. इ. स. १९५७ मध्ये यांनी सपशु अग्निष्टोम याग केला होता. सपशु याचा अर्थ अग्निष्टोम यज्ञातील देवतांना उद्देशून बोकडांची हत्या करून त्यांचे अवयव देवतांना समर्पण करणे असा आहे. अर्थात त्या वेळच्या काही विचारवंतांना ही गोष्ट रुचली नाही. त्यात वाईतील गो-शाळेचे संस्थापक पू. चौंडे महाराज होते. त्यांच्या पुढाकाराने या पशुहिंसा होत असलेल्या यज्ञाच्या कार्यक्रमाचा निषेध करण्यासाठी वाईच्या गणपती चाळीचे घाटावर एक सभा आयोजित केली होती.

धार्मिक कार्यक्रमामध्ये पशुहिंसा करणे अयोग्य असल्याची समजूत आज आहे. त्याप्रमाणे त्या वेळीही बऱ्याच प्रमाणात होती. म. गांधींवधोत्तर वाईमध्ये झालेल्या जाळपोळीचे वातावरणही त्या वेळी शिल्लक होते.

अशा परिस्थितीत या निषेध सभेच्या संयोजकांनी तर्कतीर्थांना यज्ञातील पशुहत्या विरोध त्यांची मते लक्षात घेऊन अध्यक्ष म्हणून पाचारण केले होते. सभास्थानापासून जवळच मधल्या आळीतील धर्मशाळेमध्ये यज्ञानुष्ठान सुरू झाले होते. निषेध सभेमुळे निर्माण होऊ शकणाऱ्या वातावरणामुळे हे अनुष्ठान निर्विघ्न पार पडेल किंवा नाही, याची शंका व धुगधुग आमच्या मनात होती.

अशा वातावरणात सभा सुरू झाली. तर्कतीर्थांनी अध्यक्षस्थान स्वीकारले आणि त्यांच्या प्रास्ताविकात त्यांनी आवर्जून पुढील भाषण केले. 'ही सभा निषेधसभा नसून यज्ञानुष्ठान विषय साधकबाधक विचार करणारी सभा समजावी. कारण यज्ञ करणारे यजमान अत्यंत सात्त्विक असून यज्ञाच्या अनुष्ठानाचा प्रपंच करून मांसाशन करावे असे त्यांचे बाबतीत अशक्य आहे. अनुष्ठान सुरू झाले आहे. त्यामध्ये या सभेमुळे काहीही विक्षेप येणार नाही याची खबरदारी घेणे जरूर आहे'.

या त्यांच्या उद्गारांमुळे सभेचे वातावरण एकदम बदलले व यज्ञ निर्विघ्न पार पडला. इतके नव्हे तर दुसऱ्या दिवशी तर्कतीर्थांचे यज्ञमंडपामध्येच यज्ञविषयक माहितीपूर्ण व्याख्यान झाले. एक दिवस ते यज्ञाचे काळात महाप्रसादासाठी आले होते. वास्तविक तर्कतीर्थ त्या वेळीही यज्ञातील पशुहिंसेच्या विरोधीच होते. परंतु त्यांनी केलेल्या प्रास्ताविकामध्ये त्यांच्या परमतसहिष्णू व समंजस व्यक्तिमत्त्वाचे मला प्रत्यक्ष दर्शन घडले. त्यांना हार्दिक प्रणाम करून हा कृतकतालेख पूर्ण करितो.

**(तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी: व्यक्तित्व, कार्य आणि विचार,**
**संपादक - वसंत पळशीकर, प्रकाशक - प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई**
**वर्ष - १९९६, पृष्ठे - १६४, किंमत- २०० रु., पृष्ठ क्र. ९२.)**

ООО

# ८२.
# आबांचं घर
## सुभाष अवचट

नदीच्या पुलावरून उतरले की बाजारातील गडबड लागते. डावीकडील वळण घेतले की जुन्या विटांच्या घराच्या भिंतीमधून, कोपऱ्यावरील सिनेमा टॉकीजला हुलकावणी देऊन ती गल्ली वळते आणि दिसते ती लिंबाच्या गर्द हिरव्या पडद्याच्या पार्श्वभूमीवरची मशिदीची, छोट्या टेकाडवरची कोच्या कॅनव्हाससारखी शुभ पांढरी तटस्थ भिंत. नंतर विश्वकोशाची इमारत. डाव्या बाजूला सलग वाड्याच्या ओळीनं रस्ता पायउतार होऊन थांबतो ते घाटाच्या उंच कमानीच्या रेखीव वेशीपाशी.

वेशीच्या अगोदरच्या कोपऱ्यावरील भिंतीतल्या लाकडी दिंडीदरवाज्यातून आत आले की लागतो छोटा फरसबंदी चौक. या चौकात नेहमी सौम्य सूर्यप्रकाशाचा अभिषेक असतो. दोन दगडी पायऱ्यांवर चढून बसलेली ओसरी. दोन्ही बाजूला कोनाडे असलेल्या भिंतीवर, दरवाज्यावर गुरू केवलानंदस्वामींची तसबीर आहे. या दरवाज्यातून ओलांडून आत आलो की लागते एक धीरगंभीर लायब्ररी, सर्व भिंती पुस्तकांच्याच आहेत. त्यामध्ये आहे एक मोठंसं टेबल, टेबलाच्या अलीकडे, पलीकडे ठेवलेल्या खुर्चा. या टेबलाच्या पलीकडे पुस्तकांच्या कपाटात दडलेली खिडकी आहे. तिच्यातून पलीकडे पाहिले की खाली घाटाच्या पायऱ्यापाशी चकाकणारे धूसर पाणी दिसते.

या लायब्ररीमध्ये सतत एक धीरगंभीर शांतता अविरत असते. खरं तर ही अभ्यासिका मला म्हणावयास पाहिजे होती. लायब्ररी या इंग्रजी शब्दात तिचा अर्थाचा श्वास कोंडल्यासारखा वाटतो. कधीही तुम्ही एकटे तिथे गेला तर या आभ्यासिकेचे दार लोटलेले तुम्हास दिसेल. हे आतून कधीही गच्च बंद करून टाकलेले मला तरी दिसले नाही. अर्ध्या वाचून बंद केलेल्या ग्रंथात ठेवलेल्या बुकमार्कसारखे हे दार मला वाटे. कधीही बुकमार्क काढून ग्रंथ उघडावा आणि पुढे वाचायला सुरुवात करावी तसे हे दार उघडावे आणि या आभ्यासिकेत यावे. आणि वाचायला सुरुवात करावी. अखंड ग्रंथात जागी असलेली ही जागा आहे.

याच ठिकाणी आबा वाचत बसलेले दिसत. आबांची बसायची जागा फार गंमतशीर

होती. एरव्ही कोणी वाचायला खुर्चीत बसेल. त्यासमोर टेबल. त्यावर लिहावयाचे साहित्य. त्यापुढे कोणी भेटायला आलेल्या माणसांना बसावयाच्या पाठमोऱ्या खुर्च्या.

आबा नेमके उलटे बसत. या पाठमोऱ्या खुर्च्या सामोऱ्या असत. त्या पाठीमागे टेबल, आणि त्यानंतर एकटी खुर्ची. त्या टेबलाचा वापरही असंख्य पुस्तके रचून ठेवण्यात होई, आबांच्या समोर छोटे टिपॉय असे. आणि आजूबाजूला सावरून उभ्या खुर्च्या असत. आबा एखादा पॉईंट लिहून ठेवत. तो पुढे त्यांना लेख लिहावयास उपयोगी पडे. पुस्तक वाचता वाचता मध्येच दार उघडून आत आले की काय दिसे? पुस्तकांच्या भिंतीमध्ये पांढऱ्या शुभ्र टोपीत बसलेले आबा. खादीचा शर्ट, पिवळसर जॅकट आणि परिटघडीचे नेटके नेसलेले धोतर. डोळ्यावरच्या चश्म्याच्या काचात पुस्तकांचे पांढुरके प्रतिबिंब. पाठीमागे टेबलावरच्या पुस्तकांच्या रचलेल्या चळती. त्यापाठीमागे असलेल्या खिडकीतून वाऱ्याच्या झुळकीबरोबर आत पसरलेला निळसर, ताजा प्रकाश.

ह्या अभ्यासिकेचे पेंटिंग करावयाचे म्हटले तेही ॲबस्ट्रॅक्ट तर कसे मी करू शकेन?

अभ्यासिकेतल्या वास्तवातल्या पुस्तकांच्या भिंती, खिडकी, टेबल, आबा हे तिथे आहेत आणि नाहीत. तरी पुस्तकांच्या ब्राऊन, ऑकर आणि सॅब ग्रीन रंगांतल्या मिश्रणांचे धूसर स्ट्रोक्स उमटतील. कंगोरे नसलेले. अभ्यासिकेतले ते गूढ पण शांत वातावरणात बसलेले पांढऱ्या शुभ्र वेशातले आबा आबाही राहणार नाहीत, तर फ्लॉवरपॉटमधल्या चाफ्याच्या फुलांच्या गुच्छाभोवती रेंगाळणारा, शांत पण सुवासिक पांढुरक्या रंगासारख्या एखादा तरंगता कवडसा असेल.

या अभ्यासिकेचे दार हळूवार उघडले की येते अंगण. सारीच रचना उलटी, आबांच्या टेबलासारखी. एरव्ही अंगणानंतर ओसरी असते, ओसरीनंतर येतं माजघर, नंतर स्वयंपाकघर, नंतर चौक, आड. आबांच्या घराची हीच खरी गंमत. आता या अंगणात आहे आड आणि भले थोरले आंब्याचे झाड. उजवीकडे चढून गेले की उठबशीची खोली. त्याला लागून स्वयंपाकघर, स्वयंपाकघराच्या खिडकीतून डोकावले तर खाली शंभर दीडशे फुटांवर कृष्णा वाहते. त्या पलीकडे अर्जुनाच्या झाडाची ओळ, शेत आणि उंच चढत गेलेले पाचगणीचे डोंगर. तिथं या दरीतून वर आलेले तरंगणारे अस्पष्ट धुके.

उठबशीच्या खिडकीतून डोकावले की खाली खोल दिसतो तो पायऱ्या उतरत गेलेला थंडगार चिरेबंदी घाट. त्यानंतर प्रतिबिंबात बुडलेले कृष्णेचे पात्र. वेशीला लागून तटस्थ तटासारख्या वाईमधल्या घरांच्या पुरातन अनुभववी भिंती.

हे अंगण मला फार आवडले. अभ्यासिका गंभीर तर मनमोकळे हे अंगण आहे. अंगणाची रचना घरगुती. ती आणेआप झालेली. दोन पायऱ्या उजव्या बाजूला चढल्या की आपण उठबशीच्या खोलीत जातो. या पायऱ्यांना लागूनच दगडी ओटा होता. उभ्या गजाची मोठी खिडकी उतरत अंगणात आली होती. त्या खिडकीतून सारी खोली अंगणातून, आणि खोलीतून अंगण दिसत असे.

सायंकाळ झाली की अंगणाला हुरूप येई. दिवसभराच्या चिंतनानंतर आबा येऊन ओट्यावर बसत. डोक्यावरची टोपी काढून मांडीवर ठेवून, मान वर करून, उंच आंब्याच्या फांद्यांकडे पाहात. या वेळी झाडांवर पाखरं येऊन विसावली असत अगदी आबांसारखी. त्यांची किलबिल चाललेली असे. माझ्या आठवणीत आहे ते असे की अशाच एका संध्याकाळी मी तेथे बसून आबांचे एक स्केच केले होते. आबांचे ते जुने खोड. त्यापलीकडे तिरक्या बसलेल्या फरशा. ओट्यावरचे आरामात बसलेले आबा आणि मागची खिडकी आबांच्या सायंकाळ झालेल्या उतरणीवरच्या आठवणी. आबांनी येथेच मला या आंब्यांबद्दल आठवणी सांगितल्या होत्या.

त्याला येणारा बहर, त्याची फळं, त्याची चव, पत्र्यावर फळ पडल्यानंतर येणारा आवाज आणि त्यांची पत्नी सावित्रीची त्या झाडाशी जवळीक. या अंगणातल्या विहिरीपाशी जास्वंदीची झाडं, थोडी बाग. मला नेहमी आश्चर्य वाटे ते या विहिरीचं. खाली दोन एकशे फुटांवर नदी आणि या एवढ्या उंचावर अंगणात पाणी मात्र वीसएक फुटांवर मिळालेलं.

सायंकाळी काठी टेकत येत ते आबांचे वाईकर मित्र. आता नाव आठवत नाही पण त्यांना ऐकू कमी येई. आणि चश्म्याची काडी दोऱ्यांनी बांधून जोडलेली असे. आबा त्यांना एकेरी नावाने बोलवत. त्यांची दोस्ती नाही म्हणायला चाळीस-पन्नास वर्षांची असावी. या गप्पात कुठलेही साहित्य, तत्त्वज्ञान, राजकरण येत नसे. अगदी साध्या दोन मित्रांचे जवळकीचे संभाषण, आणि शिळोप्याच्या गप्पा असायच्या. काठी टेकत ते निघाले की आबा म्हणत,

''नीट जा रे बाबा! रात्र झालीय.''

या ठिकाणी थोड्या वेळानं हळूहळू अभ्यासानं दमलेली माणसं विश्रांतीसाठी येत. ही विश्रांती म्हणजे ते काय, तर आबांबरोबर मनमोकळ्या गप्पा मारणं. गप्पा म्हणजे म्हणावं तर सायंकाळ्या आबांच्या झाडाखालचा वर्गच. दिवसभरातल्या वाचनातून, चिंतनातून आलेल्या शंकांचं निरसन म्हणा किंवा आबांच्याकडून विषयावरील पुस्तक, ग्रंथ, राजकारणावरची मतं जाणून घेणं. या वर्गात कितीएक विद्यार्थी येत जात. कधी पश्चिमात्य, कधी दुसरे भाषिक प्रांतीय. वय वगैरेंची जड अडचण कधीच नव्हती. कधी गायक तर कधी डॉक्टर, खादीतला दलित कवी नाही तर पांढरपेशी कथाकार. साखर कारखान्याचा चेअरमन असेल नाही तर कम्युनिस्ट कॉम्रेड. साऱ्यांचा राबता या बैठकीत होता. मते, मन, दृष्टी, कृतीने वेगळी असलेली सगळी माणसं जमत, त्याचे मूळ परत ज्ञानाकडेच जात होते. जाणून घेण्याची आस हेच सूत्र होते. म्हणूनच तर ही अंगणातली बैठक कधी उद्ध्वस्त झाली नाही. भक्कम मनमोकळ्या विचारवंतांना तो ओटा होता आणि अंगणही.

या वर्गात काही वेळा मीही होतो.

अंगणातला आड ओलांडला की जिना लागतो. तो पोहचतो वरच्या खोल्यांपर्यंत. या खोल्यांना लागून अखंड अशी बाल्कनी आहे. ती चक्क कृष्णा नदीवर तरंगती आहे. नदीपासून वरपर्यंत आलेल्या या उंच भिंतीच्या बाहेर हात दीड हात पुढे येऊन थांबली

आहे. तिच्या कठड्याला हात टेकून उभे राहिले की एक अजब अनुभव येतो, काही क्षण का होईना. नदीवर उंच उभा राहिल्याचा अधांतरी भास होतो. फार कमी ठिकाणी बाल्कनीत उभे राहिल्यानंतर हा येईल. बाल्कनीखाली दुसरी बाल्कनी जवळीकीला असतेच. त्यामुळे अधांतरी क्षणांचा अनुभव येत नाही. काहीतरी चिटकून उभे असल्याचा पुरवा अगोदरच आपल्यापाशी असतो.

आणि नदीचे काय? आणि अशी नदी, त्यावरची हेमाडपंती देवळे, चिरेबंदी घाट आणि समोर पसरलेले पसरणीचे डोंगर तुम्ही कोठून आणणार? तेथे तुम्ही उभे राहिलात की सारं दृश्य तुमच्यापाशी चोहीकडून एकत्र येतं. डावी, उजवी, समोर, वर- आकाशापासून ते खोल नदीच्या पात्रापर्यंत. मग कॅमेऱ्यासारखे तुम्ही उभे असता. तुमच्या पाठीमागे खोली. नंतर उतरत गेलेला जिना, विहीर, आंब्याचे झाड आणि ओट्यावर बसलेले आबा.

एकदा या खोलीमध्ये मी राहिलो तेव्हा पाऊस पडत होता, आणि एका अनमोल क्षणाचा अंगभर अनुभव घेत मी या बाल्कनीत उभा होतो. सारे विसरून, पुसून गेले होते. आणि एका अधांतरी, तरीही हुरहुर समजण्याइतक्या मनाच्या शांत गाभाऱ्यात पावसाचा नाद पोहचत होता.

तेथे बसून मी काही स्केचेस केली. नंतर ती खोली मे. पुं. रेग्यांकडे गेली. मी जेव्हा जाई तेव्हा दुसऱ्या खोलीत झोपत असे. त्यामुळे मला रेगे सर नेहमी दुष्ट वाटत असत.

उठबशीची खोली हे नामाकरण मी केलं. ह्या ठिकाणी मला सर्व जण उठबस करताना दिसत. हिचा आकार चौकोनी म्हणावा लागेल. आत आला की डाव्या हाताला गजाची डबल खिडकी, जेथून अंगण दिसे. तेथेच एक उंच टेबलासारखे कपाट, त्यावर काळा फोन आणि वर्तमानपत्र. उजव्या हाताच्या भिंतीच्या सुरुवातीला दोन हाताची लाकडी खुर्ची आणि छोटीशी उंच गादीची बैठक. त्यापुढे टिपॉय. तेही वर्तमानपत्रांसाठी. नंतर जिन्याचे दार. हा जिना तुम्हाला वरच्या अंगाच्या खोल्यांकडे घेऊन जातो. वर आहेत वासू, आबा, घरातल्या माणसांच्या झोपायच्या मोठ्या खोल्या. जिथल्या दाराला लागून कोनाडा. त्यात नुकती प्रसिद्ध झालेली, आबांना भेट आलेली पुस्तकं. त्याला लागून उंच दिवाणाची बैठक, दोन-तीन लोढ आणि उशांनी तयार केलेली. नंतर मोठी खिडकी. ही खिडकी, आणि घराच्या सर्वच खिडक्यांना अंगचे व्यक्तिमत्त्व आहे. सांगायचं झालं तर खिडकीतच खिडकीचा चेहरा रेखला आहे. चक्क हातभर जाडीची कमान, अशी की तुम्ही मांडी घालून बसू शकता. नंतर येथे दुहेरी दाराची खिडकी. जिथे बसून तुम्ही घाटाचा वारा घेत गप्पा मारू शकता. पाय सोडून चहा पिऊ शकता नाही तर चक्क ताट हातात घेऊन जेवूही शकता. नंतर डाव्या भिंतीच्या सुरुवातीला स्वयंपाक घराचे दार. त्याला लागून भिंतीवर गणपतीची तसबीर, त्याखाली पुन्हा छोटी दिवाणावरची बैठक. त्याला लागून स्वयंपाकघरात उघडणारी छोटी खिडकी, येथे उठबशीची ही खोली संपते. खुर्च्या, घड्याळ, फडताळ, सतरंजी, एखाद दुसरा फोटो, नाही तर दिवाणांची अदलाबदल. हे घटक अधूनमधून येत जात, बदलत. त्याचे वैशिष्ट्य मला फार मोठे जाणवले नाही. लक्षात ठेवावेसेही वाटले नाही. सहजतेने ते राहिलेही नाही.

झेन तत्त्वज्ञानात घर कसे असावे याचा फार छान संदर्भ आहे. घराच्या सजावटीबद्दल आहे तो. ते म्हणतात, बैठकीच्या खोलीत काय असावे? कशी असावी ती? तर कमी उंचीचे चौरंगासारखे टेबल असावे. चटईच्या वर बसावयास छोटे आसन असावे. पाणी पिण्याचा एक माठ, ओगराळे असावे. आणि निसर्ग आत आणणारी सरकवून उघडी बंद करू शकणारी एक मोठी खिडकी असावी. त्या घराचा यजमान आत आला की त्या घराची सजावट पूर्ण झाली. तो निघून गेला की ते घर पूर्ण रिकामे व्हावे दुसऱ्या कोणाहीसाठी. या उलट युरोपियन सजावट असते. इतक्या वस्तूंची रेलचेल करून ठेवली जाते की यजमान त्यात हरवून जातो. एखाद्या वस्तूसारखाच बनतो. आणि आलेल्या पाहुण्याला त्याच्याबरोबर धड मनमोकळ्या गप्पादेखील मारता येत नाहीत.

अशा डिस्टर्ब करणाऱ्या वस्तू या उठबशीच्या खोलीत नाहीत. याच रिकाम्या जागेत आता काय घडते बघा.

अगदी पहाटे म्हणजे झुंजर वेळेला आबांसह सारं घर जागे होते. खिडकी उघडली जाते आणि साऱ्या शांत घाटाचे दृश्य आत येते. नेहमीसारखं त्याबरोबर पहिली थंड, पाण्यावरून आलेली झुळूक आणि पाण्यावरून आलेल्या थंड झुळखीसारखं शांत घाटाचे दृश्य नेहमीसारखं आत येते. जिन्याचे दार उघडून परिटघडीच्या शुभ्र वेशातले ताजेतवाने आबा आत येतात. गणपतीच्या समोर उतबत्त्या लावतात, मंद सुवास, त्या शांततेत मिसळतो. आबा बूट घालून सकाळची रपेट करावयास जातात. ते पसरणीच्या घाटापर्यंत चालत जाऊन येतील तासभरात. आता घर जागे होते. सर्व जण आंघोळी आवरून ताजेतवाने होऊन तेथे हजर होतील. वासू, ह्यांची पत्नी मंगल, राहणारे पाहुणे असे सर्व चहाला तेथे येतील. अंगणात कोवळं ऊन उतरते तसा आबांचा सचिव, गोरा गोमटा कोल्हटकर हजर होईल. पहिल्या खुर्चीत तो बसेल. नंतर फोन जवळ तरी. त्याच्या फेऱ्या खुर्ची आणि फोनपाशीच नियमित होतील, फोनपाशी असलेले एक पॅड, आणि शर्टाचा वरचा खिसा हेच त्याचे ऑफिस आहे.

आबा आले की सारे स्वयंपाक घरातल्या डायनिंग टेबलापाशी जमतील. तेथे पुन्हा सकाळचा वर्ग सुरू. डिस्कशन्स हे साबुदाण्याची खिचडी नाही तर पोहे खाताना सुरू असायचेच. या टेबलाभोवती कमीत कमी सहा-सात माणसे तर नक्कीच असावयाची, माझी जागा परत स्वयंपाक घरातून नदीकडे उघडणाऱ्या खिडकीत.

समोर नदीच्या पात्रावर पूर्वेच्या उन्हाचा तिरका फटकारा आला असतो. पात्रावर किंचित धुक्याची हलकी झालर असेच. समोर दूर पात्रापलीकडच्या झाडांच्या रांगांतून शेत नांगरणारा शेतकरी दिसतो. घाटावरून देवळातला घंटेचा नाद, वाऱ्याबरोबर हेलकावे खातच येतो. पोह्याच्या चमचा तोंडात घालताना अजून नजर वर केली, पसरणीच्या घाटाभोवतालचे डोंगर बोलवतायेत असं वाटू लागतं.

असा हा चविष्ट पण नामांकित ब्रेकफास्ट याच ठिकाणी होऊ शकतो. पाठीमागे मान वळवली की बैठकीच्या खोलीत उन्हाच्या तिरपीत, उदबत्तीच्या रेघा सुवासिक वळणं घेत असतात.

आबा भाजलेल्या दोन-तीन लसणाच्या पाकळया आता खातील. बोलता बोलता सगळयांना आग्रह करतील. त्यांची वेळ झाली की झटकन उठतील आणि अंगण ओलांडून अभ्यासिकेत जातील ते दुपारच्या साडेबारापर्यंत.

तोपर्यंत ही उठबशीची खोली पूर्ण रिकामी, अस्तित्वहीन, साडेबाराच्या सुमारास तिला दुसरे रूप मिळेल. परत स्वयंपाक घरातले टेबल ताटांनी सजेल. आणि शाकाहारी घरगुती जेवण घेता घेता दुपारचा वर्ग चालू होईल. ते तासभर.

आबा एक वेळच जेवत. ते दुपारचे. या दुपारच्या वर्गात केव्हाही नवीन चेहरा सामील झालेला दिसेल. मी कधीही गेलो की ते प्रथम विचारीत,

''दुपारच्या जेवणास आहेस ना?''

पुढे माझी मुलं पाचगणीला शिकावयास होती. त्या वेळी मी वारंवार जायचो. तरीही प्रत्येक वेळी हा प्रश्न ते विचारतच. मी जेवून गेलो असतो तरी परत थोडे खायचो कारण ते हेच.

दुपारचा वर्ग.

जेवणानंतर आबा दिवाणावर बसतील. टोपी काढून शेजारी ठेवतील. लोढावर पूर्ण शरीर सैल करून रेलतील. ही त्यांची वामकुक्षी. अर्ध्या तासात परत ताजेतवाने. टोपी डोक्यावर घालून तरातरा आभ्यासिकेकडे, ते थेट अंगणात सायंकाळ येईपर्यंत.

ह्या दिनक्रमातली शिस्त नकळत माझ्यात आली. सकाळ ते संध्याकाळ स्टुडिओत काम. मध्ये अर्ध्या तासाची वामकुक्षी. संध्याकाळी अंगण आणि सकाळी फेरफटका.

पावसाळ्यात मात्र ही उठबशीची खोली निराळं रूप घेई. अंगणात बसता येत नसल्यामुळे बैठक या खोलीत होई. मोठ्या सतरंजीवर सारे जागा पटकावून बसत. बाहेर धुवाधार पाऊस, मेघ गर्जना. घाटाच्या पायऱ्यावरून नाचत कृष्णेच्या पात्रावर उतरलेल्या पावसाचा आवाज ऐकत झोपी जाणं ही आणखी एक मजा.

रात्री साडेनऊ-दहापर्यंत हे घर सामसूम होई. मे. पुं. नी वरची खोली पटकावल्यामुळे मला आभ्यासिकेजवळची खोली मिळे. या खोलीत या खोलीत दोन कॉट्स आहेत, त्याला मच्छरदाणी. कॉटच्यामध्ये घाटाकडेच बघणारी उंच खिडकी. वाईमध्ये खास थंडी असतेच. पावसातून येणारी थंडी अंगात शिरशिरी आणते.

कित्येकदा मी या खोलीत एकटाच असे. तंतोतंत तयार केलेल्या परिटघडीचा बिछाना, उशा, ब्लँकेट आणि मच्छरदाणी.

झोपायच्या अगोदर मी खिडकीत उभा राही. घाटाच्या पायऱ्यावर काळोख उतरलेला असे. तो दगडी नंदीसारखा थंड आणि स्तब्ध वाटे. अभिषेकच्या पात्रातून पिंडीवर थेंब थेंब पडणाऱ्या पाण्याच्या आवाजासारखा घाटाला टेकून परतणाऱ्या कृष्णेच्या पाण्याचा खोल आवाज वरपर्यंत येई. त्या थंड काळोखी शांततेत तेवढीच एक जाग. पलीकडच्या जुन्या तटबंदीतून मिणमिणणारा इवलासा प्रकाश, तोही बंद होई. कधी घाटाच्या पायऱ्यांवरून उतरणाऱ्या बेवारशी घोड्याच्या टापांचा आवाज, तोही या काळोखासारखा स्तब्ध होई.

सारीच शांतता. ब्लँकेटमध्ये गुरफटून घुसताना उद्या आबांना चित्रकलेबद्दल काय विचारायचं याचा विचार सुरू होई. तोही हळूहळू दिसेनासा होई. उरे ती शांतता आणि मग गाढ झोप.

कोणीतरी उठवे मला. मग आबांबरोबर घाटापर्यंत मॉर्निंग वॉक, नाही तर अचानक त्यांच्याबरोबर जाऊन भाजी खरेदी करणे. आबा माझ्यासाठी मला आवडणारी गवार घेत. कोठली भाजी कशी घ्यावी हे भाजीवाल्या बाईसमोर सांगत. त्या वेळी माझं सोडा, पण तीही मन लावून ऐकत, भाजी विकत असे. कधी सकाळीच योगा नाही तर एखादे पुस्तक हातात देऊन म्हणत,

''हे वाचून टाका आज.''

आणि मग त्या घरात कोठल्याही खिडकीत बसून मी ते वाचे. आणि मग त्या घरात कोठल्याही खिडकीत बसून मी ते वाचे आणि गंमत ती अशी की ते पुस्तक नेहमी चित्रकलेच्या संदर्भातलंच असे. सायंकाळी हसून मला ते विचारत,

''काय, 'कम्युनिकेशन' कळलं काय?''

चित्रकलेतलं हे सूत्र त्यांनी मला नकळत वाचायला लावलं होतं. आबांचे एक घर सोडून एक घर विकायचे होते. आकार छोटा पण रचना आबांच्या घरासारखीच होती. म्हणजे रस्त्याकडून नदीकडे प्रवास करत गेलेले घर. मला फार आवडले. नीटनेटके आणि बेताचे होते ते. मी मोहात पडलो. विहीर, अंगण, नदीच्या पात्राकडे पहात असलेली बाग.

मी हट्ट धरला की मी हे विकत घेणार आणि स्टुडिओ करणार. तसे आबांनी त्या घराच्या वारसदाराला बोलावून घेतले. नेमका तो वाईत सापडला. एरव्ही ते मुंबईला स्थायिक झालेले होते.

वारसदारांनी अव्वासव्वा किंमत सांगितली. तसे आबांनी रागावून म्हटले,

"एक लक्षात ठेवा हे चित्रकार आहेत, व्यापारी नाहीत. तेव्हा वाजवी किंमत सांगा."

वारसदार आबांपुढे वरमला. नंतर अर्धंच घर विकायला तयार झाला. आबा त्या चर्चेत काही बोलले नाहीत. सायंकाळी अंगणात मला जवळ बसवून ते म्हणाले,

''विरस झाला खरा, पण हा व्यवहार अयोग्य होता आणि चित्रेच काढायची आहेत तर येथे या घरी येऊन चित्रे काढा.''

एका सकाळी मी घाटावर फिरायला गेलो. अनेक संध्याकाळी आणि दुपारीही गेलो. एकदा पात्राच्या दुसऱ्या बाजूला जाऊन उभा राहिलो आणि आबांच्या या घराची अनेक स्केचेस केली. आबांनी ती पाहिली होती. नदीच्या या पात्राला लागून उभी राहिलेली वाई पूर्वी कशी दिसत होती, हे त्यांनी मला फार बारकाईने सांगितले होते. पूर्वी वाई विद्यापीठ होते. घराचे अर्किटेक्चर हा सुंदर नमुना होता. गावाचे 'टाउन प्लॅनिंगदेखील विटांचा वापर, घरांनी रचना, अनेक घरातली भिंतिचित्रे, रस्ते, ड्रेनेज, घाटाची आखीव बांधणी, देवळाचे बांधकाम, शिल्प सारे लक्षात घेता एक अद्भुत आणि सुंदर गाव तेथे वसवले गेले होते. त्याच्या जीर्ण खुणा अजूनही तेथे आहेत.

अज्ञानापोटी सारी दुर्दशा या गावाची झाली. हे पुरातन सौन्दर्य जपून ठेवणारी दृष्टी लोपली, अनेक घरातला भिंतीचित्राखाली चुल्हे लावून लग्नाचे भटारखाने लावले गेले. हा सारा अनमोल ठेवा काळा ठिक्कर पडत गेला. घाटांची, देवळांची मेणवलीच्या अप्रतिम नमुना ठरावा, अशी भिंतीचित्रे आणि घाटाची दुर्दशा झाली. जुने वाडे पाडून भकास इमारती बांधल्या गेल्या आणि एका टुमदार गावाचे गावपण बेरूप झाले.

आबांनी या साऱ्या गोष्टी नेऊन दाखविल्या. 'चुकीची दृष्टी' मिळाल्यामुळे झालेली ही दुर्दशा-याची खंत त्यांना होती. सत्तर-ऐंशी वर्षांत एखादे उमद्या गावाचे ढिगारे डोळ्यासमोर दिसावेत आणि हा ठेवा नष्ट होता जावा आणि तो कोणी थांबवू शकत नाही हा शाप म्हणावा लागेल.

एकदा हसत ते म्हणाले,

''युरोपात भिंत पडली तर प्रत्येक वीट जपून ठेवतात, आणि परत त्याच वापरून भिंत उभी करतात. का माहीत आहे-''

''का?'' मी विचारले,

''एकतर त्या वयाच्या विटा कुठे मिळणार? आणि मध्येच नवीन वापरली तर एकत्र कशा नांदणार?''

मी आबांच्या घराचे पुढे पेंटिंग केले. संन्यस्थासारखे हे कृष्णेच्या काठावर उंच रचत नेलेले हे जुने घर आहे. वयाने मोठं, अनुभवानंही दुरून पाहिले तर पायथ्याच्या दगडापासून ते तपकिरी कौलापर्यंत साक्ष पटेल.

स्वतःचा रंग चढत गेलाय त्याला. खास मुरलेला, एऱ्यागैऱ्या रंगानं ते मढलेलं नाही.

तृप्त आणि शोभिवंत झालंय ते वयानं.

देवळातल्या घंटेचा नाद ते ब्रिटिशांच्या बरोबरच्या क्रांतीतल्या गोळीचा आवाज त्यानं ऐकला आहे. मंत्र जपापासून ते रॉयिस्ट ते दलितापर्यंतची मतप्रणाली त्यानं विटाविटांत जपली आहे.

अनेक खिडक्या आहेत या घराला.

प्रत्येक खिडकीचे वैशिष्ट्य वेगळं. तेथून डोकावून पाहिले की मिळणारे अनुभवविश्व वेगळे. सतत उघड्या राहिल्यात त्या. बंद खिडक्यांचे कर्मठ घर ते हे नाही.

मी पेंटिंग करताना खिडक्या मोजल्या नाहीत. हे आबांचे घर म्हणजेच एक भली मोठी उघडणारी खिडकी आहे. विश्वाच्या कोशाचा तपशील जोखण्याचे एक प्रवेशद्वार. तेथे कोणीही या आणि डोकावा. आपल्या मनातल्या संभ्रमाला सत्याची साक्ष द्या. एरवी मी अनेक घरांची पेंटिंग केली. कधी त्याच्या अर्किटेक्चर, बांधणी, रंगरूपासाठी. पण आबांच्या या घराचे घर म्हणून मी पेंटिंग केले नाही, तर त्या घराने मला भावलेले एक पोट्रेट केलं. जसे आबांचे मला करावयाचे राहून गेलं.

**(ऋतुरंग, दिवाळी, १९९६)**

○○○

# ८३.
# तर्कतीर्थांचा शांतपणा, सहिष्णुता व वादपटुता
## श्री. म. शं. ढोले

### १) प्रथम परिचय १९४० मध्ये

भाई मानवेंद्रनाथ रॉय यांच्या रॅडिकल डेमोक्रॅटिक पार्टीची स्थापना परिषद मुंबईत हिराबाग धर्मशाळेत डिसेंबर १९४० च्या २६ ते ३० तारखांना भरली होती. देशाच्या बहुतेक सर्व भागांतून अनेक लहानथोर परिषदेला हजर राहण्यासाठी आले होते. सोलापूर जिल्ह्यातून आम्ही पाच-सहा जण गेलो होतो. पहिल्या दिवशी येणाऱ्या प्रतिनिधींना भेटून त्यांच्या ओळखी करून घेण्यात मी मग्न होऊन गेलो होतो. सुहास्यवदनाने त्यांच्याशी हस्तांदोलन करून "आपण कोठून आलात", अशी चौकशी करत आपलीही ओळख सांगायची, थोड्याशा अवांतर औपचारिक गप्पा करायच्या व "भेटू पुन्हा" असे म्हणून एकमेकांचा निरोप घेऊन दुसऱ्या प्रतिनिधीकडे चालू लागायचे, असे माझे काम चालले होते. त्याच ओघात एका उमद्या पण गंभीर चेहऱ्याच्या व्यक्तीशी माझी भेट झाली. सुहास्यवदनाने त्यांच्याशी मी हस्तांदोलन केले व "मी ढोले, सोलापूरहून आलोय. आपण कोठून आलात", अशी चौकशी करीत, त्यांच्याशी जवळीक साधण्याचा प्रयत्न केला. त्यांनीही हसत हसत माझ्या इंग्रजी चौकशीला इंग्रजीतच उत्तर दिले. ते म्हणाले, "मी वाईहून आलोय." एकदम मी आनंदाने त्यांना विचारले, "तर्कतीर्थ अद्याप आलेले दिसत नाहीत. त्यांना मला भेटायचे आहे." लगेच तेही हसत म्हणाले, "मीच तर्कतीर्थ".

मी चकितच झालो. तर्कतीर्थांना मी पूर्वी कधीही पाहिलेले नव्हते. पण त्यांच्या नावावरून व ऐकलेल्या कीर्तीवरून ते मोठे भारदस्त व्यक्तिमत्त्व प्रौढत्वाकडे झुकलेले, पंचा-उपरणे परिधान केलेले, भरपूर दाढीमिशा असलेले, आणि डोक्याला गोटा असलेले संस्कृत पंडित असावेत अशी मी कल्पना करून घेतलेली होती. पण प्रत्यक्षात त्यांचा एकंदर वेष पाश्चात्त्य विद्याविभूषित, आधुनिक आणि अद्ययावत गृहस्थाप्रमाणे दिसत होता. कोट-टोपी, धोतर वापरणारे स्वच्छ चेहऱ्याचे तरुण गृहस्थ पाहून मी चकितच झालो. १९३८

सालापासून विद्यार्थिदशेतच मला राजकारणाविषयी ओढ वाटू लागली होती. वृत्तपत्रांतून, साप्ताहिकांतून, मासिकांतून, राजकीय विषयावरील तर्कतीर्थांचे लेख मी उत्सुकतेने वाचीत होतो. त्यांनी भारून जाऊनच मी तर्कतीर्थांना भेटण्यासाठी उत्सुक झालो होतो. आता भेट झाली होती. ओळखही झाली होती. तरीही अतृप्तीची चुटपुट राहिलीच.

तीही लवकरच भागली. परिषदेला आलेल्या सर्वच प्रतिनिधींना राहण्यासाठी, हिराबाग धर्मशाळेतील एक प्रशस्त हॉल होता. आम्ही सर्व जण तेथे ओळीने पथारी पसरून राहिलो होतो. आणि माझ्या शेजारीच तर्कतीर्थ होते. दुसऱ्या बाजूला श्री. वसंतराव कर्णिक होते. ता. २७ डिसेंबरच्या पहाटे नित्याप्रमाणे मी उठून, आदल्या दिवशी परिषदेत झालेली भाषणे माझ्या वहीत लिहीत होतो. तर्कतीर्थही जागेच होते. त्यांनी उत्सुकतेने विचारले, "काय लिहिताय?" मी माझी वहीच त्यांना पाहायला दिली. चारदोन वाक्ये वाचून ते म्हणाले, "तुम्ही लघुलिपिक झालात काय?" मी "नाही" म्हटल्यावर, ते म्हणाले, "भाई रॉय यांची कालची भाषणे अगदी सविस्तर तुम्ही लिहिली आहेत हे कसे?" "केवळ स्मरणातून." मी म्हणालो. "मला पूर्वीपासूनच ही सवय आहे." त्यांनी लगेच ती वही श्री. कर्णिकांना दाखविली आणि म्हणाले, "बघा, बघा, श्री. ढोले यांचा पराक्रम बघा. केवळ स्मरणातून त्यांनी रॉयसाहेबांची भाषणे सविस्तर लिहून काढली आहेत." ते सर्व वाचून तर्कतीर्थांप्रमाणेच तेही आश्चर्यचकित झाले व त्यांनी लगेच ती वही रॉयसाहेबांकडे नेऊन पोहोचविली.

एम. एन. रॉय यांच्या भाषणातील प्रत्येक शब्द टिपून घ्यायचा, श्रीमती एलन रॉय यांची पद्धती होती. पण त्या दिवशी त्यांच्या अंगात किंचित ताप असल्यामुळे परिषदेस त्या हजर राहू शकल्या नाहीत व रॉयसाहेबांची भाषणे त्या लघुलिपीतही करू शकल्या नव्हत्या. नेमकी ती उणीव माझ्या वहीतील नोंदीमुळे भरून निघाली म्हणून सर्वांनाच आनंद झाला होता. सर्वांनीच त्यामुळे माझे कौतुक केले. तर्कतीर्थांच्या साहचर्यामुळे व प्रयत्नामुळे अगदी नवखा तरुण एकदम सर्वांनाच परिचित होऊन गेला.

## २) लोणावळा कँप

रॅडिकल डेमोक्रॅटिक पार्टीचे अखेरचे अधिवेशन कलकत्त्याला १९४८ मध्ये झाले. राजकीय पक्षपद्धती लोकशाहीच्या तत्त्वज्ञानाशी विसंगत असल्यामुळे रॅडिकल पक्ष विसर्जित करून त्याचे रूपांतर रॅडिकल ह्युमॅनिस्ट मूव्हमेंटमध्ये करण्याचा ठराव त्या अधिवेशनात प्रचंड बहुमताने संमत करण्यात आला. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी त्या अधिवेशनाचे अध्यक्ष होते. पण पक्षातील बऱ्याच जुन्या कार्यकर्त्यांना तो निर्णय मनापासून आवडला नव्हता. अनेक ठिकाणी त्यांचा असंतोष प्रगट होत होता. मधूनमधून चर्चाही होत होती. म्हणून महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांसाठी एक चर्चासत्र लोणावळा येथे मे महिन्यात आयोजित करण्यात आले होते. त्यासाठी स्वतः तर्कतीर्थ, श्री. वसंतराव कर्णिक, द्वा. भ. कर्णिक, र. भ. कर्णिक, वामनराव कुलकर्णी, जी. आर. दळवी, भाई राऊळ, आर. के. भोसले, भाई

बेके वगैरे कार्यकर्ते उपस्थित होते. श्री. वामनराव कुलकर्णी, भाई राऊळ, जी. आर. दळवी यांनी पक्षविसर्जनाच्या निर्णयाविरुद्ध आपला आवाज उठविला. चर्चेला उत्तर देणाऱ्यांमध्ये तर्कतीर्थ व मी प्रमुख होतो. चर्चा फारच चांगली झाली. तात्त्विक व व्यावसायिक दोन्ही पातळ्यांवर उपयुक्तही ठरली, असा सर्वांचाच अभिप्राय पडल्यामुळे तर्कतीर्थ व मी अधिक जवळ आलो.

### ३) एम. एन. रॉय रिसर्च इन्स्टिट्युट, सोलापूर

दरवर्षी २५ जानेवारीला सोलापुरात आम्ही रॉय स्मृती-दिनाच्या निमित्ताने नवमानवतावादावर तर्कतीर्थांची, श्री. सुंठणकरांची व बॅ. तारकुंडे यांच्यापैकी कोणाची तरी व्याख्याने आयोजित करीत होतो. या उपक्रमांतून एम. एन. रॉय रिसर्च इन्स्टिट्युट, सोलापूर या संस्थेची उभारणी झाली. या संस्थेचे अध्यक्ष म्हणून काम करण्याचे तर्कतीर्थांनी मान्य केल्यामुळे संस्थेला राज्य पातळीवरही चांगला पाठिंबा मिळाला. मुंबईतून ॲड. काणे, पुण्याहून श्री. जवाहिरे, श्री. नाईकनवरे बंधू, सोलापुरातून भाई भोसले, ॲड. विलास दास यांनी प्रामुख्याने भाग घेतला. मी कार्यवाह व भाई भोसले उपाध्यक्ष म्हणून काम पाहण्याचे ठरले. संस्थेचे रजिस्ट्रेशनही करून घेतले. प्रत्येक सभासदाने एकदाच एक हजार रुपये देणगीरूपाने द्यायचे व सदस्य 'तहहयात' बनायचे अशी सुटसुटीत घटनाही तयार करण्यात आली. मात्र जमा झालेल्या रकमेतून खर्च न करण्याचे बंधन घालण्यात आले होते. सर्व जमा रक्कम बँकेमध्ये ‘कायम ठेव’ म्हणून ठेवायची व तिच्या व्याजातून सर्व कार्य चालवायचे, अशी योजना करून कामास सुरुवात झाली. तर्कतीर्थांचा वाढदिवस २७ जानेवारीला असायचा. दि. २५ जानेवारीच्या कार्यक्रमासाठी तर्कतीर्थ सोलापुरात यायचे. तो कार्यक्रम २७ जानेवारीचा त्यांचा वाढदिवस सोलापुरात मित्रमंडळीच्या समवेत साजरा करायचा असा अलिखित नियमच पडला होता.

या संस्थेच्या वतीने सोलापूर जिल्ह्याच्या वेगवेगळया भागांत चर्चासत्रे, शिबिरे, व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. असेच एक शिबिर करमाळा येथे भरविण्यात आले होते. त्या वेळी न्यायमूर्ती व्ही. ए. नाईक, बा. रं. सुंठणकर, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, भाई भोसले व मी, श्री. कोठाडिया व श्री. शे. भा. येवले हजर होतो. दुसरे एक शिबिर सांगोले येथे भरविण्यात आले होते. त्यावेळी मी व तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी प्रमुख मार्गदर्शक म्हणून होतो. शिबिराच्या निमित्ताने शास्त्रीजींना मी माझ्या कमलापूर येथील निवासस्थानी जेवण्यासाठी नेले होते. खेड्यातील माझे घर व घरगुती पद्धतीचे जेवण शास्त्रीजींना फारच आवडले.

### ४) विधानसभा निवडणूक प्रचार

१९७२ च्या विधानसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या वतीने शास्त्रीजींचा निवडणूक प्रचारदौरा सबंध महाराष्ट्रभर आखण्यात आला

होता. त्याप्रमाणे शास्त्रीजी सांगोले येथे आले असताना माझी भेट झाली. त्यांच्या दौऱ्याचा सविस्तर कार्यक्रम मी पाहिला. नांदेड जिल्ह्यातील कंधार मतदारसंघातून मा. विठ्ठलराव जाधव काँग्रेस उमेदवार म्हणून निवडणुकीस उभे होते. पण शास्त्रीजींच्या प्रचारदौऱ्यात त्याचा उल्लेखच नव्हता. शास्त्रीजींच्या निदर्शनास ते आणून देताच, त्यांनी ताबडतोब सांगोल्याहूनच सर्व संबंधितांना फोनने संदेश पाठवून कार्यक्रम दुरुस्त करून घेतला व रात्री मी शास्त्रीजींसहित सोलापूरला मुक्कामास आलो. भाई भोसले यांनाही बरोबर घेतले आणि दुसऱ्या दिवशी आम्ही कंधारला हजर झालो. तो मतदारसंघ दोन तालुक्यांचा असल्यामुळे दोन दिवस तेथे भरपूर प्रचार करून शास्त्रीजी पुण्यास रवाना झाले. श्री. रामभाऊ कोल्हटकर हेही त्या वेळी बरोबर होतेच. सबंध प्रवासात शास्त्रीजी एकीकडे आमच्याशी स्थानिक राजकारणासंबंधी गप्पाही मारीत असत, त्याच वेळी प्रवासातील आजूबाजूच्या प्रदेशातील निसर्गशोभा वर्णन करून सांगत आणि कोल्हटकरांनी दिलेली एकामागून एक पुस्तकं वाचून त्यासंबंधी अभिप्रायही सांगतच होते. हा त्यांचा अष्टावधानीपणा पाहून आम्ही चकितच झालो. त्या वेळी साहित्य संस्कृती मंडळाचेही ते अध्यक्ष होते.

### ५) मंडल आयोग

१९८४ मध्ये मंडल आयोगाच्या शिफारशींसंबंधी अनुकूल-प्रतिकूल बोलबाला जोरात चालू होता. मी त्यासंबंधी चिकित्सक स्वरूपाचे चार लेख लिहिले होते व मित्रांच्या आग्रहावरून ते पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्याचे योजले होते. पुण्यातील एका मुक्कामात शास्त्रीजींना ते वाचूनही दाखविले होते व त्याला प्रस्तावना लिहिण्याची त्यांना विनंती केली होती. शास्त्रीजींनी लेख घेतले व मला वाईला येण्यास सांगितले.

एक महिन्याने मी वाईला गेलो. प्रवासात घेतलेल्या दैनिकात कोल्हापूरची बातमी होती. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींचे दे. भ. रत्नाप्पा कुंभार यांच्या अध्यक्षतेखाली मंडल आयोगासंबंधी व्याख्यान झाले. मी समाधानी वृत्तीने वाईला गेलो. शास्त्रीजींना भेटलो. त्यांनी लगेच लेखनीक बोलावला व प्रस्तावना सांगण्यास सुरुवात केली. मधूनमधून माझ्याशी काही मुद्द्यांवर बोलतही होते. इतरही कोणी त्यांना भेटतच होते. त्यांच्याशीही चर्चा करीतच होते व प्रस्तावना सांगण्याचे कामही एका तासात त्यांनी संपविले. आमचे नुकतेच जेवण संपले होते. मला वामकुक्षी घेण्यास त्यांनी सांगितले. पण स्वतः मात्र बिलकूल क्षणाचीही विश्रांती, वामकुक्षी वगैरे काही न घेता काम करीत होते. त्यांच्या या वयातही अथक परिश्रम करण्याची तयारी पाहून मी अचंबा करीत राहिलो.

### ६) 'वेड्या मना, का रे तळमळशी?'

श्री. वामनराव कुलकर्णी हे एक जुने, अनुभवी, संघटनाकुशल कार्यकर्ते. त्यांनी आपली जीवनकथा लिहिली. श्री. मधुकाका कुलकर्णी यांनी ती प्रकाशित केली. आणि तिचा प्रकाशन समारंभ सांगली येथे तर्कतीर्थांच्या शुभहस्ते झाला. शास्त्रीजींच्या बरोबर मी व भाई

भोसले प्रकाशन समारंभासाठी गेलो होतो.

प्रकाशक मधुकाकांनी समारंभामध्ये एक वैचारिक वादळ उठविले. समारंभापूर्वी ते पुस्तक आम्ही वाचलेले नसल्यामुळे मी तर बेसावधच होतो. १९४६ साली मे महिन्यात डेहराडून येथे अभ्यासशिबिर झाले होते व त्यातील भाई रॉय यांच्या भाषणातील काही वाक्ये व शब्दप्रयोग वामनराव कुलकर्णींच्या मनाला लागले. त्याचा उल्लेख साहजिकच वामनरावांच्या पुस्तकात आला होता. श्री. मधुकाकांनी त्याचा उल्लेख करून त्यावर, त्या वेळी हजर असलेल्या कोणीतरी स्पष्टीकरण करावे अशी विनंती केली. १९४६च्या शिबिराला व सांगलीच्या प्रकाशन समारंभाला दोन्ही ठिकाणी हजर असणारे आम्ही तिघेच. एक वामनराव, दुसरा मी व तिसरे तर्कतीर्थ. वामनरावांना काय वाटत होते, ते त्यांनी पुस्तकात लिहूनच टाकले होते. मी तर्कतीर्थांना विचारावे असा विचार केला, पण ते व्यासपीठावर होते. अनेक मान्यवर त्यांच्यासोबत बसलेले. बोलण्याची माझी पाळी आली. त्या वेळी मधुकाकांनी पुन्हा मला आठवण करून देण्याचा प्रयत्न केला. वास्तविक पाहता मला दुसरे अनेक विचार मांडायचे होते, पण मी तेवढा एकच मुद्दा घेऊन १९४६ सालातील अभ्यासशिबिराचे वातावरण व चर्चिले गेलेले विषय यांचा सविस्तर ऊहापोह केला. १९४६ च्या कँपपूर्वी आम्ही सर्व जण 'सच्चे मार्क्सवादी आम्हीच' असे समजत होतो. कम्युनिस्ट पक्षामध्ये ‘पूर्णवेळ कार्य करणारे’ कार्यकर्ते नेमण्याची पद्धती व तिचे पक्षरचनेवर आणि कार्यकर्त्यांच्या मनःस्थितीवर होणारे परिणाम याचा अनुभव आम्हीही घेतलेला होता. त्याला उद्देशून तशी पद्धती नसावी, विचारस्वातंत्र्यावर त्याचे कसे प्रतिकारक परिणाम होतात, ते रॉयसाहेबांना सांगायचे होते. त्या ओघात त्यांच्याकडून ते शब्दप्रयोग उच्चारले गेले. ते कोणाही व्यक्तीला अगर व्यक्तिसमूहाला उद्देशून नसून पद्धतीला उद्देशून होते. त्यामुळे वामनरावांनी त्यावर व्यक्तिशः खंत बाळगण्याचे काहीच कारण नाही, असा खुलासा केला. तर्कतीर्थांनी आपल्या भाषणात माझ्या विचारांचा पुनरुच्चार केला व पुस्तकाचे प्रकाशन केले. मधुकाकांनी सर्वांचे- विशेषतः माझे- मनःपूर्वक आभार मानले. पण एवढे होऊनही वामनरावांचे कितपत समाधान झाले कोणास ठाऊक!

**७)** या समारंभानंतर चहापाण्यासाठी आम्ही बसलो असताना मी तर्कतीर्थांची भेट घेऊन मी लिहिलेल्या 'धर्मनिरपेक्षता नव्हे इहवाद' या पुस्तकाची कच्ची प्रत वाचण्यासाठी दिली. ती थोडीशी चाळूनच शास्त्रीजी एकदम खूश झाले व ‘सद्य:स्थितीत याची आवश्यकता होतीच,’ असे उद्गार काढले. मी त्यांना म्हणालो, "या विषयाची सविस्तर चर्चा, धार्मिक, राजकीय व ऐतिहासिक दृष्टिकोनातून मी केली आहे, पण आपणासारख्या अधिकारी व्यक्तीने त्यावर एकदा तरी नजर फिरविली म्हणजे मला धीर येईल. म्हणून आपण हे वाचून पाहावे. वस्तुस्थिती या दृष्टीने काही चुकीचे किंवा निराधार, अतिशयोक्त वाटेल तसे सुचवावे. अशी विनंती आहे." त्यानंतर काही दिवसांनी मी त्यांना वाईत जाऊन भेटलो. त्या वेळी त्यातील

माझ्या काही विधानांबाबत त्यांचे मतभेद असल्याचे सांगितले. तरीही तुमच्या मताप्रमाणेच लिहावे, माझ्या मताचा विचार करावा व त्यावर तुमची भूमिका सविस्तर मांडावी असे त्यांनी सुचविले.

पुस्तक प्रकाशनाबाबतही त्यांची मला बहुमोल मदत झाली. श्री. रामभाऊ कोल्हटकरांनीही मला पुण्यात काही प्रकाशकांची ओळख करून दिली. शेवटी शास्त्रीजींच्या पुरस्कारामुळेच साहित्य संस्कृती मंडळाने माझ्या पुस्तकाचा स्वीकार केला असावा, अशी माझी समजूत आहे. छपाईचे कामही वाई येथील शासकीय मुद्रणालयामध्ये देण्यात आल्यामुळे त्यांना अखेरपर्यंत त्यावर लक्ष देता आले. या कामी मला वाईला अनेक वेळा याचे जावे लागले, त्या प्रत्येक वेळी त्यांची मुलाखत, चर्चा होतच होती.

८) सोलापुरातील औद्योगिक बँकेत शास्त्रीजींचे 'हिंदुधर्म' या विषयावर व्याख्यान होते. त्या वेळीही मी व भाई भोसले त्यांच्याबरोबर त्या व्याख्यानाला गेलो होतो. त्याचप्रमाणे हरिभाई देवकरण हायस्कूलच्या पटांगणात विद्यार्थ्यांच्या पुढे त्यांचे व्याख्यान झाले. त्या वेळी त्यांच्याबरोबर राहण्याची संधी आम्हाला मिळाली होती. पुण्यात टिळकरोडवरील एका सभागृहात रॉयवादी विचारांच्या कार्यकर्त्यांची परिषद संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाच्या संदर्भात भरली होती. मा. गोवर्धन पारीख अध्यक्षस्थानी होते व तर्कतीर्थ मुख्य वक्ते म्हणून बोलत होते. त्यांचे विचार सहन न होऊन भाई राऊळ संतापाने मध्येच उठून बोलू लागले. मा. पारिखांनी त्यांना शांतपणे खाली बसण्यास सांगितले व 'शास्त्रीजींचे भाषण संपल्यावर तुमचे विचार तुम्ही मांडा' असे सांगितले. पण भाई राऊळ यांना ते पटेना. अध्यक्षही संतापले. पण तर्कतीर्थांनी शांतपणे आपले भाषण चालूच ठेवले. भाई राऊळ यांना उद्देशून तर्कतीर्थ म्हणाले, "विचारस्वातंत्र्याचे महत्त्व जाणणाऱ्यांनी इतरांचाही आपले विचार समाजापुढे मांडण्याचा हक्क मानला पाहिजे व त्यासाठी सहिष्णुता व सौजन्याची आवश्यकता सर्वांनीच बाळगली पाहिजे". तर्कतीर्थांचा शांतपणा, सहिष्णुता व वादकुशलता सर्वांनाच जाणवून गेली यांत शंका नाही.

**(तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी: जन्मशताब्दी विशेषांक,**
**प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई, जानेवारी, २००१, पृ. ६१ ते ६४)**

ooo

# ८४.
# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी
## हाजी महमूद मिया शेख
## मोहियुद्दीन दारूवाले

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी काँग्रेसच्या रॅडिकल पार्टीच्या बाजू प्राणपणाने लढत असताना त्यांना मी पाहिले व त्यांचे विचारही ऐकले, तत्पूर्वी ते स्वातंत्र्य सैनिकही होते. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर कैलासवासी यशवंतराव, कैलासवासी किसन वीर व तर्कतीर्थ ही त्रयी एकत्र आली. मोरारजी देसाई मुख्यमंत्री होते तेव्हा प्रथम यशवंतराव पार्लमेंटरी सेक्रेटरी होते. देशभक्त कापरे वकील यांच्याकडे मोरारजी व यशवंतराव आले होते त्या वेळी बरोबर लक्ष्मणशास्त्री होते. मी मुळात वाई काँग्रेसचा प्रमुख होतो. पुढे संयुक्त महाराष्ट्राचा लढा झाला. देशभक्त मोरारजी, यशवंतराव व लक्ष्मणशास्त्री हे द्वैभाषिकाचे पुरस्कर्ते राहिले. संयुक्त महाराष्ट्र समिती व द्वैभाषिकवादी काँग्रेस यांच्या दरम्यान मोठा तीव्र लढा झाला. प्रतापगडी पंडितजी नेहरू यांच्या हस्ते शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण झाले, त्या वेळी वाईस संयुक्त महाराष्ट्र समितीच्या वतीने मोठा मोर्चा आयोजित केला, हा मोर्चा काँग्रेसच्या विरुद्ध होता. त्याचा तळ पसरणी घाटाच्या खाली वाई-पाचगणी रस्त्यानजीक पडला होता. या काळात कै. रामभाऊ मेरूकर, वसंतराव बोराटे व मी हे काँग्रेमध्येच होतो. व शास्त्रीबुवांनी त्यांचा रॅडिकल डेमॉक्रॅटिक पक्ष बरखास्त करून ते यशवंतराव व किसनवीर यांच्याजवळ उत्तरोत्तर येत गेले.

भारतीय घटना व निधर्मीवादाला आकर्षित होऊन शास्त्रीजी पूर्णपणे काँग्रेसचे झाले. यामुळे परिचय वाढत गेला व तो आजतागाईत वर्धमान आहे, हे माझे भाग्य समजतो. इंदिराजींच्या हस्ते केवलानंद सरस्वती मंदिराचे भूमिपूजन झाले. इमारत यशवंतरावांच्या उदार धोरणातून उभी राहिल्यावर त्यात त्यांच्या इच्छेप्रमाणे विश्वकोश चालू झाला. प्राज्ञपाठशाळेला नवा गेट अप आला. शास्त्रीमहाराज जाती, धर्मभेद, स्पृश्य-अस्पृश्य वगैरे मानीत नाहीत, असा अनुभव आल्यामुळे व समकालीन अनेक मित्र शास्त्रीजींच्या जवळ आले. १९४७ साली तर्कतीर्थांनी "ज्योतिनिबंध" लिहून प्रकाशित केला, त्यांना

दिल्लीचे पुढे अध्यक्षस्थान मिळाले. त्यांनी मला, बाजीराव हगवणे, मेहकर व बोराटे यांना दिल्लीस भरलेल्या साहित्य संमेलनास बरोबर नेले. त्यांचे गुरुदेव केवलानंद सरस्वती हे बरोबर होते. त्यांचा तेथे पंडित नेहरूंच्या हस्ते अभूतपूर्व सत्कार झाला. आम्हांस येताना ऐतिहासिक स्थळे पाहण्याचा अलभ्य योग आला. काळानुसार शास्त्रीजी बदलत आले व जरूर ते परिवर्तन करण्याची त्यांच्यात असामान्य शक्ती व युक्ती असल्यामुळे ते गतिमान राहून सतत पुढे आले. प्राज्ञपाठशाळेनंतर प्रिंटींग प्रेस उभारला. नानाविध ग्रंथ व पुस्तके छापली गेली. केवलानंदांचा तत्त्वनिष्ठ परिवर्तनवादाच्या अधिष्ठानावर मागे चालू झालेला 'धर्मकोश' हाही प्रगतिपथावर राहिला. डॉ. राधाकृष्ण, डॉ. राजेंद्रप्रसाद वगैरे भारतीय महत्त्वाच्या पुढाऱ्यांपासून अनेक लहानमोठ्या व्यक्ती प्राज्ञपाठशाळेस भेट देतात, देऊन गेले. त्या प्रत्येकांच्या व्याख्यानाचा लाभ मला झाला, शिवाय खुद्द तर्कतीर्थांची व्याख्याने अनेक वेळा मी सज्ञान झाल्यापासून ऐकीत आलो. यामुळे मी बहुश्रुत झालो.

'कृतार्थ' (१९८२) नामक मजबद्दलचा ग्रंथ यांच्याच प्राज्ञपाठशाळेच्या विश्वकोश इमारतीत कै. श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते प्रकाशित झाला व हा ग्रंथ प्राज्ञ प्रेसमध्ये छापला. माझा गौरव समारंभ मोठ्या प्रमाणात साजरा होण्यास तर्कतीर्थच कारण झाले. दहिवडी (जि. सातारा) येथे २२।९।८८ रोजी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जन्मोत्तर दिनास शास्त्रीजींच्या बरोबर मी गेलो होतो. त्यांच्या पत्नी कै. सत्यवतीबाई उर्फ सतीकाकू असतानाही त्यांच्या प्रेमळ वागणुकीचा मला वारंवार लाभ झाला. तर्कतीर्थांच्यामुळे मी पावन झालो. तीर्थासी तीर्थ तर्कतीर्थ. हा समारंभ परमपूज्य तर्कतीर्थ शास्त्रीजींचे अध्यक्षतेखाली झाला.

**('माझी हाज-यात्रा'मधून. फेब्रुवारी, १९९१, पृ. ४६ ते ४८)**

○○○

८५.

# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

## वसंत बोराटे

प्राज्ञ पाठशाळेत १९९४ साली, लक्ष्मण बाळाजी जोशी नावाचा मुलगा संस्कृत शिक्षणासाठी वाईला दाखल झाला. जोशी मूळचे खानदेशमधील पिंपळनेर ता. साक्री येथील. हरिद्वार येथे शिक्षणासाठी जाणार होते, पण योगायोगाने वाईला आले व वाईकरच बनले. वाई, काशी, कलकत्ता येथे त्यांचे शिक्षण होऊन तर्कतीर्थ ही पदवी त्यांनी मिळविली.

प्राज्ञ पाठशाळेत शिक्षणाबरोबर राष्ट्रभक्तीचेही शिक्षण देत, त्यामुळे भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात प्राज्ञ पाठशाळेचे योगदान मोठे आहे. १९३० च्या स्वातंत्र्य लढ्यात प्राज्ञ पाठशाळेच्या विद्यार्थी व शिक्षकांचा भाग मोठा होता. १९३० साली नाशिक जिल्ह्यातील बागलाण तालुक्यात जंगल सत्याग्रह करून लक्ष्मणशास्त्री फरारी झाले होते. तत्पूर्वी त्यांनी कऱ्हाडच्या कृष्णा घाटावर ओळीने आठ दिवस महाभारत रामायणातील दाखले देत देशभक्तीपर व्याख्याने दिली होती. त्यामुळे सातारा जिल्ह्यात देशभक्तीची भावना चेतली गेली व हजारो लोक स्वातंत्र्यलढ्यात सामील झाले. शास्त्रीजींना अटक होऊन धुळ्याच्या तुरुंगात रवानगी झाली. तेथे त्यांना जमनालाल बजाज, आचार्य विनोबा भावे, साने गुरुजी वगैरेंचा सहवास लाभला.

अस्पृश्यतेच्या प्रश्नावर येरवडा तुरुंगात महात्मा गांधींनी उपोषण केले. यासंबंधी चर्चेला शास्त्रीजींना बोलावले होते. अस्पृश्यतेला धर्मशास्त्रात थारा नाही असे आधार त्यांनी म. गांधींना काढून दिले. यामुळे त्यांनी अनेक धर्मशास्त्रांचा व सनातनी धर्मपंडिताचा रोष ओढवून घेतला. प्राज्ञ पाठशालेने धार्मिक पारवर्तनाची भूमिका घेऊन म. गांधींच्या व शास्त्रीजींच्या विचाराला पाठिंबा दिला.

पुढे मानवेंद्रनाथ रॉय यांच्याशी त्यांचा संबंध आला व ते रॉयवादी बनले व त्यासाठी सर्वस्वाचा त्याग, उच्चपदस्थ व्यक्तींचा सहवास सोडून त्यांनी काँग्रेसचाही त्याग केला व रॉयवादाचे प्रवक्ते बनले. रॉय यांच्या विचारसरणीनुसार त्यांनी १९४२ च्या चळवळीला

विरोध केला होता. रॉय पक्ष विसर्जित झाल्यावर त्यांनी पुन्हा काँग्रेसप्रवेश केला. यशवंतराव चव्हाणांचे व त्यांचे गाढ संबंध प्राप्त झाले. साहित्य संस्कृती मंडळाचे ते अध्यक्ष झाले व मराठी विश्वकोशाची निर्मिती करून त्यांनी आपल्या हयातीत चौदा खंड निर्माण केले. जागतिक पातळीवर चिकित्सक विद्वान म्हणून त्यांनी कीर्ती संपादन केली.

**('वाई तालुक्यातील स्वातंत्र्यसैनिकांचे योगदान' / २६ जानेवारी, २०००)**

○○○

८६.

# सहवास तर्कतीर्थांचा

## राम देशपांडे

गेल्या तीस-चाळीस वर्षांत तर्कतीर्थांची कितीतरी भाषणे ऐकायचा योग आला. कोल्हापूर आणि परिसरात त्यांची झालेली व्याख्याने ऐकायची संधी मी सोडली नाही.

असे असूनही, त्यांच्याशी मोकळेपणाने बोलावे, हस्ताक्षरसंग्रह दाखवावा, संग्रहासाठी त्यांचे हस्ताक्षर मिळविण्याचा प्रयत्न करावा, असा योग काही केल्या येत नव्हता. त्यासाठी त्यांना भेटणं, संग्रहाविषयी त्यांना सांगावं, हे मला प्रशस्त वाटत नव्हतं.

पण १४ ऑगस्ट १९६६ ची तर्कतीर्थांची भेट अविस्मरणीय ठरली. ते एका समारंभाच्या निमित्ताने कोल्हापूरला आले होते. समारंभ सकाळी होता. जेवण करून थोडीशी विश्रांती घेऊन ते वाईला जाणार होते. दुसऱ्या दिवशी १५ ऑगस्ट. रात्रीपर्यंत वाईला पोहोचायचे होते. राजारामपुरीत डॉ. कापडी यांच्या घरी ते थांबले होते. डॉक्टरांचा नि माझा परिचय होता. त्यामुळे त्यांच्याच घरी तर्कतीर्थ थांबणार असल्याने मला मोकळेपणाने भेटायची ही चांगली संधी होती.

अकरा-साडेअकराची वेळ. ते कार्यक्रमाहून परत आले. संग्रहातील काही निवडक पण दुर्मीळ हस्ताक्षरे त्यांना दाखविण्यासाठी मी बरोबर घेतली आणि डॉक्टर कापडी यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांना भेटायला गेलो. डॉक्टरांनी ओळख करून दिली. एकेक हस्ताक्षर मी त्यांना दाखवत होतो. प्रत्येक हस्ताक्षर जिज्ञासेनं ते पाहात होते. अधूनमधून हस्ताक्षर कुठं मिळालं, कसं मिळालं, ते जतन कसं करता, प्रदर्शनात ज्या वेळी हस्ताक्षरे मांडता, त्या वेळी चोरीला जातील, खराब होतील असं वाटत नाही का? असे अनेक प्रश्न हस्ताक्षरे पाहता पाहता ते मला विचारत होते. तास-दीड तास ते माझा संग्रह पाहात होते. संग्रह पाहून झाला. दुर्मीळ हस्ताक्षरे मिळवायचा जास्तीत जास्त प्रयत्न करा, असे त्यांनी सांगितलं. मी अभिप्रायाची वही त्यांच्याकडे दिली. अभिप्राय लिहिण्याची विनंती केली. क्षणाचाही विलंब न लावता त्यांनी वहीत अभिप्राय लिहिला;

*राम देशपांडे यांनी महाराष्ट्रातील नामवंतांची हस्ताक्षरे गोळा करून सुरक्षित जपण्याचा जो प्रयत्न चालविला आहे, तो प्रशंसनीय आहे.*

*लक्ष्मणशास्त्री जोशी*
*१४/८/१९६६,*
*कोल्हापूर.*

अभिप्रायाची वही माझ्या हातात देत ते म्हणाले, ''आमच्या विश्वकोशासाठी या हस्ताक्षरांचा चांगला उपयोग होण्यासारखा आहे.'' आमची ही पहिली भेट.

पुढे काही ना काही कारणाने त्यांच्या भेटी होत राहिल्या. कितीही घाई गडबडीत असले तरी ते भेटल्यावर संग्रहाची चौकशी करायचे, संग्रहाविषयी आस्थेने विचारायचे. पण या भेटी अशाच घाईगर्दीच्या.

शासकीय नोकरीतून स्वेच्छानिवृत्ती स्वीकारली आणि 'सकाळ'च्या संदर्भ विभागात रुजू झालो. हळूहळू 'सकाळ' आकार घ्यायला लागला. त्याचा जमही बसला. नवनवी हुशार, तरुण मंडळी 'सकाळ' परिवारात समाविष्ट झाली.

आणि याच दरम्यान एक घटना घडली, महाराष्ट्राचे लाडके आणि पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण गेले. यशवंतरावांच्या कार्यकर्तृत्वाचा, व्यक्तिमत्त्वाचा वेध सर्वांगांनी घ्यावा म्हणून 'सकाळ'ने विशेष पुरवणी काढायचे ठरवले. पुरवणीत तर्कतीर्थांचा लेख असायलाच हवा यावर कुणाचेच दुमत नव्हते. त्यांनी लेख लिहायचे मान्य केले. मात्र त्यांनी अट घातली, लेख लिहून घेण्यासाठी पुरेशी सवड मिळावी आणि लेख लिहून घेण्यासाठी कुणालातरी पाठवावे.

साहजिकच संपादक कुवळेकरांनी ही कामगिरी माझ्यावर सोपविली. त्यांनी मला पत्र दिले. तर्कतीर्थांच्या सहवासात पुन्हा काही काळ घालवायला मिळणार याचा आनंद झाला आणि अशाच एका सकाळी वाईला पोहोचलो.

अकरा वाजता मी विश्वकोश कार्यालयात पोहोचलो. माझा मित्र नायगावकर तिथे ग्रंथपाल होता. त्याच्यामुळे तर्कतीर्थांची भेट सुलभ झाली. ते प्राज्ञ पाठशाळेत राहात होते तिथे गेलो.

काही मंडळी त्यांना भेटण्यासाठी आली होती. मी लेखासाठी कोल्हापूरहून आल्याचे त्यांना कुणीतरी सांगितले. तर्कतीर्थांनी बसायला सांगितले. ती मंडळी उठून गेल्यावर मला आत बोलावले. शास्त्रीबुवांची स्मरणशक्ती अतिशय तल्लख. त्यांना नमस्कार करून मी समोर बसलो. त्यांनी एकदा पाहिलं आणि म्हणाले, ''आपण या आधी भेटलोय कोल्हापुरात. तुम्हीच हस्ताक्षरांचा संग्रह केलाय ना? नवीन हस्ताक्षरे मिळाली की नाही? तुम्ही संध्याकाळी या. आपण लिहायला बसू या. मात्र लेख मी वाचून तपासून दिल्याशिवाय जायचं नाही.'

'तुम्ही उतरलाय कुठं?'

मी लॉजचं नाव सांगितलं.

'बरं आहे का? सोय नसेल तर या इथेच.'

ते कुठंतरी कार्यक्रमाला गेले आणि हा संवाद इथेच थांबला.

संध्याकाळी ठरल्याप्रमाणं मी त्यांच्या घरी लेखासाठी गेलो. हाताशी यशवंतरावांविषयी पुस्तके होती. त्यांनी मजकूर सांगायला सुरुवात केली. ओघात ते मजकूर सांगत होते. यशवंतरावांची वैचारिक जडणघडण कशी झाली, त्याला कुणाकुणाचे साहाय्य झाले, यशवंतराव आपला वाचनाचा व्यासंग कसा वाढवत होते, याविषयी ते बोलत होते. मी भरभर टिपून घेत होतो. जवळजवळ दोन तास आमचे हे लेखन चालले होते. ही लेखन बैठक इथेच संपवताना ते म्हणाले, 'हा मजकूर मी रात्री वाचून तपासून ठेवतो. तो मजकूर मुद्रणप्रतीसाठी न्या. सकाळी आलात की पुढचा मजकूर सांगतो.'

दोन दिवसांत आमचा लेख लिहून पूर्ण झाला. पुढचा मजकूर सांगत असतानाच आधीच्या मजकुराची मुद्रणप्रत तयार होती.

मुद्रणप्रत तयार झाली. त्यांनी ती वाचून किरकोळ दुरुस्त्या केल्या. लेखाच्या शेवटी सही केली आणि मजकूर हाती दिला. मी लेख घेऊन कोल्हापूरला आलो.

त्यानंतर त्यांची भेट मिरजेस झाली. पु.लं.नी दिलेल्या देणगीतून मिरजेत हॉल बांधला होता. त्याच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमाच्या वेळी भेट झाली. कुसुमाग्रज, पु. ल. आणि तर्कतीर्थ एकत्र होते. माझ्या दृष्टीनं ती एक पर्वणीच होती तिघांना भेटण्याची. तीही एकाच व्यासपीठावर. नंतर पणजीच्या संमेलनात त्यांची भेट झाली आणि बहुधा हीच आमची अखेरची भेट असावी.

मनात येतं, खरंच मी भाग्यवान, एवढ्या मोठ्या मोठ्या माणसांना जवळून पाहायला मिळालं. त्यांच्या सहवासाचा आनंद मला मिळाला. वर्णनही करता यायचं नाही, असा हा आनंद.

**(सामना, रविवार, उत्सव पुरवणी, २ एप्रिल २०००)**

○○○

# ८७.

# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

## संभाजीराव पाटणे

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी महाराष्ट्राचे मुक्त ज्ञानपीठ होते. शास्त्रीजी प्रबोधनाच्या आणि परिवर्तनाच्या चळवळीतील पुरोगामी विचारवंत होते. धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातील, पिंपळनेर हे त्यांचे जन्मगाव. २७ जानेवारी १९०१ ही त्यांची जन्मतारीख. वयाच्या तिसऱ्या वर्षी त्यांचे मातृछत्र हरपले. गावीच प्राथमिक शिक्षण झाले. वडील बाळाजी जोशी यांनी त्यांना सातारा जिल्ह्यातील वाई गावी आणले. श्री स्वामी केवलानंद सरस्वती यांच्यासारखे प्रज्ञासंपन्न गुरू त्यांना लाभले. प्राज्ञपाठशाळेत विनोबा भावे यांनी लक्ष्मणशास्त्रींना इंग्लिश शिकविले. वाईतील सहा महिन्यांच्या वास्तव्यानंतर विनोबाजी बडोद्यास गेले.

लक्ष्मणशास्त्रीही काही काळ बडोद्यास गेले. अधिक ज्ञान संपादन करावे हीच इच्छा होती. पुन्हा वाईस आले. गुरुवर्यांच्या इच्छेनुसार वाराणसीला गेले. गंगाकाठावर पंडितांकडून अधिक ज्ञानसाधना केली. कलकत्ता येथील शासकीय संस्कृत विद्यालयातून १९२२ साली 'तर्कतीर्थ' ही पदवी संपादन केली. धार्मिक आणि सामाजिक परिवर्तनासाठी शास्त्रीय मांडणी करण्याचे कार्य गुरू-शिष्यांनी केले. १९२६ साली वासुदेव पंडितांच्या सुकन्या कावेरी आणि नंतरच्या सत्यवती यांच्याशी ते विवाहबध्द झाले. वडिलांनाही वाई येथेच राहण्यासाठी आणले होते. महात्मा गांधीजींची कायदेभंगाची चळवळ सुरू होती. १९३० साली सत्याग्रहात भाग घेतल्याने शास्त्रीजींना अटक झाली. धुळ्याच्या तुरुंगात असतानाच वडिलांचे निधन झाले.

१९३१ साली तुरुंगातून सुटका झाली पुन्हा सत्याग्रहात भाग घेतल्यामुळे अटक झाली. धुळ्याच्याच कारागृहात शिक्षा भोगावी लागली. फेब्रुवारी १९३३ मध्ये तुरुंगातून सुटका झाली. महात्मा गांधीजींचे येरवडा कारागृहात उपोषण सुरू होते. महात्माजींनी केवलानंद सरस्वतींना आणि शास्त्रीजींना अस्पृश्यतेच्या प्रश्नासंबंधी चर्चा करण्यास बोलविले होते.

महात्माजींच्या भूमिकेस गुरुवर्यांनी आणि तर्कतीर्थांनी पाठिंबा दिला होता. महात्माजींचे चिरंजीव देवदास आणि राजगोपालचारी यांची कन्या लक्ष्मी यांच्या विवाहाचे पौरोहित्य लक्ष्मणशास्त्री यांनी केले होते. त्या वेळी तर्कतीर्थांच्या पत्नी सत्यवती याही उपस्थित होत्या. प्राज्ञपाठशाळेत १९३४ साली अस्पृश्यांबरोबर सहभोजनही झाले होते. भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील लक्ष्मणशास्त्री काँग्रेस चळवळीपासून दूर गेले आणि रॉयवादी झाले. या पक्षाला फारसे यश मिळाले नाही.

१९४८ साली रॅडिकल डेमोक्रॅटिक पक्ष त्यांच्याच अध्यक्षतेखाली विसर्जित झाला. प्राज्ञपाठशाळा राष्ट्रीय शिक्षणाचे केंद्र होते. भूमिगतांचे आश्रयस्थान होते. लक्ष्मणशास्त्री जोशी आणि त्यांचे गुरुवर्य स्वामी केवलानंदांनी सौराष्ट्रातील सोमनाथ मंदिरातील मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली होती. त्या वेळी राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी कलशारोहण केले होते. दिल्लीमधील अखिल भारतीय मराठी साहित्य मंडळाच्या अधिवेशनाचे १९५४ साली ते अध्यक्ष होते. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या अध्यक्षपदाची, तसेच विश्वकोशाच्या प्रमुख संपादक पदाची जबाबदारी त्यांनी पेलली. धर्मकोशाचे संपादकपदही त्यांनी भूषविले. विवेकी विचारांच्या समाज प्रबोधनाबरोबरच विविध विषयांवर त्यांनी चिंतनात्मक विचारही मांडले.

ज्योतिनिबंध, वैदिक संस्कृतीचा विकास, नवभारतमधील लेखन आजही दिशादर्शक ठरणारे आहे. वाईसारख्या छोट्या गावी या देवमाणसाने माणसातला देव जाणला. वाईस महाविद्यालयाचा शुभारंभ केला. आपल्या विचार वैभवाने वाईच्या विराट नगरीला विराट विश्वकेंद्र बनविले. लक्ष्मणशास्त्रींनी परदेश दौऱ्यातही आपले भारतीय संस्कृती दर्शन घडविले. भारत सरकारने राष्ट्रीय संस्कृत पंडित म्हणून त्यांचा गौरव केला. तसेच पद्मभूषण आणि पद्मविभूषण पुरस्कारही त्यांना दिले. इचलकरंजी फाय फौंडेशनचा राष्ट्रभूषण, कोल्हापूरचा राजर्षी शाहू पुरस्कार, तसेच महाराष्ट्र शासनाचा महाराष्ट्र गौरव पुरस्कारही त्यांना मिळाला. कृष्णाकाठचा हा कोहिनूर २७ मे १९९४ रोजी अमरपदी गेला. त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन!

**('साताऱ्याचे कोहिनूर'मधून, २८ नोव्हेंबर, २०११, पृ. ४१ ते ४३)**

ooo

# ८८.

# प्रकांड पंडित : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

## अरुण गोडबोले

एकेका गावाची कधी एखादी वस्तू, कधी वास्तू तर कधी एखादी व्यक्ती ओळख आणि प्रतीक बनून जाते. केळी म्हटले, की वसई आणि पर्वती म्हटले, की पुणे, वर्धा म्हटले, की विनोबाजी आणि अगदी त्याच परंपरेत परवा परवापर्यंत वाई म्हटले की तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हीच ओळख होती. वाईला खूप प्राचीन इतिहास आहे. महाभारतापासून पेशवाईपर्यंतच्या अनेक खुणा वाईमध्ये आहेत. परंतु अलीकडच्या पन्नासएक वर्षांमध्ये तर्कतीर्थ आणि त्यांच्यामुळेच आलेला 'विश्वकोश' हीच वाईची मुख्य वैभवखूण बनलेली होती. कुशाग्र बुद्धीचे, प्रकांड पांडित्याचे आणि परिवर्तनाच्या आधुनिक प्रवाहाचे तर्कतीर्थ हे मूर्तिमंत वैभव होते. आर्थिक वैभवाने अनेक गावे समृद्ध असतात; पण तर्कतीर्थांच्या रूपाने लाभलेले वाईचे प्रज्ञावैभव अजोड होते.

मराठवाड्यातील छोट्याशा गावातून लक्ष्मण बाळाजी जोशी हा छोटा मुलगा वयाच्या १४-१५ व्या वर्षी वाईला केवलानंद सरस्वतींच्या चरणापाशी ज्ञानसंपादनासाठी आला. मूळच्या कुशाग्र बुद्धीला गुरूच्या मार्गदर्शनाखाली आणखीच वर्धिष्णु करीत एका अढळ स्थानावर गेला. हा सगळा प्रवास म्हणजे नियतीच्या पूर्वयोजनेचा एक भागच वाटावा, असा स्तिमित करणारा आहे. आमच्या पिढीला शास्त्रीजींची जी पहिली ओळख झाली, ती फारशी सुखद नव्हती. १९५७ च्या संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या प्रचंड लोकप्रभावाचे ते दिवस होते. एस. एम. जोशी, नानासाहेब गोरे वगैरे ज्येष्ठ नेते संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे, यासाठी लोकजागृती करीत होते. त्यांना घणाघाती वक्तृत्व आणि जबरदस्त लेखणी या आपल्या दोन्ही अस्त्रांनिशी आचार्य अत्रे बळ देत होते. अत्र्यांची लेखनशैली म्हणजे एखाद्याला डोक्यावर तरी घेतील, नाहीतर मग दुसरे टोक गाठून त्याच्यावर सडकून विखारी जहाल टीका करतील. त्या वेळी संयुक्त महाराष्ट्र समितीचे नेते पहिल्या प्रकारात आणि त्यात भाग न घेणारे पं. नेहरूंपासून ते मोरारजीभाई देसाई, यशवंतराव चव्हाण ते तर्कतीर्थांपर्यंत

दुसऱ्या टीकेचे धनी होणाऱ्या प्रकारात. तेव्हा 'नवयुग' आणि 'मराठा'मधून आचार्य अत्र्यांनी तर्कतीर्थांच्या नावापासून कोट्या करीत त्यांच्यावर टीकेची तुफान झोड उठविली होती. त्या लहान वयात टीकाच वाचायला आवडायची (अर्थात अनेक जणांचे वय वाढले तरी ती आवडच कायम असते). त्यामुळे हा सर्व मजकूर चवीने वाचला जायचा आणि त्यामुळे मनात तर्कतीर्थांच्याबद्दलचा आदर तेव्हा तरी जागृत झालेला नव्हता.

पण पुढील पाच वर्षांतच हे चित्र पालटले. शास्त्रीजींच्या ज्ञानभांडाराचे दर्शन घडले आणि आदरभावही आपोआपच आला. नवीन महाराष्ट्राची स्थापना झाली आणि यशवंतराव चव्हाण यांच्या द्रष्ट्या नेतृत्वाखाली त्याची नव्याने सांस्कृतिक, साहित्यिक जडणघडण सुरू झाली. त्यामधून मराठी विश्वकोश मंडळ, साहित्य संस्कृती मंडळाची स्थापना शास्त्रीजींच्या मार्गदर्शनाने आणि त्यांच्याच नेतृत्वाखाली झाली. तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या निमंत्रणावरून सोरटी सोमनाथाच्या जीर्णोद्धाराचे पौरोहित्य त्यांनी स्वीकारले होते. पुण्यात कॉलेजला असताना अनेक सभांमधून शास्त्रीजींची सुरेख भाषणे ऐकण्याचा योग आला. सहजपणे वेदांपासून आणि कौटिल्यीय अर्थशास्त्रापासून ते मार्क्सवाद रॉयिझम, म. फुले आणि डॉ. आंबेडकरांच्या समतावादापर्यंत लीलया चालणारे आणि त्या सगळ्यांचा वेध अचूक घेणारे त्यांचे वक्तृत्व गुंग करणारे असे. पांडित्य असूनही सोप्या भाषेत ते या विचारप्रवाहांचे मर्म सामान्य माणसालाही सोपे करून सांगत असत. अशी त्यांची अनेक व्याख्याने ऐकली ती बहुधा मागे उभे राहूनच. त्यांना भेटण्याचा सुयोग येण्याचे कारण नव्हते. ते वाईला म्हणजे आपल्या सातारजवळच राहात असल्याने आपले सातारकरच आहेत, असा आपलेपणा मला दुरूनच का होईना निर्माण झाला. पुढे होऊन ओळख करून घ्यावी. 'आपण सातारच्या बन्या बापू गोडबोल्यांना ओळखता, त्यांचा मी मुलगा' असे त्यांना सांगावे, असे मात्र मनातही आले नाही. त्यांचे आनंद देणारे वक्तृत्व ऐकणे, हेच पुरेसे वाटायचे.

पुढे सातारला येऊन वडिलांचा कर सल्लागार म्हणून व्यवसाय पाहू लागलो. इंडेक्स बघता-बघता त्यात तर्कतीर्थांची फाईल होती आणि लक्षात आले, की खऱ्या ज्ञानार्थीने सतत ज्ञान घेतले पाहिजे आणि निर्लोभीपणाने ज्ञानदान करीत राहिले पाहिजे, अशी त्यांची ठाम श्रद्धा होती. त्याप्रमाणेच ते आयुष्यभर आचरण करीत. साहित्य संमेलनाला अध्यक्ष म्हणून ते दिल्लीला जेवढ्या सहजपणे गेले, तेवढ्याच सहजपणे एखाद्या छोट्या दुकानाच्या उद्घाटनालाही जात राहिले. त्यांचा प्रवासाचा स्टॅमिना विलक्षण होता. मला आठवतंय, एकदा सातारच्या कार्यक्रमासाठी ते नांदेडहून सकाळी १० वाजता तेथील कार्यक्रम संपवून निघाले होते. ते सलग प्रवास करीत सातारला ५॥ ला पोहोचले होते आणि पूर्ण उत्साहाने ६ वाजता भाषणाला उभे राहिले होते. त्यांची तब्येत जेव्हा बरी नव्हती, तेव्हा कोणीतरी सुचविले की आता प्रवास व व्याख्याने थोडे दिवस बंद करावीत. तेव्हा ते म्हणाले होते, 'तो तर माझा प्राणवायू आहे. तो बंद करणे या जन्मी तरी अशक्य आहे.'

त्यांच्या रूपाने महाराष्ट्राचा ५० वर्षांचा राजकीय, सामाजिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक इतिहासच चालता-बोलता होता. तो सर्व ध्वनिमुद्रित करण्यासाठी मी त्यांना विनंती केली. ती त्यांनी मान्य केली. ते म्हणाले, 'अरे त्याला दोन पूर्ण दिवस लागतील. तू वेळ ठरवून ये. आपण महाबळेश्वरला थांबून सलग दोन दिवस रेकॉर्डिंग करू.' पण आज करू, उद्या करू, पुढच्या महिन्यात वेळ मिळेल असे करत ते तसेच राहात चालले होते. एके दिवशी मी पुण्याहून इन्कमटॅक्सचे काम संपवून सातारला येत होतो; तर वाटेतच माझे मित्र विश्वास दांडेकर यांनी माझी गाडी पास करून मला थांबवले आणि शास्त्रीजींच्या निधनाची बातमी दिली. आम्ही दोघेही तसेच वाईला जाऊन अंत्यदर्शन घेतले. मनात मात्र येत राहिले, की आपण या ज्येष्ठ ज्ञानर्षीच्या स्नेहाला पारखे झालो आणि जो इतिहास शब्दबध्द झाला असता त्यालाही मुकलो. आता फक्त त्या मिळालेल्या ज्ञानानंदाची स्मृती जपायची!

**(पूर्वप्रसिद्धी : दै. ऐक्य / १ जानेवारी २००६, 'अक्षरधन'मधून उद्धृत)**

OOO

## 89.

# A Tribute to My Father : Laxmanshastri Joshi

## Arundhati Khandkar

Those two days we all were tense and bewildered as Aaba-my father was not in the town. He was away in Calcutta to attend the annual convention of the Radical Democratic Party, in the last week of January, 1948, when the news of Gandhiji's assassination reached us in Wai, a certain section of the society started torching the houses of the Brahmin families. We children could see from the windows of the school, huge red and orange flames leaping towards the sky and it was darkening by the thick cloud of smoke. The school was later abruptly closed when we waited for Aba. Aba returned home, calm and cool and all of us felt relaxed. He assured us that he knew well that nothing untoward would happen to our home as all the people knew of his close association with Gandhi. He said further that it was the magic spell that was going to protect our home.

Aaba used to travel often and we children got used to his frequent absence from home. It was his commitment to religious reforms in the beginning, later his role as a principal adviser to M. Gandhi when he launched the campaign against untouchability that needed him to visit different people at different places. Aaba's 26 volumes of project of Dharmakosh, his long affair with Marxism and M.N. Roy as well as his engagement with Marathi Vishwakosh (Encyclopaedia in Marathi) kept him away. But every time he returned there was a beaming smile on his

face and in his bag with a lot of sweets and fruits and books for us. He appeared to us just like a Santa Claus. Back at home his evenings were carved out for us children. After we recited our tables ritually, it was a story session. We used to sit around him and listen to the stories of heroes and villains from different lands and distant cultures. He amused us as he was a compelling storyteller.

He entertained his visitors in his study room where there were quite a few cupboards full of books. I without any inhibition, picked up any book, any magazine. There was one rotating book rack on which were stacked heavy books. I often looked into the volumes on European paintings. There were beautiful nude drawings therein still he never said 'don't take those books, they are not meant for children.' He did not ever ask me about how I was doing in school, or what my performance was like. Even when I took my progress book to him for signing, he just put his signatures on the dotted line. While I was studying for philosophy honours course in Pune University, I found Kant's transcendental method and a priori concepts of space and time difficult. I approached him and he made it so easy that I felt at the top of the world.

I recall the day when I did not reach the examination hall, because I had noted their timetable wrongly. I missed the paper at my master's examination, which amounted to losing the entire academic year. I was married at that time and had not joined my husband as I had to complete my final year. Such a mistake on my part filled me with remorse and guilt. Aaba came from Wai to pick me up. He showed me the list of books of the Sahitya academy, to be translated and asked me if I was interested in such a task. I picked up Machiavelli's The Prince for translation and then he bought quite a few books on political science for me to read so as to do a good translation job. When the work was finished after a few months he went through it carefully before submitting it to the office of the Sahitya Academy, New Delhi. Without saying it in so many words, he enabled me to convert that year into a very fruitful one.

It was about a few months later I visited Wai in the month of Savan. The garden was in full bloom. Aaba got an idea suddenly of celebrating

mangalagaur the ritual worship to be performed by the newly married girls. He collected a large variety of jasmine flowers, magnolia, parijat and coloured hibiscus. He decorated a portion of the hall with fresh fragrant flowers and enjoyed every bit of the ceremony. Though such an erudite scholar yet Aba was surprisingly very sentimental while it came to family. My second son was born fourteen years after my elder one. I was about to quit my job when he and my mother tried to reason with me. She said, "Look Suman, we want to take care of our child. Your baby will grow and enter the school in three years time, so it is not wise to sacrifice your career," They brought up my son Ajay, informing me on phone, from time to time about his progress, his vocabulary, his likes and dislikes etc.

I lost my husband all of a sudden on Republic Day in 1983. Aaba stayed with me for a month for taking care of me, helping me to come to terms with the huge tragedy in my life. He noticed me on one occasion sitting on my bed and sobbing in the middle of the night, immediately he pulled the chair near my bed and said, "Suman, collect yourself, I understand your grief. Now listen to me, write in your diary everything that crosses your mind, all your thoughts and feelings. Great literature is born from such intense experiences." He was playing a double role that of my mother as well his own. My mother had passed away untimely and suddenly way back in 1978 at the age of 64. That had shattered him. I never wanted to see him collapse again. I thereafter announced to him that I was going to attend the course of Vipashyana of Goenka at Igatpuri, to attain some peace. He smilingly said, "Even if you go to the Himalayas, that will not guarantee the peace you are seeking. Peace has come from within." I changed my plan, thereafter.

When in Mumbai, he always stayed at my place. He managed his breakfast of toast and milk and fruits. He waited for me to come from college to prepare our lunch. As I got down to simple cooking, he would follow me to the kitchen, and observe how I went about the cooking. He once exclaimed, "I had told your mother to impart a few preliminary

lessons to me in cooking but she did not do it."

At the age of ninety, I was amazed to see him deliver three lectures on Shankaracharya, on three sensecutive evenings. The elite of Mumbai attended those lectures and enjoyed his fluent exposition faced with humour, What an extraordinary father I was lucky to have! My humble tribute to such a great father is to translate his important works into English so that they reach a larger panorama of reading public. Thus, I shall be able to perpetuate his memory.

**(Published in 'The Radical Humanist', September 2012)**

❍❍❍

# लेखांची संदर्भ सूची

## अ) गौरव लेख


१. **महाराष्ट्राचा सत्पुत्र** - प्रतिनिधी, किर्लोस्कर, किर्लोस्कर, जुलै, १९३७.

२. **एक वाया गेलेला विद्वानः** तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी - दि. वि. देव, साप्ताहिक नवयुग, दि. २६ नोव्हेंबर १९४४.

३. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** - श्री. शं. नवरे, साप्ताहिक मौज, दि १३ डिसेंबर, १९४४.

४. **शास्त्रीबुवांची मतांतरे आणि वेषांतरे** - श्री. शं. नवरे, दैनिक लोकमान्य, १५ डिसेंबर, १९४४.

५. **उपेक्षितांचे पुढारीः तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** - द्वा. भ. कर्णिक, साप्तहिक मौज, दि. १९ मे, १९४८.

६. **आधुनिक महाराष्ट्राचे बुद्धिवादी वेदान्तीः तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** - द्वा. भ. कर्णिक, मनोहर, मे, १९५१.

७. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** - प्रा. मा. पं. मंगुडकर, साप्ताहिक साधना, २ ऑक्टोबर, १९५४.

८. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** - प्रा. गोवर्धन पारीख, सह्याद्री, ऑक्टोबर, १९५४.

९. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशीः एक थोर 'क्रियावान पंडित'** - प्रा.गोवर्धन पारीख, नवभारत, ऑक्टोबर, १९५४.

१०. **निगर्वी, निर्भीड नि निःस्पृहः तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** - लक्ष्मणराव काशीनाथ हसमनीस, महाराष्ट्र, १९५४.

११. **तर्कतीर्थांचे क्रांतिकार्य** - रमेश रामचंद्रराव चव्हाण, कृष्णाई, १९६५-६६.

१२. **माझ्या सहवासातील तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** - भाई माधवराव बागल, नवभारत, जुलै, १९६६.

१३. **ज्ञानाचा प्रवाह खुले करणारे शास्त्रीजी** - प्राचार्य अ. के. भागवत, साप्ताहिक साधना, १५ फेब्रुवारी, १९७५.

१४. **शास्त्रीबुवा: एक प्रचंड कोडे** - श्री. शं. नवरे, दैनिक मराठा, २२ फेब्रुवारी, १९७५.

१५. **शास्त्रीबुवा आणि रॉयवादी चळवळ** - द्वा. भ. कर्णिक, नवभारत, फेब्रुवारी, १९७५.

१६. **लक्ष्मणशास्त्री जोशी : एक कृतार्थ जीवन** - मे. पुं. रेगे, दैनिक महाराष्ट्र टाइम्स, दि. १६ मार्च, १९७५.

१७. **विचार शिल्पकाराची प्रतिमा** - रा. ग. जाधव 'विचाराशिल्प'/प्रस्तावना/१५ ऑगस्ट, १९७५.

१८. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** - अनिल डोंगरे, दैनिक मराठवाडा, १६ नोव्हेंबर, १९७५.

१९. **ज्ञानतीर्थ-** रवीन्द्र पिंगे, ‘देवाघरचा पाऊस’, २५ डिसेंबर, १९७५.

२०. **तर्कतीर्थ जोशी: एक दर्शन** - रा. ना. चव्हाण, रयत शिक्षण पत्रिका, फेब्रुवारी, १९७७.

२१. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी: शास्त्र आणि शस्त्र** - यशवंतराव चव्हाण, नवभारत, फेब्रुवारी-मार्च, १९८१.

२२. **प्राज्ञपाठशाळा आणि शास्त्रीजी-** ना. बा. मराठे, नवभारत, फेब्रुवारी-मार्च, १९८१.

२३. **महाराष्ट्रातील प्रबोधनाची चळवळ व शास्त्रीजी** - रा. ना. चव्हाण, नवभारत, फेब्रुवारी-मार्च, १९८१.

२४. **शास्त्रीजींचा सामाजिक विचार-** रा. ग. जाधव, नवभारत, फेब्रुवारी-मार्च, १९८१.

२५. **परिवर्तनाचे मार्गदर्शक: तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी-** दिनकर साक्रीकर, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, अमृत महोत्सव स्मरणिका 'अमृतशारदा' २७ मे १९८१.

२६. **तर्कतीर्थांना अभिवादन** - दा. गो. देशपांडे, साप्ताहिक साधना, २१ जानेवारी, १९८६.

२७. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** - द्वा. भ. कर्णिक, ललित, दिवाळी अंक, १९८८.

२८. **विसाव्या शतकातील इतिहासाचे साक्षीदार** - अनिल जोशी, दै. केसरी, २६ जानेवारी, १९९०.

२९. **लक्ष्मणशास्त्री जोशी: एक कर्मयोगी** - रा. ना. चव्हाण, शब्दांकन- दत्ता मर्ढेकर, दैनिक ऐक्य, २६ जानेवारी, १९९२.

३०. **नित्य नव्या विचारांत रमणारा आनंदयात्री** - अनिल जोशी, दैनिक केसरी, २६ जानेवारी, १९९३.

३१. **साहित्य-संस्कृतीचे महातीर्थ** - प्राचार्य शिवाजीराव भोसले, दीपस्तंभ, २५ एप्रिल, १९९४.

३२. **महाराष्ट्रातील एक थोर विचारवंतः तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** - मीनल भावे, कृष्णाई, १९९५.

३३. **आनंदवादी प्रकांड पंडित** - गोविंद तळवलकर, दैनिक, महाराष्ट्र टाइम्स, रविवार, २८ मे, १९९५.

३४. **भारतीय प्रबोधनाचे प्रतीक: लक्ष्मणशास्त्री जोशी** - मे. पुं. रेगे, 'प्राज्ञपाठशाळा व तिची परंपरा,' १९९६.

३५. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** - शरद बेडेकर, 'विचारवंतांचा ईश्वर' डिसेंबर, १९९७.

३६. **तर्कतीर्थांची विचारयाचा** - प्राचार्य राम शेवाळकर, 'प्रतिध्वनीचे मानस', १९९८.

३७. **साध्या वृत्तीचा प्रकांड पंडित** - मे. पुं. रेगे, दैनिक सकाळ, रविवार, प्रतिमा, २३ जानेवारी, २०००.

३८. **कर्मयोगी विद्वान** - रा. ग. जाधव, दैनिक सकाळ, रविवार, प्रतिमा, २३ जानेवारी, २०००.

३९. **तर्कतीर्थ: प्राज्ञ धर्मसमीक्षक** - डॉ. मो. गो. धडफळे, दैनिक सकाळ, मे, २०००.

४०. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशीः शतकाचा वाटसरू** - मे. पुं. रेगे, दैनिक महाराष्ट्र टाइम्स, मैफल, रविवार, २८ मे, २०००.

४१. **'मराठी विश्वकोश'कर्ते: शास्त्रीजी** - रा. ग. जाधव, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी जन्मशताब्दी विशेषांक, २७ जानेवारी २००१.

४२. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी: एक 'विभज्यवादी' विचारवंत** - प्रा. डॉ. मो. गो. धडफळे, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, एप्रिल-मे-जून, २००१.

४३. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी: धर्मसुधारणा आणि समाज सुधारणा** - स. मा. गर्गे, 'भेटीगाठी', २००२.

४४. तर्कतीर्थः **एक चालते बोलते विद्यापीठ** - अ. पां. देशपांडे, 'विद्वज्जन', नोव्हेंबर, २००५.

४५. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** - वी. र.काळे, 'विस्मृतीतील विचारवंत', ६ डिसेंबर, २०११.

४६. **अभिवादन, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** - अथर्व देसाई, साप्ताहिक साधना, १४ फेब्रुवारी, २०१७.

४७. **इहवादी ऋषी** - नरेंद्र चपळगावकर, 'हरवलेले स्नेहबंध', एप्रिल, २०१८.
४८. **महाराष्ट्रीय विचार विश्वाचे अजातशत्रू नेतृत्व** - श्री. मा. भावे, दैनिक लोकसत्ता, रविवार, लोकरंग, २६ मे, २०१९.
४९. **प्रज्ञातीर्थः लक्ष्मणशास्त्री जोशी** - डॉ. सुनीलकुमार लवटे, जडणघडण, दिवाळी अंक, २०२०.
५०. **माहीत नसलेले तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** - डॉ. सुनीलकुमार लवटे, नवभारत, मार्च, २०२१.
५१. **रंग, रेषांच्या पलीकडचे व्यक्तिचित्रः वाईचे शास्त्रीजी** - डॉ. सुनीलकुमार लवटे, साप्ताहिक साधना, २९ मे, २०२१.
५२. **तर्कतीर्थांचे वाचन** - डॉ. सुनीलकुमार लवटे, 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशीः सर्वंकष आकलन', २०२२.
५३. **प्राज्ञपाठशाळा, 'नवभारत' आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**- प्रतिभा मिस्त्री (पोरे), नवभारत, ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर, २०२३.
५४. **'नवभारत' आणि तर्कतीर्थांमधील अनुबंध** - डॉ. सुनीलकुमार लवटे - नवभारत, ऑक्टोबर-नोव्हेंबर-डिसेंबर, २०२२, पृ. ४९ ते ५५.

**ब) श्रद्धांजली लेख**

५५. **ज्ञानभास्कराचा अंत** - डॉ. यु. म. पठाण, दैनिक केसरी/ दैनिक सकाळ, रविवार, २५ मे. १९९४.
५६. **संस्कृतीचा इतिहासकार** - मे. पुं. रेगे, दैनिक महाराष्ट्र टाइम्स, रविवार, २५ मे.१९९४.
५७. **जिव्हाळ्याचा सुहृद्ध हरपला** - द्वा. भ. कर्णिक, साप्ताहिक साधना, ४ जून, १९९४.
५८. **विश्वसंस्कृतीचे स्वप्न पाहणारे: तर्कतीर्थ जोशी** - अनिल जोशी, दैनिक केसरी, २६ जून, १९९४.
५९. **नि:शेष प्रेम करणारेः आबा** - डॉ. मधुकर जोशी, दैनिक सकाळ, ३ जुलै, १९९४.
६०. **ज्ञानदानात रमणारे तर्कतीर्थ** - एस. जी. इनामदार, दैनिक सकाळ, ३ जुलै, १९९४.
६१. **ज्ञानतपस्वी** - सुभाष भेंडे, ललित, जुलै, १९९४.
६२. **अखंड चाललेल्या ज्ञानयज्ञाचे कुंड विझले** - यशवंत दिनकर फडके, दैनिक लोकसत्ता, रविवार, २८ मे, १९९४.
६३. **चालता बोलता ज्ञानकोश हरपला** - मधुकाका कुलकर्णी, दैनिक केसरी, २९ मे, १९९४.

**क) आठवणी**

६४. **कौटुंबिक जीवनातील शास्त्रीजी** - सौ. अरुंधती खंडकर, नवभारत, फेब्रुवारी-मार्च, १९८१.

६५. **आबा व मी** - डॉ. मधुकर कुलकर्णी, नवभारत, फेब्रुवारी- मार्च १९८१.
६६. **माझे आजोबा** - लक्ष्मी जोशी, नवभारत, फेब्रुवारी-मार्च १९८१.
६७. **माझे सासरे** - सौ. इंदु जोशी, नवभारत, फेब्रुवारी-मार्च १९८१.
६८. **आबा: एक आनंदयात्री** - सुमन खंडकर, नवभारत, फेब्रुवारी, मार्च, १९८१.
६९. **माझे काका** - वैद्य सौ. शुभदा अ. पटवर्धन, धर्मभास्कर, जुलै, १९९४.
७०. **तर्कतीर्थांच्या सहवासात** - माधव गडकरी, 'साहित्यातील हिरे आणि मोती', १ मे, १९८४.
७१. **तर्कतीर्थ: सहवास आणि संवाद** - मधु मंगेश कर्णिक, दक्षिण महाराष्ट्र साहित्य पत्रिका, जानेवारी-फेब्रुवारी-मार्च, २००६.
७२. **यशवंतराव, किसनवीर आणि तर्कतीर्थ** - अनिल जोशी, 'यशवंत स्मृतिगंध', एप्रिल, २००९.
७३. **शास्त्रीजींबद्दलच्या काही व्यक्तिगत आठवणी** - श्री. ना. नानजकर, नवभारत, जून-जुलै, १९९५.
७४. **शास्त्रीजींच्या सहवासात** - अशोक भट, नवभारत, जून-जुलै, १९९५.
७५. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री यांच्या सहवासात** - रा. कृ. बाबर, तर्कतीर्थांच्या आठवणी - नवभारत, जुलै-ऑगस्ट, १९९५.
७६. **दोन महापुरुषांचे विचारधन** - विश्वास नाईकनवरे, 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी: व्यक्तित्व, कार्य आणि विचार', १९९६.
७७. **बहुजन समाजातील विवेकवंतांचे लाडके व जवळचे तर्कतीर्थ**, 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी व्याक्तित्व, कार्य आणि विचार', १९९६.
७८. **मोहनदासांचे चेले : तर्कतीर्थ** - बाबा फाटक, 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी: व्यक्तित्व, कार्य आणि विचार', १९९६.
७९. **समाजशिक्षक शास्त्रीजी** - अनिल जोशी, 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी: व्यक्तित्व, कार्य आणि विचार', १९९६.
८०. **माझे सहाध्यायी शिक्षक** - पुंडलिकजी कातगडे, 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी: व्यक्तित्व, कार्य आणि विचार', १९९६.
८१. **परमतसहिष्णू व समजंस व्यक्तिमत्त्व** - श्रीकृष्ण नीलकंठ लेले, 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी: व्यक्तित्व, कार्य आणि विचार', १९९६.
८२. **आबांचं घर-** सुभाष अवचट, ऋतुरंग, दिवाळी, १९९६.
८३. **तर्कतीर्थांचा शांतपणा, सहिष्णुता व वादकुशलता** - म. शं. ढोले, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी जन्मशताब्दी विशेषांक, जानेवारी,२००१.

८४. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** - हाजी महमूद मिया शेख मोहियुद्दीन दारूवाले, 'माझी हाज-यात्रा', फेब्रुवारी, १९९१.

८५. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** - वसंत बोराटे, 'वाई तालुक्यातील स्वातंत्र्य सैनिकांचे योगदान', २६ जानेवारी, २०००.

८६. **सहवास तर्कतीर्थांचा** - राम देशपांडे, दैनिक सामना, रविवार, उत्सव, २ एप्रिल, २०००.

८७. **तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** - संभाजीराव पाटणे, 'साताऱ्याचे कोहिनूर', २० नोव्हेंबर, २०११.

८८. **प्रकांड पंडित: तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी** - अरुण गोडबोले, दैनिक ऐक्य, १ जानेवारी, २००६.

89. **A Tribute to My Father : Laxmanshastri Joshi** - Arundhati Khandkar, The Radical Humanist, September, 2012.

❍❍❍

# परिशिष्टे

## परिशिष्ट - १

# ऋणनिर्देश

*'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय' प्रकल्पासाठी आवश्यक संदर्भ, माहिती, मार्गदर्शन, साधने, संपर्कसूत्र इ. चे साहाय्य करून खालील व्यक्ती व संस्थांनी मोलाचे सहकार्य केले. याशिवाय अनवधानाने नोंद घ्यावयाची राहिलेल्या इतरांचेही मी स्मरण करतो आणि सर्वांप्रती विनम्र कृतज्ञता व्यक्त करतो.*

* मा. शरद पवार, अध्यक्ष, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई.
* मा. राम नाईक, माजी राज्यपाल, उत्तर प्रदेश, लखनऊ.
* मा. मंत्री, शिक्षण मंत्रालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
* मा. सचिव, शिक्षण मंत्रालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
* मा. बाबा भांड, माजी अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई. आणि संचालक, संस्थापक, साकेत प्रकाशन प्रा.लि., औरंगाबाद.
* मा. डॉ. सदानंद मोरे, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
* मा. डॉ. सौ. मीनाक्षी पाटील, सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
* प्रा. डॉ. अशोक चौसाळकर, संपादक, समाज प्रबोधन पत्रिका, कोल्हापूर.
* प्रा. डॉ. अरुंधती खंडकर, सिंगापूर.
* मा. वासुदेव जोशी, वाई, जि सातारा.
* मा. दिलीप करंबेळकर, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई.
* मा. संजय कृष्णाजी पाटील, माजी सचिव, (अ.का.) महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई.
* मा. प्रा. डॉ, राजा दीक्षित, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई.
* डॉ. शामकांत देवरे, सहा. सचिव, मराठी विश्वकोश कार्यालय, वाई.
* श्री. रवीन्द्र घोडराज, विद्याव्यासंगी सहायक, मराठी विश्वकोश कार्यालय, वाई.
* श्री. सरोजकुमार मिठारी, विद्याव्यासंगी सहायक मराठी विश्वकोश कार्यालय, वाई.

* डॉ. जगतानंद भटकर, विद्याव्यासंगी सहायक, मराठी विश्वकोश कार्यालय, वाई.
* मा. अध्यक्ष, लोकमान्य ग्रंथालय, वाई.
* मा. शरद साठे (भा. प्र. से.), सचिव, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई.
* श्री. मोहनराव डकरे, सचिव, प्रादेशिक केंद्र, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, कऱ्हाड.
* मा. अध्यक्ष, प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई, जि सातारा.
* श्री. अनिल जोशी, सचिव, प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई, जि. सातारा.
* मा. ग्रंथपाल, मराठी विश्वकोश ग्रंथालय, वाई, जि सातारा.
* मा. अध्यक्ष, करवीरनगर वाचन मंदिर, कोल्हापूर.
* मा. ग्रंथपाल, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
* मा. खासदार प्रा संजय मंडलिक, कोल्हापूर.
* श्री. दत्ता क्षीरसागर, संचालक, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संचालनालय, पुणे.
* मा. अध्यक्ष, भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्था, पुणे.
* मा. प्रा डॉ प्रसाद जोशीं, कुलगुरू, डेक्कन कॉलेज विद्यापीठ, पुणे.
* श्री. गोपाळ अवटी, संचालक, आकाशवाणी केंद्र, पुणे.
* श्री. श्रीराम पवार, समूह संपादक, सकाळ वृत्तपत्र समूह, पुणे.
* श्री सम्राट फडणीस, संपादक, दैनिक सकाळ, पुणे.
* श्री. माधव गोखले, उपसंपादक, दैनिक सकाळ, पुणे.
* मा. स्वप्नील पोरे, संपादक, दैनिक केसरी, पुणे.
* प्रा. डॉ. प्रकाश कांबळे, महावीर विद्यालय, कोल्हापूर.
* श्री. शाम जोशी, ग्रंथसखा वाचनालय, बदलापूर.
* प्रा. डॉ सौ आशाताई गुर्जर, पुणे.
* डॉ. एच व्ही देशपांडे, माजी प्राचार्य, आजरा महाविद्यालय, आजरा, जि कोल्हापूर.
* डॉ. दिनकरराव पाटील, प्राचार्य, भोगावती महाविद्यालय, कुरुकली, ता करवीर, जि. कोल्हापूर.
* सौ. मनीषा शेणाई, ग्रंथपाल, करवीर नगर वाचन मंदिर, कोल्हापूर.
* प्रा. डॉ. पंडित टापरे, वाई जि. सातारा.
* श्री. रमेश रा. चव्हाण, रा. ना. चव्हाण प्रतिष्ठान, वाई, जि सातारा.
* प्रा. डॉ. रणधीर शिंदे, मराठी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठा कोल्हापूर.
* प्रा. डॉ. शिवाजी मोटेगावकर, राज्यशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे.
* मान. विनोद शिरसाठ, संपादक, साप्ताहिक साधना, पुणे.
* श्री सुदाम सानप, महाराष्ट्र ज्ञानमंडळ, पुणे.
* श्री. समीर दिलावर शेख, साधना साप्ताहिक, पुणे.
* डॉ. राजेंद्र प्रभुणे, वाई, जि सातारा.
* श्री. भालचंद्र मोने, प्राज्ञपाठशाळामंडळ वाई, जि सातारा.

* प्रा. सागर कांबळे, न्यू कॉलेज, कोल्हापूर .
* डॉ. आर. डी. पोतदार, अध्यक्ष, सेंटर फॉर दि स्टडी ऑफ सोशल चेंज, वांद्रे मुंबई .
* प्रा. डॉ. प्रदीप देवी, सार्वजनिक वाचनालय, नाशिक.
* प्रा. मिलिंद जोशी, कार्याध्यक्ष, म.सा. प., पुणे.
* मा. ग्रंथपाल, पुणे मराठी ग्रंथसंग्रहालय, पुणे.
* मा. ग्रंथपाल, डॉ. भांडारकर प्राच्यविद्या संस्था, पुणे.
* मा. ग्रंथपाल डेक्कन कॉलेज विद्यापीठ, पुणे.
* मा. ग्रंथपाल, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई.
* श्री. सुरेश रासकर व सौ. दिप्ती रासकर, मुंबई.
* डॉ. अशोक वेणीमाधवशास्त्री जोशी, अमेरिका.
* श्री. व. सौ. डॉ. शुभदा अरविंद पटवर्धन, मुंबई.
* प्रा. डॉ. व्यंकटेश कोटबागे, बेळगाव.
* श्री. विजय एकशिंगे व श्री संजय कळके, कोल्हापूर,
* श्री. श्रीकांत भागवत, मौज प्रकाशन गृह, मुंबई.
* डॉ. सौ. मोनिका गजेंद्रगडकर, संपादक, मौज प्रकाशन गृह, मुंबई.
* श्री. मिलिंद जोशी, व्यवस्थापक, मौज प्रकाशन गृह, मुंबई.
* Hon. Maxion Barlet, Bibliotheque de France, Paris.
* मा. ग्रंथपाल श्रीमंत गंगामाई वाचन मंदिर, आजरा जि. कोल्हापूर.
* मान.- संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, (मुंबई)
* प्रा. डॉ. रघुनाथ कडाकणे, प्रमुख, इंग्रजी विभाग, राजाराम महाविद्यालय, कोल्हापूर
* प्रा. डॉ. कृष्णा पाटील, अधिव्याख्याता, दूर शिक्षण विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
* सर्व कर्मचारी, सहयोगी, साकेत प्रकाशन प्रा .लि., औरंगाबाद
* श्री. अमेय जोशी, अक्षर दालन, कोल्हापूर
* सौ. / श्री. तनुजा व निहाल शिपूरकर, भारती मुद्रणालय, कोल्हापूर.
* श्री. गौरीश सोनार, कोरिएंडर ग्राफिक्स, कोल्हापूर.
* श्री. अशोक पाटील, छायाचित्र विकासक, कोल्हापूर.
* श्री. विश्वनाथ यादव, दैनिक लोकमत, कोल्हापूर
* श्री. विवेक जोशी, दैनिक तरुण भारत, कोल्हापूर
* श्री. भरत बुटाले, उपसंपादक, दैनिक लोकमत, कोल्हापूर.
* सौ. वीणा पाटील, अक्षर दालन, कोल्हापूर.
* श्री. राजेश दुबे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
* श्री. महेश मोधे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
* सौ. यशवंती अरूण शिंदे, कोल्हापूर.
* सौ. शुभांगी मोहन भगत, विश्ववेद ग्राफिक्स, कोल्हापूर.

OOO

## परिशिष्ट - २

## परिचय

# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

(२७ जानेवारी, १९०१ - २७ मे, १९९४)

महाराष्ट्रातील एक थोर विचारवंत, संस्कृत पंडित व मराठी विश्वकोशाचे प्रमुख संपादक, धुळे जिल्ह्यातील पिंपळनेर येथे जन्म. वडिलांचे नाव बाळाजी आणि आईचे चंद्रभागा. त्यांचे वडीलबंधू वेणीमाधव आयुर्वेदाचार्य म्हणून प्रसिद्धीस आले. लक्ष्मणशास्त्री वयाच्या चौदाव्या वर्षी वाईच्या प्राज्ञ पाठशाळेत दाखल झाले. तेथे केवलानंद सरस्वती यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी न्याय वेदांतादी प्राचीन शास्त्रांचे अध्ययन केले. १९२३ मध्ये कलकत्त्याच्या शासकीय संस्कृत महाविद्यालयातून 'तर्कतीर्थ' ही पदवी त्यांनी संपादन केली. इंग्लिश भाषा व आधुनिक पश्चिमी ज्ञानविज्ञाने यांचा स्वप्रयत्नाने त्यांनी सखोल व्यासंग केला. १९२७ मध्ये मुल्हेरच्या (नाशिक जिल्हा) पंडित घराण्यातील सत्यवती यांच्याशी त्यांचा विवाह झाला. त्यांना दोन मुले व दोन मुली असून, त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव मधुकर हे अमेरिकेत गणकयंत्रनिर्मिती करणाऱ्या 'इंटरनॅशनल बिझनेस मशिन्स' या उद्योग संस्थेत संशोधन व्यवस्थापक या पदावर होते. वाई येथेच राहून शास्त्रीजींनी प्राज्ञ पाठशाळेचे व मराठी विश्वकोशाचे कार्य आणि आपला व्यासंग अखंडपणे चालू ठेवला होता.

प्राज्ञ पाठशाळेचे वातावरण सनातनी पढीक पांडित्याचे नव्हते; ते पुरोगामी/चिकित्सेचे व राष्ट्रीय स्वरूपाचे होते. परिणामतः राष्ट्रीय व सामाजिक आंदोलनांत भाग घेण्याची प्रेरणा या वातावरणातून शास्त्रीजींना लाभली. म. गांधींच्या अस्पृश्यता निवारण कार्यास शास्त्रीजींनी हिंदू धर्मशास्त्राचे पूरक भाष्य तयार करून दिले. १९३० ते १९३२ साली कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतल्याने त्यांना प्रत्येक वेळी ६-६ महिन्यांचा कारावासही तीनदा भोगावा लागला. १९३६ नंतर मानवेंद्रनाथ रॉय यांच्या रॅडिकल डेमॉक्रॅटिक पार्टीचे ते क्रियाशील सदस्य झाले. १९४८ मध्ये हा पक्ष विसर्जित होईपर्यंत ते त्याचे सदस्य होते. १९४० पर्यंत व पुन्हा स्वातंत्र्योत्तर काळात काँग्रेस पक्षाशी ते एक विचारवंत भाष्यकर म्हणून निगडित होते.

तर्कतीर्थांच्या नेतृत्वाने प्राज्ञ पाठशाळेला एका व्यापक सांस्कृतिक कार्यकेंद्राचे स्वरूप लाभले. वाईमध्ये हरिजन विद्यार्थ्यांचे वसतिगृह, हातबनावटीचा कागद कारखाना, अद्ययावत मुद्रणालय इ. उपक्रम त्यांनी यशस्वीपणे अमलात आणले. वाईच्या महाविद्यालयाचेही ते संस्थापक सदस्य होते. प्राज्ञ पाठशाळेतर्फे धर्मकोशाच्या संपादनाचे मौलिक कार्य त्यांनी हाती घेतले. या कोशाचे २५ खंड प्रसिद्ध झाले असून, त्यांत कुटुंबसंस्था, हिंदू संस्कार, जाती, विवाह, मालमत्ता त्याचप्रमाणे हिंदू धर्मविधी, नीतिशास्त्र व तत्त्वज्ञान इ. विषयांसंबंधी प्राचीन शास्त्रांतील ग्रांथिक माहिती व्यवस्थितपणे संकलित केलेली आहे. पहिल्या १९ खंडांचे संपादन तर्कतीर्थांनी केले आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे सुरुवातीपासून म्हणजे १९६० पासून ते १९८० पर्यंत शास्त्रीजी अध्यक्ष होते. मंडळातर्फे भाषा-साहित्यविषयक अनेक योजना कार्यान्वित झालेल्या आहेत. त्यांपैकी प्रमुख प्रकल्प वीस खंडीय मराठी विश्वकोशाचा आहे. प्राचीन-अर्वाचीन सर्व ज्ञानविज्ञाने मराठीतून विशद करण्याचे हे मौलिक कार्य शास्त्रीजींच्या मार्गदर्शनाखाली चालू होते.

शास्त्रीजींनी व्याख्याने, परिषदा इ. निमित्ताने भारतभर प्रवास केला. अमेरिका, ब्रह्मदेश, रशिया तसेच युरोपीय, आशियाई आणि आफ्रिकी देशांनाही त्यांनी भारताच्या प्रतिनिधी मंडळाचे सदस्य म्हणून किंवा स्वतंत्रपणे निमंत्रित म्हणूनही भेटी दिल्या आहेत (१९५१). कुकुरमुंडे येथील सनातन धर्मपरिषद (१९२५) व वाराणसीचे अखिल भारतीय संस्कृत पंडितांचे संमेलन (१९२९) यांत भाग घेऊन शास्त्रीजींनी धर्मसुधारणेचे सभाष्य समर्थन केले. भारतीय संविधान संहितेचे संस्कृत भाषांतरही त्यांनी केले. हिंदी राष्ट्रभाषेच्या प्रचारकार्याशीही त्यांचा जवळचा संबंध आहे. दिल्ली येथील मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते (१९५४). याखेरीज अनेक विभागीय व प्रादेशिक मराठी साहित्य संमेलनांची अध्यक्षपदेही त्यांनी भूषविली.

शास्त्रीजींची संपदा मोजकी; पण मौलिक आहे. शुद्धिसर्वस्त्रम् (१९३४), आनंदमीमांसा (१९३८), हिंदू धर्माची समीक्षा (नागपूर विद्यापीठात रा. ब. परांजपे व्याख्यानमालेत दिलेली तीन व्याख्याने १९४१), जडवाद (१९४१), ज्योतिनिबंध (म. फुल्यांचे चरित्र आणि कार्य १९४७), वैदिक संस्कृतीचा विकास (१९५१, द्वितीय आवृत्ती १९७४), आधुनिक मराठी साहित्याची समीक्षा व रससिद्धांत (१९७३) हे त्यांचे ग्रंथ मान्यता पावले आहेत. राजवाडे लेखसंग्रह (१९६४) आणि लो. टिळक लेखसंग्रह (१९६९) हे त्यांनी संपादिले आहेत. हिंदू धर्माची समीक्षा ऐतिहासिक व समाजशास्त्रीय पद्धतीने त्यांनी केली आहे. 'धर्मसमीक्षा हीच सर्व प्रकारच्या समीक्षेची जननी आहे', या कार्ल मार्क्सच्या तत्त्वाचा पुरस्कार त्यांनी या ग्रंथात केला आहे. आधुनिक काळात सामाजिक प्रगतीच्या दृष्टीने पारंपरिक धर्ममूल्ये कितपत उपयुक्त आहेत, याची मूलगामी चिकित्सा या ग्रंथात केलेली आढळते. या

प्रबंधाचे इंग्रजी भाषांतर गोवर्धन पारीख यांनी 'ए क्रिटिक ऑफ हिंदुइझम' या नावाने प्रसिद्ध केले आहे (१९४८). 'वैदिक संस्कृतीचा विकास' हा एक प्रचंड प्रबंध आहे. मुळात पुणे विद्यापीठात श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे, इचलकरंजी-व्याख्यानमालेत दिलेली ही सहा व्याख्याने होत (१९४९). त्यांत वेदकालीन संस्कृती, इतिहास, पुराणे व रामायणाची संस्कृती, बौद्ध आणि जैन धर्माचे कार्य आणि आधुनिक भारतातील सांस्कृतिक आंदोलन या विषयांचा सखोल आणि ऐतिहासिक दृष्टीने घेतलेला परामर्श आहे. भारतातील वैदिक संस्कृती ही परिवर्तनक्षम आहे. आधुनिक विज्ञानदृष्टी व मानवतावाद यांच्या निकोप संवर्धनाचे तिच्यात आंतरिक सामर्थ्य आहे व म्हणून आधुनिक क्रांतियुग आणि वैदिक संस्कृतीतील मूलभूत अध्यात्मयोग यांची सांगड घातली पाहिजे, हा या ग्रंथाचा निष्कर्ष आहे. सर्वोत्कृष्ट भारतीय ग्रंथांना साहित्य अकादमी १९५५ पासून पुरस्कार देते, असा पुरस्कार लाभलेला हा पहिला मराठी ग्रंथ.

इतिहासाचार्य राजवाडे आणि लो. टिळक यांचे नमुनेदार लेखसंग्रह संपादित करून शास्त्रीजींनी त्यांना अभ्यासपूर्ण व अत्यंत विचारप्रवर्तक प्रस्तावना लिहिल्या आहेत. आधुनिक मराठी साहित्य व त्याची समीक्षा, संस्कृतातील रससिद्धांत, मराठी संतांचे कार्य यासंबंधीही त्यांनी अनेक लेखांतून नवा दृष्टिकोन मांडलेला आहे. रा. ग. जाधव यांनी शास्त्रीजींच्या निवडक लेखांचा संग्रह 'विचारशिल्प' या नावाने संपादित केला आहे (१९७५). गांधीयुगातील एक नमुनेदार कर्मयोगी विचारवंत या नात्याने त्यांच्या विचारकार्याची मीमांसा संपादकाने या लेखसंग्रहाच्या प्रस्तावनेत केली आहे.

महाराष्ट्रात बुद्धिवादी विचारवंतांची एक थोर परंपरा आहे. बाळशास्त्री म. जांभेकर, लोकहितवादी, फुले, न्या. रानडे, गो. ग. आगरकर, लो. टिळक, वि. दा. सावरकर, महर्षी शिंदे इ. विचारवंतांच्या परंपरेतच शास्त्रीजींचे कार्य मोडते. प्राचीन आचार्यपरंपरेची निःस्वार्थ लोकशिक्षणाची निष्ठा, तर्कशुद्ध दृष्टिकोन, पूर्व-पश्चिमी ज्ञान-विज्ञानांचा प्रचंड व्यासंग, स्पष्ट आणि निःस्पृह विचारप्रतिपादन व सामाजिक आणि राष्ट्रीय उद्धाराची कळकळ हे या परंपरेचे विशेष होत.

छोट्या शाळा-मंडळांपासून राष्ट्रीय संस्था-संघटनांपर्यंत सर्व प्रकारच्या व्यासपीठांवर दिलेली विचारप्रवर्तक भाषणे हा शास्त्रीजींच्या सामाजिक सेवाव्रताचाच एक अविभाज्य भाग होय. अशी कितीतरी मौलिक विचारांची भाषणे ग्रंथरूपात संग्रहित झालेली नव्हती. उदा. पुण्याच्या गोखले अर्थशास्त्र संस्थेत १९५३ साली भारतीय राष्ट्रीयत्वावर दिलेले भाषण किंवा पॅरिसच्या आंतरराष्ट्रीय प्राच्यविद्या परिषदेत १९७३ साली वाचलेला 'द कॉस्मिक स्टेट अँड कलेक्टिव्ह किंगशिप ऑफ वेदिक गॉड्स' हा शोधनिबंध. शास्त्रीजींनी शेकडो व्याख्यानांच्या रूपाने व लेखनद्वारा केलेले विचारकार्य प्रकाशात आल्यास हा महाराष्ट्राचा एक बहुमोल असा ठेवा मानला जाईल. १९७५ साली त्यांनी पंचाहत्तराव्या वर्षात पदार्पण

केले. त्यानिमित्त स्थापन झालेल्या अमृत महोत्सव समितीने त्यांच्या समग्र लेखनाचे खंड प्रसिद्ध करण्याची योजना आखली होती. पैकी एक लेखसंग्रह प्रकाशित झाला आहे. याच वर्षी मुंबई विद्यापीठाने एल.एल. डी. ही सन्माननीय पदवी देऊन त्यांच्या विद्वत्तेचा यथोचित गौरव केला. 'संस्कृत पंडित' म्हणून १९७३ मध्ये, 'पद्मभूषण' म्हणून १९७६ मध्ये, तर 'पद्मविभूषण' म्हणून १९९२ मध्ये भारत सरकारने त्यांना गौरविले. त्यांचा मृत्यू २७ मे १९९४ रोजी महाबळेश्वर येथे झाला. त्यांची अनेक चरित्रे व ग्रंथांची भाषांतरे उपलब्ध आहेत. तसेच त्यांच्या पश्चात त्यांची काही भाषणे संपादित करून प्रकाशित झाली आहेत.

**(मराठी विश्वकोश खंड ६, पृ. ६०७, ६०८)**

**(टीप : वरील परिचय अद्यतन करून सुधारित संदर्भ म्हणून इथे देण्यात आला आहे.)**

OOO

## परिशिष्ट - ३

# तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : साहित्य संपदा व संदर्भ ग्रंथ सूची

**१. आनंदमीमांसा**

मराठी प्रबंध
प्रकाशक - प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई/ पुस्तकमाला, पुष्प ६ वे,
मुद्रक - आर्य संस्कृती मुद्रणालय, चिमणबाग, टिळक रस्ता, पुणे.
प्रथमावृत्ती - १९२८ (शके १८५०)
मूल्य - ६ आणे / पृष्ठे - ७०

**२. शुद्धिसर्वस्वम्**

संस्कृत प्रबंध
प्रकाशक - लक्ष्मणशास्त्री जोशी, वाई.
मुद्रक - आर्य संस्कृती मुद्रणालय, चिमणबाग, टिळक रस्ता, पुणे.
प्रथमावृत्ती - १९२८ (शके १८५०), मूल्य ८ आणे / पृष्ठे - ३७

**३. भारतीयधर्मेतिहासतत्त्वम्**

संस्कृत निबंध
प्रकाशक- लक्ष्मणशास्त्री जोशी, वाई.
मुद्रक - कर्नाटक प्रेस, ३/८, ए, ठाकूरद्वार, मुंबई.
प्रथमावृत्ती - १९३३ / पृष्ठे - १६

**४. जडवाद अर्थात् अनीश्वरवाद**

मराठी प्रबंध
प्रकाशक - य. गो. जोशी प्रकाशन, ६२३ / १५, सदाशिव पेठ, पुणे.
वादविवेचन माला, संपादक, श्री. पां. वा. गाडगीळ.
मुद्रक - दी प्राज्ञ प्रेस, ३१५, गंगापुरी, वाई (जि. सातारा.)
प्रथमावृत्ती - २० ऑक्टोबर १९४१ / किं. सव्वा रुपया / पृष्ठे - १०३

**५. हिंदुधर्माची समीक्षा**

भाषणसंग्रह

श्री. श्रीधर गणेश परांजपे स्मारक व्याख्यानमाला, नागपूर विद्यापीठ,

नागपूर (१९४०), प्रकाशन प्रथम आवृत्ती, ऑक्टोबर १९४९

प्रकाशक - प्राज्ञशाळा मंडळ, वाई

द्वितीय आवृत्ती, १ मे १९४२ / मूल्य २ रुपये / पृष्ठे १४०

**६. ज्योति - निबंध**

भाषण / प्रस्तावना रा. ना. चव्हाण

मुद्रक व प्रकाशक - प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई

प्रथमावृत्ती - १९४७, मूल्य १२ आणे, पृष्ठे- ३५

**७. वैदिक संस्कृतीचा विकास**

भाषणसंग्रह

श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे, इचलकरंजी व्याख्यानमाला (१९४९)

पुणे विद्यापीठ, पुणे

प्राज्ञपाठशाळा मंडळ ग्रंथमाला

प्रकाशक - प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई

मुद्रक - दी प्राज्ञ प्रेस, ३१५, गंगापुरी, वाई, जि. सातारा.

प्रथमावृत्ती - आश्विन शुद्ध, शके १८७३ (१९५१), मूल्य- ६ रुपये/ पृष्ठे- २८६

**८. भारतस्य संविधानम्**

भारतीय राज्यघटना (१९५२)- संस्कृत भाषांतर

प्रकाशक - प्रकाशन विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली

मुद्रक - दी प्राज्ञ प्रेस, वाई

प्रथमावृत्ती १९५२ / मूल्य २ रुपये किंवा ३ शिलिंग. पृष्ठे - २९५

**९. राजवाडे लेखसंग्रह**

लेखसंग्रह

प्रकाशक - साहित्य अकादेमीतर्फे पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

मुद्रक - संगम प्रेस प्रा. लि., ३८३, नारायण पेठ, पुणे - २

प्रथमावृत्ती - १९५८ /मूल्य १२ रुपये / पृष्ठे - २९४

**१०. लोकमान्य टिळक लेखसंग्रह**

लेखसंग्रह

प्रकाशक - साहित्य अकादमी, नवी दिल्ली

मुद्रक - दी प्राज्ञ प्रेस, वाई

प्रथमावृत्ती - १ ऑगस्ट, १९६९ / मूल्य - १२ रुपये / पृष्ठे - ४५९.

**११. Descriptive Catalogue of Sanskrit Manuscripts.**

(Prajna Pathashala Mandal Collection) - (Part 1)
Catalogue of Sanskrit Manuscripts.
Edited by-Laxmanshastri Joshi
Printed at - The Prajna Press, 31s, Gangapuri, Wai.
First Edition - 1st June 1970, Pages-717/Price-50/-

**१२. Descriptive Catalogue of Sanskrit, Manuscripts - (Part II)**

(Prajna Pathashala Mandal Collection)-(Part I)
Catalogue of Sanskrit Manuscripts.
Edited by-Laxmanshastri Joshi
Printed at The Prajna Press, 31s, Gangapuri, Wai.
First Edition-1st June 1970, Pages-720-1361/Price-50/-

**१३. आधुनिक मराठी साहित्याची समीक्षा आणि रससिद्धांत**

भाषणसंग्रह
व्हीनस प्रकाशन, रौप्यमहोत्सव व्याख्यानमाला पुष्प ८ वे, १९७२
प्रकाशन - व्हीनस प्रकाशन, 'तपश्चर्या', ३८१ क, शनिवार पेठ, पुणे ३०
मुद्रक - किर्लोस्कर प्रेस, वीर सावरकरनगर, पुणे- ९
पहिली आवृत्ती - सप्टेंबर १९७२ / मूल्य - ६ रुपये / पृष्ठे - ११८.

**१४. सर्वधर्मसमीक्षा**

भाषणसंग्रह
सेनापती बापट व्याख्यानमाला, मुंबई विद्यापीठ, मुंबई - (१९७६-७७)
प्रकाशक - प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई
मुद्रक - गजानन प्रिंटिंग सर्व्हिसेस, कसबा पेठ, पुणे - १
प्रथमावृत्ती - १९८४ / रु.९५ /-/ पृष्ठे - ८८

**१५. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लेखसंग्रह (खंड - १ )**

लेखसंग्रह (संकीर्ण)
प्रकाशक श्रीविद्या प्रकाशन, २५०, शनिवार पेठ, पुणे ३
मुद्रक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस,
४२. जी. डी. आंबेकर मार्ग, मुंबई - ३१
प्रथमावृत्ती - २० ऑगस्ट १९८२ / मूल्य-५५५/-/ पृष्ठे - ५९०

**१६. शिखांचा पंथ व इतिहास**

भाषणसंग्रह

कै. सदाशिव बागाईतकर स्मृतिमाला, १९८४

प्रकाशक - गोपाळ मोकाशी, १७६, सदाशिव पेठ, पुणे- ३०

मुद्रक - दी प्राज्ञ प्रेस, ३१५, गंगापुरी, वाई, जि. सातारा.

प्रथमावृत्ती - ५ डिसेंबर १९८४ / किंमत - ७ रुपये / पृष्ठे - ६०.

**१७. ज्योतिचरित्र**

चरित्र

प्रकाशक - नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, ए-५, ग्रीन पार्क, नवी दिल्ली - १

मुद्रक -

प्रथमावृत्ती - शके १९१४ (१९९२)/ किं. ३० रु./ पृष्ठे १०७

## तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी संपादन कार्य

**१८. धर्मकोश (खंड १ ते ५) (१९३७ ते १९८८)**

व्यवहारकाण्डम् (भाग १ ते ३)

उपनिषदकाण्डम् (भाग १ ते ४ )

संस्कारकाण्डम् (भाग १ ते ६ )

राजनीतिकाण्डम (भाग १ ते ६)

वर्णाश्रमधर्मकाण्डम् (भाग - १)

**१९. मराठी विश्वकोश (खंड १ ते १५) (१९६५ ते १९९४)**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई (१९६५- १९८०)

महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई (१९८०-१९९४)

**२०. श्री स्वामी केवलानंद अभिनंदन ग्रंथ (१९५२) (अमृत महोत्सव )**

प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई (श्री गुरू स्वामी केवलानंद सत्कार समिती)

प्रकाशन - मार्गशीर्ष शुद्ध ४, शके - १८७४ / पृष्ठे - २७२

**२१. श्री ब्रह्मीभूत केवलानंद सरस्वती स्मारक मंदिर समारोह पुण्यस्मरण पुस्तिका**

प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई

प्रकाशन - १३ डिसेंबर, १९६० / मूल्य १ रु. / पृष्ठे - २५

**२२. श्री. यशवंतराव चव्हाण अभिनंदन ग्रंथ**

प्रकाशक - श्री यशवंतराव चव्हाण जन्मदिन सत्कार समिती महाल, नागपूर

(अठ्ठेचाळिसावा जन्मदिन सोहळा सत्कार समारंभ ग्रंथ)

मुद्रक - मौज प्रिंटिंग ब्युरो, खटाववाडी, मुंबई - ४

प्रकाशन - २१ फाल्गुन, १८८२/१२ मार्च १९६१ / पृष्ठे - १००.

**२३. मराठी विश्वकोश: परिचय ग्रंथ**

प्रकाशक - महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

मुद्रक - मौज प्रकाशन ब्युरो, खटाववाडी, मुंबई - ४

प्रकाशन - २ एप्रिल १९६५ (गुढीपाडवा) / पृष्ठे - १२१

**२४. मराठी कुमार विश्वकोश : परिचय ग्रंथ**

प्रकाशक - महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई,

मुद्रक - शासकीय फोटो झिंको मुद्रणालय, पुणे - १

प्रथमावृत्ती २००३ / मूल्य - रु. १५०/-/ पृष्ठे - २५८

## तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या साहित्याची भाषांतरे

**25. A critique of Hinduism**

By Tarkteerth Laxmanshastri Joshi

Translated by - G. D. Parikh

Publisher - Modern Age Publication, Navasari Chembers,

Outram Road, Fort, Bombay-1

Printer - N. E. Chinwalla, Manager,

British India Press, Mazagaon, Bombay

First Edition - Market, 1948 / Price. Rs.5 /-/ Pages 131

**26. हिंदू धर्म की समीक्षा**

मूल लेखक- तर्कतीर्थ पं. लक्ष्मणशास्त्री जोशी

अनुवादकर्ता - नथुराम प्रेमी

प्रकाशक - नथुराम प्रेमी, हेमचंद्र मोदी पुस्तकालय,

हिराबाग, गिरगांव, बम्बई -4

पहली बार - दिसंबर 1948/ पृष्ठ संख्या - 172

**27. जडवाद और अनीश्वरवाद**

मूल लेखक - तर्कतीर्थ पं. लक्ष्मणशास्त्री जोशी

अनुवादकर्ता - सत्यदेव विद्यालंकार

प्रकाशक - नथुराम प्रेमी, हेमचंद्र मोदी पुस्तकालय, हिराबाग, गिरगांव, बम्बई - 4

मुद्रक - न्यू भारत प्रिंटिंग प्रेस, 6, केलेवाडी, बम्बई - 4

पहली बार - मार्च 1950 / पृष्ठ संख्या - 112

**28. वैदिक संस्कृति का विकास**

मूल लेखक - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

अनुवादकर्ता - मोरेश्वर दिनकर पराडकर

प्रकाशक - साहित्य अकादमी, नई दिल्ली- 110001

प्रथम संस्करण 1957 / पृष्ठ संख्या 360.

मूल्य 200 रु.

**29. राजवाडे लेखसंग्रह**

मूल संपादक - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

अनुवादक - वसंत देव

प्रकाशक- साहित्य अकादमी की ओर से शिवलाल अग्रवाल एण्ड कंपनी (प्रा.) लि., आगरा

मुद्रक युनिवर्सल आर्ट प्रेस, आगरा

प्रथम संस्करण 1964 / मूल्य 12 रु.50 पै./ पृष्ठ संख्या 224.

**30. Jotirao Phule**

Tarkteerth Laxmanshastri Joshi

Translator - Daya Agrawal

Publisher - National Book Trust, India

First Edition 1996/Price - Rs. 75/-/ Pages-94

**31. Critique of Hinduism And Other Religions**

Tarkteerth Laxmanshastri Joshi.

Translated by Suman Oak.

Publisher - Popular Prakashan, 35, C,

Pandit Madan Mohan Malviya Marg, Popular Press Building,

Tardeo, Bombay - 400034

First Published - 1996/pages - 205

**32. Development of Indian Culture: Vedas to Gandhi**

Tarkteerth Laxmanshatri Joshi

Translated by - S. R. Nene

Published by Lok Vangmay Griha, Bupesh Gupta Bhuwan,

85, Sayani Road, Prabhadevi, Mumbai 400025

Printed by - New Age Printing Press, Mumbai-2

First Edition - 2001/ Price - 200 Rs. /- Pages - 555

**33. Spiritual Materialism**

Tarkteerth Laxmanshastri Joshi

Translated by - Arundhati Khandkar

Publisher-Lokvangmay Griha, Mumbai - 2

Printer - New Age Printing Press, Mumbai

First Edition - November 2004/ Price - 250 Rs. /Pages-171

**34. वैदिक संस्कृतेः विकासः**

मूल लेखक - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

संस्कृतानुवाद - मंजूषा कुलकर्णी

प्रकाशक - साहित्य अकादमी, नई दिल्ली- 110001

प्रथम संस्करण - 2024

*** तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या साहित्याचे संपादित ग्रंथ**

**३५. विचारशिल्प**

निबंधसंग्रह/संपादक- प्रा. रा. ग. जाधव

प्रकाशक- काँटिनेंटल प्रकाशन, विजयानगर, पुणे- ३

मुद्रक - महाराष्ट्र मुद्रणशाळा छापखाना, १७८६, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

प्रथमावृत्ती - १९७५ / किंमत - ५० रु. / पृष्ठे - १४८

**३६. आद्य शंकराचार्य - जीवन आणि विचार**

भाषणसंग्रह / संपादक - डॉ. अरुंधती खंडकर

प्रकाशक - श्रीविद्या प्रकाशन, २५०, शनिवार पेठ, पुणे

मुद्रक - इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२,

जी. डी. आंबेडकर मार्ग, - मुंबई - ३१

प्रथमावृत्ती - २७ मे १९९७ / किं. ८० रु. / पृष्ठे- ९५

**३७. साहित्याचे तर्कशास्त्र**

साहित्यिक भाषणांचा संग्रह

संपादक - सीताराम रायकर, द. दि. पुंडे, पंडित टापरे.

प्रकाशन - प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई.

प्रथमावृत्ती - २०१२ / मूल्य ७५० रु./ पृष्ठे - ४३७

## संदर्भ सूची

**१. श्री सोमनाथ तीर्थ**

लेखक - त्र्यंबक रघुनाथ (गौतमबुवा) पाठक

प्रकाशक - श्री यशवंतराव महाराज मंदिर, पिंपळनेर (धुळे)

मुद्रक - श्री गजानन छापखाना, कराड, उत्तर सातारा

प्रथमावृत्ती - जुलै १९५९ / किंमत ५ रु. / पृष्ठे - १७२

**२. नवभारत मासिक / तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी विशेषांक**

फेब्रुवारी-मार्च १९८१

प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई / किं. ५.रु./ पृष्ठे- ९५

**३. प्रज्ञांजली (तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी गौरव ग्रंथ)**

प्रकाशक - श्रीविद्या प्रकाशन, २५०, शनिवार पेठ, पुणे - ३

मुद्रक कल्पना मुद्रणालय, शिव-पार्वती, टिळक रोड, पुणे

प्रथमावृत्ती - २० जानेवारी १९८५ / किं. १२५ रु. / पृष्ठे - ३४७

**४. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (चरित्र)**

लेखिका - सौ. मालती देशपांडे

प्रकाशक - प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई

मुद्रक - दी प्राज्ञ प्रेस, वाई

प्रथमावृत्ती - जानेवारी १९९२ / किं. ५० रु./ पृष्ठे- ७५

**५. प्रज्ञानंद: अमृत महोत्सव स्मरणिका**

संपादक मंडळ - वसंतराव बोराटे (निमंत्रक) व अन्य

प्रकाशक - प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई

मुद्रक - दी प्राज्ञ प्रेस, वाई

प्रकाशन - २५ जानेवारी १९९४ / पृष्ठे ९८

**६. शास्त्रीजी (चरित्र)**

लेखक- रा. ग. जाधव

प्रकाशक- प्रतिमा प्रकाशन, १३५९, सदाशिव पेठ, पुणे

मुद्रक - सुहास मुद्रणालय, २२, बुधवार पेठ, पुणे - २

प्रथमावृत्ती २४ ऑगस्ट १९९४ / किं. ७०रु. / पृष्ठे - १५६

**७. तर्कतीर्थ: एक प्रज्ञाप्रवाह (चरित्र)**

लेखिका - अरुंधती खंडकर

प्रकाशक - श्रीविद्या प्रकाशन, २५०, शनिवार पेठ, पुणे

मुद्रक - इंडिया प्रिंटिंग वर्क्स, आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई

प्रथमावृत्ती - २७ मार्च १९९५ / किंमत २७०रु. / पृष्ठे २६०

**८. तर्कतीर्थायन (गीत चरित्र)**

कवी - गोविंद नरहर कुलकर्णी
प्रकाशक- गो. न. कुलकर्णी, 'दवबिंदू', वाई
मुद्रक - प्रतिमा प्रिंटर्स, १९१० रविवार पेठ, वाई
प्रकाशन - १ एप्रिल १९९५ / पृष्ठे - ५०

**९. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : व्यक्तित्व, कार्य आणि विचार**

संपादन- वसंत पळशीकर
प्रकाशन - प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई
मुद्रण - मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे- ४११०३०.
प्रथमावृत्ती - फेब्रुवारी १९९६, किं. २००/- पृष्ठे -१६४

**१०. प्राज्ञपाठशाळा व तिची परंपरा**

संपादक - लक्ष्मणशास्त्री जोशी, के. ल. दप्तरी, मे. पुं. रेगे
प्रकाशक - प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई
मुद्रक - मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे- ४११०३०
प्रथमावृत्ती - ऑगस्ट, १९९६ / किं. २५ रु. / पृष्ठे- २३८

**११. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या बृहत् चरित्राची साधने**

लेखक - अशोक भट
प्रकाशक - लोकमान्य टिळक स्मारक संस्था, मधली आळी,
मुद्रक - विजय मुद्रणालय, धर्मपुरी, वाई
प्रकाशन - १३ ऑक्टोबर १९९९ / विनामूल्य / पृष्ठे - ४२

**१२. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी जन्मशताब्दी विशेषांक**

कार्यकारी संपादक- यशवंत कळमकर
प्रकाशक - प्राज्ञपाठशाळा मंडळ, ३१५, गंगापुरी, वाई
मुद्रक - मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे- ४११०३०
प्रथमावृत्ती- २७ जानेवारी २००१ / मूल्य २०० रु. / पृष्ठे - ८४

**१३.संवाद तर्कतीर्थांशी (मुलाखत संग्रह)**

लेखक - अनिल जोशी
प्रकाशक - श्री यशोदा प्रकाशन, कृष्णा, पत्रकारनगर, पुणे
मुद्रक - मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे- ४११०३०
प्रथमावृत्ती २६ मे २००१ / किं. १५० रु./ पृष्ठे १५८

**१४.महाराष्ट्राचे शिल्पकार तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (चरित्र)**

लेखिका - डॉ. अरुंधती खंडकर,

प्रकाशक - महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

मुद्रक - स्नेहेश प्रिंटर्स, धनराज मिल आवार, लोअर परळ, मुंबई

प्रथमावृत्ती एप्रिल २००३ / किं. ४० रु. / पृष्ठे - ८४

**१५. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी परंपरा, प्रबोधन व परिवर्तन**

रा. ना. चव्हाण / संपादन - रमेश चव्हाण

प्रकाशक - रमेश चव्हाण, ७ अ / ६, पश्चिमा नगरी, कोथरूड, पुणे

मुद्रक - एस. जयकुमार ऑफसेट प्रा. लि., संगम प्रेस समोर, कोथरूड, पुणे

प्रथमावृत्ती - जुलै, २०१० / किं. २५० रु. / पृष्ठे - २६४

**१६. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी (चरित्र) (महाराष्ट्र चरित्र - ग्रंथमाला)**

अरुंधती खंडकर

प्रकाशक- श्री. गंधर्व वेद प्रकाशन, १२८६, सदाशिव पेठ, पुणे

मुद्रक एक्सेल प्रिंटिंग अँड पॅकेजिंग, १३१/५, एरंडवणे, पुणे

प्रथमावृत्ती - नोव्हेंबर २०१० / किं.- १८० रु. / पृष्ठे- १७८

**१७. प्राज्ञप्रबोध ( प्राज्ञपाठशाळा मंडळ शताब्दी ग्रंथ)**

संपादक - श्री. मा. भावे

प्रकाशक - प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई

मुद्रक - सन प्रिंटर्स, गणपती आळी, वाई

प्रथमावृत्ती - डिसेंबर २०१६ / किं. २५०रु. / पृष्ठे- २४७

**१८. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी: आठवणी आणि विचार**

लेखक - अनिल जोशी

प्रकाशक - श्री यशोदा प्रकाशन, 'कृष्णा', पत्रकारनगर, पुणे- ४११०१

मुद्रक - के. सागर ग्राफिक्स अँड प्रिंटर्स, वाई

प्रथमावृत्ती - ९ मार्च २०१९ / किं. २०० रु. / पृष्ठे- १७१

**१९. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या विचारांचा तात्त्विक अभ्यास**

संशोधिका - स्वाती बापूराव भोंगळे / मार्गदर्शक - डॉ. सदानंद मोरे

संशोधन प्रबंध, तत्त्वज्ञान विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

जुलै २०१९, पृष्ठे - ३१७

**२०. Swimming Upstream (Biography)**

Author - Arundhati C. Khandkar/Ashok C. Khandkar

Publisher - Oxford University Press, India.

Printer - Nutech Print Services, New Delhi

First Edition -2019/Price-Rs.-1,195/-/Pages - 193

ooo

**परिशिष्ट -४**

## संपादक परिचय

# डॉ. सुनीलकुमार लवटे

जन्म ११ एप्रिल, १९५० ला वा. बा. नवरंगे बालकाश्रम, पंढरपूर येथे बालपण व इयत्ता ३री पर्यंतचं प्राथमिक शिक्षण तेथेच. नंतर चौथी ते पदवी शिक्षण डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन बालगृह (रिमांड होम), कोल्हापूरमधून. सन १९६७ ला शालान्त परीक्षा उत्तीर्ण. उच्चशिक्षणार्थ श्री मौनी विद्यापीठ, गारगोटीच्या 'कर्मवीर हिरे ग्रामभारती'मध्ये प्रवेश. तिथे सन १९६७ ते १९७१ या काळात 'डिप्लोमा इन रूरल सर्व्हिसेस' (एज्युकेशन) ही बी.ए., बी.एड. समकक्ष पदविका प्रथम श्रेणीत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होऊन भारतीय ग्रामभारतीत सर्वप्रथम. त्याप्रीत्यर्थ भारत सरकारचा 'रोल ऑफ ऑनर', 'बेस्ट सोशल वर्कर', 'सर्टिफिकेट ऑफ मेरिट' संपादनाची 'हॅट्-ट्रिक'.

पदवी संपादनानंतर 'आंतरभारती शिक्षण मंडळ'च्या विविध शाळांमधून विविध विषयांचे सन १९७१ ते १९७९ या काळात अध्यापन. समांतरपणे शिक्षण संघटना कार्य. एम.ए., पीएच.डी. (हिंदी) शिक्षणाची पूर्तता. सन १९७९ ते २०१० या काळात हिंदी अधिव्याख्याता व सन २००५ ते २०१० या काळात प्राचार्य म्हणून महावीर महाविद्यालय, कोल्हापूर येथे अध्यापन, संशोधन, प्रशासन, मार्गदर्शन कार्य. सन १९८० ते २०१० या काळात समांतरपणे शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या हिंदी अधिविभागात एम.ए. एम.फिल., पीएच.डी. स्तरावर अध्यापन, संशोधन व मार्गदर्शन कार्य.

सन १९८० पासून आजतागायत अनाथ, निराधार, बालगुन्हेगार, बंदी बांधव, वेश्या, कुमारी माता, परित्यक्ता, वृद्ध इ. च्या संगोपन, संरक्षण, शिक्षण, सुसंस्कार, पुनर्वसन कार्याशी निगडित वंचित विकास कार्यास समर्पित. अशा संस्थांचं राज्यशासननियुक्त अध्यक्षपद कार्य, 'समाज-सेवा' त्रैमासिक संपादन. या संबंधीच्या राज्यस्तरीय, राष्ट्रीय वंचित विकास, मानवाधिकार कार्य संदर्भातील राज्यस्तरीय, राष्ट्रीय धोरण निर्धारण व योजना विकास कार्य याचाच भाग म्हणून भारतीय शिष्टमंडळातून युरोप, आशिया, आफ्रिका खंडांतील १६ देशांचे अभ्यास दौरे (१९९० ते २०११).

महाविद्यालयीन जीवनापासून लेखन, वाचनात रुची. मराठी-हिंदीत समांतर लेखन, भाषांतर, समीक्षा, संशोधन, संपादन कार्य. आजवर शंभराहून अधिक ग्रंथ प्रकाशित. ग्रंथांना आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्यस्तरीय शासन व अन्य संस्थांचे पुरस्कार. त्यात उत्तर प्रदेश सरकारच्या हिंदी संस्थान, लखनऊचा 'सौहार्द सन्मान' (रुपये दोन लक्ष, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह), महाराष्ट्र सरकारच्या राज्य हिंदी अकादमीचा 'जीवन गौरव महाराष्ट्र भारती सन्मान' (रुपये एक लक्ष, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह), राष्ट्रभाषा प्रचार प्रसार कार्याचा 'अनंत गोपाळ शेवडे पुरस्कार', (रु. पन्नास हजार, सन्मानपत्र); 'खाली जमीन, वर आकाश' आत्मकथेस महाराष्ट्र फाउंडेशन, अमेरिकेचा 'अपारंपरिक ग्रंथ पुरस्कार', महाराष्ट्र शासनाचा 'लक्ष्मीबाई टिळक पुरस्कार.' या आत्मकथेचे विविध आकाशवाणी केंद्रांवरून अभिवाचन प्रक्षेपण, विविध भाषांत अनुवाद, अनेक विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात पाठ्यपुस्तक म्हणून अंतर्भाव व संशोधन.

वि. स. खांडेकर समग्र अप्रकाशित, असंकलित साहित्याचे संपादन, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी समग्र वाङ्मय संपादन. डॉ. नरेंद्र दाभोळकर समग्र वाङ्मय हिंदी भाषांतर आणि महाराजा सयाजीराव गायकवाड समग्र वाङ्मय हिंदी भाषांतर प्रकल्पाचे प्रधान संपादक. वि. स. खांडेकर स्मृतिसंग्रहालय, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व शिरोडे; यशवंतराव चव्हाण स्मृतिसंग्रहालय, महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे स्मृतिसंग्रहालय, श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी येथे निर्मिती.

विविध सामाजिक, शैक्षणिक कार्यांची नोंद घेऊन 'कोल्हापूर भूषण', 'नागरी सत्कार', 'सुधारक'कार गोपाळ गणेश आगरकर राज्यस्तरीय पुरस्कार, अंनिस डॉ. भीमराव कुलकर्णी साहित्यिक कार्यकर्ता पुरस्कार (मसाप), विविध सीमाभाग, पश्चिम महाराष्ट्र येथे आयोजित साहित्य संमेलनांचे अध्यक्षपद. रेडिओ, दूरदर्शन, व्याख्यानमाला, आभासी संवाद इत्यादी माध्यमांतून अनेक मुलाखती, व्याख्याने, मार्गदर्शन, समुपदेशन कार्य.

वरील कार्य, पुरस्कार, लेखन, मानधन इत्यादींपोटी आजवर प्राप्त सर्व रक्कम समाज संकल्पित धन मानून विविध व्यक्ती, सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक संस्थांना देणगी म्हणून समर्पित.

ooo


वाय १८९-१,१०५ पु.-८.२०२४

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर

‘‘एका लक्ष्मणशास्त्र्यांमध्ये अनेक लक्ष्मणशास्त्री गुरफटलेले दिसतात. शास्त्रीबुवा म्हणजे काही कुणी साधुसंत नव्हेत. तेही संसारीच आहेत. त्यांनाही तुमच्या-आमच्या सारखेच रागलोभ आहेत, स्वार्थ-परमार्थ आहेत. त्यांच्यातही दोष आहेत. संतापणं, उसळणं हा प्रमुख दोष. दुसऱ्या क्षणाला विसरून जाणं हा प्रमुख गुण. मला ते विविध रूपांत दिसले. किंबहुना वर्षभर दिसतच राहिले. हाताखालच्या माणसाला बरोबरीच्या नात्याने, पण त्याला सलगी करू न देता वागवणारे, मित्रप्रेमात न्हाऊन निघणारे; ग्रंथावलोकनात ब्रह्मानंदी टाळी लागणारे, संतापाने लालबुंद होणारे; दोन घटका जिवाची मौजमजा करणारे; सांसारिक सुखाभिवृद्धीमुळे तृप्त झालेले; स्वतःच्या साहित्य सेवेबद्दल ओझरता उल्लेखही न करणारे, स्वतः च्या मिजाजीत वावरणारे, विद्येच्या अभिजात अभिलाषेने प्रचंड काम अंगावर घेणारे आणि गुरुजींच्या आठवणीने पुनःपुन्हा व्याकुळणारे, प्रकृतीला जपणारे असे वेगवेगळे शास्त्रीबुवा दिसतात. मजा अशी की, पुन्हा ही सर्व रूपे औटघटकेचीच असतात.’’

**– रवींद्र पिंगे**

(‘देवाघरचा पाऊस’-लेखसंग्रह १९७५ मधून)



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई